विषय निबंध
सं. क्र. १४६४
१९६३

# स्वामी विवेकानंद शतवार्षिक जयंती

## स्मारक ग्रंथ

खंड तिसरा

REFBK-0013075

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

स्वामी विवेकानंद शतवार्षिक जयंती

स्मारक ग्रंथ

# स्वामी विवेकानंद ग्रंथावली

## खंड तिसरा

REFBK-0013075

श्रीरामकृष्ण आश्रम

नागपूर

प्रकाशक--
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१.

संपादक--
स्वामी शिवतत्त्वानंद
स्वामी व्योमरूपानंद

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प २९ वें

( श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्वाधिकार सुरक्षित )

मूल्य--
बोर्ड बांधणी ७ रुपये
कापडी बांधणी ९ रुपये

मुद्रक--
श्री. दि. गो. लवाटे
मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस,
टिळक पुतळा, महाल, नागपूर-२.

# निवेदन

भगवान श्रीरामकृष्णचरणाश्रित पूज्यपाद स्वामी विवेकानंदांच्या शतवार्षिक जयंतीच्या महन्मंगल प्रसंगीं "स्वामी विवेकानंद ग्रंथावली"चा हा तृतीय खंड जनताजनार्दनाच्या हातीं समर्पितांना अतिशय आनंद होत आहे

भगवान श्रीरामकृष्णांच्या मार्गदर्शनानुसार दुश्चर साधना करीत असतां स्वामी विवेकानंदांना श्रीरामकृष्णांच्या कृपाकटाक्षाने निर्विकल्प सामाधीद्वारा जगांतील आणि जीवनांतील अंतिम सत्याचा साक्षात्कार झाला. त्यानंतर त्यांनी यथाकाल समग्र भारतांत आणि जगाच्या बऱ्याचशा भागांत सुबुद्ध संचार केला. अशा रीतीने ईश्वराची आणि माणसाची प्रत्यक्ष ओळख करून घेऊन, भगवान श्रीरामकृष्णांच्या जीवनांत युगोपयोगी स्वरूपांत साकारलेल्या सनातन सत्याच्या अनुरोधाने स्वामी विवेकानंदांनी भारताला आणि समस्त जगाला प्रदान केलेल्या अखिल जीवनस्पर्शी संदेशाचा संपूर्ण, अधिकृत मराठी अनुवाद या ऐतिहासिक पुण्यप्रसंगीं वाचकांच्या हातीं देतांना कृतकृत्यता वाटत आहे. स्वामी विवेकानंदांच्या तहत आजपर्यंत प्रकाशित झालेल्या, आणि त्याचबरोबर अगदी नव्याने उपलब्ध झालेल्या व अद्याप कोणत्याहि भाषेंत अप्रकाशित अशा सर्व व्याख्यानांचा, प्रवचनांचा, ग्रंथांचा, लेखांचा, पत्रांचा, संवाद-संभाषणांचा, मुलाखतींचा, प्रश्नोत्तरांचा, कवितांचा व इतर सर्व प्रकारच्या साहित्याचा मूळ इंग्रजींतून आणि बंगालींतून केलेला अनुवाद प्रस्तुत "ग्रंथावली"च्या एकूण दहा खंडांमधे समाविष्ट करण्यांत आला आहे. स्वामी विवेकानंदांच्या आजपर्यंत उपलब्ध झालेल्या समस्त इंग्रजी व बंगाली साहित्याचा हा प्रथमच प्रसिद्ध होत असलेला अधिकृत मराठी अनुवाद होय.

आधुनिक विज्ञान, तज्जनित तांत्रिक प्रगति, औद्योगिक क्रांति प्रभृतींनी जन्म दिलेल्या भौतिक दृष्ट्या समृद्ध, ऐहिक सुखसोयींनी युक्त, परंतु आत्महीन, जडवादी, भोगैकसर्वस्व 'आधुनिकते'ने भारताच्या

आणि जगाच्या जीवनांत जी अपूरणीय आध्यात्मिक पोकळी निर्माण केली आहे ती ह्याच संदेशाने--ह्याच अभ्युदय आणि निःश्रेयससाधक युगधर्माने भरून निघणार आहे हें त्याचें अनुशीलन केल्यास पटल्या-खेरीज राहणार नाही. त्याचबरोबर त्याने शिक्षण, समाजजीवन, राज-नीति प्रभृति जीवनाच्या महत्त्वाच्या शाखा निकोप व पुष्ट होऊन व्यक्ति, कुटुंब, समाज, राष्ट्र आणि समस्त जग ह्यांच्या स्थैर्यासाठी भरभक्कम पाया लाभेल.

भगवान श्रीरामकृष्णांचे प्रधान शिष्य स्वामी विवेकानंद हे आधु-निक मानवाचे यथार्थ प्रतिनिधि होते. आधुनिक विचारप्रवाह आणि त्यामुळे निर्माण झालेल्या समस्या, प्रश्न आणि आकांक्षा यांच्याशीं त्यांचा प्रत्यक्ष परिचय होता. ह्या सर्व आधुनिक समस्यांना अणि प्रश्नांना चिरंतन सत्याच्या अनुरोधाने स्वामी विवेकानंदांनी आधुनिक मानवाला उमजतील व पटतील अशा स्वरूपांत समर्पक आणि निर्णायक उत्तरें दिलीं आहेत.

आधुनिक मानवाच्या, आणि विशेषतः भारतीयांच्या आशा-आकांक्षा लक्षांत घेऊन उज्ज्वल भावीकाल निर्माण करण्यासाठी वर्तमानकालांत कार्यास प्रेरित करणाऱ्या ह्या ओजस्वी संदेशाला मराठी साज चढवून तो मराठी बंधु-भगिनींना सादर करण्यांत म्हणूनच कृतार्थता वाटत आहे. अस्तु.

या तिसऱ्या खंडांतील "संवाद आणि संभाषणें" हा अनुवाद (कै.) **श्री. वि. शं. बेनोडेकर,** एम्. ए., यांनी केला आहे. "संवाद आणि संभाषणें" हीं मूळ बंगालींत असून, "स्वामि-शिष्य-संवाद" नामक मूळ बंगाली ग्रंथावरूनच त्यांचा अनुवाद करण्यांत आला आहे. "ज्ञानयोगा"चा अनुवाद **स्वामी शिवतत्त्वानंद** यांनी केला आहे. "अमेरिकेंतील वृत्तपत्रांमधे प्रसिद्ध झालेले त्रोटक अहवाल" या विभा-गाचा अनुवाद **डॉ. स. अं. डांगे**, एम्. ए., पीएच्. डी., स्नातकोत्तर शिक्षण विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर, यांनी केला आहे. "पत्रें" या विभागाचा अनुवाद **स्वामी व्योमरूपानंद** यांनी केला आहे.

प्रा. डांगे यांचे आम्ही या सहकार्याबद्दल अत्यंत आभारी आहोंत.

"स्वामी विवेकानंद ग्रंथावली"च्या ह्या व इतरहि सर्व खंडांच्या संपादनाचें कार्य स्वामी शिवतत्त्वानंद आणि स्वामी व्योमरूपानंद ह्यांनी केलें आहे.

ग्रंथाच्या शेवटीं जोडलेली सुविस्तृत सूचि अभ्यासु आणि चोखंदळ वाचकांना सोयीची आणि उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

आजकालच्या कमालीच्या महागाईच्या दिवसांत एवढें प्रचंड प्रकाशन साहजिकच फारच मोठ्या आर्थिक बलावर अवलंबून होतें. तथापि ह्या महान् कार्याचें राष्ट्राच्या नवनिर्मितींतील महत्त्व ओळखून 'भारत शासना'च्या 'वैज्ञानिक संशोधन आणि सांस्कृतिक कार्य' विभागानें, 'महाराष्ट्र राज्या'च्या 'साहित्य आणि संस्कृति मंडळा'नें आणि इतरहि कित्येक सज्जनांनी आर्थिक दृष्टचा हातभार लावल्यामुळेच प्रस्तुत स्वरूपांत "ग्रंथावली"चें प्रकाशन शक्य होऊं शकलें. ह्या सहृदय आणि सढळ आर्थिक सहकार्याबद्दल आम्ही उपर्युक्त सर्व साहाय्यकांना मन:पूर्वक धन्यवाद देतों.

सरतेशेवटीं त्या सर्वशक्तिमंताच्या कृपेनें आणि अनेकांच्या अनेकविध सहकार्यानें सिद्ध झालेल्या ह्या प्रकाशनाचें उद्दिष्ट साध्य होवो अशी त्या दयाघनाला प्रार्थना करून हा वाङमय-अर्घ्य प्रभुचरणीं निवेदित करतों.

**स्वामी विवेकानंद**
**शतवार्षिक जयंती**
**१७ जानेवारी १९६३**

**--प्रकाशक**

# अनुक्रमाणिका

**संवाद आणि संभाषणें**

(संकलक--श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती) ... ३

**ज्ञानयोग**

धर्माची आवश्यकता ... ... ८९

मानवाचें सत्य स्वरूप ... ... १०६

माया ... ... १३२

माया आणि ईश्वरविषयक कल्पनेचा क्रमविकास ... १५८

माया आणि मुक्ति ... ... १७७

ब्रह्म आणि जगत् ... ... १९३

सर्वांभूतीं भगवद्दर्शन ... ... २१६

आत्मसाक्षात्कार ... ... २३३

बहुत्वांत एकत्व ... ... २६४

आत्म्याचा मुक्त स्वभाव ... ... २८७

विश्व (बहिर्जगत्) ... ... ३०८

विश्व (अंतर्जगत्) ... ... ३२२

अमरत्व ... ... ३४३

आत्मा आणि त्याच्या विकासाच्या तीन अवस्था ... ३६१

आत्मा--त्याचा बंध आणि मोक्ष ... ... ३८३

मानवाचें सत्य आणि आभासमय स्वरूप ... ३९४

**अमेरिकेंतील वृत्तपत्रांमधे प्रसिद्ध झालेले त्रोटक अहवाल**

भारत--धर्म आणि चालीरीती ... ... ४३३

प्रदर्शनाच्या मेळाव्यांतील हिंदु ... ... ४३९

सर्वधर्मपरिषद ... ... ४४३
वैयक्तिक वैशिष्टयें ... ... ४४६
पुनर्जन्म ... ... ४४८
हिंदु सभ्यता ... ... ४५०
एक मनोरंजक व्याख्यान ... ... ४५२
हिंदु धर्म ... ... ४५२
हिंदु संन्यासी ... ... ४५५
सहिष्णुत्वाची आवश्यकता ... ... ४५७
हिंदुस्थानांतील चालीरीती ... ... ४६०
हिंदु तत्त्वज्ञान ... ... ४६५
चमत्कार ... ... ४६८
मानवाचें देवत्व ... ... ४६९
ईश्वरप्रेम ... ... ४७७
हिंदुस्थानांतील स्त्रिया ... ... ४८०
पत्रें ... ... ४८७
सूचि ... ... ५३७



# संवाद आणि संभाषणें

अलौकिक त्याग, प्रबल भक्तिप्रेम व दीनता वगैरेंचा उल्लेख करून ते म्हणाले, "वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती" (सत्य काय हें जाणून घेण्याच्या व्यर्थ शोधांतच आम्ही हैराण झालों आहोंत, पण याउलट, यश मिळाल्याने, हे मधुकरा! तूं मात्र कृतार्थ झाला आहेस). आपलें हें म्हणणें, नागमहाशयांना कळविण्यास त्यांनी शिष्याला सांगितलें. नंतर येणाऱ्याजाणाऱ्यांच्या वाढत्या गर्दीमुळे मनमोकळें बोलतां येणार नाही असें पाहून त्याला व स्वामी तुरीयानंदांना पश्चिमेच्या बाजूस असलेल्या लहान खोलींत ते घेऊन गेले व शिष्याला उद्देशून त्यांनी विवेकचूडामणींतील पुढील श्लोक म्हटला--

"मा भैष्ट विद्वन् तव नास्त्यपायः
संसारसिन्धोस्तरणेऽस्त्युपायः ।
येनैव याता यतयोऽस्य पारं
तमेव मार्गं तव निर्दिशामि ।।"

--"हे सुजाणा! भयाचें कांहीहि कारण नाही. विनाशाचें तुला भय नाही. हा संसारसागर तरून जाण्यालाहि उपाय आहेच. त्याचाच अवलंब करून वीतराग, शुद्धसत्त्व योगीजन हा संसारसागर तरून गेले आहेत. तोच सर्वश्रेयस्कर मार्ग मी तुला दाखवितों." त्यांनी त्याला आचार्य शंकरांचा विवेकचूडामणि हा ग्रंथ वाचण्यास सांगितलें.

हें ऐकून मंत्रदीक्षा घेण्याबाबत तर स्वामीजी सुचवीत नाहीत ना असा एक विचार शिष्याच्या मनांत येऊन गेला. आतापर्यंत तो अत्यंत कांटेकोरपणें आचारविचार पाळणारा कर्मठ व वेदान्तमतवादी होता. गुरु करण्याबाबत अद्यापहि त्याचें निश्चित कांहीच ठरलें नव्हतें. आणि वर्णाश्रमाचे व्यवहार पाळण्याबाबत तो फार आग्रही होता.

अशा प्रकारें नाना विषयांवर बोलणीं चाललीं असतांनाच 'मिरर' पत्राचे संपादक श्रीयुत नरेंद्रनाथ सेन हे बाहेर आल्याची कुणीं तरी वर्दी दिली. त्यांना आंतच घेऊन यावयास स्वामीजींनी सांगितलें. नरेंद्रबाबूहि त्या लहान खोलींत येऊन बसले, व अमेरिका आणि इंग्लंडबद्दल त्यांनी स्वामीजींना अनेक प्रश्न विचारावयास सुरवात केली. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देतांना स्वामीजी म्हणाले की, "अमेरिकन लोकांप्रमाणे सहृदय, उदार, आतिथ्यशील व नवनवीन भाव ग्रहण करण्यासाठी उत्सुक

असलेली जात जगांत अन्यत्र आढळून येत नाही. अमेरिकेंत जें कांही कार्य झालें तें माझ्या बळावर नाही. अमेरिकन लोकच मुळांत सहृदय असल्याने त्यांनी हा वेदान्त स्वीकारला." इंग्लंडबद्दल बोलतांना स्वामीजी म्हणाले, "इंग्रज लोकांइतकी सनातनी वृत्तीची, रूढिप्रिय जात जगांत नाही. कोणत्याहि नवीन मताला ते सहजींच मान्यता देतील हें शक्य नाही. पण सायासाने एकदा का त्यांना एखादें नवीन मत पटवून दिलें की मग मात्र ते लोक तें मत सोडतील असें होणार नाही. अशा प्रकारचा दृढनिश्चय अन्य कोणत्याहि लोकांत आढळत नाही. म्हणूनच सभ्यता आणि बलशालीत्व यांत त्यांना आज साऱ्या जगांत अग्रपूजेचा मान मिळतो आहे."

योग्य प्रचारक मिळाल्यास अमेरिकेपेक्षा इंग्लंडमध्ये वेदान्तकार्य अधिक स्थायी होण्याची शक्यता आहे असें सांगून ते म्हणाले, "मी फक्त पायाभरणीचें काम केलें आहे. यानंतर जाणाऱ्या प्रचारकांनी जर अशाच रीतीने काम पुढे चालू ठेविलें तर कालान्तराने खूपच कार्य होईल."

नरेंद्रबाबू :—अशा प्रकारच्या धर्मप्रचाराचें भविष्यकालांत आम्हांला काय फळ मिळेल ?

स्वामीजी :—आमच्या देशाजवळ आहे काय तो फक्त हा वेदान्तधर्म. पाश्चिमात्य सभ्यतेच्या तुलनेने आपल्यापाशी दुसरें जवळजवळ कांहीच नाही. पण जो सगळ्या मतांच्या, सगळ्या पंथांच्या लोकांना धर्मलाभाचा समान अधिकार देतो, त्या या विश्वधर्म वेदान्ताचा प्रचार झाल्यास पाश्चात्त्य सभ्यतेंतील लोकांना कळून येईल की या भारतवर्षांत एकेकाळीं केवढ्या एका अद्भुत धर्मभावाचें स्फुरण झालें होतें आणि अद्यापहि होत आहे. वेदान्ताच्या या प्रचारानेच पाश्चिमात्यांना आमच्याबद्दल श्रद्धा, सहानुभूति वाटू लागेल. त्यांच्यांत या भावनांचा उदय झाल्याचें तर आताच दिसून येत आहे. या तऱ्हेने त्यांची यथार्थ श्रद्धा व सहानुभूति आपण संपादन करूं शकल्यास त्यांच्याजवळून भौतिक विज्ञानादिकांचें शिक्षण घेऊन हा जीवनसंग्राम आपण अधिक योग्य प्रकारें लढूं शकूं. मोबदल्यांत ते आपल्यापासून हा वेदान्त ग्रहण करतील व त्यायोगें पारमार्थिक कल्याण साधून घेण्यास समर्थ होतील.

नरेंद्रबाबू:–अशा प्रकारच्या देवाणघेवाणीने आपल्या राजकीय उन्नतीची कांही आशा आहे का ?

स्वामीजी:––हे पाश्चात्त्य लोक म्हणजे महापराक्रमी असुर विरोचनाचे वंशज. आपल्या बाहुबलावर ते पंचमहाभूतांकडून कळसूत्री बाहुलीप्रमाणे कामें करून घेतात. इंग्रजांशीं आपण करीत असलेल्या झगडयांत या स्थूल भौतिक शक्तींच्या जोरावर आपण एक ना एक दिवस विजयी होऊन स्वतंत्र होऊं शकूं अशी जर आपली धारणा असेल तर ती साफ चुकीची आहे. बलाच्या दृष्टीने विचार केल्यास हिमालयासमोर ठेवल्याने अति क्षुद्र दिसणाऱ्या लहानशा गोटयासारखी आपली अवस्था आहे. माझी काय कल्पना आहे माहीत आहे ? आम्ही वेदान्तोक्त धर्माचें गूढ रहस्य पाश्चात्त्य जगांत प्रसारित करून त्या बलाढच लोकांची श्रद्धा व सहानुभूति संपादन करूं शकूं व अशाने धर्माच्या बाबतींत त्यांचें गुरुत्व प्राप्त करून घेऊं आणि याउलट ऐहिक विषयांच्या बाबतींत ते आपले गुरु होतील. ज्या दिवशीं धर्माची बाब भारतवासी लोक पाश्चिमात्यांच्या हातीं सोपवून देऊन धर्मरहस्य समजून घेण्यासाठी त्यांच्या पायाशीं बसून त्यांच्या तोंडाकडे पाहतील, त्या दिवशीं या अधःपतित देशाची राष्ट्रीय अस्मिता निःशेष नष्ट होईल. 'हें द्या', 'तें द्या' अशी सदोदित भीक मागून कांहीहि होणें शक्य नाही. या आदानप्रदानाने दोघांमध्ये श्रद्धासहानुभूतीचा एक प्रेमळ ऋणानुबंध निर्माण झाल्यावर केविलवाण्या स्वराने सारखी भीक मागत राहण्याचें कांही कारणच उरणार नाही. आपण होऊनच ते साऱ्या गोष्टी करतील. माझा तर ठाम विश्वास आहे की वेदान्तप्रचाराने या व पाश्चिमात्य देशांचा उभयपक्षीं लाभच होईल. माझ्या दृष्टीने वेदान्ताच्या तुलनेने राजकारण हा गौण उपाय ठरतो. माझा हा विश्वास कार्यान्वित करण्यांतच मी माझें जीवन वेचीन. अन्य कोण्या मार्गाने भारताचें कल्याण होईल असें तुम्हांला वाटत असल्यास तुम्ही त्या मार्गाने जा.

स्वामीजींच्या विधानांशीं आपली संपूर्ण संमति दाखवून कांही वेळाने नरेंद्रबाबू निघून गेले. स्वामीजींचें सारें बोलणें ऐकून शिष्य तर अगदी थक्क होऊन गेला व स्वामीजींच्या तेजोद्दीप्त मुखाकडे अनिमेष नेत्रांनी पाहत राहिला.

दा. क्र. 93069

# संवाद आणि संभाषणें

(संकलक – श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती)

## ( १ )

श्री. प्रियनाथ मुखोपाध्याय यांचें घर, बागबाजार, कलकत्ता.

इ. स. १८९७

परदेशांतील प्रचार संपवून प्रथमच भारतांत येऊन कलकत्त्यांत पदार्पण करण्याला स्वामीजींना आज तीनचार दिवस झाले आहेत. अनेक दिवसांनंतर त्यांचें पुण्यदर्शन झाल्याने श्रीरामकृष्णभक्तमंडळींच्या आनंदाला आता जणु सीमाच नाही. भक्तमंडळींपैकी सुखवस्तु लोक मोठ्या आदराने स्वामीजींना आपल्या घरीं बोलावून स्वतःला धन्य व कृतार्थ मानताहेत. आज दुपारीं बागबाजारांतील राजवल्लभ आळींत राहणाऱ्या श्रीरामकृष्णभक्त श्रीयुत प्रियनाथ मुखोपाध्याय यांचे येथे स्वामीजींना निमंत्रण आहे. ही बातमी कळल्याने अनेक भक्त त्यांच्या घरीं उपस्थित झाले आहेत. शिष्य (श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती) देखील लोकांच्या तोंडून ही बातमी कळल्याने दुपारीं अडीचच्या सुमाराला त्यांच्या घरीं हजर झाला. स्वामीजींशीं अद्यापहि त्याचा प्रत्यक्ष परिचय झालेला नाही. याच वेळीं स्वामीजींचें प्रत्यक्ष दर्शन होण्याची संधि प्रथमच त्याच्या जीवनांत त्याला लाभली होती.

शिष्य येतांच स्वामीजींचे एक गुरुबंधु स्वामी तुरीयानंद यांनी त्याला स्वामीजींकडे नेऊन त्याचा त्यांच्याशीं परिचय करून दिला. मठांत आल्यानंतर, शिष्याने रचलेलें श्रीरामकृष्णस्तोत्र वाचून यापूर्वीच स्वामीजींनी त्याच्यासंबंधी माहिती ऐकिली होती. श्रीरामकृष्णांचे श्रेष्ठ भक्त नागमहाशय यांच्याकडे त्याचें जाणेंयेणें आहे ही गोष्टहि स्वामीजींच्या कानीं गेली होती.

स्वामीजींना प्रणाम करून त्यांच्याजवळ बसतांच त्यांनी शिष्याला नागमहाशयांसंबंधी संस्कृतांत कुशल प्रश्न विचारले, व नागमहाशयांचा

नरेंद्रबाबू निघून गेल्यावर गोरक्षण मंडळाचा एक प्रचारक स्वामीजींच्या भेटीला आला. पूर्ण जरी नसला तरी त्याचा वेष कांहीसा संन्याशासारखा होता. डोक्याला भगव्या रंगाचा फेटा. चेहरा पाहतांच तो उत्तरहिंदुस्थानी असल्याची खात्री पटावी. तो आल्याचें कळतांच स्वामीजी समोरच्या खोलींत आले. स्वामीजी येतांच त्यांना वंदन करून त्यानें गाईचें एक चित्र स्वामीजींना दिलें. जवळच बसलेल्या माणसाच्या हातीं तें चित्र देऊन स्वामीजींनी त्यांच्याशीं बोलावयास सुरवात केली.

स्वामीजी:—आपल्या या मंडळाचा उद्देश काय ?

प्रचारक:—आम्ही देशांतील गाईंची कसायांच्या हातून सुटका करतों. जागोजाग गोशाळा बांधून तेथे रोगी, दुबळ्या आणि कसायांच्या हातून सोडविलेल्या गाईंचें पालनपोषण करतों.

स्वामीजी:—फार चांगलें काम आहे आपलें हें. हा खर्च चालवायला पैशांची काय व्यवस्था करतां तुम्ही ?

प्रचारक:—आपल्यासारखे उदार लोक दयाबुद्धीने जें कांही देतात त्यांतूनच हा खर्च आम्ही चालवितों.

स्वामीजी:—आतापावेतो आपल्यापाशी किती पैसा जमला आहे ?

प्रचारक:—मारवाडी व्यापारी या कामांत सढळ हाताने पैसा ओततात. त्यांनी या कामासाठी बराच पैसा दिलेला आहे.

स्वामीजी:—मध्यभारतांत भयंकर दुष्काळ पडला आहे. खुद्द सरकारने नऊ लाख लोक 'अन्न अन्न' करीत मेल्याचें आपल्या अहवालांत जाहीर केलें आहे. आपल्या मंडळाने या भुकेलेल्यांना मदत करण्यासाठी कांही करण्याचें ठरविलें आहे काय ?

प्रचारक:—असल्या दुष्काळाबिष्काळाच्या कामांत आम्ही भाग घेत नाहीं. गोमातेचें रक्षण करण्याच्या हेतूनेच आमचें हें मंडळ स्थापन झालें आहे.

स्वामीजी:—लाखोंच्या संख्येने 'अन्न अन्न' करून आपल्या सारखींच माणसें दुष्काळांत मरत असतांना, शक्य असूनहि त्यांना पोटाला अन्न देऊन मदत करणें तुम्हांला योग्य वाटत नाही काय ?

प्रचारकः——नाही. हा दुष्काळ म्हणजे त्यांच्या कर्माचें, पापाचेंच फळ होय. जसें करावें तसें भरावें. जसें कर्म तसें फळ.

प्रचारकाचें तें उत्तर ऐकून स्वामीजींचें मुखमंडल अगदी लाल झालें आणि त्यांच्या त्या विशाल डोळ्यांतून जणु आग बाहेर पडूं लागली. पण संतापाची ती ऊर्मि आंतल्या आंत दाबून ते म्हणाले, "ज्या सभा, जीं मंडळें माणसासारख्या माणसाकडे सहानुभूतीच्या दृष्टीने पाहत नाहीत, आपलेच बंधुबांधव उपासमारीने तडफडत मरत असल्याचें पाहूनहि त्यांचे प्राण वांचविण्यासाठी एक मूठ धान्य न देतां पशुपक्ष्यादिकांचे प्राण वांचविण्यासाठी धान्याचे ढीगचे ढीग वांटण्याकरता जे पुढे सरसावतात, त्यांच्याबद्दल मला काडीचीहि सहानुभूति वाटत नाही. अशांच्याकडून समाजाचा कांही विशेष फायदा होणें सर्वथा अशक्य होय असें माझें मत आहे. माणूस आपल्या कर्माने मरतो असें म्हणून कानावर जर हात ठेवले तर जगांत प्रयत्नाला कांही अर्थच राहणार नाही. आणि मग गाईंना वांचविण्याच्या तुमच्या या धडपडीला तरी काय अर्थ ? आपल्या कर्मांनीच गाई कसायाहातीं पडतात आणि मरतात. आम्ही त्यांच्यासाठी अंग मोडून काम करण्याला कांही अर्थच नाही.

प्रचारक तर हें ऐकून किंचित् हादरलाच. पण स्वतःला सावरून तो म्हणाला, "आपण म्हणतां तें तर खरेंच. पण शास्त्रांत सांगितलें आहे की 'गाय आपली आई आहे.' "

यावर किंचित् हसून स्वामीजी म्हणाले, "हो, गाय आपली आई हें तर उघडच दिसतें आहे. एरवी असली अलौकिक प्रजा आणखी कुणापोटीं बरें निपजणार ?" स्वामीजींनी मारलेला हा टोमणा त्या प्रचारकाच्या लक्षांतच आला नसावा असें दिसलें ! अधिक चर्चा न करतां, स्वामीजींनी या कार्याला कांही मदत करावी अशी त्याने विनंती केली.

स्वामीजीः——हें बघा, मी तर हा असा संन्यासी, फकीर. तुम्हांला द्यावयाला माझ्यापाशी कुठून बरें पैसा येणार ? आणि यदाकदाचित् माझ्या हातीं पैसा आलाच तर तो मी आधी माणसांच्या सेवेसाठी खर्च करीन. प्रथम वांचवावयाला हवा माणूस——आधी त्याला

द्यावयाला हवें अन्नदान, विद्यादान, धर्मदान. हें सारें करून जर माझ्या हातीं कांही शिल्लक राहिलें तर मी तुमच्या संस्थेला कांही देऊं शकेन.

स्वामीजींचें बोलणें ऐकून त्यांना नमस्कार करून तो प्रचारक निघून गेला. तो गेल्यावर स्वामीजी पुढे म्हणाले, "काय पण बोलला ! म्हणे की माणूस मरतो आपल्या कर्मांनी, त्याला दया दाखवून काय होणार ? देशाचा अधःपात झाल्याचें ह्याच्याइतकें दुसरें स्पष्ट प्रमाण नाही. हिंदुधर्मांतील तुमचा कर्मवाद कुठल्या अधोगतीला जाऊन पोहोचला आहे हें पाहिलें ? माणसासारखा माणस असूनहि माणसासाठी ज्याचें हृदय द्रवत नाही, त्याला काय माणूस म्हणायचें ?" हें बोलत असतां स्वामीजींचें सारें अंग क्षोभ आणि दुःख यांनी थरारून गेलें. नंतर त्यांनी शिष्याला पुनः भेटावयास येण्याबद्दल सांगितलें.

शिष्यः---आपण उतरणार आहांत कुठे ? बहुतेक उतरणार असाल एखाद्या मोठ्या माणसाकडे. ते काय मला तेथे येऊं देतील ?

स्वामीजीः---सध्या तरी मी कधी आलमबाजार-मठांत तर कधी गोपाललाल शील यांच्या काशीपूरच्या उद्यानगृहांत राहणार आहे. तुम्ही तेथे या.

शिष्यः---महाराज, अगदी आपल्या एकट्याशींच बोलण्याची माझी फार इच्छा आहे.

स्वामीजीः---ठीक आहे. तसें असेल तर मग एखाद्या दिवशीं रात्रीं या. खूप बोलूं वेदान्तावर मग.

शिष्यः---महाराज, आपल्याबरोबर कांही इंग्रज व अमेरिकन लोक आल्याचें मीं ऐकलें आहे. माझ्या वेषानें, आचार-व्यवहारानें वा बोलण्यानें त्यांना कांही त्रास तर होणार नाही ना ?

स्वामीजीः---तीहि तर माणसेंच आहेत ना ? त्यांतूनहि ते सारे लोक आहेत वेदान्तधर्मनिष्ठ. तुमच्याशीं बोलून तर त्यांना उलट आनंदच होईल.

शिष्यः---महाराज, वेदान्ताच्या अधिकाऱ्याचीं म्हणून सांगितलेलीं सारीं लक्षणें आपल्या ह्या पाश्चात्य शिष्यांत आलीं कोठून ? शास्त्रें सांगतात, 'अधीतवेदवेदान्त, कृतप्रायश्चित्त, नित्यनैमित्तिक-

कर्मानुष्ठानकारी, युक्ताहारविहारी व विशेषतः चतुःसाधनसंपन्न झाल्याशिवाय वेदान्ताचा अधिकारी होतां येत नाही.' आपले पाश्चात्त्य शिष्य हे आधीच तर अब्राह्मण. त्यांत पुनः खाण्यापिण्याच्या बाबतींत त्यांना कांही विधिनिषेध नाही. अशांना कसा काय समजणार आहे वेदान्त ?

स्वामीजी:——त्यांच्याशीं बोला तर खरें आधी एकदा. म्हणजे कळेल मग त्यांना वेदान्त समजला आहे की नाही तें.

शिष्य म्हणजे एक कर्मठ आचारप्रिय हिंदु आहे ही गोष्ट आतापावेतो स्वामीजींच्या लक्षांत आली असावी.

यानंतर स्वामीजी श्रीरामकृष्णांच्या कांही भक्तांबरोबर बागबाजारांतील श्री. बलराम बोस यांच्या घरीं गेले आणि शिष्यहि वटतला मोहोल्ल्यांतून विवेकचूडामणीची एक प्रत घेऊन दर्जीपाड्यांतील आपल्या घरीं परतला.

## (२)

कलकत्ता ते काशीपूरचा रस्ता व श्री. गोपाललाल शील यांचा बाग.

इ. स. १८९७

आज दुपारच्या वेळीं स्वामीजी श्री. गिरीशचंद्र घोष * यांचे घरीं आराम करीत होते. शिष्याने येऊन प्रणाम केल्यावर त्याला आढळून आलें की स्वामीजी गोपाललाल शील यांच्या उद्यानगृहाकडे जाण्याच्या तयारींत आहेत. दारीं गाडी (बगी) तयार होती. 'चल माझ्याबरोबर' असें ते शिष्याला म्हणाले. शिष्याने निघण्याची तयारी दाखवितांच स्वामीजी त्याच्यासह गाडींत बसले व गाडी सुरू झाली. चितपूर रस्त्याला गाडी येऊन गंगादर्शन होतांच स्वामीजी 'गंगातरंग-रमणीय-जटाकलापम्' इत्यादि श्लोक आपल्याशींच गुणगुणूं लागले. मंत्रमुग्धाप्रमाणे शिष्य त्या अलौकिक स्वरलहरी स्तब्धपणें ऐकूं लागला. असा कांही वेळ जात असतांनाच एक रेल्वे एंजीन चितपूर हायड्रॉलिक ब्रिजकडे जातांना पाहून स्वामीजी म्हणाले, "बघ, कसें एखाद्या सिंहासारखें

* बंगालचे सुविख्यात नट व नाटककार आणि श्रीरामकृष्णांचे एक अग्रगण्य भक्त.

जात आहे तें." यावर शिष्य म्हणाला, "तें तर जड आहे. त्यामागे मानवी चेतनशक्ति कार्य करीत आहे म्हणूनच तें चालतें ना ? असल्या त्याच्या या गतीला काय महत्त्व ? यांत त्याची कसली बहादुरी ?"

स्वामीजी:---सांग पाहूं तूं म्हणतोस त्या चैतन्याचें लक्षण.

शिष्य:---कां बरें ? बुद्धिपूर्वक क्रिया हें चैतन्याचें लक्षण आहे.

स्वामीजी:--प्रकृतीविरुद्ध जें जें म्हणून बंड करून उठतें, तेंच चेतन. तेथेच विकास झालेला असतो चैतन्याचा. बघ ना, एखाद्या क्षूद्र मुंगीला चिरडण्याचा प्रयत्न कर, ती देखील प्राणरक्षणासाठी झगडण्याचा प्रयत्न करील. जेथे प्रयत्न आहे, जेथे म्हणून झुंजण्याची ईर्ष्या आहे, तेथे तेथे जीवनाचें चिन्ह असतें, तेथेच चैतन्याचा विकास झालेला असतो.

शिष्य:---हाच नियम काय मानवाला, मानवसमाजांनाहि लावतां येईल ?

स्वामीजी:–जरा डोळसपणें जगाचा इतिहास वाच आणि मग पाहा हा नियम लावतां येतो की नाही तें. तुम्ही हतभाग्य लोक सोडल्यास बाकी साऱ्यांनाच हा नियम लागू पडत असल्याचें तुला आढळून येईल. सध्या साऱ्या जगांत तुम्हीच एक काय ते जडवत् पडून आहांत. तुमच्यावर जणु संमोहिनी विद्येचा प्रयोग करण्यांत आला आहे. फार दिवसांपासून अन्य लोक तुम्हांला सांगत आले की, 'तुम्ही दीन आहांत, कसलीच ताकद नाही तुमच्यांत, तुम्ही दुबळे.' आणि तें ऐकून आज हजार वर्षें होत आलींत, तुम्हांलाहि वाटूं लागलें आहे की, 'आम्ही हीन आहोंत---सर्व बाबतींत अगदी नादान आहोंत.' तीच भावना सतत उराशीं बाळगल्याने आज झालाहि आहांत तसेच. (स्वत:कडे बोट दाखवून ) हा माझाहि देह घडला आहे तुमच्याच देशाच्या मातीनें ना ? पण तसले विचार कधी चुकूनहि माझ्या मनांत आले नाहीत, व यामुळेच ना त्या भगवंताच्या दयेने, जे सदान्कदा आम्हांला तुच्छ समजतात त्यांनीच मला देवतुल्य मानलें व आजहि मानतात ? तुम्ही देखील 'आपल्यांत अनंत शक्ति वसत आहे, अपरंपार ज्ञान साठविलें आहे, अदम्य उत्साह रसरसतो आहे' असें चिंतन कराल, आणि त्याबरोबरच जर या अंत:स्थ शक्तीला जागे करूं शकाल तर तुम्हीहि माझ्यासारखे व्हाल.

शिष्य:—अशाप्रकारची भावना करण्याची शक्ति कुठे आहे महाराज ? आणि अगदी बाळपणापासून या गोष्टी सांगेल, समजावून देईल असा शिक्षक वा उपदेशक तरी कुठे आहे ? आजकाल शिक्षण म्हणजे नोकरीचें साधन हीच एक गोष्ट सर्वांपासून ऐकत आलों आहोंत आणि ऐकत आहोंत.

स्वामीजी :— एवढ्यासाठीच तर त्याच्या उलट शिकवायला, दाखवायला आम्ही आलों आहोंत. तुम्ही लोक आमच्याजवळून हीं तत्त्वें शिका, समजावून घ्या, त्यांचा अनुभव घ्या आणि नंतर नगरानगरांतून, गावागावांतून, खेड्यापाड्यांतून त्यांचा प्रचार करा. साऱ्यांपाशी जाऊन त्यांना उच्चरवाने सांगा, 'उठा, जागे व्हा. आता झोपून चालावयाचें नाही, साऱ्या उणिवा सारें दुःख समूळ नष्ट करण्याची शक्ति तुमच्यांतच आहे. यावर दृढ विश्वास ठेवा म्हणजे ती शक्ति आपोआपच जागृत होईल.' या गोष्टी सतत साऱ्यांच्या कानींकपाळीं ओरडून सांगा, आणि याबरोबरच अगदी साध्या, सरळ, सोप्या भाषेंत सायन्स, तत्त्वज्ञान, भूगोल आणि इतिहासादिकांचीं मूलतत्त्वें आम जनतेंत प्रसृत करा. कांही अविवाहित तरुणांसाठी एक शिक्षणकेंद्र उघडून तेथे त्यांना सुरवातीला या गोष्टी शिकवाव्या आणि त्यांच्याच द्वारें पुढे हें कार्य करून घ्यावें असा माझा मानस आहे.

शिष्य :— पण महाराज, या आहेत साऱ्या पैशाच्या गोष्टी. हा पैसा कुठून आणणार आहांत आपण ?

स्वामीजी :— अरें, हें तूं काय बोलतो आहेस ? माणूसच तर पैसा निर्माण करतो ना ? पैशांनी माणसें निर्माण झाल्याचें का कधी कुठे ऐकलें आहेस ? तूं जर आपलें मन आणि मुख एक करूं शकशील, बोलल्यासारखें वागूं शकशील तर पैसा तुझ्या पायाशीं पाण्यासारखा वाहत येईल.

शिष्य :— बरें, तें असो महाराज, आपण म्हणतां त्याप्रमाणे समजा पैसा जमला आणि हें आपलें सत्कार्य सुरूहि झालें. पण म्हणून काय ? यापूर्वीहि अनेक थोर महापुरुषांनी कितीतरी सत्कार्यें केलीं. पण आज कुठे त्यांचा मागमूस तरी दिसतो काय ? आपण म्हणतां त्या कार्याचेंहि काळाच्या ओघांत अखेर हेंच होणार हें निश्चित. तेव्ह

असल्या या प्रयत्नांची तरी काय आवश्यकता ?

स्वामीजी:--पुढे काय होणार या विचारानेच जे हैराण होतात त्यांच्या हातून कांहीहि कार्य होणें शक्य नाही. जें सत्य म्हणून उमगलें तें तात्काळ कृतींत उतरवावयास हवें. पुढे काय होणार या विचारांची गरजच काय ? दो घडींचें तर हें जीवन. त्यांतच जर क्षणोक्षणीं नफा-नुकसानीचा हिशोब करीत बसलों तर कांही तरी साधतां येणें शक्य आहे काय ? फळाफल देण्याचा एकमात्र अधिकारी भगवान. त्याला वाटेल तें तो करील. त्यासाठी डोकें तापविण्याचें तुला काय कारण ? तिकडे नजर न देतां तुला जें करावयाचें आहे तें कर.

याप्रमाणे बोलणें चाललें असतांनाच गाडी उद्यानगृहाजवळ येऊन पोहोचली. स्वामीजींच्या दर्शनासाठी अनेक लोक कलकत्त्याहून त्या बगिच्यांत आले होते. गाडींतून उतरून स्वामीजी खोलींत येऊन बसले व जमलेल्या मंडळींशीं बोलूं लागले. मूर्तिमंत सेवास्वरूपच असे स्वामीजींचे इंग्रज शिष्य गुडविन्साहेब जवळच उभे होते. त्यांच्याशीं आधीच परिचय झालेला असल्याने शिष्य त्यांचेजवळ गेला व त्या दोघांत स्वामीजींसंबंधी नाना प्रकारच्या गोष्टी सुरू झाल्या.

संध्याकाळच्या वेळीं स्वामींजीनी शिष्याला बोलावून "तूं कठोपनिषद् पाठ केलें आहेस काय ?" म्हणून विचारले.

शिष्य:--नाही महाराज. शांकरभाष्यासहित तें मीं वाचलें मात्र आहे.

स्वामीजी:--- साऱ्या उपनिषदांमध्ये असें सुंदर उपनिषद् दुसरें नाही. जमल्यास तें तूं पाठ करून टाक. नचिकेत्याप्रमाणे श्रद्धा, साहस, विवेक व वैराग्य जीवनांत आणण्याचा प्रयत्न कर. तरच कांही लाभ. तें नुसतें वाचून काय होणार आहे ?

शिष्य:--या दासाला त्या साऱ्या अनुभूति उपलब्ध होतील अशी कृपा करा.

स्वामीजी:--ठाकुरांचें (श्रीरामकृष्णांचें) तें वचन लक्षांत आहे ना? ते म्हणत, 'कृपावायु तर सदाच वाहतो आहे. तूं तुझ्या नावेचें शीड फक्त उभारून दे.' कोणाचेंहि कांही करून देणें कोणाला तरी शक्य आहे का बाबा ? आपलें नशीब आपल्या हातीं. गुरु केवळ हें पटवून देतात,

इतकेंच काय तें. बीजांत वसत असलेल्या शक्तीनेच झाड होतें. पाणी, हवा या साऱ्या गोष्टी केवळ साहाय्यक असतात, इतकेंच.

शिष्यः—पण असल्या बाह्य साहाय्याची तर आवश्यकता असते ना महाराज ?

स्वामीजीः—ती तर असतेच. पण असल गोष्ट काय ती माहीत आहे ? मुळांत आंतच जर कांही सार नसेल तर बाहेरून मिळणाऱ्या शेकडो साहाय्यांचाहि कांही उपयोग होत नाही. असें असलें तरी प्रत्येकाचा आत्मानुभूतीचा काल येतोच. कारण मुळांत सगळेंच ब्रह्मस्वरूप आहेत. उच्चनीच अशा प्रकारचा भेद करावयाचा तो केवळ या ब्रह्माच्या कमीअधिक प्रकाशामुळे. योग्य समयीं सर्वांतच तें पूर्ण प्रकाशित वा अभिव्यक्त होणार. म्हणूनच शास्त्रें म्हणतात, **'कालेनात्मनि विन्दति'** (योग्य काळीं ह्या सत्याचा स्वतःच्या अंतरात्म्यांतच साक्षात्कार होतो).

शिष्यः— हें सारें होणार तरी केव्हा महाराज ? शास्त्रांतून तर वाचतों की आमचे कितीतरी जन्म गेले आहेत अज्ञानांतच.

स्वामीजीः—पण म्हणून भिण्याचें काय कारण? या जन्मांत ज्या अर्थी तूं इथे येऊन पोहोचला आहेस, त्याअर्थी या खेपेस साऱ्या गोष्टी खात्रीने साध्य होतील. मुक्ति, समाधि या साऱ्या गोष्टी म्हणजे ब्रह्माभिव्यक्तीच्या मार्गांतील अडथळे दूर करणें. एरवी आत्मा तर सूर्याप्रमाणे नित्यच प्रकाशमान आहे. अज्ञानाच्या ढगानें तो झाकला गेला आहे एवढेंच. तो मेघ दूर सारून देणें आणि सूर्य प्रकाशणें, दोन्ही एकच. लगेच 'भिद्यते हृदयग्रन्थिः' (हृदयाच्या सर्व गांठी तुटतात) ह्या अवस्थेची प्राप्ति. सारे धर्ममार्ग याच ब्रह्माभिव्यक्तीच्या मार्गांतील अडथळे दूर करण्याचा उपदेश देत असलेले आढळतील. ज्याला ज्या मार्गाने आत्मानुभूति होते, त्याच मार्गाचा तो लोकांना उपदेश देत असतो. सर्वांचें उद्दिष्ट मात्र एकच—आत्मज्ञान किंवा आत्मदर्शन. या बाबतींत सर्व जातींना—जीवमात्राला अगदी समान अधिकार आहे. हें सर्वच पक्षोपपक्षांना संमत असें मत आहे.

शिष्यः—महाराज, शास्त्रांतून या गोष्टी जेव्हा वाचतों किंवा ऐकतों, तेव्हा अद्यापहि आत्मवस्तूचा लाभ झाला नाही या विचाराने

चित्तांत भयंकर अशांति उत्पन्न होते.

स्वामीजी:——यालाच म्हणतात व्याकुळता.ही ज्या प्रमाणांत वाढेल त्या प्रमाणांत अडथळा आणणारे ढग विरून जातील, त्याच प्रमाणांत श्रद्धा दृढ होईल. आत्मा हळूहळू करतलामलकवत् प्रत्यक्ष होईल. अनुभूतिच धर्माचा प्राण होय. कांही आचारनियम तर सारेच पाळूं शकतात, कांही विधिनिषेधांचें पालनहि सारेच करूं शकतात. पण असल्या अनुभूतीसाठी किती लोकांचे प्राण व्याकुळ होतात ? व्याकुळता——ईश्वरलाभासाठी किंवा आत्मज्ञानासाठी अगदी वेडे होऊन जाणें म्हणजेच खरी धर्मप्रवणता. भगवान् श्रीकृष्णांसाठी गोपी ज्याप्रमाणे वेड्या होऊन गेल्या होत्या त्याप्रमाणे व्हावयास हवें, तशी व्याकुळता आत्मदर्शनासाठी हवी असते. गोपींच्या मनांत देखील, थोड्याफार प्रमाणांत का होईना, स्त्रीपुरुष भेदाची अस्पष्ट जाणीव होती. यथार्थ आत्मज्ञानांत लिंगभेदाचा लेशमात्र मागमूसहि असत नाही.

बोलण्याच्या ओघांत स्वामीजींनी जयदेवाच्या 'गीतगोविंदा'बद्दल गोष्ट काढली. ते म्हणाले, "जयदेवच संस्कृतांतील शेवटचा कवि. पण अनेक ठिकाणीं अर्थापेक्षा शब्दलालित्याकडेच जयदेवाने अधिक लक्ष पुरविल्याचें आढळून येतें. पाहा बरें, गीतगोविंदांत 'पतति पतत्रे' वगैरे श्लोकांत अनुराग-व्याकुलतेची काय पराकाष्ठा कवीने दाखवून दिली आहे ती. आत्मदर्शनासाठी अशाच प्रकारचा अनुराग हवा. पंचप्राण अगदी व्याकुळ व्हावयास हवेत. परंतु कृष्णाची वृंदावनलीला बाजूस सारून त्याच्या कुरुक्षेत्रावरील स्वरूपाकडे पाहा. किती आकर्षक दृश्य ! असल्या भयंकर युद्धकोलाहलामध्ये देखील कृष्ण कसा अगदी स्थिर, गंभीर, शांत ! युद्धाच्या या धुमश्चक्रींत देखील भगवान् अर्जुनाला गीता सांगताहेत,——क्षत्रियाचा स्वधर्म जें युद्ध तें करावयास भगवान् अर्जुनाला उद्युक्त करीत आहेत. या भयानक युद्धाचे ते सूत्रधार असूनदेखील पुन: किती कर्महीन !—— हातीं शस्त्र धरलें नाही ! कोणत्याहि दृष्टिकोनांतून पाहा, भगवान् श्रीकृष्णांचें चरित्र सर्वांगपूर्ण आहे. ज्ञान, कर्म, भक्ति, योग——साऱ्यांची ते जणु साकार मूर्तिच होत. श्रीकृष्णचरित्राच्या याच बाजूचा आज अधिक विचार व्हावयास

हवा. वृंदावनांत मुरली वाजविणाऱ्या कृष्णालाच केवळ स्वीकारून आज चालणार नाही, त्याने जीवांचा उद्धार होणार नाही. आज अत्यावश्यक आहे गीतारूपी सिंहनाद करणाऱ्या श्रीकृष्णांची पूजा, धनुर्धारी राम, महावीर हनुमान, कालीमाता यांची पूजा ! तेव्हाच कुठे लोक मोठ्या उत्साहाने कर्म करून शक्तिसंपन्न होतील. खूप विचाराअंतीं अखेर माझें तर मत झालें आहे की जे लोक या देशांत आज धर्म धर्म करून आरडाओरड करतात, त्यांच्यांतील बरेचसे आहेत विकृत, डोक्याचे हलके आणि धर्मान्ध. आत्यंतिक रजोगुणाची कास धरल्याखेरीज तुम्हांला आता ना इहलोकाची आशा, ना परलोकाची. सारा देश तमोगुणाने कुंद होऊन गेला आहे. आणि फलहि तसेंच मिळत आहे--इहलोकीं गुलामी, परलोकीं नरक.

शिष्य:--पाश्चात्त्यांमधील रजोगुणाचा आविष्कार पाहून हळू-हळू ते सात्त्विक होतील अशी आशा वाटते का आपल्याला ?

स्वामीजी:--अगदी खात्रीने. महारजोगुणसंपन्न असलेले ते लोक आज भोगाच्या अगदी चरम सीमेवर येऊन पोहोचले आहेत. योग त्यांना साधणार नाही तर काय, उपाशीपोटीं, पोटाची खांच भरण्या-साठी पोट बडवत दारोदार हिंडणाऱ्या तुम्हांला साधेल ? त्यांचें सर्वोत्कृष्ट भोगांनी भरलेलें तें जीवन पाहून माझ्यापुढे तर मेघदूतांतील 'विद्युद्वन्तं ललितवसनाः' वगैरे चित्र उभें राहतें. आणि तुमचे भोग म्हणजे घाणेरड्या खोल्यांत फाटक्यातुटक्या वाकळीवर हाडांचीं काडें टाकून डुकरांप्रमाणे दरसाल वंशवृद्धि करणें ! --भुकेलेल्या भिकाऱ्यांची आणि गुलामांची पैदास करणें. म्हणूनच म्हणतों की आता निकड आहे लोकांना रजोगुणाने उद्दीपित करून कर्मप्रवण करण्याची. कर्म--कर्म--कर्म, या खेरीज आज 'नान्यः पन्था विद्यतेऽयनाय'--तरणोपाय नाही.

शिष्य:--महाराज, आमचे पूर्वज काय रजोगुणसंपन्न होते ?

स्वामीजी:--मग काय ते नव्हते ? इतिहास तर हेंच सांगतो की त्यांनी देशोदेशीं वसाहती स्थापन केल्या--तिबेट, चीन, सुमात्रा येथेच काय पण त्याहिपलीकडे असणाऱ्या जपानपर्यंत त्यांनीं धर्मप्रचारक पाठविले. रजोगुणांतून गेल्याखेरीज उन्नति होण्याची कांही शक्यता तरी आहे ?

बोलण्याच्या भरांत रात्र झाली. तेवढ्यांतच मिस् मूलर तेथे येऊन पोहोचल्या. त्या इंग्रज होत्या, स्वामीजींवर त्यांची श्रद्धा अगदी अपरंपार होती. स्वामीजींनी शिष्याचा त्यांच्याशीं परिचय करून दिला. थोडेसें बोलणें होतांच त्या वर निघून गेल्या.

स्वामीजी:---पाहिलेंस, काय बलशाली आहे या लोकांची जात ? कुठे हिचें घरदार, त्यांत पुन: थोरामोठ्यांची मुलगी. पण धर्मलाभाच्या आशेने कुठल्या कुठे येऊन पोहोचली.

शिष्य:---तें तर खरेंच आहे. पण आपल्या देखील साऱ्या गोष्टी अद्भुतच वाटतात. कितीतरी पाश्चात्त्य स्त्रीपुरुष आपल्या सेवेला सर्वदा उत्सुक असतात. आजकालच्या जमान्यांत तर ही गोष्ट म्हणजे फारच आश्चर्यकारक.

स्वामीजी:---(स्वत:च्या देहाकडे बोट करून)-हें शरीर जर टिकून राहिलें तर आणखी कितीतरी अद्भुत गोष्टी पाहावयाला सापडतील. कांही निष्ठावान् व उत्साही तरुण मला हाताशीं सापडले तर साऱ्या देशांत मी उलटापालट करून टाकीन. असली कांही मंडळी मद्रासमध्ये आढळली. पण माझे डोळे विशेषेंकरून लागले आहेत बंगालकडे. अशा तल्लख मेंदूचे लोक अन्यत्र नाहीत. पण हे लोक शरीराने दुर्बळ आहेत. शरीर आणि बुद्धीची सारखीच वाढ व्हावयास हवी. पोलादी शरीर आणि सुतीक्ष्ण बुद्धि असल्यास सारें जग तुमच्या पायाशीं लोळण घेईल.

स्वामीजींच्या जेवणाची तयारी झाली असल्याचा निरोप आला. "चल माझ्याबरोबर, माझें जेवण पाहायला" असें स्वामीजी शिष्याला म्हणाले. जेवतांना ते म्हणाले, "फार तेलकट-तुपकट पदार्थ खाणें चांगलें नाही. तळल्या पुऱ्यांपेक्षा पोळ्या बऱ्या. पुऱ्या म्हणजे रोग्यांचें अन्न ताजा भाजीपाला जेवणांत असावा. गोड जरा कमीच." हें बोलणें चाललें असतां मधेच 'काय रे किती पोळ्या घेतल्या मीं ? आणखी घेऊं की काय ?' असें त्यांनी विचारलें. किती खाल्लें इकडेहि लक्ष नाही ! आणि भूक भागली किंवा नाही याचेंहि भान नाही ! बोलण्यांत गुंतल्याने शरीराची जाणीव जणु नाहीशी झाली होती त्यांची.

आणखी थोडें खाऊन स्वामीजींनी जेवण आटोपलें, शिष्यहि

परवानगी घेऊन कलकत्त्याला निघाला. वाहन न मिळाल्याने त्याला पायींच जावें लागत होतें. जातांना, उद्या पुन: केव्हा स्वामीजींचें दर्शन होईल हा एकच विचार त्याच्या मनांत वारंवार येत होता.

## (३)

कै. गोपाललाल शील यांचा बगीचा, काशीपूर.
इ. स. १८९७

विलायतेहून परत आल्यानंतर सुरवातीला कांही दिवस स्वामीजी कै. गोपाललाल शील यांच्या काशीपूर येथील बगिच्यांत राहिले. शिष्य दररोज तेथे जात असे. फक्त शिष्यच काय पण इतरहि अनेक उत्साही तरुण त्यांच्या दर्शनासाठी तेथे गर्दी करीत असत. प्रारंभीं मिस् मूलरहि स्वामीजींबरोबर येथे येऊन राहिल्या होत्या. शिष्याचे गुरुबंधु गुडविन साहेब हेहि स्वामीजींसह त्या उद्यानगृहांत राहत असत.

स्वामीजींची कीर्ति त्या वेळीं भारतांत प्रांतोप्रांतीं पसरली होती. तेव्हा कांही लोक कुतूहलाने, कांही तत्त्वचर्चा करण्याच्या हेतूने, तर कांही स्वामीजींच्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याच्या बुद्धीने तेथे येत. प्रश्नकर्ते स्वामीजींच्या तोंडून शास्त्रविवरण ऐकून मुग्ध झाल्याचें, व त्यांची सर्वगामी प्रतिभा पाहून मोठमोठे तत्त्वज्ञानी व विश्वविद्यालयाचे नामांकित प्रोफेसर चूप होऊन गेल्याचें शिष्याने पाहिलें आहे. सरस्वती जणु नेहमी स्वामीजींच्या कंठीं विराजमान असे. ते या बागेंत असतांनाच त्यांच्या अलौकिक योगदृष्टीचेंहि प्रत्यंतर वेळोवेळीं येत असे.*

कलकत्त्याच्या बडाबाजार या विभागांत अनेक पंडित राहत असत. श्रीमंत मारवाडी लोक त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करीत. या वेदज्ञ व दार्शनिक पंडितांच्या कानीं स्वामीजींची कीर्ति गेली होती. त्यांच्यापैकी कांहीजण वाद करण्याच्या बुद्धीने एक दिवस स्वामीजींकडे

* या बागेंत राहत असतांना स्वामीजींना एक दिवस डोकें कापलेलें एक भूत दिसलें. तें जणु त्या भयंकर कष्टमय अवस्थेंतून मुक्त करण्यासाठी स्वामीजींना विनवीत होतें. तपासाअंतीं स्वामीजींना असें आढळून आलें की खरोखरच त्या बागेंत एका ब्राह्मणाचा अपघाताने मृत्यु झाला होता. ही गोष्ट पुढे त्यांनी आपल्या गुरुबंधूंना सांगितली होती.

आले. शिष्य त्या वेळीं तेथे हजर होता. आलेले सारे पंडित अस्खलितपणें संस्कृत बोलूं शकत होते. भेटीला आलेल्या लोकांच्या गराड्यांत बसलेल्या स्वामीजींना नमस्कार करून पंडितांनी त्यांच्याशीं संस्कृतांत बोलावयाला सुरवात केली. स्वामीजीहि त्यांना संस्कृतांत उत्तर देऊं लागले. वाद कोणत्या विषयावर चालला होता हें शिष्याला आता स्मरत नाही. पण सारे पंडित एकदमच गोंगाट करून तत्त्वज्ञानांतील गूढ प्रश्न स्वामीजींना संस्कृतांत विचारीत होते, व स्वामीजीहि प्रशान्त-गंभीरपणें हळूहळू आपले तर्कसंगत सिद्धान्त त्यांना पटवून देत होते एवढें मात्र त्याच्या चांगलें स्मरणांत आहे. आणि स्वामीजींची भाषा ऐकायला पंडितांच्या भाषेपेक्षा गोड व अधिक सुललित होती हेंहि नक्की आठवतें. पुढे त्या पंडितांनीहि ही गोष्ट मान्य केली.

स्वामीजींचें त्या दिवशींचें संस्कृतांतील अस्खलित वक्तृत्व ऐकून त्यांचे गुरुबंधुहि आश्चर्यचकित झाले. गेलीं पांचसहा वर्षें युरोप व अमेरिकेंत घालविल्याने स्वामीजींचा संस्कृतशीं विशेष संबंध नाही ही गोष्ट सगळ्यांना माहीत होती. शास्त्रज्ञ पंडितांबरोबरचें स्वामीजींचें त्या दिवशींचें बोलणें ऐकून त्या प्रसंगीं स्वामीजींमधे अद्‌भुत शक्तींचें स्फुरण होत असल्याचें त्यांच्या ध्यानांत आलें. त्या दिवशींच्या त्या बैठकींत स्वामी रामकृष्णानंद, योगानंद, निर्मलानंद, तुरीयानंद व शिवानंद वगैरे मंडळी हजर होती.

त्या दिवशींच्या त्या वादांत, आलेल्या पंडितांनी पूर्वपक्ष व स्वामीजींनी सिद्धान्तपक्ष मांडला. बोलण्याच्या भरांत स्वामीजींच्या तोंडून चुकून 'अस्ति' चे जागीं 'स्वस्ति' असा शब्दप्रयोग झाल्याने सारे पंडित हसले ही गोष्ट शिष्याला चांगली आठवते. पण स्वामीजी लागलीच म्हणाले, 'पंडितानां दासोऽहं क्षन्तव्यम् एतत् स्खलनम्'—'मी पंडितांचा दास आहें, माझी ही चूक पदरीं घ्या.' स्वामीजींच्या या विनयाने पंडितहि मुग्ध झाले. बराच वेळ वाद घातल्यानंतर स्वामीजींच्या सिद्धान्तपक्षाचें म्हणणें मान्य करून ते लोक जावयास निघाले. हजर असलेल्या लोकांतील दोनचारजण त्या पंडितांबरोबर बाहेर पडले व 'स्वामीजींबद्दल काय वाटतें ?' असा प्रश्न त्यांनी त्यांना विचारला. यावर त्यांच्यांतील एक वयोवृद्ध पंडित म्हणाला, "ते व्याकरणांत

व्युत्पन्न नसले तरी शास्त्राचें गूढ मर्म त्यांना अवगत झालें आहे. आपल्या मताचें विवरण करण्यांत तर ते अद्वितीय आहेत. प्रतिपक्षाचे मुद्दे खोडून काढण्यांत त्यांनी अलौकिक प्रतिभा व असामान्य पांडित्य दाखविलें."

स्वामीजींवर त्यांच्या गुरुबंधूंचें कोण अलौलिक प्रेम दिसून येत असे ! स्वामीजी पंडितांशीं वाद करण्यांत गुंतले असतां दिवाण-खान्याला लागून असलेल्या उत्तरेकडील खोलींत स्वामी रामकृष्णानंद जप करीत बसले असल्याचें शिष्याला आढळून आलें. पंडितलोक निघून गेल्यानंतर त्या जपाचें कारण त्यांना विचारलें असतां, स्वामी-जींना वादांत जय मिळावा एवढ्यासाठी श्रीरामकृष्णांच्या पादपद्मीं आपण व्याकुळ होऊन विनवणीं करीत होतों असें त्यांनी सांगितलें.

पंडितलोक निघून गेल्यावर स्वामीजींकडून शिष्याला कळलें की, पूर्वपक्ष करणारे ते पंडित पूर्वमीमांसाशास्त्रांत चांगलेच पारंगत होते. स्वामीजींनी उत्तरमीमांसापक्षाचा अवलंब करून त्यांच्यापुढे ज्ञान-कांडाची श्रेष्ठता प्रतिपादन केली, व पंडितांनाहि स्वामीजींचे सिद्धान्त मान्य करणें भागच पडलें.

व्याकरणाची चूक झाल्याने पंडितांनी त्यांचें जें हसें केलें त्याबद्दल, अनेक वर्षें संस्कृतांत बोलण्याचा सराव नसल्याने आपली अशी चूक झाली असें ते म्हणाले. पण पंडितांना कोणत्याहि प्रकारचा दोष त्यांनी दिला नाही. तथापि, पाश्चात्त्य देशांत वादाचा मूळ मुद्दा सोडून भाषें-तील असल्या सामान्य चुकांकडे दोषदृष्टीने पाहणें हें असभ्यपणाचें सम-जतात, एवढें मात्र ते म्हणाले. सभ्य समाजांतील लोक अशा वेळीं मूळ मुद्यावरच दृष्टि ठेवतात. भाषेकडे कोणी लक्षहि देत नाही. "तुमच्या देशांत मात्र फोलपटें घेऊनच डोकें फोडाफोडी चालते. आंतील सार वस्तूकडे कोणाचें लक्षहि नसतें." या बोलण्यानंतर त्या दिवशीं स्वामीजी शिष्याशीं संस्कृतांत बोलूं लागले. शिष्यहि मोडक्यातोडक्या संस्कृतांत त्यांना उत्तरें देऊं लागला ! तरीहि त्याला प्रोत्साहन देण्या-साठी स्वामीजींनी त्याची स्तुतिच केली. या दिवसानंतर स्वामीजींच्या सांगण्यावरूनच शिष्यहि अधूनमधून त्यांच्याशीं संस्कृतांत बोलत असे.

'सभ्यता' कशाला म्हणतात या प्रश्नाला उत्तर देतांना स्वामीजी

म्हणाले की, एखादा समाज वा एखादें राष्ट्र आध्यात्मिकतेंत जेवढें प्रगत तेवढा तो समाज वा तें राष्ट्र सभ्य होय. नाना प्रकारच्या यंत्रांची वा कारखान्यांची वाढ करून ऐहिक सुखसमृद्धि प्राप्त करून घेतली आहे एवढ्यानेच एखादें राष्ट्र सभ्य झालें असें म्हणतां येणार नाही. सध्याच्या पाश्चात्त्य सभ्यतेमुळे गरजा आणि हाहाकार यांचीच दिवसानुदिवस वाढ झालेली दिसते. परंतु प्राचीन भारतीय सभ्यता सर्वसाधारण लोकांना आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवून लोकांतील ऐहिक गरजा समूळ नष्ट जरी नाही तरी बऱ्याच कमी करूं शकली होती ही गोष्ट निःसंदेह होय. वर्तमानकालीं या दोन्ही सभ्यतांची हातमिळवणी करण्यासाठीच भगवान श्रीरामकृष्णांनी जन्म घेतला आहे. आता लोकांना एकीकडे जसें कर्मप्रवण व्हावें लागेल, तसेंच दुसरीकडे त्यांना गाढ अध्यात्मज्ञान प्राप्त करून घ्यावें लागेल. अशा रीतीने भारतीय व पाश्चात्त्य सभ्यतांच्या परस्पर संमिश्रणाने जगांत नव्या युगाचा उदय होणार आहे ही गोष्ट स्वामीजींनी त्या दिवशीं नीट समजावून सांगितली. ही गोष्ट समजावून देत असतांना ते म्हणाले, "आणखी एक गोष्ट——पाश्चात्त्यांची कल्पना अशी असते की, माणूस जितका धर्मपरायण होईल तितकी त्याची वागणूक गंभीर व्हावयास हवी. त्याने तोंडावाटें अन्य कोणती गोष्टहि काढणें अयोग्य. त्यांच्यांतील धर्मगुरु माझ्या तोंडून उदार धर्ममतें ऐकून एकीकडे जितके आश्चर्यचकित होत, तितकाच व्याख्यान संपल्यानंतर मीं केलेला मित्रांबरोबरचा विनोद ऐकून त्यांना विस्मय वाटे. पुष्कळदा तर ते मला अगदी तोंडावर म्हणत, 'स्वामीजी, आपण धर्मगुरु आहांत. सामान्य लोकांप्रमाणे हसणेंखिदळणें आपल्याला शोभत नाही. असला अवखळपणा आपल्याला उचित नव्हे.' मीहि त्यांना सांगत असे, 'We are children of bliss—why should we look morose and sombre?' ——'आम्ही म्हणजे आनंदाचे वारसदार. आम्ही काय म्हणून आंबटसुतकी चेहरे करून बसावें ?' माझ्या उत्तराचें मर्म त्यांच्या लक्षांत येई, किंवा नाही याची शंकाच आहे."

त्या दिवशीं स्वामीजींनी भावसमाधि व निर्विकल्प समाधि यांच्याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांपैकी जेवढ्या लक्षांत आहेत

तेवढ्या पुढे देतों.

"असें समजा की एखादा माणूस हनुमंताप्रमाणे भक्तिभावानें ईश्वरप्राप्तीची साधना करतो आहे. हा भक्तिभाव ज्या प्रमाणांत प्रगाढ होत जाईल, त्या प्रमाणांत त्या साधकाचें चालणेंबोलणें, हावभाव, इतकेंच काय पण त्याच्या शरीराची ठेवण देखील अगदी तशीच होत जाईल. 'जात्यंतर परिणाम' अशाच तऱ्हेने होतो. अशा प्रकारें एखादा भाव घेऊन साधक हळूहळू तदाकार होतो. अशा कोणत्याहि प्रकारच्या भावाच्या चरमावस्थेलाच 'भावसमाधि' असें म्हणतात. आणि 'मी देह नाहीं', 'मी मन नाहीं', 'बुद्धि नाहीं' अशा प्रकारें नेति नेति करीत करीत ज्ञानी साधक चिन्मात्रसत्तेंत जेव्हा अवस्थित होतो तेव्हा त्याला निर्विकल्प समाधीचा लाभ होतो. (भक्तिशास्त्रांतील) असा एखाददुसरा भाव घेऊन त्यांत सिद्धि मिळविण्यास वा त्याच्या चरम सीमेपर्यंत पोहोचण्यासच कितीतरी जन्माचे प्रयास लागतात. भावराज्याचे अधीश्वर अशा आमच्या ठाकुरांनी ( श्रीरामकृष्णांनी ) मात्र असल्या अठरा भावांत सिद्धिलाभ करून घेतला होता. 'भावमुखीं जर राहिलों नसतों तर शरीर टिकलें नसतें,' असेंहि ते म्हणत."

भारतांत आपण यापुढे कसें काय कार्य करणार आहोंत याबद्दल बोलतांना त्या दिवशीं स्वामीजी म्हणाले की, मद्रास आणि कलकत्ता येथे दोन केंद्रें उघडून, सर्वप्रकारें लोककल्याण साधण्यासाठी नवीन प्रकारचे साधुसंन्यासी तयार करण्याचा माझा विचार आहे. 'विध्वंसक रीतीचा अवलंब करून जुन्या रूढी उगाच तोडीत बसल्याने समाजाची वा देशाची उन्नति करतां येणें शक्य नाही. सर्व काळीं, सर्व वेळीं रचनात्मक रीतींनीच, प्राचीन रूढी-रीतींना नवीन आकार देऊनच उन्नति साधतां येणें शक्य असतें. गतेतिहासांत भारतांतील साऱ्याच धर्माचार्यांनी अशाच पद्धतीने कार्य केलें आहे. फक्त बुद्धदेवांचाच धर्म विध्वंसक, प्राचीन रीतीनीतींचा विनाश करणारा होता. आणि यामुळेच भारतांतून त्याचें उच्चाटन झालें.'

एका जरी व्यक्तींत ब्रह्माचा पूर्ण विकास वा अभिव्यक्ति झाली, तरी त्या प्रकाशांत हजारो लोक आपला मार्ग चोखाळू शकतात, असेंहि बोलण्याच्या भरांत स्वामीजींनी सांगितल्याचें शिष्याला स्मरतें. ते

म्हणाले की, फक्त ब्रह्मज्ञ पुरुषच लोकगुरु होत. हें विधान सर्व शास्त्रांना व तर्कबुद्धीला संमत आहे. अवैदिक, अशास्त्रीय अशी कुल-गुरूंची प्रथा या देशांत स्वार्थी लोकांनीच सुरू केली. म्हणूनच साधना करूनहि सिद्धि वा ब्रह्मज्ञान लोकांना आज प्राप्त होत नाही. धर्माची ही ग्लानि दूर करण्यासाठीच शरीर धारण करून भगवान् श्रीरामकृष्ण वर्तमान युगांत अवतीर्ण झाले आहेत. त्यांनी प्रदर्शित केलेल्या सार्व-जनीन मताचा प्रचार झाल्यास जगाचें व जीवांचें मंगल होईल. त्यांच्या-पूर्वी भारतेतिहासांत कैक शतकांतहि असला अलौकिक महासमन्वया-चार्य अवतीर्ण झाल्याचें आढळत नाही.

यावर त्यांच्या एका गुरुबंधूंनी त्यांना प्रश्न विचारला, "पाश्चात्य देशांत, ठाकुर अवतार होते असा प्रचार तुम्हीं उघडपणें नेहमी कां केला नाही ?"

स्वामीजी:—त्यांना त्यांच्या विज्ञान-तत्त्वज्ञानाची फार घमेंड आहे. म्हणून अगोदर त्यांची ज्ञानाची ही घमेंड युक्तिवाद करून, विज्ञा-नाचा आश्रय घेऊन आणि तत्त्वज्ञानाचा अवलंब करून नष्ट केल्याखेरीज कुणालाहि तेथे कांहीहि करतां यावयाचें नाही. तर्क करकरून गोते खात खात हातीं कांहीच न लागल्याने जे यथार्थ तत्त्वजिज्ञासु होऊन माझ्याकडे येत, त्यांच्याजवळ मी ठाकुरांबद्दल बोलत असे. एरवी एकदमच जर मी अवतारवादाबाबत गोष्टी त्यांच्याशीं बोललों असतों तर ते म्हणते, 'अं, यांत तुम्हीं आणखी नवीन तें काय सांगितलें? आमच्यांतहि आमचे प्रभु येशू आहेतच की ? '

अशा प्रकारें मोठ्या आनंदाने तीनचार तास त्यांच्या सहवासांत घालवून शिष्य इतर भक्तमंडळींबरोबर कलकत्त्यास परत फिरला.

## (४)

श्री. नवगोपाल घोष यांचें घर, रामकृष्णपूर, हावरा.
इ. स. १८९७ (जानेवारी, फेब्रुवारी)

श्रीरामकृष्णांचे परम भक्त श्रीयुत नवगोपाल घोष यांनी गंगेच्या पश्चिम तीरावर हावरा विभागांतील रामकृष्णपुरांत नवें घर राहण्यासाठी

बांधलें होतें. या घरासाठी जागा विकत घेतेवेळीं त्या भागाचें नांव 'रामकृष्णपूर' असल्याचें ऐकून त्यांना फार आनंद झाला होता, कारण या नांवाबरोबरच त्यांच्या इष्टदेवतेचें नांव सतत त्यांच्या स्मरणांत राहणार होतें. हें घर बांधून झाल्यानंतर थोड्याच दिवसांत स्वामीजी विलायतेहून पहिल्यानेच कलकत्त्याला परत आले. साहजिकच स्वामीजींच्या हस्तें घरांत श्रीरामकृष्णांच्या मूर्तीची प्रतिष्ठा व्हावी अशी त्यांची व त्यांच्या पत्नीची आंतरिक इच्छा होती. एवढ्यासाठी घोषबाबूंनी मठांत जाऊन आपली ही इच्छा स्वामीजींना कळविली. स्वामीजींनीहि त्यांच्या या सूचनेला मान्यता दिली. त्याच निमित्ताने आज नवगोपालबाबूंच्या घरीं उत्सव होता व त्यासाठी मठांतील संन्यासी व बाहेरील रामकृष्णांचे गृहस्थभक्त या साऱ्यांना त्यांनी आदराने निमंत्रित केलें होतें. घर गुढ्यातोरणांनी सुसज्जित, समोरच्या फाटकाशीं शुभसूचक जलपूर्ण कुंभ, केळीचे खांब उभे केलेले व देवदाराच्या व आंब्याच्या पानांचीं तोरणें बांधलेलीं--असा देखावा दिसत होता. सारें रामकृष्णपूर 'जय रामकृष्ण' या जयघोषाने भरून गेलें होतें. मठापासून तीन नावा भाड्याने करून स्वामीजी मठांतील साऱ्या संन्यासी व ब्रह्मचारी मंडळींना घेऊन मोठ्या उत्साहाने रामकृष्णपूरच्या घाटावर उतरले. स्वामीजींनी भगव्या रंगाचे कपडे घालून डोक्याला फेटा बांधला होता. त्यांच्या पायांत कांहीच नव्हतें. रामकृष्णपूरच्या घाटावरून ते ज्या रस्त्याने नवगोपालबाबूंच्या घरीं जाणार होते त्या रस्त्याच्या दुतर्फा असंख्य लोक उत्सुकतेने त्यांचें दर्शन घेण्यासाठी उभे होते. घाटावर उतरून 'दु:खी ब्राह्मणीच्या अंकावर निजून चतुर्दिशा तेजोद्भासित करणारा तो कोण आहे ? कोण तो दिगंबर या कुटीरांत आला आहे ?' अशा भावार्थाचें गाणें स्वामीजींनी गावयास सुरवात केली, व त्याबरोबर स्वत:च मृदंग वाजवीत वाजवीत ते हळूहळू पुढे चालूं लागले. त्यांच्याबरोबरच आणखी तीनचार मृदंग वाजावयास सुरवात झाली आणि बरोबर असलेले लोक समसुरांत तें गाणें गात गात त्यांच्या मागून चालूं लागले. जातां जातां ही सारी मंडळी डॉ. रामलालबाबूंच्या घराजवळ थोडा वेळ थांबली. रामलालबाबूदेखील मोठ्या तत्परतेने बाहेर आले व या मंडळीबरोबर हळूहळू पुढे जाऊं

लागले. लोकांची कल्पना होती की, स्वामीजी मोठ्या टापटिपीच्या पोषाखांत खूप बडिवारासह येतील. पण जेव्हा मठवासी इतर साधूं-प्रमाणेच अगदी साध्या वेषांत मृदंग वाजवीत वाजवीत अनवाणीच येतांना त्यांनी त्यांना पाहिलें, तेव्हा अनेकांना तर ते ओळखतांच आले नाहीत. आणि दुसऱ्यांना विचारून ते कोण आहेत हें कळल्यावर ते आश्चर्यचकित होऊन म्हणूं लागले, "हेच का ते विश्वविजयी स्वामी विवेकानंद ?" स्वामीजींची ही अद्‌भुत लीनता पाहून साऱ्यांनी एक-मुखाने त्यांची प्रशंसा केली व 'जय रामकृष्ण' अशा ललकाऱ्यांनी तो रस्ता त्यांनी अगदी गर्जून सोडला.

गृहस्थांना आदर्शवत् असणाऱ्या नवगोपालबाबूंचे प्राण आनंदाने आज अगदी भरून गेले होते. ठाकुरांच्या व त्यांच्या भक्तमंडळींच्या सेवेसाठी त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती. सतत इकडे तिकडे फिरून ते जातीने साऱ्या गोष्टींकडे लक्ष पुरवीत होते. ते इकडे तिकडे फिरत असतां त्यांच्या मुखांतून 'जय राम', 'जय राम' असा घोष सतत ऐकूं येत होता.

सारी मंडळी नवगोपालबाबूंच्या दारीं येतांच घरांतून मंगलसूचक शंखघंटादिकांचा मंजुळ ध्वनि सुरू झाला. मृदंग बाजूला ठेवून कांही वेळ स्वामीजींनी बैठकींत बसून विश्रांति घेतली व नंतर ते देवघर पाहावयास वरच्या मजल्याकडे जाण्याकरता निघाले. देवघर संगमरवरी होतें. मध्यभागीं सिंहासनावर ठाकुरांची चिनीमातीची मूर्ति होती. हिंदु पद्धतीच्या पूजेला लागणाऱ्या साऱ्या उपकरणांची व वस्तूंची जय्यत तयारी होती. ती पाहून स्वामीजींना खूप आनंद झाला. नवगोपाल-बाबूंची पत्नी इतर स्त्रियांसह आली व स्वामीजींना साष्टांग नमस्कार करून तिने त्यांना पंख्याने वारा घालावयास सुरवात केली.

साऱ्या गोष्टींची स्वामीजींनी केलेली तारीफ ऐकून ती त्यांना म्हणाली, "ठाकुरांची सेवा करण्याची आमची काय ताकद ? हें लहानसें घर--गाठीं पैसाहि थोडा--आज आपण स्वहस्तें ठाकुरांची येथे स्थापना करून आम्हांला कृतार्थ करा."

यावर थोडेसें हसून किंचित् विनोदाने ते म्हणाले, "तुमच्या श्रीरामकृष्णांच्या चवदा पिढ्यांतील तरी कुणी अशा संगमरवरी घरांत

राहिला नाही ! खेड्यांतील गवती झोपडींत त्यांचा जन्म. कसेंतरी करून दिवस घालविले त्यांनी. इथे असल्या उत्तम उपचार-सेवेंत ते जर राहणार नाहीत, तर मग राहतील तरी कुठे ?" स्वामीजींच्या या उत्तराने सारेच जण हसूं लागले. नंतर भस्मभूषित स्वामीजी साक्षात् महादेवाप्रमाणे पूजकाच्या आसनावर बसून ठाकुरांचें आवाहन करूं लागले.

स्वामी प्रकाशानंद स्वामीजींच्याजवळ बसून मंत्रोच्चारण करीत होते. यथोपचार पूजा संपली व नंतर आरतीसाठी शंखघंटा वाजूं लागल्या. आरती संपल्यावर देवघरांत बसले असतांनाच स्वामीजींनी श्रीरामकृष्णांना उद्देशून पुढील श्लोक रचला--

स्थापकाय च धर्मस्य सर्वधर्मस्वरूपिणे ।
अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय ते नमः ।।

हा मंत्र म्हणून साऱ्यांनी ठाकुरांना प्रणाम केला. नंतर शिष्यानेहि श्रीरामकृष्णांना उद्देशून रचलेलें एक स्तोत्र म्हटलें. अशा रीतीने पूजाविधि संपला. आलेल्या मंडळींचा फराळ आटोपल्यावर संकीर्तनास प्रारंभ झाला. स्वामीजी वरच थांबले होते. घरांतील स्त्रिया स्वामीजींना प्रणाम करण्यास आल्या. त्यांनी स्वामीजींना धर्मविषयक अनेक प्रश्न विचारले व त्यांचा आशीर्वाद ग्रहण केला.

या परिवारांतील साऱ्यांची ठाकुरांच्या ठिकाणीं असलेली निष्ठा पाहून शिष्य अगदी मुग्ध झाला, त्यांच्या संगतीने आपला नरजन्म सफल झाला असेंच त्याला वाटलें.

नंतर साऱ्यांनी प्रसाद घेतला व खाली येऊन सर्वजण विश्रांति घेऊं लागले. हळूहळू संध्याकाळ होत आल्याने भक्तमंडळी लहान लहान गटांनी आपापल्या घरीं परत फिरली. शिष्यहि स्वामीजींबरोबर रामकृष्णपूरच्या घाटावर आला व नंतर आनंदाने बोलत बोलत नावेंतून बागबाजाराकडे निघाला.

## ( ५ )

दक्षिणेश्वर येथील कालीवाडी आणि आलमबाजार मठ.
इ. स. १८९७. मार्च महिना.

इंग्लंडहून स्वामीजी परत आले त्या वेळीं आलमबाजारांतील

श्रीरामकृष्ण-मठ स्थापन झाला होता. मठाची ही जागा 'भुताची हवेली' म्हणून प्रसिद्ध होती. पण संन्यासीमंडळींच्या पावन संघाकारणें ही भुतांची हवेली श्रीरामकृष्ण-तीर्थस्थानांत परिणत झाली होती. तेथे किती साधना, किती जप-ध्यान, किती शास्त्रचर्चा व किती नामसंकीर्तन झालें असेल याची कांही गणती नाही. कलकत्त्यांतील राजोचित सन्मान स्वीकारून झाल्यानंतर स्वामीजी याच मोडक्यातोडक्या वाड्यांतील मठांत येऊन राहूं लागले. तसेंच, कलकत्त्यांतील लोकांनी त्यांच्यावरील श्रद्धेमुळे त्यांच्या निवासासाठी कलकत्त्याच्या उत्तरभागांतील काशीपूरमध्ये गोपाललाल शील यांचें जें उद्यानगृह घेऊन ठेवलें होतें, तेथेंहि ते अधूनमधून येऊन राहत आणि दर्शनोत्सुक मंडळींशीं धर्मचर्चा करून त्यांची मनःकामना पूर्ण करीत.

श्रीरामकृष्णांचा जन्मोत्सव जवळ आलेला. दक्षिणेश्वर येथील राणी रासमणीच्या कालीवाडींत या वेळीं उत्सवाची फार मोठ्या प्रमाणावर तयारी झाली होती. श्रीरामकृष्ण-भक्तमंडळींची तर गोष्टच नको--पण इतरहि धर्मपिपासु मंडळींच्या आनंदाला, उत्साहाला जणु सीमाच नव्हती; कारण विश्वविजयी स्वामीजी श्रीरामकृष्णांची भविष्यवाणी फलद्रूप करून यंदा परत स्वदेशीं आले होते. त्यांचे गुरुबंधु त्यांच्या सान्निध्यांत जणु श्रीरामकृष्णांच्याच सहवाससुखाचा अनुभव घेत होते. कालीमंदिराच्या दक्षिणेकडील प्रशस्त स्वयंपाकघरांत नैवेद्याची तयारी होत होती. नऊ-दहाच्या सुमारास आपल्या कांही गुरुबंधूंना बरोबर घेऊन स्वामीजी तेथे आले. त्यांच्या पायांत कांही नाही, डोक्याला भगवा फेटा. त्यांचें तें अलोकसामान्य रूप पाहतां यावें म्हणून, त्यांच्या पादपद्मांना स्पर्श करण्याच्या हेतूने व त्यांच्या श्रीमुखांतून निघालेली अग्नीसमान उज्ज्वल, तेजस्वी वाणी ऐकून धन्य व्हावें म्हणून सारे लोक अगदी अधीर होऊन धांवपळ करीत होते. स्वामीजींना आज अगदी क्षणाचीहि उसंत नाही. कालीमातेच्या मंदिरासमोर असंख्य लोक जमले आहेत. कालीमातेला स्वामीजींनी साष्टांग प्रणाम केला. उपस्थित हजारो लोकांनी मातेला वंदन केलें. नंतर राधाकांताच्या मूर्तीला प्रणाम करून ते आता ठाकुरांच्या (भगवान श्रीरामकृष्णांच्या) खोलीकडे जावयास निघाले. या खोलींत

तर मुंगी रिघावयालाहि जागा नाही. 'जय रामकृष्ण' ध्वनीने कालीवाडीचा कोपरान् कोपरा निनादून गेला. शेकडो भाविकांना भरभरून आणण्यासाठी होरमिलर कंपनीचें जहाज सारखें फेऱ्या घालीत होतें. सनईच्या मंजुळ सुरावर सुरधुनी गंगा जणु नृत्य करीत होती. रामकृष्णभक्तांच्या रूपाने उत्साह, आशा, धर्मपिपासा व भक्तिप्रेम हीं जणु मूर्तिमंत साकार झालीं होतीं. या वेळचा हा उत्सव मनःप्राणांनी अनुभवण्यासारखाच होता-- शब्दांनी त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाही.

स्वामीजींबरोबर आलेल्या दोन इंग्रज महिला उत्सव पाहावयास आल्या होत्या. शिष्याचा त्यांच्याशीं परिचय नव्हता. त्यांना बरोबर घेऊन स्वामीजी पावन पंचवटीचें व बिल्ववृक्षाचें दर्शन घेत होते. स्वामीजींचा खास असा परिचय नसतांहि शिष्य त्यांच्या मागोमाग गेला व उत्सवावर रचलेलें संस्कृत स्तोत्र त्याने त्यांना दाखविलें. तें वाचतवाचतच स्वामीजी पंचवटीच्या दिशेने पुढे जात होते. शिष्याकडे वळून ते म्हणाले, "सुरेख साधलें आहे, आणखीहि लिहीत चल."

पंचवटीच्या एका बाजूला ठाकुरांचे गृहस्थभक्त जमले होते. गिरीशबाबू ( महाकवि गिरीशचंद्र घोष ) उत्तरेकडे गंगेच्या दिशेने तोंड करून बसले होते आणि ठाकुरांचें गुणगान व वचनामृत ऐकण्यांत दंग असलेला भक्तवृंद त्यांना घेरून बसला होता. इतक्यांत मंडळींनी वेढलेले स्वामीजी गिरीशबाबूंजवळ येऊन 'अरेच्या ! हे तर गिरीशबाबू !' असे उद्गारले व त्यांनी त्यांना नमस्कार केला. गिरीशबाबूंनीहि विनम्रभावाने प्रतिनमस्कार केला. गिरीशबाबूंना जुन्या दिवसांची आठवण देऊन स्वामीजी म्हणाले, "गिरीशबाबू, तेव्हाचे ते दिवस तसे, अन् आजचा हा दिवस असा !" संमतीच्या सुरांत गिरीशबाबू म्हणाले, "तें तर खरेंच; पण अजूनहि इच्छा आहे की आणखीहि पाहतां यावें !" यानंतर त्या दोघांत ज्या गोष्टी झाल्या त्यांचें मर्म अनेकांच्या लक्षांत आलें नाही. थोडा वेळ बोलणें झाल्यानंतर स्वामीजी पंचवटीच्या ईशान्य बाजूस असलेल्या बिल्ववृक्षाकडे गेले. स्वामीजी निघून गेल्यावर भोवती बसलेल्या मंडळींना उद्देशून गिरीशबाबू म्हणाले, "एक दिवस हरमोहन मित्र कुठलंसं एक वर्तमानपत्र वाचून येऊन मला सांगू

लागला की स्वामीजींच्या नांवाने अमेरिकेंत कांही निंदास्पद लोकप्रवाद प्रसृत झाले आहेत. तेव्हा मीं त्याला म्हणालों, "मीं माझ्या प्रत्यक्ष डोळ्यांनी जरी नरेन्‌ला (स्वामीजींना) कांही कुकर्म करतांना पाहिलें तरी मी म्हणेन की तो माझ्या डोळ्यांचाच दोष आहे--मी माझे डोळे उपटून टाकीन! ते म्हणजे जणु सूर्योदयापूर्वी काढलेलें शुद्ध लोणी,--तें काय पुन्हा पाण्यांत मिसळणें शक्य आहे? त्यांचे दोष जे कोणी काढतील तेच नरकांत जातील." अशा या गोष्टी होत असतांनाच स्वामीजींचे एक गुरुबंधु स्वामी निरंजनानंद गिरीशबाबूंजवळ आले आणि त्यांनी, कोलंबोपासून कलकत्त्यापर्यंत भारतांतील भिन्न भिन्न प्रांतांतील लोकांनी स्वामीजींचें जें अभूतपूर्व स्वागत केलें व स्वामीजींनी आपल्या वक्तृत्वांतून त्यांना जो उपदेश केला त्याची त्रोटक माहिती त्यांना वर्णन करून सांगितली. ऐकतां ऐकतां गिरीशबाबू तर अगदी स्तंभित झाले.

त्या दिवशीं दक्षिणेश्वरच्या कालीवाडींत सर्वत्रच एक दिव्यभावाचें तुफान उठलें होतें. आता तो सारा जनसमुदाय स्वामीजींचें व्याख्यान ऐकण्यासाठी उत्सुक झाला होता. पण लोकांच्या त्या कोलाहलांतून स्वामीजींचा आवाज ऐकू येणें शक्य नव्हतें. तेव्हा बोलण्याचा प्रयत्न अर्थातच सोडून देणें भाग पडल्याने ते त्या दोन इंग्रज महिलांना ठाकुरांचीं साधनास्थानें दाखविण्यासाठी व ठाकुरांच्या शिष्यांशीं व अंतरंगींच्या भक्तांशीं त्यांचा परिचय करून देण्याच्या हेतूने बरोबर घेऊन निघाले. धर्मलाभासाठी त्या दोघी त्यांच्याबरोबर इतक्या दूर आल्याचें अनेकांना आश्चर्य वाटून स्वामीजींच्या अद्‌भुत प्रभावाचें ते आपंसांत कौतुक करूं लागले.

तीन वाजण्याच्या सुमारास स्वामीजी शिष्यास म्हणाले,–"एखादें वाहन मिळाल्यास पाहा बरें! आता मठांत जावें लागेल." आलमबाजारापर्यंत जाण्यासाठी भाड्याने ठरवून शिष्य बग्गी घेऊन आल्यावर एका बाजूस स्वामीजी व दुसऱ्या बाजूस शिष्य व स्वामी निरंजनानंद बसले व सगळे मोठ्या आनंदाने आलमबाजाराकडे जाण्यास निघाले. जातां जातां ते शिष्याला म्हणाले, "नुस्त्या अमूर्त कल्पना उराशीं बाळगून निष्क्रिय पडून राहिल्याने काय साधणार? येवढ्याचसाठी

या असल्या उत्सवादिकांची आवश्यकता असते. यांच्या द्वारांच हे सारे भाव सर्वसामान्य जनतेंत हळूहळू प्रसृत होतील. हिंदूंच्या या पर्व-पर्वण्यांचा अर्थच मुळी हा की धर्माचीं थोर थोर तत्त्वें क्रमशः लोकांत प्रसृत करणें. यामुळे एक तोटाहि होतो. या सार्‍या उत्सवांमागील मूळ मुद्दा साधारण लोकांच्या लक्षांत येत नाही, ते या उत्सवांतच मग्न असतात--उत्सव संपला की त्यांची सारी कथा आपली मूळ पदावर यते पुन्हा--पुन्हा आपले जैसे थे ! या सार्‍या गोष्टी म्हणजे धर्माचें बाह्य आवरण होत. धर्माच्या खर्‍या स्वरूपाला--आत्मज्ञानाला--त्या झाकून टाकतात हें अगदी सत्य आहे.

"पण ज्यांना धर्म काय, आत्म्याचें स्वरूप काय, वगैरे कांहीच कळत नाही ते या उत्सवादिकांच्या आनंदांतूनच हळूहळू धर्मस्वरूप उमजूं शकतात. हेंच पाहाना की आज जो हा ठाकुरांचा जन्मोत्सव झाला व त्यासाठी जे हे लोक आले ते एकदा ना एकदा जरूर ठाकुरां-बद्दल विचार करतीलच. ज्यांच्या नांवाने आज इतके लोक एकत्रित झाले ते कोण ? त्यांच्याच नांवाने ही एवढी यात्रा कां लोटली, ह्या गोष्टी त्या लोकांच्या मनांत खात्रीने येतीलच. ज्यांच्या मनांत हेहि विचार येणार नाहीत ते निदान यात्रेंत भजन-कीर्तन ऐकतील, वर्षांतून निदान एकदा तरी प्रसाद घेतील व ठाकुरांचें भक्तमंडळ डोळ्यांनी पाह-तील. या योगेंहि झाला तर त्यांचा फायदाच होईल--तोटा खासच होणार नाही."

शिष्यः--पण महाराज, हे उत्सव, हीं संकीर्तनें म्हणजेच सारें कांही अशी जर कुणीं समजूत करून घेतली तर काय त्याची उन्नति होणें शक्य आहे ? आपल्या देशांत अगोदरच षष्ठीपूजा, मंगलचंडीपूजा वगैरे उत्सव नित्य-नैमित्तिक स्वरूपांत पक्के झाले आहेत. हाहि उत्सव अखेर त्यांच्यांतलाच एक होणार. मरेपावेतो लोक यासारखेच उत्सव करीत असतात, पण त्यांच्यांतून कांही कुणी ब्रह्मज्ञ झाल्याचें दिसत नाही.

स्वामीजीः--कां बरें ? भारतांत हे जे इतके धर्मवीर निपजले, निदान ते तरी या गोष्टींच्याच आश्रयाने इतके उन्नत झाले ना ? यांचा आश्रय घेऊन जेव्हा साधना करतां करतां त्यांना आत्मसाक्षा-त्कार होतो, तेव्हा त्यानंतर मग ते या गोष्टींवर विशेष भर देत

नाहीत. पण तरीहि अवतारतुल्य महापुरुषहि लोकसंग्रहासाठी या गोष्टींचें पालन करतात.

शिष्य:––लोकांना दाखविण्यासाठी वरवर ते कदाचित् या गोष्टींचें पालन करीतहि असतील. पण आत्मज्ञान झाल्यावर हा सारा संसारच जिथे इंद्रजालाप्रमाणे मिथ्या म्हणून प्रतीत होतो तिथे त्यांना हे बाह्य लोकाचार सत्य म्हणून कसे वाटतील ?

स्वामीजी:––कां नाही वाटूं शकणार ? सत्य सत्य म्हणून आम्ही जें समजतों तेंहि तर सापेक्षच आहे ना ? देशकालपात्रभेदाने भिन्न भासणारेंच आहे ना ? म्हणूनच अधिकारभेदानुसार साऱ्याच व्यवहारांचें प्रयोजन असतें. ठाकुर म्हणत असत की आई एखाद्या मुलाला पुलावा करून देते, तर एखाद्या मुलाला साबुदाण्याची खीर. हेंहि तसेंच.

स्वामीजींचा मुद्दा लक्षांत येतांच शिष्य एकदम चुप झाला. पाहतां पाहतां गाडी आलमबाजार मठापाशी आली. गाडीभाडें देऊन शिष्य स्वामीजींबरोबर मठांत प्रवेश करता झाला. तहान लागल्याचें म्हटल्यावरून त्याने स्वामीजींस पाणी आणून दिलें. पाणी पिणें झाल्यानंतर स्वामीजींनी अंगांतील सदरा काढून टाकला. जमिनीवर टाकलेल्या सतरंजीवर ते किंचित् लवंडले. बाजूला बसलेले स्वामी निरंजनानंद म्हणाले, "उत्सवाच्या वेळीं असली गर्दी कधी पाहिली नव्हती. जणु सारें कलकत्ता शहर लोटलें होतें तिथे !"

स्वामीजी:––कशी नाही होणार गर्दी ? आणखी काय काय होईल तें तर सारें आता यानंतरच पाहाल.

शिष्य:––महाराज, प्रत्येक धर्मसंप्रदायांत कोणत्या ना कोणत्या प्रकारचा बाह्य उत्सव असल्याचें आढळून येतें. पण या बाबतींत कोणत्याहि एका पंथाची दुसऱ्या पंथाशीं एकवाक्यता असल्याचें दिसून येत नाही. महंमदाचा धर्म मोठा उदार म्हणून म्हणतात. पण ढाक्यांत (डाक्क्यांत) पाहिलें की त्यांच्यांतहि शिया आणि सुन्नी पंथाचे लोक लठ्ठालठ्ठी करून आपसांत डोकेफोडी करीत असतात.

स्वामीजी:––संप्रदाय म्हटला की या गोष्टी थोड्याबहुत प्रमाणांत होणारच. पण आमचा भाव काय हें माहीत आहे तुला ? तो

आहे संप्रदायविहीनता. ही संप्रदायविहीनता दाखविण्यासाठीच तर आमच्या ठाकुरांचा अवतार. ते सारेच भाव, सारेच पंथ सारखेच मानीत. ते पुढे असेंहि म्हणत की ब्रह्मज्ञानाच्या दृष्टीने पाहिलें असतां हे सारेच मिथ्या, केवळ माया.

शिष्य:—- आपलें म्हणणें कांही माझ्या लक्षांत येत नाही. कधी कधी तर मला वाटतें की आपण लोकहि अशा प्रकारच्या उत्सव, प्रचार वगैरेंच्या द्वारा श्रीरामकृष्णांच्या नांवाने एक नवीन संप्रदाय सुरू करीत आहांत. नाग महाशयांच्या तोंडून मीं ऐकलें आहे की श्रीरामकृष्ण कुठल्याहि एका पंथाचे नव्हते. शाक्त, ब्राह्म, वैष्णव, ख्रिश्चन, मुसलमान वगैरे साऱ्याच धर्मांना आणि पंथोपपंथांना ते बहुमान देत.

स्वामीजी:—- साऱ्या धर्मपंथांना आम्ही त्यांच्याचप्रमाणे बहुमान देत नाहीं हें तुला कसें काय समजलें ?

असें म्हणून हसत हसत स्वामी निरंजनानंदांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, "अरे, पाहा हा बांगाल * काय म्हणतो तें ?"

शिष्य:—- महाराज, कृपा करून ही गोष्ट मला समजावून सांगा.

स्वामीजी:—- तूं माझीं व्याख्यानें तर वाचलीं आहेस ? त्यांतून कुठे मीं ठाकुरांच्या नांवाचा सांप्रदायिक भावाने प्रचार केला आहे ? अगदी बावनकशी उपनिषदान्तर्गत धर्मच तर जगभर सांगत फिरलों.

शिष्य:—- तें तर खरें. पण आपल्याशीं परिचय झाल्यानंतर मला आढळून आलें की ठाकुर म्हणजे आपले पंचप्राण होत. ठाकुरांना जर आपण भगवान् मानीत असाल, तर मग आपण साऱ्या लोकांत सरळ-सरळ तसा प्रचार कां करीत नाही ?

स्वामीजी:—- जें मला समजलें, तेंच मी लोकांना सांगतों. वेदान्ताचें अद्वैत मत म्हणजेच यथार्थ धर्म असें जर तुला वाटत असेल तर तूं कां नाही तो साऱ्या लोकांना समजावून देत ?

शिष्य —- अगोदर मला त्याची अनुभूति होऊं द्या, मग मी तें सांगीन. वेदान्ताचीं मीं नुसतीं पुस्तकें वाचलीं आहेत.

* पश्चिम बंगालचे लोक पूर्व बंगालच्या लोकांना थट्टेने व अमळ उपहासाने 'बांगाल' असें म्हणत असतात. याचा अर्थ कांहीसा 'गावंढळ माणूस' असा होतो.

स्वामीजीः— तर मग आधी अनुभूति घे आणि मग लोकांना समजावून दे. आणि असें पाहा की, प्रत्येकजणच कोणत्या तरी एखाद्या मतावर विश्वास ठेवून चालत असतो. त्या बाबतींत तुला बोलायचा कांही अधिकार नाही. कारण तूंहि देखील त्यांच्याचप्रमाणे कोणत्या तरी एका धर्ममतावर विश्वास ठेवून चालण्याखेरीज दुसरें तर कांही करीत नाहीस ना ?

शिष्यः—तें खरें आहे. मी एका मार्गावर विश्वास ठेवून चालतों हें खरें. पण माझ्या या विश्वासाला प्रमाण आहे शास्त्र. शास्त्रविरोधी मत मला मान्य नाही.

स्वामीजीः—पण शास्त्र म्हणजे काय ? उपनिषदें जर प्रमाण असतील तर मग बायबल किंवा झेंदावेस्ता यांनाहि कां प्रमाण मानूं नये ?

शिष्यः— या साऱ्या ग्रंथांचें प्रामाण्य मान्य केलें तरी ते सारे वेदांसारखे कांही प्राचीन ग्रंथ नाहीत. आत्मतत्त्वाचा विचार जसा वेदांमधे आहे तसा अन्यत्र कोठेहि नाही.

स्वामीजीः—बरें, तूं म्हणतोस तें समजा मान्य केलें; तरी पण वेदांखेरीज अन्यत्र कोठेहि सत्य नाही असें म्हणावयाचा तुला काय अधिकार ?

शिष्यः— वेदांखेरीज इतरहि धर्मग्रंथांत सत्य असूं शकेल. त्याबाबत विरुद्ध असें मला कांहीच म्हणावयाचें नाही. मी मात्र उपनिषदांचें मतच प्रमाण मानून चालणार. माझा त्यांवर खूप विश्वास आहे.

स्वामीजीः— तूं खुशाल तसें कर. पण दुसऱ्या कोणाचा जर याचप्रमाणे अन्य कुण्या मतावर 'खूप' विश्वास असेल तर त्याला सुद्धा त्याच्या विश्वासाप्रमाणे चालण्याची सवलत असूं दे. पुढे आढळून येईल तुला की तो आणि तूं,— तुम्ही दोघे एकाच जागीं पोहोचलां आहांत. महिम्नस्तोत्रांत तूं काय वाचलें नाहीस—"**त्वमसि पयसाम् अर्णव इव**" —"प्रभो, सर्व नद्या ज्यास जाऊन मिळतात अशा समुद्राप्रमाणे तूं आहेस" ?

## (६)

आलमबाजार मठ

इ. स. १८९७ चा मे महिना

दार्जिलिंगहून स्वामीजी कलकत्त्यास परत आले आहेत. सध्या ते

राहताहेत आलमबाजारमठांतच. गंगातटाकीं कुठेतरी मठ हल-विण्याच्या गोष्टी बोलल्या जात आहेत. शिष्य तर आजकाल दररोजच मठांत त्यांच्याकडे जात असतो, आणि अनेकदा तो रात्रींहि तेथेच राहतो. शिष्याच्या जीवनांतील प्रथम मार्गदर्शक श्री. नागमहाशय यांनी त्याला मंत्रदीक्षा दिलेली नाही आणि दीक्षेची गोष्ट त्यांच्याजवळ काढतांच स्वामीजींकडे बोट दाखवून ते त्याला म्हणत, 'एक स्वामीजीच जगद्‌गुरु होण्यास योग्य !' म्हणून दीक्षा घेण्याचा आपला निश्चय शिष्याने पत्र लिहून स्वामीजी दार्जिलिंगला असतांना त्यांना कळविला होता. स्वामीजींनी उत्तरांत लिहिलें होतें, 'नागमहाशयांची हरकत नसल्यास मोठ्या आनंदाने मी तुला दीक्षा देईन.' तें पत्र अद्यापहि शिष्याच्या संग्रहीं आहे.

बंगाली सनाप्रमाणे आज १३०३ सालच्या वैशाख महिन्याची १९ वी तिथि आहे. आज शिष्याला दीक्षा देण्याचें स्वामीजींनी आश्वा-सन दिलें आहे. शिष्याच्या जीवनांतील आजचा हा अनन्यसाधारण दिवस होय. मोठ्या पहाटेसच गंगास्नान आटोपून व लिचूचीं कांही फळें व इतर सामग्री बरोबर घेऊन शिष्य सकाळीं ८ च्या सुमारास मठांत हजर झाला. शिष्याला पाहून हसत हसत, 'आज तुझा बळी द्यायचा आहे—होय ना ?' असें ते म्हणाले. शिष्याशीं असें बोलून ते हसतमुखानेच इतरांशीं अमेरिकेबद्दल नाना गोष्टी बोलूं लागले. धर्म-जीवनाची साधना करतांना कशा प्रकारची एकनिष्ठता हवी, गुरूवर कशाप्रकारचा दृढविश्वास व भक्तिभाव असावयास हवा, गुरु-वाक्याबद्दल किती आस्था हवी व गुरूसाठी प्राणहि पणाला लावण्याची कशी सिद्धता पाहिजे वगैरे गोष्टीहि बोलण्याच्या भरांत ते सांगत होते. नंतर कांही प्रश्न विचारून ते शिष्याचें अंतरंग पारखून पाहूं लागले. त्यांनी विचारलें, "मी तुला जेव्हा जें काम सांगेन तेव्हा तें तूं करूं शक-शील तर ? गंगेंत उडी मारण्याने किंवा गच्चीवरून खाली अंग झोकून देण्याने तुझें कल्याण होणार आहे असें वाटून जर मीं तुला तसें करा-वयास सांगितलें तर किंचित्‌हि मागेपुढे न पाहतां तसें करावयाची तुझी तयारी राहील ना ? काय तो विचार आताच कर; नाही तर उगाचच मला गुरु करून घ्यायला पाय पुढे टाकूं नकोस." अशा प्रश्नांनी

शिष्याच्या मनाची दौड कितपत आहे याची स्वामीजी कल्पना करून घेऊं लागले. शिष्यानेहि नतमस्तक होऊन त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला 'हो' असेंच उत्तर दिलें.

स्वामीजी पुढे म्हणाले, "जे ही संसारमोहमाया नाहीशी करून भवसागराच्या पलीकडे घेऊन जातात, कृपान्वित होऊन जे साऱ्या मानसिक आधीव्याधींचा विनाश करतात तेच यथार्थ 'गुरु' होत. पूर्वी 'समित्पाणि' होऊन शिष्य गुरूंच्या आश्रमांत जात. गुरुहि त्यांचा अधिकार पाहून त्यांना दीक्षा देत, त्यांच्याकडून वेदपठन करवीत व कायामनोवाक्य-नियमनरूपी व्रताचें चिन्ह म्हणून तिहेरी मौंजीमेखला त्यांच्या कमरेला बांधून देत असत. या मौंजीमेखलेलाच ते आपली कौपीन बांधीत असत. या मौंजीमेखलेचीच जागा पुढे यज्ञोपवीताने-- जानव्याने घेतली.

शिष्यः--तर मग काय महाराज, आतासारखें सुती जानवें घालण्याची ही चाल काय वैदिक नाही ?

स्वामीजीः-- वेदांमधे कोठेहि सुती जानव्यांचा उल्लेख नाही. स्मृतिकार रघुनंदन म्हणतो, 'अस्मिन्नेव समये यज्ञसूत्रं परिधापयेत् ।' (आता यज्ञसूत्र धारण करवावें.) 'सुती जानव्यांचा उल्लेख गोभिल-गृह्यसूत्रांतहि नाही. गुरूसमीप होणाऱ्या या प्रथम वैदिक संस्काराचाच शास्त्रांत 'उपनयन' म्हणून उल्लेख आढळतो. पण आज या देशाची काय दुरवस्था झाली आहे पाहा. शास्त्रमार्ग राहिला दूर, अन् त्याच्या नांवावर सारा देश भरून गेला आहे फक्त कांही विशिष्ट प्रदेशांत, विशिष्ट समाजांत व स्त्रियांत प्रचलित असलेल्या आचारांनी आणि रूढींनी. म्हणूनच तर माझें तुम्हां लोकांना सांगणें आहे की तुम्ही प्राचीनकालाप्रमाणेच शास्त्रमार्गाने चला.' स्वतः श्रद्धासंपन्न व्हा व सारा देशहि श्रद्धावान करा. नचिकेत्याप्रमाणे हृदयांत दृढ श्रद्धा बाणव. आत्मतत्त्व जाणून घेण्यासाठी, आत्मोद्धारासाठी, या जन्ममृत्यूचें कोडें सोडविण्यासाठी प्रसंगीं नचिकेत्याप्रमाणे यमलोकीं प्रवेश कर. मृत्यूच्या मुखांत जाण्याने जर सत्यलाभ होणार असेल तर बेधडक मृत्यूच्या मुखांत प्रवेश करावयास हवा. भय म्हणजेच तर मृत्यु. हें भयच ओलांडून जावयास हवें. या क्षणापासूनच भयशून्य हो. जा, आपल्या मोक्षासाठी

आणि लोकांच्या कल्याणासाठी देहत्याग करावयास पुढे हो. नुसता हाडामांसाचा हा बोजा वाहत राहून काय साधणार आहे ? ईश्वर-लाभासाठी सर्वस्वत्यागाच्या मंत्राची दीक्षा घेऊन दधीचि मुनींप्रमाणे परकल्याणार्थ अगदी हाडामांसाचेंहि दान कर. ज्यांनी वेद-वेदान्ताचें अध्ययन केलें आहे, जे ब्रह्मज्ञ आहेत, दुसऱ्यांना भयाच्या पलीकडे नेण्याचें सामर्थ्य ज्यांच्या ठायीं आहे तेच यथार्थ गुरु होत असें शास्त्रें सांगतात. अशांचा आश्रय लाभतांच त्यांच्याजवळून दीक्षा घ्या--'नात्र कार्या विचारणा'--अशा वेळीं विचार करण्याची कांही गरजच नाही. पण याच तत्वाची आज काय दशा झाली माहीत आहे ?-- **'अंधेनैव नीयमाना यथान्धाः** '--आंधळ्यामागून चाललेला आंधळ्यांच्या माळे-सारखा प्रकार !

नऊ वाजावयाची वेळ झाली. गंगेवर न जातां आज स्वामीजींनी मठांतच स्नान केलें. स्नानानंतर एक नवीन भगवें वस्त्र परिधान करून ते मंद गतीने देवघरांत गेले व पूजेसाठी मांडलेल्या आसनावर बसले. देवघरांत एकदमच न जातां शिष्य कांही क्षण बाहेर--दारींच--वाट पाहत उभा राहिला. स्वामीजींनी बोलावतांच आंत जावयाचें. स्वामीजी ध्यानस्थ बसले. मुक्तपद्मासन घातलेले, डोळे किंचित् मिटलेलें--जणु देहमनप्राण सारें स्पंदनहीन. ध्यान संपवून स्वामीजी हांक मारून म्हणाले-- 'ये बाबा !' स्वामीजींच्या त्या प्रेमळ हांकेने शिष्य मुग्ध झाला व अगदी भारल्याप्रमाणे त्याने देवघरांत प्रवेश केला. शिष्य देवघरांत येतांच स्वामीजींनी त्याला दार बंद करून घेण्यास सांगितलें. दार बंद झाल्यावर ते शिष्याला म्हणाले, "माझ्या डाव्या बाजूस बैस." स्वामीजींच्या आज्ञेनुसार शिष्य आसनावर बसला. त्याचें हृदय कस-ल्याशा अनिर्वचनीय व अपूर्व आनंदाने कंपित होऊं लागलें. त्यानंतर आपला शुभहस्त शिष्याच्या मस्तकावर ठेवून त्यांनी शिष्याला कांही अगदी खाजगी गोष्टी विचारल्या. शिष्याने यथाशक्य उत्तरें दिल्यावर त्यांनी महाबीज मंत्राचा त्याच्या कानांत त्रिवार उच्चार केला व मग शिष्यालाहि त्याचें त्रिवार उच्चारण करण्यास त्यांनी सांगितलें. नंतर साधनेसंबंधी शिष्याला कांही उपदेश करून ते अगदी टक लावून थोडा वेळ शिष्याच्या डोळ्यांकडे पाहत राहिले. शिष्याचें मन या क्षणीं

अगदी निष्कंप व एकाग्र झाल्याने तो एका अनिर्वचनीय भावांत स्थिर झाला होता. असा किती वेळ गेला कांही उमजलें नाही. मग स्वामीजी म्हणाले, "आण गुरुदक्षिणा दे." 'काय देऊं ?' असें शिष्याने विचारतांच ते म्हणाले, "जा कोठींतून एखादें फळ घेऊन ये." धांवतच जाऊन शिष्याने कांही लिचूचीं फळें आणलीं. तीं फळें स्वामीजींनी ग्रहण केलीं, व ते म्हणाले, "जा, मिळाली तुझी गुरुदक्षिणा." आंत शिष्याची दीक्षा होत असतांनाच मठांतील एकजण दीक्षा घेण्याच्या निश्चयाने बाहेर उभा होता. स्वामी शुद्धानंद तेव्हा ब्रह्मचारी म्हणून मठांत राहत असूनहि त्यांची यथाविधि दीक्षा झाली नव्हती. आज शिष्याची अशाप्रकारें दीक्षा होतांना पाहून त्यांनाहि हुरूप आला व दीक्षा घेऊन शिष्य देव-घराबाहेर येतो न येतो तोंच ते देवघरांत स्वामीजींजवळ गेले व आपली आंतरिक इच्छा त्यांनी स्वामीजींना सांगितली. शुद्धानंदांची प्रबळ इच्छा पाहून स्वामीजींनीहि त्यांच्या म्हणण्याला मान्यता दिली व ते पुन्हा पूजेच्या आसनावर जाऊन बसले.

शुद्धानंदांना दीक्षा दिल्यावर कांही वेळाने स्वामीजी बाहेर आले व जेवण झाल्यानंतर विश्रांतीसाठी म्हणून त्यांनी कांही वेळ अंग टाकलें. शिष्यानेहि शुद्धानंदांबरोबर स्वामीजींच्या ताटांतील उच्छिष्टाचा प्रसाद मोठ्या भक्तिभावाने ग्रहण केला, व मग स्वामीजींच्या पायथ्याशीं येऊन बसून त्याने त्यांचे पाय चेपून देण्यास सुरवात केली.

कांही वेळ वामकुक्षी झाल्यावर स्वामीजी वरच्या बैठकींत जाऊन बसले. हीच वेळ योग्य आहे असें पाहून शिष्याने त्यांना प्रश्न केला, "महाराज, पापपुण्याची भावना कुठून उत्पन्न झाली ?"

स्वामीजी:–– बहुत्वबोधांतूनच या साऱ्या गोष्टींचा उगम होत असतो. माणूस जितका एकत्वाकडे जातो तितकी त्याची, जिच्यापासून धर्माधर्म, पापपुण्य इत्यादि द्वंद्वभाव उत्पन्न होतात, ती 'मी-तूं पणा'ची जाणीव कमी होते. माझ्यापासून अमुक एक गोष्ट भिन्न आहे ही भावना मनांत येतांच इतर साऱ्या द्वंद्वभावांचा उद्‌भव व विकास होतो. आणि एकत्वाच्या संपूर्ण अनुभूतींत माणसाच्या शोक मोह वगैरेंचा समूळ नाश होतो–– **'तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः'**––'एकत्वाच्या संपूर्ण जाणीवेने मनुष्यांत मोहशोकादिकांना जागाच राहत नाही.'

कुठल्याहि दुबळेपणाच्या अनुभूतीलाच पाप म्हणतात. (Weakness is sin.) या दुर्बलतेंतूनच द्वेषमत्सरादिकांचा जन्म होतो. म्हणून दुर्बलता पाप होय-- दुर्बलता म्हणजेच पाप. नित्यज्योतिस्वरूप आत्मा अंतरीं सदैव प्रकाशत आहे. तिकडे लक्षच नाही-- हाडामांसाच्या या विचित्र पिंजऱ्याकडे, या जड शरीरावरच सारें लक्ष केंद्रित करून 'मी मी' करीत असतात सगळे ! हेंच आहे सगळ्या प्रकारच्या दुर्बलतेचें मूळ. याच मीपणाच्या जाणीवेंतून जगाकडे पाहण्याच्या लौकिक-दृष्टीचा उदय झाला आहे. परमार्थबोध हा साऱ्या द्वंद्वांच्या अतीत असतो.

शिष्य:-- तर मग ही लौकिक वा व्यावहारिक सत्ता काय अजीबात सत्य नाही ?

स्वामीजी:--'मीपणा'चा बोध जोंवर आहे तोंवर ती सत्य आहे. पण ज्या क्षणीं 'मी आत्मा' या बोधाची अनुभूति होते त्या क्षणीं ही व्यावहारिक सत्ता मिथ्या होऊन जाते. लोक पाप पाप म्हणून जें म्हणतात तो दुबळेपणाचाच परिणाम होय--'मी देह' या अहंभावनेचेंच रूपान्तर होय. जेव्हा 'मी आत्मा आहें' हा बोध अंतरीं स्थिर होईल तेव्हा तूं पाप-पुण्य, धर्म-अधर्म वगैरे-साऱ्या द्वंद्वांच्या पलीकडे निघून जाशील. ठाकुर श्रीरामकृष्ण म्हणत, 'मी मेला की जंजाळ संपला.'

शिष्य:-- महाराज, हा 'मी' तर मरूनहि मरत नाही. याला मारणें महाकठीण कर्म.

स्वामीजी:-- हें एका दृष्टीने कठीण, पण आणखी एका दृष्टीने पाहतां तितकेंच सोपें आहे. हा 'मी' कुठे आहे सांगूं शकशील ? जी वस्तु मुळांतच नाही तिला मारणें-बिरणें तरी कुठलें ? मीपणाच्या खोटया जाणिवेने मनुष्य संमोहनाचा प्रयोग झाल्याप्रमाणे वावरत असतो. हें भूत उतरलें की सारें स्वप्न विरून जातें व एकच आत्मा आब्रह्मस्तंबपर्यंत सर्वत्र भरून असल्याचा अनुभव येतो. हेंच उमजायला हवें, अनुभवायला हवें. सगळ्या साधनेचा उद्देश मुळी हाच--हें आवरण दूर सारणें. तें दूर झाल्यावर चित्सूर्य स्वतेजाने प्रकाशत असल्याचें पाहशील. कारण एकमात्र आत्माच स्वयंज्योति, स्वसंवेद्य आहे. जी वस्तु मुळांतच स्वसंवेद्य आहे ती दुसऱ्या कशाच्या साह्याने कशी जाणली

जाणार ? म्हणूनच तर श्रुतीनें म्हटलें आहे, "**विज्ञातारम् अरे केन विजानीयात्.**" (जाणणाऱ्याला कसें जाणावयाचें ?) तूं जें काय जाणतोस तें मनरूपी साधनाच्या साह्यानेच जाणतोस. पण मन तर जड आहे-- त्याच्या पाठीशीं शुद्ध आत्मा विराजमान असल्यानेच तें कार्य करूं शकतें. तेव्हा या मनाच्या मदतीनें कसें काय तूं त्या आत्म्याला जाणणार ? पण एवढें मात्र कळूं शकतें की मन व बुद्धि त्या शुद्ध आत्म्यापर्यंत पोहोचूं शकत नाहीत. जाणणें वगैरे सारें या सापेक्ष जगतांतच शक्य आहे. पण मन जेव्हा विकल्पहीन वा वृत्तिहीन होतें तेव्हा मनाचा लोप होतो आणि तेव्हाच आत्मसाक्षात्कार होतो. याच अवस्थेचें वर्णन भाष्यकार शंकराचार्यांनी 'अपरोक्षानुभूति' असें केलें आहे.

शिष्यः-- पण महाराज, मन म्हणजेच तर 'मी'. त्या मनाचाच जर लोप झाला तर मग 'मी'हि राहणें शक्य नाही.

स्वामीजीः-- ती जी अवस्था आहे, तीच 'मी'पणाचें यथार्थ स्वरूप होय. तेव्हा जो 'मी' उरेल तोच सर्वभूतस्थ, सर्वगत, सर्वान्तरात्मा होय. घट भंगल्याने घटाकाशच महाकाश होतें. घट भंगल्याने त्यामधील आकाश काय नाश पावतें की काय रे ? ज्या क्षुद्र 'मी'ला तूं देहबद्ध म्हणून मानीत होतास तोच व्यापक होऊन 'सर्वगत मी'च्या किंवा आत्म्याच्या रूपानें अनुभवास येतो. म्हणून मन राहिलें काय किंवा गेलें काय, त्याचें या यथार्थ 'मी'ला वा आत्म्याला काय ?

आता मीं जें हें सांगितलें तें यथाकालीं तुझ्या अनुभवास येईल. '**कालेनात्मनि विन्दति.**' श्रवण मनन करतां करतां कालान्तराने या गोष्टींची धारणा होईल--आणि तूं मनाच्या पलीकडे जाशील. तेव्हा मग या असल्या प्रश्नांना जागाच राहणार नाही.

या गोष्टी ऐकून शिष्य अगदी स्तब्ध झाला. शिष्याची ती अवस्था बघून स्वामीजी पुढे म्हणाले, "ही अगदी साधी, सरळ अन् सोपी गोष्ट समजावून देण्यासाठी किती शास्त्रें लिहिलीं गेलीं असतील, पण तरी कांही लोकांना अजूनहि ती उमजत नाही ! वरवर आल्हाददायक भासणाऱ्या रुपेरी टिकल्यांवर आणि कामिनीच्या क्षणभंगुर रूपावर लुब्ध होऊन हा दुर्लभ मनुष्यजन्म ते कसा व्यर्थ घालवितात पाहा !

महामायेचा काय हा विलक्षण प्रभाव ! आई ! जगदंबे !!"

## (७)

कलकत्ता

इ. स. १८९७

कांही दिवसांपासून स्वामीजी बागबाजारांतील कै. बलराम बसु यांच्या घरीं राहत आहेत. भगवान श्रीरामकृष्णांच्या गृहस्थभक्तांना त्यांनी एकत्र जमण्यासाठी बोलाविलें असल्याने तीन वाजतां ते सारे या घरीं येऊन दाखल झाले. स्वामीजींचे गुरुबंधु स्वामी योगानंदहि तेथे उपस्थित आहेत. सार्‍यांना बोलावण्यांत स्वामीजींचा उद्देश आहे एक संस्था स्थापण्याचा. सर्वजण आपआपल्या जागीं बसल्यावर स्वामीजी म्हणाले---

"देशीविदेशीं फिरल्याने माझी ठाम समजूत झाली आहे की संघटित संस्थेखेरीज कोणतेंहि मोठें कार्य पार पाडतां येणें शक्य नाही. पण आपल्या देशासारख्या या देशांत अगदी सुरवातीलाच लोकतंत्राने चालणारी संस्था काढणें वा सर्वांचें मत (व्होट) घेऊन काम करणें तितकेसें सोईचें होईल असें वाटत नाही. पाश्चात्य देशांतील स्त्री-पुरुष एकतर आपल्यापेक्षां अधिक सुशिक्षित आहेत आणि दुसरें म्हणज ते आपल्यासारखे मत्सरी नाहीत. गुणांची त्यांना कदर आहे. हेंच पाहा ना की माझ्यासारख्या एका यःकश्चित् माणसाला त्यांनी किती प्रेमाने वागविलें, केवढा सन्मान दिला ! शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराबरोबर लोक जेव्हा अधिक विशाल मनाचे व सहानुभूतिसंपन्न होतील, पक्षोपपक्षांतील मतप्रणालींच्या संकुचित मर्यादा ओलांडून त्यांचे विचार जेव्हा व्यापक होतील तेव्हाच लोकतंत्राने चालणार्‍या संस्थांचें कार्य या देशांत यशस्वी होऊं शकेल. एवढ्याचसाठी आपल्या या संस्थेंत एकजण सर्वाधिकारी नेमणें उचित होईल. सर्वांनी त्याच्या आज्ञेनुसार चालावयास हवें. पुढे कालान्तराने सगळ्यांचें मत घेऊन काम करतां येईल.

"ज्यांच्या नांवावर आम्ही संन्यासी झालों आहोंत, ज्यांना जीवनांत आपला आदर्श मानून तुम्ही सारे या गृहस्थाश्रमांत वास करीत आहांत, ज्यांच्या देहावसानानंतर वीसच वर्षांच्या कालावधींत

पौर्वात्य पाश्चिमात्य साऱ्याच देशांत ज्यांचें पावन नांव व अद्‌भुत जीवन-कार्य यांचा आश्चर्यकारक रीतीने प्रसार झाला आहे, त्यांच्याच नांवाने हा संघ स्थापण्यांत यावा. आपण सारे प्रभूचे दास आहोंत —आपण साऱ्यांनीच या कार्याला हातभार लावला पाहिजे."

श्रीयुत गिरीशचंद्र घोष वगैरे उपस्थित गृहस्थभक्तांनी या सूचनेला अनुमोदन दिल्यानंतर रामकृष्ण-संघाच्या भावी कार्यपद्धतीसंबंधी चर्चा सुरू झाली. संस्थेचें नामकरण करण्यांत आलें 'रामकृष्ण मिशन'. मिशनचा उद्देश वगैरे गोष्टी आम्ही त्याच्या छापील पत्रकावरून पुढे देत आहोंत:–

**उद्देश:**— मानवाच्या कल्याणासाठी श्रीरामकृष्णांनी जीं तत्त्वें उपदेशिलीं व स्वतःच्या जीवनांत आचरून दाखविलीं, त्यांचा प्रसार करणें आणि मनुष्याची शारीरिक, मानसिक व पारमार्थिक उन्नति होण्यासाठी हीं तत्त्वें जास्तींत जास्त उपयोगी होतील असा प्रयत्न करणें हा या संघाचा उद्देश आहे.

**व्रत:**— जगांतील सगळे धर्म एकाच अक्षय सनातन धर्माचीं भिन्न भिन्न रूपें होत अशा जाणिवेने वेगवेगळ्या धर्मांतल्या लोकांत आपुलकी निर्माण करण्यासाठी श्रीरामकृष्णांनी जें कार्य सुरू केलें, तें पुढे चालविणें हें या संघाचें व्रत होय.

**कार्यपद्धति:**— ऐहिक आणि पारमार्थिक उन्नति करणाऱ्या विद्यांचें दान लोकांना देऊं शकतील अशीं लायक माणसें शिकवून तयार करणें; कलाकौशल्य, निरनिराळे व्यवसाय, उद्योगधंदे वगैरेंच्या वाढीस प्रोत्साहन देऊन लोकांना उद्योगप्रवण बनविणें आणि वेदान्त आणि इतर धार्मिक आदर्श श्रीरामकृष्णांच्या जीवनांत ज्या स्वरूपांत व्यक्त झाले, त्यांचा सामान्य जनतेंत प्रसार करणें.

**भारतांतील कार्यपद्धति:**— आचार्याचें वा शिक्षकाचें व्रत घेऊं इच्छिणाऱ्या गृहस्थांच्या व संन्याशांच्या शिक्षणासाठीं भारतांतील शहरोशहरीं आश्रम स्थापणें, आणि जेणेंकरून ते लोक प्रांतोप्रांतीं जाऊन साधारण जनतेला शिक्षित करूं शकतील असे उपाय योजणें.

**विदेशांतील कार्य:**—भारताबाहेरील देशांत 'व्रतधारी' प्रचारक पाठविणें, भारतांतील व भारताबाहेरील आश्रमांत परस्पर प्रेमाचे व सहानभूतीचे घनिष्ठ संबंध स्थापणें व वाढविणें आणि नवीन आश्रमांची

स्थापना करणें.

स्वामीजी या संघाचे ( मिशनचे ) मुख्य अध्यक्ष झाले. स्वामी ब्रह्मानंद कलकत्ता केंद्राचे अध्यक्ष नेमले गेले व स्वामी योगानंदांची त्यांचे सहकारी म्हणून नेमणूक झाली. अॅटर्नी श्रीयुत नरेन्द्रनाथ मित्र सेक्रेटरी झाले आणि डॉ. शशीभूषण घोष व शरच्चंद्र सरकार हे दुय्यम सेक्रेटरी झाले. शिष्याची नेमणूक शास्त्राध्यापक म्हणून झाली. याबरोबरच असेंहि ठरलें की संघाची सभा दर रविवारीं दुपारीं चारनंतर बलरामबाबू यांच्या घरीं भरत जाईल. या सभेनंतर तीन वर्षे रामकृष्ण संघाची बैठक दर रविवारीं ठरल्याप्रमाणे बलरामबाबूंच्या घरीं भरत असे. हें येथे सांगणें नकोच की, दुसऱ्यांदा परदेशीं जाईपर्यंत स्वामीजी सवडीनुसार या बैठकींना हजर असत व कधी सल्लामसलत वा उपदेश देऊन तर कधी आपल्या अलौकिक मधुर कंठाने गाऊन उपस्थितांना मोहून टाकीत असत.

सभा संपून सर्व लोक निघून गेल्यावर स्वामी योगानंदांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, "हें कार्य अशा रीतीने एकदा सुरू तर झालें. श्रीरामकृष्णांच्या कृपेने कसें काय यशस्वी होतें तेंच आता पाहावयाचें."

स्वामी योगानंदः-- तुमचें हें सारें काम पाश्चात्त्य वळणावर चाललें आहे. असें करण्याचा ठाकुरांचा आदेश होता काय ?

स्वामीजीः---ठाकुरांना हें अभिप्रेत नव्हतें हें तुला कसें कळलें ? अनंतभावमय ठाकुरांना तुम्ही काय आपल्या संकुचित मर्यादांनी जखडून टाकणार आहांत ? मी या साऱ्या मर्यादा भंगून टाकून त्यांचा भाव साऱ्या विश्वांत प्रसृत करून जाईन. त्यांच्या स्वतःच्या पूजाअर्चेचा प्रचार करण्याचा उपदेश ठाकुरांनी मला कधीच दिला नाही. साधना, ध्यानधारणा व अन्य उच्च धार्मिक आदर्शांसंबंधी त्यांनी जो उपदेश दिला, त्याचा आधी अनुभव घेऊन नंतर तो सर्वांना शिकवावयास हवा. अनंत मतें म्हणजे अनंत मार्गच होत. संप्रदायांनी भरलेल्या या जगांत आणखी एका संप्रदायाची भर घालण्याकरिता कांही माझा जन्म झाला नाही. प्रभुचरणांच्या आश्रयाने आम्ही धन्य झालों आहोंत. त्यांच्याच संदेशाचा सर्वत्र प्रसार करण्यासाठीच आमचा जन्म आहे.

स्वामीजींच्या म्हणण्याच्या विरुद्ध स्वामी योगानंदांनी एक

अक्षरहि न काढल्याने स्वामीजी पुढे म्हणाले, "प्रभुकृपेचीं चिन्हें माझ्या या जीवनांत अनेकदा प्रत्ययास आलीं आहेत. तेच पाठीशीं उभे राहून माझ्याकडून हीं सारीं कामें करवून घेत आहेत. भुकेने व्याकुळ होऊन झाडाखाली जेव्हा पडून राहत होतों, लंगोटी नेसायला म्हणून देखील कापडाची बोटभर चिंधी जेव्हा जवळ नसे, हातीं एक कवडीहि नसतांना जेव्हा पृथ्वीपर्यटनाचा निश्चय केला, तेव्हा ठाकुरांच्या कृपेनेच साऱ्या बाबतींत मला मदत मिळत गेली. याउलट या विवेकानंदाला नुसतें एकदा पाहावयाला मिळावें म्हणून शिकागोच्या रस्त्यांतून लोटलेल्या गर्दीत लठ्ठालठ्ठी व्हायची; ज्या सन्मानाचा शतांशहि मिळाला तरी सामान्य माणसाचें डोकें फिरून जाईल तो तसला सन्मानहि ठाकुरांच्या कृपेने विनायास पचवून टाकूं शकलों--प्रभुकृपेने सर्वत्र विजयी झालों. आता या देशांत कांही कार्य करून जाईन. साऱ्या शंका-कुशंका सोडून माझ्या या कार्याला तुम्ही हातभार लावा, पाहाल त्यांच्या कृपेने साऱ्या गोष्टी पूर्णपणें साध्य होतील.

योगानंदः--तुमच्या इच्छेप्रमाणेच साऱ्या गोष्टी होतील. आम्ही तर नेहमीच तुमच्या सांगण्याप्रमाणे वागत आलों आहोंत. वेळोवेळीं हें तर मला अगदी स्पष्ट दिसतें की ठाकुरच साऱ्या गोष्टी तुमच्या द्वारें करवून घेत आहेत. पण काय असेल तें असो, एखादवेळीं कांही तरी खटकतें--ठाकुरांची वेगळीच कार्यपद्धति पाहिली आहे की नाही,--म्हणून असेल कदाचित्. कधी कधी वाटतें की, त्यांचें म्हणणें बाजूला ठेवून आपण भलतीकडेच तर जात नाही ना? याच हेतूने विरुद्ध बोलून मधूनमधून तुम्हांला सावधगिरीचा इशारा देत असतों.

स्वामीजीः-- असल गोष्ट काय आहे ठाऊक आहे? सामान्य भक्तांना रामकृष्णांचें स्वरूप जेवढें उमजलें तेवढेच कांही ते नाहीत. ते आहेत अनंतभावमय एक वेळ ब्रह्मज्ञानाचें मोजमाप करतां येईल पण श्रीरामकृष्णांच्या अगम्य भावांना मात्र सीमा नाही. त्यांच्या एका कृपाकटाक्षाने लाखो विवेकानंद क्षणांत निर्माण होतील. पण तसें न करतां मुद्दामच या वेळीं माझ्याद्वारां, मला निमित्त करून ते या साऱ्या गोष्टी करवून घेत आहेत त्याला मी काय करूं सांग?

हें बोलणें झाल्यावर कांही कामासाठी स्वामीजी तेथून दुसरीकडे

निघून गेले. स्वामी योगानंद शिष्याला म्हणाले, "पाहिलास नरेन्‌चा विश्वास ? म्हणाला की ठाकुरांच्या कृपाकटाक्षाने लाखो विवेकानंद निर्माण होतील. केवढी ही गुरुभक्ति ! तिचा एक कण जरी लाभला असता तरी आम्ही धन्य होऊन गेलों असतों."

शिष्य:— महाराज, श्रीरामकृष्ण स्वामीजींबद्दल काय म्हणत असत ?

योगानंद:— ते म्हणत, 'या युगीं असला दुसरा आधार झाला नाही.' कधी म्हणत,'नरेन् पुरुष, मी प्रकृति,'—'नरेन् माझी सासुरवाडी.' कधी म्हणत, 'अखंडाच्या श्रेणींतील.' कधी म्हणत, 'अखंडाच्या राज्यांत जेथे देवदेवता आपलें अस्तित्व ब्रह्मापासून वेगळें राखूं शकत नाहीत— विलीन होऊन जातात, तेथे सात ऋषि आपापलें अस्तित्व वेगळें राखून ध्यानांत निमग्न असल्याचें पाहिलें. नरेन् त्यांच्यापैकीच एकाचा अंशावतार होय.' 'जगत्पालक नारायणाने नर व नारायण नामक ऋषींचीं रूपें घेऊन जगाच्या कल्याणार्थ तपश्चर्या केली. नरेंद्र म्हणजे त्यांपैकी नर ऋषीचा अवतार'—असेंहि कधी ते सांगत असत. कधी म्हणत— 'नरेन् शुकदेवांसारखा आहे, माया त्याला स्पर्श करूं शकली नाही.'

शिष्य:— ह्या साऱ्या गोष्टी काय खऱ्या आहेत ? की ठाकुर भावावेगाने एकेका वेळीं एकेका प्रकारें म्हणत ?

योगानंद:—त्यांच्या साऱ्याच गोष्टी अगदी खऱ्या आहेत. त्यांच्या मुखावाटे कधी चुकूनहि खोटी गोष्ट बाहेर येत नसे.

शिष्य:— मग वेगवेगळ्या वेळीं अशा भिन्न भिन्न गोष्टी ते कां सांगत ?

योगानंद:—मी काय म्हणतों तें तुला कळलेंच नाही. या साऱ्या गोष्टी नरेन्‌मधे एकाचवेळीं सामावल्या आहेत असा त्यांचा अभिप्राय होता. नरेन्‌मधे ऋषींचें वेदज्ञान, शंकराचार्यांचा त्याग, बुद्धदेवांची करुणा, शुकदेवांची मायामोहशून्यता आणि त्यांचें ब्रह्मज्ञान हीं सारीं एकत्र असल्याचें तुला दिसत नाही का ? म्हणूनच ठाकुर वेळोवेळीं अशा नाना प्रकारच्या गोष्टी त्याच्याबद्दल सांगत. जें सांगत तें सारें खरेंच होतें.

हें ऐकून शिष्य अगदी स्तंभित होऊन गेला. एवढ्यांत स्वामीजी

पुन्हा परत आले व त्यांनी शिष्याला विचारलें, "तुमच्या त्या भागांत (पूर्व बंगालमधे) ठाकुरांबद्दल लोकांना विशेष माहिती आहे काय ?"

शिष्य:––महाराज, आमच्या भागांतून एकटे नागमहाशयच काय ते श्रीरामकृष्णांजवळ आले होते––त्यांच्या तोंडून ऐकूनच आता पुष्कळांना श्रीरामकृष्णांबद्दल जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. पण ठाकुर म्हणजे ईश्वरावतार होत याची त्या लोकांना अजूनहि जाणीव नाही; आणि कांहींचा तर सांगूनहि यावर विश्वास बसायचा नाही.

स्वामीजी:––त्यावर विश्वास बसणें काय इतकी सोपी गोष्ट आहे ? आम्हीं त्यांना इतकें निरखून पारखून पाहिलें. त्यांच्याच तोंडून ही गोष्ट वारंवार ऐकली, रात्रंदिवस त्यांच्या बरोबर राहिलों, तरी देखील वेळप्रसंगीं आमच्याहि मनांत जर संशय––शंकाकुशंका––उत्पन्न होतात, तर मग इतरांची काय कथा ?

शिष्य:––'आपण पूर्णब्रह्मावतार भगवान् आहोंत' ही गोष्ट आपल्या तोंडाने त्यांनी तुम्हांला कधी सांगितली होती काय ?

स्वामीजी:––किती तरी वेळा ! आम्हां साऱ्यांनाच त्यांनी तसें सांगितलें. ते तेव्हा काशीपूरबागेंत होते. शरीर आता अगदी जातें की राहतें अशी त्यांची अवस्था झालेली. असाच एक दिवस त्यांच्या बिछान्यापाशी बसलों असतां माझ्या मनांत आलें,"हे जर आता या वेळीं म्हणतील की, 'मी भगवान् आहें,' तर खरें वाटेल की हे खरोखरीच भगवान् आहेत." त्यांचें शरीर जाण्याच्या दोनच दिवस आधीची ही गोष्ट. तत्क्षणीं माझ्याकडे वळून ते म्हणाले, "जो राम, जो कृष्ण तोच आता या शरीरीं रामकृष्ण. तुझ्या वेदान्तदृष्टीने नाही––अगदी साक्षात्." तें ऐकून तर मी अगदी थक्क झालों. साक्षात् प्रभूच्या श्रीमुखानेच वारंवार ही गोष्ट ऐकूनहि आमचाच जिथे तिच्यावर अजूनहि पूर्ण विश्वास बसला नाही; संशय, निराशादिकांनी आमचींच मनें अधूनमधून जिथे विचलित होतात तिथे इतरांची काय कथा ? आपल्याचसारख्या देहवान एखाद्या माणसाला ईश्वर मानावयाचें व त्यावर तसा विश्वास ठेवायचा ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. फारच फार तर आपण त्याला सिद्ध-ब्रह्मज्ञ पुरुष म्हणून मान्य करूं ! येव-ढ्याचसाठी त्यांना तुम्ही कांहीहि म्हणून संबोधा, त्यांना कांहीहि माना–

त्यांना महापुरुष म्हणा वा ब्रह्मज्ञ म्हणा--त्याला कांहीं हरकत नाही. पण श्रीरामकृष्णांसारखा असा पुरुषोत्तम या भूतलावर यापूर्वी आणखी कधीच आला नाही हें मात्र पक्कें लक्षांत ठेव. घोर अंधाराने व्यापलेल्या या संसारांत आता हाच महापुरुष दीपस्तंभासारखा आहे. त्याच्याच प्रकाशांत माणूस या संसारसागरांतून पलीकडे जाऊं शकेल.

शिष्य:--महाराज, मला तर वाटतें की कांही विशेष (चमत्कार वगैरे) पाहिल्या-ऐकल्याखेरीज खराखुरा विश्वास वसणें कठीण. असें ऐकतों की, मथुरबाबूंनी* ठाकुरांच्या बाबतींत अशा कित्ती तरी गोष्टी पाहिल्या होत्या. आणि म्हणूनच ठाकुरांवर त्यांचा इतका विश्वास बसला होता.

स्वामीजी:--ज्याचा विश्वास बसतच नाही त्याचा कांही ऐकून-पाहूनहि विश्वास बसणें शक्य नाही. अशा माणसाला वाटतें की, हा भ्रम तर नसेल ? स्वप्न तर नसेल ? कृष्णाचें विश्वरूप दुर्योधनानेहि पाहिलें, अर्जुनानेहि पाहिलें, अर्जुनाचा त्यावर विश्वास बसला. दुर्योधनाला उलट वाटलें की हा कांही तरी जादूटोणा असावा! भगवंतानेच समजावून न दिल्यास कांही सांगणें समजणें कुणालाच शक्य नाही. कांहीहि न पाहतां, कांहीहि न ऐकतां, कित्येकांचा अगदी सोळाआणे विश्वास जडून जातो, उलट सतत बारा वर्षें अगदी समोर वावरतांना पाहून, नाना दैवी शक्तींचा आविष्कार स्वतःच्या डोळ्यांनी पाहूनहि एखादा संदेहांतच गटांगळ्या खात असतो. तेव्हा मुख्य गोष्ट आहे भगवंताची कृपा. तरीहि चिकाटीने प्रयत्न हा करायलाच हवा, तरच त्याची कृपा होणार.

शिष्य:-- महाराज, या भगवत्कृपेचे काय कांही नियम आहेत?

स्वामीजी:-- आहेतहि आणि नाहीतहि.

शिष्य:--हें कसें काय ?

स्वामीजी:--जे कायावाचामनाने सदा पवित्र असतात, ज्यांच्या ठिकाणीं भक्ति-अनुराग प्रबल असतो, जे नित्य सदसत् विचार करतात

---

* दक्षिणेश्वर येथील काली मंदिराची प्रतिष्ठात्री राणी रासमणि यांचे जामात श्री. मथुरानाथ विश्वास. हे भगवान श्रीरामकृष्णांचे परम अनुगत भक्त होते.

व ध्यानधारणादिकांत सदैव रत असतात, अशांवरच प्रभुकृपा होत असते. पण भगवान प्रकृतीच्या साऱ्या नियमांच्या (natural lawsच्या) पलीकडे आहे. कोणताहि नियम त्याला बद्ध करूं शकत नाही. ठाकुरांनी म्हटल्याप्रमाणे 'भगवंताचा स्वभाव एखाद्या बालकाप्रमाणे असतो.' म्हणूनच आपण पाहतों की कोटी कोटी जन्म प्रार्थना करूनहि एखाद्याला त्याचा सुगावाहि लागत नाही, आणि याउलट ज्याला आपण पापी, पतित म्हणतों, नास्तिक म्हणतों त्याचें अंतरंग अकस्मात् चित्प्रकाशानें उजळून जातें. अगदी अयाचितपणें भगवान त्याच्यावर कृपा करतात. त्याच्या पूर्वसुकृतानें त्याला ती लाभली असावी असें फार तर तुम्ही म्हणूं शकाल. पण हें कोडें उकलणें फार कठीण आहे. ठाकुर कधी कधी म्हणत, 'भगवंतावर सारा भार घालून राहा--सुकलें पान वाऱ्याकडे सारें सोपवून तो नेईल तिकडे जसें जातें तसें राहा.' आणि याउलट तेच कधी कधी सांगत--'भगवंताच्या कृपेचा वारा तर नित्य वाहतोच आहे, तुम्ही आपल्या नावांचीं शिडेंच काय तीं तेवढीं मोकळीं करा.'

शिष्य:--ही तर अति कठीण गोष्ट वाटते महाराज ! कोणत्याहि प्रकारच्या तर्काला किंवा बुद्धिवादाला येथे वावच उरत नाही.

स्वामीजी:--देश-काल-निमित्तांनी बद्ध असलेल्या मायेच्या राज्यांतच तर्क-विचारादिकांची क्रिया चालते. भगवान तर या देश-कालनिमित्तांच्या अतीत आहे. त्यानेच नियम केले आहेत, पण तो मात्र साऱ्या नियमांच्या पलीकडे आहे. ज्यांना आपण प्रकृतीचे नियम म्हणतों ते तोच करतो--स्वतःच तो ते नियम होतो आणि तो त्यांच्या पलीकडेहि असतो. तो ज्यांच्यावर कृपा करतो ते तत्क्षणींच त्या नियमांच्या शिवाराबाहेर निघून जातात. म्हणूनच त्या प्रभुकृपेसंबंधी कांही साचेबंद ठराविक नियम नाहीत. कृपा करणें ही त्याची लहर आहे. हें सारें विश्वब्रह्मांडच त्याची लहर आहे--'**लोकवत्तु लीलाकैवल्यम्**'* आपल्या इच्छामात्रेंकरून जो हें विश्वब्रह्मांड रचूं आणि मोडूं शकतो त्याला काय कृपा करून एखाद्या महापाप्याला मुक्ति देतां येणार नाही? तरीहि कांही लोकांकडून तो साधना करवून घेतो व कांहींना तो कांहीहि करावयास लावत नाही--ही सारीच त्याची लहर--त्याची इच्छा--

* वेदान्तसूत्रें २. १. ३३

सारी त्याची लीला.

शिष्य:--यांतलें कांहीच समजलें नाही !

स्वामीजी:--आणि समजून तरी काय होणार ? साधेल तितकें आपलें मन त्याच्या चरणीं लाव. त्यायोगेंच हें जगत्--हें इंद्रजाल आपोआप विरून जाईल; पण यासाठी चिकाटीने मन लावायला मात्र हवें. काम-कांचनादिकांची वासना मनांतून काढून टाकावयास हवी, सदसत् विचार सर्वदा करावयास हवा; मी देह नव्हे अशा ठाम समजुतीने विदेहभावाने व्यवहार करावयास हवा. मी सर्वगत आत्मा आहें हा अनुभव घ्यावयास हवा. सतत चिकाटीने या गोष्टी करणें म्हणजेच पुरुषकार--प्रयत्न, साधना. या साधनेच्या साहाय्यानेच शरणागतीची अवस्था लाभेल--त्याच्यावर भरीभार घालून राहतां येईल; यालाच म्हणतात परम पुरुषार्थ.

स्वामीजी पुढे म्हणाले, "त्याची कृपा तुम्हां लोकांवर जर नसती तर तुम्ही लोक येथे आलां तरी कसे असतां ? ठाकुर म्हणत की 'ज्यांच्यावर ईश्वराची कृपा आहे ते येथे येतीलच येतील; ते कुठेहि राहोत अन् कांहीहि करोत, येथल्या गोष्टींचा, येथल्या भावांचा त्यांच्यावर प्रभाव पडेलच पडेल.' तुझीच गोष्ट घे ना--जे कृपासिद्ध होते, प्रभुकृपा म्हणजे काय हें ज्यांना खरोखर कळलें होतें त्या नागमहाशयांचा संगलाभ काय ईश्वरकृपेशिवाय झाला तुला ? 'अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्--' जन्मजन्मान्तरींचें सुकृत गाठीं असेल तरच अशा महापुरुषाचें दर्शन लाभतें. उत्तम भक्तीचीं शास्त्रांत सांगितलेलीं सारीं लक्षणें नागमहाशयांच्या ठायीं परिपूर्ण रूपांत आढळतात. 'तृणादपि सुनीचेन' असें जें म्हणतात तसला दीनभाव एकमात्र नागमहाशयांतच आढळून येतो. तुमचा पूर्वबंगाल धन्य आहे--नागमहाशयांच्या पावन पदस्पर्शाने तो पुनीत होऊन गेला आहे."

बोलतां बोलतां स्वामीजी महाकवि गिरीशचंद्र घोषांच्या घराकडे फिरावयास जाण्यासाठी म्हणून निघाले. शिष्य व योगानंद हे त्यांच्याबरोबर होते. गिरीशचंद्रांच्या घरीं येऊन बसल्यावर स्वामीजी म्हणाले, "जी. सी.*! आजकाल सदासर्वदा मनांत येतें--हें करावें, तें

---

* गिरीशचंद्रांच्या या इंग्रजी आद्याक्षरांनीच स्वामीजी अनेकदा त्यांना संबोधीत.

करावें--त्यांच्या ( ठाकुरांच्या ) मंगलमय वाणीने सारें जग भरून टाकावें. पुन्हा मनांत शंका येते--अशाने भारतांत एखादा नवीन संप्रदायच तर नाही ना स्थापन होणार ? यामुळे मोठें सांभाळून काम करावें लागतें. पुष्कळदा वाटतें--नवीन संप्रदाय झाला तरी हरकत नाही-- त्यांत काय मोठेसें. पण लागलीच पुन्हा वाटतें--नको, त्यांनी कधीहि कुणाचाहि भाव नष्ट केला नाही; समदृष्टि, समदर्शन हीच होती त्यांची वृत्ति. या विचाराने मनांतील कल्पना मी नेहमी दाबून टाकतों. यावर तुमचें काय मत आहे ?

गिरीशबाबू:--यांत मी तें काय सांगूं शकणार बरें ? तुम्ही आहां त्यांच्या हातांतील साधन. ते जें करवून घेतील तेंच तुम्हांला करावें लागणार. मला कांही या साऱ्या भानगडी उमजत नाहीत. पण हें मात्र मला स्पष्ट दिसतें की प्रभूची शक्ति तुमच्या द्वारें कार्य करीत आहे. अगदी उघड्या डोळ्यांनी मला हें स्पष्ट दिसत आहे.

स्वामीजी:-- आणि मला दिसतें की आपण आपल्या मतानुसार काम करतों आहोंत. तरी आपत्ति-विपत्तींत, अभाव-दारिद्र्यांत ते दर्शन देऊन ठीक रस्त्याने नेतात, योग्य मार्गदर्शन करतात हेंहि मला दिसतें. पण तरी अद्याप प्रभूच्या शक्तिमाहात्म्याचें कांहीहि आकलन मला झालेलें नाही.

गिरीशबाबू:--ते म्हणत असत, 'सगळें समजल्यावर लगेच सारें कांही संपून जाईल, मग कोण काम करणार व कोण कोणाकरवीं काम करवून घेणार ?

हीं बोलणीं झाल्यावर अमेरिकेबद्दल गोष्टी निघाल्या. जणु मुद्दामच गिरीशबाबूंनी स्वामीजींचें मन दुसरीकडे वळविलें. असें करण्याचें कारण विचारलें असतां त्यांनी पुढे एकदा सांगितलें होतें-- "श्रीरामकृष्णांच्या तोंडून आम्हीं ऐकलें होतें की अशा प्रकारच्या गोष्टी फार वेळ बोलल्याने स्वामीजींच्या ठिकाणीं जर वैराग्य व ईश्वरभावोद्दीपन झालें व त्यांना जर स्वत:चें स्वरूप कळून आलें--आपण कोण याची जाणीव झाली तर एक क्षणभरहि ते या देहांत राहणार नाहीत." म्हणूनच स्वामीजी सारखे श्रीरामकृष्णांबद्दल बोलूं लागल्यास त्यांचे गुरुबंधु त्यांचें मन दुसरीकडे वळवीत असत हें मीं पाहिलें आहे. तें कसेंहि

असो, अमेरिकेबद्दल बोलतांना त्या गोष्टींत स्वामीजी अगदी रंगून गेले, व त्या देशांतील समृद्धि, स्त्री-पुरुषांचे गुणावगुण, भोगविलास, ऐश्वर्य वगैरे गोष्टींचें सविस्तर वर्णन करण्यास त्यांनी प्रारंभ केला.

## (८)

कलकत्ता

इ. स. १८९७

गेल्या कित्येक दिवसांपासून स्वामीजी बागबाजारांतील श्री. बलराम बोस यांच्या घरीं राहत आहेत. सकाळ, दुपार, संध्याकाळ, केव्हाहि पाहा, त्यांना क्षणाचीहि उसंत नाही. ते कोठेहि असोत उत्साही तरुण, कॉलेजचे विद्यार्थी हे सारखे त्यांच्याकडे येत असतात. स्वामीजीहि त्या सर्वांना मोठ्या प्रेमाने धर्म आणि तत्त्वज्ञान यांतील गहन तत्त्वें सोप्या भाषेंत समजावून देत. स्वामीजींच्या अलौकिक प्रतिभेने ते सारे जणु मुग्ध आणि चकित होऊन स्तब्ध बसत.

आज खग्रास सूर्यग्रहण. ग्रहण पाहण्यासाठी म्हणून खगोल-शास्त्रज्ञहि नाना ठिकाणीं गेले आहेत. धार्मिक स्त्री-पुरुष गंगास्नानासाठी दूरदूरच्या स्थानांहून येऊन मोठ्या उत्कंठेने ग्रहण लागण्याची वाट पाहत आहेत. स्वामीजींना मात्र या ग्रहणाबाबत कांही विशेष औत्सुक्य नाही. शिष्य आज आपल्या हाताने स्वयंपाक करून स्वामीजींना जेवूं घालणार आहे. स्वामीजींनीच तसें म्हटलें होतें. आवश्यक सर्व साहित्य घेऊन आठाच्या सुमारास तो बलरामबाबूंच्या घरीं येऊन हजर झाला. स्वामीजी त्याला बघून म्हणाले, "तुमच्या तिकडे करतात तस्सा झाला पाहिजे अगदी सैपाक. आणि ग्रहणाच्या आधीच आटोपलें पाहिजे जेवणखाण."

बलरामबाबूंच्या घरच्या बायकामंडळींपैकी कुणीहि या वेळीं कलकत्त्यांत नव्हतें; म्हणूनच सारें घर अगदी रिकामें होतें. स्वयंपाक-घरांत जाऊन शिष्य आपल्या कामाला लागला. श्रीरामकृष्णांच्या निस्सीम भक्त 'योगेन मा' जवळ उभ्या राहून शिष्याला सारें सामान-सुमान जमवून देत होत्या. मधूनमधून स्वयंपाकांतहि त्यांचें सूचना देणें चालूंच होतें. स्वामीजीहि अधूनमधून येत, त्याचें काम पाहत

93069

व त्याला उत्साहित करीत. मधे मधे त्याची थट्टाहि करीत. सारा स्वयंपाक तयार होत आला होता. तेवढ्यांत स्वामीजी स्नान आटोपून आले, व स्वतःच पाटपाणी घेऊन जेवावयास बसले. सैपाक थोडा व्हायचा आहे हें सांगूनहि त्यांनी कांही ऐकलें नाही. एखाद्या हटवादी मुलासारखे म्हणाले, "जें झालें असेल तेंच आण आता लवकर. आता कांही मला धीर धरवत नाही. पोटांत अगदी आग पडली आहे भुकेने!" तेव्हा मग शिष्याने घाईघाईने स्वामीजींना वाढलें व त्यांनीहि लागलीच जेवावयास आरंभ केला. नंतर बाकीच्या जिनसा वाटयांतून स्वामीजींना आणून दिल्यावर शिष्याने योगानंद, प्रेमानंद प्रभृति इतर साधूंना वाढावयास सुरवात केली. शिष्य पाककलेंत कांही मोठासा कुशल नव्हता. पण आज त्याच्या स्वयंपाकाची स्वामीजी खूपच स्तुति करूं लागले. नंतर दही व संदेश (एक प्रकारची मिठाई) घेऊन त्यांनी जेवण आटोपलें आणि हात धुणें झाल्यावर ते खोलींत खाटेवर येऊन बसले. शिष्य स्वामीजींच्या समोरील दालनांत प्रसाद ग्रहण करावयास बसला. स्वामीजी म्हणाले-- "पाहा, ज्याला चांगला सैपाक येत नाही, तो चांगला साधु होणें कांही शक्य नाही. मन शुद्ध जर नसेल ना तर रुचकर सैपाक साधणें कठीण." कांही वेळाने चोहीकडून शंखघंटादिकांचा निनाद येऊं लागला. स्त्रियांच्या कंठांतून निघणाऱ्या मंगलसूचक ध्वनींनी वातावरण भरून गेलें. तेव्हा स्वामीजी म्हणाले, "अरे, ग्रहण लागलें. मी झोपतों आता. तूं अमळ पाय दाबून दे माझे." असें म्हणून ते किंचित् लवंडले. त्यांचे पाय दाबतांना शिष्याच्या मनांत आलें, 'या पवित्र क्षणीं गुरुचरणसेवाच माझें गंगास्नान आणि जपजाप्य.' या विचारासरशीं शिष्य शांत मनाने त्यांचे पाय दाबूं लागला. ग्रहण खग्रास असल्यामुळे हळूहळू सर्वत्र संध्याकाळ झाल्यासारखा अंधार पसरला.

ग्रहण सुटायला १५।२० मिनिटांचा अवधि असतांना स्वामीजींनी उठून, हाततोंड धुऊन, थट्टेने शिष्याला म्हटलें, "लोक म्हणतात, ग्रहणांत जो जें करतो त्याचें फळ त्याला पुढे कोटीपट मिळतें. तेव्हा विचार केला की महामायेने या शरीराला चांगली झोप घेण्याचें भाग्य तर दिलें नाही--आता ग्रहणांत जर झोपून घेतलें तर निदान पुढे तरी

चांगली गाढ झोप मिळायचें भाग्य लाभेल ! पण तेंहि कांही नशीबीं दिसत नाही. जोरजबरदस्तीने फारच फार तर १५ मिनिटें निजलों असेन."

नंतर स्वामीजींभोवती सारेजण जमल्यावर स्वामीजींनी शिष्याला उपनिषदांसंबंधी कांही बोल म्हणून फर्माविलें. स्वामीजींसमोर बोलण्याचा शिष्याला यापूर्वी कधी प्रसंग आला नव्हता. त्याची तर छातीच धडधड करायला लागली. पण कांही झालें तरी स्वामीजी कांही आपलें सोडणाऱ्यांपैकी नव्हते. तेव्हा अखेर उठून 'पराञ्चिखानि व्यतृणत् स्वयंभूः' या श्लोकाचें विवरण करावयास त्याने सुरवात केली. नंतर गुरुभक्ति व त्याग यांचा महिमा वर्णन करून व ब्रह्मज्ञानच परमपुरुषार्थ होय असें प्रतिपादन करून तो खाली बसला. स्वामीजींनी सारख्या टाळ्या वाजवून शिष्याला प्रोत्साहन देण्यासाठी म्हटलें, "वा ! काय सुंदर बोललास !"

स्वामी शुद्धानंद व प्रकाशानंद यांनाहि मग स्वामीजींमी बोलावयास सांगितलें. स्वामी शुद्धानंदांनी आपल्या ओजस्वी भाषेंत 'ध्याना' संबंधी एक छोटेसें भाषण केलें. त्यानंतर प्रकाशानंद वगैरेंचीं भाषणें आटोपल्यावर स्वामीजी उठून येऊन बाहेरच्या बैठकींत बसले. संध्याकाळ व्हायला अद्यापहि एका तासाचा अवधि आहे. सर्व मंडळी बाहेर येऊन बसल्यावर, कुणाला कांही विचारावयाचें असल्यास विचारा असें स्वामीजींनी सुचविलें.

शुद्धानंदः–– 'ध्याना'चें खरें स्वरूप काय आहे महाराज ?

स्वामीजीः–– कोणत्याहि एका वस्तूवर मन केंद्रित करण्यालाच ध्यान म्हणतात. एका वस्तूवर एकाग्र करूं शकल्यास तें मन मग दुसऱ्या कोणत्याहि वस्तूवर एकाग्र करतां येतें.

शुद्धानंदः––सविषय व निर्विषय अशा दोन प्रकारच्या ध्यानांचा उल्लेख शास्त्रांत आढळतो. त्यांचा अर्थ काय ? व त्यांतील श्रेष्ठ कोणतें ?

स्वामीजीः–– सुरवातीला कोणतीतरी एखादी वस्तु घेऊन ध्यानाचा अभ्यास करावयाचा असतो. एके काळीं एका काळ्या बिंदूवर मी माझें मन केंद्रित करीत असे. अखेर तो बिंदु दिसतच नसे––

तो समोर आहे याचीहि माझी जाणीव हरपत असे. मनाचा निरोध होऊन जाई, कोणत्याहि वृत्तीचा तरंग उद्भवत नसे;--वारा पडल्याने शांत झालेल्या समुद्रासारखें तरंगहीन होऊन जात असे मन. या अवस्थेंत अतींद्रिय सत्याचा कांहीसा आभास मला मिळे. म्हणून मला वाटतें की कोणत्याहि सामान्य बाह्य विषयाच्या आश्रयाने ध्यानाचा अभ्यास केल्यास मन एकाग्र होतें---ध्यान साधतें. त्यांतहि मनाची ओढ असणाऱ्या गोष्टींवर जर मन केंद्रित करण्याचा प्रयत्न केला तर ध्याना-च्या या अभ्यासांत मन लवकरच एकाग्र होतें. यासाठीच आपल्या देशांत नाना देव-देवींच्या मूर्तींची पूजा प्रचलित आहे. या देव-देवतां-च्या पूजनांतूनच केवढी अलौकिक कला उदयाला आली. पण आता येथे तो मुद्दा बाजूला ठेवूं. येथे मुद्दा हा की ध्यानाचा सर्वांचा विषय एकच असूं शकत नाही. ज्यांनी ज्या बाह्य अवलंबनांचा ध्यानासाठी आधार घेऊन सफलता प्राप्त करून घेतली त्यांनी त्या अवलंबनाचाच प्रचार केला. कालान्तराने हीं बाह्य अवलंबनें म्हणजे मन स्थिर करण्याचीं केवळ साधनें होत ही गोष्ट लोकांच्या स्मरणांतून गेली व या बाह्य अवलंबनाचाच गाजावाजा पुढे होऊं लागला. ध्येय बाजूला ठेवून साधनांवरच लोक लक्ष ठेवूं लागले. मनाला वृत्तिशून्य करणें हा आहे मूळ उद्देश, आणि एखाद्या वस्तूवर मन एकाग्र (तन्मय) केल्या-खेरीज तो साधणें शक्य नाही.

शिष्यः---मनोवृत्ति जर विषयाकार झाली तर त्या मनाने ब्रह्म-धारणा होणें कसें शक्य आहे ?

स्वामीजीः---मनोवृत्ति सुरवातीला जरी विषयाकार झाली तरी पुढे त्या विषयाचें ज्ञान उरत नाही. उरतो शुद्ध 'अस्तिबोध.'

शिष्यः--- मन एकाग्र झाल्यावरहि कामना-वासनांचा उद्भव कां म्हणून होतो ?

स्वामीजीः---पूर्वसंस्कारांमुळे त्या गोष्टी होतात. बुद्धदेव अगदी समाधिस्थ होण्याच्या क्षणीं माराचा उदय झाला. मार म्हणून कांही कोणी बाहेरची व्यक्ति नव्हती. माराच्या रूपाने मनांतील पूर्वसंस्कारच बाहेर व्यक्त झाले.

शिष्यः--- असें सांगतात की सिद्ध होण्यापूर्वी अनेक भयानक

अनुभव येतात; ते सारे काय मनःकल्पित असतात ?

स्वामीजी:— नाही तर काय मग ? साधकाला मात्र त्या अवस्थेंत उमजत नाही की हे सारे आपल्याच मनाचे खेळ आहेत म्हणून. बाहेर त्यांतलें कांहीच नसतें. हें जें जगत् पाहतोस बाहेर, त्यालाहि अस्तित्व नाही. सारा मनाचाच खेळ. मन वृत्तिशून्य झाल्यावर त्यांत ब्रह्माचें प्रतिबिंब पडतें. तेव्हा, 'यं यं लोकं मनसा संविभाति'– त्या त्या लोकाचें दर्शन होऊं शकतें. जो संकल्प करावा तो पूर्ण होतो. ही सत्यसंकल्प अवस्था प्राप्त होऊनहि जो जागरूक राहतो, कुठल्याहि वासनेचा पगडा आपल्यावर बसूं देत नाही, त्यालाच ब्रह्मज्ञान लाभतें. उलट ही अवस्था लाभल्यावर जो विचलित होतो त्याला अनेक सिद्धि (शक्ति) लाभतात व तो परमार्थापासून भ्रष्ट होतो.

येवढें सांगून झाल्यावर स्वामीजी 'शिव, शिव,' असें नामोच्चारण करूं लागले. पुढे ते पुन्हा म्हणाले, "एका त्यागाखेरीज ह्या जीवनसमस्येचें गूढ उकलण्याचा दुसरा कोणताहि मार्ग नाही. 'त्याग, त्याग, त्याग' हाच होऊं द्या तुमच्या जीवनाचा मूलमंत्र. 'सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां वैराग्यमेवाभयम्'—या जगामधील प्रत्येक गोष्टीला भय आहे, भय नाही फक्त वैराग्याला. वैराग्य म्हणजेच अभय."

## (९)

कलकत्ता

इ. स. १८९७ (मार्च–एप्रिल)

अमेरिकेहून परत आल्यावर कांही दिवस झालेत, स्वामीजी कलकत्त्यांतच असून त्यांचें वास्तव्य आहे श्री. बलराम बोस यांचे घरीं. मधूनमधून अन्य परिचित लोकांकडेहि जाणें-येणें चालूंच आहे. आज शिष्य स्वामीजींना भेटायला आला तेव्हा ते बाहेर जाण्याच्याच तयारींत होते. ते शिष्याला म्हणाले, 'चल माझ्याबरोबर,' आणि हें म्हणतच ते खाली उतरूं लागले. शिष्यहि त्यांच्या मागून निघाला. भाड्याच्या एका गाडींत ते व शिष्य दोघेहि बसले. गाडी दक्षिण दिशेने चालूं लागली.

शिष्य:—कुठे निघालां आहांत महाराज ?

स्वामीजी:—चल माझ्या बरोबर म्हणजे दिसेलच.

कुठे जायचें तें शिष्याला कांहीच न सांगतां, गाडी बिडनस्ट्रीटवर जेव्हा आली तेव्हा बोलण्याच्या ओघांत ते म्हणाले, "तुमच्या या देशांत स्त्रियांच्या शिक्षणासाठी कांहीच प्रयत्न होत नाहीत. शिकल्यासवरल्याने स्वतः तुम्ही मात्र माणसांत येतां पण तुमच्या सुखदुःखाच्या ज्या वांटे-करणी, प्राण पणाला लावून ज्या तुमची सेवा करतात त्या स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी, त्यांची उन्नति करण्यासाठी तुम्ही काय करतां ?"

शिष्य:—कां बरें ? आजकाल केवळ स्त्रियांसाठी म्हणूनच किती तरी शाळा निघताहेत, कॉलेजें आहेत—त्यांत शिक्षण घेऊन किती तरी स्त्रिया बी.ए., एम्. ए. होऊन बाहेर पडत आहेत.

स्वामीजी:—ते झाले सारे विलायती चाळे. तुमच्या धर्मशास्त्रांना अनुसरून, या देशाच्या रिवाजांना धरून चालणाऱ्या कितीशा शाळा आहेत ? अशा प्रकारचें शिक्षण या देशीं तर पुरुषांनाहि मिळत नाही, मग स्त्रियांबद्दल तर बोलणेंच नको. सरकारी आकडेवारीप्रमाणे भारतांत शेकडा १०–१२ टक्के लोकच शिक्षित आहेत; स्त्रियांच्या बाबतींत मला वाटतें हें प्रमाण शेकडा एक टक्का देखील भरणार नाही.

"असें नसतें तर काय देशाची ही असली दुर्दशा झाली असती ? शिक्षणाचा प्रसार, ज्ञानाची वाढ या साऱ्या गोष्टी झाल्याखेरीज देशाची उन्नति होणार कशी ? तुम्ही मूठभर लोक शिकून तयार झालां आहांत, तुम्ही देशाचे आधारस्तंभ आहांत, पण तुमच्यांतहि तर मुळी या बाबतींत कांही हालचाल दिसत नाही. पण लक्षांत ठेव—सर्व-सामान्य लोकांत आणि स्त्रियांपर्यंत जोंवर शिक्षणाचा प्रसार होत नाही तोंवर कांहीहि साधणें शक्य नाही. म्हणूनच कांही ब्रह्मचारी व कांही ब्रह्मचारिणी शिकवून तयार करण्याची माझी इच्छा आहे. हे ब्रह्मचारी अर्थातच पुढे संन्यास घेतील व देशभर गावोगावीं हिंडून सर्वत्र सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणाचा प्रसार करतील. याचप्रमाणे या ब्रह्मचारिणीहि स्त्रियांमध्ये शिक्षणाचा फैलाव करतील. पण हें कार्य आपल्या देशाच्या पद्धतीनुसार व्हावयास पाहिजे. पुरुषांच्या

शिक्षणाचीं जशीं केंद्रें उघडण्यांत येतील, तशींच स्त्रियांच्याहि शिक्षणासाठी उघडावयास हवींत. सुशिक्षित व सच्चरित्र ब्रह्मचारिणी या केंद्रांतील स्त्रियांच्या शिक्षणाचा भार घेतील. पुराण, इतिहास, गृहकृत्यें, कला, कौटुंबिक जीवनांतील कर्तव्यें व आदर्श चारित्र्य घडविण्याला साहाय्यक असणारे नीतिनियम आधुनिक विज्ञानाच्या मदतीने शिकवावयास हवेत. धर्मपरायणता, नीतिपरायणता विद्यार्थिनींच्या अंगीं बाणावयास हवी. त्या सुगृहिणी होतील असे कसून प्रयत्न करावयास हवेत. अशाच सुगृहिणींचीं मुलेंबाळें पुढे या बाबतींत अधिक उन्नति करूं शकतील. सुशिक्षित आणि नीतिपरायण मातांच्या पोटींच थोर लोक जन्माला येतात. आज पाहावें तर तुम्हीं स्त्रियांना कामें करणारीं यंत्रें करून ठेविलें आहे. अरे राम ! तुमच्या शिक्षणाचें अखेर हेंच का फळ ? आधी स्त्रियांचा उद्धार करावयास हवा. सर्वसामान्य जनतेंत जागृति उत्पन्न करावयास हवी, तरच देशाचें—भारतवर्षाचें कल्याण होईल."

गाडी कॉर्नवॉलिस स्ट्रीटवरील ब्राह्मसमाज ओलांडून पुढे निघालीसें पाहून ते गाडीवाल्याला म्हणाले, "चोरबागानाच्या रस्त्याने गाडी घे." या रस्त्याला गाडी लागल्यानंतर महाकाली पाठशाळेच्या संस्थापिका तपस्विनी माता यांनी त्यांची शाळा पाहण्यासाठी बोलाविल्याचें स्वामीजींनी शिष्याला सांगितलें. ही शाळा तेव्हा चोरबागानांतील कै. राजेंद्र मल्लिक यांच्या घराच्या किंचित् पूर्वेला एका दुमजली भाड्याच्या घरांत होती. गाडी शाळेसमोर थांबतांच दोनचार गृहस्थांनी पुढे येऊन त्यांना नमस्कार केला, व ते स्वामीजींना घेऊन वर गेले. तपस्विनी माताजींनी उभे राहून स्वामीजींचें स्वागत केलें. थोड्याच वेळांत त्यांनी स्वामीजींना आपल्याबरोबर एका वर्गांत नेलें. मुलींनी उभे राहून स्वामीजींचें स्वागत केलें. नंतर माताजींच्या सांगण्यावरून त्या सार्‍यांनी मिळून समसुरांत 'शिवध्यान' गाऊन दाखविलें. शाळेंत पूजादिकांचें शिक्षण कशा प्रकारें दिलें जातें तें स्वामीजींनी विचारल्यावरून त्या मुलींनी प्रात्यक्षिक करून दाखविलें. मोठ्या प्रसन्न मनाने त्या सार्‍या गोष्टी पाहून नंतर स्वामीजी दुसर्‍या वर्गाकडे वळले. वृद्ध माताजींना स्वामीजींबरोबर जातीने सर्वत्र फिरणें

शक्य नसल्याने त्यांनी शाळेंतीलच दोनतीन शिक्षकांना स्वामीजींना सर्व वर्ग नीट दाखविण्यास सांगितलें. सर्व वर्ग पाहून झाल्यावर स्वामीजी माताजींकडे परत आले. माताजींनी एका मुलीला बोलावून कालिदासाच्या रघुवंशांतील तिसऱ्या सर्गाच्या पहिल्या श्लोकाचें विवेचन करावयास सांगितलें. मुलीनेहि संस्कृतांतून त्या श्लोकाचें विवरण केलें. स्वामीजींनीहि तें ऐकून संतोष व्यक्त केला आणि स्त्रीशिक्षणाच्या प्रसारासाठी माताजींनी चिकाटीने व प्रयत्नपूर्वक केलेल्या गोष्टींचें तें फळ पाहून ते त्यांची खूप प्रशंसा करूं लागले. माताजी नम्रतापूर्वक म्हणाल्या, " देवीज्ञानाने मी या विद्यार्थिनींची सेवा करतें. एरवी ही शाळा स्थापन करण्यांत कीर्ति वा अन्य कोणताहि माझा हेतु नाही."

विद्यालयासंबंधी बोलणें संपल्यानंतर स्वामीजी परत जावयास निघाल्याचें पाहून माताजींनी व्हिजिटर्स बुक आणवून त्यांत स्वामीजींना त्यांचें मत लिहिण्यास सांगितलें. या वहींत आपलें मत स्वामीजींनी विस्तृतपणें लिहिलें. त्यांच्या लिहिण्यांतलें 'हें कार्य अगदी योग्य दिशेने चाललें आहे' हें शेवटचें वाक्य शिष्याच्या अजूनहि स्मरणांत आहे.

नंतर माताजींना नमस्कार करून स्वामीजी शिष्यासह पुन्हा गाडींत येऊन बसले व गाडी बागबाजाराकडे चालूं लागल्यावर त्यांनी शिष्याशीं स्त्रीशिक्षणाबद्दल बोलणें सुरू केलें. त्यांतलाच कांही भाग पुढे देतों.

स्वामीजी:— माताजींचा जन्म कुठला!—सर्वस्वाचा त्याग त्यांनी केला असला तरी लोककल्याणासाठी त्या केवढ्या कळकळीने प्रयत्न करीत आहेत! शिक्षण देणाऱ्या असल्या स्त्रिया नसल्यास मुलींचें काय अशा प्रकारें शिक्षण होणें शक्य आहे? मला साऱ्या गोष्टी आवडल्या, परंतु कांही गृहस्थ माणसें शिक्षक म्हणून लावल्याचें मात्र मला तितकेसें पटलें नाही. शिक्षित विधवा किंवा ब्रह्मचारिणींवरच शाळेंतील शिक्षणाचा सारा भार असावयास हवा. कन्याशाळांशीं पुरुषांचा कुठल्याहि प्रकारचा संपर्क आपल्या देशांत असणें योग्य नाही.

शिष्य:— पण महाराज, गार्गी, खना, लीलावती वगैरेंसारख्या गुणवान शिक्षित स्त्रिया या देशांत आता आढळतात कुठे?

स्वामीजी:—— या देशांत अशा प्रकारच्या स्त्रिया काय आजच्या घटकेला नाहीत ? हा सीता-सावित्रींचा देश. पुण्यक्षेत्र भारतवर्षी याहि घडीला स्त्रियांमध्ये जें चारित्र्य, जो सेवाभाव, जसा स्नेह, जशी दया, तुष्टि आणि भक्ति वगैरे गोष्टी आढळून येतात तशा साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर अन्यत्र मला आढळल्या नाहीत. पाश्चात्त्य देशांत अनेकदा तर स्त्रियांकडे पाहून ह्या स्त्रिया आहेत असें मला वाटेच ना ! अगदी जणु पुरुषच ! गाड्या चालवतात, ऑफिसांत जातात, शाळांतून नोकरी करतात, प्रोफेसरी करतात. केवळ भारतवर्षांतच स्त्रियांमधील लज्जा, विनय वगैरे गुण पाहून डोळे कसे निवतात ! असले सुयोग्य आधार त्यांच्या रूपाने समोर असूनहि तुम्ही त्यांची उन्नति करूं शकलां नाही. त्यांच्या हृदयांत ज्ञानदीप प्रज्वलित करण्याचा प्रयत्न तुम्हीं केला नाही. योग्य प्रयत्न झाले, योग्य शिक्षण मिळालें तर या आदर्श स्त्रिया होतील.

शिष्य:—— महाराज, या माताजी ज्या प्रकारचें शिक्षण विद्यार्थिनींना देताहेत त्याने काय तुम्ही म्हणतां तसलें फळ लाभेल ? या साऱ्या विद्यार्थिनी मोठ्या होऊन विवाह करतील अन् अल्पावधींतच, बाकी चार बाया जशा असतात तशाच याहि होतील. मला तर वाटतें की यांना जर ब्रह्मचर्यव्रताची दीक्षा देणें शक्य झालें तरच या समाजाच्या व देशाच्या उन्नतीसाठी आत्मबलिदान करूं शकतील आणि मगच शास्त्रोक्त उच्च आदर्श त्यांना लाभूं शकेल.

स्वामीजी:—— क्रमाक्रमाने या साऱ्या गोष्टी होतील. देशांत अद्यापहि असे शिक्षित लोक निर्माण झालेले नाहीत की जे समाजाच्या शिक्षेचें भय न बाळगतां आपल्या मुलीबाळी अविवाहित ठेवावयास तयार होतील. हेंच पाहा ना ! आजहि मुलगी १२-१३ वर्षांची होते न होते तोंच लोकनिंदेला भिऊन समाजप्रवादाच्या भयाने लोक आपल्या मुलींचीं लग्नें घाईघाईनें उरकून घेतात. संमतीवयाचें बिल पुढे येतांच समाजधुरीणांनी लाखो लोक जमवून हलकल्लोळ माजविला की आम्हांला हा कायदा नको. दुसऱ्या देशांत हीं विरोधी सभासंमेलनें होण्याचें तर बाजूलाच राहो, लोकांनी घराचीं दारें लावून घेऊन हा कलंक अद्याप आपल्या समाजांत आहे म्हणून शरमेने माना खाली

घातल्या असत्या.

शिष्य:—पण स्मृतिकारांनी काय कांही विचार न करतांच या बालविवाहाचें मंडन नि समर्थन केलें असेल ? खात्रीने त्यांच्या या करण्यामागे कांही गूढ अर्थ असलाच पाहिजे.

स्वामीजी:— असा कोणता गूढ अर्थ असणार आहे ?

शिष्य:— बालवयांतच लग्न झाल्यास मुली पतिगृहीं जाऊन अगदी लहानपणापासूनच कुलधर्म शिकूं शकतात. सासरीं सारीं गृहकृत्यें त्यांच्या अंगवळणीं पडूं शकतात. वाढत्या वयाच्या मुली पितृगृहीं उच्छृंखल होण्याची शक्यता असते. बालपणीं विवाह झाल्यास ही शक्यता राहत नाही. उलट लज्जा, नम्रता, सहिष्णुता, कष्टाळूपणा वगैरे स्त्रीसुलभ गुणांचा त्यांच्या ठिकाणीं विकास व्हायला मदतच होते यामुळे.

स्वामीजी:— याउलट दुसऱ्या बाजूने म्हणतां येईल की बालविवाहाने बहुसंख्य स्त्रिया अकालीं प्रजोत्पादन करावें लागून मृत्युमुखीं पडतात. त्यांची संततीहि अल्पजीवी निपजते व देशांतील भिकारवाढीला मदत करते ! आईबाप सुदृढ व बलसंपन्न नसतील तर निरोगी प्रजा जन्मणार तरी कशी ? थोडेंफार शिकून वयांत आल्यावर लग्न झाल्यास त्याच स्त्रियांना जी संतति होईल तिच्याद्वारें देशाचें केव्हाहि कल्याणच होईल. तुमच्या घराघरांतून विधवांची ही भरती दिसते तिचें कारण आहे हा बालविवाह. बालविवाह कमी झाल्यास विधवांची संख्याहि आपोआप कमी होईल.

शिष्य:— मला तर वाटतें महाराज, की वय वाढल्यावर लग्न झाल्यास स्त्रिया गृहकृत्यांत तितकेसें लक्ष घालूं शकणार नाहीत. मीं तर ऐकलें आहे की कलकत्त्यांत अनेक कुटुंबांतून सासवा सारें सैपाकपाणी उरकतात आणि शिकल्यासवरलेल्या सुना पावलें रंगवून खुशाल बसून राहतात. आमच्या पूर्वबंगालमध्ये ही गोष्ट होणें शक्यच नाही.

स्वामीजी:— चांगलें आणि वाईट हें तर सर्वत्रच आहे. माझ्या मतें तर कुठल्याहि देशांतल्या समाजाची घडण आपोआपच होत असते. म्हणून बालविवाह-बंदी, विधवाविवाह वगैरे भानगडी करून व्यर्थ डोकें शिणवण्यांत कांही अर्थ नाही. आपलें काम म्हणजे समाजांतील

साऱ्या स्त्री-पुरुषांना शिक्षण देणें. हितअनहित काय हें त्यांचें त्यांनाच या शिक्षणामुळे कळूं लागेल आणि अहितकर गोष्टींचा ते आपणहून त्यागहि करतील. मग जुलूमजबरदस्तीने समाजांत कोणत्याहि गोष्टी मोडाव्या किंवा घडवाव्या लागणार नाहीत.

शिष्य---आजच्या स्त्रीला कसल्या प्रकारचें शिक्षण देणें तुम्हांला इष्ट वाटतें ?

स्वामीजी:--- धर्म, कला, विज्ञान, गृहविज्ञान, पाकशास्त्र, शिवणकला, आरोग्यशास्त्र वगैरेंसारख्या विषयांचीं मूलतत्त्वें तरी त्यांना शिकवावयास हवींत. कथा-कादंबऱ्या तर मुळीच त्यांच्या हातीं लागूं देऊं नयेत. महाकाली पाठशाळा बऱ्याच अंशीं योग्य मार्गानें चालली आहे; पण नुसती पूजापद्धति शिकवूनच कांही काम भागण्यासारखें नाही. शिक्षणाने साऱ्याच बाबतींत डोळसपणा यायला हवा. आदर्शभूत स्त्रियांचीं चरित्रें सतत विद्यार्थिनींसमोर ठेवून त्यागाच्या उच्च व्रताबद्दल त्यांच्या मनांत अभिरुचि उत्पन्न करावयास हवी. सीता, सावित्री, दमयंती, लीलावती, खना, मीरा वगैरेंचीं चरित्रें स्त्रियांना समजावून देऊन त्याच आदर्शानुसार तुमचीं जीवनें तुम्ही घडवा हें त्यांच्या मनावर ठसवावयास हवें.

श्री. बलराम बोसांच्या दाराशीं गाडी येऊन पोहोचली. गाडींतून उतरून स्वामीजी वर गेले व त्यांच्या दर्शनासाठी म्हणून जमलेल्या लोकांना त्यांनी महाकाली पाठशाळेचा वृत्तान्त आरंभापासून अखेरपर्यंत सांगावयास सुरवात केली.

त्यानंतर, नवीनच स्थापन झालेल्या 'रामकृष्ण मिशन'च्या सदस्यांनी कोणतीं कामें हातीं घ्यावींत याबद्दल सांगतांना 'विद्यादान' व 'ज्ञानदान' यांचें महत्त्व ते प्रतिपादन करूं लागले. शिष्याला अनुलक्षून ते म्हणाले, "शिक्षण द्या, शिक्षण द्या. नान्यः पन्था विद्यतेऽयनाय--- एरवी तरणोपाय नाही." शिक्षणदानाला विरोधी असणाऱ्या गटाला उद्देशून टोमणा मारीत ते म्हणाले, "पाहा, प्रल्हादाच्या टोळक्यांत सामील नका होऊं बरें !" या म्हणण्याचा अर्थ काय म्हणून विचारतांच त्यांनी स्पष्टीकरण केलें, "ठाऊक नाही ? 'क' म्हणतांच भावविव्हलतेने प्रल्हादाच्या डोळ्यांत (कृष्णस्मृतीने) पाणी येई;---

मग शिकणेंसवरणें कुठलें होणार ? प्रल्हादाचे डोळे भरून येत अर्थात् प्रेमविव्हलतेने, पण मूर्खांच्या डोळ्यांत पाणी येतें तें मात्र भयाने ! भक्तमंडळींतहि पुष्कळसे लोक हे असेच आहेत !" स्वामीजींच्या या विधानाने सारे लोक हसूं लागले. स्वामीजींचें हें बोलणें ऐकून स्वामी योगानंद म्हणाले, "जेव्हा जें तुमच्या मनांत येईल तेव्हा त्याची अगदी कड लावीपर्यंत तुम्हांला कांही चैन पडत नाही. आताहि तुमच्या जें मनांत आहे तें शेवटीं होणारच !"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

(१०)
कलकत्ता
इ. स. १८९७

स्वामीजींबरोबर सायणाचार्यांचें ऋग्वेदावरील भाष्य शिष्य आज दहा दिवसांपासून वाचतो आहे. बागबाजारांतील श्री. बलराम बोस यांच्या घरींच स्वामीजी राहत आहेत. मॅक्समुलरांचे ऋग्वेदावरील खंड एका मोठ्या माणसाकडून आणले आहेत. आधीच नवा ग्रंथ, त्यांत भाषा पुन्हा वैदिक— त्यामुळे शिष्य वाचतांना जागोजाग अडखळत आहे. त्यावरून 'बांगाल' म्हणून त्याची प्रेमळ थट्टा करायलाहि स्वामीजींना फावत आहे ! तथापि तो अडेल तेथे ते त्याला योग्य उच्चार व पाठ सांगत आहेत. वेदांचें अनादित्व सिद्ध करण्यासाठी जें अलौकिक बुद्धिकौशल्य सायणांनी दाखविलें तें स्पष्ट करतांना स्वामीजी त्या भाष्यकाराची मुक्तकंठाने प्रशंसा करीत आहेत; उलट केव्हा केव्हा प्रमाण देऊन त्याच पदाच्या गूढ अर्थासंबंधी आपलें भिन्न मत नमूद करून मौजेने ते सायणांची थट्टाहि करीत आहेत.

अशा रीतीने कांही काळ ग्रंथावलोकन झाल्यावर स्वामीजींनी मॅक्समुलरबद्दल बोलणें काढलें व म्हटलें, "मला तर वाटतें की सायण स्वतःच आपल्या भाष्याचा उद्धार करण्यासाठी मॅक्समुलरच्या रूपाने आले असावेत. माझी ही धारणा पुष्कळ दिवसांपासूनची आहे. मॅक्समुलरांच्या प्रत्यक्ष भेटीने माझी ही धारणा आणखी दृढ झाली. अशा चिकाटीचा, वेदवेदान्तांत अशी गति असलेला पंडित आपल्या देशांतहि आढळत नाही ! त्यांतच ठाकुरांवर (श्रीरामकृष्णांवर) काय त्यांची

गाढ भक्ति !! त्यांना ते अवतार मानतात. पाहुणा म्हणून त्यांच्या घरीं होतों तेव्हा काय आदरातिथ्य केलें माझें ! त्या वृद्ध पतिपत्नीकडे पाहून वाटे जणु वशिष्ठ-अरुंधती संसार करताहेत. मला निरोप देतांना म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून आसवें गळलीं !

शिष्य:-- सायणच जर मॅक्समुलर म्हणून आले असतील तर त्यांनी ही पवित्र भारतभूमि सोडून म्लेंच्छ होऊन कां बरें जन्म घेतला ?

स्वामीजी:-- अज्ञानामुळेच माणूस, 'मी आर्य, तो म्लेंच्छ,' अशी भावना करतो-- असे भेद पाडतो. पण वेदांचे भाष्यकार म्हणजे ज्ञानाची जिवंत मूर्तिच होत. त्यांना या वर्णाश्रमांची वा जातिभेदाची काय मातब्बरी ? त्यांच्या दृष्टीने त्या साऱ्याच निखालस अर्थशून्य गोष्टी होत. जीवांचें हित करण्यासाठी ते हवें तिथे जाऊं शकतात. विशेषतः ज्या देशांत विद्या व धन यांची सांगड आहे तो देश सोडून जर ते जन्म घेते तर हीं प्रचंड पुस्तकें छापायला पैसा तरी कुठून मिळाला असता त्यांना ? ऐकलें नाहीस ?-- ईस्ट इंडिया कंपनीनेच तर हे ग्रंथ छापायला नगद नऊ लाख रुपये दिले होते ! तोहि पैसा कमीच पडला. या भारतांतीलच शेकडो वैदिक पंडितांना मासिक पगारावर या कामीं नेमण्यांत आलें होतें. विद्या-ज्ञानादिकांसाठी असा प्रचंड खर्च, अशी तळमळ आजच्या जमान्यांत या देशांत कुठे कधी दिसली आहे ? स्वतः मॅक्समुलर यांनीच या ऋग्वेद-प्रस्तावनेंत म्हटलें आहे की नुसतीं हस्तलिखितें तयार करावयाला त्यांना पंचवीस वर्षें लागलीं व नंतर तीं छापावयास लागलीं वीस वर्षे. सतत प्रदीर्घ पंचेचाळीस वर्षें एकच ग्रंथ घेऊन चिकाटीने असलें काम करणें हें कांही सामान्य माणसाचें काम नव्हे. यांतच काय तें समज. मी कांही उगीचच त्यांना सायण म्हणत नाही.

मॅक्समुलरबद्दल हें बोलणें झाल्यावर पुन्हा अध्ययनाला सुरवात झाली. वेदांचें अवलंबन करूनच सृष्टीचा विकास झाला आहे ह्या सायणांच्या मताचें स्वामीजी मोठ्या आवेशाने समर्थन करूं लागले. ते म्हणाले, "वेद म्हणजे अनादि सत्यांचा समूह. वेदज्ञ ऋषींनी हीं सारीं सत्यें प्रत्यक्ष पाहिलीं. अतींद्रिय ज्ञान नसलेल्या आपल्यासारख्या

सामान्य लोकांना त्यांचा अनुभव येणें शक्य नाही. म्हणूनच वेदांत ऋषि शब्दाचा अर्थ आहे मंत्रार्थद्रष्टा–जानवें घालणारा ब्राह्मण असा नाही. ब्राह्मणादि जातिभेद तर पुढे आले. वेद शब्दात्मक अर्थात् भावात्मक वा केवळ अनंत भावराशींची समष्टि होत. जो पुढे स्थूल रूप धारण करून व्यक्त होतो असा सूक्ष्म भाव म्हणजेच शब्द, असा शब्द या पदाचा प्राचीन वैदिक अर्थ आहे. म्हणून जेव्हा प्रलय होतो तेव्हा भावी सृष्टीचीं सारीं सूक्ष्म बीजें वेदांतच समाविष्ट होतात. म्हणूनच पुराणान्तरीं प्रथमच मत्स्यावतारांत वेदांचा उद्धार झाल्याचें आढळून येतें. प्रथमावतारांतच वेदांचा उद्धार झाला व या वेदांपासून क्रमाने पुढे साऱ्या सृष्टीचा विकास होऊं लागला. म्हणजेच वेदांतर्गत शब्दांच्या आधारें विश्वांतील सारे स्थूल पदार्थ एकामागून एक तयार होऊं लागले, कारण साऱ्याच स्थूल पदार्थांचें सूक्ष्म रूप म्हणजे शब्द किंवा भाव होय. पूर्वीच्या सर्व कल्पांमधेंहि सृष्टि अशीच निर्माण झाली होती. या गोष्टीचा उल्लेख वैदिक संध्येच्या मंत्रांतच आहे **'सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् दिवञ्च पृथिवीं चान्तरीक्षमथो स्वः'** (विधात्याने सूर्य, चंद्र, पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक, स्वर्ग, इत्यादि पूर्वीच्या कल्पांतील पद्धतीने आणि क्रमाने व निर्माण केले.) समजलें ?

शिष्यः–– पण महाराज, कोणतीहि वस्तुच जेव्हा नसेल तेव्हा कशाला उद्देशून शब्द वापरला जाईल ? आणि पदार्थांचीं नांवेंहि कशीं तयार होतील ?

स्वामीजीः–– वरवर पाहतां असें वाटतें खरें. पण असें पाहा की हा घट फुटला असतां 'घटत्वा'चा नाश होतो काय ? नाही. कां नाही ? कारण घट म्हणजे स्थूल वस्तु; पण घटत्व म्हणजे घटाचें सूक्ष्म रूप वा त्याची शब्दावस्था होय. अशा प्रकारें सर्व पदार्थांची शब्दावस्था म्हणजे त्या साऱ्या पदार्थांची सूक्ष्मावस्था होय. आणि आपण ज्या पाहतों, ऐकतों, समजतों, स्पर्श करतों त्या साऱ्या जिनसा या सूक्ष्म वा शब्दावस्थेंत असलेल्या पदार्थांचा स्थूल विकास होत; जसें, कार्य आणि त्याचें कारण. जगाचा कल्पान्तीं नाश झाल्यानंतरहि जगताचा बोधक शब्द, म्हणजेच साऱ्या स्थूल पदार्थांचा सूक्ष्मस्वरूपसमूह ब्रह्मांत कारणरूपाने असतो. सृष्टिनिर्मितीच्या पूर्वी सूक्ष्मस्वरूपसमूहांत एकीभूत

असलेले हे पदार्थ स्पंदित होऊन, त्यांचाच मूलभूत असा शब्दगर्भात्मक अनादि ॐकार ध्वनि आपोआप ध्वनित होऊं लागतो. पुढे क्रमाने या समष्टींतूनच एकेक विशिष्ट विशिष्ट पदार्थ प्रथम सूक्ष्म वा शाब्द स्वरूपांत व नंतर स्थूल स्वरूपांत व्यक्त होतो. हा शब्द म्हणजेच ब्रह्म---शब्द म्हणजेच वेद. हाच सायणाचार्यांचा अभिप्राय आहे. आलें तुझ्या ध्यानांत ?

शिष्य:--- नीटसें कांही समजलें नाही महाराज.

स्वामीजी:-- जगांत जितके म्हणून घट आहेत ते सारे नष्ट झाले तरी 'घट' हा शब्द राहूं शकेल हें तर समजतें ? तर मग जगाचा ध्वंस झाल्यावरहि किंवा ज्या साऱ्या वस्तूंचें हें जग बनलें आहे त्या साऱ्या तुटून, फुटून, चूर्ण होऊन गेल्यावरहि त्या त्या वस्तूंचे बोधक शब्द कां नाही राहणार ? आणि त्यांच्यापासून पुन्हा सृष्टीची उत्पत्ति न व्हायला तरी काय झालें ?

शिष्य:---पण नुसतें 'घट, घट' म्हणून आरडाओरड करीत राहून तर घट तयार व्हायचे नाहीत ना !

स्वामीजी:-- तूं किंवा मी आरडाओरड करून कांहीच होणार नाही हें खरें, पण सिद्धसंकल्प ब्रह्मांत घटकल्पना उदय पावतांच घट व्यक्त होईल. सामान्य साधकाच्या देखील इच्छामात्रेंकरून कितीतरी अकल्पनीय घटना घडून येतात; मग सिद्धसंकल्प ब्रह्माबद्दल तर बोलायलाच नको. सृष्टीपूर्वी ब्रह्म प्रथम शब्दात्मक होत असतें व मग तेंच ॐकारात्मक वा नादात्मक होऊन जातें. नंतर पूर्वकल्पांतील भूः, भुवः, स्वः किंवा गाय, मनुष्य, घट, पट इत्यादि शब्द वा कल्पना या ॐकारामधूनच अभिव्यक्त होऊं लागतात. सिद्धसंकल्प ब्रह्मांत एकेक शब्द एकामागून एक उठतांच ती ती वस्तु लगेच व्यक्त होऊन हळूहळू या वैचित्र्यपूर्ण जगताचा विकास होतो. शब्दच सृष्टीचें मूळ कसें हें आता तरी समजलें ?

शिष्य:--- हो, समजल्यासारखें तर वाटतें थोडेंफार; पण या कल्पनांची नीट धारणा कांही होत नाही.

स्वामीजी:-- ठीक धारणा होणें, प्रत्यक्ष अनुभूति होणें या काय तोंडच्याच गोष्टी आहेत रे बाबा ? मन जसें ब्रह्मावगाही होऊं लागतें

तसें एकानंतर एक अशा क्रमाने या साऱ्या अवस्थांतून जाऊन अखेर निर्विकल्प अवस्थेप्रत पोहोचतें. समाधि लागतांना, तींत प्रवेश करतांना जगत् शब्दमय आहे ही अनुभूति येते व नंतर मग गभीर ॐकार ध्वनींत सारें विलीन होऊन जातें. त्यानंतर तोहि राहत नाही--तोहि आहे की नाही असें वाटूं लागतें, हीच अनादि नादाची अनुभूति. यानंतरची म्हणजे मन प्रत्यक् ब्रह्मांत लीन होण्याची अवस्था. येथे सारें शांत.

स्वामीजींचें हें विवेचन ऐकून शिष्याला निश्चित जाणवलें की या साऱ्या अवस्थांतून जाऊन त्यांना अनेकदा समाधिलाभ झाला असला पाहिजे. एरवी या गोष्टी अशा स्पष्टपणें ते कसे समजावून देऊं शकतील ? शिष्य स्तब्ध झाला. स्वतः अनुभवल्याखेरीज अशा रीतीने समजावून सांगणें कुणालाहि शक्य नाही.

स्वामीजी पुढे म्हणाले, "अवतारतुल्य महापुरुष समाधिभंगानंतर जेव्हा परत 'मीं-माझें'च्या प्रदेशांत उतरून येऊं लागतात तेव्हा प्रथम अव्यक्त नादाचाच त्यांना अनुभव येतो--हळूहळू तो नाद सुस्पष्ट होत गेल्याने ते ॐकाराचा अनुभव घेतात. ॐकारानंतर त्यांना शब्दमय जगताची प्रतीति येते व सर्वांत शेवटीं प्रतीत होतें जड जगत्. पण सामान्य साधकांनी मोठ्या कष्टाने कसेंतरी करून नादापलीकडे जाऊन जर साक्षात् ब्रह्मानुभूति उपलब्ध करून घेतली तर ते मग जेथे हें स्थूल जगत् प्रत्यक्ष अनुभवास येतें त्या निम्नभूमीवर पुन्हा उतरूं शकत नाहीत. ते ब्रह्मपदीं लीन होऊन जातात--क्षीरे नीरवत्--"

या साऱ्या गोष्टी चालल्या असतांनाच महाकवि गिरीशचंद्र घोष तेथे आले. मोठ्या प्रेमाने कुशलप्रश्नादि विचारून स्वामीजींनी त्यांची चौकशी केली व ते शिष्याला पुन्हा पुढे समजावून सांगूं लागले. गिरीशबाबू तें सारें एकचित्ताने ऐकूं लागले, व स्वामीजींनी सुस्पष्टपणें केलेलें वेदांचें तें विवेचन ऐकून ते मुग्ध झाले.

चालू विषयाला धरून स्वामीजी पुढे म्हणाले, "लौकिक (नित्योपयोगांत असणारे) व वैदिक असे शब्दांचे दोन भाग नैयायिकांच्या 'शब्दशक्तिप्रकाशिकें'त माझ्या पाहण्यांत आले. तेथील तें विवेचन खरोखरच सखोल विचारांचें निदर्शक आहे, पण त्यांची ती परिभाषा वाचून मात्र डोकें अगदी भणाणून जातें !"

नंतर गिरीशबाबूंकडे वळून ते म्हणाले, "काय जी. सी., हें सारें तुम्हीं तर कधी वाचलें नाही––फक्त कृष्ण, विष्णु करीत करीतच तर जन्म घालवला !"

गिरीशबाबू:–– मी काय वाचून करणार ? एक तर वेळ नाही, अन् बुद्धिहि नाही तितकी की त्या साऱ्या भानगडी समजतील ! पण ठाकुरांच्या कृपेने तो सारा वेद-वेदान्त नुसता माथीं घेऊनच मी हा जन्म तरून जाईन. तुमच्या करवीं त्यांना खूप काम करून घ्यावयाचें आहे म्हणूनच ते तुमच्याकडून हें सारें अध्ययन करवून घेताहेत. आम्हांला त्या साऱ्यांची कांही गरज नाही.

असें म्हणून 'जय वेदरूपधारी श्रीरामकृष्ण की जय' असा जयजयकार करीत गिरीशबाबू त्या प्रचंड ऋग्वेदसंहितेला पुनः पुनः नमस्कार करूं लागले. वाचकांना आम्हीं इतरत्र सांगितलेंच आहे की स्वामीजी जेव्हा ज्या गोष्टीचा उपदेश करीत तेव्हा तिचा असा खोल ठसा श्रोत्यांच्या मनावर उमटे की हीच गोष्ट काय ती सगळ्यांत अधिक महत्त्वाची आहे असें त्यांना वाटूं लागे. ब्रह्मज्ञानासंबंधी बोलत तेव्हा वाटें, तें मिळविणें म्हणजेच जीवनाची सार्थकता. भक्ति वा कर्मासंबंधी किंवा देशाच्या प्रगतीसारख्या इतर विषयांवर जेव्हा ते बोलत तेव्हा तो तो विषय श्रोत्यांच्या मनांत अग्रस्थान प्राप्त करून घेई व त्या गोष्टी करण्यासाठी ते उत्सुक होऊन जात. आताहि वेदांबद्दल बोलतांना त्यांनी शिष्य व इतरांचीं मनें वेदोक्त ज्ञानाच्या महिम्याने अगदी भारून टाकलीं. इतकीं की तेवढी महत्त्वाची वा प्रयोजनीय अन्य कोणतीहि गोष्ट त्यांना शोधूनहि सापडली असती किंवा नाही याची शंकाच आहे. गिरीशबाबूंनी ही गोष्ट बरोबर ताडली; आणि स्वामीजींचें अत्यंत थोर हृदय व त्यांची उपदेशाची ही पद्धत आधीपासूनच माहीत असल्याने, शिष्यादि उपस्थित मंडळींना स्वामीजींनी ज्ञान, भक्ति, कर्म यांचें सारखेंच महत्त्व पटवून द्यावें म्हणून त्यांनी (गिरीशबाबूंनी) एक युक्ति योजली.

स्वामीजींची दुसरीकडेच लय लागल्याचें पाहून गिरीशबाबू एकदम म्हणाले, "नरेन्–– आता मी काय म्हणतों तेंहि थोडें ऐका, वेद-वेदान्त तर खूप झाला वाचून; पण देशांत हा जो घोर हाहाकार

माजला आहे, अन्नाचें दुर्भिक्ष, व्यभिचार, भ्रूणहत्या वगैरे महापातकें डोळ्यासमोर हा जो राजरोस धुडगूस घालताहेत त्यांच्यावर कांही उपाय त्या तुमच्या वेदांत आढळला का तुम्हांला कुठे ? एकेवेळीं जिच्या घरीं पांचपन्नास माणसें पंगतीला असत त्या अमक्या बाईच्या घरीं आज तीन दिवस झाले चूल पेटली नाही, त्या तमक्या घरच्या कुलस्त्रीला गुंडांनी अत्याचार करून ठार मारलें, ह्या घरीं काय तर भ्रूणहत्या झाली, त्याने काय तर लांडीलबाडी करून विधवेचें सर्वस्व अपहरण केलें, या असल्या साऱ्या शोचनीय गोष्टींना पायबंद घालण्याचा कांही उपाय आहे का तुमच्या वेदांत ?" गिरीशबाबूंनी लोकांच्या दुरवस्थेचें असलें भयंकर चित्र आपल्या नाटचमय वाणीने रंगवायला सुरवात केल्यावर स्वामीजी तर अगदी चुप बसले. त्या साऱ्या दुःखकष्टादिकांच्या नुसत्या विचारानेच स्वामीजींचे डोळे पाण्याने भरून आले. आपली ही अवस्था कुणाच्याहि नजरेला पडूं नये म्हणून ते लागलीच त्या बैठकींतून उठून गेले.

तेवढचांत गिरीशबाबू शिष्याला म्हणाले, "पाहिलेंस का ? केवढें करुणापुर्ण, उदार हृदय आहे यांचें !–– मी तुमच्या या स्वामीजींना मानतों तें कांही ते वेदज्ञ पंडित आहेत म्हणून नव्हे, तर ज्यामुळे ते जीवांच्या दुःखाने व्याकुळ होऊन डोळचांतून पाणी गाळीत बाहेर उठून गेले त्या त्यांच्या उदार हृदयासाठी. हें तर उघडचा डोळचांनी पाहिलेंस ना की मानवाच्या दुःखकष्टांच्या करुण गोष्टी ऐकतांच त्यांचें हृदय अगदी पिळवटून निघालें, सारा वेद-वेदान्त कुठल्याकुठे वाहून गेला ?

शिष्यः–– आमचा आपला छान वेदाभ्यास चालला होता–– आपण उगीचच मायाराज्यांतील या फालतू गोष्टी सांगून स्वामीजींचें मन व्याकुळ केलेंत.

गिरीशबाबूः––जगांत दुःखकष्टांचा हा डोंब उठलेला अन् तिकडे न पाहतांच म्हणे येथे स्वस्थपणें केवळ वेदाध्ययन करताहेत––गुंडाळून ठेव बाजूला तुझा हा वेदवेदान्त एका कोपऱ्यांत.

शिष्यः––स्वतः आपण भावनाप्रधान आहांत की नाही, म्हणून आपणांस ही भावनांची भाषाच प्रिय वाटते. ज्यांच्या अध्ययनाने या

साऱ्या जगाचा विसर पडतो त्या शास्त्रांबद्दल कांही तुम्हांला आदर दिसत नाही. नाहीतर खात्रीने तुम्ही हा असा रंगाचा भंग केला नसता.

गिरीशबाबू:—मी म्हणतों, ज्ञान आणि प्रेम यांच्यांत फरक काय आहे तो तर जरा एकदा समजावून सांग? तुझे गुरु स्वामीजीच पाहाना— जसे ज्ञानी तसेच प्रेमिकहि आहेत. 'सत्-चित्-आनंद' ह्या तिन्ही एकच वस्तु, असें तुझे वेदच नाही का सांगत? स्वामीजी हें एवढें पांडित्य दाखवीत होते, पण जगाच्या दु:खाची नुसती वार्ता कानीं येतांच जीवांच्या दु:खाने दु:खी होऊन आसवें ढाळूं लागले. ज्ञान व प्रेम यांत या वेद-वेदान्ताने भेद मानला असेल तर त्याला माझा दुरूनच नमस्कार असो!

गिरीशबाबूंचें म्हणणें वेदविरोधी तर मुळीच नाही या विचाराने शिष्य चुप बसला.

इतक्यांत स्वामीजी परत आले व 'तुमचें काय बोलणें चाललें आहे' असें त्यांनी शिष्याला विचारलें.

शिष्य:— आमचें बोलणें चाललें होतें वेदांबद्दलच. यांनी कांही हे ग्रंथ वाचले नाहीत पण आश्चर्य हें की यांतील सारे सिद्धान्त यांना पुरेपूर उमजले आहेत!

स्वामीजी:— गुरुभक्तीच्या जोरावर हे सारे सिद्धान्त आपोआप अनुभवास येतात. ग्रंथपठनाची, श्रवणाची मग कांही गरजच नाही उरत. पण असला भक्ति-विश्वास जगांत अत्यंत दुर्लभ होय. ह्या गिरीशबाबूं-सारखी भक्ति, विश्वास ज्यांचा असेल त्यांना शास्त्राध्ययनाची कांही आवश्यकता नाही. पण यांचें जर कुणी नुसतें अनुकरण करूं जाईल तर त्याचा निखालस सर्वनाश होईल. त्यांचें म्हणणें ऐकावें— त्यांच्या वागण्याचें अनुकरण मात्र कधीहि करूं नकोस.

शिष्य:— ठीक आहे.

स्वामीजी:— नुसतें 'ठीक' म्हणून डोकें हलवून नाही चालणार. मी सांगतों तें सारें नीट समजून घे. मूर्खासारखा साऱ्या गोष्टींना मान नको हलवूस आपला! मी सांगतों म्हणूनच कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवूं नकोस. नीट समजून घे— मगच विश्वास ठेव. आपल्या साऱ्या गोष्टी नीट उमजून मगच स्वीकारायला ठाकुर मला नेहमी

सांगत. तर्कबुद्धि व शास्त्र यांच्या साह्यानेच आपला मार्ग आक्रमावयास हवा. सतत चिंतनानेच बुद्धि शुद्ध होते, व तींतच ब्रह्म प्रतिबिंबित होऊं शकतें. समजलें ना मी काय म्हणतों तें ?

शिष्य:—समजलों तर सारेंच, पण नाना लोकांचीं मतें ऐकून डोकें अगदी फिरून जातें. एकजण (गिरीशबाबू) म्हणतो 'हें सारें वाचून काय होणार आहे ?' लागलीच आपण म्हणतां—'वाचा, विचार करा.' अशा वेळीं आम्हीं काय करावें ?

स्वामीजी:—आम्हीं दोघांनीहि सांगितलेल्या गोष्टी खऱ्याच आहेत. फरक येवढाच की त्या दोन भिन्न दृष्टिकोनांतून सांगितल्या गेल्या आहेत. एक अवस्था अशी येते की जेव्हा तर्क, बुद्धि या साऱ्या गोष्टी अगदी चुप होऊन जातात—'मूकास्वादनवत्.' आणखी एक अवस्था अशी आहे की जींत वेदादिशास्त्रग्रंथांचें आलोचन, अध्ययन-अध्यापन या गोष्टी करतां करतांच सत्यवस्तूचा प्रत्यक्ष लाभ होतो. तुला स्वतःला मात्र या साऱ्या अध्ययन-अध्यापनांतूनच जावें लागणार आहे. तोच तुझा सत्यलाभाचा मार्ग. लक्षांत ठेव.

स्वामीजींचा हा आदेश मिळाल्याने गिरीशबाबू हरले असें वाटून निर्बुद्धपणें शिष्य त्यांना म्हणाला, "ऐकलेंत ना, स्वामीजींनी मला वेदवेदान्त वाचायला, तर्कविचारांचा अवलंब करायला सांगितलें तें ?"

गिरीशबाबू:—तर मग तूं तेंच कर. स्वामीजींच्या आशीर्वादाने तुझें त्यानेच कल्याण होईल.

येवढ्यांत स्वामीजींचे शिष्य स्वामी सदानंद तेथे आले. त्यांना पाहून स्वामीजी म्हणाले, "अरे ! जी. सी. च्या तोंडून देशाची दुरवस्था ऐकल्याने माझे प्राण अगदी व्याकुळ झाले आहेत. देशासाठी कांहीतरी करण्याची आहे तुझी तयारी ?

सदानंद:—महाराज, आपण हुकूम द्या, बंदा तें करायला तयार आहे.

स्वामीजी:—सुरवातीला लहान प्रमाणावर सेवाश्रम काढा. त्यांत गरीब, दुःखीकष्टी लोकांना साहाय्य मिळण्याची व्यवस्था राहील, रोग्यांची शुश्रूषा करण्यांत येईल. अनाथ, अपंग, असहाय लोकांची जाति-वर्णनिरपेक्ष सेवा करण्यांत येईल. आलें ध्यानांत मी काय

म्हणतों तें ?

सदानंद:— अगदी आपल्या आज्ञेबरहुकूम करूं हें.

स्वामीजी:— जीवांच्या सेवेपरता दुसरा कोणताहि मोठा धर्म नाही. सेवाधर्माचें यथायोग्य पालन झाल्यास संसारबंधन अगदी सहज तुटून जातें.—'मुक्तिः करफलायते'—'मुक्ति हातोहात लाभते.'

मग गिरीशबाबूंना उद्देशून स्वामीजी म्हणाले, "पाहा गिरीशबाबू, मनांत येतें की जगाचें हें दुःख कमी करण्यासाठी हजारो जरी जन्म घ्यावे लागले तरी मी ते घेईन. असें करण्याने एखाद्याच माणसाचें थोडें जरी दुःख कमी होत असेल तर तें मी खात्रीने करीन. वाटतें, फक्त माझीच मुक्ति घेऊन मी काय करूं ? साऱ्यांनाच या मार्गाने घेऊन चलावयास हवें. कां म्हणून हा भाव माझ्या मनांत असा प्रबळ होत आहे ?

गिरीशबाबू:— असें जर नसतें तर कशाला श्रीरामकृष्णांनी तुम्हांला सर्वांत मोठा आधार म्हणून गौरविलें असतें.

असें म्हणून कामानिमित्त दुसरीकडे जाण्यासाठी गिरीशबाबू निघून गेले.

## (११)

### आलमबाजार मठ

### इ. स. १८९७

पहिल्यानेच स्वामीजी विलायतेहून कलकत्त्यास परत आल्यावर त्यांच्याकडे पुष्कळ उत्साही तरुण मंडळी येत हें आम्हीं आधी सांगितलेंच आहे. स्वामीजी त्या अविवाहित युवकांना ब्रह्मचर्याचा व त्यागाचा उपदेश देत व संन्यासासाठी—आपल्या मुक्तीकरिता व जगाचें कल्याण साधण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास त्यांना प्रोत्साहित करीत. संन्यास घेतल्याखेरीज यथार्थ आत्मज्ञान होणें शक्य नाही, येवढेंच नव्हे तर बहुजनहितकर, बहुजनसुखकर कोणतेंहि ऐहिक कार्य करणें व त्यांत यशस्वी होणें हेंहि संन्यासाखेरीज शक्य नाही असें ते म्हणत. उत्साही तरुणांसमोर ते त्यागाचा आदर्श नेहमी ठेवीत व कोणी संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्याला प्रोत्साहन देऊन त्यावर

कृपा करीत. त्यांच्याच प्रोत्साहनानें कांहीं भाग्यवान तरुणांनी संसार-त्याग करून त्यांच्याकडूनच संन्यासदीक्षा घेतली. त्यांच्यापैकी प्रथम ज्या चार जणांना स्वामीजींनी संन्यास दिला त्यांच्या संन्यासदीक्षेच्या दिवशीं शिष्य आलमबाजार मठांत हजर होता. तो दिवस अद्यापहि शिष्याच्या चांगला स्मरणांत आहे.

स्वामी नित्यानंद, विरजानंद, प्रकाशानंद व निर्भयानंद म्हणून आज रामकृष्ण संघामधे परिचित असलेल्या मंडळींनीच त्या दिवशीं संन्यास घेतला. त्यांच्यापैकी एकाला संन्यास देऊं नये असें स्वामीजींच्या गुरुबंधूंनी त्यांना वारंवार आग्रहानें सांगितल्याचें शिष्यानें मठांतील अनेक संन्यासी मंडळीकडून ऐकलें आहे. त्यांना उत्तर देतांना स्वामीजी म्हणाले, "आम्हींच जर पापी, दीन, दुःखी, पतित वगैरेंचा उद्धार करण्यांत पाय मागें घेतला तर त्यांच्याकडे मग कोण पाहणार ? तुमच्यापैकी कुणीहि या बाबतींत माझ्या आड येऊं नये." अखेर स्वामीजींचीच प्रबल इच्छा पूर्ण झाली. अनाथशरण स्वामीजींनी कृपा करून त्याला संन्यास देण्याचा संकल्प केला.

आज दोन दिवस झाले, शिष्य मठांतच राहतो आहे. स्वामीजी शिष्याला म्हणाले, "तूं तर भिक्षुक ब्राह्मण. उद्या तूंच त्यांचा श्राद्धविधि कर, परवा मी त्यांना संन्यास देईन. आज पोथ्यापुस्तकें काय पाहावयाचीं असतील तीं सारीं नीट पाहून ठेव." शिष्यानें स्वामीजींची आज्ञा मान्य केली.

संन्यास घेण्याचें ठरविलेल्या या चार ब्रह्मचाऱ्यांनी संन्यासाच्या आदले दिवशीं मुंडन केलें. मग गंगास्नानानंतर पांढरीं वस्त्रें धारण करून स्वामीजींच्या पादपद्मांना वंदन करून व त्यांचा स्नेहमय आशीर्वाद घेऊन ते श्राद्धविधीसाठी तयार झाले.

शास्त्रानुसार जे संन्यास घेतात त्यांना त्या वेळीं स्वतःचें श्राद्ध स्वतःलाच उरकून घ्यावें लागतें. कारण संन्यासानंतर त्यांना लौकिक किंवा वैदिक कोणत्याच बाबतींत कांही अधिकार पुढे राहत नाही हें येथे सांगितल्यास वावगें होणार नाही. पुत्रपौत्रांनी केलेल्या श्राद्धांचें किंवा पिंडदानादि क्रियांचें फळ त्यांना मग स्पर्शूं शकत नाही. म्हणूनच संन्यास घेण्यापूर्वी स्वतःचेंच श्राद्ध स्वतःस करावयाचें असतें,

आपल्याच पायीं पिंड अर्पण करून संसाराचा, इतकेंच काय पण स्वतःच्या देहाच्या पूर्व संबंधांचेहि संकल्प सोडून संपूर्ण विसर्जन करावयाचें असतें. यालाच संन्यासाची अधिवासक्रिया म्हणतात ! स्वामीजींचा या साऱ्या वैदिक कर्मकांडावर ठाम विश्वास होता. शास्त्रानुसार या साऱ्या क्रिया न झाल्यास ते अत्यंत नाराज होत हें शिष्याने पाहिलें होतें. भगवे कपडे घालून घराबाहेर पडले की झाली संन्यासदीक्षा ही आजकालची भावना स्वामीजींच्या ठिकाणीं नव्हती. अनादिकालापासून चालत आलेले, ब्रह्मविद्यासाधनभूत गुरुपरंपरागत संन्यासव्रत घेण्यापूर्वी करावयाचे सारे नैष्ठिक संस्कार ते ब्रह्मचाऱ्यांकरवीं व्यवस्थितपणें करवून घेत. श्रीरामकृष्णांच्या शरीरत्यागानंतर, उपनिषदादि शास्त्रग्रंथांत संन्यास घेण्याची जी विधिविहित पद्धत आहे ती मिळवून श्रीरामकृष्णांच्या फोटोसमोर स्वतः स्वामीजींनी आपल्या गुरुबंधूंसह वैदिक पद्धतीने संन्यास घेतल्याचें आम्हीं ऐकलें आहे.

आलमबाजार मठांत दुसऱ्या मजल्यावर पाणी ठेवण्याची जी जागा होती त्या खोलींत श्राद्धोपयोगी सारी सामुग्री ठेवली होती. स्वामी नित्यानंदांना पितरांच्या श्राद्धाचा अनुभव असल्याने आवश्यक असणाऱ्या गोष्टी जमविण्यांत कांही चूक झाली नव्हती. स्नान आटोपल्यावर शिष्य स्वामीजींच्या आज्ञेने पौरोहित्य करावयास सिद्ध झाला. मंत्र वगैरे यथाविधि म्हणणें-म्हणविणें सुरू झालें. स्वामीजी अधूनमधून येऊन पाहून जात. श्राद्धक्रिया आटोपल्यावर या चौघांहि ब्रह्मचाऱ्यांनी आपापले पिंड आपापल्या पायीं अर्पण केल्याने जगरहाटीच्या दृष्टीने ते मेल्यासारखेच झाले. त्या वेळीं शिष्याचें हृदय त्या कल्पनेने अगदी व्याकुळ होऊन संन्यासाच्या कठोरतेच्या जाणिवेने तो अत्यंत विव्हल झाला. पिंड घेऊन ते जेव्हा गंगेवर गेले तेव्हा शिष्याची ही व्याकुळता पाहून स्वामीजी त्याला म्हणाले, "हें सारें पाहून तुला काय भय वाटतें की काय रे ?" मान खाली घालून जेव्हा शिष्याने होकार दिला तेव्हा ते म्हणाले, "जगाच्या दृष्टीने आजपासून हे मेल्यासारखेच आहेत. उद्यापासून त्यांना नवीन देह, नवीन विचार, नवीन वस्त्रें मिळतील. ब्रह्मवीर्याने प्रदीप्त होऊन ते ज्वलन्त अग्नीप्रमाणे विराजतील— '**न कर्मणा न प्रजया धनेन, त्यागेनैके अमृतत्वमानशुः**' (कर्म,

प्रजा किंवा धन यांनी नव्हे, तर एकमेव त्यागानेच अमृतत्व लाभत असतें)."

स्वामीजींचें बोलणें ऐकून शिष्य अगदी स्तब्ध झाला. संन्यास-व्रताच्या कठोरतेने त्याची बुद्धि स्तंभित झाली. शास्त्रज्ञानाचा त्याचा गर्व अगदी गळून पडला. करणींत अन् बोलण्यांत केवढा हा फरक असतो असा विचार तो करूं लागला. श्राद्ध आटोपून गंगेंत पिंड अर्पण करून ते चौघेहि ब्रह्मचारी परत आले व त्यांनी स्वामीजींच्या पाद-पद्मांना वंदन केलें. त्यांना मनःपूर्वक आशीर्वाद देऊन स्वामीजी म्हणाले, "मानवजीवनांतील सर्वश्रेष्ठ व्रत घेण्यास तुम्ही सिद्ध झालां आहांत. धन्य तुमचा जन्म, धन्य तुमचा वंश, धन्य तुमची जन्मदात्री माता-- 'कुलं पवित्रं जननी कृतार्था."

त्या दिवशीं रात्रीं जेवणानंतर स्वामीजी फक्त संन्यासधर्मा-संबंधीच बोलत होते. संन्यासदीक्षा घेण्यास उत्सुक असलेल्या ब्रह्मचाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले, "**आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च** (स्वतःच्या मोक्षासाठी आणि जगाच्या हितासाठी) हाच आहे संन्यासाचा वास्तविक हेतु. संन्यास न झाल्यास कोणीहि केव्हाहि ब्रह्मज्ञ होऊं शकत नाही, ही गोष्ट वेद-वेदान्त घोषणा करून सांगतात. संसारहि करूं अन् ब्रह्मज्ञहि होऊं असें जे म्हणतात त्यांच्या बोलण्याकडे लक्षहि देण्याची गरज नाही. तीं सारीं झालीं प्रच्छन्न भोग्यांचीं वा आडून भोग भोगणाऱ्यांचीं आत्म-वंचनेचीं भ्रामक बोलणीं. एवढीशी का होईना, संसाराची भोगेच्छा ज्याला असेल; एवढी का होईना, कामना ज्याला असेल त्याचा या दुर्गम मार्गाच्या विचारानेच थरकांप उडतो. म्हणूनच आपलें कसें तरी भाबडें समाधान करून घेण्यासाठी ते सांगत हिंडतात, "प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधायला हवींत !" तीं सारीं बोलणीं म्हणजे वेड्यांची बडबड, उन्मत्तांचे स्वैर प्रलाप--अशास्त्रीय व संपूर्णतया अवैदिक मत. त्यागाशिवाय मुक्ति अशक्य. पराभक्तीचा लाभ त्यागाशिवाय होत नाही. त्याग--त्याग--'**नान्यः पन्था विद्यतेऽयनाय**'--'अन्य मार्ग नाही.' गीतेंतहि सांगितलें आहे '**काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।**'

संसाराचा हा जंजाळ सोडल्याखेरीज कुणालाहि मुक्ति लाभत

नाही. संसाराश्रमांत राहणें हेंच आपण कोणत्या ना कोणत्या वासनेचे गुलाम आहोंत या गोष्टीचें प्रमाण होय. असें नसल्यास कुणी संसारांत राहीलच कशाला ? कुणी कामिनीचा दास, तर कुणी धनाचा, कुणी मानाचा तर कुणी यशाचा, विद्येचा वा पांडित्याचा. अखेर सारे कशाचे ना कशाचे दासच. या साऱ्या दासत्वबंधनांतून मोकळे झाल्यानेच मुक्तीच्या मार्गानें पुढे जातां येणें शक्य आहे ! कुणी कितीहि बकवक करो, मला येवढें समजतें की हें सारें सोडल्याखेरीज, संन्यास घेतल्याखेरीज जीवाचें परित्राण होणें शक्य नाही--इतर कशानेहि ब्रह्मज्ञानलाभ होण्याची शक्यता नाही."

शिष्यः-- महाराज, केवळ संन्यास घेतल्यानेच काय सिद्धिलाभ होतो ?

स्वामीजीः-- सिद्धिलाभ होतो किंवा नाही ही तर फार दूरची गोष्ट ; तूं जोंपर्यंत या भयंकर संसाराच्या कचाटयांतून बाहेर पडत नाहीस, जोंपर्यंत वासनांचें दास्य झुगारून देत नाहीस, तोंपर्यंत तुला भक्तीचा काय किंवा मुक्तीचा काय कसलाच लाभ होणें शक्य नाही हें अगदी निश्चित. ब्रह्मज्ञांना ऋद्धिसिद्धि म्हणजे अगदी तुच्छ गोष्टी.

शिष्यः-- महाराज, संन्यासासाठी कांही योग्य अयोग्य काल आहे काय ? किंवा संन्यासाचे कांही भिन्न भिन्न प्रकार असतात का ?

स्वामीजीः-- संन्यासासाठी योग्य अयोग्य अशी कोणतीहि वेळ कांही ठरलेली नसते. '**यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्**' -- वैराग्याचा उदय होतांक्षणींच संन्यास घ्यावा असाच श्रुतींचा आदेश आहे. योगवासिष्ठांतहि म्हटलें आहे की--

'युवैव धर्मशीलः स्यात् अनित्यं खलु जीवितम् ।
को हि जानाति कस्याद्य मृत्युकालो भविष्यति ।।'

--'जीवित अनित्य असल्याने तरुणपणींच धर्मप्रवण व्हावें. कुणाला ठाऊक मृत्यूचा घाला कुणावर केव्हा येईल तें ?' शास्त्रांत चार प्रकारचे संन्यास सांगितले आहेत. (१) विद्वत्, (२) विविदिषा, (३) मर्कट, (४) आतुर. एकाएकीच तीव्र व यथार्थ वैराग्याचा उदय होऊन लगेच संन्यास घेऊन बाहेर पडला--ही गोष्ट कांही पूर्वजन्मींच्या संस्कारांशिवाय होत नाही,-- यालाच म्हणतात विद्वत् संन्यास.

आत्मतत्त्व जाणण्याच्या प्रबळ इच्छेने शास्त्राध्ययन व साधनादिद्वारा स्व-स्वरूप जागून घेण्यासाठी एखाद्या ब्रह्मज्ञ पुरुषापासून संन्यास घेऊन स्वाध्याय व साधना करण्याला म्हणतात विविदिषा संन्यास. स्वजन-वियोग वा यासारख्या अन्य सांसारिक तापांनी पोळून निघून कांही लोक त्रस्त होऊन घर सोडून संन्यास घेतात, पण हें स्मशान-वैराग्य कांही टिकाऊ नसतें. म्हणूनच संन्यासाच्या या प्रकाराला म्हणतात मर्कट संन्यास. ठाकुर गोष्ट सांगत ना एक—'वैराग्याच्या भरांत एकजण पश्चिम प्रांतांत गेला अन् अखेर नोकरी मिळवली त्याने एक. नंतर काय तर म्हणे बायकोला बोलावून घेतलें किंवा पुन्हा लग्न करून व्यवस्थित संसार थाटला!' संन्यासाचा आणखी एक प्रकार म्हणजे अगदी मरायला टेकला, वांचायचें कांहीच लक्षण नाही, अशा वेळीं एखाद्याला संन्यास देतात. अशा वेळीं जर तो मेला तर पवित्र संन्यास व्रत घेऊन मेला असें मानतात. पुढील जन्म चांगला मिळेल अशी एक भावना असते असें करण्यामागे. त्यांतूनहि जर कुणी वांचला तर मग पुन्हा संसारांत न पडतां ब्रह्मज्ञानलाभाच्या प्रयत्नांत त्याने संन्यासी बनून कालक्रमणा करावयाची असते. तुझ्या काकांना शिवानंद स्वामींनी आतुर संन्यास दिला होता. ते तर तेव्हा वारले पण त्या संन्यासदीक्षेने त्यांना पुढे चांगला जन्म लाभेल. संन्यास घेतल्याखेरीज मात्र आत्म-ज्ञान होण्याचा दुसरा उपाय नाही.

शिष्य:—मग गृहस्थांसाठी कांही उपायच नाही का महाराज?

स्वामीजी:— त्यांच्या सुकृताने त्यांच्यांत कोणत्या ना कोणत्या जन्मीं वैराग्याचा उदय होईलच. असें वैराग्य निर्माण झालें की काम भागलें; जन्ममृत्यूच्या गुंतावळ्यांतून सुटायला मग उशीर नाही. पण साऱ्याच नियमांना एखाददुसरा अपवाद असतोच. सुयोग्य रीतीने गृहस्थधर्माचें पालन करूनहि एखाददुसरा मुक्त झाल्याचेंहि आढळतें. उदाहरणच द्यायचें झालें तर आपल्या नागमहाशयांचें देतां येईल.

शिष्य:—वैराग्य व संन्यासासंबंधी उपनिषदादि ग्रंथांतून तर कांही सविस्तर उपदेश आढळत नाही महाराज?

स्वामीजी:— पागलासारखा काय बडबडतोस? वैराग्यच तर उपनिषदांचा प्राण आहे. विचारजनित प्रज्ञा हेंच तर उपनिषदांतील

ज्ञानाचें चरम लक्ष्य आहे. तरी पण मला असें वाटतें की भगवान बुद्ध-देवांनंतरच भारतवर्षांत या त्यागव्रताचा विशेष प्रचार झाला आहे. त्यानंतरच वैराग्य व विषयवितृष्णा ह्या गोष्टी धर्माचें चरम लक्ष्य म्हणून मानण्यांत आल्या आहेत. बौद्धधर्मातील त्याग-वैराग्याचा हा आदर्श हिंदु-धर्माने आत्मसात् करून टाकला. भगवान बुद्धदेवांसारखा त्यागी महापुरुष या अवनीतलावर अन्य कुणी झाला नाही.

शिष्यः—— तर मग काय बुद्धदेवांपूर्वी देशांत त्यागवैराग्याची भावना कमी प्रमाणांत होती ? देशांत संन्यासी नव्हते ?

स्वामीजीः—— असें कोणी म्हटलें ? ( बुद्धदेवांच्या वेळीं ) संन्यासाश्रम होता, पण तोच जीविताचें अंतिम ध्येय ही जाणीव सर्व-साधारण लोकांत नव्हती; वैराग्याविषयी तेवढा आग्रह नव्हता, विवेकनिष्ठा ही तेवढीशी प्रबळ नव्हती. म्हणूनच कितीतरी योग्यां-पाशी, साधूंपाशी जाऊनहि बुद्धदेवांना शांति लाभली नाही. नंतरच 'इहासने शुष्यतु मे शरीरम्' (ह्या आसनावरच माझें शरीर सुकून गेलें तरी हरकत नाही) असा दृढ संकल्प करून त्यांनी आत्मज्ञानासाठी स्वतःच कंबर कसली व प्रबुद्ध होऊनच अखेर आसनावरून उठले. भारतांत आज हे जे संन्याशांचे मठ वगैरे दिसतात ते सारे बुद्धधर्माच्या अधिकाराखाली होते. हिंदूंनी आता त्या साऱ्यांना आपल्या रंगाने रंगवून स्वतःचें करून घेतलें आहे. बुद्धदेवांपासूनच यथार्थ संन्यासा-श्रमाचा पाया रचला गेला. त्यांनीच संन्यासाश्रमाच्या मृत सांगाड्यांत प्राण ओतले.

स्वामीजींचे गुरुबंधु स्वामी रामकृष्णानंद म्हणाले, "बुद्धदेवां-च्याहि पूर्वी चार आश्रम भारतांत होते याला संहितापुराणादि ग्रंथ प्रमाण आहेत."

स्वामीजीः—— मन्वादि संहिता, अधिकांश पुराणें व महाभारताचा बराच भाग हीं तर परवा परवा रचलेलीं शास्त्रें होत. भगवान् बुद्ध या साऱ्यांच्या फार पूर्वी होऊन गेले.

स्वामी रामकृष्णानंदः—— असें असतें तर वेदांमधे, उपनिषदांत, संहितांतून, पुराणांतून या बुद्धधर्माची चर्चा खात्रीने आढळली असती. या प्राचीन ग्रंथांत बुद्धधर्माची चर्चा ज्या अर्थी आढळत नाही त्या अर्थी

बुद्धदेव त्यांच्या पूर्वी होऊन गेले असें तुम्ही कशावरून म्हणतां? चार-दोन प्राचीन पुराणांतून बौद्धमताचा उल्लेख थोडाफार आढळतो, पण त्यावरून हें मात्र सिद्ध होऊं शकत नाही की हिंदूंच्या संहिता, पुराणें हीं सारीं आधुनिक आहेत.

स्वामीजी:— इतिहास जरा वाचून पाहा ना! * तुला आढळून येईल की बुद्धदेवांच्या साऱ्या कल्पना पचवून टाकूनच हिंदुधर्म येवढा थोर झाला आहे!

रामकृष्णानंद:— त्याग वैराग्य वगैरे गोष्टी प्रत्यक्ष जीवनांत नीट आचरून बुद्धदेव हिंदुधर्मातील भाव फक्त सजीव करून गेलेत असें मला वाटतें.

स्वामीजी:— या गोष्टीला मात्र कांही प्रमाण नाही. कारण बुद्धजन्मापूर्वीचा कांहीहि प्रमाणभूत इतिहास आज उपलब्ध नाही. आहे त्या इतिहासालाच प्रमाण मानल्यास हें कबूल करावयास हवें की घोर अंधकारमय प्राचीन कालांत एक बुद्धदेवच उज्ज्वल ज्ञानप्रभेने चमकून गेले.

नंतर मग पुन्हा संन्यासाबद्दल गोष्टी सुरू झाल्या.

स्वामीजी:— संन्यासाची उत्पत्ति कुठूनहि का होईना, मानव-जीविताचें उद्दिष्ट आहे या त्यागव्रताचें अवलंबन करून ब्रह्मज्ञ होणें. संन्यास घेणें हाच परमपुरुषार्थ. वैराग्य अंगीं बाणून जे संसाराविषयी वीतराग होतात तेच खरोखर धन्य होत.

शिष्य:— त्यागी संन्याशांची संख्या वाढल्याने देशाच्या ऐहिक उन्नतीला बाध येतो असें आजकाल अनेकजण म्हणतात. उपजीविकेसाठी

*हें उघडच आहे की प्रस्तुत वादांत स्वामीजी आधुनिक इतिहाससंशोधकांच्या मतांचा आधार घेत आहेत आणि तेणेंकरून असल्या नवीन प्रयत्नांना आणि अध्ययनपद्धतींना प्रोत्साहन आणि आपला पाठिंबा देत आहेत. परंतु, स्वतःचे शिष्य स्वामी स्वरूपानंद यांना त्यांनी लिहिलेल्या एका पत्रावरून आपल्याला स्पष्टच कळून येतें की, स्वामीजींनी पुढे ह्या आधुनिक विद्वानांचा पक्ष सोडून दिला होता, आणि हे विद्वान् आधुनिक हिंदुधर्माचा जो बराचसा भाग बौद्धधर्मातून आला आहे असें अजूनहि अट्टाहासाने म्हणतात तो सर्व बौद्धधर्मापूर्वी अस्तित्वांत होता असें त्यांनी सप्रमाण सिद्ध केलें आहे.

गृहस्थांवर अवलंबून राहून कांहीहि काम न करतां साधु हिंडत फिरतात म्हणून कांहींचें म्हणणें असें की समाजाच्या व स्वदेशाच्या उन्नतीला त्यांचा काडीचाहि उपयोग नाही.

स्वामीजी:— लौकिक वा ऐहिक उन्नतीचा अर्थ तर एकदा सांग नीट समजावून.

शिष्य:— पाश्चात्त्य देशांत जसें विद्येच्या जोरावर अन्नवस्त्रादिकांचे प्रश्न सोडवितात, विज्ञानाच्या बळावर देशांत त्यांनी जशी व्यापारवाढ केली आहे, कला, कपडेलत्ते, आगगाड्या, तारायंत्रें वगैरेंची त्यांनी जी वाढ केली आहे ती म्हणजेच ऐहिक उन्नति.

स्वामीजी:— माणसांत रजोगुणाचा उदय झाल्याखेरीज का या गोष्टी होणें शक्य आहेत ? सारा भारतवर्ष हिंडून पालथा घातला पण रजोगुणाचें कुठे नांव नाही आढळलें. सर्वसाधारण लोक सारे घोर, अत्यंत घोर तमोगुणांत निश्चेष्ट पडले आहेत. फक्त संन्याशांठायींच रजोगुण, सत्वगुण असल्याचें दिसलें. तेच भारताचा कणा आहेत. यथार्थ संन्यासी हे गृहस्थांना शिकविणारे, उपदेश देणारे होत. त्यांच्याच तर शिकवणुकीने ज्ञानप्रकाश लाभून पूर्वी अनेकदा गृहस्थलोक जीवनसंग्रामांत कृतकार्य झाले. संन्याशांनी दिलेल्या अमोल ज्ञानोपदेशाच्या मोबदल्यांतच गृहस्थलोक त्यांना अन्नवस्त्र देतात. हें आदान-प्रदान नसतें तर भारतांतील लोक अमेरिकेंतील रेडइंडियन लोकांप्रमाणे आतापर्यंत समूळ नष्ट होऊन गेले असते. संन्याशांना दोन मुठी पोटाला देतात म्हणूनच गृहस्थलोक उन्नतीच्या मार्गावर आहेत. संन्यासी कर्महीन वा आळशी नाहीत. वास्तविक तेच तर आहेत कर्मशीलतेचे मूलस्रोत. त्यांना उच्च आदर्श जीवनांत व कार्यांत उतरवतांना पाहून व त्यांच्या जवळूनच हे सारे उच्च भाव घेऊन गृहस्थ कर्मक्षेत्रांत जीवनसंग्राम करण्यास समर्थ झाले व आजहि होत आहेत. पवित्र संन्याशांकडे पाहूनच गृहस्थ सारे पवित्रभाव जीवनांत उतरवितात आणि यथार्थाने कर्मतत्पर होतात. संन्यासी ईश्वरलाभासाठी व जगाच्या कल्याणासाठी सर्वस्वत्यागाच्या व्रताचें आपल्या जीवनांत पालन करतात व गृहस्थांना ह्या सर्व बाबतींत प्रोत्साहन देतात. याच्या मोबदल्यांतच गृहस्थलोक त्यांना दोन मूठी अन्न पोटाला देतात. तें

अन्न उत्पन्न करण्याची प्रवृत्ति व क्षमता देखील सर्वत्यागी संन्याशांच्या प्रेमळ आशीर्वादानेच देशांतील लोकांत वृद्धिंगत होते. ह्या साऱ्या खोल गोष्टी न समजल्यामुळेच लोक संन्यासआश्रमाची निंदा करतात. इतर देशांत कांहीहि असो, आपल्या देशांत मात्र संन्याशांच्या हातींच सुकाणू असल्याने संसारसागरांत गृहस्थांची नाव बुडत नाही.

शिष्य:-- लोककल्याणासाठी तत्पर असणारे यथार्थ संन्यासी कितीसे आढळून येतात महाराज ?

स्वामीजी:-- हजारो वर्षांत रामकृष्णांसारखा एखादा यथार्थ संन्यासी झाला तरी पुष्कळ झालें. ते जे सारे आदर्श व भाव देऊन जातात ते त्यांच्या जन्मानंतर हजारो वर्षे लोकांचें मार्गदर्शन करतात. संन्यासाश्रम देशांत आहे म्हणूनच तर त्यांच्यासारखे महापुरुष या देशांत जन्म घेतात. कमीअधिक दोष तर सर्वच आश्रमांत दाखवतां येतील. पण दोष असूनहि आजपावेतो हा आश्रम इतर सर्व आश्रमांच्या अग्रस्थानीं गौरवाने उभा आहे. याचें कारण काय ? कारण हेंच की यथार्थ संन्यासी आपल्या मुक्तीचीहि उपेक्षा करतात--जगाच्या मंगलासाठीच त्यांचा जन्म. अशा या संन्यासाश्रमाबद्दल तुम्ही लोक जर कृतज्ञता बाळगणार नाही तर शतवार धिक्कार असो तुम्हांला !

हें बोलत असतांना स्वामीजींचें मुखमंडल आरक्त झालें. संन्यासाश्रमाचा गौरव वर्णितांना ते जणु मूर्तिमान संन्यासच असल्याचा शिष्याला भास झाला.

नंतर या आश्रमाची महती प्राणोप्राण अनुभवीत अंतर्मुख होऊन ते आपल्याशींच अत्यंत मधुर स्वरांत गुणगुणूं लागले--

" वेदान्तवाक्येषु सदा रमन्तः
भिक्षान्नमात्रेण च तुष्टिमन्तः ।
अशोकमन्तःकरणे चरन्तः
कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः । "

" वेदान्तचिंतनांत सदा रममाण असणारे, माधुकरी भिक्षेंत लाभलेल्या अन्नाने संतुष्ट असणारे, शोकमोहहीन अंतःकरणाने स्वच्छंद विचरण करणारे संन्यासी परमभाग्यवान होत."

ते पुढे म्हणाले, 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' च संन्याशांचा

जन्म. संन्यास घेऊन जो हें ध्येय विसरतो त्याचें जीवन व्यर्थ होय;-- वृथैव तस्य जीवनम्. दुसऱ्यांकरिता प्राण देण्यासाठी, कष्टी जीवाचें करुण क्रंदन थांबविण्यासाठी, विधवांचे अश्रु पुसण्यासाठी, पुत्रवियोगानें विव्हळ झालेल्यांना शांति देण्यासाठी, अज्ञानांत असलेल्या सर्व-साधारणांना जीवनसंग्रामार्थ समर्थ बनविण्यासाठी, शास्त्रोपदेशाचा प्रचार करून त्याच्या द्वारें साऱ्यांचें ऐहिक व पारमार्थिक मंगल साधण्यासाठी व सर्वांमध्ये प्रसुप्त असलेल्या ब्रह्मसिंहावर ज्ञानाचा झोत टाकून त्याला जागे करण्यासाठीच या जगांत संन्याशांचा जन्म असतो." आपल्या गुरुबंधूंना उद्देशून ते म्हणाले, "आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च' आमचा जन्म. नुसते बसून काय करतां आहांत ? उठा, जागे व्हा. स्वतः जागे व्हा व बाकी साऱ्यांना जागे करा; नरजन्माचें सार्थक करा.---उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत."

## (१२)

श्री. बलरामबाबूंचें घर, कलकत्ता

इ. स. १८९८

आज दोन दिवसांपासून स्वामीजी बागबाजारांतील श्री. बलराम बोस यांच्या घरींच आहेत. हें शिष्याला फार सोईचें असल्याने तो दररोज तेथे जात असतो. आज संध्याकाळ होण्यापूर्वी थोडा वेळ स्वामीजी घराच्या गच्चीवर फिरत आहेत. बरोबर शिष्य व इतर चारपांच लोक. उष्मा खूप जाणवतो आहे. स्वामीजींच्या अंगांत कांहीच नाही. दक्षिणवारा मंद मंद वाहतो आहे. बोलण्यांत गुरु गोविंदसिंहांची गोष्ट काढून त्यांचा त्याग, त्यांची तपस्या व प्राण पणाला लावून केलेला त्यांचा परिश्रम यांनी शीख जातीचें कसें पुनरुत्थान झालें, धर्म बदलून मुसलमान झालेल्या व्यक्तींना पुन्हा हिंदु करून घेऊन त्यांना शीख पंथांत त्यांनी कसें स्थान दिलें, व नर्मदातटाकीं त्यांचा कसा अंत झाला वगैरे गोष्टी आपल्या ओजस्वी वाणीने ते सांगूं लागले. गुरु गोविंदसिंहांपासून दीक्षा घेतलेल्या लोकांत त्या वेळीं कसल्या विलक्षण शक्तीचें स्फुरण होई तें सांगून शिखांत प्रचलित असलेला एक दोहा त्यांनी म्हटला--

सवा लाख से एक लढाऊँ
जब गुरु गोविन्द नाम सुनाऊँ

--गुरु गोविंदापासून दीक्षा घेतलेला एकच माणूस सवा लाख लोकांवर मात करूं शकतो. त्यांच्याकडून दीक्षा घेतल्याने त्यांच्या शक्तीने जीवनांत यथार्थ धर्मशीलता बाणून गुरु गोविंदांच्या प्रत्येक शिष्याच्या अंतरीं अशा अद्भुत वीरश्रीचा संचार होई की तिच्या योगाने तो सवा लक्ष परधर्मीयांना हरविण्यास समर्थ होत असे. धर्मगौरव सुचविणारी ही गोष्ट सांगतांना स्वामीजींच्या उत्साहोत्फुल्ल नयनांतून तेज जणु ओसंडून बाहेर पडूं लागलें. ऐकणारे थक्क होऊन स्वामीजींच्या मुखमंडलाकडे पाहूं लागले. काय अद्भुत उत्साह व सामर्थ्य होतें स्वामीजींत ! जेव्हा ज्या गोष्टीबद्दल बोलत तेव्हा असे तन्मय होऊन बोलत की ऐकणाऱ्याला वाटावें, ही एकच गोष्ट जणु त्यांना जगांत सर्वांत महत्त्वाची वाटत आहे--ती मिळविणें हेंच जणु त्यांच्या दृष्टीने मानवजातीचें चरम लक्ष्य होय. कांही वेळाने शिष्य म्हणाला, "महाराज, गुरु गोविंद हिंदु व मुसलमान या दोघांनाहि आपल्या धर्मांत सामील करून घेऊन त्यांना एकाच ध्येयाने संचालित करूं शकले ही मात्र अत्यंत आश्चर्याची गोष्ट वाटते. भारतीय इतिहासांत या गोष्टीला कुठेहि तोड नाही."

स्वामीजी:-- एकाच समान ध्येयाने प्रेरित केल्याखेरीज लोक एकाच सूत्रांत ओवले जात नाहीत. एकच ध्येय जर नसेल तर सभा, समित्या स्थापून व व्याख्यानें देऊन लोकांना एक करतां येत नाही, त्यांच्यांत ऐक्यभावना आणतां येत नाही. त्या वेळीं हिंदु काय किंवा मुसलमान काय, सारेच घोर अत्याचार-अन्यायांत पिचत असल्याची जाणीव गुरु गोविंदसिंहांनी सर्वांच्या ठायीं निर्माण केली. गुरु गोविंदांनी समान ध्येयाची नव्याने निर्मिति केली नाही, सर्वसाधारण लोकांना त्यांनी त्याची जाणीवच फक्त करून दिली. म्हणूनच हिंदु-मुसलमान सारेच त्यांचें अनुसरण करूं लागले. ते महान् शक्तिउपासक होते. भारताच्या इतिहासांत या अशा घटना अगदी विरळच.

रात्र होत आहेसें पाहून सर्वांबरोबर स्वामीजी खालच्या मजल्यावरील बैठकींत येऊन बसले. ते बसतांच सारेजण त्यांच्या

भोवती जमले. या वेळीं चमत्कारांबद्दल बोलणें निघालें.

स्वामीजी म्हणाले, "अगदी थोडचाशा मनःसंयमाने देखील सिद्धि वा चमत्कार करण्याच्या शक्ति हस्तगत करतां येतात." शिष्याला त्यांनी विचारले, " काय तुला दुसऱ्यांचे विचार जाणून घेण्याची विद्या शिकावयाची आहे ? फार तर चार-पांच दिवसांत तुला ही विद्या शिकवून देतों."

शिष्यः—त्यामुळे काय लाभ होईल ?

स्वामीजीः—का बरें ? दुसऱ्यांच्या मनांतील गोष्टी समजूं शकतील तुला.

शिष्यः—ब्रह्मविद्यालाभाला कांही मदत होणार आहे का त्यायोगें ?

स्वामीजीः—मुळीच नाही.

शिष्यः—मग मला त्या विद्येशीं कांहीहि कर्तव्य नाही. पण आपण स्वतः चमत्कारांसंबंधी अनुभविलेल्या वा ऐकल्या-पाहिलेल्या गोष्टी मात्र ऐकायची इच्छा आहे माझी.

स्वामीजीः—हिमालयांत हिंडत असतां एका रात्रीं मी एका पहाडी गावांत राहिलों. संध्याकाळ टळून गेल्यावर थोडचाच वेळांत त्या गावांतून ढोलक्यांचा खूप आवाज ऐकूं येऊं लागल्याने घरवाल्याकडे चौकशी केल्यावर कारण कळलें की एका माणसाच्या अंगांत आलें आहे. घरमालकाने आग्रह केल्यावरून व स्वतःलाहि कुतूहल असल्याने ही सारी भानगड आहे तरी काय तें पाहायला म्हणून मी गेलों. जाऊन पाहतों तों ही गर्दी झालेली. एका उंच्यापुऱ्या व लांब-कुरळचा केसांच्या पहाडी माणसाकडे बोट दाखवून मला सांगण्यांत आलें की त्याच्याच अंगांत आलें आहे. पाहतों तों त्याच्याजवळच एक कुऱ्हाड आगींत तापत ठेवलेली दिसली. कांही वेळाने त्या लाल तापलेल्या कुऱ्हाडीने त्याच्या अंगाला डाग देण्यांत आले व त्याच्या केसांवरूनहि ती फिरविण्यांत आली ! पण आश्चर्य हें की त्या कुऱ्हाडीने त्याचें अंग डागलें गेलें नाही की केसहि जळले नाहीत—त्याच्या तोंडावर वेदनेची किंचित् छटा देखील कुठे आढळली नाही. मी तर तें पाहून अगदी थक्क झालों. तितक्यांत गावचा प्रमुख माझ्यापाशी येऊन

हात जोडून म्हणाला, "महाराज, कृपा करून याला त्या भुताच्या तावडींतून सोडवा." मी मोठ्या पेचांत पडलों. काय करावें कांही कळेना. साऱ्यांच्या आग्रहावरून त्या झपाटलेल्या 'झाडा'पाशी जाणें मला भागच होतें. जाऊन ती तापली कुऱ्हाड एकदा पारखून पाहावी असा विचार मनांत आला. ती जों हातीं धरतों तो सारा हात पोळून निघाला. तरी बरें झालें की कुऱ्हाड थंड होऊन काळवंडली होती. हाताच्या वेदनेने तर माझे प्राण अगदी व्याकुळ झाले. माझे सारे तर्क-कुतर्क पार कुठल्या कुठे पळाले. करणार काय ? हाताची आग होत असतांनाच त्या माणसाच्या डोक्यावर हात ठेवून थोडा वेळ जप केला. आश्चर्य असें की १०—१५ मिनिटांतच तो माणूस शांत झाला. त्यामुळे गावच्या लोकांची माझ्यावर इतकी भक्ति जडली की तिला सीमा राहिली नाही. मी जणु त्यांना साक्षात् भगवान वाटूं लागलों. मला स्वतःला मात्र काय झालें तें मुळीच उमजलें नाही. अखेर कांहीएक न बोलतांच मी आमच्या घरमालकाबरोबर घरीं परत फिरलों. तेव्हा रात्रीचे १२ वाजले असतील. आलों आणि झोपून राहिलों पण हाताच्या पीडेने व घडलेला प्रकार काय तें कांहीच न समजल्याने डोक्यांत काहूर उठलें आणि झोप कांही आली नाही. जळत्या कुऱ्हाडीनेहि माणसाचें शरीर डागलें गेलें नाहीसें पाहून माझ्या मनांत आले— "There are more things in heaven and earth, than are dreamt of in your philosophy !"— तत्त्वज्ञानाला ज्याची स्वप्नांत देखील जाणीव होणार नाही असल्या कितीतरी गोष्टी या विश्वांत आहेत.

शिष्यः— पुढे कधी या गोष्टीचा कांही तर्कसंगत उलगडा आपल्याला झाला का ?

स्वामीजीः— नाही. आज बोलण्याच्या भरांत गोष्ट आठवली म्हणून तुम्हां लोकांना सांगितली.

ते पुढे म्हणाले, "ठाकुर मात्र या साऱ्या सिद्धींची खूप निंदा करीत. ते म्हणत, 'या शक्तींच्याकडे एकदा मन गेलें की परमार्थाकडे मग जाणें होत नाही.' पण माणसाचें मनच असें दुर्बळ की गृहस्थांची तर गोष्ट सोडा, साधूंपैकी रुपयांत चौदा आणे लोक या सिद्धींच्या

मागे असतात. असल्या सिद्धींचे चमत्कार पाहून पाश्चात्त्य लोक अगदी थक्क होतात. सिद्धाईलाभ एक वाईट गोष्ट आहे, धर्ममार्गांतील अड-थळा आहे हें ठाकुरांनी कृपा करून पटवून दिलें म्हणूनच समजूं शकलों. म्हणूनच तुम्हीं पाहिलें असेल की ठाकुरांच्या संतानांपैकी कुणीहि या साऱ्याकडे नजरहि टाकीत नाही."

"मद्रासमध्ये तुमची त्या पंचाक्षऱ्याशीं झालेली भेट सांगाना याला" असें स्वामी योगानंदांनी स्वामीजींना सुचविलें.

या संबंधांत शिष्याने पूर्वी कांहीच ऐकलें नव्हतें. म्हणून ती हकीकत सांगा असा हट्ट त्याने स्वामीजींपाशी धरला. मग स्वामीजींनी सांगावयास सुरवात केली.—"मद्रासला मन्मथबाबूंकडे * राहत असतां एकदा मला स्वप्न पडलें की माझी जन्मदात्री आई वारली. माझें मन अत्यंत खिन्न झालें. त्या वेळीं मी मठांतील लोकांनाहि पत्र लिहीत नसे मग घरीं लिहिणें तर दूरच राहो. मन्मथबाबूंना स्वप्न सांगतांच बातमी काढण्यासाठी म्हणून त्यांनी कलकत्त्याला तार केली. स्वप्नामुळे मन असें उद्विग्न झालेलें, त्यांतच मद्रासच्या मंडळींनी सारी जमवाजमव करून अमेरिकेला जाण्यासाठी माझ्यामागे खूप तगादा लावला होता. आणि आईची कांही बातमी कळल्याखेरीज कुठे जाण्याची तर माझी इच्छा नव्हती. माझी ही अवस्था लक्षांत आल्याने मन्मथबाबूंनी सुचविलें की 'गावापासून थोड्याच अंतरावर एक पिशाच्चसिद्ध माणूस राहतो. तो सिद्धीच्या जोरावर माणसांचें भूतभविष्य सांगूं शकतो. त्याच्याकडे चला.' मन्मथबाबूंचा आग्रह पडल्याने व स्वतःच्या मनाची उद्विग्नता दूर होईल म्हणून मी त्या माणसाकडे जावयास कबूल झालों. मन्मथ-बाबू, मी, आलासिंगा व आणखी एकजण असे आम्ही चौघे थोडें अंतर रेल्वेने जाऊन नंतर पायींच चालत त्याच्यापाशी पोहोचलों. जाऊन पाहतों तों स्मशानाच्या बाजूनेच एक धिप्पाड, काळाढुस्स माणूस बसला होता. त्यांच्या शिष्याने कांही 'रुंडुगुंडु' करून मद्रासी भाषेंत समजावून सांगितलें की तोच तो पिशाच्चसिद्ध पुरुष होय. सुरवातीला तर त्याने आमची कांहीच दखल घेतली नाही. नंतर कंटाळून आम्ही जेव्हा अगदी परत फिरायला निघालों तेव्हा त्याने

---

* मद्रासचे माजी अकाऊंटंट जनरल बाबू मन्मथनाथ भट्टाचार्य

आम्हांला कांही वेळ थांबायला सांगितलें. आमच्या बरोबरचा आलासिगा दुभाष्याचें काम करीत होता. 'आम्हांला त्याने थांबायला सांगितलें आहे' असें आलासिगाने आम्हांला म्हटलें. नंतर एक पेन्सिल घेऊन त्या माणसाने कांही वेळ कांही आकृत्या काढल्या व मग मात्र मला त्याचें मन संपूर्ण एकाग्र झाल्याचें दिसलें. हें झाल्यावर त्याने आधी माझें नांव, गोत्र व मग आमच्या चौदा पिढ्यांतील माणसांची माहिती सांगितली. हेंहि सांगितलें की श्रीरामकृष्ण माझ्याबरोबर सर्वत्र सर्वदा असतात व माझ्या आईचेंहि कुशल आहे. धर्मप्रचार करण्यासाठी लवकरच मला खूप दूर जावें लागणार आहे असेंहि त्याने त्याच वेळीं सांगितलें. आईबद्दल हा कुशल समाचार ऐकून मन्मथबाबूंबरोबर आम्ही सारे घरीं परत आलों. परत येऊन पाहतों तों आईचें कुशल असल्याची कलकत्त्याहून तार येऊन पोहोचली होती."

योगानंदांना उद्देशून स्वामीजी म्हणाले, "बेटयाने जें जें सांगितलें तें तें ठीक अगदी तस्सें झालें. मग तें काकतालीय न्यायाने असो वा कसेंहि असो."

योगानंदः—— तुम्ही या साऱ्या गोष्टींवर पूर्वी विश्वास ठेवीत नव्हतां म्हणूनच तो अनुभव तुम्हांला येण्याची आवश्यकता होती.

स्वामीजीः—— मी काय कांही न पाहतां न ऐकतां कशावरहि विश्वास ठेवीन ? ह्या शाळेंत मी शिकलोंच नाहीं ! महामायेच्या राज्यांत येऊन या जगत्-जादूगिरीबरोबरच किती इंद्रजालचमत्कार मीं पाहिलेत याला कांही सीमा नाही. माया ! माया !! रामराम! आज या काय साऱ्या व्यर्थ भाकडकथा निघाल्यात ? भुतांचा विचार करतां करतां लोक स्वतःच भुतें होऊन जातात. अन् जो कळत न कळत रात्रंदिवस म्हणत असतो 'मी नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त आत्मा आहें' तो ब्रह्मज्ञ होतो.

मोठ्या स्नेहार्द्र दृष्टीने शिष्याकडे पाहून ते म्हणाले, "या साऱ्या फालतू गोष्टींना मनांत मुळीच स्थान देऊं नकोस. फक्त सदसत् विचार कर, आत्मोपलब्धीसाठी प्राण पणाला लावून प्रयत्न कर. आत्मज्ञानापेक्षा श्रेष्ठ या जगांत अन्य कांहीच नाही. बाकी सारी माया—— जादुगिरी. एक प्रत्यगात्माच फक्त नित्य सत्य होय. येवढेंच मला

कळलें व तेंच तुम्हांला सांगण्याचा मी प्रयत्न करतों;-- '**एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन.**' (या विश्वब्रह्मांडांत एकमेव ब्रह्मच आहे, नानात्व मुळीच नाही.)

बोलण्याच्या भरांत रात्रीं अकरा वाजून गेले. नंतर जेवण आटोपून स्वामीजी झोपण्यासाठी निघून गेले. स्वामीजींना प्रणाम करून शिष्यहि परत निघाला. स्वामीजींनी विचारलें, "उद्या येणार आहेस ना ?"

शिष्य:-- येणार आहें यांत काय विचारावयाचें ? दिवसभरांत आपल्याला न पाहिल्यास मन व्याकुळ होतें.

स्वामीजी:-- तर मग आता ये. फार रात्र झाली आहे.

स्वामीजींबद्दल विचार करीत करीत मध्यरात्रीच्या सुमारास शिष्य घरीं परत आला.

---

# ज्ञानयोग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम .............. वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ...............

# ज्ञानयोग

## धर्माची आवश्यकता

( लंडन येथे दिलेलें व्याख्यान )

ज्या ज्या शक्तींनी मानवजातीच्या भवितव्याला वेळोवेळीं विशिष्ट घाट दिला आहे आणि आजहि ज्या शक्ति मानवाचें भविष्य घडवीत आहेत त्या साऱ्यांत धर्म नांवाची शक्ति सर्वांत अधिक प्रबल ठरली आहे. ही धर्म नामक विलक्षण शक्ति सर्वच समाजांच्या पाठीशीं कुठेतरी, त्यांच्या पार्श्वभूमीच्या स्वरूपांत कार्य करीत असते. मानवी घटकांना एकत्र आणणारी, त्यांना एकतेच्या सूत्रांत ओवणारी आजपर्यंतची सर्वांत मोठी प्रेरकशक्ति म्हणजे हा धर्मच होय. हें तर प्रसिद्धच आहे की या धर्मामुळे निर्माण झालेले संबंध जातीच्या, भौगोलिक परिस्थितीच्या, फार काय पण वंशाच्या संबंधांपेक्षाहि पुष्कळदा अधिक चिवट ठरले आहेत. एकाच देवाची पूजा करणाऱ्या, एकाच धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांनी, केवळ एकाच वंशांत जन्मलेल्या माणसांपेक्षा, नव्हे, प्रत्यक्ष भावाभावांपेक्षाहि एकमेकांना अधिक उत्कटतेने, अधिक सातत्याने साथ दिली आहे हें आपण जाणतोंच. ह्या धर्मरूपी नदीचा उगम कुठे आणि कसा झाला हें शोधण्याचे आजवर अनेक प्रयत्न होऊन गेले आहेत. काळाला तोंड देत आज आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेले सर्वच प्राचीन धर्म एक गोष्ट अधिकारवाणीने, अगदी हट्टाने प्रतिपादन करीत असतात की ते सर्व गूढ, गुह्य, इंद्रियातीत स्वरूपाचे असून त्यांची उत्पत्ति मानवी बुद्धींतून झालेली नाही, ते जणु तिच्या बाहेर कुठेतरी उत्पन्न झाले आहेत.

धर्माच्या उत्पत्तीविषयी आधुनिक विद्वानांना पुढील दोन मतें कांही अंशीं ग्राह्य वाटतात. पैकी पहिलें मत असें आहे की धर्म हा

मृतात्म्यांच्या पूजेंतून उद्भवला आहे. धर्माच्या उत्पत्तीविषयीचें दुसरें मत असें की धर्म हा मानवाच्या अनंतविषयक धारणेच्या विकासांतून जन्मला आहे. पहिला पक्ष असें प्रतिपादन करतो की दिवंगत पूर्वजांची पूजा करण्याच्या मानवी प्रवृत्तींतूनच धार्मिक भावना उदयास आल्या. दुसऱ्या पक्षाचें असें मत आहे की धर्माचा उदय निसर्गाच्या शक्तींवर सचेतनत्वाचा आरोप करण्याच्या मानवी प्रवृत्तींतून झाला.

माणूस स्वतःच्या मृत नातलगांची स्मृति कायम ठेवूं इच्छीत असतो. आपल्या त्या मृत नातेवाइकांचीं शरीरें नष्ट झालीं असलीं तरीदेखील ते स्वतः मात्र अस्तित्वांत आहेत असें त्याला वाटत असतें. या भावनेने प्रेरित होऊन तो त्यांना अन्न अर्पण करूं इच्छितो आणि एका अर्थानें त्यांची पूजा करूं इच्छितो. आपण ज्याला धर्म म्हणतों तो ह्यांतूनच उद्‌भूत झाला असें कांहींचें म्हणणें आहे. इजिप्त, बाबिलोनिया, चीन प्रभृति देशांच्या, आणि त्याचप्रमाणे अमेरिकेंतील व इतरहि कांही भागांतील जातींच्या प्राचीन धर्माचा अभ्यास केला रतमृत पूर्वजांच्या पूजेंतून धर्माची उत्पत्ति झाली असल्याच्या अगदी स्पष्ट खुणा आढळतात. इजिप्तच्या प्राचीन रहिवाशांची आत्म्यासंबंधी प्रथम अशी कल्पना होती की एखाद्याचा आत्मा म्हणजे त्याचीच एक अगदी हुबेहुब प्रतिमूर्ति असते. त्यांची अशी कल्पना होती की प्रत्येक मानवशरीरांत हुबेहुब त्या माणसासारखाच आणखी एक पुरुष वसत असतो, आणि माणूस मरतो त्या वेळीं तो आंतला दुसरा पुरुष तें शरीर सोडून जातो खरा, परंतु तो नाहीसा मात्र होत नाही, तो तसाच अस्तित्वांत राहतो. आणि याबरोबरच इजिप्तच्या त्या प्राचीन लोकांचा असाहि विश्वास होता की जोंवर त्या मेलेल्या माणसाचें मृत शरीर जसेंच्या तसें टिकेल तोंवरच तो आंतमधला दुसरा पुरुषहि अस्तित्वांत राहील. म्हणूनच मृत शरीरांना कोणतीहि इजा न पोहोचूं देण्याविषयी इजिप्तमधले लोक इतकी दक्षता बाळगीत असलेले दिसतात. आणि म्हणूनच त्यांनी ते प्रचंड पिरॅमिड बांधून त्यांत मृत देह नीट काळजीपूर्वक जतन करून ठेवले आहेत. कारण त्यांची अशीहि कल्पना होती की बाह्य शरीराच्या एखाद्या अवयवाला इजा झाल्यास त्या आंतमधील प्रतिमूर्तिस्वरूप दुसऱ्या पुरुषाला देखील

तसलीच इजा होईल. ही म्हणजे मृत पूर्वजांची पूजा होय हें स्पष्टच आहे. प्राचीन बाबिलोनियन लोकांमधेहि आपल्याला ही प्रतिमूर्तीची कल्पना प्रचलित असल्याचें आढळून येतें. पण तींत थोडा फरक आहे. बाबिलोनियन लोकांचा असा समज होता की, मृत्यूनंतर मृत शरीर सोडून गेलेल्या त्या आंतमधल्या प्रतिपुरुषाठायींच्या प्रेमाच्या सगळ्या भावना अजीबात करपून जातात आणि अन्नपाण्याकरता व इतरहि जरूर त्या मदतीकरता तो लोकांना भेडसावीत हिंडत असतो. मग त्याच्या ठिकाणीं स्वतःच्या मुलाबाळांविषयी आणि बायकोविषयीहि कांही दयामाया किंवा प्रेम उरत नाही. प्राचीन हिंदु लोकांमधेदेखील आपल्याला ह्या मृत पूर्वजांच्या पूजेचीं कित्येक चिन्हें आढळतात. चिनी लोकांच्या बाबतींतहि, त्यांच्या धर्माचा आधार ही पूर्वजपूजा होती असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. त्या विस्तीर्ण देशांत अजूनहि या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्वत्र ही पूर्वजपूजा प्रचलित आहे. खरें पाहतां, चीन देशांत कोणता एकमेव धर्म खरोखर फोफावला असेल तर तो या पूर्वजपूजेचा धर्मच होय असें निःसंकोचपणें म्हणतां येईल. याप्रमाणे मृत पूर्वजांच्या पूजेमधूनच धर्माची उत्पत्ति झाली असें मत प्रतिपादन करणाऱ्यांचा पक्ष एका अर्थी चांगलाच बळकट आहे असें म्हणणें भाग आहे.

उलट, निसर्गाच्या पूजेंतून धर्माची उत्पत्ति झाली असें प्राचीन आर्यांच्या वाङ्मयाच्या आधाराने सिद्ध करून दाखविणाऱ्या विद्वानांचीहि वाण नाही. भारतांत पितरांची पूजा प्रचलित असल्याचे पुरावे सर्वत्र आढळत असले तरीसुद्धा भारताच्या सर्वांत जुन्या वाङ्मयांत मात्र तिचा अगदी मागमूसदेखील आढळत नाही. आर्यजातीचा सर्वांत प्राचीन ग्रंथ जो ऋग्वेद, त्यांत आपल्याला तिचें नांवनिशाणहि आढळत नाही. आधुनिक विद्वानांच्या मतें, ऋग्वेदांत जर कांही आढळत असेल तर ती म्हणजे निसर्गाचीच पूजा होय. प्रकृतीचा पडदा बाजूस सारून पलीकडे काय आहे हें जाणण्याची आस मानवमनाला सदाचीच लागलेली आहे. उषा, संध्या, झंझावात, प्रकृतीच्या प्रचंड नि विराट शक्ति, तिचीं सुंदर सुंदर रूपें ह्यांनी मानवाला नेहमीच भुरळ पाडली आहे आणि तोहि त्या साऱ्यांवर लुब्धून गेला असून

त्यांच्या रहस्यांचा भेद करून त्यांचीं गुपितें जाणून घेण्याची आकांक्षा बाळगीत आला आहे. या प्रयत्नांत तो ह्या सर्व दृश्यांवर चेतनधर्माचा आरोप करतो, त्यांना शरीरें आणि आत्मे आहेत अशी कल्पना करतो—— कधी तो त्यांना सौंदर्यादि गुणांनी भूषित मानतो तर कधी गुणातीत मानतो. या सर्व प्रयत्नांचें पर्यवसान होतें ह्या समस्त दृश्यांना भावमय, कल्पित रूपें देण्यांत—— मग तीं मानवीधर्मयुक्त मानलीं गेलीं असोत वा नसोत. हाच प्रकार प्राचीन ग्रीसमधेंहि घडलेला आढळून येतो; ग्रीक लोकांच्या सगळ्या पौराणिक कथा म्हणजे प्रकृतीच्या भावमय, कल्पित अशा निरनिराळ्या रूपांचीं वर्णनेंच होत. ही देखील प्रकृति-पूजाच होय. प्राचीन जर्मन, स्कँडिनेव्हियन आणि इतर सर्व आर्य जातींचेंहि असेंच आहे. याप्रमाणे,धर्माची उत्पत्ति निसर्गाच्या शक्तींवर सचेतनत्वाचा वा मानवी गुणांचा आरोप करण्याच्या प्रवृत्तींतूनच झाली याहि मताच्या पुष्टयर्थ खूप सबळ प्रमाणें पुढे करतां येतात.

हीं दोन्हीं मतें जरी परस्परविरोधी वाटत असलीं तरी तिसऱ्या एका निराळ्याच भूमीवर त्यांना एकत्र आणून त्यांच्यांत मेळ घालतां येतो असें मला वाटतें. आणि माझ्या मतें ती भूमिच धर्माचें खरें मूळ होय. तिला मी 'इंद्रियांच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचा प्रयत्न' असें म्हणूं इच्छितों. एकतर माणूस आपल्या पितरांचे आत्मे धुंडाळीत असतो, मृतात्मे धुंडाळीत असतो, म्हणजेच शरीराचा नाश झाल्यानंतर काय राहतें हें जाणून घेऊं इच्छीत असतो, किंवा निसर्गाच्या विराट दृश्यांच्या पाठीमागे असलेल्या शक्तीचें स्वरूप तो समजून घेऊं इच्छीत असतो. तें कसेंहि असलें तरी एक गोष्ट मात्र अगदी निश्चित आहे की या दोन्ही प्रकारांत तो इंद्रियांच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचा प्रयत्न करीत असतो. इंद्रियांनी जेवढें कळतें तेवढ्यावरच तो संतुष्ट राहूं शकत नाही, त्यांच्या पलीकडे जाण्याची त्याची स्पृहा असते. धर्माची उत्पत्ति कशी झाली ह्याचें स्पष्टीकरण गहन किंवा अद्भुत असण्याचें कांहीच कारण नाही. मला तरी हें अगदी स्वाभाविक वाटतें की धर्माची ओझरती कल्पना प्रथम स्वप्नांमधून यावी. स्वतःच्या अमरत्वाची चुणूक माणसाला स्वप्नांमधून लाभली असावी. खरोखर,

स्वप्न ही एक अत्यंत आश्चर्यकारक अवस्था नाही काय ? आपण जाणतोंच की लहान मुलांना आणि अडाणी माणसांना स्वप्नांत आणि जागेपणांत फारसा फरक वाटत नसतो. निद्रावस्थेंत शरीर तसें पाहिल्यास मेलेलेंच असतें, आणि तरीसुद्धा त्या अवस्थेंतदेखील मन मात्र आपलीं सारीं गुंतागुंतीचीं कामें करीतच असतें असा जर त्यांनी तर्क केला तर त्यांत खरोखर अस्वाभाविक काय आहे ? आणि मग यावरून हें शरीर (मृत्यूने) कायमचें नष्ट झालें तरीसुद्धा आपल्या मनाच्या क्रिया (स्वप्नांतीलप्रमाणे) तशाच चालू राहतील असा जर माणसाने सरळ निष्कर्ष काढला तर त्यांत तरी आश्चर्य तें कोणतें ? धर्माच्या उत्पत्तीसंबंधीच्या गूढाचें, मला वाटतें, हें अधिक स्वाभाविक स्पष्टीकरण म्हणतां येईल. ह्या स्वप्नांच्या अनुशीलनामधून मानवी मन अधिकाधिक उच्च धारणा करण्यास समर्थ होतें. अर्थातच कालान्तराने अधिकांश मानवजातीला आढळून आलें की स्वप्नांमधील गोष्टी जागृतावस्थेंत खऱ्या ठरत नसतात, आणि स्वप्नावस्थेंत म्हणजे माणसाला कांही नवें अस्तित्व प्राप्त होतें अशांतला भाग नसून त्याच्या जागृतावस्थेंतील अनुभवांचीच स्वप्नांत नुसती उजळणी होत असते, इतकेंच.

परंतु एव्हाना अन्वेषणास प्रारंभ होऊन चुकला होता. या अन्वेषणाचें क्षेत्र आंत होतें--अंतर्जगत् हेंच त्याचें क्षेत्र होतें. मनाच्या भिन्नभिन्न अवस्थांचा धांडोळा घेत माणूस सारखा अधिकाधिक खोल खोल जात गेला. आणि या अन्वेषणांत जाग्रत वा स्वप्न या दोन्ही अवस्थांच्या वरची अवस्था त्याने शोधून काढली. ह्या अवस्थेचा उल्लेख जगांतील सर्वच सुसंघटित धर्मांनी केलेला आपल्याला आढळून येतो. तिला ते समाधि, परमानंदाची अवस्था, अंतःस्फूर्तीने लाभलेली अवस्था वगैरे नांवें देतात. सर्वच सुसंघटित धर्म अशी घोषणा करतात की त्यांचे प्रवर्तक, त्यांचे द्रष्टे, त्यांचे आचार्य मनाच्या अशा अवस्थेप्रत पोहोचले होते की जी जागृतावस्थाहि नव्हे आणि स्वप्नावस्थाहि नव्हे, तर ती त्या उभयतांच्याहि पलीकडली असून त्या अवस्थेंत त्यांना आध्यात्मिक राज्यासंबंधीच्या एकामागून एक अनेक नवीन तथ्यांचा साक्षात्कार झाला होता.

जागृतावस्थेंत आपल्या भोवतालच्या गोष्टींचा आपल्याला जो प्रत्यय येतो त्या मानाने त्यांना त्या साक्षात्कारावस्थेंत आलेली सत्यांची अनुभूति कितीतरी उत्कट असते. उदाहरणादाखल वैदिक धर्मच घ्या. वेद हे ऋषींनी रचले आहेत असें मानण्यांत येते. हे ऋषि सत्यांचा साक्षात्कार झालेले सत्पुरुष होते. संस्कृतांतील ऋषि या शब्दाचा नक्की अर्थ 'मंत्रांचा द्रष्टा' असा आहे. म्हणजे, वैदिक मंत्रांमधे वर्णिलेलीं सत्यें त्यांनी प्रत्यक्ष पाहिलीं होतीं. हे ऋषि अशी घोषणा करतात की त्यांना कित्येक सत्यांचा साक्षात्कार झाला आहे. त्या इंद्रियातीत सत्यांच्या बाबतींत 'संवेदणें' हा शब्द वापरतां आला तर 'आम्हीं तीं सत्यें संवेदिलीं आहेत, त्यांची आम्हांला मूर्त संवेदना झाली आहे' असें ते छातीठोकपणें म्हणतात. वेदांच्या रूपाने त्यांनी त्याच सत्यांची नोंद करून ठेवली आहे. यहुदी आणि खिस्ती या दोन्ही धर्मांमधेहि ह्याच सत्याची घोषणा केलेली आढळून येते.

बौद्धधर्माच्या दक्षिणभारतांतील शाखेच्या संबंधांत या मुद्यावर कांही आक्षेप घेतले जाणें शक्य आहे. असें विचारतां येईल की, बौद्धांचा तर कसल्याहि प्रकारच्या ईश्वरावर विश्वास नाही, मग त्यांचाहि धर्म अनुभवाच्या ह्या अतींद्रिय अवस्थेंतूनच निष्पन्न झाला असणें कसें शक्य आहे ? ह्याला उत्तर असें की, त्या बौद्धांचाहि एका शाश्वत नैतिक नियमावर विश्वास असतो, आणि आपण आपल्या बुद्धीने विचार करून ज्या पद्धतीने एखादा सिद्धान्त बांधीत असतों त्या पद्धतीने कांही हा नीतिनियम बुद्धीचें वा तर्काचें कार्य नव्हे. तर, बुद्धांना त्याचा अतींद्रिय अवस्थेंत आढळ झाला, त्या अवस्थेंत त्यांना त्याचा शोध लागला. श्री. एड्विन अर्नॉल्ड कृत 'आशियाचा नंदादीप' (The Light of Asia) नामक रसाळ काव्यांत रेखाटलेल्या त्रोटक स्वरूपांत कां होईना पण तुमच्यापैकी ज्यांनी बुद्धदेवांचें चरित्र वाचलें आहे त्यांना आठवत असेल की, मनाची ती इंद्रियातीत अवस्था प्राप्त होईपर्यंत बुद्धदेव त्या बोधिवृक्षाखाली आसनस्थ होऊन बसल्याचें त्यांत वर्णन आहे. बुद्धदेवांचे सर्व उपदेश ह्या अवस्थेंतूनच निःसृत झाले आहेत, बौद्धिक विचारांतून नव्हत.

असो तर, याप्रमाणे सर्वच धर्म हें एक महान् विधान करतात

की मानव मन कित्येक क्षणीं केवळ इंद्रियांच्याच मर्यादा नव्हे तर तर्काची शक्तिदेखील उल्लंघून जात असतें. त्या अवस्थेंत त्याला मग अशा सत्यांचा प्रत्यक्ष साक्षात्कार होतो की त्यांचा त्याला एरवी कधीहि प्रत्यय आला नसता, तर्काने तीं त्याला कदापि गवसलीं नसतीं. आणि हींच सत्यें जगामधील समस्त धर्मांचा पाया होत. अर्थातच ह्या सत्यांना आव्हान देण्याचा, त्यांना तर्काच्या कसोटीवर घासून पाहण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. तथापि, जगांत विद्यमान असलेले सर्वच धर्म असें ठासून सांगतात की इंद्रियांच्या आणि बुद्धीच्या सीमा ओलांडून जाण्याची ही विलक्षण शक्ति मानवी मनांत असते आणि मानवी मनाची ही शक्ति म्हणजे एक सप्रमाण सिद्ध झालेली गोष्ट आहे असें ते म्हणत असतात.

धर्माच्या या साऱ्या घोषणा कितपत खऱ्या आहेत हा प्रश्न अमळ बाजूला ठेवला तरी एक वैशिष्टच मात्र निरपवादपणें ह्या सगळ्याच धर्मांत असलेलें आढळून येतें. तें हें की पदार्थविज्ञानासारख्या शास्त्राचे शोध मूर्त स्वरूपाचे असतात तर त्याउलट धर्मांनी प्रचारिलेलीं सत्यें हीं अमूर्त स्वरूपाचीं असतात. अत्यंत सुसंघटित अशा सर्वच धर्मांमधे ह्या सत्यांना शुद्ध एकरस, एकसंध अमूर्त तत्त्वाचें स्वरूप येत असतें. मग कुणी त्याला 'सर्वव्यापी पुरुष' म्हणोत, 'ईश्वर नामक अमूर्त व्यक्ति' म्हणोत, 'नैतिक नियम म्हणोत' किंवा 'वस्तुमात्राला आधारभूत असें अमूर्त सत्-तत्त्व' म्हणोत. आधुनिक काळांतहि, मनाची ही अतींद्रिय अवस्था वगळूनच ज्यांनी धर्माचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला आहे त्यांना देखील जुन्या काळचीं तीं अमूर्त तत्त्वें घेऊन त्यांना 'नैतिक नियम' 'आदर्श एकत्व' इत्यादींसारखीं निरनिराळीं नांवें देऊनच आपलें काम करावें लागलें आहे. या साऱ्यावरून हेंच दिसून येतें की हीं अमूर्त सत्यें म्हणजे कांही इंद्रियांनी प्रत्ययास येणाऱ्या गोष्टी नव्हत. तीं इंद्रियगोचर नव्हत. आपल्यापैकी कुणींहि कधी 'आदर्श मानव' पाहिलेला नाही, आणि तरीहि त्यावर विश्वास ठेवण्यास आपल्याला सांगितलें जात असतें. आपल्यापैकी कुणींहि कधी आदर्श-दृष्ट्या परिपूर्ण मनुष्य बघितलेला नाही, आणि तरीहि तसला आदर्श समोर असल्याखेरीज आपली उन्नति होणेंहि शक्य नाही. याप्रमाणे, ह्या

सर्व निरनिराळ्या धर्मांच्या बाबतींत ही एक गोष्ट अगदी ठसठशीतपणें आढळून येते की, सगुण ईश्वराच्या स्वरूपांत म्हणा, की निर्गुण ब्रह्माच्या स्वरूपांत म्हणा, की नियमाच्या स्वरूपांत म्हणा, की सर्वव्यापक सत्तेच्या स्वरूपांत म्हणा, की सारभूत सत्‌तत्त्वाच्या स्वरूपांत म्हणा, एक आदर्शभूत एकसंध, एकरस अमूर्त तत्त्व ते आमच्या समोर ठेवीत असतात. आपलें काम म्हणजे त्या आदर्शाप्रत पोहोचण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहणें. मानव कुणीहि असो आणि कुठेंहि वसो, प्रत्येक मानवासमोर अनंत शक्तीचा एक आदर्श असतो. मानवमात्रासमोर अनंत सुखाचा आदर्श असतो. आपल्या सभोवार दिसत असलेलीं बहुतांश कामें, सर्वत्र होत असलेले उद्योग ह्या अनंत शक्तीसाठी वा या अनंत सुखासाठी धडपडण्यांतूनच उद्भवले असतात. तथापि कांही थोड्याजणांना हें चटकन् उमजतें की आपण अनंत शक्तीसाठी धडपडत आहोंत खरे, परंतु ती या इंद्रियांमधून कवटाळतां येण्यासारखी नाही. त्यांना अगदी लवकर कळून चुकतें की अनंत आनंद हा कधी इंद्रियांमधून मिळावयाचा नसतो. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे असें की आमचीं इंद्रियें म्हणा की आमचा देह म्हणा, हीं त्या अनंताच्या अभिव्यक्तीचें माध्यम या दृष्टीने फारच समर्याद आहेत, अगदीच थिटीं आहेत. 'सान्तामधून अनंत व्यक्त करणें अशक्य आहे,' आणि लवकर म्हणा की उशीरा म्हणा, माणूस सान्तामधून अनंत व्यक्त करण्याचा प्रयत्न सोडून देण्यास शिकत असतो. हें तसली धडपड सोडून देणें, हा त्या प्रयत्नांचा त्यागच नीतीची पार्श्वभूमि होय. नीति ज्यावर उभी आहे तो आधार म्हणजे त्याग हाच होय. ज्यांना त्यागाचा पाया नाही असे नीतिनियम कधीच अस्तित्वांत आले नाहीत.

नीतिशास्त्र नेहमी सांगत असतें—"मी नव्हे, तूं." त्याचें ब्रीद असतें—"मी नव्हे, तर, माझ्याखेरीज इतर." म्हणजेच "स्वार्थीपणा नाही, तर निःस्वार्थता." ह्याचेंच नांव नीति. ती अनंत शक्ति किंवा तो अनंत आनंद इंद्रियांद्वारा मिळविण्याच्या प्रयत्नांत माणूस व्यक्तित्वाच्या ज्या साऱ्या फोल कल्पनांना बिलगत असतो त्या टाकून दिल्या पाहिजेत असें नीतिशास्त्राचें सांगणें आहे. 'आधी इतरांचें आणि नंतर मागाहून माझें' अशी तुमची वृत्ति असावयास हवी. इंद्रियें म्हणत

असतात—"आधी मी." नीतिशास्त्र म्हणत असतें—" 'मी' सगळ्यांत शेवटीं." याप्रमाणे नीतीचे सर्व नियम त्यागावर आधारलेले आहेत; भौतिक पातळीवर व्यक्तित्वाचा विनाश करणें, परिपोष करणें नव्हे. तें अनंत कधीच भौतिक पातळीवर व्यक्त व्हावयाचें नाही, तें शक्य नाही, तशी कल्पनाहि करतां यावयाची नाही.

म्हणून, त्या अनंताच्या अधिकाधिक सूक्ष्म अभिव्यक्तीसाठी माणसाने भौतिक पातळी सोडून वर उच्च उच्च स्तरांवर जावयास हवें. नीतीचे निरनिराळे नीतिनियम अशा रीतीने घडविले जात असतात, परंतु त्या सर्वांत एकच एक मध्यवर्ती भावना असते, आणि ती म्हणजे आत्मत्यागाची. संपूर्ण आत्मविलय हेंच नीतिशास्त्राचें ध्येय आहे. स्वतःच्या व्यक्तित्वाचा विचार करूं नका असें म्हटल्यास लोकांना धक्का बसतो. ज्याला ते स्वतःचें व्यक्तित्व म्हणतात तें हरविण्याची त्यांना इतकी भयंकर भीति वाटत असते. परंतु त्याचबरोबर तींच माणसें नीतीचे सर्वोच्च आदर्श अगदी बरोबर असल्याचें मान्य करतील. त्यांच्या हें मुळीच लक्षांत येत नाही की समस्त नीतिनियमांचें एकमेव कार्य, एकमेव लक्ष्य, एकमेव ध्येय आहे— व्यक्तित्वाचा विनाश, त्याची उभारणी नव्हे.

उपयुक्ततावादाच्या सिद्धान्तांनी माणसामाणसांमधील नैतिक संबंधांचा उलगडा होऊं शकत नाही. कारण, प्रथमतः म्हणजे केवळ उपयुक्तताच लक्षांत घेऊन आपण कोणतेहि नीतिनियम निर्माण करूं शकणार नाहीं. साधारणतः म्हटलें जातें त्याप्रमाणे अमानवी आधाराखेरीज, किंवा मी म्हणत असतों त्याप्रमाणे अतींद्रिय प्रत्ययाखेरीज नीति असूंच शकत नाही. अनंताकडे जाण्याच्या प्रयत्नांविना आदर्श म्हणून कांही असूंच शकत नाही. माणसांना त्यांच्या समाजांच्या सीमांमधेच जखडून ठेवणारी कोणतीहि मतप्रणाली मानवजातीच्या नीतिनियमांचा कांही अर्थ लावूं शकणार नाही. त्या अनंताकडे जाण्याचा, त्या इंद्रियातीत अवस्थेची प्राप्ति करून घेण्याचा आमचा प्रयत्न अव्यवहार्य आणि वेडगळ आहे या सबबीवर उपयुक्ततावादी आम्हांला एकीकडे त्या प्रयत्नांपासून परावृत्त करूं इच्छीत असतो, आणि त्याचबरोबर दुसरीकडे तो आम्हांला नीतीचें पालन करण्याचा आणि समाजाचें हित

करण्याचा आदेश देत असतो. पण आम्ही समाजाचें हित करायचें तें काय म्हणून ? समाजाचें हित करणें ही गौण, दुय्यम गोष्ट होय. प्रथम म्हणजे आपल्यासमोर एक ध्येय, एक लक्ष्य असावयास हवें. नीति हेंच कांही लक्ष्य वा साध्य होऊं शकत नाही, ती केवळ साधन आहे. आपल्यासमोर जर कांही ध्येय, लक्ष्य वा साध्य नसेल तर मग आपण नीतिमान काय म्हणून व्हावयाचें ? नीतीचें पालन करून आपण काय साधणार आहोंत ? मीं लोकांचें भलेंच कां करावयाचें, त्यांचें वाईट कां करावयाचें नाही ? ह्या प्रश्नाला उपयुक्ततावाद्याचें काय उत्तर आहे ? स्वतःचें सुख हेंच जर मानवजातीचें लक्ष्य असेल तर मग मीं इतरांना दुःखी करून स्वतःला सुखी करण्यास काय प्रत्यवाय आहे ? तसें करण्यापासून मला काय परावृत्त करूं शकेल ? शिवाय, उपयुक्ततावाद ही एक फारच संकुचित कल्पना आहे. नीतीचा वा समाजजीवनाचा आधार होण्याच्या दृष्टीने उपयुक्ततावाद फारच अपुरा आहे. प्रचलित सर्वच सामाजिक संस्था आणि प्रथा ह्या समाजाच्या वर्तमान अवस्थेच्या अनुरोधानेंच निर्माण केल्या गेल्या आहेत. परंतु, म्हणून, समाज हा शाश्वत आहे असें धरून चालण्याचा उपयुक्ततावाद्यांना काय अधिकार आहे ? कशाच्या आधारावर ते असें म्हणूं शकतात ? कित्येक युगांपूर्वी समाज अस्तित्वांत नव्हता, आणि कांही युगांनंतर बहुधा अस्तित्वांत असणारहि नाही. बहुधा ही एक तात्पुरती अवस्था असून तिच्यामधून आपण अधिक उच्च विकासाकडे जात आहोंत. आणि म्हणूनच ह्या असल्या समाजाच्याच अनुरोधाने बनविलेला कोणताहि नियम कधी शाश्वत असूं शकणार नाही आणि तो संपूर्ण मनुष्यस्वभावाला कदापि लागू पडणार नाही. म्हणून, फार तर एवढेंच म्हणतां येईल की, उपयुक्ततावादी सिद्धान्त केवळ वर्तमान सामाजिक परिस्थितींतच कामीं पडूं शकतील. यापलीकडे त्यांना आणखी कांहीच मूल्य नाही. परंतु धार्मिक आणि आध्यात्मिक सत्यांवर आधारलेले सदाचार आणि नीतिनियम मानवाच्या संपूर्ण आणि अनंत स्वरूपाला लागू पडतात. ते नीतिनियम असतात अर्थातच व्यक्तीसाठी, परंतु ते आधारलेले मात्र असतात व्यक्तीच्या अनंत स्वरूपावर. जसें व्यक्तीला तसेंच ते समाजालाहि लागू असतात,

कारण ह्या व्यक्तींचा समुदाय म्हणजेच समाज होय. म्हणून, ते ज्या-अर्थी व्यक्तीला आणि तिच्या शाश्वत संबंधांना लागू असतात, त्या-अर्थी ते समस्त समाजालाहि लागू असलेच पाहिजेत, मग तो समाज कोणत्याहि काळांतील आणि कोणत्याहि परिस्थितींतील असो. यावरून हें दिसून येतें की मानवजातीला आध्यात्मिक स्वरूपाच्या धर्माची नेहमीच गरज असते. भौतिक जग कितीहि सुखदायक वाटत असलें तरीहि माणूस सदाच त्यांत गुरफटून राहूं शकत नाही.

असें म्हणण्यांत येत असतें की आध्यात्मिक बाबींकडे फार लक्ष दिल्याने जगांतील आपले व्यावहारिक संबंध बिघडतात. चिनी साधु कन्फ्यूशसच्या त्या तेवढ्या जुन्या काळींहि असें म्हटलें गेलें होतें की "आपण आधी ह्या जगाकडे लक्ष देऊं या, आणि तें संपलें की मग आपण परलोकाकडे लक्ष देऊं." आपण 'ह्या जगाकडे लक्ष देणें' अर्थात‌च फार चांगलें आहे. परंतु अध्यात्माकडे फार लक्ष देण्याने जर आमच्या व्यावहारिक संबंधांवर थोडाफार परिणाम होत असेल तर ह्या तथा-कथित व्यवहाराकडे फार लक्ष पुरविल्याने आमच्या इहलोक आणि परलोक दोहोंचीहि हानि होत असते. त्याने आपण जडवादी बनून जातों---केवळ भोगवादी बनून जातों. पण मानवाने प्रकृतीला वा ह्या जगालाच आपलें लक्ष्य न समजलें पाहिजे, त्याचें लक्ष्य त्यापेक्षा कांहीतरी उच्च असावयास हवें.

**जोंवर प्रकृतीच्या वर उठण्याची धडपड करीत आहे तोंवर माणूस हा माणूसच असतो,** आणि ही प्रकृति अंत:प्रकृति व बहि:प्रकृति अशी उभयविध असते. आमच्या बाहेरील आणि आमच्या शरीरांतील जड अणु-परमाणूंना चालविणाऱ्या नियमांचाच समावेश 'प्रकृतीं'त होतो असें नव्हे, तर, वस्तुतः ह्या बाह्य प्रकृतीला प्रेरणा देऊन चालविणारी जी सूक्ष्म अंत:प्रकृति तिचाहि 'प्रकृतीं'त समावेश होतो. (बाह्य प्रकृतीला जिंकणें ही फार चांगली आणि फार मोठी गोष्ट आहे यांत शंकाच नाही, पण आपली अंत:प्रकृति जिंकणें ही खचितच त्याहिपेक्षा मोठी गोष्ट आहे.) ताऱ्यांना आणि ग्रहांना चालविणारे नियम जाणणें ही फार मोठी आणि चांगली गोष्ट आहे खरी, परंतु मानवाच्या मनोविकारांना, त्याच्या भावनांना, त्याच्या इच्छाशक्तीला चालविणारे नियम जाणून

घेणें त्यापेक्षा अनंतपट श्रेष्ठ आणि चांगलें आहे. हें अंतर्मानवाला वा मानवाच्या अंतःप्रकृतीला जिंकणें, मानवी मनांत चालणाऱ्या सूक्ष्म क्रियांचीं रहस्यें जाणून घेणें, मानवी मनाविषयीचीं अद्भुत गूढें जाणणें हें सारें संपूर्णपणें धर्माचें क्षेत्र होय.) साधारण माणसाला स्थूल, मोठाल्या भौतिक गोष्टीच आवडत असतात. हा मनुष्यस्वभाव आहे. जें कांही सूक्ष्म आहे तें साधारण माणसाला आकळत नाही. हजारो कोकरांचा फन्ना उडविणाऱ्या सिंहाचें सामान्य लोकांना कौतुक वाटतें असें जे म्हणतात तें अगदी बरोबर आहे. तो त्या सिंहाचा क्षणिक विजय असला तरी त्या कोकरांचें तें मरण होय हा विचारहि कधी त्यांच्या मनांत येत नाही, कारण केवळ भौतिक वा शारीरिक शक्तीचा आविष्कार बघूनच त्यांना आनंद वाटत असतो. साधारण मानवांचा हाच खाक्या असतो. जें कांही बाह्य आहे तेंच तेवढें त्यांना कळूं शकतें आणि आनंद देऊं शकतें. परंतु प्रत्येक समाजांत असा एक वर्ग असतो की त्याचीं सुखें इंद्रियजन्य नसतात, तर इंद्रियांच्या पलीकडील असतात, आणि त्या लोकांना या भौतिक जगाहून श्रेष्ठ, त्यापेक्षा उच्च अशा कशाचें तरी ओझरतें दर्शन अधूनमधून होत असतें व तेथपर्यंत पोहोचण्याचा ते प्रयत्न करीत असतात. आणि आपण जर नाना राष्ट्रांचा इतिहास नीट काळजीपूर्वक वाचून पाहिला तर आपल्याला असें हमखास आढळून येईल की अशा माणसांची संख्या जेव्हा वाढते तेव्हाच कोणत्याहि राष्ट्राचा अभ्युदय होत असतो, आणि उपयुक्ततावादी त्याला कितीहि फोल म्हणोत, पण ज्या वेळीं हा अनंताचा ध्यास सुटतो त्याच वेळीं त्या राष्ट्राच्या अधःपातास सुरुवात होते. ह्याचा अर्थच असा की, (कोणत्याहि जातीच्या शक्तीचा खरा उगम तिच्या आध्यात्मिकतेंतच असतो, आणि ज्या दिवसापासून त्या आध्यात्मिकतेस ओहोटी लागते आणि जडवादाचें वर्चस्व होऊं लागतें त्या दिवसापासूनच ती जात मृत्युपंथास लागते.)

याप्रमाणे धर्मापासून आपण जीं कांही भरीव तथ्यें आणि सत्यें शिकूं शकतों व त्यापासून आपल्याला जें कांही सांत्वन-समाधान लाभूं शकतें तें अमळ बाजूस ठेवलें तरीहि, नुसतें एक शास्त्र, नुसतें एक अध्ययन या दृष्टीनेसुद्धा मानवाला उपलभ्य असलेल्या सर्व मानसिक

93064

व्यायामांमधे धर्म हा सर्वांत श्रेष्ठ आणि निकोप व्यायाम होय. ह्या अनंताचा धांडोळा, ही त्या अनंताला कवटाळण्याची धडपड, इंद्रियांच्या सीमारेखा ओलांडून जाण्याचा हा आटापिटा, जडाच्या शिवाराबाहेर पडण्याची ही खटपट, आणि आध्यात्मिक मानवाचा विकास करण्यासाठी-- आपला अंतरात्मा त्या अनंतांत विलीन करून त्याच्याशीं एक होण्यासाठी अहर्निश चालविलेला हा प्रयत्न-- हाच खरोखर माणूस करीत असलेल्या सर्व उद्यमांमधे सर्वांत महान्, सर्वांत उदात्त होय. कांही लोकांना खाण्यांतच सगळ्यांत जास्त सुख वाटत असतें. त्यांना तें तसें वाटू नये असें म्हणण्याचा आपल्याला कांहीच अधिकार नाही. आणखी कित्येकांना कांही विशिष्ट गोष्टी त्यांच्या मालकीच्या असण्यांतच पराकाष्ठेचा हर्ष होत असतो. त्यांना तो तसा होऊं नये असें म्हणण्याचा आपल्याला कांहीच अधिकार नाही. पण त्याचबरोबर, ज्याला अध्यात्मचिंतनांतच सर्वांत जास्त आनंद लाभत असतो त्यालाहि 'नको' म्हणण्याचा ह्या लोकांना कांहीसुद्धा अधिकार नाही. (प्राणी जितका खालच्या स्तराचा, तितकें त्याचें सुख इंद्रियांशीं जास्त निगडित असतें.) एखादा कुत्रा किंवा लांडगा लाळ गाळीत आणि शेपटी हालवीत जसल्या चवीने आपलें खाणें खातो तसल्या चवीने माणूस क्वचितच जेवूं शकेल. परंतु कुत्र्याची किंवा लांडग्याचीं सगळीं सुखें इंद्रियांतच सामावलेलीं असतात. (प्रत्येक देशांतील खालच्या पातळीवरील मानव इंद्रियजनित सुखांतच रममाण असतात तर सुसंस्कृत आणि सुशिक्षित माणसांना चिंतन, तत्त्वज्ञान, कला, विज्ञान इत्यादिकांतच आनंद लाभत असतो. अध्यात्म तर आणखी वरच्या पातळीवरील गोष्ट आहे. त्याचा विषय अनंत हा असल्यामुळे त्याची पातळी सर्वांत वरची आहे,) आणि ज्यांना त्याचा आस्वाद घेतां येणें शक्य आहे त्यांच्यापक्षीं तेथें सर्वांत अधिक आनंद आहे. म्हणून, माणसाने सुखाच्या शोधांत असलें पाहिजे या उपयुक्ततावाद्यांच्याच ब्रीदानुसार वागावयाचें झालें तरीदेखील आपण धार्मिक चिंतनाची सवय लावून घेतली पाहिजे, कारण उपलभ्य सर्व सुखांमधे तेंच सर्वांत उच्च सुख होय. एवंच अध्ययन म्हणून धर्म अगदी आवश्यकच आहे असें मला वाटतें.

त्याच्या परिणामांवरूनहि हें सहज पटण्यासारखें आहे. (मानवी

मनाला कार्यप्रवण करणारी धर्म ही सर्वांत मोठी प्रेरकशक्ति आहे.) आध्यात्मिक आदर्शाइतकी शक्ति आपल्यांत इतर कोणताच आदर्श जागवूं शकणार नाही. इतिहास ह्याला साक्ष. मानवजातीचा इतिहास बघितल्यास हें खरें असल्याचें आपल्याला स्पष्ट दिसून येईल, आणि धर्माचें हें सामर्थ्य अजूनहि नाहीसें झालेलें नाही. मी अर्थातच हें नाकबूल करीत नाहीं की माणूस केवळ उपयुक्ततावादी मतें बाळगूनहि अत्यंत भला आणि अत्यंत नीतिमान होऊं शकतो. केवळ उपयुक्तता-वादाचा आदर्श बाळगून पूर्णपणें निकोप, नीतिमान आणि चांगले झालेले कितीतरी थोर पुरुष ह्या आपल्या जगांत होऊन गेले आहेत. परंतु जग हालवून सोडणाऱ्या, जगांत जणु एका प्रचंड आकर्षणशक्तीचा प्रादुर्भाव करणाऱ्या, शेकडो हजारो लोकांवर प्रभाव पाडून त्यांना कार्यास प्रवृत्त करणाऱ्या, आपल्या जीवनाने इतरांमधे आध्यात्मिकतेचा वन्हि चेतवून देणाऱ्या व्यक्तींची पार्श्वभूमि मात्र आध्यात्मिकच असल्याचें आपल्याला नेंहमी आढळून येईल. त्यांच्या ठायींच्या प्रचंड प्रेरणा धर्मांतूनच निर्माण झालेल्या असतात.( जिच्यावर मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि जी मानवाच्या ठायीं स्वरूपतःच वसत असते त्या अनंत शक्तीचा साक्षात्कार करून घेण्यासाठी जर मानवाला कुणी सर्वांत जास्त प्रेरणा देत असेल तर तो धर्मच होय./ (चारित्र्य बनविण्यासाठी, जें कांही चांगलें आहे आणि थोर आहे तें घडविण्यासाठी, लोकांच्या जीवनांत आणि स्वतःच्या अंतरात्म्यांत शांति आणण्यासाठी प्रेरणा देणारी सर्वांत मोठी शक्ति म्हणजे धर्म होय.) आणि म्हणून त्या दृष्टीने त्याचें अध्ययन व्हावयासच हवें. धर्माचें अध्ययन-अनुशीलन आता पूर्वीपेक्षा विशाल दृष्टिकोनांतून झालें पाहिजे. धर्मासंबंधीच्या सर्व संकुचित, मर्यादित, कलहप्रसू, आक्रमक कल्पना आता लयास जावयास हव्यात. धर्माविषयीच्या साऱ्या पंथनिष्ठ, जमातनिष्ठ, राष्ट्रनिष्ठ कल्पना टाकून द्यावयास हव्यात. प्रत्येक जाती-जमातीचा फक्त स्वतःचा असा एकेक विशिष्ट देव असावा आणि स्वतःखेरीज इतर सगळ्यांचा देव खोटा आहे असें प्रत्येकाने मानीत असावें ही भ्रामक, वेडगळ समजूत आता भूतकाळांत जमा व्हावयास हवी. असल्या सगळ्या कल्पनांचा सपशेल त्याग करावयास हवा.

माणसाचें मन जसें जसें विशाल होतें तसतसा त्याच्या आध्यात्मिक प्रगतीचा वेग पण वाढतो. एव्हानाच अशी वेळ आली आहे की साऱ्या जगाच्या काऱ्याकोपऱ्यांत पसरल्याखेरीज कोणताहि विचार माणूस प्रकट करूंच शकत नाही. निव्वळ भौतिक साधनांनीच आपण अवघ्या जगाच्या संपर्कांत आलों आहोंत. आणि म्हणून जगाच्या भावी धर्मांनीहि तसेंच सार्वजनीन, तितकेंच विशाल असलें पाहिजे.

आज जगांत जें कांही आहे— जें कांही चांगलें आहे, जें कांही थोर आहे त्या साऱ्याचा अंतर्भाव भावी धर्मांमधे व्हावयास हवा, आणि त्याचबरोबर पुढे आणखी विकास होण्यालाहि त्या धर्मांमधे अपरंपार शक्यता असावयास हवी. भूतकालांतील जें कांही चांगलें आहे तें राखलें गेलें पाहिजे, आणि आहे त्या भांडारांत भविष्यकाळांत आणखी भर घालण्याचा मार्गहि मोकळा असला पाहिजे. धर्मांनी समावेशक वृत्ति धारण केली पाहिजे, ईश्वराविषयीच्या त्यांच्या विशिष्ट कल्पना इतरांहून वेगळ्या आहेत एवढ्याचसाठी त्यांनी तिरस्काराने एकमेकांना तुच्छ न लेखलें पाहिजे. मीं आपल्या आयुष्यांत अशीं कितीतरी धार्मिक माणसें पाहिलीं आहेत, अशीं कितीतरी समंजस माणसें पाहिलीं आहेत की ज्यांचा ईश्वरावर, आपण त्या शब्दाचा जो अर्थ करतों त्या अर्थाने मुळीहि विश्वास नव्हता. कदाचित् तुम्हां-आम्हांला कधी कळूं शकला असेल त्यापेक्षा कितीतरी चांगल्या रीतीने ईश्वर त्यांना कळला होता. सगुण ईश्वराची कल्पना किंवा निर्गुण अनंत, नैतिक नियम किंवा आदर्श मानव— ह्या साऱ्यांचाच धर्माच्या व्याख्येंत अंतर्भाव झाला पाहिजे. आणि धर्म ज्या वेळीं असे विशाल, असे उदार होतील त्या वेळीं लोकांचें भलें करण्याचें त्यांचें सामर्थ्य शेकडोपटीने वाढेल. धर्मांनी, त्यांच्या ठायीं प्रचंड शक्ति वसत असल्यामुळे, जगाचें भलें करण्यापेक्षा त्याचें नुकसानच जास्त केलें आहे, आणि असें होण्याचें एकमेव कारण म्हणजे त्यांचा संकुचितपणा आणि विशिष्ट सीमांमधेच घुटमळत राहण्याची त्यांची प्रवृत्ति.

सध्याच्या काळांत देखील आपल्याला असे कितीतरी संप्रदाय आणि समित्या आढळून येतील की ज्यांच्या कल्पना जवळजवळ

एकमेकांसारख्याच असूनहि, एकजण अगदी हुबेहुब दुसऱ्याप्रमाणेच त्या कल्पना व्यक्त करूं इच्छीत नाही एवढ्याचसाठी तीं आपसांत भांडत असतात. म्हणून धर्मांनी विशाल, उदार व्हावयास हवें. धार्मिक कल्पना सार्वजनीन, विस्तृत आणि सीमारहित झाल्या पाहिजेत, तरच धर्म पूर्णपणें कार्यक्षम बनूं शकेल, कारण धर्माची शक्ति जगांत आता कुठे नुकतीच प्रकट व्हावयास सुरुवात झाली आहे. कधीकधी असें म्हणण्यांत येतें की धर्म मरणाच्या वाटेस लागले आहेत, आध्यात्मिक भाव जगांतून लोपत आहेत. पण मला तर उलट असें वाटतें की आता तर त्याच्या वाढीस नुसती सुरुवात झाली आहे. विशाल आणि शुचिर्भूत झालेल्या धर्माची शक्ति मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत शिरकाव करणार आहे. धर्म जोंवर कांही निवडक लोकांच्या हातीं होता किंवा पुरोहितवर्गाच्या कबज्यांत होता तोंवर तो फक्त मंदिरें, चर्च, शास्त्रग्रंथ, ठराविक मतें, विधि, मूर्ति, कर्मकांड वगैरेंतच डांबला गेला होता. परंतु धर्म जेव्हा आपल्या खऱ्या, आध्यात्मिक आणि सार्वजनीन स्वरूपांत आविर्भूत होईल तेव्हा, आणि तेव्हाच धर्म सत्य आणि सजीव बनेल. मग तो आपल्या अगदी स्वभावांत भिनून जाईल, आपल्या प्रत्येक क्रियेंत झंकृत होईल, आपल्या समाजाच्या रोमरंध्रीं स्पंदेल, आणि जगाचें भलें करण्याची शक्ति त्याच्या ठायीं आजपर्यंत कधी होती त्यापेक्षा अनंतपट वृद्धिगत होईल.

एक धर्म खरा ठरला तर सर्व धर्म खरे ठरतात आणि एक खोटा ठरला तर सगळे खोटे ठरतात हें बघून निरनिराळ्या प्रकारच्या धर्मांमधे आपसांत मैत्रीची भावना बळावणें आवश्यक आहे. मात्र हा मित्रभाव म्हणजे, सध्याच्या काळांत दुर्दैवाने पुष्कळजण करतात त्याप्रमाणे इतरांवर जणु अनुग्रह करीत असल्याचा आव आणणें, आश्रयदात्यांचा दिमाख दाखविणें किंवा हात राखून हिशेबाने सदिच्छा प्रकट करणें वगैरेसारखा कांही प्रकार नसावा. हा मित्रभाव परस्पराविषयी आदराच्या, परस्पराविषयी सन्मानाच्या, परस्पराविषयी आस्थेच्या भावनेंतून उद्भवावयास हवा. आणि ह्या साऱ्यापेक्षा, मैत्रीची भावना उदयास यावयास हवी— निरनिराळे धर्म आणि भौतिक विज्ञानें यांच्यामधे. विभिन्न धर्म आणि भिन्नभिन्न भौतिक विज्ञानें हीं वस्तुतः

एकाच सत्याचे दोन वेगवेगळे आविष्कार, दोन वेगवेगळीं रूपेंच आहेत. पैकी पहिल्यांचा जन्म होतो अंतर्जगतांतील घटनांच्या अनुशीलनामधून; आणि धर्म या संज्ञेस केवळ आपणच पात्र आहोंत, त्या आडनांवावर फक्त आपलाच हक्क आहे असें दुर्दैवाने अद्यापहि त्यांना वाटत असतें. त्या एकाच सत्याच्या अभिव्यक्तीचा दुसरा प्रकार म्हणजे तथाकथित भौतिक विज्ञानें—ह्यांचीं शिरें जणु स्वर्गाचीं रहस्यें भेदीत असतात पण त्यांचे पाय मात्र रोवलेले असतात जमिनीवरच.

सारांश, धर्म आणि आधुनिक भौतिक विज्ञान ह्यांच्यांत मिलाफ घडून यावयास हवा. हा मिलाफ घडून येण्यासाठी, ह्या दोघांमधे असला समन्वय, असली एकवाक्यता साधण्यासाठी त्या दोघांनाहि एकमेकांना कांही सवलती द्याव्या लागतील, कित्येक बाबतींत तर फार मोठ्या सवलती द्याव्या लागतील; कांही सवलती देतांना त्यांना अतिशय अवघडहि जाईल, दुःखहि होईल, परंतु त्या त्यागाने आपला लाभ झाला आहे, आपण समृद्ध झालों आहोंत आणि सत्याच्या दिशेने अधिक प्रगत झालों आहों असेंच त्या दोघांनाहि आढळून येईल. आणि अखेरीस, जें ज्ञान देश आणि काल यांच्या शिवेंतच कोंडून आहे तें त्या देशकालातीत ज्ञानाशीं— जिथवर मन आणि इंद्रियें पोहोचूं शकत नाहीत त्या निरपेक्ष सत्य, पूर्ण, अनंत, एकमेवाद्वितीयाशीं मीलन पावून त्याच्याशीं एक होऊन जाईल.

---

# मानवाचें सत्य स्वरूप

( लंडन येथे दिलेलें व्याख्यान )

माणूस कसा जळूसारखा ह्या इंद्रियगोचर जगाला चिकटून असतो. त्यांतील इंद्रियभोग्य नाना वस्तूंवर तो इतका आसक्त असतो की कांही झालें तरी तो त्या सोडूं इच्छीत नाही. पण ज्यांत तो रात्रंदिवस वावरत असतो तें हें बाह्य जग माणसाला कितीहि खरें, कितीहि सारवान, कितीहि भरीव वाटत असलें तरी व्यक्तीच्या आणि त्याचप्रमाणे राष्ट्राच्या आयुष्यांत असा एक समय हटकून येतो की ज्या वेळीं अनिच्छेने का होईना पण त्यांना विचारावेसें वाटतें की 'हें सारें खरें आहे ना?' आपलीं इंद्रियें आपल्याला फसवीत तर नसतील ना असा प्रश्नहि ज्याच्या मनाला कधी चाटूनदेखील जात नाही, ज्याचा प्रत्येक क्षण कोणत्या ना कोणत्या तरी इंद्रियोपभोगांत खर्ची पडत असतो अशाहि माणसाला मरावें लागतेंच आणि त्या वेळीं त्यालाहि अपरिहार्यपणें वाटतेंच-- 'हें सगळें काय होतें? हें सारें खरें आहे का?' ह्या प्रश्नानेच धर्माची सुरुवात होते आणि त्या प्रश्नाचें उत्तर मिळालें की धर्माचें काम संपतें. जिथे इतिहास पांगुळतो अशा अत्यंत प्राचीन काळींहि, त्या गूढ पौराणिक युगांतहि, सभ्यतेच्या अंधुक उषःकालींहि ह्याच प्रश्न विचारला गेलेला आढळून येतो-- "मृत्यूनंतर माणसाचें काय होतें? हें सारें-- हें जग खरें आहे का?"

उपनिषदांपैकी अत्यंत काव्यमय अशा कठ नामक उपनिषदाचा आरंभच ह्या प्रश्नाने होतो-- "मनुष्य मेला म्हणजे त्याच्यासंबंधी मतभेद उत्पन्न होतो. एक पक्ष म्हणतो की तो आता अगदी कायमचा नाहीसा झाला आहे तर दुसरा पक्ष आग्रहाने प्रतिपादन करीत असतो की तसें नाही, तो अजूनहि अस्तित्वांत आहे. यांपैकी कोणता पक्ष खरा?" ह्या प्रश्नाला निरनिराळीं उत्तरें दिलीं गेलीं आहेत. जगांतील अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि धर्म यांवरील सारे ग्रंथ वस्तुतः ह्याच प्रश्नाच्या निरनिराळ्या

उत्तरांनी भरले आहेत. त्याचबरोबर, अशान्त, व्याकुळ चित्ताने विचारलेल्या 'मृत्यूनंतर काय? ह्या जगापलीकडे काय आहे? सत्य काय आहे?' या प्रश्नांना उडवून देण्याचे, दडपून टाकण्याचे प्रयत्नहि कांही कमी झाले नाहीत. परंतु, जगांत जोंवर मृत्यु राहील तोंवर हा प्रश्न दडपून टाकण्याचे हे सगळे उपरे प्रयत्न सदा विफळच ठरतील. ह्या जगाच्या पलीकडे काय आहे याची फिकीर करण्याच्या फंदांत न पडतां आमच्या सगळ्या आशा आणि आकांक्षा आम्ही जें समोर दिसतें त्यांच्यावरच खिळवून ठेवूं अशी वल्गना माणसाने खुशाल करावी, या इंद्रियगोचर जगापलीकडील कशाचाहि विचार मनांत येऊं न देण्याचा चंग त्याने खुशाल बांधावा, आणि बाह्य जगांतील प्रत्येक गोष्ट कदाचित् त्याला ह्या शिवारांतच गुंग राहण्यास मदतहि करील. समोर आहे त्याच्या पलीकडे आमची दृष्टि फैलूं नये यासाठी सारें जग खुशाल आपलें सामर्थ्य एकवटून झटत राहो. पण काय! जोंपर्यंत मानवाला मरण येत राहणार आहे तोंपर्यंत हा प्रश्नहि पुन्हापुन्हा विचारला जाणार आहे की, "ज्यांच्याइतकें खरें आम्हांला आणखी कांहीच वाटत नाही, ज्यांच्याइतकें सार आम्हांला आणखी कशांतच दिसत नाही त्या ह्या आम्ही कवटाळून असलेल्या साऱ्या वस्तूंचा शेवट अखेर मृत्युच ना?" मृत्यु! सारें जग एका क्षणांत लोपून नाहीसें होतें! एखाद्या डोंगरकड्यावर उभें राहून समोर आ फाडून पसरलेल्या भयाण, अथांग दरींत ओणवून बघतांना व्हावी तशी मनाची स्थिति मृत्युसमयीं होते— कितीहि कणखर असलें तरी तें मागे सरून विचारतेंच— "हें सारें— हें जग खरें कां?" एका बळवंत मनाच्या सगळ्या शक्ति एकवटून आयुष्यभर हळूहळू उभारलेले आशेचे सारे मनोरे एका निमिषांत कोसळून पार जमीनदोस्त होऊन जातात. "ते खरे असतात का?" ह्या प्रश्नाला उत्तर मिळालेंच पाहिजे. काळ कधीच त्या प्रश्नाची धार बोथट करूं शकणार नाही, उलट जसजसा काळ लोटेल तसतसा तो प्रश्न अधिकच धारदार होत जाईल.

आणि यानंतर म्हणजे सुखी होण्याची मानवाची ती इच्छा! सुखी होण्याच्या लालसेने आपण जगामधील प्रत्येक वस्तूच्या मागे धावत असतों, ह्या इंद्रियभोग्य बाह्य जगांत वेड्यासारखें सैरावैरा

पळत असतों. लाभत असलेल्या यशाची नशा चढलेल्या एखाद्या तरुणाला विचारा, हें जग खरें आहे असेंच तो ठासून सांगेल. त्याला खरोखरच तसें वाटत असतें. पण, भाग्य आपल्याला कसें सारखें चकवीत आलें आहे ह्याचा उमज पडल्यावर, म्हातारपणीं, कदाचित् तेच राजेश्री शून्याकडे बघत सुस्कारे टाकीत म्हणतील की, 'आयुष्य म्हणजे नुसता दैवाचा खेळ आहे बघा!' त्याला अखेर कळून येतें की वासना तृप्त होत नसतात. तो कुणीकडेहि जावो, त्याच्या समोर एक चिरेबंदी भिंत उभी राहते–– तिच्या पलीकडे जाणें त्याला शक्य नसतें. इंद्रियांनी घेतलेल्या प्रत्येक भोगाची प्रतिक्रिया ही ठेवलेलीच आहे. सारेंकांही क्षणभंगुर आहे. उपभोग, दुःख, विलास, संपत्ति, सत्ता, दारिद्र्य–– सारेंचकांही, नव्हे, खुद्द जीवन देखील क्षणभंगुर आहे.

ह्यांतून सुटण्याचे दोन मार्ग मनुष्यजातीला मोकळे आहेत. पैकी पहिला म्हणजे शून्यवाद्यांसारखें मानणें की कशांतच कांही अर्थ नाही, सारेंच शून्य आहे, आपल्याला कांहीच कळत नाही, भविष्यकाळाविषयी म्हणा की भूतकाळाविषयी म्हणा आपल्याला कधीहि कांहीहि कळणें शक्य नाही, इतकेंच काय पण वर्तमानकाळाविषयीहि आपल्याला कधी कांही कळणें शक्य नाही. कारण आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे की जो भूतकाळ आणि भविष्यकाळ हे दोन्ही नाकबूल करून फक्त वर्तमानकाळच कवटाळूं इच्छितो तो शुद्ध वेडा म्हणावा. तें शक्य असेल तर मग आई आणि बाप नाकबूल करून त्यांचें मूल मात्र अस्तित्वांत आहे असेंहि कां बरें म्हणतां येऊं नये ? हें देखील तितकेंच तर्कसंगत ठरेल. भूतकाळ आणि भविष्यकाळ नाकबूल केल्यास वर्तमानकाळहि त्याबरोबरच अपरिहार्यपणें नाकबूल केला जातोच. असो तर, हा झाला शून्यवाद्यांचा पक्ष. परंतु मीं अजून असा एकहि इसम पाहिला नाही की जो क्षणभरासाठी का होईना पण खराखुरा शून्यवादी बनूं शकेल. वायफळ बडबड करणें अर्थातच फार सोपें आहे. उचलली जीभ आणि लावली टाळूला !

ह्याउलट, हा प्रश्न सोडविण्याचा यत्न करणें, खरें काय हें जाणून घेणें, ह्या सतत बदलत्या आणि नश्वर जगांत सत्य काय आहे हें शोधून काढणें, हा झाला दुसरा मार्ग. आपल्या या देहांत––

भौतिक परमाणूंच्या या समुदायांत सत्य म्हणून कांही आहे काय? मानवजातीच्या उभ्या इतिहासांत सदा हाच शोध चालत आल्याचें आढळून येईल. अत्यंत प्राचीन काळीं मानवाला पुष्कळदा ह्या सत्याचें ओझरतें दर्शन घडल्याचें दिसून येतें. दिसून येतें की, त्या तेवढ्या प्राचीन काळीं सुद्धा मानवाला ह्या देहाच्या अमळ पलीकडे जाऊन असें कांहीतरी गवसलें होतें की जें ह्या बाह्य देहाहून वेगळें आणि तरीहि पुष्कळसें त्याच्याचसारखें, त्याच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ, अधिक पूर्ण असून ह्या बाह्य, स्थूल देहाचा नाश झाला तरी नष्ट होत नाही. मृतशरीर दग्ध करणाऱ्या अग्निदेवाला उद्देशून ऋग्वेदांतील सूक्तांत पुढील मंत्र आढळतो–"ने, अग्ने, त्याला आपल्या हातांनी हळुवारपणे ने–– त्याला सर्वांगसुंदर, ज्योतिर्मय तनु प्रदान कर, आणि जिथे शोक नाही, जिथे त्याला फिरून मृत्यु येणार नाही अशा पितृलोकीं त्याला ने." हीच कल्पना प्रत्येक धर्मांत असल्याचें तुम्हांला दिसून येईल. आणि हिच्याचबरोबर आणखीहि एक कल्पना तुम्हांला सर्वच धर्मांमध्ये आढळून येईल. ही गोष्ट अत्यंत सूचक म्हणावी लागेल की एकूणएक सर्व धर्म अगदी निरपवादपणें प्रतिपादन करतात की मनुष्य जें कांही होता त्यापासून तो खाली आला आहे–– त्याचा अधःपात झाला आहे, त्याच्या मूळ स्वरूपापासून त्याची च्युति झाली आहे; मग हें सत्य ते पौराणिक कथेचा पेहराव देऊन पुढे ठेवोत, की तत्त्वज्ञानाच्या रेखीव भाषेत सांगोत, की सुंदर काव्यांतून व्यक्त करोत. प्रत्येक धर्मग्रंथांत आणि प्रत्येक पुराणांत हेंच एक सांगितल्याचें आढळून येतें की, मानव आज जें आहे तें, तो जें होता त्याचें भ्रष्ट स्वरूप होय. यहुदी धर्मग्रंथांतील ––जुन्या बायबलांतील––ॲडमच्या अधःपतनाच्या कथेचें सार तरी हेंच आहे. हिंदूंच्या धर्मग्रंथांमध्ये हेंच पुनःपुनः प्रतिपादिलें गेलें आहे; त्यांचें सत्ययुगाचें स्वप्न ह्याचेंच निदर्शक आहे,––त्या सत्ययुगांत म्हणे स्वतःची तशी इच्छा असल्याखेरीज कुणीहि मरत नसतो, लोक आपल्या मर्जीप्रमाणे वाटेल तितके दिवस आपलें शरीर टिकवून ठेवूं शकतात, आणि सगळ्यांचीं मनें पवित्र आणि बलिष्ठ असतात. हिंदूंच्या मतें असें सत्ययुग पूर्वी होतें–– त्या वेळीं जगांत पाप किंवा दुःख अजीबात

नव्हतें, आणि आपलें आजचें कलियुग ही त्या आदर्श युगाची भ्रष्ट दशा होय. ह्याबरोबरच सर्व धर्मग्रंथांतून आपल्याला जलप्रलयाची कथाहि आढळून येते. चालू युग हें पूर्वीच्या एका युगाचें अवनत, भ्रष्ट रूप होय असें प्रत्येक धर्माचें मत असल्याचें त्या सर्वांतील ह्या कथेवरूनच स्पष्ट दिसून येतें. जग अधिकाधिक अध:पतित, अधिकाधिक भ्रष्ट होऊं लागलें, अखेर जलप्रलय होऊन मानवजातीचा बराच भाग त्यांत नाहीसा झाला, आणि मग फिरून चढती कळा शुरू झाली. तें परत हळूहळू आपल्या त्या आधीच्या पवित्र अवस्थेप्रत चाललें आहे. बायबलाच्या जुन्या भागांतील (Old Testament मधील) जलप्रलयाची कथा तुम्हां सर्वांना अवगत असेलच. अशीच कथा जुन्या बाबिलोनी, मिसरी, चिनी आणि हिंदु लोकांतहि प्रचलित होती. हिंदूंच्या ग्रंथान्तरीं ही कथा पुढील स्वरूपांत आढळते : प्राचीन काळीं मनु नांवाचे एक थोर ऋषि होते. ते एके समयीं गंगातटाकीं संध्यावंदनादि आन्हिक करीत असतांना एक लहान मासा त्यांच्या जवळ येऊन 'मला आश्रय द्या' असें म्हणता झाला. समोर एक पाण्याचें भांडें होतें, मनूंनी त्या माशाला त्या भांड्यांत ठेवून विचारलें की, "तुला काय हवें ?" त्यावर, "माझ्यापरीस एक मोठा मासा माझा पाठलाग करीत असून मला संरक्षण हवें आहे" असें त्या माशाने उत्तर दिलें. मनूंनी मग त्या लहानशा माशाला आपल्या घरीं नेलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं बघतात तर तो मासा वाढून, त्याला ज्या भांड्यांत ठेवलें होतें त्या भांड्याएवढा मोठा झाला असल्याचें मनूंना आढळून आलें. मनूंना समोर बघून तो मासा त्यांना म्हणाला, "आता या भांड्यांत राहणें मला मुळीच शक्य नाही." म्हणून मग मनूंनी त्याला एका हौदांत ठेवलें. एका दिवसांत तो त्या हौदाएवढा झाला आणि म्हणाला की "यापुढे या हौदांत राहणें मला शक्य नाही." त्यावर त्याला नदींत नेऊन ठेवणें मनूंना भाग पडलें. दुसरा दिवस उजाडेपर्यंत वाढत वाढत त्या माशाने ती नदीहि व्यापून टाकली. अखेर मनूंनी त्याला समुद्रांत ठेवलें. तेव्हा तो मासा मनूंना म्हणाला, "मनो, मी ह्या विश्वाचा सृष्टिकर्ता आहें. मी हें मत्स्यरूप घेऊन तुझ्याकडे आलों तें तुला बजावण्यासाठी की मी जगभर जलप्रलय करणार आहें. तूं एक नौका

तयार कर, तींत प्रत्येक प्राण्याचें एकेक जोडपें ठेव आणि स्वतःच्या कुटुंबासह तूंहि तींत जाऊन बैस. मग, सारें जग पाण्यानें तुडुंब भरून गेलें असतां त्या पाण्यांतून माझें शिंग बाहेर येईल. त्या शिंगाला तूं आपली नौका बांध आणि तो प्रलयपूर ओसरल्यावर तूं नौकेंतून उतरून पृथ्वीवर वस्ती कर." मग तदनुसार जगांत जलप्रलय झाला, आणि मनूंनी मत्स्यभगवानाच्या आदेशानुसार आपलें स्वतःचें कुटुंब प्रत्येक जातीच्या प्राण्यांचें एकेक जोडपें आणि प्रत्येक उद्भिजाचीं बीजें त्यांतून वांचविलीं. तो जलप्रलय संपल्यानंतर मनु नौकेंतून उतरून जमिनीवर वस्ती करते झाले. आपण सर्वजण 'मनूं'ची संतति, 'मनूं'चे वंशज असल्यामुळेच आपल्याला 'मानव' असें म्हटलें जातें.

आता, मानवी भाषा म्हणजे आंतील सत्य बाहेर व्यक्त करण्याचा प्रयत्न होय. ह्या सर्व कथा वाचून माझी अशी पक्की खात्री झाली आहे की, बोबडे बोलच ज्याची भाषा आहे अशा बालकाप्रमाणे बाल्य अवस्थेंत असलेला मानव ह्या कथांमधून अत्युच्च तत्त्वज्ञान व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे; फक्त, तसें करण्याचें योग्य साधन वा माध्यम त्या बालमानवापाशी नव्हतें, इतकेंच. परंतु म्हणून काय झालें ? सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ आणि बालक यांच्या भाषेंत भेद आहे तो केवळ प्रमाणाचा, प्रकाराचा नव्हे. जिला तुम्ही अगदी अचूक, व्यवस्थित, गणितासारखी कांटेकोर अशी आजकालची भाषा म्हणतां तींत, आणि जुन्या काळच्या लोकांच्या अस्फुट, गूढ, पौराणिक भाषेंत भेद आहे तो फक्त अभिव्यक्तिसामर्थ्याच्या प्रमाणाचा. ह्या सर्व कथांच्या मागे एक महान् सत्य आहे; प्राचीन लोक तें जणु ह्या कथांमधून व्यक्त करण्याची धडपड करीत आहेत. पुष्कळदा ह्या असल्या पौराणिक कथांच्या मागे अमोल सत्यें दडलेलीं असतात, आणि, अत्यंत खेदाने म्हणावें लागतें की, आम्हां आधुनिकांच्या गोंडस, घासूनपुसून चक्क अशा शब्दावडंबरामागे पुष्कळदा नुसत्या कचऱ्याखेरीज आणखी कांहीसुद्धा नसतें. म्हणून, एखादी गोष्ट पौराणिक कथेच्या रूपांत मांडली आहे किंवा आजच्या श्रीयुत वा श्रीमती अमुक अमुक यांच्या कल्पनांशीं जुळत नाही एवढ्याच कारणाने आपण ती धुत्कारण्याची कांहीच गरज नाही. अमुक अमुक द्रष्ट्याने सांगितल्या आहेत एवढ्याचसाठी

सगळे धर्म आपल्याला ह्या पौराणिक कथांवर विश्वास ठेवायला शिकवितात म्हणून धर्मांना हसणाऱ्या लोकांनी ह्या आजच्या आधुनिकांना जास्तच हसायला हवें. आजच्या काळांत जर एखाद्याने मोझेसचें, बुद्धाचें किंवा ख्रिस्ताचें वचन उद्धृत केलें तर गांवढळ म्हणून लोक त्याला हसतात, पण तेंच त्याला हक्स्ले, टिंडॉल किंवा डार्विनचें नांव उच्चारूं द्या, लोकांना तें एकदम पटेल ! 'हक्स्ले असें म्हणतो'— बस्, पुष्कळांना एवढेंच पुरें ! अहाहा, अंधविश्वासाचा केवढा अभाव हा ! पूर्वी होता धार्मिक अंधविश्वास, आता आहे वैज्ञानिक अंधविश्वास. फरक फक्त इतकाच की, त्या जुन्या अंधविश्वासांतून जीवनदायी आध्यात्मिक तथ्यें लाभत असत तर आजच्या आमच्या आधुनिक अंधविश्वासांतून निष्पन्न होतो केवळ काम आणि लोभ. तो अंधविश्वास होता ईश्वराची पूजा, हा अंधविश्वास आहे कःपदार्थ धनाची, नांवलौकिकाची किंवा सत्तेची पूजा. त्या दोहोंत बरीक हा फरक आहे खरा.

असो. आपण आपल्या त्या पौराणिक गोष्टीकडे वळूं या. ह्या सर्व कथांमधे जी एक कल्पना प्रामुख्याने अनुस्यूत असलेली आपल्याला आढळून येते ती ही की माणूस आधी जें कांही होता त्यापासून ढळून तो आता अवनत झालेला आहे. परंतु, वर्तमान काळाकडे वळल्यास, आधुनिक संशोधनाने हें मत अजीबात खोडून काढलें असल्याचें दिसतें. क्रमविकासवादी ह्या म्हणण्याच्या अगदी विरुद्ध असलेले आढळून येतात. क्रमविकासवाद्यांच्या मतानुसार माणूस हा क्षुद्र, मांसल अशा एका विशिष्ट जिवाणूचा (mollusc चा) क्रमविकास होत होत निर्माण झाला आहे, आणि म्हणून वरील पौराणिक गोष्ट जें प्रतिपादन करते तें खरें असणें शक्य नाही. ह्या दोन परस्परविरोधी मतांचा समेट करण्याचें सामर्थ्य भारताच्या पुराणांमधे आहे. भारतीय पुराणांमधे कल्पांविषयी एक सिद्धान्त आहे. त्या कल्पसिद्धान्तानुसार कोणतीहि प्रगति ही लाटेसारखी होत असते. लाट उठून वर जाते, खाली येते, फिरून वर जाते, फिरून खाली येते, पुन्हा वर जाते— अशा क्रमाने ती पुढे सरत असते. हिला चक्राकार गति म्हणतां येईल. आधुनिक संशोधनानुसारहि हें अगदी खरें आहे की माणूस हा कशाचा तरी केवळ

क्रमविकास होऊनच निर्माण झाला असणें शक्य नाही. क्रमविकास म्हटला की त्याआधी क्रमसंकोचाची प्रक्रिया आलीच. आधुनिक वैज्ञानिक तुम्हांला हेंच सांगेल की, एखाद्या यंत्रांत तुम्ही आधी जेवढी शक्ति प्रविष्ट कराल तेवढ्याच प्रमाणांत नंतर त्या यंत्राकडून तुम्हांला शक्ति मिळूं शकेल. 'कांही नाही'मधून (असत् मधून) 'कांहीतरी' (सत्) निर्माण होणें कदापि शक्य नाही. पूर्ण मानव, बुद्धमानव, ख्रिस्तमानव जर एका विशिष्ट, क्षुद्र, मांसल जिवाणूचा क्रमविकास असेल तर मग तो पूर्ण मानव, तो बुद्ध, तो ख्रिस्त क्रमसंकुचित होऊन आधीचाच त्या जिवाणूंत प्रविष्ट झालेला असावयाला हवा. तसें नसेल तर मग त्यांचें हें लोकोत्तर विभूतिमत्त्व आलेंच कुठून ? 'कांही नाहीं'तून 'कांहीतरी' उपजूंच शकत नाही. त्या जुन्या धर्मग्रंथांचा आधुनिक ज्ञानाशीं अशा तऱ्हेने मेळ बसविणें ह्या कल्पसिद्धान्ताच्या मदतीने आपल्याला शक्य आहे. निरनिराळ्या अवस्थांमधून हळूहळू व्यक्त होत होत जी शक्ति अखेर पूर्ण मानवाच्या रूपाने प्रकट होते ती 'कांही नाही' मधून म्हणजेच शून्यांतून वा असतांतून आलेली असणें शक्य नाही. ती कुठेतरी होतीच होती. आणि मागे जात जात तुम्ही जर एखाद्या विशिष्ट जंतु-जिवाणूलाच ह्या साऱ्याचा प्रारंभ ठरवीत असाल तर त्या जंतु-जिवाणूंत ती शक्ति कशी ना कशी तरी समाविष्ट असलीच पाहिजे.

अलीकडे ज्या एका प्रश्नावर चांगलेंच रण माजत आहे तो असा की, आपण ज्याला देह म्हणतों तो पंचभूतांचा समुदायच आत्मा नामक वा विचार नामक शक्तीला जन्म देत असतो की विचारच ह्या देहाला घडवीत असतो ? जगांतील सर्व धर्म अर्थातच असें प्रतिपादन करतात की विचार नामक शक्तिच देह घडवीत असते, देह कधी विचाराचें कारण असूं शकत नाही. परंतु, ( Comte सारख्या ) अनेक आधुनिक तत्त्वज्ञांच्या मतें, आपण ज्याला विचार म्हणतों तो म्हणजे केवळ देह नामक यंत्राच्या निरनिराळ्या भागांच्या विशिष्ट जोडणींतूनच निर्माण होत असतो. पण, ह्या आधुनिक तत्त्वज्ञांचें म्हणणें ग्राह्य करून, आत्मा म्हणा की मन म्हणा की आणखी काय वाटेल तें म्हणा, ह्या देहयंत्राचें कार्य आहे असें मानलें, तें आपला देह आणि मेंदू बनविणाऱ्या जड

परमाणूंच्या रासायनिक वा भौतिक संयोगांतून निर्माण होत असतें असें मानलें तर मूळ प्रश्न तसाच राहून जातो. हें शरीर कोण घडवितो ? कोणती शक्ति ह्या जड, भौतिक परमाणूंना शरीराचा आकार देते ? भोवतालच्या जडराशींतून आवश्यक ती सामग्री घेऊन तुमचें शरीर एकप्रकारचें तर माझें दुसऱ्याच प्रकारचें घडविणारी शक्ति कोणती ? ही सारी अनंत विविधता, हे इतके भेद कशानें होतात ? आत्मा हा शरीरांतील भौतिक परमाणूंच्या संयोगांतून निर्माण होतो असें म्हणणें म्हणजे बाप मुलापासून जन्मतो असेंच म्हणण्यासारखें आहे ! जड परमाणूंचा हा संयोगच कसा झाला ! कुणीं—कोणत्या शक्तीनें तो घडवून आणला ? तुम्ही जर म्हणाल की दुसऱ्या कुण्या एका शक्तीनें हा संयोग घडवून आणला आहे, आणि, जो आत्मा आता एका विशिष्ट जडद्रव्यराशीशीं संयुक्त झालेला दिसत आहे तो त्याच जड परमाणूंच्या संयोगाचें फल होय, तर तें कांही आमच्या प्रश्नाचें उत्तर नव्हे. प्रचलित इतर सिद्धान्तांशीं विरोध न करतां, सर्वच नाही तरी निदान अधिकांश घटनांची जो सुसंगत उपपत्ति लावून दाखवितो तोच सिद्धान्त आपण ग्रहण करावयास हवा. सबब, जडद्रव्य घेऊन त्यांतून शरीर घडविणारी शक्ति आणि त्या शरीरांतून व्यक्त होणारी शक्ति ह्या दोन्ही एकच होत असें म्हणणेंच तर्कास अधिक धरून होईल. आणि म्हणून, जी विचाररूपी शक्ति वा मनःशक्ति आपल्या शरीरांत व्यक्त होत आहे ती केवळ तें शरीर घडविणाऱ्या जड परमाणूंच्या संयोगामधून उत्पन्न झाली असून तिला स्वतंत्र अस्तित्व नाही असें म्हणण्यांत कांहीच अर्थ नाही. शिवाय, शक्ति कधी जडामधून उत्पन्न होऊं शकत नसते. उलट असें सप्रमाण सिद्ध करून दाखविणें शक्य आहे की आपण ज्याला जड म्हणतों त्याला मुळी अस्तित्वच नाही. जड ही शक्तीचीच केवळ एक विशिष्ट अवस्था होय, इतकेंच. घनत्व, कठीणपणा, भरीवपणा इत्यादि जडाचे सर्वच गुणधर्म गतीमुळे निर्माण होत असतात असें सिद्ध करतां येईल. द्रव पदार्थांना खूप जोरानें भोवऱ्यासारखी गति दिली तर त्यांत घन पदार्थांची शक्ति निर्माण होते. हवेला जर प्रचंड वादळांतल्यासारखी भोवऱ्याची गति दिली तर ती घन पदार्थासारखी होऊन घन पदार्थांना धडक देऊन त्यांना तोडूं-फोडूं-

वाकवूं शकते. कोळयाच्या जाळयाच्या एका तंतूला जर अनंत वेगानें गतिमान करतां आलें तर तो लोखंडी साखळीइतका पक्का होऊन एखादें झाड देखील छेदून जाऊं शकेल. या दृष्टीने बघतां, आपण ज्याला जड म्हणतों तें अस्तित्वांतच नाही असें सिद्ध करणें त्या मानानें सोपें जाईल. तसें ह्याच्या विरुद्ध पक्षाविषयी मात्र म्हणतां यावयाचें नाही.

आमच्या शरीरामधे ही जी शक्ति व्यक्त होत असते ती काय आहे ? एवढें मात्र खरें की, ती शक्ति कांहीहि असो, ती जणु जड परमाणूंना घेऊन त्यांतून मनुष्यशरीरादि आकृति घडवीत आहे. दुसरें कुणीहि येऊन हें तुमचें-माझें शरीर घडवीत नाही. माझ्याकरता माझ्या-ऐवजी आणखी कुणी जेवला असें कधी झालें नाही ! माझें मलाच अन्न खावें लागतें, मलाच तें पचवावें लागतें आणि त्यांतूनच माझें रक्त, माझें मांस, माझीं हाडें वगैरे सारें माझें मलाच तयार करावें लागतें. ही गूढ, अद्‌भुत शक्ति काय आहे ?

भूत-भविष्यासंबंधीचा विचार पुष्कळांना भीतिदायक वाटतो. पुष्कळांना तें नुसतें अनुमान करीत बसणें वाटतें. म्हणून आपण आता वर्तमानाचाच विचार करूं. प्रश्न आहे-- आपल्यामधून कार्य करणारी ही शक्ति काय आहे ? आपल्याला माहीतच आहे की प्राचीन काळच्या सर्वच धर्मग्रंथांतून ही शक्ति म्हणजे आपल्या शरीरांत वसणारें एक ज्योतिर्मय अंतःशरीर वा सूक्ष्म शरीर असल्याचें मानलें गेलें आहे; हें ज्योतिर्मय अंतःशरीर वा सूक्ष्म शरीर रूपाने बाह्य, स्थूल शरीरा-सारखेंच असून, स्थूल शरीराचें पतन झालें तरी तें सूक्ष्म शरीर मात्र तसेंच टिकतें असें त्याचें वर्णन त्या ग्रंथान्तरीं आढळतें. तथापि नंतरच्या काळांत याबाबत यापेक्षा उच्च कल्पना उदयास आलेली दिसते. ती अशी की हें ज्योतिर्मय अंतःशरीर म्हणजे कांही ती मूलभूत शक्ति वा सत्ता नव्हे. ज्या कशाला म्हणून रूप वा आकार आहे तें तें जड परमाणूंच्या संयोगानेच निर्माण झालें असलें पाहिजे, आणि म्हणून तो संयोग घडवून आणणारें वेगळें कांहीतरी त्यामागे विद्यमान असावयासच हवें. जर आपलें हें बाह्य, स्थूल शरीर घडवावयास त्याहून वेगळ्या अशा कशाची तरी आवश्यकता असेल तर मग त्याच कारणास्तव तें

ज्योतिर्मय अंतःशरीर वा सूक्ष्म शरीर घडविण्यासाठी त्याहून वेगळें असें कांहीतरी आवश्यक असणारच. त्या 'कांहीतरी'लाच आमच्या संस्कृत भाषेंत आत्मा म्हटलें आहे. इंग्रजींत त्याला म्हणतात 'सोल' (Soul). त्यांना कळून आलें की हा आत्माच ह्या ज्योतिर्मय अंतःशरीरामधून म्हणजेच सूक्ष्म शरीरामधून आपल्या बाह्य, स्थूल शरीरावर कार्य करीत असतो. हें ज्योतिर्मय अंतःशरीर वा सूक्ष्म शरीर मनाचें वसतिस्थान मानलें जाऊन आत्मा त्याच्या पलीकडे आहे असें ठरलें. हा आत्मा म्हणजे मनहि नव्हे; तो मनालाहि चालवितो, आणि मनाच्या द्वारा स्थूल शरीराला चालवितो. तुम्हांला एक आत्मा आहे, मला निराळा आत्मा आहे, आपल्यापैकी प्रत्येकालाच वेगवेगळा आत्मा आहे आणि एकेक वेगवेगळें सूक्ष्म शरीर आहे, आणि त्यामधून आपण स्थूल, बाह्य शरीरावर कार्य करीत असतों. येथवर मजल गाठल्यानंतर मग ह्या आत्म्यासंबंधी, या आत्म्याचें स्वरूप कसें आहे यासंबंधी प्रश्न विचारले गेले. शरीरहि नाही, मनहि नाही असा हा मानवाचा आत्मा मग आहे तरी काय? खूप उलटसुलट चर्चा झाली. अनुमानें केलीं गेलीं. तऱ्हतऱ्हेचीं तात्त्विक मतें अस्तित्वांत आलीं. ह्या साऱ्यांतून आत्म्यासंबंधी निष्पन्न झालेले कांही सिद्धान्त मी आता तुम्हांला सांगण्याचा प्रयत्न करतों.

ह्या निरनिराळ्या सर्व तत्त्वज्ञानांचें ह्या एका मुद्द्यावर एकमत आहे की, एरवी या आत्म्याचें स्वरूप कसेंहि का असेना, त्याला रूपहि नाही वा आकारहि नाही, आणि जिला रूप वा आकार नसतो ती गोष्ट सर्वव्यापी असलीच पाहिजे. देश आणि काल हे दोन्ही मनांतच विद्यमान असतात. कालाखेरीज कार्यकारणभाव असूंच शकत नाही. आधी हें, त्याच्यानंतर तें, त्याच्यानंतर तें अशा क्रमाच्या कल्पनेखेरीज कार्यकारणभाव असूंच शकत नाही. सारांश, देश, काल आणि कार्यकारण हीं तिन्हीं मनांतच असतात, आणि ज्याअर्थी आत्मा हा मनाच्या पलीकडे असून रूपरहित म्हणजे निराकार आहे त्याअर्थी तो देश, काल आणि कार्यकारण ह्यांच्या पलीकडे असला पाहिजे. आणि याप्रमाणे तो जर देश-काल-निमित्तांच्या पलीकडे आहे तर तो अनंत असलाच पाहिजे. आणि येथेच आमच्या तत्त्वज्ञानांतील सर्वांत श्रेष्ठ

सिद्धान्त येतो. तो असा की, अनंत कधी दोन असूं शकणार नाहीत. आत्मा जर अनंत असेल तर मग केवळ एकच आत्मा असूं शकतो. आणि तुम्हांला एक आत्मा आहे, मला निराळा आत्मा आहे वगैरे वगैरे ज्या कांही आत्म्यांच्या अनेकत्वाविषयी कल्पना आहेत त्या खऱ्या असणें शक्य नाही. आणि म्हणून 'खरा मानव' हा एकमेवाद्वितीय, अनंत, सर्वव्यापी आत्मा होय-- तेंच 'मानवाचें सत्य स्वरूप' होय. आणि हा वरवर खरा भासणारा मनुष्य, हा व्यावहारिक जीव त्या खऱ्या मानवाची एक सीमित वा नाम-रूपांच्या उपाधींमुळे ओढविलेली अवस्था होय. या अर्थाने ती पौराणिक कथा खरीच ठरते की, हा वरवरचा मनुष्य, हा व्यावहारिक जीव एरवी कितीहि मोठा असला तरी वस्तुतः तो त्या पलीकडील खऱ्या मानवाचें केवळ एक अस्पष्ट प्रतिबिंबच होय. तो खरा मानव, तो आत्मा कार्य आणि कारण ह्यांच्या पलीकडे असल्यामुळे, देश आणि काल यांनी बांधलेला नसल्यामुळे स्वाधीन, म्हणजेच स्वरूपतः मुक्त असला पाहिजे. बद्ध तो कधीच नव्हता, त्याला बांधील असें काय आहे ? हें त्या आत्म्याचें प्रतिबिंब, हा वरवरचा मनुष्य, हा व्यावहारिक जीव मात्र देश, काल आणि कार्य-कारणभाव यांनी जखडलेला आहे, म्हणजेच तो बद्ध आहे. किंवा आमच्या कांही तत्त्वज्ञांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे तो बद्ध आहेसा भासतो, परंतु खरोखर बद्ध मात्र नाही. आमच्या आत्म्यासबंधी हेंच सत्य आहे-- तो सर्वव्यापी आहे, तो चैतन्यस्वरूप आहे, तो अनत आहे. आम्ही स्वरूपतःच असें आहोंत, प्रयत्न करून आम्हांला तसें व्हावयाचें नाही. प्रत्येक आत्मा अनंत आहे, आणि म्हणून जन्म-मृत्यूचा प्रश्नच उद्भवूं शकत नाही. एकदा एका शाळेंत कित्येक लहान मुलां-मुलींची परीक्षा घेणें चाललें होतें. परीक्षक त्यांना अमळ कठीणच प्रश्न टाकीत होता. पैकी एक प्रश्न असा होता की "ही पृथ्वी पडत कां नाही ?" परीक्षकाला त्या पोरांकडून गुरुत्वाकर्षणासंबंधी उत्तर हवें होतें. बहुतेक मुलांना तर कांहीच उत्तर देतां आलें नाही. कांही चार-दोन मुलांनी अडखळत अडखळत पृथ्वी न पडण्याचें कारण गुरुत्वाकर्षण किंवा तसलेंच कांहीतरी होय असें गुळमुळीत, मोघम उत्तर दिलें. पण एका चुणचुणीत पोरीने एक उलट प्रश्न टाकून त्या परीक्षकाला उत्तर

दिलें ! तिने त्याला विचारलें, "पृथ्वी जी पडणार म्हणतां, ती कुठे बरें पडणार ?" खरेंच, पृथ्वी पडणार कुठे ! हा प्रश्नच मुळी चुकीचा, वेडगळपणाचा होता. पृथ्वी पडणार कुठे ? पृथ्वीच्या बाबतींत पडणें किंवा चढणें कांहीच नाही. अनंत अवकाशांत वर किंवा खाली म्हणून कांहीच नाही ! वर किंवा खाली हे केवळ कशाच्यातरी अपेक्षेने योजावयाचे शब्द होत. वर-खालीपणा हा सापेक्ष असतो. अनंत जाणार कुठे आणि येणार तरी कुठून ? त्याने कुठून यायचें आणि कुणीकडे जायचें ?

असो तर, याप्रमाणे माणूस ज्या वेळीं गतकाळाचा किंवा भावी काळाचा विचार करण्याचें थांबवितो, आपला देह उत्पत्ति-विनाशशील आणि सीमाबद्ध आहे हें जाणून देहाभिमानाचा त्याग करूं शकतो त्या वेळीं तो एका उच्च पदीं आरूढ झालेला असतो. शरीर हा 'खरा माणूस' वा आत्मा नव्हे, मनहि आत्मा नव्हे, कारण त्यांचा ऱ्हास आणि वृद्धि होते. त्यांच्या पलीकडे असलेला आत्माच चिरंतन आहे, नित्य आहे, तोच शाश्वत आहे, फक्त तोच कायम राहणार आहे. शरीर आणि मन हीं सारखीं बदलत असतात, नव्हे, बदलांच्याच एका साखळीला आपण शरीर म्हणत असतों तर दुसऱ्या साखळीला मन म्हणत असतों. तीं एखाद्या नदीसारखीं आहेत--तिच्यांतलें पाणी सारखें वाहून जात असतें आणि तरीहि एका अखंडित प्रवाहाचा आभास निर्माण करीत असतें-- आपल्याला ती एकच नदी वाटत असते. आपल्या शरीरांतील प्रत्येक परमाणु सारखा बदलत आहे, परिणाम पावत आहे; कांही थोडे क्षण देखील कुणाचेंहि तेंच शरीर नसतें, आणि तरीहि आपण त्याला तेंच एकच शरीर समजत असतों. मनासंबंधीहि असेंच. ह्या क्षणीं तें सुखी असतें, दुसऱ्याच क्षणीं दुःखी होऊन जातें; ह्या क्षणीं सबळ तर पुढल्याच क्षणीं दुर्बळ बनून जातें; जणुकाय सतत बदलता भोवराच ! म्हणून तेंहि आत्मा असणें शक्य नाही, कारण आत्मा अनंत आहे. बदल फक्त सान्त, सीमाबद्ध वस्तूंतच होणें शक्य आहे. अनंत कशाहि प्रकारें बदलणें शक्य नाही, तसें म्हणणें वेडेपणाचें होय. एक सीमाबद्ध शरीर ह्या दृष्टीने मी इथून तिथे जाऊं शकेन, तुम्हीहि हलूं शकाल; या

विश्वांतील प्रत्येक परमाणुच सतत परिणाम पावत आहे, परंतु सगळेच्या सगळें विश्व म्हणजे एक सलग समष्टि अशा दृष्टीने बघितल्यास, विश्वाचा साकल्याने विचार केल्यास तें एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणें किंवा बदलणें शक्यच नाही. गति ही नेहमी सापेक्ष असते. हें टेबल आहे, मी ह्या टेबलाजवळून त्या तिथे जातों; म्हणजे, माझें जाणें ह्या टेबलाच्या अपेक्षेने होतें. कशाच्यातरी अपेक्षेने वा तुलनेनेच मी एका जागेहून दुसऱ्या जागीं जाऊं शकेन. ह्या विश्वांतील कोणताहि परमाणु दुसऱ्या एका परमाणूच्या अपेक्षेने वा तुलनेनेच इथून तिथे जाऊं शकेल, पण समस्त विश्व म्हणजे एकच एक एकसंध समष्टि मानल्यास कशाच्या बरें अपेक्षेने, कशाच्या बरें तुलनेने तें जाऊं-येऊं शकेल ? कारण मग ह्या विश्वसमष्टीखेरीज आणखी काय असणार की ज्याच्या अपेक्षेने, ज्याच्या तुलनेने तुम्ही ह्या विश्वसमष्टीची गति जाणूं शकाल ? म्हणून तो आत्मा--ती अनंत एकसंधता, ती अनंत एकता, तें 'एकमेवाद्वितीय' कधी बदलत नाही, कधी चळत नाही की ढळत नाही, तीच निरपेक्ष पारमार्थिक सत्ता होय, तोच 'खरा मानव' होय, तेंच 'मानवाचें सत्य स्वरूप' होय. आणि म्हणून आपलें खरें स्वरूप सर्वव्यापक आहे, सीमाबद्ध नाही. आपण म्हणजे सदा बदलते, छोटे छोटे सीमाबद्ध जीव आहोंत ही भावना कितीहि सोईची असली, कितीहि मजेदार वाटली तरी तो एक मुरलेला भ्रमच होय. तुम्ही सर्वव्यापी, अनंत पुरुष आहांत असें सांगितल्यास लोकांना भेडसावल्यासारखें वाटतें. पण तें सत्य आहे. तुम्ही सर्वांमधून कार्य करीत आहांत, सर्व पायांनी तुम्ही चालत असतां, सर्व ओठांनी तुम्ही बोलत असतां, सर्व हृदयांनी तुम्ही भावनांचा अनुभव घेत असतां.

लोकांना हें सांगितल्याने ते भयभीत होऊन जातात. ते तुम्हांला वारंवार विचारतील की मग त्यांचें व्यक्तित्व उरणारच नाही काय ? हे लोक व्यक्तित्व म्हणतात तरी कोणत्या वस्तूला कुणास ठाऊक. तें एकवार बघण्याची माझी इच्छा आहे. लहान मुलाला मिशा नसतात, मोठा झाल्यावर त्याला दाढीमिशी फुटते. त्या लहान पोराचें व्यक्तित्व वा 'मीपण' जर त्याच्या शरीरांतच सामावलेलें असतें तर मग मोठेपणीं दाढीमिशी येऊन त्या शरीरांत बदल झाल्याने तें नष्ट झालें असेंच

नाही का म्हणावें लागणार ? माझें व्यक्तित्व वा 'मीपण' जर शरीरांतच सामावलेलें असतें तर माझा एक डोळा वा हात नाहीसा झाल्याने माझें व्यक्तित्व वा माझें 'मीपण'हि नाहीसें होईल. असेंच असेल तर मग दारुड्याने दारू पिणें सोडलें न पाहिजे, कारण तसें केल्याने त्याचें 'मीपण' वा व्यक्तित्व नाहीसें व्हायचें ! चोराने चोऱ्या करणें सोडून कधी साव न बनलें पाहिजे, कारण तशाने त्याचें व्यक्तित्व नाहीसें होईल ! या व्यक्तित्व गमावण्याच्या भयाने मग कुणीहि आपल्या सवयी बदलूं नयेत ! सारा वेडेपणाचा बाजार ! व्यक्तित्व वा 'मीपण' हें अनंताखेरीज आणखी कशांतच नाही. न बदलणारी अशी फक्त तीच एक अवस्था आहे. बाकीचें सारेंकांही सारखें बदलत आहे, परिणाम पावत आहे, वाहून जात आहे. व्यक्तित्व वा 'मीपण' हें स्मृतींतहि असूं शकत नाही. समजा की डोक्याला जबरदस्त तडाखा लागून मला माझ्या पूर्वीच्या सगळ्या गोष्टींचा पार विसर पडून गेला आहे. व्यक्तित्व वा 'मीपण' जर स्मृतींतच असतें तर मग माझें व्यक्तित्व नाहीसें झालें, माझें 'मीपण' पूर्णपणें लोपलें असाच त्याचा अर्थ होईल. माझ्या लहानपणाचीं पहिलीं दोनतीन वर्षें मला मुळीच आठवत नाहीत. स्मृति आणि अस्तित्व जर एकच असतीं, आठवण्यावरच जर माझें असणेंपण अवलंबून असतें तर मग माझ्या लहानपणीचीं मला न आठवणारीं तीं दोन तीन वर्षें माझ्या आयुष्यांतून बादच झालींत म्हणावयाचीं ! तसें झाल्यास माझ्या आयुष्याचा जो जो भाग मला आठवत नाही तो तो भाग मी जगलोंच नाहीं असें होईल. व्यक्तित्वासंबंधीची वा 'मीपणा'संबंधीची ही धारणा फारच कोती म्हणावी लागेल.

आपण अद्यापि 'व्यक्ति' वा 'मी' नाहींच ! आपण व्यक्तित्वाच्या वा 'मीपणा'च्या लाभासाठी प्रयत्न करीत आहोंत, इतकेंच. तें अनंतच आपलें खरें व्यक्तित्व, आपलें खरें 'मीपण' आहे, तेंच मानवाचें सत्य स्वरूप आहे. ज्याचें जीवन ह्या साऱ्या विश्वांत व्यापून आहे तोच खरोखर जगत असतो. आणि, आपण जितकें जितकें आपलें जीवन लहान लहान, मर्यादित गोष्टींवर केंद्रित करीत असतों तितक्याच झपाट्याने आपण मृत्यूकडे जात असतों. जेवढा वेळ आपलीं जीवनें

विश्वांत व्यापून असतात, इतरांमधे व्यापून असतात तेवढाच वेळ आपण खऱ्या अर्थाने जिवंत असतों. हीं आपलीं लहानलहान जिणीं जगणें म्हणजे तर खरोखर मरणेंच होय. म्हणूनच आपल्याला मृत्यूचें भय पछाडत असतें. मृत्यूचें भय तेव्हाच जिंकतां येईल की जेव्हा माणसाला साक्षात्कार होईल की, जोंपर्यंत ह्या विश्वांत एकतरी जीवन विद्यमान आहे तोंपर्यंत मी जिवंत आहें. "मी सर्व वस्तूंत आहें, मी सर्व देहांमधे आहें, सर्व जीवनें माझींच आहेत, मीच हें विश्व आहें" असें ज्या वेळीं माणूस म्हणूं शकेल तेव्हाच तो अभय पावेल, 'अभीः' होऊन जाईल. सदा बदलत्या वस्तूंशीं जखडले असतां अमरत्वाच्या गोष्टी बोलणें म्हणजे वेडेपणाच होय. बदलत्या वस्तु अविनाशी असणें कसें शक्य आहे ? एक प्राचीन संस्कृत तत्त्वज्ञ म्हणतात की ज्याचे तुकडे पडत नाहीत वा जें बदलत नाही असें व्यक्तित्व वा 'मीपण' केवळ आत्म्यांतच शक्य आहे, कारण तो अनंत आहे. अनंताचे कधी भाग पडणें शक्य नाही, त्याचे कधी तुकडे पडणें शक्य नाही. तो अविभाज्य आहे, अखंड आहे. अनंत आत्मा हा नेहमी आहे तसाच असतो, तीच अखंड, एकरस, एकमेवाद्वितीय सत्ता होय, आणि तेंच मानवाचें खरेखुरें व्यक्तित्व वा 'मीपण' होय, तोच 'खरा मानव' होय, तेंच 'मानवाचें सत्य स्वरूप' होय. हा वरवरचा माणूस, हा व्यावहारिक जीव म्हणजे तें अतींद्रियं, सर्वातीत व्यक्तित्व व्यक्त करण्याची, प्रकट करण्याची धडपड होय, इतकेंच. 'क्रमविकास' होत असतो तो 'आत्म्या'चा नव्हे. हे जे बदल घडून येत आहेत—दुर्योधनाचा सुयोधन होत आहे, पशूचा माणूस होत आहे, तें सारें आत्म्यांत घडत नाही. ह्याला म्हणतां येईल प्रकृतीचें क्रमविकसन आणि आत्म्याचें क्रमप्रकटन ! कल्पना करा की, तुमच्या आणि माझ्या मध्ये एक पडदा टांगला असून तो आड आल्यामुळे मी तुम्हांला पाहूं शकत नाहीं. आणि अशी कल्पना करा की त्या पडद्याला एक लहानसें छिद्र असून त्यांतून मला तुमच्यापैकी कांही जणांचे, अगदी समोरच्याच फक्त कांहीजणांचे चेहरे दिसत आहेत. आता कल्पना करा की तें छिद्र हळूहळू मोठें होऊं लागलें आहे. त्याने काय होईल ? तें छिद्र जसजसें मोठें मोठें होत जाईल तसतसा समोरचा देखावा माझ्यासमोर

आपोआप अधिकाधिक प्रकट होत राहील. आणि होतां होतां अखेर ज्या वेळीं तो सगळाच्या सगळाच पडदा तेथून नाहीसा होईल त्या वेळीं मी अगदी तुमच्या समोर उभा असेन आणि अगदी स्पष्टपणें तुम्हां साऱ्यांना पाहूं शकेन. या सर्व प्रकारांत बदल झाला तो तुमच्यांत मुळीच नाही; क्रमविकास होत होता तो त्या छिद्राचा, आणि त्याचबरोबर तुम्ही क्रमशः माझ्या दृष्टीसमोर अधिकाधिक प्रकटत होता. एकीकडून क्रमविकसन तर दुसरीकडून क्रमप्रकटन ! आत्म्याच्या बाबतींतहि असेंच घडतें. प्रकृतीकडून क्रमविकसन तर आत्म्याकडून क्रमप्रकटन ! पूर्णत्व आपल्याला 'मिळवावयाचें' नसतें. आपण आधीचेच, स्व-रूपतःच पूर्ण आहोंत, मुक्त आहोंत. धर्म, ईश्वर, परलोक वगैरे आमच्या धारणांचा अर्थ काय ? या सर्व कल्पना आमच्यांत कुठून आल्यात, कशा आल्यात ? कशांत आहे त्यांचा उगम ? माणूस काय म्हणून ईश्वराच्या मागे लागतो ? ईश्वराच्या रूपाने म्हणा, माणसाच्या रूपाने म्हणा की आणखी कशाच्यातरी रूपाने म्हणा, पण एखाद्या पूर्णत्वाच्या आदर्शाची ही आस प्रत्येक देशांतील, प्रत्येक समाजांतील लोकांना असते ती कां ? ह्याचें कारण हेंच की तो आदर्श मुळी तुमच्या आंत—तुमच्या अंतरंगीं—तुमच्या अंतरात्म्यांतच वर्तमान आहे. ती तुमच्या हृदयाचीच धडधड तुम्ही ऐकत असतां, पण ती कुठून उद्भवते हें मात्र तुम्हांला ठाऊक नसतें, आणि म्हणून त्या आवाजाला तुम्ही चुकीने बाहेरचा समजत असतां. तुमच्या अंतरात्म्यांत वसणारा ईश्वरच तुम्हांला त्याच्या शोधास प्रवृत्त करीत आहे, त्याचा साक्षात्कार करून घेण्याची प्रेरणा तुमच्यांत जागवीत आहे. इथे तिथे, देवळांरावळांत, चर्च-मशिदींत, स्वर्गीं-मर्त्यीं यथेच्छ शोधाशोधी करून भागल्यानंतर अखेर जिथून, ज्या स्वतःच्या आत्म्यापासून आपण सुरवात केली असते तिथेच एक प्रचंड वर्तुळ पूर्ण करून आपण परत येतों आणि मग आपल्याला आढळून येतें की, ज्यास आपण त्रिभुवनभर धुंडाळीत होतों, देवळांदेवळांत इतके रडून आपण ज्याची करुणा भाकली, ज्याला आपण दूर मेघांआड दडलेला अत्यंत गूढ स्वरूपाचा समजत होतों तो आपल्या अगदी जवळांत जवळचा आहे, आपला आत्माच आहे, आपल्या प्राणांचा प्राण आहे, तोच आपला देह आहे, आपलें मन आहे, आपलें सर्वस्व आहे—'तूंच मी, मीच तूं.'

तोच आपलें स्व-रूप आहे. तें प्रकट करा, तें व्यक्त करा. तुम्हांला पवित्र 'व्हावयाचें' नाही, तुम्ही आधीचेच--स्वरूपतःच पवित्र आहांत. प्रकृति ही तुम्ही आणि तुमच्या अंतर्यामीं वसणारें तें अतींद्रिय सत्य यांमधील पडद्यासारखी आहे. तुम्हीं केलेला प्रत्येक सद्विचार वा प्रत्येक सत्कर्म म्हणजे जणुकांही तो पडदा हळूहळू फाडीत जाणेंच होय; आणि मग तसतसाच त्यामागील तो शुद्ध, अनंत ईश्वर, तो तुमचा आत्मा अधिकाधिक प्रकट होत जातो.

हीच समग्र मानवजीवनाची कथा होय. तें आवरण जसजसें जास्तजास्त झिरझिरीत होत जातें तसतशी त्याआडील ती आत्म-ज्योति अधिकाधिक प्रकाश पावूं लागते, कारण प्रकाशणें हा तिचा धर्मच होय. ह्या आत्म्याला 'जाणतां' यावयाचें नाही, त्याला 'जाण-ण्याचा' प्रत्येक प्रयत्न निष्फळ ठरेल. ह्या आत्म्याला जर खरोखरच 'जाणतां' आलें असतें, तो जर खरोखरच 'ज्ञेय' असता तर तो 'आत्मा'च राहिला नसता! कारण 'आत्मा' म्हणजेच 'ज्ञाता'--तो नित्य ज्ञाता आहे, ज्ञेय कदापि नाही. ज्ञान म्हणजेच मर्यादीकरण, जाणणें म्हणजेच एखाद्या गोष्टीला आपल्या ज्ञानाचा 'विषय' करून तिला आपल्या ज्ञानाच्या कक्षेंत खेचणें. परंतु आत्मा असा ज्ञेय वा आमच्या जाण-ण्याचा 'विषय' होणें स्वरूपतःच शक्य नाही, तो सर्व गोष्टींचा नित्य ज्ञाता आहे, तो ह्या विश्वाचा नित्य साक्षी आहे, आपला 'मी' आहे. स्वतःच्या आत्म्याचें ज्ञान ही तर जणु खालची पायरी आहे, स्वस्वरूप-च्युति आहे, स्वरूपापासून भ्रष्ट होणें, ढळणें आहे. आपण तर आधीचेच, कायमचेच तो 'ज्ञाता' आहोंत, मग ज्ञाताच ज्ञात्याला कसें जाणणार? स्वतःलाच आपण कसें जाणणार? तो आत्माच प्रत्येकाचें खरें स्वरूप होय, आणि प्रत्येकजण तें नानाप्रकारें व्यक्त करण्याची धडपड करीत आहे. तसें नसतें तर मग हे इतके नीतिनियम काय म्हणून आहेत? एरवी मग नीतिमत्तेचा अर्थ काय? तिचें स्पष्टीकरण कसें करतां येईल? सर्व नीतिशास्त्रांमधे एक प्रमुख कल्पना निरनिराळ्या रूपांनी व्यक्त होत आहे, आणि ती म्हणजे परोपकार करणें-- दुसऱ्यांचें भलें करणें. मानवाच्या समस्त कार्यांचा प्रेरक हेतु माणसांवर दया, सर्व प्राण्यांवर दया हाच असला पाहिजे. पण हें सारें म्हणजे 'मीच हें विश्व

आहें, हें सारें विश्व एक आहे' ह्या चिरंतन सत्याचेच वेगवेगळे आविष्कार होत. एरवी ह्या साऱ्याची उपपत्ति काय ? मीं माझ्या बांधवांवर उपकार काय म्हणून करावयाचा ? काय म्हणून मीं लोकांचें हित करावयाचें ? तसें करण्यास मला काय भाग पाडतें ? ह्या साऱ्याचें कारण आहे 'सहानुभूति'—माझा आत्माच सर्वांचा आत्मा आहे, सर्वांठायीं मीच भरलों आहें ह्याची अव्यक्त जाणीव. अगदी कठोरांतील कठोर माणसालाहि कधीकधी दुसऱ्यांविषयी सहानुभूति वाटतेच. इतकेंच काय पण, 'आपण खरें मानून चालत असलेलें हें आपलें व्यक्तित्व, हें मीपण वस्तुत: एक भ्रम आहे, ह्या भासमान व्यक्तित्वाला कवटाळून राहणें फार अनुचित आहे' असें कुणीं म्हटल्यास भयभीत होणारा माणूसच नीतीसंबंधी बोलतांना 'संपूर्ण आत्मत्यागच नीतीचा पाया होय' असें ठासून म्हणेल. परंतु, अमळ विचार करून बघा—'संपूर्ण आत्मत्याग' म्हणजे खरोखर काय बरें ? विचारान्तीं आपल्याला आढळून येईल की संपूर्ण आत्मत्याग म्हणजेच ह्या आपल्या भासमान व्यक्तित्वाचा त्याग, समस्त स्वार्थीपणाचा त्याग. 'मी' आणि 'माझें'ची ही भावना, हा 'अहंकार' आणि ही 'ममता' हीं आमच्यांत रुजलेल्या भ्रांतीचींच फळें होत, आणि आपला हा आजचा 'अहं' जसजसा निघून जातो तसतसा आपला खरा आत्मा अधिकाधिक प्रकट होत जातो. हाच खराखरा आत्मत्याग होय, हाच समस्त नैतिक उपदेशांचें केंद्र, पाया नि सार होय. आणि, जाणतां अजाणतां अवघें जग हळूहळू त्याकडेच जात आहे, कमीअधिक प्रमाणांत तो आचरण्याचा यत्न करीत आहे. फक्त, अधिकांश लोक हें अजाणतां करीत आहेत, इतकेंच. त्यांनी तें जाणूनबुजून केलें म्हणजे झालें. हें 'मी आणि माझें' हा खरा आत्मा नव्हे, तें आत्म्याचें केवळ एक बंधन आहे, एक उपाधि आहे हें जाणून त्यांनी कळूनवळून त्याग करावयास हवा. आम्ही आज ज्याला माणूस म्हणतों तो म्हणजे त्या सर्वातीत, अतींद्रिय, अनंत सच्चिदानंदाचा केवळ एक आभास आहे, त्या सर्व-स्वरूप अनंत अग्नीचा केवळ एक स्फुलिंग आहे. तो अनंतच त्याचें खरें स्वरूप होय.

हें सर्व खरें, पण ह्या ज्ञानापासून फायदा काय ? ह्या ज्ञानाचा उपयोग काय, त्याचें फळ काय ? असे दिवस आले आहेत की प्रत्येक

गोष्ट फायद्याच्या मापानेच मोजावी लागते — तिच्यापासून किती रुपये किती आणे किती पैसे मिळतील यावरूनच तिचा खरेखोटेपणा ठरविला जातो. पण मी विचारतों की सत्याची अशी फायदा बघून किंवा पैशाने पारख करण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ? फायदा किंवा पैसा हा का सत्याचा कस ठरूं शकतो ? समजा की त्यापासून कांही फायदा व्हायचा नाही, म्हणून काय तें कमी का खरें ठरणार आहे ? फायदा किंवा उपयोग ही मुळी सत्याची कसोटीच नव्हे. तथापि ह्या सत्यापासून, ह्या ज्ञानाने आपला सर्वांत मोठा फायदा होणार आहे. आपण बघतोंच की सगळ्यांना सुख हवें असतें, परंतु अधिकांश लोक तें क्षणभंगुर, नश्वर, मिथ्या गोष्टींतच शोधीत असतात. पण सुख कधी इंद्रियांमधे नसतें. असा एकहि हरीचा लाल अजून जन्मला नाही की ज्याला इंद्रियांच्या सुखांनी, इंद्रियोपभोगांनी सुखी केलें आहे, तृप्त केलें आहे. सुख केवळ आत्म्यांतच लाभूं शकतें. आत्मानंदाच्या लाभानेच माणूस खरोखर सुखी होऊं शकतो, आनंदी होऊं शकतो, तृप्त होऊं शकतो. ह्या ज्ञानाने, ह्या आत्मविद्येने आपल्याला हा आत्मानंद लाभूं शकतो हा ह्या ज्ञानापासून होणारा मानवजातीचा सगळ्यांत मोठा फायदा होय; हा त्या ज्ञानाचा सर्वांत श्रेष्ठ उपयोग होय. आणखी असें की अज्ञानच सर्व दुःखांचें मूळ होय, आणि आपण अनंत आत्मा असूनहि स्वतःला सान्त, यःकश्चित् जीव समजून रडतों भेकतों हेंच सगळ्यांत मोठें, अगदी मूलभूत अज्ञान होय. आपण अविनाशी, नित्यशुद्ध, पूर्ण आत्मा असूनहि आपण ह्या लहानलहान मनांशीं, ह्या लहानलहान शरीरांशीं एकरूप होऊन जातों नि स्वतःला शरीर वा मनच समजूं लागतों हाच आपल्या सर्व अज्ञानाचा पाया होय, ह्यांतूनच सारा स्वार्थीपणा जन्मतो. मी स्वतःला हें एक लहानसें शरीर समजूं लागतांच मला मग तें टिकवून ठेवावेसें, नीट सुरक्षित ठेवावेसें, इतर शरीरांच्या सुखदुःखाची पर्वा न करतां सुंदर ठेवावेसें वाटूं लागतें; मग तुम्ही आणि मी अलग होऊन जातो. आणि हा असला अलगपणा, ही भेदाची भावना उपजतांच सर्वप्रकारच्या अमंगळाला फावतें आणि परिणामीं दुःखें उद्भवतात. ह्या आत्मज्ञानापासून, ह्या ब्रह्मविद्येपासून हाच फायदा आहे, तिचा हाच उपयोग आहे की आपल्या ह्या जगांतील

अगदी मूठभरच माणसें जरी ही स्वार्थीपणाची, संकुचितपणाची, क्षुद्रपणाची भावना बाजूस सारूं शकतील तर उद्याच हें जग नंदनवन बनून जाईल; परंतु केवळ यंत्रांनी आणि नुसत्या भौतिक ज्ञानाच्या प्रगतीने हें कदापि साधावयाचें नाही. आगींत तेल ओतल्याने जाळ जसा आणखीच भडकतो त्याचप्रमाणे ह्यांनी दुःखांना केवळ ऊतच येत असतो. आत्मज्ञानाखेरीज सगळेच्या सगळें भौतिक ज्ञान म्हणजे केवळ आगींत तेल ओतणेंच होय. तें म्हणजे स्वार्थी लोकांच्या हातीं इतरांना लुबाडण्याचें आणखी एक साधन देणेंच होय, दुसऱ्यांसाठी प्राण देण्याऐवजी दुसऱ्यांचे प्राण घेऊन आपण आपलें ओंगळ जिणें निर्वेधपणें जगण्याची कलाच शिकविणें होय.

ह्यानंतरचा प्रश्न म्हणजे--हें सारें आचरणांत आणणें शक्य आहे काय ?--तें 'व्यवहार्य' आहे काय ? 'आधुनिक समाजां'त हें आचरतां येणें संभवनीय आहे काय ? ह्याचें उत्तर असें की, **सत्य कोणत्याहि समाजापुढे मान तुकविण्यास रिकामें नाही—मग तो समाज प्राचीन असो की आधुनिक असो. समाजानेच सत्यापुढे मान तुकवावयास हवी, आणि तें शक्य नसेल तर मरणास तयार व्हावयास हवें.** समाजच सत्यानुसार उभारले जावयास हवेत, सत्य कधीच समाजाशीं जुळतें घेण्यासाठी स्वतःत बदल करणार नाही. आणि हें जमावयाचें नसेल तर परिणाम ठेवलेलाच आहे--ध्वंस. निःस्वार्थतेसारखें उदात्त सत्य जर समाजांत राहून आचरणांत आणणें शक्यच नसेल तर मग तो तसला समाज सोडून जंगलांत जाऊन राहणें चांगलें. ह्यालाच म्हणावें धाष्टर्य. धाडस दोन प्रकारचें असतें. एक म्हणजे तोफेला तोंड देण्याचें धाडस. आणि दुसरें आहे आध्यात्मिक श्रद्धेतून निर्माण होणारें धाडस. भारतावर स्वारी करावयास निघालेल्या एका सम्राटाला त्याच्या गुरूने भारतांतील साधूंचा शोध करून त्यांची भेट घेण्यास सांगितलें. बऱ्याच शोधानंतर त्या सम्राटाला एक अत्यंत वृद्ध साधु एका शिळेवर बसलेला आढळला. त्याच्याशीं थोडें संभाषण करतांच त्याच्या शहाणपणाने तो सम्राट् अत्यंत प्रभावित होऊन गेला. त्याने त्या साधूला आपल्या देशांत चलण्याची विनंती केली. त्यावर साधूने नकार देऊन उत्तर दिलें--"माझ्या अरण्यांत मी अगदी संतुष्ट आहे." सम्राट् म्हणाला--"मी आपल्याला धन-मान देईन, मी सम्राट्

आहें, मी देऊं शकणार नाहीं असें कांहीच नाही." त्यावर त्या साधूने उत्तर दिलें,"मला त्या गोष्टींची मुळीच पर्वा नाही." तें ऐकून सम्राट् त्याला म्हणाला–"ठीक आहे, तुम्ही जर चलणार नाही तर मी तुम्हांला ठार करून टाकीन." त्यावर मंद, प्रसन्न स्मित करीत तो साधु उद्गारला–"राजा, अद्याप कधी बोलला नसशील इतकी मूर्खपणाची गोष्ट तूं आज बोलून गेलास ! मला मारणें तुला शक्य नाही. मला सूर्य सुकवं शकणार नाही, अग्नि जाळूं शकणार नाही, तरवार मारूं शकणार नाही, कारण मी अज, अमर, नित्य, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी आत्मा आहें." ह्याला म्हणतात आध्यात्मिक धाष्टर्च. हें निराळें आणि वाघसिंहाचें धाष्टर्च निराळें. १८५७ च्या वणव्यांतील गोष्ट. एका मुसलमान शिपायाने एका संन्याशाला भयंकर भोसकलें. तो संन्यासी फार थोर महात्मा होता. हिंदु शिपायांनी त्या माणसाला पकडलें आणि त्या साधूसमोर आणून 'म्हणाल तर ह्याचीं खांडोळीं करून टाकतों' असें म्हटलें. त्यावर त्या साधूने शांतपणें आपल्या त्या मारेकऱ्याकडे पाहिलें आणि म्हटलें–"बंधो, तूंहि तोच (परमात्माच) आहेस, तूंहि तोच आहेस." असें म्हणतच त्या साधूने शांतपणें देह ठेवला. आध्यात्मिक धाष्टर्याचें हें आणखी एक उदाहरण होय. तुम्ही जर सत्य आपल्या समाजजीवनांत उतरवूं शकणार नसाल, सर्वोच्च सत्याला वाव मिळेल असा समाज जर तुम्ही उभारूं शकणार नसाल तर मग तुमच्या ह्या बाहुबलाचा टेंभा मिरविण्यांत काय हशील ? मग उगाच तुमच्या ह्या सामाजिक संस्थांच्या थोरवीची घमेंड तरी कां बाळगतां ? अखेर 'हें धाष्टर्च, हें आत्मबळ व्यवहार्य नाही' असेंच जर तुम्ही म्हणणार असाल तर मग तुमच्या ऐश्वर्याचा आणि तुमच्या मोठेपणाचा तुमचा हा तोरा काय किमतीचा ? रुपये–आणे–पै सोडून आणखी कांहीच व्यवहार्य नाही काय ? असेंच असेल तर मग आपल्या समाजाचा एवढा गर्व कशाला वाहतां ? **तोच समाज सर्वांत थोर की ज्यांत सर्वोच्च सत्यें व्यवहार्य होऊं शकतात.** माझें तरी असें मत आहे. आणि समाज जर सर्वोच्च सत्यांच्या आचरणास सोईचा नसेल तर तो बदलून तसा करा, आणि जितक्या लवकर हें कराल तितकें चांगलें. उठा, नर-नारींनो, अशा भावनेने उठा, ह्या सत्यावर विश्वास ठेवण्यापुरतें साहस

धरा, तें सत्य आचरणांत आणण्याचें धाडस करा. जगाला अशा कांही धारिष्टचवान स्त्री-पुरुषांची गरज आहे. तें साहस अंगीं बाणवा की ज्यामुळे माणूस सत्य जाणून घेण्याची आणि प्रत्यक्ष जीवनांत उतरविण्याची हिंमत धरतो, जें मृत्यूपुढेहि डगमगत नाही, नव्हे, मृत्यूचें स्वागतच करतें, ज्याच्या बळावर माणूस आत्मस्वरूप जाणूं शकतो आणि जाणूं शकतो की त्याला मारील असें अलम दुनियेंत कांही नाही. त्यानें तुम्ही मुक्त व्हाल. मग तुम्हांला स्वतःचें खरें स्वरूप कळून येईल—आत्मस्वरूप कळून येईल.

"हा आत्मा प्रथम श्रवण केला पाहिजे, मग त्यावर मनन केलें पाहिजे आणि नंतर त्यावर ध्यान केलें पाहिजे—त्याचा ध्यास घेतला पाहिजे." आजकाल कामाचा खूप उदो उदो करण्याकडे आणि चिंतन-मननाची, ध्यान-धारणेची हेटाळणी करण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. 'करणें' फार चांगलें आहे, पण त्याचा उगम होत असतो चिंतनांतून, विचारांतून. स्नायूंमधून होणाऱ्या शक्तीच्या लहान लहान आविष्कारांनाच कर्म म्हणतात. पण जिथे विचार नसतो तिथून कर्महि निष्पन्न होऊं शकत नाही. म्हणून आपला मेंदू उच्च विचारांनी, सर्वोच्च आदर्शांनी भरून टाका, रात्रंदिवस ते स्वतःसमोर बाळगा, आणि मग बघाल की त्यांतून मोठमोठीं कर्में उद्‌भूत होत आहेत. 'मी अपवित्र' ह्या भावनेला तिलांजलि द्या, म्हणा की 'मी पवित्र आहें, शुद्ध आहें.' मी क्षुद्र आहें, मी जन्मलों, मी मरणार या विचारांची आपण स्वतःवर कशी मोहनी घातली आहे आणि म्हणूनच आपण सदासर्वदा भयानें कसे थरथरत असतों.

एका सिंहिणीबद्दल एक मोठी सुंदर गोष्ट आहे. ती सिंहीण गाभण होती. एके दिवशीं भक्ष्याच्या शोधांत फिरत असतां मेंढ्यांचा एक कळप चरतांना बघून तिने त्यावर झेप घेतली. त्या प्रयत्नांत एका छाव्यास जन्म देऊन ती मरण पावली. त्या आई नसलेल्या छाव्याचा त्या मेंढ्यांनीच सांभाळ केला, त्याचें संगोपन करून त्याला वाढविलें तोहि त्या मेंढ्यांच्या सहवासांतच लहानाचा मोठा झाला, त्यांच्याचसारखा गवत खाऊं लागला आणि त्या मेंढ्यांसारखाच बें बें पण करूं लागला ! अशा रीतीने कालान्तराने वयांत येऊन तो जरी एक

प्रचंड सिंह बनला तरी आपण एक मेंढरू आहोंत असेंच तो समजत असे ! होतां होतां एके दिवशीं दुसरा एक सिंह भक्ष्याच्या शोधांत तिथे येऊन ठेपला. त्या मेंढ्यांच्या घोळक्यांत एक सिंह गवत खातांना आणि कोठे खुट्ट होतांच मेंढ्याप्रमाणे भयाने धावपळ करतांना बघून त्या नव्या सिंहाला मोठाच अचंबा वाटला ! त्या मेष-सिंहाजवळ जाऊन 'तूं मेंढी नाहीस, तूं सिंह आहेस' असें त्याला सांगण्याचा त्याने प्रयत्न करून पाहिला. पण तो जवळ येऊं लागतांच हें मेषपात्र धूमच ठोकें ! तरीपण नाउमेद न होतां तो नवा सिंह योग्य संधीची वाट पाहूं लागला. अखेर पाळतीवर असतांना एक दिवस त्याला तो गवत-खाऊ सिंह स्वस्थ झोपलेला आढळला. त्याच्या जवळ जाऊन आणि त्याला जागें करून तो नवा सिंह त्याला म्हणाला– "अरे, तूं मेंढ्यांच्या कळपांत राहून आपला स्वभाव कसा बरें भुललास? अरे, तूं मेंढी नाहीस, तूं सिंह आहेस, सिंह." इतक्या कमी अंतरावर प्रत्यक्ष एक सिंह पाहतांच त्या बिचाऱ्याची बोबडी वळली ! "नाही हो, मी आपला मेंढीच आहें, मी सिंह कसा असेन ?"––तो दीनपणें ओरडत म्हणाला. आपण सिंह आहोंत यावर त्याचा विश्वास बसणें शक्य नव्हतें. उलट तो भयाने मेंढीप्रमाणे बें बें करूं लागला ! मग त्या नव्या सिंहाने त्या गवतखाऊ सिंहाला ओढत-फरफटत एका तळ्यापाशी नेलें आणि म्हटलें– "हं, बघ त्या पाण्यांत, ती बघ माझी पडछाया आणि जवळच ती तुझी. बघ एकदा." तो गवतखाऊ तुलना करूं लागला. त्याने एकदा त्या सिंहाकडे पाहिलें, एकदा स्वतःच्या त्या प्रतिबिंबाकडे दृष्टि फेकली. एका क्षणांत त्याच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. "खरेंच की, मी सिंह आहें." त्याने एक प्रचंड सिंह-गर्जना केली. तें बें बें पार कुठे बेपत्ता झालें ! बंधूंनो आणि भगिनींनो, तुम्ही सिंह आहांत – तुम्ही आत्मा आहांत – शुद्ध, अनंत नि पूर्ण आहांत. त्रैलोक्यांतील महाशक्ति तुमच्यांत विद्यमान आहे. "मित्रा, तूं रडतोस काय म्हणून ? तुला जन्म नाही, तुला मृत्यु नाही––ते तुला स्पर्शूं शकत नाहीत. तूं कां रडतोस ? जरा-व्याधि, दुःख-दैन्य यांच्या तूं पलीकडे आहेस. तूं त्या अनंत आकाशासारखा आहेस. चित्रविचित्र रंगांचे मेघ त्यावर येतात, क्षणभर खेळतात आणि कुठे नाहीसे होऊन

जातात. पण आकाश मात्र होतें तसेंच राहतें--सदा आपलें निळेभोर."
आम्हांला ह्या जगांत पाप, दुष्टपणा काय म्हणून दिसतो ? कारण तें सारें आमच्या आंतच आहे. रस्त्याच्या कडेला झाडाचा एक बुंधा होता. अंधारांत त्या रस्त्याने जाणाऱ्या चोराला वाटलें की तो शिपाई आहे. आपल्या हृदयदेवतेची प्रतीक्षा करणाऱ्या तरुणाला तो बुंधा आपली प्रियतमाच वाटली. भुताखेतांच्या गोष्टी ऐकलेल्या बालकाला तें भूतच वाटून तो भिऊन किंचाळूं लागला. याप्रमाणे भिन्न भिन्न व्यक्ति भिन्न भिन्न रूपांत बघत असतांहि तो बुंधा मात्र सदा बुंधाच होता, त्यांत केव्हाच आणि कांहीच बदल झाला नव्हता. आपलेंहि असेंच आहे. जसें आपण आहोंत तसेंच जगहि आपल्याला दिसत असतें. जशी दृष्टि तशी सृष्टि. अशी कल्पना करा की एका खोलींत टेबलावर एक मोहरांची थैली असून तिथे एक लहान मूल आहे आणि एक चोर येऊन ती थैली चोरतो आहे मोहोरा चोरीस गेल्यात हें त्या मुलाला कळेल काय? आमच्या आंत जें असतें तेंच आम्हांला बाहेर दिसत असतें. त्या मुलाच्या मनांत चोर नव्हता, सबब त्याला बाहेरहि चोर दिसला नाही. सर्वच बाबतींत हें खरें आहे. सर्व ज्ञानांच्या बाबतींत हें असेंच आहे. जगांतल्या पापाविषयी आणि दुष्टपणाविषयी उगाच हाकाटी करूं नका. उलट, आपल्याला अजूनहि जगांत पाप दिसतच आहे याबद्दल खंत वाटूं द्या, आपल्याला चोहीकडे पापच पाप दिसत आहे ह्याबद्दल मनापासून वाईट वाटूं द्या. आणि तुम्ही जर ह्या जगाला मदत करूं इच्छीत असाल तर त्याच्या नांवाने बोटें मोडून त्याला दोष देत बसूं नका, त्याचा तिरस्कार करूं नका. त्याला आणखी जास्त दुबळें करूं नका. कारण, पाप म्हणा की दुःख म्हणा, सारें दुबळेपणामुळेच तर आहे. आपण दुबळे आहोंत, पापी आहोंत असेंच लहानपणापासून आपल्या कानींकपाळीं ओरडण्यांत येत असतें. ह्या असल्या शिकवणुकीने जग दिवसेंदिवस जास्त जास्त दुबळें बनत आहे. लोकांना शिकवा की ते सारेच अमृताचे महिमाशाली पुत्र आहेत. इतकेंच काय पण ज्यांच्यामधे त्या आत्म्याचा प्रकाश अति मंद आहे-- जे दुबळे आहेत, पापी आहेत त्यांनाहि ह्या महन्मंगल कल्याणमंत्राची दीक्षा द्या. अगदी लहानपणापासूनच करुणात्मक, बलदायक, विधायक, रचनात्मक असे उपयुक्त विचार त्यांच्या मेंदूंत शिरूं द्या. असल्याच

विचारांचा प्रभाव स्वतःवर पडूं द्या, दुबळेपणा आणतील, पंगु बनवितील अशा विचारांना थारासुद्धा देऊं नका. दृढपणें सदा आपल्याशीं म्हणा— "मी तोच आहें, मी तोच आहें--मी आत्मा आहें." तुमच्या हृदयांत हेंच अहर्निश एखाद्या संगीतासारखें झंकृत होत राहो. अगदी मृत्युसमयीं देखील 'सोऽहं' 'सोऽहं' असा घोष करीतच प्रयाण करा. हेंच सत्य आहे— हें जग चालविणारी महाशक्ति तुमच्या ठायीं आहे. ज्या अंधविश्वासांनी, ज्या खुळचट समजुतींनी, ज्या भ्रमांनी तुमचें मन झाकून टाकलें आहे त्यांना पिटाळून लावा. आपण धीट बनूं या, साहसी बनूं या. तें सत्य जाणा आणि आचरणांत आणा. आपलें लक्ष्य खूप दूर असेल, पण ही मायानिद्रा दूर सारून उठा, जागे व्हा, आणि लक्ष्याप्रत पोहोचेपर्यंत मधे कुठेच थांबूं नका.

---

# माया

(लंडन येथे दिलेलें व्याख्यान)

माया हा शब्द तुमच्यापैकी बहुधा सर्वांनीच ऐकला असेल. साधारणपणें भ्रांति, भुरळ किंवा अशाच कांहीतरी अर्थानें हा शब्द वापरला जात असतो. परंतु हा कांही त्या शब्दाचा खरा अर्थ नव्हे. मायावाद हा वेदान्ताचा एक आधारस्तंभ आहे आणि म्हणून तो नीट समजून घेणें अत्यंत आवश्यक आहे. ह्या मायेविषयी चुकीची धारणा होण्याचा फारच संभव असल्यामुळे आपण अमळ धीर धरून, लक्षपूर्वक माझें म्हणणें ऐकावें अशी मी आपल्याला विनंती करूं इच्छितों.

वैदिक वाङ्मयांत 'भुलवण' वा 'जादू' या अर्थीच हा माया शब्द वापरलेला आढळून येतो. हाच ह्या शब्दाचा सर्वांत जुना अर्थ होय. परंतु तेव्हा मायेविषयीचा खरा, अंतिम सिद्धान्त गाठला गेला नव्हता. वेदांमधे "इंद्राने आपल्या मायेने तऱ्हतऱ्हेचीं रूपें घेतलीं" ("इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयते") असलीं वचनें आढळतात. ह्या ठिकाणीं माया हा शब्द 'इंद्रजाल' वा 'जादू' या अर्थीच उपयोजिला गेला आहे यांत संदेह नाही. आणि याच अर्थाने ज्यांत माया शब्द आला आहे अशीं आणखीहि कित्येक वचनें आपल्याला वेदांमधे सापडतील. यानंतर मग कांही काल हा माया शब्द अजीबात गळतो, बराच काळ त्याचा प्रयोग होतांना दिसत नाही. परंतु ह्या मध्यंतरीच्या काळांत त्या शब्दामागील कल्पना मात्र हळूहळू विकसित होत होती. नंतरच्या काळांत पुढील प्रश्न विचारला गेलेला आढळतो-- "आपल्याला ह्या विश्वाचें रहस्य कां बरें कळत नाही?" आणि ह्या प्रश्नाला तिथे दिलें गेलेलें उत्तरहि अत्यंत सूचक आहे. ह्या प्रश्नाला तिथे उत्तर दिलें गेलें आहे की, "आपण बोलत असतों खूप मोठमोठ्या गोष्टी, पण लोळत असतों इंद्रियसुखांच्या खातेऱ्यांतच. वासनांच्या कच्छपी

लागून आपण सारखी धावपळ करीत असतों. म्हणून आपण कसे धुक्याने घेरल्यासारखे झालों आहोत. त्यामुळे तें सत्य आपल्याला दिसूं शकत नाही." ("नीहारेण प्रावृता जल्प्या चासुतृप उक्थशास चरन्ति.") या ठिकाणीं माया शब्द वापरला गेला नाही खरा, परंतु त्यामागील कल्पना वा भाव मात्र या ठिकाणीं अगदी स्पष्टपणें व्यक्तविला गेला आहे. तो असा की, आमच्या या अज्ञानाचें कारण एखाद्या धुक्यासारखें असून तें आमच्या व त्या सत्याच्या मधे पडद्यासारखें आड आलें आहे.

ह्यानंतर बऱ्याच काळाने एका अर्वाचीन उपनिषदांत हा माया शब्द फिरून उपयोगांत आल्याचें दृष्टीस पडतें. परंतु एव्हाना त्याचा अर्थ कितीतरी बदलून गेला आहे, अगदी नवीनच अर्थ त्या शब्दाशीं निगडित होऊन गेला आहे. या मध्यंतरीच्या काळांत मायेसंबंधी मतां-मागून मतें पुढे आलीं, त्याच त्या मतांची फिरफिरून उजळणी झाली, त्यांची चर्चा झाली, छाननी झाली. मायाविषयक कल्पनेला स्थिरता येईपर्यंत असेंच चालूं होतें. तेव्हा कुठे अखेरीस मायाविषयक धारणेला पक्वता आणि पूर्णता आली. श्वेताश्वतर उपनिषदांत पुढील वचन दृष्टीस पडतें-- "ही प्रकृति म्हणजेच माया होय. आणि त्या मायेचा शासनकर्ता तो परमेश्वरच होय." ("मायां तु प्रकृतिं विद्यात् मायिनं तु महेश्वरम्.")

आमच्या तत्त्वज्ञांकडे वळल्यास आढळून येतें की, भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्यांपूर्वीच्या दार्शनिकांनी हा माया शब्द नाना अर्थांनी वापरला आहे. हा मायावाद बौद्ध दार्शनिकांनीहि थोडाफार हाताळला, परंतु या बौद्धांच्या हातीं पडून मायावादाला पुष्कळसें 'विज्ञानवादा'चें* स्वरूप प्राप्त झालें, आणि आज माया शब्दाचा साधारणतः हाच अर्थ करण्यांत येत असतो. हिंदूंनी "जग माया आहे" असें म्हणतांच लोकांची एकदम अशी धारणा होते की (हिंदूंच्या मतें) जग निव्वळ कल्पना आहे. बौद्ध दार्शनिकांनी मायेचा हा जो अर्थ केला त्याला कांही कारण आहे. तें असें की त्या काळीं तत्त्वज्ञांचा एक असा वर्ग होता की ज्यांचा

---

* आपल्या प्रत्ययास येणाऱ्या सर्व वस्तु म्हणजे केवळ आपल्या मनाच्याच निरनिराळ्या वृत्ति वा अनुभूति होत, त्यांना त्यांखेरीज बाह्य असें वास्तविक अस्तित्व नाही, ह्या मताला विज्ञानवाद वा Idealism म्हणतात.

बाह्य जगाच्या अस्तित्वावर मुळीच विश्वास नव्हता. परंतु वेदान्तोक्त मायेचें अंतिम, पूर्ण विकसित स्वरूप म्हणजे विज्ञानवादहि नव्हे, वास्तववादहि* नव्हे, किंवा कोणताहि एखादा 'वाद' नव्हे. तर, माया म्हणजे आपण काय आहोंत आणि आपल्या सभोवार आपण काय बघतों ह्यासंबंधीचें अगदी वस्तुस्थितिनिदर्शक साधें, सरळ वर्णन.

मीं तुम्हाला मागे एकदा सांगितल्याप्रमाणे, ज्यांच्या हृदयांत वेद स्फुरले त्या लोकांचीं मनें मूलभूत तत्त्वांच्या अनुसंधानांत, मूलभूत तत्त्वांच्या शोधांतच गर्क होतीं. वस्तुमात्राच्या थेट अंतरंगांत शिरून त्यांचें खरें स्वरूप जाणून घेण्याचीच त्यांना आस लागली होती, बाह्य तपशिलांतच घोटाळत बसण्याची त्यांना सवडहि नव्हती आणि आवडहि नव्हती, त्यावांचून त्यांचें कांही अडण्यासारखेंहि नव्हतें. ह्या वस्तुमात्रापलीकडील, ह्या जगतापलीकडील कांहीतरी जणु त्यांना खुणावीत होतें, साद घालीत होतें, आणि म्हणून त्यांना त्याखेरीज दुसरें कांहीच सुचत नव्हतें. आज आपण ज्यांना आधुनिक विज्ञानें म्हणतों त्या विषयांसंबंधीचा उपनिषदांमधे इतस्ततः विखुरलेला 'तपशील' पुष्कळदा चुकीचा निघेल, परंतु त्याबरोबरच त्यांचीं 'मूलतत्त्वें' मात्र बरोबर आहेत हेंहि तितकेंच खरें. उदाहरणार्थ ईथर वा आकाशतत्त्व हें आधुनिक विज्ञानाच्या अगदी अलीकडील सिद्धान्तांपैकी एक आहे. हें आकाशविषयक तत्त्व आपल्याला आमच्या प्राचीन उपनिषदांमधे आढळेल. इतकेंच नव्हे तर, उपनिषदांमधे आढळणारें आकाशविषयक तत्त्व हें आधुनिक विज्ञानाच्या ईथरविषयक सिद्धान्तापेक्षा कितीतरी विकसित स्वरूपाचें आहे. पण हें सारें 'मूल तत्त्वा'च्या स्वरूपांत. त्याच्या 'तपशिला'चें, त्या मूल तत्त्वांच्या कार्याचें वर्णन करतांना मात्र त्या लोकांनी बऱ्याच चुका केलेल्या आढळून येतील. ह्या विश्वामधील समस्त प्राणशक्ति ज्या एका सर्वव्यापी प्राणतत्त्वाचा निरनिराळ्या रूपांतील आविष्कार होय तें व्यापक प्राणतत्त्व वैदिक काळीं अवगत होतें; वेदांच्या ब्राह्मण

* ह्या जगांतील वस्तु म्हणजे केवळ आपल्या मनाच्या वृत्ति वा अनुभूतिच नसून त्यांना बाह्य अस्तित्व आहे या मताला वास्तववाद किंवा Realism म्हणतात.

भागांमधे तें आढळतें. संहितेच्याहि एका दीर्घ सूक्तांत, निरनिराळ्या प्राणशक्तींच्या रूपांत प्रकटणाऱ्या ह्या सर्वव्यापक, सर्वाधार विश्वप्राणाची स्तुति केली गेली आहे. ओघानेच आलें आणि ऐकून तुमच्यापैकी पुष्कळांना कुतूहल वाटेल म्हणून सांगतों की, आपल्या ह्या पृथ्वीवर जीवाची उत्पत्ति कशी झाली यासंबंधी कित्येक आधुनिक युरोपीय वैज्ञानिकांनी मांडलेल्या मतांशीं बऱ्हंशीं जुळणारे सिद्धान्त वैदिक तत्त्वज्ञानांत आढळून येतात. आपणां सर्वांना अर्थातच हें विदित असेल की, जीव दुसऱ्या ग्रहांवरून पृथ्वीवर संक्रमित झाला अशा तऱ्हेचें एक मत प्रचलित आहे. जीव अशा रीतीने चंद्रलोकाहून येत असतो असें कुणाकुणा वैदिक तत्त्वज्ञांचें ठाम मत आहे.

असो तर, सारांश काय की, मूल तत्त्वांसंबंधीच बोलावयाचें झाल्यास अगदी ठासून म्हणतां येईल की व्यापक व सामान्य तत्त्वांचें प्रतिपादन करतांना ह्या वैदिक दर्शनकारांनी अतिशय धीटपणा आणि कमालीचा निर्भीडपणा दाखविला आहे. बाहेरून-- बाह्य जगताकडून ह्या विश्वाच्या रहस्याचें जितपत समाधानकारक उत्तर मिळणें शक्य आहे तितपत त्यांनी खासच मिळविलें होतें. बाह्य जगताच्या मदतीने त्यांनी शोधून काढलेलीं मूलतत्त्वें जिथे विश्वाचें कोडें सोडविण्यास अपुरीं पडतात, तिथे, त्याच मूलतत्त्वांबाबत आधुनिक विज्ञानाने सादर केलेला बारीकसारीक प्रायोगिक तपशील म्हणजे अधिक कांही साधूं शकेल असें मुळीच नाही. जर पूर्वीच्या काळीं आकाशतत्त्व विश्वाचें रहस्य उकलण्यास असमर्थ ठरलें असेल तर मग त्याच आकाशतत्त्वाचें कितीहि सविस्तर, तपशीलवार अध्ययन केलें तरी त्याने आपला प्रश्न सुटण्यास कांही मदत होईल अशी आशा धरणें व्यर्थ नव्हे काय ? सर्वव्यापी प्राणतत्त्व जर ह्या विश्वाचें अंतिम तत्त्व नसेल तर मग त्याचें हवें तेवढें सविस्तर अध्ययनहि निष्फळच ठरणार. कारण, तपशिलांच्या कितीहि ज्ञानाने मूलतत्त्वांत बरें काय फरक पडणार आहे ? सारांश, मला म्हणावयाचें आहे तें एवढेंच की, मूलतत्त्वांच्या अनुसंधानाच्या बाबतींत हिंदु दार्शनिक आधुनिक विचारवंतांइतकेच, किंबहुना प्रसंगीं त्यांच्यापेक्षाहि कांकणभर जास्तच निर्भीड होते. त्यांनी अतिशय व्यापक असे कितीतरी सामान्य सिद्धान्त शोधून काढले आहेत की जे

आजहि पूर्णतया अभिनवच वाटावेत. आणि त्यांच्या ग्रंथांमधे अशीं कितीक अनिर्णीत तत्त्वें आढळतील की आधुनिक विज्ञानाला तीं अद्याप त्याहि रूपांत गवसलेलीं नाहीत. दृष्टान्तादाखल सांगतां येईल की, सर्व-व्यापी आकाशतत्त्वापर्यंत पोहोचूनच ते थबकले नाहीत, तर त्यापलीकडे जाऊन, मनसुद्धा सूक्ष्म आकाशच होय हें त्यांनी जाणलें, आणि मनाचेंहि 'फार सूक्ष्म आकाश' असें वर्गीकरण करून टाकलें. आणि एवढ्या-वरहि न थांबतां त्याहिपलीकडे जाऊन त्यांनी परत त्यापेक्षादेखील अधिक सूक्ष्म अशा आकाशाचा शोध लावला. 'पण उपयोग काय? ह्या साऱ्याने मूळ कोडें सुटण्यासारखें नव्हतें. हीं सारीं तत्त्वेंहि विश्वाचें रहस्य उकलण्याच्या दृष्टीने अपुरींच होतीं. त्यांतील एकहि ह्या विश्वाचें अंतिम तत्त्व असूं शकत नव्हतें. बाह्य जगाचें कितीहि ज्ञान झालें तरी मूळ प्रश्न तसाच —— अनुत्तरितच —— राहत होता. बाह्य जगाच्या केवढ्याहि ज्ञानाने तो सुटण्यासारखा नव्हता. मग उपाय? वैज्ञानिक म्हणेल, "हें सर्व खरें आहे. पण म्हणून काय झालें? आताच कुठे आपल्याला थोडें थोडें ज्ञान होऊं लागलें आहे. नुकतीच सुरुवात झाली आहे. आणखी निदान कांही हजार वर्षे थांबा, आपला प्रश्न सुटलाच पाहिजे. तोंवर गम खा, तेवढ्यांत आपलें हें कूट सुटलेंच म्हणून समजा." परंतु वेदान्त्याचें यावर अगदी असंदिग्ध उत्तर आहे की, "नाही, हें जात्याच शक्य नाही!" कारण, वेदान्त्याने हें निःसंदेह सिद्ध केलें आहे की मानवी मन हें स्वभावानेच सीमायुक्त आहे, तें कांही विशिष्ट सीमा ओलांडूंच शकत नाही, तें देश, काल आणि कार्यकारणभाव यांच्या पलीकडे जाऊंच शकत नाही. ज्याप्रमाणे माणूस स्वतःच्या खांद्यावर बसूं शकत नाही त्याचप्रमाणे दिक्कालांनी रेखाट-लेली लक्ष्मणरेखाहि कुणीसुद्धा उल्लंघून जाऊं शकणार नाही. ह्या देश-काल-निमित्ताचें कोडें सोडविण्याचा प्रत्येक प्रयत्न विफलच ठरणार, कारण त्यासाठी केलेला प्रत्येक प्रयत्न त्या त्रिकुटाचें अस्तित्व गृहीत धरूनच केलेला असणार!

असो तर, मग "ह्या जगाला अस्तित्व नाही" या विधानाचा काय अर्थ होतो? "जग माया आहे, जग मिथ्या आहे" याचा अर्थ काय? ह्याचा अर्थ असा की या जगाला निरपेक्ष अस्तित्व नाही।

त्याला फक्त सापेक्ष अस्तित्व आहे. केवळ तुमच्या, माझ्या नि इतर प्रत्येकाच्या मनाच्या वा बोधाच्या अपेक्षेनेच ह्या जगाला अस्तित्व आहे. सारांश, त्याचें अस्तित्व आमच्या मनावर अवलंबून आहे. आपल्या पांच इंद्रियांच्या द्वारा आपल्याला ह्या जगाचा प्रत्यय येत असतो. पण तेंच जर आपल्याला आणखी एखादें इंद्रिय असतें तर आज प्रत्ययाला येत आहे त्यापेक्षा आणखी कांहीतरी वेगळें ह्याच जगांत आपल्या प्रत्ययास आलें असतें. आणि आणखीहि एखादें जास्तीचें इंद्रिय असतें तर हेंच जग मग त्याहिपेक्षा आणखीच कांही निराळें भासलें असतें. यावरून काय निष्कर्ष निघतो ? ह्यावरून हाच निष्कर्ष निघतो की ह्या जगाला खरें अस्तित्व नाही—त्याला न बदलणारें, न चळणारें, न संपणारें अस्तित्व नाही. पण त्याचबरोबर त्याला अस्तित्वच नाही असेंहि म्हणतां यायचें नाही. कारण तें आहे हें आपण प्रत्यक्ष बघतोंच आणि त्यांत राहून नि त्यांतून मार्ग काढीतच आपल्याला जगायचें असतें. मग हें जग नाही असें कसें म्हणावयाचें ? तें आहेहि आणि नाहीहि—तें आहे-नाहीचें, सत्-असताचें संमिश्रण आहे.

तात्त्विक भराऱ्या मारावयाचें थांबवून आपल्या नित्याच्या जीवनांतील रोजच्या लहान-मोठ्या घटनांकडे दृष्टि वळविल्यास आढळून येतें की आपलें उभें आयुष्यच या आहे-नाहीच्या, या अस्ति-नास्तीच्या लपंडावाने विरोधपूर्ण होऊन बसलें आहे. आढळून येतें की, आपलें संपूर्ण जीवनच या सत्-असताच्या विरोधावर उभें आहे, या दोन विरुद्ध भावांच्या संमिश्रणानेच बनलेलें आहे, आमच्या जीवनांत हा विरोध नाही कुठे ? पदोपदीं, आपल्या जीवनाच्या प्रत्येक आविष्कारांत हा विरोध आपल्या निदर्शनास येईल. आपल्या ज्ञानाचीच गोष्ट घ्या. त्यांत हा विरोध विद्यमान आहे. प्रारंभीं वाटतें की जाणून घेण्याच्या इच्छेचीच काय ती गरज, ती असली की माणूस काय हवें तें जाणून घेऊं शकेल—त्याला मग अज्ञेय असें कांहीच नाही. पण काय ! ज्ञानाच्या मार्गानें कांही थोडींच पावलें तो चालून जात नाही तोंच एक अभेद्य भिताड त्याचा मार्ग रोधून उभें असल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस येतें. तें ओलांडून जाणें त्याच्या शक्तीबाहेरचें—सपशेल अशक्य. त्याचें समस्त कार्य एका वर्तुळाच्या घेरांतच. त्यांतच घोटाळणें, त्या

घेरांतच त्याचें सारें धडपडणें. ती मर्यादा त्याच्यापक्षीं अलंघनीय. अत्यंत निकटचे, अत्यंत जिव्हाळ्याचे, अत्यंत आवडते कितीतरी प्रश्न त्याला रात्रंदिवस अस्वस्थ करीत असतात, सारखे छेडीत असतात. पण ते सोडविणें मात्र त्याला शक्य नसतें, कारण स्वतःच्या बुद्धीची सीमा तो कशी ओलांडणार ? आणि तरीहि ती इच्छा त्याच्या हृदयांत खोल खोल रुजलेली असते. तथापि तिला काबूंत ठेवण्यांत, तिला मुरड घालण्यांतच शहाणपणा आहे, त्यांतच आपलें हित आहे हेंहि त्याबरोबरच आपल्याला अवगत असतें. आपल्या हृदयाची प्रत्येक प्रेरणा श्वासागणिक आपल्याला स्वार्थी बनण्यास सांगत असते आणि त्याबरोबरच एक अमानवी शक्ति आपल्याला बजावीत असते की निःस्वार्थपणाच कल्याणकारक होय. प्रत्येक बालक बघावें— जन्मजात आशावादी, मधुर सुखस्वप्नांमधे दंग. त्याच्या उमलत्या दृष्टीसमोर सारखीं सोनेरी स्वप्नें तरळत असतात. यौवनाचा वसंत अवतरतो, त्या उन्मादांत त्याचा आशावाद आणखीच बहरतो. मृत्यु म्हणून, पराभव म्हणून, अधःपतन म्हणून कांही ह्या दुनियेंत आहे यावर कुणाहि युवकाचा विश्वास बसणें कठीण. आणि...! वार्धक्य येतें— जीवन एक उध्वस्त, भग्न अवशेषांचा खच ठरतें. सोनेरी स्वप्नें सारीं शून्यांत विरून गेलेलीं असतात. ऐन यौवनाच्या उमेदींत आशेने मुसमुसणारा तोच युवक आज वृद्ध— घोर निराशावादी. जीवन-मरणाच्या शिवेवर घुटमळणाऱ्या त्याच्या आयुष्यावर आता निराशेचें घनदाट सावट पसरलेलें असतें. याप्रमाणे प्रकृतीच्या थपडा खात, तिच्यापुढे सारखी हार मानीत आपण एका ध्रुवाकडून दुसऱ्या ध्रुवाकडे जात असतों— कुठे ? कुणीकडे ? कुणास ठाऊक ! बुद्धदेवांच्या 'ललित विस्तार' नामक चरित्रामधील एका सुप्रसिद्ध गीताची मला येथे आठवण येते. या ग्रंथांत वर्णिलें आहे की मानवजातीच्या उद्धारासाठी बुद्धदेव अवतीर्ण झाले होते, परंतु राजवाड्याच्या विलासांमधे त्यांना स्वतःचा विसर पडला. त्यांना त्या मोहांतून जागें करण्यासाठी कांही देव-कन्यांनी येऊन एक गीत गायिलें. त्या गीताचें ध्रुवपद होतें— "धारेला लागून ह्या जीवनसरितेच्या स्रोतामधे आपण वाहत आहोंत. अविरत परिवर्तन— विराम नाही की विश्राम नाही." आहे खरें

आपलें जीवन हें असें ! अविराम गति. सारखें चाललें आहे-- खळ नाही की खंड नाही, कुठे विसावण्याचें नांव नाही. माणसानें बिचाऱ्याने काय करावयाचें ? ह्यावर उपाय काय ? ज्याला अन्नवस्त्राची ददात नाही, आवादींत लोळतो आहे, त्याला आशावादी व्हायला फावतें. दुःखदैन्याचा नामनिर्देश देखील तो टाळतो, तेवढ्यानेच त्याच्या उरांत धडकी भरते. संसारांतील क्लेश-यातनांचा पाढा त्याच्यासमोर वाचतां कामा नये. त्याला जाऊन ऐकवा की सर्वकांही चांगलें आहे, संसार अगदी मंगलमय आहे. तो म्हणत असतो-- "होय, हेंच खरें. असेंच आहे. माझेंच उदाहरण घ्या ना. हें बघा माझें छानदार राहतें घर. थंडीवाऱ्याचें अन् तहानभुकेचें मला भय नाही. म्हणून हीं असलीं बीभत्स, भयाण चित्रें माझ्यासमोर आणूं नका." पण ! दुसरीकडे कितीतरीजण थंडीने गारठून नि अन्न अन्न करीत मृत्यूच्या खाईत पिचत पडले आहेत. तुम्ही जाऊन 'त्यांना' शिकवा बघूं की सर्वकांही चांगलें आहे, जग मंगलमय आहे. बघा ते ऐकतात काय ! तुमचें म्हणणें त्यांना पटणें शक्य आहे काय ? आयुष्यांत इतक्या हालअपेष्टा, इतक्या यातना सहन कराव्या लागत असतां तुमच्या सुखाच्या, सौंदर्याच्या नि मांगल्याच्या ऐसपैस वार्ता ऐकायला ते कसें तयार होतील ? स्वतः दुःखाने होरपळत असतां इतरांनी मात्र सुखी असावें असें ते कसें इच्छितील ? ते हेंच म्हणतील की "आम्ही रडत आहोंत, मग इतरांनी काय म्हणून हसावें ? आम्ही सर्वांनाच आमच्याबरोबर टिपें गाळायला लावूं. आम्ही दुःखाने गांजलों आहोंत, सगळ्यांच्याच कपाळीं तें येवो-- त्यांतच आम्हांला शांति." असो तर, याप्रमाणे आपण आशावाद आणि निराशावाद यांमधे हिंदोळत असतों.

आणि यानंतर म्हणजे मृत्यु--जीवनाविषयीचें तें सर्वांत भयंकर सत्य ! अलम दुनिया मृत्यूच्या रोखाने धावत आहे. प्रत्येक गोष्ट धुळीला मिळते. आमची प्रगति, आमच्या मोठेपणाचा पोकळ डोलारा, आमच्या सुधारणा, आमचे विलास, आमचें ऐश्वर्य, आमचें ज्ञान, झाडून साऱ्याची एकच गति--तें कराल मृत्युमुख. जीवनांत अगदी निश्चित जर कांही असेल तर तें फक्त हेंच--मरण. नगरें वसतात नि उध्वस्त

होतात, साम्राज्यें उदयाला येतात आणि नामशेष होतात, ग्रह-नक्षत्रें तुटून फुटून चक्काचूर होतात नि त्यांची ती धूळ इतर ग्रहांवरील वायु-प्रवाह इतस्ततः उधळून देतात. अनादिकालापासून हा धिंगाणा चालूं आहे. प्रत्येक गोष्ट मृत्यूच्या वरवंटयाखाली रगडली जात आहे. मृत्युच साऱ्यांचें लक्ष्य. जीवनाची, सौंदर्याची, ऐश्वर्याची, सत्तेची, शक्तीची, इतकेंच काय पण सद्‌गुणांची देखील मृत्यु अखेर चिता पेटवून देतो. साधुसंत मरतात, पापी मरतात. फकीर मरतात नि अलमगीर पण मरतातच. मृत्यूच्या लोखंडी टाचेखाली सगळेचजण चिरडले जात आहेत. आणि तरीसुद्धा जगण्याची ही विलक्षण लालसा, जीवना-विषयीची ही भयंकर आसक्ति शिल्लक आहेच. कां कुणास ठाऊक, पण ह्या जीवनाला आम्ही कसे गोचिडासारखे चिकटून असतों. तें कांहीकेल्या सोडवतच नाही. असें कां व्हावें कांही कळत नाही. हीच—हीच 'माया'.

किती काळजीपूर्वक आई आपल्या लाडक्याचें लालनपालन करीत असते. तिचा सगळा जीव, तिचे पंचप्राण त्याच्यांत गुंतलेले असतात. तोच तिचें जीवनसर्वस्व. तो वाढतो, वयांत येतो. कदाचित् वाईट चालीचा निघून पशु निपजतो. त्याच आईला रोज लाथाबुक्क्यांचा प्रसाद देऊं लागतो. आणि तरीदेखील ती जाऊन त्याला बिलगतेच. विचारशक्ति जागी होते त्या वेळीं पुत्रवात्सल्याच्या गोंडस नांवाखाली ती तिची गळचेपी करून टाकते. हें वस्तुतः 'प्रेम' नव्हे असें तिला कधी चुकूनसुद्धा वाटत नाही. आपण कधीच झिटकारून टाकूं शकणार नाहीं असें हें एक कसलेंतरी पिशाच्च आपल्या मानगुटीला बसलें आहे ह्याची त्या बापडीला जाणीव नसते. तिने कितीहि प्रयत्न केला तरी, ती ज्या बंधनांत सापडली आहे तें तोडून फेकणें तिला शक्य नसतें. आणि—हीच 'माया' होय.

आपण सारेच कांचनमृगाच्या मागे धावत आहोंत. प्रत्येकाला वाटतें की तो आपल्या हातीं लागेल. ही आशा किती फोल आहे हें कुणाहि विचारी माणसाला समजण्यासारखें आहे. आणि तरीसुद्धा प्रत्येकजण तो लाभावा म्हणून जिवाचें रान करीतच असतो. लाभत तो कुणालाच नाही. माया ती हीच.

मृत्यु अहोरात्र या पृथ्वीतलावर पिंगा घालीत आहे. आणि तरीसुद्धा आपण चिरंजीव आहोंत अशाच भरवशानें आम्ही जगत असतों. राजा युधिष्ठिराला एकदा प्रश्न विचारण्यांत आला होता की या पृथ्वीच्या पाठीवर सर्वांत विस्मयकारक काय आहे ? सम्राटानें त्यावर उत्तर दिलें--

"अहन्यहनि भूतानि गच्छन्ति यममंदिरम् ।
शेषाः स्थिरत्वमिच्छन्ति किमाश्चर्यमतःपरम् ।।"

-- "सभोवार प्रत्यक्ष दिसत असतें की मृत्यु अहर्निश एकामागून दुसऱ्याचा सारखा फडशा पाडीत आहे. तरी उरलेले मात्र स्वतःला अमरपट्टा मिळालेला आहे अशाच थाटांत वागत असतात. यापेक्षा आणखी विस्मयकारक काय असूं शकेल !" हीच माया.

आपल्या बुद्धींतील, आपल्या ज्ञानांतील, नव्हे, आपल्या जीवनामधील प्रत्येक घटनेंतील हे विरोध आपल्याला चहूकडून भेंडसावीत असतात. एखादा समाजसुधारक कमर कसून पुढे येतो--समाजांत रुजलेल्या दोषांचा नायनाट करण्याचा त्यानें चंग बांधला असतो. त्याच्या खटाटोपाला यश येऊन ते दोष दूर होतच आहेत एवढ्यांत दुसरेच नाना दोष अन्यत्र डोकें वर काढतात. पडायला आलेल्या एखाद्या जुन्यापुराण्या वाड्यासारखी अवस्था--एका जागीं डागडुजी करा, दुसरीकडे पडझड सुरू ! भारतांतील आमचे सुधारक भारतीय स्त्रियांवर लादण्यांत येणाऱ्या सक्तीच्या वैधव्याचा गाजावाजा करून, तो दोष दूर व्हावा म्हणून अकांडतांडव करीत आहेत, तर पाश्चात्त्य देशांत मुळी लग्नेंच होत नाहीत म्हणून हलकल्लोळ. एकीकडे कुमारिका कष्टी आहेत, त्यांना मदत पाहिजे; दुसरीकडे विधवांच्या अपेष्टांना पार नाही, त्यांना मदत हवी. जुनाट संधिवातासारखें आहे हें. त्याला तुम्ही डोक्यांतून हुसकून लावा, तो तुमच्या अंगांत शिरेल. तिथून पिटाळा की पायांत येऊन हजर. विद्या, संपत्ति आणि ज्ञान हीं केवळ मूठभरांची मक्तेदारी होऊन बसलीं आहेत. ज्ञान किती महान्, किती मूल्यवान ! ज्ञानार्जन किती उदात्त! तें फक्त कांहींच्याच हातीं ? छे, हा विचारच भयंकर ! बस्, सुधारक उठतात, व्याख्यानांची झोड उठवून आमच्या कानींकपाळीं ओरडतात की विद्या, अर्थ आणि

ज्ञानार्जन केवळ निवडक कांहीजणांच्याच हातांत नसावीत. तीं सर्वसामान्य प्रत्येकाच्या वांटयास येण्यासाठी ते शिकस्त करतात. त्यामुळे कित्येक-जण अधिक सुखी होतात खरे, पण ज्ञानाच्या, संस्कृतीच्या वाढीबरोबरच शारीरिक सुखाला बहुधा उतरती कळा लागत असते त्याची काय वाट ? सुखाच्या ज्ञानाबरोबरच दु:खाचेंहि ज्ञान आलेंच ! आगींतून निघून फोफाटयांत ! ह्या पेचांतून कसें सुटावयाचें ? अगदी क्षुल्लक प्रमाणांत आम्हीं उपभोगिलेले ऐहिक भोगविलास दुसऱ्या एखाद्या जागीं त्याच प्रमाणांत दु:ख उत्पन्न करीत असतात. हा असाच नियम आहे. तरुणांना कदाचित् हें नीट कळणार नाही. परंतु या जगांत ज्यांनी चार पावसाळे काढले आहेत, यथेच्छ धडपड करून पाहिली आहे, 'जीवना'ची चव घेतली आहे, जीवनाशीं ज्यांची जानपछान झाली आहे त्यांना हें चटकन् उमजेल. ह्यालाच म्हणतात 'माया.' हें सारें असेंच अगदी अहर्निश चालूं आहे, परंतु हे सारे पेच सुटणें मात्र अशक्य आहे. 'हें असेंच कां ?' याचें उत्तर देणें असंभवनीय होय. कारण, तर्कशुद्ध स्वरूपांत जिथे मुळी प्रश्न मांडतांहि येत नाही तिथे त्याचें उत्तर तें काय देणार ? वस्तुस्थिति ही अशी आहे, बस्, तींत कां आणि कसें यांना जागाच नाही. आहे तें हें असें आहे, आणि जें कांही आहे त्यावर तोडगा नाही एवढेंच आपल्याला कळूं शकतें. ह्या वस्तुस्थितीची नुसती नीट कल्पना होणें, स्पष्टपणें तिचें चित्र मनश्चक्षूंसमोर उभें करणें देखील जिथे आमच्या शक्तीबाहेरचें आहे, तिथे उत्तर देण्याची नि उपाय शोधण्याची गोष्टच कशाला ?

ह्या संसारगतीच्या वास्तव वर्णनाचेंच नांव माया. आमच्या या दुनियेचें रहाटगाडगें कसें फिरत आहे या विषयीची सत्यकथा म्हणजेच माया. ह्या सर्व खऱ्या गोष्टी सांगितल्याने लोक घाबरतात. पण आपण धीट झालें पाहिजे. त्याखेरीज गत्यंतर नाही. वस्तुस्थिति दृष्टी-आड करणें हा कांही उपाय शोधण्याचा मार्ग नव्हे. तुम्हांला माहीतच असेल की कुत्रा पाठीस लागल्यास स्वत:च्याच पायांत डोकें खुपसून ससा स्वत:ला सुरक्षित समजत असतो. आशावादाच्या पाठीशीं लपण्यांत आपणतरी त्या सशाहून निराळें काय करीत असतों ? पण हा कांही सुटकेचा मार्ग नव्हे.

ह्या मायावादाविरुद्ध आक्षेप घेतले जातात. पण तुम्हांला आढळून येईल की जीवनांतील पुष्कळशा चांगल्या गोष्टी ज्यांच्या वांट्याला आलेल्या आहेत अशाच लोकांकडून साधारणतः हे आक्षेप घेतले जात असतात. या तुमच्या देशांत-- इंग्लंडमधे-- निराशावादी बनणें मोठें कठीण आहे ! जग किती सुरळीत चाललें आहे, त्याची किती प्रगति होत आहे याचें सुरस वर्णन इथे प्रत्येकजण येऊन मजजवळ करीत असतो. ह्या महाशयांच्या लेखीं त्यांची स्वतःची स्थिति म्हणजेच जगाची स्थिति ! तोच जुना प्रश्न फिरून उपस्थित होतो-- पृथ्वीतलावर एकमेव खरा धर्म कोणता ? ख्रिश्चनांचा ! कारण ? कारण, ख्रिस्ती राष्ट्रांची ऐहिक भरभराट होत आहे. हें तो धर्म खरा असल्याचें भरभक्कम कारण ! होय, समृद्धिशाली राष्ट्रांचा धर्मच काय तो खरा असणार ! पण हें विधान स्वतःच स्वतःला खोडून काढतें. कारण ख्रिस्ती राष्ट्रांची भरभराट ही ख्रिस्ती नसलेल्या राष्ट्रांच्या दुर्दशेवरच अवलंबून राहणार. भक्ष्य व्हायला कुणीतरी हवेंच ना ! क्षणभर कल्पना करा की सगळ्या जगाने ख्रिस्ती धर्म स्वीकारला. काय परिणाम होईल ? परिणाम हाच होईल की आजचीं गबर ख्रिस्ती राष्ट्रें आपोआप गरीब बनतील. कारण, ख्रिस्ती नसलेलीं राष्ट्रें संपुष्टांत आल्यामुळे मग कुणाचा गळा कापून ही ख्रिस्ती राष्ट्रें आपली तुंबडी भरणार ? याप्रमाणें वरील विधान स्वतःच स्वतःचें खंडन करतें. पशु वनस्पतींवर उपजीविका करतात, माणसें पशूंवर आणि पराकाष्ठेच्या खेदाची गोष्ट म्हणजे एकमेकांवर ! प्रबळ दुबळ्यांवर जगत असतात. सर्वत्र हेंच चालू आहे. आणि हीच 'माया'. काय संगति लावणार तुम्ही या साऱ्याची ? कोणता उपाय योजणार आहांत तुम्ही ह्या साऱ्यावर ? किती विलक्षण कोडें ! दररोज आपण ह्याचीं निरनिराळीं उत्तरें ऐकतों, दररोज नव्यानव्या उपपत्त्या, नवीनवीं स्पष्टीकरणें ऐकत असतों. आपली समजूत घालण्यांत येतें की अंतीं सर्वकांही ठीक होऊन जाईल. हें शक्य आहे असेंहि जरी गृहीत धरलें तरी ठीक होण्याचा हा असा सैतानीच मार्ग कां असावा ? चांगलें साधण्याची ही कुठली दानवी रीत ? चांगलें हें चांगल्या मार्गानेच कां अस्तित्वांत येऊं नये ? त्यासाठी हे अघोरी प्रकार कां आवश्यक असावेत ? आजच्या मानवांचे

म्हणे वंशज सुखी होणार आहेत. छान. पण त्यासाठी आज आमच्या कपाळीं हा असला जिवंतपणीं नरकवास काय म्हणून ? याला उत्तर ? याला उत्तर-- 'माया.' हें सारें माया आहे हेंच याचें एकमेव उत्तर. याला अन्य उत्तर नाही.

यानंतर म्हणजे, वारंवार आमच्या कानांवर येत असतें की अस्तित्वांत असलेल्या वाईटाचा क्रमशः लोप करीत जाणें हें 'क्रमविकासा'चें (डार्विनच्या Evolution चें) एक वैशिष्टय आहे, आणि याप्रमाणे दुनियेंतून वाईट सतत नाहीसें होत असल्यामुळे अखेरला निव्वळ चांगलेंच फक्त शिल्लक उरेल. ऐकायला मोठें गोड आहे हें ! आणि, सदा तृप्तीचे ढेकर देत संसारांत वावरणाऱ्या सुखवस्तु भाग्यवंतांच्या, ज्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी रोज मरमर मरावें लागत नाही किंवा या एवंगुणविशिष्ट 'क्रमविकासा'च्या जात्यांत जे भरडले जात नाहीत अशा सुखासीनांच्या दांभिकतेला तें खूप रोचक आणि पोषकहि आहे. खरोखर, अशा भाग्यवानांच्या पक्षीं तें मोठें सोईचें आणि अतिशय समाधानकारक आहे यांत मुळीच संदेह नाही. सामान्य जनता दुःखानें रडकुंडीस येते--येवो, यांना त्याची काळजी करण्याचें कांहीच कारण नाही. ती वांचो की मरो--त्यामुळे ह्यांचें काय बिनसणार आहे ? ठीक. परंतु 'क्रमविकासा'वर आधारलेला हा 'सिद्धान्त' पूर्णपणें तर्कदुष्ट आणि भ्रामक आहे. प्रथमतः म्हणजे, त्यांत असें मुळी गृहीतच धरलें गेलें आहे की आपल्या या जगांतील चांगलें आणि वाईट या दोन अगदी परस्परनिरपेक्ष वस्तु असून जगांतील त्यांचें प्रमाण ठरलेलें आहे--जगांत अमुक इतक्या प्रमाणांत चांगलें वा शुभ आहे आणि अमुक इतक्या प्रमाणांत वाईट वा अशुभ आहे. आणि द्वितीयतः, याहिपेक्षा एक अत्यंत चुकीची कल्पना त्यांत ग्राहय मानली आहे ती ही की, आपल्या जगांतील चांगल्याचें प्रमाण क्रमशः वाढत असून वाईटाचें प्रमाण सारखें घटत आहे. म्हणजे, या 'सिद्धान्ता'नुसार, 'क्रमविकासा'ने जगामधील वाईट एकसारखें कमीकमी होत असल्याकारणें शेवटीं असा एक काळ येईल की जेव्हा दुनियेंतील अवघ्या वाईटाचा संपूर्ण लोप होऊन जाईल आणि फक्त चक्क, शुद्ध चांगलेंच शिल्लक उरेल. मग सर्वत्र सदा निर्भेळ चांगलेंच चांगलें राहील,

वाइटाचें नांवहि उरणार नाही ! 'सिद्धान्त' तर काय हवे तसे बांधतां येतील, परंतु वाइटाचें प्रमाण घटत आहे असें खरोखरच सिद्ध करून दाखवितां येईल काय ? जंगलांत राहणाऱ्या रानटी माणसाचीच गोष्ट उदाहरणादाखल घ्या. मन सुसंस्कृत कसें करावें हें त्या बापड्याला ठाऊक नसतें. वाचण्याचा त्याला गंध नसतो, आणि लिहिणें तर कशाशीं खातात हेंहि त्याला माहीत नसतें. आज त्याला एखादी जबरदस्त जखम झाली तरी उद्याच तो खडखडीत बरा होतो. आणि आम्ही ? सुसंस्कृत, सुसभ्य, सुधारलेले आम्ही-- चालतां चालतां नुसती ठेच लागल्यानेहि आमचा ग्रंथ आटोपूं शकतो ! नुसत्या ओरखड्यानेहि आम्ही मरूं शकतों. यंत्रांमुळे जिनसा स्वस्त होत आहेत, यंत्रें म्हणे प्रगतीला आणि क्रमविकासाला हातभार लावीत आहेत. अगदी बरोबर ! पण त्यांनी एकाची पोळी पिकत असली तरी त्यासाठी इतर हजारो लाखोजण दळले जातात याची काय वाट ? यंत्रांच्या साहाय्याने एकजण संपत्तींत लोळतो तर त्याचबरोबर हजारोजण अधिकाधिक कंगाल बनत जातात आणि सामान्य जनता गुलामांच्या पायरीला आणून बसविली जाते. यंत्रांनी प्रगति आणि क्रमविकास हा असा होतो आहे ! आपल्या या जगाची रीतच अशी आहे. भोगांखेरीज आणखी ज्याला कांहीच माहीत नाही, भोगच ज्याचें सर्वस्व होय अशा पाशवी स्वभावाच्या माणसाचें जीवन इंद्रियांनाच खिळलेलें असतें. त्याचें सुखदुःख इंद्रियांमधेच साठविलेलें असतें. तो दुःखी होतो-- पोट भरून खायला मिळालें नाही तर, किंवा त्याच्या शरीराला कांही इजा झाली तर. त्याच्या दुःखाचीं हीं किंवा असलींच कारणें असतात. त्याचीं सुखें, त्याचीं दुःखें इंद्रियांतूनच जन्मतात आणि इंद्रियांमधेच विराम पावतात. अशा इसमाची जसजशी प्रगति होऊं लागते, त्याच्या सुखाचें क्षितिज जसजसें विस्तारूं लागतें, तसतशी त्याच्या दुःखांचीहि वृद्धि त्याच प्रमाणांत होत जाते. अरण्यांत राहणाऱ्या रानटी मानवाला मत्सर करणें, न्यायालयांत खेचलें जाणें, कर देणें, समाजाकडून निंदा होणें वगैरे भानगडी मुळीच ठाऊक नसतात. मानवाने आपल्या दानवी स्वभावाला शोभेल आणि सगळ्यांच्या मर्मांचा भेद करील असा जो एकमेकांचा भयंकर छळ चालविलेला असतो त्याने अहर्निश गांजले जाणें त्याला

माहीत नसतें. फोल ज्ञानाच्या घमेंडींत सदा आपलाच तोरा मिरविणारा एक माणसासारखा माणूस कोणत्याहि पशूपेक्षा हजारोपट सैतान कसा बनूं शकतो हें त्या बिचाऱ्याला ठाऊक नसतें. असो तर, एकूण काय की इंद्रियांना जखडलेल्या जीवनाच्या दलदलींतून आपण जसजसे बाहेर पडतों तसतशी आपली सुख भोगण्याची शक्ति वृद्धिगत होते, आणि त्याबरोबरच आपल्या दुःख भोगण्याच्या शक्तीचीहि आपोआपच वाढ होते. असें होणारच, तें टाळतां येणें शक्य नाही. ज्ञानतंतु अधिक सूक्ष्म वा संवेदनाक्षम होतात, आणि त्यामुळेच त्यांची दुःखानुभवाची शक्तिहि वाढीस लागते. सर्वच समाजांमधे आपल्याला आढळून येतें की अडाणी, सामान्य माणूस कुणीं चारदोन शिव्याहि हासडल्या तरी तितकेसें मनाला लावून घेत नाही, कुणीं त्याला चांगलें बडवलें तर त्याला वाईट वाटेल. पण तेच आमच्यांतील राजमान्य राजेश्री मात्र एखादा अधिकउणा शब्दहि सहन करूं शकत नाहीत, तेवढ्यानेच ते घायाळ होतात. राजेश्रींचे ज्ञानतंतु इतके नाजुक, हळवे झालेले असतात ! सुखोपभोगाच्या क्षमतेबरोबरच राजेश्रींचीं दुःखेंदेखील वाढलींत. 'क्रमविकास'वाद्यांना स्वतःच्या 'सिद्धान्ता'च्या पुष्टयर्थ यांतून कांही विशेष पुरावा मिळेल असें वाटत नाही ! सुख उपभोगण्याची आपली शक्ति आपण जसजशी वाढवूं तसतशीच दुःख भोगण्याचीहि आमची शक्ति वाढतच जाणार. आणि कधीकधी तर मला असेंहि वाटतें की, आमची सुखी होण्याची शक्ति गणितश्रेढीने वाढेल तर त्याचबरोबर आमची दुःखी होण्याची शक्ति भूमितिश्रेढीने वाढत जाईल. प्रगतीचा एकेक टापू आक्रमणारे आपण जाणतोंच की आपली जसजशी अधिकाधिक प्रगति होत जाते तसतसे आनंदाचे, आणि तसतसेच दुःखाचेहि निरनिराळे कितीतरी प्रदेश आपल्याला लागतात. प्रगतीबरोबरच सुखानुभूतीची, आणि सुखानुभूतीबरोबरच दुःखानुभूतीचीहि आपली शक्ति वृद्धि पावत असते, तीव्र होत असते. हीच माया.

असो तर, या साऱ्यावरून आपल्याला हेंच दिसून येतें की माया म्हणजे ह्या संसारगतीच्या स्पष्टीकरणासाठी उभा केलेला एखादा 'मतवाद' नव्हे. माया म्हणजे हें जग खरोखर कसें आहे ह्याचें नुसतें वस्तुस्थितिनिदर्शक वर्णन. आणि ती वस्तुस्थिति ही अशी की, आहे-नाहीचा,

सत्-असताचा विरोध हाच आमच्या अस्तित्वाचा पाया आहे, आणि जीवनांत आम्हांला सर्वत्र या जीवघेऊ विरोधांमधूनच मार्ग काढावा लागत असतो; जिथे चांगलें आहे तिथे वाईटहि असणारच आणि जिथे वाईट आहे तिथे थोडेंतरी चांगलें असणारच, जिथे जीवन आहे तिथे त्याच्या सावलीसारखा मृत्युहि त्याच्या पाठोपाठ असणारच, आज जो सुपांत आहे त्याला उद्या जात्यांत जावें लागणारच आणि आज जो रडत आहे, त्याला कधी ना कधी हसायला मिळेलच. आणि ह्या साऱ्यावर, या परिस्थितीवर कांही उपायहि नाही. जिथे नुसतें चांगलेंच असेल, वाइटाचा वाराहि नसेल, जिथे आपण सतत फक्त हसूंच शकूं, जिथे आपल्याला कधी रडावें लागणार नाही अशा आटपाटनगराचीं स्वप्नें आपल्याला खुशाल पडत राहोत. पण तें जात्याच शक्य नाही, कारण तिथेहि आपल्या इथल्यासारखीच परिस्थिति राहणार. जिथे म्हणून आपल्याला हसविणारी शक्ति विद्यमान आहे तिथे तिथे आपल्याला रडविणारी शक्तिहि दबा धरून बसलेली असतेच. जिथे जिथे सुख निर्माण करणारी शक्ति वसत असते तिथे तिथे आपल्याला दुःखी करणारी शक्तिहि कुठेतरी छपलेली असतेच.

सारांश, वेदान्ततत्त्वज्ञान आशावादीहि नाही आणि निराशावादीहि नाही. हे दोन्ही दृष्टिकोन तें मानतें आणि वस्तुस्थिति जशी आहे तशीच तें बघतें. तें मानतें की आपलें हें जग चांगल्याचें आणि वाइटाचें, सुखाचें आणि दुःखाचें मिश्रण आहे, आणि त्यांतील चांगल्यांत वा सुखांत भर घातल्यास वाइटांत वा दुःखांतहि आपोआपच भर पडल्याखेरीज राहणार नाही. पूर्णपणें चांगलें किंवा पूर्णपणें वाईट असें जग कधीच असूं शकणार नाही, कारण 'पूर्ण चांगलें' किंवा 'पूर्ण वाईट' हे शब्दच मुळी विरोधात्मक आहेत. जगाविषयी हें असलें मत प्रकट करून आणि वस्तुस्थितीचें हें असलें विश्लेषण करून वेदान्त एक मोठें गुह्य रहस्य आपल्याला शिकवितो की, चांगलें आणि वाईट ह्या मुळी दोन अगदी वेगवेगळ्या गोष्टीच नव्हत. या आमच्या जगांत अशी एकदेखील वस्तु नाही की जिला आपण निव्वळ चांगली म्हणूं शकूं, आणि या विश्वांत अशी एकहि वस्तु नाही की जिला आपण निव्वळ वाईट म्हणूं शकूं. जी घटना मला आज चांगली

वाटत आहे, अनुकूल वाटत आहे, तीच उद्या मला वाईट, प्रतिकूल वाटेल. जी गोष्ट एकाला दुःख देत आहे तीच दुसऱ्याला सुखी करीत असेल. ज्या अग्नीने भाजून एखादें मूल प्राणास मुकतें त्याच अग्नीवर सुग्रास स्वयंपाक करून एखाद्या भुकेने मरणाऱ्याचे प्राण वांचवितां येतील. जे ज्ञानतंतु दुःखाच्या संवेदना आंत वाहून नेतात तेच सुखाच्याहि संवेदना वाहून नेत असतात. म्हणून, वाईट थांबविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे चांगलेंहि थांबविणें हाच होय, दुसरा मार्ग नाही. मृत्यु थांबवावयाचा असेल तर जीवनहि थांबवावें लागेल. कारण, मृत्युरहित जीवन आणि दुःखरहित सुख हे शद्बच विरोधात्मक आहेत. या जोडीतील कोणतेंहि एक हें दुसऱ्याहून अजीबात वेगळेपणाने कधीहि आढळणें शक्य नाही, कारण तीं दोन्हीहि एकाच वस्तूचे केवळ दोन वेगवेगळे आविष्कार आहेत. काल मला जी गोष्ट चांगली वाटत होती ती आज चांगली वाटेनाशी झाली आहे. मी जेव्हा स्वतःच्या आयुष्याचें सिंहावलोकन करतों आणि निरनिराळ्या वयांत माझे काय काय आदर्श होते हें बघूं लागतों तेव्हा मला हें चांगलें पटतें. आयुष्यांत एके काळीं उमद्या घोड्यांची जोडी हाकावी असें माझें ध्येय होतें; एक विशिष्ट मिठाई करतां आली तर मी अगदी पूर्णपणें सुखी होईन असें मला एकदा वाटत होतें; पुढे माझी अशी कल्पना होती की जर मला सुस्वरूप बायको, गोंडस मुलें आणि रग्गड पैसा लाभला तर माझ्यासारखा सुखी मीच होईन. आज ह्या सर्वच कल्पना पोरकटपणाच्या वाटून मला त्यांचें हसूं येतें.

वेदान्त म्हणतो की, गतजीवनाचा आढावा घेतांना, ज्या आदर्शांचा अवलंब केल्याने स्वतःच्या व्यक्तित्वाचा नाश होण्याची भीति आम्हांला वाटते त्यांच्याकडे बघून हसूं यावें असा समय आमच्या आयुष्यांत केव्हा ना केव्हा तरी येतोच येतो. आपल्यापैकी प्रत्येकाला स्वतःचा देह खूप खूप दिवस टिकवून ठेवण्याची इच्छा असते. त्याने आपण खूप सुखी होऊं असें आपल्याला वाटतें. पण आपल्या आयुष्यांत अशी एक वेळ येईल की ज्या वेळीं आपण या कल्पनेला हसूं. आणि असेंच जर असेल तर मग उघडच आहे की आपण एका भयंकर विरोधपूर्ण अवस्थेंत सापडलों आहोंत — ना धड

आहे ना धड नाही, ना धड सुख ना धड दु:ख -- आहे त्यांचें विचित्र संमिश्रण ! आणि असेंच असेल तर मग ह्या वेदान्ताचा, भाराभर तत्त्वज्ञानांचा आणि धर्मांचा तरी काय उपयोग ? आणि याहिपेक्षा म्हणजे मग चांगलीं कामें करण्याचा तरी काय उपयोग ? हा प्रश्न मग भंडावूं लागतो. हें जर खरें असेल की वाईट केल्याखेरीज तुम्ही चांगलें करूंच शकणार नसाल, आणि जेव्हा जेव्हा तुम्ही सुख उत्पन्न करण्याचा प्रयत्न कराल तेव्हा तेव्हा दु:खहि निर्माण झाल्याखेरीज राहणारच नसेल तर मग लोक तुम्हांला हें निश्चितच विचारणार की "मग चांगलें करण्याचा काय उपयोग?" याचें उत्तर असें की, प्रथमत: म्हणजे दु:ख कमी करण्यासाठी आपण झटलेंच पाहिजे, कारण स्वत:ला सुखी करण्याचा तोच एकमेव मार्ग होय. आपल्यापैकी प्रत्येकाला स्वत:च्या आयुष्यांत हें केव्हातरी उमजतें. जे बुद्धिवान असतात त्यांना तें अमळ लवकर उमजतें आणि निर्बुद्ध लोकांना टक्केटोणपे खाऊन जरा उशीरा. निर्बुद्ध लोकांना हें ज्ञान फार महागांत पडतें, शहाण्यांना अमळ कमी चाट बसते. द्वितीयत:, आपल्याला आपला वांटा उचललाच पाहिजे, आपल्याला आपलें काम केलेंच पाहिजे, कारण या विरोधांची कोंडी फोडण्याची हीच एकमेव युक्ति आहे. आपण आपल्या स्वप्नांतून जोंवर जागें होणार नाहीं, जोंवर हें गंजिफांचे वाडे वसविणें थांबविणार नाहीं तोंवर चांगल्या आणि वाईट शक्ति हें संसाराचें मृगजळ आमच्या दृष्टीसमोर असेंच सारखें नाचवीत राहतील. म्हणून तो धडा आपल्याला शिकावाच लागेल. आता हें खरें की तो शिकायला आपल्याला फार फार वेळ लागणार आहे. असो.

वेदान्त म्हणतो की अनंतच सान्त झालें आहे. जर्मनीमधे याच पायावर एक तत्त्वज्ञान उभारण्याचा प्रयत्न केला गेला आहे. इंग्लंडमधेहि असे प्रयत्न होत आहेत. या सर्व तत्त्वज्ञांच्या मतांचें विश्लेषण केल्यास त्या सर्वांचें म्हणणें असें असल्याचें आढळून येतें की, तें अनंत या विश्वाच्या रूपाने व्यक्त होण्याचा प्रयत्न करीत असून अशी एक वेळ येईल की ही क्रिया पूर्ण होऊन अनंत स्वत:ला पूर्णपणें व्यक्त करण्यास समर्थ होईल. हें सारें ठीक आहे, आणि आपण अनंत,

आविष्कार, अभिव्यक्ति वगैरे मोठमोठे शब्दहि वापरले आहेत खरे, पण विचारवंत लोक आपल्याला यावर साहजिकच विचारतील की सान्तामधे अनंताची पूर्ण अभिव्यक्ति होऊं शकते या तुमच्या विधानाला तर्कसंगत असा काय आधार आहे ?— एकच वस्तु एकाच वेळीं सान्त आणि परत अनंतहि कशी असूं शकेल ? निरपेक्ष आणि अनंत सत्ता उपाधींमधूनच विश्वाचें रूप धारण करूं शकते. आणि उपाधि म्हणजेच तर मर्यादितपणा, सान्तता ! म्हणून विश्व नेहमीच मर्यादित, सीमाबद्ध राहणार. जें जें म्हणून इंद्रियांना, मनाला वा बुद्धीला गोचर होईल तें तें सोपाधिक म्हणजे मर्यादितच असणार. सान्त कधीच अनंत होऊं शकणार नाही, तसें म्हणणें अगदी वेडगळ-पणाचें आहे.

याउलट वेदान्त असें म्हणतो की, निरपेक्ष वा अनंत सत्ता सान्त रूपांमधे व्यक्त होण्याचा प्रयत्न करीत आहे हें खरें, पण त्याचबरोबर हेंहि खरें की अशी एक वेळ येईल की ज्या वेळीं हें अशक्य आहे असें तिला आढळून ती या प्रयत्नापासून परावृत्त होऊन माघार घेईल— निवृत्त होईल. ह्या माघार घेण्याला, ह्या निवृत्तीलाच म्हणतात वैराग्य. हें वैराग्यच धर्माचा खरा प्रारंभ होय. असे दिवस आले आहेत की आज वैराग्याविषयी नुसतें बोलणें देखील कठीण होऊन बसलें आहे. अमेरिकेंत लोक माझ्याविषयी असें म्हणत असत की पांच हजार वर्षांपूर्वीच मरून बेपत्ता झालेल्या देशांतून हा इसम आलेला असून वैराग्याचा उपदेश करीत हिंडत आहे. इंग्रज तत्त्वज्ञहि बहुधा असेंच म्हणत असावेत. म्हणोत बापडे. त्यांनी कांहीहि म्हटलें तरी हें अबाधित सत्य आहे की त्याग-वैराग्यच धर्मलाभाचा एकमेव मार्ग होय. अंगीं वैराग्य बाणवा, त्याग करा.' येशूंनी काय सांगितलें होतें ? "जो माझ्यासाठी जीवन हरवितो त्यालाच खरें जीवन सापडतें." त्यांनी पुन्हापुन्हा ललकारून सांगितलें आहे की त्याग-वैराग्यच पूर्णत्वप्राप्तीचा एकमेव मार्ग होय. हवा तितका आटापिटा करून बघा, पाहा आणखी दुसरा एखादा मार्ग सापडूं शकतो काय तें. तें अगदी असंभाव्य आहे. अशी एक वेळ येते की जेव्हा आपला अंतरात्मा ह्या लांबच लांब, भयाण, उदासवाण्या स्वप्नांतून जागा होतो—

खेळणीं भिरकावून देऊन मूल आईला बिलगण्यासाठी आतुर होऊन जातें. आपल्याला उमजतें की "भोगांनी वासना कदापि शमत नसते, उलट अग्नींत तूप टाकल्याप्रमाणे होऊन ती आणखीच भडकत असते." हें सर्वच इंद्रियसुखांना लागू आहे, तें सर्व बौद्धिक सुखांनाहि लागू आहे, मानवी मनाला शक्य अशा सर्वच भोगसुखांना तें लागू आहे. हीं सारींच सुखें असार आहेत, मिथ्या आहेत, या 'माये'च्या अंतर्गत आहेत, देश-काल-निमित्ताचें जें जाळें आपण कदापि छेदूं शकत नाहीं त्या जाळ्याच्या आंतमधलींच आहेत. या जाळ्यांत तुम्ही अनंत काल भटकलांत तरी शेवट असा कुठेच व्हायचा नाही. आणि थोडेसें सुख मिळविण्याची आपण धडपड करीत असतांनाच दुःखाचे ढीगचे ढीग आपल्यावर येऊन कोसळतात. शिव शिव, किती केविलवाणी दशा ही ! किती भयंकर ! जेव्हा जेव्हा मी ह्या साऱ्याविषयी विचार करतों तेव्हा तेव्हा मला अगदी निःसंदेहपणें वाटूं लागतें की हा मायेचा सिद्धान्त, हें सारेंकांही माया आहे हा सिद्धान्तच या साऱ्याचें एकमेव आणि सर्वोत्कृष्ट स्पष्टीकरण आहे. ह्या जगांतल्या दुःखाला कांही माप नाही. आणि तुम्ही जर निरनिराळ्या देशांत भ्रमण कराल तर तुम्हांला आढळून येईल की एक समाज स्वतःतील वाईट एका उपायाने दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे तर दुसरा दुसऱ्याच एखाद्या उपायाने. निरनिराळे समाज एकाच दोषाला वेगवेगळ्या उपायांनी आळा घालण्याचा प्रयत्न करीत असतात, पण कोणीच कृतकार्य होऊं शकला नाही. आणि एकीकडे काही दोष दबले असतील तर दुसरीकडे त्यांना ऊत आलेला आढळून येईल. हें असेंच चाललें आहे. स्वतःच्या समाजांत सतीत्वाचा दर्जा उच्च ठेवण्यासाठी हिंदूंनी बालविवाहाची प्रथा पाडली. काय झालें ? अखेर त्या प्रथेनेच हिंदुजातीचा अधःपात केला. पण त्याबरोबरच हेंहि नाकबूल करतां यावयाचें नाही की हा बालविवाह समाजांतील सतीत्वाला पोषक आहे. तुम्ही काय पसंत करतां ? तुम्हांला जर एखाद्या समाजांतील सतीत्व वाढवावयाचें असेल तर त्याच्यांतील स्त्री-पुरुषांची बालविवाहाने शारीरिकदृष्टया खच्ची करून टाका. दुसरीकडे बघितल्यास तुम्हां इंग्लंडमधल्या लोकांची स्थिति कांही

विशेष चांगली आहे काय ? नाही ना ? कारण सतीत्वच राष्ट्राची जीवनशक्ति होय. एखाद्या राष्ट्राच्या मृत्यूचें पहिलें चिन्ह म्हणजे सतीत्वाचा लोप अशीच इतिहासाची साक्ष नाही काय ? त्याला सुरुवात झाली की मग त्या समाजाचा नाश उमरठ्याशींच म्हणून समजावें. मग या दुःखावर तोडगा काय ? आईबाप जर आपल्या मुला-मुलींच्या जीवनसहचरांची निवड करून देतील तर हा दोष कमी होण्याची शक्यता आहे. भारतांतल्या मुली भावनेपेक्षा व्यवहाराला जास्त प्राधान्य देतात. पण त्यामुळे त्यांच्या जीवनांत फारच थोडें काव्य उरतें. परत, मुलामुलींनी स्वतःच जरी आपला जीवनसहचर निवडला तरी त्यानेहि त्यांना कांही मोठेसें सुख लाभतांना दिसत नाही. भारतीय स्त्री सर्वसाधारणपणें बरीच सुखी आढळेल. नवरा-बायकोंतील कलागती त्या मानाने तिथे कमीच. उलटपक्षीं, या बाबतींत जिथे सर्वांत जास्त स्वातंत्र्य आहे त्या अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत दुःखी घरें आणि अपेशी लग्नें यांची संख्या फार मोठी आहे. दुःख इथेहि आहे, दुःख तिथेहि आहे. हें सारें काय दर्शवितें ? हें सारें हेंच दर्शवितें की अखेर या सर्व उपायांनी कांही मोठेसें सुख लाभलेलें नाही. आपण सर्वजण सुखासाठी धडपडत आहोंत, आणि एकीकडे थोडेसें सुख मिळतें न मिळतें तोंच दुसरीकडे दुःख दत्त म्हणून येऊन उभें राहतें.

तर मग काय आपण भल्यासाठी कर्मे करूं नयेत ? जरूर करावींत— पूर्वीपेक्षाहि जास्त उत्साहाने करावींत. तथापि ह्या साऱ्या ज्ञानाने होईल तें हेंच की त्याने आपला कडवेपणा, स्वमताविषयीचा दुरभिमान आणि माथेफिरूपणा दूर होईल. हें ज्ञान असल्यास इंग्रज मग आपला कट्टरपणा सोडून देईल आणि हिंदूंना शिव्याशाप देण्याचें थांबवील. इतर जातींच्या आचारांना मान देण्यास तो शिकेल. दुराग्रह, स्वमतान्धता कमी होऊन खरें काम अधिक होईल. स्वमतान्ध लोक काम करूं शकत नसतात, त्यांची तीनचतुर्थांश शक्ति अशीच वाया जात असते. ज्याचें डोकें नेहमी ताळ्यावर राहतें, जो शांत आणि व्यवहार्य असतो तोच काम करीत असतो. सारांश, या ज्ञानाने आपली काम करण्याची शक्ति वाढेल. वस्तुस्थिति ही अशी आहे, दुनियेचें रहाटगाडगें हें असेंच

चालावयाचें हें जाणून असल्यामुळे आपल्या अंगीं अधिक सबुरी अधिक सोशीकपणा येईल. जगांतील दुःख किंवा वाईट बघितल्याने आपला तोल सुटून आपण छायांच्या पाठीमागे धावायला लागणार नाहीं. जगांत हें असेंच चालणार हें जाणल्यामुळे मग आपल्या अंगीं सहिष्णुता बाणेल. उदाहरणार्थ, सगळीं माणसें जरी चांगलीं झालीं तरी तोंवर पशूंचा क्रमविकास होऊन तीं माणसें बनतील आणि मग त्यांनाहि ह्याच अवस्थेंतून जावें लागेल. असेंच वनस्पतींचेंहि. मात्र एक गोष्ट अगदी निश्चित आहे आणि ती ही की, ही प्रचंड नदी समुद्राकडे धावत आहे, आणि तिच्या प्रवाहामधला प्रत्येक बिंदु यथाकाळीं त्या असीम सागरास जाऊन मिळणार आहे. दुःख, आणि कष्ट, सुख आणि दुःख, हसूं आणि रडूं यांनी भरलेल्या या जीवनांत ही एक गोष्ट अगदी निश्चित आहे की सर्वचजण आपल्या त्या लक्ष्याकडे धावत आहेत, आणि वेळेचाच काय तो प्रश्न, पण अखेर तुम्ही, मी, वनस्पति, पशु— नव्हे, जीवनाचा प्रत्येक कण पूर्णत्वाच्या त्या अनंत समुद्राला जाऊन मिळणार आहे, मुक्त होणार आहे, भगवंताच्या चरणांना स्पर्श करूं शकून कृतकृत्य होणार आहे.

मला आपल्याला फिरून एकवार सांगावेसें वाटतें की वेदान्ताचा दृष्टिकोन आशावादीहि नाही आणि निराशावादीहि नाही. हें जग निव्वळ वाइटच आहे किंवा निव्वळ चांगलेंच आहे असें वेदान्त मुळीच म्हणत नाही. त्याचें असें म्हणणें आहे की आपल्या वाइटाची किंमत आपल्या चांगल्यापेक्षा मुळीच कमी नाही, आणि आपल्या चांगल्यालाहि आपल्या वाइटापेक्षा जास्त किंमत मुळीच नाही. तीं परस्परसंलग्न आहेत. जग हें असें आहे, आणि हें जाणून आपण शांतपणें, सहनशील बनून काम करीत गेलें पाहिजे. कशासाठी ? आपण कशासाठी काम करावयाचें ? वस्तुस्थिति जर अशीच असेल, जगाचें रहाटगाडगें जर असेंच चालणार असेल तर मग आम्हीं काय करावें ? मग आम्ही अज्ञेयवादी कां बरें बनूं नये ? आधुनिक अज्ञेयवाद्यांनाहि हें जाणवतें की या प्रश्नाला कांही उत्तर नाही, आमच्या वेदान्ताच्या भाषेंत म्हणजे या मायेच्या जाळ्यांतून सुटण्याचा कांही उपाय नाही; आणि म्हणून आहे त्यांतच संतुष्ट राहून जीवनाचा

उपभोग घ्या असें हे अज्ञेयवादी आम्हांला सांगत असतात. पण यांत त्यांची एक फार मोठी चूक होत आहे, ते अगदी तर्कविरोधी उपदेश करीत आहेत. आणि ती चूक अशी की, ते जीवन कशाला म्हणतात ? केवळ इंद्रियांच्या सुखांत लोळण्यालाच ते जीवन म्हणतात काय ? त्या बाबतींत तर पशूंमधे आणि आपल्यांत फारच थोडा फरक आहे. माझी खात्री आहे की येथे आपल्यांत असा कुणीहि नसेल की ज्याचें जीवन केवळ इंद्रियांनाच खिळलेलें आहे. याचाच अर्थ असा की जीवन हें इंद्रियसुखांपेक्षा आणखी कांहीतरी अधिक आहे. आपल्या भावना, आपले विचार आणि आपल्या आकांक्षाहि आपल्या जीवनाचें अंगच होत; आणि एका महान् आदर्शासाठी, पूर्णत्वासाठी केलेली धडपडदेखील आपण ज्याला जीवन म्हणतों त्याचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक नव्हे काय ? अज्ञेयवाद्यांच्या मतें जीवन जसें आहे तशाच स्वरूपांत आपण त्याचा उपभोग घ्यावयास हवा. परंतु आमच्या क्षुल्लक सुख-दुःखांबरोबरच, नव्हे, त्या साऱ्यांपेक्षा एक मोठी गोष्ट आमच्या जीवनांत असते, तिनेच आमच्या जीवनाला अर्थ येत असतो; ती म्हणजे आदर्शाचें अन्वेषण. पूर्णत्वाकडे जाणें हेंच खरोखर जीवनाचें सार आहे. तें आम्हीं कसें सोडायचें ? कां सोडायचें ? आणि म्हणूनच आम्ही अज्ञेयवादी होऊं शकणार नाहीं किंवा जग जसें भासतें तसेंच तें आहे असें मानू शकणार नाहीं. आयुष्यांतून हा आदर्शरूपी घटक वजा करून जें उरतें त्यालाच अज्ञेयवादी जीवन म्हणत असतात. अज्ञेयवाद्यांचें म्हणणें असें असतें की हा आदर्श मानवी ज्ञानाला अगोचर आहे, तो हातीं लागणें अशक्य आहे, मग हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यांत काय अर्थ आहे ? म्हणून त्या आदर्शाच्या प्राप्तीचा प्रयत्न सोडून देऊन आपण जीवनाचा उपभोग घेतला पाहिजे. परंतु हा आदर्श वगळल्यास, हें पूर्णत्व वजा केल्यास जें उरतें, अज्ञेयवादी ज्याला जीवन म्हणतात तें म्हणजेच माया होय-- ही प्रकृति, हें विश्व माया होय असा वेदान्ताचा सुनिश्चित सिद्धान्त आहे.

प्रत्येक धर्म म्हणजे ह्या प्रकृतीच्या, या मायेच्या पलीकडे जाण्याचा एकेक लहान-मोठा प्रयत्न होय. मग तो धर्म अगदी निकृष्ट असो की अत्यंत विकसित असो, तो पौराणिक कथा, प्रतीकें वा देव-देवदूत-दानवांच्या

चरित्रांमधून वा ऋषि-मुनींच्या वा अवतार-महापुरुषांच्या चरित्रांमधून व्यक्त झालेला असो की सूक्ष्म तत्त्वज्ञानांतून व्यक्त झालेला असो, प्रत्येक धर्माचें लक्ष्य एकच आहे, ते सगळेच ह्या बंधनांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे ते सगळेच स्वाधीनतेकडे म्हणजेच मुक्तीकडे झेपावत आहेत-- मुक्तीसाठी धडपडत आहेत. कळत न कळत माणसाला जाणवत असतें की आपण बंधनांत आहों--बद्ध आहों, जसें असावें अशी आपली इच्छा आहे तसें आपण नाहीं. ज्या क्षणीं त्याने आपल्या भोवताली बघण्यास सुरुवात केली त्याच क्षणीं हें त्याला कळून चुकलें. त्याच क्षणीं त्याला कळून चुकलें की तो बंधनांत अडकलेला आहे, बद्ध आहे. आणि त्याबरोबरच त्याला हेंहि आढळून आलें की त्याच्या आंतमधे असें कांहीतरी आहे की ज्याला दूर दूर उडून जावेसें वाटतें-- जिथे देह मागोमाग येऊं शकणार नाही अशा कुठेतरी निघून जावेसें वाटतें, पण व्यर्थ, तें या बंधनांनी जखडलेलें आहे. अगदी निकृष्ट प्रतीच्या धर्मांतसुद्धा-- बलदंड, क्रूर, आपल्या नातेवाइकांच्या घरांभोवती घिरट्या घालणारे, रक्त-पिपासु, सुराप्रिय मृत पितर ज्यांत पूजिले जातात त्या साऱ्या धर्मां-मधेसुद्धा हा एक सामान्य घटक, ही मुक्तीची अभिलाषा आढळून येते. देवदेवतांची पूजा करणाऱ्या माणसाला त्यांच्या ठिकाणीं त्याच्या स्वतःपेक्षा अधिक स्वाधीनता दिसत असते-- इतर कशाहि-पेक्षा तीच त्याला जास्त लोभनीय वाटत असते. दरवाजा बंद असला तरी देव त्यांतून आंत येऊं शकतो, भिंतींचें बंधन देवाला नाही अशी त्याची श्रद्धा असते. ही स्वाधीनतेची कल्पना वाढत वाढत अंतीं सगुण ईश्वराच्या धारणेचा उदय होतो. या प्रकृतीच्या बंधनांच्या पलीकडे असलेला, ह्या मायेच्या पलीकडे असलेला पुरुष असें त्या सगुण ईश्वराच्या स्वरूपाचें वर्णन करतां येईल. माझ्या दृष्टीसमोर जणु एक दृश्य तरळूं लागतें-- भारतवर्षांतील एका निर्जन वनांतील आश्रमांत कांही प्राचीन आर्य ऋषि ह्या प्रश्नांची चर्चा करीत आहेत. आणि, तिथे वयोवृद्ध, तपोवृद्ध ज्येष्ठांनाहि हें कोडें उलगडत नाहीसें बघून त्या ऋषि-समुदायांतून एक तरुण ऋषिकुमार उभा राहून घोषणा करीत आहे--

"श्रृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्राः
आ ये धामानि दिव्यानि तस्थुः ।

. . . . . . . . . . . . . . . . .

वेदाहमेतं पुरुषं महान्तम्
आदित्यवर्णं तमसः परस्तात् ।
तमेव विदित्वा अतिमृत्युमेति
नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ॥"

-- "ऐका, अमृताच्या पुत्रांनो आणि हे दिव्यधामीं वास करणाऱ्यांनो ऐका, मला मार्ग सापडला आहे. जो ह्या अज्ञानान्धकाराच्या पलीकडे आहे त्या परम पुरुषाला जाणल्यानेच आपण मृत्यूवर मात करूं शकूं."*

ही माया—ही सगळीकडे आहे. तिने आपल्याला चहू बाजूंनी घेरून टाकलें आहे. ही माया भयंकर आहे. पण आपल्याला तिच्यांतूनच मार्ग काढून कार्य करीत जावयाचें आहे. हें सगळें जग चांगलें झाल्यावर मी कार्य करीन आणि आनंद आस्वादीन असें म्हणणाऱ्याला, "प्रवाहांतील सारें पाणी समुद्रांत वाहून गेल्यानंतर मी चालत चालत नदीपार जाईन" असें ठरवून गंगेच्या काठीं जेठा मारून बसणाऱ्या इसमाइतकेंच यश मिळण्याचा संभव ! आपल्याला मार्ग क्रमायचा आहे—मायेच्या हातांत हात घालून नव्हे, तर तिच्याशीं दोन हात करीतच. हा आणखी एक धडा आपल्याला शिकायचा आहे. आपण प्रकृतीचे साहाय्यक म्हणून जन्माला आलेलों नाहीं, तर तिचे प्रतिस्पर्धी म्हणून. आपण तिचे स्वामी आहोंत, पण तिच्या बंधनांनी आपण स्वतःला जखडून घेतलें आहे. हें—हें घर इथे कुठून आलें ? निसर्गाने वा प्रकृतीने तर तें बांधलें नाही ना ? प्रकृति तर म्हणत असते की—"जा, जंगलांत जाऊन राहा." माणूस म्हणतो—"नाही, मी एक घर बांधीन आणि ह्या प्रकृतीशीं झगडीन." आणि तो आपलें म्हणणें खरें करून दाखवितोहि. मानवाचा उभा इतिहास म्हणजे ह्या तथाकथित प्रकृतीच्या नियमांशीं त्याने सतत दिलेल्या लढ्याचाच वृत्तान्त होय. आणि ह्या लढ्यांत अखेर माणूसच जिंकतो. अंतर्जगाकडे वळल्यास तिथेहि तोच संग्राम चाललेला असतो—तिथेहि मानवाच्या

* श्वेताश्वतर उपनिषद् २.५; ३.८

पाशवी आणि आध्यात्मिक प्रवृत्तींचा संघर्ष, अंधार-उजेडाचा झगडा चाललेला असतो, आणि येथे, या अंतर्जगांतहि माणसाचाच जय होत असतो. या प्रकृतीमधून, या मायेमधून रस्ता कापीत तो मुक्ति गाठीत असतो.

सारांश, आपण बघितलेंच की वेदान्त तत्त्वज्ञांना ह्या मायेच्या पलीकडे असें कांही गवसलें आहे की जें त्या मायेच्या अधीन नाही, आणि आपण जर तिथपर्यंत पोहोचूं शकलों तर आपणहि मायेच्या कचाटयांतून सुटूं शकूं, आपणहि मग या मायेने बांधलेले राहणार नाहीं. कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत ही कल्पना सर्वच धर्मांमधे आढळून येते. परंतु वेदान्ताच्या मतें ती धर्माचा केवळ प्रारंभ होय, पर्यवसान नव्हे. सगुण ईश्वराची ही कल्पना, ह्या विश्वाचा स्रष्टा आणि शास्ता म्हणून वर्णिलेला तो पुरुष, या मायेचा वा प्रकृतीचा तो नियंता म्हणजे वेदान्तमताचा शेवटचा टप्पा नव्हे, तिथून वस्तुतः खऱ्या वेदान्ताची सुरुवात होते. मायाधीश ईश्वर-विषयक ही धारणा हळूहळू अधिकाधिक विकसित होत होत अखेर वेदान्ताच्या साधकाला अनुभूति लाभते की ज्या आदि पुरुषाला तो स्वतःच्या बाहेर उभा असलेला समजत होता तो वस्तुतः त्याच्या स्वतःच्या आंतच आहे— नव्हे, तो स्वतः आणि तो परम पुरुष एकच होत, तो स्वतःच तो पुरुष आहे. तो साधक स्वतःच तो नित्य-शुद्धबुद्धमुक्त आत्मा असून मायिक उपाधींना खरें मानल्यामुळे बंधन ओढवून, तो स्वतःला चुकीने खरोखरच बद्ध समजत होता.

# माया आणि ईश्वरविषयक कल्पनेचा क्रमविकास

( २० ऑक्टोबर १८९६ रोजीं लंडन येथे दिलेलें व्याख्यान )

अद्वैत वेदान्ताच्या जणु पायाभूत तत्त्वांपैकी एक असा हा मायावाद बीजरूपाने वेदांच्या संहिताभागामधे कसा आढळतो हें आपण बघितलेंच. वास्तविक पाहतां उपनिषदांमधे विकसित स्वरूपांत आढळणारीं सर्वच तत्त्वें कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत संहितांमधे आधीचींच असल्याचें निदर्शनास येतें. तुमच्यापैकी बहुतेकांचाच बहुधा एव्हाना या मायावादाशीं नीट परिचय झाला आहे, आणि म्हणून तुम्हांला माहीत असेल की कित्येकदा मायेचा अर्थ चुकीने भ्रम असा करण्यांत येतो, आणि त्यामुळे हें जग माया आहे असें म्हणतांच हें जग भ्रम वा भुलवण आहे असें समजलें जातें. माया शब्दाचा हा अर्थ योग्यहि नाही आणि बरोबरहि नाही. माया म्हणजे एखादें विशिष्ट 'मत' नव्हे, माया म्हणजे हें आपलें विश्वचक्र, हें संसारचक्र कसें चाललें आहे ह्याचें केवळ वस्तुनिष्ठ वर्णन होय. ही माया समजून घेण्यासाठी आपल्याला संहितांपर्यंत जावें लागेल आणि तिच्यासंबंधीच्या प्रारंभिक कल्पनेपासून सुरुवात करावी लागेल.

देवांसंबंधी कल्पना कशी उद्‌भवली हें आपण पाहिलेंच आहे. त्याबरोबरच आपल्याला हेंहि अवगत आहे की प्रथम हे देव म्हणजे केवळ कित्येक शक्तिशाली पुरुष होते, इतकेंच. ग्रीक म्हणा की हिब्रू म्हणा की पारशी म्हणा की आणखी कोणतेहि म्हणा, जुने धर्मग्रंथ वाचतांना तुमच्यापैकी बहुतेकांना हें वाचून धक्काच बसतो की त्यांत वर्णिलेल्या प्राचीन देवांनी कधीकधी तुम्हांआम्हांला अगदी किळस येईल अशीं कृत्यें केलीं आहेत. परंतु हे ग्रंथ वाचतांना आपण अगदी सपशेल विसरूनच जातों की आपण ह्या एकोणिसाव्या शतकांतले लोक असून हे देव म्हणजे हजारो वर्षांपूर्वीच्या व्यक्ति होत. आपण हेंहि विसरतों की जे लोक ह्या देवांची पूजा करीत होते त्यांना त्या

देवांच्या चारित्र्यांत कांहीच अयोग्य किंवा विसंगत वाटत नव्हतें, त्या देवांच्या वर्णनांत भीति वाटेल असें त्यांना कांहीच आढळत नव्हतें, कारण ते त्यांचे देव पुष्कळांशीं त्यांच्याचसारखे होते. ह्या बाबतींत मी असें म्हणूं इच्छितों की, आपण अगदी आपल्या आयुष्यभर गिरवावा असा हा एक मोठाच धडा आहे. दुसऱ्यांविषयी मत बनवितांना आपण नेहमी स्वतःच्याच कल्पनांनी वा आदर्शांनी त्यांना जोखत असतों. सदा आपल्याच मापानें आपण लोकांना मापत असतों. हें उचित नाही, हें वांच्छनीय नाही. ज्याच्या त्याच्या स्वतःच्या आदर्शानुसारच कुणाचीहि पारख व्हावयास हवी, दुसऱ्या एखाद्याच्या आदर्शानुसार नव्हे. आपल्या भोवतालच्या लोकांशीं वागतांना आपण नेहमीच ही चूक करीत असतों, आणि माझें असें मत आहे की आपलीं जीं एकमेकांशीं भांडणें होत राहतात त्यांपैकी बहुतेकांचें एकमेव कारण केवळ हेंच असतें की आपण सदाच स्वतःच्या देवाच्या तुलनेने दुसऱ्यांच्या देवांचा, स्वतःच्या आदर्शाच्या तुलनेने दुसऱ्यांच्या आदर्शांचा आणि स्वतःच्या हेतूंच्या तुलनेने दुसऱ्यांच्या हेतूंचा विचार करीत असतों, त्यांना भलेंबुरें ठरवीत असतों. कांही विशिष्ट परिस्थितींत मीं एखादी विशिष्ट गोष्ट केली असेल; झालें, दुसऱ्या कुणाला तसेंच वागतांना बघतांच मी एकदम ठरवून मोकळा होतों की मीं ज्या हेतूने ती गोष्ट केली त्याच हेतूने याहि इसमाने ती ती गोष्ट केली आहे; माझ्या हें अगदी स्वप्नांतहि येत नाही की वरकरणी कार्य जरी सारखेंच दिसत असलें तरी कितीतरी निरनिराळ्या कारणांनी तें घडून आलें असणें शक्य आहे. मला त्या कार्यास प्रवृत्त करणाऱ्या हेतूपेक्षा अगदी वेगळ्याच हेतूने कदाचित् त्या इसमाने तें कार्य केलें असेल. म्हणून, त्या प्राचीन धर्मांविषयी विचार करतांना आपण आपलाच लाडका दृष्टिकोन वापरण्याच्या भरीस कदापि न पडलें पाहिजे, तर त्या जुन्या जमान्यांतले विचार आणि आचार यांच्याशीं समरस होऊनच आपण त्यांच्यासंबंधी मत बनविलें पाहिजे.

बायबलाच्या जुन्या भागांतील क्रूर आणि बेदरकार जिहोवाचें वर्णन वाचून पुष्कळांना कापरें भरतें. मी म्हणतों, असें कां व्हावें ?

त्या प्राचीन यहुदी लोकांचा जिहोवा हा ईश्वराविषयीच्या आमच्या आजच्या रूढ कल्पनेशीं जुळलाच पाहिजे असा हट्ट धरण्याचा तुम्हां-आम्हांला खरोखर काय अधिकार आहे ? शिवाय, हेंदेखील आपण विसरतां कामा नये की आपल्या नंतर अशीं माणसें जन्माला यावयाचीं आहेत की, आम्ही जसें त्या प्राचीनांना हसतों, हुबेहूब त्याचप्रमाणे त्या पुढल्या पिढ्याहि धर्मासंबंधीच्या नि ईश्वरासंबंधीच्या आमच्या आजच्या कल्पनांना हसणार आहेत. तथापि ह्या साऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या कल्पनांमधून ऐक्याचा एक सोनेरी धागा ओवलेला आहे — त्या साऱ्यांना एक मूलभूत असा सर्वसाधारण पाया आहे. हा धागा, हा पाया कोणता हें शोधून काढणेंच वेदान्ताचें उद्दिष्ट होय. "एकेक भाव म्हणजे एकेक मणि असून मी त्या साऱ्यांना एकत्र गुंफणारा दोरा आहें"—असें भगवान श्रीकृष्णांनी म्हटलें आहे. आणि, आजच्या कल्पनांनुसार त्या सर्व जुन्या कल्पना कितीहि विसंगत व कितीहि किळसवाण्या वाटल्या तरी ईश्वरविषयक त्या सर्व प्राचीन कल्पना आणि आधुनिक कल्पना यांच्यांतील तो मूलभूत संबंध दाखवून देणें हेंच वेदान्ताचें कर्तव्य आहे. ईश्वरविषयक त्या साऱ्या जुन्या कल्पना त्या त्या काळाच्या संदर्भांत अगदी सुसंगतच होत्या, आणि मला वाटतें, आपल्या आजच्या कल्पनां-पेक्षा अधिक हिडीस नव्हत्या ! ज्या वेळीं आपण त्या कल्पना तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भांतून—तत्कालीन समाजाची अवस्था व त्या लोकांचे नैतिक आदर्श यांच्या संदर्भांतून काढून आपल्या आजच्या परिस्थितीला लागू करूं जातों त्याच वेळीं त्या आपल्याला किळसवाण्या वाटूं लागतात. कारण ती जुनी परिस्थिति—समाजाची ती अवस्था आता पार लुप्त होऊन गेली आहे. ज्याप्रमाणे प्राचीन यहुदी हे उत्साही, तीक्ष्णबुद्धीच्या आधुनिक यहुद्यांत परिणत झाले आहेत आणि प्राचीन आर्य आजच्या बुद्धिप्रवण हिंदूंत परिणत झाले आहेत त्याचप्रमाणे जिहोवाचीहि वाढ झाली आहे, देवांचीहि वाढ झाली आहे— त्यांचाहि विकास झाला आहे.

ही एक फार मोठी चूक होत असते की उपासकांचा क्रमविकास होत असतो हें कबूल करतांना उपास्याचाहि त्याचबरोबर क्रमविकास होत असतो हें मात्र आपण मानीत नाहीं. उपासकाबरोबरच त्याच्या

उपास्यानेहि प्रगति केली असते यावर आपला विश्वास नसतो ! मला म्हणावयाचें आहे तें एवढेंच की, ज्याप्रमाणे तुमच्या-माझ्या ठायीं सत्याचा अधिकाधिक आविष्कार होऊन आपण उन्नत होत असतों त्याचप्रमाणे, सत्याचा अधिकाधिक आविष्कार या अर्थाने आपले देवहि उन्नत होत असतात. देव वा ईश्वर उन्नत होत असतो हें म्हणणें तुम्हांला जरा चमत्कारिक वाटेल. तुम्ही विचाराल की हें कसें ? देव वा ईश्वर उन्नत होणें शक्य नाही. तो तर अपरिवर्तनीय आहे-- त्यांत परिवर्तन वा बदल कसा घडेल ? तुमचें म्हणणें बरोबर आहे. परंतु मग त्या अर्थाने तुमच्या-माझ्यांतील 'खरा मनुष्य'हि कधी उन्नत होत नसतो हेंहि विसरतां कामा नये. वस्तुस्थिति अशी आहे की माणसाच्या स्वतः-च्या प्रगतीबरोबरच त्याच्या ईश्वराविषयीच्या कल्पनादेखील सारख्या बदलत असतात, विकास पावत असतात. आपल्याला पुढे दिसून येईलच की, ह्या सर्व मानवी आविष्कारांमागे असलेला 'खरा मनुष्य' अचल, अपरिवर्तनीय, शुद्ध आणि नित्य मुक्त आहे. आणि हा वरवरचा माणूस ज्याप्रमाणे त्या 'खऱ्या मनुष्या'ची केवळ छाया आहे त्याचप्रमाणे ईश्वराविषयीच्या सर्व कल्पना केवळ आपल्या मनाचीच निर्मिति आहेत-- त्या खऱ्या ईश्वराचे ते केवळ आंशिक आविष्कार आहेत, केवळ आभास आहेत. आमच्या मनांनीच निर्माण केलेल्या ह्या ईश्वर-विषयक सर्व विभिन्न कल्पनांमागे, ईश्वराच्या ह्या सर्व आंशिक आविष्कारांमागे, ईश्वरविषयक ह्या आभासांमागे खराखरा ईश्वर दडलेला आहे--तो कधी बदलत नाही, तो नित्य शुद्ध आहे, अपरिणामी आहे. परंतु हे आविष्कार मात्र सदा बदलत असतात, आणि त्या बदलत्या आविष्कांरामधून त्यांच्या मागील तें सत्य अधिकाधिक व्यक्त होत असतें. जेव्हा त्या आविष्कारांमधून त्यांमागील सत्य अधिक प्रमाणांत व्यक्त होतें तेव्हा त्याला उन्नति म्हणतात, आणि ज्या वेळीं तें पाठी-मागील सत्य अधिकांश झाकलेलें राहतें वा व्यक्त होत नाही त्या वेळीं त्याला अवनति म्हणतात. याप्रमाणे जसाजसा आपला विकास होतो तसातसा आपल्या देवांचाहि विकास होत जातो. जसें आपण वाढतों तसाच आपला ईश्वरहि वाढतो. धोपटपणें सांगावयाचें म्हणजे जसजशी आपली प्रगति होते, जसजसा आपला विकास होतो तसतसे आपले

देवहि आपल्याला त्यांचें स्वतःचें स्वरूप अधिकाधिक प्रकट करून दाखवितात.

ह्या पार्श्वभूमीवर आता आपण मायावाद समजूं शकूं. जगांतील सर्वच धर्म ह्या एका प्रश्नाची चर्चा करीत असतात : 'जगांत हा विसंवाद कां ? जगांत हें वाईट, हें अशुभ, हें दुःख कां ?' धार्मिक कल्पना उदयास आल्या तेव्हांच्या त्या सुरवातीच्या प्राचीन काळांत हा प्रश्न उद्भवलेला आढळत नाही, कारण त्या काळच्या त्या आदिम मानवाला त्याच्या भोवतालच्या जगांत कुठे कांही विसंगति आढळली नाही. भोवतालची परिस्थिति त्याला विसंवादी वाटत नव्हती, कोणत्याहि प्रकारें मतांचे संघर्ष होत नव्हते, पाप आणि पुण्य, चांगलें आणि वाईट यांचें द्वंद्व त्याला सतावीत नव्हतें. त्याच्या स्वतःच्या अंतःकरणांत फक्त दोनच भावना उठत--एक कांहीतरी त्याला 'हें कर' असें सांगे आणि दुसरें कांहीतरी त्याला 'हें करूं नकोस' असें सांगत असे. आदिम मानव हा स्वतःच्या आवेगांनी वाहवणारा मनुष्य होता. त्याला वाटेल तसें तो करीत असे, मनांत आलेला कोणताहि विचार कृतींत आणण्यास तो कचरत नसे, अमुक गोष्ट भली की बुरी हें ठरवीत बसण्याच्या भानगडींत तो पडत नसे, स्वतःच्या आवेगांना तो क्वचितच लगाम घालूं जात असे. आणि जसा तो, तसेच त्याचे देवहि होते; त्याचे ते देवहि त्याच्याचसारखे अत्यंत आवेगी स्वभावाचे होते. इंद्र येतो आणि दैत्यांचा धुव्वा उडवून जातो. जिहोवा कुणावर प्रसन्न होतो तर कुणावर कोपतो-- असें कां हें कुणालाहि माहीत नसतें, कुणी तें जाणूनहि घेऊं इच्छीत नाही. असले प्रश्न विचारण्याची, कारणें शोधून काढण्याची प्रवृत्ति माणसांत जागी झाली नव्हती, आणि म्हणून जिहोवा जें करील तें बरोबरच होय असें मानलें जाई. चांगलें आणि वाईट, पाप आणि पुण्य ह्या कल्पना अजून मानवी मनांत उद्भवल्या नव्हत्या. आपण ज्यांना दुष्टपणाच्या म्हणूं अशा कितीतरी गोष्टी त्यांचे ते देव करून जात. इंद्र आणि इतर देव यांनी वारंवार अत्यंत गर्हणीय कृत्यें केलीं आहेत, परंतु त्या इंद्रादि देवांच्या उपासकांच्या दृष्टीने दुष्टपणा वा पाप वा वाईट असें कांहीच नव्हतें, आणि म्हणून साहजिकच आपल्या देवांच्या वागणुकींत त्यांना कांही गैर वाटलें नाही--

हे देव असें कसे वागतात हा प्रश्न त्यांना पडला नाही.

नीतिविषयक कल्पनांच्या वाढीबरोबरच मानवाच्या मनांत नैतिक संघर्ष उत्पन्न होऊं लागले. मानवाच्या आंत जणुकाय एक नवीनच इंद्रिय निर्माण झालें--एक नवीनच भावना उदयास आली. निरनिराळ्या देशांत आणि निरनिराळ्या भाषांत तिला निरनिराळीं नांवें आहेत. कुणी तिला ईश्वराचा आवाज म्हणतो, कुणी तिला पूर्वशिक्षणाचें फळ म्हणतो. तें कांहीहि असो, पण तिच्यांत माणसाच्या आवेगांना वा स्वाभाविक प्रवृत्तींना लगाम घालण्याचें सामर्थ्य होतें एवढें मात्र खरें. आपल्यामधे एक प्रेरणा असते, ती आपल्याला 'हें कर' असें म्हणत असते. आणि त्या प्रेरणेमागेच आणखी एक आवाज असतो तो आपल्याला 'करूं नकोस' असें सांगत असतो. आपल्या मनामधे अशा कित्येक प्रेरणा असतात की ज्या आपल्या इंद्रियांवाटें बाहेर पडण्याचा सतत प्रयत्न करीत असतात, आणि त्यांच्याच पाठीशीं असलेला अगदी क्षीण, अगदीच बारीक का असेना पण एक आवाज त्यांना म्हणत असतो की बाहेर जाऊं नका. ह्या दोन प्रेरणांना संस्कृतभाषेंत दोन मोठीं सुंदर नांवें आहेत. पहिलीचें नांव आहे 'प्रवृत्ति', आणि दुसरीचें 'निवृत्ति'. प्रवृत्ति म्हणजे पुढे सरणें आणि निवृत्ति म्हणजे मागे वळणें. ही प्रवृत्तिच बहुधा आपल्या सर्व कार्यांच्या पाठीशीं असते. तीच आपल्या सर्व कार्यांचें मूळ होय. धर्माला सुरुवात होते निवृत्तीचा उदय झाल्याने. ह्या 'नको'नेच धर्माला सुरुवात होते, ह्या 'नको'नेच आध्यात्मिकतेला सुरुवात होते. जोंवर हा 'नको', ही निवृत्ति उदयास आलेली नसते तोंवर धर्माला सुरुवात झालेली नसते असें पक्कें समजावें. असो तर, तो आदिम मानव त्या लढाऊ देवांची पूजा करीत होता तरी ह्या 'नको'चा, ह्या निवृत्तीचा त्याच्या ठायीं उदय होतांच त्याच्या कल्पना झपाट्याने उन्नत होऊं लागल्या.

एव्हाना मानवाच्या हृदयांत अमळ प्रेमाचा उद्रेक झाला. अर्थातच तें अगदी थोडें होतें, आणि आजहि म्हणजे तें खूप जास्त आहे अशांतला मुळीच भाग नाही. सुरुवातीला तें एकेका जमातींतच मर्यादित होतें, एका जमातीमधील लोक फक्त स्वतःच्या जमातींतील लोकांवरच प्रेम करूं शकत होते; त्यांच्या देवांचेंहि फक्त त्या त्या जमातीवरच प्रेम होतें आणि प्रत्येक देव हा फक्त एकेका जमातीचा

देव होता, तो फक्त त्या आपल्याच जमातीचा रक्षणकर्ता होता. आणि कधीकधी एका जमातीचे घटक स्वतःला त्या आपल्या जमातीच्या देवाचे वंशज समजूं लागत. निरनिराळ्या देशांतील टोळ्यांमधील सगळेजण स्वतःला ती आपली टोळी स्थापणाऱ्या एकाच मूळ पुरुषाचे वंशज मानतात तसलाच हा प्रकार होय. प्राचीन काळीं असे कांही लोक होते, आणि अजूनहि आहेत की जे स्वतःला केवळ ह्या जमातदेवांचेच नव्हे तर सूर्याचे आणि चंद्राचेहि वंशज मानतात. प्राचीन संस्कृत ग्रंथांतून तुम्हांला सूर्यवंशी आणि सोमवंशी थोर, शूरवीर सम्राटांच्या कथा वाचावयास सापडतील. ते सुरुवातीला सूर्याचे आणि चंद्राचे उपासक होते, आणि मग हळूहळू ते स्वतःला सूर्यदेवाचे वा सोमदेवाचे वंशज समजूं लागले. असो तर, याप्रमाणे मानवांत जसजशी 'ही आपली जमात' अशी भावना वाढूं लागली तसतसें त्यांच्या हृदयांत थोडें प्रेमहि उद्भवलें, परस्परां-प्रतीच्या कर्तव्याची थोडी जाणीवहि निर्माण झाली, थोड्याबहुत प्रमाणांत समाजसंस्थाहि अस्तित्वांत आली. आणि त्याबरोबरच, 'एकमेकांच्या दोषांकडे कानाडोळा केल्याखेरीज, एकमेकांविषयी क्षमेची वृत्ति बाळगल्याखेरीज आपण एकत्र राहूं शकणार नाहीं' ही भावनाहि मानवांत उदयास आली. आपल्या स्वाभाविक प्रवृत्तींना कधी ना कधी तरी लगाम घातल्याखेरीज, स्वतःवर ताबा ठेवल्या-खेरीज, मनास येईल तसें वागण्याच्या इच्छेला पायबंद घातल्याखेरीज एक माणूस दुसऱ्याबरोबर एके ठिकाणीं नांदूं शकणें कसें बरें शक्य आहे ? तें अगदी अशक्य आहे. अशा रीतीनें आत्मसंयमनाची भावना जन्मास आली— 'संयम' जन्मास आला. ह्या आत्मसंयमनाच्या वा संयमाच्या भावनेवरच समाज उभा आहे, आणि ज्या पुरुषानें वा ज्या स्त्रीनें सहनशीलतेसारखी व क्षमेसारखी महत्त्वाची वृत्ति अंगीं बाणविली नाही तिचें जीवन कसें कडवट, कसें दुखरें होतें हें आपण बघतोंच.

असो तर, याप्रमाणे मानवाच्या ठायीं धार्मिक भावनांचा उदय झाल्यानें कांहीतरी उच्च, अधिक नैतिक असा भाव त्याच्या अंतःकरणांत पुसटपणें का होईना पण उत्पन्न झाला. ते जुने देव—

यज्ञाग्नींतील जळत्या मांसबलीचा करपट वास आणि उग्र मद्याच्या आहुति ज्यांना प्रिय होत्या ते प्राचीन आडदांड, झुंजार, मद्यपी, गोमांसभक्षी देव आता विसंगत, चमत्कारिक वाटूं लागले. उदाहरणार्थ, वेदांमधे असें वर्णन आहे की, कधी कधी इंद्र इतके मद्य प्राशन करतो की तो जमिनीवर कोसळून असंबद्ध बडबडूं लागतो. आता यापुढे हे असले देव लोकांना मानवणें शक्य राहिलें नाही. कार्यांमागील हेतु शोधून काढण्याची लोकांची वृत्ति बनली, आणि त्या सपाट्यांत देवांचीहि झडती घेणें सुरू झालें, त्या देवांच्याहि कार्यांमागील हेतु शोधण्यांत येऊं लागला. अमुक देवाने अमुक कार्य कां केलें ? तें कार्य करण्यांत त्याचा हेतु काय होता ? हें असले प्रश्न विचारण्यांत येऊं लागले. त्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें मिळत नाहीत असें दिसून येतांच लोकांनी त्या देवांचें विसर्जन केलें. किंवा असें म्हणतां येईल की मग लोकांनी देवांविषयीच्या आपल्या त्या तोकड्या कल्पनांचा त्याग करून देवाविषयी अधिक उच्च, अधिक सुसंगत कल्पना करावयास सुरुवात केली. आपल्या देवांच्या साऱ्या कार्यांचा आणि गुणांचा जणु त्यांनी आढावा घेतला, आणि त्यांतील जें त्यांना सुसंगत वाटलें नाही तें त्यांनी टाकून दिलें, जें त्यांना सुसंगत वाटलें तें त्यांनी ठेवलें आणि तीं सारीं सुसंगत कार्यें आणि ते सारे सुसंगत गुण एकाच देवाला चिकटवून ते त्या देवाला 'देवाधिदेव' म्हणूं लागले. आता ते ज्या देवाची पूजा करूं इच्छीत होते तो केवळ शक्तीचेंच प्रतीक असून भागणार नव्हतें, त्यांना आपल्या देवाच्या ठायीं आता शक्तीपेक्षा अधिक कांहीतरी हवें होतें. आता त्यांचा देव नीतिपरायण बनला, मानवजातीवर प्रेम करणारा बनला, मानवाचा हितकर्ता बनला. परंतु तो अजूनहि एक 'देव'च होता. त्याच्या पूजकांनी त्याची नीतिपरायणता वाढविली, त्याची शक्तिहि वाढविली. त्याच्या भक्तांच्या पक्षीं तो आता जगांतील सर्वांत अधिक नीतिपरायण पुरुष बनला आणि जवळ जवळ सर्वशक्तिमानहि बनला.

पण असलीं ठिगळें जोडून किती दिवस चालणार ? ईश्वर आणि जग ह्यांच्या परस्परसंबंधाचें कोडें उलगडण्याचे प्रयत्न जसजसे अधिकाधिक निकराचे होऊं लागले तसतशा त्याविषयी अधिकाधिक

शंकाकुशंका उभ्या होऊं लागल्या-- तें गूढ जास्तच गूढ होऊं लागलें. त्या देवाधिदेवाचे गुण गणितश्रेढीने वाढविण्यांत आले तर तद्विषयक शंका-अडचणी भूमितिश्रेढीने वाढूं लागल्या! ज्या वेळीं जिहोवा नामक निष्ठुर ईश्वरावर लोकांचा विश्वास होता त्या वेळीं तो निष्ठुर ईश्वर आणि हें जग ह्यांचा मेळ घालणें जितकें कठीण होतें त्यापेक्षा हा देवाधिदेव आणि जग यांचा मेळ बसविणें कितीतरी अधिक कठीण जाऊं लागलें. त्या देवाधिदेवाच्या-- सर्वशक्तिमान आणि प्रेमस्वरूप जगदीश्वराच्या राज्यांत हे असले सैतानी चाळे कां खपावेत? तो हें कसें चालूं देतो? त्याच्या राज्यांत सुखापेक्षा दुःख इतकें जास्त कां? चांगल्यापेक्षा दुष्टपणा इतका जास्त कां? या साऱ्याकडे आपण कितीहि डोळेझाक केली तरी जग हा एक अत्यंत हिडिस लोक आहे ही वस्तुस्थिति आहे तशीच राहणार, तींत कांही बदल व्हायचा नाही. फार तर ह्या जगाला टॅन्टॅलसचा नरक* म्हणतां येईल. ह्या जगांत आपल्याला राहावें लागतें, आपल्या चित्तांत प्रबळ प्रवृत्ति सळसळत असतात, इंद्रियांचीं सुखें उपभोगण्याच्या नाना अदम्य वासना रसरसत असतात, पण आपण त्या पूर्ण मात्र करूं शकत नाहीं. आपल्या मनांत एक लाट उठते, आपल्या इच्छेविरुद्ध ती आपल्याला पुढे रेटते, पण आपण एक पाऊल टाकतों न टाकतों तोंच आपल्याला एक तडाखा बसतो. त्या टॅन्टॅलस-सारखें जिणें जगण्याचाच जणु आपल्याला शाप मिळाला आहे. तें तसलें अतृप्तीचें जिणें जगणेंच आपल्या कपाळीं आहे. काय करणार? ह्या पांच इंद्रियांच्या मर्यादित जगापलीकडील ध्येयें आमच्या डोक्यांत शिरतात, पण आम्ही जेव्हा त्यांना कृतींत आणूं जातों तेव्हा तें जमेनासें होतें. उलट भोवतालच्या परिस्थितीचा हैदोस आमचा चक्काचूर

---

* ग्रीकलोकांमधे एक पौराणिक कथा प्रचलित आहे. तींत असें वर्णिलें आहे की, टॅन्टॅलस नांवाचा एक राजा पाताळांतील एका तलावांत टाकला गेला होता. त्या तळ्यांतलें पाणी त्याच्या ओठापर्यंत येई पण तो तान्हेला राजा तें पिऊं जातांच तें पाणी एकदम दूर निघून जाई. त्याचप्रमाणे त्याच्या डोक्यावर तऱ्हतऱ्हेचीं फळें लोंबलेलीं दिसत, पण तो भुकेला राजा ज्या वेळीं हातांनी ती धरण्याचा प्रयत्न करी त्या वेळीं तीं लगेच दूर निघून जात.

करीत असतो. पण म्हणून मी जर सर्वप्रकारचा ध्येयवाद सोडून ह्या जगाच्या धबडग्यांत सामील होऊन केवळ सांसारिकभावें जीवन जगण्याचा प्रयत्न करीन तर पशूच्या जीवनांत आणि माझ्या जीवनांत कांहीच फरक उरणार नाही, मी आपल्या हातांनी स्वत:चा अध:पात आणि अवनति ओढवून घेतल्यासारखें होईल. याहि मार्गानें सुख नाही, त्याहि मार्गानें सुख नाही. जसें जन्माला आले तसेंच या जगांत जगण्यांत जे संतुष्ट आहेत त्यांच्या कपाळीं दु:ख आहे. जे सत्यासाठी, उच्च गोष्टींसाठी या जगांतील निव्वळ पाशवी जीवनापेक्षा उच्च अशा कशातरीसाठी सर्वस्वाचा होम करायला तयार आहेत त्यांच्या कपाळीं हजारपट जास्त दु:ख आहे. ही वस्तुस्थिति आहे. हें असें कसें हें सांगतां येत नाही, ह्याचा कधीच उलगडा व्हावयाचा नाही. परंतु वेदान्त आपल्याला ह्या साऱ्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवितो. लक्षांत ठेवा, तुम्हांला भीति वाटेल अशा कांही गोष्टी कधीकधी मला तुम्हांला सांगाव्या लागतील. पण मी जें तुम्हांला सांगतों तें जर तुम्ही ध्यानांत बाळगाल, त्यावर विचार कराल आणि तें पचवाल तर तें तुमच्या अंगीं लागेल, तें तुम्हांला उन्नत बनवील आणि तुम्हांला सत्य जाणून घेण्यास आणि तदनुसार जीवन जगण्यास समर्थ बनवील.

हें जग म्हणजे टॅन्टॅलसचा नरक आहे हें कांही एखादें विशिष्ट ‘मत’ किंवा ‘वाद’ नव्हे, तें वस्तुस्थितीचें अगदी वास्तववादी वर्णन आहे—ह्या जगाविषयी आपल्याला कांही कळत नाही आणि त्याबरोबरच आपल्याला कळत नाही असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं. मला कळत नाही असें जर मला वाटतें तर ही जगत्-शृंखला अस्तित्वांत आहे हें तरी मीं कसें म्हणावें? ती केवळ माझ्या मनाचाच खेळ असूं शकेल, माझ्याच मेंदूचा भ्रम असूं शकेल. हें सारें अथपासून इतिपर्यंत कदाचित् माझें स्वप्नच असेल. मला कदाचित् स्वप्न पडत असावें की मी तुमच्यासमोर व्याख्यान देत आहें आणि तुम्ही तें ऐकत आहांत. हें सारें स्वप्न नाही असें कुणीच सिद्ध करून दाखवूं शकणार नाही. ‘माझा मेंदू’ हेंहि कदाचित् माझें स्वप्नच असणें शक्य आहे, आणि खरें पाहतां स्वत:चा मेंदू कुणी कधी प्रत्यक्ष पाहिला आहे काय? तो आहे असें आपण आपलें गृहीत धरून चालतों, इतकेंच. असेंच सर्व बाबतींत. माझें

स्वतःचें शरीरहि मी असेंच गृहीत धरून चालत असतों आणि त्याच बरोबर मला माहीत नाही असेंहि मी म्हणूं शकत नाहीं. ही ज्ञान आणि अज्ञान ह्या दोहोंच्या मधली स्थिति, हें अंधार-उजेडाचें गूढ मिश्रण, हें खऱ्या-खोटयाचें संमिश्रण--तीं कुठे एकमेकांत मिसळतात--कुणास ठाऊक. आपण सारेजण एका स्वप्नांत चालतों आहोंत, अर्धे झोपलेले, अर्धे जागे, सारा जन्म कसा एका धुक्यांत घालवीत आहोंत--आम्हां सर्वांचीच ही दशा आहे. आमच्या सर्व इंद्रियज्ञानाची हीच दशा आहे. सगळया तत्त्वज्ञानाची, ज्यांचा आम्ही एवढा तोरा मिरवितों त्या आमच्या विज्ञानांची, आम्हां मानवांच्या सर्व ज्ञानाची हीच दशा आहे. अशी आहे ही दुनिया.

जडद्रव्य म्हणा, आत्मा म्हणा, मन म्हणा की त्यांना तुम्ही आणखी दुसरीं हवीं तीं नांवें द्या, त्या साऱ्यांच्या बाबतींत एक गोष्ट अगदी खरी आहे ती ही की, तीं आहेत असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं आणि तीं नाहीत असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं. तीं एक आहेत असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं, तीं अनेक आहेत असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं. हा अंधार आणि उजेड यांचा चिरंतन खेळ सदाच चालला आहे-- त्यांना आपण वेगळे करूं शकत नाहीं, त्यांच्यांतील भेद जाणूं शकत नाहीं, त्यांना विभागूं शकत नाहीं. सगळें खरें वाटतें पण त्याचबरोबर खोटेंहि वाटतें. आपण जागें आहोंत असें वाटतें आणि त्याचबरोबर झोपेंत आहोंत असेंहि वाटतें. ही अगदी वस्तुस्थिति आहे, आणि माया म्हणतात ती हीच. आपण या मायेंत जन्मतों, मायेंत जगतों, मायेंत विचार करतों, मायेंतच स्वप्नें बघतों. या मायेंतच आपण तत्त्वज्ञानी आहोंत, तिच्यांतच आपण धार्मिक आहोंत, नव्हे, ह्या मायेमधेच आपण दानव आणि ह्या मायेमधेच आपण देव बनतों. आपल्या कल्पना तुम्ही हव्या तितक्या ताणा, त्यांना कितीहि उच्च उच्चतर स्तरांवर न्या, त्यांना अनंत म्हणा की आणखी तुम्हांला हवें तें नांव द्या -- त्याहि साऱ्याच्या साऱ्या ह्या मायेमधेच आहेत. हें असेंच असणार, यापेक्षा वेगळें कांही शक्यच नाही. आणि समस्त मानवी ज्ञान म्हणजे ह्या मायेविषयी व्यापक सामान्य विधानें होत, ती जशी भासते त्या स्वरूपांत तिला जाणण्याचे प्रयत्न होत. ही माया--हें सारें

नामरूपाचें कार्य होय. ज्याला म्हणून आकार वा रूप आहे, जें जें तुमच्या मनांत एखादी कल्पना निर्माण करतें, तें सारें ह्या मायेच्या अंतर्गत आहे, कारण देश, काल आणि कार्यकारणभाव यांच्या नियमांनी बांधली गेलेली प्रत्येक गोष्ट मायेंत असते.

असो, आता आपण अमळ ईश्वराविषयीच्या त्या सुरवातीच्या कल्पनांकडे वळून त्यांचें पुढे काय झालें हें बघूं या. उघडच आहे की, ईश्वर म्हणजे मानवांवर सतत प्रेम करणारा, सदा निःस्वार्थ व सर्वशक्तिमान पुरुष असून तो ह्या विश्वाचें शासन करीत असतो ही ईश्वराविषयीची कल्पना लोकांचें समाधान करूं शकली नाही. ह्या सगुण ईश्वराविरुद्ध बंड पुकारून "ईश्वर न्यायी आणि दयामय कसा ?"-- असें तत्त्वज्ञ विचारूं लागला. तो जर न्यायी आणि दयामय असेल तर मग माणसांच्या आणि पशूंच्या रूपांतील आपल्या कोटयवधि संतानांचा नाश त्याला उघडया डोळयांनी बघवतो कसा ? कारण-- जीवो जीवस्य जीवनम्-- दुसऱ्यांना मारल्याखेरीज ह्या जगांत कुणी क्षणभरहि जिवंत राहूं शकत नाही. हजारो जीवांचा नाश केल्याखेरीज तुम्ही एक श्वास तरी घेऊं शकाल का ? लक्षावधि जीव मरत आहेत म्हणूनच तुम्ही जगतां आहांत. तुमच्या जीवनाचा प्रत्येक क्षण, तुम्ही घेत असलेला प्रत्येक श्वास हजारो जीवांचें मरण ठरत आहे; तुम्ही करीत असलेली प्रत्येक हालचाल लाखो जीवांचें मरण ठरत आहे. तुम्ही खात असलेला प्रत्येक घास लाखो जीवांचें मरण ठरत आहे. त्यांनी काय म्हणून मरावें ? या बाबतींत तो एक बुरसटलेला खोटा युक्तिवाद प्रचारांत आहे की ते अगदी खालच्या पातळीवरील-- क्षुद्र प्राणी आहेत. कशावरून बरें ? कुणास ठाऊक, मुंगी माणसापेक्षा श्रेष्ठ आहे की माणूस मुंगीपेक्षा. यांतील काय खरें आहे हें कोण सिद्ध करणार ? तरीपण तो प्रश्न बाजूला ठेवून अमळ गृहीत धरून चलूं या की ते खालच्या पातळीवरील, क्षुद्र जीव आहेत. पण म्हणून त्यांनी मरावें काय म्हणून ? ते जर खालच्या पातळीवरील, क्षुद्र असतील तर मग जगण्याचा अधिकार त्यांनाच जास्त आहे म्हणायचा. मग खरें पाहतां त्यांनीच जगावयास नको का ? कां नाही ? त्यांचें

जीवन इंद्रियांमधेच जास्त असतें, आणि म्हणून सुख आणि दुःख त्यांना तुमच्या-माझ्यापेक्षा हजारोपट जास्त जाणवत असतें. कुत्र्याच्या किंवा लांडग्याच्या रुचीने आपल्यापैकी कुणीतरी कांही खाऊं शकेल काय ? कुणीहि नाही, कारण आपलें सगळें जीवन कोल्ह्याकुत्र्या-सारखें इंद्रियांतच सामावलेलें नसतें, तें बुद्धींत असतें, आत्म्यांत असतें. परंतु पशूंचें सगळेच्या सगळें जीवन, त्यांचा आत्माच इंद्रियांत वसत असतो, आणि म्हणून इंद्रियसुखासाठी ते वेडे होतात; ते इतक्या उत्कट आनंदाने इंद्रियसुख भोगतात की आपण माणसें तसें कदापि करूं शकणार नाहीं; आणि त्यांच्या त्या सुखाइतकेंच त्यांचें दुःखहि त्याच प्रमाणांत उत्कट असतें. सुख जितकें, दुःखहि तितकेंच. पशूंना होणारें सुख जर माणसापेक्षा इतकें उत्कट असेल तर त्यावरून हाच निष्कर्ष निघतो की त्यांना दुःखहि तसेंच-- माणसापेक्षा कितीतरी तीव्रपणें होत असलें पाहिजे. याचा अर्थ असा की, माणसाला मरतांना जितकें दुःख आणि जितके कष्ट होतात त्यापेक्षा हजारोपट जास्त पशूंना मरतांना होतात, आणि तरीदेखील त्यांच्या दुःखाची फिकीर न करतां आपण त्यांना खुशाल मारतोंच. हीच माया होय. आणि म्हणून मानवासारख्या असणाऱ्या सगुण ईश्वराची जर आपण कल्पना केली आणि त्यानेच ही सृष्टि केली असें मानलें तर 'वाइटांतून अंतीं चांगलें निपजतें' वगैरे प्रतिपादन करणारीं तथाकथित मतें नि सिद्धान्त अपुरे, कुचकामाचेच ठरतात. लक्षावधि चांगल्या गोष्टी घडल्या, छान झालें, पण त्या वाइटांमधून कां निपजाव्यात ? कारण मग ह्याच तत्त्वानुसार, स्वतःच्या पंचेंद्रियांना पूर्ण सुख लाभावें म्हणून मीं तरी दुसऱ्यांचे गळे कापायला कां कचरावें ? त्याला काय हरकत आहे ? पण हें सयुक्तिक ठरणें कदापि शक्य नाही. चांगलें हें वाइटामधून कां यावें ? हा प्रश्न तसाच उरतो. आणि त्याला उत्तर नाही. ह्या प्रश्नाला उत्तर देणें शक्य नाही. भारतीय तत्त्वज्ञानाला हें स्वीकारणें भाग पडलें.

वेदान्त हा सर्वांत धाडसी धर्म आहे. सत्याचा शोध करतांना तो मार्गांत मधे कुठेच थांबला नाही, आणि त्याच्यापक्षीं या बाबतींत एक मोठी अनुकूल गोष्ट होती. ती अशी की, सत्य

सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकाची मुस्कटदाबी करूं जाणारा पुरोहितवर्ग वेदान्ताच्या विकासाचा मार्ग रोधण्यास तिथे नव्हता. धर्माच्या बाबतींत तिथे नेहमीच संपूर्ण स्वातंत्र्य होतें. भारतांत खुळचट समजुतींचीं बंधनें आहेत सामाजिक बाबतींत, धार्मिक क्षेत्रांत नाहीत. येथे, या पाश्चात्त्य देशांमधे समाज अगदी स्वतंत्र आहे. भारतांत सामाजिक बाबींत फारच कडकपणा आहे, पण धर्माच्या बाबतींत मात्र पूर्ण मतस्वातंत्र्य आहे. येथे, या तुमच्या इंग्लंडमधे माणूस त्याला आवडेल तसा पोशाख करूं शकतो, त्याला आवडेल तें खाऊं शकतो -- कुणीहि त्याला कांही म्हणणार नाही वा अडविणार नाही. पण तेंच जर त्याने चर्चमधे जाण्याचें टाळलें तर त्याची सार्वजनिक चर्चा होऊं लागते. धर्माच्या बाबतींत समाज काय म्हणतो हें लक्षांत घेऊनच त्याने सत्याविषयी विचार करावयास हवा. त्या बाबतींत समाजाचें मत डावलून चालणार नाही. उलट भारतांत जर एखाद्याने दुसऱ्या जातीच्या माणसाच्या हातचें खाल्लें तर समाज त्याच्यावर तुटून पडून त्याला वाळींत टाकण्याची भयंकर शिक्षा देतो. युगांपूर्वी त्याचे पूर्वज जो पेहराव करीत होते त्यापेक्षा त्याने किंचित् निराळा पोषाख केला की झालाच त्याचा सत्यानाश ! पहिली आगगाडी बघायला गेला म्हणून एका-जणावर त्याच्या जातीने बहिष्कार टाकला होता असें माझ्या ऐकिवांत आहे. कदाचित् ही अतिशयोक्ति असेल ! ही अशी आहे आमच्या समाजाची अवस्था. परंतु धर्माच्या बाबतींत मात्र नास्तिक, जडवादी, बौद्ध, तऱ्हतऱ्हेचे पंथ, कित्येक अति चमत्कारिक मतें भारतांत खेळीमेळीने एकत्र नांदत असलेलीं आढळून येतात. सर्वच संप्रदायांचे आचार्य प्रचार करीत सर्वत्र भ्रमण करून शिष्य मिळवितात. आणि ब्राह्मण लोक जडवाद्यांनाहि आपल्या देवळांच्या दाराशीं उभें राहून त्यांच्या मतांचा खुशाल प्रचार करूं देतात. हें त्यांना भूषणावहच म्हटलें पाहिजे. यावरून त्यांची धार्मिक बाबतींतील उदारता दिसून येते.

बुद्धदेवांनी अतिशय वृद्धपणींच देह ठेवला. माझ्या एका अमेरिकन वैज्ञानिक स्नेह्याचें मला येथे स्मरण होतें. त्याला बुद्धदेवांचें चरित्र

वाचणें फार आवडत असे. पण त्याला बुद्धदेवांचा मृत्यु मात्र आवडत नसे, कारण बुद्धदेवांना क्रुसावर खिळे ठोकून मारण्यांत आलें नव्हतें ! किती चुकीची कल्पना आहे ही ! माणसाला थोर व्हायचें असेल तर त्याचा खूनच व्हायला हवा ! भारतांत असल्या कल्पना कधीच प्रचलित नव्हत्या. ह्या बुद्धदेवांनी साऱ्या भारतभर भ्रमण केलें, भारतीयांच्या देवदेवतांची बदनामी केली, फार काय पण त्यांच्या जगन्नियंत्या परमेश्वरालाहि धाब्यावर बसविलें, आणि तरीहि कोणीं त्यांच्या केसालाहि धक्का लावला नाही, अगदी वृद्ध होईपर्यंत ते जगले. ते ऐंशी वर्षं जगले आणि अर्ध्याअधिक देशाला त्यांनी स्वतःच्या धर्माची दीक्षा दिली.

त्यानंतर म्हणजे चार्वाक. ह्या लोकांनी अत्यंत भयंकर अशा मतांचा प्रचार केला. ह्या आपल्या एकोणिसाव्या शतकांत तसल्या नागड्या, सोलीव जडवादाचा उघडपणें प्रचार करण्यास कुणी धजणारसुद्धा नाही. हे चार्वाक देवळांदेवळांतून, शहरांशहरांतून खुशाल असा प्रचार करीत हिंडत की धर्म म्हणजे नुसता मूर्खपणा होय, आपला स्वार्थ साधण्याकरता भटाभिक्षुकांनी शोधून काढलेली ती एक युक्ति आहे, वेद म्हणजे ढोंगी, धूर्त निशाचरांची करामत आहे, ईश्वर, आत्मा वगैरे सारें खोटें आहे. ते म्हणत की जर आत्मा असेल तर तो मृत्यूनंतर आपल्या बायकापोरांच्या ममतेनें परत कां येत नाही ? त्यांची अशी कल्पना होती की, जर आत्मा असेल तर त्यानें मृत्यूनंतरहि आपल्या लोकांवर प्रेम केलें पाहिजे, चांगलें खाण्या-लेण्याची त्याला इच्छा असलीच पाहिजे. चार्वाकांचीं हीं असलीं मतें होतीं तरी देखील कुणी त्यांना इजा केली नाही.

याप्रमाणे भारतांत धार्मिक बाबींत हें असलें लोभनीय स्वातंत्र्य नेहमीच असत आलें आहे, आणि आपण हें कधीच विसरतां कामा नये की विकास हा केव्हाहि स्वाधीनतेंतच होत असतो. विकासाला जर सगळ्यांत पहिल्यानें कशाची गरज असेल तर ती स्वाधीनतेची. ज्याला तुम्ही स्वाधीनत्व देणार नाही तें कधीच वाढूं शकणार नाही. स्वतःसाठी सदैव गुरूची भूमिका राखून ठेवून आपण दुसऱ्यांचा विकास करून देऊं शकतों, दुसऱ्यांच्या वाढीस हातभार लावूं शकतों, दुसऱ्यांना दिशा दाखवूं शकतों, त्यांचें मार्गदर्शन करूं शकतों ही कल्पनाच मुळी

वेडगळपणाची आहे, ती भयंकर खोटी गोष्ट आहे, तिच्यामुळेच ह्या जगांतील कोटयवधि लोकांची प्रगतीच्या मार्गावर पीछेहाट झाली आहे. लोकांना स्वाधीनतेचा प्रकाश लाभूं द्या. विकासासाठी फक्त तोच आवश्यक आहे.

भारतांत आम्ही धार्मिक बाबींत स्वाधीनता दिली, आणि म्हणूनच धर्माच्या दृष्टीने आम्ही आजहि अत्यंत जोमदार, अत्यंत शक्तिशाली आहोंत. सामाजिक बाबतींत तुम्हीहि तसलीच स्वाधीनता देतां आणि म्हणूनच तुमची समाजसंस्था इतकी लोभसवाणी झाली आहे. समाजजीवनाच्या विकास-विस्तारासाठी आवश्यक असलेली स्वाधीनता आम्हीं अजीबात दिली नाही आणि म्हणून आमचा समाज अगदी आकसून गेला आहे. धार्मिक बाबतींत तुम्ही कधीहि मुळीच स्वाधीनता दिली नाही, धर्माविषयी कुणी अमळ वेगळें मत प्रदर्शित करतांच तुम्ही बंदुक रोखली किंवा तरवार उपसली आणि म्हणून युरोपच्या जीवनांत धर्माची वाढ इतकी खुरटलेली, इतकी निकृष्ट दिसून येते. भारतांत समाजाला आवळणारीं बंधनें काढून घेतलीं जावयास हवींत, युरोपांत धार्मिक प्रगति रोधणारे अडथळे दूर केले जावयास हवेत. भारतांत हवें आहे सामाजिक स्वातंत्र्य, युरोपांत हवी आहे धार्मिक स्वाधीनता. असें झालें की मग बघाल माणसाची कशी आश्चर्यावह प्रगति नि उन्नति होते ती. ह्या आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक उन्नतींमधे ऐक्य आहे, त्या तिन्ही क्षेत्रांतील उन्नति एकाच गोष्टीचे तीन निरनिराळे पैलू आहेत हें जर आपल्याला उमजूं शकेल तर अगदी पूर्ण अर्थाने, अगदी खऱ्याखुऱ्या अर्थाने धर्म आपल्या समाजामधे, आपल्या दैनंदिन जीवनामधे उतरेलच उतरेल. वेदान्ताच्या प्रकाशांत तुम्हांला आढळून येईल की सगळीं विज्ञानें हे धर्माचेच निरनिराळे आविष्कार आहेत, आणि हें जगांतील सर्वच गोष्टींना लागू आहे.

असो तर, याप्रमाणे आपल्याला आढळून येतें की स्वाधीनता असल्यामुळेच युरोपांत हीं विज्ञानें जन्मास येऊन वाढूं शकलीं. आश्चर्याची गोष्ट ही की प्रत्येक समाजामधेच आपल्याला दोन मतें, दोन प्रवृत्ति दिसून येत असतात, दोन वर्ग आढळत असतात. एक

विध्वंसक असतो तर दुसरा असतो विधायक. समजा की एखाद्या समाजांत कांही दोष आहेत. बस्, तुम्हांला आढळून येईल की एक वर्ग तात्काळ उठतो आणि त्यांवर अगदी कडकडून हल्ला चढवितो; कधी-कधी ह्या प्रकाराला अत्यंत कट्टरपणाचें, स्वमतान्धतेचें स्वरूप येतें. प्रत्येक समाजांत कट्टर, स्वमतान्ध लोक असतात, आणि स्वतःच्या आवेगी स्वभावानुसार स्त्रिया पुष्कळदा ह्या लोकांच्या आरडाओरडींत सामील होतात. कशाच्यातरी विरुद्ध आक्रोश करणाऱ्या प्रत्येक स्वमतान्ध इसमाला अनुयायी लाभतातच. मोडतोड करणें फार सोपें आहे, एखादा पिसाट देखील वाटेल तें मोडूं शकेल, पण कांहीहि उभारणें त्याला कठीण जाईल. सर्वच देशांमधे असे लोक असतात की ज्यांना वाटत असतें की केवळ शिवीगाळ करून, केवळ दोष दाखवूनच ते लोकांचें भलें करूं शकतील. हे स्वमतान्ध लोक स्वतःच्या मतीप्रमाणे थोडेंबहुत चांगलें करीतहि असतील, परंतु एकूण त्यांच्या हातून वाईटच जास्त होत असतें. कारण सामाजिक संस्था कांही एका दिवसांत बनत नसतात, आणि एखाद्या सामाजिक रूढींत बदल करावयाचा असल्यास तिचें कारण दूर करावयास हवें. समजा की एखादी सामाजिक रूढि वाईट आहे; पण म्हणून तिच्यावर शिव्याशापांची लाखोली वाहिल्याने का ती नाहीशी होणार आहे ? त्यासाठी तुम्हांला अगदी मुळाला हात घालूनच कार्य करावें लागेल. आधी तिचें कारण शोधून काढा, तें कारण दूर करा, मग त्याचें कार्य म्हणजे ती अनिष्ट रूढि आपो-आपच दूर होईल. केवळ आरडाओरड करून कांहीच फळ लाभावयाचें नाही, त्याने उलट अपायच होईल.

ह्या विध्वंसक लोकांहून निराळे, म्हणजे विधायक प्रवृत्तीचे जे लोक असतात त्यांच्या हृदयांत सहानुभूति असते आणि ते जाणून असतात की एखादा दोष दूर करण्यासाठी खोलांत, त्याच्या कारणापर्यंत जावें लागत असतें. थोर थोर साधुसंत ह्या वर्गांत मोडतात. आपण विध्वंस करण्यासाठी आलों नसून आधीचें जें आहे तें पूर्ण करण्यासाठी आलों आहोंत, अशी जगांतील सर्वच श्रेष्ठ आचार्यांनी घोषणा केली आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पुष्कळदा त्या महान् आचार्यांचा हा जीवितहेतु ध्यानांत न आल्यामुळे, त्यांच्या ठायीं

प्रचलित लोकमताशीं जुळतें घेण्याची अनुचित प्रवृत्ति होती असें समजलें गेलें होतें. आजहि कधीकधी असें म्हटलें जातें की हे द्रष्टे आणि महान् आचार्य कांहीसे भ्याड होते, कारण स्वत:ला जें सत्य वाटलें त्याचा उच्चार करायला ते धजले नाहीत. पण वस्तुस्थिति मात्र अशी मुळीच नाही. ह्या जगांतील सर्वांना स्वत:च्या अपत्यांप्रमाणे मानणाऱ्या त्या महापुरुषांच्या हृदयामधील प्रेमाच्या असीम शक्तीची कल्पना स्वमतान्ध व्यक्तींना कशी येणार ? तेच खरोखर आमचे पितें होते, खऱ्याखऱ्या देवता होते; अपरंपार सहानुभूति आणि सोशीकपणा यांनी त्यांचीं हृदयें तुडुंब भरलेलीं होतीं; सदा सहन करणें, क्षमा करणें हा मुळी त्यांचा धर्मच होता. मानवसमाजाचा विकास कसा व्हावयास हवा हें त्यांना अवगत होतें; आणि शांतपणें, हळूहळू पण नेटाने ते उपाययोजना करीत गेले. त्यांनी कधी लोकांचा धिक्कार केला नाही, कधी लोकांना भेडसावलें नाही, तर अगदी हळुवारपणें, दयाळूपणें मार्ग दाखवीत लोकांना एकेक पाऊल पुढेपुढे नेलें. उपनिषदांचे रचयिते हे असे होते. त्यांनी नीट जाणलें होतें की ईश्वरासंबंधीच्या जुन्या कल्पना तत्कालीन प्रगत नैतिक कल्पनांशीं जुळण्याजोग्या नव्हत्या. ते हेंहि पूर्णपणें जाणून होते की हे नास्तिक लोक जो प्रचार करीत आहेत त्यांत पुष्कळसें सत्य आहे, फार महत्त्वाचा सत्यांश आहे; परंतु त्याबरोबरच ते हें देखील जाणून होते की जे लोक जुन्याशीं अजीबात फारकत करून घेऊन सपशेल नव्याने जणु हवेंत समाज उभारूं जात असतात, अनेक मण्यांना एकत्र ओवणारा दोरा जे तोडून टाकूं जातात त्यांना अपयश आल्याखेरीज कधीच राहत नाही.

आपण अगदी नव्याने कधीच कांही घडवीत नसतों, आपण केवळ नवी मांडणी करीत असतों; आपण अगदी नवें असें कांहीच निर्माण करूं शकत नाहीं, आपण फक्त जुन्याच वस्तूंच्या जागा बदलीत असतों, इतकेंच. बीजाचेंच धिरेधिरे, शांतपणें झाड होत असतें; म्हणून सत्याच्या शोधाकडे लागलेली लोकांची शक्ति आपण धीर धरून, हळुवारपणें संचालित केली पाहिजे, जें सत्य आधीचेंच ज्ञात आहे त्याचें संपूर्ण स्वरूप जाणलें पाहिजे. याप्रमाणे, ईश्वरासंबंधीच्या जुन्या कल्पना प्रचलित काळाला निरुपयोगी होत असें म्हणून त्या झिटकारून

न टाकतां त्या प्राचीन ऋषींनी त्या कल्पनांमधे दडलेलें सत्य समजून घ्यावयाचा यत्न केला. आणि त्यांच्या त्या प्रयत्नांचें फळ म्हणजेच वेदान्त तत्त्वज्ञान होय. त्या सर्व जुन्या देवदेवतांच्या आणि जगन्नियामक सगुण ईश्वराच्या कल्पनांमधून पुढे जातां जातां त्यांना अखेर सर्वांत श्रेष्ठ, अंतिम सत्य गवसलें. त्यालाच त्यांनी निर्गुण परब्रह्म असें नांव दिलें. या निर्गुण परब्रह्माच्या कल्पनेपर्यंत आल्यानंतर त्यांना आढळून आलें की हृया समस्त विश्वांत एकता आहे, एकच अखंड सत्ता विद्यमान आहे.

"हृया अनेकत्वपूर्ण जगांत ज्याला तो सर्वांठायीं विराजणारा अखंडस्वरूप एक दिसतो, हृया मर्त्य जगांत ज्याला तें एक अनंत जीवन गवसतें, या जडत्वाने आणि अज्ञानाने घेरलेल्या जगांत ज्याला तो एक ज्योतिःस्वरूप आणि तो ज्ञानस्वरूप आढळतो त्यालाच चिरंतन शांति लाभते, आणखी कुणाला नाही, आणखी कुणालाहि नाही."

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# माया आणि मुक्ति

(२२ ऑक्टोबर १८९६ रोजीं लंडन यथे दिलेलें व्याख्यान)

"स्वत:मागोमाग जणु सोनेरी मेघ विखरीत आपण ह्या जगांत प्रवेश करीत असतों" असें कवि म्हणतो. परंतु आपल्यापैकी सगळेच जण कांही स्वत:मागोमाग सोनेरी मेघ विखरीत विखरीत येत नाहीत, कित्येकजण काळेकुट्ट धुकें विखुरत येत असतात; याबद्दल मुळीच संशय नाही. तें कसेंहि असलें तरी आपण--आपल्यापैकी प्रत्येकजण जणुकाय रणभूमीवर यावें याप्रमाणे ह्या जगांत लढण्यासाठी येत असतों. रडत-रडत आपण ह्या जगांत पाऊल ठेवतों--दोन हात करीत आपल्याला जमेल तशी आपण वाट काढीत असतों--ह्या अनंत जीवनसमुद्रांतून वाट शोधीत असतों; आपण पुढे पुढे चाललों असतों--अनंत युगें मागे पडलेलीं असतात, अनंत विस्तार समोर पसरलेला असतो. असेंच आपण पुढे पुढे जात असतों, अखेर मृत्यु येतो नि आपल्याला ह्या रणभूमीवरून उचलून नेतो--आपण जिंकलों असतों की हरलों असतों हेंहि आपल्याला ठाऊक नसतें. आणि हीच माया होय.

बालकाच्या हृदयांत आशा कशी रसरसत असते. त्याच्या उमलत्या दृष्टीला सारें जग कसें एखाद्या सोनेरी स्वप्नासारखें दिसत असतें; माझ्या इच्छेनुसारच सारेंकांही होणार आहे अशी त्याची भावना असते. तीं पुढे जाऊं लागतांच प्रकृति पदोपदीं एखाद्या दगडी भिंती-प्रमाणे त्याचा मार्ग अडवीत जाऊन त्याच्या प्रगतीला अडथळा करीत असते. ती भिंत भेदून जाण्यासाठी तो तिला पुन्हापुन्हा धडका देतो. तो जसजसा पुढे जातो तसतसें त्याचें साध्यहि पुढेपुढे सरत जातें--अखेर मृत्यु येतो आणि कदाचित् त्याची सुटका होते. आणि हीच माया होय.

वैज्ञानिक उठतो -- त्याला ज्ञानाची तहान लागलेली असते. कशाचाहि त्याग त्याला त्याग वाटत नाही, कितीहि धडपड करावी

लागली तरी तो नाउमेद होत नाही. प्रकृतीचें गुह्यामागून गुह्य शोधीत तो पुढेपुढे जात असतो, प्रकृतीच्या अगदी गाभ्यांतलीं, अगदी अंतरंगांतलीं गुह्यें तो हुडकीत असतो, पण कशासाठी ? हें सारें कशासाठी? आम्हीं त्याचा इतका उदो उदो कां करायचा ? त्याची इतकी कीर्ति काय म्हणून व्हावी ? कोणताहि मनुष्यप्राणी करूं शकेल त्यापेक्षा प्रकृति अनंतपट जास्त करीत नाही काय ? आणि तरीहि प्रकृति जड आहे, अचेतन आहे. जडाचें, अचेतनाचें अनुकरण करण्यांत काय एवढी बहादुरी ? विजेचा हवा तेवढा प्रचंड लोळ प्रकृति वाटेल तितका दूर फेकूं शकते. एखाद्या माणसानें ह्याच्या शतांश जरी केलें तरी आपण त्याचे किती गोडवे गातों, त्याला अगदी डोक्यावर घेऊन नाचतों. कां बरें ? प्रकृतीची नकल करण्याबद्दल, मृताची नकल करण्याबद्दल, जडाची नकल करण्याबद्दल, अचेतनाची नकल करण्याबद्दल त्याची इतकी वाहवा करण्याची काय गरज ? गुरुत्वाकर्षणाची शक्ति केवढीहि प्रचंड वस्तु तोडूनफोडून पार चक्काचूर करूं शकते; पण म्हणून काय झालें ? अखेर ती अचेतनच ना ? अचेतनाची नकल करण्याबद्दल एवढा तोरा कशाला ? त्यांत एवढें गौरविण्यासारखें काय आहे ? आणि तरीदेखील आपण सगळेजण त्यासाठी धडपडत असतों. आणि हीच माया होय.

इंद्रियें माणसाला सारखी बाहेर खेचीत असतात. जिथे सुख आणि आनंद कधीहि सापडणार नाही तिथे माणूस सुख धुंडाळीत असतो, आनंद शोधीत असतो. युगानुयुगें आपल्याला उपदेश देण्यांत आला आहे की हा प्रयत्न खोटा आहे, व्यर्थ आहे, ह्या जगांत सुख नाही. पण आपण तो उपदेश मानूं शकत नाहीं; आपल्याला स्वतःला तसा अनुभव आल्याखेरीज तो उपदेश मानणें आपल्याला शक्य नाही. आपण त्यांच्यासाठी धडपडतों आणि तडाख्यांमागून तडाखे खातों. एवढ्यानें तरी आपण शिकतों का ? एवढ्यानें तरी आपण धडा घेतों का ? नाही, मुळीच नाही. जळत्या ज्योतीवर जाऊन पडणाऱ्या पतंगांप्रमाणे आम्ही पुन्हापुन्हा इंद्रियसुखांवर झडप घालीत असतों. इंद्रियसुखांनी तृप्त होऊं अशी आपल्याला आशा असते. फिरफिरून नव्या जोमानें आपण इंद्रियसुखांवर तुटून पडत असतों. हें असेंच सारखें चाललें असतें. ह्या प्रकारांत अखेर आपण पांगुळतों, गळाठतों,

आपण ठकतों, चकतों, आणि अखेर मरून जातों. आणि हीच माया होय.

आपल्या बुद्धीसंबंधीहि असेंच. ह्या विश्वाचें कोडें उकलण्याच्या आटचापिटचांत आपण आपल्या जिज्ञासेला आळा घालूं शकत नाहीं, आपल्याला तें सारें कळलेंच पाहिजे असा आपला अट्टाहास असतो, आणि ज्ञान, मग तें कशाचेंहि असो, आपल्याला लाभणें शक्य नाही यावर आपला विश्वास बसत नाही. पण काय ! आपण कांही थोडीं पावलें पुढे जातों न जातों तोंच आदि-अंतरहित काळाची भिंत आपल्या समोर उभी राहते, ती ओलांडून जाणें आपल्याला शक्य नसतें. कांही पावलें जातांच अमर्याद 'देशा'ची ( space ची ) भिंत आपल्याला अडविते, ती उल्लंघणें आपल्याला शक्य नसतें. आणि हें सारेंचकांही कार्य-कारणभावाच्या भिंतींनी अनुल्लंघनीयपणें वेढलेलें आहे. त्यांच्या पलीकडे जाणें आपल्याला शक्य नाही. आणि तरीहि आपण प्रयत्न करीतच असतों. आणि आपल्याला असा प्रयत्न करीतच राहावें लागणार आहे. आणि हीच माया होय.

श्वासोच्छ्वासागणिक, हृदयाच्या प्रत्येक स्पंदनागणिक, आपल्या प्रत्येक हालचालीगणिक आपण स्वाधीन आहोंत असें आपल्याला वाटत असतें. आणि त्याचबरोबर, आपण तसें नाहीं हें प्रतिक्षणीं आपल्या प्रत्ययास आणून दिलें जात असतें. आपण बंदे गुलाम आहोंत, प्रकृतीचे बंदे गुलाम आहोंत—शरीराने म्हणा, की मनाने म्हणा, की विचारांनी म्हणा की भावनांनी म्हणा, आपण बंदे गुलाम आहोंत. आणि माया ती हीच.

आपला मुलगा म्हणजे विलक्षण बुद्धिमान आहे, असा अद्‌भुत मुलगा आजपर्यंत कधी जन्मला नाही असें जिला वाटत नाही अशी आई कुठेहि आढळायची नाही ! तिचा सारा जीव त्या मुलांत गुंतलेला असतो. तो तिचा आत्माच बनून जातो. हळूहळू तो मोठा होतो, कदाचित् दारुडचा बनतो, पशु निपजतो, त्या आईचे वाटेल तसे हाल करतो. आणि तो जितके तिचे हाल करतो, जितकें तिला वाईट वागवितो तितकें तिचें पुत्रप्रेम वाढूं लागतें. निःस्वार्थ मातृप्रेम म्हणून जग त्याची खूप स्तुति करतें. हें कुणाच्या ध्यानांत येत नाही की ती

आई निव्वळ गुलाम आहे, तसें केल्याखेरीज तिला राहवतच नाही. तें ओझें झुगारून देण्याची तिला हजारो वेळा इच्छा होत असेल, पण तें तिला शक्य नसतें. म्हणून ती त्यालाच अद्‌भुत पुत्रवात्सल्य असें गोंडस नांव देऊन त्याचे देव्हारे माजवूं लागते. आणि हीच माया होय.

या जगांत आपल्या सगळ्यांचीच ही गत आहे. अशी एक पौराणिक गोष्ट आहे की, एकदा नारद श्रीकृष्णांना म्हणाले की "प्रभो, तुमची माया कशी असते तें मला दाखवा." ह्या प्रसंगाला कांही दिवस लोटल्यानंतर एक दिवस श्रीकृष्ण नारदांना आपल्याबरोबर अरण्यांत घेऊन गेले. बरेंच अंतर चालून गेल्यानंतर श्रीकृष्ण म्हणाले, "नारदा, मला तहान लागली आहे, तुम्ही कुठूनतरी मला थोडें पाणी आणून देऊं शकाल ?" नारद त्यावर "प्रभो, तुम्ही कांही चिंता करूं नका, हा मी आत्ता जाऊन पाणी घेऊन येतों" असें म्हणून पाण्यासाठी निघाले. थोड्याच अंतरावर एक खेडें होतें. पाण्यासाठी नारद त्या खेड्यांत शिरले आणि त्यांनी तेथील एक दरवाजा ठोठावला. एका अत्यंत सुंदर युवतीने दरवाजा उघडला. तिला बघतांच, श्रीकृष्ण पाण्यासाठी आपली वाट पाहत असतील, तहानेने त्यांचे प्राण कदाचित् अत्यंत व्याकुळ झाले असतील ह्याचा नारदांना तात्काळ सपशेल विसर पडला ! सारेंकांही विसरून नारद त्या मुलीशीं बोलण्यांत गुंग झाले. तो सारा दिवस ते तिथेच होते, श्रीकृष्णांकडे परत जाण्याचें त्यांनी नांवहि काढलें नाही. दुसऱ्या दिवशीं ते फिरून त्याच घरीं गेले आणि त्या मुलीशीं गुलगुल बोलण्यांत दंग होऊन गेले. संभाषणांतून प्रेम निर्माण झालें आणि नारदांनी त्या मुलीसाठी तिच्या बापाकडे मागणी घातली. त्यांचा विवाह झाला. तीं त्या खेड्यांतच राहूं लागलीं. हळूहळू त्यांना मुलेंबाळें झालीं. अशा रीतीने बारा वर्षे लोटलीं. नारदांचा सासरा मरण पावला आणि त्याची दौलत नारदांनाच मिळाली. याप्रमाणे बायकोपोरें, शेतीभाती, गुरेंढोरें वगैरेंत नारद खूप रमले आणि त्यांचे दिवस अत्यंत सुखांत जाऊं लागले. स्वतःच्या भाग्यावर नारद खूप खूष होते. अशा अवधीस झालें काय की त्या खेड्यांत एकाएकी खूप पूर आला. एके रात्रीं जवळची नदी पुराने बेफाम फुगली आणि तिने तें खेडेंच्या खेडें पाण्याने तुडुंब भरून टाकलें. घरें पडलीं, माणसें आणि जनावरें

वाहून गेलीं व डुबून मेलीं, आणि त्या भयंकर स्रोतांत सगळेंकांही तरंगूं लागलें. नारदांना पळून जाऊन जीव वांचवावा लागला. एका हाताने त्यांनी आपल्या बायकोला घट्ट धरलें, एका हाताने आपल्या दोन पोरांना धरलें, त्यांचा तिसरा मुलगा त्यांच्या खांद्यावर असला, आणि ह्या लटांबरासह नारद त्या भयकर पुरांतून बाहेर पडण्याची धडपड करूं लागले. कांही पावलें गेल्यानंतर त्या स्रोताचा असह्य वेग त्यांना जाणवूं लागला. एवढ्यांत त्यांच्या खांद्यावरील पोर अकस्मात् पाण्यांत पडलें आणि बोल बोल म्हणतां म्हणतां त्यांच्या डोळ्यांदेखत झपाट्याने वाहून गेलें. नारद उद्विग्नपणें ओरडले. त्या वाहत्या पोराला वांचविण्याच्या प्रयत्नांत त्यांचें आणखी एक पोर त्यांच्या पकडींतून निसटलें आणि तेंहि वाहून गेलें. अखेर, आपलें सारें बळ एकवटून त्यांनी जिला कवटाळून धरलें होतें त्या त्यांच्या बायकोचीहि त्या पुराच्या तडाख्याने त्यांच्यापासून ताटातूट होऊन तीहि धारेला लागली आणि नारद किनाऱ्यावर फेकले गेले. अत्यंत शोकाकुल होऊन नारद धाय मोकलून रडूं लागले. एवढ्यांत मागून एक सौम्य कंठस्वर त्यांना ऐकूं आला---"वत्सा, पाणी कुठे आहे ? तूं माझ्यासाठी गडवाभर पाणी आणण्यासाठी गेलास, मी सारखी तुझी वाट पाहत आहें, तुला जाऊन जवळजवळ अर्धा तास होऊन गेला की !" "अर्धा तास ?"--- नारद उद्‌गारले ! त्यांच्या मनांत संपूर्ण बारा वर्षांचा काळ लोटला होता ! आणि ह्या साऱ्या घटना म्हणे अर्ध्या तासांत होऊन गेल्या होत्या ! हीच माया.

कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत आपण सगळेच या मायेंत आहोंत. ही वस्तुस्थिति समजायला मोठी कठीण आणि फार गुंतागुंतीची आहे. प्रत्येक देशांत ह्या साऱ्याचा प्रचार झाला आहे, सर्वत्र तिची शिकवण दिली गेली आहे, पण फारच थोड्या लोकांनी त्यावर विश्वास ठेवला आहे, कारण आपल्याला स्वतःला अनुभव आल्याखेरीज, स्वतः तडाखे खाल्ल्याखेरीज आपला या साऱ्यावर विश्वास बसणें शक्य नाही. यावरून काय दिसून येतें ? यावरून हेंच दिसून येतें की हा सारा फार भयंकर प्रकार आहे. कारण सारेंकांही व्यर्थ आहे, सारें मिथ्या आहे. सगळ्याचा संहार करणारा काल येतो आणि कांहीच उरूं देत नाही. तो

साधु आणि पापी, राजा आणि प्रजा, सुरूप आणि कुरूप सगळ्यांचाच ग्रास करतो; तो कुणालाच सोडत नाही. झाडून सर्व गोष्टींची एकच गति--विनाश. आपलें ज्ञान, आपल्या कला, आपलीं विज्ञानें-- सारें-कांही त्या विनाशाकडेच धावत आहे. कुणीहि या प्रवाहाला तोंड देऊं शकणार नाही, कुणीहि क्षणभरसुद्धा त्याची गति रोधूं शकायचा नाही. आपण हें सारें विसरण्याचा प्रयत्न करूं शकूं. पण काय ! प्लेगसारख्या रोगाने कहर उडवून दिलेल्या गावांतले लोक जसे दारू पिऊन, नाचून आणि इतर अनेक वृथा उपाय योजून परिस्थिति विसरून जाण्याच्या प्रयत्नांत पक्षाघाताने बधिर झाल्यासारखे होतात, तसलीच आपलीहि गत होणार ! आणि तरीहि आपण तसा प्रयत्न करीत असतोंच. तऱ्हतऱ्हेच्या इंद्रियसुखांमधे दंग राहून आपण ह्या साऱ्याचा विसर पडावा असा प्रयत्न करीत असतों. आणि हीच माया.

यांतून सुटण्याचे दोन मार्ग सांगितले जातात. पैकी सगळ्यांनाच माहीत असलेला अगदी धोपट मार्ग असा की, 'हें सारें खरें असेल, पण त्याचा विचार करूं नका. तवा गरम आहे तोंपर्यंत आपली पोळी भाजून घ्या. हें सारें खरें आहे, अगदी सत्य आहे, पण तिकडे लक्ष देऊं नका. शक्य होतील तितकीं सुखें पकडण्याचा यत्न करा. तुम्हांला जितकें जमेल तितकें करा. ह्या संसारचित्राची काळी बाजू बघूं नका, नेहमी त्याची उजळ, आशादायक बाजू बघत चला.' या म्हणण्यांत थोडें तथ्य आहे, पण त्यांत फार भयंकर धोका आहे. त्यांत तथ्य आहे तें हेंच की, त्यापासून आपल्याला कार्यास प्रवृत्त करणारी बरीच प्रेरकशक्ति लाभूं शकते. आशा आणि असला विधायक आदर्श आपल्याला उत्साहित करून आयुष्यांत कार्य करण्यास खूप प्रवृत्त करूं शकतात खरीं, परंतु त्यांच्यांत अमळ धोकाहि आहे. धोका असा की अनुभवान्तीं अखेर उद्विग्न, विषण्ण आणि हताश होऊन आपण सगळे प्रयत्न सोडून देणें संभवनीय आहे.' "हें जग असें आहे, पण त्याला उपाय नाही. जें जसें आहे तसेंच स्वीकारा. जमेल तितकें शांतीने आणि समाधानाने राहण्याचा प्रयत्न करा. त्यांत जीं दुःखें आहेत त्यांतहि संतोष माना. जेव्हा तुमच्यावर घाव बसतील तेव्हा म्हणा की ते घाव नाहीत, तीं फुलें आहेत. आणि जेव्हा तुम्ही गुलामासारखें इतस्ततः फरफटले जाल

तेव्हां म्हणा की छे, आम्ही गुलाम कुठे आहोंत, आम्ही स्वतंत्र आहोंत, स्वाधीन आहोंत. रात्रंदिवस लोकांना आणि स्वतःलाहि असें खोटें सांगत जा, कारण ह्या जगांत सुखासमाधानाने राहण्याचा हाच एक मार्ग आहे"--असें म्हणणारे लोक अनुभवान्तीं अखेर उद्विग्न, विषण्ण, हताश होऊन सगळे प्रयत्न सोडून देतांना दिसतात. ह्यालाच म्हणतात व्यवहारचातुर्य, आणि ह्या आपल्या एकोणिसाव्या शतकांत हें व्यवहार-चातुर्य जितकें सवंग आहे तितकें ते आणखी केव्हाच नव्हतें; कारण आजच्या इतके कठोर तडाखे माणसाला आणखी केव्हाच बसले नसतील, आजच्याइतकी भयंकर स्पर्धा आणखी कधीच मानवी आयुष्यांत नव्हती, माणसें आपल्या बांधवांशीं आजच्याइतकीं क्रूरपणें आणखी कधीच वागलीं नसतील; आणि म्हणूनच आज ह्या 'व्यवहारचातुर्या'ने माणसाचें सांत्वन करण्याची इतकी निकड भासत आहे. सांप्रत हा उपदेश जोमाने अगदी प्रचंड प्रमाणांत दिला जात आहे; परंतु तो निष्फळ ठरत आहे, कारण तो नेहमीच निष्फळ ठरत असतो. तो निष्फळ ठरलाच पाहिजे, तो कधीच सफळ होत नसतो. एखादें मढें गुलाबाच्या फुलांनी झाकलें जावयाचें नाही, तें शक्य नाही. तें फार दिवस जमावयाचें नाही, कारण लवकरच तीं गुलाबाचीं फुलें सुकून जातील आणि तें मढें आणखीच भेसूर दिसूं लागेल. आपल्या जीवनाचेंहि असेंच आहे. आपली सडकी, चरणारी जखम आपण सोनेरी कपड्याने खुशाल लपेटून ठेवूं, पण काय ! एक ना एक दिवस तो कपडा गळून जाईल आणि ती किळसवाणी जखम उघडी पडेल.

तर मग काय कांही आशा नाही ? हें खरें आहे की आपण सगळे या मायेचे गुलाम आहोंत, या मायेंत जन्मलों आहोंत आणि या मायेंतच जगत आहोंत. पण ह्यांतून बाहेर पडण्याचा कांहीच मार्ग नाही ? कांहीच आशा नाही ? आपण सर्वजण हीनदीन आहोंत, हें जग म्हणजे खरोखर एक कारागृहच आहे, आपला तथाकथित महिमादेखील एक कारागृहच आहे, आपली बुद्धि, आपलें मन हींसुद्धा कारागृहेंच होत हें मानवाला युगानुयुगें माहीत आहे. असा माणूस अजून जन्माला आला नसेल, अवघ्या जगांत असा एकहि मनुष्यप्राणी नसेल की ज्याला हें कधी ना कधी तरी जाणवलें नसेल, मग तोंडाने तो कांहीहि म्हणो.

वृद्धांना हें सगळ्यांत जास्त जाणवतें, कारण साऱ्या हयातीचा साचलेला अनुभव त्यांच्या गाठीं असतो, जीवनाच्या खोटाडेपणानें ते सहजासहजी चकत नाहीत. असो तर, मग ह्यांतून बाहेर पडण्याचा कांहीच मार्ग नाही काय ? आपल्याला आढळून येतें की हें सारें खरें असलें तरीहि, वस्तुस्थिति ही अशी भयंकर असली तरीहि, ह्या दुःखांत आणि यातनांमधेहि, जिथें जीवन आणि मृत्यु समानार्थक शब्द होत त्या ह्या जगामधेंदेखील एक लहानसा आवाज सगळ्या युगांत, सगळ्या देशांत, प्रत्येक हृदयांत घुमत असतो, आणि तो हाच की---"ही माझी माया दैवी आहे, ती त्रिगुणमयी आहे, ती तरून जाणें फार कठीण आहे, तथापि जे मलाच शरण येतात ते ही जीवननदी तरून जातात"--"हे भारानें वाकलेल्यांनो आणि थकलेल्यांनो या, माझ्याकडे या, मी तुम्हांला आसरा देईन, विसावा देईन." ह्या आवाजाच्या, ह्याच वाणीच्या रोखानें आपण सारे पुढेपुढे जात आहोंत. माणसानें ती ऐकली आहे, युगानुयुगें तो ती ऐकत आहे. ज्या वेळीं सगळेंकांही हरविल्यासारखें वाटूं लागतें, ज्या वेळीं आशा मालवते, ज्या वेळीं माणसाच्या स्वतःवरील विश्वासाच्या चिंधड्या उडतात, ज्या वेळीं सारेंकांही पकडींतून निघून जात आहेसें वाटतें आणि आयुष्य एक भग्न अवशेषांचा खच ठरतें त्या वेळीं ही वाणी माणसाला ऐकूं येऊं लागते. त्या वेळीं तो ती ऐकायला तयार होतो. आणि ह्यालाच-- ती वाणी ऐकण्यालाच म्हणतात धर्म.

सारांश, एकीकडे आहे ही अभयवाणी की--हें सारें व्यर्थ असलें, माया असलें तरीहि अत्यंत आशादायक गोष्ट ही की या मायेपलीकडे जाण्याचा मार्ग आहे. आणि दुसरीकडे आहे 'व्यवहारचतुर' लोकांचा उपदेश---"धर्म, तत्त्वज्ञान वगैरे फालतु गोष्टींनी स्वतःचें डोकें उगाच शिणवूं नका. संसारांत राहा; जग मोठें वाईट आहे हें खरें, तरीपण त्याचा शक्य तितका चांगला उपयोग करून घ्या." हेंच अगदी सरळ शब्दांत सांगावयाचें म्हणजे--ढोंगीपणाचें, खोटेपणाचें जीवन जगा, सतत लबाडीचें जीवन जगा, शक्य तितक्या नीटनेटक्या रीतीनें आपले व्रण छपवून ठेवा. ठिगळामागून ठिगळ लावीत चला, मग मूळ वस्त्र बेपत्ता होऊन तुम्ही ठिगळांचीच एक गोधडी बनलांत तरी हरकत नाही. ह्यालाच म्हणतात व्यवहारीपणाचें

जीवन. जे या 'ठिगळें जोडण्याने'च संतुष्ट असतात ते लोक धर्माकडे कदापि वळायचे नाहीत. आजच्या ह्या अवस्थेविषयी, आपल्या जीवनाविषयीच जेव्हा भयंकर असंतोष वाटूं लागतो, जीवनाला ठिगळें लावण्याचा मनापासून तिटकारा येतो, ढोंग आणि खोटेपणा यांचा अगदी वीट येतो तेव्हाच धर्माला सुरुवात होते. त्या बोधिवृक्षाखाली ध्यानस्थ बसलेल्या बुद्धदेवांसमोरहि हें 'व्यवहारचातुर्य' प्रकटलें होतें; तें म्हणजे मूर्खपणाच होय हें त्यांना जाणवत होतें, परंतु या साऱ्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता हें त्यांना कळेना. त्या वेळीं बुद्धदेव जसें वागले तसें वागण्यास जो धजेल तोच धार्मिक होऊं शकेल. सत्याचा शोध सोडून देऊन संसारांत परत जाऊन तेंच जुनें ढोंगांचें जीवन जगण्याचें, चांगल्या गोष्टींना वाईट आणि वाईट गोष्टींना चांगलीं नांवें देत जगण्याचें, स्वतःला आणि दुसऱ्यांना फसवीत जगण्याचें प्रलोभन जेव्हा बुद्धदेवांपुढे उभे राहिलें तेव्हा त्या महावीराने तें तत्क्षणींच धुत्कारून म्हटलें की "अज्ञानांत पिचत केवळ खाण्यापिण्याचें जीवन जगण्यापेक्षा मृत्यु श्रेयस्कर. पराजयाचें जिणें जगण्यापेक्षा रणमैदानावर मरणेंच चांगलें." हाच धर्माचा पाया होय. ज्या वेळीं मनुष्य ह्या पायावर उभा राहतो त्या वेळीं तो सत्यलाभाच्या मार्गाला लागला आहे, तो ईश्वरलाभाच्या मार्गाला लागला आहे असें समजावें. धार्मिक होण्यासाठी प्रथम असल्या दृढनिश्चयाची आवश्यकता आहे. मी आपला मार्ग शोधून काढीनच काढीन. मी सत्य प्राप्त करून घेईनच घेईन, किंवा त्या प्रयत्नांत प्राण देईन. कारण ह्या जगाच्या बाजूने लाभण्यासारखें कांहीच नाही, तें शून्य आहे, तें अगदी बघतांबघतां नाहीसें होत आहे. आजचा सुंदर, आशापूर्ण नवयुवक उद्याचा वृद्ध होय. आजच्या कळया उद्याच्या हिमवर्षावाने गोठून नष्ट व्हाव्यात त्याप्रमाणे आशा, सुखें नि आनंद हीं नष्ट होणार आहेत. ही झाली एक बाजू. दुसऱ्या बाजूला आहे विजयाची लोभस आशा—जीवनाच्या समस्त अनिष्टांवर, नव्हे, प्रत्यक्ष जीवनावर, समग्र विश्वावर जय मिळण्याची आशा. ह्या बाजूचा आश्रय घेऊन माणूस उभा राहूं शकेल. आणि म्हणूनच, जे हा जय प्राप्त करून घेण्यासाठी, सत्यासाठी, धर्मासाठी निर्भयपणें प्रयत्न करतात तेच उचित मार्गाने जात असतात.

वेदहि अशीच घोषणा करतात की, "हताश होऊं नका. तरवारीच्या धारेवरून चालण्याप्रमाणे मार्ग अत्यंत बिकट आहे खरा, तरीहि निराश होऊं नका. उठा, जागे व्हा, आणि आपलें ध्येय, आपलें लक्ष्य गाठा."

मानवाला ते कोणत्याहि स्वरूपांत प्राप्त झाले असेनात का, पण जगांतील वेगवेगळचा समस्त धर्मांचा हा एक सर्वसामान्य, मूल आधार असल्याचें आढळून येईल. सर्वच धर्म ह्या जगांतून बाहेर कसें पडावें ह्याचा, म्हणजेच मुक्तीचा उपदेश देत आहेत. जग आणि धर्म या दोहोंमधे मेळ बसविण्याचा यत्न कोणताहि धर्म करीत नाही. उलट, या दोहोंत मेळ बसणें कालत्रयीं शक्य नाही असेंच सर्व धर्म असंदिग्धपणें सांगत असतात. धर्माला त्याच्या आदर्श स्वरूपांत दृढ प्रतिष्ठित करणें हेंच कोणत्याहि धर्माचें उद्दिष्ट असतें, त्याचा जगाशीं मेळ घालण्याचा खटाटोप करून तो आदर्श खाली ओढण्याचा प्रयत्न धर्म कधीच करीत नाहीत. प्रत्येक धर्म हाच उपदेश देत असतो, आणि ह्या सर्व आकांक्षांचा समन्वय करणें, जगांतील सर्वांत श्रेष्ठ आणि सर्वांत कनिष्ठ अशा सर्वच धर्मांचा तो मुक्तिरूपी मूलभूत, सामान्य आधार व्यक्त करणें हेंच वेदान्ताचें कर्तव्य होय. ज्याला आपण अगदी पक्का धार्मिक अंधविश्वास म्हणतों तो आणि सर्वोच्च तत्त्वज्ञान या दोहोंचेंहि वस्तुतः एकच उद्दिष्ट असतें, आणि तें म्हणजे ते दोघेहि मानवाला एकाच संकटांतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवीत असतात; आणि अधिकांश धर्मांच्या मतें, जो स्वतः प्रकृतीच्या नियमांनी बद्ध नाही म्हणजेच जो मुक्त आहे अशा कुणाच्यातरी मदतीने मानवाने ही मुक्ति प्राप्त करून घ्यावयाची असते. आता हें बरीक खरें की ह्या 'कुण्या एका नित्यमुक्ता'च्या स्वरूपासंबंधी बराच गोंधळ आणि मतभेद अस्तित्वांत आहे. तो सगुण ईश्वर आहे की माणसासारखाच सजीव पुरुष आहे, तो पुरुष आहे की स्त्री आहे की दोन्ही नाही, याबाबतच्या वादाला अंत नाही. तथापि सर्वांची मूलभूत कल्पना मात्र सारखीच आहे. ह्या विभिन्न मतांमधे परस्परांत अगदी कमालीचा विरोध असला तरीदेखील त्या सर्वांमधून ऐक्याचें एक सुवर्णसूत्र ओवलेलें आपल्याला आढळून आल्याखेरीज राहत नाही. तें सुवर्णसूत्र कोणतें हें वेदान्ताने शोधून काढलें आहे, आणि तो तें आपल्याला हळूहळू दाखवूनहि देतो.

तें तसें दाखवून देतांना वेदान्त सर्वप्रथम आपल्या निदर्शनास जर कांही आणून देत असेल तर तें हेंच सत्य की, हे सर्वच धर्म मुक्तीकडे चालले आहेत, मुक्तीसाठी प्रयत्न हाच सर्व धर्मांचा सामान्य आधार होय.

आपलीं सुखें आणि आपलीं दु:खें, आपल्या अडचणी आणि आपली धडपड या साऱ्यांमधे एक आश्चर्यकारक सत्य विद्यमान आहे. तें हें की या साऱ्यामधूनच आपण अगदी निश्चितपणें मुक्तीकडे चाललों आहोंत. प्रश्न उद्भवला होता -- "हें विश्व वस्तुत: काय आहे ? तें कशांतून उत्पन्न होतें ? तें कशांत लय पावतें ?" आणि त्या प्रश्नाला उत्तर मिळालें-- "मुक्तींतूनच तें उत्पन्न होतें, मुक्तींतच तें अवस्थान करतें, आणि मुक्तींतच तें लय पावतें." ही मुक्तीची भावना, आपण म्हणजे वस्तुत: मुक्त आहोंत ही विलक्षण भावना सोडून देऊन आपण एक क्षणभरहि राहूं शकणार नाहीं, ती भावना वगळल्यास आपलीं सारीं कार्यें, नव्हे, आपलें प्रत्यक्ष जीवन-देखील वृथाच ठरेल. प्रकृति प्रतिक्षणीं आपल्याला पटवून देत असते की आपण गुलाम आहोंत, बद्ध आहोंत, मुक्त नाहीं. आणि तरीहि त्याबरोबरच ही भावनाहि आमच्या मनांत उसळत असते की कांही झालें तरी आपण मुक्तच आहोंत. माया जणु पदोपदीं ठोसे लगावून आपल्याला दाखवून देत असते की आपण बद्ध आहोंत, आणि तरीहि त्याबरोबरच, त्या ठोशाबरोबरच, त्या बद्धपणाच्या भावनेबरोबरच आपल्यांत आणखी एक भावना उठत असते की आपण मुक्त आहोंत. आंतली कोणती तरी वाणी आपल्याला दिलासा देत असते की आपण मुक्त आहों. पण स्वत:च्या त्या मुक्तस्वभावाचा साक्षात्कार करून घेण्याचा, स्वत:चा तो मुक्तस्वभाव प्रकट करण्याचा आपण प्रयत्न करूं लागतांच आपल्या मार्गांत अगदी अनुल्लंघनीय अडचणी उभ्या होतात. परंतु, हें सारें खरें असलें तरीदेखील आपल्या अंतरीच्या अंतरीं हा ध्वनि उमटत राहतोच की 'मी मुक्त आहें, मी मुक्त आहें.' आणि तुम्ही जर जगांतील निरनिराळ्या धर्मांचें अनुशीलन कराल तर तुम्हांला आढळून येईल की त्या सगळ्यांमधून कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत हीच कल्पना व्यक्त होत आहे. आणि धर्म शब्द संकुचित अर्थानें न घेतां व्यापक अर्थानें घेतल्यास तुम्हांला आढळून येईल की समाजाचें

अवघें जीवन ह्या एका मुक्तीच्या भावनेचीच अभिव्यक्ति होय. सर्वच हालचाली त्या एका मुक्तीच्या भावनेचेच आविष्कार होत. "श्रमांनी आणि भाराने थकलेल्यांनो, या, माझ्याकडे या"-- अशी घोषणा करणारी ती वाणी जाणतां वा अजाणतां सर्वांनीच ऐकलेली असते. अगदी ह्याच स्वरूपांत किंवा ह्याच शब्दांत नसली तरी कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत ही मुक्तीचें आश्वासन देणारी वाणी आपल्याबरोबर असतेच. होय, आपण जें ह्या जगांत जन्माला आलों आहोंत तें देखील ह्या वाणीमुळेच; आपली प्रत्येक हालचाल, आपली प्रत्येक क्रिया त्यासाठीच आहे. आपल्याला माहीत असो की नसो, आपण सर्वजण मुक्तीकडेच वेगाने चाललों आहोंत, त्याच वाणीच्या मागोमाग जात आहोंत. त्या बासरीवाल्याच्या (The Pied Piper च्या) बासरीच्या मंजुळ आवाजाने खेड्यांतील मुलें जशीं आकर्षिलीं गेलीं होतीं त्याचप्रमाणे आपण अजाणतां त्या मोहक वाणीचें अनुसरण करीत तिच्या मागोमाग जात आहोंत.

आपण जेव्हा त्या वाणीचें अनुसरण करतों तेव्हा आपण नीतिपरायण असतों. केवळ मानवात्म्यानेच नव्हे तर अत्यंत कनिष्ठ प्राण्यांपासून तों अतिशय श्रेष्ठ प्राण्यांपर्यंत सर्वांनीच ती वाणी ऐकली आहे आणि सर्वचजण तिच्या रोखाने धावत आहेत; आणि ह्या धडपडींत ते एकतर एकमेक एकत्र होत आहेत किंवा एकमेकांना आपल्या मार्गांतून दूर ढकलून देत आहेत. यांतूनच चढाओढ, सुखें, धडपड, जीवन, आनंद, मृत्यु वगैरे उद्भवतात, आणि हें सारें विश्व म्हणजे त्या वाणीपर्यंत पोहोचण्याच्या वेड्या धडपडीचें फळच होय. त्याला आणखी कांहीच अर्थ नाही. व्यक्त प्रकृतीचा-- ह्या विश्वब्रह्माण्डाचा हा अर्थ आहे.

त्या वाणीपर्यंत पोहोचूं शकल्याने काय होतें? मग सगळेंच दृश्य बदलूं लागतें. ती वाणी जाणतांच, तिचा अर्थ कळतांच सारें दृश्य बदलून जातें. मायेचें बीभत्स रणक्षेत्र वाटणारें हेंच जग मग बदलून जाऊन शुभ आणि सुंदर दिसूं लागतें. मग ह्या प्रकृतीला शिव्याशाप देण्याची कांही गरज उरत नाही; हें जग फार भयंकर आहे आणि सारेंच वृथा आहे असें म्हणण्याचीहि कांही गरज उरत

नाही; रडण्या-ओरडण्याची व विलाप करण्याचीहि कांही गरज राहत नाही. त्या वाणीचा अर्थ--तिचें स्वरूप समजतांच, मग ह्या जगांत ही इतकी धडपड कां असावी, हे कलह, ही स्पर्धा, ही गडबड, ही निष्ठुरता, हीं लहानलहान सुख-दुःखें कां असावीं हें आपल्याला कळूं लागतें. मग आपल्याला कळूं लागतें की हीं सारीं मुळी प्रकृतीच्या वा जगाच्या स्वभावांतच आहेत--जगाची घडणच मुळी तशी आहे, कारण तीं जर नसतीं तर आपण त्या वाणीकडे गेलोंच नसतों--आपल्याला माहीत असो की नसो, पण जिच्याप्रत जाणें हेंच आपल्या अस्तित्वाचें उद्दिष्ट आहे त्या वाणीकडे एरवी आपण वळलोंच नसतों. सारांश, अवघें मानवी जीवन, समस्त प्रकृति त्या मुक्तीच्या प्राप्तीसाठी धडपडत आहे. सूर्य त्याच लक्ष्याकडे जात आहे, तेंच साधण्यासाठी पृथ्वी सूर्याभोवती आणि चंद्र पृथ्वीभोवती फेऱ्या घालीत आहे. तेंच लक्ष्य गाठण्यासाठी ग्रहनक्षत्रें फिरत आहेत आणि वायु वाहत आहे. प्रत्येक गोष्ट तेवढ्याचसाठी धडपडत आहे. साधु त्याच वाणीकडे जात आहे--तसें केल्याखेरीज तो राहूंच शकत नाही. त्यांत त्याला एवढें गौरविण्यासारखें कांहीच नाही. पापीहि त्याच वाणीच्या अनुरोधानें जात आहे. उदार हृदयाचा दानशील माणूस त्या वाणीकडे थेट जात असतो, कांहीच त्याला अडवूं शकत नाही; कंजुष मनुष्यहि त्याच लक्ष्याकडे जात असतो. सर्वांत जास्त सत्कर्म करणाऱ्या माणसाला तीच वाणी त्याच्या स्वतःच्या अंतर्यामीं ऐकूं येत असते, तो ती हाक उपेक्षूं शकत नाही, तिच्या रोखाने जाण्याखेरीज त्याला गत्यंतरच नसतें. तद्वतच, अगदी कमालीच्या आळशी माणसालाहि तीच वाणी ऐकूं येत असते. त्या वाणीकडे जातांना एकजण दुसऱ्यापेक्षा जास्त अडखळतो, आणि जो याप्रमाणे जास्त अडखळतो त्याला आपण वाईट मनुष्य म्हणत असतों आणि जो कमी अडखळतो त्याला आपण चांगला माणूस म्हणतों. चांगलें आणि वाईट ह्या दोन वेगळाल्या गोष्टी मुळीच नाहीत, तीं एकच गोष्ट आहेत; त्या दोघांत फरक आहे तो प्रमाणाचा, प्रकाराचा नव्हे.

आता, ही मुक्तीची भावनाच जर याप्रमाणे साऱ्या जगांत सर्वत्र कार्य करीत असेल तर मग त्या दृष्टीने धर्माकडे बघितल्यास

आढळून येतें की सर्वच धर्मांमधे हीच कल्पना सदैव व्यक्त होत आली आहे. उदाहरणादाखल मृत पितरांची किंवा कित्येक आडदांड, क्रूर देवतांची पूजा करणारा अगदी निकृष्ट प्रतीचा एखादा धर्म घ्या. त्या देवतांविषयी किंवा पितरांविषयी सर्वांत महत्त्वाची कल्पना काय असते ? त्यांच्याविषयी महत्त्वाची, प्रमुख कल्पना हीच असते की ते देव किंवा ते पितर प्रकृतीपेक्षा वरचढ असतात, ते प्रकृतीनें किंवा मायेने बद्ध नसतात. अर्थातच त्यांच्या उपासकांची प्रकृतीसंबंधीची कल्पना अगदी तोकडी असते. उपासक स्वत: एखाद्या भिंतींतून आरपार जाऊं शकत नाही किंवा आकाशांत उंच उडूं शकत नाही, पण आपण ज्या देवांची पूजा करीत आहों ते देव हें सारें करूं शकतात अशी त्याची श्रद्धा असते. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ह्याचा काय अर्थ होतो ? हाच की ह्यांतूनहि ती मुक्तीची भावनाच व्यक्त होत आहे; तो उपासक जिला प्रकृति समजतो तिच्यावर त्याचे देव मात करूं शकतात अशी त्याची धारणा असते. ह्यापेक्षा श्रेष्ठ अशा देवांची जे पूजा करतात त्यांनाहि हेंच लागू आहे. प्रकृतीविषयीची कल्पना जसजशी विशाल होऊं लागते तसतशी त्या प्रकृतीवर वर्चस्व गाजविणाऱ्या पुरुषासंबंधीची कल्पनाहि विशाल होत जाते. असें होतां होतां आपण एकेश्वरवादापर्यंत येऊन पोहोचतों. ही प्रकृति—ही माया—आहे, आणि ह्या मायेचें शासन करणारा कुणीतरी एक पुरुष आहे ह्या धारणेलाच म्हणतात एकेश्वरवाद.

ह्या एकेश्वरवादाच्या कल्पना प्रथम उदयास येऊं लागतांच वेदान्ताची सुरुवात होते. परंतु वेदान्त तत्त्वज्ञानाला हा एकेश्वरवाद अपुरा वाटतो, ह्या साऱ्याचें त्याला आणखी चांगलें, मूलग्राही स्पष्टीकरण हवें असतें. ह्या समस्त मायाप्रपंचाच्या पलीकडे एक पुरुष आहे, तो मायेच्या मुळीच अधीन नाही, तो मायेचा स्वामी आहे, तो आम्हां सर्वांना स्वत:कडे आकर्षीत आहे, आणि आपण सर्वजण त्याच्याचकडे चाललों आहोंत— हें स्पष्टीकरण अर्थातच चांगलें आहे असें वेदान्त म्हणतो. परंतु वेदान्ताच्या मतें, तें बुद्धीला प्रत्यक्षपणें विरोधी नसलें तरीहि सत्याचें हें दर्शन तितकेसें स्पष्ट नाही, तें अस्पष्ट आणि अंधुक आहे. तुम्हां ख्रिश्चनांच्या त्या स्तोत्रांत म्हटलें आहे ना की

"माझ्या ईश्वरा तुझ्या अधिकाधिक निकट," तेंच फक्त एक शब्द बदलून वेदान्त्यालाहि छान लागू पडेल; वेदान्ती म्हणत असतो--"माझ्या ईश्वरा माझ्या अधिकाधिक निकट." आपलें लक्ष्य आपल्यापासून खूप दूर आहे, तें प्रकृतीच्या अगदी पलीकडे आहे, तें आपल्याला सगळ्यांना स्वतःकडे आकर्षीत आहे ह्या कल्पनेच्या पावित्र्याला आणि श्रेष्ठत्वाला मुळीच धक्का न लावतां तें आपलें लक्ष्य आपण अधिकाधिक जवळ जवळ आणीत गेलें पाहिजे. आणि मग होतां होतां तो स्वर्गांतील ईश्वर हा प्रकृतींतील ईश्वर होऊन जातो, तदनंतर तो प्रकृतींतील ईश्वर आणि ती प्रकृति हीं दोन्हीं एक होऊन जाऊन त्यांच्यांत कांही भेद उरत नाही, आणि नंतर तो प्रकृतीशीं अभिन्न असलेला ईश्वर ह्या देहरूपी मंदिरांत निवास करणारा ईश्वर होऊन जातो, आणि अखेर तो देहमंदिरवासी ईश्वर स्वतः तें मंदिरच बनून जातो, तोच त्या देहांतील आत्मा वा जीवात्मा बनून जातो, तोच मनुष्य बनून जातो, आणि हीच सत्याची पराकाष्ठा होय, हेंच वेदान्ताचें अंतिम साध्य होय. ऋषिगण ज्याला नाना स्थानीं शोधीत होते तो वस्तुतः आपल्या स्वतःच्या हृदयांतच वसत आहे. वेदान्त म्हणतो की तुम्हांला जी वाणी ऐकूं आली होती ती बरोबरच होती, फक्त तुमची जागा चुकली होती-- ती कुठून येत आहे याची तुम्हांला कल्पना नव्हती, आणि म्हणूनच ती ऐकूनहि तुम्ही तिच्याप्रत पोहोचणारा मार्ग धरूं शकलां नाही. मुक्तीचा जो आदर्श तुम्हांला जाणवत होता तो बरोबरच होता, फक्त तो आपल्या बाहेर आहे असें तुम्ही समजत होतां आणि तीच तुमची चूक होती. तो तुम्ही स्वतःच्या अधिकाधिक जवळ जवळ आणूं लागा म्हणजे अखेर तुमच्या निदर्शनास येईल की तो आदर्श, म्हणजेच ही मुक्ति, ही स्वाधीनता चिरकाल तुमच्या आंतच होती, तुमच्या आत्म्याचा अगदी अंतरात्मा होती. ती मुक्ति, ती स्वाधीनता तुमचें स्वस्वरूपच होती, आणि ह्या मायेने तुम्ही कधीच बांधलां गेलां नव्हतां. प्रकृति कधीच तुमच्यावर अंमल गाजवूं शकली नव्हती. एखाद्या भ्यालेल्या पोराप्रमाणे तुम्ही स्वप्न बघत होतां की ती तुमचें नरडें दाबीत आहे. आणि ह्या भयापासून सुटका हेंच आपलें लक्ष्य आहे. हें सारें केवळ बुद्धीने जाणून घ्यावयाचें नसतें, तर

तें प्रत्यक्ष अनुभवावयास हवें, त्याचा साक्षात्कार व्हावयास हवा, आपल्याला हें जग जितक्या प्रत्यक्षपणें दिसतें त्याहिपेक्षा अधिक प्रत्यक्षपणें आपल्याला ह्या साऱ्याची प्रतीति यावयास हवी. तेव्हाच आपण मुक्त होऊं आणि तेव्हाच सर्व गडबड थांबेल, अंतःकरणांतील सर्व गोंधळ नाहीसा होईल, सारी वक्रता निघून जाईल, ही बहुत्वाची भ्रांति दूर होईल. आणि तेव्हाच मग ही प्रकृति वा माया आतासारखें एक भयानक, अर्थहीन स्वप्न न वाटतां अत्यंत सुंदर दिसूं लागेल, हें जग म्हणजे कारागृह वाटण्याऐवजी आपलें क्रीडांगण बनून जाईल; आणि संकटें, विस्कळीतपणा, अडचणी व क्लेश देखील ब्रह्मस्वरूप होऊन जातील-- त्यांचें खरें स्वरूप आपल्याला दिसूं लागेल; दिसूं लागेल की प्रत्येक गोष्टीच्या पाठीशीं, त्या गोष्टीच्या खऱ्या सत्तेच्या स्वरूपांत तो एकमेवाद्वितीय सच्चिदानंदच उभा आहे आणि एकमेव तोच आपला आणि सर्वांचा खरा आत्मा आहे.


---

# ब्रह्म आणि जगत्

( लंडन, १८९६ )

अद्वैत तत्त्वज्ञान समजून घेतांना कोणता प्रश्न जर सर्वांत जास्त अडवीत असेल तर तो म्हणजे ह्याच की, तें निरपेक्ष, अनंत ब्रह्म हें सान्त जगत् कसें बनलें ? ही गोष्ट कळण्यास खरोखर अत्यंत कठीण आहे. हा प्रश्न पुन:पुन: विचारला जाईल आणि कितीहि वेळा विचारला गेला तरी तो फिरून जसाच्या तसाच राहील. जो अनंत आहे, तो सान्त कसा झाला ? जो असीम आहे, तो सीमाबद्ध कसा झाला ? ह्याच प्रश्न आपण आता विचारासाठी घेऊं या. हा विषय नीट समजण्यासाठी आपण खालील एका आकृतीचें साहाय्य घेऊं या.

सोबतच्या आकृतींतील 'अ' म्हणजे ब्रह्म असून 'ब' म्हणजे जगत् होय. हें ब्रह्म जगत् झालें आहे. या ठिकाणीं जगत् शब्दाचा अर्थ केवळ जडजगत् एवढाच नसून त्यांत जडजगताबरोबरच सूक्ष्म मानसिक जगत्, आध्यात्मिक जगत् यांचाहि अंतर्भाव होतो—स्वर्गाचा, नरकाचा, नाना लोकांचा, थोडक्यांत म्हणजे जें कांही अस्तित्वांत आहे त्या साऱ्याचाच ह्या 'जगता'मधें अंतर्भाव होतो. मन हें एका कार्य वस्तूचें नांव आहे, शरीर हें आणखी एका कार्य वस्तूचें नांव आहे. असेंच इतर सर्व वस्तूंचें. आणि ह्या सर्व कार्य वस्तूंचें मिळूनच हें आपलें जगत्, हें विश्वब्रह्माण्ड बनलें आहे. हें 'अ' ब्रह्म 'क' या देश-काल-निमित्तांमधून येऊन 'ब' रूपी जगत्



बनलें आहे. अद्वैत वेदान्ताचें हेंच मूल तत्त्व होय. देश, काल आणि निमित्त हीं एखाद्या विलोरी कांचासारखीं असून त्यामधून आपण ब्रह्म बघत असतों, आणि याप्रकारें खालून बघितल्यास तें ब्रह्म जगताच्या रूपाने भासूं लागतें. आता, यावरून एक गोष्ट अगदी चटकन् लक्षांत येते ती ही की, ब्रह्मामधे देश किंवा काल किंवा निमित्त यांपैकी कांहीच नाही. तिथे 'काला'ची जाणीव असूं शकत नाही, कारण तिथे मन किंवा विचार नाही. तिथे 'देशा'ची जाणीवहि असूं शकत नाही, कारण जिथे कोणत्याहि तऱ्हेचा बदल वा परिवर्तन नाही. आणि जिथे केवळ एकमेव, अद्वितीय सत्ताच विद्यमान आहे तिथे गति आणि निमित्त वा कार्य-कारणभावहि असूं शकत नाही. हें आपण नीट समजून घ्यावयास हवें आणि आपल्या मनावर चांगलें बिंबवावयास हवें की, (या संदर्भात जर 'अधःपतन' हा शब्द वापरणें गैर नसेल तर) आपण ज्याला कार्य-कारणभाव म्हणतों तो ब्रह्माचें जगत्प्रपंचाच्या रूपांत अधःपतन झाल्यानंतर सुरू होत असतो, त्यापूर्वी नव्हे; आपली इच्छाशक्ति, आपल्या वासना वगैरे सारें नेहमी 'त्यानंतर' सुरू होत असतें. मला वाटतें की शौपेनहॉरने वेदान्त समजून घेतांना ह्या ठिकाणीं चूक केली आहे, आणि म्हणूनच तो इच्छाशक्तीला इतकें प्राधान्य देतो. शौपेनहॉरने इच्छाशक्तीला प्रत्यक्ष ब्रह्माचेंच स्थान दिलें आहे. परंतु निरपेक्ष ब्रह्मसत्तेचें कधीच 'इच्छाशक्ति' या शब्दाने वर्णन करतां यावयाचें नाही. कारण इच्छाशक्ति ही जगत्प्रपंचाच्या अंतर्गत असून परिवर्तनशील म्हणजे बदलणारी आहे, आणि आपल्या आकृतींतील देश-काल-निमित्तावरील ('क' वरील) रेघेच्या वर ('अ'मधे, म्हणजेच ब्रह्मामधे) बदलहि नाही आणि गतिहि नाही. ह्या 'क'च्या खाली, म्हणजे जगत्प्रपंचामधेच बाहेरील आणि आंतील गतीस प्रारंभ होत असतो. ह्या आंतील गतीसच आपण विचार म्हणत असतों. सारांश, 'क'च्या वर इच्छाशक्ति मुळी असूंच शकत नाही, आणि म्हणूनच इच्छाशक्ति ही जगत्प्रपंचाचें कारण असणेंहि कदापि शक्य नाही. आणखी जवळ येऊन आपण स्वतःच्या देहाकडे बघितल्यास आढळून येतें की आपल्या शरीरांतील सर्वच गतींचें वा हालचालींचें कारण इच्छाशक्ति

नसते. मीं ही खुर्ची जागची हलविली; माझ्या या क्रियेचें कारण माझी इच्छाशक्तिच होय, तीच माझ्या ह्या क्रियेंत स्नायूंच्या हालचालींच्या रूपानें व्यक्त झाली. परंतु, ज्या शक्तीनें खुर्ची हलविली तीच शक्ति हृदय, फुप्फुसें वगैरेहि चालवीत आहे, पण 'इच्छाशक्ती'च्या रूपानें नव्हे. ह्या दोन्ही शक्ति एकच आहेत असें धरून चाललें तरीहि ती जेव्हा जाणिवेच्या पातळीवर येते तेव्हाच तिला 'इच्छाशक्ति' म्हणतां येतें, परंतु ती अशी ह्या जाणिवेच्या पातळीवर येण्यापूर्वीच तिला इच्छाशक्ति म्हणणें म्हणजे तिला चुकीचें नांव देणें होय. ह्यामुळेच शौपेनहॉरच्या तत्त्वज्ञानांत बराच गोंधळ उडालेला आहे. असो.

एक दगड पडतो, आणि आपण लगेच विचारतों की तो कां पडला ? कारणाशिवाय कांहीहि घडत नसतें असें गृहीत धरलेलें असलें तरच हा प्रश्न संभवतो. हें आपण नीट ध्यानांत घ्यावें अशी माझी आपल्याला विनंती आहे, कारण एखादी घटना कां घडली असें जेव्हा आपण विचारतों तेव्हा आपण असें धरूनच चलत असतों की घडणाऱ्या प्रत्येक घटनेच्या मागे एक 'कां' असतें, म्हणजेच, त्या घटनेच्या पूर्वी असें कांहीतरी विद्यमान असतें की जें त्या घटनेचें कारण होय. ह्या 'आधी आणि नंतर'च्या क्रमालाच कार्यकारणभाव म्हणत असतात. ह्याचा अर्थ असा की, ह्या जगामधली प्रत्येक गोष्ट एकदा 'कारण' असते आणि एकदा 'कार्य' असते. प्रत्येक गोष्ट स्वतःच्या नंतरच्या कांही गोष्टींचें कारण असते आणि परत स्वतःच्या आधीच्या कोणत्या-तरी गोष्टीचें कार्य असते. ह्यालाच कार्य-कारणाचा नियम म्हणतात, आणि त्याच्या आधारानेच आपण कोणताहि विचार करूं शकत असतों. ह्या कार्य-कारणभावावर दृढ विश्वास असल्याखेरीज आपण मुळी विचारच करूं शकणार नाहीं. आपला असा विश्वास असतो की ह्या विश्वांतील प्रत्येक परमाणु, मग तो कांहीहि असो, इतर सर्व परमाणूंशीं कसा ना कसा तरी संबद्ध असतो. आपल्याठायीं ही धारणा कशी निर्माण झाली ह्याविषयी बरीच चर्चा होऊन गेली आहे. युरोपमधे असे कित्येक अंतःस्फूर्तिवादी तत्त्वज्ञ होऊन गेले आहेत की ज्यांच्या मतें ही धारणा मानवाच्या ठायीं स्वभावसिद्धच असते, तर

इतरांच्या मतें मानवाच्या ठायीं ती अनुभवांतून जन्मली आहे, पण ह्या वादाचा निर्णय कधीच झाला नाही. वेदान्ताला ह्यासंबंधी काय म्हणावयाचें आहे तें आपण पुढे पाहूंच. परंतु आपण आधी हें नीट समजून घ्यावयास हवें की, केव्हाहि 'कां' असा प्रश्न विचारतांना आपण असें गृहीतच धरून चालत असतों की आपल्या भोवती घडणाऱ्या प्रत्येक घटनेच्या 'पूर्वी' कांहीतरी घडलेलें असतें आणि तिच्या 'नंतर' कांहीतरी घडणार असतें. ह्या प्रश्नांत ही आणखी एक धारणा अनुस्यूत असते की ह्या विश्वांतील कोणताहि पदार्थ स्वतंत्र नाही, प्रत्येक पदार्थावर तद्व्यतिरिक्त दुसरा एखादा पदार्थ कार्य करीत असतोच. परस्परसंबद्धता––एकमेकांचा एकमेकांशीं संबंध असणें–– हा समस्त विश्वाचा नियम आहे. ह्या विश्वांत कांहीच अन्यनिरपेक्ष नाही, सर्व गोष्टी परस्परसापेक्ष आहेत. एक दुसरीच्या अधीन असते, दुसरीवर अवलंबून असते. स्व-तंत्र असें कांहीच नाही. परंतु म्हणूनच 'ब्रह्मावर कशाचें कार्य होऊन तें ब्रह्म हें जगत् बनलें' हा प्रश्न विचारतांना आपण केवढी चूक करीत असतों बरें! कारण हा प्रश्न विचारणें म्हणजे असें गृहीत धरून चालणें होय की ब्रह्महि आणखी कशाने तरी मर्यादित आहे, तें आणखी कशाच्या तरी अधीन आहे. आणि असें गृहीत धरणें म्हणजे ब्रह्माला–– त्या निरपेक्ष सत्तेला ह्या विश्वांतील सापेक्ष, पराधीन वस्तूंच्या पायरीलाच आणणें होय. परंतु वस्तुतः ब्रह्मामधे वा त्या निरपेक्ष सत्तेमधे–– आपल्या आकृतींतील 'अ'मधे––देश, काल, किंवा कार्य-कारणभाव नाही, तें एकमेवाद्वितीय आहे, मनाच्या अतीत आहे. जें केवळ स्वतःच्या अस्तित्वानेच अस्तित्वांत असतें, म्हणजेच जें स्वतःसिद्ध वा स्वयंभू असतें, एकमेव अद्वितीय असतें, त्याचें कांहीहि 'कारण' असूं शकत नाही. जें मुक्त असतें, स्व-तंत्र असतें त्याचें कांही 'कारण' असूं शकत नाही, अन्यथा तें मुळी मुक्त वा स्वतंत्र राहणारच नाही, तें तर मग बद्ध होऊन जाईल, परतंत्र होऊन जाईल. कोणतीहि सापेक्ष गोष्ट स्व-तंत्र असूंच शकत नाही. असो तर, यावरून आपल्या लक्षांत येईल की 'अनंत ब्रह्म सान्त कां झालें?' हा प्रश्नच मुळी संभवत नाही, तो स्वविरोधी आहे.

हा सर्व सूक्ष्म तत्त्वविचार बाजूस ठेवून आपल्या नेहमीच्या तर्कबुद्धीच्या साहाय्यानेदेखील, आपल्या धोपट सामान्यज्ञानानेदेखील हें आपण निराळ्या तऱ्हेने समजूं शकूं. प्रश्न आहे-- ब्रह्म हें जगत् कसें झालें ? अनंत हें सान्त कसें झालें ? निरपेक्ष सत्ता सापेक्ष कशी झाली ? आता, क्षणभर असें धरून चला की आपल्याला ह्या प्रश्नाचें उत्तर कळलें. पण तसें झाल्यास मग तें ब्रह्म काय ब्रह्म राहील ?-- अनंत काय अनंत राहील ? निरपेक्ष काय निरपेक्ष राहील ? नाही ! मग तर ब्रह्म एक सान्त, सापेक्ष पदार्थ बनून जाईल ! सर्वसाधारणपणें आपण 'ज्ञान' कशाला म्हणत असतों ? जी वस्तु आपल्या मनाचा 'विषय' बनते, म्हणजेच आपल्या मनाद्वारा सीमाबद्ध होते तीच आपण जाणूं शकतों, आणि ती जेव्हा आपल्या मनाच्या कक्षेपलीकडे असते, म्हणजेच आपल्या मनाचा 'विषय' बनत नाही तेव्हा आपण ती जाणूं शकत नाहीं, आपल्याला तिचें ज्ञान होत नाही. आता, हें अनंत ब्रह्म जर मनाच्या द्वारा मर्यादित वा सीमाबद्ध होईल तर मग तें मुळी अनंत राहणारच नाही, तें सान्त होऊन जाईल. जें जें म्हणून मनाच्या द्वारा मर्यादित होतें तें तें सान्त, समर्याद होऊन जात असतें. म्हणून 'अनंताला जाणतों' असें म्हणणें वदतो व्याघातच होय-- ते शब्द परस्परविरोधी आहेत. आणि म्हणूनच 'अनंत ब्रह्म सान्त कां वा कसें झालें' ह्या प्रश्नाला अजूनहि कुणी उत्तर देऊं शकला नाही, कारण ह्या प्रश्नाचें खरोखरच जर उत्तर मिळालें तर अनंत मग अनंत राहणारच नाही. 'जाणला' गेलेला ईश्वर हा मुळी ईश्वरच नव्हे ! तो मग तुमच्या-माझ्यासारखीच एक सान्त वस्तु होऊन जाईल. तो कधीच 'ज्ञात' होऊं शकणार नाही, तो नेहमीच 'अज्ञेय' राहणार.

तथापि अद्वैतवादी म्हणतात की ईश्वर हा नुसत्या 'ज्ञेया'परीस कितीतरी अधिक आहे. हें सत्य आपण नीट समजून घ्यावयास हवें. ज्या अर्थाने अज्ञेयवादी प्रतिपादन करतात त्या अर्थाने ईश्वर अज्ञेय आहे अशी कल्पना करून घेऊं नका. उदाहरणादाखल ही समोरची खुर्ची घ्या. आपण ही खुर्ची जाणतों, तिचें आपल्याला ज्ञान होतें, ती एक ज्ञात वस्तु आहे. परंतु आभाळाच्या पलीकडे काय आहे, तिथे

लोकांचें अस्तित्व आहे किंवा नाही हें आपल्याला बहुधा अजीबात अज्ञेय आहे. पण ईश्वर मात्र ह्या खुर्चीसारखा 'ज्ञात'हि नाही आणि आभाळापलीकडील गोष्टींसारखा 'अज्ञेय'हि नाही. तो या अर्थाने 'ज्ञात' वा 'अज्ञेय' नाही. उलट, ज्याला 'ज्ञात' म्हणतात त्यापेक्षाहि ईश्वर कांहीतरी अधिक आहे हाच 'ईश्वर अज्ञात व अज्ञेय होय' या म्हणण्याचा खरा अर्थ आहे. कित्येक प्रश्न अज्ञात वा अज्ञेय आहेत असें म्हणण्याचा प्रघात आहे, त्या अर्थाने कांही अज्ञात वा अज्ञेय हा शब्द ईश्वराच्या बाबतींत वापरला जात नसतो. ईश्वर हा 'ज्ञाता'पेक्षाहि अधिक ज्ञात आहे. ही खुर्ची आपल्याला 'ज्ञात' आहे, पण ईश्वर आपल्याला तिच्यापेक्षाहि कितीतरी अधिक ज्ञात आहे, कारण ही खुर्ची जाणतांना ती आपल्याला 'ईश्वरामधूनच' जाणावी लागत असते. तो साक्षीस्वरूप आहे, आमच्या समस्त ज्ञानांचा शाश्वत साक्षी आहे. आपण जें कांही जाणतों तें आपल्याला त्याच्यामधूनच, त्याच्याद्वाराच जाणून घ्यावें लागत असतें. तोच आपल्या आत्म्याची खरी सत्ता होय—तोच आपला खरा आत्मा होय. तोच आपल्या ह्या 'मी' ची खरी सत्ता होय—तोच आपला खरा 'मी' होय. आणि ह्या 'मी'मधून जाणल्याखेरीज आपण कांहीच कधी जाणूं शकत नाहीं, व म्हणूनच आपल्याला सर्वकांही ब्रह्मामधूनच—ईश्वरामधूनच—जाणावें लागतें. ही खुर्ची जाणावयाची झाल्यास आपल्याला ती ब्रह्मामधूनच जाणावी लागेल. याप्रमाणे ईश्वर ह्या खुर्चीपेक्षा आपल्या अनंतपट जास्त जवळ आहे, आणि तरीहि तो आपल्या अनंतपट वर आहे. तो ज्ञातहि नाही, अज्ञातहि नाही, तर त्या दोहोंपेक्षाहि अनंतपट श्रेष्ठ आहे. तो आपला आत्मा आहे. "ह्या विश्वांत जर तो आनंदस्वरूप ओतप्रोत भरून नसता तर येथे कोण क्षणभरहि जगूं शकला असता, क्षणभरहि श्वासोच्छ्वास करूं शकला असता ?" कारण त्याच्याचमुळे आपण श्वासोच्छ्वास करीत असतों, त्याच्याच अस्तित्वामुळे आपण अस्तित्वांत असतों. तो म्हणजे कुठेतरी बाहेर उभा राहून माझ्या शरीरांतील रक्त खेळवीत असतो असें नव्हे. वरील सर्व विधानांचा अर्थ हाच की तोच ह्या साऱ्याची खरी सत्ता आहे, तो माझ्या आत्म्याचा आत्मा आहे. आपण त्याला 'जाणतों' असें आपण कदापि म्हणूं शकणार नाहीं; तसें म्हणणें म्हणजे

त्याला खाली ओढणेंच होय. ज्याप्रमाणे आपण उडी मारून स्वतःच्या बाहेर येऊं शकत नाहीं त्याचप्रमाणे आपण त्याला 'जाणूं' शकत नाहीं. ज्ञान म्हणजेच 'विषयीकरण' (objectification)-- ज्ञेय वस्तूला ज्ञात्याचा 'विषय' बनविणें. उदाहरणार्थ, स्मरणकालीं आपण अनेक गोष्टी 'विषयीकृत' करीत असतों, त्यांना जणु स्वतःच्या बाहेर काढून त्यांच्याकडे बघत असतों. समस्त स्मृति, ज्या सर्व गोष्टी मीं पाहिल्या आहेत आणि ज्या मी जाणतों त्या सर्व माझ्या मनांतच अवस्थित आहेत. ह्या सर्वांचीं चित्रें, ह्या सर्व गोष्टींचे ठसे वा संस्कार माझ्या मनांत अवस्थित आहेत; आणि जेव्हा मी त्यांच्याविषयी विचार करूं लागतों, त्यांना जाणूं इच्छितों तेव्हा त्या ज्ञानप्रक्रियेंतील पहिली क्रिया म्हणजे मी त्यांना माझ्या स्वतःबाहेर प्रक्षेपित करीत असतों. ईश्वरासंबंधी आपण असें कधीच करूं शकणार नाहीं, कारण तो आपल्या आत्म्याचाहि आत्मा आहे; त्याला आपण असें स्वतःबाहेर कदापि प्रक्षेपित करूं शकणार नाहीं. वेदान्तामधे (छांदोग्य उपनिषदामधे) पुढील गहन विधान आढळतें--"स यः एषः अणिमा, ऐतदात्म्यम् इदं सर्वं, तत् सत्यं, स आत्मा, तत्त्वमसि श्वेतकेतो इति"--"तें सूक्ष्म जगत्कारण सर्व वस्तूंचा आत्मा आहे, तेंच सत्य आहे, हे श्वेतकेतो, तूंच तें आहेस." हें 'तत्त्वमसि' वाक्य वेदान्तामधील अत्यंत पवित्र वाक्य गणलें गेलें असून त्याला 'महावाक्य' असें म्हणत असतात, आणि छांदोग्य उपनिषदांतील वरील सविस्तर विधानावरून 'तत्त्वमसि'चा--'तूंच ईश्वर आहेस' ह्याचा खरा अर्थ नीट समजूं शकतो. ह्याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि शब्दांत तुम्ही ईश्वराचें वर्णन करूं शकणार नाही. 'तत्त्वमसि'--'तूंच ईश्वर आहेस'--हेंच ईश्वराचें यथायोग्य वर्णन होय. दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेने त्याचें वर्णन करणें, त्याला पिता, बंधु वा परम मित्र म्हणणें म्हणजे ईश्वराला 'विषयीकृत' करणें होय, आणि तें तर कदापि संभवनीय नाही. तो समस्त ज्ञानाचा नित्य 'विषयी' आहे--तो ज्ञानाचा 'विषय' कसा होणार ? मी ही खुर्ची बघतों, मी तिचा द्रष्टा वा 'विषयी' आहें; अशाच प्रकारें ईश्वर माझ्या आत्म्याचा नित्य द्रष्टा--नित्य ज्ञाता--नित्य 'विषयी' आहे. त्याला--तुमच्या आत्म्याच्या त्या अंतरात्म्याला--वस्तुमात्राच्या त्या खऱ्या सत्तेला

तुम्ही कसें काय 'विपयीकृत' करणार--स्वतःच्या बाहेर काढून एखाद्या ज्ञेय वस्तूप्रमाणे कसें काय वघणार ? म्हणून मी तुम्हांला फिरून एकदा सांगूं इच्छितों की, ईश्वर ज्ञेयहि नाही आणि अज्ञेयहि नाही--तो या दोहोंपेक्षाहि अनंतपट श्रेष्ठ आहे. तो आणि आपण एक आहोंत, अभिन्न आहोंत; आणि जें आपल्याहून भिन्न नाही तें आपल्या-पक्षीं ज्ञेयहि नसतें आणि अज्ञेयहि नसतें; उदाहरणार्थ आपला आत्मा,--माझा आत्मा मला ज्ञेयहि नाही आणि अज्ञेयहि नाही. तुम्ही आपला स्वतःचा आत्मा जाणूं शकणार नाही; तुम्ही त्याला बाहेर काढून त्याच्याकडे 'विषय' म्हणून बघूं शकणार नाही, कारण तुम्हीच तो आहांत, आणि म्हणून तुम्ही स्वतःला त्यापासून पृथक् वा वेगळें करूं शकणार नाही. परंतु त्याचबरोबर तो अज्ञेयहि नाही, कारण 'अज्ञेय' असावयासहि तो प्रथम 'विषय' असला पाहिजे. पण तो 'विषय' असणें तर कदापि शक्य नाही. शिवाय, स्वतःपेक्षा तुम्हांला आणखी जास्त ज्ञात काय बरें असेल ? म्हणूनहि तुम्ही स्वतःच्या आत्म्याला अज्ञेय म्हणूं शकणार नाही, कारण तोच तुम्हांला सर्वांत जास्त ज्ञात आहे. वस्तुतः तो आपल्या ज्ञानाचा मध्यबिंदुच असतो. अगदी ह्याच अर्थानें ईश्वर ज्ञातहि नाही किंवा अज्ञेयहि नाही, तर त्या दोहोंपेक्षाहि अनंतपट श्रेष्ठ आहे; कारण तोच आपला खरा आत्मा आहे.

अतएव, आपण पाहिलें की प्रथमतः म्हणजे "तें अनंत ब्रह्म हें जगत् कसें झालें ?" हा प्रश्नच मुळी स्वविरोधी आहे. आणि द्वितीयतः म्हणजे, आपल्याला दिसून येतें की अद्वैतवादानुसार ईश्वर म्हणजे एकत्व-- एकात्मत्व; आणि म्हणून आपण त्या ईश्वराला कदापि 'विषय' बनवूं शकणार नाहीं, कारण, आपल्याला माहीत असो की नसो, पण आपण सदा त्याच्यांतच अस्तित्वांत असतों आणि त्याच्यांतच सारी हालचाल, सगळीं कार्यें करीत असतों. आपण जें काम करतों तें सदैव त्याच्यामधून, त्याच्याद्वारेंच करीत असतों. आता प्रश्न येतो की, हीं देश, काल आणि निमित्त ( कार्य-कारणभाव ) काय आहेत ? अद्वैत म्हणजेच तर द्वैताचा अभाव-- फक्त एकच सत्ता अस्तित्वांत आहे, दोन नाहीत. आणि तरीहि असें विधान केलेलें

आढळतें की, तें अनंत ब्रह्म देश-काल-निमित्तांच्या आवरणामधून नाना रूपांनी अभिव्यक्त होत असतें. त्यावरून असें वाटतें की दोन वस्तु अस्तित्वांत आहेत-- पहिली म्हणजे अनंत ब्रह्म, आणि दुसरी म्हणजे माया अथवा देश-काल-निमित्तांची समष्टि. वरवर पाहतां या दोन वस्तु आहेत हें खूप पटण्यासारखें वाटतें. परंतु अद्वैतवादी याबाबत म्हणतात की, नाही, जें आहे त्याला दोन वस्तु म्हणतां यावयाचें नाही. कारण, दोन वस्तु जर असतील तर मग ब्रह्माप्रमाणे त्या दोन्ही निरपेक्ष, स्वतंत्र सत्ता असावयास हव्यात आणि त्यांच्यावर कार्य-कारणभावाचा परिणाम व्हावयास नको. परंतु प्रथमतः म्हणजे, देश-काल-निमित्तांना स्वतंत्र अस्तित्व आहे असें म्हणतां यावयाचें नाही. काल हा पूर्णपणें परतंत्र आहे, आमच्या मनाच्या प्रत्येक बदलाबरोबर तो बदलत असतो; म्हणजेच कालाला स्वतंत्र अस्तित्व नाही. कधीकधी स्वप्नांत असें वाटतें की आपण कित्येक वर्षांचा काळ घालविला आहे, तर कधीकधी कित्येक महिने एका क्षणासारखे निघून गेल्याप्रमाणे वाटतात. यावरून हेंच दिसून येतें की काल हा पूर्ण-पणें आपल्या मनाच्या अवस्थेवर अवलंबून असतो. द्वितीयतः म्हणजे, काळाची कल्पना कधीकधी अजीबात लुप्त होऊन जाते. असेंच 'देशा'चेंहि आहे. आपण 'देश' म्हणजे काय हें जाणूं शकत नाहीं. परंतु याप्रमाणे 'देशा'चें स्वरूप सांगतां आलें नाही, त्याचें नक्की लक्षण सांगतां आलें नाही तरीपण तो अस्तित्वांत आहेच आहे. तो इतर वस्तूंपासून पृथक् वा वेगळा अस्तित्वांत असत नाही. 'निमित्ता'चें वा कार्य-कारणभावाचेंहि असेंच आहे.

या देश-काल-निमित्तांचा एक विशेष गुण आपल्याला आढळून येतो, तो हा की तीं इतर वस्तूंपासून पृथक् वा वेगळीं अस्तित्वांत असूं शकत नाहीत. ज्याला कोणताहि वर्ण नाही, ज्याला कोणतीहि सीमा नाही आणि ज्याचा भोवतालच्या वस्तूंशीं कांही संबंध नाही अशा अमूर्त 'देशा'ची वा अवकाशाची कल्पना करण्याचा प्रयत्न करून पाहा. ती तुम्हांला कदापि करतां यावयाची नाही; 'दोन सीमांमधली वा तीन वस्तूंमधली जागा' अशीच तुम्हांला 'देशा'ची वा अवकाशाची कल्पना करावी लागेल. यावरून हेंच दिसून येतें की

'देशा'चें वा अवकाशाचें अस्तित्व इतर वस्तूंवरच अवलंबून असतें, त्याला स्वतंत्र असें अस्तित्व नाही. असेंच 'काला'चेंहि; आपण शुद्ध, अमूर्त अशा कालाची कल्पना करूं शकणार नाहीं; कालाची कल्पना करावयाची झाल्यास आपल्याला एक आधीची आणि एक नंतरची घटना घेऊन त्या दोघींना एकमेकींशीं क्रमाच्या कल्पनेने जोडावें लागेल. अवकाश वा 'देश' ज्याप्रमाणे बाहेरील दोन वस्तूंवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे कालहि दोन घटनांवर अवलंबून असतो. दोन वस्तूंशीं संबंध जोडल्याखेरीज आपल्याला 'देशा'ची वा अवकाशाची कल्पना करतां यावयाची नाही, आणि दोन घटनांशीं संबंध जोडल्याखेरीज आपल्याला कालाची कल्पना करतां यावयाची नाही. आणि 'निमित्ता'ची वा कार्यकारणभावाची जाणीव ही ह्या देश-कालांवर अवलंबून असते. आपण कार्यकारणभावाच्या कल्पनेला देश-कालांपासून वेगळें करूंच शकणार नाहीं. सारांश, ह्या देश-काल-निमित्तांचें हें एक वैशिष्ट्य आहे की त्यांना स्वतंत्र असें अस्तित्वच नाही. ह्या भिंतीला किंवा ह्या खुर्चीला जें अस्तित्व आहे तेंसुद्धा त्यांना नाही. प्रत्येक वस्तूभोवती घोटाळणाऱ्या छायांसारखीं तीं असून त्यांना तुम्ही कधीच धरूं शकणार नाही. त्यांना खरेखुरें अस्तित्व नाहीं; पण म्हणून तीं अस्तित्वांतच नाहीत असेंहि म्हणतां यावयाचें नाही, कारण ह्या विश्वामधली प्रत्येक वस्तु त्यांच्याच माध्यमांतून व्यक्त होत आहे हें आपण पाहतोंच. याप्रमाणे, आपल्याला आढळून येतें की, प्रथमतः म्हणजे, ह्या देश-काल-निमित्तांच्या समूहाला अस्तित्व आहे असेंहि म्हणतां येत नाही, आणि अस्तित्व नाही असेंहि म्हणतां येत नाही. द्वितीयतः म्हणजे, कधीकधी तीं अजीबात लोपून जात असतात. उदाहरणच द्यावयाचें झाल्यास समुद्रावरील लाटेचें देतां येईल. लाट आणि समुद्र अभिन्न आहेत, एकच आहेत हें खरें, परंतु तरीसुद्धा लाट म्हणून कांहीतरी आहे आणि ती समुद्रापासून वेगळी आहे हेंहि नाकारतां यावयाचें नाही. समुद्र आणि लाट यांच्यांतील हा वेगळेपणा कशामुळे निर्माण होत असतो ? तो होत असतो-- 'नामा'मुळे आणि 'रूपा'मुळे. 'नाम' म्हणजे त्या वस्तूसंबंधी आपल्या मनांत जी धारणा किंवा कल्पना असते ती-- म्हणजेच त्या वस्तूचा

आपल्याला होणारा बोध. आणि 'रूप' म्हणजे तिचा आकार. आता, लाट या रूपाचा आपण समुद्रापासून अगदी पृथक्पणें विचार करूं शकूं काय ? नाही, कदापि नाही. ती नेहमीच समुद्राच्या कल्पनेशीं निगडित असते. ती लाट विरतांच तात्काळ तिचा आकार नाहीसा होतो, आणि तरीदेखील तो तिचा आकार वा तें 'रूप' म्हणजे आपला भ्रम होता अशांतला कांही भाग नाही. जोंवर ती लाट होती तोंवर तिचें रूपहि होतें, आणि तोंवर तें रूप आपण कदापि नाकारूं शकत नव्हतों. हीच माया.

असें म्हणतां येईल की, हें समस्त विश्वच जणुकाय त्या ब्रह्माचें एक विशिष्ट रूप आहे. ब्रह्म जणुकाय समुद्र असून तुम्ही-मी, चंद्र-सूर्य-तारे वगैरे आपण सगळे त्या समुद्रावरील निरनिराळ्या लाटा आहोंत. ह्या लाटा त्या समुद्रापासून वेगळ्या कशामुळे होतात ? 'रूपा'मुळे. आणि देश-काल-निमित्तच तें रूप होय. परत हीं देश, काल आणि निमित्त संपूर्णपणें त्या लाटेवर अवलंबून आहेत. ती लाट विरतांच तींहि अंतर्धान पावतात. जीवात्म्यानें ह्या मायेचा त्याग करतांच ती त्याच्यापक्षीं अंतर्धान पावते आणि तो मुक्त होऊन जातो. ह्या देश-काल-निमित्तांविषयीची आपली ओढ नाहीशी करणें, त्यांच्या तावडींतून सुटणें यासाठीच आपली सगळी धडपड आहे, कारण तींच आपल्या मार्गांत सतत अडथळे आणीत असतात. तीं आपल्या मार्गांतील विघ्नें होत आणि म्हणून त्यांच्या कचाटयांतून सुटण्यासाठी आपण धडपडत असतों. 'क्रमविकासवाद' म्हणजे तरी काय ? त्यांत दोन शक्ति कार्य करीत असतात. एक प्रचंड, अव्यक्त अंतःशक्ति स्वतःला व्यक्त करण्याचा यत्न करीत असते, आणि बाह्य घटना तिला दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असतात, परिस्थिति तिला व्यक्त होऊं देत नसते. म्हणून, ह्या बाह्य घटनांशीं वा या परिस्थितीशीं झगडण्यासाठी ती शक्ति फिरफिरून नवींनवीं शरीरें धारण करीत असते. उन्नतीच्या ह्या प्रयत्नांत ॲमीबा ( इंद्रियरहित एक सूक्ष्म जंतु ) एक निराळें शरीर धारण करून कित्येक अडथळ्यांवर मांत करतो, त्यानंतर मग आणखी निराळें शरीर धारण करतो, आणि याप्रमाणे नवींनवीं शरीरें धारण करीत करीत अखेर मनुष्यरूपांत परिणत होतो. आता, ही कल्पना

पुढे पुढे नेत गेल्यास अंतीं तिच्यांतून हाच तर्कसंगत अंतिम सिद्धान्त निष्पन्न होईल की, अखेर अशी एक वेळ येईल की जेव्हा, अॅमिबांत असलेली आणि मनुष्यरूपाने विकसित होणारी ही शक्ति प्रकृतीचे समस्त अडथळे उल्लंघून जाईल आणि अंतीं बाह्य घटनांच्या वा परिस्थितीच्या खोड्यांतून कायमची मुक्त होईल. तत्त्वज्ञानाच्या भाषेंत ही कल्पना अशी मांडतां येईल की, प्रत्येक क्रियेचे दोन घटक असतात-- पहिला 'विषयी' आणि दुसरा 'विषय'; आणि आपल्या जीविताचें एकमेव उद्दिष्ट आहे-- ह्या 'विषयी'ला 'विषया'चे स्वामी बनविणें. उदाहरणार्थ, एक मनुष्य माझ्या मनाला लागेल असें मला बोलतो आणि त्यामुळे मी खट्टू होतों. अशा परिस्थितींत मी स्वत:ला पुरेसें सबळ बनवून त्या परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करीन-- मग तो माणूस मला बोलला तरी मला त्याचें कांही वाटावयाचें नाही. अशाच रीतीने आपण सगळेजण प्रकृतीवर विजय मिळविण्याचा प्रयत्न करीत असतों. नैतिकता म्हणजे तरी काय ? नैतिकता म्हणजेच 'विषयी'ला अथवा 'स्वत:'ला दृढ करणें की जेणेंकरून आपण सर्व-प्रकारच्या प्रलोभनांमधे अविचल राहूं शकूं. सारांश, आमच्या तत्त्व-ज्ञानाचा हा अगदी तर्कसंगत, अंतिम सिद्धान्त आहे की अशी एक वेळ आलीच पाहिजे की जेव्हा आपण प्रकृतीच्या समस्त अवस्थांवर जय मिळवूं शकूं, कारण किती झालें तरी प्रकृति अखेर सान्तच आहे.

ही आणखी एक गोष्ट आपण शिकावयास हवी की प्रकृति ही सान्त, मर्यादित आहे. प्रकृति सान्त वा मर्यादित आहे हें कसें समजावयाचें ? हें आपण केवळ तत्त्वज्ञानाच्या मदतीनेच समजूं शकूं. त्या अनंताचा उपाधींमधून आविष्कार म्हणजेच प्रकृति. उपाधि म्हणजेच समर्यादपणा. म्हणूनच प्रकृति ही सान्त वा समर्याद आहे. आणि म्हणूनच अशी एक वेळ आलीच पाहिजे की ज्या वेळीं आपण समस्त बाह्य अवस्था वा परिस्थिति जिंकूं शकूं. ह्या विजयाचा उपाय कोणता ? आपण बाहेरील 'सर्व' घटना वा 'सर्व' अवस्था जिंकूं शकूं हें खरोखरच संभवनीय आहे काय ? नाही, कदापि नाही. आपण बाहेरील वस्तूंमधे बदल घडवून आणून सर्व बाह्य वस्तु जिंकणें शक्य नाही. लहानसा मासा पाण्यांतल्या आपल्या सगळ्या शत्रूंच्या तडाख्यांतून निसटूं

इच्छितो. तो तें कसें साधतो ? पंख उगवून घेऊन-- पक्षी बनून आकाशांत उडून जाऊन. तो मासा पाण्यांत किंवा हवेंत बदल घडवून आणीत नसतो, तो बदल घडवून आणतो स्वत:मधेच. बदल नेहमी 'विषयी'मधे-- 'स्वत:मधेच घडवून आणावयाचा असतो. क्रमविकासाच्या समस्त प्रक्रियेंत 'स्वत:'मधे बदल घडवून आणूनच प्रकृतीवर जय मिळविला जात असल्याचें तुमच्या निदर्शनास येईल. हेंच तत्त्व धर्माला आणि नीतीला लावा, म्हणजे तुम्हांला आढळून येईल की केवळ 'स्वत:'मधे बदल घडवून आणूनच वाईटावर वा अशुभावर जय मिळविला जात असतो. अशा रीतीने अद्वैत वेदान्त हा 'स्वत:'मधे बदल घडवून आणण्यावरच सगळा भर देतो. सारेंकांही 'स्वत:'वरच अवलंबून आहे. पाप, वाईट, दु:ख वगैरेंच्या नांवाने हाकाटी करणें अगदी असमंजसपणाचें आहे, कारण त्या गोष्टी मुळी 'बाहेर' अस्तित्वांतच नाहीत. मी रागवावें अशी परिस्थिति पुन:पुन: निर्माण झाली तरीसुद्धा त्या सर्व अवस्थांत स्थिर, अविचलित राहणें जर माझ्या अंगीं बाणलें असेल तर कशानेहि आणि कधीहि माझ्या ठिकाणीं क्रोधाचा उद्रेक होणार नाही. लोकांनी माझा कितीहि द्वेष केला तरी मीं जर स्वत:ला तो मनावर न घेण्याचें वळण लावून घेतलें असेल तर मग मला कुणाविषयीहि द्वेष वाटावयाचा नाही.

म्हणून या बाबतींत विजय मिळविण्याची रीत आहे-- 'स्वत:'-मधे बदल करणें, 'स्वत:'ची उन्नति करणें, 'स्वत:'मधे पूर्णत्व आणणें. 'विषयी'मधून 'विषयां'वर विजय. यासंबंधांत मी असें अगदी धीटपणें म्हणूं इच्छितों की, आधुनिक जगांतील भौतिक आणि आध्यात्मिक संशोधनाशीं मेळ बसूं शकेल असा फक्त एकच धर्म आहे, आणि तो म्हणजे अद्वैत वेदान्त. अद्वैतवेदान्ताचा ह्या आधुनिक संशोधनांशीं केवळ मेळच बसतो असें नव्हे, तर तो चार पावलें त्यांच्या पुढेच आहे असें म्हणतां येईल. आणि म्हणूनच तो आधुनिक वैज्ञानिकांना इतका रुचतो. या आधुनिक वैज्ञानिकांना आढळून आलें आहे की जुना द्वैतवाद आज थिटा पडत आहे, त्याने त्यांच्या आजच्या गरजा भागण्यासारख्या नाहीत; केवळ अद्वैतवादच त्यांच्या अपेक्षा पुऱ्या करूं शकतो. माणसांत नुसता विश्वास असून भागत नाही, तो विश्वास बुद्धिनिष्ठ असावयास

हवा. विश्वासाने त्याच्या बुद्धीची गळचेपी व्हावयास नको. वाटेल त्यावर विश्वास ठेवून कसें चालेल? आता, ज्याअर्थी या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत देखील 'माझ्या पूर्वजांच्या धर्माखेरीज इतर कोणताहि आणि कुठलाहि धर्म खोटाच असला पाहिजे' अशी अनेकांची धारणा असल्याचें आढळतें, त्याअर्थी आमच्यांत अजूनहि बराच दुबळेपणा शिल्लक आहे हें उघड आहे. या सर्व कल्पना आपण टाकून दिल्या पाहिजेत. अर्थातच, हा प्रकार केवळ तुमच्याच देशांत (इंग्लंडमधेच) आहे असें मला मुळीच म्हणावयाचें नाही. हा प्रकार सर्वच देशांत आहे, आणि माझ्या स्वतःच्या देशांत तर सगळ्यांत जास्त आहे. माझ्या देशांत हा अद्वैतवाद सर्वसाधारण लोकांपर्यंत कधीच पोहोचूं दिला गेला नाही. प्रथम कांही संन्याशांनी त्याचा कबजा घेतला आणि तो अरण्यांत नेला—त्यांनी अरण्यांत राहून त्याची साधना केली, आणि म्हणूनच वेदान्ताचें 'आरण्यक' असें नांव पडलें. भगवंताच्या दयेनें बुद्धदेव आले आणि त्यांनी जनसमाजांत त्याचा प्रसार केला. परिणामीं उभें राष्ट्र बौद्ध होऊन गेलें. त्यानंतर बऱ्याच काळाने, ज्या वेळीं नास्तिकांनी आणि अज्ञेयवाद्यांनी फिरून सारा देश नासविला त्या वेळीं तत्कालीन विचारवंतांना त्या जडवादाच्या दलदलींतून भारताला बाहेर काढण्यासाठी एकमेव अद्वैतवादच उपयोगी पडण्यासारखा वाटला.

अद्वैताने भारताला जडवादापासून अशा रीतीने दोनदा वांचविलें आहे. बुद्धदेवांचा उदय होण्यापूर्वी भारतांत भयंकर जडवाद माजला होता. तो जडवाद अत्यंत हिडीस स्वरूपाचा होता. आजकालचा (पाश्चात्त्य) जडवाद त्या मानाने कितीतरी बरा. तो जडवाद आजकालच्या जडवादापेक्षाहि अत्यंत वाईट होता, अगदीच निपटारा होता. एका अर्थाने मी स्वतः एक जडवादी आहें, कारण अवघ्या विश्वब्रह्माण्डभर फक्त एकाच वस्तूचें अस्तित्व आहे असा माझा विश्वास आहे. आजकालचे वैज्ञानिक जडवादीहि हेंच म्हणतात, फक्त ते त्या एका वस्तूला 'जडद्रव्य' म्हणतात आणि मी तिला ब्रह्म म्हणतों. ह्या जडवाद्यांच्या मतें या जडद्रव्यांतूनच मानवाच्या साऱ्या आशा-आकांक्षा, धर्म प्रभृति सारेंकांही निर्माण झालें आहे, तर माझ्या मताने हें सारें ब्रह्मापासून

उत्पन्न झालें आहे. परंतु बुद्धदेवांच्यापूर्वी जो जडवाद प्रचारांत होता तो अत्यंत स्थूल, ओबडधोबड स्वरूपाचा होता. त्या जडवादाची शिकवण होती की, "खा, प्या आणि मजा करा; ईश्वर, आत्मा, स्वर्ग वगैरे सारें झूट आहे; धर्म ही कांही दुष्ट पुरोहितांनी उभी केलेली खोटी, बनावट गोष्ट आहे." 'जोंवर जिवंत आहांत तोंवर सुखांत राहण्याचा प्रयत्न करा, कर्ज काढूनहि चैन करा, तें फेडण्याची चिंता बाळगूं नका'—— ही त्या लोकांची नीति होती. हा असा होता बुद्ध-देवांच्या पूर्वीचा तो प्राचीन जडवाद. आणि त्या काळीं हा असला जडवाद इतका पसरला होता की आजहि त्याला 'लोकायतिक' म्हणजेच लोकप्रिय तत्त्वज्ञान म्हटलें जातें. या अशा परिस्थितींत बुद्धदेवांनी वेदान्त प्रकाशांत आणला, त्याचा लोकांत प्रसार केला आणि अशा रीतीने भारताला वांचविलें. बुद्धदेवांच्या निर्वाणानंतर हजार वर्षांनी भारतांत फिरून तशीच परिस्थिति निर्माण झाली होती. बहुजन-समाज——अठरापगड जातींचे आणि वंशांचे सर्वसाधारण लोक धर्मान्तर करून बौद्ध बनविण्यांत आले होते. हे लोक अत्यंत मागासलेले होते, आणि त्यामुळे साहजिकच त्यांच्या हातीं पडून बौद्ध धर्माला अवकळा आली, तो अवनत झाला. बौद्धधर्मांत ईश्वराला, जगन्नियंत्याला स्थान नव्हतें, म्हणून त्या धर्माच्या ह्या मागस, नाना लोकभ्रमांनी घेरलेल्या अनुयायांनी ईश्वराच्या अभावीं हळूहळू आपल्या जुन्या आक्राळ-विक्राळ देवता, भूतेंखेतें वगैरे पुजण्यास सुरुवात केली. सबगोलंकार होऊन बौद्धधर्म एक विचित्र खिचडी बनून गेला, सर्वत्र सावळागोंधळ माजला. ह्या अनागोंदींत जडवादाला फावलें, तो भलताच फोफावूं लागला—— त्यामुळे उच्चवर्णीय लोक घोर यथेच्छाचारी बनले आणि खालच्या वर्गाचे लोक खुळचट समजुतींत पिचूं लागले. अशा आणी-बाणीच्या वेळीं भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्य उदयास आले आणि त्यांनी वेदान्त तत्त्वज्ञानांत फिरून एकवार प्राणाचा संचार केला—— तें संजीवित केलें. वेदान्ताचें असें पुनरुज्जीवन करतांना आचार्यांनी त्याला तर्कबुद्धीच्या भरभक्कम पायावर प्रतिष्ठित केलें——वेदान्ताला तर्कनिष्ठ तत्त्वज्ञानाचें रूप देऊन त्याचा प्रचार केला. उपनिषदांमधील विवेचन बौद्धिक दृष्ट्या पुष्कळदा बरेंच गूढ स्वरूपाचें वाटतें. बुद्धदेवांनी

वेदान्ताच्या नैतिक बाजूवर भर दिला होता, श्रीशंकराचार्यांनी त्याच्या बौद्धिक बाजूवर जोर दिला. श्रीशंकराचार्यांनी उपनिषदांतील गूढ सिद्धान्तांची फोड करून दाखविली, त्यांची नीट मांडणी केली, त्यांना बुद्धिग्राह्य स्वरूप दिलें आणि अशा तऱ्हेने अत्यंत सुसंगत अशा अद्वैत दर्शनाच्या रूपांत तें उपनिषदांचें तत्त्वज्ञान लोकांपुढे ठेवलें.

आज जडवाद युरोपभर धिंगाणा घालीत आहे. त्याच्या तावडींतून आधुनिक संदेहवाद्यांची सुटका व्हावी अशी तुमचीआमची कितीहि कळकळीची इच्छा असली---त्यांच्या ठायीं श्रद्धा-विश्वास निर्माण व्हावा असें आपल्याला कितीहि मनापासून वाटत असलें--- त्यासाठी आम्हीं भगवंताची कितीहि करुणा भाकली तरी ते नास्तिक दाद द्यायला तयार नाहीत, त्यांना सारेंकांही तर्काने सप्रमाण सिद्ध करून हवें आहे. तर्कसंगत धर्मच युरोपला ह्या जडवादाच्या खोड्यांतून सोडवूं शकेल, बुद्धिनिष्ठ धर्मावरच युरोपची मुक्ति अवलंबून आहे, आणि कोणत्याहि बुद्धिनिष्ठ लोकांच्या मनाची थोडीतरी पकड घेऊं शकेल असा जर कोणता एकमेव धर्म असेल तर तो म्हणजे अद्वैतवाद-एकत्ववाद--- निर्गुण ब्रह्मवादच होय. ज्या ज्या वेळीं धर्म लोपूं लागतो आणि अधर्म पसरूं लागतो त्या त्या वेळीं ह्या अद्वैतवादाचा उदय होत असतो. आणि म्हणूनच तो आज युरोपांत आणि अमेरिकेंत मूळ धरीत आहे.

ह्या तत्त्वज्ञानाच्या संबंधांत मला आपल्याला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. प्राचीन उपनिषदांमधे आपल्याला अत्यंत उदात्त काव्य आढळून येतें; त्यांचे रचयिते महाकवि होते. प्लेटोने म्हटलें आहे की लोकांना कवितेमधूनच स्फूर्ति लाभत असते. अ-लौकिक सत्यांचा आविष्कार कवित्वामधूनहि होऊं शकतो. जगाला कवितेमधून सत्याचें दर्शन घडविण्यासाठी परमेश्वराने उपनिषदें रचणाऱ्या ह्या प्राचीन ऋषींना, ह्या सत्यद्रष्टयांना जणु मानवजातीच्या कितीतरी वर अशा कवींच्या पदावर आरूढ केलें होतें असें वाटूं लागतें. त्या ऋषींनी कधी प्रचाराचा आटापिटा केला नाही, कधी तात्त्विक चर्चेचा घोळ घातला नाही, कधी लेखकाचा आव आणला नाही. त्यांच्या हृदयांतून सत्याचें संगीत कारंज्यासारखें थुईथुई नाचत बाहेर पडे. उपनिषत्कार ऋषींच्या

नंतर आले बुद्धदेव. बुद्धदेवांच्या ठायीं वसत होतें महान्, विश्वस्पर्शी हृदय, नि अपरंपार सहनशीलता. त्यांनी धर्माला व्यवहारोपयोगी करून तो प्रत्येकाच्या दारापर्यंत पोहोचवून दिला. श्रीशंकराचार्यांच्या ठिकाणीं वसत होती प्रचंड बौद्धिक शक्ति-- असामान्य धीशक्ति. आपल्या तर्क-बुद्धीचा प्रखर प्रकाशझोत फेकून आचार्यांनी धर्म उजळून टाकला. आज आपल्याला गरज आहे-- उज्ज्वल ज्ञानज्योत, आणि बुद्धदेवांच्या त्या परम विस्मयावह, अतिविशाल, करुणामय हृदयांतील प्रेमाची प्रभा, या दोहोंच्या मिलाफाची. या दोहोंच्या मिलाफानेच--बुद्धि आणि हृदय यांच्या महन्मंगल संमीलनानेच आपल्याला सर्वोच्च तत्त्वज्ञान लाभेल. हा रत्न-सुवर्णाचा संयोग घडून आल्याने विज्ञान आणि धर्म एकत्र येऊन एकमेकांशीं हातमिळवणी करतील, काव्य आणि तत्त्वज्ञान मित्र बनतील. हाच भावी जगाचा धर्म होईल. आणि आपण जर त्याला नीट प्रत्यक्षांत उतरवूं शकूं तर तो सर्व कालांतील आणि सर्व अवस्थांतील सर्व लोकांच्या उपयोगीं पडूं शकणारा धर्म होईल असें अगदी छातीठोकपणें म्हणतां येईल. आधुनिक विज्ञानाला देखील ग्राह्य वाटेल असा फक्त हाच एकमेव मार्ग आहे, कारण एव्हाना तें जवळजवळ या मार्गापर्यंत येऊनहि ठेपलें आहे. सर्वकांही एकाच शक्तीचा आविष्कार आहे असें ज्या वेळीं एखादा विज्ञानाचार्य प्रतिपादितो त्या वेळीं तुम्हांला उपनिषदांमधील ईश्वराची-- एकमेवाद्वितीय परब्रह्माची-- आठवण होत नाही काय ? (कठ) उपनिषदांत म्हटलें नाही काय की--

"अग्निर्यथैको भुवनप्रविष्टः, रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ।
एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा, रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ॥"

--"ज्याप्रमाणें एकच अग्नि ह्या जगांत प्रवेश करून नाना रूपांनी प्रकट होत आहे, त्याचप्रमाणे तो एकमेवाद्वितीय, सर्व भूतांचा अंतरात्माहि नाना रूपांनी नटला आहे आणि त्याचबरोबर तो ह्या जगाच्या बाहेरहि--जगाच्या अतीतहि आहे." आधुनिक विज्ञान कुणीकडे चाललें आहे हें तुम्ही बघत नाही काय ? हिंदुजातीने मनाच्या अनुशीलनाचा, तत्त्वज्ञानाचा मार्ग धरला. युरोपीय राष्ट्रांनी बाह्य प्रकृतीच्या अनुशीलनाचा मार्ग चोखाळला. आज त्या दोन्ही जाती एकाच ठिकाणीं येऊन मिळत आहेत. मनाचा ठाव घेतां घेतां, मनाचा थाक लावतां लावतां

आपण अखेर, जो सर्वांचा अंतरात्मा आहे, जो सगळ्याचें सार आहे, सर्व वस्तूंची खरीखरी सत्ता आहे, जो नित्यमुक्त, नित्यानंदमय आणि नित्यसत्तास्वरूप आहे अशा त्या एकमेवाद्वितीयापर्यंत जाऊन पोहोचतों. बाह्य, जड विज्ञानामधूनहि आपण तद्वतच एकत्वापर्यंत येऊन थोपतों. विज्ञान आज आपल्याला सांगत आहे की सगळ्या वस्तु एकाच शक्तीच्या केवळ भिन्नभिन्न अभिव्यक्ति असून ती शक्ति ही अस्तित्वांत असलेल्या सर्व गोष्टींची समष्टि वा गोळाबेरीज आहे, आणि मानवजातीची गति मुक्तीकडे आहे, बंधाकडे नव्हे. माणसाने नीतिमान काय म्हणून व्हावयाचें? एवढ्याचसाठी की नैतिकता ही मोक्षाप्रत नेत असते आणि अनैतिकता बंधनांत अडकवीत असते.

अद्वैतवादाचें आणखी एक वैशिष्टय हें आहे की मोडतोड करणें हें सुरुवातीपासूनच त्याच्या स्वभावांत नाही. इतर कोणताहि धर्म वा इतर कोणतेंहि मत भग्न करणें सुरुवातीपासूनच त्याच्या स्वभावांत नाही. ही अद्वैतवादाची आणखी एक थोरवी आहे. तो निर्भयपणें घोषणा करतो की, "कुणाच्याहि विश्वासावर आघात करूं नये, कुणाचाहि बुद्धिभेद करूं नये. अज्ञानामुळे जे लोक खालच्या प्रतीच्या उपासनांना कवटाळून आहेत त्यांच्याहि त्या विश्वासाला ढका लावूं नये." अद्वैतवादाची हीच शिकवण आहे की कुणाचाहि विश्वास चाळवूं नका, कुणाची श्रद्धा भंगूं नका; माणूस जिथे आहे तिथून आणखी आणखी वर जाण्याला त्याला मदत करा, अवघ्या मानवजातीला आपलें म्हणा. हें तत्त्वज्ञान ज्या ईश्वराचा प्रचार करतें तो ईश्वर समष्टीच्या स्वरूपाचा आहे— विराट आहे. अद्वैतवादाच्या ईश्वरांत इतर कुण्याहि धर्माच्या वा इतर कुण्याहि मताच्या ईश्वराचा समावेश होऊं शकतो. सर्वांनाच लागू पडेल, सगळ्यांचेंच आपुलकीने ग्रहण करील असा एक विश्वधर्म जर तुम्हांला हवा असेल तर त्या धर्माने, फक्त कांहीजणांच्याच उपयोगी पडूं शकेल अशा ईश्वरविषयक विशिष्ट कल्पनेचा प्रचार करून चालणार नाही; तो विश्वधर्म ईश्वरविषयक सर्व कल्पनांची समष्टि वा गोळाबेरीज असावयास हवा, उन्नतीच्या निरनिराळ्या पायऱ्यांवरील समस्त धर्ममतांचा त्या विश्वधर्मांत अंतर्भाव व्हावयास हवा.

अद्वैतवादाखेरीज इतर कोणत्याहि धर्ममतांत ही असली उदार, विशाल, व्यापक दृष्टि—ही असली समष्टीची भावना इतक्या स्पष्टपणें आढळून येत नाही. ते सर्व एकेक अंश किंवा एकेक खंड असून सगळे त्या समष्टींत समाविष्ट होण्याचा यत्न करीत आहेत. असें होण्यांतच अंशाची वा खंडाची सार्थकता असते. आणि म्हणून अद्वैतवादाचा अगदी पहिल्यापासूनच भारतांतील विविध संप्रदायांशीं व पंथांशीं मुळीसुद्धा विरोध नव्हता. भारतांत आज अनेक द्वैतवादी आहेत, भारतांतील त्यांची एकूण संख्या खूपच मोठी आहे, कारण अजाण लोकांना द्वैतवाद स्वाभाविकपणेंच रुचत असतो. द्वैतवाद हें या जगाचें अत्यंत सोईस्कर, स्वाभाविक आणि सामान्यबुद्धीला सहज पटण्यासारखें स्पष्टीकरण आहे. ह्या द्वैतवाद्यांना अद्वैत कधीच विरोध करीत नाही. द्वैतवादी समजत असतात की ईश्वर ह्या विश्वाच्या बाहेर, स्वर्ग नामक एका विशिष्ट स्थानीं वसत असतो. अद्वैतवादी जाणून असतो की तो आम्हां सर्वांचा अंतरात्मा आहे, आणि त्याला थोडेंसुद्धा दूर किंवा स्वतःच्या बाहेर कुठेतरी लेखणें म्हणजे त्याचा अपमानच करणें होय, तो नास्तिकपणाच होय. त्याच्यापासून आपण वेगळे आहोंत, पृथक् आहोंत ही कल्पनाच मुळी भयावह आहे. तो आपल्या अगदी जवळांत जवळचा आहे, आणखी कशाहिपेक्षा तो आपल्या जवळचा आहे, त्याच्याइतकें जवळ आपल्याला दुसरें कांहीच नाही. "तूंच तो आहेस" ह्या वाक्याखेरीज त्याच्या-आपल्यांतील हा जवळपणा कोणत्याहि भाषेंतील आणखी कोणत्याहि शब्दांनी व्यक्त करतां यावयाचा नाही. तो आणि आपण अभिन्न आहोंत, एकच आहोंत. भगवंताशीं याखेरीज दुसरा कोणताहि संबंध अद्वैतवाद्याला समाधानकारक वाटत नाही. द्वैतवाद्याला जशी या अद्वैतसंबंधाची धास्ती वाटते आणि तो त्याला नास्तिकपणा वाटतो, तसेंच अद्वैतवाद्यालाहि द्वैताचें भय वाटतें आणि तें त्याला परमेश्वराचा अपमान करण्यासारखें वाटतें. परमेश्वराला आपली ज्ञेय वस्तु समजण्यास लोक कसे धजतात हेंच अद्वैतवाद्याला कळत नाही! पण तरीदेखील तो जाणून असतो की धर्मराज्यांत ह्या द्वैतभावालाहि स्थान आहे, त्याचेंहि प्रयोजन आहे. याप्रमाणे द्वैतवाद्याचा मार्ग त्याच्या स्वतःच्या दृष्टीने बरोबरच आहे,

त्याच्यापशीं योग्यच आहे हें जाणून असल्यामुळे अद्वैतवाद्याचा द्वैताला मुळीसुद्धा विरोध नसतो. द्वैतवादाचा दृष्टिकोनच असा आहे की त्यांतून बघणाऱ्याला भेद वा बहुत्व हें दिसणारच. द्वैतबोधाची घडणच मुळी तशी आहे. द्वैताच्या दृष्टिकोनांतून बघणाऱ्याला ईश्वर हा स्वत:हून वेगळा, स्वत:च्या बाहेर असा वाटणारच. अद्वैतवादी म्हणतो की ह्याला कांहीच हरकत नाही,—— द्वैतवादी खुशाल आपला द्वैतभाव घेऊन राहो. कारण अद्वैतवादी हें पक्कें जाणून असतो की द्वैतवाद्याचें मत कांहीहि असो, त्या मतांत कितीहि अपूर्णता असो, पण तो (अद्वैतवादी) ज्या लक्ष्यस्थानीं जाऊं इच्छीत आहे तिकडेच तो द्वैतवादीहि जावयास निघाला आहे—— दोघांचेंहि अंतिम लक्ष्य एकच आहे. हाच अद्वैतवादी आणि द्वैतवादी यांच्यांतील मोठा फरक. द्वैतवाद्याच्या ठायीं असला उदार, विशाल, व्यापक आणि सहिष्णु भाव वसत नसतो, कारण द्वैतवाद्याचा दृष्टिकोनच मुळी असा असतो की ज्यामुळे स्वत:पेक्षा वेगळे असलेले इतर सर्व दृष्टिकोन चुकीचे आहेत असें मानणें त्याला भाग पडावें. संकुचितपणा, अनुदारपणा हा द्वैतवादाचा अंगभूत दोष आहे. जगामधील कुठलेहि द्वैतवादी घ्या, त्यांचा स्वाभाविकपणेंच सगुण ईश्वरावर विश्वास असतो. त्यांचा तो ईश्वर खरें पाहतां निव्वळ एक मानवच असतो, फक्त त्याच्या ठायीं अपरंपार शक्ति वसत असते, इतकेंच. तो ह्या जगताचा सर्वसत्ताधारी शासनकर्ता असून या जगांतील कांही लोक त्याचे आवडते असतात आणि कांही लोक नावडते असतात. सगळीच त्याची लहर ! कांही लोकांवर किंवा कांही जातींवर तो निष्कारणच प्रसन्न असतो आणि त्यांच्यावर आशीर्दानांचा पाऊस पाडतो. द्वैतवादी अगदी स्वाभाविकपणें असें धरून चालत असतात —— त्यांचा असा आवडता सिद्धान्त असतो की ईश्वराचे कांही निवडक लाडके लोक असतात. आणि अशी धारणा असल्यामुळे ते ईश्वराचे 'लाडके' होण्यासाठी आसुसले असतात "फक्त आम्हीच ईश्वराचे लाडके आहोंत, आणि तुम्ही आमच्याप्रमाणे वागाल, आमचें अनुकरण कराल तरच तुम्हांला ईश्वराची कृपा लाभूं शकेल, एरवी नाही"—— असें म्हणणारे लोक तुम्हांला बहुधा प्रत्येक धर्मांतच आढळतील. कित्येक द्वैतवादी तर याहिपेक्षा संकुचित मनोवृत्तीचे असतात. ते अगदी अट्टाहासाने

प्रतिपादीत असतात की, ‘कुणावर कृपा करावयाची हें ईश्वराने आधीच ठरवून टाकलेलें आहे ! त्या ईश्वरी संकेतांत जे मावतील त्यांचाच फक्त उद्धार होईल ! इतरांनी काय वाटेल तें केलें तरी ईश्वर त्यांचा अंगीकार करायला रिकामा नाही ! ’ इतरांना वगळण्याची अशी संकुचित वृत्ति ज्याच्यांत कमीअधिक प्रमाणांत नाही असा एकतरी द्वैतवादी धर्म दाखवून देण्याचें मी तुम्हांला आव्हान देतों. आणि म्हणूनच, या द्वैतवादी धर्मांनी एकमेकांशीं भांडावें हें ओघानेच येतें. आणि वस्तुस्थितिहि तशीच आहे ! हे द्वैतवादी धर्म सदाच आपसांत झगडत आले आहेत. शिवाय, हे द्वैतवादी सर्वसाधारण लोकांचीं मनें नेहमीच जिंकत असतात, कारण द्वैतवाद हा अजाण लोकांना नेहमीच सोयीचा वाटत असतो. इतर कुणालाहि न लाभणारे कांही विशेष अधिकार आपल्याला लाभले आहेत असें मानणें त्यांना खूप आवडतें. असो. द्वैतवाद्यांच्या मतें, हातीं दंड घेतलेला आणि आपल्याला शिक्षा देण्यास तत्पर अशा प्रकारचा ईश्वर मानल्याखेरीज आपण नीतिमान होणेंच शक्य नाही. विचार करण्याची पात्रता नसलेले सर्वसाधारण लोक बहुधा द्वैतवादीच असतात. आणि सर्वच देशांत त्या बिचाऱ्यांचा नेहमीच छळ होत आला आहे. त्यामुळे साहजिकच त्यांची मुक्तीची कल्पना म्हणजे शिक्षेच्या भयापासून सुटका अशी होऊन गेली. अमेरिकेंत मला एकदा एका पाद्र्याने हटकलें होतें की, “काय ? तुमच्या धर्मांत सैतानाची कल्पना नाही ? हें कसें शक्य आहे ? त्याखेरीज लोक धार्मिक कसे बनतील ?” परंतु, याउलट आपल्याला आढळून येईल की, जगांतील सगळ्यांत चांगल्या आणि सर्वांत श्रेष्ठ अशा विभूतींनी मात्र ह्या सर्वोच्च निर्गुण ब्रह्माच्या आदर्शाचा आश्रय घेऊनच कार्य केलें आहे. ज्याने आपल्या शक्तीने लक्षावधि जीवांना संजीवन दिलें त्या पुरुषोत्तमाने–– येशू ख्रिस्तांनी ह्या निर्गुण ब्रह्माच्या भावाने प्रेरित होऊनच म्हटलें होतें–– “मी आणि माझा पिता एक आहोंत.” आणि हजारो वर्षें लोटलींत तरी त्यांची ती पावन शक्ति अजूनहि जगाचें कल्याण करीतच आहे. आणि आपल्याला हेंहि माहीत आहे की तो महापुरुष अद्वैतवादी होता म्हणूनच इतरांविषयी सदय होता. बघा ना, ज्यांना सगुण ईश्वरापरीस उच्च अशा कशाचीच धारणा

करणें शक्य नव्हतें अशा सर्वसामान्य बहुसंख्य लोकांना ते येशू ख्रिस्त सांगत असत की—"तो विश्वपिता ईश्वर, तो आपला पिता स्वर्गांत वसत आहे, त्याची करुणा भाका." जे यापेक्षा अमळ उच्च तत्त्वाची धारणा करूं शकत होते त्यांना येशू म्हणत की—"मी द्राक्षलता आहे आणि तुम्ही माझ्या शाखा आहांत." परंतु, ज्यांना त्यांनी आपलें स्वरूप अधिक पूर्णपणें प्रकट करून दाखविलें त्या आपल्या अंतरंगींच्या शिष्यांपुढे येशूंनी सर्वोच्च सत्याची घोषणा करून म्हटलें होतें की, "मी आणि माझा पिता एक आहोंत." आणि ज्यांना ते अधिकारानुसार द्वैताचा उपदेश देऊन "स्वर्गातील पित्या"ची करुणा भाकायला सांगत त्यांनाहि ते आशीर्वाद देत असत की "जेव्हा वेळ येईल तेव्हा तुम्हांला उमजेल की मी तुमच्यांत आहें आणि तुम्ही माझ्यांत आहांत. जसा मी आणि माझा पिता अभिन्न आहोंत तसेंच तुम्हां सर्वांनाहि त्या विश्वपित्याशीं एक होतां येवो."

बुद्धदेवांनी द्वैती देव-देवतांची कधीच पर्वा केली नाही. ते नास्तिक आणि जडवादी लेखले गेले. परंतु तो थोर महापुरुष एका यःकश्चित् बकऱ्यासाठी स्वतःचा प्राण देखील द्यायला तयार झाला होता. त्या पुरुषोत्तमाने मनुष्यजातीच्यापक्षीं सर्वोच्च ठरतील अशा ऊर्जस्वल नैतिक आदर्शांचा प्रसार केला. जिथेजिथे म्हणन नीतिनियम आढळून येतील तिथेतिथे त्या महामानवाचा—बुद्धदेवांचा—प्रभाव कार्य करीत आहे, त्यांच्याच उपदेशसूर्याचा एक कवडसा चकाकत आहे असें समजा. जगाला ललामभूत होणाऱ्या असल्या थोरहृदयी विभूतींना तुम्ही संकुचित सीमांमधे कधीच डांबून ठेवूं शकणार नाही. विशेषतः हें सांप्रत तर मुळीच शक्य नाही. कारण, सांप्रत मानवजातीच्या इतिहासांत असा एक कालखंड आला आहे की शंभरच वर्षांपूर्वी स्वप्नांतदेखील आली नसती इतक्या प्रमाणांत आज मानवाची बौद्धिक उन्नति झाली आहे, फक्त पन्नास वर्षांपूर्वी कुणाला कल्पना देखील करतां आली नसती एवढा वैज्ञानिक ज्ञानाचा लोंढा आज जगभर पसरला आहे. अशा काळीं लोकांना अतःपर संकुचित सीमांमधे डांबून ठेवणें शक्य आहे काय ? लोकांना संकुचित सीमांमधे डांबून ठेवण्याच्या प्रयत्नांत तुम्ही त्यांना जनावरांच्या आणि विचारहीन जडमूढांच्या

पायरीला आणीत असतां. तशाने त्यांचें नैतिक जीवन मारलें जातें. सांप्रत जर कशाची गरज असेल तर ती म्हणजे सर्वश्रेष्ठ हृदय आणि सर्वोच्च बुद्धिमत्ता यांची सांगड घालण्याची, अनंत प्रेम आणि अनंत ज्ञान यांचा गोड मिलाफ घडवून आणण्याची. वेदान्ती हे परमेश्वराचे फक्त हे तीनच गुण मानीत असतात-- तो अनंत सत्ता आहे, अनंत ज्ञान आहे, आणि अनंत आनंद आहे; आणि वेदान्ती म्हणतो की हे तिन्ही वस्तुतः एकच आहेत. ज्ञान आणि प्रेम अथवा आनंद यांखेरीज सत्ता असूं शकत नाही, प्रेमाखेरीज ज्ञान असूं शकत नाही आणि ज्ञानाखेरीज प्रेम असूं शकत नाही. आपल्याला हवा आहे अनंत सत्ता, अनंत ज्ञान आणि अनंत आनंद यांचा सुरेल सुसंवाद--- त्यांचा सुरेख समन्वय-- त्या तिघांचें लोभस संमीलन. कारण तेंच आपलें लक्ष्य आहे. आपल्याला त्यांचा समन्वय हवा आहे-- सत्ता, ज्ञान आणि आनंद यांची चरमोन्नति हवी आहे, त्यांपैकी फक्त एकाचीच-- एकदेशी-- उन्नति आपल्याला नको. आपल्याला हवी त्या तिहींची समभावें, सारखीच उन्नति. आणि ती शक्य आहे-- शंकराचार्यांची बुद्धि आणि तिच्याबरोबरच बुद्धदेवांचें हृदय लाभणें शक्य आहे. आपण सर्वजण तो महन्मंगल समन्वय साधण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करूंच अशी मला दृढ आशा आहे.

---

# सर्वांभूतीं भगवद्दर्शन

(२७ ऑक्टोबर १८९६ रोजीं लंडन येथे दिलेलें व्याख्यान)

आपण बघितलेंच की, आपल्याला भोगावीं लागणारीं दुःखें निवारण्याचा, त्यांचा प्रतिकार करण्याचा आपण कितीहि आटापिटा केला तरीदेखील आपलें अधिकांश आयुष्य दुःखांनी भरलेलेंच राहतें यांत शंका नाही. आमच्यापक्षीं हीं दुःखें खरोखर अनंतच आहेत असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. मानव अनादिकालापासून तीं दूर करण्याची, त्यावर उपाय योजण्याची धडपड करीत आला आहे, परंतु सारेंकांही आजहि जसेंच्या तसेंच आहे हें उघडच आहे. ह्या दुःखावर मात करण्याचे आपण जितके जितके उपाय शोधून काढतों तितकीं तितकीं आपल्या या जगांत आणखी कितीतरी दुःखें गुप्तपणें दडून बसलीं आहेत असें आपल्याला आढळून येतें. आपण हेंहि बघितलें आहे की, या सगळ्या दुःखांवर एकमेव तोडगा म्हणजे ईश्वर होय अशी सर्व धर्मांची सांग आहे. सर्वच धर्म आपल्याला कंठरवानें सांगतात की, आपण आजकालच्या व्यवहारपटु लोकांचें ऐकून, हें जग आहे तसेंच खरें मानून तें कवटाळलें तर मग आपल्या कपाळीं दुःखांखेरीज आणखी कांहीच असणें शक्य नाही. ह्याबरोबरच सर्व धर्म ठामपणें आणखी अशीहि घोषणा करीत असतात की हें जगच 'सारेंकांही' नाही, ह्या जगाच्या पलीकडे आणखी 'कांहीतरी' विद्यमान आहे. ह्या पांच इंद्रियांच्या कोंडींत सापडलेलें जीवन, ह्या पंचभौतिक जगताच्या शिवारांत घुटमळणारें जीवन म्हणजे कांही अवघें जीवन नव्हे-- खऱ्या, अनंत जीवनाचा तो फक्त लहानसा तुकडा आहे-- अथांग, अपार जीवनसमुद्राच्या पृष्ठभागावरील तो अगदी वरवरचा फेस आहे. त्याच्या मागे, त्याच्या पलीकडे, ज्यांत दुःखांचा रिघाव नाही असें तें अनंत जीवन विस्तारलेलें आहे. त्या अनंत जीवनाला-- त्या अनंतालाच कांही लोक 'गॉड' म्हणतात, कांही 'अल्ला' म्हणतात, कांही

'जिहोवा' म्हणतात, कांही 'जोव्ह' म्हणतात तर कांही त्याला आणखीच निराळें नांव देतात. वेदान्ती त्याला 'ब्रह्म' म्हणतात.

'दुखांच्या तावडींतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे हें दुःखमय जगत् ओलांडून त्याच्या पलीकडे जाणें हाच होय'––हा धर्मांनी दिलेला कानमंत्र ऐकून पहिल्याप्रथम तरी आपल्याला असेंच वाटतें की हे सगळे धर्म आपल्याला आत्महत्त्या करायला सांगत आहेत! आमचा प्रश्न होता––"जीवनांतील दुःखें कशीं दूर होतील?" वरवर पाहतां, या प्रश्नाला धर्माचें उत्तर आहे––"त्यासाठी ह्या जीवनाचा त्याग करावा लागेल." म्हणजेच जगण्याचें थांबवावें लागेल! या उत्तरावरून मला त्या एका जुन्या गोष्टीची आठवण होते. एका झोपलेल्या माणसाच्या डोक्यावर एक डास बसला. तो डास मारण्याच्या इराद्याने त्या माणसाच्या एका मित्राने त्याच्या डोक्यावर असा एक तडाखा लगावला की त्याने तो डास आणि तो झोपलेला माणूस, दोघांचीहि इतिश्री झाली! आमच्या जीवनांतील दुखांवर धर्मांनी सुचविलेला उपायहि अशाच प्रकारचा वाटूं लागतो!

आमचें आयुष्य अनिष्टांनी भरलेलें आहे, हें जग दुःखांनी पुरेपूर भरलेलें आहे हें अगदी खरें आहे आणि जगाची ओळख पटण्यापुरतें पुरेसें आयुष्य ज्याला लाभलें आहे असा कुणीहि ह्या सत्याचा इन्कार करणार नाही. पण यावर जगांतील धर्मांनी उपाय काय सुचविला आहे? ते म्हणतात की, 'हें जग कांहीच नाही, ह्या जगाच्या पलीकडे असें कांहीतरी आहे की तेंच वस्तुतः सत्य होय.' मुष्कील आहे ती येथेच. हा अघोरी उपाय आमच्या सर्वस्वावर वरवंटा फिरविणारा वाटतो. असा कसा उपाय? ह्याला उपाय कसें म्हणतां येईल बरें? मग काय सुटकेचा कांहीच मार्ग नाही? यावर वेदान्त म्हणतो की हे सगळे धर्म जो उपाय सुचवीत आहेत तो अगदी बरोबर आहे, फक्त तो नीट समजून घ्यावयास हवा. पुष्कळदा तो चुकीनें समजला जातो, कारण त्यांना काय म्हणावयाचें आहे हें ते धर्म नीट, स्पष्टपणें सांगत नाहीत. आपल्याला जर खरोखर कशाची आवश्यकता असेल तर ती म्हणजे हृदय आणि मेंदू या दोहोंच्या संमीलनाची. हृदय अर्थातच फार श्रेष्ठ गोष्ट आहे; जीवन उंचावणाऱ्या थोर प्रेरणा हृदयामधूनच

स्फुरत असतात. नुसतीच बुद्धि, हृदय मुळीच नाही, यापेक्षा मुळीच बुद्धि नाही पण थोडेंतरी हृदय आहे, हें मी हजारदा पसंत करीन. ज्याला हृदय आहे त्याला जीवन शक्य आहे, प्रगति शक्य आहे, परंतु ज्याला नुसता मेंदूच आहे, हृदय मुळीच नाही तो शुष्कतेच्या शापानें मरतो.

तथापि त्याबरोबरच हेंहि तितकेंच खरें की, जो केवळ आपल्या हृदयानेंच चालविला जातो त्याच्यावर बरींच अरिष्टें ओढवतात, कारण त्याच्याकडून वेळोवेळीं चुका होण्याची फार संभावना असते. म्हणूनच आपल्याला हृदय आणि बुद्धि या दोहोंची एकजूट हवी आहे, त्यांचा संयोग हवा आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की माणसानें आपल्या हृदयाची बुद्धीशीं तडजोड करावी, किंवा बुद्धीची हृदयाशीं तडजोड करावी. तर, प्रत्येकाठायीं अनंत हृदय आणि भावना असोत, आणि त्याबरोबरच अनंत प्रमाणांत बुद्धि नि विचारशक्तिहि वसो. ह्या जगांत एखादी गोष्ट फक्त अमुक इतक्या प्रमाणांतच आपल्याठायीं असली पाहिजे अशी कांही मर्यादा का ठरलेली आहे ? हें जग अनंत नाही काय ? जीवनांत भावनांच्या आणि त्याचबरोबर सुसंस्कृततेच्या नि बुद्धीच्याहि अनंत विकासाला पूर्ण वाव आहे. आमच्याठायीं हृदय आणि बुद्धि दोन्ही अमर्याद प्रमाणांत येवोत, आमच्या जीवनांत तीं दोन्ही एकमेकांच्या हातांत हात घालून समान्तरभावें प्रवाहित होवोत.

जगामधे दुःख आहे हें बहुधा सर्वच धर्मांना कळतें, परंतु ते सगळेच एक चूक करतांना आढळतात, आणि ती म्हणजे ते सगळे कसे केवळ हृदयानेंच चालविले जातात, भावनांनी वाहवून जातात. 'ह्या जगांत दुःख आहे, म्हणून ह्या जगाचा त्याग करा'— हा उपदेश फार थोर आहे, आणि तोच एकमेव सदुपदेश आहे यांतहि शंका नाही. 'जगाचा त्याग करा.' सत्य आकळण्यासाठी असत्याचा त्याग करायला हवा, चांगल्याचा लाभ होण्यासाठी वाइटाचा त्याग करायला हवा, जीवनाची प्राप्ति होण्यासाठी मृत्यूचा त्याग करायला हवा याविषयी दुमत असणें अर्थातच शक्य नाही.

तरीपण, जीवनांतील दुःखांवर तोडगा म्हणून आपण आपलें

आजचें हें पंचेंद्रियगत जीवन-- आपल्याला ठाऊक असलेलें हें जीवन सोडून द्यायला हवें असाच जर ह्या मताचा गर्भितार्थ असेल तर मग हें जीवन टाकून दिल्यानंतर आमच्या हातीं काय उरेल ? कारण जीवन म्हणजे आम्ही आज जें जगतों आहोंत त्याखेरीज वेगळें आणखी काय बरें ? हेंच जर आम्हीं टाकून दिलें तर मग काय उरलें ?

पुढे ज्या वेळी आपण वेदान्ताच्या सखोल तात्त्विक भागाचें आलोचन करूं त्या वेळीं आपल्याला हें सारें आणखी चांगलें कळून येईल. सध्या मी तुम्हांला एवढेंच सांगूं इच्छितों की केवळ वेदान्तामधेच आपल्याला ह्या समस्येचा तर्कसंगत उलगडा आढळून येतो. येथे तुम्हांला मी वेदान्ताच्या उपदेशाचें सार सांगून ठेवतों, आणि तें हेंच की जगाकडे आपण दिव्यचक्षूंनी, म्हणजेच, ब्रह्मदृष्टीने बघावयाचें आहे.

खरें पाहतां वेदान्ताला जगाचा तिटकारा नाही-- वेदान्त खरोखर जग अजीबात उडवून देऊं इच्छीत नाही. वेदान्ताइतकें जाज्वल्य वैराग्य आणखी कोणीच शिकवीत नसेल. पण वेदान्त आपल्याला शिकवीत असलेलें वैराग्य शुष्क नाही, आम्हांला आत्महत्त्येस उद्युक्त करण्याचा वेदान्ताचा मानस नाही. मानवी जीवन सुकवून टाकणें वेदान्ताला अभिप्रेत नाही. वेदान्तांत सांगितलेल्या वैराग्याचा खरा अर्थ आहे-- जगाकडे ब्रह्मदृष्टीने बघणें. आपल्याला जग ज्या स्वरूपाचें वाटतें, ज्या स्वरूपाचें जाणवतें, ज्या स्वरूपाचें भासतें, जगाच्या त्या स्वरूपाचा आपण त्याग करावयाचा असून तें मग खरोखर काय आहे हें जाणून घ्यावयाचें आहे. वेदान्ताची शिकवण ही अशी आहे. जगाकडे ब्रह्मदृष्टीने बघा; कारण वास्तविक दृष्टचा तें ब्रह्माखेरीज आणखी कांही नाहीच. तें वस्तुतः, स्वस्वरूपतः ब्रह्मच आहे. वेदान्तावरील आदिम अधिकृत ग्रंथ जीं उपनिषदें, त्यांतील सर्वांत प्राचीन अशा ईश नामक उपनिषदाचा प्रारंभच पुढीलप्रमाणे होतो-- " ह्या जगांत जें कांही आहे तें सर्व आपण ईश्वराने आच्छादून टाकावयास हवें."

आपण सर्वकांही ईश्वराने आच्छादून टाकावयास हवें; जगांतील दुःखांकडे आणि वाइटाकडे जाणूनबुजून डोळेझाक करून, सगळेंकांही मंगलमय आहे, सगळेंकांही सुखमय आहे, किंवा जें काय घडतें तें सारें

चांगल्यासाठीच घडतें असा भ्रम उराशीं बाळगून तज्जन्य बेगडी आशावादानें आपण जग आच्छादावयाचें नाही, तर, खरोखरच प्रत्येक वस्तुत ईश्वर बघून आपण ईश्वरानें हें जग आच्छादावयाचें आहे. ह्या अशा रीतीनें आपण जगाचा त्याग करावयाचा आहे, आणि जगाचा असा त्याग केल्यावर शिल्लक काय उरतें ? शिल्लक उरतो— परमेश्वर ! म्हणजे काय ? म्हणजे असें की, तुम्हांला पत्नी आहे, असूं द्या; तुम्ही तिला सोडून द्यावयाचें आहे अशांतला भाग नाही, तर तुम्हीं आपल्या त्या पत्नीच्या ठायीं ईश्वर बघावयाचा आहे. मुलाबाळांचा त्याग करायला हवा. म्हणजे काय ? म्हणजे प्रत्येक देशांतले कांही नरपशु करतात त्याप्रमाणे आपल्या मुलाबाळांना घराबाहेर हाकलून का द्यावयाचें ? नाही, मुळीच नाही. हा धर्म नव्हे, ही तर सैतानी. मुलाबाळांचा त्याग करावयाचा म्हणजेच त्यांच्या ठायीं ईश्वर बघावयाचा. असेंच इतरहि सर्व गोष्टींविषयी. जीवनांत आणि मरणांत, सुखांत आणि दुःखांत प्रभु समभावें विद्यमान आहे. समस्त विश्वच भगवंतानें भरलेलें आहे. फक्त डोळे उघडा आणि त्याला बघा. वेदान्त शिकवितो तें हें. तुम्हीं जें जग अनुमानानें कल्पिलें आहे त्या जगाचा त्याग करा, कारण तुमचें अनुमान हें अत्यंत अल्प, एकदेशी अनुभवांवर आधारलेलें आहे, तें अत्यंत दुबळ्या तर्कावर आधारलेलें आहे, तुमच्या स्वतःच्या दुबळेपणावरच आधारलेलें आहे. ह्या असल्या अनुमानानें उभारलेल्या जगाचा त्याग करा; ज्या जगाचा आपण आजवर विचार करीत आलों आहों, ज्या जगाला आपण इतके दिवस जळूप्रमाणे चिकटून आहों, ज्याच्यावर आपली इतकी आसक्ति आहे तें आपणच निर्माण केलेलें लटकें जग आहे. त्याचा त्याग करा; डोळे उघडा आणि बघा की आपण समजत असलेलें जग मुळी कधी अस्तित्वांतच नव्हतें, तें आपल्याला पडत असलेलें स्वप्न होतें, ती माया होती, मायेनें झपाटल्यामुळे आपल्याला तो जगद्भ्रम दिसत होता. सदा अस्तित्वांत होता स्वयं तो प्रभुच. तोच मुलाबाळांत, तोच पत्नींत, तोच पतींत, तोच चांगल्यांत, तोच वाइटांत, तोच पापांत आणि तोच पाप्यांतहि विराजमान आहे. जीवनांतहि तोच आणि मरणांतहि तोच खेळत आहे.

महाभयंकर विधान खरेंच ! परंतु वेदान्त हेंच सप्रमाण सिद्ध

करून दाखवूं इच्छितो, हेंच साऱ्या जगाला शिकवूं इच्छितो, हेंच सर्वांना हाकारून सांगूं इच्छितो. वेदान्ताला सुरुवातच मुळी येथून होते.

अशा रीतीने सर्व वस्तूंकडे ब्रह्मदृष्टीने बघितल्यानेंच आपण जीवनांतील सर्व आपत्ति आणि दुःखें टाळूं शकूं. कशाचीहि इच्छा धरूं नका —— वासना बाळगूं नका. आपण कष्टी कशामुळे होतों ? आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या समस्त दुःख-दैन्याचें कारण आहे—— वासना. तुम्ही कसलीतरी वासना धरतां, ती वासना पुरी होत नाही; परिणाम ?—— दुःख. वासना नाही तिथे दुःखहि नाही. पण याहि बाबतींत गैरसमज होणें शक्य आहे—— माझ्या ह्या विधानाचा भलताच अर्थ केला जाणें शक्य आहे. म्हणून, वासना सोडून देणें आणि त्यायोगें सर्व दुःखांपासून सुटणें म्हणजे खरोखर काय हें नीट उलगडून सांगणें आवश्यक आहे. ह्या भिंतींना देखील कांही वासना नाहीत, आणि म्हणून त्यांना तज्जन्य दुःखहि भोगावें लागत नाही. खरें आहे. पण म्हणूनच त्यांचा कधी विकासहि होत नाही. ह्या खुर्चीला कांही वासना नाहीत, म्हणून तिला कधी दुःखहि भोगावें लागत नाही, पण ती नेहमी खुर्ची ती खुर्चीच राहते. सुख उपभोगण्यांतहि गौरव आहे, आणि दुःख भोगण्यामधेहि गौरव आहे. साहसपूर्वक म्हणावयाचें तर म्हणतां येईल की दुःखामधे उपयुक्ततादेखील आहे. आपल्या जीवनांत दुःखाचा केवढातरी उपयोग आहे. दुःख आपल्याला केवढे महान् धडे शिकवितें हें आपण सर्वचजण जाणतों. आपापल्या जीवनांत आपण असल्या शेकडो गोष्टी केल्या आहेत की ज्या केल्या नसत्या तर बरें झालें असतें असें आपल्याला वाटतें, परंतु त्याचबरोबर त्यांनी आपल्याला अमोल धडे दिले आहेत हेंहि तितकेंच खरें नाही काय ? माझ्या स्वतःविषयीच बोलावयाचें तर मी तरी अगदी निःसंकोचपणें म्हणूं शकेन की माझ्या आयुष्यांत मीं थोडेसें चांगलें आणि बरेचसें वाईट केलें आहे याचा मला आनंद वाटतो; मीं कांही बरोबर केलें आहे ह्याचा मला आनंद वाटतो आणि मीं पुष्कळ चुका केल्या आहेत याचाहि मला आनंद वाटतो, कारण त्यांतील प्रत्येकीपासून मला केवढातरी अनमोल धडा मिळत गेला आहे. आज, या घटकेला मी जें काय आहें तें म्हणजे माझ्या

आजवरच्या समस्त कृत्यांचें आणि विचारांचें फळच होय. माझ्या प्रत्येक कृत्याचा आणि माझ्या प्रत्येक विचाराचा माझ्यावर परिणाम झाला असून त्या परिणामांनीच मीं माझ्या प्रगतीचा हा आजचा टप्पा गाठला आहे.

असो तर, वासना चुकीच्या असतात, त्या वाईट असतात हें आम्हां सर्वांनाच समजतें. पण वासना सोडून देणें, त्यांचा त्याग करणें म्हणजे खरोखर काय हें आपल्यापैकी फार थोडेंजणच नीट जाणत असतात. वासना सोडून दिल्या तर मग ही जीवनायात्रा तरी कशी चालावयाची ? मग, दुःखांच्या तावडींतून सुटण्याकरता वासनांचा त्याग करणें हा उपाय आत्महत्त्येचाच प्रकार ठरणार नाही काय ? कारण त्यामुळे वासनांबरोबरच माणसाचाहि शेवट अवश्यंभावीच म्हणावयाचा ! पण वस्तुतः तसें नाही. ह्या समस्येचें उत्तर असें आहे : तुम्हीं धन-दौलत बाळगूं नये असें नाही, तुम्हीं आवश्यक त्या, नव्हे, चैनीच्याहि वस्तु बाळगूं नयेत असें नाही. आवश्यक तें, नव्हे, त्याहिपेक्षा हवें तितकें अधिक तुमच्याजवळ खुशाल असूं द्या, फक्त सत्य काय आहे तें जाणा आणि त्याचा साक्षात्कार करून घ्या. धनसंपत्ति ही वस्तुतः तुमच्या-माझ्या कुणाच्याहि मालकीची नाही. म्हणून तिच्याविषयी मालकीचा बोध, 'माझे'पणाची भावना बाळगूं नका. तुम्ही काय, किंवा मी काय, किंवा आणखी कुणी काय, आपण कुणीच कांही नाहीं. हें सर्वकांही त्या प्रभूच्या मालकीचें आहे––सर्वकांही प्रभूचें आहे. ईश उपनिषदाचा प्रारं-भींचा मंत्रच आपल्याला प्रत्येक वस्तूंत भगवंताची प्रतिष्ठा करावयास सांगत आहे. तुम्ही ज्या संपत्तीचा उपभोग घेत आहांत तींत भगवान विद्यमान आहे. तुमच्या मनांत ज्या इच्छा उठत आहेत त्यांत तो वसत आहे. ज्या वस्तु विकत घेऊन तुम्ही आपली ती इच्छा पूर्ण करीत आहांत त्या वस्तूंतहि तो विराजत आहे. तुमच्या सुंदर वेषभूषेंत, तुमच्या मोहक अलंकारांमधे तोच विराजमान आहे. वरील समस्येचें हें उत्तर आहे. आपण ह्या दिशेने विचार करावयास हवा, ही अशी भावना बाळगावयास हवी. ह्या दिव्य-चक्षूंनी, ह्या ब्रह्मदृष्टीने जगाकडे बघूं लागल्याने साराच देखावा बदलून जाईल. कारण जशी दृष्टि तशीच सृष्टि तुम्ही जर आपल्या प्रत्येक हालचालींत, आपल्या बोलण्याचालण्यांत, आपल्या

शरीरांत, आपल्या सर्व गोष्टींत भगवंताची स्थापना कराल तर उभें दृश्यच पालटून जाईल, आणि हें जग दुःखाचें वा दैन्याचें वाटण्याऐवजी तें तुमच्यापक्षीं स्वर्ग बनून जाईल.

येशूंनी असें म्हटलें आहे की, ''स्वर्गाचें राज्य तुमच्या अंतर्यामींच आहे.'' वेदान्तहि असेंच म्हणतो, प्रत्येक थोर धर्माचार्यहि असेंच म्हणतो. ''ज्याला बघण्यासाठी डोळे आहेत तो बघो आणि ज्याला ऐकण्यासाठी कान आहेत तो ऐको.'' वेदान्त सप्रमाण सिद्ध करून देतो की आपण ज्या सत्याच्या सारखे शोधांत आहोंत तें सत्य नित्यसिद्ध असून सदा आपल्याजवळच आहे. आपल्या अज्ञानामुळे आपल्याला वाटत असतें की आपण तें हरविलें आहे. आणि म्हणून रडत-आरडत तें शोधण्याच्या धडपडींत आपण जगभर भटकत असतों. पण वस्तुतः तें सदा आपल्या हृदयांतच वर्तमान असतें. केवळ तिथेच तें आपल्याला सापडूं शकतें.

'जगाचा त्याग करा' ह्या उपदेशाचा जर आपण तो जुना, रुक्ष, स्थूल अर्थ घेतला तर त्याचा अर्थ असा होईल की मग आपण कर्माला रामराम ठोकायचा, आळशी बनून चिखलाच्या पेंडासारखें बसून राहावयाचें, कसलाहि विचार करावयाचा नाही, कोणतेंहि काम करावयाचें नाही, उलट दैववादी होऊन जावयाचें, परिस्थितीच्या ओघांत प्रवाहपतिताप्रमाणे सारखें इतस्ततः वाहवावयाचें, निसर्गाच्या नियमांचे बंदे गुलाम होऊन बसावयाचें आणि सारखें कसेंतरी, कुठेतरी भरकटत असावयाचें. त्या उपदेशाच्या चुकीच्या अर्थानें हा अनर्थ ओढवेल ! पण हा मुळी त्या उपदेशाचा खरा अर्थच नव्हे. आपण कर्म करावयासच हवें. खोटया, फसव्या वासनांनी बेबंद वाहविणाऱ्या सामान्य जनांना कर्माविषयी काय माहीत असतें ? स्वतःच्या भावनांनी आणि इंद्रियांनी फरफटला जाणारा माणूस कर्माविषयी काय जाणत असतो ? जो आपल्या वासनांनी, कसल्याहि प्रकारच्या स्वार्थीपणाने फरफटला जात नाही तोच खरोखर कर्म करीत असतो. ज्याच्या पोटांत कोणताहि मतलब दडलेला नसतो तोच कर्म करीत असतो. ज्याला कर्मापासून कसल्याहि लाभाची आस नसते तोच कर्म करीत असतो.

एखाद्या सुंदर चित्राचा आस्वाद खरोखर कोण घेत असतो— विकणारा की तें नुसतें साक्षीवृत्तीने पाहणारा ? विक्रेता आपल्या

हिशेबांतच गर्क असतो, तें केवढ्याला विकलें जाईल आणि त्यावर नफा किती मिळेल या विचारांतच दंग असतो. त्याच्या डोक्यांत हेच विचार चालू असतात. त्याचें लक्ष लिलावाच्या बोलींकडेच असतें, त्या कसकशा वाढत आहेत हेंच तो बघत असतो. दर किती झपाट्यानें वाढत आहे हें ऐकण्यांतच तो गुंग असतो. तो त्या चित्राचा आस्वाद घेणार केव्हा! विकण्याचा किंवा विकत घेण्याचा कसलाहि इरादा नसलेला माणूसच तिथे उभें राहून त्या चित्राचा खरा आस्वाद घेऊं शकतो. तो नुसता त्या चित्राचें सौंदर्य बघत उभा राहतो आणि मन-मुराद आनंद लुटतो. तद्वतच, हें आपलें विश्वब्रह्माण्डहि एक चित्रच आहे, आणि ज्या वेळीं वासना लयास जातील त्या वेळींच माणूस ह्या जगाचा आस्वाद घेऊं शकेल, आणि त्या वेळींच हें विकणें आणि विकत घेणें थांबेल, मालकीच्या या भ्रामक कल्पना नाहीशा होतील. मग कर्ज देणारा लोपेल, विकत घेणारा लोपेल, विकणारा लोपेल, आणि उरेल फक्त-- सुंदर चित्रासारखें हें आपलें जग! ईश्वरासंबंधी पुढील कल्पनेपेक्षा अधिक सुंदर कल्पना मला कुठेहि आढळली नाही. ती कल्पना अशी की, "परमेश्वर हा महान् कवि आहे, प्राचीन कवि आहे; हें समग्र विश्व त्याचें काव्य आहे-- तें तो अनंत आनंदाच्या शाईने नाना श्लोकांत, नाना वृत्तांत, नाना छंदांत लिहीत आहे." वासना सोडून देऊं तेव्हाच आपण त्या आनंदघन प्रभूच्या ह्या विश्व-काव्याचा नीट अर्थ लावण्यास आणि त्याचा रस चाखण्यास समर्थ होऊं. मग आपल्या दृष्टीला सर्वकांही दिव्य दिसूं लागेल-- सर्वकांही ब्रह्ममय दिसूं लागेल. आपण ज्यांना काळेबेरे आणि अपवित्र समजत होतों ते सारे कानेकोपरे, सगळे आडमार्ग, अवघी अंधारीं ठिकाणें मग दिव्य रूप धारण करतील--ब्रह्मस्वरूप होऊन जातील. तीं आपलें खरें स्वरूप मग आपल्याला उघड करून दाखवितील. मग आपण स्वतःलाच हसूं आणि हें उमजूं की, हें सारें रडणें-ओरडणें केवळ पोरांचा खेळ आहे आणि आपण सदैव साक्षीप्रमाणे उभे असून तो खेळ बघत आहोंत.

म्हणून, आपापलीं कर्मे करा असें वेदान्ताचें आपल्याला सांगणें आहे. परंतु तीं कर्में आपण कशीं करावयाचीं-- कशा रीतीनें

करावयाचीं हें वेदान्त आपल्याला प्रथम सांगतो. आपण आपापलीं कर्मे करावयाचीं, परंतु ह्या जगाचा त्याग करून-- ह्या वरवर भासणाऱ्या, मिथ्या जगाचा त्याग करून. ह्याचा अर्थ काय ? ह्याचा अर्थ असा की आपण ईश्वराला सर्वत्र बघावयाचें आणि मग त्या बोधाने आपापलीं कर्मे करावयाचीं. वाटेल तर शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरा, इच्छा असेल तर आपल्या सगळ्या लौकिक वासना पुरवून घ्या, फक्त त्या साऱ्यांकडे ब्रह्मदृष्टीने बघा, त्यांना स्वर्गीय रूप द्या. परोपकाराचें, आनंदमयतेचें, कर्मशीलतेचें सुदीर्घ जीवन जगण्याची आकांक्षा बाळगा, अशा पद्धतीने कर्म करण्यानेच तुम्हांला या मायेंतून बाहेर पडण्याचा मार्ग सापडेल. याखेरीज अन्य उपाय नाही. सत्य न जाणतांच जो माणूस ह्या जगाच्या भ्रामक विलासांमधे मग्न होतो त्याचा पाय घसरला आहे, मानवजीवनाच्या उद्दिष्टाला तो मुकला आहे असेंच समजावें,— त्याला जीवनांतील खरा पुरुषार्थ कधीच लाभावयाचा नाही. याउलट, जो मनुष्य जगाला शिव्याशाप देऊन जंगलांत जातो, स्वतःच्या शरीराला, दंड देत राहतो, देह सुकवून सुकवून स्वतःला हळूहळू मारून टाकतो, स्वतःचें हृदय म्हणजे एक शुष्क, रखरखीत वाळवंट करून टाकतो, सर्व भावनांचा निःपात करून टाकतो आणि कठोर, शुष्क, नीरस बनून जातो तोहि वाट चुकला आहे असेंच समजावें. हीं अगदी दोन टोकें झालीं– दोन्हीं चुकीचीं आहेत. पहिली एका प्रकारची चूक तर दुसरी दुसऱ्या प्रकारची. दोघेहि वाट चुकले आहेत, दोघेहि जीवनाच्या खऱ्या उद्दिष्टाला मुकले आहेत.

म्हणून, सर्व वस्तूंविषयी ईश्वरबोध बाळगून, सर्व वस्तूंमधे ईश्वर आहे हें जाणून कर्म करा अशी वेदान्ताची शिकवण आहे. आपल्या जीवनांत ईश्वर ओतप्रोत भरलेला आहे अशा निष्ठेने, नव्हे, तें ईश्वरच आहे अशा दृढ निष्ठेने निरंतर कर्म करा. हेंच आपलें एकमेव कर्तव्य आहे, याखेरीज आपल्याला आणखी कशाचीच वांच्छा नसावी, हेंच आपलें एकमेव अभीप्सित असो. भगवान प्रत्येक वस्तूंत विद्यमान आहे, त्याला धुंडण्याकरता आपण आणखी कुठे जायचें ? आमच्या प्रत्येक कार्यांत, प्रत्येक विचारांत, प्रत्येक भावनेंत तो आधी-चाच आहे. असें जाणून आपण कर्म करावयासच हवें-- हाच एक मार्ग

आहे, आणखी अन्य मार्ग नाही. अशा रीतीने कर्म केलें तर त्याचीं फळें आपल्याला बंधनकारक होणार नाहीत. आपल्या जीवनांतील साऱ्या दुःखांचें आणि अशुभांचें मूळ आपल्या खोटया आशा, आपल्या खोटया वासनाच कशा असतात हें आपण पाहिलेंच. ह्या मिथ्या, असार वासनांमुळेच आपल्याला दुःख भोगावें लागतें, अशुभ सहावें लागतें. परंतु आपल्या अंतरींच्या ईश्वरबोधाने ज्या वेळीं त्या दिव्य स्वरूप धारण करून पवित्र होतात त्या वेळीं मग त्या आपलें कांही अनिष्ट करूं शकत नाहीत, दुःख निर्माण करूं शकत नाहीत. ज्यांना हें रहस्य उमजलें नाही त्यांना तें उमजेपर्यंत हें जग सैतानाचा खेळच वाटत राहील, तोंपर्यंत त्यांना सैतानी, आसुरी जगांतच जिणें कंठावें लागेल. स्वतःमधे अनंत आनंदाची केवढी थोरली खाण आहे ह्याची लोकांना जाणीव नसते, आपल्या सभोवताल, सर्वत्र केवढा अपार आनंद विराजत आहे ह्याची त्यांना कल्पना नसते. त्यांना अजून त्याचा सुगावा लागलेला नसतो, अजून त्याचें संधान सापडलें नसतें. सैतानी जगत्, आसुरी जगत् कशाला म्हणावयाचें ? वेदान्त म्हणतो-- अज्ञानालाच.

प्रचंड नदाच्या कांठीं बसून आपण तहानेने व्याकुळ होऊन प्राण सोडीत आहोंत. अन्नाच्या राशींपाशी बसून आपण भुकेने मरत आहोंत. आपण आनंदघन विश्वांत वसत आहोंत, पण आपल्याला तें गावत नाही. आपण सर्वदा त्यांतच नांदत आहोंत, पण चुकीने त्याला भलतेंच कांहीतरी समजत आहोंत. धर्म तें आपल्याला सापडून देण्याचा जिम्मा घेतो. सर्वांच्याच हृदयांना त्या आनंदमय जगाची आस लागलेली आहे. सर्वच जाती त्याच्या शोधांत आहेत, धर्माचें तेंच एकमेव लक्ष्य आहे, विभिन्न धर्मांत ही एकच आकांक्षा निरनिराळया शब्दांत व्यक्त केली जात आहे. धर्मांधर्मांत हा जो वरवर फरक भासतो तो केवळ शब्दांच्या वेगळेपणामुळेच होय. एकजण एक विचार एका प्रकाराने व्यक्त करतो, दुसरा एकजण तोच विचार किंचित् निराळया प्रकारें व्यक्त करतो; परंतु प्रत्येकजण बहुधा अगदी एकच अर्थ निरनिराळया शब्दांनी व्यक्त करीत आहे.

हें सर्व ऐकून त्यावावत नाना प्रश्न मनांत येतात. हें सारें बोलणें तर खूप सोपें आहे. माझ्या अगदी लहानपणापासून मी हें ऐकत आलों

आहें की, आपण सर्व ठिकाणीं आणि सर्व वस्तूंमधे ईश्वर बघितला पाहिजे, आणि तरच आपण ह्या जगाचा खराखरा उपभोग घेऊं शकूं. परंतु आपण ह्या जगांत मिसळूं लागतांच आणि आपल्याला जगाकडून कांही तडाखे बसतांच जगाविषयीचा आपला ईश्वरबोध, आपलें सर्वत्र ब्रह्मदर्शन पार कुठल्या कुठे लोपून जातें ! मी रस्त्याने जात असतों, प्रत्येक माणसांत ब्रह्म बघत असतों; एखादा धसमुसळ्या येतो आणि मला धक्का मारतो, मी रस्त्यावर उताणा पडतों. झालें ! माझें 'सर्वत्र ब्रह्मदर्शन' 'प्रत्येक व्यक्तींत ईश्वर पाहणें' वगैरे कुठल्या कुठे बेपत्ता होऊन जातें ! मी झटकन् उठतों, दांतओठ खात मूठ आवळतों, वगैरे वगैरे-- संपलें ब्रह्मदर्शन ! तत्क्षणीं मी पिसाळतों. मला साऱ्याचा विसर पडतो, मला त्या माणसांत ईश्वर दिसण्याऐवजी सैतान दिसूं लागतो. अगदी जन्मल्यापासून आपल्याला उपदेश देण्यांत आला आहे की आपण सर्वभूतीं भगवद्दर्शन करावयास हवें. प्रत्येक धर्माची हीच शिकवण आहे-- सर्व ठिकाणीं, सर्व वस्तूंत ईश्वर बघा-- सर्वत्र ब्रह्मदर्शन करा. 'न्यू टेस्टामेंट'मधे (बायबलच्या नव्या भागामधे) येशू ख्रिस्तांनी या बाबतींत केलेला असंदिग्ध उपदेश तुम्हांला आठवत नाही काय ? आम्हां सर्वांनाच तें शिकविण्यांत आलें आहे, पण तें प्रत्यक्ष कृतींत आणतांना सारेंच मुसळ केरांत जातें ! अडचण तिथेच आहे ! तिथेच घोडें पेंड खातें ! इसापनीतींतली ती काळविटाची गोष्ट तुमच्या लक्षांत असेलच. एक सुंदर धष्टपुष्ट काळवीट एका तलावाच्या पाण्यांत स्वतःची पडछाया बघून आपल्या पिलास म्हणाला, "बघ मी किती बळवान आहें. माझ्या डौलदार डोक्याकडे बघ, माझे सगळे अवयव बघ-- कसे बळकट आणि भरदार आहेत ते. अन् किती वेगाने धावूं शकतों मी." कर्मधर्मसंयोगाने एवढ्यांतच त्याला दुरून कुठून-तरी कुत्र्यांचें भुंकणें ऐकूं आलें. बस्, ताबडतोब त्याने धूम पळावयास सुरुवात केली आणि कित्येक मैलांचा फेरा मारून तो धापा टाकीत आपल्या जागीं परत आला. तो सर्व प्रकार बघून त्याच्या पिलाने त्याला विचारलें, "तुम्ही खूप बळवान आहांत असें तुम्हीच मला सांगत होतां, मग कुत्रीं भुंकतांच तुम्ही पळून गेलांत हें कसें ?" त्यावर त्या काळविटाने उत्तर दिलें-- "होय पोरा, तूं म्हणतोस तें

खरें आहे. पण जेव्हा कुत्रीं भुंकूं लागतात तेव्हा माझा सगळा आत्मविश्वास नाहीसा होऊन जातो." आमचीहि अशीच दशा आहे ! आपण मनुष्यजातीविषयी किती उच्च धारणा बाळगीत असतों, आपण खूप बलवान आणि शूर आहोंत असें आपल्याला वाटत असतें, आपण मोठमोठ्या प्रतिज्ञा करीत असतों, पण काय ! कसोटीच्या आणि मोहाच्या प्रसंगांचीं 'कुत्रीं' भुंकूं लागतांच आपली दशा हुबेहूब त्या इसापनीतींतल्या काळविटासारखी होऊन जाते ! प्रश्न आहे की, असेंच जर असेल तर मग ह्या साऱ्या शिकवणुकीचा काय उपयोग ? अर्थातच ह्या शिकवणुकीचा उपयोग आहे-- फार मोठा उपयोग आहे. तो असा की दीर्घोद्योगाने वा चिकाटीने अखेर यश लाभतेंच लाभतें. कोणतीहि गोष्ट चुटकीसरशी एका दिवसांत होऊं शकत नाही.

"आत्मा वा अरे द्रष्टव्यः, श्रोतव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्यः"-- "ह्या आत्म्याचें स्वरूप प्रथम श्रवण करावयास हवें, मग त्यावर मनन-चिंतन करावयास हवें, आणि नंतर त्यावर सतत ध्यान करावयास हवें-- त्याचा ध्यास घ्यावयास हवा." प्रत्येकजणच आकाश बघूं शकत असतो, भूमीवर सरपटणारी यःकश्चित् अळीदेखील तें निळें आकाश बघत असते-- पण तें आम्हां सर्वांपासून किती दूर आहे बरें ! आपलें मन इच्छेनुसार सर्वत्र जाऊं शकतें, परंतु शरीराला तिथे रांगत रांगत जायला किती वेळ लागतो ! आपल्या सगळ्या आदर्शांचें-- आपल्या सगळ्या ध्येयांचेंहि असेंच आहे. तीं खूप खूप दूर असतात यांत कांही संशयच नाही, परंतु त्याबरोबरच आपण आपलें ध्येय गाठलेंच पाहिजे हेंहि आपण जाणून आहोंत. केवळ ध्येय गाठलें पाहिजे एवढेंच नव्हे, तर आपण अगदी सर्वोच्च ध्येयहि गाठलें पाहिजे. आपलें ध्येय, आपला आदर्श अगदी सर्वोच्च, अगदी सर्वश्रेष्ठ असाच असावयास हवा. दुर्दैवाने ह्या जगांत बहुसंख्य लोक कोणताहि आदर्श, कसलेंहि ध्येय समोर नाही अशा स्थितींत आपल्या अंधाऱ्या जीवनांत चाचपडत असतात. समोर एखादा आदर्श असलेला मनुष्य जर हजार चुका करील तर, माझी खात्री आहे की, समोर कोणताहि आदर्श नसलेला मनुष्य पन्नास हजार चुका करील. म्हणून जीवनांत एखादा आदर्श असणेंच श्रेयस्कर आहे. आणि त्या आपल्या आदर्शासंबंधी

आपण आपल्याला शक्य आहे तितकें ऐकलें पाहिजे, इतकें ऐकलें पाहिजे की अखेर तो आपल्या हृदयांत भिनला पाहिजे, आपल्या मेंदूत भिनला पाहिजे, आपल्या नसानसांत भिनला पाहिजे, आपल्या रक्तांत भिनला पाहिजे, आपल्या अणुरेणूंत भिनला पाहिजे, आपल्या रोमरंध्रांत शिरला पाहिजे. म्हणून आपल्याला प्रथम तें आत्मतत्त्व श्रवण करावें लागेल. "हृदय पूर्ण भरलें की जीभ बोलूं लागते," आणि हृदय पूर्ण भरलें की हातदेखील काम करूं लागतात.

विचारच आपल्या कार्यप्रवृत्तीचें नियमन करणारी शक्ति होय. तीच आपल्याला पुढे नेत असते. आपलें मन सर्वोच्च विचारांनी भरून टाका, दिवसांमागून दिवस त्यांचें श्रवण करा, महिन्यांमागून महिने त्यांचें चिंतन करा. अपयशांकडे मुळीच लक्ष देऊं नका; अपयश येणें अगदी स्वाभाविक आहे, तें तर जीवनाचें सौंदर्यच म्हणावयाचें अपयशांखेरीज जीवन तें काय ? ह्या अपयशांवर मात करण्याची धडपड जर जीवनांत नसेल तर तें तसलें अळणी जिणें जगण्यांत काय स्वारस्य ? अपयश नसल्यास जीवनांत कांही काव्य उरेल काय ? ह्या धडपडींची, ह्या चुकांची, अपयशांची तमा बाळगूं नका. मीं गायीला कधी खोटें बोलतांना ऐकलें नाही, पण ती नेहमी गायच राहते, कधी मनुष्य होत नाही. म्हणून या अपयशांची खंत बाळगूं नका, क्षुल्लक पिछेहाटीबद्दल खेद करूं नका. हजार वेळा आपल्या आदर्शाला धरून राहण्याचा प्रयत्न करा, आणि हजारहि वेळा अपेशी झालांत तरी फिरून एकवार कंबर बांधून प्रयत्न करा. मानवमात्राचा जीवितादर्श आहे-- मानवमात्राचा जीवनोद्देश आहे-- सर्वभूतीं भगवद्दर्शन. परंतु तुम्ही जर त्याला सर्व वस्तूंमधे पाहूं शकणार नाही तर निदान जी व्यक्ति तुम्हांला अत्यंत आवडते तींतच प्रथम त्याला बघा, त्यानंतर मग आणखी एका व्यक्तींत त्याला बघण्याचा प्रयत्न करा. अशा रीतीने पुढे चला. आत्म्यासमोर अनंत जीवन पडलेलें आहे. वाटेल तितका काळ लागूं द्या. अपरंपार चिकाटी धरून प्रयत्न करा, तुमचें उद्दिष्ट सिद्ध होईलच.

(ईश उपनिषदांत म्हटल्याप्रमाणें) "तो स्वरूपापासून कदापि च्युत न होणारा, एक, आणि मनापेक्षाहि अधिक वेगवान आहे. विषयांना

प्रकाशित करणारीं इंद्रियें त्याच्यापर्यंत पोहोचूं शकत नाहीत--त्याला प्रकाशित करूं शकत नाहीत. कारण तो त्यांच्या आधीच विद्यमान आहे-- आधीचाच प्रकाशमान आहे. तो स्थिर असूनहि इतर समस्त गतिमंतांना मागें टाकत असतो. त्याच्या सत्तेनेच हिरण्यगर्भ सर्व जीवांना त्यांचीं त्यांचीं कर्मफळें देत असतो. तो गतिमान आहे, तो स्थिरहि आहे; तो दूर आहे, तो जवळहि आहे; तो सर्वांच्या आंत आहे आणि तोच सर्वांच्या बाहेरहि आहे. तो सर्वांत, सर्वत्र ओतप्रोत भरून आहे, सर्वकांही त्यांतच अधिष्ठित आहे. जो समस्त भूतांना आत्म्यामधे बघतो आणि आत्म्याला समस्त भूतांमधे बघतो तो त्या सर्वात्मदर्शनाकारणें कुणाचीहि घृणा करीत नाही, कुणापासूनहि स्वतःला वेगळें करूं इच्छीत नाही. त्याचें आत्मदर्शन कधीहि खंड पावत नाही. जेव्हा समस्त जीवन आणि समस्त विश्व ह्या आत्म्यामधेच दिसूं लागतें तेव्हाच जीवनाचें आणि विश्वाचें रहस्य कळलें असें म्हणतां येईल. ज्याच्या दिव्य चक्षूंना सर्व भूतें आत्माच दिसतात त्याला कसला मोह पडणें शक्य आहे ? सर्व विश्वभर एकच एक आनंदमय आत्मा ज्याच्या प्रत्ययास येतो त्याला शोक कसला ?"

हें सर्व जीवांचें, सर्व पदार्थांचें एकत्व हा वेदान्ताचा आणखी एक महत्त्वाचा विषय आहे. आपण पुढे बघूंच की आपल्या समस्त दुःखांचें एकमेव कारण अज्ञानच होय असें वेदान्त सप्रमाण सिद्ध करून दाखवितो. आणि अज्ञान म्हणजेच ही बहुत्वाची जाणीव, ही नानात्वाची जाणीव-- माणसामाणसांत भेद आहे, जातीजातींत भेद आहे, चंद्रांत आणि पृथ्वींत भेद आहे, अणूअणूंत भेद आहे अशी जाणीव. ह्या असल्या जाणिवेंतून, ह्या भेदबोधांतूनच सगळीं दुःखें जन्मतात. वेदान्त म्हणतो की हा भेद वस्तुतः अस्तित्वांत नाही, तो खरा नाही. तो केवळ आपल्याला भासतो, इतकेंच. तो वरवरचा आहे. वस्तूंच्या अंतःस्थलीं, वस्तूंच्या गाभ्यांत अभेदच विद्यमान आहे. हें वरवर भासणारें नानात्व भेदून तुम्ही जर आंत शिराल तर तुम्हांला आढळून येईल की माणसांमाणसांत, जातींजातींत, उच्च आणि नीच यांच्यांत, गरीब आणि श्रीमंत यांच्यांत, देवांत आणि मानवांत, मानवांत आणि पशूंत एकत्व विद्यमान आहे, सर्वांत अभेद आहे. तुम्ही जर पुरेसें आंत शिरूं शकाल

तर सर्वकांही त्या एकाचींच भिन्नभिन्न रूपें असल्याचें तुम्हांला दिसून येईल. आणि जो हें एकत्व बघूं शकतो त्याला कशानेंहि भुरळ पडावयाची नाही, मोह मग त्याला कधीच झपाटूं शकत नाही. खरोखर, मग त्याला काय बरें मोहवूं शकेल ? त्यानें सर्व वस्तूंचें खरें स्वरूप जाणलें असतें, सर्व वस्तूंचें रहस्य जाणलें असतें. त्याला मग आणखी दु:ख कसलें ? त्याला कशाविषयी वासना असणें शक्य आहे ? वस्तुमात्रांतील सत्याचा मागोवा घेत घेत तो भगवंतापर्यंत पोहोचला असतो. आणि तो भगवान कसा ? तो ह्या सर्व वस्तूंचें केंद्र आहे, सर्व वस्तूंमागील एकत्व आहे— नित्य सत्, नित्य चित् आणि नित्य आनंद आहे ! तिथे जन्म-मृत्यु, आधि-व्याधि, दु:ख-दैन्य, शोक-अशांति इत्यादि कशाचाच रिघाव नाही. तिथे आहे— पूर्ण अद्वैत, पूर्ण आनंद. कारण त्याने मग कोणासाठी शोक करावा ? त्या सत्याचा, त्या अखंड सच्चिदानंदाचा लाभ झाल्यानंतर मग मृत्यु नाही, कष्ट नाहीत, कुणासाठी शोक करणें नाही, कुणाबद्दल दु:ख होणें नाही. "तो प्रभु सर्वत्र ओतप्रोत भरून आहे, तो शुद्ध आहे, तो निराकार आहे, विदेही आहे, निष्कलंक आहे. तो पवित्र आहे, निष्पाप आहे. तोच ज्ञाता आहे. तो मनाचा नियंता आहे. सर्वांत श्रेष्ठ आहे. तो महान् कवि आहे. तो स्वयंभू आहे. तोच सर्वांच्या मन:कामना पुरविणारा आहे." अज्ञानांतून निर्माण झालेल्या ह्या अविद्यामय जगाला परमार्थसत्य समजून, ब्रह्मासारखें सत्य समजून जे त्याची आराधना करतात ते अंधारांत चाचपडतात. आणि जे उभा जन्म ह्या जगालाच खिळून बसतात, ह्या जगापेक्षा उच्च किंवा श्रेष्ठ ज्यांना कधीच कांही दिसत नाही ते तर आणखीच घन अंध:कारांत पिचतात. परंतु ज्याला ह्या प्रकृतीचें रहस्य, — तिचें खरें, दैवी स्वरूप अवगत झालें आहे, ह्या प्रकृतीच्या साहाय्यानें जो ह्या प्रकृतीपलीकडील त्या दैवी प्रकृतीचें चिंतन करतो तो मृत्यूच्या पलीकडे जातो, आणि त्या दैवी प्रकृतीच्या साहाय्यानें तो अमृत उपभोगतो.

"हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ।।

तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि ।
योऽसावसौ पूरुषः सोऽहमस्मि ।।"*

--"हे सूर्यदेवा, तूं आपल्या सोनेरी बिंबाने सत्य झाकून टाकलें आहेस. तें आवरण तूं दूर कर की जेणेंकरून सत्याकांक्षी अशा मला तें सत्य दिसूं शकेल. तुझ्या मागे दडलेलें सत्य मीं जाणलें आहे; तुझ्या किरणांचा खरा अर्थ, त्यांचें खरें स्वरूप मीं जाणलें आहे; तुझा महिमा मीं जाणला आहे, तुझें मंगलमय, परम रमणीय रूप मीं पाहिलें आहे. तुझ्यामधे जो पुरुष आहे तोच माझ्यामधे आहे, मीच तो आहें."

---

* ईश उपनिषद् १५, १६.

# आत्मसाक्षात्कार

( २९ ऑक्टोबर १८९६ रोजीं लंडन शहरीं दिलेलें व्याख्यान)

मी आज तुम्हांला एका उपनिषदामधून कांही सांगेन. त्या उपनिषदाचें नांव आहे कठ उपनिषद. तुमच्यापैकी कांहीजणांनी बहुधा त्याचा सर एडविन अर्नॉल्डकृत 'मृत्यूचें रहस्य' (The Secret of Death) नामक अनुवाद वाचलाहि असेल. असो.

मागील एका व्याख्यानांत आपण बघितलेंच की, 'ह्या जगाचें मूल कारण काय आणि ह्या जगाची उत्पत्ति कशी झाली' ह्या प्रश्नानें प्रारंभ झालेल्या जिज्ञासेला बाह्य जगताच्या अनुशीलनाद्वारा समाधान-कारक उत्तर न मिळूं शकल्यामुळे लोकांची दृष्टि मग अंतर्जगताकडे वळली. ह्या ग्रंथांत--कठोपनिषदांत--मानवाच्या अंतःस्वरूपाविषयी विचार करून हा विषय मानसशास्त्रीय पद्धतीने हाताळण्यांत आला आहे. प्रथम 'हें बाह्य जगत् कुणीं निर्माण केलें, ह्याची उत्पत्ति कशी झाली ?' असा प्रश्न विचारला गेला होता. आताचा--कठोपनिषदां-तील नचिकेत्याचा--प्रश्न आहे--'माणसाच्या आंत असें काय आहे की ज्याच्यामुळे तो जिवंत राहतो, हालचाल करूं शकतो, आणि माणूस मेल्यावर त्या आंतील वस्तूचें काय होतें ?' यापूर्वीच्या तत्त्वज्ञांनी जड जगताचें अनुशीलन करून त्यामधून अंतिम सत्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला होता. ह्या प्रयत्नांत त्यांना अधिकांत अधिक जर कांही गवसलें असेल तर तो म्हणजे ह्या विश्वाचें शासन करणारा एक व्यक्तित्ववान पुरुष--सगुण ईश्वर. हा त्यांचा ईश्वर म्हणजे मनुष्या-चीच खूप खूप सुधारून वाढविलेली आवृत्ति होती, तो खूप खूप मोठा मानव होता--तुमच्याआमच्यापरीस अनंतपट मोठा मानव होता. पण कितीहि झालें तरी तो एक मानवच होता. परंतु हें कांही सत्याचें संपूर्ण दर्शन म्हणतां यावयाचें नाही; ह्याला फार तर आंशिक सत्य म्हणतां येईल. आपण मानवप्राण्याच्या दृष्टिकोनांतून--मानवी

दृष्टिकोनांतून--ह्या जगाकडे बघत असतों, आणि म्हणून आपला ईश्वर हें त्या जगाचें 'मानवी' स्पष्टीकरण असणार.

कल्पना करा की एक गाय तत्त्वज्ञ बनली असून तिला तिचा एक विशिष्ट धर्महि आहे. ती जगाकडे अर्थातच गायीच्या दृष्टींतून बघणार. ती जेव्हा या प्रश्नाचा विचार करील तेव्हा ती तो गायीच्या दृष्टिकोनांतूनच करील. साहजिकच आपण मानव ज्याला ईश्वर म्हणतों त्याला ती गाय ईश्वर म्हणावयाची नाही. तिला आमचा ईश्वर मुळी दिसावयाचाच नाही. ह्याचप्रमाणे समजा की मांजरें तत्त्वज्ञ बनलीं आहेत. काय होईल ? तीं मांजराच्या दृष्टींतून जग बघतील. त्यांचें जगत् हें मांजर-जगत् राहील. ह्या जगांतील अंतिम सत्याविषयीच्या प्रश्नाचें उत्तर तीं मांजर-दृष्टिकोनांतूनच देतील. ह्या जगावर शासन करणारें एक सर्वज्ञ, सर्वशक्तिमान विराट मांजर अशीच त्यांची ईश्वराविषयी धारणा राहील. सारांश, ह्यावरून आपल्याला हेंच दिसून येतें की, ह्या जगाचें आपलें स्पष्टीकरण हें कांही संपूर्ण स्पष्टीकरण नव्हे, किंवा आपल्या धारणेंत म्हणजे संपूर्ण विश्वाचा समावेश होतो असेंहि नव्हे. माणूस ज्या दृष्टिकोनांतून जगाचें भयंकर स्वार्थी स्पष्टीकरण देत असतो त्याचा स्वीकार करणें अत्यंत चुकीचें होईल. बाह्य जगामधून आपल्याला ह्या जगाच्या कोड्याचें जें उत्तर मिळतें त्यांत दोष हा असतो की, प्रथमतः म्हणजे आपण जें जगत् पाहत असतों तें केवळ आपलें स्वतःचें विशिष्ट जगत् असतें, सत्याची ती आपल्या दृष्टिकोनांतून बघितलेली आपली धारणा असते. तें सत्य--तें निरपेक्ष सत्य आपल्याला कधी आपल्या इंद्रियांनी कळणें शक्य नाही, आपल्याला त्याचें आकलन होणें शक्य नाही. पांच ज्ञानेंद्रियें असलेल्या मानवप्राण्याच्या दृष्टींतूनच आपण हें जगत् पाहूं शकतों. कल्पना करा की आपल्याला आणखी एक ज्ञानेंद्रिय लाभलें. हें समस्त विश्व मग आपल्याला निराळेंच दिसूं लागेल. साऱ्या विश्वाचा देखावा अगदी बदलून जाईल. क्षणभर कल्पना करा की आपल्याला घ्राणेंद्रिय, दर्शनेंद्रिय, श्रवणेंद्रिय वगैरेंसारखेंच सहावें एक चुंबकेंद्रिय प्राप्त झालें आहे. ज्यांचा प्रत्यय घेण्याचें इंद्रिय आज आपल्याला नाही, आणि म्हणून ज्यांचें आज आपल्याला कांहीच ज्ञान नाही अशा लाखो शक्ति

अस्तित्वांत असल्याचें मग कदाचित् आपल्याला आढळून येईल. आपलीं इंद्रियें समर्याद आहेत, तीं खरोखरच अतिशय मर्यादित आहेत; आणि ह्या मर्यादांमधेच, ह्या सीमांमधेच आमचें सर्व जग अवस्थित असतें; आणि आपला ईश्वर हा त्याच आपल्या मर्यादाबद्ध, छोट्याशा जगाचें स्पष्टीकरण असतो, आणि म्हणूनच तो आपल्या संपूर्ण समस्येचें उत्तर असणें शक्य नाही. पण माणूस इथेच थांबू शकत नाही. तो एक विचारशील प्राणी आहे आणि म्हणून तो असें एक उत्तर शोधून काढूं इच्छीत असतो की जें समस्त जगाचें साकल्याने स्पष्टीकरण करूं शकेल. तो अशा एका जगाविषयी विचार करूं इच्छितो की जें एकाच वेळीं मानवांचें जग आहे, देवांचें जग आहे, संभाव्य सर्व प्राण्यांचें जग आहे, आणि तो असें एक उत्तर शोधून काढूं इच्छितो की ज्याने सर्वच घटनांचें--ह्या सर्वच जगतांचें साकल्याने स्पष्टीकरण होऊं शकेल.

सारांश, आपण प्रथम असें एक जग शोधून काढलें पाहिजे की ज्यांत ह्या सर्व जगांचा अंतर्भाव होतो; आपण असें कांहीतरी शोधून काढलें पाहिजे की जें आपल्या इंद्रियांना गोचर होवो की न होवो, पण जें ह्या सर्व जगांचें एक साधारण तत्त्व आहे. जें श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा सर्वच जगांमधील एक साधारण तत्त्व आहे असें कांहीतरी जर आपण शोधून काढूं शकलों तर आपला प्रश्न सुटण्यासारखा आहे. जें कांही अस्तित्वांत आहे त्या साऱ्याचा एक साधारण आधार, एक साधारण पाया असलाच पाहिजे हें केवळ तर्काने जरी आपल्याला पटूं शकलें तरी देखील आपला प्रश्न हा सुटण्याच्या मार्गावर आहे असें म्हणतां येईल. परंतु केवळ आपण पाहत असलेल्या, केवळ आपल्याला माहीत असलेल्या जगाच्या मदतीनेच आपल्याला आपल्या प्रश्नाचें उत्तर लाभणें कदापि शक्य नाही, कारण आपलें तें जग म्हणजे संपूर्ण जगाचा केवळ एक विशिष्ट अंश होय.

म्हणून मग, आपला प्रश्न सुटण्याची आशा आहे-- आपण जर खूप खोल-- जगाच्या अगदी बुडाशीं जाऊं शकलों तरच. जगाचें हें बाह्य कवच भेदून आपण जर त्याच्या गाभ्यांत-- त्याच्या अगदी अंतःस्थलीं रिघूं शकलों तरच केवळ आपला प्रश्न सुटण्याची आशा

आहे. प्राचीन विचारवंतांना आढळून आलें होतें की, माणूस केंद्रापासून जितका दूर असतो तितकी विविधता आणि विभिन्नता अधिक तीव्रपणें त्याला जाणवते, आणि तो त्या केंद्राच्या जितका जवळ जातो तितका त्याला एकत्वाचा वा अभेदाचा अधिक उत्कटपणें प्रत्यय येऊं लागतो. बरोबरच आहे. आपण जितकें एखाद्या वर्तुळाच्या केंद्राच्या जवळ असतों तितकें आपण, त्या वर्तुळाच्या सर्व त्रिज्या जिथे येऊन मिळतात त्या साधारण मीलनभूमीच्या अधिक जवळ असतों; आणि आपण त्या वर्तुळकेंद्रापासून जितकें दूर असतों तितकी आपली त्रिज्यारेखा इतर त्रिज्यांपासून दूर असते, जास्त विलग असते. बाह्य जगत् हें स्वतःच्या केंद्रापासून फार दूर आहे आणि म्हणूनच, अस्तित्वांत असलेल्या सर्व वस्तु जींत एक होऊं शकतील अशी साधारण मीलनभूमि बाह्य जगतांत असणें शक्य नसतें. एकंदर वस्तु-समष्टीचा–– एकूण अस्तित्वाचा बाह्य जगत् हा केवळ एक अंश आहे एवढेंच फार झालें तर म्हणतां येईल. त्याचे आणखीहि कितीतरी अंश किंवा भाग आहेत; मनोजगत्, नैतिक जगत्, बौद्धिक जगत् हीं देखील 'जगां'तच मोडतात ना ? ते अस्तित्वाचे भिन्नभिन्न स्तर आहेत. आणि म्हणून, त्यांतील फक्त एकच घेऊन तद्द्वारा 'संपूर्ण' जगाचें कोडें उलगडण्याचा प्रयत्न करणें अगदी व्यर्थ आहे, त्यांत यश मिळणें अगदी अशक्य आहे. आणि म्हणूनच आपल्याला प्रथम कुठेतरी असें एक केंद्र गवसलें पाहिजे की ज्याच्यापासून सर्व 'जगें', सूर्यापासून किरणें निघावींत तशीं निघतात. याप्रमाणे अस्तित्वाच्या सर्व स्तरांवरील सर्व वस्तु जिथे एक होतात त्या अखिलमीलनभूमीवर उभें राहूनच आपण जगाचें रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हाच या बाबतींतला सिद्धान्त होय. आणि तें कसें साधेल हेंच आता आपल्याला बघावयाचें आहे. प्रश्न आहे–– तें तसलें 'केंद्र' कुठे आहे ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें की–– तें केंद्र आमच्या आंतच आहे ! तें आपल्या अंतर्यामीं–– आपल्या आत्म्यांतच विद्यमान आहे. ह्या माणसाच्या आंत जो 'खरा' माणूस आहे, तोच तें केंद्र होय. आमचे ते प्राचीन ऋषि समस्त बाह्य आवरणांचा–– समस्त बाह्य कवचांचा भेद करून खूप खूप आंत गेले, अगदी खोल खोल जाऊन त्यांनी तळ गाठला आणि

त्यांच्या प्रत्ययास आलें की वस्तुमात्राचें---समस्त विश्वाचें---ह्या समस्त जगांचें-- निखिल विश्वब्रह्माण्डाचें केंद्र जीवात्म्याच्या गाभाऱ्यांतच-- मानवाच्या अंतरात्म्यांतच अवस्थित आहे. अस्तित्वांत असलेलें सारेंकांही--- सर्व स्तरांवरील सर्व वस्तु त्या एकाच केंद्राकडे गुरुत्वाकर्षित होत आहेत-- त्या एकाच केंद्रांत एकीभूत होत आहेत. तीच समस्तांची साधारण मीलनभूमि आहे आणि त्या सकलसंमीलनभूमीवर उभें राहूनच आपण सर्व 'जगां'ना लागूं पडेल असें उत्तर मिळवूं शकूं--- एक सर्वसामान्य सिद्धान्त---एक सार्वभौम सिद्धान्त बांधूं शकूं. म्हणून, 'हें जग कुणीं उत्पन्न केलें ?' हा प्रश्न कांही मोठासा तत्त्वज्ञानसंगत नाही किंवा त्याचें उत्तर लाभणेंहि तादृश महत्त्वाचें नाही. असो.

कठ उपनिषदांत सत्य अत्यंत आलंकारिक भाषेंत सांगितलें गेलें आहे. फार प्राचीन काळीं एक अत्यंत श्रीमंत मनुष्य राहत होता. त्यानें एकदा एक विशिष्ट यज्ञ केला. त्या यज्ञांत यजमानानें आपल्या सर्वस्वाचें दान केलें पाहिजे असा विधि होता. परंतु आपला हा यज्ञकर्ता असावा तितका प्रामाणिक नव्हता. आंत एक आणि बाहेर एक अशी थोडीशी त्याची वागणूक होती. तो विशिष्ट यज्ञ केल्याचा गौरव आणि कीर्ति लाभावी अशी त्याची इच्छा होती, परंतु त्या प्रसंगीं त्यानें दान काय दिलें ? तर, आता यापुढे ज्यांचा त्याला काडीचाहि उपयोग नव्हता अशा त्याचा जवळच्या साऱ्या जख्खड, आटलेल्या, वांझआणि. लुळ्यापांगळ्या गाई ! त्याला नचिकेता नांवाचा एक मुलगा होता आपला पिता अनुचित आचरण करीत आहे हें त्या मुलानें बघितलें आपल्या पित्याचें हें वागणें बरोबर नाही, तो आपलें व्रत मोडीत आहे, शास्त्राज्ञा उल्लंघीत आहे हें बघून त्याला अतिशय खेद झाला, परंतु काय करावें, आपल्या पित्याला हें सारें कसें सांगावें हें त्याला कळेना. भारतांत मुलांच्या पक्षीं आईबाप प्रत्यक्ष देवताच असतात. म्हणून तो मुलगा अत्यंत आदरपूर्वक आपल्या पित्याजवळ गेला आणि नम्रपणें त्यानें त्याला विचारलें की, "बाबा, तुम्ही माझें दान कुणाला करणार आहांत ? दानांत तुम्हीं मलाहि कुणालातरी देऊन टाकावयास हवें, कारण तुम्ही करीत असलेल्या यज्ञांत यजमानानें आपलें सर्वकांही दान म्हणून देऊन टाकावयास हवें असा विधि आहे, आणि तुम्हीं तसा

संकल्पहि सोडला आहे." नचिकेत्याचा पिता आपल्या पोटच्या पोराच्या या असल्या बोलण्याने अतिशय क्षुब्ध झाला आणि त्याला म्हणाला, "म्हणजे ? तूं हें काय भलतेंच बोलत आहेस ? बापाने आपल्या मुलाचें दान करावयाचें ? छि छि !" परंतु, न राहवून नचिकेत्याने तोच प्रश्न आपल्या पित्याला फिरून दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा विचारला. आता मात्र पिता रागावला. रागावून तो नचिकेत्याला म्हणाला--"ठीक आहे, तुला मी यमाला देऊन टाकीत आहें." पुढचा कथाभाग असा आहे की पित्याचें वचन खरें व्हावें, त्याला खोटें बोलण्याचें पाप लागूं नये म्हणून नचिकेता मृत्युदेवता जो यम, त्या यमाच्या घरीं गेला. यम म्हणजे ह्या जगांत सर्वांत पहिल्याने मृत झालेला मनुष्य. तो स्वर्गांत जाऊन पितरांचा शासनकर्ता झाला आहे. सर्व चांगले लोक मेल्या-नंतर तिथे जातात आणि यमाबरोबर दीर्घकाळ वास करतात. यम अत्यंत पवित्र आणि सत्पुरुष आहे. हें त्याच्या 'यम' या नांवावरूनच दिसून येतें. असो तर, याप्रमाणे बाल नचिकेता यमाच्या लोकांत गेला. परंतु त्या वेळीं यमधर्म घरीं नव्हते. देवहि कधी कधी घरीं नसतात ! त्यांची वाट बघत त्या मुलाला तीन दिवस तिथे तसेंच राहावें लागलें. चवथ्या दिवशीं यमराज परत आले.

बालतपस्वी नचिकेत्याविषयी समस्त वृत्तान्त ऐकून यमधर्म त्याला म्हणाले--"हे विद्वन्, कांही न खातां तुम्ही गेले तीन दिवस माझ्या घरीं माझी वाट पाहत होतां. तुम्ही अत्यादरास पात्र असे अतिथि आहांत, हे ब्रह्मकुमार, तुम्हांला वंदन असो. माझें कल्याण असो. मी घरीं नव्हतों, त्यामुळे तुम्हांला इतका त्रास झाला याबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे. परंतु मी तुमच्या त्रासाची भरपाई करण्याचा प्रयत्न करीन. तुम्ही तीन दिवस माझ्या मागे माझ्या घरीं उपासांत काढलेत. प्रत्येक दिवसाबद्दल एक असे कोणतेहि तीन वर तुम्ही मला मागा." त्यावर तो बालक म्हणाला--"प्रभो, आपण प्रसन्न झालां आहांत तर पहिला वर मला असा द्यावा की जेणेंकरून माझ्या पित्याचा माझ्यावरचा राग नाहीसा होऊन जाईल आणि तो माझ्यावर संतुष्ट होऊन, तुमच्या अनुमतीने मी ज्या वेळीं माझ्या घरीं परत जाईन त्या वेळीं तो मला ओळखूं शकेल." यमराज तोंड भरून

"तथास्तु" म्हणाले. दुसऱ्या वराने नचिकेत्याने स्वर्ग प्राप्त करून देणाऱ्या एका विशिष्ट यज्ञाचें आपल्याला ज्ञान मिळावें अशी इच्छा प्रकट केली. आता, आपण बघितलेंच आहे की, वेदांच्या संहिताभागांत आपल्याला सर्वांत जुनी जर कोणती कल्पना आढळत असेल तर ती म्हणजे, जिथे मानवाला दिव्य देह लाभतो आणि जिथे तो आपल्या पितरांसह वास करतो, त्या स्वर्गाचीच होय. हळूहळू इतरहि कल्पनांचा उदय झाला, परंतु त्याहि समाधानकारक नव्हत्या; स्वर्गापेक्षाहि उच्च अशा आणखी कशाची तरी अजूनहि उणीव भासत होती. स्वर्गांत राहणें म्हणजे इहलोकींच्या जीवनापेक्षा कांही विशेष निराळें असणार असें मुळीच नाही. मनसोक्त विषयोपभोग आणि निरोगी, सुदृढ शरीर लाभलेल्या एखाद्या तरुण लक्ष्मीवंतासारखें फार फार तर तें जीवन असणार. स्वर्ग म्हणजे तरी हें जड जगतच ना? फक्त अमळ उच्च दर्जाचें, इतकेंच. आणि आपण तर बघितलेंच आहे की बाह्य जड जगताच्या मदतीने आपला प्रश्न सुटूं शकत नाही—ह्या विश्वाचें कोडें उलगडूं शकत नाही. म्हणून, जड जगतांतच मोडणारा स्वर्गहि त्या बाबतींत आपल्या कांही कामाचा नाही हें ओघानेच आलें. म्हणून स्वर्गांमागून स्वर्गांची कल्पना केली तरी देखील आपला प्रश्न सुटण्यासारखा नाही. जर हें आपलें बाह्य, जड जगत् आपला प्रश्न सोडवूं शकत नसेल तर मग अशाच आणखी कितीहि जगांची कल्पना करीत गेलों तरी त्याने काय होणार? त्याने आपला प्रश्न कसा बरें सुटणार? कारण, आपण हें कधीच विसरतां कामा नये की, जडद्रव्य किंवा स्थूलभूतें हीं एकूण प्रकृतीचा केवळ एक अगदी यःकश्चित् अंश होत. आपल्या खरोखर प्रत्ययास येणाऱ्या घटनांपैकी असंख्य घटना भौतिक स्वरूपाच्या नसतात.

उदाहरणार्थ आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षणाकडे अमळ निरखून बघा. काय आढळतें? त्यांत विचार आणि भावना हीं अधिक चाललीं आहेत की बाह्य घटना अधिक घडत आहेत? नुसत्या मनाने तुम्ही किती अनुभवत असतां आणि प्रत्यक्ष पाहणें-स्पर्शणें किती करीत असतां? हें अंतर्जगत् किती विशाल असून त्यांत कोण प्रचंड कार्य सतत चालूं असतें! त्या मानाने इंद्रियग्राह्य घटना किती थोड्या

असतात बरें! स्वर्गवाद हीच चूक करतो--तो म्हणतो की आमचें जीवन आणि त्या जीवनांतील समस्त घटना फक्त शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधांतच सामावलेल्या आहेत. म्हणूनच ही स्वर्गाची कल्पना सर्वांचेंच पूर्ण समाधान करूं शकली नाही. तरीदेखील, ह्या आख्यानानुसार, नचिकेता दुसऱ्या वराने ह्या स्वर्गाला नेणाऱ्या एका विशिष्ट यज्ञासंबंधी विचारीत आहे. वेदांच्या प्राचीन भागांत सांगितलें आहे की, ह्या यज्ञांनी देवता संतुष्ट होऊन यज्ञकर्त्या जीवांना स्वर्गलोकीं घेऊन जातात.

कोणत्याहि धर्माचा अभ्यास करतांना तुम्हांला ही एक गोष्ट आढळून येईल की, जें कांही प्राचीन असतें त्याला लोक पवित्र मानूं लागतात. दृष्टान्तादाखल सांगतां येईल की, आमचे पूर्वज भारतांत भूर्जपत्रांवर लिहीत असत, परंतु पुढे त्यांना कागद कसा करावा हें कळून आलें. तरीपण भूर्जपत्र आम्हीलोक अजूनहि अत्यंत पवित्र मानीत असतों. ज्या भांड्यांमधे प्राचीनकाळीं ते स्वयंपाक करीत असत त्या भांड्यांत कालान्तराने कितीतरी सुधारणा झाली, आणि त्याचबरोबर तीं जुनीं पात्रें पवित्र होऊन बसलीं. आणि हा प्रकार भारतांतल्याइतका आणखी कुठेहि प्रचारांत नसेल. दोन लाकडें एकमेकांवर घासून अग्नि उत्पन्न करण्याची नऊ-दहा हजार वर्षांपूर्वीची जुनी पद्धत अजूनहि चालूं आहे. यज्ञाच्या वेळीं इतर कोणत्याहि पद्धतीने विस्तव पेटविणें चालावयाचें नाही. आशियानिवासी आर्यांच्या दुसऱ्या एका शाखेसंबंधीहि असेंच. त्यांच्या सध्याच्या वंशजांना आजहि आकाशांतील विजेपासून अग्नि मिळविण्याचा नाद आहे. यावरून हें सिद्ध होतें की ते लोक पूर्वीच्या काळीं ह्याच पद्धतीने विस्तव मिळवीत असत. त्यांना पुढे विस्तव पेटविण्याच्या निराळ्या पद्धती कळल्या, तरीपण त्यांनी आपली ती जुनी पद्धत सोडली नाही. पुढे तीच एक पवित्र कर्म होऊन बसली. हिब्रू लोकांचेंहि असेंच आहे. ते चर्मपटावर (parchment वर) लिहीत असत. आता ते लिहिण्यासाठी कागद वापरतात, पण चर्मपटाला ते अत्यंत पवित्र मानतात. सर्वच जातींसंबंधी असेंच आहे. ज्या अनुष्ठानाला आज आपण पवित्र समजतों ती केवळ एक जुनी वहिवाट असते, आणखी कांहीच नव्हे.

वैदिक यज्ञहि अशाच स्वरूपाचे होते. प्राचीन काळीं ते करणें ही प्रथा होती. काळाच्या ओघांत लोकांना जसजशा जीवन जगण्याच्या अधिकाधिक चांगल्या पद्धती अवगत होत गेल्या तसतशा त्यांच्या कल्पनाहि खूप सुधारल्या, परंतु ते जुने आचार मात्र तसेच राहून गेले. वेळोवेळीं त्यांचें अनुष्ठान होत गेलें आणि त्यांना पवित्र अर्थ येऊन कर्मकांडाचें स्वरूप प्राप्त झालें.

आणि मग हें यज्ञकार्य चालविणें ज्यांचा व्यवसाय होऊन बसला असा एक वर्ग समाजांत निर्माण झाला. ह्यांनाच म्हणतात पुरोहित. ह्यांनी यज्ञांसंबंधी सखोल विचार करून त्यांचें एक तत्त्वज्ञानच निर्माण केलें. यज्ञच त्यांचें सर्वस्व होऊन बसले. यज्ञांतील धूमाचा गंध हुंगण्यासाठी देवता यज्ञस्थलीं येतात आणि यज्ञाच्या शक्तीने जगांत काय वाटेल तें लाभूं शकतें अशी श्रद्धा निर्माण झाली. ठराविक आहुति दिल्या, विशिष्ट मंत्र उच्चारले, विशिष्ट आकाराच्या वेदी रचल्या तर देवता प्रसन्न होऊन हवें तें देतात अशी श्रद्धा निर्माण झाली. आणि म्हणूनच, कोणत्या प्रकारच्या यज्ञाने माणूस स्वर्गांत जातो हें नचिकेता विचारीत आहे. यमराजांनी नचिकेत्याने मागितलेला हा दुसरा वरहि तात्काळ पूर्ण केला आणि 'हा विशिष्ट यज्ञ यापुढे तुझ्याच नांवाने— नाचिकेत यज्ञ या नांवानेच— लोकांत प्रसिद्ध होईल' असा त्याला आशीर्वाद पण दिला.

यानंतर नचिकेत्याने यमराजांना तिसरा वर मागितला. या तिसऱ्या वरापासूनच कठोपनिषदाला खरी सुरुवात होते. मृत्यूची अधिष्ठात्री देवता जे यमराज, त्यांना बाल नचिकेता म्हणता झाला— "एक संदेह उपस्थित होऊन मोठी अडचण उभी राहत असते. माणूस मरतो तेव्हा कांही लोक म्हणतात की तो आहे, आणि कांहीजण म्हणतात की तो नाही. आपल्या मुखावाटें मला हें रहस्य समजून घेण्याची इच्छा आहे." हा प्रश्न ऐकून यमराजांना भय-विस्मयाचा धक्काच बसला! त्यांनी नचिकेत्याला पहिले दोन वर अगदी आनंदाने दिले होते. परंतु हा तिसरा वर अगदी आगळाच होता! तो ऐकून यमराज म्हणाले— "प्राचीनकालीं देवांचाहि या बाबतींत गोंधळ झाला होता. हें अति सूक्ष्म तत्त्व समजण्यास फारच कठीण आहे. नचिकेत्या, तूं

दुसरा एखादा वर माग. तूं मला या बाबतींत गळ घालूं नकोस. हा एवढा वर मला माफ कर."

परंतु नचिकेता अशाने चळणारा नव्हता. आत्मज्ञान मिळविण्याचा त्याचा निश्चय अगदी पक्का होता. तो यमांना म्हणाला--"मृत्युदेव, आपण अगदी बरोबर बोललांत. देवांनाहि ह्या बाबतींत संशय पडला होता आणि हें आत्मतत्त्व आकलण्यास अत्यंत कठीण आहे असें जें आपण म्हणालांत तें अगदी खरें आहे. परंतु ह्या आत्म्याचें ज्ञान देऊं शकेल असा आपल्यासारखा आचार्य मला आणखी कुठे बरें लाभेल ? हे मृत्युदेव, आपल्याखेरीज हें मृत्यूचें कोडें कोण बरें उकलून दाखवूं शकेल ? आणि म्हणून मला आपल्याकडून याखेरीज आणखी कोणताहि वर मुळीच नको. या वरासारखा वर आणखी कोणता बरें आहे ?"

तें ऐकून यमराज म्हणाले--"नचिकेत्या, शंभर वर्षें आयुष्य असलेलीं मुलें आणि नातू मागून घे; हवे तितके पशु, हत्ती, घोडे आणि सोन्याच्या राशी मागून घे. या साऱ्या पृथ्वीचें राज्य माग. जितकीं वर्षें जगण्याची तुझी इच्छा असेल तितकीं वर्षें तूं जगशील. ह्यांतील एखादा वर माग. ह्याच्यासारखा आणखी कोणताहि एखादा वर खुशाल माग. गजान्तलक्ष्मी, सुदीर्घ आयुष्य--काय वाटेल तें माग. नचिकेत्या, तुला ह्या समुद्रवलयांकित पृथ्वीचें एकछत्री साम्राज्य हवें आहे काय ? सर्वप्रकारच्या उपभोग्य वस्तूंचा मी तुला भोक्ता बनवीन. तुमच्या मर्त्यलोकांत दुर्लभ अशी वाटेल ती गोष्ट तूं माझ्याजवळून मागून घे, मुळीच संकोच करूं नकोस. ह्या अनुपम लावण्यवती स्वर्गीय अप्सरा, त्या ज्यांत बसलेल्या आहेत त्या दिव्य रथांसह आणि त्यांच्या हातांतील सुस्वर वाद्यांसह मी तुला प्रदान करतों. कुणाहि मानवाला ह्यांची प्राप्ति होणें कदापि शक्य नाही. माझ्या वरप्रसादाने त्या तुला लाभतील आणि तुझी सेवा करतील. परंतु, नचिकेत्या, मृत्यूनंतर काय होतें हा प्रश्न मात्र तूं मला विचारूं नकोस."

त्यावर नचिकेता म्हणाला--"मृत्युदेव, ह्या सर्व गोष्टी दों दिवसांच्या आहेत. शिवाय, त्यांच्या उपभोगाने समस्त इंद्रियांच्या शक्तींचा ऱ्हास होत असतो. आणि दीर्घायुष्य दीर्घायुष्य तें काय ?

अनंत कालाच्या तुलनेने केवढेंहि दीर्घ आयुष्य खरोखर स्वल्पच नव्हे काय ? हे रथ, हे घोडे, हें नृत्य-संगीत सारें आपलें आपल्याजवळच असो. प्रभो, धनाने कोणी कधी तृप्त झाला आहे काय ? अखेर तुमच्या पाशांत सापडावें लागून वित्ताचा वियोग अवश्यंभावीच आहे ना ? तुमची इच्छा असेल तोंपर्यंतच माणूस जिवंत राहूं शकतो मीं मघा आपल्याला मागितला तोच वर मला हवा आहे——मला अन्य कोणताहि वर नको. माझ्या दृष्टीने, आपल्यासारख्याजवळ मागण्यासारखा आणखी दुसरा वरच नाही."

नचिकेत्याच्या ह्या वैराग्यपूर्ण उत्तराने यमधर्म परम संतुष्ट झाले आणि म्हणाले——"नचिकेत्या, कल्याण (श्रेय) ही एक गोष्ट आहे आणि भोग (प्रेय) ही दुसरीच गोष्ट आहे. ह्या दोहोंचीं फलें वेगवेगळीं असून तीं माणसांना वेगवेगळ्या उद्दिष्टांनी आकर्षीत असतात——वेगवेगळ्या दिशांनी ओढीत असतात. जो त्यांपैकी श्रेय निवडतो त्याचें परम कल्याण होतें. जो भोग स्वीकारतो तो मनुष्य-जीवनांतील खऱ्या पुरुषार्थाला मुकतो. हें श्रेय आणि हें प्रेय हीं दोन्हीं माणसासमोर येऊन उभीं राहतात. विवेकी मनुष्य त्यांची पारख करून त्या दोहोंतील फरक जाणतो. याप्रमाणे, तीं दोन्हीं एकमेकां-पासून वेगळीं असून श्रेयच प्रेयापेक्षा श्रेष्ठ आहे असें जाणून तो श्रेया-चाच अंगीकार करतो. उलट अविवेकी, मूढ माणसें देहसुखाच्या आशेने प्रेयाचेंच ग्रहण करतात. नचिकेत्या, केवळ वरवरच मोहक वाटणाऱ्या वस्तूंचा नश्वर स्वभाव विचारांत घेऊन तूं विवेकाने त्यांचा त्याग केला आहेस. तूं खरोखर प्रज्ञावंत आहेस." यानंतर यम-धर्मांनी नचिकेत्याला आत्मोपदेश देण्यास सुरुवात केली.

या ठिकाणीं आपल्याला त्यागाची आणि वैदिक नीतीची अत्युच्च कल्पना आढळून येते. ती ह्रीच की, माणसाने भोगवासनेचा त्याग केल्याखेरीज त्याच्या हृदयांत सत्याचा प्रकाश पडणें सुतराम् शक्य नाही. जोंपर्यंत ह्या फोल विषयवासना आपल्या हृदयांत धुडगूस घालीत आहेत, जोंपर्यंत त्या आपल्याला फरफटून नेत आहेत आणि आपल्याला प्रत्येक वस्तूचे गुलाम बनवीत आहेत——एवढ्यातेवढ्या रूपाचे, एवढ्यातेवढ्या चवीचे, एवढ्यातेवढ्या स्पर्शाचे गुलाम बनवीत

आहेत, तोंपर्यंत आपण आपल्या ज्ञानाचा केवढाहि दिमाख दाखविला तरीदेखील सत्य आपल्या हृदयांत कसें बरें आविर्भूत होणार ?

असो तर, तदनंतर यम नचिकेत्याला म्हणाले, "धनाच्या मोहाने ज्याची बुद्धि भ्रष्ट झालेली आहे अशा अविवेकी, बालिशबुद्धीच्या, माणसाच्या मनांत परलोकाविषयी, आत्मतत्त्वाविषयी विचार कधीच उदय पावत नसतात 'हाच लोक काय तो आहे, परलोक वगैरे सब झूट आहे' अशा भावनेने ते जगत असतात आणि पुन्हापुन्हा माझ्या तावडींत सापडत असतात. हें सत्य आकलन करणें फार कठीण आहे. पुष्कळ-जण तें सतत ऐकूनहि समजू शकत नाहीत, कारण हें सत्य सांगणारा आणि ऐकणारा हे दोघेहि तसेच सुयोग्य असावयास हवेत. असला वक्ता आणि असला श्रोता हे दोघेहि खरोखर अत्यंत आश्चर्यकारक व्यक्ति म्हणाव्या लागतील. ह्या सत्याची खूण पटण्यासाठी तें सांगणारा गुरुहि आश्चर्यकारक असावयास हवा आणि तें ऐकणारा शिष्यहि तद्वतच आश्चर्यकारक असावयास हवा. त्याचप्रमाणे, साधकाने फोल तर्क करीत बसून आपलें मन प्रक्षुब्ध करून घेतां कामा नये. कारण, हें अतींद्रिय आत्मतत्त्व मुळी तर्काचा विषयच नाही. तो प्रत्यक्षानुभूतीचा विषय आहे." प्रत्येक धर्म, तो जें सांगतो त्यावर आपल्याला विश्वास ठेवायला सांगत असतो असें आपण नेहमी ऐकत आलों आहोंत. आंधळ्याप्रमाणे विश्वास ठेवायला आपल्या शिकविण्यांत आलें आहे. आता, ही आंधळयाप्रमाणे विश्वास ठेवण्याची कल्पना आक्षेपार्ह आहे यांत मुळीच संशय नाही. पण आपण जर तिचें नीट विश्लेषण केलें तर तिच्या बुडाशीं एक अत्यंत महान् सत्य असल्याचें आपल्याला आढळून येईल. जे लोक आपल्याला आंधळा विश्वास ठेवायला सांगत असतात त्यांना खरें पाहतां अभिप्रेत असते-- जिच्याविषयी आपण बोलत आहोंत ती ही प्रत्यक्षानुभूति. मनाला फोल तर्काने प्रक्षुब्ध करतां कामा नये, कारण तर्काने कधी ईश्वरलाभ होत नसतो. ईश्वर हा प्रत्यक्ष अनुभूतीचा विषय आहे, तो मुळी तर्काचा विषयच नाही. तर्क वा अनुमान हें नेहमी कोणत्यातरी अनुभवावर उभारलेलें असतें. अशा अनुभवांखेरीज तर्क करतां येणें शक्यच नाही. आपण आधीच अनुभवलेल्या कांही गोष्टींची एकमेकींशीं तुलना करण्याच्या पद्धतीलाच

तर्क म्हणत असतात. ह्या अनुभवलेल्या कांही गोष्टी आधीच्याच असल्याखेरीज तर्क मुळी शक्यच नाही. हें जर बहिर्जगताच्या बाबतींत खरें असेल तर मग तें अंतर्जगताच्या बाबतींतहि कां खरें असूं नये ? रसायनशास्त्रज्ञ कांही रसायनें घेतों आणि त्यांपासून कित्येक निराळीं द्रव्यें तयार होतात. ही एक बाह्य जगतांतली घटना आहे, आपण ती प्रत्यक्ष पाहतों, ती आपल्या अनुभवाला येते, आणि तिच्या पायावर आपण आपलीं सारीं रसायनविषयक अनुमानें रचतों. पदार्थविज्ञानाचेंहि असेंच आहे, इतर सर्वच विज्ञानांचेंहि असेंच आहे. सर्व प्रकारचें ज्ञान याप्रमाणे 'प्रत्यक्षा'वरच आधारलेलें असतें, आणि त्याच्या आसऱ्यानेच आपण तर्कविचार करीत असतों. परंतु, आश्चर्य हें की, विशेषत: आजच्या काळांत अधिकांश लोक असें समजत असतात की धर्माच्या क्षेत्रांत असा प्रत्यक्ष अनुभव येणें संभवनीय नाही, आणि धर्म जर जाणून घ्यावयाचाच असेल तर तो फक्त वायफळ तर्कानेच जाणून घेणें शक्य आहे ! परंतु वस्तुस्थिति अशी मुळीच नाही. धर्म कांही वडबडण्याची वस्तु नाही, धर्म ही प्रत्यक्षानुभूतीची वस्तु आहे. आपल्याला स्वत:च्या आत्म्यांत शिरून तिथे धांडोळा घ्यावा लागेल, तिथे काय आहे हें बघावें लागेल. तिथे काय आहे हें आपल्याला समजून घ्यावें लागेल, आणि जें समजलें त्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घ्यावा लागेल. धर्म तो हाच. कितीहि वटवट करा, ती धर्म नव्हे. म्हणून, ईश्वर आहे की नाही हा प्रश्न तर्काच्या द्वारा सुटणें कधीच शक्य नाही, कारण तर्काचे मुद्दे दोन्ही बाजूला समान आहेत. परंतु, ईश्वर जर असेलच तर तो आमच्या हृदयांतच आहे, आमच्या आंतच आहे. तुम्हीं त्याला कधी पाहिलें आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. आपल्या ह्या जगाला अस्तित्व आहे किंवा नाही ह्या प्रश्नाचा अजून सोक्षमोक्ष झालेला नाही, वास्तववादी (Realists) आणि विज्ञानवादी (Idealists) ह्यांच्यांतील वादावादीला कधीच अंत नाही. परंतु तुम्हीआम्ही ठाम जाणून आहोंत की जग आहे, तें चाललें आहे. आपण फक्त शब्दाच्या अर्थाची लटपट करून उगाच तर्कटें लढवीत असतों. एक शब्द घ्यायचा, त्याचा आपल्याच मनाने नवाच अर्थ करायचा आणि वाद घालीत बसायचें--

हा आमचा खाक्या ! म्हणूनच यमराजांनी नचिकेत्याला बजावून सांगितलें की ज्याला सत्याचा लाभ करून घेण्याची इच्छा आहे त्यानें स्वतःचें मन फोल तर्कटांनी कदापि विक्षुब्ध होऊं न दिलें पाहिजे. ईश्वर आहे की नाही या एकाच प्रश्नाच्या बाबतींत नव्हे, तर आपल्या जीवनामधील सर्वच प्रश्नांच्या बाबतींत आपण प्रत्यक्षानुभूतीवरच विसंबून असलें पाहिजे, प्रत्यक्ष अनुभवाचीच कास धरली पाहिजे. बहिर्विज्ञानांप्रमाणेच परमार्थविज्ञानांतहि आपल्याला कित्येक पारमार्थिक वा आध्यात्मिक घटना प्रत्यक्ष बघाव्या लागतील आणि त्यांच्यावरच धर्माची उभारणी करावी लागेल. अर्थातच एखाद्या धर्माच्या कोणत्याहि साचेबंद, ठरीव सिद्धान्तावर आपण विश्वास ठेवलाच पाहिजे. ह्या हट्टांत कांहीच अर्थ नाही, नव्हे, तसें केल्यास आपली अवनतिच होईल. जो मनुष्य तुम्हांला प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवायला सांगतो तो स्वतःची तर अवनति करून घेतोच, परंतु तुम्हीं त्याच्यावर तसा विश्वास ठेवला तर त्याने तुमचीहि अवनति झाल्याखेरीज राहणार नाही. जगांतील साधुसंतांना आम्हांला फक्त एवढेंच सांगण्याचा अधिकार आहे की त्यांनी स्वतःच्या मनाचें विश्लेषण केलें आहे आणि त्यांना कित्येक सत्यें गवसलीं आहेत. आपल्यालाहि तसें आढळून आलें तर आपण विश्वास ठेवूं, एरवी नाही. धर्माच्या बाबतींत कांही सांगण्यासारखें असेल तर तें फक्त एवढेंच. परंतु तुम्ही हें अगदी पक्कें लक्षांत असूं द्या की जे लोक धर्मावर हल्ला चढवीत असतात त्यांच्यापैकी शेकडा ९९·९ जणानी आपल्या मनाचें कधी विश्लेषण केलेलें नसतें, सत्याचा लाभ करून घेण्यासाठी कधी साधना केलेली नसते. म्हणून, "सूर्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणारे तुम्ही सगळे मूर्ख आहांत" असें ओरडणाऱ्या आंधळ्याच्या शब्दांप्रमाणेंच ह्या असल्या लोकांच्या धर्मविरोधी तर्कटांमधेंहि कांहीसुद्धा अर्थ नाही.

धर्म ही प्रत्यक्ष अनुभवाची वस्तु आहे हें एक अत्यंत मौल्यवान सत्य आपण समजून घेतलें पाहिजे आणि नेहमी हृदयांत वाळगलें पाहिजे. धर्मावरून माजणारी ही दंगल, हीं भांडणें, हे मतभेद आणि वाद-विसंवाद तेव्हाच थांबतील की जेव्हा आपल्याला उमजेल की धर्म हा शास्त्रग्रंथांत किंवा चर्च-मशीद-मंदिरांत सामावलेला नाही. धर्म म्हणजे

प्रत्यक्षानुभूति. ज्याला ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन झालें आहे, आत्मसाक्षात्कार झाला आहे तोच खरोखर धार्मिक म्हणावा. अशी प्रत्यक्ष अनुभूति नसेल तर, वक्तृत्वाचा पाऊस पाडणारा सर्वश्रेष्ठ धर्माचार्य आणि एखादा य:कश्चित्, अज्ञ जडवादी ह्यांच्यांत खरोखर कांहीच फरक नाही. आपण सर्वजण खरोखर नास्तिक आहोंत; तें आपण कबूल करूं या. 'धार्मिक तत्त्वांना केवळ बुद्धीने साद दिली म्हणजे धार्मिक झालों असें मुळीच नाही.' एखाद्या ख्रिश्चनाची वा मुसलमानाची किंवा जगांतल्या कोणत्याहि धर्माच्या अनुयायाची गोष्ट घ्या. येशूंनी टेकडीवरून दिलेल्या त्या सुप्रसिद्ध उपदेशांतील सत्याचा ज्याला खरोखर साक्षात्कार होईल तो पूर्णत्व पावेल आणि तात्काळ देवता बनून जाईल. आणि तरीहि, पृथ्वीच्या पाठीवर येशूंच्या त्या उपदेशाचें पालन करणारे त्यांचे कैक कोटी अनुयायी आहेत असें म्हणतात ! ह्याचा अर्थ फक्त एवढाच समजावयाचा की ते लोक कधी ना कधी येशूंच्या त्या उपदेशाचा साक्षात्कार करून घेण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. दर दोन कोटी ख्रिश्चनांत एक तरी ख्रिस्तांचा खरा अनुयायी निघेल की नाही याची शंकाच आहे.

ह्याचप्रमाणे आमच्या भारतांत देखील तीस कोटी वेदान्ती आहेत असें म्हणण्यांत येतें. फार कशाला, हजारांत एखाद्याला जरी धर्माचा प्रत्यक्षानुभव आलेला असता तर हें जग फार फार बदलून गेलें असतें ! आपण सर्वजणच नास्तिक आहोंत, आणि तरीहि, जो बिचारा हें कबूल करतो त्याच्या आपण हात धुऊन मागे लागतों. आपण सारेच अंधारांत पिचत आहोंत. धर्म आपल्यापक्षीं कांहीच नाही. आपल्यापक्षीं धर्म म्हणजे फक्त बुद्धीने कित्येक तत्त्वांना मान्यता देणें आणि बडबड करणें. जो खूप छान बोलूं शकतो त्यालाच आपण पुष्कळदा धार्मिक समजत असतों. हा काय धर्म की धर्माची थट्टा ? "लोकांना दिपवून सोडील अशी शब्दयोजना करण्याचें कौशल्य, थक्क करून सोडणारें अस्खलित वक्तृत्व, शास्त्राच्या वचनांचा तऱ्हतऱ्हेने अर्थ लावण्याची करामत वगैरे सारें केवळ पंडितांच्या रसास्वादनासाठी आहे. ह्या साऱ्याला धर्म कदापि म्हणतां यावयाचें नाही." आपल्या अंतरंगीं ज्या वेळीं प्रत्यक्षानुभूतीचें कमळ उमलावयास लागतें--स्वत:च्या अंतरात्म्यांत ज्या

वेळीं आपल्याला प्रत्यक्षानुभव येऊं लागतो त्याच वेळीं धर्माला खरी सुरुवात होते. तोच खरोखर धर्माचा अरुणोदय म्हणतां येईल. तेव्हाच आपण खरखुरे नीतिमान होऊं. सध्या आपण पशूंपेक्षा कांही विशेष अधिक नीतिमान नाहीं. समाजाच्या चाबकानेच आज आपल्याला थोपवून धरलें आहे. "तुम्हीं चोऱ्या केल्या तरी मी तुम्हांला कांही शिक्षा करणार नाही" असें जर समाज आज आपल्याला वचन देईल तर एकमेकांना लुबाडण्यासाठी आपण एकमेकांवर नुसते तुटून पडूं ! पोलीसचा शिपाई आपल्याला नीतिमान बनवीत असतो. 'समाज काय म्हणेल' 'लोक काय म्हणतील' ह्या धाकानेच आपण आज नीतिनियम पाळत आहोंत, एरवी खरोखर पाहतां या बाबतींत आपण पशूंपेक्षा फारसे वरचढ ठरणार नाहीं. हें विधान किती खरें आहे हें आपण आंतल्या आंत पुरतेपणीं जाणून आहोंत. म्हणून आपण ढोंगीपणा सोडून देऊं या. आपण खरोखर धार्मिक नाहीं आणि लोकांकडे तुच्छतेने बघण्याचा आपल्याला कांहीहि अधिकार नाही हें आपण मोकळेपणाने कबूल करूं या. आपण सर्वजण भाऊभाऊ आहोंत, आणि आपल्याला जेव्हा धर्माचा प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हाच आपण खरोखर नीतिमान होऊं शकूं.

समजा की तुम्हीं एक विशिष्ट देश पाहिला आहे. असें असतां, तुम्हीं तो पाहिला नाही असें म्हणावयास कुणी जरी तुम्हांला सक्तीने भाग पाडलें तरी तुम्ही मनांतल्या मनांत जाणून असतां की तुम्हीं तो देश पाहिला आहेच. तद्वतच, हें बाह्य जगत् तुम्ही अनुभवतां त्यापेक्षा अधिक उत्कटपणें ज्या वेळीं तुम्हांला धर्माचा आणि ईश्वराचा अनुभव येईल त्या वेळीं कशानेहि तुमचा विश्वास चळावयाचा नाही. त्यालाच म्हणावें खराखरा विश्वास. "ज्याच्या ठायीं मोहरीएवढा देखील विश्वास आहे तो जर एखाद्या पहाडाला दूर सर असें म्हणेल तर त्या पहाडाला दूर सरावेंच लागेल"–– असें जें वाक्य तुमच्या बायबलमधे आहे त्याचा तरी अर्थ हाच आहे. त्याच वेळीं तुम्ही सत्य खरोखर जाणाल, कारण त्या वेळीं मग तुम्ही स्वतःच सत्य होऊन गेलेलां असतां.

वेदान्ताचें ब्रीदवाक्य आहे––धर्माचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त करून

घ्या, नुसत्या बडबडण्याने कांहीहि व्हावयाचें नाही. परंतु असा प्रत्यक्षानुभव लाभणें, आत्मसाक्षात्कार होणें अत्यंत कठीण आहे. जो परमाणूंच्या आंत लपून बसलेला आहे तो पुराण पुरुष प्रत्येक मानवी हृदयाच्या अति गूढ प्रदेशांत वसत आहे. साधुसंतानी अंतर्दृष्टीच्या बलाने त्याचा साक्षात्कार करून घेतला आणि ते सुख-दुःखाच्या पलीकडे निघून गेले. ज्याने त्या परम पुरुषाला जाणलें आहे त्याने सत्य जाणलें आहे, आणि ज्याने सत्य जाणलें आहे तो, आपण ज्याला धर्म आणि अधर्म म्हणतों त्यांच्या पलीकडे निघून जातो, शुभाशुभ कर्मांच्या पलीकडे निघून जातो, सत्-असताच्या पलीकडे निघून जातो. पण मग स्वर्गाचें काय झालें ? स्वर्गासंबंधी आमची कल्पना म्हणजे दुःखरहित सुख अशी असते. म्हणजे असें की, आपल्याला जीवनांतील सर्व दुःखें वजा करून त्यांतील फक्त सुखें हवीं असतात. कल्पना तर खूप चांगली आहे यांत संशयच नाही. ती अगदी स्वाभाविकपणें आपल्या मनांत जन्मत असते. पण ती अगदी सपशेल चुकीची आहे, कारण नुसतेंच सुख किंवा नुसतेंच दुःख नांवाची गोष्टच असूं शकत नाही.

रोममधल्या त्या श्रीमंत माणसाचा वृत्तान्त तुम्हां सर्वांनी ऐकलाच असेल. एक दिवस त्याला दिसून आलें की त्याच्या संपत्तींतील फक्त दहा लक्ष पौंडच काय ते शिल्लक आहेत. बस्, 'आता उद्या माझें कसें होणार ?' अशा विचाराने त्याने ताबडतोब आत्महत्त्या करून टाकली ! दहा लक्ष पौंड म्हणजे त्याच्या दृष्टीने गरीबी ठरली ! कशाला सुख म्हणायचें आणि कशाला दुःख ? तीं बदलत असतात, सारखीं बदलत असतात---सारखीं निरनिराळीं रूपें धरीत असतात. मी जेव्हा लहान होतों तेव्हा मला वाटे की मला जर कोचमन होऊन बग्गी हाकतां आली तर माझ्या सुखाला सीमा राहणार नाही. आज मला तसें वाटत नाही ! आता सांगा, तुम्ही कोणतें सुख पकडून ठेवणार ? ही गोष्ट आपण सर्वांनी नीट समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या बाबतींतली आपली भ्रामक समजूत जातां जात नाही. प्रत्येकाची सुखाची कल्पना वेगवेगळी असते. मीं असा एक मनुष्य पाहिला आहे की रोज अफूचा एक गोळा गिळल्याखेरीज तो सुखी होऊं शकत नाही. त्याला स्वर्गाचें जें स्वप्न पडेल त्यांत त्या

स्वर्गाची जमीन अफूचीच असेल ! परंतु तो तसला स्वर्ग मला वापडयाला मुळीच परवडायचा नाही. अरबी काव्यांत घोळघोळून केलेलीं स्वर्गाचीं वर्णनें आढळतात—त्या स्वर्गांत सुंदर सुंदर बगीचेच बगीचे आहेत आणि त्या बगिच्यांतून नद्या झुळझुळत असतात ! माझा स्वतःचा जन्म अशा प्रदेशांत गेला आहे की तिथे सगळीकडे पाणीच पाणी आहे; दरवर्षी पूर येतात, खेडीचीं खेडीं वाहून जातात अन् हजारो लोक पुराला बळी पडतात. साहजिकच, मी ज्या स्वर्गाची कल्पना करीन त्यांत नद्या वाहणारे बगीचे असणार नाहीत, माझ्या स्वर्गांत पर्जन्यमान खूपच बेताबाताचें राहील ! एवंच, आपल्या सुखाच्या कल्पना नेहमी बदलत असतात. एखाद्या तरुणाला स्वर्गाचें जें स्वप्न पडेल त्यांत त्याच्या हृदयाची सुंदर राणी असणारच. तोच ज्या वेळीं जख्ख म्हातारा होईल त्या वेळीं त्या हृदयाच्या राणीला फाटा दिला जाईल ! आपल्या गरजेनुसारच आपला स्वर्ग रंगविला जात असतो, आणि जसजशा आपल्या गरजा बदलतात तसतशीच स्वर्गाची आपली कल्पनाहि बदलत असते. इंद्रियांचीं सुखेंच ज्यांना जीवनाचें उद्दिष्ट वाटत असतात अशांनी कल्पिलेला स्वर्ग जर खरोखरच आपल्याला लाभला तर आपल्या उन्नतीची आशाच खुंटली म्हणायची. अशा स्वर्गांत मानवाची उन्नति होणें अशक्य होय. मानवात्म्याला दिलेला तो एक भयंकर शापच ठरेल. एवढ्याकरताच का आपला जन्म आहे ? थोडेसें हसणें, थोडेसें नाचणें-गाणें, थोडेसें रडणें, आणि मग कुत्र्यासारखें मरून जाणें ! ज्या वेळीं तुम्ही ह्या असल्या गोष्टींच्या मागे लागतां त्या वेळीं तुम्ही मानवजातीला केवढा घोर शाप देत असतां ह्याची तुम्हांला जाणीव नसते ! तुम्ही ज्या वेळीं ह्या भोगसुखांसाठी अकांडतांडव करीत असतां तेव्हा तुम्ही खरोखर तसेंच करीत असतां, कारण खरें सुख म्हणजे काय हें तुम्हांला माहीत नसतें. तत्त्वज्ञान वस्तुतः आपल्याला सुखें सोडून द्यायला सांगत नाही, तर खरें सुख म्हणजे काय हें जाणून घ्यायला सांगत असतें. नॉर्वे देशांतील लोकांची स्वर्गासंबंधी अशी कल्पना आहे की स्वर्ग म्हणजे एक भयंकर रणक्षेत्र आहे. तिथे सगळेजण 'ओडीन' (Odin) नामक देवतेसमोर बसलेले असतात. मग ते रानटी डुकराची शिकार करतात. त्यानंतर

ते आपसांत खूप लढतात आणि एकमेकांचीं खांडोळीं करून टाकतात. परंतु कसें कुणास ठाऊक, या असल्या कत्तलीनंतर थोड्याच वेळानें त्यांच्या सगळ्या जखमाबिखमा भरून येतात आणि मग ते सारेजण एका दिवाणखान्यांत जमतात. तिथे तो डुक्कर छान खरपूस भाजला जातो. आणि मग सगळे मिळून मजा करीत खूप दारू झोकून त्यावर यथेच्छ ताव मारून त्याचा फन्ना उडवितात. परंतु दुसऱ्या दिवशीं तो रानडुक्कर फिरून जिवंत होऊन जसाच्या तसा होतो. फिरून त्याची शिकार केली जाते. फिरून साऱ्याची पुनरावृत्ति होते. असा प्रकार सतत चालला असतो. हा असा आहे नॉर्वेमधील लोकांचा स्वर्ग ! तोहि तुमच्याआमच्याच स्वर्गासारखा आहे, त्यापेक्षा मुळीच कमी प्रतीचा नाही, फक्त आपली कल्पना थोडी गोमटी असते, इतकेंच. आपण सर्वचजण अशी रानडुकराची शिकार करूं इच्छीत असतों-- आपण अशा ठिकाणीं जाऊं इच्छीत असतों की जिथे हीं सर्व सुखें सतत पुरेपूर चालूं राहतील. तोच रानडुक्कर रोज मारला जाऊन खाल्ला जातो आणि तो दुसऱ्या दिवशीं फिरून ताजातवाना होतो ह्या नार्वेजियन लोकांच्या स्वर्गसुखाच्या कल्पनेहून आमची ही स्वर्गसुखाची कल्पना कुठे निराळी आहे बरें ?

असो. तत्त्वज्ञानाचें आपल्याला असें आग्रहाचें सांगणें आहे की निरपेक्ष, अपरिवर्तनीय असा एक आनंद आहे. हें उघडच आहे की आपण आपल्या जीवनांत जीं इवलालीं सुखें उपभोगीत असतों तीं तो आनंद असणें शक्य नाही. आणि तरीहि वेदान्त हें आपल्याला दाखवून देतो की आपल्या ह्या जीवनांत जें कांही आनंदाचें आहे तें त्या खऱ्या आनंदाचा केवळ एक कणच होय, कारण वस्तुतः अस्तित्वांत आहे केवळ तोच एक आनंद--तो ब्रह्मानंदच. वास्तविकदृष्टया आपण प्रतिक्षणीं तो निरपेक्ष आनंद--तो ब्रह्मानंदच आस्वादीत असतों-- झाकाळलेल्या, चुकीच्या, विकृत स्वरूपांत, इतकेंच काय तें. हर्ष म्हणून, आनंद म्हणून, सुख म्हणून जें कांही आहे तें सारें--फार काय पण चोराचा चोरी करण्यांतला आनंद देखील वस्तुतः त्या निरपेक्ष आनंदाचा, त्या ब्रह्मानंदाचाच आविष्कार होय. फक्त, तो तऱ्हतऱ्हेच्या बाह्य वस्तूंच्या वा उपाधींच्या संसर्गानें मलिन झाला असतो, गढूळ

झाला असतो, आणि म्हणून त्याचें खरें रूप आपल्याला कळत नाही, इतकेंच. परंतु त्याची उपलब्धि करून घेण्यासाठी आपल्याला नेति नेति करीतच जावें लागेल——ह्या सगळ्या लहानलहान, 'अल्प' ऐहिक सुखांचा त्यागच करावा लागेल. अशा रीतीने नेति नेति करीत गेल्यानेच इति इति सुरू होईल——ह्या लहान लहान 'अल्प' सुखांचा त्याग केल्यानेच तो महान् आनंद, तो 'भूमा' आनंद आपल्याला उपलब्ध होईल. आपण अज्ञानाचा त्याग केला पाहिजे, जें कांही खोटें आहे त्या साऱ्याचा त्याग केला पाहिजे, तरच सत्य आपल्या जीवनांत प्रकट होऊं लागेल. अशा रीतीने ज्या वेळीं आपण सत्य आत्मसात् करूं त्या वेळीं मग, ज्या गोष्टींचा आपण त्यासाठी आधी त्याग केला होता त्यांना निराळेंच स्वरूप येईल, वेगळाच अर्थ प्राप्त होईल——तें सारें-कांही ब्रह्ममय होऊन जाईल. त्या वेळीं सर्वकांही उन्नत होऊन जाईल, उदात्त होऊन जाईल, आणि मगच आपण त्या साऱ्यांचें खरें स्वरूप जाणूं शकूं, त्यांना एका नव्याच प्रकाशमय दृष्टीने बघूं शकूं. परंतु त्यांचें स्वरूप याप्रमाणे समजून घेण्यासाठी आपल्याला आधी सत्याचें निदान ओझरतें तरी दर्शन व्हावयास हवें; आपण आधी ह्या साऱ्यांचा त्याग केला पाहिजे, आणि मग त्या साऱ्या गोष्टी आपल्याला वापस मिळतील——ब्रह्मस्वरूपांत ! म्हणून आपल्याला आपल्या साऱ्या दुःखांचा आणि क्लेशांचा, आपल्या सगळ्या लहान लहान सुखांचा त्याग करावयास हवा.

हीं सारीं लहान लहान सुखें ज्या विराट आनंदाचे कण होत, ज्याची मायिक रूपेंच होत आणि "वेद ज्याचा उद्घोष करीत असतात, ज्याच्या लाभासाठीच नाना प्रकारें तपश्चर्या केली जाते, ज्याच्या प्राप्ती-साठी लोक ब्रह्मचर्याचें पालन करतात तें तत्त्व मी तुला एका शब्दांत सांगतों. तो शब्द 'ॐ' होय." वेदांमधे ह्या ॐकाराचा खूप महिमा सांगितला असून तो अत्यंत पवित्र मानला गेला आहे.

त्यानंतर, 'माणूस मेल्यानंतर त्याचें काय होतें' या नचिकेत्याच्या प्रश्नाला उत्तर देत यमधर्म म्हणाले——"हा ज्ञानमय, सदा चैतन्यवान आत्मा कधी मरत नाही, कधी जन्मत नाही; तो कशापासून उत्पन्न होत नाही आणि वस्तुतः त्याच्यापासूनहि कांही उत्पन्न होत नाही. हा

अज, नित्य, शाश्वत आणि सनातन आत्मा देहाच्या नाशाने कधी नष्ट होत नसतो. आपण मारूं शकतों असें जर मारणारा समजेल किंवा आपण मारलों गेलों असें जर मरणारा समजेल तर त्या दोघांनाहि सत्य माहीत नाही असें समजावें, कारण हा आत्मा मारतहि नाही आणि मरतहि नाही." केवढें भयंकर विधान हे! असो. ह्या मंत्राच्या पहिल्या ओळींतील आत्म्याच्या 'ज्ञानमय' (विपश्चित्) या विशेषणाकडे मी तुमचें लक्ष ओढूं इच्छितों. आपण जसजसें पुढे जाऊं तसतसें आपल्याला आढळून येईल की वेदान्ताचा असा सिद्धान्त आहे की समस्त ज्ञान आणि समस्त पवित्रता हीं आपल्या आत्म्यांत आधी-चींच वसत आहेत--कुठे तीं मंदपणें प्रकटत आहेत तर कुठे उज्ज्वल-पणें, हाच काय तो फरक. माणसामाणसांत आणि ह्या समग्र सृष्टींतील वस्तूवस्तूंत जो फरक आहे तो फक्त प्रमाणाचा आहे, प्रकाराचा नाही. प्रत्येकाच्या पाठीशीं आहे, प्रत्येकाचें सत्यस्वरूप आहे तोच एक अनंत, नित्यानंदमय, नित्यशुद्ध, नित्यपूर्ण परमात्मा. तोच पुण्यवंताचा आत्मा आहे आणि पाप्याचाहि आत्मा आहे, तोच सुखांत लोळणाऱ्याचाहि आत्मा आहे आणि दुःखांत पिचणाऱ्याचाहि आत्मा आहे, तोच सुरूपा-चाहि आत्मा आहे आणि कुरूपाचाहि आत्मा आहे, तोच मानवाचा आत्मा आहे आणि पशूंचाहि आत्मा आहे--तो एकच सर्वांचा आत्मा आहे, तो सर्वत्र समभावें विद्यमान आहे. तो ज्योतिर्मय आहे. जगांत आपल्याला जो फरक दिसतो तो त्या आत्म्याच्या अभिव्यक्तींतील फरका-मुळेच असतो. कुठे तो जास्त व्यक्त असतो तर कुठे कमी, परंतु अभि-व्यक्तींमधील ह्या फरकांमुळे त्यांमधून अभिव्यक्त होणाऱ्या आत्म्यांत मात्र मुळीच फरक पडत नसतो, तो सर्वांच्या ठायीं सारखाच असतो. एका-जणाच्या पोशाखांतून त्याच्या शरीराचा बराचसा भाग उघडा दिसतो तर दुसऱ्या एखाद्याच्या पोशाखांतून त्याच्या शरीराचा तितका भाग दिसत नाही. त्याने त्यांच्या शरीरांत कांही फरक पडत नाही, फरक आहे तो त्यांच्या पोशाखांतच. ह्याचप्रमाणे, पोशाखाच्या म्हणजेच देह-मनादिकांच्या स्वरूपानुसारच आत्म्याचें ज्ञान आणि पवित्रता हीं अभिव्यक्त होत असतात. म्हणून येथे आपण ही गोष्ट आपल्या मनावर अगदी पक्की बिंबवून घेतली पाहिजे की, वेदान्तदर्शनांत चांगलें आणि वाईट ह्या

दोन निराळ्या वस्तु मानल्या गेल्याचें कुठेहि आढळणार नाही. ती एकच गोष्ट चांगलें आणि वाईट दोन्हीं होत आहे--तो एकच आत्मा चांगल्याचें आणि वाईटाचें रूप धरीत आहे--चांगल्यांत आणि वाइटांत जो फरक दिसतो तो त्यांमागील आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या कमीअधिक प्रमाणाचाच होय. प्रत्यक्ष व्यवहारांत आपल्याला ह्याचा सदा पडताळा येत असतो. ज्या गोष्टीला आज मी सुखदायक समजत आहें तिलाच, उद्या मला अधिक चांगली अवस्था लाभतांच मी त्रासदायक लेखूं लागतों. जो अग्नि आपल्याला ऊब देतो तोच परत आपलें भाजून भरीतहि करूं शकतो; तो कांही त्या अग्नीचा दोष नाही. सारांश, आत्मा हा पवित्र आणि पूर्ण असल्यामुळे, जो मनुष्य कुकर्म करीत असतो तो स्वतःच्या स्वरूपाच्या विरुद्ध वागत असतो--त्याला स्वतःचें स्वरूप माहीत नसतें. अगदी खुनी माणसांत देखील तो शुद्ध आत्मा विराजमान असतो, तो नाहीसा होत नाही. चूक त्या खुनी इसमाची असते, भ्रमामुळे तो आपल्या त्या आत्म्याला झाकून टाकतो, त्याची प्रभा फाकूं देत नाही. तद्वतच, मी मारला गेलों असें ज्याला वाटत असतें त्याचाहि आत्मा मरत नसतो. तो नित्य आहे. तो कधी मारला जाऊं शकत नाही, त्याचा कधी ध्वंस केला जाऊं शकत नाही. "लहानांत लहान, मोठ्यांत मोठा असा तो सर्वांचा प्रभु प्रत्येक मानवाच्या हृदयाच्या गाभाऱ्यांत वास करीत आहे. निष्पाप व्यक्ति त्या विधात्याच्या कृपेनेच त्याचें दर्शन लाभून शोकरहित होत असतात. तो अशरीरी असूनहि शरीरांत वसत असतो, अवकाशातीत असूनहि अवकाशांत स्थित असतो. तो अनंत आहे, सर्वव्यापी आहे. तो असा आहे हें जाणून ज्ञानीजन दुःखाच्या पलीकडे निघून जातात--ते मग फिरून कधी दुःख पावत नाहीत."

"हा आत्मा वक्तृत्वशक्तीने मिळण्यासारखा नाही, तो तीक्ष्ण बुद्धीने मिळण्यासारखा नाही किंवा वेदांच्या अध्ययनानेहि मिळण्यासारखा नाही." किती धीट, किती निर्भयपणाचें विधान आहे हें !--"तो आत्मा वेदांच्या अध्ययनानेहि मिळण्यासारखा नाही." मीं तुम्हांला मागेच सांगितल्याप्रमाणे, आम्हांला ह्या वेदांचें दान देणारे ऋषि अत्यंत धीटपणें, पराकाष्ठेच्या निर्भयपणें विचार करणारे होते, कशानेहि ते

थोपले जाणारे नव्हते. लक्षांत असूं द्या की तुम्ही ख्रिस्ती लोक बायबल-कडे ज्या दृष्टीने बघतां तिच्यापेक्षाहि कितीतरी जास्त आदराने आणि सन्मानाने हिंदुलोक वेदांकडे बघत असतात. शास्त्र ही ईश्वराची वाणी आहे ह्याचा अर्थ तुम्हां ख्रिश्चनांच्या दृष्टीने एवढाच होतो की कुणा-तरी माणसाने ईश्वराकडून आदिष्ट होऊन, ईश्वराकडून स्फूर्ति लाभून तो शास्त्रग्रंथ लिहिला आहे. परंतु, हिंदूंची अशी धारणा आहे की, जगांत ह्या साऱ्या वस्तु अस्तित्वांत आहेत ह्याचें कारण वेदांमधे त्यांचीं नांवें आलीं आहेत हें होय. अमुक एक गोष्ट कां आहे ? तर वेदामधे तिचा निर्देश आहे म्हणून. हिंदूचा असा विश्वास आहे की वेदांमधूनच ही सारी सृष्टि निर्माण झाली आहे. ज्ञान म्हणून जें कांही आहे तें सारें वेदांमधे आहे. जसा जीवात्मा अनादिअनंत आहे तसाच वेदांमधील प्रत्येक शब्द अनादिअनंत आणि पवित्र आहे. सृष्टिकर्त्याचें समस्त हृद्गतच जणु वेदांमधे व्यक्त झालें आहे. हिंदुलोक वेदांकडे ह्या दृष्टीने बघत असतात. अमुक एक गोष्ट नैतिक कां ? तर वेद तसें म्हणतात म्हणून. तमुक गोष्ट अनैतिक कां ? तर वेद तसें म्हणतात म्हणून. असें असूनहि ह्या ऋषींचें धाष्टर्य बघा. त्यांनी अगदी न भितां, न कचरतां घोषणा केली की वेदांचें खूप अध्ययन करूनहि सत्यलाभ व्हावयाचा नाही, सत्य हें वेदांच्या अध्ययनाने मिळणारें नाही. मग तें कशाने लाभतें ? "ज्याच्यावर तो प्रभु प्रसन्न होतो त्यालाच तो स्वतःचें स्वरूप प्रकट करून दाखवितो." यावर अर्थातच असा आक्षेप घेतला जाईल की हा तर पक्षपाताचा प्रकार झाला. परंतु यम त्याचें स्पष्टीकरण कर-तात—"दुष्कर्म करणाऱ्या लोकांना, ज्यांची मनें शांत नाहीत अशा लोकांना सत्याचा लाभ होणें कदापि शक्य नाही. जे प्रामाणिक अंतः-करणाचे असतात, ज्यांचीं कर्मे पवित्र असतात, ज्यांची इंद्रियें संयत असतात त्यांनाच हा आत्मा निजस्वरूप प्रकट करून दाखवितो."

यमधर्मांनी ह्या संदर्भात एक अत्यंत सुंदर दृष्टान्त दिला आहे. मनापुढे हें चित्र रेखाटून बघा : आपलें हें शरीर एक रथ असून आत्मा त्या रथांत बसलेला रथस्वामी आहे. बुद्धि ही त्या रथाचा सारथि आहे. मन लगाम आहे. आणि इंद्रियें त्या रथाला जुंपलेले घोडे

आहेत. नीट वळण दिलें गेल्यामुळे ज्याचे घोडे काबूंत आहेत, ज्याचा लगाम पक्का असून बुद्धिसारथ्याने तो नीट सावरून धरला आहे तोच त्या सर्वव्यापक परम पदास पोहोचतो. उलट ज्याच्या रथाचे इंद्रियरूपी घोडे कह्यांत नाहीत आणि मनरूपी लगाम नीट सावरलेला नाही त्याचा रथ अखेर विनाशाप्रत जातो. सर्व भूतांच्या अंतर्यामीं वास करणारा हा आत्मा डोळ्यांना वा इतर कोणत्याहि इंद्रियाला गोचर होत नसतो. ज्यांचीं मनें शुद्ध आणि सूक्ष्म झालीं आहेत त्यांनाच ह्या आत्म्याचा साक्षात्कार होतो. जो शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधांच्या पलीकडे आहे, जो अव्यय आहे, ज्याला आदि व अंत नाहीत, जो प्रकृतीच्या अतीत आहे, जो अपरिवर्तनशील आहे त्या आत्म्याचा साक्षात्कार झाल्याने माणूस कायमचा मृत्यूच्या तावडींतून सुटतो. परंतु त्याचा असा साक्षात्कार होणें फार कठीण आहे. तें म्हणजे जणु वस्तऱ्याच्या धारेवरून चालण्यासारखें आहे. रस्ता खूप लांबच लांब आणि संकटाचा आहे, परंतु रोवलेला पाय मागे न घेतां पुढे पुढे चला, निराश होऊं नका. उठा, जागे व्हा, आणि तें लक्ष्य गाठेपर्यंत मधेच कुठेहि रेंगाळूं नका.

समस्त उपनिषदांमधून आढळणारी केंद्रभूत मुख्य कल्पना कोणती असेल तर ती म्हणजे प्रत्यक्ष अनुभव हीच होय. आपल्याला सत्याचा प्रत्यक्ष अनुभव यावयास हवा, आत्मसाक्षात्कार व्हावयास हवा. यासंबंधी वेळोवेळीं नाना प्रश्न उद्भवतील, आणि आधुनिक मानवाच्या बाबतींत तर हें विशेषेंकरून सत्य आहे. ह्या साऱ्याच्या उपयुक्ततेसंबंधी शंका येईल, आणखीहि कितीतरी शंका उद्भवतील; परंतु ह्या बाबतींत एक गोष्ट आपल्याला आढळून येईल की, या सगळ्या शंका आपल्याला आपल्या पूर्वसंस्कारांमुळेच येत आहेत. या पूर्वसंस्कारांचा आपल्या मनावर भलताच पगडा असतो. ज्यांनी लहानपणापासून सदा सगुण ईश्वराविषयी आणि मनाच्या व्यक्तित्वासंबंधी ऐकलें आहे त्यांना ह्या कल्पना अलबतच अत्यंत कठोर आणि कर्कश वाटतील, परंतु ते जर ह्या कल्पना श्रवण करतील आणि त्यावर नीट विचार करतील तर ह्या त्यांच्या जीवनांत मुरून जातील आणि मग कधी त्यांना ह्या कल्पनांचें भय वाटणार नाही. तत्त्वज्ञानाच्या बाबतींत साधारणत. उत्पन्न होणारा एक मोठा प्रश्न म्हणजे तत्त्वज्ञानाच्या

उपयुक्ततेसंबंधी होय. तत्त्वज्ञानाचा उपयोग काय ? ह्या प्रश्नाला फक्त एकच उत्तर आहे. आणि तें हें की, जर उपयुक्ततावाद्यांच्या मतें लोकांनी सुख मिळविण्याचा प्रयत्न करणें चांगलें असेल तर मग आध्यात्मिक चिंतनांत ज्यांना सुख वाटतें त्यांनी तें सुख मिळविण्याचा प्रयत्न कां बरें करूं नये ? इंद्रियसुखच पुष्कळांना सुखवितें आणि म्हणून ते लोक तेंच सुख मिळविण्यासाठी धडपड करीत असतात, परंतु तें तसलें सुख ज्यांना सुखवूं शकत नाही, ज्यांना उच्च आनंद हवा असतो असेहि लोक असतीलच ना ? कुत्र्याचें सुख फक्त खाण्यापिण्यांतच असतें. कांही विशिष्ट तारे कुठे आहेत हें बघण्यासाठी सर्वकांही सोडून कदाचित् एका पर्वताच्या शेंड्यावर जाऊन राहण्याऱ्या वैज्ञानिकाचे अपूर्व सुख कुत्र्याला समजणें शक्य नाही. कुत्रा त्या वैज्ञानिकाला हसेल आणि त्याला वेडा ठरवून मोकळा होईल. कदाचित् त्या वैज्ञानिकाची विवाह करण्याची देखील ऐपत नसेल आणि त्याला फारच खडतर आयुष्य कंठावें लागत असेल. कुत्रा त्याला हसेल. परंतु तो उलट त्या कुत्र्याला हेंच म्हणेल की, "बाबारे, तुझें सुख फक्त इंद्रियांमधेच सामावलेलें आहे. तूं तेंच उपभोगीत असतोस. त्याच्या पलीकडलें कोणतेंहि सुख तुला माहीत नाही. परंतु मला माझें हें जीवन अत्यंत सुखदायक आणि उपभोग्य वाटतें, आणि तुला जर तुझ्या पद्धतीने सुख उपभोगण्याचा अधिकार असेल तर मलाहि माझ्या कल्पनेप्रमाणे सुख उपभोगण्याचा अधिकार कां नसावा ?" चूक होते ती हीच की आपण सगळें जग आपल्याच विचाराचें करूं इच्छितों आणि आपल्याच मनाच्या, आपल्याच आवडीनावडीच्या मापाने सारें जग मोजूं जातों. तुम्हांला कदाचित् इंद्रियांचे विषयच सगळ्यांत जास्त सुखकर वाटत असतील, परंतु म्हणून मलाहि त्यांच्यांतच सुख वाटलें पाहिजे असें मुळीच नाही. तुम्ही जर तसा हट्ट धराल तर अर्थातच मला माझा मतभेद स्पष्टपणें व्यक्त करावा लागेल. लौकिक उपयुक्तावादी आणि धार्मिक मनुष्य यांच्यांत हाच फरक आहे. उपयुक्ततावादी म्हणतो की, "बघा, मी किती सुखी आहें. मला पैशाची कमतरता नाही. पण धर्माबिर्माच्या बाबतींत मी कधी उगाच आपलें डोकें शिणवीत नाहीं. तें सारें शोधण्या-धुंडाळण्याच्या हद्दीपलीकडलें

आहे, आणि त्या साऱ्याच्या कच्छपीं न लागतांहि मी छान सुखांत आहें." येथपर्यंत सर्वकांही ठीकच आहे. या साऱ्या उपयुक्ततावाद्यांचें भलें होवो. परंतु हें जग अत्यंत भयंकर आहे. आपल्या बांधवांचें अनिष्ट न करतां जर कुणी सुखी होऊं शकत असेल तर भगवान त्याचा पाठीराखा होवो. परंतु तो इसम माझ्याकडे येऊन जर मला म्हणूं लागेल की, "तूंहि माझ्यासारखेंच वागलें पाहिजेस, तूंहि ह्याच गोष्टी केल्या पाहिजेस, एरवी तूं मूर्खच म्हणायचा" तर मात्र मी त्याला म्हणेन की, "तूं चुकत आहेस. कारण, ज्या गोष्टी तुला परम सुख-दायक वाटत आहेत त्यांच्याविषयी मला काडीचेंहि आकर्षण वाटत नाही. दोन मुठी सोन्याच्या तुकड्यांमागे धावणेंच जर जिणें असेल तर तें जगण्याची मला कांहीच गरज वाटत नाही. तसलें जिणें माझ्या दृष्टीने वृथा होय. त्यापरीस मी मरण पत्करीन." उपयुक्ततावाद्याला धार्मिक माणसाचें हें उत्तर आहे. खरी गोष्ट अशी आहे की ज्यांच्या ह्या साऱ्या खालच्या भोगवासना संपल्या आहेत त्यांच्याचपक्षीं धर्म शक्य आहे—खरा धर्म अशांसाठीच असतो. आपल्याला आपल्या वांटयाचे अनुभव घेतलेच पाहिजेत, करावयाची तितकी धावाधावी केलीच पाहिजे. जेव्हा ही आपली धावाधावी संपते तेव्हाच तें दुसरे जग—ह्या जीवनापलीकडील सत्य आपल्या दृष्टीला गोचर होऊं लागतें.

ही विषयभोगवासना कधीकधी अत्यंत धोक्याच्या परंतु अतिशय भुरळ पाडणाऱ्या एका आगळ्याच कल्पनेचें रूप धारण करीत असतें ही कल्पना तुम्हांला नेहमीच ऐकूं येईल. अगदी जुन्या काळींहि तं होतीच. ती तुम्हांला प्रत्येकच धर्माच्या अनुयायांत आढळून येईल ती कल्पना अशी की, अशी एक वेळ येईल की ज्या वेळीं जगांतलं सर्व दुःखें लयास जातील, केवळ सुखेंच मागे उरतील आणि ही पृथ्वं स्वर्ग होऊन जाईल. ह्यावर माझा विश्वास नाही. ही पृथ्वी जशी आहे तशीच सदा राहणार आहे. असें म्हणणें फार कठोर आहे खरें, पण तसें म्हटल्याखेरीज कांही गत्यंतर दिसत नाही. ह्या जगांतील दुःख म्हणजे माणसाच्या शरीरांतील संधिवातासारखें आहे. संधि-वाताला तुम्ही एका अवयवांतून हुसकून लावा, तो दुसऱ्या एखाद्या

अवयवांत शिरतो, तिथून हाकला की तो तुम्हांला आणखीच कुठेतरी सतावूं लागतो. तुम्ही कांहीहि करा, तो आपलें ठाण सोडायचा नाही. फार जुन्या काळीं लोक जंगलांत राहत आणि एकमेकांना मारून खात; आजच्या काळांत ते एकमेकांचें मांस खात नाहीत खरें, परंतु अगदी मन लावून एकमेकांना ठकवितात. ह्या ठकवाठकवीने देशाचे देश, शहरेंचीं शहरें पोखरून निघत आहेत. हें कांही 'प्रगती'चें चिन्ह नव्हे ! आणि जगांत जिला तुम्ही प्रगति म्हणतां ती म्हणजे वासनांनी वासनांना गुणायचें याखेरीज आणखी दुसरें काय आहे--- वासनांच्या संतत वृद्धीखेरीज आणखी काय आहे हें मला तरी कांही कळत नाही. मला जर कांही अगदी स्पष्ट दिसत असेल तर तें म्हणजे हेंच की, दुःखें सगळीं वासनांमुळे ओढवत असतात ; वासना म्हणजे एखाद्या भिकाऱ्यासारखी दशा--- तो सदा कशाचीतरी भीक मागत असतो, कोणत्याहि गोष्टीकडे 'ही मला मिळाली पाहिजे' या वासने-खेरीज तो बघूंच शकत नाही --- सदा लसलस--- सदा 'पाहिजे' 'पाहिजे' 'आणखी पाहिजे' हीच भगभग. वासना तृप्त करण्याची आपली शक्ति जर गणितश्रेढीने वाढली तर वासनेची शक्ति भूमितिश्रेढीने वाढत असतें. ह्या जगांतल्या सुखांची आणि दुःखांची गोळाबेरीज सदा सारखी असते. समुद्रांत एका जागीं लाट उंचावली तर दुसरीकडे त्यामुळे खळगा पडत असतो. जर एखाद्या माणसाला सुख लाभलें तर दुसऱ्या एखाद्या माणसाला किंवा पशूला तत्प्रीत्यर्थ दुःख भोगावें लागतें. माणसांची संख्या वाढत आहे आणि कित्येक पशूंची संख्या घटत आहे; आपण त्यांना मारून टाकून त्यांची जमीन हिसकून घेत आहोंत, आपण त्यांचें सगळें खाद्य लुबाडून घेत आहोंत. असें असतां, सुख वाढत आहे असें आपण कोणत्या तोंडाने म्हणूं शकूं ? प्रबळ देश दुबळ्यांचा फन्ना उडवीत आहेत, पण त्याने ते प्रबळ देश सुखी होतील असें का तुम्हांला वाटतें ? मुळीच नाही. ते मग एकमेकांचा निःपात करूं लागतील ! एक व्यव-हारी माणूस ह्या दृष्टीने मला हें मुळीच कळत नाही की ह्या जगाचा स्वर्ग कसा काय बनणार आहे ! वस्तुस्थिति ह्याच्या अगदी विरुद्ध आहे. व्यवहारी दृष्टि सोडून तात्त्विक दृष्टीने विचार केला तरी मला

हें शक्य दिसत नाही.

पूर्णत्व हें नेहमीच अनंत असतें, आपण आधीचेच--स्वरूपतःच तें अनंत आहोंत, आणि तें निजस्वरूप व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहोंत. तुम्ही, मी, आपण सर्वचजण आपलें तें अनंतस्वरूप अभिव्यक्त करण्याचा यत्न करीत आहोंत. येथपर्यंत सारें ठीक आहे. परंतु ह्या सत्याच्या आधाराने कांही जर्मन तत्त्ववेत्त्यांनी एक अत्यंत चमत्कारिक सिद्धान्त प्रचलित केला आहे. तो असा की, तें अनंत उत्तरोत्तर अधिकाधिक व्यक्त होतां होतां अशी एक वेळ येईल की ज्या वेळीं तें पूर्णपणें व्यक्त होऊन जाईल आणि आपण सगळेजण पूर्ण पुरुष होऊन जाऊं. परंतु 'पूर्णपणें व्यक्त होणें' वा 'पूर्ण अभिव्यक्ति' म्हणजे काय ? 'पूर्णत्व' हें अनंत असतें, आणि 'व्यक्त होणें' म्हणजेच तर मर्यादांनी–सीमांनी–बांधलें जाणें. 'अभिव्यक्ति' म्हणजेच समर्यादपणा. म्हणजे मग 'आपल्या अनंत स्वरूपाची पूर्ण अभिव्यक्ति होईल' याचा अर्थ असा होतो की तेव्हा मग आपण 'समर्याद अनंत' म्हणजेच 'अनंत आणि त्याचबरोबर मर्यादित' स्वरूपाचे बनूं ! ह्या म्हणण्यांत कांही अर्थ तरी आहे काय ? हे शब्दच मुळी स्वविरोधी आहेत, परस्परविसंगत आहेत. हा असला सिद्धान्त पोरासोरांचें समाधान करूं शकेल; परंतु तें म्हणजे खोटेंपणाचें विष त्यांच्या मनांत भिनविणें होय आणि धर्मालाहि तें अत्यंत हानिकारक होय. आपण हें जाणून असावयास हवें की जग आणि मानव हीं ईश्वराचीं अवनत रूपें होत; तुमच्या बायबलांतहि सांगितलें आहे की 'ॲडॅम' हा आधी पूर्ण मानव होता, नंतर त्याचा अधःपात झाला. 'मानव हा आधीच्या आपल्या उच्च अवस्थेपासून ढळून हीन अवस्थेप्रत आला आहे' असें शिकवीत नाही असा एकहि धर्म आज अस्तित्वांत नाही. आपण अवनत होऊन पशूच्या अवस्थेस आलों आहोंत, आणि आता आपण फिरून वर जात आहोंत, उन्नत होत आहोंत, ह्या बंधनांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहोंत. परंतु त्याचबरोबर हेंहि तितकेंच खरें की आपण निजस्वरूप--आपलें अनंत स्वरूप येथे कधीहि पूर्णतया व्यक्त करूं शकणार नाहीं. आपण जंग जंग पछाडले तरी हें संभवनीय नाही असेंच आपल्याला आढळून येईल. आणि त्या प्रयत्नांत मग एक वेळ

अशी येईल की जेव्हा आपल्याला उमजेल की जोंपर्यंत आपण इंद्रियां-द्वारा बांधलेलों आहोंत तोंपर्यंत आपल्याला पूर्णत्व लाभणें अशक्य होय. आणि तेव्हा मग, आपण ज्या दिशेने चाललों आहोंत तिच्याकडे पाठ करून, उलट वळून आपण आपल्या मूळच्या अनंतावस्थेकडे मागे परत जाण्याची तुतारी फुंकूं.

ह्यालाच म्हणतात वैराग्य--त्याग. आपण ज्या मायाप्रवाहांत वाहवत असून धारेला लागलों आहोंत त्याच्या उलट पोहून आपल्याला उगम गाठावा लागेल--स्वत:च्या ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति करून घ्यावी लागेल. आणि आपण जेव्हा असें उलट वळूं तेव्हाच आपल्या जीव-नांत नीतीला आणि दयेला सुरुवात होईल. एकूणएक समस्त नीति-प्रणालींचें कोणतें एकमेव ब्रीद्रवाक्य असेल तर तें म्हणजे 'मी नाहीं, तूं' हेंच होय. आमच्या मागे जें अनंत विराजमान आहे त्याने स्वत:ला बहिर्जगतांत व्यक्त करूं जाऊन हें 'मी'चें रूप धारण केलें आहे. त्या अनंतापासूनच ह्या लहानलहान 'मी'–'तूं'ची उत्पत्ति झाली आहे. अभिव्यक्तीच्या प्रयत्नांत हें फळ उत्पन्न झालें आहे--आता ह्या 'मी'ला माघारीं परतून त्या निजस्वरूप अनंताशीं मीलित व्हावयाचें आहे. ज्या ज्या वेळीं तुम्ही 'मी नाहीं, तूं' असें म्हणत असतां त्या त्या वेळीं तुम्ही त्या अनंताकडे, स्वस्वरूपाकडे माघारीं परतण्याचा प्रयत्न करीत असतां, आणि ज्या ज्या वेळीं तुम्ही 'तूं नाहीस, मी' असें म्हणत असतां त्या त्या वेळीं तुम्ही या सान्त, इंद्रिय-गोचर जगांतच आपलें अनंत स्वरूप व्यक्त करण्याच्या भ्रामक धडपडींत एकेक चुकीचें पाऊल टाकीत असतां. यांतूनच जगांत स्पर्धा आणि अशुभ हीं उद्भवत असतात. परंतु अखेर त्यागाचा--शाश्वत त्यागाचा उदय होतोच होतो. तेव्हा मग हा क्षुद्र 'मी' कायमचा नष्ट होऊन जातो. ह्या टीचभरच्या य:कश्चित् जीवनाची इतकी मातब्बरी कशाला ? ह्या जीवनाला कवटाळून बसून त्याचा येथे वा स्वर्गाबिर्गांत आणखी कुठे उपभोग घेण्याच्या फोल वासनांनी मृत्यु ओढवत असतो.

पशूंची उन्नति होऊन जर मानव उत्पन्न झाला असेल तर मानवाची अवनति होऊन पशु उत्पन्न झाले असणेंहि शक्य आहे.

# बहुत्वांत एकत्व

( ३ नोव्हेंबर १८९६ रोजीं लंडन येथे दिलेलें व्याख्यान )

" आमचीं हीं इंद्रियें त्या स्वयंभू परमात्म्यानें बहिर्गामी स्वभावाचींच निर्माण केलीं आहेत. म्हणूनच माणसाची दृष्टि बाह्य विषयांकडेच जात असते, आंतील त्या स्वतःच्या अंतरात्म्याकडे ती कधीच वळत नाही. एखादाच विवेकी पुरुष अमृताची— त्या परमानंदाची कास धरून आपली बहिर्मुख दृष्टि मुरडून आंत बघतो आणि त्या अंतरात्म्याचा साक्षात्कार करून घेऊन धन्य होतो."* आपण बघितलेंच की, वेदांमधे सत्याचा— त्या जगत्कारणाचा शोध प्रथम बाह्य जगतामधेच केलेला आढळून येतो. नंतर मग नवीन मार्ग गवसून त्या अन्वेषणाला निराळीच दिशा लागली. त्या सत्याकांक्षी ऋषींच्या निदर्शनास आलें की बहिर्जगतांत अन्वेषण करून वस्तूंचें खरें स्वरूप जाणतां येणें शक्य नाही. त्यासाठी बहिर्गामी दृष्टि मुरडून ती आंत वळवावी लागेल—बाहेर बघावयाचें सोडून आंत बघावें लागेल. आणि ह्या ठिकाणीं आत्म्यासाठी जें विशेषण वापरलें आहे तेंहि अत्यंत सूचक, अत्यंत अर्थगर्भ आहे. या ठिकाणीं आत्म्याला म्हटलें आहे 'प्रत्यक्' आत्मा. 'प्रत्यक्' म्हणजे आंत गेलेला —आंतील. तो आपला 'प्रत्यक् आत्मा' आहे, म्हणजे तो आपली खरी सत्ता आहे, आपल्या हृदयाचें केंद्र आहे, आपल्या अस्तित्वाचा गाभा आहे. त्याच्या आंतूनच जणुकांही सर्वकांही बाहेर आलें आहे— सर्वकांही त्यापासूनच उत्पन्न झालें आहे. तो जणुकाय मध्यवर्ती सूर्य असून, आपलें मन, आपलें शरीर, आपलीं इंद्रियें, आपलें सर्वकांही त्या प्रत्यगात्मसूर्यापासून बाहेर निघणारे किरणच होत. "बालिशबुद्धीचे अज्ञानी लोक बाहेरील काम्य वस्तूंचा पाठलाग करीत असतात. त्या धावाधावींत ते सर्वत्र पसरलेल्या मृत्यूच्या जाळ्यांत अडकतात. परंतु

* कठ उपनिषद् २.१.१

अमृतत्व कशांत आहे हें उमजून विवेकी जन ती नित्य वस्तु ह्या अनित्य वस्तूंच्या फापटपसाऱ्यांत कधीच धुंडीत बसत नाहीत."* येथेहि हीच कल्पना स्पष्टपणें व्यक्त केलेली आढळते की, सान्त वस्तूंनी भरलेल्या ह्या बाह्य जगांत त्या अनंताला धुंडाळण्याचा प्रयत्न वृथा होय. अनंताचा धांडोळा अनंतांतच केला पाहिजे, आणि आमच्याठायीं जर कांही अनंत असेल तर तो म्हणजे आमच्या आंत विराजत असलेला आमचा आत्मा—आमचा अंतरात्मा—तो प्रत्यगात्माच होय. अनंत काय तो आमचा आत्माच आहे—आमचें शरीरहि अनंत नाही, आमचें मनहि अनंत नाही, आमचे विचार देखील अनंत नाहीत, आमच्या दृष्टीसमोरचा हा जगत्प्रपंचहि अनंत नाही. ह्या साऱ्यांचीच कधीतरी उत्पत्ति होत असते आणि कधी ना कधी त्यांचा अंत होत असतो. परंतु ह्या सर्वांना पाहणारा तो साक्षीस्वरूप द्रष्टा, तो मानवाचा आत्मा, तो सदाजागृत अंतःस्थ पुरुषच केवळ अनंत आहे, आणि ह्या समस्त विश्वब्रह्माण्डाचें अनंत आदिकारण शोधण्यासाठी आपल्याला त्या आपल्या अनंत अंतरात्म्यांतच डुबी घ्यावी लागेल. त्या अनंत आत्म्यांतच आपल्याला जगत्कारणाचा शोध लागेल. तो अनंत आत्माच ह्या समस्त विश्वाचें अनंत आदिकारण होय. "जो येथे (अंतरात्मा) आहे तोच तेथे (जगत्कारण) आहे, आणि जो तेथे (जगत्कारण) आहे तोच येथे (अंतरात्मा) आहे. जो ह्या जगांत नानात्व—अनेकत्व—बघतो, मृत्यु त्याचा पिच्छा कधीच सोडत नाही."† वेदांमधे प्रथम प्रथम स्वर्गलोकाला जाण्याची इच्छा कशी आढळून येते हें आपण बघितलेंच. त्या प्राचीन आर्यांना ज्या वेळीं भोवतालच्या जगाचा कंटाळा आला त्या वेळीं, जिथे केवळ सुखच सुख आहे, दुःख मुळीच नाही अशा ठिकाणीं मृत्यूनंतर जाण्याची त्यांना अगदी स्वाभाविकपणें इच्छा झाली. ह्याच जागांना त्यांनी स्वर्ग म्हटलें आहे. इंग्रजींत त्याला 'हेवन' म्हणतां येईल. तिथे आपलें शरीर अजर, अमर होऊन जाईल, आपले मनहि तसेंच होईल, आणि आपल्या पितरांसह आपण तिथे कायमचे सुखाने नांदूं अशी त्यांची अपेक्षा

* कठ उपनिषद् २.१.२

† कठ उपनिषद् २.१.१०

होती. परंतु तत्त्वचिंतनाचा उदय होतांच लोकांना ह्या स्वर्गाच्या कल्पना थिटचा आणि पोरकट वाटूं लागल्या. कोणत्याहि एखाद्या विशिष्ट स्थानीं अनंत जीवन जगतां येईल ही कल्पनाच मुळी विसंगत आहे, कारण कोणतेंहि स्थान वा कोणताहि लोक म्हटला की तो केव्हा-तरी उत्पन्न झाला असलाच पाहिजे, आणि म्हणूनच कांही काल टिकून तो कधी ना कधी नष्ट होणार हें ओघानेच आलें. म्हणून स्वर्ग कधी अंतहीन असूं शकणार नाही. अर्थातच मग तिथे अनंत जीवन जगण्याचा प्रश्नच उद्भवत नाही ! आणि म्हणून त्यांना ती स्वर्गाची कल्पना सोडून द्यावी लागली. त्यांना हळूहळू कळून आलें की, हे स्वर्गांत वास करणारे देव एक दिवस त्यांच्याचसारखे ह्या पृथ्वीवर वावरणारे मनुष्यप्राणी होते आणि स्वतःच्या कांही सत्कर्मांनी देव होऊन ते आता स्वर्गांत वास करीत आहेत, आणि इंद्र, वरुण वगैरे सारीं केवळ एकेका विशिष्ट पदाचीं वा एकेका विशिष्ट हुद्याचीं नांवें आहेत, तीं कांही कुणा अजरामर व्यक्तींचीं नांवें नाहीत.

वेदांमधे उल्लेखिलेली कोणतीच देवता अजरामर, शाश्वत व्यक्ति नाही. इंद्र म्हणा की वरुण म्हणा, हीं कांही कोणत्याहि विशिष्ट व्यक्तींचीं नांवें नव्हत. कांही विशिष्ट अधिकार असलेल्या विशिष्ट पदांचीं वा हुद्यांचीं तीं नांवें आहेत. पूर्वीचा इंद्रच कांही आताचाहि इंद्र नाही; तो पूर्वीचा इंद्र आता इंद्रपदावर नसून ह्या आपल्या पृथ्वीवरील कुणीतरी जाऊन तें पद घेतलें आहे. असेंच इतर सर्व देवांचेंहि आहे. हीं कित्येक विशिष्ट पदें असून, आपल्या सत्कर्मांनी देव होण्याला योग्य झालेलीं माणसें मृत्यूनंतर स्वर्गलोकीं जातात आणि तें तें पद प्राप्त करून इंद्र, वरुण वगैरे बनतात. त्यांच्या नंतर आणखी दुसऱ्यांची वर्णी लागते. असा क्रम सतत चालू आहे. परंतु हे देवदेखील एक ना एक दिवस मरत असतातच. तेहि मर्त्यच आहेत. तेहि खरोखर अमर नाहीत. ऋग्वेदाच्या प्राचीन भागांत देवांना उद्देशून 'अमर' शब्द वापरलेला आढळतो खरा, परंतु पुढे तो शब्द अजीबात वगळला गेला आहे. कारण त्या लोकांना कळून आलें की, एखादी भौतिक वस्तु कितीहि सूक्ष्म स्वरूपाची असली तरीदेखील, देश आणि काल यांच्या पलीकडे असलेलें खरें अमरत्व

त्या भौतिक वस्तूला लागू असणें कदापि शक्य नाही. देवांचीं शरीरें कितीहि सूक्ष्म असलीं तरी तीं देश-कालांमधेच निर्माण झालीं आहेत—तीं कधीतरी आणि कुठेतरी उत्पन्न झालीं आहेत, कारण आकार असलेल्या कोणत्याहि वस्तूच्या घडणावळीस आवश्यक असलेले सर्व घटक 'देशा'मधे वा अवकाशामधेच अवस्थित असतात. 'देशा'खेरीज वा अवकाशाखेरीज (म्हणजेच विशिष्ट जागेखेरीज) आपण कोणताहि आकार डोळ्यासमोर आणूं शकणार नाहीं. कोणत्याहि विशिष्ट जागेंत नाही अशा एखाद्या आकारयुक्त वस्तूची कल्पना करून बघा. ती करतां येणें असंभाव्य आहे. 'देश' किंवा अवकाश जणुकांही आकारयुक्त वस्तूंच्या उपादानांपैकी वा घटकद्रव्यांपैकीच एक आहे. आणि आकार हा सतत बदलत असतो. देश आणि काल हे मायान्तर्गत आहेत. आणि स्वर्ग देखील ह्या पृथ्वीप्रमाणेच देश-कालांनी मर्यादित आहे हें सत्य उपनिषदांतील पुढील ओळींत व्यक्त झालें आहे—"यदेवेह तदमुत्र यदमुत्र तदन्विह"—"जें इथे आहे तेंच तिथे आहे, आणि जें तिथे आहे तेंच इथे आहे." हे इंद्र-वरुणादि देव जर अस्तित्वांत असतीलच तर येथे आपल्या ह्या पृथ्वीवर जे नियम आहेत ते तेथे त्यांनाहि लागू असलेच पाहिजेत, ते देवहि ह्याच साऱ्या नियमांनी बद्ध असले पाहिजेत. आणि ह्या सगळ्या नियमांचा निष्कर्ष आहे—नाश पावणें आणि फिरफिरून नव्याने उत्पन्न होणें. ह्या नियमांच्या प्रभावाने समस्त जडद्रव्य निरनिराळीं रूपें धारण करीत आहे आणि तीं रूपें अखेर भग्न होऊन फिरून जडद्रव्यांत परिणाम पावत आहेत. जी जी वस्तु उत्पन्न झाली आहे तिचा तिचा विनाश हा होणारच, आणि म्हणून स्वर्ग जर असेलच तर त्यालाहि हा नियम लागू असलाच पाहिजे.

या जगांत आपल्याला दिसून येतें की प्रत्येक सुखाच्या मागोमाग, त्याच्या अगदी सावलीसारखें कांही ना कांही तरी दुःख येतच असतें. जीवनाच्या मागोमाग मृत्यु त्याच्या सावलीसारखा घोटाळत असतो. ते नेहमीच एकत्र असतात, कारण ते कांही परस्परविरोधी नाहीत. त्या मुळी दोन अलग अलग सत्ताच नाहीत, एकाच वस्तूचीं तीं दोन वेगवेगळीं रूपें आहेत; ती एकच वस्तु जीवन-मरण, सुख-दुःख, चांगलें-

वाईट इत्यादि रूपांनी प्रकट होत असते. चांगलें आणि वाईट ह्या दोन अलगअलग गोष्टी आहेत आणि त्या उभयतां तशाच कायमच्या अस्तित्वांत आहेत ही कल्पना अगदी उघडउघडच वेडगळपणाची आहे. त्या दोन्ही एकाच वस्तूचीं दोन वेगळालीं रूपें आहेत—— ती एकच वस्तु कधी चांगल्या तर कधी वाईट रूपानें व्यक्त होत असते, इतकेंच. त्या दोहोंत जो फरक आहे तो प्रकाराचा मुळीच नाही, तो फरक केवळ प्रमाणाचा आहे. अभिव्यक्तीच्या कमीअधिक उत्कटतेमुळेच तीं एक-मेकांपासून निराळीं वाटत असतात. ही वस्तुस्थिति तर आपल्या परिचयाचीच आहे की, एकच ज्ञानतंतुप्रणाली चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रकारच्या संवेदना समभावाने वाहून नेत असते, आणि ज्या वेळीं त्या ज्ञानतंतूंना इजा होते त्या वेळीं चांगली किंवा वाईट कोणतीच संवेदना आपल्यापर्यंत येऊन पोहचत नाही. एखादा विशिष्ट ज्ञानतंतु जर पक्षाघाताने बधिर झाला तर तद्द्वारा येणारी सुखदायक संवेदना आपल्याला लाभत नाही, आणि त्याचबरोबर दुःखदायक संवेदनाहि तद्द्वारा आपल्याला प्राप्त होऊं शकत नाही. सुख आणि दुःख मुळी दोन नाहीतच, तीं दोन्ही वस्तुतः एकच आहेत. तीं नेहमी एकत्रच असतात. परत, आपण हेंहि अनुभवलें आहे की एकच वस्तु आपल्या जीवनांत निरनिराळ्या वेळीं कधी सुख तर कधी दुःख निर्माण करीत असते. एकच वस्तु, एकच घटना एकाजणाला सुख देईल तर दुस-ऱ्याला दुःख देणारी ठरेल. मांस खाण्याने तें खाणाऱ्या इसमाला सुख होईल, परंतु ज्याचें मांस खाल्लें जाणार त्या प्राण्याला अर्थातच भयं-कर वेदना होतील. सगळ्यांना समभावाने सुख देईल असें कांहीच असणें शक्य नाही. कांहीजण सुखी होत असतात तर कांहीजण दुःखी. आणि हें असेंच चालावयाचें. म्हणून सुख आणि दुःख, चांगलें आणि वाईट इत्यादिकांत असा मूलभूत, प्रकारगत भेद आहे, असें द्वैत आहे असें कदापि म्हणतां यावयाचें नाही. यावरून काय निष्कर्ष निघतो ? मीं मागच्या एका व्याख्यानांत तुम्हांला सांगितल्याप्रमाणे, यावरून हाच निष्कर्ष निघतो की, आपल्या ह्या जगांत अशी अवस्था कधीच अस्तित्वांत येणें शक्य नाही की ज्या वेळीं अखेर सर्वकांही चांगलें होऊन जाईल आणि वाइटाचा मागमूसहि राहणार नाही. माझ्या ह्या विधानाने

पुष्कळांची बऱ्याच दिवसांची आशा भग्न झाली असेल, कित्येकांना भीतिहि वाटली असेल. पण त्याला उपाय नाही. ही वस्तुस्थिति आहे आणि ती नाकबूल करण्यांत कांही अर्थ नाही. हें असें नाही असें जर मला कुणी पटवून देऊं इच्छीत असेल तर त्याचें म्हणणें समजून घ्यावयाला मी अर्थातच तयार आहें, परंतु जोंवर तें मला कळत नाही आणि पटत नाही तोंवर मी त्याला कशी बरें मान डोलवूं ?

माझ्या ह्या विधानाविरुद्ध पुढे केला जाणारा आणि वरवर पाहतां अतिशय पटणारा असा एक सर्वसामान्य मुद्दा हा की, आपल्या भोवताली जें कांही अशुभ किंवा वाईट दिसतें आहे तें क्रमविकासाच्या ओघांत हळूहळू नाहीसें होत आहे, आणि ह्याचा परिणाम असा होणार आहे की, हा क्रमविकास असाच लक्षावधि वर्षें चालल्यानंतर अशी एक वेळ येईल की ज्या वेळीं सगळ्या अशुभाचा आणि सगळ्या वाइटाचा नायनाट होऊन जाईल आणि केवळ शुभ आणि चांगलेंच शिल्लक उरेल. वरवर पाहतां हा मुद्दा मोठा भरीव आणि बळकट वाटतो खरा. आणि देवाच्या दयेनें वस्तुस्थिति खरोखरच तशी असती तर फार फार चांगलें झालें असतें ! परंतु हा मुद्दा म्हणजे एक चुकीचा युक्तिवाद आहे. त्यांतील चूक हीच की, ह्या जगांत चांगल्या गोष्टी आणि वाईट गोष्टी ह्या दोन्ही एका कायमच्या ठरलेल्या प्रमाणांत अस्तित्वांत आहेत असें त्यांत गृहीत धरलें गेलें आहे. त्यांत असें गृहीत धरलें गेलें आहे की, ह्या जगांत वाईट हें एका ठराविक प्रमाणांत आहे. म्हणजे समजा की वाइटाची संख्या एकूण १०० ही आहे. ह्याच-प्रमाणे चांगल्याचीहि एकूण संख्या ठरलेली आहे. आणि, त्यांच्या मतें, क्रमविकासाच्या रगड्यांत ही वाइटाची संख्या दररोज एकसारखी घटत आहे; आणि म्हणून एक वेळ अशी येईल की घटतां घटतां सगळेच्या सगळें वाईट संपून जाईल आणि नुसतें चांगलेंच काय तें मागे राहील. पण वस्तुस्थिति खरोखरच अशी आहे काय ? जगाचा इतिहास हेंच दाखवितो की जगांत शुभाबरोबरच अशुभाचें प्रमाणहि सारखें वाढतच आहे ! दृष्टान्तादाखल अगदी खालच्या पातळीवरील माणसाचीच गोष्ट घ्या. तो जंगलांत राहतो, त्याचीं सुखें अगदी थोडीं असतात, आणि त्याचबरोबर त्याचीं दुःखें पण

थोडीं असतात. त्याचीं दु:खें केवळ इंद्रियांच्या पातळीवरीलच असतात--केवळ इंद्रियांमधूनच जन्म पावत असतात. त्याला जर भरपूर खायला मिळालें नाही तर तो दु:खी होतो; त्याला भरपूर खायला द्या आणि मन:पूत भटकण्याची आणि शिकार करण्याची मोकळीक द्या की तो पूर्णपणें सुखी होईल. त्याचें सुख फक्त इंद्रियांशींच निगडित असतें; तद्वतच त्याचें दु:खहि. कल्पना करा की त्या माणसाचें ज्ञान वाढलें. त्यानें काय होईल ? त्याने त्याचीं सुखें वाढतील, त्याची बुद्धि खुलेल, पूर्वी त्याला इंद्रियांनी जें सुख लाभत होतें तें आता त्याला बौद्धिक क्रियांनी लाभूं लागेल. आता त्याला एखादें सुंदर काव्य वाचण्यांत सुख वाटूं लागेल, आणि गणितांतील एखादा प्रश्न सोडविण्यांत तो देहभान विसरून जाईल. परंतु त्याचबरोबर, त्याचे ज्ञानतंतु अत्यंत सूक्ष्म झाल्याकारणें, ज्या मानसिक दु:खांची त्याला त्याच्या रानटी अवस्थेंत कल्पनाहि नव्हती तीं सारीं दु:खें आता त्याला भोगावीं लागतील, कारण त्याचे नाजुक बनलेले ज्ञानतंतु आता त्या मानसिक दु:खांच्याहि संवेदना ग्रहण करण्यास अधिकाधिक सरावतील. एक अगदी साधें उदाहरण घ्या. तिबेटमधे विवाहाची प्रथा नाही, आणि म्हणूनच तिथे प्रेमामुळे निर्माण होणारा मत्सरहि नाही, पण तरीदेखील विवाहसंस्था ही समाजाच्या कितीतरी उन्नत अवस्थेचें लक्षण होय यांतहि कांही संशय नाही. वैवाहिक जीवनांतील एकनिष्ठतेचा अद्भुत, निर्मल आनंद कसा असतो ह्याची तिबेटी लोकांना कल्पना असणें शक्य नाही; पतिव्रता, सती साध्वी पत्नी आणि एकपत्नीव्रतधारी, सद्गुणी पति यांच्यांतील विशुद्ध दांपत्यप्रेमाच्या आस्वादाला ते आचवले आहेत. तिथे विवाहप्रथाच नसल्यामुळे ह्या साऱ्याचा त्यांना अनुभव येणें शक्यच नाही. पण त्याचबरोबर हेंहि तितकेंच खरें की, एकनिष्ठ पत्नीच्या किंवा एकनिष्ठ पतीच्या वांटयाला येणाऱ्या भयंकर मत्सराचा, किंवा वैवाहिक निष्ठेची कल्पना उराशीं बाळगून असल्यामुळे, नवरा-बायकोंतील एकजण चवचाल निघाल्यास दुसऱ्याला काय पीडा होते, किती दु:ख आणि किती जळफळाट सहन करावा लागतो ह्याचाहि त्या तिबेटी लोकांना अनुभव घ्यावा लागत नाही. ह्या वैवाहिक उच्च आदर्शामुळे एकीकडे जसें

सुख लाभतें तसेंच दुसरीकडे कपाळीं दुःखहि येतें.

तुमच्या देशाचीच गोष्ट घ्या. पृथ्वीच्या पाठीवर इतका श्रीमंत, इतका विलासी दुसरा कोणता देश नाही. पण बघा, इथे दुःख किती उत्कट आहे, इतर देशांच्या मानानें इथे वेड्यांची संख्या किती जास्त आहे. आणि ह्या साऱ्याचें एकमेव कारण म्हणजे तुम्हांलोकांच्या वासना अत्यंत तीव्र, अत्यंत प्रवल आहेत. येथें प्रत्येकाला उच्च जीवनमान राखणें भागच आहे, इथला माणूस वर्षभरांत जेवढा पैसा उधळतो तेवढ्यांत भारतांत एकजण खूप धनाढ्य बनूं शकेल--- त्याला ती साऱ्या हयातभर पुरण्याइतकी संपत्ति होऊं शकेल. इथल्या लोकांना साध्या राहणीचा उपदेश देण्यांत हशील नाही, कारण येथें सभोवतालचें वातावरणच असें आहे की अमुक बाबींत अमुक इतका खर्च न करून येथें चालतच नाही. एरवी समाज त्याला फाडून खाईल. हें समाजाचें चक्र अहर्निश बेदरद फिरत आहे--- त्याला विधवांच्या अश्रूंची पर्वा नाही किंवा पोरक्या पोरांच्या किंकाळ्यांची खंत नाही. सर्वत्र हाच प्रकार आहे. भोगाच्या तुमच्या कल्पना खूप विकास पावलेल्या आहेत, तुमचा समाजहि इतर अनेकांपरीस कितीतरी सुरेख आहे. तुमच्या जीवनांत भोग्य वस्तूंचीहि खूप रेलचेल आहे. भोगाचे मुबलक उपाय तुमच्यापाशी आहेत. परंतु ज्यांच्यापाशी तुमच्यापेक्षा भोगाचीं साधनें कमी आहेत त्यांना दुःखहि तुमच्यापेक्षा कमी आहे. हें अगदी सर्वत्र, सर्वांना लागू आहे--- तुमच्या दृष्टीपुढे जितका उच्च आदर्श असेल तितकें तुमचें सुख अधिक उत्कट राहील आणि तितकेंच गाढ दुःखहि तुम्हांला भोगावें लागेल. एक जणु दुसऱ्याची छायाच आहे. ' जगांतलें अशुभ किंवा वाईट कमीकमी होत आहे हें कदाचित् खरें असेल, पण मग शुभ किंवा चांगलेंहि नाहीसें होत असलेंच पाहिजे. परंतु वस्तुतः वाईट झपाट्यानें वाढत आहे आणि चांगलें घटत आहे असेंच म्हणतां यावयाचें नाही काय ? तें कसेंहि असलें तरी एवढें मात्र खास की चांगलें किंवा शुभ जर गणितश्रेढीनें वाढत असेल तर वाईट किंवा अशुभ हें भूमितिश्रेढीनें वाढत जातें. आणि ह्याचेंच नांव माया. हा आशावादहि नाही किंवा निराशावादहि नाही. हें जग नुसत्या दुःखांनीच भरलेलें आहे असें

वेदान्त कधीच म्हणत नाही. हें म्हणणें खोटें आहे. त्याचबरोबर, तें सुखसंतोषाने परिपूर्ण आहे असें म्हणणेंहि चूक होय. म्हणून, हें जग अगदी चांगलें आहे, तो फुलांचा ताटवा आहे, तें दुधामधाने भरलेलें आहे-- थोडक्यांत म्हणजे तें सुख-सुंदरतेचें आगर आहे असें लहान मुलांना शिकविणें योग्य नव्हे. स्वतः आपण आपल्या आयुष्यभर हीं असलींच सोनेरी, रुपेरी स्वप्नें बघितलीं आहेत. परंतु तीं वस्तु-स्थितीशीं कितपत बरें जुळतात ? तरी पण एखाद्या माणसाने इतरांपेक्षा अधिक दुःख भोगलें म्हणून, डोक्यांत राख खालून, हें जग म्हणजे नुसतें दुःखांनी आणि वाइटांनीच भरलेलें आहे असेंहि म्हणणें बरोबर ठरावयाचें नाही. द्वंद्वमयता-- भल्या-बुऱ्याची, सुख-दुःखाची पाठशिवणी-- हेंच आमच्या ह्या जगाचें स्वरूप आहे. आणि वेदान्त याच्याहि पुढे जाऊन म्हणतो की, "चांगलें आणि वाईट ह्या दोन वस्तु आहेत, त्या दोन वेगवेगळ्या सत्ता आहेत असें समजूं नका. कारण तीं दोन्हीं एकच वस्तु आहेत. ती एक वस्तु भिन्नभिन्न प्रमाणांत आणि भिन्नभिन्न रूपांनी व्यक्त होऊन एकाच माणसाच्या मनांत भिन्नभिन्न भावना उत्पन्न करीत असते." म्हणून, वेदान्ताचें पहिलें काम म्हणजे, वरवर पाहतां अनेकत्वाने भरलेल्या ह्या बाह्य जगांत एकत्व कुठे आहे तें शोधून काढणें, हें होय. ह्या अभिव्यक्त वस्तूंमधे कितीहि भिन्नता भासत असली तरी ती एकच सत्ता ह्या भिन्नभिन्न वस्तूंच्या रूपांनी व्यक्त होत आहे. तुम्हांला पारशी लोकांचें तें ओबडधोबड प्राचीन मत माहीत असेलच. त्यांच्या मताने दोन देवांनी मिळून हें जग निर्माण केलें आहे. पैकी एक देव चांगला आहे-- ह्या जगांत चांगलें म्हणून जें कांही आहे तें त्या चांगल्या देवाने निर्माण केलें आहे. दुसरा देव वाईट आहे-- त्यानेच ह्या जगांतील सारें वाईट उत्पन्न केलें आहे. ह्या मतांतील वेडगळपणा अगदी उघडच आहे. कारण, आपल्या या जगाचें कार्य जर खरोखरच याप्रमाणे चालूं असतें तर मग निसर्गाच्या प्रत्येक नियमाचे दोन भाग झाले असते--एक देव येऊन त्या नियमाचा एक भाग अमलांत आणून दूर झाल्यावर लगेच दुसऱ्या देवाने येऊन त्याच नियमाचा दुसरा भाग अमलांत आणला असता ! असें असणें शक्य आहे काय ? असें खरोखर आहे काय ? शिवाय, ह्यांत आणखी

एक अडचण अशी की, हे दोन्ही देव एकाच जगांत एकाच वेळीं कार्य करीत आहेत, आणि एकमेकाशीं अगदी सलोखा ठेवून त्यांतील एक देव एका ठिकाणीं कुणाचें कल्याण करीत आहे तर दुसरा देव दुसऱ्या ठिकाणीं कुणाचें निसंतान करीत आहे ! जगांत अस्तित्वांत असलेलें द्वंद्व व्यक्त करण्याचा हा अर्थातच अत्यंत स्थूल, अगदीच ओबडधोबड प्रयत्न आहे. या बाबतींत यापेक्षा अधिक विकसित आणि अधिक सूक्ष्म मत म्हणजे 'जग हें कांही अंशीं चांगलें आणि कांही अंशीं वाईट आहे' हें होय. हें मतहि पूर्वीच्या मताइतकेंच आणि पूर्वीच्या कारणानेच वेडगळपणाचें म्हणतां येईल. वस्तुस्थिति अशी आहे की, जी शक्ति आम्हांला अन्न देत आहे तीच शक्ति अपघातांनी आणि दुर्घटनांनी आमच्यांतील अनेकांचा संहार करीत आहे. ह्या दोन्ही शक्ति वस्तुतः एकच होत.

ह्या साऱ्यावरून हेंच दिसून येतें की, ह्या जगाविषयी आपण आशावादहि बाळगूं शकत नाहीं किंवा निराशावादहि बाळगूं शकत नाहीं. ह्यांतील कित्येक घटना आशावादाला पोषक आहेत तर कित्येक निराशावादाला षोषक आहेत. तें आशावाद आणि निराशावाद या दोहोंचेंहि मिश्रण आहे. आणि हळूहळू आपल्याला आढळून येईल की, वेदान्त सगळा दोष प्रकृतीच्या खांद्यावरून उचलून आमच्या स्वतःच्या खांद्यावर ठेवून देतो. दोषांची जबाबदारी वेदान्त प्रकृतीवर लोटीत नाही, त्यांसाठी तो तुम्हांआम्हांलाच जबाबदार धरतो. पण त्याबरोबरच ह्यांतून बाहेर पडण्याचा उपायहि वेदान्त आम्हांला दाखवून देतो. मात्र 'जगांत वाईट किंवा अमंगल नाहीच' असें वेदान्त कधीच म्हणत नाही. वस्तुस्थिति जशी आहे तशी ती स्वीकारून वेदान्त तिचें विश्लेषण करतो, तो कोणतीहि गोष्ट डोळ्याआड करीत नाही, कोणतीहि गोष्ट झाकून टाकण्याचा प्रयत्न करीत नाही. वेदान्त आपल्याला हताश करीत नाही, वेदान्त आपल्याला अज्ञेयवादीहि बनवीत नाही. जगांतील सुख-दुःखांना तोंड देण्याचा, त्यांच्या कचाट्यांतून सुटण्याचा उपाय वेदान्त आपल्याला सांगतो. आणि तो उपाय वज्रासारख्या सुदृढ पायावर आधारलेला आहे, कसल्या तरी ठिसूळ, भुसभुशीत पायावर आधारलेला उपाय वेदान्त

आपल्याला मुळीच सांगत नाही. कारण तसें करणें म्हणजे एखाद्य लहान पोराचें तोंड कसेंतरी बंद करणें होय, कांहीतरी खोटेंनाटें सांगू त्या पोराच्या डोळ्यांत धूळ फेकणें होय. आज ना उद्या हें त्या पोराल उमजून आल्याखेरीज राहावयाचें नाही. वेदान्त आमच्याशीं अ कधीच वागूं इच्छीत नाही, तो आपल्याला सांगत असलेला उपा असल्या प्रकारचा मुळीच नाही. मी तरुण असतांनाची एक घटन मला येथे आठवते. कुणा एका तरुणाचे वडील वारले. तो तरु अगदीच उघडा पडला. त्यांतच परत एका खूप मोठ्या कुटुंबाचा भा त्याच्यावर पडला. त्याच्या वडिलांचे मित्र आता त्याला मदत क ण्यास कांकूं करूं लागले, फार काय पण त्यांतील कित्येकजण तर सं साधून त्याच्यावरच उलटले. एक दिवस एका धर्माचार्याची भे होऊन तो तरुण त्याला आपल्या दुःखांची कहाणी सांगूं लागला. ऐकून त्याचें सांत्वन करण्याच्या उद्देशाने तो धर्मगुरु त्या तरुणाल म्हणाला--"जें कांही होत आहे तें चांगलेंच आहे. बघ, जें कां घडतें तें आपल्या भल्यासाठीच घडत असतें." जुनी जखम सोने कापडाने झाकून ठेवण्याच्या प्रयत्नासारखाच हा सांत्वनाचा सनात प्रकार आहे. हें आमच्या दुबळेपणाचें आणि खुळचटपणाचेंच लक्ष म्हणावयाचें. असो तर, वरील घटनेला सहा महिने लोटल्यानंतर त धर्माचार्याला मुलगा झाला. त्याच्या बारशाच्या दिवशीं त्या धर्मगु मेजवानी दिली. त्या प्रसंगीं त्या तरुणालाहि निमंत्रण दिलें गे पूजेच्या वेळीं त्या धर्माचार्याने प्रार्थना केली-- "भगवंता, तु करुणा अपार आहे. धन्य तुझी." तें ऐकून तो तरुण एकदम उठ आणि म्हणाला--"करुणा ? करुणा कसली ? हा तर परमेश्व शाप आहे. हें तर तुमच्यावर भयंकर दुःख कोसळलें आहे." तें ऐ चकित होऊन त्या धर्माचार्याने त्या तरुणाला विचारलें--"तें काय ?" त्यावर त्या तरुणाने उत्तर दिलें--"ज्या वेळीं माझे व वारले त्या वेळीं तुम्ही म्हणालां होतां की ती घटना वरवर वाईट अस तरी खरोखर पाहतां चांगली होती. मग आता, तुम्हांला मुलगा झ ही गोष्ट वरवर पाहतां चांगली, परंतु वस्तुतः वाईट आहे असें म्हणूं नये ?" याप्रमाणे दुःखाकडे डोळेझाक करणें हा काय

निवारण्याचा उपाय झाला ? स्वतः भले व्हा आणि जे दुःखांत आहेत त्यांना दया दाखवा. ठिगळें जोडीत बसण्याच्या फंदांत पडूं नका, त्याने हें जग सुधरायचें नाही. हा भवरोग कशानेहि बरा होणार नाही, ह्या जगाच्या पलीकडे जाणें हाच खरोखर त्यावर एकमेव उपाय आहे.

हें जग भल्याचें आणि बुऱ्याचें मिश्रण आहे. जिथे जिथे चांगलें आहे, तिथे तिथे त्याच्या पाठीशीं वाईट उभे आहे हें निश्चित जाणून असा. चांगल्याच्या मागेमागे वाईट येत असतें. परंतु ह्या समस्त अभिव्यक्तींच्या, ह्या सर्व विरोधांच्या पाठीमागे, त्यांच्या पलीकडे वेदान्ताला तें एकत्व आढळून येतें. वेदान्त म्हणतो--"वाइटाचा त्याग करा, आणि चांगल्याचाहि त्याग करा." मग शिल्लक काय राहिलें ? वेदान्त म्हणतो की, केवळ चांगलें आणि वाईटच अस्तित्वांत आहे असें नव्हे. ह्या चांगल्याच्या आणि वाइटाच्या मागे असें कांही-तरी आहे की जें खरोखर तुमचें आहे, जें 'खरें तुम्ही' आहां--तें सर्व-प्रकारच्या वाइटाच्या आणि सर्वप्रकारच्या चांगल्याच्याहि अतीत आहे, आणि तेंच ह्या चांगल्याच्या आणि वाइटाच्या रूपांनी अभिव्यक्त होत आहे. आधी तें जाणून घ्या, आणि तेव्हाच कुठे तुम्ही खरेखुरे आशावादी होऊं शकाल, त्यापूर्वी नाही; कारण तेव्हाच तुम्ही साऱ्यावर जय मिळवूं शकाल. ह्या वरवर खऱ्या भासणाऱ्या अभिव्यक्तींवर अशा रीतीने जय मिळवा, त्यांना स्वतःच्या अधीन ठेवा, म्हणजे मग तुम्ही स्वतःचें तें खरें स्वरूप स्वच्छंदाने प्रकट करूं शकाल--तुमच्यांतील तो 'खरा तुम्ही' सुखेनैव प्रकट होऊं शकेल. प्रथम स्वतः स्वतःचे मालक बना. उठा आणि स्वतःची सुटका करून घ्या. मुक्त व्हा. ह्या साऱ्या नियमांच्या कक्षेपलीकडे निघून जा, कारण ह्या नियमांची तुमच्यावर कांही अनिर्बंध सत्ता नाही, ते तुमच्या खऱ्या स्वरूपाचा केवळ एक अंश आहेत. आधी हें जाणून घ्या की, तुम्ही प्रकृतीचे दास नाही--कधी नव्हतां आणि कधी होणार नाही; आणि ही प्रकृति तुम्हांला अनंत वाटत असली तरी ती वस्तुतः सान्तच आहे, ती समु-द्रांतील एका बिंदूप्रमाणे आहे, आणि तुम्हीच तो समुद्र आहां, तुमचा आत्माच तो समुद्र आहे; तुम्ही चंद्र-सूर्य-तारांच्या पलीकडचे आहांत. तुमच्या अनंत स्वरूपाच्या तुलनेने चंद्रसूर्यादि नुसते बुडबुडेच आहेत.

हें जाणा, म्हणजे मग तुम्ही चांगलें आणि वाईट या उभयतांवर जय मिळवाल. तेव्हाच सारा देखावा बदलून जाईल आणि उभे ठाकून तुम्ही म्हणूं शकाल--"अहाहा, या जगांतील शुभ किती सुंदर आहे आणि अशुभ किती अद्‌भुत आहे !"

वेदान्ताची शिकवण ही अशी आहे. सोनेरी कपडयाने जखमा झाकून ठेवणें आणि जसजशा त्या जखमा जास्त जास्त चिघळतील तसतशा त्या आणखी आणखी सोनेरी कापडाने झाकीत जाणें, असल्या प्रकारचा वेडगळ उपाय वेदान्त कधीच सुचवीत नाही. जीवन ही एक अति कठोर वस्तुस्थिति आहे; तें अगदी वज्रासारखें दुर्भेद्य असलें तरी त्यांतून धैर्याने मार्ग काढा; तें कितीहि दुर्भेद्य असलें तरी आत्मा त्यापेक्षा अधिक शक्तिमान आहे. तुमच्या कर्मफलांची जबावदारी वेदान्त लहानसहान देव-देवतांवर लोटीत नाही; वेदान्त घोषणा करतो की त्या साऱ्यासाठी तुमचे तुम्हीच जबाबदार आहांत, स्वतःच्या भाग्याचें तुम्ही स्वतःच विधाते आहांत. स्वतःच्या भल्या-बुऱ्या कर्मांचेच बरे-वाईट परिणाम तुम्ही भोगत असतां, स्वतःच स्वतःच्या डोळयांपुढे हात धरून तुम्ही 'अंधार' 'अंधार' म्हणून ओरडत असतां. हात दूर करा--प्रकाशच प्रकाश दिसेल; तुम्ही ज्योतिःस्वरूप आहांत, तुम्ही आधीचेच-- अगदी मूळचेच पूर्ण आहांत. "जो ह्या जगांत अनेकत्व बघतो, विभिन्नता बघतो त्याला मृत्यु पुनःपुनः गाठतो"-- या श्रुतिवचनाचा अर्थ आपल्या आता ध्यानांत येईल.

ह्या सत्याचा साक्षात्कार आपण कसा काय करून घ्यावयाचा? आपलें हें मन-- हें इतकें भ्रांतिग्रस्त, इतकें दुबळें, इतकें ओढाळ, इतक्या सहजासहजी वाहवणारें आपलें हेंच मन देखील सबल होऊं शकून त्याला त्या ज्ञानाचा, मृत्युपरंपरेंतून सोडविणाऱ्या त्या एकत्वाचा आस्वाद लाभूं शकतो. डोंगरमाथ्यावर वर्षणाऱ्या पावसाचें पाणी ज्याप्रमाणे निरनिराळे ओहोळ बनून त्या डोंगरांच्या कडांनी वाहत असतें त्याचप्रमाणे ह्या जगांत आढळून येणाऱ्या शक्ति त्या एकाच सत्तेपासून उद्‌भूत झाल्या आहेत. ती एकच सत्ता मायेंत पडून अनेक झाली आहे. ह्या अनेकांच्या, ह्या बहुत्वाच्या मागे धावूं नका, त्या 'एका'कडे जा. "जें कांही गतिमान आहे, जें कांही पवित्र आहे त्यांत त्याचा--

त्या एकमेवाद्वितीय आत्म्याचा वास आहे. आकाशांतला सूर्य, अंतरिक्षांतला वायु, वेदीवरचा अग्नि आणि कलशांतला सोमरस तोच आहे. तो या विश्वब्रह्माण्डांत ओतप्रोत भरून आहे. तोच यज्ञांतली देवता आहे. घरांतला अतिथि आहे. जलीं-स्थलीं, काष्ठीं-पाषाणीं सर्वत्र तोच आहे. तोच माणूस आहे, तोच पशु आहे. तो सत्य आहे. तो महान् आहे."* "ज्याप्रमाणे एकच अग्नि ह्या लोकीं प्रवेश करून दाह्यवस्तूच्या आकारानुसार निरनिराळ्या रूपांनी प्रकट होत असतो, त्याचप्रमाणे तो सर्वभूतांचा एकमेव अंतरात्मा उपाधीनुसार नाना रूपांनी प्रकट होत आहे, आणि त्याचबरोबर तो ह्या सर्व रूपांच्या बाहेरहि आहे. ज्याप्रमाणे एकच वायु ह्या जगांत प्रवेश करून नाना रूपांनी व्यक्त होत असतो, त्याचप्रमाणे हा सर्वभूतांचा एकमेव अंतरात्मा भिन्नभिन्न उपाधींनुसार नाना रूपांनी प्रकटत आहे, आणि त्याचबरोबर ह्या समस्त रूपांच्या बाहेरहि आहे."† ज्या वेळीं तुम्हांला त्या एकत्वाचा साक्षात्कार होईल त्याच वेळीं तुम्हांला ह्या सत्याचा, ह्या दिव्य अवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव येईल, त्यापूर्वी नाही. त्याच वेळीं तुम्ही बावनकशी आशावादी होऊन जाल, कारण मग तुम्हांला आंत-बाहेर सर्वत्र तो एकमेवाद्वितीय आनंदघन आत्माच विलसतांना दिसूं लागेल. यावर असा प्रश्न उद्भवतो की तो शुद्ध, अनंत आत्मा सर्वांठायीं वसत आहे हें जर खरें असेल तर त्याला या शरीरांमधे सुख-दुःखांचा भोग घ्यावा लागतो, तो कष्टी होतो, तो अपवित्र होतो हें कसें ? या प्रश्नाला उपनिषदाचें असें असंदिग्ध उत्तर आहे की, तो सुख-दुःख मुळीच भोगत नाही, तो मुळीच कष्टी होत नाही, तो मुळीच अपवित्र होत नाही. "आपण सूर्याच्या प्रकाशांत जगांतील निरनिराळ्या वस्तु बघत असतों. या अर्थाने सूर्य आपल्या सगळ्यांच्या दृष्टीचें कारण आहे. पण म्हणून, बाहेरील वाईट-साईट वस्तूंच्या संपर्कांत येऊन आपली दृष्टि अपवित्र झाली तरी तो आपल्या दृष्टींतला दोष कांही सूर्याला लागत नाही. त्याचप्रमाणे तो एकमेवाद्वितीय, सर्वभूतांचा अंतरात्मा जगाच्या संपर्काने निर्माण होणाऱ्या दुःखांनी

† कठ उपनिषद् २.२.२

† कठ उपनिषद् २.२.९-१०

कदापि लिप्त होत नाही, कारण तो स्वरूपतः जगताच्या अतीत आहे." मला कावीळ होऊन सारेंकांही पिवळें दिसूं लागलें तरी त्याने सूर्यावर काय परिणाम होणार ? त्याने सूर्याचें कांहीच व्हावयाचें नाही. "तो एकमेवाद्वितीय आहे, सर्वांचा निर्माता आणि नियंता आहे, सर्व भूतांचा अंतरात्मा आहे. स्वतःचें एकत्व तो अनेक रूपांनी व्यक्त करीत असतो. जे विवेकी जन त्याचा स्वतःच्या अंतरात्म्यांत साक्षात्कार करून घेतात त्यांनाच शाश्वत सुख लाभतें, इतर कुणालाहि नाही, इतर कुणालाच नाही. ह्या क्षणभंगुर जगांत तोच एक चिरंतन आहे, ह्या मृत्युभरल्या जगांत तोच एक जीवन आहे. समस्त सचेतनांचें चैतन्य तोच आहे. तोच ह्या अनेकांतील एकत्व आहे. तो एकटाच सर्वांच्या मनःकामना पुरवीत असतो. जे विवेकी लोक त्याचा स्वतःच्या अंतर्यामीं साक्षात्कार करून घेतात त्यांनाच शाश्वत शांति लाभत असते, इतर कुणालाहि नाही, इतर कुणालासुद्धा नाही." † बाह्य जगतांत त्याला कुठे शोधावयाचें ? तो चंद्रांत सापडणार आहे, की सूर्यांत, की ताऱ्यांमधे ? कुठेच नाही ! "तिथे सूर्य प्रकाशत नाही, चंद्र-तारा प्रकाशत नाहीत, विद्युत् प्रकाशत नाही, मग ह्या अग्नीचा काय पाड ? त्याच्याच—त्या स्वयंप्रकाशाच्याच प्रकाशाने हीं सारीं प्रकाशमान आहेत. ह्या साऱ्यांमधून तोच प्रकाशत आहे." ‡ हा आणखी एक सुंदर दृष्टान्त आहे. तुमच्यापैकी जे लोक भारतांत जाऊन आले आहेत आणि ज्यांनी तेथील वडाची ती विचित्र वाढ पाहिली आहे त्यांनाच हा दृष्टान्त कळूं शकेल. एका वडाच्या पारंब्या जमिनींत घुसून दुसरें वडाचें झाड निपजतें, त्यांतून त्याचप्रमाणे तिसरें, याप्रमाणे एकाच मुळांतून निघालेला वटवृक्ष सारें आसमंत भरून टाकतो. तो परमात्माच हा संसाररूपी वटवृक्ष आहे. तो ह्या अवघ्या वृक्षविस्ताराचें मूळ असून त्याच्या शाखाप्रशाखांनी फैलून तोच हें समस्त विश्व बनला आहे; आणि याप्रमाणे त्या संसारवटवृक्षाचा केवढाहि प्रचंड विस्तार झाला असला तरी सर्व बुंध्या-फांद्यांचा संबंध

* कठ उपनिषद् २. २. ११.

† कठ उपनिषद् २. २. १२-१३.

‡ कठ उपनिषद् २. २. १५.

अतूट आहे--आपलें हें जग, स्वर्ग-मृत्यु-पाताळ, अनंत कोटी विश्वब्रह्माण्डें सारीं त्या परब्रह्मांतच अवस्थित आहेत, कांहीच त्याच्या बाहेर अस्तित्वांत नाही. त्याची सत्ता कोणीच ओलांडूं शकत नाही.

वेदांच्या ब्राह्मण नामक भागांत निरनिराळ्या स्वर्गाविषयी सांगितलें आहे. परंतु उपनिषदांतील तत्त्वज्ञानाची आपल्याला अशी शिकवण आहे की आपण ह्या स्वर्गांत जाण्याच्या वासनेचा त्याग करायला हवा. सुख ह्या किंवा त्या स्वर्गांत नाही, तें आहे आत्म्यांतच; जागेवर कांहीच अवलंबून नाही. ब्रह्मसाक्षात्काराच्या भिन्नभिन्न पायऱ्या आहेत हें दाखविणारा एक मंत्र आपल्याला ह्या कठ उपनिषदांत आढळतो. तो असा की-- "स्वप्नामधे वस्तु जश दिसतात तसें पितृलोकांत ब्रह्माचें दर्शन होतें." स्वप्नांत ज्याप्रमाणे वस्तु आपल्याला अंधुक दिसतात, सुस्पष्टपणें दिसत नाहीत, त्याचप्रमाणे ब्रह्महि पितृलोकांत दिसत असतें. गंधर्व नांवाचा आणखी एक स्वर्गलोक आहे, तिथे ब्रह्माचें दर्शन आणखीच अस्पष्ट होत असतें; माणसाला पाण्यांत स्वतःची पडछाया जशी दिसते तसें ब्रह्म गंधर्वलोकांत दिसत असतें. हिंदूंच्या मतें सर्वांत श्रेष्ठ स्वर्ग म्हणजे ब्रह्मलोक होय. ह्या ब्रह्मलोकांत ब्रह्मदर्शन बऱ्याच स्पष्टपणें होत असतें. ज्याप्रमाणे अंधार आणि उजेड एकमेकांपासून वेगळे दिसतात त्याप्रमाणे तिथे ब्रह्म आणि जगत् हीं स्पष्टपणें वेगवेगळीं प्रतीत होत असतात. परंतु हेंहि कांही संपूर्ण अनावृत ब्रह्मदर्शन नव्हे. परंतु, माणसाला ज्याप्रमाणे आरशांत स्वतःचें मुख जसेंच्या तसें, स्पष्टपणें आणि स्वच्छपणें दिसत असतें त्याचप्रमाणे ह्या सत्याचें-- परब्रह्माचें अंतरात्म्यांत उज्ज्वल दर्शन घडत असतें.† म्हणून, वेदान्त म्हणतो की सर्वोच्च स्वर्ग हा आपल्या अंतरात्म्यांतच आहे, आपला आत्माच सर्वश्रेष्ठ स्वर्गलोक होय. वेदान्ताच्या मताने मानवात्माच पूजेसाठी योग्य असें सर्वश्रेष्ठ मंदिर होय, तो सर्वप्रकारच्या स्वर्गांहून श्रेष्ठ आहे, कारण ह्याच जीवनांत स्वतःच्या ह्या आत्म्यामधे आपल्याला सत्याचा जसा स्पष्ट आणि स्वच्छ साक्षात्कार होऊं शकतो तसा आणखी कुठेहि, कोणत्याहि स्वर्गांत होऊं शकत नाही. एक जागा सोडून दुसऱ्या जागीं गेल्यानेच

† कठ उपनिषद् २.३.५

आत्मसाक्षात्काराच्या दृष्टीने कांही विशेष मदत होते असें मुळीच नाही. भारतांत असतांना मला असें वाटे की गुहेंत जाऊन राहिल्याने मला ब्रह्मानुभूति खूप स्पष्टपणें होईल. परंतु वस्तुस्थिति तशी नसल्याचें मला अखेर आढळून आलें. मग मला वाटूं लागलें की कदाचित् वनांत जाऊन राहिल्याने तें साधेल. त्यानंतर मला काशीला जावेसें वाटूं लागलें. परंतु कुठेहि जा, सगळ्या जागा सारख्याच असल्याचें आढळून येईल, सगळीकडे सारख्याच अडचणी भासूं लागतील, कारण आपणच आपलें जग निर्माण करीत असतों. मी जर वाईट असेन तर सगळें जगच मला वाईट दिसूं लागेल. कठ उपनिषद् वरील मंत्रांत हेंच सत्य आपल्याला सांगत आहे. आणि हा नियम स्वर्गलोकांना—कोणत्याहि लोकाला लागू आहे. मी जर मरून स्वर्गांत गेलों तर तिथेहि मला इथल्यासारखेंच आढळून येईल, कारण जोंवर मी पवित्र होत नाहीं तोंवर गुहेंत म्हणा, की जंगलांत म्हणा, की काशीला म्हणा, की स्वर्गांत म्हणा—कुठेच जाऊन कांही विशेष फायदा व्हायचा नाही. आणि मीं जर माझ्या मनाचा आरसा घासूनपुसून चक्क केला असेल तर मग मी कुठे राहतों यावर कांहीच अवलंबून असणार नाही. मग मी जेथे राहीन तेथेच मला त्या सत्याचें जसेंच्या तसें दर्शन घडेल—पूर्ण ब्रह्मानुभूति येत राहील. म्हणून जी शक्ति वस्तुतः केवळ स्वतःच्या मनाचा आरसा स्वच्छ करण्याकडेच लावायला हवी तिचा, इथून तिथे धांवपळ करून अपव्यय करण्यांत कांही अर्थ नाही. हेंच सत्य कठोपनिषद् पुढील मंत्रांत सांगत आहे— "त्याला कुणीच पाहूं शकत नाही, कुणाच्याच डोळ्यांना त्याचें रूप दिसणें शक्य नाही. मनाने—शुद्ध मनानेच त्याचा प्रत्यय येऊं शकतो, शुद्ध अंतःकरणांतच तो प्रकट होतो. जे त्याला अशा रीतीने जाणतात ते अमर होतात."†

उन्हाळ्यांत मीं दिलेलीं राजयोगावरचीं व्याख्यानें तुमच्यापैकी ज्यांनी ऐकलीं आहेत त्यांच्या एव्हाना हें लक्षांत आलेंच असेल की त्या वेळीं सांगितलेला तो योग ह्या ज्ञानयोगाहून वेगळ्या प्रकारचा होता. सध्या आपण ज्या योगाची चर्चा करीत आहोंत त्या योगाचें मुख्य कार्य

---

† कठ उपनिषद् २·३·९

म्हणजे इंद्रियांचा संयम हें होय. कठोपनिषदांत ज्ञानयोगाचें लक्षण व स्वरूप सांगतांना म्हटलें आहे की, "पांचहि इंद्रियें उपशम पावून मन शांत होणें, आणि अंतःकरण मग फिरून कधी क्षुब्ध न होणें हीच योगाची परिपक्व अवस्था होय."† ज्या वेळीं इंद्रियें मानवात्म्याचीं गुलाम बनून जातात, ज्या वेळीं तीं मग त्याचें मन आणखी क्षुब्ध करूं शकत नाहीत त्याच वेळीं योग्यानें आपलें लक्ष्य गाठलें असें म्हणतां येतें. "ज्या वेळीं अंतःकरणांत सळसळणाऱ्या साऱ्या असार वासनांचा त्याग होऊन जातो त्या वेळीं हा मर्त्य जीव अमर होऊन जातो; ह्याच लोकांत आणि ह्याच जीवनांत तो परमेश्वराशीं–त्या सत्यस्वरूप परब्रह्माशीं एक होऊन जातो. ज्या वेळीं हृदयाच्या सर्व गाठी तुटतात त्या वेळीं हाच मर्त्य जीव अमर होऊन जातो आणि ह्या इथेच––ह्याच जीवनांत ब्रह्मानंद उपभोगतो."‡ येथेच, ह्या इहलोकीं, ह्या पृथ्वीवरच, ह्याच जीवनांत त्याला ब्रह्मानंद लाभतो, त्यासाठी त्याला आणखी कुठे, स्वर्गांत व अन्य लोकीं जावें लागत नाही. हीच वेदान्ताची शिकवण आहे."‡

ह्या संदर्भांत चारदोन शब्द बोलल्यास अप्रासंगिक होणार नाही असें वाटतें. सर्वसाधारणपणें तुमच्या असेंच ऐकण्यांत येईल की, हा वेदान्त, आणि वेदान्तच नव्हे तर भारतांतील इतरहि सर्व दर्शनें आपल्या ह्या जगापलीकडील कशावरतरी दृष्टि खिळवून असतात, ह्या जीवनांतील आनंद आणि संघर्ष टाळायला सांगून तीं आपल्याला ह्या जगाच्या बाहेर जाण्याचा उपदेश देत असतात. परंतु असें म्हणणें सपशेल चूक आहे. भारतीय विचारधारेविषयी ज्यांना कांही माहीत नाही आणि तिचें खरें मर्म समजण्याची ज्यांना अक्कल नाही असले अडाणी लोकच असें कांहीच्याबाही बरळतांना तुम्हांला आढळतील. परंतु आमच्या शास्त्रांचें नीट अनुशीलन केल्यास हें निदर्शनास येतें की, आमच्या ऋषींना स्वर्गांत वा अन्यत्र कुठेहि जाण्याची मुळीच आस नाही, उलट 'थोडा वेळ मजा करण्याची आणि मग मरून जाण्याची जागा' असें म्हणून ते क्षणभंगुर स्वर्गाबिर्गाचा अधिक्षेप

† कठ उपनिषद् २·३·१०

‡ कठ उपनिषद् २·३·१४–१५

आणि उपहासच करतांना आढळतात. वर शेवटीं उद्‌धृत केलेल्या कठोपनिषदांतील दोन मंत्रांवरूनहि माझ्या म्हणण्याची सत्यता तुम्हांला सहज पटण्यासारखी आहे. जोंवर आपण दुर्बळ आहोंत तोंवर आपल्याला ह्या स्वर्ग-नरकादिकांतून——ह्या साऱ्या अनुभवांमधून जावेंच लागेल. परंतु खरोखर सत्य जर कांही असेल तर तो म्हणजे आत्माच होय, आणि तो आपल्या आंतच विद्यमान आहे, त्याच्यासाठी स्वर्गांत वा इतर कोणत्या लोकांत जावें लागत नाही. आमच्या शास्त्रांत ह्याचबरोबर असेंहि ठासून सांगण्यांत आलें आहे की आत्महत्या करून आपण ह्या जन्म-मृत्यूंच्या कचाटयांतून सुटूं शकणार नाहीं. जन्म-मृत्यु टाळण्याचा तो कांही उपाय नव्हे. जन्म-मृत्यूंच्या तावडींतून सुटण्याचा, ह्या भवबंधनांतून सुटण्याचा खराखरा मार्ग सापडणें अर्थातच फार फार कठीण आहे. आम्ही हिंदु अगदी तुम्हां पाश्चात्त्यांइतकेच व्यवहार्य आहोंत, फक्त जीवनाकडे बघण्याचा आमचा दृष्टिकोन तुमच्याहून वेगळा आहे, इतकेंच काय तें. पाश्चात्त्य म्हणत असतो——राहायला छानदार घर, ल्यायला चांगले कपडेलत्ते, खायला सुग्रास अन्न, बुद्धीला ज्ञान-विज्ञानाचा खुराक—— बस्, हें सारें असलें म्हणजे झालें, कारण जीवन म्हणजे यापेक्षा आणखी तें काय ? आणि हें सारें साधण्यांत पाश्चात्त्य लोक कमालीचे व्यवहारपटु असतात. परंतु हिंदु म्हणत असतो की जगाचें खरें ज्ञान म्हंणजे आत्मज्ञान——तेंच जगाचें खरेखुरें ज्ञान आहे. हिंदुलोक ह्याच जीवनांत तो आत्मानंद चाखूं इच्छीत असतात. ह्या तुमच्या अमेरिकेंत एक नांवाजलेला अज्ञेयवादी माझ्या पाहण्यांत आला. तो खूप मोठ्या मनाचा, अति सज्जन आणि अत्यंत सुंदर वक्ता आहे. त्याने एकदा धर्मावर व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानांत तो म्हणाला की धर्म ही एक कुचकामाची वस्तु आहे, परलोकाविषयी विचार करून आपण आपला मेंदू शिणविण्याची अर्थाअर्थी कांही गरज नाही, वगैरे वगैरे. विषयाचें प्रतिपादन करतांना त्याने पुढील दृष्टान्त दिला: आपल्याजवळ एक संत्रें आहे, आणि आपल्याला त्यांतील सगळा रस पिळून घ्यावयाचा आहे. ह्या दृष्टान्तांतील संत्रें म्हणजे आपलें हें जग, आणि त्यांतील सगळा रस पिळून घ्यायचा म्हणजे ह्या जगांतील शक्य तितका आनंद लुटायचा ! एकदा त्याची माझी भेट झाली. त्या

वेळीं मी त्याला म्हणालों--"माझें तुमच्याशीं अगदी एकमत आहे. तुमच्याप्रमाणेच मजजवळहि एक फळ आहे, आणि मलादेखील त्यांतला सगळा रस पिळून घ्यावयाची इच्छा आहे. तुमच्या माझ्या मतांत फरक आहे तो फक्त 'तें फळ कोणतें' हें ठरविण्यांत! तुम्ही मानतां की तें संत्रें आहे, मला वाटतें की तो आंबा आहे! तुमच्या मतें ह्या जगांत राहून खाल्लेंप्यालें आणि थोडेसें वैज्ञानिक ज्ञान संपादन केलें म्हणजे झालें, आणखी कशाची कांही गरज नाही. हीच तुम्हांला इतिकर्तव्यता वाटते. पण म्हणून इतर सगळ्यांनाहि तसेंच वाटलें पाहिजे असें म्हणण्याचा तुम्हांला काय बरें अधिकार आहे? जीवनाविषयीची ही तुमची कल्पना मला स्वतःला अगदीच भिकार आणि टाकाऊ वाटते." सफरचंद जमिनीवर कां पडतें किंवा विद्युत्प्रवाह माझ्या ज्ञानतंतूंना कसा उत्तेजित करतो हें जाणणेंच जर जीवनाचें एकमेव उद्दिष्ट असेल तर निदान मी तरी आत्ताच आत्महत्या करून मोकळा होईन. मी वस्तुमात्राचा गाभा, त्यांचें मर्म समजून घेऊं इच्छितों--मला जीवनाचें खरें रहस्य काय आहे हें जाणून घ्यावयाचें आहे. तुम्ही जीवनाच्या भिन्न भिन्न 'आविष्कारां'चें अनुशीलन करीत असतां, मी जीवनाचें 'स्वरूप' जाणूं इच्छितों. माझें तत्त्वज्ञान म्हणतें की, आपण जगाचें आणि जीवनाचें खरें स्वरूप, त्यांचें गूढ रहस्य जाणून घेतलें पाहिजे, आणि स्वर्ग-नरकादिकांचे सारे विचार नि इतरहि तसल्या साऱ्या वेडगळ समजुती आपल्या मनांतून पार हुसकून लावल्या पाहिजेत. अर्थातच, ज्या अर्थानें आपलें हें जग अस्तित्वांत आहे त्या अर्थानें हे स्वर्ग-नरकहि अस्तित्वांत आहेत. पण म्हणून काय झालें? आपण ह्या जीवनाचा गाभा, त्याचें मर्म, त्याचें सार, त्याचा खरा अर्थ, खरें स्वरूप जाणून घ्यावयास हवें; केवळ तें कसें कार्य करतें आणि त्याचे कोणकोणते आविष्कार आहेत हें जाणत बसून काय लाभ? मला प्रत्येक बाबतींत 'कां' जाणून घ्यावयाचें आहे, 'कसें' हें बालबुद्धीचे लोक जाणत बसोत. आणि विज्ञान म्हणजे तरी काय? हें 'कसें' जाणून घेत बसणेंच नव्हे काय? तुमच्या देशांतील एक मोठा माणूस एकदा म्हणाला होता--"सिगारेट ओढीत असतांना जें जें घडतें तें सारें जर मी टिपून ठेवलें तर तेंच सिगारेटचें शास्त्र वा

सिगारेट-विज्ञान होईल." अर्थातच, वैज्ञानिक होणें चांगलें आहे, ती फार मोठी गोष्ट आहे. परमेश्वर त्यांना आशीर्वाद देऊन त्यांच्या शोधांमधे त्यांना मदत करो. परंतु जेव्हा एखादा म्हणतो की तेंच सर्वकांही आहे, विज्ञानाच्या अनुशीलनाखेरीज जीवनाचा आणखी कांही उद्देशच नाही, तेव्हा मात्र तो निर्बुद्धासारखें कांहीतरी बडबडत आहे असें समजावें. समजावें की त्याने जीवनाचा हेतु, जीवनाचें मूल रहस्य जाणून घेण्याचा, खरी वस्तु काय आहे हें आकलण्याचा कधी यत्नच केलेला नाही. मी तर्काच्या आधाराने खुशाल असें म्हणूं शकेन की तुमचें सारें ज्ञान निरर्थक आहे, बिनबुडाचें आहे--त्याला कांहीच पाया नाही. तुम्ही प्राणाच्या विभिन्न आविष्कारांचें अनुशीलन करीत असतां, पण ज्या वेळीं 'प्राण म्हणजे काय' असें मी तुम्हांला विचारतों त्या वेळीं चक्क 'तें आम्हांला माहीत नाही' असें तुम्ही उत्तर देतां ! हें तुमचें ज्ञान तुम्हांलाच लखलाभ असो. तुम्हांला जें आवडतें त्याचें तुम्ही अध्ययन करा, तुम्हांला कोणी अडवूं इच्छीत नाही. फक्त, तुम्हीहि आम्हांला अडवूं नका म्हणजे झालें. तुम्ही तुमच्या वाटेने जा, मला माझ्या वाटेने जाऊं द्या.

लक्षांत असूं द्या की माझ्या पद्धतीने मीहि व्यवहार्य आहें, खूप व्यवहार्य आहें. म्हणून, केवळ पाश्चिमात्यच काय ते व्यवहार्य आहेत ही तुमची कल्पना अगदी मूर्खपणाची आहे. तुम्ही एका तऱ्हेने व्यवहार्य आहांत, मी दुसऱ्या तऱ्हेने व्यवहार्य आहें. माणसांचें आणि मनांचे भिन्नभिन्न प्रकार असतात. भारतांत जर कुणाला असें सांगण्यांत येईल की, जन्मभर एका पायावर उभें राहिल्याने सत्याचा लाभ होऊं शकतो, तर तो माणूस जरूर तसें करील. पाश्चात्त्य देशांत जर लोकांच्या ऐकण्यांत येईल की एका रानटी देशांत अमुक ठिकाणीं सोन्याची खाण आहे, तर हजारो लोक संकटांना तोंड देऊन तें सोनें मिळण्याच्या आशेने तिथे जाऊन थडकतील. कदाचित् त्यांच्यापैकी एखाद्यालाच यश मिळेल, पण म्हणून ते डगमगणार मुळीच नाहीत. ह्याच लोकांनी 'आत्मा आहे' असें ऐकलें असेल, पण आपल्या आत्म्याची काळजी वाहण्याचें काम चर्चमधील पाद्र्यावर सोपवून ते निश्चित राहतील. प्रथम उल्लेखिलेला माणूस सोन्यासाठी त्या रानटी लोकांच्या

देशांत जाणार नाही, तसें करणें फार धोक्याचें आहे असें म्हणून तो चूप बसेल. परंतु त्यालाच जर आपण सांगितलें की, अमुक एका खूप उंच पर्वताच्या टोकावर एक अद्‌भुत साधु राहत असून तो तुला आत्म-ज्ञान देऊं शकेल, तर तो पर्वत चढून जाण्याचा तो प्रयत्न करीलच करील, मग त्या प्रयत्नांत मरण आलें तरी बेहत्तर. वरील दोन्ही प्रकारचीं माणसें व्यवहार्यच आहेत, परंतु चूक होत असते ती इथे की ह्या जगालाच जीवनाचें सारसर्वस्व मानण्यांत येतें. इंद्रियांच्या क्षणिक सुखांनाच तुम्ही जीवन समजत असतां–– त्यांत शाश्वत असें कांहीच नाही, उलट त्यांनी अधिकाधिक दुःखच ओढवत असतें. माझ्या मार्गाने गेल्यास शाश्वत शांति लाभत असते.

तुमचा दृष्टिकोन चुकीचा आहे असें मला म्हणावयाचें नाही. तुमच्या निवडीचा आणि आवडीचा मार्ग तुम्हांला मोकळा आहेच. त्यापासून कितीतरी भलें आणि मंगल निष्पन्न होत असतें, पण म्हणून माझ्या दृष्टिकोनाची निंदा करूं नका. माझा दृष्टिकोनहि माझ्यापक्षीं व्यवहार्यच आहे. आपण सर्वजण आपापल्या पद्धतीने काम करूं या. भगवंताच्या कृपेने जर आपण सर्वचजण वर उल्लेखिलेल्या दोन्ही दृष्टींनी सारखेच व्यवहार्य असतों तर फार छान झालें असतें ! मीं असे कित्येक वैज्ञानिक बघितले आहेत की जे वैज्ञानिक आणि आध्यात्मिक ह्या दोन्ही क्षेत्रांत सारखेच व्यवहारपटु आहेत, आणि मला मोठी आशा आहे की, काळाच्या ओघांत अवघीची अवघी मानवजात अशीच दोन्ही दृष्टींनी कार्यक्षम होईल. एखाद्या भांड्यांतील पाणी उकळण्याच्या बेतांत असतांना बघाल तर तुम्हांला आढळून येईल की, आधी एका कोपऱ्यांतून एक बुडबुडा वर येतो, मग दुसऱ्या कोपऱ्यांतून आणखी एक बुडबुडा उठतो. हे बुडबुडे हळूहळू वाढत जातात–– चारपांच एकत्र होतात, आणि अखेर सगळेच एकवटून सारेच्या सारें पाणी खळखळून उकळूं लागतें. ह्या जगाचेंहि पुष्कळसें असेंच आहे. प्रत्येक व्यक्ति म्हणजे एकेक बुडबुडा असून कित्येक बुडबुड्यांचें मिळून वेगवेगळें एकेक राष्ट्र होत असतें. हळूहळू हीं राष्ट्रें एकत्र येत आहेत, आणि माझी खात्री आहे की, असा एक दिवस उगवेलच उगवेल की जेव्हा अलग अलग राष्ट्रें वा अलग अलग जाती म्हणून कांही गोष्टच

उरणार नाही, राष्ट्रांराष्ट्रांतील, जातीजातींतील भेद लयाला जाईल, आणि ज्या एकत्वाकडे आपण इच्छेने वा अनिच्छेने, कळत वा नकळत चाललों आहोंत तें एकत्व अभिव्यक्त होईल. आम्हां सर्वांमधे भावाभावाचें नातें वस्तुत: स्वभावत:च विद्यमान आहे, पण त्याचा विसर पडून आपण सगळे अलग अलग होऊन गेलों आहोंत. अशी एक वेळ नक्कीच येईल की जेव्हा हा भेदभाव लयास जाऊन सर्वजण एक होतील. असा एक काळ आलाच पाहिजे की जेव्हा प्रत्येक माणूस जसा वैज्ञानिक क्षेत्रांत तसाच आध्यात्मिक क्षेत्रांतहि अत्यंत व्यवहारपटु होईल आणि तेव्हा मग हें एकत्व, ह्या एकत्वांतून जन्मलेला मधुर मिलाफ साऱ्या जगभर पसरेल. अवघी मानवजात जीवन्मुक्त होऊन जाईल. आपला मत्सर आणि द्वेष, आपलें प्रेम आणि सहकार्य यांमधून आपण त्याच एका लक्ष्याकडे जाण्याची धडपड करीत आहोंत. एक प्रचंड नदी खळाळत समुद्राकडे चालली आहे. कागदाचे लहानलहान चिटोरे, गवताच्या काड्या वगैरे तिच्या प्रवाहाबरोबर वाहत आहेत. तीं मधेमधे इकडेतिकडे वाहविण्याचा प्रयत्न खुशाल करोत, पण अखेर त्या सर्वांना समुद्रास जाऊन मिळावेंच लागणार आहे. तद्वतच तुम्हीआम्ही सर्वचजण कागदांच्या लहानलहान तुकड्यांप्रमाणे नि गवताच्या काड्यांप्रमाणे ईश्वराकडे —— त्या असीम पूर्णतेच्या सागराकडे चाललों आहोंत; आपणहि मधेमधे अमळ इकडेतिकडे वाहण्याचा प्रयत्न करीत असतों, पण सरतेशेवटीं आपणहि सर्वजण त्या जीवनाच्या आणि आनंदाच्या महासागरास जाऊन मिळणार आहोंतच आहोंत.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ......................
क्रमांक ........................ नों. दि. ..................

# आत्म्याचा मुक्त स्वभाव

(लंडन येथे ५ नोव्हेंबर १८९६ रोजीं दिलेलें व्याख्यान)

आतापर्यंत आपण ज्याचें आलोचन करीत होतों तें कठोपनिषद्, आपण आता ज्याकडे वळणार आहोंत त्या छांदोग्य उपनिषदाच्या बऱ्याच नंतर रचलें गेलें आहे. कठोपनिषदाची भाषा बरीच आधुनिक असून त्यांत विचारहि बऱ्याच सुसंघटितपणें मांडले गेले आहेत. जुन्या उपनिषदांची भाषा फारच आर्ष स्वरूपाची म्हणजेच अगदी जुनाट वळणाची आहे, ती वेदांच्या संहिताभागांतल्या भाषेसारखी आहे. शिवाय, या जुन्या उपनिषदांचें स्वरूप असें आहे की त्यांतील सारभूत तत्त्वांपर्यंत पोहोचण्यासाठी कधीकधी बऱ्याच अनावश्यक विषयांमधून वाट काढावी लागत असते. वेदांचे कर्मकांड आणि ज्ञानकांड असे दोन भाग आहेत. ह्या कर्मकांडाविषयी मीं तुम्हांला सांगितलें आहेच. या छांदोग्य नामक जुन्या उपनिषदावर ह्या कर्मकांडाचा बराच प्रभाव पडला आहे. परिणामीं, छांदोग्य उपनिषदाचा अर्ध्याहून अधिक भाग कर्मकांडात्मकच आहे. असें असलें तरीहि, ह्या जुन्या उपनिषदांचें अध्ययन करण्यापासून एक फार मोठा लाभ होत असतो. तो लाभ असा की, ह्या जुन्या उपनिषदांच्या अध्ययनाने आपल्याला, आध्यात्मिक तत्त्वांचा विकास कसाकसा होत गेला हें नीट बघतां येतें—आध्यात्मिक तत्त्वांच्या विकासाचा जणु इतिहासच कळून येतो. त्यांच्या मानाने अलीकडील ठरणाऱ्या उपनिषदांमधे आध्यात्मिक तत्त्वें एकत्र जमवून तीं नीट संगतवार आणि ठाकठिकीने एके जागीं मांडलीं गेलीं आहेत. ह्याचें उदाहरण म्हणून भगवद्गीतेचा उल्लेख करतां येईल. ह्या भगवद्गीतेला आपण सर्वांत शेवटचें उपनिषद् म्हणूं शकूं. तींत आपल्याला ह्या कर्मकांडात्मक कल्पनांचा मागमूसहि आढळावयाचा नाही. उपनिषदांच्या उद्यानांमधे उमललेलीं आध्यात्मिक सत्यरूपी सुंदर सुंदर पुष्पें एकत्र करून

गीतारूपी पुष्पगुच्छ बनविण्यांत आलेला आहे. परंतु गीतेंत तुम्हांला आध्यात्मिक तत्त्वांच्या उगमापर्यंत जाऊन, त्यांचा क्रमविकास कसा झाला हें मात्र बघतां यावयाचें नाही. त्यासाठी तुम्हांला वेदांचेंच अध्ययन करावें लागेल. ह्या आध्यात्मिक तत्त्वांचा क्रमविकास समजून घेण्याच्या दृष्टीने वेदांचा अभ्यास विशेष उपयोगी पडतो असें मत अनेकांनी व्यक्त केलें आहे, आणि तें अगदी खरें आहे. कारण, हे वेद इतके कांही पवित्र मानले जातात की जगांतील इतर धर्मग्रंथांत जशी छाटाछाट किंवा भेसळ झाली आहे तशी वेदांमधे मुळीच होऊं शकली नाही. जगांतील इतर कोणत्याहि धर्मग्रंथापेक्षा वेदांचें मूळस्वरूप अधिक प्रमाणांत जसेंच्या तसें टिकलें आहे. ह्या वेदांमधे सर्वांत उत्कृष्ट आणि त्याचबरोबर सर्वांत निकृष्ट असे सर्वच प्रकारचे विचार संरक्षिले गेले आहेत; आवश्यक आणि अनावश्यक बाबी, अत्यंत उदात्त उपदेश आणि अगदी धोपट तपशील ह्यांचा त्यांत एकमेकांशेजारींच उल्लेख आढळेल; कारण कुणीहि त्यांच्यांत बदल करण्यास धजूं शकलेला नाही. वेळोवेळीं निरनिराळ्या मतांचे भाष्यकार उदयास आले, त्यांनी त्या जुन्याच गोष्टींमधून अत्यंत आश्चर्यकारक अशा नवनवीन कल्पना काढून दाखविल्या, त्यांतील अगदी मामुली विधानांमधेदेखील त्यांना सखोल आध्यात्मिक तत्त्वें गवसलीं; परंतु त्यांनी मूळ रचनेमधे मात्र फिरवाफिरव वा ढवळाढवळ केली नाही, त्यामुळे ह्या साऱ्यानंतरहि मूळ ग्रंथ जसेच्या तसेच राहिले, आणि म्हणूनच ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टीने त्यांना इतकें विलक्षण आणि अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्याला विदित आहेच की, प्रत्येक धर्माच्या शास्त्रग्रंथांमधे, पुढील काळच्या वाढत्या आध्यात्मिक कल्पनांच्या अनुरोधाने आवश्यक आणि योग्य ते फेरफार करण्यांत आले आहेत, इथला एखादा शब्द बदलणें तिथे एखादा शब्द अधिकीचा घालणें वगैरे प्रकार घडले आहेत. वैदिक साहित्याच्या बाबतींत असलें कांही झालें नाही असें म्हणतां येईल, आणि झालेंहि असेलच तरी तें कुणाच्या लक्षांतहि येण्यासारखें नाही. यामुळे आपला एक फार मोठा लाभ झाला आहे तो हा की, आपण आध्यात्मिक विचारांचें अगदी मूळ स्वरूप अभ्यासूं शकतों, त्यांचा विकास कसाकसा झाला, हें बघूं

शकतों,--स्थूल, आधिभौतिक कल्पनांमधून अधिकाधिक सूक्ष्म अशा आध्यात्मिक कल्पना कशा निपजत गेल्या आणि अखेर वेदान्तांत त्यांची अंतिम परिणति कशी झाली हें आपण बघूं शकतों. वेदांमधे आपल्याला कित्येक जुन्या आचारांचीं आणि रूढींचीं वर्णनेंहि आढळतात, परंतु त्यांचा आढळ उपनिषदांमधे मात्र तितकासा होत नाही. त्यांची भाषा एका विशिष्ट प्रकारची, अत्यंत आटोपशीर आणि लक्षांत ठेवावयास, पाठ करण्यास फार सोपी आहे.

हे ग्रंथ लिहिणाऱ्यांनी, केवळ कित्येक गोष्टी लक्षांत राहण्याला मदत व्हावी या उद्देशानेंच ह्या ओळी टिपणासारख्या लिहून ठेवल्या आहेत, आणि ते लिहून ठेवीत असलेल्या त्या गोष्टी सर्व लोकांना आधीच्याच माहीत आहेत असेंहि ते धरून चालत होते. ते सांगत असलेली कथा वा वृत्तान्त हा ऐकणाऱ्यांपैकी प्रत्येकालाच अवगत आहे असें ते गृहीत धरून चालत होते. परंतु यामुळे एक मोठी अडचण उत्पन्न झाली आहे ती अशी की, आपल्याला वेदांमधील एकाहि कथेचा नीट अर्थ कळणें जवळजवळ दुरापास्तच होऊन बसलें आहे. कारण ज्या वेळीं आणि ज्यांच्याकरता त्या लिहिल्या गेल्या त्या वेळीं आणि त्यांना त्या घटना माहीत होत्या, परंतु आज ती परंपरा लुप्त होऊन आता त्या दंतकथांच्या स्वरूपांतहि उरलेल्या नाहीत, आणि याउपरहि त्याचा जो काय भाग राहिला असेल तो पराकाष्ठेच्या अतिशयोक्तीच्या रूपाचा आहे. त्यांचे इतके नवेनवे अर्थ लावले गेले आहेत की आपण जेव्हा पुराणांकडे वळतों तेव्हा त्यांत ह्या कथांना अतिरंजित भावनात्मक काव्याचें स्वरूप आलेलें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. पाश्चात्त्य देशांत पाश्चात्त्य जातींच्या राजनैतिक विकासासंबंधी जें एक ठळक वैशिष्ट्य आपल्या लक्षांत येतें तें असें की, हे लोक कुणाचाहि अनिर्बंध अंमल, कुणाचेंहि अनियंत्रित शासन सहच करूं शकत नाहीत, कोणीहि एक मनुष्य आपल्यावर अधिकार गाजवीत आहे असें घडूं न देण्यासाठी ते जिवाचें रान करीत असतात, आणि ते क्रमशः अधिकाधिक व्यापक लोकशाही तत्त्वांकडे जात आहेत, बाह्य स्वाधीनतेच्या अधिकाधिक विशाल कल्पनांकडे झेपावत आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार केल्यास तेथील आध्यात्मिक जीवनाच्या विकासाच्या बाबतींतदेखील अगदी असलाच प्रकार आढळून येतो.

अनेक देव लोपून त्यांच्या जागीं अवघ्या विश्वाच्या एका ईश्वराचा उदय झाला, आणि उपनिषदांनी ह्या एकेश्वरवादाविरुद्धहि बंड पुकारलें. ह्या विश्वाचे अनेक शासनकर्ते असून ते तुमच्या-आमच्या भाग्याचे विधाते आहेत ही बहुदेवत्वाची कल्पना तर त्यांना असह्य वाटलीच, परंतु कुणातरी एका पुरुषाने ह्या विश्वाचें नियंत्रण करावें ही एकेश्वरवादाची कल्पनाहि त्यांना सहन होऊं शकली नाही. उपनिषदांचें अनुशीलन करतांना अगदी पहिल्याप्रथम हीच गोष्ट आपल्या लक्षांत येते. ही कल्पना सारखी वाढत जाऊन अखेर अगदी परमोच्च बिंदु गाठते. जवळजवळ सर्वच उपनिषदांमधे आपल्याला हा परमोच्च बिंदु गाठल्याचें आढळून येतें— विश्वाच्या त्या एका देवाला— त्या एकेश्वराला— त्या जगदीश्वराला पदच्युत केल्याचें आढळून येतें ! सगुण ईश्वर अंतर्धान पावून त्याच्या जागीं निर्गुण ब्रह्म आविर्भूत होतें ! आता ईश्वर हा जगाचें शासन करणारी एक व्यक्ति राहिलेला नसतो—आता तो मनुष्यापेक्षा अनंतपट मोठा, पण अखेर मानवच, अशा स्वरूपाचा राहिलेला नसतो. आता तो सर्व भूतांठायीं वसणारें एक तत्त्व झालेला असतो, समस्त विश्वब्रह्माण्डांत भरून असलेलें ब्रह्मतत्त्व झालेला असतो. आणि एवढें झाल्यानंतर — सगुण ईश्वरापासून निर्गुण ब्रह्मापर्यंत पोहोचल्यानंतर मग मानवाविषयीहि 'तो केवळ एक व्यक्ति आहे' ही धारणा टिकणें अर्थातच शक्य नव्हतें,— तें तर्कविसंगत ठरलें असतें. मग साहजिकपणेंच माणसाचेंहि सगुणत्व लयास जाऊन तो एक तत्त्व बनला. ईश्वराबरोबरच मानवाचेंहि सगुणत्व लोप पावून तोहि निर्गुण ब्रह्म बनला — त्याचें सगुण व्यक्तित्व वा मनुष्यत्व वा जीवत्व हें केवळ त्याचें बाह्य आभासात्मक रूप असून त्यामागे, आंत त्याचें निर्गुण ब्रह्मस्वरूप विराजत आहे. याप्रमाणे ईश्वर आणि मनुष्य या दोन्ही बाजूंनी एकाच वेळीं व्यक्तित्व किंवा सगुणत्व भग्न करून निर्गुण तत्त्वाकडे गमन होत असल्याचें आपल्याला दिसून येतें— सगुण ईश्वर हळूहळू निर्गुण तत्त्व होत आहे, आणि सगुण मनुष्य हळूहळू निर्गुण मानव बनत आहे. आणि मग निर्गुण ईश्वर आणि निर्गुण मनुष्य हे दोन दिशांकडून वाहत येणारे दोन धावते ओघ क्रमशः निरनिराळ्या

अवस्थांमधून एकमेकांकडे वाहूं लागतात. आणि हे दोन प्रवाह क्रमशः ज्या निरनिराळ्या अवस्थांमधून जाऊन अखेर एकमेकांत मिसळून एक होतात त्या अवस्थांचें वर्णन उपनिषदांमधे आढळतें, आणि प्रत्येक उपनिषदाचा अखेरचा शब्द-- अंतिम सिद्धान्त असतो-- "**तत् त्वम् असि**"-- "तूंच तो आहेस." केवळ तें एकमेवाद्वितीय, नित्य, आनंदमय ब्रह्मतत्त्वच वस्तुतः अस्तित्वांत आहे, -- तें 'एक'च ह्या साऱ्या 'अनेकां'च्या रूपांनी विश्वभर व्यक्त होत आहे !

यानंतर मग आले तत्त्वज्ञ. उपनिषदांचें काम येथे संपलें, त्यानंतरचे प्रश्न सोडविण्याचें काम मग ह्या तत्त्वज्ञगणांनी स्वतःकडे घेतलें. उपनिषदांनी आराखडा तयार करून दिला होता, त्यांत तपशील भरण्याचें काम ह्या तत्त्वज्ञांनी केलें. मुख्य गोष्टी उपनिषदांमधे होत्याच, त्यावर चिंतन-विचार करून त्यांचें सविस्तर विवरण-विशदीकरण करण्याचें काम ह्या तत्त्वज्ञांनी केलें. ह्या उपनिषदांमधील सिद्धान्तांवरून अगदी स्वाभाविकपणेंच कितीतरी प्रश्न उत्पन्न होतात. तें एकमेव, निर्गुण ब्रह्मतत्त्व ह्या नाना रूपांनी प्रकट होत आहे असें गृहीत धरून चाललें तरी देखील असा प्रश्न उत्पन्न होतो की, तें एक कां बरें बहु होतें ? हा प्रश्न म्हणजे, 'जगांत दुःख, वाईट, अशुभ वगैरे कां आहे' हा मानवाच्या मनांत अगदी ओबडधोबड स्वरूपांत येणारा एक जुनापुराणाच प्रश्न निराळ्या पद्धतीने विचारणें होय. 'ह्या जगांत दुःख किंवा वाईट कां आहे ? त्याचें कारण काय ?'-- हाच प्रश्न आता 'तें एक कां बरें बहु होतें ?'-- या सूक्ष्म, तात्त्विक स्वरूपांत विचारला गेला. त्या प्रश्नाचें स्थूल स्वरूप जाऊन आता त्यालाच सूक्ष्म स्वरूप आलें आहे. 'आपण दुःखी कां आहोंत'--अशा स्वरूपांत तो आता इंद्रियांच्या भूमिकेवरून विचारला जात नसून तो आता तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून विचारला जात आहे. 'तें एकच तत्त्व बहु कां बरें होतें ?' आणि, आपण बघितल्याप्रमाणे, ह्या प्रश्नाचें भारताने दिलेलें अगदी सर्वोत्कृष्ट उत्तर म्हणजे मायावाद हें होय. मायावाद घोषणा करतो की, तें एक 'खरोखरच' बहु झालें नाही, बहु होतांना त्या एकाच्या मूळ स्वरूपाची कांहीहि हानि झालेली नाही--स्वतःचें मूळ स्वरूप यत्किंचितहि न बदलतांच तें 'एक' 'बहु' झालें आहे ! हें बहुत्व नुसतें

वरवरचें आहे, तो भास आहे. मनुष्य हा केवळ वरवर पाहिल्यासच व्यक्ति आहे, खरोखर पाहिल्यास तो निर्गुण पुरुष आहे. ईश्वर हा केवळ वरवर पाहिल्यासच व्यक्ति वा सगुण आहे, खरोखर पाहिल्यास तो विश्वब्रह्माण्डांत भरून दशांगुळें उरलेला निर्गुण पुरुषच होय.

हें उत्तरहि एकदम मिळालेलें नाही, तेंहि पायरीपायरीनेच मिळालेलें आहे. आणि ह्या उत्तरासंबंधी तत्त्वज्ञांमधे मतभेदहि आहे. भारतामधील सर्वच तत्त्वज्ञांना हा मायावाद संमत नव्हता. त्यांच्यापैकी अधिकांशजणांना तो संमत नव्हता असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. द्वैतवादी आहेत, त्यांचा अगदी ओबडधोबड असा द्वैतवाद आहे, ते मुळी हा प्रश्न विचारूंच देत नाहीत, मुळांतच ते त्याची गळचेपी करूं पाहतात. ते म्हणतात, "हा प्रश्न विचारण्याचा तुम्हांला कांहीहि अधिकार नाही, 'हें असें कां' असें स्पष्टीकरण विचारण्याचा तुम्हांला कांहीच अधिकार नाही. ती ईश्वराची इच्छा आहे, बस्, आपण तिच्यापुढे शांतपणें मान तुकविली पाहिजे. जीवात्म्याला कोणत्याहि प्रकारची स्वाधीनता नाही. आपण काय काय करणार आहोंत, आपल्याला कशाकशाचा लाभ होणार आहे, आपल्याला कोणकोणतीं सुखें आणि दुःखें प्राप्त होणार आहेत हें सारें आधीचेंच ठरलेलें आहे. ज्या वेळीं दुःख येईल त्या वेळीं तें निमूटपणें सहन करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. आपण जर तसें करणार नाही तर त्याबद्दल आपल्याला आणखीच शिक्षा भोगावी लागेल. हें सारें म्हणणें खरें कशावरून ? तसें वेदांमधे सांगितलें आहे म्हणून." हे द्वैतवादी आपल्या ह्या म्हणण्याला पोषक असे मंत्र वेदांमधून काढून दाखवितात, सगळ्याच्या सगळ्या वेदांचा स्वतःच्या मताला पोषक असा अर्थहि लावून दाखवितात. अशा रीतीने आपलें म्हणणें सप्रमाण सिद्ध होत असल्याचें दाखवून द्वैतवादी तें इतरांवरहि लादूं इच्छीत असतात.

आणखी एका मताचे तत्त्वज्ञ आहेत. तेहि मायावाद मानीत नसले तरी त्यांचें मन द्वैतवाद आणि मायावाद यांच्या दरम्यान असतें. ह्यांना म्हणतात विशिष्टाद्वैतवादी वा परिणामवादी. ह्यांच्या मतें हें समस्त ब्रह्माण्ड म्हणजे जणु भगवंताचा देह आहे. तो परमेश्वर समस्त जीवात्म्यांचा आणि समग्र प्रकृतीचा आत्मा आहे. वाईट कर्में

केल्यामुळे जीवात्म्याचा संकोच होत असतो. ज्या वेळीं माणूस एखादें कुकर्म करतो त्या वेळीं त्याचा आत्मा संकुचित होऊं लागतो आणि त्याच्या शक्तीचा ऱ्हास होऊन ती कमी कमी होत जाते. जोंवर तो सत्कर्में आचरीत नाही तोंवर हें असेंच चालतें. तो ज्या वेळीं सत्कर्में आचरूं लागतो त्या वेळीं मग तिचा विकास होऊं लागतो. तें कसेंहि असलें तरी, भारतांतील ह्या सर्व मतप्रणालींमधे एक सर्वसामान्य कल्पना आपल्याला आढळून येते. तिला मी 'मानवाच्या दिव्यत्वा'ची किंवा 'मानवाच्या ईश्वरत्वा'ची कल्पना म्हणूं इच्छितों. ही कल्पना केवळ भारतामधीलच मतप्रणालींमधे आढळते असें नाही, तर, जगांतील प्रत्येक मतप्रणालींतहि ती आढळते, मग ह्याची त्यांना जाणीव असो की नसो. जगांत अशी एकहि मतप्रणाली नाही, असा एकहि खराखुरा धर्म नाही की ज्याचें असें म्हणणें नसेल की, मानवाचा आत्मा हा स्वरूपतः पवित्र आणि पूर्ण आहे; मग त्या धर्मानुसार मानवाच्या आत्म्याचें स्वरूप कांहीहि असो आणि त्याचा ईश्वराशीं संबंध कसाहि असो, किंवा स्वतःचें तें म्हणणें तो धर्म पौराणिक कथेच्या रूपानें व्यक्त करो, रूपक कथेच्या रूपाने व्यक्त करो की तत्त्वज्ञानाच्या स्वरूपांत व्यक्त करो. मानवाच्या आत्म्याचें खरें स्वरूप आनंद, ऐश्वर्य आणि शक्तिमत्ता हेंच आहे; दौर्बल्य, दुःख किंवा अनैश्वर्य नाही. कसें कुणास ठाऊक, हें दुःख त्याच्यावर ओढवलें आहे. त्याच्यावर हें दुःख कसें ओढवलें ह्याचें स्पष्टीकरण करण्यासाठी अविकसित धर्म कदाचित् पाप नामक पुरुषाची किंवा सैतानाची किंवा 'अऱ्हिमन'ची कल्पना करतील. इतर कित्येकजण ईश्वर आणि सैतान यांचें एकाच व्यक्तींत एकीकरण करून ती व्यक्ति कांहींना सुखी तर कांहींना दुःखी करीत असते असें म्हणतील; 'असें काय म्हणून' ह्या प्रश्नाला अर्थातच त्यांच्याजवळ कांही समर्पक उत्तर नसतें. जे अधिक विचारशील आहेत असे कित्येकजण मायावाद वगैरेंच्या साहाय्याने ह्याचें स्पष्टीकरण करीत असतात. परंतु ह्या सर्व मतांमधून एक तत्त्व अगदी स्पष्टपणें प्रकट होत असतें, आणि तेंच आपल्याला येथे विचारांत घ्यावयाचें आहे, त्याचाच आपल्याला येथे ऊहापोह करावयाचा आहे. कारण, एरवी हीं सारीं तत्त्वज्ञानें आणि मतमतान्तरें अखेर केवळ मनाची कसरत

आणि बुद्धीला व्यायाम या स्वरूपाचींच आहेत. जर कोणती एक महान् कल्पना अत्यंत स्पष्टपणें माझ्या निदर्शनास येत असेल, प्रत्येक देशांतील आणि प्रत्येक धर्मांतील अंधविश्वासांचा भेद करून जर कोणती एकमेव कल्पना उज्ज्वलपणें प्रकट होत असेल तर ती हीच की मानव हा स्वरूपत: दिव्य आहे, दिव्यत्व हेंच आपलें स्व-रूप आहे--आपण स्वस्वरूपत: ब्रह्म आहोंत, आपण ब्रह्मस्वरूप आहोंत.

बाकी जें कांही आहे तें सारें, वेदान्ताच्या मतें, केवळ त्यावर अध्यारोप होय, त्याची केवळ मिथ्या उपाधि होय. त्या आत्म्यावर कांहीतरी अध्यारोपित झालेलें आहे, पण त्यामुळे त्याचें मूळचें दिव्य स्वरूप मात्र कधी नाश पावत नसतें. जसा अत्यंत सच्चारित्र्याच्या व्यक्तींत, तसाच अत्यंत अध:पतित व्यक्तींतहि तो आत्मा नित्य विद्यमान असतो. तो आत्मा, तें दिव्य स्व-रूप उद्‌बुद्ध करावयास हवें, म्हणजे मग त्याचें कार्य आपोआप चालत राहील. आपण त्याचें आवाहन केलें पाहिजे, म्हणजे तो स्वत:च प्रकट होईल. जुन्याकाळच्या लोकांना माहीत होतें की, गारगोटींत आणि सुक्या लाकडांत अग्नि वसत असतो, परंतु तो बाहेर पडण्यासाठी घर्षणाची गरज असते. तद्वतच, पावित्र्य आणि मुक्तिरूपी अग्नि प्रत्येकाच्या आत्म्यांत वसत आहे. पावित्र्य आणि मुक्ति हा प्रत्येक आत्म्याचा स्वभाव आहे, तें प्रत्येक आत्म्याचें स्वरूप आहे, हे कांही आत्म्याचे गुण नव्हत. कारण गुण हे नव्याने संपादन करतां येतात आणि म्हणूनच ते नाहीसे होणेंहि शक्य असतें. आत्मा आणि मुक्ति हीं एकच होत; आत्मा म्हणजेच मुक्ति, आणि मुक्ति म्हणजेच आत्मा. सत्ता आणि ज्ञान यांचेंहि असेंच. सत्ता आणि ज्ञान हें आत्म्याचें स्वरूप होय; आत्मा म्हणजेच सत्ता आणि ज्ञान. सत्-चित-आनंद हें आत्म्याचें स्वरूप आहे, तो आत्म्याचा जन्मसिद्ध, स्वरूपसिद्ध स्वभाव आहे; आणि ज्या सर्व अभिव्यक्ति आपण बघतों त्या साऱ्या ह्या आत्म्याचे आविष्कार आहेत-- कांही अभिव्यक्तींत त्याचा आविष्कार उज्ज्वल असतो तर कांहींत अंधुक असतो, इतकेंच. फार काय पण मृत्युहि त्या खऱ्या सत्तेचीच एक अभिव्यक्ति होय--त्या सत्स्वरूप आत्म्याचा एक आविष्कार होय. जन्म आणि मृत्यु, वृद्धि आणि क्षय, उन्नति आणि अवनति ह्या साऱ्याच त्या एका अखंड सत्तेच्या भिन्नभिन्न अभिव्यक्ति

होत. अशा रीतीने, ज्ञान म्हणा की अज्ञान म्हणा, विद्या म्हणा की अविद्या म्हणा, दोन्ही त्या चित्स्वरूपाच्या, त्या ज्ञानस्वरूपाच्याच अभिव्यक्ति होत; त्यांच्यांत फरक आहे तो प्रमाणाचा, प्रकाराचा नव्हे. आमच्या पायांखाली तुडविल्या जाणाऱ्या यःकश्चित् किड्याचें ज्ञान आणि सगळ्या जगांतील सर्वश्रेष्ठ प्रतिभावान व्यक्तीचें ज्ञान यांत फरक आहे केवळ प्रमाणाचा, प्रकाराचा नव्हे. म्हणूनच वेदान्तवादी तत्त्वज्ञ निर्भयपणें म्हणत असतात की, ह्या जीवनांतील सर्व सुखें, फार काय पण अत्यंत ओंगळ सुखें देखील आत्म्याच्या त्या दिव्य आनंदमय स्वरूपाच्याच भिन्नभिन्न अभिव्यक्ति होत.

हेंच वेदान्तांतील सर्वांत प्रमुख तत्त्व म्हणतां येईल, आणि मीं मघा म्हटल्याप्रमाणे, सर्वच धर्मांचें असें मत असल्याचें दिसून येतें. ज्या धर्माच्या मुळाशीं हें तत्त्व नाही असा एकहि धर्म अजून माझ्या पाहण्यांत आलेला नाही. एकूणएक सर्वच धर्मांमधे हें सार्वजनीन तत्त्व विद्यमान आहे. उदाहरणादाखल बायबलच घ्या. त्यांत तुम्हांला रूपककथेच्या स्वरूपांत असें सांगितलेलें आढळून येईल की, अगदी पहिला मानव जो 'अॅडम', तो आधी अत्यंत पवित्र होता, परंतु त्याच्या दुष्कृत्यांनी त्याचें तें पावित्र्य पुढे नष्ट झालें. ह्या रूपककथेवरून हें स्पष्ट दिसतें की, ज्याने ती कथा लिहिली त्याचें असें मत होतें की, आदि मानव वा खरा मानव हा स्वरूपतः पूर्ण आणि पवित्र होता. मानवाठायीं आढळून येणारी अपवित्रता, दिसून येणारी दुर्बलता ही केवळ त्याच्या त्या खऱ्या स्वरूपावर आरोपिली गेली आहे-- तो केवळ अध्यारोप वा उपाधि आहे. आणि ख्रिस्तीधर्माचा पुढचा इतिहास हेंच सांगतो की, आपली ती मूळची, स्वरूपसिद्ध पूर्णावस्था फिरून प्राप्त करून घेणें मानवाला शक्य आहे, नव्हे, तो ती अगदी निश्चितपणें प्राप्त करून घेऊं शकतोच ह्यावर ख्रिस्ती लोकांचाहि विश्वास आहे. नवी आणि जुनी अशा दोन्ही संहिता मिळून समस्त बायबलाचा हाच अभिप्राय आहे. मुसलमानांचेंहि असेंच. आदि मानव अॅडम आणि त्याची स्वरूपसिद्ध पवित्रता यावर मुसलमानांचाहि विश्वास आहे, आणि ती लुप्त पूर्णावस्था फिरून प्राप्त करून घेण्याचा मार्ग महंमद पैगंबरांच्या आगमनाने मोकळा झाला आहे अशी त्यांची

श्रद्धा आहे. बौद्धांचेंहि असेंच आहे. ह्या द्वैतजगताच्या पलीकडील निर्वाण नामक अवस्थेवर बौद्धांचा विश्वास असतो. बौद्धांचें हें निर्वाण म्हणजे वेदान्ती ज्याला ब्रह्म म्हणतात तेंच होय, त्या दोहोंत कांहीच फरक नाही. आणि बौद्धांच्या समस्त उपदेशांचें सार म्हणजे ही गमावलेली निर्वाण-अवस्था फिरून प्राप्त करून घेणें, हेंच होय. ह्याच कल्पनेवर बौद्धधर्म उभारला गेला आहे. याप्रमाणे, प्रत्येक धर्ममतांत आपल्याला हें तत्त्व विद्यमान असल्याचें आढळून येतें की, जें तुमचें आधीचेंच नाही, तें तुम्हांला लाभणें कदापि शक्य नाही. ह्या विश्वब्रह्माण्डांत आपण कुणाचेच ऋणी नाहीं. आपण केवळ स्वतःचा जन्मसिद्ध अधिकारच मागत आहोंत. ही गोष्ट वेदान्ताच्या एका थोर आचार्यानें आपल्या ग्रंथाच्या नांवाद्वारेंच मोठ्या सुरसपणें व्यक्त केली आहे. त्यांनी आपल्या ग्रंथाचें नांवच ठेवलें आहे--- 'स्वाराज्यसिद्धि'! स्वाराज्यसिद्धि म्हणजे, जें स्वतःचें राज्य आपण गमाविलें आहे तें फिरून परत मिळविणें ! तें राज्य मुळांत आपलेंच आहे, तें आपण गमावून बसलों असून तें आपल्याला परत मिळवावयाचें आहे. तथापि, या 'गमाविण्या-मिळविण्या'च्या बाबतींत मायावादी असें म्हणतात की आपलें तें राज्य गमाविलें आहे असें वाटणें हा आपला भ्रम होय, वस्तुतः तें कधीच गमाविलेलें नाही. इतर तत्त्वज्ञ आणि मायावादी यांच्यांत एवढाच काय तो फरक आहे.

असो तर, याप्रमाणे आपलें राज्य होतें आणि आपण तें गमाविलें आहे यावर सर्वच धर्मांचें एकमत असलें तरी तें राज्य आपण परत कसें मिळवावयाचें ह्याचा उपाय मात्र प्रत्येकजण निरनिराळा सांगत असतो. कुणी म्हणतो की, तें राज्य परत मिळविण्यासाठी तुम्हीं कांही विशिष्ट क्रियांचें अनुष्ठान केलें पाहिजे, कांही विशिष्ट प्रतिमांची पूजा करून त्यांच्या चरणीं धन वाहिलें पाहिजे, कांही विशिष्ट अन्न खाल्लें पाहिजे आणि कांही विशिष्ट नियमांचें पालन करीत एका विशिष्ट तऱ्हेनेच वागलें पाहिजे. कुणी म्हणतो की, प्रकृतीच्या पलीकडील त्या कुण्या एका पुरुषासमोर गुढगे टेकून रडतभेकत तुम्हीं त्याची करुणा भाकली, त्याची क्षमा मागितली तर तें तुमचें राज्य तुम्हांला परत मिळेल. कुणी म्हणतो की, तुम्हीं त्या पुरुषावर अगदी

हृदयापासून प्रेम केलें तर तें तुमचें राज्य तुम्हांला परत मिळेल. याप्रमाणे कुणी कांही तर कुणी कांही उपाय सांगत असतो. उपनिषदांमधे हे सगळे निरनिराळे उपाय सांगितलेले आहेत. मी जसजसें त्यांचें अधिक विवरण करीन तसतसें हें तुम्हांला दिसून येईलच. परंतु सर्वांत शेवटचा आणि सर्वांत श्रेष्ठ उपाय हा आहे की तुम्हीं रडण्याभेकण्याची मुळीच गरज नाही. ह्या साऱ्या कर्मकांडाच्या अनुष्ठानाचीहि कांही गरज नाही. आणि तें स्वाराज्य कसें परत मिळेल ह्याची चिंता करीत बसण्याचीहि वस्तुतः कांही गरज नाही, कारण खरोखर पाहतां तें तुम्हीं कधी गमावलेंच नाही ! जें तुम्हीं कधी गमावलेंच नाही तें परत मिळविण्याचा खटाटोप तरी कशाला बरें ? तुम्ही आधीचेच--स्वभावतःच--पवित्र आहांत, तुम्ही स्वभावतःच मुक्त आहांत. आपण मुक्त आहोंत असें जर तुम्ही समजाल तर ह्याच क्षणीं मुक्त होऊन जाल, आणि आपण बद्ध आहोंत असें समजाल तर बद्धच राहाल. हें विधान फार धाष्टर्याचें आहे खरें, परंतु मीं प्रारंभींच म्हटल्याप्रमाणे मला पुरें धाडस धरूनच काय तें सांगावें लागणार आहे. तें ऐकून तुम्हांला आता कदाचित् भय वाटेल, पण तुम्ही ज्या वेळीं ह्यावर विचार कराल, ह्याचें चिंतन कराल, स्वतःच्या जीवनांत त्याची प्रतीति घ्याल त्या वेळीं माझें म्हणणें खरें असल्याचें तुमच्या निदर्शनास येईल. कारण, मुक्ति हें जर तुमचें स्वरूप नसेल तर मग काय वाटेल तें करूनहि तुम्ही मुक्त होऊं शकणार नाही. अशी कल्पना करा की तुम्ही मुक्त होतां आणि कांहीतरी होऊन तो आपला मुक्तस्वभाव खरोखर हरवून बसून बद्ध होऊन गेलां आहांत. ह्याचा अर्थ हाच होईल की तुम्ही सुरुवातीला मुक्त नव्हतांच. तुम्ही जर आधी खरोखरच मुक्त असतां तर तुमचें तें मुक्तस्वरूप कशाने नाहीसें झालें ? जें स्वतंत्र आहे तें कधीच परतंत्र होऊं शकत नाही; तें जर खरोखरच परतंत्र होऊं शकेल तर त्यावरून हेंच सिद्ध होईल की तें वस्तुतः स्वतंत्र नव्हतेंच--त्याचें स्वातंत्र्य हा भ्रमाचा भोपळा होता.

आता, ह्या दोहोंपैकी तुम्ही कोणता पक्ष घेणार हा प्रश्न आहे. आत्मा हा स्वरूपतः पवित्र आणि मुक्त आहे असें जर म्हणाल तर मग त्याला बद्ध किंवा सीमित करूं शकेल असें ह्या विश्वब्रह्मांडांत

कांहीहि असणें शक्य नाही हेंहि तुम्हांला मानावेंच लागेल. उलट, ह्या आत्म्याला बद्ध करूं शकेल असें जर कांही ह्या जगांत असेल तर मग तो मुक्तस्वरूपाचा आहे असें म्हणतां यावयाचें नाही, आणि मग तो स्वभावतः मुक्त आहे असें तुमचें म्हणणें भ्रमच ठरेल. म्हणून, मुक्ति प्राप्त करून घेणें जर शक्य असेल तर त्यावरून हेंच अपरिहार्यपणें सिद्ध होतें की आत्मा हा स्वरूपतःच मुक्त आहे. तो तसा असलाच पाहिजे, याविरुद्ध असलेला पक्ष खरा असणें शक्यच नाही. आत्मा स्वरूपतः मुक्त आहे याचा अर्थ असा की बाह्य कोणत्याहि वस्तूच्या तो अधीन नाही, म्हणजेच आत्म्याखेरीज अन्य कोणतीहि वस्तु त्याचें कारण बनून त्यावर कसलाहि परिणाम करूं शकत नाही. आत्मा हा कार्य-कारणसंबंधाच्या पलीकडे आहे, आणि ह्यावरच आत्म्याविषयीच्या आपल्या सर्व उच्च कल्पना आधारलेल्या आहेत. आत्मा स्वरूपतः मुक्त आहे, म्हणजेच अन्य कोणतीहि वस्तु त्यावर परिणाम करूं शकत नाही, असें मानल्याखेरीज आत्मा अमर आहे हें आपण कदापि सिद्ध करूं शकणार नाहीं. कारण, मरण म्हणजेच कोणत्यातरी बाह्य कारणाने आपल्यावर घडून आलेला परिणाम. एकजण विष पितो आणि परिणामीं मरतो--ह्यावरून हें सिद्ध होतें की विष नांवाची बाहेरची कांहीतरी एक गोष्ट आमच्या शरीरावर परिणाम करूं शकते. जर आत्म्याच्या बाबतींतहि हें खरें असेल तर मग आत्मादेखील बद्धच आहे असें म्हणावें लागेल. परंतु आत्मा मुक्त आहे हें जर खरें असेल तर मग त्यावर अन्य कशाचाहि परिणाम होणें शक्य नाही, म्हणजेच तो कधीहि मरणार नाही हेंहि ओघानेच आलें. आत्मा हा कार्य-कारणसंबंधाच्या पलीकडे असेल, ह्या मायेच्या पलीकडे असेल तरच तो स्वरूपतः मुक्त, अमर आणि आनंदमय असणें संभवतें. ह्या दोहोंपैकी तुम्ही कोणता पक्ष स्वीकारणार ? एकतर म्हणा की पहिला पक्ष भ्रामक आहे किंवा म्हणा की दुसरा पक्ष भ्रामक आहे. मी तरी दुसराच पक्ष भ्रामक आहे असें ठामपणें म्हणेन. माझ्या सर्व भावनांशीं आणि आकांक्षांशीं तेंच मला अधिक सुसंगत वाटतें. मी स्वरूपतः मुक्त आहें ह्याचा मला अगदी धादान्त प्रत्यय येत असतो; तो खोटा असून माझा आजचा हा बद्धपणाच खरा आहे हें मी कधीच

मान्य करणार नाहीं.

सर्वच तत्त्वज्ञानांमधे हा वाद कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत चाललेला आढळून येतो. अगदी आधुनिक म्हणून गणल्या गेलेल्या तत्त्वज्ञानांमधेहि हाच वाद निर्माण झाल्याचें तुम्हांला आढळून येईल. या बाबतींत दोन पक्ष आहेत. पैकी एका पक्षाचें असें म्हणणें आहे की, आत्मा नांवाची कांही वस्तुच अस्तित्वांत नाही, ती केवळ एक भ्रामक कल्पना आहे; जड कण पुन:पुन: जागा बदलीत असल्यामुळे आपल्याला आत्मा असल्याचा भास होतो; त्या जड कणांच्या ह्या विशिष्ट गतीमुळेच शरीर, मेंदू वगैरे जडसमूह उत्पन्न होतात; शरीरांदिकांतील ह्या जड कणांच्या विशिष्ट स्पंदनांमुळे, त्यांच्या विशिष्ट गतींमुळे आणि संतत जागा बदलण्यामुळेच ही मुक्तस्वरूपाच्या आत्म्याची भावना उद्भवत असते. कित्येक बौद्ध संप्रदाय होते, त्यांचेंहि हें असेंच मत होतें. आपल्या ह्या मताच्या स्पष्टीकरणार्थ ते पुढील दृष्टान्त देत असत. तुम्हीं जर एक जळती मशाल घेतली आणि ती वेगाने गोल फिरविली तर तुम्हांला प्रकाशाचें वर्तुळ दिसेल. तें वर्तुळ वस्तुत: अस्तित्वांत नाही, कारण ती मशाल प्रतिक्षणीं आपली जागा बदलत आहे. तद्वतच आपणहि लहानलहान जड कणांचीं जुडगीं आहोंत; ते जड कण खूप वेगाने फिरत असल्यामुळेच एक शाश्वत 'अहं' वा आत्मा असल्याचा आभास निर्माण होतो. हें झालें एका पक्षाचें मत. ह्या मतानुसार शरीरच सत्य असून आत्म्याला अस्तित्व नाही. याउलट दुसऱ्या पक्षाचें मत असें आहे की, विचारांच्या वा मनाच्या अति द्रुत स्पंदनांमुळेच जडद्रव्याच्या अस्तित्वाचा भ्रम होतो, परंतु वस्तुत: जडाला अस्तित्व नाही. याप्रमाणे एक पक्ष म्हणतो की आत्मा हा आपला भ्रम आहे, तर दुसरा पक्ष म्हणतो की जड हा आमचा भ्रम आहे. आता प्रश्न आहे की आपण कोणता पक्ष घ्यावयाचा ? अर्थातच आपण आत्मास्तित्ववाद ग्रहण करून जडाला भ्रमात्मक म्हणूं. आत्म-निरात्म दोन्ही पक्ष सारखेच तर्कसंगत आहेत, तथापि आत्म-पक्षीं तर्क अमळ अधिक सबळ आहे असें म्हणावें लागेल. कारण, जड काय आहे हें कुणींच कधी पाहिलेलें नाही. आपल्याला केवळ आपलाच प्रत्यय येऊं शकतो. मला असा एकहि माणूस माहीत

नाही की जो स्वतःच्या बाहेर पडून जडाचा प्रत्यय घेऊं शकला आहे. उडी मारून कुणी कधी स्वतःच्या बाहेर येऊं शकला नाही. म्हणूनच आत्म्याच्या पक्षीं तर्क अमळ अधिक प्रबळ आहे असें म्हणतां येतें. द्वितीयतः म्हणजे, आत्मवाद हा ह्या विश्वाचें नीट स्पष्टीकरण करूं शकतो, जडवाद मात्र तें करूं शकत नाही. आणि म्हणूनच जडवाद करीत असलेलें विश्वाचें स्पष्टीकरण तर्कदुष्ट ठरतें. सगळीच्या सगळीं तत्त्वज्ञानें घेऊन विश्लेषण करून त्यांचें सार काढलें तर हेंच आढळून येईल की, तीं सगळीं ह्या दोन पक्षांपैकी या किंवा त्या पक्षांत अंतर्भूत होतात. एकूण काय की, 'आत्मा हा स्वरूपतः पवित्र आणि मुक्त आहे किंवा नाही' हा तो जुनाच प्रश्न ह्या नव्या तत्त्वज्ञानांमधे अधिक गुंतागुंतीच्या, अधिक गहन आणि अधिक तात्त्विक स्वरूपांत उपस्थित केला गेलेला आढळून येतो. एक पक्ष म्हणतो की आत्मा हा स्वरूपतः पवित्र आणि मुक्त आहे असें वाटणें हा आपला भ्रम आहे, तर दुसरा पक्ष म्हणत असतो की आपण बद्ध आहोंत असें वाटणें हा भ्रम आहे. आपण अर्थातच दुसऱ्या पक्षाचे समर्थक आहोंत--आपला बद्धपणा हाच भ्रम आहे.

या बाबतींत वेदान्ताचा सिद्धान्त असा आहे की, आपण खरोखर बद्ध नाहीं, आपण आधीचेच मुक्त आहोंत--स्वरूपतः मुक्त आहोंत--नित्य मुक्त आहोंत. केवळ इतकेंच नव्हे, तर, आपण बद्ध आहोंत असें म्हणणें किंवा वाटणें अत्यंत अनर्थावह आहे, अनिष्टकारक आहे--ती चूक आहे, स्वतःच स्वतःला मोहाभिभूत करून घेणें आहे. मी बद्ध आहें, मी दुर्बळ आहें, मी असहाय आहें असें ज्या वेळीं तुम्ही म्हणतां त्याच वेळीं, त्याच क्षणीं तुमच्या दुर्भाग्याला सुरुवात होते--आपल्या पायांत तुम्ही आणखी एक बेडी चढवून घेतां. तसें कधीहि म्हणूं नका, तसें कधीहि वाटूं देऊं नका. मीं एका व्यक्तीविषयी ऐकलें आहे--तो माणूस एका जंगलांत राहत असे आणि रात्रंदिवस 'शिवोऽहम्' 'शिवोऽहम्' असें जपत असे. एक दिवस एका वाघानें त्याच्यावर झडप घातली आणि त्याला मारून खाण्यासाठी तो वाघ त्याला घेऊन पळूं लागला. नदीच्या पैलतीरावरून लोक हा सारा प्रकार बघत होते; शब्दोच्चाराची शक्ति होती तोंपर्यंत तो माणूस

'शिवोऽहम्' 'शिवोऽहम्' म्हणत असल्याचें त्या लोकांनी ऐकलें--वाघाच्या प्रत्यक्ष जबड्यांत असतांनादेखील तो 'शिवोऽहम्' 'शिवोऽहम्' म्हणत होता. अशीं अनेक माणसें होऊन गेलीं आहेत. अशींहि अनेक माणसें होऊन गेलीं आहेत की शत्रु त्यांचे तुकडे तुकडे करीत असतांनादेखील त्यांनी त्या शत्रूंना आशीर्वाद दिला आहे. "सोऽहम्, सोऽहम्--मी तोच आहें, मी तोच आहें, आणि तुम्हींहि तोच आहांत. मी पवित्र आहें, पूर्ण आहें. आणि माझे शत्रुहि तद्वतच पवित्र आणि पूर्ण आहेत. तुम्हीहि तोच आहांत, मीहि तोच आहें." ह्याला म्हणावें बल, ह्याला म्हणावी शक्ति. अशालाच म्हणावें वीर. आता, हेंहि कांही खोटें नाही की द्वैतवादी धर्मांमधेहि थोर आणि अपूर्व गोष्टी आहेत; ज्याची आपण पूजा करूं शकतों, ज्याच्यावर आपण प्रेम करूं शकतों अशा, प्रकृतीहून पृथक् असलेल्या सगुण ईश्वराची कल्पना मोठी गोड आहे यांत कांही संशय नाही. पुष्कळदा ती कल्पना मोठी सांत्वनदायक ठरत असते; तिने प्राण कसे निवत असतात. परंतु वेदान्त म्हणतो की, हें सांत्वन, हें प्राण निवणें अफूने येणाऱ्या नशेसारखें आहे, तें स्वाभाविक नाही, तें अस्वाभाविक, अनैसर्गिक आहे. त्याने अखेर दुबळेपणा येत असतो; आणि यापूर्वी कधीहि पडली नसेल इतकी गरज जर आज जगाला कशाची असेल तर ती आहे बलाची--शक्तीची. वेदान्त म्हणतो की या जगांतील अवघ्या दुःखाचें कारण आहे दुर्बलता. दुःखाचें एकमेव कारण आहे दुर्बलता. दुर्बल आहोंत म्हणूनच आपल्याला दुःख भोगावें लागतें. दुर्बल आहोंत म्हणूनच आपण खोटें बोलतों, चोरी करतों, खून करतों, इतर नाना गुन्हे, नाना पापें करतों. दुर्बल आहोंत म्हणूनच आपण दुःख भोगतों. दुर्बल आहोंत म्हणूनच आपण मरतों. जिथे आपल्याला दुर्बल बनविणारें कांही नाही तिथे मृत्यु फिरकूं शकणार नाही, दुःख शिरकूं शकणार नाही. भ्रांतीमुळेच आपण दुःख भोगत असतों. ही भ्रांति दूर करा, सगळें दुःख नाहीसें होईल. ही खरोखर अगदी सरळ, सोपी गोष्ट आहे. अशा रीतीने, ह्या साऱ्या तात्त्विक वादविवादांतून आणि प्रचंड बौद्धिक कसरतींतून आपण जगांतील अगदी सगळ्यांत सरळ आणि सोप्या अशा आध्यात्मिक सिद्धान्ताप्रत येऊन पोहोचतों.

अद्वैत वेदान्त ज्या स्वरूपांत आध्यात्मिक सिद्धान्त व्यक्त करतो तेंच सत्याचें सगळ्यांत सरळ आणि सोपें स्वरूप होय. भारतांत आणि इतरत्रहि या बाबतींत एक फार मोठी चूक झाली आहे. वेदान्ताच्या आचार्यांना असें वाटलें की ही अद्वैताची शिकवण सर्वांना देतां येण्यासारखी न ही, ती सार्वजनिक करून चालणार नाही. त्यांना असें वाटलें ह्याचें कारण हें की, त्यांनी सत्यासंबंधीचे सिद्धान्त विचारांत न घेतां, ज्या प्रक्रियेने ते सिद्धान्त गाठले गेले ती प्रक्रियाच विचारांत घेतली, आणि ती प्रक्रिया अर्थातच अत्यंत गहन आणि गुंतागुंतीची आहे यांत शंकाच नाही. ती भयावह तात्त्विक नि तार्किक प्रक्रिया पाहून त्यांना भीति वाटली. त्यांना वाटलें की ह्या गोष्टी सर्वांना आकळतां येणें शक्य नाही, त्या दैनंदिन जीवनांत उतरवितां येणें शक्य नाही, आणि ह्या असल्या (अद्वैत) तत्त्वज्ञानाच्या नांवाखाली भलतीच नैतिक शिथिलता बोकाळेल.

परंतु, जगांत अद्वैत तत्त्वांचा प्रसार केल्याने अनीति आणि दुर्बलता माजेल यावर माझा मुळीच विश्वास नाही. उलट, माझा सकारण अगदी ठाम विश्वास आहे की दुर्नीति आणि दुर्बलता निवारण्याचा तोच एकमेव उपाय आहे. हेंच (अद्वैतच) जर सत्य असेल तर मग अमृतस्रोत जवळून वाहत असतां लोकांना काय म्हणून डबक्यांतलें गढूळ पाणी पिऊं द्यायचें? सर्वजण स्वरूपतः पवित्र आहेत हें जर सत्य आहे तर मग तें ह्याच क्षणीं साऱ्या जगाला कां बरें शिकवूं नये? हें सत्य वज्रघोषाने पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक व्यक्तीला— साधूंना आणि पाप्यांना, स्त्रियांना आणि पुरुषांना, वृद्धांना आणि बालकांना, सिंहासनाधिष्ठित सम्राटांना आणि रस्ते झाडणाऱ्या मेहतरांना कां बरें शिकवूं नये?

आज हें एक अतिशय प्रचंड आणि कमालीचें अवघड काम वाटणें शक्य आहे. पुष्कळांना ह्या साऱ्याने आश्चर्याचा धक्काहि बसेल. परंतु हा सगळा खुळचट समजुतींचा परिणाम होय, आणखी कांहीच नाही. तऱ्हतऱ्हेच्या निषिद्ध, निःसत्त्व आणि न पचणाऱ्या गोष्टी खाऊन किंवा उगाच फाके करून करून आपण आता पंचपक्वान्नाचें सुग्रास भोजन करण्यास अपात्र होऊन बसलों आहोंत. लहानपणापासून

दुबळें बनविणारे शब्दच आपण ऐकत आलों आहोंत. हें म्हणजे भुताखेतांवरील विश्वासासारखें आहे. आपला भुताखेतांवर विश्वास नाही अशी बढाई करणारे लोक अर्थातच तुम्ही पुष्कळ बघितले असतील, परंतु अंधारांत ज्यांच्या अंगावर अमळ कांटा येत नाही असे लोक खरोखर विरळाच ! हा निव्वळ खुळचट समजुतींचा परिणाम आहे. आणि ही जशी भुताखेतांच्या बाबतींतली खुळचट समजूत आहे तशाच धर्माच्या बाबतींतहि खुळचट समजुती असतात. सैतान म्हणून कोणी नाही असें मीं म्हटलें तर अवघा धर्म बुडाला असें वाटणारे लोक या देशांत आहेत. मला पुष्कळांनी म्हटलें आहे की सैतानाला वगळून धर्म असूंच कसा शकतो ? आपल्या नाकांत वेसण घालून आपल्याला वळविणारा कोणी असल्याखेरीज धर्म असूंच कसा शकेल ! कोणी आपल्यावर अंमल गाजविणारा असल्याखेरीज आपण राहूंच कसें बरें शकूं ! आपल्याला कोणीतरी असें वागवावें हेंच आपल्याला आवडतें, कारण तेंच आपल्या आंगवळणीं पडून गेलें आहे. रोज कुणींतरी आपले कान उपटल्याखेरीज आपल्याला बरेंच वाटत नाही ! सारा खुळचट समजुतींचा बाजार, आणखी काय ! परंतु, आज आपल्याला कितीहि भयंकर वाटत असलें तरी अशी वेळ खासच येईल की, जेव्हा आपल्यापैकी प्रत्येकजण मागे वळून पाहील आणि आपल्या पवित्र आणि अनंत आत्म्याला झाकून टाकणाऱ्या एकूणएक सर्व खुळचट समजुतींकडे बघून हसूं लागेल आणि 'मी मुक्त आहें, मी मुक्तच होतो व मी सदा मुक्तच राहीन' असें खरोखर, आनंदाने आणि ठामपणें म्हणत राहील. वेदान्त जगाला ह्याच तत्त्वाचें--ह्या अद्वैततत्त्वाचें पसायदान देतो, आणि तेंच चिरस्थायी होण्यास पात्र आहे. वेदान्ताचे ग्रंथ कदाचित् उद्या नाहीसे होतील, पण हे वेदान्तप्रतिपादित तत्त्व अमर आहे, सनातन आहे, चिरंतन आहे. हें तत्त्व प्रथम हिब्रू लोकांच्या डोक्यांत उदय पावलें की उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत राहणाऱ्यांच्या डोक्यांत प्रथम प्रकट झालें ह्याची कुणाला पर्वा आहे ? तें सत्य आहे, आणि सत्य हें सनातन असतें, शाश्वत असतें, त्रिकालाबाधित असतें; आणि तें सत्य स्वतःच आपल्याला दर्शवून देतें की तें कुणाहि विशिष्ट व्यक्तीची वा विशिष्ट राष्ट्राची मिरास नाही. माणूस,

पशु, देवता––सर्वांचा त्या एकाच सत्यावर समान अधिकार आहे. त्या सर्वांना त्याचा लाभ होऊं द्या. काय म्हणून जीवन दु:खी करावयाचें? लोकांना तऱ्हतऱ्हेच्या खुळचट, वेडगळ समजुतींना काय म्हणून बळी पडूं द्यावयाचें? त्यांच्यांतील दहा-वीसजणहि जरी ह्या खुळचट समजुतींपासून वचावणार असतील तर तत्प्रीत्यर्थ मी माझीं दहा हजार आयुष्यें खर्ची घालण्यास तयार आहें. तुमच्या ह्या देशांत––ह्या इंग्लंडमधेच नव्हे, तर ह्या वेदान्ताच्या खुद्द मायभूमींत––आमच्या भारतांतदेखील हें सत्य सांगितल्याने लोक भितात. ते म्हणतात–– "हें सारें संन्याशांसाठी आहे––जग सोडून जंगलांत जाऊन राहणाऱ्यांसाठी आहे. त्यांच्यापक्षीं हें सारें ठीक आहे. पण आम्ही बिचारे गृहस्थ लोक, आमच्यापक्षीं कुणाचें ना कुणाचें तरी भय आवश्यक आहे, आमच्यापक्षीं कर्मकांडाची जरूरी आहे" वगैरे वगैरे.

द्वैतवादाने जगावर बराच काळ अंमल गाजविला आहे, आणि हें त्याचें फळ आहे. मग आता एक नवीन प्रयोग कां बरें करून बघूं नये? अद्वैताचा सर्वांनी स्वीकार करायला कदाचित् कांही युगें लागतील, पण त्यासाठी आताच सुरुवात करायला काय हरकत आहे? स्वत:च्या आयुष्यांत आपण वीसजणांना जरी हें तत्त्व सांगितलें तरी आपण एक महत्कर्म केलें असें होईल.

ह्याच्या विरुद्ध एक मुद्दा बहुधा पुढे करण्यांत येत असतो. तो असा की, "मी शुद्ध आहें, मी आनंदस्वरूप आहें हें म्हणणें फार चांगलें आहे, पण आपल्या जीवनांत आपण तसें नेहमी दाखवून देऊं शकत नाहीं." हा मुद्दा अर्थातच खरा आहे. परंतु 'आदर्श' म्हटला की तो नेहमी खूप कठीण असणारच. आपण प्रत्येकजण आपल्या डोक्यावर खूप खूप दूर असलेलें आकाश पाहत असतों. पण तें खूप दूर आहे म्हणून आपण त्याकडे बघावयाचेंच नाहीं असें तर तुम्ही म्हणणार नाही ना? आदर्शाचेंहि असेंच आहे. आदर्श दूर आहे, तो खूप कठीण आहे म्हणून तो सोडून खुळचट समजुतींकडे वळल्याने सारें चांगलें होऊन जाईल असें तर नाही ना? अमृत मिळत नाही म्हणून विष प्याल्याने का आपलें भलें होणार आहे? आपण आत्ताच्या आत्ताच सत्याचा साक्षात्कार करून घेऊं शकत नाहीं म्हणून अज्ञानाच्या

अंधकाराचा आसरा घेऊन दुबळेपणाला आणि खुळचट समजुतींना बळी पडल्याने का आपलें कल्याण होणार आहे ?

द्वैतवादाच्या पुष्कळशा प्रकारांना माझी कांहीच हरकत नाही· त्यांतील बहुतेक मला आवडतातहि. परंतु दुबळेपणा निर्माण करणाऱ्या कोणत्याहि उपदेशप्रकाराला माझी अगदी मनापासून हरकत आहे. शारीरिक, मानसिक वा आध्यात्मिक शिक्षण-वळण घेत असलेल्या प्रत्येक पुरुषाला वा स्त्रीला, मुलाला वा मुलीला माझा केवळ हा एकच प्रश्न आहे. तुम्ही बलवान आहांत ना ? तुमच्यांत बलाचा संचार होत आहे ना ? कारण केवळ सत्यच बल प्रदान करूं शकत असतें हें मी जाणून आहें. मी जाणून आहें की केवळ सत्यच जीवन देत असतें, आणि सत्याची कास धरण्याखेरीज इतर आणखी कशानेहि आपण बलवान होऊं शकणार नाहीं व बलवान झाल्याखेरीज कुणालाहि सत्याचा लाभ होणें शक्य नाही. बलहीनाला सत्याचा लाभ कदापि होत नसतो. म्हणून जी कोणती मत-प्रणाली माणसाचें मन दुबळें करते, माणसाला खुळचट बनविते, माणसांत विषाद भरते, माणसाला भलभलत्या अशक्य गोष्टींच्या मागे धावायला शिकविते, चमत्कारांच्या नादीं लावते ती मला मुळीच पसंत नाही, कारण तिचा परिणाम फार घातुक होतो. असल्या मतप्रणालींनी कधीच कुणाचें हित होत नाही; त्यांनी आपलीं मनें रोगट, विकृत होतात, आपलीं मनें दुबळीं होऊन जातात—— इतकीं की कालान्तराने आपण सत्याच्या आकलनास आणि जीवनांत तें आचरण्यास जवळजवळ अपात्रच होऊन जातों. म्हणून आपल्याला कोणत्या एकाच गोष्टीची आवश्यकता असेल तर ती म्हणजे बलाची. ह्या भवरोगावर बल हेंच एकमेव रामबाण औषध आहे. ज्या वेळीं श्रीमंत लोक गरिबांना आपल्या पायाखाली तुडवूं लागतात त्या वेळीं बल हेंच गरिबांच्या कामीं पडूं शकणारें एकमेव दिव्यौषध होय. ज्या वेळीं विद्वान् लोक अडाण्यांना दडपून टाकूं जातात त्या वेळीं बल हेंच अडाण्यांच्या कामीं पडेल असें एकमेव औषध होय. ज्या वेळीं पापी लोक इतर पापी लोकांच्या जुलुमांनी गांजले जातात त्या वेळीं बलच त्यांच्या कामीं पडूं शकण्यासारखें एकमेव महौषध होय. आणि हा अद्वैतवाद जितकें बल,

जितकी शक्ति प्रदान करतो तितकें बळ, तितकी शक्ति आणखी कशानेहि लाभूं शकत नाही. या अद्वैतवादाइतकें आपल्याला नीतिमान, नीतिपरायण करील असें आणखी कांहीहि नाही. ज्या वेळीं सगळीच्या सगळी जबाबदारी आपल्याच खांद्यावर पडते त्या वेळीं आपण जितक्या उच्च आणि उत्कृष्ट रीतीने काम करूं तितकें आणखी इतर कोणत्याहि परिस्थितींत करूं शकणार नाहीं. मी तुम्हां सर्वांना आव्हान देतों-- सांगा बघूं, मीं एखादें तान्हें मूल तुमच्या हातीं दिलें तर तुम्ही कसें वागाल ? तेवढ्या वेळेपुरतें तुमचें सारें जीवन बदलून जाईल; एरवी तुम्ही कसेहि असलांत तरी निदान तात्पुरतें तुम्हांला अगदी निःस्वार्थ होऊन जावें लागेल. तुमच्यावर सारी जबाबदारी टाकतांच तुमच्या गुन्हेगारीच्या नि पापाच्या साऱ्या वृत्ति मालवतील-- तुमची दानतच अजीबात बदलून जाईल. ह्याचप्रमाणे, जर सगळीच्या सगळी जबाबदारी आमच्याच खांद्यावर टाकण्यांत आली तर आमच्याठायींची सगळी श्रेष्ठता आणि सगळी उदात्तता पणास लागून व्यक्त होईल. ज्या वेळीं आसरा घ्यायला आम्हांला कोणी उरणार नाही, ज्या वेळीं आमचे दोष लादायला आम्हांला सैतान सापडणार नाही, ज्या वेळीं आमचा भार वाहायला आम्हांला सगुण ईश्वर मिळणार नाही, ज्या वेळीं केवळ आमचे आम्हीच साऱ्याला जबाबदार राहूं त्याच वेळीं आमच्यांत जें कांही उच्च आणि उदात्त आहे तें सारें प्रकट होईल. माझ्या दैवाला मीच जबाबदार आहें-- माझें भलें करणाराहि मीच आहें, माझें बुरें करणाराहि मीच आहें. मी स्वरूपतः शुद्ध, अपापविद्ध, आनंदघन आहें. ह्याच्या विरुद्ध असलेले सगळे विचार आपण धुतकारून दिले पाहिजेत. "मला मृत्यु नाही, मला भय नाही. मला जात नाही, मला पंथ नाही. मला माता नाही, पिता नाही, बंधु नाही, शत्रु-मित्र नाही. कारण मी अखंड, अनंत सत्-चित्-आनंद-स्वरूप आहें. मी आनंदमय आहें, मी आनंदमय आहें. पाप-पुण्य, धर्म-अधर्म, सुख-दुःख-- कांहीच मला बांधूं शकणार नाही. तीर्थ-यात्रेचें, शास्त्रग्रंथांचें, कर्मकांडाचें-- कशाचेंच बंधन मला नाही. क्षुधा आणि तृष्णा मला कधीच स्पर्शूं शकत नाहीत. हें शरीर माझें नव्हे, हें शरीर मी नव्हे, आणि म्हणूनच ह्या शरीराला ग्रासणारे क्लेश

आणि जन्म-जरा-मरणादि विकार मला कदापि शिवूं शकणार नाहीत. मी अखंड सच्चिदानंद आहें; मी आनंदस्वरूप आहें, मी आनंदस्वरूप आहें."†

वेदान्त म्हणतो की एकमेव हेंच उद्गान आपण गावयास हवें, एकमेव हाच उद्घोष आपण करावयास हवा, एकमेव हाच स्तव आपण अवलंबावयास हवा. आपण स्वरूपतः दिव्य आहोंत असें स्वतःला आणि इतरांना सांगत राहणें हाच सिद्धिलाभाचा एकमेव उपाय आहे—ह्याच एकमेव मार्गानें आपण आपल्या लक्ष्याप्रत जाऊन पोहोचूं शकूं. आणि आपण जसजसें हें म्हणत राहूं तसतसें बल येत जाईल, तसतशी आपल्यांत शक्ति संचरित होईल. पहिल्यापहिल्याने अडखळत चालणारा माणूस, चालतां चालतां पाय सबळ होऊन हळूहळू दृढ पावलांनी चालूं शकेल. 'शिवोऽहम्' 'शिवोऽहम्'— 'मी अखंड सच्चिदानंदस्वरूप आहें, मी अखंड सच्चिदानंदस्वरूप आहें' हा घोष हळूहळू अधिकाधिक जोमदार होत जाईल आणि अखेर त्यांतील सत्य आमच्या हृदयांत भिनेल, आमच्या नसानसांतून सळसळूं लागेल, आमच्या रंध्रारंध्रांतून स्फुरण पावूं लागेल. ज्ञानदिवाकराची मंगल प्रभा आमच्या जीवनांत जसजशी अधिकाधिक फाकूं लागेल तसतसा मोह विरून जाऊं लागेल, अज्ञानांधकाराच्या राशीच्या राशी अंतर्धान पावूं लागतील, आणि अखेर असा समय येईल की अविद्यातमाचा संपूर्ण विध्वंस करून ज्ञानरवि आमचें जीवन उजळीत आमच्या हृदयाकाशांत कायमचा तळपूं लागेल.

---

† श्रीशंकराचार्यकृत निर्वाणषट्क.

# विश्व

## (बहिर्जगत्)

(१९ जानेवारी १८९६ रोजीं न्यूयॉर्क येथे दिलेलें व्याख्यान)

सभोवताल नित्य किती सुंदर फुलोरा फुलत असतो ! किती मनोहर त्याचे रंग, किती मादक त्याचे गंध ! उगवता दिनमणि-- किती मोहक, किती सुभग त्याची ती तांबूस प्रभा ! आणि रंगीबेरंगी वेश ल्यालेली ही प्रकृति तरी किती रमणीय ! सारें विश्वच किती सुरेख आहे ! आणि ह्या वसुंधरेवर वास करावयास लागल्यापासूनच मानव हें सौंदर्य, ही सुषमा आस्वादीत आला आहे. गगनचुंबी पर्वत सागराच्या मीलनासाठी उतावीळ होऊन खळाळत वाहत जाणाऱ्या जलविपुल नद्या, कुणाच्याहि पावलांच्या खुणा स्वतःवर टिकूं न देणारीं अपरंपार वाळवंटें, असीम-अनंत समुद्र, नितळ निळ्या आभाळांत लुकलुकणारीं तारांगणें--सारेंकांही दिव्य, भव्य, उदात्त, भय-विस्मय-कारक आणि नितान्त सुंदर आहे ह्यांत शंकाच नाही ! आपण ज्याला प्रकृति किंवा निसर्ग म्हणतों तो वस्तुसमूह स्मरणातीत कालापासून मानवी मनावर असर करीत आला आहे. मानवाच्या विचारांना तो सतत चाळवीत आला आहे, आणि त्या साऱ्याचीच प्रतिक्रिया म्हणून ही पृच्छा उदयास आली आहे-- "हें सारें काय आहे ? हें सारें कुठून आलें ?" मानवाने रचलेले सर्वांत जुने ग्रंथ जे वेद, त्यांच्या अगदी प्रारंभींच्या भागाच्या त्या अति प्राचीनकाळीहि हाच प्रश्न विचारलेला आढळून येतो-- "हें सारें आलें तरी कुठून ? जेव्हा सत् नव्हतें किंवा असत्‌हि नव्हतें, अंधार हा अंधारांत छपून बसला होता, त्या वेळीं ह्या विश्वब्रह्माण्डाचें सृजन कुणीं केलें ? कसें केलें ? हें रहस्य कुणाला बरें अवगत आहे ?" आणि त्या तेव्हाचा तो हा प्रश्न आज थेट आपल्या-पर्यंत येऊन पोहोचला आहे. ह्या प्रश्नाला लाखो वेळां उत्तर देण्याचे

प्रयत्न झाले आहेत, आणि फिरून लाखो वेळां त्याला उत्तर देण्याचे प्रयत्न अजूनहि करावे लागतील. ह्या प्रश्नाला आजवर दिलेलें प्रत्येकच उत्तर चुकीचें होतें अशांतला अर्थातच भाग नाही. ह्या प्रश्नाला दिल्या गेलेल्या प्रत्येक उत्तरांत सत्याचा थोडा ना थोडा तरी अंश होताच, आणि जसजसा काळ लोटत आहे तसतसें तें सत्यहि अधिकाधिक सबल होत आहे. भारताच्या प्राचीन तत्त्वज्ञांकडून मला समजलेल्या ह्या प्रश्नाच्या उत्तराची रूपरेषा, मानवाच्या आधुनिक ज्ञानाशीं त्याची सांगड घालून तुम्हांला कथन करण्याचा मी प्रयत्न करीन.

अमळ सखोल विचार केल्यास आपल्याला आढळून येईल की, सर्वांत जुन्या अशा ह्या प्रश्नांतच त्याच्यांतील कित्येक मुद्यांचीं उत्तरेंहि अंतर्भूत आहेत. याप्रमाणे ह्या प्रश्नांतच अंतर्भूत असलेला पहिला मुद्दा हा की, असा एक समय होता की जेव्हा 'सत् नव्हतें किंवा असत्‌हि नव्हतें'—— म्हणजेच तेव्हा आपलें हें जगत् अस्तित्वांत नव्हतें; —— आपली ही धरणीमाता, हे उपसागर-महासागर, ह्या नद-नद्या, हे पहाड-पर्वत, हीं नगरें-ग्रामें, मनुष्य-पशु-पक्षी-वनस्पति, ग्रह-नक्षत्र-तारा—— हा सारा सृष्टीचा अनंतविध विचित्र पसारा अस्तित्वांत नव्हता असा एक समय होता. कशावरून ? हें आपण निश्चितपणें कशावरून म्हणूं शकतों ? हा सिद्धान्त कसा बांधला जातो हें आपण बघूं या. माणसाला सभोवताल काय दिसतें ? कोणतेंहि एखाद झाड घ्या. माणूस जमिनींत बी पेरतो. त्याला अंकुर फुटतो. पुढे तो हळूहळू जमिनींतून बाहेर डोकावून रोप बनतो. वाढतां वाढतां त्याचा एक प्रचंड वृक्ष तयार होतो. काळाच्या ओघांत पुढे अखेर तो वृक्ष मरतो—— मरतांना मागे ठेवून जातो केवळ बीज ! आपल्या जीवनप्रवासांत तो वृक्ष जणु एक वर्तुळ पूर्ण करीत असतो—— तो बीजांतून निघतो, झाड बनतो, आणि परत बीजांतच परिणाम पावतो. एखाद्या पक्ष्याकडे बघा. तो अंड्यांतून निपजतो, पक्षी होऊन जगतो, अखेर मरतो——मरतांना मागे ठेवून जातो दुसरीं कित्येक अंडीं——भावी पक्ष्यांचीं बीजें ! असेंच पशूंचेंहि आहे, असेंच मनुष्याचेंहि आहे. प्रकृतींतील प्रत्येक पदार्थाचाच जणु बीजापासून, मूल द्रव्यापासून,

सूक्ष्म आकारापासून प्रारंभ होतो, हळूहळू तो अधिकाधिक स्थूल होत राहून विकास पावत जातो, कांही काळ हें असें चालतें आणि मग तो फिरून त्या सूक्ष्म रूपांत विलीन होऊन जातो. सूर्यकिरणांनी चमकून सुंदर दिसणारा पावसाचा थेंब समुद्रांतून वाफेच्या रूपाने वर खेचला गेला होता, ती वाफ हवेंत खूप उंच गेली, त्या उंच प्रदेशांत तिचें पाणी झालें, तें या पावसाच्या थेंबाच्या रूपाने खाली आलें—फिरून त्याची वाफ बनेल. आपल्या सभोवताल विस्तारलेल्या प्रकृतींतील एकूणएक पदार्थांचें असेंच आहे. हिमशिला आणि नद्या प्रचंड पवर्तांवर कार्य करीत असतात, त्यामुळे ते पर्वत फुटून त्यांचा चुरा होत असतो, तें चूर्ण समुद्रांत वाहत जातें, तिथे तें समुद्रतळीं साचूं लागतें, त्याचे थरावर थर जमतात, ते खडकांसारखे टणक होतात, आणि अशा रीतीने भावी पिढ्यांचे पर्वत तयार होत राहतात. मग तेहि फिरून फुटून चूर्ण होतील. सतत हा असा प्रकार चालूं असतो. वाळूचे पर्वत बनतात आणि पर्वताची वाळू होते. स्मरणातीत कालापासून हें असेंच चाललें आहे. हाच मानवाचा समग्र इतिहास आहे, हाच प्रकृतीचा समग्र इतिहास आहे, हाच जीवनाचा समग्र इतिहास आहे.

अस्तु. प्रकृति सर्वत्र, सर्वदा एकाच पद्धतीने कार्य करीत असते हें जर खरें असेल; वाळूचा एक इवलासा कण ज्या तऱ्हेने आणि ज्या नियमांनी निर्माण झाला त्याच तऱ्हेने आणि त्याच नियमांनी चंद्र-सूर्य-तारादि प्रचंड ज्योतिर्गोलांनी भरलेलें हें समस्त विश्वब्रह्मांड निर्माण झालें आहे हें जर खरें असेल,— आणि तें खरें असावें, कारण अजूनपर्यंत मानवाला त्याविरुद्ध कधीहि व कांहीहि अनुभव आलेला नाही; एखादा अणु ज्या प्रक्रियेने घडला आहे, हुबेहुब त्याच प्रक्रियेनुसार अवघें विश्व उभारलें गेलें आहे हें जर खरें असेल; एकच नियम सगळ्या विश्वभर सर्वत्र लागू पडत असतो हें जर खरें असेल, तर वेदांनी म्हटल्याप्रमाणे "मातीच्या एका ढेकळाचें ज्ञान झाल्याने विश्वांतील साऱ्याच्या साऱ्या मातीचें आपल्याला ज्ञान होऊं शकतें." एखादें लहानसें झाड घेऊन त्याच्या जीवनेतिहासाचें जर आपण अनुशीलन केलें तर ह्या अवघ्या विश्वब्रह्माण्डाचें स्वरूप आपल्याला कळून येईल.

एखाद्या वाळूच्या कणाचें स्वरूप जर आपण जाणून घेतलें तर ह्या समस्त विश्वब्रह्माण्डाचें रहस्य आपल्याला अवगत होईल. हीच तर्क-पद्धति जगांतील सर्व गोष्टींना लागू केली तर प्रथमतःच आपल्याला आढळून येईल की, सर्वच गोष्टी प्रारंभीं आणि अंतीं, सुरवातीला आणि शेवटीं जवळजवळ सारख्याच दिसतात. पर्वत वाळूंतून निर्माण होतो आणि परत वाळूंत लय पावतो, नदी वाफेंतून निर्माण होते आणि परत वाफेंत लय पावते, वृक्ष बीजांतून निर्माण होतो आणि परत बीजांत लय पावतो, मानवजीवन मनुष्यबीजांतून निर्माण होतें आणि परत मनुष्यबीजांत लय पावतें. हें ग्रह-नक्षत्रयुक्त विश्व एका तेजाळ बाष्पमय अवस्थेंतून (nebulous state मधून) निर्माण झालें आहे आणि परत त्या अवस्थेंतच लय पावणार आहे. यावरून आपण काय शिकूं शकतों ? हेंच की, व्यक्त अथवा स्थूल अवस्था ही 'कार्य' असते, आणि सूक्ष्म अवस्था ही तिचें 'कारण' असतें.

समस्त तत्त्वज्ञानाचे थोर जनक महर्षि कपिल यांनी हजारो वर्षांपूर्वी हें सप्रमाण सिद्ध केलें आहे की—"नाशः कारणलयः"—विनाश म्हणजे कारणांत लय पावणें होय. ह्या समोरच्या टेबलाचा विनाश केला तर तो स्वतःच्या कारणांत लय पावेल,— ज्या सूक्ष्म रूपांच्या आणि परमाणूंच्या संयोगानें हा टेबल नामक पदार्थ निर्माण झाला आहे त्यांत परत त्याचा लय होऊन जाईल. माणूस जेव्हा मरतो तेव्हा, ज्या भूतसामग्रीनें त्याचा देह बनला होता त्यांत त्याचा लय होतो. ह्या पृथ्वीचा जर नाश होईल तर, ज्या पंचमहाभूतांनी तिला आकार दिला आहे त्यांच्यांत तिचा परत लय होऊन जाईल. ह्यालाच म्हणतात नाश—कारणलय— फिरून कारणांत लय पावणें. यावरून आपण हेंच शिकलों की कार्य हें स्वतःच्या कारणाशीं अभिन्न असतें, त्यांच्यांत भेद मुळीच नसतो—'कारणा'च्या एका रूपान्तराचेंच नांव 'कार्य' होय. ज्या सामग्रीनें हा कांचेचा प्याला बनला आहे तें कारण होय, हा कांचेचा प्याला हें कार्य होय—तें कारणच ह्या कार्याच्या रूपानें सध्या आपल्या-समोर अस्तित्वांत आहे. कांच नांवाचें थोडेसें द्रव्य आणि त्यांतून हा प्याला घडविणाऱ्याच्या हातांतली शक्ति हीं ह्या कांचेच्या प्याल्याचीं कारणें होत. पहिल्याला म्हणतात 'उपादान' कारण आणि दुसऱ्याला

म्हणतात 'निमित्त' कारण. ह्या दोहोंच्या संयोगानें हें कांचेचा प्याला नामक रूप बनलें आहे. ह्या कांचेच्या प्याल्यांत त्याचीं तीं उपादन आणि निमित अशीं दोन्हीं कारणें वर्तमान आहेत. हा प्याला बनविणाऱ्याच्या हातांतली शक्ति ह्या प्याल्यांत संहतिशक्तीच्या वा चिकटण्याच्या शक्तीच्या स्वरूपांत अस्तित्वांत आहे, एरवी त्या चिकट-शक्तीच्या अभावी ह्या प्याल्यांतील सगळे कण एकमेकांपासून विलग होऊन गेले असते. हें झालें 'निमित्त' कारण. त्याचप्रमाणे ह्या प्याल्याचें 'उपादान' कारण म्हणजे कांच-द्रव्यहि ह्यांत विद्यमान आहेच. हा प्याला म्हणजे त्याच सूक्ष्म कारणांची एका नूतन आकारांत अभिव्यक्ति होय, आणि आपण जर हा प्याला फोडून त्याचा चुरा करून टाकला तर ज्या शक्तीमुळे ह्याच्यांतील सर्व कण एकत्र चिकटून होते ती शक्ति फिरून स्वतःच्या उपादानांत विलीन होईल, आणि कांच-द्रव्याचे कण, त्यांना कोणी फिरून नवा आकार देत नाही तोंपर्यंत तसेच पडून राहतील.

यावरून आपल्याला दिसून येतें की कार्य हें कारणाहून कधीच भिन्न नसतें. कार्य ही त्या कारणाचीच स्थूल स्वरूपांत केवळ नव-अभिव्यक्ति असते. असो. ह्याखेरीज ह्या साऱ्यावरून आपण आणखी एक गोष्ट शिकलों ती ही की, ज्यांना आपण वृक्ष-लता, पशु-पक्षी वा माणसें म्हणतों त्या ह्या विशिष्ट विशिष्ट रूपांची अनादि-कालापासून उत्थान-पतनात्मक गतीने फिरफिरून पुनरावृत्ति होत आहे. बीजांतून झाड निघतें. त्या झाडापासून बीज होतें. त्या बीजापासून आणखी एक झाड होतें. फिरून बीज, फिरून वृक्ष. हें असें अगदी एकसारखें चाललें आहे. त्याला कांही अंत नाही. पाण्याचे बिंदु पहाडावरून ओघळून समुद्राला जाऊन मिळतात, तिथे त्यांची वाफ होऊन ते वर जाऊन फिरून पहाडावर पडतात, तेथून मग फिरून खाली ओघळून समुद्राला जाऊन मिळतात. वर जाणें, खाली येणें—उत्थान आणि पतन—अशा गतीने युगें लोटत आहेत. सर्व जीवनांचें हें असेंच आहे; आपण पाहूं शकतों, अनुभवूं शकतों, ऐकूं शकतों वा कल्पना करूं शकतों अशा अस्तित्वांत असलेल्या प्रत्येक गोष्टीचें हें असेंच आहे. आमच्या ज्ञानाच्या कक्षेंत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचें

असेंच आहे-- मनुष्यदेहांतील श्वास-उच्छ्वासासारखी गति--येणें आणि जाणें, जाणें आणि येणें. ह्या सृष्टींतील प्रत्येक गोष्टीचा हाच प्रकार आहे--एक लाट उठते, दुसरी कोसळते, फिरून उठते, फिरून कोसळते. प्रत्येक लाटेबरोबरच एक खाई असते, आणि प्रत्येक खाई-बरोबरच एक लाट असते. समस्त विश्वब्रह्माण्डाला एकच नियम लागू असला पाहिजे, कारण समस्त विश्व हें सर्वत्र समरूप (uniform) आहे. म्हणून हें समस्त विश्वब्रह्माण्ड केव्हातरी स्वतःच्या कारणांत विलीन झालेंच पाहिजे; सूर्य, चंद्र, तारा, पृथ्वी, शरीरें, मनें--ह्या विश्वब्रह्माण्डांत अस्तित्वांत असलेलें सर्वकांही स्वतःच्या सूक्ष्म कार-णांत लय वा अंतर्धान पावलेंच पाहिजे--वरवर पाहतां त्याचा जणु विनाश हा झालाच पाहिजे. तथापि तें सारें स्वतःच्या कारणांत सूक्ष्म रूपानें अवस्थित राहील. आणि पुढे यथाकाल तें सारें त्या सूक्ष्म रूपांतून फिरून बाहेर पडेल--फिरून नव्यानें पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारा इत्यादि सारें विश्वब्रह्माण्ड प्रसूत होईल.

ह्या उत्थान-पतनासंबंधी आणखी एक गोष्ट जाणून घेण्यासारखी आहे. बीजांतून झाड उपजतें. तें कांही अगदी तात्काळ झाड बनत नाही. कांही काळ तें विश्रांतीच्या किंवा अत्यंत सूक्ष्म अशा अव्यक्त क्रियेच्या अवस्थेंत राहतें. त्या बीजाला (झाड होण्यापूर्वी) कांही काळ जमिनीच्या खाली कार्य करावें लागतें. तिथे (जमिनीच्या खाली) तें फुटून त्याचे तुकडेतुकडे होऊन जातात, त्याची जणु अवनति होऊन जाते, आणि मग त्या अवनतींतून त्याची परत उन्नति होऊं लागते. तद्वतच, ह्या समस्त विश्वब्रह्माण्डालाहि, जिला प्रलय किंवा सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीची अवस्था म्हणतात तींत कांही काळ सूक्ष्म रूपांत अदृश्य-पणें आणि अव्यक्तपणें कार्य करावें लागतें, आणि मग फिरून नव्यानें सृष्टि निर्माण होते. ह्या विश्वब्रह्माण्डाच्या एका अभिव्यक्तीच्या संपूर्ण काळाला, म्हणजेच त्याचें सूक्ष्म स्वरूपांत लय पावणें, त्याच स्थितींत कांही काल राहणें आणि मग फिरून प्रकट होणें या सर्वांना मिळून संस्कृतभाषेंत 'कल्प' म्हणतात. समस्त विश्वब्रह्माण्ड सारखें या कल्पांच्या गतीनें चाललें आहे.

येथे एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. आधुनिक

काळाच्या दृष्टीने तर ह्या प्रश्नाचें महत्त्व विशेषच आहे. आपण बघितलें आहे की, सूक्ष्म रूपें हळूहळू विकसित होत जाऊन, व्यक्त होत जाऊन त्यांना अधिकाधिक स्थूल स्वरूप प्राप्त होत असतें. आपण बघितलें आहे की, कारण आणि कार्य हीं अभिन्न असतात––कार्य हें कारणाचेंच केवळ दुसरें रूप असतें. आणि म्हणून हें ओघानेच आलें की, हें समस्त विश्वब्रह्माण्ड 'कांही नाहीं'तून वा शून्यांतून प्रसूत होणें कदापि शक्य नाही. कारणाखेरीज कोणतेंहि कार्य निर्माण होणें शक्य नाही, नव्हे, कारणच दुसरें एक रूप धारण करून कार्य बनत असतें.

आता प्रश्न आहे की, मग हें ब्रह्माण्ड कशापासून प्रसूत झालें आहे? ह्या प्रश्नाला अर्थातच असें उत्तर द्यावें लागेल की, तें त्याच्याआधीच्या सूक्ष्म ब्रह्माण्डापासून उत्पन्न झालें आहे. मनुष्य कशांतून उत्पन्न झाला आहे? आधीच्या सूक्ष्म रूपांतून. वृक्ष कशापासून उत्पन्न झाला आहे? बीजापासून. आजचा हा समस्त वृक्ष त्या बीजांत विद्यमान होता. तो त्या बीजांतून बाहेर आला––व्यक्त झाला, इतकेंच. ह्याचप्रमाणे, हें समस्त ब्रह्माण्ड स्वतःच्याच सूक्ष्मावस्थेंतून प्रसूत झालें आहे. आता तें व्यक्त झालें आहे, इतकेंच. हें फिरून त्या सूक्ष्म रूपांत लय पावेल आणि मग फिरून व्यक्त होईल. यावरून आपल्याला हें दिसून येतें की, सूक्ष्म रूपें व्यक्त होऊन अधिकाधिक स्थूल बनत जातात, होतां होतां अखेर त्यांच्या ह्या स्थूल बनण्याची कमाल मर्यादा गाठली जाते, आणि असें झाल्यावर मग हीं स्थूल रूपें पलटी खाऊन पुन्हा सूक्ष्म सूक्ष्म होऊं लागतात. हें सूक्ष्मामधून प्रकट होणें, हळूहळू अधिकाधिक स्थूल स्थूल होत जाणें, जणु त्यांच्या अंगविभागांची वा अवयवांची नुसती मांडणी बदलणें––ह्यालाच आधुनिक काळांत 'Evolution' वा 'क्रमविकास' असें म्हटलें जातें. आणि तें अगदी खरें आहे, संपूर्णतया खरें आहे; आपण स्वतःच्या जीवनांत हें प्रत्यक्षच बघत असतों. तर्कनिष्ठ, विचारवंत असा कुणीहि इसम ह्या क्रमविकासवाद्यांशीं भांडायला उभा होईल हें संभवनीय वाटत नाही. परंतु आपण आणखी एक गोष्ट जाणून घेतली पाहिजे. आपण ह्या क्रमविकासवाद्यांच्या एक पाऊल पुढे गेलें पाहिजे. म्हणजे काय? म्हणजे असें की, आपण हें जाणावयास हवें की, प्रत्येक क्रमविकासाच्या

आधी एक क्रमसंकोच होऊन गेलेला असतो. आधी क्रमसंकोच आणि मग क्रमविकास अशी ही संपूर्ण प्रक्रिया आहे. बीज हें वृक्षाचें जनक खरें, पण दुसरा एक वृक्ष त्या बीजाचा जनक होता. बीज हें एक सूक्ष्म रूप असून त्यांतून एक प्रचंड वृक्ष क्रमविकसित झाला आहे खरा, परंतु दुसरा एक प्रचंड वृक्ष क्रमसंकुचित होऊनच तें बीज बनलें आहे हेंहि तितकेंच खरें नाही काय ? तद्वतच, हें समस्त विश्वब्रह्माण्ड उत्पत्तीपूर्वीच्या त्या विराट सूक्ष्मावस्थेंत विद्यमान होतें, हें स्थूल ब्रह्माण्ड त्या सूक्ष्म ब्रह्माण्डाच्या रूपानें होतें. ज्या इवल्याशा जीव-पेशीचा पुढे माणूस होतो तींत तो माणूस आधीचा क्रमसंकुचित असतो आणि मग मनुष्यरूपानें हळूहळू क्रमविकसित होतो. क्रमविकासवादी जर हें मान्य करतील तर मग आमचा त्यांना मुळीसुद्धा विरोध उर-णार नाही, कारण, ते जर ही क्रमसंकोचाची प्रक्रिया मानतील तर मग धर्माचे विध्वंसक ठरण्याऐवजी ते उलट धर्माचे सगळ्यांत श्रेष्ठ पाठीराखे बनतील ! तें कसें हें आपण पुढे यथासमय बघूंच.

असो तर, आतापर्यंत आपण हें बघितलें की, 'कांही नाहीं'तून वा शून्यांतून 'कांहीतरी' उत्पन्न झालें अशा अर्थानें ही सृष्टि 'उत्पन्न' झाली असणें शक्य नाही. सर्वच गोष्टी अनंत कालापासून आहेत आणि अनंतकाल राहतील. मात्र साऱ्याची गति लाटेसारखी आहे—एकदा उसळायचें तर एकदा कोसळायचें. सूक्ष्म, अव्यक्त अवस्थेंत लय पावावयाचें, फिरून स्थूल रूपानें व्यक्त व्हावयाचें. हें अव्यक्तावस्थेंत निर्गमन आणि व्यक्तावस्थेंत पुनरागमन—हें क्रमसंकोचन आणि फिरून क्रमविकसन साऱ्या प्रकृतिभर सर्वत्र चालूं आहे. याप्रमाणे क्रमविकासाच्या आधी क्रमसंकोच हा विद्यमान असतोच ह्या आपण आतापर्यंत सिद्ध केलेल्या नियमानुसार विचार केल्यास काय निष्पन्न होतें ? हेंच की, अगदी निकृष्ट जीवाणूपासून तों पूर्णमनुष्यरूपी सर्वोच्च जीवापर्यंतची संपूर्ण साखळी ही 'कशा'चा तरी क्रमसंकोच आहे, आणि तें क्रमसंकु-चित 'कांहीतरी'च मग पुढे अगदी निकृष्ट जंतूपासून तों पूर्णमनुष्यरूपी उत्कृष्ट जीवापर्यंतच्या साखळीच्या रूपानें हळूहळू क्रमविकसित होत गेलें. आता प्रश्न आहे की, अशा रीतीनें क्रमसंकुचित झालेलें तें 'कांहीतरी' म्हणजे काय ? काय क्रमसंकुचित झालें होतें ? ह्याला

उत्तर आहे-- तें 'कांहीतरी' म्हणजे ईश्वर होय ! ईश्वरच तिथें क्रमसंकुचित झाला होता. यावर क्रमविकासवादी आम्हांला म्हणतील की, "तिथें ईश्वर क्रमसंकुचित झालेला होता हें तुमचें म्हणणें चूक आहे. कसें तें बघा. तुम्ही म्हणतां की ईश्वर हा चित्स्वरूप वा चैतन्य आहे, परंतु ह्या क्रमविकासाच्या प्रक्रियेंत चैतन्य हें तर फार उशीरा प्रकट होत असल्याचें आढळून येतें. फक्त वरच्या दर्ज्याचे प्राणी आणि मनुष्य यांच्याठिकाणींच चैतन्याचा आढळ होतो, परंतु या जगांत ह्या चैतन्याचा आविर्भाव होण्यापूर्वी कोटचवधि वर्षांचा काल लोटला आहे. त्या प्रदीर्घ कालावधींत जगांत चैतन्याचा आविष्कार नव्हता. सर्वकांही जडच होतें." क्रमविकासवाद्यांच्या या आक्षेपाचें आपल्या 'क्रमसंकुचन आणि क्रमविकसन' सिद्धान्ताच्या अनुरोधानें परीक्षण केल्यास त्यांच्या म्हणण्यांत कांहीच अर्थ नसल्याचें आपल्याला आढळून येईल. आपण बघितलेंच आहे की, झाड बीजांतून उपजतें आणि परत बीजांत लय पावतें; म्हणजेच त्याची सुरुवात आणि शेवट हीं सारखींच असतात. स्वतःच्या कारणांतून पृथ्वी उत्पन्न होतें आणि त्यांतच लय पावतें. सर्वंच वस्तूंना हें लागू आहे-- त्यांचा आरंभ आणि अखेर हीं सारखीं असतात. यांतून निष्पन्न होतें ? हेंच की, आपण जर एखाद्या वस्तूचा प्रारंभ जाणून घेऊं शकलों तर तिचा शेवटहि आपण जाणूं शकूं. आणि, उलट, तिचा शेवट जर आपण जाणून घेऊं शकलों तर तिचा प्रारंभहि आपण जाणूं शकूं. असेंच जर असेल तर प्रारंभींच्या जीवरसापासून वा जीवबीजापासून तों अंतींच्या पूर्णमनुष्यापर्यंतची ही एका अखंड जीवनप्रवाहांतील क्रमविकासी समग्र परंपरा घ्या. ह्या परंपरेच्या वा साखळीच्या शेवटीं आपल्याला पूर्णमानव आढळतो, म्हणून तिच्या प्रारंभींहि तो विद्यमान असलाच पाहिजे. कारण प्रारंभ आणि शेवट हीं अगदी सारखींच असतात हें आपण बघितलेंच आहे. म्हणून तें प्रारंभींचें जीवबीज ही उच्चतम चैतन्याची क्रमसंकुचितावस्था होय हें मानावयासच हवें. हें सारें आपल्याला स्पष्टपणें दिसावयाचें नाही, तरीपण वस्तुतः तें क्रमसंकुचित चैतन्यच स्वतःला हळूहळू अभिव्यक्त करीत असून, तें पूर्णमनुष्याच्या रूपानें व्यक्त होईपर्यंत त्याची ही अभिव्यक्त होण्याची क्रिया अशीच

चालत राहील. हें तत्त्व गणिताच्या साहाय्याने देखील सुनिश्चितपणें सप्रमाण सिद्ध करतां येईल. ह्या विश्वांतील एकूण शक्ति कधी वाढतहि नाही आणि कधी कमीहि होत नाही हा शक्तीच्या चिरंतन-त्वाचा नियम ( Law of conservation of energy ) जर खरा असेल तर हें मानावयासच हवें की, एखाद्या यंत्रांत शक्ति आधी प्रविष्ट केल्याखेरीज त्या यंत्राकडून तुम्हांला कांहीहि काम मिळावयाचें नाही. एखाद्या इंजिनांत तुम्ही पाणी आणि कोळसा यांच्या रूपाने जितकी शक्ति प्रविष्ट कराल तितकेंच कार्य त्याच्याकडून तुम्हांला मिळू शकेल-- थोडेंहि कमी नाही किंवा थोडेंहि जास्त नाही. मीं माझ्या शरीरांत अन्न, हवा आणि इतर पदार्थांच्या रूपाने जेवढी शक्ति प्रविष्ट केली आहे तेवढेंच काम करण्यास मी समर्थ आहें. एक शक्ति रूप बदलून फक्त दुसऱ्या स्वरूपांत व्यक्त होत असते, इतकेंच. ह्या विश्वाच्या एकंदर व्यवस्थेंत आपण जडाच्या एका कणाची किंवा शक्तीच्या एका बिंदूचीहि भर घालूं शकणार नाहीं किंवा त्यांतून एक कण जड किंवा एक बिंदु शक्ति कमीहि करूं शकणार नाहीं. असेंच जर असेल तर मग हें चैतन्य काय आहे ? तें जर त्या प्रारंभींच्या जीवबीजांत विद्यमान नसेल तर मग तें क्रमविकासाच्या प्रक्रियेंत पुढे अगदी आंगतुकपणें अचानक कुठूनतरी आलें असेंच म्हणावें लागेल; पण असें म्हणणें म्हणजे 'कांही नाहीं' तून वा असतांतून 'कांहीतरी' वा सत् निर्माण झालें असें म्हणण्यासारखें आहे, परंतु असें म्हणणें वेडगळ-पणाचें होय. म्हणून यावरून हें अगदी निःसंदेहपणें सिद्ध होतें की, क्रमविकासपरंपरेच्या दुसऱ्या टोकाला असलेला पूर्ण मानव, मुक्त मानव, देवमानव, प्रकृतीच्या समस्त नियमांच्या पलीकडे गेलेला मानव, साऱ्याच्या अतीत गेलेला मानव, ज्याच्यापक्षीं ही क्रमविकासाची प्रक्रिया कायमची थांबली आहे असा मानव, जन्म आणि मृत्यु उल्लंघून गेलेला मानव, ख्रिश्चन ज्याला 'ख्रिस्तमानव' म्हणतात तो मानव, बौद्ध ज्याला 'बुद्धमानव' म्हणतात तो मानव, योगी ज्याला 'मुक्तमानव' म्हणतात तो मानव--सारांश, असा तो पूर्णत्व पावलेला मानव हा त्याच क्रमविकासपरंपरेच्या पहिल्या टोकाला असलेल्या जीवबीजांत क्रमसंकुचितावस्थेंत विद्यमान होताच होता.

हाच तर्क, हाच सिद्धान्त समस्त विश्वब्रह्माण्डाला लागू केल्यास दिसून येतें की, चैतन्यच ह्या सृष्टीचें कारण असलें पाहिजे, तिचें नियामक असलें पाहिजे. माणसाची ह्या विश्वासंबंधी पूर्णविकसित, सर्वांत प्रगत कल्पना काय आहे ? हीच की, ह्या विश्वाच्या एका भागाचा दुसऱ्या भागाशीं मेळ आहे, सर्व भागांचा एकमेकांशीं मेळ आहे, ह्या विश्वाच्या घडामोडींमागे बुद्धि आहे, चैतन्य आहे--म्हणजेच हें विश्व कुण्यातरी चेतनाने घडविलें असलें पाहिजे. प्राचीन 'सहेतुकत्व वाद' (ईश्वराने कांही विशिष्ट हेतूने वा उद्देश्याने योजनापूर्वक ही सृष्टि उत्पन्न केली आहे असें मत--Design Theory ) हा हीच कल्पना व्यक्त करण्याचा एक प्रयत्न होता. म्हणून, प्रारंभीं चैतन्य होतें, चैतन्यच ह्या सृष्टीचें आदिकारण होय. सुरवातीस तें चैतन्य क्रमसंकुचित होऊन जातें आणि तेंच हळूहळू क्रमविकसित होत जातें. आणि म्हणूनच, ह्या विश्वांत आज अभिव्यक्त असलेलें एकूण चैतन्य म्हणजे सुरुवातीस क्रमसंकुचित झालेल्या त्या सर्वव्यापी चैतन्याचीच केवळ अभिव्यक्ति होय. ह्या सर्वव्यापी, विश्वजनीन चैतन्यालाच आम्ही 'ईश्वर' म्हणतों. वाटल्यास तुम्ही त्याला खुशाल दुसरें एखादें नांव द्या, परंतु हें मात्र अगदी निश्चित की, प्रारंभीं तें अनंत, विश्वव्यापक चैतन्य होतें. तें विश्वजनीन चैतन्य सुरुवातीस क्रमसंकुचित होऊन जातें, आणि मग तें हळूहळू अभिव्यक्त होऊं लागतें, क्रमविकसित होत जातें. आणि तें अखेर पूर्ण मानवाच्या, 'ख्रिस्त-मानवा'च्या 'बुद्ध-मानवा'च्या रूपांत व्यक्त होईपर्यंत त्याची ही क्रमाभिव्यक्ति, त्याचा हा क्रमविकास चालू राहतो. अशा रीतीने मग तें स्वतःच्या उत्पत्तिस्थानीं परत जातें--स्वस्वरूपास प्राप्त होतें. म्हणूनच सर्व शास्त्रें म्हणत असतात--"आपण त्याच्यांतच जगतों, त्याच्यांतच वावरतों, त्याच्यांतच अस्तित्वांत असतों." म्हणूनच सर्व शास्त्रें प्रतिपादीत असतात की, "आपण ईश्वरापासूनच उत्पन्न झालों आहोंत आणि ईश्वरांतच परत जाणार आहोंत." पारिभाषिक शब्दांनी तुम्ही भिऊन जाऊं नका. पारिभाषिक संज्ञा जर तुम्हांला भिववूं शकतील तर मग तुम्ही तत्त्वज्ञ बनण्यास पात्र नाही असेंच म्हणावें लागेल. ब्रह्मवादी ह्या विश्वव्यापक चैतन्यालाच 'ईश्वर' म्हणतात.

मला पुष्कळ वेळां विचारण्यांत आलें आहे की, "तुम्ही हा जुनाट 'ईश्वर' (God) शब्द कां वापरत असतां ?" ह्याला माझें उत्तर असें आहे की, ह्या विश्वव्यापी चैतन्याचा निर्देश करण्यासाठी जितके म्हणून शब्द उपयोगांत आणले गेले आहेत त्या सर्वांत 'ईश्वर' हाच सगळ्यांत चांगला, सगळ्यांत समर्पक शब्द आहे; आपला आशय व्यक्त करण्यासाठी तोच सर्वोत्तम शब्द आहे. त्यासाठी त्याच्यापरीस चांगला शब्द तुम्हांला शोधूनहि सापडणार नाही, कारण मानवाच्या समस्त आशा, समस्त आकांक्षा आणि समस्त सुख हीं या एका शब्दांत केंद्रित झालीं आहेत. आता तो शब्द बदलणें अगदी अशक्य आहे. हे असले शब्द ज्या संतमहात्म्यांनी घडविले त्यांना त्यांच्या अर्थाचा आणि तात्पर्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार झालेला होता. हळूहळू ते शब्द समाजांत प्रचलित झाले, अज्ञ लोक त्यांचा उपयोग करूं लागले आणि परिणामीं त्या शब्दांच्या गर्भितार्थाचा आणि माहात्म्याचा लोप झाला. हा 'ईश्वर' शब्द अगदी स्मरणातीत कालापासून वापरला जात आहे आणि ह्या विश्वव्यापी चैतन्याची कल्पना त्याच्याशीं निगडित होऊन गेली आहे, जें कांही थोर आहे आणि जें कांही पवित्र आहे तें सारें त्या शब्दाशीं निगडित होऊन गेलें आहे. कुणी एकजण मूर्ख तो शब्द बरोबर नाही असें म्हणतों एवढ्यावरूनच आपण तो फेकून द्यावयाच असें तर नाही ना ? मग दुसरा कुणी ढुढ्ढाचार्य उभा होईल आणि म्हणेल की 'माझा' शब्द घ्या आणखी कुणी उपटसुंभ उपटेल नि म्हणेल की 'माझा' शब्द घ्या. अशाने असल्या मूर्खपणाच्या अर्थहीन शब्दांना तर कांही अंतच राहावयाचा नाही. म्हणून मी म्हणतों की, ह्या जुन्या शब्दाचाच उपयोग करा, फक्त त्याच्या खऱ्या अर्थाने त्याचा उपयोग करा; त्यावर चढलेलें खुळचट समजुतींचें किटण दूर करा आणि ह्या प्राचीन महान् शब्दाचा खराखरा अर्थ नीट उमजून घ्या. कांही मानसिक नियमांनुसार आपल्या मनांत एका विचारावरून दुसरे कित्येक विशिष्ट विचार उद्भवत असतात; ह्याला म्हणतात विचारांचें साहचर्य (Association of Ideas). ह्या विचारांच्या साहचर्याच्या शक्तीची जर तुम्हांला कल्पना असेल तर तुम्हांला हें पटेल की, हे असले शब्द असंख्य भव्य, दिव्य, उदात्त, महिमाशाली नि ओजस्वी

भावांशीं निगडित असतात. कोटी कोटी लोक त्यांचा उपयोग करीत असतात, कोट्यवधि लोक त्यांची पूजा करीत असतात, आणि जें कांही श्रेष्ठ नि उत्कृष्ट आहे, जें कांही तर्कसंगत आहे, जें कांही लोभसवाणें आहे, मानवस्वभावांत जें कांही महान् नि ऊर्जस्वल आहे, तें सारें त्या शब्दांशीं संबद्ध करून टाकीत असतात. आणि म्हणून त्या शब्दांनी हृदयांत हे असले राजसवाणे भाव उद्दीपित होत असतात, आणि म्हणूनच आपण ते शब्द कदापि टाकून देऊं शकणार नाहीं. अस्तु. 'ईश्वराने हें विश्व निर्माण केलें आहे' एवढेंच तुम्हांला सांगून जर मी हें सारें व्यक्त करण्याचा प्रयत्न केला असता तर तुम्हांला त्यापासून कांहीच अर्थबोध झाला नसता. आणि तरीहि, ह्या सर्व तर्कविचारांनंतर, ह्या एवढ्या विश्लेषण-विवरणाच्या खटपटीनंतर आपण परत त्या अनंतकोटी-ब्रह्माण्डनायक आदि पुरुषानिकट-- त्या पुराण पुरुषोत्तमानिकटच येऊन पोहोचलों आहोंत.

सारांश, आपण बघितलें की जडद्रव्य, विचार, शक्ति, मन, चेतना प्रभृति वैश्विक शक्तीचीं समस्त भिन्नभिन्न रूपें हीं त्या विश्वव्यापक चैतन्याचेच विभिन्न आविष्कार होत. त्या विश्वचैतन्याला आपण आता यापुढे 'परम पुरुष' वा 'प्रभु' म्हणूं. आपण जें कांही बघतों, ऐकतों, अनुभवतों तें सारें--थोडक्यांत म्हणजे हें समस्त विश्वब्रह्माण्ड त्याचेंच 'सृजन' आहे--अधिक कांटेकोरपणें म्हणावयाचें म्हणजे त्याचाच 'परिणाम' आहे--किंवा याहिपेक्षा अधिक कांटेकोरपणें सांगावयाचें म्हणजे तो प्रभु 'स्वतःच' हें सारेंकांही आहे. चंद्र-सूर्य-तारांच्या रूपाने तो प्रभुच प्रकाशत आहे, आमची ही धरणीमाताहि तोच आहे, तिला वलयांकित करणारे हे समुद्रहि तोच आहे. पर्जन्याच्या रूपाने होणारा हा जलधारांचा नाजुक वर्षाव, आपण श्वासाने आंत घेऊन ज्याच्यावर जगतों तो हा मृदुमंद पवन, आपल्या शरीरांत सतत स्पंदणारी शक्ति, हें सारेंकांही तोच आहे. तोच वक्ता, तोच वक्तृत्व, आणि तोच येथे उपस्थित असलेले तुम्ही श्रोते. मी ज्या व्यासपीठावर उभा राहून बोलत आहें तें हें व्यासपीठ, ज्याच्या मदतीने मी तुमचे चेहरे बघूं शकतों तो हा प्रकाश--हें सारेंहि तो प्रभुच आहे. सारेंकांही तोच आहे. तोच ह्या अखिल विश्वब्रह्माण्डाचें उपादानकारण

आणि निमित्तकारण आहे. तोच एकीकडे लहानशा जीवकोषांत क्रमसंकुचित होतो आणि मग क्रमविकसित होत होत दुसऱ्या टोकाला फिरून ईश्वराच्या रूपाने प्रकट होतो. तोच खालच्या पातळीवर उतरून यःकश्चित् अणुरेणु बनतो आणि मग हळूहळू निज-रूप प्रकट करीत करीत अखेर स्वतःशीं फिरून युक्त होऊन जातो. हें आहे ह्या विश्वाचें रहस्य --

"त्वं स्त्री त्वं पुमानसि, त्वं कुमार उत वा कुमारी ।
त्वं जीर्णो दंडेन वंचसि, त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ।।"

--"तूंच पुरुष आहेस, तूंच स्त्री आहेस. रसरसत्या यौवनाच्या मदाने ताठून चालणाऱ्या युवक-युवतीहि तूंच आहेस, आणि काठीच्या आस-ऱ्याने कांपऱ्या पायांनी अडत-अडखळत जाणारा जराजर्जर वृद्धहि तूंच आहेस. सर्व वस्तूंत तूंच आहेस. प्रभो, तूंच सर्वकांही आहेस." † मानवी बुद्धीचें समाधान करूं शकेल अशा रीतीने ह्या विश्वब्रह्माण्डाच्या कोड्याचा उलगडा करूं शकणारें हें एकच स्पष्टीकरण आहे. एका वाक्यांत सांगावयाचें म्हणजे, आपण त्याच्यापासूनच जन्मतों, त्याच्यां-तच जगतों आणि परत जाऊन त्याच्यांतच विलीन होतों.

---

† श्वेताश्वतर उपनिषद् ४, ३.

# विश्व

## (अंतर्जगत्)

(२६ जानेवारी १८९६ रोजीं न्यूयॉर्क येथे दिलेलें व्याख्यान)

मानवी मन स्वभावत:च बाहेर जाऊं इच्छितें,त्याला जणु सदान् कदा ह्या इंद्रियांच्या फटींमधून शरीराबाहेर न्याहाळण्याची वांच्छा असते. डोळे हे बघणारच, कान ऐकणारच, इंद्रियें बाह्य जगत् अनुभवणारच-- आणि म्हणून स्वाभाविकपणेंच प्रकृतीचें सौंदर्य आणि तिची उदात्तता प्रथमच माणसाचें लक्ष वेधून घेते. मानवाच्या अंतरंगांत पहिल्याप्रथम उद्भवलेले प्रश्न बाह्य जगतासंबंधीच होते. प्रथम आकाश, तारे, इतर ज्योतिर्गोल, पृथ्वी, नद्या, पर्वत, समुद्र प्रभृतींचें रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न झाला. प्रत्येक प्राचीन धर्मांत आपल्याला ह्याचीं चिन्हें आढळून येतात. अंधारांत चाचपडणारें मानवमन प्रथम साऱ्या बाहेरच्याच वस्तु कवटाळूं जाई. आणि त्यांतून नदीची देवता, आकाशाची देवता, मेघाची देवता, पर्जन्याची देवता प्रभृति नाना देवता उदयास आल्या; आज आपण ज्यांना निसर्गाच्या शक्ति म्हणतों त्या ह्या साऱ्या बाह्य वस्तु अशा रीतीने बदलून जाऊन इच्छाशक्तिमान देव-देवतांमधे रूपान्तरित होऊन गेल्या. परंतु, ह्या प्रश्नांमधे जसजसें अधिकाधिक खोल जाण्यांत येऊं लागलें तसतसें ह्या बाह्य देवतांनी मानवी बुद्धीचें समाधान होईनासें झालें आणि मग अखेरीस माणसाच्या मनाची सारी शक्ति आंत वळली, अंतर्मुख झाली, आणि माणूस स्वत:च्या आत्म्यासंबंधी प्रश्न विचारूं लागला. पृच्छा आता ब्रह्माण्डाकडून पिंडाकडे वळली--ती आता बहिर्जगतांतून आंत अंतर्जगतांत शिरली. बाह्य प्रकृतीच्या विश्लेषणाकडून मानव अंत:प्रकृतीच्या विश्लेषणाकडे आकर्षिला गेला. ह्या अंतर्मानवासंबंधी प्रश्न उद्भवत असतो-- सांस्कृतिक पातळी उंचावल्यानंतर, प्रकृतीच्या बाबतींत सखोल अंतर्दृष्टि लाभल्यानंतर, उन्नतीची उच्च अवस्था गाठल्यानंतर.

हा अंतर्मानवच आपल्या आजच्या ह्या दुपारच्या चर्चेचा विषय आहे. ह्या अंतर्मानवासंबंधीच्या प्रश्नाइतका आमच्या जिव्हाळ्याचा आणि आम्हांला आवडता प्रश्न दुसरा आणखी कोणताहि नाही. किती लक्ष वेळां आणि किती किती देशांत हा प्रश्न विचारला गेला आहे म्हणून सांगावें ! अरण्यवासी संन्यासी म्हणा की सिंहासनाधिष्ठित सम्राट् म्हणा, धनवान म्हणा की निर्धन म्हणा, पुण्यवान म्हणा की पापिष्ठ म्हणा-- प्रत्येकाने-- प्रत्येक पुरुषाने आणि प्रत्येक स्त्रीने, सर्वांनीच वेळोवेळीं, कधी ना कधी तरी हा प्रश्न विचारलाच आहे-- ह्या क्षणभंगुर मानवजीवनांत नित्य कांहीच नाही काय ? हें शरीर मेलें तरी जें मरत नाही असें कांही नाही काय ? ही कुडी, हा सांगाडा मातीस मिळाल्यावरहि शिल्लक उरतें असें कांही नाही काय ? चिता भडकून ह्या शरीराचें जळून भस्म झाल्यानंतरहि मागे राहतें असें कांही नाही काय ? आणि जर असेलच तर मग त्याचें पुढे काय होतें ? तें कुठे जातें ? अन् तें आलें तरी कुठून होतें ? हे प्रश्न पुन्हापुन्हा, पुन्हापुन्हा विचारले गेले आहेत, आणि जोंवर ही सृष्टि राहील, जोंवर मानवी मेंदू विचार करतील तोंवर हे प्रश्न विचारले जातीलच. अर्थातच, त्यांना कधीच उत्तर दिलें गेलें नाही अशांतला मात्र भाग नाही; जेव्हा जेव्हा हे प्रश्न विचारले गेले तेव्हातेव्हा त्यांना उत्तरहि मिळत गेलें आहे, आणि जसजसा काळ जाईल तसतसें तें उत्तर अधिकाधिक दृढ, वज्रलेप होत जाईल. खरें पाहतां, ह्या प्रश्नांना हजारो वर्षांपूर्वीचा कायमचें उत्तर दिलें गेलेलें आहे, आणि त्यानंतरच्या काळांत तेंच फिरफिरून प्रतिपादिलें जात आहे, निरनिराळ्या दृष्टान्तांच्या मदतीने विशद केलें जात आहे, तुमच्या-आमच्या बुद्धीला कळेल अशा सुबोध, स्पष्ट स्वरूपांत फोड करून सांगितलें जात आहे. आणि म्हणून, आपणहि आता कांही करणार असूं तर तें म्हणजे त्याच उत्तराचें फक्त पुन:कथन, इतकेंच. त्या सर्वस्पर्शी सर्वंकष समस्यांवर मी म्हणजे कांही नवाच प्रकाश पाडणार आहें असला आव मी मुळीच आणूं इच्छीत नाहीं. माझी आकांक्षा एवढीच आहे की, तेंच सनातन सत्य आधुनिक काळाच्या भाषेंत तुमच्यासमोर ठेवावें, त्या प्राचीनांचे विचार आधुनिकांच्या भाषेंत व्यक्त करावेत, तत्त्वज्ञांचे विचार सामान्यजनांच्या

भाषेंत व्यक्त करावेत, देवदूतांचे विचार मनुष्यांच्या भाषेंत व्यक्त करावेत, ईश्वराचे विचार दुबळ्या मानवजातीच्या भाषेंत व्यक्त करावेत की जेणेंकरून माणसें ते समजूं शकतील; कारण ज्या दैवी सत्तेमधून हे विचार प्रसूत झाले आहे ती मानवाठायीं नित्य विद्यमान आहे, आणि म्हणून त्याला ते विचार नेहमीच समजूं शकतात.

अस्तु. मी तुम्हांला बघत आहें. ह्या दर्शनक्रियेसाठी कोण-कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ? प्रथमत: म्हणजे डोळे. त्यासाठी डोळे पाहिजेतच. मी इतर सर्व बाबतींत टणटणीत असलों, माझी इतर सगळीं इंद्रियें पुरतीं शाबत असलीं तरी, मला जर डोळेच नसतील तर मी कांही तुम्हांला पाहूं शकणार नाहीं. म्हणून दर्शनक्रियेसाठी प्रथमत: डोळे आवश्यक आहेत. द्वितीयत: म्हणजे, ह्या डोळ्यांमागे असलेलें खरेखुरें दर्शनेंद्रिय आवश्यक आहे. कारण डोळे कांही खरेखुरें दर्शनेंद्रिय नव्हत. ते केवळ दर्शनक्रियेची उपकरणें वा यंत्रें वा साधनें होत. दर्शनाचें खरें इंद्रिय ह्या डोळ्यांच्या मागे असतें, आणि तें म्हणजे मेंदूतील ज्ञानतंतूंचें केंद्र वा 'मज्जागोलकस्थान' ( nerve centre ) होय. कांही इजा होऊन हें केंद्र जर नष्ट झालें असेल तर मग अगदी स्वच्छ, चकचकीत डोळे असूनहि त्या माणसाला कांहीसुद्धा दिसावयाचें नाही. म्हणून दर्शनक्रियेसाठी हें केंद्र किंवा हें खरेंखुरें दर्शनेंद्रिय असणें आवश्यक आहे. आपल्या इतर ज्ञानेंद्रियांचेंहि असेंच आहे. आपला हा बाहेरचा कान म्हणजे आवाजाचीं कंपनें त्या आंतल्या केंद्राकडे घेऊन जाण्याचें केवळ यंत्रच होय. तीं ध्वनिकंपनें मेंदूतील श्रवणकेंद्रापर्यंत पोहोचल्याखेरीज श्रवणक्रिया घडावयाची नाही—आपल्याला कांही ऐकूं यावयाचें नाही. परंतु ध्वनिकंपनें बाहेरील कानांमधून मेंदूतील श्रवणकेंद्रापर्यंत पोहोचलीं म्हणजे झालें असें मात्र नव्हे, तेवढ्यानेच श्रवणक्रिया पूर्ण होत नसते. बघाना, तुम्ही आपल्या ग्रंथागारांत अगदी एकाग्र चित्ताने एखादें पुस्तक वाचण्यांत गढून गेलां असतां अशा वेळीं ठणठण करीत घड्याळाचे ठोके पडतात, पण ते तुम्हांला ऐकूं मात्र येत नाहीत. असें कां व्हावें ? ते तुम्हांला ऐकूं कां येऊं नयेत ? आवाज झाला, हवेंत त्याचीं कंपनें निर्माण झालींत, तुमचे बाहेरील कान आणि आंतील श्रवणकेंद्रहि शाबूत

आहेत, तुमच्या कानांतून तीं ध्वनिकंपनें आंत त्या केंद्रापर्यंत पोहोचविलींहि गेलीं आहेत, आणि तरीसुद्धा तुम्हांला ते ठोके ऐकूं आले नाहीत. कां बरें ? कशाची उणीव होती ? उणीव होती मनाची ! होय, तुमचें मन त्या श्रवणकेंद्राशीं संयुक्त नव्हतें. यावरून स्पष्ट होतें की, ऐकण्यापाहण्या वगैरेसाठी मन नामक तिसऱ्या एका गोष्टीची गरज असते, मन तिथे हजर असायला हवें. याप्रमाणे प्रथम म्हणजे बाह्य यंत्र हवें, त्यानंतर म्हणजे आंतील इंद्रिय आवश्यक असून त्या इंद्रियापर्यंत ह्या बाह्य यंत्रांनी संवेदना पोहोचवून द्यावयास हव्यात, आणि शेवटीं म्हणजे आपलें मन त्या आंतील इंद्रियाशीं जोडलेलें असावयास हवें. जेव्हा आपलें मन त्या आंतील इंद्रियाशीं जोडलेलें नसतें तेव्हा मग बाहेरील कर्ण-यंत्राने आणि आंतील श्रवणेंद्रियाने श्राव्य वस्तूचा ठसा ग्रहण केला तरी देखील आपल्याला मात्र कांहीच जाणीव होणार नाही. मात्र ही क्रिया येथेहि पूर्ण होत नाही. मन देखील केवळ 'वाहक' आहे; आंतील त्या श्रवणेंद्रियाकडून तो ठसा, ती संवेदना घेऊन मनाला ती आणखी आंत वाहून नेऊन ती बुद्धीस सुपूर्द करावी लागते. बुद्धि ही निश्चयात्मिका असून, तिच्यासमोर जें आणलें जातें त्याचा ती निश्चय वा निर्णय करीत असते—तें काय आहे हें नक्की ठरवीत असतें. परंतु एवढ्यानेहि संपत नाही, हेंहि पुरेसें नाही ! बुद्धीला तें आणखी आंत नेऊन सारेंकांही देहाच्या त्या मालकाला व चालकाला, त्या हृदयसिंहासनाधिष्ठित सम्राटाला, मानवाच्या आत्म्याला समर्पण करावें लागतें. याप्रमाणे बुद्धीने हें सर्व त्याच्या हवालीं केल्यानंतर तो त्याबाबत काय करावयाचें आणि काय नाही यासंबंधी हुकूम फर्मावितो—'करा' अथवा 'करूं नका' असा आदेश देतो. आणि मग, ज्या क्रमाने संवेदना आंत गेली होती त्याच क्रमाने तो आदेश बाहेरच्या यंत्रापर्यंत येऊन थडकतो—प्रथम तो बुद्धीला लाभतो, बुद्धीकडून मनाला दिला जातो, मनाकडून आंतील इंद्रियांना मिळतो आणि इंद्रियें तें फर्मान बाहेर आपापल्या यंत्रांना कळवितात, अशा तऱ्हेने आपल्याला बाह्य विषयांचें ज्ञान होत असतें ! पंचेंद्रियजन्य विषयज्ञानाची संपूर्ण प्रक्रिया ही अशी आहे.

वस्तूंच्या ज्ञानाचीं हीं यंत्रें मानवाच्या बाह्य वा स्थूल शरीरांत

असतात, परंतु मनाचें व बुद्धीचें तसें नाही. मन व बुद्धि हीं, हिंदु तत्त्वज्ञानांत ज्याला सूक्ष्म शरीर म्हणतात आणि ख्रिस्ती धर्मशास्त्रांत ज्याला मानवाचें आध्यात्मिक शरीर म्हणतात, त्यांत अवस्थित असतात. हें अंतःशरीर ह्या आपल्या बाह्य शरीराच्या तुलनेने सूक्ष्म—अतिशयच सूक्ष्म असतें, परंतु तरीहि हें सूक्ष्म शरीर म्हणजे कांही आत्मा नव्हे. आत्मा ह्या सार्‍यांच्या अतीत वा पलीकडे असतो. हें बाह्य, स्थूल शरीर कांही थोड्याच वर्षांमधे ध्वंस पावतें, अगदी क्षुल्लक कारणाने त्यांत गडबड होऊं शकते आणि तें नष्ट होऊं शकतें. सूक्ष्म शरीर असें सहजासहजीं नष्ट होत नाही खरें, तरीपण तेंहि कधी सबल तर कधी दुर्बल होत असतें. आपण हें प्रत्यहीं बघतोंच की, म्हातार्‍या माणसांत मनाची शक्ति र्‍हास पावते, शरीरांत जोम आला की मनांतहि जोम संचरतो, निरनिराळ्या औषधांचा आणि रसायनांचा मनावर परिणाम होतो, बाहेरची प्रत्येक गोष्ट त्यावर क्रिया करीत असते आणि तेंहि बाह्य जगावर प्रतिक्रिया करतें. ज्याप्रमाणे ह्या शरीराला र्‍हास-वृद्धि आहे त्याचप्रमाणे मनालाहि सबलता-दुर्बलता आहे, आणि म्हणून मन हें कदापि आत्मा असूं शकत नाही, कारण र्‍हास-क्षय-दुर्बलता आत्म्याला नाहीत. हें कशावरून? ह्या मनाच्या पलीकडे कांहीतरी आहे हें कशावरून? ह्याला उत्तर असें की, ज्ञान हें स्वप्रकाश असल्याकारणें तें जडाचा धर्म असणें कधीच शक्य नाही. ज्ञान जिचा स्वभावधर्म वा स्वरूप आहे अशी कोणतीहि जड वस्तु कुणीं कधी बघितली नाही. कोणतेंहि जड द्रव्य स्वतःच स्वतःला प्रतिभासित करूं शकत नाही—स्वतःच स्वतःला जाणूं शकत नाही. ज्ञानच समस्त जडांना उद्भासित वा प्रकाशित करीत असतें. हा जो दिवाणखाना आहे, ज्ञानच त्याचें मूळ म्हणावें लागेल, कारण कोण्या ना कोण्या ज्ञानाच्या साहाय्याखेरीज त्याच्या अस्तित्वाची मुळी उपलब्धिच झाली नसती. हें शरीर स्वप्रकाश नाही; तें जर तसें असतें तर मृत व्यक्तीचें कलेवरहि स्वप्रकाश असावयास हवें. मन किंवा 'आध्यात्मिक शरीर'हि स्वप्रकाश असूं शकत नाही. ज्ञान हें त्यांचें स्वरूप वा स्वभावधर्म नाही. जें स्वप्रकाश असतें त्याचा कधीच क्षय होत नसतो. जें परप्रकाशित, म्हणजेच दुसर्‍या कुणाच्या उपर्‍या प्रकाशाने प्रकाशित

असतें त्याला कधी प्रकाश असतो तर कधी नसतो. पण जें स्वतःच प्रकाशस्वरूप आहे त्याचा प्रकाश कधी असणें तर कधी नसणें——त्याच्या प्रकाशाची क्षय-वृद्धि होणें कसें शक्य आहे ? सूर्याच्या उसन्या प्रकाशाने प्रकाशत असल्याकारणें चंद्राला कळा लागतात, त्याचा क्षय आणि वृद्धि होत असते हें आपण नित्य बघतोंच. लोखंडाचा एखादा गोळा अग्नींत टाकून तांबडालाल होईपर्यंत तापविला तर तो तेजस्वी दिसूं लागून त्याचा प्रकाशहि पडूं लागतो, पण थोडचा वेळाने तो प्रकाश नाहीसा होतो, कारण तो उसना असतो. सारांश, क्षय हा उसन्या प्रकाशाचाच होणें शक्य आहे, अंगच्या प्रकाशाचा नव्हे.

असो तर, आपण आतापर्यंत पाहिलेंच की आपला हा स्थूल देह, ही बाह्य आकृति स्वप्रकाश नाही, प्रकाश वा चेतना हा या स्थूल देहाचा स्वभावधर्म वा स्वरूप नाही, आणि म्हणूनच तो स्वतःच स्वतःला जाणूं शकत नाही. हेंच मनालाहि लागू आहे. मनहि स्वतःच स्वतःला जाणूं शकत नाही. ह्याचें कारण काय ? कारण हेंच की, ह्या मनाच्या शक्तीचा ऱ्हास आणि वृद्धि होत असते, तें कधी सबल तर कधी दुर्बल होऊन जातें, त्याच्यावर बाहेरील कशाचाहि असर होऊं शकतो. म्हणून, ह्या मनामधून जो प्रकाश प्रकटत असतो तो त्याचा स्वतःचा नसला पाहिजे. मग तो कुणाचा बरें आहे ? तो अशाच कशाचा तरी असला पाहिजे की जें स्वप्रकाश आहे, प्रकाश हें ज्याचें स्वरूपच आहे, आणि म्हणून ज्याचा तो प्रकाश कधी क्षय वा लोप पावत नाही, कधी वाढत वा घटत नाही. म्हणजे तें स्वप्रकाश आहे, नव्हे, प्रकाशच आहे. आणि त्यालाच म्हणतात 'आत्मा'. असें नव्हे की आत्मा 'जाणत असतो' वा आत्म्याला 'ज्ञान होत असतें,' तर आत्मा स्वतःच ज्ञानस्वरूप आहे. असें नव्हे की आत्म्याला अस्तित्व आहे, तर आत्मा अस्तित्वस्वरूप आहे. असें नव्हे की आत्मा सुखी होतो, तर तो सुखस्वरूप आहे. जो सुखी 'बनतो', त्याचें तें सुख उसनें असतें; ज्याला ज्ञान 'होतें', त्याला तें कुणाकडूनतरी मिळालेलें असतें; आणि जें अस्तित्वांत 'येतें', त्याचें तें अस्तित्व आणखी कुणाच्यातरी अस्तित्वावर अवलंबून असतें—— त्याचें तें अस्तित्व आणखी कुणाच्या-तरी अस्तित्वाची पडछाया असते. जिथे जिथे 'गुण' असतात म्हणजेच

जिथे जिथे 'गुण' व 'गुणी' असा भेद असतो तिथे तिथे समजावें की ते गुण त्यांच्या 'गुणी'वर वा आधार द्रव्यावर प्रतिबिंबित झालेले आहेत. परंतु ज्ञान, अस्तित्व आणि सुख--चैतन्य, सत्ता आणि आनंद हीं कांही आत्म्याचे 'गुण' नाहीत, तीं आत्म्याचें स्व-रूप आहेत. आत्मा सच्चिदानंदस्वरूप आहे— अस्ति-भाति-प्रियस्वरूप आहे.

यावर फिरून असा प्रश्न विचारला जाणें शक्य आहे की, आपण असें काय म्हणून मानावयाचें ? आपण असें काय म्हणून मानावयाचें की ज्ञान, आनंद आणि अस्तित्व हीं आत्म्याचें स्वरूप आहेत, ते त्याने कुणाकडून उसने घेतलेले गुण नव्हत ? तर्का-खातर असें म्हणतां येईल की, ज्याप्रमाणे शरीराचा प्रकाश हा मनापासून उसना घेतलेला असतो त्याचप्रमाणे आत्म्याचा प्रकाश, आत्म्याचा आनंद आणि आत्म्याचें ज्ञान हींसुद्धा कुणाकडूनतरी उसनींच घेतलीं असतात असें कां म्हणू नये ? परंतु अशा रीतीनें तर्क करण्यांत एक घोडचूक अशी होते की त्याने अनवस्थाप्रसंग निर्माण होतो, म्हणजे, अशा तऱ्हेने तर्क करीत गेल्यास मग आपल्याला कुठेच थांबतां यावयाचें नाही. अशा तऱ्हेच्या बिनबुडाच्या तर्काला कुठेच शेवट नसतो. कारण, मग असें विचारतां येईल की ते गुण आत्म्याने कुणाकडून उसने घेतले आहेत ? यावर जर तुम्ही म्हणाल की दुसऱ्या कुणाकडून तरी आत्म्याने ते गुण उसने घेतले आहेत, तर मग तोच प्रश्न फिरून उत्पन्न होईल— त्या 'दुसऱ्या कुणीं' ते गुण कुणाकडून उसने घेतलेत ? म्हणून आपल्याला अखेर अशा एकाप्रत पोहोचावें लागेल की ज्याचा प्रकाश उसना नाही, जो स्वयंप्रकाश आहे. म्हणून, ना शेंडा ना बुडूख अशा तऱ्हेच्या या तर्काची कधीच न संपणारी लांबण संपविण्याचा तर्कसंमत उपाय हाच की जिथे आपल्याला पहिल्या-प्रथम स्वप्रकाशत्व आढळेल तिथेच आपण थांबावयाचें, उगीच आणखी पुढे जावयाचें नाही.

सारांश, आपण बघितलें की, मानवप्राणी प्रथमतः म्हणजे ह्या शरीररूपी बाह्य आवरणाने बनला आहे; त्यानंतर येतो मन, बुद्धि व अहंकार यांनी बनलेला सूक्ष्म देह. त्या उभयतांपलीकडे आहे मानवाचें खरें स्वरूप--आत्मा. आपण बघितलेंच आहे की, स्थूल शरीराचे सर्व

गुण आणि सर्व शक्ति मनाकडून उसन्या घेतलेल्या असतात, आणि मन वा सूक्ष्म शरीर स्वतःच्या शक्ति आणि स्वतःचा प्रकाश आपल्या-पलीकडे अवस्थित असलेल्या आत्म्याकडून उसना घेत असतें.

ह्या आत्म्याच्या स्वरूपासंबंधी परत नाना प्रश्न उत्पन्न होतात. हा आत्मा स्वप्रकाश असून चैतन्य, सत्ता व आनंद हीं आत्म्याचें स्वरूप आहेत ह्या तर्काच्या बळावरच जर आत्म्याचें अस्तित्व मान्य करावयाचें असेल तर मग त्यावरून हेंहि अगदी स्वाभाविकपणें निष्पन्न होतें की हा आत्मा कधी 'सृष्ट' झालेला नसला पाहिजे-- तो 'सृष्ट' पदार्थ नाही. जें स्वप्रकाश आहे, ज्याचें अस्तित्व अन्य कुणाहिवर अवलंबून नाही तें कुणापासूनहि उत्पन्न झालेलें असणें कदापि शक्य नाही. तें नेहमीच अस्तित्वांत असतें; तें अस्तित्वांत नव्हतें अशी वेळ कधीच नव्हती, कारण मग जेव्हा आत्मा अस्तित्वांत नव्हता तेव्हा 'वेळ' वा काल कुठे--कशांत बरें अवस्थित होता ? 'काल' हा तर आत्म्यामधेच अवस्थित असतो; जेव्हा आत्म्याची शक्ति मनावर प्रतिबिंबित होते तेव्हा मन कार्य करूं लागतें आणि तेव्हाच कुठे 'काल' उद्‌भूत होतो. जेव्हा आत्मा नव्हता तेव्हा अर्थातच मनाचें कार्य जो विचार, तोहि नव्हता, आणि विचाराशिवाय कालहि असूं शकत नाही. म्हणून, कालच जिथे आत्म्यांत स्थित असतो तिथे आत्मा हा कालांत अवस्थित असतो असें उलटेंच कसें बरें म्हणतां येईल ? त्याला जन्महि नाही अथवा मृत्युहि नाही; फक्त तो या साऱ्या निरनिराळ्या अवस्थांमधून जात असतो, इतकेंच. तो स्वतःला हळूहळू खालच्या अवस्थेंतून वरच्या अवस्थेंत अभिव्यक्त करीत असतो. हें असें सारखें चालूं आहे. मनामधून शरीरावर कार्य करीत तो आपला महिमा प्रकट करीत असतो, आणि शरीराद्वारें बाह्य जगताचें ग्रहण करीत असतो आणि तें जाणत-अनुभवत असतो. तो एक शरीर धारण करून त्याचा उपयोग करून घेतो, आणि जेव्हा त्या शरीराकडून आणखी कांही काम होण्याची शक्यता न राहून तें कुचकामाचें ठरतें तेव्हा मग तें सोडून तो दुसरें शरीर धारण करतो. हें असेंच सतत चाललें आहे.

येथे एक अत्यंत मनोरंजक मुद्दा उपस्थित होतो. तो सर्वसाधा-रणपणें पुनर्जन्मवाद (Transmigration Theory) म्हणून प्रसिद्ध

आहे. पुष्कळदा लोक ह्या पुनर्जन्माच्या कल्पनेला घाबरतात. आणि वेडगळ समजूत ही अशी प्रबळ गोष्ट आहे की, चांगल्या विचारशील म्हणविणाऱ्या माणसांचासुद्धा असा विश्वास असतो की ते शून्यामधून निर्माण झाले आहेत ! आणि आणखी मौज अशी की एवढ्यावरच न थांबतां, तर्काच्या खूप खूप सुरेख कोलांट्या मारून ते अटीतटीने असा सिद्धान्त प्रस्थापित करण्याचा आटापिटा करतात की, ते याप्रमाणे जरी शून्यांतून उत्पन्न झाले आहेत तरी आता यापुढे मात्र ते अगदी अनंतकाल कायम राहणार आहेत. पण हें कसें बरें शक्य आहे ? जे शून्यांतून उत्पन्न झाले आहेत त्यांना शून्यांतच परत जावें लागणार हें निश्चित. परंतु सुदैवाने वस्तुस्थिति अशी आहे की, तुम्ही काय, मी काय, किंवा इथे उपस्थित असलेला आणखीहि कुणी काय, आपण कुणीच शून्यांतून उत्पन्न झालेलों नाहीं अथवा शून्यांत परतहि जाणार नाहीं. आपण अनंतकाल अस्तित्वांत आहोंत नि अनंतकाल राहूंहि; आणि विश्वब्रह्माण्डांत कुठेंहि अशी कोणतीच शक्ति नाही की जी तुमचें किंवा माझें अस्तित्व रद्द करूं शकेल किंवा आपल्याला शून्य करून टाकूं शकेल. असो. या बाबतींत आपण एक गोष्ट नीट लक्षांत ठेवावयास हवी की, आपल्याला ह्या पुनर्जन्मवादाचें भय बाळगण्याचें तर कांही कारण नाहीच नाही, उलट तो मानवजातीच्या नैतिक सुस्थितीसाठी अतोनात आवश्यक आहे. विचारवंत व्यक्तींना पटूं शकेल असा हाच एकमेव तर्कसंगत सिद्धान्त आहे. तुम्ही जर यापुढे अनंतकाल अस्तित्वांत असणार असाल तर मग तुम्ही यापूर्वीहि अनंत-काल अस्तित्वांत असलांच पाहिजे, याखेरीज दुसरें कांहीच शक्य नाही. ह्या पुनर्जन्मवादाविरुद्ध साधारणपणें जे कित्येक आक्षेप घेतले जातात त्यांचें मी आता निरसन करण्याचा प्रयत्न करीन. हे आक्षेप तुमच्या-पैकी पुष्कळांना कदाचित् अगदीच बावळटपणाचे वाटतील, तरीपण त्यांना उत्तर देणें भाग आहे, कारण कांहीकांही वेळां अत्यंत विचार-शील माणसें कमालीच्या वेडपट कल्पना प्रतिपादन करण्यास सरसावत असलेले आढळून येत असतात. 'अशी कोणतीहि वेडगळ कल्पना नाही की जिच्या समर्थनासाठी तत्त्वज्ञ पुढे येत नाहीत' असें जें म्हणतात ना, तें अगदी खरें आहे. असो तर, ह्या पुनर्जन्मवादाविरुद्ध पहिला आक्षेप

म्हटला म्हणजे--'पुनर्जन्म जर खरा असेल, आपला जर पुनःपुनः जन्म होत असेल तर मग आपल्याला आपल्या मागच्या जन्मांतील गोष्टी कां बरें आठवत नाहीत ?' ह्या आक्षेपाला उत्तर देण्यापूर्वी मी असें विचारतों की तुम्हां-आम्हांला आपल्या ह्याच जन्मांतील सर्वच्या सर्वच जुन्या गोष्टी तरी आठवतात काय ? तान्हें असतांना तुम्हीं काय काय केलें हें तुमच्यापैकी कितीजणांना बरें स्मरतें ? स्वतःचें अगदी सुरुवातीचें बालपण आपल्यापैकी कुणालाहि आठवत नाही; आणि आपलें अस्तित्व आपल्या आठवण्यावरच जर अवलंबून असेल तर मग ह्यावरून हेंच सिद्ध होतें की, आपल्याला स्वतःच्या लहानपणींच्या त्या काळांत अस्तित्व नव्हतें, कारण आपल्याला त्या काळाचें मुळीहि स्मरण नाही. आम्हांला जर तो आठवूं शकेल तरच आम्ही पूर्व-जन्माचें अस्तित्व मानूं असें म्हणणें म्हणजे निव्वळ असमंजसपणें कांहीतरी बरळणें होय. आपल्याला आपल्या पूर्वजन्मांतील गोष्टी कशा बरें आठवाव्यात ? आपला हा मेंदू आपल्या त्या मागल्या जन्मींचा का आहे ? तो त्या जन्मींचा आपला मेंदू तर नाहीसा होऊन गेला आहे, त्याचा अजीबात ध्वंस होऊन गेलेला आहे, आणि त्या जागीं आताचा हा सपशेल नवाच मेंदू घडविला गेला आहे. आमच्या ह्या आजच्या नव्या मेंदूंत मागच्या जन्मांतून जर कांही आलें असेल तर तें म्हणजे आमच्या जन्मजन्मान्तरींच्या समस्त संस्कारांचें एकूण फल हेंच होय,-- तें बरोबर घेऊन मन ह्या नव्या शरिरांत वास करावयास आलें आहे.

या क्षणीं मी जें कांही आहें तें माझ्या अनंत गतकालांतील माझ्या समस्त कर्मांचा परिणाम वा फल होय. आणि त्या अनंत गत-कालाचें मला स्मरण असण्याचें प्रयोजन तरी काय ? ज्याला सत्याचा मूर्त साक्षात्कार झाला आहे अशा एखाद्या प्राचीन साधूने, ऋषीने वा जुन्या काळांतील एखाद्या द्रष्टयाने जर कांही म्हटलें असेल तर हीं आधुनिक माणसें नाक मुरडून म्हणतात की, "अंऽऽ, तो मूर्ख होता !" पण त्यांनाच जर कुणी असें सांगेल की "हक्स्लेने वा टिंडॉलने असें म्हटलें आहे" तर मात्र तें खरें असलेंच पाहिजे असें धरून चलून ते त्याचा अगदी निर्विचारपणें स्वीकार करतील. प्राचीन अंधविश्वासांच्या

जागीं आपण आधुनिक अंधविश्वास उभे केले आहेत, धर्माच्या त्या जुन्या पोपांच्या जागीं आपण विज्ञानाचे हे आधुनिक पोप बसविले आहेत. असो तर, तात्पर्य काय की पुनर्जन्माविरुद्धचा हा स्मृतिसंबंधीचा मुद्दा साधार नाही, आणि ह्या सिद्धान्ताविरुद्ध घेतला जाणारा गंभीर असा आक्षेप जवळजवळ एकमेव हाच होय असें म्हणतां येईल. याप्रमाणे, पुनर्जन्माचा सिद्धान्त खरा असण्यासाठी मागल्या जन्मांची स्मृति असलीच पाहिजे असें मुळीच नाही हें आपण बघितलें असलें तरी, आपण हें अगदी ठामपणें म्हणूं शकतों की, अशी गतजन्मांची स्मृति प्राप्त झालेल्या अनेक व्यक्ति आहेत, आणि ज्या जन्मांत आपल्याला मुक्ति लाभेल त्या जन्मांत तुम्हां-आम्हांलादेखील ती तसली स्मृति प्राप्त होईल. आणि तेव्हाच आमच्या प्रत्ययास येईल की हें जग केवळ एक स्वप्न आहे; तेव्हाच आपल्या अगदी अंतरींच्या अंतरीं आपल्याला उमगेल की हें जग एक रंगभूमि असून आपण तिच्यावर अभिनय करणारे केवळ नट आहोंत; तेव्हाच अनासक्ति आमच्या हृदयांत वज्रासारख्या शक्तीने प्रवेश करील; मगच ही भोगाची तहान निमेल, जीवनाला नि जगाला जळूसारखें चिटकून बसण्याची ही वृत्ति कायमची लयाला जाईल. तेव्हा मग, तुम्ही ह्या जगांत फिरफिरून किती वेळां आलां आहांत, किती लक्ष जन्म तुम्ही आई-बाप, पुत्र-कन्या, पति-पत्नी, आप्त-मित्र,सत्ता-ऐश्वर्य वगैरेंसह जगलां आहांत हें अगदी सूर्यप्रकाशाइतकें स्पष्टपणें तुम्हांला दिसून येईल. हें सारें किती वेळां आलें आणि किती वेळां गेलें. किती वेळां तुम्ही लाटांच्या शिरांवर चढलां होतां आणि किती वेळां तुम्ही निराशांच्या खाईंत पडलां होतां ! जेव्हा स्मृति तुम्हांला हें सारें दाखवून देईल तेव्हाच तुम्ही वीराप्रमाणे उभे ठाकाल आणि जगाने तुम्हांला कितीहि भेडसावण्याचा यत्न केला तरी तुम्ही तें सारेंच हसण्यावारी नेऊं शकाल. तेव्हाच वीराप्रमाणे उभे ठाकून तुम्ही म्हणूं शकाल––"मरणा, मी तुझीदेखील कांही तमा बाळगीत नाहीं, तूं मला असें कोणतें भय दाखवूं शकणार आहेस ?" आणि ही अवस्था सर्वांनाच प्राप्त होणार आहे.

आत्म्याचा पुनर्जन्म होत असतो हें सिद्ध करण्यासाठी कांही मुद्दे, कांही तार्किक प्रमाणें आहेत काय ? आतापर्यंत आपण केवळ

शंकानिवारण करून प्रतिपक्षाचें फक्त खंडनच करीत होतों--हा पुनर्जन्मवाद खोडून काढण्यासाठी विरोधीपक्षानें मांडलेले मुद्दे बरोबर कसे नाहीत एवढेंच फक्त दाखवीत होतों. स्वतःच्या पक्षाचें मंडन करण्यासाठी आपल्याजवळ कांही प्रमाणें नाहीत काय ? आहेत, अशीं प्रमाणें खचितच आहेत, आणि तींहि अत्यंत सबळ अशींच आहेत. ज्ञान मिळविण्याच्या शक्तीच्या बाबतींत माणसांमाणसांत जो कमालीचा फरक दिसून येतो त्याचा उलगडा पुनर्जन्माच्या सिद्धान्ताखेरीज आणखी कशानेहि होणें शक्य नाही. प्रथमतः, ज्या प्रक्रियेने आपण ज्ञान मिळवीत असतों तिचा विचार करूं. समजा की मी रस्त्यावर गेलों आणि तिथे मला एक कुत्रा दिसला. तो कुत्रा आहे हें मीं कसें समजलों ? त्याचा ठसा माझ्या मनावर पडतांक्षणींच, मी तो ठसा, माझ्या मनांत वसत असलेल्या माझ्या पूर्वानुभवांच्या संस्कारांशीं ताडून पाहूं लागतों. माझ्या पूर्वानुभवांचे समस्त संस्कार माझ्या मनांत वर्गवारीने कप्प्यांकप्प्यांत नीट व्यवस्थितपणें रचलेले असतात. एखादा नवीन ठसा येतांक्षणींच, आंतील कप्प्यामधील कांही जुन्या संस्कारांशीं मी तो ताडून पाहूं लागतों; आणि त्या नव्या ठशाच्या जातीचेच संस्कार असलेला कप्पा आढळतांच मी तो नवा ठसा त्या कप्प्यांत ठेवून देतों आणि मला समाधान वाटूं लागतें. तो कुत्रा आहे हें आता मला समजलें, कारण माझ्या मनांत आधीच्याच असलेल्या कांही संस्कारांशीं तो चपखल जुळला. या नव्या ठशाचा सजातीय संस्कार ज्या वेळीं मला माझ्या आंत गवसत नाही तेव्हा मला असमाधान वाटतें. एखाद्या नव्या ठशाचा सजातीय संस्कार आंत न आढळल्यामुळे निर्माण होणाऱ्या असमाधानाच्या मनःस्थितीलाच 'अज्ञान' म्हणतात. आणि, नव्या ठशाचे सजातीय संस्कार आढळल्या-कारणें निर्माण होणाऱ्या समाधानाच्या मनःस्थितीलाच म्हणतात 'ज्ञान.' एक सफरचंद पडलें, माणसाला 'असमाधान' वाटलें. मग त्याने क्रमशः तसल्याच घटनांचा स्वतःच्या मनामधे एक वर्ग वा एक कप्पा बनविला. अशा तऱ्हेने वर्गवारी करून त्याने त्या कप्प्यांत काय अनुभव साठविले होते ? हेंच की, सर्वच सफरचंदें पडत असतात. आणि म्हणून मग अखेर त्याने त्याला नांव दिलें--'गुरुत्वाकर्षण'.

असो तर, यावरून आपल्याला हेंच दिसून येतें की, पूर्वानुभवांचा साठा असल्याखेरीज कोणताहि नवीन अनुभव संभवत नाही, कारण मग हा नवा ठसा ज्याच्याशीं जुळवून पाहतां येईल असें आपल्या संग्रहीं कांहीच नसणार. म्हणून, कांही युरोपीय तत्त्वज्ञ समजतात त्याप्रमाणे, मूल या जगांत जर ते म्हणतात तसली मनाची अगदी 'कोरी चक्क पाटी' घेऊन येत असेल,तर त्या तसल्या कोऱ्या करकरीत मनाच्या मुलाचा अगदी थोड्याहि प्रमाणांत बौद्धिक विकास होणें कदापि शक्य व्हावयाचें नाही, कारण स्वतःचे नवीन अनुभव 'मिळवून' पाहण्यासाठी त्याच्याजवळ कोणतेहि आणि कसलेहि पूर्वसंस्कार नसणार. सारांश, पूर्वसंचित ज्ञानाचें भांडार संग्रहीं असल्याखेरीज नवीन ज्ञान होणें अशक्य आहे. आपण बघतोंच की, ज्ञान प्राप्त करून घेण्याची व्यक्तीव्यक्तीची शक्ति वेगवेगळी असते, आणि यावरून हेंच सिद्ध होतें की आपल्यापैकी प्रत्येकजण स्वतःच्या ज्ञानाचा साठा वा पूर्वसंचय बरोबर घेऊनच जन्माला आलेला असतो. ज्ञान फक्त एकाच मार्गानें होऊं शकत असतें, आणि तो मार्ग म्हणजे अनुभव; ज्ञान होण्याचा आणखी कोणताहि मार्ग नाही. आपल्याला तो अनुभव जर ह्या जन्मांत आलेला नसेल तर मग तो अनुभव आपल्याला आपल्या दुसऱ्या कोणत्यातरी जन्मांत आलेला असला पाहिजे.मृत्यूचें भय प्रत्येकाच्या ठायीं आढळतें ते कां ? कोंबडीचें एखादें लहानसें पिलूं नुकतेंच अंडें फोडून बाहेर पडलेलें असतें-- एखादें गिधाड त्याच्यावर झडप घालूं पाहतें-- तें पिलूं भीतीनें तात्काळ आपल्या आईकडे पळतें. त्या पिलाला हें कसें आणि कुठून कळलें की आपण गिधाडाचें भक्ष्य असून हें गिधाड आपल्याला मारून खाऊन टाकणार आहे ? गिधाडाला बघतांच ह्या कोंबडीच्या इवल्याशा नवजात पिलानें केलेल्या ह्या वागणुकीचा अर्थ काय ? ह्या साऱ्याचें एक जुनें स्पष्टीकरण आहे. अर्थातच 'स्पष्टीकरण' हें सन्मान्य नांव देऊन त्याला गौरविण्याची माझी इच्छा नाही ! ह्या स्पष्टीकरणानुसार ह्या साऱ्याला म्हणावयाचें--'उपजत प्रवृत्ति'--Instinct. अंड्यांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या त्या कोंबडीच्या पिलाला मृत्यूचें भय कशामुळे वाटलें ? आत्ताच उबविलेल्या अंड्यांतून बाहेर निघालेलें बदकाचें पिलूं पाण्याजवळ येतांच त्यांत उडी मारून पोहूं लागतें हें कसें ?

तें यापूर्वी तर कधीच पोहलेलें नसतें, किंवा कुणाला पोहतांनाहि त्याने पाहिलेलें नसतें. लोक ह्याला 'उपजत प्रवृत्ति' म्हणत असतात. शब्द तर आहे खूप अगडबंब, पण त्याने आपल्याला नवीन असें कांही सुद्धा कळत नाही ! असो. ही 'उपजत प्रवृत्ति' म्हणजे काय प्रकार आहे हें आपण नीट बघण्याचा प्रयत्न करूं या. कल्पना करा की एक मुलगी पियानो वाजवावयास शिकत आहे. पहिल्यापहिल्याने तिला प्रत्येक पट्टी नीट निरखूनच तिच्यावर बोट दाबावें लागेल, परंतु याप्रमाणे कांही महिने आणि कांही वर्षे सतत एकसारखा सराव करतां करतां तिच्या पक्षीं पियानोवर बोटें फिरविणें अगदी स्वाभाविक होऊन बसेल, तें सारें अगदी आपोआप होऊं लागेल. पहिल्याने जें जाणीवपूर्वक इच्छाशक्तीने केलें होतें तें करतांना नंतर मग तसल्या इच्छाशक्तीचा उपयोग करण्याची कांही आवश्यकता राहत नाही. तसल्या जाणीवपूर्वक इच्छेखेरीजहि मग तें काम होऊं शकतें. आणि ह्यालाच म्हणतात 'उपजत प्रवृत्ति.' आधी तें इच्छापूर्वक केलें जातें, मग तें इच्छेशिवाय होऊं लागतें. परंतु एवढ्यानेहि 'उपजत प्रवृत्ती'-चा सिद्धान्त कांही पूर्णपणें सांगितला गेला नाही, त्याचा अर्धा भाग अजूनहि सांगावयाचा बाकी आहे. आणि तो उरलेला अर्धा भाग हा की, जीं सारीं कामें आपल्याकडून सध्या 'उपजत प्रवृत्ती'ने वा स्वाभाविकपणें होत असतात, तीं बहुतेक सारींच्या सारींच आपल्या इच्छाशक्तीच्या नियंत्रणाखाली आणतां येणें शक्य आहे. शरीराच्या प्रत्येक स्नायूवर आपलें नियंत्रण चालणें, आपली हुकमत चालवितां येणें शक्य आहे. आपला प्रत्येक स्नायु आपल्या स्वतःच्या अधीन करून घेतां येणें शक्य आहे. ही गोष्ट अगदी प्रसिद्धच आहे. म्हणून, ह्या अन्वय आणि व्यतिरेक वा सुलट आणि उलट अशा दोन्ही प्रकारच्या प्रमाणांनी हें पूर्णपणें सिद्ध झालें की, आज आपण जिला 'उपजत प्रवृत्ति' म्हणतों ती म्हणजे जाणीवपूर्वक इच्छेने केलेल्या कार्यांचेंच एक भ्रष्ट किंवा ऱ्हास पावलेलें रूप होय. आणि म्हणूनच, ज्याअर्थी समस्त प्रकृति एकाच नियमाने चालत असते त्याअर्थी हें उपमान वा हा दृष्टान्त अवघ्या सृष्टीला लागू करून असा सिद्धान्त बांधतां येईल की, खालच्या प्राण्यांत आणि माणसांतहि जी 'उपजत प्रवृत्ति' म्हणून

वाटते ती इच्छाशक्तीचीच केवळ भ्रष्ट वा अवनत अवस्था असली पाहिजे.

'क्रमविकासाच्या प्रत्येक प्रक्रियेपूर्वी एक क्रमसंकोचाची प्रक्रिया झालेली असते आणि प्रत्येक क्रमसंकोचप्रक्रियेनंतर क्रमविकासाची प्रक्रिया घडत असते' हा बाह्य जगतांत आपल्यास आढळून आलेला नियम येथे लागू केल्यास दिसून येतें की, उपजत प्रवृत्ति ही विचारपूर्वक वा जाणीवपूर्वक केलेल्या कार्यांची क्रमसंकुचितावस्था होय. म्हणजेच, उपजत प्रवृत्तींत बुद्धि ही क्रमसंकुचित असते. म्हणून, आपण जिला माणसाठायींची वा पशूंठायींची उपजत बुद्धि म्हणतों, ती म्हणजे पूर्वी जाणीवयुक्त इच्छाशक्तीने केलेल्या कर्मांची क्रमसंकुचित, भ्रष्ट अवस्थाच असली पाहिजे. आणि, असें जाणीवयुक्त इच्छाशक्तीचें कार्य म्हटलें की त्यासाठी पूर्वानुभव हा आवश्यक असणारच. आधीचा अनुभव असल्याखेरीज जाणीवयुक्त इच्छाशक्तीने कर्म करणें कदापि संभवत नाही. हा अनुभव वा हें ज्ञान पूर्वी केलेल्या कर्मांमधून प्राप्त झालें होतें आणि संस्काररूपाने तें अजूनहि विद्यमान आहे. हें मृत्यूचें भय, बदकाच्या पिलाची ही जन्मतःच पाण्यांत पोहण्याची क्षमता, आणि इच्छेशिवाय वा नेणीवपूर्वक केल्या जाणाऱ्या मनुष्यप्राण्याच्या समस्त क्रिया आज जरी 'उपजत प्रवृत्ति' बनून गेल्या असल्या तरी त्या सर्व आधीच्या कर्मांचें आणि आधीच्या अनुभवांचें फलच होत. येथपर्यंतचें सर्वकांही स्पष्ट नि सरळ आहे, आणि आधुनिक विज्ञानहि येथपर्यंत आपल्याच बाजूला आहे. परंतु येथे आणखी एक अडचण उपस्थित होते. अगदी आधुनिक विज्ञाननिष्ठ लोक हळूहळू प्राचीन ऋषींच्या सिद्धान्तांकडे वळत आहेत, आणि त्यांचें त्या प्राचीन ऋषींशीं जेथवर जमतें तेथवर अर्थातच कांही गडबड नाही. वैज्ञानिकांना हें कबूल आहे की, प्रत्येक माणूस आणि प्रत्येक प्राणी हा कित्येक अनुभवांचा एकेक साठा बरोबर घेऊन जन्माला आला असतो; आणि वैज्ञानिकांना हेंहि कबूल आहे की मनाचीं हीं समस्त कार्यें पूर्वानुभवांचें फल होत. परंतु येथे त्यांना एक शंका येते. ते येथे असें विचारतात की, "हे सर्व अनुभव म्हणजे आत्म्याचे असतात असें मानण्याची काय गरज ? ते केवळ शरीराचेच धर्म होत असें मानण्याला काय हरकत

आहे ? ते आनुवंशिक परंपरेने संक्रमित झालेले आहेत असें कां म्हणूं नये ?" पुनर्जन्मवादाविरुद्ध हा अगदी शेवटला प्रश्न होय. जे अनुभव वा जे संस्कार घेऊन मी जन्माला आलों आहें ते म्हणजे माझ्या समस्त पूर्वजांच्या संचित संस्कारांचेंच एकूण फळ होत-- सारांश, माझ्या समस्त पूर्वजांचेच संचित संस्कार माझ्यांत संक्रमित झाले आहेत असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे ? यःकश्चित् जीवाणूपासून तों सर्वश्रेष्ठ मनुष्यप्राण्यापर्यंतच्या सगळ्यांचेच एकूण कर्मसंस्कार माझ्यामधे आहेत ही गोष्ट खरी, परंतु ते आनुवंशिक परंपरेने एका शरीरांतून दुसऱ्यांत संक्रमित होत होतच माझ्यामधे आले आहेत, असें मानल्यास सर्व अडचणी दूर होऊन जात नाहीत काय ? हा प्रश्न मोठा गोंडस आहे खरा ! अर्थातच, हें आनुवंशिक संक्रमण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आपणहि मानतोंच. ती मर्यादा कोणती ? ती हीच की, जन्मास येणाऱ्या जीवाला अनुरूप असें शरीर आनुवंशिकपणेंच लाभत असतें. म्हणजे असें की, जन्माला येणाऱ्या जीवात्म्याला राहावयास योग्य होईल असें शरीररूपी गृहच काय तें त्याला त्याच्या जनकाकडून लाभत असतें. प्रत्येकजण आपल्या स्वतःच्या पूर्वकर्मांनी एक विशिष्ट शरीर धारण करून जन्म घेत असतो, आणि त्या विशिष्ट शरीराला उपयोगी अशी सामग्री प्रत्येक जीवात्म्याला अशाच माता-पित्यांकडून मिळते की जीं त्या जीवात्म्याला स्वतःचें संतान म्हणून प्राप्त करून घेण्यास योग्य आहेत.

आनुवंशिक संक्रमणासंबंधीच्या ह्या धोपट मतांत हें एक अत्यंत विस्मयावह प्रमेय कसल्याहि पुराव्याखेरीजच गृहीत धरण्यांत येत असतें की आपल्या अनुभवांचा वा मानसिक संस्कारांचा ठसा जड द्रव्यावर उमटणें शक्य आहे, ते जडद्रव्यावर नोंदविले जाणें शक्य आहे--ते जडद्रव्यांत क्रमसंकुचितावस्थेंत वसणें शक्य आहे. मी ज्या वेळीं तुमच्याकडे बघतों त्या वेळीं माझ्या चित्त-सरोवरांत एक तरंग उठतो. हा तरंग कांही वेळाने विरून जातो, परंतु संपूर्णपणें नाहीसा न होतां तो संस्काराच्या रूपाने सूक्ष्म स्वरूपांत मागे उरतो. हें आपल्याला समजूं शकतें. भौतिक वा शारीरिक संस्कार शरीरांत राहूं शकतो हेंहि समजण्यासारखें आहे. परंतु, ज्याअर्थी शरीराचा पार ध्वंस होत

असतो त्याअर्थी मानसिक संस्कार हे शरीरांत राहूं शकतात असें धरून चलण्याला खरोखर काय बरें पुरावा आहे ? कशाच्या द्वारा हे संस्कार संक्रमित होत असतात ? क्षणभर असें धरून चलूं या की, प्रत्येक मानसिक संस्कार हा शरीरांत वास करूं शकतो आणि माझ्या वंशाच्या अगदी आदिपुरुषापासूनच्या झाडून सर्व पूर्वजांचें सगळेच्या सगळे संस्कार अनुवंशिक परंपरेनें माझ्या पित्यांत संक्रमित झालेले आहेत, आणि तेथून ते माझ्यांत आले आहेत. ते माझ्यांत कसे आलेत ? तुम्ही म्हणाल की ते जीवकोषाद्वारें (Bioplasmic cell द्वारें) माझ्यांत आलेत. परंतु हें कसें बरें शक्य आहे ? कारण पित्याचें शरीर त्याच्या संतानांत सारेंच्या सारेंच तर येत नसतें ना ? एकाच माता-पित्यांना अनेक अपत्यें असणें शक्य आहे; आणि म्हणून मग ह्या आनुवंशिक संक्रमणवादानुसार (त्यांत संस्कार आणि ज्यावर ते संस्कार उमटलेले आहेत तें जडद्रव्य हीं एकच मानलीं गेलीं असल्यामुळे) हेंच अटळपणें निष्पन्न होतें की, प्रत्येक संतानाला जन्म देतेवेळीं तीं मातापितरें स्वतःच्या संस्कारांचा थोडाथोडा भाग गमावीत असलीं पाहिजेत, किंवा, तीं जर आपले सर्वच संस्कार वा स्वतःच्या सर्वच मनोवृत्ति संक्रामित करीत असतील तर मग पहिल्याच अपत्याच्या जन्मानंतर त्यांचीं मनें संपूर्णपणें रितीं होऊन जावयास हवींत !

शिवाय, आतापर्यंतच्या समस्त काळाचे अनंत संस्कार जर त्या जीवकोषांत शिरले आहेत असें म्हणाल तर त्यावर प्रश्न असा की ते त्यांत कुठे आणि कसे शिरले ? हा अगदीच असंभाव्य पक्ष आहे. आणि, त्या कोषांत वा पेशींत ते संस्कार कसे राहतात व कुठे राहतात हें जोंपर्यंत हे जडवादी शरीरशास्त्रज्ञ सिद्ध करूं शकत नाहीत, आणि 'संस्कार वा मनोवृत्ति ह्या भौतिक पेशींत निद्रिस्त असतात' म्हणजे खरोखर काय हें समजावून सांगूं शकत नाहीत तोंपर्यंत त्यांचा पक्ष मान्य करतां येणें शक्य नाही. या साऱ्यावरून एक गोष्ट अगदी स्पष्ट दिसून येतें की, संस्कार हे मनांतच वसत असतात, मनच पुन्हा-पुन्हा जन्म घेण्यासाठी येत असतें व स्वतःला सगळ्यांत जास्त उपयोगी पडेल अशी देहसामग्री वापरीत असतें, आणि स्वतःच्या कर्मानुसार जें मन जें शरीर धारण करण्यास पात्र झालें आहे तें शरीर निर्माण

करण्यास उपयुक्त अशी सामुग्री मिळेपर्यंत त्या मनाला वाट पाहावी लागत असते. येथपर्यंत सारें स्पष्ट आहे आणि तें सारें आपल्याला समजूं-पटूं शकतें. तात्पर्य काय की, जीवात्म्याला देहनिर्माणोपयोगी सामुग्री पुरविणें एवढेंच आनुवंशिक संक्रमणाचें कार्य होय. आणि म्हणून हा आनुवंशिक संक्रमणवाद ह्या विशिष्ट मर्यादेपर्यंतच आपण स्वीकारूं शकतों. पण आत्मा देहामागून देहांत गमन करीत असतो, शरीरामागून शरीर निर्माण करीत असतो; आणि आपण करीत असलेला प्रत्येक विचार व आपण करीत असलेली प्रत्येक क्रिया हीं सूक्ष्म रूपांत राहून जात असतात नि वेळ येतांच तीं फिरून उफाळून नव्या स्थूल, व्यक्त रूपांत प्रकट होण्यास सज्ज असतात. ज्या ज्या वेळीं मी तुमच्याकडे बघतों त्या त्या वेळीं माझ्या मनांत एक तरंग उठतो. तो जणु माझ्या चित्तसरोवरांत आंत बुडी घेतो आणि अधिकाधिक सूक्ष्म होत जातो, परंतु त्याचा अजीबात नाश मात्र होत नाही. तो स्मृतीच्या रूपाने फिरून तरंगाकार धारण करून उदित होण्यासाठी सज्ज अशा अवस्थेंत मनांतच वसत असतो. अशा रीतीने हे सगळेच्या सगळे संस्कार माझ्या मनांत विद्यमान आहेत, आणि मी मरेन त्या वेळीं आपल्या एकवटलेल्या बळाने ते मला घेऊन जातील. अशी कल्पना करा की ह्या खोलींत एक चेंडू आहे, आणि आपल्यापैकी प्रत्येकाच्या हातीं एकेक दांडू असून त्यांनी आपण सर्वजण त्या चेंडूला सगळीकडून तडाखे लगावीत आहोंत; चेंडू खोलीमध्ये सारखा इथून तिथे जात राहील, आणि उघड्या दरवाज्याजवळ येतांच तो बाहेर उडून जाईल. स्वत:बरोबर तो काय घेऊन जाईल ? त्याला जितके तडाखे मारले गेले त्यांची एकूण शक्ति. बाहेर तो कोणत्या दिशेने जाईल हें देखील बसलेल्या सर्व तडाख्यांच्या त्या फलीभूत शक्तीनेच ठरेल. ह्याचप्रमाणे, ज्या वेळीं देहाचें पतन होतें त्या वेळीं आत्म्याची गति कोणीकडे होईल हें कशाने ठरतें ? त्याने जीं सारीं कर्में केलीं आहेत, जे सारे विचार चिंतिले आहेत त्या सर्वांच्या परिणामभूत समष्टीनेच तें ठरत असतें. त्याच्या एकूण कर्मांचें फलच जर असें असेल की तें भोगण्यासाठी त्याला नवें शरीर धारण करणें भाग आहे, तर तो अशा माता-पित्यांकडे जाईल की जे त्याला तें शरीर घडविण्यास

योग्य अशी सामुग्री देऊं शकतील. त्या सामुग्रीने वा त्या उपादानाने तो आपला नवीन देह घडवून त्यांत एक आयुष्यभर वास्तव्य करील. अशा रीतीने तो देहामागून देहांत जात असतो--कधी स्वर्गांत जातो, परत पृथ्वीवर मनुष्याच्या वा एखाद्या खालच्या प्राण्याच्या रूपाने जन्मतो. जोंवर त्याचा भोग संपत नाही आणि वर्तुळ पूर्ण करून तो स्वस्वरूपीं परतत नाही तोंवर हा असाच प्रकार चालूं राहील. तसें झाल्यावर मग त्याला स्वतःचें स्वरूप कळून येतें, आपण खरोखर कोण आहोंत हें त्याला उमजतें. मग अज्ञान लयास जातें, त्याच्या शक्ति प्रकट होतात. तो सिद्ध होतो, पूर्ण होतो. मग त्याच्या पक्षीं स्थूल शरीरांमधून कार्य करण्याचें कांही प्रयोजन उरत नाही, सूक्ष्म शरीरांमधून कार्य करण्याचेंहि कांही प्रयोजन उरत नाही. तो मग स्वतःच्या ज्योतीने प्रकाशूं लागतो---स्वयंज्योति होऊन जातो, मुक्त होऊन जातो. त्याला मग फिरून मरावें लागत नाही वा फिरून जन्मावेंहि लागत नाही.

आपल्याला या बाबतींत येथे आता यापेक्षा जास्त तपशिलांत शिरावयाचें नाही. तरीपण, ह्या पुनर्जन्माच्या सिद्धान्तासंबंधी आणखी एक मुद्दा मात्र मला तुमच्या नजरेस आणावयाचा आहे. तो असा की, जीवात्म्याची स्वाधीनता प्रतिपादन करणारा हाच सिद्धान्त आहे. हाच एकमेव सिद्धान्त असा आहे की आमच्या सगळ्या दुबळेपणाचा दोष तो आणखी दुसऱ्या कोणावरहि लादत नाही. स्वतःचा दोष दुसऱ्यावर लादण्याची खोड आपल्याला सगळ्यांनाच असते. ही अगदी सर्वांकडून घडणारी चूक आहे. आपल्याला स्वतःचे दोष दिसत नसतात; डोळे स्वतःला पाहत नसतात, त्यांना इतर प्रत्येकाचे डोळे दिसत असतात. स्वतःचा दोष दुसऱ्या कुणाच्यातरी माथीं लादणें शक्य असतें तोंपर्यंत आपण मानवप्राणी स्वतःचा दुबळेपणा, स्वतःचे दोष कबूल करायला मुळीच राजी नसतों. सर्वसाधारण माणूस स्वतःच्या आयुष्यांतील सगळे दोष, सगळ्या चुका आपल्या शेजाऱ्यांवर लादूं पाहत असतो, तें न जमल्यास ईश्वरावर लादूं जातो, आणि तेंहि न साधल्यास दैव नांवाचें एक भूत खडें करून त्याला वेठीस धरतो. परंतु वस्तुतः दैव म्हणजे खरोखर काय ? तें राहतें तरी कुठे ? आपण

जें पेरतों तेंच उगवत असतें. आपल्या दैवाचें आपणच निर्माते आहोंत. त्यासाठी दुसऱ्या कुणाला निंदायलाहि नको आणि वंदायलाहि नको. वारा वाहत असतो; ज्या नावांचीं शिडें उभारलेलीं असतात त्यांना तो लाभतो आणि त्या भरल्याशिडाने आपला मार्ग आक्रमतात, परंतु ज्या नावांचीं शिडें गुंडाळलेलींच असतात त्यांना त्या वाऱ्याचा कांहीच फायदा होत नाही. हा काय त्या वाऱ्याचा दोष ? हा काय त्या दयाघन परम पित्याचा दोष—— ज्याच्या दयेचा वायु अहर्निश सतत अखंडपणें वाहत असतो, ज्याच्या दयेला ऱ्हास कसा तो माहीतच नाही अशा त्या भगवंताचा का हा दोष की आपल्यापैकी कांहीजण सुखी आहेत नि कांही दुःखी ? आपणच आपलें भाग्य घडवीत असतों. त्याचा सूर्य सबळ-दुर्बळ सगळ्यांसाठीच उगवत असतो. त्याचा वारा पापी-पुण्यवान सगळ्यांसाठी सारखाच वाहत असतो. तो सर्वांचाच प्रभु आहे, सर्वांचाच पिता आहे—— तो दयाळू आहे, समदर्शी आहे. तुम्हांला असें वाटतें काय की, आमच्या आयुष्यांतील क:पदार्थ लहान-लहान गोष्टींकडे आम्ही ज्या दृष्टीने बघतों त्याच दृष्टीने तो ब्रह्माण्ड-नायकहि त्यांच्याकडे बघत असतो ? भगवंतासंबंधी ही किती क्षुद्र, हीन कल्पना ठरेल बरें ! आपण कुत्र्याच्या लहानलहान पिलांप्रमाणे ह्या जगांत नाना गोष्टींसाठी अगदी प्राण पणास लावून धडपड करीत असतों, आणि तो प्रभुदेखील त्या गोष्टींकडे आमच्या इतक्याच गंभीर-पणें पाहील असें मूर्खपणें समजत असतों. ह्या कुत्र्याच्या पिलांच्या या खेळाची किंमत काय, त्याचा अर्थ काय हें तो पुरेपूर जाणून असतो. स्वतःचे दोष त्याच्या माथीं लादण्याचा, त्याला दंड-पुरस्कार देणारा ठरविण्याचा आमचा खटाटोप निव्वळ निर्बुद्धपणाच होय. तो कुणाला दंडहि देत नाही, कुणाला पुरस्कारहि देत नाही. सर्वदा, सर्वत्र, सर्व अवस्थांत अचूकपणें, अढळपणें त्याची दया प्रत्येकालाच लाभणें शक्य आहे—— प्रत्येकजणच त्याच्या दयेचा अधिकारी आहे, कोणीहि त्याच्या दयेपासून वंचित नाही. आपण तिचा उपयोग कसा करूं हें आमचें आमच्यावरच अवलंबून आहे. आपण ती कशा तऱ्हेने कामीं आणूं हें आमचें आमच्यावरच अवलंबून आहे. कुणा माणसाला किंवा ईश्वराला किंवा जगांतील आणखी कुणालाहि दोष देऊं नका. ज्या वेळीं तुम्हांला

दु:ख भोगावें लागत असल्याचें दिसेल त्या वेळीं त्याबद्दल स्वत:लाच दोषी ठरवा आणि जेणेंकरून स्वत:चें कल्याण होईल तें करण्याचा प्रयत्न करा.

ह्या समस्येचें केवळ हें एकच उत्तर आहे. जे दुसऱ्यांना दोष देत असतात-- आणि हाय ! अशांची संख्या दिवसेंदिवस सारखी वाढते आहे-- ते बहुधा दुबळ्या मेंदूचे कमनशिबी लोक असतात; स्वत:च्या चुकांनी त्यांनी ती दुर्दशा स्वत:वर ओढवून घेतलेली असते आणि मग ते इतरांना दोष देत बसतात, परंतु त्याने त्यांच्या अवस्थेंत कांहीच फरक पडत नाही. त्याने त्यांचा कसलाहि फायदा होत नाही. उलट, दुसऱ्यांवर दोष लादण्याच्या ह्या प्रयत्नांनी ते आणखीच दुबळे मात्र बनतात. म्हणून, स्वत:च्या दोषांसाठी दुसऱ्या कुणालाहि बोल लावूं नका, स्वत:च्या पायांवर उभें राहा आणि सर्व जबाबदारी आपल्या स्वत:वर घ्या. म्हणा की, "जें हें दु:ख मी भोगतों आहें तें माझ्याच कृत्यांमुळे होय, आणि ह्यावरूनच हेंहि सिद्ध होतें की तें माझ्याकडूनच नष्ट होऊं शकेल." जें मीं निर्माण केलें आहे त्याचा मीच ध्वंस करूं शकेन; जें दुसऱ्या कुणीं निर्माण केलें आहे त्याचा नाश करण्यास मी कधीच समर्थ होऊं शकणार नाहीं. म्हणून, उठा, धीट बना, शक्तिमान बना. सगळी जबाबदारी स्वत:च्याच खांद्यावर घ्या, आणि पक्की खूणगांठ बांधून असा की तुमच्या भाग्याचे तुम्हीच विधाते आहांत. जें बल वा जें साहाय्य तुम्हांस हवें आहे तें तुमच्या स्वत:च्या आंतच आहे. हें जाणून स्वत:च स्वत:चें भवितव्य घडवा. 'गतं न शोच्यम्.' जें झालें तें होऊन गेलें, त्याबद्दल खंत करीत बसूं नका. म्हणतात ना की, वाहिलें तें पाणी नि राहिली ती गंगा. अनंत भावीकाळ तुमच्यापुढे विस्तारलेला आहे. आणि हें तुम्हीं नेहमी लक्षांत ठेवावयास हवें की तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार नि प्रत्येक कृत्य तुमच्या गंगाजळींत संचित राहील. आणि हें पण सदा लक्षांत असूं द्या की, तुम्हीं केलेले कुविचार आणि तुम्हीं केलेलीं कुकर्में ज्याप्रमाणे वाघांसारखीं तुमच्यावर झेप घेण्यास टपून आहेत, त्याचप्रमाणे ही देखील मोठ्या स्फूर्तिदायी आशेची गोष्ट आहे की तुमचे सद्विचार आणि तुमचीं सत्कर्में हजारो लाखो देवदूतांच्या शक्तीने तुमचें रक्षण करण्यास सदासर्वदा सज्ज आहेत.

# अमरत्व

( अमेरिकेंत दिलेलें व्याख्यान )

हा एकच एक प्रश्न--जीवात्म्याच्या अमरत्वासंबंधीचा प्रश्न जितक्या वेळा विचारला गेला आहे तितक्या वेळा आणखी दुसरा कोणता प्रश्न विचारला गेला असेल बरें ? ह्या रहस्याचा भेद करण्यासाठी मानवानें हें जग जितके धुंडाळलें तितकें आणखी कशासाठी बरें धुंडाळलें असेल ? ह्या प्रश्नापेक्षा मानवी हृदयाला जवळचा आणि जिव्हाळ्याचा आणखी कोणता प्रश्न असेल ? आमच्या जीवनाशीं, आमच्या अस्तित्वाशीं इतका अच्छेद्यपणें निगडित आणखी कोणता बरें प्रश्न असेल ? हें अमरत्व हा कवींच्या कल्पनेचा, तत्त्वज्ञांच्या विचारांचा. द्रष्ट्यांच्या चिंतनाचा आणि ऋषींच्या ध्यानाचा विषय झालेला आहे, सिंहासनाधिष्ठित सम्राटांनी त्याची मूलगामी चर्चा केली आहे, रस्त्यावरील भिकाऱ्यांनी त्याचें सुरम्य स्वप्न बघितलें आहे. मानवांतील सर्वांत श्रेष्ठांना त्याचा लाभ झालेला आहे, सगळ्यांत निकृष्ट माणसांनीहि त्याची आशा धरलेली आहे. ह्याविषयीची आस्था आणि ओढ अजूनहि नाहीशी झालेली नाही, आणि मानवस्वभाव जोंपर्यंत आहे असाच राहील तोंपर्यंत त्याविषयीची ही आस्था नि ही ओढहि नष्ट व्हावयाची नाही. निरनिराळ्या जनांनी जगाला ह्याविषयी निरनिराळीं उत्तरें दिलेलीं आहेत. परत, इतिहासाच्या प्रत्येक पर्वांत हजारोजणांनी हा प्रश्न व्यर्थ म्हणून सोडून दिला आहे, आणि तरीहि तो प्रश्न अजूनहि होता तसाच नवीन आहे, ताजा आहे. जीवनाच्या धबडग्यांत आणि धडपडींत पुष्कळदा आपल्याला त्याचा विसर पडल्यासारखें होतें, परंतु अकस्मात् कुणीतरी मरतो--ज्याच्यावर प्राणांपलीकडे प्रेम केलें, ज्याच्यांत सारा जीव गुंतलेला होता असा आपल्या अगदी जवळचा नि आवडीचा कुणी तरी आपल्यापासून कायमचा हिरावून घेतला जातो--आणि मग ह्या संसाराचा कोलाहल, दंगल नि धुडगूस

क्षणभर निमतात, सारें कसें थबकल्यासारखें होऊन जातें, नि आत्म्याच्या गाभाऱ्यांत तो जुनाच घुमारा घुमूं लागतो--"ह्यानंतर पुढे काय ?"--"मृत्यूनंतर आत्म्याचें काय होतें बरें ?"

समस्त मानवी ज्ञान हें अनुभवांतूनच उत्पन्न होत असतें; अनुभवाखेरीज आपण कांहीहि जाणणें शक्य नाही. आपला सर्व तर्क, आपलीं सगळीं अनुमानें ही आपण आपल्या अनुभवांनी बनविलेल्या सामान्य सिद्धान्तांवरच आधारलेलीं असतात; आपलें समस्त ज्ञान म्हणजे स्वतःच्या अनुभवांची नीट गुंफण करणें, नीट जुळणी करणें, त्यांचा नीट समन्वय साधणें याखेरीज आणखी कांहीच नव्हे. सभोवताल दृष्टि टाकल्यास आपल्याला काय आढळून येतें ? एकसारखा बदल ! अखंड परिवर्तन ! बीजांतून रोप उगवतें, रोपाचें झाड होतें, आणि वर्तुळ पूर्ण करून तें झाड फिरून बीजरूप धारण करतें. प्राणी जगांत येतो, कांही काल जगतो, आणि मरतो-- अशा रीतीने वर्तुळ पूर्ण होतें. मनुष्याचेंहि असेंच. फार काय पण, मोठमोठे पर्वतहि हळूहळू पण निश्चितपणें चूर्ण होत असतात, नद्या हळूहळू पण सुनिश्चितपणें सुकत असतात. पावसाच्या रूपानें पाणी समुद्र सोडून बाहेर जातें आणि अखेर परत समुद्राला जाऊन मिळतें. सर्वत्रच वर्तुळें पूर्ण होत आहेत-- जन्म, वृद्धि, क्षय आणि विनाश अगदी अंकगणिताच्या अचुकपणें एकामागून एक येत असतात. हा आपला अगदी नित्याचा--अगदी रोजचाच अनुभव आहे. आणि तरीसुद्धा, अगदी यःकश्चित् अणूपासून तों सर्वश्रेष्ठ सिद्ध पुरुषापर्यंतच्या ह्या अब्जावधि प्रकारच्या विभिन्न, विविध नाम-रूपयुक्त वस्तूंच्या पाठीशीं, त्यांच्या अंतरंगीं एक अखंडितता, एकप्रकारचें एक ऐक्य विद्यमान असल्याचें आपल्या प्रत्ययास येतें. दररोजच आपल्याला दिसून येत आहे की, जी भिंत एका पदार्थाला दुसऱ्या पदार्थापासून विलग करीत आहे असें वाटत होतें तीं भिंत धडाधड ढासळत आहे, आणि समस्त पदार्थ म्हणजे एकच जडद्रव्य असून तें वेगवेगळ्या प्रकारें आणि निरनिराळ्या रूपांनी व्यक्त होत आहे असें आधुनिक विज्ञान मानूं लागलें आहे; ती एकच प्राणशक्ति नाना प्रकारांनी आणि नाना रूपांनी प्रकट होत आहे,-- ह्या साऱ्यांना जोडणारी ती जणु एक सलग साखळी असून हीं सारीं

भिन्नभिन्न रूपें म्हणजे जणु त्या साखळीचीच एकेक कडी आहे; कडीमागून कडी अशा ह्या अनंत कड्या विखुरलेल्या आहेत, पण सान्या आहेत मात्र त्या एकाच साखळीच्या कड्या. ह्यालाच म्हणतात क्रमोन्नति वा क्रमविकासवाद. ही कल्पना जुनीच आहे, फार फार जुनी आहे, मानवसमाज जितका जुना आहे तितकी जुनी आहे; फक्त, मानवी ज्ञान जसजसें प्रगत होत आहे तसतसा तिला उजळा बसत असून ती अधिकाधिक अभिनव, अधिकाधिक उज्ज्वल, जास्त जास्त टवटवीत वाटत आहे. परंतु या क्रमविकासाला आणखी एक महत्त्वाची बाजू आहे की जी त्या प्राचीनांनी हेरली होती, पण जी आधुनिकांच्या मात्र अजून नीटशी ध्यानांत आलेली नाही, आणि ती म्हणजे——क्रमसंकोच. बीजाचाच वृक्ष होत असतो, वाळूच्या कणाचा कधी वृक्ष होत नसतो. पिताच पुत्र होत असतो, चिखलाचा एक पेंड कधी पुत्ररूपाने जन्मत नाही. प्रश्न आहे——ह्या क्रमविकासाची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीची अवस्था काय असते?—— हा क्रमविकास कुठून, कशापासून सुरू होत असतो? बीज पूर्वी काय होतें? तें पूर्वी वृक्षाच्याच रूपाने होतें. भावी वृक्षाची सर्व शक्यता त्या बीजांत वसत असते; भावी माणसाची समस्त शक्ति लहानग्या मुलाच्या ठायीं अप्रकटितपणें विद्यमान असते; कोणत्याहि भावी जीवाची समस्त संभाव्यता त्याच्या बीजकोषांत अव्यक्तपणें सुप्त असते. ह्याचा अर्थ काय होतो? भारतांतील प्राचीन दार्शनिकांनी ह्याला म्हटलें आहे—— क्रमसंकोच. एकूण काय की, प्रत्येक क्रमविकासाच्या आधी क्रमसंकोचाची प्रक्रिया अस्तित्वांत असल्याचें आपल्या निदर्शनास येतें. जें आधीचेच तिथे नाही तें क्रमविकासाच्या प्रक्रियेने व्यक्त होणें कदापि शक्य नाही. जें आधीचेंच विद्यमान नाही त्याचा क्रमविकास होत नसतो. येथे आधुनिक विज्ञान फिरून आपल्या मदतीला येतें. गणिती तर्काने हें सिद्ध झालें आहे की, ह्या विश्वांत प्रकट झालेल्या शक्तीची गोळाबेरीज ही सदा समान असते, तींत कधी ऱ्हास-वृद्धि होत नसते. आहे त्यांतून तुम्ही जडाचा एक कण किंवा शक्तीचा एक टिपूसहि कमी करूं शकणार नाही वा त्यांत लवमात्र भरहि घालू शकणार नाही. म्हणजे काय की क्रमविकास कांही शून्यांतून झालेला नाही. पण मग तो

कशांतून बरें झाला––तो झाला त्या आधीच्या क्रमसंकोचांतून. ह्या क्रमविकासाच्या पूर्वी क्रमसंकोचाची प्रक्रिया होऊन गेली असली पाहिजे हें अगदी निश्चित. मूल म्हणजे क्रमसंकुचित माणूस होय, आणि माणूस म्हणजे क्रमविकसित मूल होय. बीज म्हणजे क्रमसंकुचित वृक्ष होय, आणि वृक्ष म्हणजे क्रमविकसित बीज होय. भावी जीवाच्या जीवनाची समस्त संभाव्यता त्याच्या जीवकोषांत अव्यक्तपणें असते. आता ही समस्या अमळ सुगम झाली आहे. आता ह्या तत्त्वाला, आधीच्या त्या जीवनाच्या अखंडिततेच्या कल्पनेची जोड देऊन तीं दोन्हीं एकाच वेळी विचारांत घ्या. अगदी कनिष्ठ अशा जीवाणूपासून तों अगदी पूर्ण मानवापर्यंत वस्तुतः एकच अस्तित्व–– एकच जीवन विद्यमान आहे. ज्याप्रमाणे एका आयुष्यांत आपल्याला अभिव्यक्तीचे विविध प्रकार आढळतात––जीवबीज तान्ह्या मुलांत, बालकांत, तरुणांत नि वृद्धांत विकसित होत जातें––त्याचप्रमाणे त्या जीवाणूपासून तों अगदी पूर्ण मनुष्यापर्यंत एक अखंडित जीवनसूत्र, एक सलग साखळी असल्याचें आपल्या निदर्शनास येतें. ह्यालाच म्हणतात क्रमविकास, परंतु आपण बघितलेंच आहे की प्रत्येक क्रमविकासाच्या बुडाशीं एक क्रमसंकोच विद्यमान असतो. हळूहळू व्यक्त होत जाणारी ही जीवनशक्ति प्रारंभींच्या जीवाणूपासून तों अंतींच्या पूर्ण मानवापर्यंत वा पृथ्वीवर आविर्भूत झालेल्या ईश्वरावतारापर्यंत क्रमविकसित होत असते–– आणि म्हणून ही समस्त मालिका त्या आदिम जीवाणूंतच क्रमसंकुचितावस्थेंत अस्तित्वांत असली पाहिजे. ही समग्र मालिका त्या एकाच जीवनाची अभिव्यक्ति होय. ह्या समस्त मालिकेच्या रूपाने क्रमशः अभिव्यक्त होणारी ही जीवनशक्ति, फार काय पण मर्त्यलोकीं मनुष्यरूपाने अवतीर्ण झालेला ईश्वर वा अवतारी पुरुष देखील त्या प्रारंभींच्या जीवाणूंत अव्यक्तस्वरूपांत अवस्थित होता, त्यांत क्रमसंकुचित होता, आणि त्यांतून हें सारें क्रमाक्रमाने बाहेर आलें, हळूहळू हळूहळू अभिव्यक्त होत गेलें. सर्वांत श्रेष्ठ अशी अंतिम अभिव्यक्तिदेखील तिथे बीजावस्थेंत सूक्ष्म रूपाने विद्यमान असलीच पाहिजे. असें असेल तर मग, ज्या एका शक्तींतून ही माला वा ही साखळी निर्माण झाली आहे ती शक्ति कशाची बरें क्रमसंकुचित अवस्था असेल ? काय बरें त्या

शक्तीच्या रूपाने क्रमसंकुचित झालेलें असेल ? त्या शक्तीच्या रूपाने क्रमसंकुचित झाली होती-- तीच सर्वव्यापी, विश्वमयी चित्कळा ! हेंच एकरस, घनीभूत चैतन्य त्या आदि जीवाणूंत क्रमसंकुचित झालेलें असतें, आणि त्या जीवाणूपासून तों संपूर्ण सिद्ध मनुष्यापर्यंतच्या मालिकेंतील रूपांनी हळूहळू हळूहळू स्वतःला अभिव्यक्त करीत असतें. तें हळूहळू 'अभिव्यक्त' होत असतें, थोडेंथोडें 'वाढत' असतें असें नव्हे, ही 'वाढण्या'ची कल्पना तुम्ही आपल्या डोक्यांतून अजीबात काढून टाका. 'वाढ' म्हटली की बाहेरून कांहीतरी येत असतें अशीच कल्पना मनांत येते. परंतु, तसें मानल्यास प्रत्येक जीवाच्या अंतर्यामीं अव्यक्तपणें वास करणारें तें अनंत चैतन्य कोणत्याहि बाह्य गोष्टीवर वा अवस्थेवर अवलंबून नाही हें सत्य खोटें पडेल. त्या चैतन्याची कधीच 'वाढ' होत नसते. तें कधीच 'वाढत' नसतें; तें सर्वदा जसेंच्या तसें पूर्ण असतें, त्याची केवळ अधिकाधिक अभिव्यक्ति होत जाते, इतकेंच.

'कार्य' म्हणजेच 'कारणा'चें व्यक्त रूप. कार्य आणि कारण यांच्यांत स्वरूपतः कांहीच भेद नाही. उदाहरणार्थ हा कांचेचा प्यालाच घ्या. ज्या उपादानाचा वा कच्च्या मालाचा तो बनला आहे तें उपादान, आणि ज्याने तो बनविला त्याची इच्छाशक्ति या दोहोंच्या संयोगाने तो तयार झाला आहे. हीं दोन त्याचीं कारणें होत, आणि तीं दोन्हीं त्यांत विद्यमान आहेत. निर्मात्याची इच्छाशक्ति त्यांत आता कोणत्या रूपाने विद्यमान आहे ? त्यांतील कांचेचे कण एकत्र चिकटवून ठेवणाऱ्या शक्तीच्या रूपाने-- समुच्चयशक्तीच्या वा संहतिशक्तीच्या रूपाने. ती शक्ति जर यांत नसती तर त्याचा प्रत्येक कण विलग होऊन गेला असता. असो तर, मग कार्य म्हणजे काय ? कार्य म्हणजेच कारण--फक्त निराळ्या स्वरूपांत, इतकेंच. कारणाचीच निराळ्या तऱ्हेने घडण होऊन तें कार्य बनत असतें. 'कारण' ज्या वेळीं बदलून कांही विशिष्ट कालासाठी समर्याद होऊन साकारतें त्या वेळीं त्यालाच 'कार्य' म्हणतात. हें आपण लक्षांत ठेवावयास हवें. जीवनासंबंधीच्या आपल्या कल्पनेस हें तत्त्व लागू केल्यास दिसून येतें की, जीवाणूपासून तों संपूर्ण सिद्ध मनुष्यापर्यंतच्या नानाविध रूपांनी

अभिव्यक्त झालेली ही अवघीच्या अवघी माला त्या विश्वव्यापी प्राण-शक्तीशीं-- त्या चित्कळेशीं अभिन्न असली पाहिजे. प्रथम त्या चित्कळेने क्रमसंकुचित होऊन सूक्ष्म रूप धारण केलें, आणि मग त्या कारणभूत अनिर्वाच्य सूक्ष्म अवस्थेंतून ती क्रमविकसित होत गेली, स्वत:ला अभिव्यक्त करीत गेली-- अधिकाधिक स्थूल होत गेली.

परंतु अमरत्वाचा प्रश्न अजूनहि सुटलेला नाही. आपल्याला आतापर्यंत काय आढळून आलें ? आतापर्यंतच्या चर्चेंतून एवढेंच निष्पन्न झालें की, ह्या जगांतील कशाचाहि ध्वंस होत नसतो. या जगांत नवीन असें कांहीहि नाही, कांही व्हावयाचेंहि नाही. एका प्रकारच्या वस्तूंचे समुच्चय, एखाद्या चाकाप्रमाणे फिरून, एकामागून एक पुन्हापुन्हा उपस्थित होत आहेत. ह्या जगांतली प्रत्येक गति लाटेच्या स्वरूपाची असते-- एकदा वर उसळते आणि एकदा खाली कोसळते. अनंत कोटी ब्रह्माण्डें सूक्ष्म रूपांतून बाहेर पडतात, क्रम-विकसित होत जाऊन अधिकाधिक स्थूल आकार धारण करतात. फिरून जणुकाय विरून त्या सूक्ष्म रूपास परत जातात. फिरून त्या सूक्ष्म अवस्थेंतून स्थूल अवस्थेंत येतात, कांही काल क्रमविकसित होत राहतात आणि मग फिरून हळूहळू आपल्या त्या कारणावस्थेंत लीन होतात. प्रत्येक जीवाचें हें असें चाललें आहे. जीवनाचा प्रत्येक आविष्कार-- प्रत्येक जीव-- अशा तऱ्हेने सूक्ष्म-स्थूल अवस्थांमधे गमनागमन करीत आहे-- बाहेर येत आहे नि परत जात आहे. ह्या साऱ्या प्रकारांत नाहीसें काय होत असतें ? रूप वा आकार. रूप वा आकार नष्ट होत असतो, पण तो पुन्हा उत्पन्न होत असतो. असें म्हणतां येईल की, एका अर्थानें हीं शरीरें वा हे आकार देखील अविनाशी आहेत, शाश्वत आहेत. एका अर्थानें हे सर्व देह आणि हीं सर्व रूपेंहि नित्य आहेत. कशीं ? कल्पना करा की आपण फासे खेळत आहोंत आणि समजा की ६-३-९ असें दान पडलें आहे. आपण पुढे खेळूं लागतों. पुन्हापुन्हा ते फासे फेकले जातात आणि दर खेपेस निरनिराळें दान पडत जातें. परंतु याप्रमाणे खेळतां खेळतां असा एक डाव फिरून येईल की त्या वेळीं पुन्हा तोच जोड आणि तेंच दान येईल. फिरून खेळा, फिरून बऱ्याच वेळाने का

होईना पण तेंच दान पडेल. याचप्रमाणे चालूं राहील. आता, या विश्वांत असलेल्या प्रत्येक कणाला, प्रत्येक अणूला आपण एकेक फासा समजूं या. हे सारे फासे पुन:पुन: फेकले जात आहेत आणि प्रत्येक वेळीं त्यांचा एकेका प्रकारें संयोग होत आहे. सध्या आपण आपल्या सभोवताल पाहत असलेले समस्त पदार्थ म्हणजे त्या अणूंचा एक विशिष्ट संयोग होय. इथे हा ग्लास, हें टेबल, हा पाण्याचा चंबू वगैरे जिनसा आहेत. अणुपरमाणूंचा हा एका प्रकारचा संयोग आहे. कालान्तराने हा संयोग नष्ट होऊन जाईल. परंतु अशी एक वेळ खचितच येईल की जेव्हा अगदी हाच संयोग फिरून घडून येईल--त्या वेळीं तुम्ही असेंच येथे उपस्थित असाल, हें टेबल वगैरे सारेंकांही सध्या आहे तसेंच नि त्याच ठिकाणीं ठेवलेलें असेल, आणि आता चालूं असलेल्या विषयावरच व्याख्यान चाललेलें असेल. असंख्य वेळां हें असेंच घडलेलें आहे व आणखीहि असंख्य वेळां त्याची पुनरावृत्ति होईल. हें झालें बाह्य, स्थूल भौतिक रूपांविषयी. त्यासंबंधी या साऱ्यावरून काय सिद्ध झालें ? हेंच की, अणुपरमाणूंच्या संयोगांनी निर्माण झालेलीं हीं भौतिक रूपें सुद्धा अनादिअनंतपणें पुनरावृत्त होत असतात.

या सिद्धान्तांतून एक अत्यंत मनोरंजक गोष्ट निष्पन्न होते, ती म्हणजे, पुढीलमारख्या वस्तुस्थितीचें समाधानकारक स्पष्टीकरण: तुमच्यापैकी कुणींकुणीं बहुधा अशी व्यक्ति बघितली असेल की जी इतरांचें गत जीवन जाणूं शकते आणि त्यांचें भविष्य सांगूं शकते. भविष्यकाळांतील घटना जर कांही ठराविक आणि निश्चित नियमांनुसार घडत नसतील तर भविष्यांत काय होणार आहे हें कुणीहि झालें तरी कसें बरें जाणूं शकेल ? परंतु, भूतकाळांतील घटना भविष्यकाळांत पुनरावृत्त होत असतात हें आपण पाहिलेंच. जत्रावगैरेंसारख्या प्रसंगीं उभारण्यांत येणारा रहाटपाळणा तुम्हीं सर्वांनीच बघितला असेल. त्याचे सगळे झुले एकामागून एक, नियमित गतीने चक्राकार फिरत असतात. लोकांचा एक जथा येतो--त्यांतील सगळेजण एकेका झुल्यांत बसतात. रहाटपाळणा फिरूं लागतो. वर्तुळें पूर्ण करून तो थांबतो. त्यांत बसलेले ते लोक खाली उतरतात. नवा जथा येतो--

त्यांतील लोक एकेका झुल्यांत बसतात. याप्रमाणे चाललें असतें. अगदी क्षुद्र प्राण्यांपासून तों सर्वश्रेष्ठ माणसापर्यंतचें प्रकृतीचें हें प्रत्येक रूपच जणु एकेक जथा आहे, प्रकृतिच तो प्रचंड, जगड्व्याळ रहाटपाळणा आहे, आणि प्रत्येक शरीर वा रूप या रहाटपाळण्याचा एकेक झुला आहे. जीवात्म्यांचे नवे नवे जथे त्या झुल्यांमधे बसत असतात, पूर्ण वा सिद्ध होईपर्यंत वर वर जात असतात आणि मग त्या रहाटपाळण्यांतून उतरत असतात. पण त्या रहाटपाळण्याचें फिरणें मात्र सदैव चालूंच असतें---सर्वदा जथ्यामागून जथे बसवून घेऊन त्यांना फिरविण्यास तो तयारच असतो. आणि, जोंपर्यंत हे देह त्या रहाटपाळण्यांत आहेत तोंपर्यंत अगदी निश्चितपणें, अगदी गणिती अचूकपणें, ते देह कुठे जातील हें आधीच नक्की सांगतां येईल, परंतु आत्म्यासंबंधी मात्र तसें सांगतां येणें संभवत नाही. अशा रीतीने प्रकृतीचें भूत आणि भविष्य अगदी तंतोतंतपणें सांगतां येणें शक्य आहे.

सारांश, आपण बघितलें की, जड अणुपरमाणूंचे सध्या ज्या प्रकारचे संयोग झालेले आहेत त्याचप्रकारचे त्यांचे संयोग फिरफिरून विशिष्ट समयीं होत असतात. अनादिकाळापासून जगाची ही अशी प्रवाहरूपाने नित्यता चालली आहे. परंतु ह्याने कांही आत्म्याचें अमरत्व सिद्ध होत नाही. आपण हेंहि बघितलेंच आहे की, कोणत्याहि शक्तीचा नाश होत नसतो, कोणत्याहि जडवस्तूचा कधी शून्यांत लोप करतां येणें शक्य नसतें. तर मग त्यांचें काय होत असतें ? त्यांचीं नाम-रूपें बदलत जातात, आणि अखेर, जेथून त्यांची उत्पत्ति झाली होती तिथेच तीं परत येतात. कोणतीहि गति कधी सरळरेषेंत होत नसते. प्रत्येक वस्तु वर्तुलाकार फिरून आपल्या पूर्वीच्या स्थानीं परतत असते, कारण सरळरेषा अनंतपणें वाढविल्यास तिचें वर्तुळ बनत असतें. असेंच जर असेल तर मग कोणत्याहि आत्म्याची अनंतकालासाठी, म्हणजेच कायमची अधोगति होणें शक्य नाही---सुतरां शक्य नाही. जगामधली प्रत्येक गोष्ट आपलें वर्तुळ पूर्ण करून स्वतःच्या उगमस्थानीं परत आलीच पाहिजे---लवकर किंवा उशीरा, इतकाच काय तो फरक. तुम्ही, किंवा मी, किंवा हे इतर सारे जीवात्मे काय आहेत ? क्रमसंकोच आणि क्रमविकास यांची चर्चा करतांना आपण पाहिलेंच आहे

की, तुम्ही वा मी, आपण सगळेच त्या विराट्, विश्वव्यापी चैतन्याचा वा विश्वव्यापी प्राणाचा वा विश्वव्यापी मनाचा एकेक अंश आहोंत; आपण त्याचींच क्रमसंकुचित रूपें आहोंत, तेंच आमच्या रूपांनी क्रमसंकुचित झालें आहे. आणि म्हणून आपण आपापलीं वर्तुळें पूर्ण करून क्रमविकासाच्या प्रक्रियेनुसार फिरून त्या विश्वव्यापी चैतन्याप्रत परत जाऊं. आणि तें विश्वव्यापी चैतन्य म्हणजेच--ईश्वर. त्या विश्वव्यापी चैतन्यालाच लोक प्रभु, परमेश्वर, ख्रिस्त, बुद्ध वा ब्रह्म म्हणत असतात--जडवाद्यांना त्याचाच शक्तीच्या रूपाने प्रत्यय येत असतो, आणि अज्ञेयवादी त्यालाच अनंत, अनिर्वचनीय, सर्वातीत असें 'कांहीतरी' मानत असतात. तोच विश्वव्यापी प्राण होय, तीच विश्वव्यापी शक्ति वा चित्कळा होय. आणि आपण सर्वजण त्याचेच अंश आहोंत.

आत्म्याच्या अमरत्वासंबंधी ही झाली दुसरी कल्पना, परंतु त्या बाबतींत तीहि कांही पुरेसें प्रमाण नव्हे, याउपरहि कितीतरी शंका नि कितीतरी संदेह तसेच राहून जातात. कोणत्याहि शक्तीला नाश नाही हें म्हणणें मोठें चांगलें आहे, परंतु आपण जितक्या शक्ति आणि जितकीं रूपें बघतों तीं सगळींच मिश्र स्वरूपाचीं असतात--कित्येक घटकांच्या मिश्रणाने वा संयोगाने निर्माण झालेलीं असतात. आपल्या समोर असलेलें हें रूप हें कित्येक घटकांचें संमिश्रण आहे; आपल्याला आढळणारी प्रत्येक शक्तिहि ह्याचप्रमाणे संमिश्र असते. शक्तीसंबंधीचें विज्ञानाचें मत आधारास घेऊन तुम्ही जर तिला कित्येक शक्तींची गोळाबेरीज वा कित्येक शक्तींचें फलित म्हणाल, तर मग तुमच्या व्यक्तित्वाची वा 'मी'पणाची काय वाट ? तें मग कुठे राहिलें ? मिश्रणाने उत्पन्न झालेला प्रत्येक संमिश्र पदार्थ, लवकरच म्हणा की उशीरा म्हणा, स्वतःच्या घटक द्रव्यांमधे विघटित झालाच पाहिजे. ह्या विश्वांत जडाच्या किंवा शक्तीच्या मिश्रणाने जें जें म्हणून उत्पन्न झालें आहे, तें तें कधी ना कधी तरी स्वतःच्या घटकांमधे विभक्त झालेंच पाहिजे. जी वस्तु कित्येक कारणांच्या संमिश्रणाने वा संयोगाने अस्तित्वांत आली आहे तिचें विघटन, म्हणजेच तिचा विनाश वा मृत्यु अवश्यंभावीच होय. आज ना उद्या ती विदीर्ण होणारच, विश्लिष्ट होणारच, विकीर्ण होणारच--स्वतःच्या घटकांमधे विघटित

होणारच. आत्मा ही कांही एखादी भौतिक शक्ति नव्हे, मानस शक्ति वा विचारशक्तिहि नव्हे. तो मानसशक्तीचा व विचारशक्तीचा निर्माता आहे, स्वतः कांही मानस वा विचार-शक्ति नव्हे; तो देह घडविणारा आहे, स्वतःच कांही देह नव्हे. कशावरून ? उघडच आहे की, देह कधी आत्मा असूं शकत नाही. कां नाही ? कारण देह जड आहे, तो चैतन्यवान नाही. मेलेल्या माणसाचें कलेवर किंवा कसायाच्या दुकानांतील मांसाचा तुकडा कधी चैतन्यवान असतो का ?

यावर प्रश्न विचारला जाईल-- 'चैतन्य म्हणजे काय ?' त्याला उत्तर असें की, चैतन्य म्हणजे प्रतिक्रियाशक्ति. आता आपण ह्यांत अमळ खोल जाऊं या. ही समोर एक सुरई आहे. मी ती पाहतों. आता, 'मी पाहतों' म्हणजे खरोखर काय घडतें ? त्या सुरईपासूनचे कांही प्रकाशकिरण माझ्या डोळ्यांमधे शिरतात. त्या किरणांनी माझ्या बुबुळांमागील पडद्यावर एक चित्र पाडलें. तें चित्र नेऊन माझ्या मेंदूला सादर करण्यांत आलें. परंतु अजूनहि 'सुरई पाहणें' ही क्रिया झाली नाही. शरीरक्रियाशास्त्रज्ञ ज्यांना संवेदनावाहक ज्ञानतंतु म्हणतात ते ज्ञानतंतु तो ठसा आंत मेंदूपर्यंत घेऊन जात असतात. पण अजूनहि पाहण्याची प्रतिक्रिया घडत नाही. मेंदूमधील मज्जाकेंद्र तो ठसा मनाला सादर करतें, मन प्रतिक्रिया करतें, आणि ही अशी प्रतिक्रिया होतांक्षणीं ती सुरई माझ्या मनापुढे लख्खन् चमकते --म्हणजे ती माझ्या मनाला गम्य होते--म्हणजेच ती मला 'दिसते'. याहिपेक्षा एक अगदी आपल्या नेहमीच्या परिचयाचें उदाहरण घ्या, म्हणजे ही गोष्ट आणखी चांगल्या रीतीने समजेल. समजा की तुम्ही खूप एकाग्रपणें माझें भाषण ऐकत आहांत आणि एक डास तुमच्या नाकाच्या शेंड्यावर बसला असून, फक्त डासच देऊं शकतात अशी ती गोड सुखसंवेदना तो तुम्हांला देत आहे ! परंतु तुम्ही माझें बोलणें ऐकण्यांत इतकें तल्लीन झालां आहांत की तुम्हांला त्या डासोबांचें तें चावणें मुळी जाणवलेंच नाही. पण म्हणजे खरोखर काय बरें घडलें? तो डास तुमच्या कातडीला एके जागीं चावला. तिथे कित्येक ज्ञानतंतु अर्थातच आहेत. त्या ज्ञानतंतूंनी ती विशिष्ट संवेदना मेंदूपर्यंत नेऊन पोहोचविली. मेंदूवर तिचा ठसाहि पडला. परंतु तुमचें मन

दुसरीकडे, म्हणजे माझें बोलणें ऐकण्यांत गुंतलेलें असल्यामुळे त्यानें प्रतिक्रिया केली नाही. आणि म्हणून तुम्हांला त्या डासाचें चावणें जाणवलें नाही. नवा ठसा आंत आला, परंतु मनाने जर प्रतिक्रिया केली नाही तर आपल्याला त्याचा बोध व्हावयाचा नाही. परंतु मनानें प्रतिक्रिया करतांच आपल्याला त्या ठशाचा बोध होतो––म्हणजेच, आपण 'पाहतों', आपण 'ऐकतों', आपण 'अनुभवतों' वगैरे, वगैरे. मनाची ही प्रतिक्रिया घडतांच, सांख्यांच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे मेंदूपर्यंत आलेला तो ठसा उजळून 'ज्ञानाचें स्फुरण' होतें. ह्या एकूण प्रक्रियेंत आपण बघितलेंच की, हा ज्ञानाचा प्रकाश शरीर देऊं शकत नाही, कारण आपण पाहिलेंच की मनाचें त्या ठशाकडे लक्ष नसेल तर आपल्याला त्याचा बोध होऊं शकत नाही. अशा कांही घटना ऐकण्यांत येतात की, जी भाषा एक व्यक्ति कधीच शिकली नाही ती भाषा, कांही विशिष्ट अवस्थेंत, ती व्यक्ति बोलतांना आढळली आहे. त्या बाबतींत पुढे चौकशी करतां असें निदर्शनास आलें आहे की, तो माणूस आपल्या लहानपणीं ती भाषा बोलणाऱ्या लोकांत राहिला होता––आणि साहजिकच ते ठसे वा संस्कार त्याच्या मेंदूवर राहून गेले होते. ते सारे संस्कार तिथे साठविले गेले होते; कांहीतरी कारण घडून पुढे मनाने त्यांच्यावर प्रतिक्रिया केली, तात्काळ ते जुने, संचित संस्कार उजळून ज्ञानाचें स्फुरण झालें आणि तो मनुष्य ती भाषा बोलूं शकला. परंतु यावरूनच परत हेंहि दिसून येतें की, या साऱ्यासाठी नुसतें मनच पुरेसें नाही, मन स्वतःच आणखी कुणाच्यातरी हातांतील यंत्र वा साधन वा उपकरण आहे. प्रस्तुत घटनेंतील त्या माणसाच्या बाबतींत असें घडलें की, त्याच्या लहानपणीं ती भाषा त्याच्या मनांत सामावलेली होती, पण तो मात्र हें जाणत नव्हता, परंतु अखेर अशी एक वेळ आली की त्याला तिची जाणीव झाली. यावरून हेंच सिद्ध होतें की, मनाखेरीज आणखी कुणीतरी आहे;–त्या माणसाच्या लहानपणीं त्याच्यामधील त्या 'कुणीतरी'ने त्या शक्तीचा उपयोग केला नाही, परंतु तो मोठा होतांच त्या अंतःस्थ 'कुणीतरी'ने संधि साधून त्या शक्तीचा वापर केला. सारांश, प्रथम आहे शरीर, द्वितीय आहे मन अथवा विचारांचें साधन, आणि तृतीय आहे––त्या मनापलीकडे असलेला

आत्मा. मेंदूतील परमाणूंच्या बदलांमुळेच विचार उद्भवत असतात असें आधुनिक तत्वज्ञ मानीत असल्यामुळे ह्या असल्या घटनांचें स्पष्टीकरण करणें त्यांना अर्थातच जमत नाही, आणि स्पष्टीकरण जमत नाही म्हणूनच ते साधारणपणें या असल्या घटनांचा सरळ इन्कार करून मोकळे होतात !

तें कसेंहि असो, मनाचा मेंदूशीं अगदी घनिष्ठ संबंध असून, प्रत्येक वेळीं शरीर बदलतांना त्या मेंदूचा नाश होत असतो. आत्मा हाच एकमेव 'प्रकाशक' असून, मन हें त्याच्या हातांतील एक साधन वा उपकरण आहे; त्या आंतील साधनाद्वारेंच (मनाद्वारेंच) आत्मा बाहेरील साधनें (नाक, डोळे, इत्यादि बाह्य ज्ञानेंद्रियें) हाताळीत असतो आणि अशा रीतीने विषयानुभूति होत असते. बाहेरील नेत्रादि इंद्रियें जगांतील वस्तूंचे ठसे ग्रहण करतात आणि ते आंत मेंदूतील मज्जाकेंद्रांपर्यंत, म्हणजेच खऱ्या ज्ञानेंद्रियांपर्यंत नेऊन पोहोचवितात. कारण एक गोष्ट आपण सदा लक्षांत ठेवावयास हवी की, बाहेरून दिसणारे आपले डोळे, कान वगैरे म्हणजे विषयांच्या ठशांचे केवळ 'ग्राहक' वा 'ग्रहणयंत्रें' होत; आंतील इंद्रियें, म्हणजेच मेंदूतील मज्जाकेंद्रेंच खरें कार्य करीत असतात. संस्कृतभाषेंत मेंदूतील ह्या मज्जाकेंद्रांना, ह्या ज्ञानतंतूंच्या केंद्रांनाच 'इंद्रियें' म्हटलें जातें. हीं 'इंद्रियें' ते ठसे वा त्या संवेदना मनाच्या हवालीं करतात. मन ते ठसे वा त्या संवेदना पुढे नेऊन चित्त नामक स्वतःच्याच एका अवस्थेला देतें. तिथे त्या संवेदना इच्छाशक्तीच्या रूपाने संघटित केल्या जातात. आणि मग हीं सारीं त्यांना त्या अंतर्यामस्थित राजाधिराजाला, त्या अंतःसिंहासनाधिष्ठित नियामकाला, त्या चैतन्यघन आत्म्याला समर्पित करतात. तो त्या बघून आवश्यक ते आदेश देतो. मग मन तात्काळ 'इंद्रियां'वर, म्हणजेच मेंदूतील मज्जाकेंद्रांवर कार्य करतें. आणि तीं इंद्रियें स्थूल शरीरावर कार्य करूं लागतात. ह्या साऱ्यांचा द्रष्टा, अनुभवकर्ता, खरा शास्ता, नियन्ता, स्रष्टा, संचालक तो मानवाचा आत्माच होय.

एवंच, आपण बघितलें की, आत्मा हा देह नव्हे, विचारशक्तियुक्त मनहि नव्हे. आत्मा हा संमिश्र वा संयुक्त पदार्थ असणें शक्य

नाही. कां बरें ? कारण, जो म्हणून संयुक्त वा संमिश्र पदार्थ आहे तो आपण एकतर पाहूं शकतों, किंवा त्याची कल्पना तरी करूं शकतोंच. जी गोष्ट आपण पाहूं शकत नाहीं, जिची आपण कल्पना करूं शकत नाहीं, जी आपण आणखी कशाशीं संयुक्त वा संमिश्र करूं शकत नाहीं, जी आपण धरूं-पकडूं-कवटाळूं शकत नाहीं, जी जडहि नव्हे किंवा शक्तिहि नव्हे, कार्यहि नव्हे किंवा कारणहि नव्हे, ती गोष्ट संयुक्त वा संमिश्र पदार्थ असणें अर्थातच संभवत नाही. आमचें मनोविश्व, आमच्या विचारांचें विश्व हीच ह्या संयुक्त वा संमिश्र पदार्थांची चतु:सीमा होय, त्याबाहेर त्यांना अस्तित्व नाही. मिश्र वा संयुक्त पदार्थ हे नियमांच्या राज्यांतच वसूं शकतात, त्याबाहेर नाही. जें नियमांच्या राज्याबाहेर आहे, नियमातीत आहे तें मिश्र वा संयुक्त असणेंच शक्य नाही. मानवाचा आत्मा हा कार्य-कारणाच्या नियमाच्या पलीकडे असल्यामुळे तो मिश्र वा संयुक्त नाही. तो नित्यमुक्त—मुक्तस्वभाव—असून, नियमाच्या राज्यांतील सर्व वस्तूंचा शास्ता आहे, नियन्ता आहे. तो कधी मरत नाही, कारण मरण म्हणजे तर एखाद्या मिश्र वा संयुक्त पदार्थाचें स्वत:च्या घटकांत विघटन. म्हणून, जें मिश्र वा संयुक्त नाही तें कधीच मरणें शक्य नाही. तें मरतें असें म्हणणें—आत्मा मरतो असें म्हणणें म्हणजे निखालस मूर्खपणाच होय.

आता आपण ह्या 'अमरत्वा'च्या प्रश्नाच्या अगदी सूक्ष्म अशा भागाला—त्याच्या अगदी गाभ्यालाच हात घालीत आहोंत— अगदी खोल खोल पाण्यांत शिरत आहोंत, तुमच्यापैकी कित्येकांना त्यामुळे कदाचित् भयहि वाटण्याचा संभव आहे. आपण बघितलें की, हा आत्मा या जडाच्या नि शक्तीच्या नि विचाराच्या टीचभरच्या विश्वाच्या पलीकडे असल्यामुळे स्वगत-सजातीय-विजातीय-भेदशून्य, अखंड, एकरस असा अमिश्र, असंयुक्त मूलपदार्थ आहे, आणि म्हणून त्याचें विघटन होणें, म्हणजेच त्याचा विनाश होणें, म्हणजेंच तो मरणें शक्य नाही. आता, जो मरत नाही, तो जगत असणेंहि अशक्य ! ज्याला 'मरण' नाही, त्याला 'जीवन' तरी कसें असणार ? कारण, जीवन आणि मरण हीं एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारखीं आहेत मृत्यूचेंच दुसरें नांव जीवन, आणि जीवनाचेंच दुसरें नांव मृत्यु

अभिव्यक्तीच्या एका विशिष्ट प्रकाराला आपण जीवन म्हणतों, आणि त्याच गोष्टीच्या अभिव्यक्तीच्या दुसऱ्या एका विशिष्ट प्रकाराला आपण मृत्यु म्हणतों. ज्या वेळीं लाट वर उंच उसळते त्या वेळीं आपण त्याला जीवन म्हणतों, आणि ज्या वेळीं ती खोल खाली कोसळते त्या वेळीं आपण त्याला मृत्यु म्हणतों, एखादी गोष्ट जर मृत्यूच्या अतीत असेल तर हेंहि उघडच आहे की ती जीवनाच्याहि---जन्माच्याहि--अतीत असली पाहिजे. हें अगदी स्वाभाविकच म्हणावें लागेल. येथे मी तुम्हांला आपल्या त्या पहिल्या सिद्धान्ताचें स्मरण करून देऊं इच्छितों की, मानवात्मा हा त्या सर्वव्यापी, जगन्मय शक्तीचा, म्हणजेच ईश्वराचा अंश आहे---त्याचें केवळ प्रकट रूप आहे. आणि, आता आपण बघितलें की तो मानवात्मा जन्म आणि मृत्यु यांच्या अतीत आहे-- त्या दोहोंच्याहि पलीकडे आहे. तुमचा कधी जन्म झालेला नाही, आणि तुमचा कधी मृत्युहि व्हावयाचा नाही. पण मग, आपण आपल्या भोवती हे जे जन्म आणि मृत्यु बघत असतों ते काय आहेत ? ते मग कुणाचे होत असतात ? ते फक्त देहाचेच होत असतात---देहच जन्मत असतो आणि देहच मरत असतो, आत्मा नव्हे; कारण, आत्मा सर्वव्यापी आहे, नित्यविद्यमान आहे. यावर तुम्ही विचाराल की, "हें कसें शक्य आहे ?" तुम्ही मला साहजिकच म्हणाल की, "आपण येथे हे इतके लोक बसलों आहोंत, आणि तरीहि तुम्ही म्हणतां की आत्मा सर्वव्यापी आहे, हें कसें ?" परंतु, यावर मला तुम्हांला फक्त एवढेंच विचारावयाचें आहे की, एखादी गोष्ट जर नियमांच्या पलीकडे असेल, कार्य-कारणसंबंधाच्या पलीकडे असेल तर मग तिला मर्यादित करूं शकेल असें काय बरें असणें शक्य आहे ? हा समोरचा कांचेचा प्याला सीमित आहे, तो कांही सर्वव्यापी नाही, कारण त्याच्या भोवतालचें जडद्रव्य त्याला त्या विशिष्ट आकाराचेंच राहण्यास भाग पाडीत आहे, तें त्याला विस्तार पावूं देत नाही, सर्वव्यापी होऊं देत नाही. त्याच्या भोवती असलेल्या प्रत्येक गोष्टीचा त्याच्यावर प्रभाव पडत आहे, आणि म्हणून तो सीमित वा मर्यादित आहे. परंतु जें समस्त नियमांच्या पलीकडे आहे, ज्यावर कार्य करील असें कांहीहि नाही, त्याला काय बरें सीमाबद्ध वा मर्यादित करूं शकेल ? तें

सर्वव्यापी असलेंच पाहिजे. तुम्ही या विश्वांत सर्वत्र अवस्थित आहांत. तर मग, मी जन्मलों, मी मरणार आहें वगैरे हें सारें काय आहे ? हें सारें आपण अज्ञानामुळे म्हणत असतों, तो आपल्या मेंदूचा भ्रम आहे. तुम्ही कधी जन्मलां नाही, कधी मरणारहि नाही. तुम्हांला जन्म नाही, पुनर्जन्महि नाही, हें सारें कांही म्हणतां कांही सुद्धा नाही. ह्या जाण्या-येण्याचा अर्थच काय ? नुसता वेडेपणा, आणखी कांहीच नाही. तुम्ही सर्वत्रच आहांत. पण मग ह्या जाण्या-येण्याचा अर्थ तरी काय ? ज्याला तुम्ही मन म्हणतां, त्या ह्या सूक्ष्मशरीराच्या बदलामुळे निर्माण होणारा तो एक भ्रम आहे. तोच आपल्याला भ्रमवीत आहे. एक लहानसा मेघ आकाशावरून तरळत जातो. तो जसजसा पुढे पुढे जातो, तसतसें आकाशच चालत असल्याचा भास होतो. असें पुष्कळदा होतें—— एखादा मेघ चंद्रावरून चालला असतो, पण आपल्याला वाटतें की चंद्रच चालत आहे, पण वस्तुत: चालत असतो मेघच, चंद्र नव्हे. धावत्या आगगाडींत बसलों असतांना वाटूं लागतें की आसमंतांतलीं झाडेंझुडपें, जमीन वगैरेच धावत आहेत; नावेंतून जातांना वाटूं लागतें की पाणीच चालत आहे. वस्तुत: तुम्ही जातहि नाही आणि येतहि नाही, तुम्हांला जन्महि नाही आणि पुनर्जन्महि नाही; तुम्ही अनंत, सर्वव्यापी, नित्यविद्यमान, संपूर्णपणें कार्यकारणातीत, नित्यमुक्त, अज आणि अविनाशी आहांत. जिथे जन्मच नाही तिथे मरणाचा प्रश्नच कसा उद्भवतो ? हा सारा शुद्ध वेडेपणा आहे. तुम्ही सर्वव्यापी आत्मा आहांत——अमर आहांत.

ह्या विचारपरंपरेचा शेवट गाठण्यासाठी——या बाबतींतील निर्दोष, तर्कसंगत असा अंतिम सिद्धान्त गाठण्यासाठी आपल्याला आणखी एक पाऊल पुढे टाकावें लागेल, एक अखेरची पायरी चढावी लागेल. घराकडे जाणारा अर्धा रस्ता चालून मधेच बैठक मारून बसण्यांत कांही स्वारस्य नाही, तसें करून चालणार नाही. तुम्ही तत्त्वज्ञ आहांत, विचाराच्या मार्गावर थोडें पुढे जाऊन 'पुरें, आता आणखी नको, क्षमा करा' असें म्हणणें तुम्हांला शोभत नाही. असो तर, आपण जर समस्त नियमांच्या अतीत असूं तर मग आपण सर्वज्ञ असलोंच पाहिजे, नित्यानंदस्वरूप असलोंच पाहिजे, समस्त ज्ञान, समस्त शक्ति नि समस्त

मांगल्य आमच्यामधेंच असलें पाहिजे. होय, असलेंच पाहिजे; आहेच. आपण सर्वज्ञ, सर्वव्यापी पुरुष आहोंत. परंतु, असे पुरुष अनेक असणें शक्य आहे काय? कोटचवधि सर्वव्यापी पुरुष असणें शक्य आहे काय? अर्थातच नाही. तें अलबत शक्य नाही. तर मग आम्हां सर्वांचें काय झालें? वस्तुतः आपण सगळे एकच आहोंत-- एकच-जण अस्तित्वांत आहे, एकच आत्मा अस्तित्वांत आहे, आणि तो एकमेवाद्वितीय आत्माच आहे आपण सगळे. ह्या टीचभरच्या प्रकृतीच्या पाठीमागे उभा आहे तो आत्मा. तो एकच पुरुष विद्यमान आहे--तोच एकमेव सत्ता आहे, तो नित्यानंदस्वरूप आहे, तो मांगल्य-निधान आहे तो सर्वव्यापक आहे, तो सर्वज्ञ आहे, तो सर्वसाक्षी आहे, तो अज आहे, अमर आहे. त्याच्या आज्ञेनेच हें आकाश विस्तारलें आहे, त्याच्या आज्ञेनेच हा वायु वाहत आहे, सूर्य प्रकाशत आहे आणि प्राणिमात्र जिवंत आहेत. तोच ह्या प्रकृतीचा पाया, तिची सत्ता आहे; त्या सत्यस्वरूपावर अधिष्ठित आहे म्हणूनच ही प्रकृति सत्य भासत आहे. तो आपल्या आत्म्याचा आत्मा आहे, इतकेंच नव्हे तर आपणच तो आहोंत, तो आणि आपण एक आहोंत, अभिन्न आहोंत. जिथे जिथे 'दोन' असतात, 'द्वय' असतें, तिथे भय असतें, तिथे संकट असतें तिथे संघर्ष असतो, तिथे कलह असतो, तिथे स्पर्धा असते. जेव्हा सारेंकांही 'एक' होऊन जातें, 'अद्वय' होऊन जातें तेव्हा मग कुणाचा द्वेष करायचा, कुणाची घृणा बाळगायची, कुणाशीं संघर्ष करायचा? ज्या वेळीं सर्वकांही तो प्रभुच आहे असा अनुभव येऊं लागतो त्या वेळीं मग कुणाशीं कलह करायचा--कुणाशीं लढायचें? जीवनाचें कोडें ह्यानेच सुटूं शकेल, वस्तूंचें स्वरूप ह्यानेच कळूं शकेल. हाच आहे जीवनाचा, जगाचा खरा अर्थ. हीच आहे सिद्धि, हीच आहे पूर्णता, आणि हाच आहे ईश्वर. जोंवर तुम्ही 'नानात्व' बघत आहांत तोंवर तुम्ही भ्रमांत आहांत. ह्या अनेकांनी भरलेल्या जगांत ज्याला तो एक दिसतो, ह्या सदा बदलत्या जगांत ज्याला त्या कधीहि न बदलणाऱ्याचा साक्षात्कार होतो-- तो एकमेवाद्वितीय, तो अपरिवर्तन-शील स्वतःच्या आत्म्याचा आत्मा आहे, स्वतःचें खरें स्वरूप आहे असें ज्याच्या प्रत्ययास येतें तोच मुक्त होय, तोच परमानंदाचा अधिकारी

होय, तोच कृतकृत्य होय, कृतार्थ होय, त्यानेच तें परमपद गाठलें असतें. म्हणून, हें जाणून असां की, तुम्हीच तो आहांत, तुम्हीच ह्या विश्वाचे ईश्वर आहांत-- 'तत्त्वमसि.' आणि ह्या साऱ्या नाना कल्पना-- मी पुरुष आहें अथवा मी स्त्री आहें, मी रोगी आहें अथवा मी निरोगी आहें, मी दुबळा आहें अथवा मी सबळ आहें, मी अमक्याचा द्वेष करतों अथवा तमक्यावर प्रेम करतों, माझा अधिकार क्षुल्लक आहे अथवा खूप मोठा आहे-- या साऱ्या कल्पना निव्वळ भ्रम होत. द्या झुगारून त्या साऱ्या ! तुम्ही कशाने दुबळे आहांत ? तुम्हांला काय दुबळें बनवूं शकेल ? तुम्हांला काय भिववूं शकेल ? जगांत सर्वत्र एकमेव तुम्हीच विराजत आहांत. म्हणून उठा आणि मुक्त व्हा. जाणून असां की, तुम्हांला दुबळें करणारा प्रत्येक विचार आणि प्रत्येक शब्दच काय तो या जगांतील एकमेव अशुभ होय. जें माणसाला दुबळें बनवितें, जें माणसाला भेडसावतें तेंच एकमेव अशुभ असून तें धुत्कारून द्यावयास हवें. तुम्हांला काय बरें भय दाखवूं शकेल ? सूर्यामागून सूर्य निखळून पडोत, चंद्रांमागून चंद्रांचा चक्काचूर होवो, ब्रह्माण्डांमागून ब्रह्माण्डें विनाशाच्या खाईत लोटलीं जावोत-- तुम्हांला त्याचें काय ?-- तुमच्या लेखीं तें काय होय ? एखाद्या प्रचंड शिळे-सारखे अढळ उभे राहा; तुम्ही अविनाशी आहांत, तुम्ही आत्मा आहांत, तुम्ही विश्वात्मा आहांत, तुम्ही विश्वेश्वर आहांत. म्हणा-- "मी निरपेक्ष सत्ता आहें, निरपेक्ष आनंद आहें, निरपेक्ष चैतन्य आहें. शिवोऽहम्, शिवोऽहम्." एखादा क्षुब्ध वनराज ज्याप्रमाणे पिंजरा कडाकड मोडून बाहेर पडतो त्याप्रमाणे, तुम्हांला जखडणाऱ्या साऱ्या साखळ्या तडातड तोडून कायमचे मुक्त व्हा. तुम्ही कोणत्या गोष्टीला भीत आहांत ? काय तुम्हांला बांधून ठेवीत आहे ?--- केवळ अज्ञान, केवळ भ्रांति; आणखी कांहीहि तुम्हांला बांधू शकणार नाही; तुम्ही तोच शुद्ध अपापविद्ध आत्मा आहांत, नित्यानंदस्वरूप आहांत.

निर्बुद्ध, मूर्ख लोकच तुम्हांला सांगतील की तुम्ही पापी आहांत आणि म्हणून एका कोपऱ्यांत दडा व मुळूमुळू रडा. याप्रमाणे, तुम्ही पापी आहांत असें तुमच्या कानींकपाळीं ओरडणारे हे लोक मूर्ख, दुष्ट आणि बदमाषच म्हटले पाहिजेत. तुम्ही सारे ईश्वर आहां. तुम्ही

ईश्वराला ईश्वर म्हणून न ओळखतां त्याला केवळ मनुष्य म्हणत आहांत ना ? म्हणून, जर तुमच्यांत धाडस असेल, धमक असेल तर हा विश्वास पक्का धरून ठेवा आणि आपलें उभें जीवन त्याच्या अनुसार घडवा. कुणी जरी तुमचा गळाहि कापायला येईल तरी त्याला नाही म्हणूं नका, कारण वस्तुतः तुम्हीच तुमचा गळा कापीत आहांत. ज्या वेळीं एखाद्या गरिबावर कांही उपकार कराल त्या वेळीं त्याबद्दल तिळमात्रदेखील अहंकार वाटूं देऊं नका. तो 'उपकार' नव्हे, ती 'उपासना' आहे, त्यांत अहंकार वाटण्यासारखें खरोखर काय आहे? हें सारें विश्व तुम्हीच नाही काय ? ह्यांत असा कोण आहे की जो वस्तुतः तुम्हीच नाही ? तुम्ही या जगाचा, ह्या विश्वाचा आत्मा आहांत. तुम्हीच सूर्य, चंद्र नि तारा आहांत, समस्त रूपांनी तुम्हीच विराजत आहांत. तुम्हीच समस्त विश्व आहांत. तुम्ही कुणाचा वरें द्वेष करणार अन् कुणाशीं दोन हात करणार ? म्हणून, हें जाणा की तुम्हीच तो आहांत---आणि हें जाणून आपलें सारें आयुष्य तदनुसार घडवा. जो हें जाणतो आणि तदनुसार आपलें जीवन घडवितो त्याला मग आणखी अंधारांत चाचपडावें लागणार नाही.

---

# आत्मा आणि त्याच्या विकासाच्या तीन अवस्था

(द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत यांचा समन्वय)

( अमेरिकेंत दिलेलें व्याख्यान )

मॅक्स मूलर यांचें 'वेदान्त तत्त्वज्ञानावरील तीन व्याख्यानें' हें नामांकित पुस्तक तुमच्यापैकी पुष्कळांनीच वाचलें असेल. आणि तुमच्यांतील कित्येकांनी बहुधा प्राध्यापक डॉयसन यांचें त्याच तत्त्वज्ञानावरील जर्मनभाषेंतील पुस्तकहि वाचलें असेल. भारताच्या धार्मिक विचारांसंबंधी पाश्चात्यदेशांमधे जें कांही लिहिलें आणि शिकविलें जात आहे, त्यांत भारतीय विचाराची एक शाखाच मुख्यत्वेंकरून मांडली जात असते, आणि ती शाखा म्हणजे 'अद्वैत' ही होय. अद्वैत ही हिंदुधर्माची एकतत्त्ववादी बाजू होय. आणि ह्यामुळेच पाश्चात्यदेशांमधे कित्येकदा असें समजण्यांत येतें की वेदांची समस्त शिकवण तत्त्वज्ञानाच्या ह्या एकाच प्रणालींत सामावलेली आहे. परंतु, वस्तुस्थिति मात्र अशी आहे की, भारतीय विचाराला विविध पैलू आहेत, आणि इतर पैलूंच्या तुलनेने ह्या अद्वैत मताचे अनुयायी सगळ्यांत कमी भरतील. अत्यंत प्राचीन कालापासून विचाराचे विभिन्न संप्रदाय भारतांत प्रचलित आहेत; आणि, प्रत्येक शाखेने कोणत्या विशिष्ट तत्त्वांवरच विश्वास ठेवला पाहिजे हें नेमून देणारी संघटित वा सर्वमान्य संस्था वा समिति तिथे कधीच अस्तित्वांत नसल्यामुळे स्वतःचा मार्ग निवडण्याची, स्वतःचें तत्त्वज्ञान रचण्याची नि स्वतःचा पंथ स्थापण्याची लोकांना पूर्ण मुभा होती. आणि म्हणूनच आपल्याला आढळून येतें की फार फार पुरातन काळापासून भारत हा धार्मिक पंथांनी अगदी गजबजलेला देश आहे. आजच्या घटकेला भारतांत आमचे किती हजार पंथ आहेत ह्याची मला कल्पना नाही, आणि त्यांच्या जोडीला दरवर्षी कैक नवीन पंथ अस्तित्वांत येत असतातच. त्या जातीची

धार्मिक क्रियाशीलता केवळ अक्षय्यच आहे असें दिसतें.

ह्या समस्त संप्रदायांचे प्रथमतः दोन मुख्य विभाग करतां येण्यासारखे आहेत. ते दोन विभाग म्हणजे 'वैदिक' आणि 'अवैदिक' हे होत. हिंदूंचे धर्मग्रंथ जे वेद, ते सत्याचे सनातन आविष्कार होत असा ज्यांचा विश्वास असतो त्यांना 'वैदिक' म्हणतात, आणि वेदांना डावलून जे इतर आप्तवचनांचा वा प्रमाणांचा आधार घेतात त्यांना 'अवैदिक' मानलें जातें. अवैदिक असे आधुनिक प्रमुख हिंदु पंथ म्हटले म्हणजे जैन आणि बौद्ध हे होत. वैदिकांपैकीहि परत कित्यकजण अशी घोषणा करतात की, शास्त्रांचें प्रामाण्य हें तर्कबुद्धीपेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे, तर इतर कित्येकांचें म्हणणें आहे की, शास्त्रांचा जो आणि जेवढा भाग तर्कबुद्धीला पटण्यासारखा आहे तेवढाच फक्त ग्राह्य समजून बाकीचा खुशाल वगळण्यांत यावा.

सांख्य, नैयायिक आणि मीमांसक या तीन वैदिक विभागांपैकी पहिले दोन, म्हणजे सांख्य व नैयायिक हे दर्शनाच्या व तत्त्वज्ञानाच्या शाखा म्हणून अस्तित्वांत असले तरी एखादा पंथ वा संप्रदाय निर्माण करणें मात्र त्यांना जमलें नाही. आज जर कोणता एकच पंथ वा संप्रदाय समस्त भारताला खरोखर व्यापून असेल तर तो म्हणजे उत्तरमीमांसकांचा अथवा वैदान्तिकांचाच होय. त्यांच्या तत्त्वज्ञानाला 'वेदान्त दर्शन' असें म्हणण्यांत येतें. आता, तसें पाहिल्यास, हिंदु तत्त्वज्ञानाच्या सर्वच शाखा वेदान्तामधून वा उपनिषदांमधूनच उदयास आल्या आहेत, पण तरी देखील अद्वैतवाद्यांनी तें नांव स्वतःच्या वैशिष्टयाचें निदर्शक म्हणून स्वीकारलें, कारण स्वतःचा अवघा धर्म आणि तत्त्वज्ञान हीं त्यांनी वेदान्तावर आणि केवळ वेदान्तावरच आधारलीं आहेत, अन्य कशावरहि नाही. काळाच्या ओघांत वेदान्त प्रभावी ठरला, आणि भारतांत आज अस्तित्वांत असलेल्या नानाविध सर्वच पंथांचें वा संप्रदायांचें वेदान्ताच्या या वा त्या शाखेशीं नातें जोडतां येईल. तथापि, ह्या सर्व शाखांचीं मतें एकच आहेत अशांतला मात्र भाग नाही.

आपल्याला आढळून येईल की, वेदान्त्यांमधे तीन प्रमुख भेद आहेत. एका मुद्यावर ते सर्व सहमत आहेत, आणि तो म्हणजे ते

सगळे 'आस्तिक' आहेत, ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा विश्वास आहे. त्याचबरोबर, वेद ही साक्षात् ईश्वराचीच प्रकट झालेली दैवी वाणी होय-- त्यांतील शब्दन् शब्द स्वयं ईश्वरानेच व्यक्त केला आहे असाहि ह्या सर्व वेदान्त्यांचा विश्वास आहे. मात्र, स्वतःच्या धर्मग्रंथांना ख्रिस्ती किंवा मुसलमान ज्या अर्थाने 'स्वयं ईश्वराने व्यक्त केलेले शब्द' मानतात, नक्की त्याच अर्थाने वेदान्ती बहुधा वेदांना तसें मानीत नाहीत, तर एका अगदीच निराळ्या आणि विशिष्ट अर्थाने ते वेदांना 'ईश्वराची वाङ्मयी मूर्ति' मानतात. त्यांची अशी धारणा आहे की, वेद हे ईश्वराच्या ज्ञानाचे आविष्कार वा प्रकट रूप आहेत, आणि ईश्वर हा नित्य असल्यामुळे त्याचें ज्ञानहि त्याच्या बरोबर नित्य विद्यमान आहे, आणि म्हणून वेद हे नित्य आहेत. ह्या सर्वच वेदान्त्यांचा ज्यावर विश्वास आहे असा आणखीहि एक सामान्य मुद्दा आहे. आणि तो म्हणजे-- कल्पांसंबंधीचा सिद्धान्त. ह्या सर्व वेदान्त्यांचें असें मत आहे की, आपल्या ह्या सृष्टीचे कल्प असतात, ही समस्त सृष्टि एकदा व्यक्त तर एकदा लुप्त होत असते; ती व्यक्त दशेस येऊन अधिकाधिक स्थूल स्थूल होत जाते, आणि अगणनीय कालावधि लोटल्यानंतर ती मग सूक्ष्म सूक्ष्म होतां होतां विरून जाऊन शांत होते, व त्यानंतर कांही काल ती त्या विश्रांतीच्याच अवस्थेंत राहते. त्या नंतर मग ती फिरून व्यक्त होऊं लागते. अशा रीतीने फिरफिरून तीच सृष्टि-स्थिति-प्रलयाची प्रक्रिया सतत चालली असते. सृष्टीच्या या उत्पत्ति-प्रलयांमधील काळालाच म्हणतात 'कल्प.' असो. ते 'आकाश' नामक एका द्रव्याचें अस्तित्व मानतात. हें 'आकाश' म्हणजे वैज्ञानिक ज्याला 'ईथर' म्हणतात त्यासारखें कांहीसें आहे. तद्वतच ते 'प्राण' नामक एका शक्तीचेंहि अस्तित्व मानतात. ह्या 'प्राणा'संबंधी ते असें म्हणतात की, त्याच्या कंपनामुळेच हें विश्व निर्माण होत असतें. ज्या वेळीं एक कल्प संपतो त्या वेळीं ही अखिल व्यक्त प्रकृति सूक्ष्म सूक्ष्म होऊं लागून त्या 'आकाशां'त विरून जाते; तें 'आकाश' दिसणें वा प्रत्ययास येणें शक्य नाही, तथापि सर्व गोष्टी त्यापासूनच निर्माण झालेल्या आहेत. गुरुत्वाकर्षण, आकर्षण, व अपसारण, किंवा विचार, भावना व ज्ञानतंतूंची गति इत्यादि नानाविध शक्ति त्या 'प्राणां'त लीन

होतात आणि त्या 'प्राणा'चें कंपन बंद होतें. पुढील कल्पाला सुरुवात होईपर्यंत तो त्याच अवस्थेंत राहतो. कल्पाच्या प्रारंभीं तो 'प्राण' कंपमान होतो, तें कंपन 'आकाशा'वर क्रिया करूं लागतें आणि मग ठराविक क्रमानें हीं सारीं रूपें आकारूं लागतात.

अस्तु. वेदान्त्यांचे तीन मुख्य वर्ग आहेत हें मीं तुम्हांला सांगितलें आहेच. त्या सर्वांचेंच कोणकोणत्या मुद्यांवर एकमत आहे हेंहि मीं तुम्हांला सांगितलें. आता आपण त्यांपैकी एकेकाचें विवेचन करूं या. वेदान्त्यांच्या ज्या वर्गासंबंधी मी तुम्हांला पहिल्याप्रथम सांगूं इच्छितों त्याला 'द्वैत मत' असें म्हणण्यांत येतें. ह्या द्वैतवाद्यांचा असा विश्वास असतो की, ह्या विश्वाचा स्रष्टा आणि नियन्ता असलेला ईश्वर हा प्रकृतीपासून कायमचा वेगळा आहे, जीवात्म्यापासून कायमचा अलग आहे. ईश्वर नित्य आहे, प्रकृति नित्य आहे, तसेच सर्व जीवात्मेहि नित्य आहेत. प्रकृति आणि जीवात्मे व्यक्त होत असतात आणि बदलत असतात, परंतु ईश्वर जसाच्या तसाच राहतो. परत, द्वैतवाद्यांच्या मतें ईश्वर हा एक 'व्यक्ति' वा 'पुरुष' आहे. ह्याचा अर्थ अलबतच असा नव्हे की ईश्वराला एक शरीर आहे; ह्याचा अर्थ एवढाच की त्याच्या ठायीं गुण आहेत, म्हणजेच तो 'सगुण' आहे. त्याच्या ठायीं मानवी गुण आहेत-- तो कृपाळू आहे, तो न्यायी आहे, तो सामर्थ्यवान आहे, तो सर्वशक्तिमान आहे, आपण त्याच्या समीप जाऊं शकतों, आपण त्याची प्रार्थना करूं शकतों व तो ती ऐकतोहि, आपल्याला त्याच्यावर प्रेम करतां येणें शक्य आहे, तोहि उलट आपल्यावर प्रेम करीत असतो, वगैरे वगैरे वगैरे. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे तो मानवी ईश्वर आहे, फक्त तो मानवापेक्षा अनंतपट श्रेष्ठ आहे, अनंतपट मोठा आहे, इतकेंच; माणसांमधे असणारे कोणतेहि दुर्गुण त्याच्या ठायीं अजीबात नाहीत. 'तो अमितकल्याणगुणाधार आहे, अशेषमंगलगुणसंपन्न आहे' असें ते ईश्वराचें वर्णन करीत असतात. आता, कांहीहि झालें तरी तो कोणत्यातरी उपादानाशिवाय वा द्रव्याशिवाय सृष्टि निर्मूं शकत नाही, आणि तें द्रव्य वा तें उपादान म्हणजे प्रकृति होय-- ह्या प्रकृतिरूपी उपादानांतून तो हें निखिल विश्वब्रह्माण्ड निर्माण करीत असतो. वेदान्त न मानणारे कांही द्वैती आहेत, त्यांना 'अणुवादी'

म्हणतात; त्यांचा असा विश्वास आहे की ही प्रकृति म्हणजे आणखी कांहीहि नसून ती अनंत अणूंची समष्टि आहे, आणि ईश्वराच्या इच्छेचें या अणूंवर कार्य होऊन सृष्टि निर्माण होत असते. वेदान्ती ह्या अणुवादाचा इन्कार करतात; ते म्हणतात की तो अजीबात तर्कदुष्ट आहे. अविभाज्य अणु हे भूमितीमधील बिंदूंसारखे आहेत, ते निरवयव असल्यामुळे त्यांचे भाग पडूं शकत नाहीत, त्यांना परिमाणहि नाही; परंतु जिला भाग वा अंश नाहीत आणि परिमाणहि नाही अशा अगणित, अनंत वस्तु एकत्रित केल्या तरी बेरीज कांहीच होणार नाही. जें निरवयव, निरंश आहे त्यापासून सावयव आणि अंशयुक्त असें कांही निर्माण होणें असंभवनीय आहे; कितीहि शून्यें एकांत एक मिसळलीं तरी एकहि संपूर्ण संख्या होणें शक्य नाही. म्हणून, हे अणु जर असे असतील की त्यांना भाग वा परिमाण नाही, तर मग त्या तसल्या अणूंमधून ह्या विश्वाची निर्मिति होणें अगदी असंभाव्य आहे. म्हणून, ह्या द्वैतवादी वेदान्त्यांच्या मतें 'अव्यक्त प्रकृति' नामक एक उपादान असून, त्यांतूनच परमेश्वर हें विश्व उत्पन्न करीत असतो. भारतांतील बहुसंख्य जनता ही द्वैती आहे. साधारणपणें मानवी मनाला ह्यापेक्षा उच्च भावाची धारणा करणें जमत नसतें. आपल्याला आढळून येईल की, पृथ्वीच्या पाठीवरील नव्वद टक्के लोक, मग त्यांचा कोणत्याहि धर्मावर विश्वास असो, द्वैतीच असतात. युरोपांतील आणि पश्चिम आशियांतील सगळेच धर्म द्वैती आहेत; तसें होणें अगदी अपरिहार्यच आहे. जें मूर्त नाही अशा कशाचीहि धारणा करणें साधारण माणसाला शक्य नसतें. त्याच्या बुद्धीला जें आकळतां येईल त्यालाच बिलगण्याची त्याची प्रवृत्ति स्वाभाविकपणेंच असते. ह्याचा अर्थ असा की, उच्च आध्यात्मिक भावांना खाली स्वतःच्या पातळीवर ओढून आणूनच तो त्यांची धारणा करूं शकतो. अमूर्त विचारांना मूर्त रूप देऊनच तो ते आकलूं शकतो. साऱ्या जगांतल्या सर्वसाधारण जनतेचा द्वैत हाच धर्म आहे. त्यांचा ईश्वर त्यांच्यापासून पूर्णपणें पृथक् असतो, तो जणु एक मोठा राजा असतो, एक श्रेष्ठ नि बलिष्ठ सम्राट् असतो. त्याबरोबरच ते त्याला पृथ्वीवरील सम्राटांपेक्षा खूप खूप शुद्ध नि पवित्र असा कल्पीत असतात; असतील नसतील ते सगळे सद्गुण ते

त्याला चिटकवितात नि सगळेच्या सगळे दुर्गुण त्यांतून वजा करून टाकतात. जणुकांही बुरें वगळून भलें अस्तित्वांत असणें शक्यच आहे !—— जणुकांही अंधाराच्या कल्पनेशिवाय उजेडाची कल्पना अस्तित्वांत असणें शक्यच आहे !

ह्या सर्वच द्वैतवादी मतांच्या बाबतींत अगदी पहिलीच अडचण ही उभी होते की, एका न्यायी व दयाळू ईश्वराच्या राज्यांत, त्या अमितकल्याणगुणाधाराच्या राज्यांत, म्हणजेच आपल्या ह्या जगांत हें इतकें अशुभ, हें इतकें अमंगल, हें इतकें वाईट कसें बरें असावें ? जगांतील प्रत्येकच द्वैतवादी धर्माला हा प्रश्न पडला, परंतु त्याचें उत्तर म्हणून हिंदूंनी कधीच 'सैतान' कल्पिला नाही. हिंदूंनी अगदी एकमताने त्यासाठी माणसालाच दोषी ठरविलें, आणि तसें करणेंच त्यांना अगदी सरळ आणि सोपें वाटलें. कां ? कारण हेंच की, मी तुम्हांला आताच सांगितल्याप्रमाणे, जीवात्मे हे शून्यांतून उत्पन्न झाले आहेत असें ते मुळीच मानीत नव्हते. ह्या आयुष्यांत आपण बघतोंच की, आपण आपल्या भवितव्याला घाट आणि रूप देऊं शकत असतों; आपल्यापैकी प्रत्येकजण दररोज स्वतःच्या उद्याला आपल्या मनासारखा विशिष्ट घाट देण्याची धडपड करीत असतो. आज आपण उद्याचें भवितव्य निश्चित करीत असतों, उद्या आपण परवाचें भवितव्य निश्चित करूं; याप्रमाणे सारखें चालू आहे. हाच तर्क मागे नेऊन त्याच्याच अनुरोधाने भूतकाळाचा विचार करणेंहि तर्काला सोडून होणार नाही. आपल्या स्वतःच्या कर्मांनीच जर आपण आपलें भावी भाग्य घडवीत असूं तर मग तोच नियम भूतकाळालादेखील कां बरें लागू करूं नये ? जर एका अनंत साखळींत कांही विशिष्ट कड्यांचे गट ठराविकपणें एकाआड एक पुनःपुनः येत असतील तर मग, त्या कड्यांच्या गटांमधील एकाचें स्वरूप समजून घेऊं शकल्यास आपण त्या समस्तच्या समस्त साखळीचेंच स्वरूप समजूं शकूं. तद्वतच, ह्या अनंत कालाचा एक तुकडा तोडून घेऊन त्याचें जर आपण स्पष्टीकरण करूं शकलों आणि याप्रमाणे तो जर आपण नीट समजूं शकलों तर, प्रकृति ही समरूप असून सर्वत्र, सर्वदा एकाच नियमानुसार कार्य करीत असते हें खरें असल्यास, तें त्या एका तुकड्याचें आपलें स्पष्टीकरण कालाच्या

येथून तेथवर अवघ्याच्या अवघ्या प्रवाहालाच लागू पडलें पाहिजे. येथे ह्या लहानशा काल-खंडांत आपण स्वतःच स्वतःचें भाग्य घडवीत असतों हें जर खरें असेल, आज आपण बघतों आहोंत त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीला कांहीतरी कारण असलेंच पाहिजे हें जर खरें असेल तर, मग हेंदेखील खरें असलेंच पाहिजे की, सध्या आपण जें कांही आहोंत तें आपल्या समस्त भूतकाळाचें फलित होय; आणि म्हणून मग हेंहि खरें की, मानवजातीचें भवितव्य घडविण्यासाठी स्वतः मानवाखेरीज आणखी कुणाहि पुरुषाची कांहीच गरज नाही. ह्या जगांत जें कांही वाईट आहे त्याला आमच्याखेरीज आणखी कुणीच कारणीभूत नाही, ह्या साऱ्या वाईटाला आपणच कारण आहोंत; आणि वाईट कृत्यांमुळे परिणामीं दुःख उद्भवत असतें हें जसें आपण सतत बघत असतों तसेंच हेंहि आपण समजूं शकतों की जगांत अस्तित्वांत असलेलें बरेचसें दुःख मानवाच्या गत दुष्कृत्यांचेंच फळ होय. अतएव, या सिद्धान्तानुसार माणूसच ह्या साऱ्याला जबाबदार आहे. ईश्वराचा ह्यांत कांहीच दोष नाही. त्या सदा कल्याणमय अशा विश्वपित्याला दोष देण्यांत काय हशील ? 'जसें करावें तसें भरावें.' जें पेरावें तेंच उगवत असतें.

ह्या द्वैतवाद्यांचा आणखी एक विशिष्ट सिद्धान्त असा आहे की, अंतीं प्रत्येकच जीवाला मुक्ति लाभत असते. कुणीदेखील वगळला जायचा नाही. तऱ्हतऱ्हेच्या स्थित्यंतरांमधून, तऱ्हतऱ्हेच्या सुखांतून आणि दुःखांतून जाऊन त्यांतील प्रत्येकजणाचीच अखेर सुटका होणार आहे. कशांतून सुटका होणार आहे ? निरपवादपणें सर्वच हिंदु संप्रदायांची वा पंथांची अशी धारणा आहे की, सर्वच जीवांना ह्या जगांतून बाहेर पडावयाचें आहे, ह्यांतून सुटावयाचें आहे. आपण जें पाहतों नि अनुभवतों तें आपल्या नित्याचा परिचयाचें हें जग म्हणा, किंवा आणखी एखादें काल्पनिक जगहि म्हणा, कोणतेंच बरोबर असणें शक्य नाही, कोणतेंच खरें जग असणें शक्य नाही, कारण तीं दोन्हीं भलें आणि बुरें यांचें मिश्रण आहेत. ह्या द्वैतवाद्यांच्या मतें, आपल्या ह्या जगाच्या पलीकडे केवळ सुखाने आणि केवळ शुभाने भरलेलें एक ठिकाण आहे; आणि एकदाचें त्या ठिकाणीं पोहोचल्यानंतर मग जन्माचें नि पुनर्जन्माचें आणखी कांही प्रयोजन उरणार नाही, जगण्याचें

नि मरण्याचें आणखी कांही प्रयोजन उरणार नाही; आणि ही कल्पना ह्या द्वैतवाद्यांना अत्यंत प्रिय आहे. त्या ठिकाणीं मग आणखी येथल्या-सारखे रोग नाहीत की मृत्यु नाही. तिथे मग शाश्वत सुख राहील, आणि ते निरंतर, अगदी कायमचे भगवंताच्या सान्निध्यांत राहतील व चिरकाल भगवदानंद उपभोगतील. ह्या द्वैतवाद्यांचा असा विश्वास आहे की, अगदी निकृष्ट कीटापासून तों सर्वश्रेष्ठ देवदूत नि देव-देवता यांपर्यंत सर्व प्राण्यांना लवकर म्हणा की उशीरा म्हणा त्या दुःखरहित लोकाची प्राप्ति होईलच होईल. तथापि आपलें हें जग मात्र कधीच संपायचें नाही; लाटांसारख्या गतीने तें अनंत काल असेंच चालत राहणार. तें कल्पांमधून जात असतें, पण संपत मात्र कधीच नाही. ज्यांचा उद्धार व्हावयाचा आहे, ज्यांना पूर्णत्व प्राप्त व्हावयाचें आहे अशा जीवात्म्यांची संख्या अनंत आहे. त्यांतील कांही आत्मे वन-स्पतींच्या रूपांत आहेत, कांही खालच्या प्राण्यांच्या रूपांत आहेत, कांही माणसांच्या रूपांनी आहेत, तर कांही देवदेवता आहेत, परंतु ते सगळेच्या सगळे -- अगदी सर्वश्रेष्ठ देवदेखील-- अपूर्ण आहेत, बंधनांत आहेत. बंधन म्हणजे काय ? जन्मणें आणि मरणें हें भाग पडणें म्हणजेच बंधन होय. सर्वश्रेष्ठ देवांना देखील मरावें लागतें. हे देव म्हणजे खरोखर काय आहेत ? त्या कांही अवस्था आहेत, तीं कित्येक पदें आहेत. उदाहरणार्थ, देवांचा राजा इंद्र हें एक विशिष्ट पद आहे. अत्यंत उच्च असा कुणीएक जीवात्मा तिथे जाऊन तें पद प्राप्त झाल्यामुळे ह्या कल्पांतील इंद्र बनला आहे, आणि ह्या कल्पानंतर तो फिरून मनुष्य म्हणून जन्मेल आणि खाली ह्या पृथ्वीवर येईल. आणि मग ह्या कल्पांतील सगळ्यांत चांगला माणूस पुढील कल्पांत तिथे जाऊन त्या पदीं आरूढ होईल. इतर सगळ्या देवांबाबतहि हें असेंच आहे; तींहि कित्येक पदें असून लक्षावधि जीवात्मे आळीपाळीने त्या त्या पदीं आरूढ झाले आहेत. आणि तो अधिकार संपल्यानंतर मग ते खाली येतात आणि मनुष्य बनतात. जे लोक ह्या जगांत चांगलीं कामें करतात, आणि दुसऱ्यांवर उपकार करतात, परंतु तसें करतांना ज्यांचें लक्ष पुरस्कारावर असतें, स्वर्गाला जाण्याची ज्यांना आशा असते किंवा आपल्या भोवतालच्या सर्व लोकांनी आपली स्तुति

करावी अशी ज्यांची इच्छा असते त्यांना मेल्यानंतर त्यांच्या ह्या सत्कर्मांचें फळ लाभल्याखेरीज राहत नाही——तेहि देव बनतात. परंतु देवपदप्राप्ति म्हणजे कांही मुक्ति नव्हे; पुरस्काराची वा बक्षिसाची आशा बाळगून मुक्ति कदापि लाभावयाची नाही. माणूस मनापासून जें इच्छितो, भगवान त्याला तेंच देतो. माणसें सत्तेची इच्छा धरतात, त्यांना प्रतिष्ठा हवी असते, त्यांना देवतांचे भोग भोगावेसे वाटतात, आणि त्यांच्या ह्या वासना पुरविल्याहि जातात, पण काय ? कर्माचें कोणतेंहि फल नित्य असणें शक्य नाही. तें फल कांही ठराविक कालानंतर संपुष्टांत येणारच; कदाचित् तसें होण्याला युगें लागतील, पण त्यानंतर तें नाहीसें होईलच, आणि मग ह्या देवांना खाली यावेंच लागेल आणि मनुष्य व्हावेंच लागेल आणि अशा रीतीने त्यांना मुक्तीची आणखी एक संधि मिळेलच मिळेल. खालचे प्राणी उन्नत होऊन माणसें बनतील, कदाचित् देव बनतील, मग फिरून माणसें बनतील, किंवा परत प्राण्यांच्या जन्माला जातील——ही भोगाची सारी वासना, ही जीवनाची तृष्णा, हें 'मी आणि माझें'ला कवटाळणें सोडून देईपर्यंत हें असेंच चालणार. हें 'मी आणि माझें'च ह्या जगांतील सर्व अशुभाचें, सर्व अनर्थाचें अगदी मूळ आहे. "तुझें मूल तुझें आहे काय ?"——असें जर तुम्ही एखाद्या द्वैतवाद्याला विचाराल तर तो म्हणेल की, "तें भगवंताचें आहे. माझी संपत्ति ही माझी नाही, ती भगवंताची आहे." सर्वकांही परमेश्वराचें आहे असें समजलें पाहिजे.

भारतांतील हे द्वैतवादी पंथ शुद्ध शाकाहारी असून प्राणिमात्राच्या अहिंसेचे थोर प्रचारक आहेत. परंतु अहिंसेविषयीची त्यांची कल्पना मात्र बौद्धांच्या अहिंसाविषयक कल्पनेहून सर्वस्वी भिन्न आहे. "कोणत्याहि प्राण्याच्या हिंसेविरुद्ध तुम्ही प्रचार कां करतां" असें जर तुम्हीं एखाद्या बौद्धाला विचारलें तर तो उत्तर देईल की, "कुणाचाहि प्राण घेण्याचा आपल्याला कांहीच अधिकार नाही." परंतु तेंच जर तुम्ही एखाद्या द्वैतवादी भक्ताला विचारल की, "तुम्ही कोणताहि प्राणी कां मारीत नाही," तर तो म्हणेल—— "कारण तो प्रभूचा आहे." सारांश, द्वैतवादी म्हणत असतात की हें 'मी आणि माझें' आपण ईश्वराला आणि केवळ ईश्वरालाच लावलें पाहिजे—— तोच एकमेव

'मी' आहे आणि सर्वकांही 'त्याचें' आहे. जींत 'मी आणि माझें' नाही अशी अवस्था ज्या वेळीं माणसाला प्राप्त होते, ज्या वेळीं सारेंकांही भगवंताला समर्पिलें जातें, ज्या वेळीं तो सर्वांवर प्रेम करतो आणि मोबदल्याची कसलीहि आशा न बाळगतां एखाद्या यःकश्चित् प्राण्यासाठी स्वतःचा जीवहि देण्यास तयार होतो, त्या वेळीं त्याचें चित्त शुद्ध होतें, आणि चित्त असें शुद्ध झालें म्हणजे मग त्या शुद्ध चित्तांत भगवत्प्रेमाचा उदय होतो. ईश्वर हा प्रत्येक जीवाच्या आकर्षणाचें केंद्र आहे, आणि द्वैतवादी म्हणतात की, "चिखलाने माखलेली सुई लोहचुंबकाकडून आकर्षिली जाणार नाही, परंतु तिच्यावरील तो चिखल धुऊन काढतांक्षणींच ती आकर्षिली जाईल." ईश्वर हा लोहचुंवक असून मानवी आत्मा सुई आहे, आणि मानवाचीं वाईट कर्में म्हणजे त्या सुईला माखलेली घाण नि माती आहेत. ती घाण नि माती धुऊन जाऊन जीवात्मा शुद्ध होतांच तो स्वभावसिद्ध आकर्षणाने आकर्षित होऊन ईश्वराकडे जाईल आणि कायमचा त्याच्या बरोबर वास करील, परंतु तो राहील मात्र त्याच्याहून सदा पृथकच. पूर्णत्व पावलेला सिद्ध आत्मा, तशी त्याची इच्छा असेल तर कोणतेंहि रूप धारण करूं शकतो; इच्छा असल्यास तो शंभर शरीरें धारण करूं शकतो, किंवा इच्छा असल्यास शरीराशिवायच राहूं शकतो. तो प्रायः सर्वशक्तिमान होऊन जातो, फक्त सृष्टि निर्माण करूं शकत नाही, इतकेंच, ती क्षमता केवळ ईश्वराठायींच आहे. कोणी कितीहि पूर्ण आणि सिद्ध झाला तरी तो विश्वब्रह्माण्डाच्या घडामोडी करूं शकत नाही, त्याचा कारभार चालवूं शकत नाही; तें कार्य ईश्वराचें आहे. परंतु, पूर्णत्व पावल्यानंतर सर्व आत्मे कायमचे सुखी होऊन जातात आणि ईश्वरावरोबर कायमचे राहूं लागतात. द्वैतमत हें असें आहे.

द्वैतवादी आणखी एका गोष्टीचा प्रचार करीत असतात. 'प्रभो, मला हें द्या, मला तें द्या' असल्या तऱ्हेच्या प्रार्थनेला त्यांचा विरोध असतो. अशी प्रार्थना करूं नये असें त्यांचें मत आहे. माणसाला जर एखादी ऐहिक गोष्ट मागायचीच असेल तर त्याने ती खालच्या दर्जाच्या कुणाजवळ तरी मागावी; ह्या देव-देवतांपैकी वा देवदूतांपैकी कुणाला किंवा एखाद्या सिद्ध पुरुषाला त्याने लौकिक गोष्टी मागावयास

हव्यात. ईश्वरावर मात्र आपण केवळ प्रेमच करायला हवें--केवळ प्रेमासाठीच प्रेम. "प्रभो, मला अमुक दे, मला तमुक दे" अशी भगवंतापाशी प्रार्थना करणें म्हणजे जवळजवळ भगवन्निंदाच करणें होय. म्हणून, द्वैतवाद्यांच्या मताने, माणसाला जें हवें आहे तें त्याला एखाद्या देवतेची प्रार्थना करून आज ना उद्या मिळूं शकेल; पण त्याला जर मुक्ति हवी असेल तर त्याने ईश्वराचीच आराधना केली पाहिजे. हाच भारतांतील सर्वसाधारण जनतेचा धर्म आहे.

असें म्हणण्यास प्रत्यवाय नसावा की, खऱ्याखऱ्या वेदान्त तत्वज्ञानाला सुरुवात होते 'विशिष्टाद्वैता'पासूनच. ह्या विशिष्टाद्वैतवाद्यांचें असें मत आहे की, कार्य हें कधीच कारणापासून भिन्न नसतें, कार्य हें कारणाचेंच एक रूपान्तर असतें. आता, हें विश्व जर कार्य असेल आणि ईश्वर जर कारण असेल तर हें विश्व स्वयं ईश्वरच असलें पाहिजे--त्याखेरीज तें दुसरें कांहीहि असणें शक्यच नाही. ह्या विशिष्टाद्वैतवादाचा पहिला सिद्धान्त आहे की, ईश्वर हा या जगाचें निमित्त आणि उपादान असें उभयविध कारण आहे; तोच ह्या विश्वाचा स्रष्टा आहे, आणि ही सर्व सृष्टि ज्याचें व्यक्त स्वरूप होय तें उपादान वा ती सामग्रीहि स्वत: तो ईश्वरच आहे. तुमच्या भाषेंतील 'क्रिएशन' या शब्दाला संस्कृतमधे समानार्थक प्रतिशब्द नाही, कारण 'कांही नाहीं'तून 'कांहीतरी' उत्पन्न होणें, अभावांतून वा शून्यांतून भाव वा वस्तु निर्माण होणें ह्या ज्या अर्थाने तुम्ही पाश्चात्त्य लोक 'क्रिएशन' (सृष्टि) हा शब्द वापरीत असतां, त्या अर्थाने ही सृष्टि निर्माण झाली आहे असें मानणारा एकहि संप्रदाय वा पंथ भारतांत विद्यमान नाही. असें दिसतें की, सृष्टीसंबंधी असलीच कांहीतरी कल्पना असणारी कांही थोडी मंडळी भारतांतहि अस्तित्वांत होती, परंतु त्यांच्या त्या मताचें खंडन होऊन लवकरच त्यांची वाट लागली. सध्या तरी ह्या कल्पनेवर विश्वास ठेवणारा एकहि पंथ भारतांत अस्तित्वांत असल्याचें माझ्या माहितींत नाही. 'क्रिएशन' वा 'सृष्टि' ह्या शब्दाचा आमचा अर्थ आहे--जें आधीच (अव्यक्त) होतें तेंच व्यक्त होणें. असो तर, ह्या विशिष्टाद्वैतमतानुसार हें समस्त विश्वब्रह्माण्ड स्वयं ईश्वरच आहे. तोच ह्या विश्वाचें उपादान वा

सामग्री आहे. वेदांमधे आपल्याला असें विधान आढळेल की––"यथोर्णनाभिः सृजते गृण्हते च .... तथाऽक्षरात् संभवतीह विश्वम्"–"ज्याप्रमाणे कोळी आपल्या शरीरांतील तंतूंनीच जाळें विणीत असतो ....त्याचप्रमाणे हें समस्त विश्व त्या परमपुरुषापासून उद्भवलें आहे." †

आता, कार्य हें जर याप्रमाणे कारणाचें केवळ रूपान्तर असेल तर मग प्रश्न असा की, "जो भौतिक वा जड नाही, उलट जो नित्य चैतन्यस्वरूप आहे अशा ईश्वरापासून हें भौतिक, जड, अचेतन विश्व उत्पन्न झाल्याचें आपल्याला दिसतें हें कसें ? 'कारण' जर शुद्ध नि पूर्ण आहे तर मग हें 'कार्य' त्याहून अगदीच वेगळें कसें ?" यावर हे विशिष्टाद्वैतवादी जें उत्तर देतात तें बघण्यासारखें आहे. या बाबतींत त्यांचा एक मोठा चमत्कारिक सिद्धान्त आहे. त्यांचें असें म्हणणें आहे की ईश्वर, प्रकृति आणि जीव ह्या तिन्ही सत्ता एकच आहेत. ईश्वर जणुकाय आत्मा आहे, आणि प्रकृति व जीव हीं त्या ईश्वराचा देह आहेत. ज्याप्रमाणे मला एक शरीर आणि एक आत्मा आहे, त्याचप्रमाणे हें समस्त विश्वब्रह्माण्ड नि समस्त जीव हीं ईश्वराचा देह आहेत आणि ईश्वर त्या सर्वांचा आत्मा आहे––सर्व आत्म्यांचा आत्मा आहे. ह्याप्रमाणे ईश्वर हा या विश्वाचें उपादान कारण आहे. शरीरांत बदल घडतील––तें तरुण किंवा वृद्ध होईल, सबळ किंवा दुर्बळ होईल––परंतु आत्म्यावर ह्याचा कांहीसुद्धा परिणाम व्हावयाचा नाही. आत्मा ही अनाद्यनंत, शाश्वत, नित्य सत्ता असून ह्या शरीरामधून अभिव्यक्त होत आहे. शरीरें येतात नि जातात, पण आत्मा मात्र बदलत नाही. ह्याचप्रमाणे, हें निखिल विश्वब्रह्माण्ड ईश्वराचें शरीर आहे, आणि ह्या अर्थानें तें ईश्वरच आहे. परंतु ह्या विश्वदेहांत घडणाऱ्या बदलांचा मात्र त्या विश्वात्म्यावर––ईश्वरावर कांहीहि परिणाम होत नाही. ह्या उपादानांतून वा ह्या सामग्रींतून तो हें विश्व निर्माण करतो, आणि कल्पाच्या अंतीं त्याचें हें शरीर सूक्ष्म होऊन जातें, संकोच पावतें; पुढील कल्पाच्या प्रारंभीं तें फिरून विस्तार पावतें आणि त्यांतून हे सारे निरनिराळे लोक विकसित होतात.

† मुंडक उपनिषद् १, १, ७.

असो. द्वैतवादी आणि विशिष्टाद्वैतवादी ह्या दोघांनाहि हें मान्य आहे की, जीवाचा आत्मा हा स्वभावतः शुद्ध आहे, परंतु त्याच्या स्वतःच्याच कर्मांनी तो अशुद्ध, अपवित्र बनत असतो. विशिष्टाद्वैती ही गोष्ट द्वैतवाद्यांपेक्षा अधिक सुंदर रीतीने व्यक्त करतात; ते म्हणतात की, आत्म्याचें पावित्र्य व पूर्णत्व हीं संकोच पावत असतात नि फिरून प्रकट होत असतात, आणि आता आपण जर कशाचा प्रयत्न करीत असूं तर तो म्हणजे ह्या आत्म्याचें स्वभावसिद्ध चैतन्य, पावित्र्य व शक्ति हीं फिरून अभिव्यक्त करण्याचा. आत्म्यांचे असंख्य गुण आहेत, पण त्यांना सर्वशक्तिमत्त्व वा सर्वज्ञत्व मात्र नाही. प्रत्येक दुष्कर्म आत्म्याच्या स्वभावाचा संकोच करीत असतें, आणि प्रत्येक सत्कर्म त्याचा विस्तार, त्याचा विकास करीत असतें. हे सर्व आत्मे सगळे त्या ईश्वराचे अंश वा अवयव आहेत. "यथा सुदीप्तात् पावकाद्विस्फुलिंगाः, सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः। तथाऽक्षराद्विविधाः सोम्य भावाः, प्रजायन्ते तत्र चैवाऽपि यन्ति ॥"—"ज्याप्रमाणे धडधडत्या अग्नींतून त्या अग्नीच्याच स्वभावाच्या लाखोगणती ठिणग्या उडत असतात, त्याचप्रमाणे ह्या अनंत पुरुषापासून, त्या परमेश्वरापासून हे सगळे जीवात्मे उत्पन्न झाले आहेत."* आणि, प्रत्येक जीवात्म्याचें अंतिम लक्ष्य एकच आहे. अस्तु. ह्या विशिष्टाद्वैतवाद्यांचा ईश्वरहि खरें पाहतां सगुणच आहे—अनंतकल्याणगुणाधार आहे—फक्त, तो ह्या विश्वब्रह्माण्डामधील वस्तूवस्तूंत व्यापून आहे—ओतप्रोत भरून आहे. तो सर्वत्र आणि सर्व वस्तूंत अनुस्यूत आहे, अंतर्भूत आहे—सर्वगत आहे. आणि 'ईश्वर सर्वकांही आहे' असें जेव्हा शास्त्रें म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ असा की, ईश्वर सर्वकांही व्यापून आहे, सर्व वस्तूंत ओतप्रोत भरून आहे; असें नव्हे की ईश्वर ही भिंत बनला आहे, तर, ईश्वर ह्या भिंतींत आहे. ह्या अवघ्या विश्वब्रह्माण्डांत असा एक कण नाही, असा एकहि अणुरेणू नाही की ज्यांत तो नाही. जीवात्मे सगळे समर्याद आहेत, सीमान्वित आहेत, ते सर्वव्यापक नाहीत. जेव्हा त्यांच्या स्वभावसिद्ध शक्तींचा उन्मेष होतो, विस्तार होतो, विकास होतो आणि ते पूर्णत्व पावतात तेव्हा मग त्यांना

* मुंडक उपनिषद् २, १, १.

आणखी जन्मावें नि मरावें लागत नाही, ते मग ईश्वराबरोबर नित्य निवास करतात.

आणि, आता आपण 'अद्वैता'कडे वळूं ! वेदान्ताची ही शेवटची पायरी होय, अखेरचा टप्पा होय. कोणत्याहि देशांत आणि कोणत्याहि युगांत तत्वज्ञानाच्या नि धर्माच्या वृक्षावर उमललेल्या सर्व पुष्पांमधे हा वेदान्त हें सर्वांत सुबक पुष्प होय असें आम्हांला वाटतें. ह्या अद्वैत वेदान्तांत मानवी विचाराची सर्वोच्च अभिव्यक्ति झाली असून, अभेद्य वाटणाऱ्या गूढाचा भेद करून हा वेदान्त त्याच्या कितीतरी पलीकडे निघून जातो. 'अद्वैत वेदान्त' वा 'अद्वैतवाद' हा असा आहे. सर्व-साधारण जनतेचा धर्म होण्याच्या दृष्टीने तो फारच गहन, फारच उच्च आहे. जिथे गेलीं तीन हजार वर्षे त्याची सार्वभौम सत्ता अबाधितपणें चालत आहे त्या त्याच्या जन्मभूमि भारतांतदेखील तो सर्वसामान्य जनतेंत रिवूं शकला नाही, भिनूं शकला नाही. पुढे गेल्यानंतर आपल्याला आढळून येईल की, कोणत्याहि देशांतील सग-ळ्यांत विचारशील स्त्री-पुरुषांना देखील हा वेदान्त आकळणें जडच जातें. आपण स्वतःला इतकें दुबळें बनवून टाकलें आहे, आपण स्वतःला इतकें हीन बनवून टाकलें आहे. आपण केवढेहि मोठमोठे दावे केलेत, धर्माच्या बाबतींतील स्वतःचा अधिकार खूप खूप मोठा असल्याची केवढीहि ऐट आणली तरी अगदी स्वाभाविकपणें आपण दुसऱ्या कुणावर तरी अवलंबून राहूं इच्छीत असतों, दुसऱ्या कुणाचा तरी आधार घेऊं इच्छीत असतों, दुसऱ्या कुणावर तरी भर टाकूं इच्छीत असतों. लहानलहान, दुबळ्या वनस्पतीसारखे आपण आहोंत, —सदैव कशाचा तरी आधार हवा. माझ्याकडे किती जणांनी आणि किती वेळा 'आरामशीर धर्मा'ची मागणी केली आहे म्हणून सांगावें ! फारच थोडे जण सत्य ऐकूं इच्छीत असतात, त्याहिपेक्षा थोडे तें उमजून घेऊं इच्छीत असतात, आणि अगदी अगदी थोडेजणच काय ते तें तंतोतंत आचरणांत आणण्यापर्यंत मजल नेण्याचें धाडस करूं शकत असतात. आणि त्यांना तरी काय दोष द्यायचा ? हा सगळा मेंदूच्या दुबळेपणाचाच प्रकार होय. कोणताहि नवा विचार, आणि विशेषतः तो उच्च प्रकारचा असल्यास, कसा एक प्रक्षोभ निर्माण करीत असतो,

मेंदूमज्जेंत जणु एक नवीच चाकोरी कोरण्याचा यत्न करीत असतो, आणि त्यामुळे डोकें भणभणूं लागून माणसाचा तोल सुटतो. लोक कांही विशिष्ट परिस्थितीला सरावून गेलेले असतात, ती त्यांच्या आंगवळणीं पडून गेली असते, आणि त्याबरोबरच, उच्च असा नवा विचार आत्मसात् करावयाचा म्हणजे त्यासाठी आधी त्यांना प्राचीन अंधविश्वासाच्या प्रचंड राशीवर मात करावी लागत असते, पिढीजाद अंधविश्वासांवर मात करावी लागत असते, स्वतःच्या जातीच्या नि स्वतःच्या वर्गाच्या अंधविश्वासांवर, स्वतःच्या शहराच्या अंधविश्वासांवर, स्वतःच्या देशाच्या अंधविश्वासांवर मात करावी लागत असते, आणि ह्या साऱ्यापेक्षा म्हणजे मानवमात्राच्या ठायीं निसर्गतःच वसत असलेल्या अंधविश्वासांच्या प्रचंड ढिगाऱ्यावर त्यांना मात करावी लागत असते. ते तरी काय करतील बिचारे ! तथापि, आपल्या ह्या जगांत, मूठभरच का होईनात परंतु अशा कांही धारिष्टचवंत व्यक्ति असतात की ज्या ह्या सत्याची धारणा करण्याचें साहस करतात, त्याचें ग्रहण करण्याचें साहस करतात, आणि त्याची अगदी कड लागेपर्यंत त्याचें अनुसरण करण्याचें साहस करतात.

ह्या अद्वैत्यांची घोषणा काय असते ? ते म्हणतात की, जर ईश्वर असेल तर मग तो ईश्वर ह्या विश्वाचें उपादान आणि निमित्त हीं दोन्हींहि कारणें असलाच पाहिजे. तो केवळ स्रष्टाच आहे असें नव्हे, तर सृष्टदेखील तोच आहे. तोच हें विश्वब्रह्मांड आहे. यावर कुणी म्हणेल की, हें कसें ? तो शुद्ध, चैतन्यस्वरूप ईश्वर हे असलें विश्व बनला, हें कसें ? यावर अद्वैतवाद्यांचें असदिग्ध, ठाम उत्तर असे की, होय, तो ईश्वरच हें विश्व बनला आहे--मात्र, वर वर बघतां, खरोखर नव्हे. अज्ञानांत पिचणारे सारे जीव ज्याला विश्व म्हणतात तें खरोखर अस्तित्वांतच नाही. तर मग तुम्ही, मी, आणि आपल्याला दिसणाऱ्या ह्या साऱ्या गोष्टी काय आहेत ? स्वतःच स्वतःवर घातलेल्या मोहिनीचें फळ, स्वतःच स्वतःला पाडलेल्या भुरळीचें फळ ! अस्तित्वांत आहे वस्तुतः एकच सत्ता--तो अनंत, नित्यानंदस्वरूपच केवळ अस्तित्वांत आहे. त्याच सत्तेंत आपण हीं सारीं विभिन्न, विचित्र, विविध स्वप्नें बघत आहोंत ! ती सत्ता म्हणजेच आत्मा--सर्वातीत,

अनंत, ज्ञातातीत, ज्ञेयातीत आत्मा; त्याच्या मधे आणि त्याच्या मधूनच आपण हें विश्व अनुभवत असतों. तोच एकमेव सत्य आहे. तोच हें टेबल आहे, माझ्या समोरचा हा श्रोतृसमुदायहि तोच आहे, तोच ही भिंत आहे,——नाम आणि रूप वजा करून सर्वकांही तोच आहे. ह्या टेबलाचें रूप वगळा, त्याचें नाम वगळा,——जें कांही उरलें तें तोच आहे. वेदान्ती त्याला 'तो' म्हणत नाहीत किंवा 'ती'हि म्हणत नाहीत ——लिंगभेद कपोलकल्पित आहे, मेंदूचा तो एक भ्रम आहे—— आत्म्याला कोणतेंच लिंग नाही, तो लिंगातीत आहे. भ्रम झालेल्या लोकांना, पशूप्रमाणे बनलेल्या लोकांनाच ही स्त्री आणि हा पुरुष असें दिसत असतें, दिव्य दृष्टीच्या मानवांना पुरुषहि दिसत नाही, स्त्रीहि दिसत नाही——त्यांना उभयत्र दिसत असतो तो एकमेवाद्वितीय सच्चिदानंदच. जे साऱ्याच्या अतीत झालेले आहेत, सगळ्याच्या पलीकडे निघून गेले आहेत त्यांच्या ठिकाणीं लिंगाची कल्पना कशी बरें असू शकेल ? प्रत्येकजण आणि प्रत्येक गोष्ट आत्माच आहे——लिंगरहित, शुद्ध, नित्यकल्याणस्वरूप आत्मा आहे. हें नाम, हें रूप, हा देह हीं भौतिक आहेत, पार्थिव आहेत, आणि हा सारा भेद त्यांच्यामुळेच निर्माण होत असतो. नामामुळे निर्माण झालेले भेद आणि रूपामुळे निर्माण झालेले भेद, असे हे दोन प्रकारचे भेद जर तुम्ही दूर केलेत तर मग प्रत्ययास येईल की सारें विश्व एकच आहे——दोन, म्हणजेच द्वैत कुठेच नाही; सर्वत्र एक, म्हणजे अद्वैतच आहे. तुम्ही आणि मी एक आहोंत. प्रकृति म्हणून कांही नाही, ईश्वर म्हणूनहि कांही नाही, किंवा विश्व म्हणूनहि कांही नाही——आहे केवळ तीच एकमेवाद्वितीय, अनंत सत्ता,——तिच्यांतूनच नामांनी आणि रूपांनी हीं सगळीं निर्माण झालीं आहेत. "विज्ञातारम् अरे केन विजानीयात्"——ज्ञात्याला वा जाणणाऱ्यालाच कसें बरें जाणणार ? तो जाणला जाणें कधीच शक्य नाही. तुम्ही तुमचा स्वतःचा आत्मा कसा बघणार ? तुम्ही केवळ स्वतःचें प्रतिबिंब, स्वतःची पडछाया पाहून तीच काय ती बघूं शकाल ! तद्वतच हें सारें विश्व त्या एकमेवाद्वितीय, नित्य पुरुषाचें, त्या आत्म्याचें प्रतिबिंब आहे, आणि ज्याच्यावर त्याचें प्रतिबिंब पडतें तो आरसा जितका साफ किंवा मळकट असेल तदनुसार त्या आत्म्याचींहि

स्पष्ट किंवा अस्पष्ट, चांगलीं किंवा वाईट प्रतिबिंबें पडत असतात. ह्याप्रमाणे, खुनी इसमांत, आत्म्याचें प्रतिबिंब घेणारा आरसा वाईट असतो, आत्मा नव्हे. साधुसंतांचे आरसे स्वच्छ, शुद्ध असतात. आत्मा हा स्वस्वरूपतः शुद्ध आहे, पवित्र आहे. तो एकच,--ह्या विश्वाची ती एकमेव सत्ताच अगदी निकृष्ट जंतूपासून तों उत्कृष्ट नि परिपूर्ण व्यक्तींपर्यंत सर्वत्र प्रतिबिंबित होत आहे. हें समस्त विश्व एकरस, एकसंध ऐक्य आहे--शरीर, मन, आत्मा ह्या सर्वच दृष्टींनी ती एक अखंड सत्ता आहे. आपण ती एकच सत्ता निरनिराळ्या रूपांनी बघत असतों आणि हे सारे आभास तिच्यावर निर्माण करीत असतों. ज्याने स्वतःला 'माणूस' ह्या मर्यादित अवस्थेशींच जखडून टाकलें आहे त्याला ती सत्ता मनुष्याच्या जगाच्या स्वरूपांतच प्रतिभासित होते. जो त्यापरीस उच्च पातळीवर आहे त्याला ती स्वर्गासारखी भासेल. परंतु विश्वांत अस्तित्वांत आहे फक्त एकच आत्मा, दोन नव्हत. तो कोठून येतहि नाही, कुठे जातहि नाही. तो जन्मत नाही की मरत नाही. त्याला हाहि जन्म नाही, पुनर्जन्महि नाही. तो मरणार कसा ? तो जाणार तरी कुठे ? हे स्वर्ग, ही पृथ्वी, हे सारे लोक, हें सारेंच मनाच्या व्यर्थ कल्पना होय. तीं अस्तित्वांत नाहीत, मागे कधी अस्तिवांत नव्हतीं, आणि पुढेहि कधी अस्तित्वांत असणार नाहीत. भूत-वर्तमान-भविष्य--तिन्ही कालीं त्यांना अस्तित्व नाही.

मी सर्वव्यापी आहें, नित्य आहें. मी जाणार कुठे ? मी आधीच जिथे नाहीं अशी जागा कुठे आहे ? मी ह्या प्रकृतीचें हें पुस्तक वाचीत आहें. पानामागून पान संपवून मी तें उलटीत आहें, आणि आयुष्याच्या एका स्वप्नामागून दुसरें स्वप्न विरून जात आहे. आयुष्याचें आणखी एक पान उलटलें जातें; आयुष्याचें आणखी एक स्वप्न येतें आणि आंदुळत आंदुळत निघून जातें. अशा रीतीने, होतां होतां ज्या वेळीं माझें वाचणें संपतें त्या वेळीं मी तें दूर सारतों आणि अलग उभा राहतों-- मी तें पुस्तक झुगारून देतों. आणि सारेंचकांही संपुष्टांत येतें. अद्वैत्याची शिकवण काय आहे ? ह्या विश्वांत कधी अस्तित्वांत असतील आणि कधी अस्तित्वांत येतील ते सगळेच्या सगळे देव पदच्युत करून त्या जागीं, त्या रिकाम्या सिंहासनावर तो स्थापना

करतो— मानवाच्या आत्म्याची. हा आत्मा सूर्य-चंद्रांपेक्षा श्रेष्ठ आहे, स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे, ह्या जगड्व्याळ विश्वब्रह्माण्डापेक्षाहि मोठा आहे. कोणताहि ग्रंथ, कोणतेंहि शास्त्र, कोणतेंहि विज्ञान कदापि ह्या आत्म्याच्या महिम्याची कल्पना करूं शकणार नाही. हा आत्मा मनुष्याच्या रूपाने व्यक्त होत असतो— आणि, ह्या मानवाइतका महिमाशाली ईश्वर आणखी कोणताहि कधी अस्तित्वांत नव्हता— भूतकाळीं, वर्तमानकाळीं आणि भविष्यकाळीं कधीहि अस्तित्वांत असलेला एकमात्र ईश्वर तोच होय. म्हणून, मला केवळ माझी स्वतःचीच आराधना करावयाची आहे, माझ्या स्वतःखेरीज आणखी कुणाचीहि नाही. अद्वैती म्हणत असतो— "मी माझ्या स्वतःच्या आत्म्याचीच उपासना करतों." मीं कुणापुढे लोटांगण घालावयाचें ? मी स्वतःच्या आत्म्यालाच प्रणाम करतों. मीं साहाय्यासाठी कुणाकडे जावयाचें ? ह्या विश्वाचा मी अनंत आत्मा— त्या मला कोण मदत करूं शकेल ? हीं सारीं वेडगळ स्वप्नें आहेत, सारा भ्रम आहे; कधी कुणी कुणाला मदत केली आहे ? कुणीहि नाही. वरून, आकाशापलीकडील कुठूनतरी साहाय्य मिळावें म्हणून रडणारा-भेकणारा एखादा दुबळा माणूस, एखादा द्वैती जर तुम्हांला कुठे आढळेल तर जाणून असा की, तें आकाशहि त्याच्या स्वतःच्या आंतच आहे हें जाणत नसल्यामुळे तो तसा वागत आहे. आकाशापलीकडून त्याला साहाय्य हवें असतें, आणि तें साहाय्य त्याला मिळतेंहि. तें त्याला लाभतांना आपण बघतों; परंतु तें खरोखर येत असतें त्याच्या स्वतःच्या आंतमधूनच, आणि तें बाहेरून येत आहे असें तो चुकीने समजत असतो. कित्येकदा अंथरुणावर पहुडलेल्या आजारी माणसाला दारावर थाप ऐकूं आल्यासारखें वाटतें. तो उठतो आणि दार उघडून बघतो, पण तिथे कुणीच दृष्टीस पडत नाही. तो फिरून आपल्या बिछान्यावर पडतो, आणि फिरून त्याला टक् टक् ऐकूं येते. तो उठतो आणि दरवाजा उघडतो. बाहेर कुणीच नसतें. अखेर त्याला उमजतें की, ती त्याच्याच हृदयाची धडधड त्याला दारावरच्या थापेसारखी भासली होती. अशाच रीतीने माणूस, स्वतःच्या बाहेरील नाना देव-देवतांमागे व्यर्थ धावपळ करीत वर्तुळ पूर्ण करतो, आणि अखेर, जिथून त्याने

सुरुवात केली होती तिथे-- त्या मानव आत्म्याप्रत परत येतो, आणि त्याला आढळून येतें की, ज्या ईश्वराला तो रानावनांत नि गिरिकंदरांत धुंडाळीत होता, ज्याला शोधीत तो तीर्थोतीर्थी, देवळारावळांत, या वा त्या स्वर्गलोकांत भटकत होता, स्वर्गातील आपल्या सिंहासनावर बसून जगावर राज्य करणारा अशीहि ज्या ईश्वराविषयी तो कल्पना करीत होता, तो त्याचा स्वतःचा आत्माच आहे. मी तोच, नि तोच मी. माझ्याखेरीज आणखी कोणीहि ईश्वर नव्हता, आणि हा क्षुद्र 'मी' कधीच अस्तित्वांत नव्हता.

पण मग त्या पूर्णस्वरूप ईश्वराला भ्रम कसा होऊं शकला ? नाही, त्याला भ्रम कधीच झाला नाही. त्या पूर्णस्वरूप ईश्वराला स्वप्नें कशीं पडत राहावींत ? नाही, त्याला कधीच स्वप्नें पडलीं नाहीत. हा भ्रम कुठून उद्भवला हा प्रश्नच मुळी वेडगळपणाचा आहे. भ्रम हा केवळ भ्रमांतूनच उद्भवत असतो. सत्याचा साक्षात्कार झाल्याबरोबर मग भ्रम म्हणून कांही उरावयाचेंच नाही. भ्रम हा नेहमी भ्रमावरच आधारलेला असतो, तो कधीच ईश्वरावर, त्या सत्यावर, त्या आत्म्यावर आधारित नसतो. तुम्ही कधीच भ्रमांत नाही, भ्रम तुमच्यांत आहे, तुमच्या समोर आहे. आकाशांत एके ठिकाणीं एक मेघ असतो, दुसरा एक मेघ येतो नि त्याला बाजूला सारून त्याची जागा घेतो. आणखी एखादा येतो आणि त्या दुसऱ्या मेघाला बाजूस सारतो. ज्याप्रमाणे, त्या नित्य नील नभासमोर निरनिराळ्या रंगांचे नि छटांचे ढग येतात, थोडा वेळ तरळतात आणि तें नितळ निळें आकाश तसेंच ठेवून नाहीसे होऊन जातात, त्याचप्रमाणे तुमचें आहे-- तुम्ही त्या आकाशासारखे आहांत-- नित्य शुद्ध, नित्य पूर्ण, नित्य मुक्त. तुम्ही सगळेच ह्या विश्वाचे खरेखुरे ईश्वर आहांत; नव्हे, दोन मुळी नाहीच, आहे केवळ एकच. "तूं आणि मी" असें म्हणणें चूक आहे; म्हणा-- "मी." कोटयवधि मुखांनी खाणारा तो मीच आहें, मी भुकेला असणें कसें शक्य आहे ? अगणित हातांनी मीच काम करतों आहें, मी निष्क्रिय असणें कसें शक्य आहे ? अवघ्या विश्वाचें जीवन जगणारा मीच आहें, मला मृत्यु कुठला ? मी समस्त जीवनाच्या, समस्त मरणाच्या पलीकडे आहें. मीं मुक्तीचा शोध कुठे करायचा,

कारण मी स्वरूपतःच मुक्त आहें. मला— ह्या विश्वब्रह्माण्डाच्या ईश्वराला कोण बांधूं शकणार ? जगांतले सगळे धर्मग्रंथ म्हणजे, ह्या विश्वांतील एकमेव सत्ता जो मी, त्या माझाच महिमा रेखाटूं इच्छिणारे लहानलहान नकाशे आहेत. मग ह्या पुस्तकांची मला मातब्बरी ती काय ? अद्वैती ही अशी घोषणा करीत असतो.

सत्य जाणा, सत्याचा साक्षात्कार करून घ्या, म्हणजे तात्काळ मुक्त व्हाल. मग सारा अंधार कुठल्या कुठे नाहीसा होऊन जाईल. मी ह्या विश्वाच्या अनंत आत्म्याशीं एक आहें अशी जेव्हा माणसाला प्रतीति येते, जेव्हा सर्वप्रकारचा भेद शमतो, जेव्हा समस्त स्त्री-पुरुष, सारे देव-देवदूत, सगळे प्राणी नि वनस्पति, अवघेंच्या अवघें विश्व त्या अखंड एकत्वांत विरून जातें तेव्हा सर्व भय लयास जातें. मी स्वतःलाच इजा करूं शकेन काय ? मी स्वतःलाच मारून टाकणें शक्य आहे काय ? मी स्वतःचाच घात करणें शक्य आहे ? मी स्वतःलाच दुःख देणें शक्य आहे काय ? कुणाला भ्यायचें ? तुम्ही स्वतःलाच भिणें शक्य आहे काय ? अशी विश्वैक्याची, सर्वैक्याची अवस्था लाभल्यावर मग सारें दुःख लयास जाईल. मला काय बरें दुःख देऊं शकेल ? मी ह्या विश्वाची एकमेव सत्ता आहें. ही अशी अवस्था लाभल्यानंतर सर्वप्रकारचा मत्सर लयास जाईल. कुणाचा मत्सर करावयाचा ? मीं माझा स्वतःचाच का मत्सर करावयाचा ? ही अशी अवस्था लाभल्यानंतर सर्वप्रकारच्या अनिष्ट भावना लयास जातील. कुणाविरुद्ध मीं अनिष्ट भावना बाळगावयाची ? माझ्या स्वतःच्याच विरुद्ध ? कारण, ह्या विश्वांत तर माझ्याखेरीज आणखी कुणीच नाही. आणि, ज्ञानलाभाचा हाच एकमेव मार्ग आहे असें वेदान्ती म्हणतो. हा भेद समूळ नष्ट करा, ही भेदभावना अजीबात निखंदून टाका, ह्या जगांत अनेकत्व आहे ह्या खुळचट समजुतीला मूठमाती द्या. "ज्याला ह्या अनेकांनी भरलेल्या जगांत त्या एकाचेंच दर्शन होतें, ह्या सर्व जड वस्तूंच्या पसाऱ्यांत ज्याला तो एकमेव चिन्मय पुरुष दिसतो, ह्या सावल्यांच्या जगांतील तें एकमेव सत्य जो आकळतो, त्यालाच शाश्वत शांति लाभते—अन्य कुणालाहि नाही, अन्य कुणालाहि नाही."†

† कठ उपनिषद् २, २, १३.

भारतीय धर्मविचाराने ईश्वराच्या रोखाने जीं तीन पावलें टाकलीं आहेत--ज्या तीन अवस्थांमधून तो विकासला आहे त्यांच्याविषयीचे हेच प्रमुख मुद्दे आहेत. आपण बघितलेंच की, त्याने सगुण, प्रकृतिबहिर्भूत अशा ईश्वरापासून सुरुवात केली. मग तो बाह्य विराट देहाकडून आंतर विराट देहाकडे--विश्वांत ओतप्रोत भरून असलेल्या ईश्वराकडे वळला. आणि अंतीं त्याचें पर्यवसान झालें--हा जीवात्माच तो ईश्वर वा तो परमात्मा आहे हें ओळखण्यांत, आणि विश्वांतील ह्या भिन्न भिन्न अभिव्यक्तींचें एकसंध एकत्व, त्यांचें ऐकात्म्य आकळण्यांत. वेदांचा हा अंतिम सिद्धान्त आहे. ह्या साऱ्याला द्वैतापासून प्रारंभ होतो, विशिष्टाद्वैतामधून तो प्रगत होत जातो, आणि संपूर्ण एकत्वांत म्हणजेच निखळ अद्वैतांत त्याचें पर्यवसान होतें. ह्या जगांत किती अगदी थोडेजण हा अखेरचा टप्पा गाठूं शकतात, नव्हे, त्यावर निदान विश्वास तरी ठेवूं शकतात, आणि त्याहिपेक्षा किती थोडेजण तदनुसार वागूं शकतात हें आपण जाणतोंच. आणि तरीहि आपण जाणून आहोंत की, ह्या जगांतील साऱ्या सदाचारांचें, साऱ्या नीतिमत्तेचें नि साऱ्या आध्यात्मिकतेचें स्पष्टीकरण हा अद्वैत सिद्धान्तच करूं शकतो. जो उठतो तो 'लोकांचें भलें करा' असा उपदेश कां बरें देत असेल ? ह्याचें स्पष्टीकरण काय आहे ? सर्वच थोर लोकांनी मानवजातीच्या बंधुभावाचा प्रचार कां बरें केला असेल ? त्यांच्यापेक्षाहि थोर पुरुषांनी तर समस्त प्राण्यांच्याच बंधुभावाचा प्रचार केला आहे--तो तरी कां ? कारण हेंच की, त्यांना ह्याची जाणीव असो की नसो, पण त्यांच्या त्या साऱ्या प्रचारामधून, त्यांच्या सगळ्या तर्कविसंगत नि वैयक्तिक अंधविश्वासांमधून, अनेकत्वाचा वा समस्त भेदांचा निरास करणारा नि ह्या समस्त विश्वाचें ऐक्य प्रस्थापित करणारा त्या आत्म्याचा शाश्वत प्रकाश अस्फुटपणें फाकत होता.

शिवाय, ह्या अद्वैताने, ह्या अंतिम सिद्धान्ताने आपल्याला विश्व एकच एक असल्याचें दाखवून दिलें--इंद्रियांमधून संवेदूं जाऊन तें आपल्याला जड भासतें, बुद्धीमधून बघितल्यास तें जीवात्म्यांनी भरलेलें वाटतें, आणि चैतन्यामधून आकळल्याने ईश्वरस्वरूप--ब्रह्मरूप--दिसतें. जग ज्याला दुष्टपणा आणि वाईटपणा म्हणतें त्या आवरणांनी जो

मनुष्य स्वत:ला आच्छादून घेतो त्याच्यापक्षीं हेंच विश्व बदलून जाऊन एक हिडीस जागा होऊन बसेल. ज्याला भोग हवे आहेत अशा दुसऱ्या एखाद्याच्या पक्षीं हेंच विश्व रूप पालटून स्वर्ग बनून जाईल. आणि, पूर्णत्व पावलेल्या सिद्ध मानवाच्या पक्षीं हें सारेंचकांही अंतर्धान पावून तें सारें त्याचा स्वत:चा आत्माच असल्याचा त्याला प्रत्यय येत राहील.

आता, समाजाच्या आजच्या अवस्थेंत ह्या तिन्ही पायऱ्यांची आवश्यकता आहे. त्यांतील एक ही दुसरीचें खंडन करीत नाही, तर दुसरीची केवळ पूर्ति करते. त्या एकमेक एकमेकींना पूरक आहेत. अद्वैती किंवा विशिष्टाद्वैती असें म्हणत नाही की द्वैत चुकीचें आहे; तो दृष्टिकोन बरोबरच आहे, पण तो खालचा आहे. द्वैतीहि सत्याच्याच मार्गावर आहे. म्हणून, प्रत्येकाला ह्या विश्वासंबंधीचा त्याचा दृष्टिकोन, त्याच्या स्वत:च्या भावानुसार अमलांत आणूं द्या. कुणालाहि धक्का लावूं नका, कुणाचाहि भाव भग्न करूं नका, कुणाचाहि दृष्टिकोन चुकीचा म्हणूं नका. माणूस जिथे आहे तिथेच त्याचें ग्रहण करा, तो जसा आहे तसाच त्याचा स्वीकार करा. आणि, तुम्हांला जर शक्य असेल तर त्याला मदतीचा हात देऊंन वरच्या स्तरावर चढवा, परंतु इजा करूं नका, तोडफोड करूं नका. अखेर सर्वचजण सत्याप्रत पोहोचणार आहेत. "यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि स्थिता:। अथ मर्त्योऽमृतो भवति अत्र ब्रह्म समश्नुते ।।"--"जेव्हा हृदयांतील समस्त वासना निष्प्रभ होतील, दूर होतील, तेव्हा मग हाच मर्त्य जीव अमर होऊन जाईल"‡--तेव्हा मग हाच मानव ईश्वर होऊन जाईल.

---

‡ कठ उपनिषद् २, ३, १४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

# आत्मा -- त्याचा बंध आणि मोक्ष

( अमेरिकेंत दिलेलें व्याख्यान )

अद्वैत तत्त्वज्ञानानुसार ह्या विश्वांत केवळ एकच गोष्ट सत्य आहे, आणि तिलाच त्या तत्त्वज्ञानांत 'ब्रह्म' म्हटलें आहे; बाकी सर्वकांही असत्य असून, तें मायेच्या शक्तीने ब्रह्मांतून व्यक्त नि तयार झालें आहे. परत त्या ब्रह्माप्रत जाऊन पोहोचणें हेंच आपलें लक्ष्य आहे. आपण, आपल्यापैकी प्रत्येकजण म्हणजे तें ब्रह्म वा तें सत्य अधिक ही माया होय. आपण जर ही माया वा अज्ञान दूर करूं शकूं तर मग आपण खरोखर जें आहोंत तें होऊन जाऊं. ह्या तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक मनुष्य तीन भागांचा बनलेला आहे. ते तीन भाग म्हणजे--देह, अंतरिंद्रिय वा मन, आणि त्यापलीकडील आत्मा. देह हा आत्म्याचें बाह्य आवरण आणि मन हें त्याचें आंतर आवरण असून, हा आत्माच खरा द्रष्टा आहे, खरा भोक्ता आहे, आणि ह्या देहामधें राहून अंत-रिंद्रियाच्या वा मनाच्या द्वारें तोच हा देह चालवीत असतो.

पंचभूतांनी बनलेल्या ह्या जड, भौतिक मानवी शरीरांत आत्मा हाच एकमेव अशी सत्ता आहे की जी चेतन आणि अ-भौतिक आहे. आता, हा आत्मा अ-भौतिक असल्यामुळे तो संमिश्र वा संयुक्त पदार्थ असणें शक्य नाही, आणि तो संमिश्र वा संयुक्त पदार्थ नाही म्हणूनच तो कार्य-कारणाच्या नियमाच्या अधीन नाही, आणि म्हणून तो अमर आहे. जें अमर असतें त्याला आदि असणें शक्य नाही, कारण ज्याला म्हणून आदि आहे त्याला अंतहि असलाच पाहिजे. ह्यावरूनच हेंहि निष्पन्न होतें की तो आकाररहित म्हणजेच अरूप वा निराकार असला पाहिजे. जडद्रव्याशिवाय कोणताहि आकार वा रूप अस्तित्वांत असणेंच शक्य नाही. ज्या ज्या वस्तूला आकार वा रूप आहे तिला तिला आदि आणि अंत हीं असलींच

पाहिजेत. आपल्यापैकी कुणींहि असा आकार वा असें रूप पाहिलेलें नाही की ज्याला आदि नाही आणि ज्याचा अंत व्हावयाचा नाही. जड आणि शक्ति यांच्या संयोगानेच आकार वा रूप निर्माण होत असतें. ह्या खुर्चीला एक विशिष्ट आकार वा रूप आहे; ह्याचा अर्थ असा की, कांही प्रमाणांतील जडद्रव्यावर कांही परिमाणाच्या शक्तीचें कार्य घडून त्याला एक विशिष्ट घाट दिला गेला आहे. हा घाट वा ही विशिष्ट घडण ही जडाच्या आणि शक्तीच्या संयोगाचें फळ आहे. पण, हा संयोग शाश्वतस्वरूपाचा वा नित्य असणें शक्यच नाही; प्रत्येक संयोगाच्या बाबतींत अशी एक वेळ येणारच की जेव्हा तो विरून जाईल, वियुक्त होईल. म्हणजेच सर्व आकारांना वा रूपांना आदि आणि अंत हीं असतातच. आपण जाणून आहोंत की आपलें शरीर नाश पावणार आहे; त्याला आदि आहे आणि अंतहि असणारच. परंतु आत्म्याला आकार वा रूप नसल्याकारणें तो आदि-अंतत्वाच्या नियमानें बांधलेला असणें शक्य नाही. तो अनादि काळापासून अस्तित्वांत आहे; जसा काल नित्य आहे तसाच मानवाचा आत्मा हा नित्य आहे. दुसरें असें की, हा आत्मा सर्वव्यापक असला पाहिजे. रूप किंवा आकारच अवकाशानें सविशेष आणि समर्याद बनत असतो; जें रूप-रहित वा आकाररहित आहे ते अवकाशांत सीमाबद्ध असणें शक्य नाही. म्हणून, अद्वैत वेदान्तानुसार, तुमच्यांतील आत्मा, माझ्यांतील आत्मा, प्रत्येकांतील आत्मा, सर्वव्यापी आहे. तुम्ही सध्या जितकें ह्या पृथ्वीवर आहांत तितकेंच सूर्यमंडलांतहि आहांत, जितकें अमेरिकेंत तितकेंच इंग्लंडांत आहांत. परंतु हा आत्मा शरीरामधून आणि मनामधून कार्य करीत असतो, आणि म्हणून तीं जिथे अवस्थित असतात तिथेच त्याचें कार्य दृग्गोचर होतें.

आपण करीत असतों ते प्रत्येक कर्म, आपण करीत असतों तो प्रत्येक विचार आपल्या मनावर, संस्कृतभाषेंत ज्याला 'संस्कार' म्हण-तात तो एकेक ठसा उमटवीत असतो, आणि ह्या संस्कारांच्या गोळा-बेरजेचीच ती 'चारित्र्य' नांवाची प्रचंड शक्ति बनत असते. माणसाचें चारित्र्य ही त्याची स्वतःचीच करणी असते, तें त्यानें स्वतःच निर्माण केलेलें असतें; त्यानें आपल्या आयुष्यांत केलेल्या मानसिक आणि

शारीरिक क्रियांचें तें फल असतें. ह्या संस्कारांची समष्टि हीच माणसाला त्याच्या मृत्यूनंतर पुढील गति देणारी शक्ति होय. माणूस मरतो; देहाचें पतन होतें आणि तो पंचभूतांत विलीन होऊन जातो; परंतु संस्कार मात्र नाहीसे होत नाहीत, ते मनाला चिकटून राहतात; आणि मन हें सूक्ष्म भूतांचें बनलेलें असल्याकारणें तें विरून जात नाही, कारण द्रव्य जितकें सूक्ष्म तितकें तें अधिक चिवट नि तग धरणारें असतें. परंतु सरतेशेवटीं ह्या मनाचाहि विलय होतो, आणि त्यासाठीच आपली ही सारी खटपट आहे. ह्या संबंधांत मला सुचणारा सर्वोत्कृष्ट दृष्टान्त म्हणजे चक्री वावटळीचा होय. निरनिराळ्या दिशांकडून वाऱ्याचे निरनिराळे झोत एके जागीं मिळतात आणि त्या मीलनकेंद्रांत ते सगळे एक होऊन चक्राकार गरगर फिरूं लागतात. याप्रमाणे गरगर वाटोळें फिरतांना कागदांचे चिटोरे, गवताच्या काड्या वगैरे मिळेल तें ओढून घेऊन ते एका ठिकाणीं धुळीचा एक स्तंभ उभारतात, व मग थोड्या वेळाने तो तिथेच टाकून दुसऱ्या ठिकाणीं परत दुसरा एक स्तंभ उभारतात, आणि अशा रीतीने गोल गोल गरगर फिरत पुढे पुढे सरकून समोर सापडेल ती सामग्री उचलून तिचे स्तंभामागून स्तंभ उभारीत जातात. हुबेहुब ह्याचप्रमाणे, संस्कृतभाषेंत ज्यांना 'प्राण' म्हणतात त्या शक्ति एकत्रित होतात आणि जड भूतांमधून शरीर नि मन घडवितात व तें शरीर पडेपर्यंत तिथे कार्य करीत राहतात. तें शरीर पडल्यानंतर मग त्या शक्ति दुसरी सामग्री घेतात, तिच्यांतून दुसरें शरीर निर्मितात, आणि तेंहि पतन पावल्यावर आणखी एक शरीर उभारलें जातें आणि अशा रीतीने ही क्रिया चालूं राहते. जडद्रव्याच्या साहाय्याखेरीज शक्ति ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकत नसते. म्हणून, देहाचें पतन झालें तरी मनोद्रव्य वा चित्त तसेंच राहतें आणि संस्कारांच्या रूपाने प्राण त्यावर क्रिया करीत असतो; आणि मग तो दुसऱ्या स्थानीं जातो, नव्या सामग्रींतून दुसरा एक भोवरा निर्माण करतो, आणि तिथे फिरून कार्य करूं लागतो. अशा रीतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं तो प्रवास करीत असतो; त्याची शक्ति पूर्णपणें क्षय पावेपर्यंत वा तिचा संपूर्ण व्यय होईपर्यंत हें असेंच चालूं असतें. अखेर तोहि संपुष्टांत येऊन पतन

पावतो. म्हणून, मनाचा जेव्हा अंत होईल, छिन्नभिन्न होऊन त्याचे तुकडेतुकडे होऊन जातील, कोणताहि संस्कार मागे उरणार नाही तेव्हा आपण पूर्णपणें मुक्त होऊन जाऊं. तोंपर्यंत मात्र आपण बंधनांतच राहणार; तोंपर्यंत आत्मा हा मनाच्या भोवऱ्यांत सापडलेला असणार आणि आपण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेलें जात आहोंत असेंच त्याला भावत राहणार. ज्या वेळीं तो भोवरा शमतो त्या वेळीं आत्म्याला आढळून येतें की तो सर्वव्यापी आहे. मग तो हवें तिथे जाऊं शकतो, तो पूर्ण मुक्त असतो, आणि स्वतःच्या इच्छेनुसार हवीं तितकीं मनें नि शरीरें निर्माण करूं शकतो. परंतु, तोंपर्यंत मात्र त्याला त्या भोवऱ्याशीं निगडित राहावें लागतें, त्या भोवऱ्याबरोबरच जावें-यावें लागतें. ही मुक्तिच आपलें लक्ष्य असून आपण सारे तिच्याकडेच चाललों आहोंत.

अशी कल्पना करा की, ह्या खोलींत एक चेंडू आहे आणि आपल्यापैकी प्रत्येकजणाच्या हातीं एकेक दांडू असून आपण त्यांनी त्या चेंडूला टोले मारीत आहोंत. अशा रीतीनें आपण त्या चेंडूला शेकडो टोले लगावून इथून तिथे इतस्ततः पळवीत आहोंत. होतां होतां उघडा दरवाजा गाठून तो अखेर खोलीच्या बाहेर उडून जातो. कोणत्या गतीने आणि कोणत्या दिशेने तो बाहेर जाईल बरें ? आतापावेतों त्याच्यावर त्या खोलींत सर्वत्र ज्या शक्तींचें कार्य होत होतें त्यावर हीं दोन्हीं अवलंबून राहतील हें उघडच आहे. त्याला जे भिन्न भिन्न टोले मारले गेले आहेत त्या साऱ्यांचा परिणाम होणारच. आपली मानसिक आणि शारीरिक प्रत्येक क्रिया ह्या 'टोल्या' प्रमाणे आहे. टोले दिला जाणारा चेंडू म्हणजे मानवी मन. ह्या दुनियेच्या खोलींत सतत टोले बसून आपण इकडून तिकडे फिरविले जात आहोंत, आणि हिच्यांतून बाहेर पडण्याची आपली गति आणि दिशा ह्या दोन्हीं या साऱ्या ठोशांच्या शक्तीवर अवलंबून राहतील. जसें त्या चेंडूचें, तसेंच आपलेंहि; त्या चेंडूचा वेग नि दिशा त्याला लगावल्या गेलेल्या टोल्यांवर अवलंबून असतात, तद्वतच, ह्या जगांतल्या आपल्या साऱ्या कर्मानुसारच आपला भावी जन्म होणार. आणि म्हणूनच, आपला हा वर्तमान जन्म आपल्या गतकाळाचें फळ होय. ही झाली एक गोष्ट.

आता समजा की, मीं तुम्हांला एक साखळी दिली आहे. तिला सुरुवात किंवा शेवट असा नाहीच, ती अनंत आहे. आणि तिच्यांत एक पांढरी कडी आणि एक काळी कडी एकीआड एक आलटूनपालटून बसविली आहे. तिला आदि आणि अंत नाही, हें मीं सांगितलेंच आहे. आता समजा की, त्या साखळीचें स्वरूप काय आहे असा मीं तुम्हांला प्रश्न विचारला. ती साखळी दोन्ही टोकांना अनंत असल्यामुळे, तिचें स्वरूप ठरविणें प्रथम तुम्हांला कठीण वाटेल, पण हळूहळू तुम्हांला आढळून येईल की, अनंत असली तरी ती एक 'साखळी' आहे. लवकरच तुम्हांला उमजून येईल की, ही अनंत साखळी पांढऱ्या आणि काळ्या अशा दोन कड्यांची केवळ पुनरावृत्तिच असून, असल्या अनंत कड्या एक-मेकींत जोडून ती पुरी साखळी तयार झालेली आहे. त्यांतील एका कडीचें स्वरूप जरी तुम्हांला कळलें तरी त्या सगळ्याच्या सगळ्या साखळीचें स्वरूप तुम्हांला कळल्यासारखें होईल, कारण तींत तसल्याच कड्यांची नुसती पुनरावृत्तिच झालेली आहे. गत, वर्तमान आणि भावी अशा आपल्या सर्व जीवनांची अशीच एक अनंत साखळी बनलेली आहे. तिला आदि नाही की अंत नाही. आपलें प्रत्येक जीवन म्हणजे त्या साखळीची एकेक कडी असून, जन्म आणि मृत्यु हीं त्या प्रत्येक जीवन-कडीचीं दोन टोकें आहेत. आपण जें कांही आहोंत आणि येथे जें कांही करीत आहोंत त्याचीच फक्त थोड्याशा फरकाने पुन्हा-पुन्हा पुनरावृत्ति चाललेली आहे. म्हणून, आपण जर या दोन कड्या जाणूं शकलों तर ह्या जगांत आपल्याला ज्या ज्या गतींमधून वा अवस्थांमधून जावयाचें आहे त्या साऱ्याच्या साऱ्या आपण जाणूं शकूं. यावरून आपल्याला दिसून येतें की, या जगांत आपलें येणें, ह्या जगांतली आपली गति ही पूर्णपणें आपल्याच पूर्वीच्या गमनागमनांनी ठरत असते. त्याचप्रमाणे, आपण ह्या जगांत आपल्या स्वतःच्या कर्मांनीच आहोंत. ज्याप्रमाणे आपण आपल्या वर्तमान कर्मांची गोळाबेरीज खांद्यावर घेऊन ह्या जगाच्या बाहेर पाऊल टाकीत असतों, त्याचप्रमाणे आपल्या पूर्वकर्मांची गोळाबेरीज खांद्यावर घेऊनच आपण ह्या जगांत प्रवेश करीत असतों हेंहि तितकेंच खरें; जें आपल्याला ह्या जगाच्या बाहेर घेऊन जात असतें, नक्की तेंच आपल्याला ह्या जगांत आणत असतें.

आपल्याला ह्या जगांत काय आणतें ? आपलीं पूर्वकर्में. आपल्याला ह्या जगांतून बाहेर काय घेऊन जातें ? आपण येथे केलेलीं कर्में; अशाच तऱ्हेने आपण सतत येत-जात आहोंत. सुरवंट स्वतःच्याच तोंडांतून तंतु काढून कोसला बनवितो आणि सरतेशेवटीं आपण स्वतःच त्या कोसल्यांत अडकून पडलों असल्याचें त्याला आढळून येतें, तद्वतच आपण स्वतःच्याच कर्मांनी स्वतःला बांधून टाकलें आहे, स्वतःच्याच कर्मांचें जाळें आपण स्वतःभोवती रचलें आहे. आपण स्वतःच कार्य-कारणाच्या नियमाला गति दिली आहे, आणि आता आपल्याला त्याच्या तावडींतून सुटणें जड जात आहे. आपणच चाकाला गति दिली आहे, आणि आता आपण त्याच्या खाली चिरडलों जात आहोंत. ह्याप्रमाणे हें तत्त्वज्ञान आपल्याला शिकवितें की, आपण आपल्या स्वतःच्या चांगल्या किंवा वाईट कर्मांनी एकाचप्रकारें बांधलों जात आहोंत.

आत्मा मात्र कधीच येत नाही किंवा जात नाही, तो कधी जन्मत नाही किंवा मरत नाही. हा सगळा प्रकृतीचा खेळ असून, ती प्रकृति आत्म्यासमोरून सरकत आहे, आणि ह्या तिच्या हालचालींचीं प्रतिबिंबें आत्म्यावर पडत आहेत; आणि आत्मा अज्ञानाने समजत आहे की तोच सरकत आहे, तोच ह्या साऱ्या हालचाली करीत आहे, प्रकृति नव्हे. ज्या वेळीं आत्मा असें समजतो त्या वेळीं तो बंधनांत असतो; पण ज्या वेळीं त्याला आढळून येतें की तो कधीहि मुळीसुद्धा हालत नाही, तो सर्वव्यापी आहे, त्या वेळीं त्याला मुक्ति लाभते. बंधनांतील आत्म्याला जीव म्हणतात. असो तर, यावरून तुमच्या लक्षांत येईल की, आत्मा येतो आणि जातो असें जें म्हटलें जातें तें केवळ समजण्याला सोईचें व्हावें म्हणूनच म्हटलें जात असतें. खगोलशास्त्राचा अभ्यास करतांना, सोईचें पडावें म्हणून, वस्तुस्थिति तशी मुळीच नसली तरीहि सूर्य पृथ्वीभोवती फिरत आहे असें समजण्यास तुम्हांला सांगण्यांत येतें ना ? हेंहि तसेंच आहे. अशा रीतीने जीवाला, म्हणजेच आत्म्याला उच्च किंवा हीन अवस्था प्राप्त होत असतात. हाच तो पुनर्जन्माचा सुप्रसिद्ध नियम होय; आणि हा नियम समग्र सृष्टीला बंधनकारक आहे.

ह्या देशांतील लोकांना, माणूस हा पशूंतून विकसित होऊन वर

आला आहे हा विचार अत्यंत भयंकर वाटतो. पण असें कां ? ह्या कोटयवधि पशूंची काय गति होणार आहे ? ते कांहीच नव्हत की काय ? जर आपल्याला आत्मा असेल तर तसाच तो त्यांनाहि आहे, आणि जर त्यांना नसेल तर मग आपल्याला पण नाही. फक्त माणसालाच आत्मा आहे आणि पशूंना नाही असें म्हणणें हास्यास्पदच होय. मीं अशीं माणसें पाहिलीं आहेत की जीं पशूंपेक्षाहि निपटारीं आहेत.

मानवी आत्म्याने उच्च-नीच नाना देहांमधे मुक्काम केला आहे, संस्कारांनुसार एकामधून दुसऱ्या देहांत गमन केलें आहे; परंतु 'मनुष्य' ह्या सर्वश्रेष्ठ देहांतच त्याला मुक्ति लाभत असते. मनुष्यदेह हा देवदूताच्या देहापेक्षाहि श्रेष्ठ आहे, तो सर्वच देहांमधे श्रेष्ठ आहे, तो सर्वश्रेष्ठ आहे; ह्या अवघ्या सृष्टीमधे मनुष्यच सर्वांत श्रेष्ठ प्राणी आहे, कारण त्याला मुक्तीचा अधिकार आहे.

हें समस्त विश्व ब्रह्मामधे होतें, आणि तें जणु त्यामधून बाहेर फेकलें गेलें, आणि जेथून तें बाहेर आलें त्या आपल्या उगमाप्रत परत जाण्यासाठी तें सारखें मार्ग क्रमीत आहे. विद्युज्जनक यंत्रांतून वीज बाहेर यावी, आणि फेरा पूर्ण करून तिने फिरून त्या यंत्रांत परत जावें, अशासारखा हा प्रकार आहे. जीवात्म्याचेंहि असेंच आहे. ब्रह्मांतून प्रक्षेपित होऊन तो नानाप्रकारच्या वनस्पतिदेहांमधून नि पशुदेहांमधून जातो आणि अखेर मनुष्यशरीरांत प्रविष्ट होतो; मनुष्य ही ब्रह्माच्या सगळ्यांत जवळची अवस्था आहे. ज्या ब्रह्मांतून आपण बाहेर पडलों त्याप्रत परत जाणें ही जीवाची फार मोठी धडपड आहे. लोकांना हें माहीत आहे किंवा नाही ह्याला कांहीच महत्त्व नाही. ह्या विश्वांत आपल्याला जी काय गति आढळते, खनिजकोटींत वा वनस्पतिजगांत वा पशुजगांत जी काय धडपड आढळते ती म्हणजे मध्यबिंदूप्रत परत येऊन उपशम पावण्याचा प्रयत्नच होय. आधी साम्यावस्था होती नि ती भग्न झाली आहे; आणि सगळे अंश, अणु-परमाणु सारेच ती आपली गमाविलेली साम्यावस्था फिरून मिळविण्यासाठी धडपडत आहेत. ह्या धडपडींत ते इतरांशीं संयोग पावत आहेत, नवीं नवीं रूपें धारण करीत आहेत, आणि त्यांतूनच प्रकृतीचीं हीं अद्भुत दृश्यें

निर्माण होत आहेत. पशुजीवनांतली, वनस्पतिजीवनांतली आणि इतर सर्वत्रची सारी धडपड नि स्पर्धा, सारे सामाजिक संघर्ष नि युद्धें हीं त्या साम्यावस्थेप्रत परत जाण्याच्या त्या शाश्वत धडपडीचेच केवळ विभिन्न आविष्कार आहेत.

जन्माकडून मरणाकडे जाण्याला, ह्या प्रवासालाच संस्कृतभाषेंत 'संसार' म्हणतात. संसार शब्दाचा शब्दशः अर्थ आहे--जन्म-मरणाचें चक्र. सारी सृष्टि ह्या चक्रांतून जाऊन, लवकर म्हणा की उशीरा म्हणा पण मुक्त होईल. यावर कदाचित् असा प्रश्न विचारला जाईल की, आपण सारेचजण जर मुक्तावस्थेप्रत पोहोचणारच आहोंत तर मग ती मिळविण्यासाठी आम्हीं 'धडपड' काय म्हणून करावयाची ? जर प्रत्येकजणच मुक्त होणार आहे तर मग आम्ही आपले स्वस्थ बसूं आणि वाट पाहूं. लवकर होवो की उशीरा होवो, पण प्रत्येक प्राणीच मुक्त होईल हें खरें आहे; कुणीहि वाया जाणें शक्य नाही. कुणाचाहि नाश होणें शक्य नाही; प्रत्येकजणच वर येणार आहे, उन्नत होणार आहे. असेंच जर आहे, तर मग आमच्या ह्या धडपडीचा काय उपयोग ? ह्या साऱ्याला उत्तर असें की, प्रथमतः म्हणजे, आपल्याला त्या मध्यबिंदूप्रत घेऊन जाईल असा ही धडपड हाच एकमेव उपाय आहे; आणि द्वितीयतः म्हणजे, आपण धडपड कां करतों हें आपल्याला माहीत नाही. ती आपल्याला करावीच लागते. "हजारो लोकांपैकी कांहींमधे, आपण मुक्त होऊं ही जाणीव जागी झाली असते." बहुसंख्य मानवजात भौतिक गोष्टींनीच संतुष्ट असते, परंतु कांहीजण असे असतात की त्यांना जाग आली असते, त्यांना परत फिरण्याची ओढ लागलेली असते, इथले त्यांचें हें खेळणें अगदी पुरेसें होऊन गेलेलें असतें. हे लोक कळूनवळून, बुद्धिपुरस्सर प्रयत्न करीत असतात, तर बाकीचे सगळे अजाणतां प्रयत्न करीत असतात.

समस्त वेदान्त तत्त्वज्ञानाचें सार, त्याचें अगदी मूलसूत्र आहे-- "जगाचा त्याग करणें",--खोटयाचा, मिथ्याचा त्याग करणें नि सत्याचा स्वीकार करणें. ज्यांना ह्या जगाची मोहिनी वाटत असते, ज्यांना ह्या जगाची भुरळ पडली असते ते लोक यावर कदाचित् विचारतील की, "आपण ह्या जगांतून बाहेर पडण्याचा, त्या

मध्यबिंदूप्रत परत जाण्याचा प्रयत्न काय म्हणून करावयाचा ? समजा की आपण सारे ईश्वरांतून आलों आहोंत, पण हें जग सुखदायक नि छान सुरेख असल्याचें आपल्या प्रत्ययास येत आहे; मग उलट आपण ह्याच जगाचा आणखी आणखी जास्त उपभोग घेण्याचा यत्न कां करूं नये ? आपण त्याच्या बाहेर पडण्याचा कां बरें यत्न करायचा ?" हे लोक म्हणत असतात, "ह्या जगांत दररोज होत असलेल्या आश्चर्यकारक सुधारणांकडे बघा; विलासाचे, चैनीचे, ऐषआरामाचे किती पदार्थ त्याच्यासाठी निर्माण केले जात आहेत. हें जग अतिशय उपभोग्य आहे. ह्यापासून दूर जाऊन, ह्याहून निराळ्या अशा कशातरीसाठी आम्ही कां बरें तडफडावें ?" ह्या लोकांना उत्तर असें की, ह्या जगाचा नाश अगदी अवश्यंभावी आहे, त्याचा चक्काचूर होणें अगदी अटळ आहे, आणि शिवाय हेच भोग आपण अनेकदा भोगलेले आहेत. सध्या आपण बघत असलेलीं सारीं रूपें पुनःपुनः व्यक्त होऊन गेलीं आहेत, आणि ज्या जगांत आपण जगत आहोंत तें यापूर्वी अनेक वेळां असेंच अस्तित्वांत येऊन गेलेलें आहे मी यापूर्वी अनेक वेळां येथे होतों नि मीं अनेक वेळां तुमच्यापुढे व्याख्यान दिलें आहे. तुम्हांला आढळून येईल की हें असेंच असलें पाहिजे, आणि सध्या तुम्हीं जे शब्द ऐकत आहांत तेच तुम्ही पूर्वी अनेक वेळां ऐकले आहेत. आणि आणखीहि पुष्कळ वेळां हें असेंच घडणार आहे. जीवात्मे कधीच निराळे नव्हते, शरीरें सारखीं मोडत आहेत नि फिरून घडत आहेत. दुसरें असें की, ह्या गोष्टी ठराविक काळाच्या अंतराने पुन्हापुन्हा होत असतात. अशी कल्पना करा की, येथे तीन-चार फासे असून आपण त्यांनी खेळत आहोंत. आपण जेव्हा ते फासे टाकतों तेव्हा कदाचित् एकावर पांच दिसतात, आणखी एकावर चार दिसतात, आणखी एकावर तीन, तर उरलेल्यावर दोन दिसतात. तुम्ही जर ते टाकीतच राहिलांत तर फिरून अगदी हुबेहुब तेच आकडे परतण्याच्या वेळा पुन्हापुन्हा आल्याच पाहिजेत. तुम्ही ते फासे फेकत चला, मधे कितीहि वेळ जावो, पण तेच आकडे फिरून आलेच पाहिजेत. आता, किती डावांत ते पुन्हा येतील हें ठासून सांगतां येणें अर्थातच शक्य नाही; हा सारा योगायोगाचा प्रकार आहे--केवळ दैवयोग. योगायोग हाच ह्या

बाबतींतील नियम. असेंच जीवात्म्यांचें आणि त्यांच्या संबंधांचें आहे. दर खेपेस मध्यंतरीं कितीहि अवधि लोटत गेला तरी तेच तेच संयोग आणि तेच तेच वियोग पुन्हा पुन्हा होत राहतील. तेंच जन्मणें, खाणें आणि पिणें, आणि मग मरणें, हें पुन्हा पुन्हा फिरफिरून घडत असतें. कित्येकांना ह्या जगाच्या उपभोगांपरीस श्रेष्ठ असें कांही कधीच गावत नाही, परंतु जे उंच उंच भराऱ्या मारूं इच्छितात त्यांना आढळून येतें की, हे भोग कधीच अंतिम लक्ष्य नसतात, ते केवळ सहज, जातां जातांचे आहेत.

अगदी क्षुद्र कीटापासून तों मानवापर्यंतचें प्रत्येक रूप वा प्रत्येक देह म्हणजे रहाटपाळण्याच्या एकेका झुल्याप्रमाणे आहे असें आपण म्हणूं या. हा रहाटपाळणा सतत एकसारखा फिरत आहे. पण त्यांत बसणारे मात्र बदलत आहेत. एक माणूस एका झुल्यांत बसतो, रहाटपाळण्याबरोबर फिरतो आणि त्यांतून बाहेर येतो. रहाटपाळणा आपला संतत चालूंच असतो. तद्वतच, एक जीवात्मा एका देहांत प्रवेश करतो, तिथे कांही काळ वास करतो, मग तो सोडून आणखी एकांत जातो, आणि फिरून तों टाकून तिसऱ्या एखाद्यांत शिरतो. भवचक्रांतून वा मायेच्या ह्या रहाटपाळण्यांतून खाली उतरून मुक्त होईपर्यंत त्याचा हा फेरा असाच चालू असतो.

माणसाचें भूत आणि भावी जीवन सांगण्याची अद्‌भुत शक्ति असलेले लोक प्रत्येक देशांत आणि प्रत्येक युगांत असल्याचे प्रसिद्ध आहे. ह्याचें स्पष्टीकरण असें आहे की, आत्म्याचा स्वरूपसिद्ध मुक्त-स्वभाव पूर्णपणें नाहीसा होत नसला तरी, व म्हणूनच मुक्त होणाऱ्या व्यक्तींच्या उदाहरणांवरून सिद्ध होतें त्याप्रमाणे तो जरी स्वतःला कार्य-कारणाच्या बंधनापासून सोडवून घेण्यास निश्चितच समर्थ असला तरी देखील, आत्मा जोंपर्यंत कार्य-कारणाच्या राज्यांत असतो तोंपर्यंत त्याच्या क्रिया बव्हंशीं कार्यकारणाच्या नियमाने नियंत्रित होत असतात, आणि त्यायोगें कोणत्या कर्माचें फळ केव्हा नि कसें फलद्रूप होत असतें ह्याविषयी अंतर्दृष्टि असणाऱ्या व्यक्तींना कुणाचेंहि भूत व भविष्य सांगतां येणें शक्य होतें.

वासना किंवा उणीव हें अपूर्णत्वाचेंच निश्चित चिन्ह होय. जिथे

वासना असते किंवा उणिवेची भावना असते तिथे अपूर्णत्व असतेंच हें निश्चित समजावें. पूर्ण, मुक्त व्यक्तीला कोणतीच वासना असणें शक्य नाही. ईश्वराला कसलीच उणीव भासणें शक्य नाही. त्याला जर कसलीहि कामना असेल तर तो ईश्वरच असूं शकणार नाही, तो अपूर्ण होऊन जाईल. आणि म्हणून, ईश्वराला ह्याची किंवा त्याची वांच्छा आहे, तो कधी कोपत असतो तर कधी प्रसन्न होत असतो इत्यादि म्हणणें म्हणजे निव्वळ बालिश बडबडच असून तिला कांहीहि अर्थ नाही. आणि म्हणूनच सर्व धर्माचार्यांची हीच शिकवण आहे की— "कसलीच वासना बाळगूं नका, समस्त वासनांचा त्याग करा नि पूर्ण संतुष्ट असा."

मूल बिनादांतांचें नि रांगत रांगत जगांत प्रवेश करतें, आणि म्हातारा माणूसहि बिनादांतांनीच नि खुरडत खुरडत जगाच्या बाहेर पडतो. दोन्ही टोकें सारखींच आहेत, परंतु एकाला स्वतःपुढील आयुष्याचा कांहीच अनुभव नसतो, तर दुसरा त्या साऱ्यामधून गेलेला असतो. ज्या वेळीं कंपनें फारच मंद असतात त्या वेळीं आपल्याला प्रकाश दिसत नाही, अंधार भासतो; ज्या वेळीं तीं फारच जलद असतात त्या वेळींहि अंधार हेंच त्यांचें फळ असतें. दोन्हीं टोकें साधारणपणें सारखींच भासत असतात खरीं, पण त्या दोघांत वस्तुतः अगदी दोन ध्रुवांचें अंतर असतें. ह्या भिंतीला कांही वासना नाहीत, आणि तद्वतच पूर्णत्व पावलेल्या व्यक्तीलाहि वासना नसतात. परंतु, भिंत ही कसलीहि वासना धरण्यापुरती सचेतनच नसते, तर पूर्णत्व पावलेल्या व्यक्तीच्या लेखीं वासना धरण्यासारखेंच कांही नसतें. अशीं कितीतरी ठोंबीं, वेडपट, बावळट माणसें असतात की ज्यांना ह्या जगांत कसलीच वासना नसते, कारण त्यांचा मेंदू अर्धवट असतो. आणि तद्वतच सर्वोच्च अवस्थेंतहि मुळीच वासना नसते. परंतु, एकाच अस्तित्वाचीं हीं दोन अगदी दोन ध्रुवांसारखीं विरुद्ध टोकें आहेत. एकाचें नातें पशूशीं आहे, तर दुसऱ्याचें नातें ईश्वराशीं जुळलेलें असतें.

---

## मानवाचें सत्य आणि आभासमय रूप

( न्यूयॉर्क शहरीं दिलेलें व्याख्यान )

आपण येथे उभे आहोंत, परंतु आपले डोळे दूर, अतिदूर—कित्येकदा कितीतरी कोस दूर दृष्टिक्षेप करीत असतात. माणसानें जेव्हापासून विचार करावयास प्रारंभ केला तेव्हापासून तोहि असेंच करीत आहे. माणूस नेहमी वर्तमानाच्या शिवाराबाहेर दृष्टिक्षेप करीत असतो— ह्या शरीराचा ध्वंस झाल्यानंतर आपण कुठे जातों हें तो जाणून घेऊं इच्छीत असतो. ह्या गूढाचा भेद करण्यासाठी, ह्या रहस्याचा ठाव घेण्यासाठी निरनिराळे सिद्धान्त प्रतिपादिले गेले, एकामागून एक निरनिराळ्या विचारप्रणाली पुढे आणल्या गेल्या. त्यांतील कांहींचें खंडन झालें, कित्येक ग्राह्य मानण्यांत आल्या; आणि जोंवर माणूस ह्या मर्त्यलोकीं वास करील, जोंवर तो विचार करील तोंवर हें असेंच चालूं राहणार आहे. ह्या प्रत्येक मतामधेंच थोडें ना थोडें सत्य आहे; सर्वांमधे असत्यहि भरपूर आहे. ह्यासंबंधांत भारतांत जें कांही अनुशीलन झालें त्याचाच निष्कर्ष, त्याचेंच फलित मी तुम्हांला सांगण्याचा प्रयत्न करीन. भारतीय तत्त्वज्ञान्यांनी, दर्शनकारांनी आणि मानसशास्त्रज्ञांनी वेळोवेळीं प्रकट केलेल्या ह्या विषयासंबंधीच्या निरनिराळ्या सर्व मतांचा समन्वय करण्याचा तर मी यत्न करीनच, परंतु शक्य झाल्यास मी त्यांचा आधुनिक वैज्ञानिक सिद्धान्तांशींहि मेळ घालण्याचा प्रयत्न करीन.

वेदान्तदर्शनाचा एकमेव विषय, एकमेव उद्देश आहे—एकत्वाचें अन्वेषण. हिंदु मन तपशिलांत रमत नाही, तें विशेषांकडे लक्ष देत नाही; त्याला नेहमी त्यांमागील सामान्य तत्त्वाची, नव्हे, वैश्विक तत्त्वाचीच ओढ वाटत असते. "जें जाणल्यानें बाकी सारें जाणलें जातें असें काय आहे ?"— हाच त्यांच्या चिंतनाचा एकमेव विषय आहे, त्याच

सत्याचें त्यांनी सतत अन्वेषण केलें आहे. "मातीच्या एका ढेकळाचें ज्ञान झाल्याने ज्याप्रमाणे मातीच्या सर्व वस्तूंचें ज्ञान होऊं शकतें, त्याप्रमाणे, असें काय आहे की जें जाणल्याने हें अवघें विश्वचे विश्वच जाणलें जाईल ?"—– हीच त्यांची एकमेव पृच्छा, एकमेव जिज्ञासा. हिंदु तत्त्वज्ञांच्या मतानुसार हें अवघें विश्व 'आकाश' नामक एका जड-द्रव्यांत रूपान्तरित होऊं शकतें. आपण आपल्या सभोवार जें कांही पाहतों, ज्या कशाचा अनुभव घतों, ज्या कशाला स्पर्श करतों, ज्या कशाची चव घेतों तें सारें ह्या 'आकाशा'चाच केवळ विभिन्न आविष्कार होय. हें आकाश सूक्ष्म आणि सर्वव्यापक आहे. आपण ज्यांना घन, द्रव किंवा वायुरूप म्हणतों ते सर्व पदार्थ, सर्वप्रकारचे आकार, रूपें नि शरीरें, ही पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारे—– हें सगळेंचकांही ह्या 'आकाशा'चें बनलेलें आहे.

ह्या 'आकाशा'वर कोणती शक्ति कार्य करून त्यापासून या विश्वब्रह्माण्डाचें सृजन करीत असते ? ह्या आकाशासमवेतच एक विश्वव्यापी शक्तिहि अस्तित्वांत आहे; ह्या विश्वांत जी म्हणून शक्ति आहे—–मग ती आकर्षणशक्तीच्या रूपाने प्रकट होत असो की अपसारण-शक्तीच्या रूपाने प्रकट होत असो, नव्हे, विचारशक्तीच्या देखील रूपाने प्रकट होत असो—–ती सारी त्या एकाच महाशक्तीची केवळ विभिन्न अभिव्यक्ति होय; आणि त्या एका मूळ शक्तीलाच हिंदुलोक 'प्राण' म्हणत असतात. हाच 'प्राण' 'आकाशा'वर कार्य करून हें अवघें विश्व निर्माण करीत असतो. कल्पाच्या प्रारंभीं हा प्राण जणु 'आकाश'रूपी अनंत समुद्रांत प्रसुप्त असतो. आदिकालीं हें आकाश गतिहीन स्वरू-पांत असतें. नंतर मग ह्या प्राणाच्या प्रभावाने ह्या आकाश-समुद्रांत गति उत्पन्न होते, आणि हा प्राण जसजशी हालचाल करूं लागतो, जसजसा स्पंदन पावूं लागतो तसतशीं ह्या आकाश-समुद्रांतून नाना ब्रह्माण्डें, किती सूर्य, किती चंद्र, किती तारे, ही वसुंधरा, माणसें, पशु, वनस्पति, निरनिराळ्या शक्ति नि अद्‌भुत पदार्थ निर्माण होऊं लाग-तात. म्हणून, हिंदूंच्या मतें, शक्तीचें प्रत्येक रूप हा या प्राणाचाच एकेक आविष्कार असून, प्रत्येक भौतिक रूप हें आकाशाचीच अभि-व्यक्ति होय. ज्या वेळीं हा कल्प संपेल त्या वेळीं, आपण ज्यांना घन

पदार्थ म्हणतों ते सगळेच्या सगळे त्यानंतरच्या सूक्ष्म रूपांत म्हणजेच द्रव रूपांत परिणत होतील; तो द्रव पदार्थ मग बाष्परूपांत परिणत होईल; तो बाष्पीय पदार्थ मग आणखीच सूक्ष्म आणि एकजिनसी तेजाचें रूप धारण करील; आणि अखेर सारेंकांही, ज्यापासून तें सारें उत्पन्न झालें होतें त्या मूल आकाशांत लय पावेल. आणि ह्याचप्रमाणे, आपण आता ज्यांना आकर्षणशक्ति, अपसारणशक्ति वा गतिशक्ति इत्यादि म्हणत असतों त्या सर्व शक्ति हळूहळू, क्रमाक्रमाने त्या मूल प्राणांत विलीन होऊन जातील. त्यानंतर, पुढील कल्पाचा आरंभ होईपर्यंत कांही काळ हा प्राण जणु निद्रिस्त अवस्थेंत राहील, नि कल्पारंभीं मग फिरून जागृत होऊन फिरून हीं नाना रूपें प्रकट करील; आणि मग तो कल्प संपल्यानंतर हें सारें फिरून लय पावेल. हें सारें याप्रमाणे येत आहे नि जात आहे——एकदा वर तर एकदा खाली, एकवार पुढे तर एकवार मागे याप्रमाणे जणु हिंदकळत आहे, हिंदोळत आहे. आधुनिक विज्ञानाच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे तें एकवार स्थितिशील, तर परत गतिशील होत आहे; एकवार प्रसुप्त तर एकवार क्रियाशील होत आहे. आलटूनपालटून हें असेंच अनाद्यन्त चाललें आहे.

तथापि हेंहि विश्लेषण आंशिक वा अपूर्णच आहे. हें एवढें आधुनिक भौतिक विज्ञानालाहि अवगत आहे. भौतिक विज्ञानाचें संशोधन ह्यापलीकडे पोहोचूं शकत नाही. परंतु म्हणून कांही ह्या अन्वेषणाचा इथेच अंत होत नाही. आपल्याला अजून तें 'एक' कांही गवसलें नाही की जें जाणल्याने बाकी सारेंकांही जाणलें जातें. आपण अवघें विश्व हें भूतद्रव्य ( matter ) आणि शक्ति ( energy ) या नांवांनी प्रसिद्ध असलेल्या, किंवा भारतांतील प्राचीन तत्त्वज्ञ ज्यांना आकाश आणि प्राण म्हणत असत अशा त्या दोन घटकांमधे विलीन केलें. यानंतरची पायरी म्हणजे ह्या आकाश व प्राण यांना त्यांच्या मूलकारणांत विलीन करणें. त्या उभयतांना, त्यांच्यापेक्षाहि श्रेष्ठ अशा मन नामक पदार्थांत विलीन करणें शक्य आहे. मन वा महत् नामक समष्टिभूत मानसशक्तींतून वा विचारशक्तींतून आकाश व प्राण हीं दोन्हीं उत्पन्न झालीं आहेत. विचार वा चिंतन हा आत्म्याचा, आकाश वा प्राण या दोहोंपेक्षाहि अधिक सूक्ष्म असा आविष्कार आहे. ही

विचारशक्ति, ही चिंतनशक्ति,ही समष्टिभूत मानसशक्ति वा हें 'महत'च आकाश व प्राण या दोन रूपांत विभक्त होऊन जातें. प्रारंभीं हें सर्वव्यापी मन वा 'महत'च अस्तित्वांत होतें, त्यानेच व्यक्त होऊन, परिणत होऊन, विकसित होऊन आकाश व प्राण हीं दोन रूपें धारण केलीं; आणि त्या दोहोंच्या संयोगानें, दोहोंच्या समवायानेच हें समस्त विश्व निर्मित झालें.

आता यानंतर आपण मानसशास्त्राकडे वळूं. मी तुमच्याकडे बघत आहें. डोळे माझ्याकडे बाह्य संवेदना आणीत आहेत; संवेदना-वाहक ज्ञानतंतु त्या संवेदना मेंदूकडे घेऊन जात आहेत. आपले हे बाहेरून दिसणारे डोळे कांही पाहण्याचें 'इंद्रिय' नव्हत, ते केवळ बाह्य 'साधन' वा 'करण' वा 'यंत्र' होत. कारण, मेंदूकडे संवेदना घेऊन जाणारें, ह्या आपल्या डोळ्यांमागील खरें दर्शनेंद्रिय जर नष्ट झालें तर मला दोन सोडून वीस डोळे जरी असले तरी त्यांनी मी तुम्हांस पाहूं शकणार नाहीं. डोळ्यांमधील पडद्यावर बाह्य विषयाचें अगदी शक्य तितकें पूर्ण चित्र पडलेलें असेल, आणि तरीहि मी तुम्हांला पाहूं शकणार नाहीं. सबब, दृष्टीचें 'इंद्रिय' हें त्याच्या 'साधनां'हून वेगळें आहे; तें खरें दर्शनेंद्रिय ह्या आपल्या डोळ्यांच्या मागे अवस्थित असतें. सर्वचप्रकारच्या विषयानुभूतींसंबंधी हें खरें आहे. आपलें बाहेरचें नाक हें कांही वास घेण्याचें इंद्रिय नव्हे, तें केवळ साधन वा उपकरण आहे, खरें घ्राणेंद्रिय त्याच्या मागे बसविलेलें असतें. आपल्या प्रत्येक ज्ञानेंद्रियाच्या बाबतींत ही अशीच रचना आहे-- ह्या स्थूल शरीरांत त्यांचीं बाह्य साधनें वा यंत्रें असतात, आणि त्या यंत्रांच्या मागे, परंतु ह्या स्थूल शरीरांतच त्यांचीं इंद्रियें असतात. परंतु आपल्याला बाह्य वस्तूंचें ज्ञान होण्यासाठी हीं एवढींच पुरेशीं नाहीत. समजा की मी तुमच्याशीं बोलत आहें, आणि तुम्ही अगदी लक्षपूर्वक माझें म्हणणें ऐकत आहांत. अशा वेळीं कांहीतरी घडतें-- समजा की एखादी घंटा वाजते; परंतु तिचा आवाज तुम्हांला कदाचित् ऐकूं येणार नाही. असें कां बरें व्हावें? ध्वनितरंग तुमच्या कानां-पर्यंत आले, ते तुमच्या कानांत शिरून आंतील पडद्यावर आदळले, तेथून ज्ञानतंतूंनी तो संदेश मेंदूपर्यंत नेऊन पोहोचविला; याप्रमाणे सर्व

प्रक्रिया पूर्ण होऊनहि तुम्ही तो ध्वनि ऐकूं शकलां नाही, असें कां ? जर मेंदूपर्यंत संदेश पोहोचविला जाण्यानेच समस्त श्रवणक्रिया पूर्ण होत असेल तर मग, तसें घडूनहि, तुम्ही तो ध्वनि कां बरें ऐकूं शकलां नाही ? यावरून हेंच दिसून येतें की, श्रवणक्रियेसाठी आवश्यक असलेलें आणखी कांहीतरी तेथे हजर नव्हतें-- तुमचें मन त्या इंद्रियाशी जोडलेलें नव्हतें ! आणि म्हणूनच, बाकी समस्त प्रक्रिया पूर्ण होऊनहि तुम्ही ऐकूं शकलां नाही. ज्या वेळीं मन हे इंद्रियापासून अलग असतें, त्याच्याशीं संयुक्त नसतें, त्या वेळीं इंद्रियाने त्याला वाटेल तो संदेश आणून दिला तरी मन तो ग्रहण करणार नाही. मन जेव्हा इंद्रियाशीं जोडलें जातें, त्याच्याशीं संयुक्त होतें, केवळ तेव्हाच कोणतीहि वार्ता ग्रहण करणें मनाला शक्य होतें. परंतु एवढयानेहि ही प्रक्रिया खरोखर पूर्ण होत नाही, एवढयानेच खरोखर आपल्याला विषयज्ञान वा विषयानुभव होत नाही. नाक, कान आदि बाह्य साधनांनी वा यंत्रांनी बाहेरील वस्तूच्या संवेदना आंत घेतल्या, इंद्रियांनी त्या आंत मेंदूपर्यंत नेऊन पोहोचविल्या, मन त्या मेंदूतील केंद्राशीं संयुक्त झालें, आणि तरीहि विषयज्ञानाची क्रिया पूर्ण व्हावयाची नाही. आणखी एक गोष्ट आवश्यक आहे-- आंतून एक प्रतिक्रिया व्हावयाला हवी. ही प्रतिक्रिया घडतांच ज्ञान उत्पन्न होतें. बाहेर असलेल्या वस्तूने जणु माझ्या मेंदूकडे एक संदेशप्रवाह प्रेरित केला. तेथून माझ्या मनाने तो ग्रहण करून बुद्धीला सादर केला. बुद्धीने, चित्तांत पूर्वीपासून अवस्थित असलेल्या संस्कारांच्या अनुरोधाने त्याचें वर्गीकरण केलें आणि एक प्रतिक्रियाप्रवाह प्रेरित केला; ही प्रतिक्रिया होतांच मला त्या वस्तूचें ज्ञान झालें. येथे इच्छाशक्तीचें कार्य घडतें. मनाची जी शक्ति ही प्रतिक्रिया प्रेरित करते तिला बुद्धि म्हणतात. तथापि अजूनहि ही वस्तुज्ञानाची प्रक्रिया संपूर्ण झालेली नाही. ती पुरी होण्यास आणखी एक टप्पा आवश्यक आहे. समजा की येथे एक चित्रक्षेपक यंत्र आणि एक पडदा आहे, आणि मी त्या यंत्राने त्या पडद्यावर चित्र पाडण्याचा यत्न करीत आहें. मी काय करावयाचें असतें ? मीं त्या यंत्रामधून नानाप्रकारचे प्रकाशकिरण त्या पडद्यावर सोडून ते सगळे तिथे नीट एकत्रित करावयाचे असतात, या ठिकाणीं अशी एक न हालणारी,

अचल वस्तु आवश्यक असते की जिच्यावर चित्र पाडतां येऊं शकेल. जी वस्तु स्वतःच हालत आहे, चल आहे तिच्यावर चित्र पाडतां येणें शक्य नाही, त्यासाठी एखादी न हालती, स्थिर, अचल वस्तुच आवश्यक आहे. कारण, त्या यंत्रामधून मी जे प्रकाशकिरण फेकीत आहें ते *हालते आहेत, चल आहेत; म्हणून त्यांचें चित्र उमटण्यासाठी* त्या हालत्या, चल प्रकाशकिरणांना एखाद्या न हालत्या, स्थिर, अचल वस्तूवर एकत्रित, एकीभूत, मीलित करून पूर्णस्वरूपांत प्रक्षेपित करावें लागेल. आपलीं हीं इंद्रियें ज्या साऱ्या संवेदना आंत घेऊन मनाला सादर करीत आहेत आणि मन ज्यांना बुद्धीला सुपूर्द करीत आहे, त्या संवेदनांसंबंधीहि अगदी असेंच आहे. जिच्यावर ह्या साऱ्या संवेदनांचें जणु सलग चित्र पाडतां येईल, जिच्यावर हे सगळे वेगवेगळे ठसे एकत्रित नि एकीभूत करतां येतील असें स्थायी, स्थिर, अचल कांहीतरी पाठीमागे असल्याखेरीज वस्तूच्या ज्ञानाची वा विषयानुभूतीची ही प्रक्रिया पूर्ण व्हावयाची नाही. आपल्या अस्तित्वांतील साऱ्या बदलत्या घटकांमधे एक एकत्वाचा भाव निर्माण करणारी ती वस्तु काय आहे ? चंचळ, गतिमान पदार्थाची एकरूपता टिकविणारी, विभिन्न गतींमधेहि प्रतिक्षणीं एकत्व टिकविणारी ती वस्तु काय आहे ? बाह्य विषयांचे आपण ग्रहण करीत असलेले सर्व ठसे,—बाह्य विषयांच्या आपल्या सर्व संवेदना जिच्यांत एकत्र ओवल्या जातात, जिच्यामुळे आपले सगळे विषयानुभव जणु एकत्र संमीलित होतात, एकत्र वास करतात नि त्यांना एक अखंडभाव प्राप्त होतो ती वस्तु काय आहे ? आपण बघितलेंच आहे की असलें कांहीतरी आवश्यक आहे, आणि आपण हेंहि पाहिलें की तें "कांहीतरी' आपल्या शरीराच्या व मनाच्या तुलनेने अचल, स्थिर असें असावयास हवें. ज्या पडद्यावर तें चित्रक्षेपक यंत्र चित्रें पाडीत आहे तो त्या प्रकाशकिरणांच्या तुलनेने अचल, स्थिर आहे, एरवी मुळी चित्रच संभवणार नाही. ह्याचा अर्थ असा की, आपल्यामधील 'तें' स्थिर व अचल असें 'कांहीतरी', तो 'पडदा' म्हणजेच 'द्रष्टा' हा एक अविभाज्य, अखंड, कूटस्थ, अचल अशी साक्षीस्वरूप व्यक्ति असावयास हवी. ज्याच्यावर मन हीं सारीं चित्रें चितारीत आहे, आमच्या मनाने व बुद्धीने वाहून आणलेल्या संवेदना

ज्याच्यावर स्थापित, श्रेणीबद्ध नि एकीभूत केल्या जातात त्यालाच म्हणतात--मानवाचा 'आत्मा'.

आपण बघितलें की, विराट समष्टि मन वा 'महत्' हें आकाश व प्राण ह्या दोहोंत विभक्त झालें असून, मनाच्या मागे आपल्यामधे आत्मा विद्यमान असल्याचेंहि आपल्याला दिसून आलें आहे. जसा आपल्यांत, तसाच ह्या विश्वांत, या समष्टि मनाच्या मागे एक आत्मा विद्यमान आहे, आणि त्यालाच म्हणतात--ईश्वर. व्यक्तींत तो मानवाचा आत्मा असतो. ह्या विश्वांत, ह्या ब्रह्माण्डांत एकीकडे जसें समष्टि-मन हें आकाश आणि प्राण ह्या रूपांमधे परिणत झालें आहे, त्याचप्रमाणे दुसरीकडे स्वतः समष्टि-आत्मा हाच मनरूपाने परिणत झाला आहे. आता प्रश्न असा आहे की, व्यष्टि मानवाच्या बाबतींतहि हें खरें आहे काय ? माणसाचें मन त्याच्या शरीराचा, नि त्याचा आत्मा त्याच्या मनाचा स्रष्टा आहे काय ? म्हणजे असें की, मानवाचा देह, त्याचें मन आणि त्याचा आत्मा ह्या तीन वेगवेगळ्या वस्तु आहेत, की एकामधेच तीन आहेत, की एकाच सत्तेच्या त्या केवळ तीन निरनिराळ्या अवस्था आहेत ? आपण हळूहळू पायरी पायरीने ह्या प्रश्नाचें उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न करूं. त्याची पहिली पायरी म्हणजे, आपल्याला येथवर हें आढळून आलें की, प्रथमतः म्हणजे हा आपला स्थूल देह आहे, ह्या स्थूल देहाच्या मागे इंद्रियें, मन व बुद्धि हीं आहेत, आणि तिच्या मागे आत्मा आहे. पहिल्या-प्रथम आपल्याला जणु असेंच आढळून आलें की, हा आत्मा शरीराहून पृथक् आहे, मनाहूनहि पृथक् आहे. या बाबतींत धर्मजगतामधे मत-भेद आढळून येतात आणि ह्या मुद्यापासूनच त्या मतभेदास सुरुवात होते. ज्यांना साधारणपणें द्वैतवादी गणण्यांत येतें अशा सर्व धर्मसंप्र-दायांच्या मतें आत्मा हा सगुण आहे, तो नाना गुणधर्मांनी युक्त आहे, भोग, सुख, दुःख इत्यादि भावना हे अगदी खऱ्या अर्थाने आत्म्याचे धर्म आहेत. आत्मा याप्रमाणे सगुण आहे ही गोष्ट अद्वैत्यांना मान्य नाही; त्यांच्या मतें तो निर्गुण आहे.

प्रथम द्वैतवाद्यांकडे वळून, आत्मा व त्याची गति यांसंबंधी त्यांचें मत काय आहे हें मी तुम्हांला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीन.

त्यानंतर मग, जें मत ह्या द्वैतवादाचें पूर्णपणें खंडन करतें त्या मता-विषयी मी तुम्हांला सांगेन. आणि शेवटीं, अद्वैतवादाद्वारें ह्या दोन्ही विरोधी मतांचा समन्वय कसा साध्य करतां येईल ह्याचीहि आपण चर्चा करूं.

असो तर, हा मानवाचा आत्मा शरीर व मन ह्यांहून पृथक् असल्याकारणें, आणि तो आकाश व प्राण यांच्या संयोगानें बनलेला नसल्याकारणें तो अमर असलाच पाहिजे. हें कशावरून ? मर्त्यत्व किंवा विनश्वरता म्हणजे काय ? ज्या घटकांनी एखादी वस्तु बनलेली असते तिचे ते घटकावयव पृथक् होऊन जाणें, ती विघटित वा विश्लेषित होऊन जाणें म्हणजेच मृत्यु. ज्याचें ज्याचें असें पृथक्करण, विघटन वा विश्लेषण होतें तें तें मर्त्य वा नश्वर असतें. यावरून हें अर्थात् उघडच आहे की ज्या वस्तु कित्येक घटकांच्या संयोगानें वा संमिश्रणानें निर्माण झालेल्या असतात, फक्त त्यांचेंच असें विघटन वा विश्लेषण होणार; जी वस्तु दोन वा तीन घटकांनी तयार झालेली आहे तिचें विघटन हें होणारच, तें अगदी अवश्यंभावी आहे, अपरिहार्य आहे. जी वस्तु ह्याप्रमाणे इतर कित्येक घटकांच्या संयोगानें निर्माण झालेली नाही, फक्त तिचेंच विघटन वा विश्लेषण कधी व्हावयाचें नाही, आणि म्हणून ती कधी मरूं शकावयाची नाही, तिचा विनाश व्हावयाचा नाही. ती अविनाशी असते, म्हणजेच अमर असते. ती अनाद्यन्त असते, ती कधी सृष्ट वा निर्मित झालेली नसते. प्रत्येक सृष्ट पदार्थ हा केवळ एक संयोग वा संमिश्रण असतो; शून्यांतून कांहीहि सृष्ट झालेलें कुणीं कधी पाहिलें नाही. सृजनासंबंधी आपल्याला एवढेंच माहीत आहे की, सृजन म्हणजे आधीच अस्तित्वांत असलेल्या कित्येक वस्तूंच्या संयोगानें एक निराळयाच रूपाचा पदार्थ निर्माण होणें. असें असल्यामुळे,--हा मानवाचा आत्मा संयुक्त वा संमिश्र पदार्थ नसल्या-मुळे--तो कोणत्याहि विभिन्न वस्तूंच्या संयोगानें वा संमिश्रणानें निर्माण झालेला नसल्यामुळे--तो अविभाज्य आहे, आणि म्हणून तो अनादिकाळापासून अस्तित्वांत आहे आणि अनंतकाळ अस्तित्वांत राहील. तो नेहमीच अस्तित्वांत होता आणि नेहमीच अस्तित्वांत राहील. तो नित्य आहे. हा देह पतन पावला तरीहि आत्मा तसाच

राहील. वेदान्त्यांच्या मतें, ज्या वेळीं ह्या देहाचा विनाश होतो त्या वेळीं आपल्या इंद्रियांचा मनांत लय होतो, मनाचा प्राणांत विलय होतो, प्राण आत्म्यांत प्रवेश करतो, आणि मग तो मानवात्मा जणु सूक्ष्मशरीररूपी वा लिंगशरीररूपी वसन परिधान करून तेथून निघून जातो. ह्या सूक्ष्म वा लिंग शरीरांतच माणसाचे सर्व संस्कार वसत असतात. संस्कार म्हणजे काय ? आपलें मन जणु एखाद्या तलावासारखें आहे, आणि आपण करीत असलेला प्रत्येक विचार म्हणजे जणु त्या तलावांत उठणारा एकेक तरंग, एकेक लाट आहे. ज्याप्रमाणे तलावांत तरंग किंवा लाटा उसळतात, कोसळतात आणि विरून नाहीशा होतात, त्याचप्रमाणे चित्तांतहि विचारांचे तरंग वा लाटा सतत उठत असतात आणि मग विरून जात असतात; पण त्या अजीबातच नाहीशा मात्र होत नसतात. चित्तांत उठणारे ते तरंग वा त्या लाटा क्रमशः अधिकाधिक सूक्ष्म होत जातात, परंतु अजीबात नाहीशा होत नाहीत, सूक्ष्मस्वरूपांत विद्यमानच राहतात, आणि प्रयोजन पडतांच केव्हाहि फिरून उदित होण्यास तत्पर असतात. ज्या विचारांनी असलें सूक्ष्म रूप धारण केलें आहे त्यांच्याचपैकी कांहींना फिरून तरंगाच्या वा लाटेच्या रूपांत परत आणण्यालाच स्मृति म्हणतात. असो तर, ह्याप्रमाणे, आपण जे कांही विचार केले आहेत, जीं काय कर्मे केलीं आहेत तीं आपल्या मनांमधे निवास करीत असतात; तें सारेंच्या सारें तिथे सूक्ष्मस्वरूपांत असतें, आणि माणूस मरतो तेव्हाहि ह्या सर्व संस्कारांची समष्टि त्याच्या मनामधे विद्यमान असते —ते संस्कार मग सूक्ष्मशरीरावर कार्य करीत असतात. नंतर, जणु ह्या सूक्ष्मशरीराचें आणि संस्कारांचें वस्त्र पांघरून आत्मा तो देह सोडून निघून जातो, आणि ह्याच विभिन्न संस्काररूपी भिन्न भिन्न शक्ति एकवटून त्या आत्म्याची गति नियंत्रित करीत असतात—तदनुसारच त्याला पुढील जन्म लाभत असतो. त्यांच्या (द्वैतवाद्यांच्या) मतें, आत्म्याला तीन प्रकारची गति लाभत असते.

जे अत्यंत धार्मिक असतात ते मृत्यूनंतर सूर्यरश्मींचें अनुसरण करतात आणि सूर्यलोकीं गमन करतात; तेथून ते चंद्रलोकांत व तेथन विद्युल्लोकांत जातात; तेथे त्यांची एका आनंदमय पुरुषाशीं भेट होते आणि तो पुरुष त्या नवागताला सर्वोच्च नि सर्वश्रेष्ठ अशा ब्रह्मलोकीं

घेऊन जातो. त्या ठिकाणीं ह्यांना सर्वज्ञत्व आणि सर्वशक्तिमत्त्व यांचा लाभ होतो, ते जवळजवळ ईश्वराइतकेच शक्तिमान आणि सर्वज्ञ बनतात-– ज्ञान व शक्ति यांच्या बाबतींत प्राय: ईश्वरतुल्य बनतात. आणि मग, द्वैतवाद्यांच्या मतें, ते तिथे कायमचे वास करतात, किंवा अद्वैतवाद्यांच्या मतें, ते आत्मे तो कल्प संपल्यानंतर त्या विश्वात्म्याशीं म्हणजेच ब्रह्माशीं एक होऊन जातात. ह्यानंतरच्या दुसऱ्या वर्गातील लोक, म्हणजेच सकामभावनेने सत्कर्म करणारे लोक मृत्यूनंतर स्वत:च्या सत्कर्मांनी चंद्रलोकीं नेले जातात. चंद्रलोक हा निरनिराळ्या स्वर्गांचा बनलेला आहे. तिथे गेल्यानंतर ह्या लोकांना सूक्ष्म-शरीराचा-- देवशरीराचा-- लाभ होतो. ते याप्रमाणे देव बनून तिथे वास करतात आणि सुदीर्घ काल स्वर्गसुखाचा उपभोग घेतात. उपभोगाचा तो अवधि संपल्यानंतर त्यांचें जुनें कर्म बळावतें, आणि त्यामुळे त्यांचें फिरून ह्या मर्त्यलोकांत पतन होतें-- ते फिरून ह्या पृथ्वीवर येऊन पडतात. स्वर्गभोग संपवून पृथ्वीवर परततांना ते वायुलोक, मेघलोक इत्यादि निरनिराळ्या लोकांमधून येत येत सरते-शेवटीं पर्जन्यधारांबरोबर पृथ्वीवर येऊन पोहोचतात. याप्रमाणे पावसाबरोबर खाली पृथ्वीवर येऊन ते खाण्याच्या कसल्यातरी पिकाला चिकटून राहतात. तदनंतर अखेर तें धान्य कुण्या अनुरूप व्यक्तीच्या खाण्यांत येऊन तिच्या पोटीं त्या स्वर्गांतून परत आलेल्या जीवाचा जन्म होतो. यानंतरचा, तिसरा म्हणजेच शेवटचा वर्ग म्हटला म्हणजे अत्यंत दुर्वृत्त लोकांचा. हे असले दुष्ट लोक मृत्यूनंतर भूत वा दानव होतात आणि चंद्रलोक व आपली ही पृथ्वी ह्यांच्या मध्यंतरीं कुठेतरी वास करतात. ह्यांच्यापैकी कित्येकजण मानवांना त्रास देतात तर कित्येक मानवाशीं मित्रत्वाने वागतात. अशा रीतीने कांही काल तिथे कंठून हेहि पुन्हा पृथ्वीवर येऊन पडतात आणि पशूंचा जन्म घेतात. त्या पशुदेहांत कांही काळ काढून ते त्यांतून सुटून फिरून मानवयोनींत जन्मास येतात आणि अशा रीतीने मुक्ति प्राप्त करून घेण्याची त्यांना आणखी एक संधि लाभते. यावरून आपल्याला दिसून येतें की, जे मुक्तीच्या अगदी जवळ जाऊन पोहोचले असतात, ज्यांच्या ठायीं केवळ अगदी फारच थोड्या प्रमाणांत अपवित्रता उरलेली असते,

ते सूर्यरश्मींमधून ब्रह्मलोकीं गमन करतात. जे मध्यम प्रतीचे लोक असतात, जे स्वर्गाला जाण्याच्या कामनेनेंच इहलोकीं सत्कार्य करीत असतात, ते चंद्रलोकान्तर्गत स्वर्गांत जातात आणि तिथे त्यांना देवशरीरांचा लाभ होतो; परंतु मुक्तिलाभ करून घेण्यासाठी त्यांना फिरून मनुष्यदेह धारण करावा लागतो. आणि, जे अत्यंत वाईट असतात, अत्यंत दुर्वर्तनी असतात ते भूत किंवा दानव बनतात, त्यानंतर त्यांना कदाचित् पशुदेखील व्हावें लागतें, आणि नंतर मग त्यांना मनुष्यदेह लाभून पूर्णत्व वा मुक्ति प्राप्त करून घेण्याची आणखी एक संधि मिळते. ह्या आपल्या पृथ्वीला कर्मभूमि म्हटलें आहे, हें कर्म-क्षेत्र आहे. भलीं म्हणा की बुरीं म्हणा, सारींच कर्मे माणूस येथेच करीत असतो. स्वर्गाला जाण्याच्या इच्छेने चांगलीं कर्मे केल्यास माणूस स्वर्गांत जाऊन देव बनतो; परंतु त्या ठिकाणीं तो कोणतेंहि नवीन असें कर्म करीत नाही, पृथ्वीवर केलेल्या आपल्या सत्कर्मांचें फक्त फळच तो स्वर्गांत उपभोगीत असतो. आणि हें त्याचें सत्कर्म संपुष्टांत येतांच, त्याने आधीच्या जीवनांत केलेल्या सर्व वाईट कर्मांचें एकूण फळ त्याला पछाडतें आणि फिरून खाली ह्या पृथ्वीवर खेचून आणतें. ह्याचप्रमाणे, जे भूत होतात ते त्याच अवस्थेंत, कोणत्याहि प्रकारचें नवें कर्म न करतां राहतात. त्या अवस्थेंत तें कोणतेंहि नवीन कर्म करीत नाहीत, फक्त स्वतःच्या गत दुष्कृत्यांचें कुफल भोगीत असतात. त्यानंतर कांही काळ त्यांना पशुयोनींत काढावा लागतो; याहि अवस्थेंत त्यांच्याकडून कोणतेंहि नवीन कर्म घडत नसतें. ती दशा संपल्यानंतर मग ते देखील फिरून मनुष्य होऊन जन्माला येतात. चांगल्या किंवा वाईट कर्मांचें फळ म्हणून लाभलेल्या पुरस्काराच्या किंवा शिक्षेच्या अवस्थेंत कोणतेंहि नवें कर्म घडत नसतें; त्या अवस्था नुसत्या सुखाचा उपभोग वा दुःखाचा भोग भोगण्यासाठीच असतात. एखादें असाधारण चांगलें किंवा असाधारण वाईट कर्म असल्यास तें शीघ्र फळत असतें. उदाहरणार्थ असें समजा की, एखादा मनुष्य आपल्या सगळ्या आयुष्यभर अनेक वाईट गोष्टी करीत आला आहे, परंतु त्याने एक खूप चांगलें कर्म केलें. अशा परिस्थितींत, त्याच्या त्या चांगल्या कर्माचें फळ ताबडतोब प्रकट होईल, पण तें सुफळ

उपभोगून संपल्यानंतर त्याच्या त्या साऱ्या वाईट कर्मांनाहि फळें येतील व तीं त्याला भोगावीं लागतील. जे सारे लोक चांगलीं चांगलीं नि मोठमोठीं कर्में करतात, परंतु ज्यांच्या एकूण जीवनाची गति बरोबर नसते ते देव होतील. तिथे कांही काल देवशरीरांत राहून आणि देवांचा अधिकार उपभोगून त्यांना मग फिरून माणूस व्हावें लागेल. याप्रमाणे जेव्हा त्यांच्या सत्कर्मांची शक्ति क्षीण होईल तेव्हा मग त्यांचीं तीं जुनीं वाईट कर्में फळूं लागतील. जे अत्यंत घोर अशीं वाईट कर्में करतात त्यांना भूतयोनींत वा दानवयोनींत जन्म घ्यावा लागतो, आणि जेव्हा त्यांच्या त्या अपकृत्यांचें फळ संपतें तेव्हा मग, त्यांचें जें काय थोडें चांगलें कर्म अवशिष्ट असतें त्याच्या बळाने ते फिरून मनुष्य बनतात. जिथून मग पडण्याची वा परतण्याची संभावना नसते त्या ब्रह्मलोकास घेऊन जाणाऱ्या मार्गाला देवयान म्हणतात, आणि चंद्रलोकाच्या मार्गाला पितृयान म्हणतात.

म्हणून, वेदान्तदर्शनाच्या मतें मनुष्यच जगांतील सर्वांत श्रेष्ठ प्राणी होय आणि कर्मभूमि असलेली ही आपली पृथ्वीच समस्त विश्वांत सर्वश्रेष्ठ स्थान होय, कारण फक्त येथेच त्याला मुक्त होण्यासाठी सर्वांत मोठी व सर्वांत चांगली संधि लाभत असते. देव म्हणा, की देवदूत म्हणा, की आणखी कुणीहि म्हणा, सर्वांनाच मुक्त होण्यासाठी मनुष्यजन्म घ्यावा लागतो. ह्या अशा श्रेष्ठ, समतोल मानवजन्मांतच मुक्तीची सगळ्यांत जास्त सोय आणि संधि असते.

आता आपण तत्त्वज्ञानाच्या आणखी एका बाजूची--वरील मताच्या विरुद्ध पक्षाची चर्चा करूं. बौद्धांना ह्या आत्म्याचें अस्तित्व मुळीच मान्य नाही. ते म्हणतात की, "ह्या शरीराला आणि मनाला आधारभूत, त्यांच्या पार्श्वभूमीसारखें आणखी कांहीतरी आहे असें मानण्याचा काय फायदा ? विचार तसेच चालले असतात असें आपण कां मानूं नये ? या शरीर-मनाच्या पाठीमागे आत्मा नांवाचा आणखी तिसरा एक पदार्थ आहे असें काय म्हणून समजावयाचें ? तसें समजण्याने काय लाभ होईल ? ह्या शरीर-मनरूपी यंत्राचें स्पष्टीकरण त्याच्या स्वतःच्याच साहाय्याने करतां येणार नाही काय ?--त्यासाठी त्याहून वेगळी अशी तिसरी एखादी नवी वस्तु कल्पण्याची काय गरज?

तें—त्याचें स्वरूप आणि कार्य—-स्वतःसिद्ध असें आहे म्हणून भागणार नाही काय ?'' बौद्धांचे हे मुद्दे फार जबरदस्त आहेत, त्यांचा हा तर्क अत्यंत सबळ आहे, यांत शंकाच नाही. एकूण बाह्य संशोधनाच्या आधाराने विचार केल्यास दिसून येतें की हें शरीर-मनोरूपी यंत्र स्वतः-सिद्ध आहे, त्याचें स्पष्टीकरण त्यांतच गवसेल, त्याचें स्वरूप समजून घेण्यासाठी त्याव्यतिरिक्त आणखी कशाचें साहाय्य घेण्याची कांहीच आवश्यकता नाही—-निदान आपल्यापैकी पुष्कळांना तसें वाटतें, ते त्याच दृष्टीने त्याकडे पाहतात. वस्तुस्थिति जर अशीच असेल तर मग, शरीर व मन या दोन्हीहून वेगळा असून त्या दोहोंच्या पार्श्वभूमी-सारखा आहे, त्यांचा आधार आहे अशा एका आत्म्याची कल्पना करण्याची खरोखर गरजच काय ? फक्त शरीर आणि मन हीं दोनच मानणें पुरेसें नाही काय ? सतत बदल पावणाऱ्या, सतत परिणाम पावणाऱ्या एका जडस्रोताचें नांव आहे शरीर, आणि सतत बदल पाव-णाऱ्या, सतत परिणाम पावणाऱ्या विचारस्रोताचें वा जाणिवेच्या स्रोताचें नांव आहे मन. पण मग त्या बदलांमधे ही जी एकत्वाची प्रतीति येते, हा जो एकपणा आहेसा भासतो तो कशामुळे ? यावर बौद्धांचें असें म्हणणें आहे की हें एकत्व वा हा एकपणा खरोखर अस्तित्वांत नाही. खरोखर हें एकत्व नाही हें आपलें म्हणणें पटवून देण्याकरता बौद्ध तत्त्वज्ञ एक दृष्टान्त देतात. ते म्हणतात की एक जळती मशाल घ्या आणि ती वेगाने स्वतःसमोर फिरवीत राहा. तुम्हांला अग्नीचें एक वर्तुळ दिसूं लागेल. खरोखर तिथे तसलें वर्तुळ नाही, परंतु ती मशाल सारखी फिरत असल्याकारणें तिथे एका वर्तुळाचा भास होतो, इतकेंच. तद्वतच, आपल्या जीवनांतहि वस्तुतः एकत्व नाही. जडाची एक रास झपाट्याने सारखी चालली आहे, त्या समस्त जडराशीला एक म्हणण्याची इच्छा असेल तर खुशाल म्हणा, परंतु तींत खरोखरच एकत्व आहे अशांतला मात्र भाग नाही. जसें शरी-राचें, तसेंच मनाचेंहि. प्रत्येक विचार हा दुसऱ्या विचाराहून पृथक् आहे; ते विचार एकामागून एक झपाट्याने एखाद्या प्रवाहासारखे वाहत आहेत, म्हणूनच त्यांच्यांत एकत्व असल्याचा भ्रम निर्माण होतो. सारांश, त्यांच्यांतील ह्या अग्निवर्तुळाप्रमाणे भासमान अशा

एकत्वाच्या स्पष्टीकरणासाठी आत्मा नामक तिसऱ्याच एखाद्या वस्तूची कल्पना करण्याची कांहीहि गरज नाही. कुठेहि पाहतां हें जें कांही दिसत आहे--हें शरीर आणि हें मन--हा जडाचा स्रोत आणि हा विचारांचा वा जाणिवेचा स्रोत--बस्, यांचेंच अस्तित्व आहे, हींच काय तीं सर्वत्र अस्तित्वांत आहेत, त्यांच्याखेरीज आणखी तिसरेंच कांहीतरी उगाच त्यांच्या पाठीशीं कल्पूं नका. तुम्हांला आढळून येईल की, हेंच बौद्धांचें मत आधुनिक काळांतील कित्येक विचारसंप्रदायांनी आणि पंथांनी दत्तक घेतलें आहे, आणि सगळेचजण तें आपण स्वत: शोधून काढलेलें अगदी नवीन मत होय असा दावा करीत आहेत. अधिकांश बौद्ध तत्त्वज्ञानांचें थोडक्यांत म्हणणें हेंच आहे की, हें दृश्यमान जगत् स्वत:च अगदी पुरेसें आहे, तें स्वत:सिद्ध आहे, त्याचें स्पष्टीकरण त्याच्याच मदतीने होऊं शकतें, त्यासाठी त्याच्या पाठीशीं काय आहे हें हुडकत बसण्याची कांहीहि जरूरी नाही; हें इंद्रियग्राह्य जगतच सारेंकांही आहे, त्याव्यतिरिक्त आणखी कांहीसुद्धा नाही,--मग आणखी एखाद्या वस्तूची त्याचा आधार म्हणून कल्पना करण्याचें वस्तुत: प्रयोजनच काय ? प्रत्येक गोष्ट म्हणजे केवळ गुणांचा समुच्चय वा गुणांची समष्टिच होय; मग, ज्याला हे गुण चिकटलेले राहतील, ज्यांत ह्या गुणांचा समवाय होईल अशा एका आनुमानिक पदार्थाची कल्पना करण्याची काय आवश्यकता ? गुणसमूह वेगाने स्थानपरिवर्तन करीत आहेत, झपाट्याने जागा बदलत आहेत म्हणूनच एक सलग, अखंड पदार्थ असें आपल्याला ज्ञान होतें, त्या गुणांच्या पाठीमागे अपरिवर्तनशील वा न बदलणारें कांहीतरी खरोखरच आहे म्हणून नव्हे. ह्यांतील कित्येक मुद्दे किती अद्भुत आहेत हें आपण बघितलेंच, आणि मानवजातीच्या नित्याच्या, धोपट अनुभवाला ते अगदी सहज रुचतात नि पटतात. खरोखर, लाखांत एखादा तरी ह्या दृश्य जगताच्या पलीकडे --ह्या देखाव्याच्या पलीकडे कांही आहे ह्याची कल्पना करूं शकत असेल की नाही याची वानवा आहे. बहुसंख्य लोकांना प्रकृति वा जग म्हणजे केवळ बदलांचा समुच्चयच--सदा परिवर्तन, परिणाम, चक्रगति, संयोग नि संमिश्रण ! ह्या साऱ्यापलीकडील त्या शांत, प्रशांत सागराचें ओझरतेंहि दर्शन आपल्यापैकी फारच थोड्यांना कधी

काळीं लाभलें असेल तर असेल. आपल्याला नेहमी येथे लाटांचा पिंगाच दिसत असतो--हें जग आपल्याला केवळ हिंदोळत्या लाटांचा समुदायच दिसत असतें. सारांश, याप्रमाणे हीं दोन मतें असलेलीं आपल्याला आढळून येतात. पैकी एक मत असें की, शरीर आणि मन या उभयतांच्या पाठीमागे एक अपरिणामी, अपरिवर्तनशील, अचल अशी सत्ता विराजमान आहे; आणि दुसरें मत असें की, ह्या विश्वांत निश्चलत्व वा अपरिवर्तनत्व म्हणून कांहीच नाही,--सारेंच परिवर्तन, नुसतेंच परिवर्तन ! ---बदल, बदल, बदल--आणखी कांहीच नाही. ह्या दोन्ही मतांमधील या विरोधाचा परिहार कसा करावयाचा हें आपल्याला, यापुढील पायरी असें जें अद्वैततत्त्वज्ञान, तेंच नीट दाखवून देतें.

अद्वैततत्त्वज्ञान म्हणतें की, "ह्या साऱ्याच्या पाठीमागे कांहीतरी आहे, आणि तें ह्या साऱ्या बदलत्या वस्तूंचा आधार, ह्या साऱ्यांची पार्श्वभूमिच असून स्वत: मात्र मुळीच बदलत नाही, तें अपरिणामी आहे, अपरिवर्तनशील आहे" असें जें द्वैतवादी म्हणतात तें अगदी बरोबर आहे. कारण, अपरिवर्तनशील वा न बदलतें असें कांहीतरी असल्याखेरीज आपण परिवर्तनाची वा बदलाची कल्पनाच करूं शकणार नाही. एखादा पदार्थ बदलता आहे हें आपण, त्याच्यापरीस कमी बदलत्या अशा आणखी एखाद्या वस्तूशीं त्याची तुलना करूनच ठरवूं शकूं. परत, हा आपला कमी बदलता पदार्थदेखील, त्याच्यापेक्षाहि कमी बदलत्या अशा आणखी एखाद्या पदार्थाच्या तुलनेने अधिक बदलताच भासूं लागेल. अशा रीतीने पुढे जातां जातां आपल्याला कुठेतरी थांबून अखेर असें मान्य करणें भागच पडेल की, जींत कधीहि कोणताहि आणि कसलाहि बदल होत नाही अशी एक सत्ता अस्तित्वांत आहेच आहे. जोंपर्यंत आपण ही अशी कदापि-न-बदलती सत्ता मानीत नाही तोंपर्यंत कमी प्रमाणांत बदलणाऱ्या वस्तूंची ही चढती भांजणी अशीच चालू राहील. हा समस्त व्यक्त जगत्प्रपंच केव्हातरी अशा एका अवस्थेंत खात्रीने असला पाहिजे की जेव्हा सारेंकांही अव्यक्त होतें, स्थिर होतें, शांत होतें; त्या अव्यक्तावस्थेंत समस्त विरोधी शक्ति समतोल स्थितींत होत्या, म्हणजेच त्या वेळीं कोणतीच शक्ति

कार्य करीत नव्हती; कारण, समतोल अवस्था वा साम्यावस्था बिघडून वैषम्य निर्माण झाल्याखेरीज शक्ति कार्य करूं शकत नाहीत, त्यांचा विकासच होऊं शकत नाही. हें समस्त विश्वब्रह्माण्ड तीच साम्यावस्था फिरून गाठण्यासाठी सारखें वेगाने चाललें आहे. आपल्याला जर कांही अगदी ठामपणें माहीत असेल तर तें म्हणजे फक्त एवढेंच. हें अगदी ठाम, निश्चित सत्य आहे. अपरिवर्तनशील, अपरिणामी, कदापि न बदलतें कांहीतरी आहे असें जें द्वैतवादी म्हणतात तें अगदी बरोबर आहे; पण तें 'कांहीतरी' हें शरीर-मनाला आधारभूत असूनहि त्या शरीर-मनापासून संपूर्ण पृथक् आहे, शरीर-मनाच्या पलीकडे आहे हें जें द्वैतवाद्यांचें विश्लेषण आहे तें मात्र चुकीचें आहे. तद्वतच, हा समस्त जगत्प्रपंच म्हणजे बदलांचा वा परिवर्तनांचा एक प्रवाहच आहे. असें जें बौद्ध म्हणतात तेंहि अगदी खरें आहे. कारण, जोंवर मी ह्या जगापासून पृथक् आहें, जोंवर मी माझ्यापासून वेगळें असें कांहीतरी पाहत असतों, थोडक्यांत म्हणजे जोंवर पाहणारा आणि पाहिलें जाणारें, द्रष्टा आणि दृश्य अशा दोन गोष्टी राहतील, द्वैतभाव राहील, तोंवर बदलणें हेंच ह्या विश्वाचें स्वरूप आहे, तें बदलांचेंच बनलेलें आहे, तें सदा सारखें बदलत आहे असेंच मला भासत राहणार. परंतु खरी वस्तुस्थिति अशी आहे की, हें विश्व बदलतेंहि आहे आणि न-बदलतेंहि आहे. आत्मा, मन आणि शरीर ह्या तीन पृथक्, वेगवेगळ्या सत्ता आहेत असें मुळीच नाही, तीं तिन्हीं खरोखर एकच होत. ती एकच सत्ता कधी शरीराच्या, कधी मनाच्या, तर कधी त्या दोहोंपलीकडील वस्तूच्या वा आत्म्याच्या रूपाने प्रतीत होत असते. जो शरीराकडे बघतो तो मनालादेखील बघूं शकत नाही, जो मनाला बघतो तो आत्मा बघूं शकत नाही, आणि जो आत्मा बघतो त्याच्यापक्षीं शरीर आणि मन दोन्हीं कुठे अंतर्धान पावतात ! जो केवळ गतिच पाहतो त्याला तो निरपेक्ष शांत, स्थिर भाव कधीच दिसूं शकत नाही, आणि ज्याला तो संपूर्ण शांत, स्थिर भाव दिसतो त्याच्यापक्षीं गति कुठे 'गायब' होऊन जाते ! रज्जूला चुकीने, भ्रमाने सर्प समजलें जातें. जी व्यक्ति त्या दोरीला साप समजते तिच्यापक्षीं दोरी अदृश्य होऊन जाते, आणि ज्या वेळीं तो भ्रम दूर होऊन तिला ती रज्जूच दिसूं लागते त्या

वेळीं मग तिच्यापक्षीं सर्प तिरोधान पावतो.

एकंदरींत आपल्याला आढळून आलें की, केवळ एकच सर्वंकष सत्ता आहे आणि तीच नाना रूपांनी प्रत्ययास येत असते. तिला आत्मा म्हणा, की मूल वस्तु म्हणा, की आणखी कांही म्हणा, ह्या विश्वभर एकमेव तिचेंच अस्तित्व आहे. अद्वैतवादाच्या भाषेंत हा आत्मा, वा ही वस्तु म्हणजेच ब्रह्म; तें एकमेवाद्वितीय ब्रह्मच नाम आणि रूप यांच्यामुळे बहु वा अनेक भासत असतें. समुद्रावरील लाटांकडे बघा. त्यांतील एकहि लाट त्या समुद्रापासून खरोखर पृथक् नाही. मग ती कशामुळे बरें पृथक् भासतें ? नाम आणि रूप यांच्यामुळे; त्या लाटेचा तो विशिष्ट 'आकार' आणि आपण त्या आकाराला दिलेलें लाट हें 'नांव' ह्या दोहोंमुळेच ती समुद्रापासून पृथक् वा वेगळी भासत असते. तिचें तें रूप आणि तें नांव निघून गेल्याबरोबर, होता तसाच समुद्र शिल्लक राहतो. लाट आणि समुद्र यांमधे कुणीहि खरोखर फरक करूं शकेल काय ? तद्वतच, हें समस्त विश्व तीच एकमेव, एकसंध, एकरस, अखंड सत्ता आहे; नाम आणि रूप यांनीच ही सारी विविधता नि विभिन्नता निर्माण केली आहे. सूर्य ज्या वेळीं लक्षावधि जलबिंदूंवर प्रतिबिंबित होतो त्या वेळीं ज्याप्रमाणे प्रत्येक बिंदूंत सूर्याची एकेक पूर्ण प्रतिकृति उमटलेली दिसते, त्याचप्रमाणे ही विश्वांतील एकमेव सत्ता, हा एकमेवाद्वितीय आत्मा ह्या निरनिराळ्या नाम-रूपांच्या असंख्य बुडबुड्यांवर प्रतिबिंबित होऊन निरनिराळा भासत असतो. परंतु वस्तुतः तो आहे एकच—एकमेवाद्वितीयच. 'मी' किंवा 'तुम्ही' म्हणून कांहीच नाही, सारें एकच आहे—तो एकच विद्यमान आहे. एकतर म्हणा की 'सारेंच मी', नाहीतर म्हणा— 'सारेंच तूं'. ही दोहोंची भावना, हा द्वैतबोध संपूर्णपणें मिथ्या आहे, आणि आपण ज्याला साधारणपणें जग म्हणतों तें ह्या मिथ्या ज्ञानाचें— ह्या द्वैतबोधाचेंच फळ होय. विवेकाचा उदय होऊन ज्या वेळीं माणसाला आढळून येतें की दोन वस्तु वा द्वैत नाहीच, एकच वा अद्वैतच आहे, त्या वेळीं त्याच्या प्रत्ययास येतें की, तो स्वतःच हें समस्त विश्वब्रह्माण्ड झालेला आहे. त्याला अनुभव येऊं लागतो की—'अस्तित्वांत असल्यासारखें वाटणारें हें सदा बदलतें विश्व मीच

आहें. परत, ह्या सर्व बदलांच्या, ह्या समस्त गुणांच्या पलीकडे असलेली ती नित्य पूर्ण, नित्य मुक्त, नित्य आनंदस्वरूप सत्ताहि मीच आहें.'

सारांश, नित्य शुद्ध, नित्य पूर्ण, नित्य मुक्त, अपरिणामी, अपरिवर्तनीय असा एकमेव आत्माच काय तो अस्तित्वांत आहे; तो कधीच बदलत नाही, कधीच बदलला नाही, आणि ह्या विश्वांतील हे नानाप्रकारचे सगळेच्या सगळे बदल त्या एकमेवाद्वितीय आत्म्यावर केवळ भासत आहेत.

त्या आत्मसत्तेवर नाना उपाधींनी--ह्या नामांनी आणि रूपांनी हीं सारीं स्वप्नदृश्यें चितारलीं आहेत. 'आकारा'मुळेच लाट ही समुद्रापासून वेगळी होत असते. समजा की ती लाट विरून गेली;--मग तिथे कांही आकार उरेल काय ? नाही, तोसुद्धा अंतर्धान पावेल. लाटेचें अस्तित्व संपूर्णपणें समुद्राच्या अस्तित्वावर अवलंबून असतें, परंतु समुद्राचें अस्तित्व मात्र लाटेच्या अस्तित्वावर मुळीच अवलंबून नसतें. जोंवर लाट असते तोंवरच तिथे आकार वा रूप असतें, परंतु लाट विरतांच तें देखील नाहीसें होऊन जातें---लाटेविना आकार वा रूप राहूंच शकत नाही. हें नाम आणि रूप हीं मायेंतून निर्माण झालीं आहेत-- नाम आणि रूप म्हणजेच माया. ही मायाच व्यक्तींची निर्मिति करून, एकीला दुसरीहून वेगळी भासवीत असते. परंतु ह्या मायेला स्वतःला मात्र अस्तित्व नाही. माया 'आहे'--तिला 'अस्तित्व' आहे असें म्हणतां येत नाही. 'रूपा'ला वा आकाराला अस्तित्व आहे असें म्हणतां येणार नाही, कारण तें रूप वा तो आकार दुसऱ्या गोष्टीच्या अस्तित्वावर अवलंबून असतो. परत, त्याला अस्तित्व नाही असेंहि म्हणतां येत नाही, कारण त्यामुळेच हा सारा भेद वा वेगळालेपणा उद्भवत असतो. एवंच, अद्वैततत्त्वज्ञानाच्या मतें ही माया, वा हें अज्ञान, वा नाम-रूप, वा युरोपांत ज्यांना 'देश-काल-निमित्त' म्हणण्यांत येतें तींच ह्या एका अनंत सत्तेंतून विश्वाचा हा अनेकत्वाचा पसारा दाखवीत आहेत; परंतु वस्तुतः, परमार्थतः हें विश्व अभिन्न आहे, एक आहे. द्वैत खरोखरच खरें आहे असें जोंवर कुणाला वाटत राहील तोंवर तो भ्रमांत आहे असें समजावें. द्वैत ही

भ्रांति आहे. जेव्हा त्याला अद्वैताची जाणीव होईल, केवळ एकमेव सत्ताच काय ती अस्तित्वांत आहे असें ज्ञान होईल तेव्हाच त्याचा भ्रम दूर होऊन त्याला खरेंखरें ज्ञान झालें, तेव्हाच त्याने खरोखर 'जाणलें' असें म्हणतां येईल. जसजसे दिवस लोटत आहेत तसतसें हें सत्य सिद्ध होत आहे---जडजगतांत म्हणा, मनोजगतांत म्हणा, की अध्यात्म-जगतांत म्हणा, सर्वत्र हेंच सत्य सिद्ध होत आहे. आज हें अगदी सप्रयोग सिद्ध होत आहे की, तुम्ही, मी, चंद्र, सूर्य, तारे वगैरे आपण सारे केवळ त्या एकाच जडद्रव्याच्या समुद्रांतील एकेका अंशाचीं नांवें आहोंत, आणि ह्या जडद्रव्याचीं हीं बाह्य रूपें सारखीं बदलत आहेत. जो शक्तिकण कांही महिन्यांपूर्वी सूर्यांत होता तो आज कदाचित् मनुष्यामधे आला असेल, उद्या कदाचित् तो पशूमधे प्रवेश करील आणि परवा कुण्या वनस्पतींत शिरेल. तो सारखा येणें-जाणें करीत आहे--येत आहे नि जात आहे. हा सारा एक अखंड, अनंत जड-विस्तार आहे---केवळ नामांनी आणि रूपांनी त्याला विभिन्नता आली आहे. त्यांतील एका बिंदूचें नांव आहे सूर्य, एकाचें नांव आहे चंद्र, एकाचें आहे तारा, एकाचें मनुष्य, एकाचें पशु, एकाचें वनस्पति, वगैरे वगैरे. आणि हीं सगळीं नामें भ्रमात्मक आहेत, त्यांना कांहीच सत्यत्व नाही, कारण हें सारें म्हणजे जडद्रव्याचा एक सदा बदलता---सारखा परिणाम पावणारा ढीग आहे. आणखी एका दृष्टीने बघितल्यास हेंच जग विचारसमुद्रासारखें दिसेल; त्यांतील एकेक बिंदु जे आपण, ते म्हणजे एकेक मन आहोंत; तुम्ही सगळेजण एकेक मन आहांत, मी एक मन आहें, प्रत्येकजणच एकेक मन आहे. आणि, हेंच जग ज्ञान-दृष्टीने बघितल्यास---म्हणजेच ज्ञानांजनाने दृष्टींतील अज्ञानजन्य मोह नि भ्रम दूर झालेला असल्यास, मन शुद्ध झालेलें असल्यास हेंच जग तो नित्यशुद्ध, अपरिणामी, अपरिवर्तनशील, अमर, अखंड, एकमेवा-द्वितीय सच्चिदानंदघन पुरुषच असल्याचें प्रत्ययास येईल.

पण मग द्वैतवाद्यांच्या त्या तीन प्रकारच्या मरणोत्तर-जीवनां-विषयीच्या मताचें काय ?-- माणूस मेल्यानंतर स्वर्गांत जातो, किंवा अमुक अमुक लोकांत जातो, दुष्ट माणसें भूत होतात, पुढे पशु होतात वगैरे जे द्वैतवाद्यांचे मरणोत्तर-जीवनविषयक तीन सिद्धान्त आहेत

त्यांचें काय ? त्यासंबंधी अद्वैतवादी म्हणतात की, कुणी येतहि नाही आणि कुणी जातहि नाही. तुमच्या बाबतींत येणें-जाणें कसें शक्य आहे ? तुम्ही अनंत आहांत, तुम्हीं जावें अशी जागा आहे तरी कुठे ? एका शाळेंत एकदा कांही लहान मुलामुलींची परीक्षा घेणें चाललें होतें. परीक्षक असमंजसासारखा त्या लहानलहान मुलामुलींना तऱ्हेतऱ्हेचे अवघड अवघड प्रश्न विचारीत होता. त्यांत त्याने त्यांना पुढील एक प्रश्न विचारला-- "पृथ्वी पडत कां नाही ?" मुलांकडून गुरुत्वाकर्षणासंबंधी वा तसल्याच एखाद्या किचकट शास्त्रीय सिद्धान्तासंबंधी उत्तर काढून घेण्याचा महाशयांचा इरादा होता. त्या मुलांपैकी बहुतेकांना तर तो प्रश्न मुळी कळूंदेखील शकला नाही, आणि म्हणून साहजिकच त्यांनी नानाप्रकारचीं चुकीचीं उत्तरें दिलीं. परंतु त्यांच्यांत एक हुषार पोरगी होती, तिने त्या परीक्षकालाच एक उलट प्रश्न विचारून त्याच्या त्या प्रश्नाचें उत्तर दिलें ! तिने त्या परीक्षकाला विचारलें-- "तें मग सांगतें. पण ही पृथ्वी जी पडणार म्हणतां, ती कुठे पडायची ?" उघडच आहे की त्या परीक्षकाचा तो प्रश्नच मुळी वेडगळपणाचा होता. ह्या ब्रह्माण्डाच्या दृष्टीने वर किंवा खाली म्हणून कांहीच नाही, वर-खाली ही केवळ सापेक्ष कल्पना आहे. आत्म्यासंबंधीहि असेंच; त्याच्या बाबतींत जन्म-मृत्यूसंबंधीचा प्रश्नच मुळी अगदी वेडगळपणाचा आहे. कोण जातो नि कोण येतो ? तुम्ही नाही कुठे ? ज्यांत तुम्ही आधीचेच नाही असा स्वर्ग कुठे आहे ? मानवाचा आत्मा सर्वव्यापी आहे. तो जाणार कुठे ? तो जाणार नाही कुठे ? तो सर्वत्रच आहे. म्हणून, पूर्णत्व पावलेल्या जीवन्मुक्ताच्या दृष्टीसमोरून जन्म-मृत्यूचीं, स्वर्ग-नरकाचीं हीं सारीं पोरकट स्वप्नें नि क्षुद्र भ्रम तात्काळ पार लोपून जातात. ज्यांच्यांत थोडेंफार अज्ञान शिल्लक असतें त्यांना ब्रह्मलोकापर्यंतचे देखावे दाखवून मग हें सारें त्यांच्या दृष्टीसमोरून अदृश्य होतें. अज्ञान्यांच्या पक्षीं मात्र तें सारें तसेंच चालूं राहतें.

पण मग, स्वर्गांत जाणें, जन्मणें, मरणें वगैरे गोष्टी जगांतील सगळ्यांनाच खऱ्या वाटतात, सगळ्यांचाच त्यांवर विश्वास असतो हें कसें ? अशी कल्पना करा की, मी एक पुस्तक वाचीत आहें. पाना-

मागून पान वाचलें जात आहे नि उलटविलें जात आहे. आणखी एक पान आलें, वाचून तेंहि पलटविलें गेलें. ह्यांत बदल कुणांत होतो आहे ? कोण येत आहे नि जात आहे ? मी नव्हे, तें पुस्तक— त्याचीं पानें. तद्वतच, ही समस्त प्रकृति म्हणजे आत्म्यासमोरील एक पुस्तक आहे; त्याचें प्रकरणामागून प्रकरण वाचलें जात आहे नि उलटविलें जात आहे— प्रत्येकदा नवीन दृश्य समोर येत आहे. तेंहि वाचलें जातें नि उलटविलें जातें. फिरून नवा अध्याय, नवा देखावा उलगडतो; परंतु आत्मा मात्र जशाचा तसाच असतो— अपरिवर्तित, नित्य. परिवर्तन पावत आहे, बदलत आहे— प्रकृति, मानवाचा आत्मा नव्हे. तो कधीच बदलत नाही, कधीच परिणाम पावत नाही. जन्म आणि मृत्यु हे प्रकृतींत आहेत, तुमच्यांत नाहीत— ते प्रकृतिधर्म होत, आत्म-धर्म नव्हत. तथापि अज्ञ लोक भ्रांतींत असतात; भ्रमाने आपण समजतों की पृथ्वी फिरत नसून सूर्यच फिरत आहे, अगदी त्याचप्रमाणे अज्ञानजन्य भ्रांतीमुळे आपण समजत असतों की आपण जन्मलों आहोंत, आपण मरणार आहोंत— प्रकृति नव्हे. म्हणून हे सगळे आपले भ्रम होत. आगगाडी धावत नसून भोवतीचीं शेतेंच धावत आहेत असें समजणें ज्याप्रमाणे आपला भ्रम होय, अगदी त्याचप्रकारें जन्म आणि मृत्यु हे देखील आपले भ्रमच होत. ज्या वेळीं माणूस मनाच्या एका विशिष्ट दशेंत असतो, त्याची एक विशिष्ट मनोभूमिका असते, एक विशिष्ट मनोवृत्ति वा मनोभाव असतो त्या वेळीं हेंच त्याला पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारा प्रभृति रूपांनी दिसत असते; आणि जे जे त्याच मनः-स्थितींत, मनाच्या त्याच अवस्थेंत असतात त्यांनाहि अगदी तसेंच दिसतें तुमच्या आणि माझ्यामधे असे लक्षावधि जीवात्मे असणे शक्य आहे की जे आपल्याहून भिन्न अवस्थांत आहेत— अस्तित्वाच्या अगदी निराळ्याच स्तरांवर आहेत— अजीबात वेगळ्याच योनींत आहेत. ते आपल्याला कधीच पाहूं शकणार नाहीत, आणि आपणहि त्यांना कधी पाहूं शकणार नाहीं. आमच्या चित्तवृत्तीसारखीच ज्यांची चित्तवृत्ति आहे आणि जे अस्तित्वाच्या आमच्याच स्तरावर आहेत, सदृश कोटींतील आहेत, अशांनाच फक्त आपण पाहूं शकतों. एकाच स्वरांत चढवून ठेवलेल्या वाद्यांमधील एक छेडतांच इतरहि झंकृत

होतात. आम्हां साऱ्यांचीं मनें सध्या ज्या 'स्वरांत चढविलेलीं' आहेत त्या 'स्वरा'ला आपण 'मानव-स्वर' असें नांव देऊं शकूं. आता, आमच्या स्वरांचा हा 'मानव-स्वर' बदलून जर दुसऱ्या एखाद्या 'स्वरांत' तीं 'लावलीं' गेलीं तर मग इथे माणसें दिसावयाचीं नाहीत; अवघेच्या अवघें 'मानव-विश्व' अंतर्धान पावेल, आणि त्याऐवजी आपल्याला दुसरेंच दृश्य दिसूं लागेल-- कदाचित् देव आणि देव-विश्व हीं दिसूं लागतील, किंवा दुष्ट लोकांना दानव आणि दानव-विश्व दिसूं लागेल. परंतु, हीं सारीं आहेत मात्र एकाच विश्वाचीं केवळ भिन्नभिन्न दर्शनें. हेंच विश्व 'मानव' दृष्टिकोनांतून वा 'मानव' पातळीवरून बघितल्यास पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारे इत्यादि वस्तूंच्या स्वरूपांत दिसतें. हेंच विश्व 'दानव' दृष्टिकोनांतून वा 'दानव' पातळीवरून बघितल्यास शिक्षा भोगण्याचें ठिकाण वा 'नरक' दिसूं लागेल. आणि ज्यांना स्वर्गाची वांच्छा आहे त्यांना हेंच विश्व स्वर्गाच्या रूपांत दिसूं लागेल. स्वर्गाच्या सिंहासनावर बसलेल्या ईश्वरानिकट जाऊन सारी हयात त्याची स्तव-स्तुति करीत घालवूं अशींच स्वप्नें ज्यांनी उभ्या आयुष्यभर पाहिलीं आहेत, त्या लोकांना मेल्यानंतर त्यांच्या मनांत घोळत असलेलीं हीं दृश्येंच दिसतील. हेंच विश्व त्यांच्यापक्षीं एका विशाल स्वर्गांत परिणत होऊन जाईल; त्यांच्या दृष्टीला दिसेल की एका सिंहासनावर ईश्वर उपविष्ट आहे, आणि पंख असलेले यक्ष-किन्नर नि अप्सरा इतस्तत: स्वच्छंद विचरण करीत आहेत. हे सारे स्वर्ग म्हणजे माणसाची स्वत:चीच करणी आहेत-- ते माणसानेच रचले आहेत. म्हणून, अद्वैतवादी म्हणतो की, द्वैतवादी जें म्हणतात तें खरें आहे, पण हें सारें केवळ त्यानेच निर्मिलें आहे, सारें त्यानेच उभारलें आहे. हे स्वर्गादि विभिन्न लोक, हे देव आणि दानव, हे जन्म नि पुनर्जन्म--ह्या साऱ्याच दंतकथा आहेत, साऱ्याच भाकडकथा आहेत, साऱ्याच 'पुराणांतल्या गप्पा' आहेत. आणि-- हें मानवजीवन पण तेंच आहे-- तसलेंच आहे. ह्या साऱ्या म्हणजे पौराणिक कथा, आणि मानवजीवन काय तें तेवढें सत्य, हें शक्य नाही. लोक सदाच करीत असलेली फार मोठी चूक हीच की, आपलें हें मानवी जीवनच काय तें सत्य असें ते समजत असतात. स्वर्ग, नरक, देव, दानव, पुनर्जन्म

वगैरे गोष्टींना रूपककथा, पौराणिक कथा किंवा भाकडकथा म्हटलें तर तें त्यांना छान समजूं शकतें, रुचूं शकतें, पटूं शकतें, पचूंहि शकतें; पण आपलें स्वतःचें जीवनहि तसेंच आहे हें मात्र ते कांही केल्या मानूं इच्छीत नाहीत. हें जें कांही भासतें आहे, तें त्या स्वरूपांत सारेच्या सारें भाकडकथा आहे, 'पुराणांतील गप्पा' आहे, दंतकथा आहे; आणि सर्वांत खोटी गोष्ट म्हणजे आपण देह आहोंत ही धारणा,— आपण देह कधीच नव्हतों, कधीच असूं शकणार नाहीं. आपण केवळ मनुष्य आहोंत असें म्हणणें ही अगदी सगळ्यांत खोटी गोष्ट आहे, आपण ह्या विश्वाचे ईश्वर आहोंत— परब्रह्म आहोंत. ईश्वराची उपासना-अर्चना करण्यांत आपण सदा स्वतःच्या अव्यक्त आत्म्याचीच आराधना करीत आलों आहोंत. आपण जन्मतःच पापी नि दुष्ट आहोंत असें समजण्या-इतकी आणखी दुसरी कोणतीहि आत्मप्रतारणा नसेल— तें स्वतःशींच भयंकर खोटें बोलणें होय, स्वतःलाच ठकविणें होय. ज्याला दुसरे लोक पापी दिसत असतात तोच केवळ पापी होय, तोच एकमेव पापी होय. कल्पना करा की, येथे एक लहानगें मूल आहे आणि समोरच्या टेबलावर तुम्ही मोहरांनी भरलेली एक थैली ठेवलेली आहे. समजा की एक चोर आला नि ती मोहरांची थैली घेऊन गेला. त्या बालकाच्या दृष्टीने ती थैली तिथेच जागेवर असणें काय किंवा याप्रमाणे चोरली जाणें काय दोन्हीं सारखेंच; त्याच्या 'आंत' चोर नाही, सबब त्याला बाहेरहि चोर दिसत नाही. पापी नि अधम लोकांनाच बाहेर नीचपणा दिसतो, भल्या माणसांना नाही. म्हणूनच, अधम इसमांना हें जग नरक भासतें, मध्यम लोकांना तें स्वर्ग वाटतें, तर उत्तम वा पूर्ण, सिद्ध पुरुषांना तें साक्षात् भगवत्स्वरूप दिसतें. असें झालें म्हणजेच दृष्टीसमोरचा पडदा दूर होतो आणि पवित्र व शुद्ध झालेल्या त्या महाभाग्यवंताच्या प्रत्ययास येतें की आता त्याची दृष्टि, त्याचा दृष्टिकोनच आमूलाग्र बदलून गेला आहे. मग लक्षावधि, कोटयवधि वर्षें त्याला छळणारीं सारीं दुःस्वप्नें पार लोपून जातात; आणि इतके दिवस जो स्वतःला मनुष्य, देव किंवा दानव समजत होता, इतके दिवस जो स्वतःला श्रेष्ठ लोकांत, हीन लोकांत, पृथ्वीवर, स्वर्गामधे वा इतर कुठे वसणारा मानत होता त्याला आढळून येतें

की तो खरोखर सर्वव्यापी आहे, सर्वत्रच आहे. त्याला आढळून येतें की तो काळाच्या अधीन नाही, काळ त्याच्या अधीन आहे; सगळेच्या सगळे स्वर्ग त्याच्यांतच वसत आहेत, तो कोणत्याहि स्वर्गाचा रहिवासी नाही; आणि, मानवाने जेव्हा कधी, जिथे कुठे नि ज्या कुण्या देवांची पूजा केली असेल ते सारे त्याच्या स्वतःच्या आंतच अवस्थित आहेत, तो त्यांतील कुणाहि देवांत अवस्थित नाही. त्याला आढळून येतें की तोच देव आणि दानव, मानव आणि वनस्पति, पशु नि प्रस्तर ह्या साऱ्यांचा निर्माता आहे. आणि मानवाचें सत्य स्वरूप आता त्याला स्पष्ट दिसूं लागतें; त्याला दिसूं लागतें की मानवाचें तें स्व-रूप, तो आत्मा स्वर्गाहून श्रेष्ठ आहे, ह्या आपल्या विश्वब्रह्माण्डाहून परिपूर्ण आहे, अनंत कालापेक्षाहि अधिक अनंत आहे, खऱ्या अर्थानें अनंत आहे, आकाशापेक्षाहि जास्त सर्वव्यापक आहे. असें झाल्यानेच माणूस निर्भय होतो, निर्मुक्त होऊन जातो. मग सारे भ्रम विरतात, सारीं दुःखें सरतात, सारीं भयें कायमचीं निमतात. मग जन्मणें थांबतें, आणि त्याबरोबरच मरणेंहि; दुःखें लोपतात, आणि त्यांबरोबरच हीं क्षुद्र सुखेंहि; पृथ्वी अंतर्धान पावते, आणि तिच्याबरोबरच स्वर्गहि; शरीर विलीन होतें, आणि त्याबरोबरच मनदेखील. त्या व्यक्तीच्या दृष्टीने हा विश्वाचा सारा फापटपसाराच जणु 'गायब' होऊन जातो. ही शक्तींची उचंबळ-सळसळ, त्यांचा हा सतत संग्राम नि संघर्ष कायमचा थांबतो. आणि, जें शक्तीच्या नि जडाच्या रूपांनी व्यक्त होत होतें, जें प्रकृतीच्या धडपडींच्या रूपांनी--नव्हे, स्वयं प्रकृतीच्याच रूपाने व्यक्त होत होतें, जें स्वर्ग-मर्त्य, पशु-वनस्पति, मानव-देव प्रभृतींच्या रूपांनी व्यक्त होत होतें, तें सारें--तीं सारीं रूपें एका अनंत, अखंड अविभाज्य, अपरिणामी, अपरिवर्तनशील सत्तेंत रूपान्तरित होऊन जातात. आणि त्या ज्ञानी पुरुषाला आढळून येतें की तो त्या सत्तेशीं एक आहे, अभिन्न आहे. "ज्याप्रमाणे नाना रंगांचे मेघ आकाशांत येतात, थोडा वेळ तरळतात आणि मग नाहीसे होतात," त्याचप्रमाणे ह्या आत्म्यासमोर स्वर्ग नि मर्त्य, मानव नि देवता, सुखें नि दुःखें इत्यादींचे देखावे येत असतात खरे; परंतु ते निघून जातात आणि ते एकमेव, अनंत, नील, अपरिवर्तनशील आकाश जसेंच्या तसेंच मागे राहतें. आकाश कधीच

बदलत नसतें; बदलत असतात--मेघ. आकाश बदललें असें वाटणें ही चूक आहे, तो भ्रम आहे. तद्वतच, आपण अपवित्र आहोंत, आपण सान्त आहोंत, आपण जगाहून पृथक् आहोंत असें वाटणें ही चूक आहे, तो आमचा भ्रम आहे. खरा मनुष्य हा तीच एकमेवाद्वितीय, एकरस, अखंड सत्ता होय.

येथे दोन प्रश्न उपस्थित होतात. पैकी पहिला हा की, "ह्याची --ह्या अद्वैतबोधाची प्रत्यक्ष उपलब्धि होणें शक्य आहे काय ? आता-पर्यंत आपण धर्मतत्त्वाची, तत्त्वज्ञानाची चर्चा केली; तें सारें ठीकच आहे, परंतु ह्या अद्वैततत्त्वाची प्रत्यक्ष अनुभूति येणें शक्य आहे काय?" होय, आहे, अगदी पूर्णपणें शक्य आहे. ज्यांचा हा अज्ञानजन्य भेद-भ्रम कायमचा नाहीसा झाला आहे अशीं पुरुषरत्नें ह्या जगाच्या वाळवंटांत आहेत--आजहि आहेत, अशीं माणसें आजहि जिवंत आहेत. ही असली अनुभूति लाभल्यानंतर, सत्याचा असा साक्षात्कार झाल्यानंतर ते लगेच मरून जातात काय ? नाही, आपण समजतों तितक्या तडाकाफडकी ते मरून जात नाहीत. एका लाकडी आंसाने जोडलेली दोन चाकें बरोबर धावत आहेत. मी जर त्यांतील एक धरून, त्यांना जोडणारा आंस कुऱ्हाडीने तोडून टाकीन तर, जें चाक मीं धरलें आहे तें तिथेच थांबेल; परंतु, पूर्वीच्या गतीमुळे तें दुसरें चाक मात्र थोडा वेळ तसेंच धावत राहील नि मग खाली पडून जाईल. हा नित्य शुद्ध, नित्य मुक्त आत्मा म्हणजे जणु एक चाक असून, हें भ्रामक शरीर नि मन जणु दुसरें चाक आहे, आणि तीं दोन चाकें कर्माच्या आंसाने एकमेकांशीं जोडलेलीं आहेत. ज्ञान ही कुऱ्हाड असून, तीच त्या दोन चाकांना जोडणारा आंस--त्या दोहोंतील संयोगदंड--तोडून टाकीत असते. आणि मग तें आत्मारूपी एक चाक धावण्याचें थांबतें--म्हणजेच, आपण येत आहोंत नि जात आहोंत, जन्मत आहोंत नि मरत आहोंत असें त्याला वाटण्याचें थांबतें,--आपण प्रकृतिच असून आपल्याला अभाव नि वासना आहे असें त्याला वाट-ण्याचें थांबतें; आणि त्याला आढळून येतें की तो पूर्ण आहे, मुक्त आहे, वासनारहित आहे. परंतु, दुसऱ्या चाकाची--शरीर-मनाच्या चाकाची--आधीचीच गति, प्रारब्ध कर्मांची गति तशीच असते, तिचा

क्षय झालेला नसतो; आणि म्हणून तें शरीर नि मन हीं कांही काळ टिकतील--प्रारब्ध कर्मांचा वेग अजीबात क्षीण होत नाही, संपून जात नाही तोंवर टिकतील. तो वेग संपुष्टांत आल्यानंतर मग तीं पतन पावतील आणि आत्मा विदेहमुक्त होऊन जाईल. त्याला मग आणखी स्वर्गांत जावें लागणार नाही किंवा तेथून परतावें लागणार नाही; फार काय, पण मग त्याला ब्रह्मलोकांत किंवा तसल्याच एखाद्या सर्वश्रेष्ठ लोकांतदेखील जावें लागायचें नाही; कारण, तो कोठून येणार नि कोठे बरें जाणार ? ज्या व्यक्तीला ह्याच जीवनांत ही असली अवस्था लाभली आहे, क्षणभराकरता का होईना पण जिच्या समोरून जगाचा हा नित्याचा मामुली देखावा बदलून जिला त्या सत्याचें दर्शन घडलें आहे, अशा व्यक्तीला 'जीवन्मुक्त' म्हणतात. याप्रमाणे जिवंत असतांनाच मुक्त होणें, जीवन्मुक्त होणें हेंच वेदान्त्यांचें लक्ष्य होय.

एकदा मी पश्चिमभारतांतील एका वाळवंटाच्या प्रदेशांतून प्रवास करीत होतों. दिवसांमागून दिवस मी त्या वाळवंटांतून पायीं प्रवास करीत चाललों होतों, परंतु एका गोष्टीचा मला मोठा अचंबा वाटे, आणि ती गोष्ट ही की, सुंदर सुंदर तलाव रोज माझ्या दृष्टीस पडत, त्यांच्या कांठीं झाडें दिसत आणि त्या झाडांच्या उलटचा सावल्या त्या तलावांच्या पाण्यावर थरथरतांना दिसत. मी स्वत:शींच म्हणत असे--'किती सुंदर दृश्य हें ! अन् लोक ह्या प्रदेशाला वाळवंट म्हणतात !' तीं अद्भुत सरोवरें आणि त्यांच्या कांठच्या त्या वृक्षलता रोज बघत मीं त्या प्रदेशांतून जवळजवळ महिनाभर प्रवास केला असेल. एक दिवस वाट चालतां चालतां मी खूप तान्हेला झालों आणि थोडें पाणी पिण्याची मला इच्छा झाली. म्हणून मी बाजूच्या एका सुंदर, स्वच्छ तलावाकडे जाऊं लागलों. तों काय ! मी पुढे जातांच तें तळें एकाएकी अदृश्य झालें ! ! आणि अस्मादिकांच्या डोक्यांत लख्खन् प्रकाश पडला--'लहानपणापासून ज्याच्याविषयी पुस्तकांत वाचीत आलों आहें तें हेंच--मृगजळ ! ! !' आणि त्याबरोबरच हेंहि ज्ञान झालें की, ह्या साऱ्या महिन्याभर मी दररोज मृगजळ पाहत होतों, पण मला माहीत नव्हतें की तें मृगजळ आहे. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीं फिरून चालायला सुरुवात केली. फिरून पूर्वींसारखेंच तळें दिसूं लागलें !

परंतु आता हेंहि ज्ञान खेळूं लागलें की तें मृगजळ आहे, तें कांही खरें-खुरें तळें नाही. आपल्या ह्या जगाचेंहि असेंच आहे. आपण सारे ह्या संसाराच्या वाळवंटांत दिवसांमागून दिवस, महिन्यांमागून महिने, वर्षांमागून वर्षे भ्रमण करीत आहोंत, पण आपल्याला ठाऊक नसतें की हें मृगजळ आहे. एक दिवस तें विरून जाईल, अदृश्य होऊन जाईल, पण तें फिरून दिसूं लागेल; देह प्रारब्धकर्मांच्या अधीन राहणार, आणि म्हणून हें मृगजळहि परतणार. आपण जोंवर कर्माने बांधलों आहोंत, तोंवर हें जग फिरून आपल्या समोर येईल, फिरून आपल्याला दिसूं लागेल; स्त्री-पुरुप, पशुपक्षी, झाडेंझुडपें, आपली आसक्ति, आपलीं कर्तव्यें—सारेंकांही फिरून दिसूं लागेल, पण त्या पूर्वीच्या शक्तीने नव्हे,—विंचवाची नांगी आता सपशेल मोडून गेलेली असेल. ह्या नव्या ज्ञानाच्या प्रभावाने कर्माची शक्ति खंडित होऊन जाईल, नष्ट होऊन जाईल, कर्माचा 'विषाचा दांत' पडून जाईल. आपल्या दृष्टीने मग साऱ्या जगाचें रूपच पालटून जाईल, तें आपल्याला अगदी निराळयाच स्वरूपांत दिसूं लागेल; कारण, मग आपल्याला जसें हें जग दिसत राहील, तसेंच तें खरोखर काय आहे हें ज्ञानहि आपल्याठायीं खेळत राहील,—मृगजळ आणि सत्य ह्यांच्यामधील फरकाचा आपल्याला मग कधीच विसर पडावयाचा नाही

त्या वेळीं हें जग मग आपल्यापक्षीं तें पूर्वीचें जग राहणार नाही. परंतु ह्या बाबतींत मला आपल्याला एक धोक्याची सूचना देऊन ठेवावीशी वाटते. ह्या वेदान्तसाधनेंत एक मोठा धोका आहे. प्रत्येक देशांत आपल्याला असे कित्येक लोक आढळतात की जे ह्या वेदान्ततत्त्वज्ञानाचें ग्रहण करतात आणि म्हणूं लागतात की, "मी धर्माधर्माच्या अतीत आहें, मी विधिनिषेधांच्या अतीत आहें; मी माझ्या इच्छेनुसार काय हवें तें करीन." ह्याच देशांत, अगदी आजच्या घटकेला तुम्हांला अनेक मूर्ख असें बडबडतांना ऐकूं येतील की, "मी बद्ध नाहीं, मी स्वयं ईश्वर आहें; मला जसें वाटेल तसें मी वागेन." आत्मा हा सर्वप्रकारच्या भौतिक, मानसिक वा नैतिक नियमांच्या पलीकडे असला तरी हा वरील प्रकार मात्र बरोबर नाही. नियमांच्या राज्यांत बंधन असतें, मुक्ति असते नियमांच्या पलीकडे. हेंदेखील

खरें आहे की, मुक्ति हा आत्म्याचा स्वभाव आहे, तो त्याचा स्वरूपसिद्ध हक्क आहे; आणि आत्म्याचा तो खरोखरचा मुक्तस्वभाव जडाच्या भौतिक आवरणांमधून माणसाच्या वरवरच्या स्वाधीनतेच्या रूपाने प्रकटत असतो. आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणीं आपल्याला वाटत असतें की आपण स्वाधीन आहोंत, स्व-तंत्र आहोंत. आपण स्वाधीन आहोंत, स्वतंत्र आहोंत ह्या भावनेशिवाय आपण एक क्षणभरहि जिवंत राहूं शकणार नाहीं, बोलूंचालूं शकणार नाहीं, श्वासोच्छ्वासदेखील करूं शकणार नाही; परंतु, त्याबरोबरच, थोडचाशा विचारान्तीं आपल्याला कळतें की आपण यंत्रासारखे आहोंत, आपण स्वाधीन नाहीं, स्व-तंत्र नाहीं. मग खरें कोणतें? 'मी स्वाधीन, मी स्व-तंत्र' ही आपली भावना म्हणजे आपला भ्रम आहे काय? एक पक्ष म्हणतो की, होय, ही आपली स्वाधीनपणाची वा स्व-तंत्रपणाची भावना आपला भ्रम आहे; दुसरा पक्ष म्हणतो की, नाही, आपण बांधलेलों आहोंत, बद्ध आहोंत हीच भावना भ्रम होय. पण ह्या दोन प्रकारच्या भावना आमच्याठायीं जन्मतातच कशामुळे? ह्याचें उत्तर असें की, माणूस हा खरोखर, स्व-रूपतः मुक्त आहे, 'खरा' मनुष्य हा मुक्तच आहे, तो दुसरें कांहीच असणें शक्य नाही. परंतु, तो जेव्हा मायेच्या राज्यांत उतरतो, नाम-रूपांच्या खोडचांत सापडतो तेव्हा मात्र तो बद्ध बनून जातो. 'स्वाधीन इच्छा' हा शब्दप्रयोगच मुळी चुकीचा आहे. इच्छा कधी स्वाधीन असूंच शकत नाही. ती स्वाधीन असणें कसें बरें शक्य आहे? 'खरा' माणूस, म्हणजेच आत्मा जेव्हा मायेच्या वा नाम-रूपाच्या बंधनांत सापडून बद्ध होतो तेव्हाच त्याची इच्छाशक्ति (will) अस्तित्वांत येते, त्यापूर्वी नाही. माणसाची इच्छाशक्ति ही बद्ध आहे, परंतु त्या इच्छाशक्तीचा जो पाया आहे तो मात्र नित्य मुक्तच आहे. आणि म्हणूनच, बंधनाच्या अवस्थेंतसुद्धा––मानवजीवनांत वा देवजीवनांत, स्वर्गीं वा मर्त्यीं कुठेहि आणि कशाहि स्थितींत असलों तरीसुद्धा––स्वतःच्या स्वभावसिद्ध मुक्तस्वरूपाची स्मृति आपल्याला राहूनच जाते. आणि जाणतां वा अजाणतां आपण सारेचजण स्वतःचें तें मुक्तस्वरूप गाठण्यासाठी, त्याच्या प्रत्ययासाठी सारखे धडपडत आहोंत. ज्या वेळीं माणूस स्वतःचें तें मुक्तस्वरूप

प्राप्त करून घेईल त्या वेळीं मग तो कोणत्याहि नियमाने कसा बरें बांधला जाऊं शकेल ? मग ह्या विश्वांतला कोणताहि नियम त्याला बांधूं शकणार नाही, कारण हें अखिल विश्वब्रह्माण्ड मग त्याचें स्वतःचेंच होऊन जातें. त्या वेळीं मग तो स्वतःच हें विश्वब्रह्माण्ड असतो· एकतर म्हणा की तोच हें समस्त विश्वब्रह्माण्ड आहे, आणि नाहीतर म्हणा की त्याच्या दृष्टीने हें विश्वब्रह्माण्ड मुळी नसतेंच. मग त्याच्या ठिकाणीं ह्या लिंग, देश वगैरेंसारख्या साऱ्या क्षुद्र कल्पना कशा बरें असूं शकतील ? मग तो असें कधीतरी म्हणेल का की, मी पुरुष आहें वा मी स्त्री आहें वा मी बालक आहें ? मग तो असें कसें बरें म्हणूं शकेल ? हें सारें खोटें---लटकें---मिथ्या---भ्रमात्मक नाही काय? त्याने जाणलें असतें की तें तसें आहे. मग, हे पुरुषाचे अधिकार आहेत, हे स्त्रीचे अधिकार आहेत असें तो कसें म्हणेल ? कुणालाच अधिकार नाहीत; कुणालाच वेगळें, पृथक्, स्वतंत्र अस्तित्व नाही. पुरुषहि नाही, स्त्रीहि नाही---आत्मा लिंगहीन आहे, नित्यशुद्ध आहे. मी पुरुष आहें अथवा मी स्त्री आहें असें म्हणणें, किंवा मीं ह्या देशाचा आहें अथवा त्या देशाचा आहें असें म्हणणें हें खोटें बोलणें आहे, तें मिथ्या आहे, लटकें आहे. हें सारें जगच माझा देश आहे, समस्त विश्वब्रह्माण्ड माझेंच आहे, कारण ह्या अखिल ब्रह्माण्डाला स्वतःचा देह करून त्याने मीं स्वतःला आच्छादून घेतलें आहे. सत्य हें असें असूनहि आपल्याला ह्या जगांत असे लोक आढळतातच की जे हीं सारीं तत्त्वें बडबडायलाहि तयार असतात आणि त्याबरोबरच घाणेरडीं कृत्येंहि करायला कचरत नसतात. आणि, "तुम्ही असें कां वागतां" असें जर आपण त्यांना विचारलें तर ते खुशाल असें सांगून मोकळे होतात की, "मी कांही वाईट करीत आहें असें जें तुम्हांला वाटतें तो तुमचा भ्रम आहे ! तो तुमचा गैरसमज आहे ! माझ्या हातून अनुचित कांही घडणें शक्यच नाही !" ह्या लोकांची पारख करण्याचा कांही निकष नाही काय ? ह्यांना जोखण्याची कांही कसोटी नाही काय ? आहे, असला निकष, असली कसोटी खासच आहे.

चांगलें आणि वाईट हीं दोन्हीं जरी आत्म्याचे मर्यादित आविष्कार आहेत तरी देखील, वाईट हें 'खऱ्या' मानवाचें--- आत्म्याचें--- अगदी

बाह्य आवरण आहे आणि चांगलें हें त्याचें आंतील, त्या मानाने अधिक जवळचें आवरण आहे. आणि, जोंवर माणूस 'वाइटा'चा स्तर भेदून त्याच्या पार जात नाही तोंवर तो 'चांगल्या'च्या स्तरापर्यंत पोहोचूं शकणार नाही, आणि चांगलें व वाईट हे दोन्ही स्तर भेदून त्यांच्या पलीकडे गेल्याखेरीज तो आत्म्यापर्यंत पोहोचणें शक्य नाही. जो याप्रमाणे आत्म्यापर्यंत जाऊन पोहोचूं शकतो त्याचें मग काय अवशिष्ट राहतें ? अगदी थोडेसें कर्म-- गत जीवनाच्या कर्माचा, प्रारब्ध कर्माचा अगदी थोडासा वेग, इतकेंच. परंतु हा वेग संपूर्णतया शुभ-स्वरूपाचाच असतो. जोंवर 'वाइटा'च्या वेगाचा पूर्णपणें क्षय होत नाही आणि पूर्वीची अपवित्रता संपूर्णपणें दग्ध होऊन जात नाही तोंवर कुणालाहि सत्याचा साक्षात्कार आणि उपलब्धि होणें अशक्य आहे, असंभवनीय आहे. म्हणून, जो आत्म्यापर्यंत पोहोचला आहे, ज्याला सत्याचा साक्षात्कार झाला आहे त्याचे गतजीवनाचे फक्त शुभ संस्कारच अवशिष्ट राहतात, केवळ शुभ वेगच अवशिष्ट राहतो. तो जरी देहांत राहिला आणि त्याने जरी अखंडपणें कर्म केलें तरी तो केवळ इतरांच्या कल्याणासाठीच कर्म करील, त्याच्या मुखावाटें सर्वांप्रति केवळ आशीर्वादच उच्चारले जातील, त्याचे हात केवळ सत्कर्मच करतील, त्याचें मन केवळ चांगलेच विचार करूं शकेल, तो कुठेहि गेला तरी त्याचें अस्तित्व सर्वांना वरदानच ठरेल. तो स्वतःच एक जिवंत, मूर्तिमंत वरदान म्हणावयाचा. अशा व्यक्तीच्या नुसत्या सान्नि-ध्यानेहि अत्यंत दुष्टाचा सुष्ट होऊन जाईल, घोर पातक्यांमधेहि पालट पडून ते साधु बनून जातील. त्याने तोंडावाटें जरी एक शब्दसुद्धा काढला नाही तरी त्याचें नुसतें असणेंच मानवजातीच्या पक्षीं एक महन्मंगल वरदान ठरेल. आता सांगा, अशी व्यक्ति कांही वाईट करणें शक्य आहे ? अशीं माणसें दुष्कृत्यें करणें संभवतें ? लक्षांत असूं द्या की, नुसतें तोंडाने बोलणें आणि प्रत्यक्ष अनुभवणें यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे, दोन ध्रुवांचा फरक आहे. बडबड काय कुणीहि मूर्ख करूं शकेल. अज्ञानी लोक सत्यासंबंधी काय कमी बडबडत असतात ? पोपटसुद्धा बडबडतो. बडबडणें निराळें आणि अनुभवणें निराळें. तत्त्वज्ञानें, आणि मतें, आणि चर्चा, आणि शास्त्रें,

आणि सिद्धान्त, आणि देवळें, आणि पंथ, आणि इतर साऱ्या गोष्टी आपापल्या परीनें चांगल्याच आहेत; परंतु ज्या वेळीं सत्याचा तो प्रत्यक्ष अनुभव येतो त्या वेळीं ह्या साऱ्या गोष्टी गळून पडतात. उदाहरणार्थ, नकाशा ही फार उपयोगाची वस्तु आहे, परंतु त्या नकाशांत रेखाटलेला देशच प्रत्यक्ष बघून आल्यानंतर मग ज्या वेळीं तुम्ही त्या नकाशाकडे बघतां तेव्हा तुम्हांला किती विलक्षण फरक आढळून येतो ! तद्वतच, ज्यांना सत्याचा साक्षात्कार झालेला आहे त्यांना तें सत्य समजण्यासाठी तर्क लढवीत बसण्याची वा बुद्धीच्या इतर कसरतींची कांहीच जरूरी भासत नसते; तें मग त्यांच्या जीवनाचें जीवन बनून गेलेलें असतें, तें त्यांना अगदी मूर्तपणें दिसत असतें, प्रत्यक्षापेक्षाहि तें त्यांना अधिक प्रत्यक्ष वाटत असतें. वेदान्तवाद्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, तें मग त्यांना 'करतलामलकवत्'-- 'स्वतःच्या तळहातावरील आवळ्याइतकें' स्पष्ट दिसत असतें. स्वतःच्या तळहातावरील आवळा दाखवून तुम्ही ज्याप्रमाणे ठामपणें म्हणूं शकतां की, 'बघा, ह्या इथे हा आवळा आहे', त्याचप्रमाणे अशी प्रत्यक्षानुभूति लाभून धन्य झालेले महापुरुष निःसंकोचपणें, असंदिग्धपणें, छातीठोकपणें म्हणूं शकतात की-- 'हा बघा, हा आत्मा, तो हा येथे आहे.' त्याविरुद्ध तुम्हीं त्यांच्याबरोबर जरी वर्षानुवर्ष तर्क लढविला तरी ते तुमच्याकडे पाहून फक्त गालांतल्या गालांत हसतील, त्या साऱ्याला ते बालिश बडबड समजतील; आपण अजाण पोरांना बडबडूं देतों त्याप्रमाणे ते तुम्हांला काय वाटेल तें बडबडण्याची मुभा देतील. सत्याची प्रत्यक्ष उपलब्धि होऊन त्यांचें 'पोट भरून गेलेलें असतें,' ते अगदी तृप्त झालेले असतात, पूर्ण झालेले असतात. कल्पना करा की, तुम्ही एक देश बघून आलां आहांत, आणि एखादा मनुष्य तुमच्याकडे येऊन 'तो देश मुळी अस्तित्वांतच नाही' असें तुम्हांला तर्काच्या जोरावर पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. तो हवा तितका वेळ नि हवीं तशीं तर्कटें लढवीत राहिला तरी त्याच्यासंबंधी तुमचा मनो-भाव फक्त असाच राहील की, महाशय पागलखान्यांत भरती करण्याच्याच लायकीचे आहेत ! तद्वतच, ज्याला धर्माची प्रत्यक्षानुभूति झालेली आहे तो म्हणत असतो, "जगभर लोक आपापल्या टीचभरच्या

धर्मविषयी हें जें बोलत असतात ती सारी नुसती पोरकट बडबड होय. प्रत्यक्ष अनुभवच धर्माचा आत्मा आहे, धर्माचें सार आहे." धर्माचा प्रत्यक्ष अनुभव येऊं शकतो. प्रश्न आहे—तुम्ही तो घ्यायला तयार आहांत का ? तुम्हांला तो खरोखरच हवा आहे काय ? तुम्हांला जर तो खरोखर हवा असेल आणि त्यासाठी जर तुम्ही यथोचित प्रयत्न कराल तर तो प्रत्यक्षानुभव तुम्हांलाहि प्राप्त होईल, आणि तसें होईल तेव्हाच तुम्ही खरेखुरे धार्मिक बनाल. जोंवर तुम्हांला असा अपरोक्षानुभव लाभत नाही, तोंवर तुमच्यांत आणि नास्तिकांत कांहीसुद्धा फरक नाही. फरक असेलच तर तो एवढाच की, नास्तिक निदान प्रामाणिक तरी असतो; परंतु, जो मनुष्य 'माझा धर्मावर विश्वास आहे' असें म्हणतो, पण त्याची प्रत्यक्ष उपलब्धि करून घेण्याचा मात्र कधीहि प्रयत्न करीत नाही तो प्रामाणिकहि नसतो.

ह्यानंतरचा प्रश्न म्हणजे—ही अशी प्रत्यक्षानुभूति लाभल्यानंतर त्या माणसाचें काय होतें ? समजा की, हें सगळें विश्व एक असून आपण तो अनंत पुरुष आहोंत अशी आपल्याला उपलब्धि झाली, आणि समजा आपल्याला प्रत्यक्ष अनुभव आला की हा आत्मा हीच एकमेव सत्ता असून तोच ह्या जगांतील नाना वस्तूंच्या रूपांनी नटलेला आहे. असें झाल्यानंतर आपलें काय होतें ? तसें झाल्यावर आपण निष्क्रिय बनूं आणि एका कोपऱ्यांत जाऊन बसून चुपचाप मरून जाऊं काय ? "ह्याने जगाचें काय भलें होईल ?" तोच जुना प्रश्न ! ह्याला उत्तर असें की प्रथमतः म्हणजे, त्याने जगाचें भलें काय म्हणून झालें पाहिजे ? त्याने तसें झालें पाहिजे ह्याला कारण काय ? कां बरें त्याने जगाचें भलें झालेंच पाहिजे ? "ह्याने जगाचें काय भलें होईल" असा प्रश्न विचारण्याचा कुणालाहि काय अधिकार आहे ? ह्या प्रश्नाचा अर्थ तरी काय ? कशाला तुम्ही 'जगाचें भलें होणें' म्हणतां ? 'जगाचें भलें होणें' म्हणजे काय ? लहान पोरांना मिठाई आवडते. समजा की, तुम्ही विजेसंबंधी प्रयोग करून कांही शोध लावीत आहांत. एखाद्या लहान पोराने येऊन "ह्याने मिठाई विकत घेतां येईल का ?"—असें जर तुम्हांला विचारलें तर तुम्ही काय उत्तर द्याल ? त्याच्या त्या प्रश्नाला "नाही" हेंच तुमचें उत्तर

ना ? तें ऐकून त्यावर तो पोरगा काय म्हणेल ? तो हेंच म्हणेल की, "मग ह्याने माझें काय भलें होणार ? ह्याने माझा काय फायदा, काय लाभ ?" सत्याच्या ह्या प्रत्यक्षानुभूतीसंबंधीहि लोक असाच प्रश्न विचारीत असतात-- "ह्या साऱ्याने जगाचें काय भलें होईल ? जगाचा काय फायदा होईल ? तिने आम्हांला पैसा मिळेल का ?" "नाही." "मग काय अर्थ आहे तींत ? तिचा काय उपयोग ?" 'जगाचें भलें' होण्याचा लोकांचा अर्थ हा असा असतो. फक्त ह्यालाच लोक 'जगाचें भलें होणें' समजत असतात. असो. आणि तरीहि, धर्माची ही प्रत्यक्षानुभूतिच जगाचें पुरेपूर भलें करीत असते, जगाचें खरें हित, खरें कल्याण करीत असते. लोकांना भय वाटत असतें की, ही अवस्था प्राप्त झाल्याने, हें सारेंकांही 'एक' आहे असा साक्षात्कार झाल्याने त्यांच्या प्रेमाचे झरे आटून जातील, आयुष्यांत मोलाचें म्हणून जें जें आहे तें सारें नाहीसें होऊन जाईल, जणु ह्या जन्मांतील नि परजन्मांतील आपल्या सगळ्या प्रेमाच्या व आवडीच्या वस्तूंना ते कायमचे मुकतील. हे लोक अमळ थबकून आपल्याशींच कधीसुद्धा असा विचार करून बघत नाहीत की, ज्यांनी स्वतःच्या व्यक्तिगत सुखाचा सगळ्यांत कमी विचार केला आहे, स्वतःच्या व्यक्तिगत सुखाविषयी जे नितान्त उदासीन होते त्यांनीच जगांत थोर थोर कामें केलीं आहेत, तेच ह्या जगांतील सर्वश्रेष्ठ कार्यकर्ते ठरले आहेत. आपल्या प्रेमाचा विषय हा एक हीन, क्षुद्र, मर्त्य जीव नाही असें जेव्हा माणसाला आढळून येतें, तेव्हाच माणूस खरेंखरें प्रेम करूं शकतो. आपल्या प्रेमाचा विषय हा एक मातीचा गोळा, एक हाडामांसाचा पुतळा नसून तो खरोखर मूर्तिमंत परमेश्वरच आहे असें जेव्हा माणसाला आढळून येतें तेव्हाच माणूस खरेखरें प्रेम करूं शकतो. आपला पति म्हणजे वस्तुतः स्वयं परमेश्वर आहे, तो स्वरूपतः ब्रह्म आहे असें जेव्हा पत्नीला कळेल तेव्हा ती त्या पतीवर जास्तच प्रेम करूं शकेल. आपली पत्नी ही वस्तुतः, स्वरूपतः, परमेश्वरच आहे हें जेव्हा पति जाणेल तेव्हा तो आपल्या त्या पत्नीवर अधिकच प्रेम करूं शकेल. आपलीं मुलें हीं वस्तुतः, स्वरूपतः ईश्वर आहेत, ब्रह्म आहेत हें जेव्हा आईला उमजेल तेव्हा ती आई त्या

आपल्या मुलांवर आणखीच प्रेम करूं शकेल. आपला प्रत्यक्ष शत्रुदेखील स्वरूपतः परब्रह्मच आहे हें ज्या माणसाला समजेल तो माणूस आपल्या अगदी हाडवैऱ्यावरदेखील प्रेम करूं शकेल. पवित्र माणूस वा साधुसत्पुरुष वस्तुतः, स्वरूपतः ब्रह्मच आहे हें ज्या माणसाला आकळलें तो माणूस त्या पवित्र माणसावर वा त्या सत्पुरुषावर अगदी मनापासून प्रेम करूं शकेल. आणि अशीच व्यक्ति अगदी अपवित्रांतल्याहि अपवित्र माणसावरसुद्धा, पराकाष्ठेच्या पापी माणसावरसुद्धा खरोखरीचें प्रेम करूं शकेल, कारण ती जाणत असते की त्या अपवित्र माणसाच्या, त्या पाप्याच्या पाठीमागेहि तोच-- तो प्रभुच उभा आहे. जिचा क्षुद्र 'मी' मरून गेला आहे आणि त्या जागीं ईश्वर अधिष्ठित झाला आहे अशी व्यक्ति सारें जग हालवून टाकीत असते-- जगाला आपल्या इशाऱ्यानुसार चालवूं शकते. अशा व्यक्तीच्या दृष्टीला हें सारें जग अगदी निराळेंच दिसत असतें. जें कांही दुःखदायक आहे, जें कांही क्लेशकारक आहे तें सारें तिच्या दृष्टीसमोरून अंतर्धान पावतें-- तिला मग दुःखदायक नि क्लेशकारक असें कांही दिसतच नाही;-- स्पर्धा, द्वंद्व, संघर्ष, झटापटी तिच्या लेखीं मग उरतच नाहीत. अन्नाच्या दोन घासांकरता, भाकरीच्या चतकोर तुकड्याकरता जिथे आम्ही दररोज धडपडत असतों, झगडत असतों, चढाओढ करीत असतों तें हें जग मग आपल्यापक्षीं कारागृह न राहतां एक क्रीडांगण बनून जाईल. अहाहा, उभें जग मग किती सुंदर दिसूं लागेल ! केवळ अशाच व्यक्तीला, न कचरतां म्हणण्याचा अधिकार आहे की, "हें जग अति सुंदर आहे." सारेंकांही शुभ आहे, चांगलें आहे, मंगलमय आहे, असें म्हणण्याचा फक्त अशा व्यक्तीलाच अधिकार पोहोचतो. ह्या असल्या प्रत्यक्षानुभूतीपासून जगाचा हाच फार मोठा फायदा होईल की तिच्यामुळे जीवनांतील संघर्ष आणि विरोध लयास जाऊन शांति उदयास येईल. साऱ्याच्या साऱ्या मानवजातीला ह्या महान् सत्याच्या केवळ एका बिंदूची जरी उपलब्धि होऊं शकेल तरी ह्या अवघ्या जगाचें रूपच पालटून जाईल. आणि लढणें-झगडणें निमून शांतीची राजवट येईल. इतर सगळ्यांना मागे लोटून स्वतःच पुढे जाण्यास प्रवृत्त करणारी आम्हांला सुटलेली ही ओंगळ, बीभत्स, पाशवी

उतावळ मग या जगांतून लोपून जाईल. आणि, तिच्याबरोबरच सारे संघर्ष लोपतील, तिच्याबरोबरच सारा द्वेष, सारी घृणा लोपेल, तिच्याबरोबरच सारा मत्सर लोपेल, आणि तिच्याबरोबरच सारें वाईटहि कायमचें लोप पावेल. मग ह्या पृथ्वीवर देवता नांदूं लागतील. ही पृथ्वीच मग स्वर्ग होऊन जाईल. आणि, ज्या वेळीं देवता देवतांबरोबर खेळतील, देवता देवतांबरोबर काम करतील, देवता देवतांवर प्रेम करतील, त्या वेळीं तिथे मग वाइटाला थारा कसा बरें मिळूं शकेल ? दिव्य अनुभव लाभण्याचा हा थोर उपयोग आहे.-- हें त्याचें सुफळ आहे, हा त्याच्यापासून फायदा आहे. समाजांत आज तुम्हांला जें कांही दिसतें तें सारें बदलून जाईल, त्याचें रूपच पालटून जाईल. माणसाला मग तुम्ही वाईट मानणार नाही,-- हाच ह्याच्यापासून पहिला महालाभ. ज्या बिचाऱ्या एखाद्या पुरुषाकडून किंवा स्त्रीकडून चूक झाली आहे, कांही गैर झालें आहे त्यांच्याकडे मग तुम्ही फिरून तुच्छतेने बघणार नाही, त्यांना मग तुम्ही कधी असें नाक मुरडणार नाही. आणि, स्त्रियांनो, रात्रीं रस्त्याने भटकणाऱ्या गरीब बिचाऱ्या हीनदीन बायांकडे तिरस्काराने बघून नंतर मग तुम्ही त्यांचा कधीहि अधिक्षेप करणार नाही, कारण मग तुम्हांला तिथे, त्यांच्यांतदेखील स्वयं भगवानच दिसेल. दुसऱ्यांचा हेवा करण्याची, कुणाची 'जिरविण्या'ची, कुणाला 'धडा शिकविण्या'ची कल्पनाहि मग तुमच्या मनांत कधी यावयाची नाही. तें सारें पार मावळून जाईल. आणि प्रेम-- तो प्रेमाचा महान् आदर्श इतका प्रबळ नि प्रभावी होईल की, मानवजातीला योग्य मार्गाने नीट चालविण्यासाठी मग आणखी चाबकाचें नि कोरड्याचें कांहीच प्रयोजन उरणार नाही.

ह्या जगांत वास करणाऱ्या स्त्री-पुरुषांपैकी एक लक्षांश, नव्हे, एक कोटचंशहि नुसतें शांत बसून जगाला उद्देशून--"तुम्ही सारेच ईश्वर आहांत; हे मानवांनो, हे पशूंनो, हे समस्त प्राण्यांनो, तुम्ही सर्व त्या एकाच जिवंत देवाचे आविष्कार आहांत, त्याचींच निरनिराळीं रूपें आहांत" असें थोडा वेळहि जरी म्हणतील तरी अवघ्या अर्ध्या तासांतच हें सारें जग बदलून जाईल. मग, चोहीकडे द्वेषाचें नि घृणेचें विष न पसरवितां, सगळीकडे मत्सराचे नि कुविचारांचे प्रवाह न वाहवितां,

सर्वंच देशांमधील लोक असें मानतील की, सारेंकांही तो प्रभुच आहे. तुम्ही जें कांही पाहत आहांत वा अनुभवीत आहांत, तें सारें तोच आहे. तुमच्यामधेच वाईट असल्याखेरीज तुम्हांला बाहेर वाईट कसें दिसेल ? तुमच्या स्वतःच्या अंतःकरणामधे आंत कुठेतरी चोर दडून बसलेला असल्याखेरीज तुम्हांला बाहेर चोर कसा दिसणार ? तुम्ही स्वतःच खुनी असल्याखेरीज तुम्हांला बाहेर खुनी कसा दिसेल ? स्वतः चांगले व्हा, मग बघाल की सारें वाईट तुमच्यापक्षीं नाहीसें होऊन गेलें आहे. मग सारें जगच असें बदलून जाईल. ह्या साऱ्यापासून समाजाचा हा सर्वांत मोठा फायदा आहे, महान् लाभ आहे. मानव-प्राण्याच्या दृष्टीने हा फार मोठा लाभ आहे.

भारतांत प्राचीन काळीं निवडक व्यक्तींनी हे असले विचार चिंतिले आहेत, ते कार्यांत उतरविले आहेत. परंतु, इतरांना वगळून चालण्याची धर्माचार्यांची वृत्ति आणि परकीयांचे आमच्या देशावरील विजय नि तज्जन्य पराधीनता यांमुळे ह्या विचारांचा चोहीकडे प्रसार होऊं शकला नाही. तथापि तीं अति महान् सत्यें आहेत, आणि जिथे जिथे त्यांचा प्रभाव पडूं शकला तिथे तिथे माणसें देवत्वाला पोहोचलीं आहेत--स्वतःचें दिव्य स्वरूप जाणूं आणि प्रकटवूं शकलीं आहेत. असल्याच एका दैवी पुरुषाच्या स्पर्शाने माझें स्वतःचें उभें आयुष्य बदलून गेलें आहे; येत्या रविवारीं मी तुम्हांला त्यांच्यासंबंधी सांगणार आहेंच. आणि, आता हे विचार साऱ्या जगभर प्रसारित होण्याचा समय येत आहे. मठा-आश्रमांत कोंडून न राहतां, केवळ पंडितांच्याच रसास्वादनासाठी असलेल्या ग्रंथांमधे डांबून न राहतां, केवळ कांही पंथांचा नि मूठभर विद्वानांचाच मक्ता न राहतां हे विचार, हीं सत्यें आता साऱ्या जगभर पसरविलीं जातील की जेणेंकरून तीं साधु आणि पापी, स्त्रिया, पुरुष आणि मुलें, शिकलेले आणि बिनशिकलेले अशा सर्वांचीच समाईक संपत्ति होतील. मग तीं साऱ्या जगाच्या वातावरणांत भिनून जातील, आणि हा जो वायु आम्ही श्वासाबरोबर आंत घेत आहोंत तोदेखील प्रत्येक स्पंदनागणिक आम्हांला जाणीव देत राहील की--"तत् त्वम् असि"--"तूंच तो आहेस." आणि अनंत कोटी चंद्र-सूर्यांच्या रत्ना-माणकांनी खचलेलें हें

निखिल विश्व, त्यांतील शब्द उच्चारूं शकणाऱ्या प्रत्येकाच्या कंठांतून समस्वराने घोषीत राहील -- "तत् त्वम् असि" --- "तत् त्वम् असि."

---

अमेरिकेंतील वृत्तपत्रांमधे प्रसिद्ध झालेले

# त्रोटक अहवाल

# भारत—धर्म आणि चालीरीती

( 'सॅलेम इव्हिनिंग न्यूज,' २९ ऑगस्ट १८९३ )

हल्ली या देशाच्या दौऱ्यावर असलेल्या स्वामी विवे कानोंद * नामक हिंदु संन्याशाला बघण्यासाठी आणि त्यांचें मुख्यतः हिंदूंच्या वेदप्रणीत धर्मावर अनौपचारिकपणें दिलेलें भाषण ऐकण्यासाठी काल सायंकाळच्या उष्म्यांतसुद्धा 'थॉट अँड वर्क' क्लबचे बरेचसे सभासद आणि इतर निमंत्रित सद्‌गृहस्थ 'वेस्ले' प्रार्थनामंदिरांत एकत्र झाले होते. आपल्या भाषणांत त्यांनी असेंहि सांगितलें की, त्यांच्या देशांत जात म्हणजे केवळ एक सामाजिक विभाग आहे व ती धर्मावर कोणत्याहि प्रकारें अवलंबून नाही.

तिकडील बहुसंख्य लोकांत दिसून येणाऱ्या दारिद्र्यावर त्यांनी भर दिला. हिंदुस्थान भूभागदृष्टचा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपेक्षा बराच लहान असूनसुद्धा त्यांत दोन अब्ज तीस कोटी [?] लोकसंख्या आहे व त्यांपैकी तीस कोटी [?] लोक दरमहा, सरासरीनें पाहतां, पन्नास सेंटपेक्षा कमीच वेतन मिळवितात. तेथील कांही कांही जिल्ह्यांत तर सर्वच लोकांना महिनेचे महिने किंवा वर्षानुवर्षसुद्धा एका विशिष्ट झाडावरील फुलें शिजवून त्यावर उपजीविका करावी लागते.

दुसऱ्या कांही जिल्ह्यांत पुरुष केवळ भातच खातात, आणि स्त्रियांना व मुलांना भाताच्या पेजेवरच आपली भूक शमविणें भाग पडतें. भाताचें एखादेंहि पीक बुडालें की दुष्काळच पडतो. अर्धी जनता दररोज केवळ एकभुक्त असते, तर अर्धीला दुसऱ्या वेळचें भोजन कुठून मिळेल हेंहि माहीत नसतें. स्वामी विवे क्योंद यांच्या मतें हिंदुस्थानांतील जनतेची गरज अधिक धर्माची, किंवा आहे त्याहून

* त्या दिवसांत स्वामी विवेकानंदांचें नांव अमेरिकेंतील वृत्तपत्रांमधे तऱ्हतऱ्हेने लिहिलें जाई; आणि विशेषतः विषयाच्या नावीन्यामुळे त्यांच्या भाषणांचें अहवालहि चुकीचे प्रसिद्ध होत.

चांगल्या धर्माची नाही, तर, त्यांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, 'व्यवहारी दृष्टी'ची आहे; आणि भारतांतील पीडित व अर्धभुक्त जनतेच्या या निकडीच्या गरजेकडे अमेरिकेंतील लोकांचें लक्ष वेधण्याच्या आशेने ते या देशांत आले आहेत.

त्यांनी आपल्या देशबांधवांची परिस्थिति व त्यांचा धर्म यासंबंधी बराच वेळ भाषण केलें. भाषण चालू असतांना 'सेन्ट्रल बॅप्टिस्ट' चर्चचे डॉ. एफ्. ए. गार्डनर व रे. एस्. एफ्. नॉब्स यांनी त्यांना वरचेवर आणि सविस्तर प्रश्न विचारले. ते (स्वामीजी) म्हणाले की, तेथील (भारतांतील) मिशनरी लोकांची तत्त्वप्रणाली सुंदर असून त्यांनी चांगल्या कल्पनांनी सुरवात केली आहे; पण त्यांनी तेथील लोकांची औद्योगिक परिस्थिति सुधारण्यासाठी कांही केलें नाही. ते म्हणाले की, अमेरिकेंतील लोकांनी त्यांना (भारतीय जनतेला) धार्मिक शिक्षण देण्यासाठी प्रचारक पाठविण्याऐवजी त्यांना औद्योगिक शिक्षण देण्यासाठी कुणास पाठविलें तर अधिक चांगलें होईल.

'ख्रिस्ती लोकांनी भारतीय जनतेला त्यांच्या दुःस्थितींत साहाय्य केलें नाही काय ? किंवा प्रशिक्षण शाळा (ट्रेनिंग स्कूल्स) काढून त्यांना प्रत्यक्षपणें मदत केली नाही काय ?' असें विचारलें असतां व्याख्यात्यांनी सांगितलें की, त्यांनी तसें कांही वेळां केलें, पण खरें पाहतां याचें श्रेय त्यांना लाभलें नाही, कारण अशा वेळीं त्यांना लोकांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करण्याची कायद्याने मोकळीक दिली नाही.

' हिंदुस्थानांतील स्त्रियांना तेथील पुरुष इतका मान देतात की, त्यांनी घराबाहेर न जाणें चांगलें असें त्यांना वाटतें ' असें सांगून त्यांनी तेथील स्त्रियांच्या वाईट स्थितीचें स्पष्टीकरण केलें. हिंदु स्त्रियांविषयी एवढा आदर दर्शविण्यांत येतो की त्यांना पडद्यांत ठेवण्यांत येतें. तेथील सतीच्या जुन्या चालीचें स्पष्टीकरण करतांना त्यांनी सांगितलें की, तेथील स्त्रियांचें आपल्या पतीवर इतकें प्रेम असतें की, त्या पतीशिवाय जिवंत राहूंच शकत नाहीत. तीं दोघें (पति-पत्नी) विवाहसमयीं एक होतात आणि मरणांतहि तीं एकच राहतात.

मूर्तिपूजा व जगरनॉटाच्या [जगन्नाथाच्या] रथाखाली स्वतःस

झोकून देण्याची प्रथा यांबद्दल त्यांना विचारलें, तेव्हा ते म्हणाले की, रथाच्या चालीबद्दल सरसकट हिंदु जनतेला दोष देण्यांत येऊं नये, कारण तसें कृत्य धर्मान्ध लोक किंवा बहुधा महारोगीच करीत असतात.

व्याख्यात्यांनी त्यांच्या स्वतःच्या देशांतील त्यांच्या कार्याचें विवरण करतांना सांगितलें की, त्यांना औद्योगिक कार्यासाठी संन्याशांची अशी संघटना करावयाची आहे की, ज्यायोगें संन्यासी हे जनतेला औद्योगिक शिक्षणाचा लाभ करून देऊन तिची स्थिति सुधारण्यास मदत करतील.

आज तिसऱ्या प्रहरीं विवे कानोंद यांचें 'भारतांतील मुलें' या विषयावर मुलांसाठी व युवकांसाठी १६६, नॉर्थ स्ट्रीट येथे भाषण होईल. श्रीमती वुड्स यांनी त्यासाठी आपला बगीचा देण्याची कृपा केली आहे.

दिसायला ते देखणे आहेत, सावळे पण आकर्षक आहेत. कमरेच्या त्जागीं बंदाने आवळलेला, पिवळसर लाल रंगाचा लांब झगा त्यांनी परिधान केलेला होता. डोक्यावर पिवळा फेटा बांधला होता. संन्यासी असल्याने त्यांना जात नाही आणि ते कुणाहि बरोबर खाणें-पिणें करूं शकतात.

* * * *

( 'डेली गॅझेट', २९ ऑगस्ट १८९३ )

हिंदुस्थानांतून आलेले राजा स्वामी विवि रानंदा हे काल तिसऱ्या प्रहरीं 'वेस्ले' चर्चमधे सॅलेमच्या 'थॉट ॲण्ड वर्क' क्लबचे अतिथि होते.

पुरुष आणि स्त्रिया बऱ्याच संख्येंत उपस्थित होत्या आणि यांनी अमेरिकन पद्धतीने त्या प्रसिद्ध संन्याशाशीं हस्तांदोलन केलें. त्यांनी नारिंगी रंगाचा झगा परिधान केलेला होता, त्यावर एक लाल कमरपट्टा होता; त्यांच्या पिवळ्या रंगाच्या फेट्याचा शेमला एका खांद्यावर लोंबत असून त्याचा ते हातरुमालासारखा उपयोग करीत

† अमेरिकेंतील वार्ताहर स्वतःची कल्पना लढवून 'राजा', 'ब्राह्मण', 'पुरोहित' . वाटेल तशीं विशेषणें स्वामी विवेकानंदांसाठी योजत असत.

होते. त्यांनी 'काँग्रेस' जोडे घातले होते.

आपल्या भारतीय जनतेची स्थिति व तिचा धर्म याविषयी ते बराच वेळ बोलले. त्यांचें भाषण चालू असतांना 'सेंट्रल बॅप्टिस्ट चर्च'चे डॉ. एफ्. ए. गार्डनर व रे. एस्. एफ्. नॉब्स यांनी त्यांना वारंवार सखोल प्रश्न केले. त्यांनी सांगितलें की, तेथील मिशनऱ्यांची तत्त्वप्रणाली उत्कृष्ट आहे व त्यांनी तेथे चांगल्या कल्पना घेऊन कार्याला सुरवात सुद्धा केली आहे; पण लोकांची औद्योगिक परिस्थिति सुधारण्यासाठी त्यांनी कांही केलें नाही. त्यांनी सांगितलें की, अमेरिकेंतील लोकांनी भारतीयांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी धर्मप्रचारक पाठविण्याऐवजी त्यांना औद्योगिक शिक्षण देण्यासाठी कुणास पाठविलें तर अधिक चांगलें होईल.

स्त्री-पुरुषसंबंधांवर सविस्तर बोलतांना त्यांनी सांगितलें की, हिंदुस्थानांतील पति आपल्या पत्नीशीं कधीच खोटें बोलत नाहीत आणि तिला कधीहि छळत नाहीत. इतरहि पापकृत्यांचा त्यांनी उल्लेख केला की जीं तेथील पति करीत नाहीत.

'ख्रिस्ती लोकांनी भारतांतील लोकांना त्यांच्या दुःस्थितींत साहाय्य केलें नाही काय ? किंवा प्रशिक्षण शाळा (ट्रेनिंग स्कूल्स) काढून त्यांना प्रत्यक्षपणें मदत केली नाही काय ?' असें विचारलें असतां व्याख्यात्यांनी सांगितलें की, त्यांनी तसें कांही वेळां केलें, पण खरें पाहिलें असतां त्याचें श्रेय त्यांना लाभलें नाही; कारण अशा वेळीं लोकांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करण्याची मोकळीक त्यांना कायद्याने दिली नाही.

'हिंदुस्थानांतील स्त्रियांना तेथील पुरुष इतका मान देतात की त्यांनी घराबाहेर न जाणें चांगलें असें त्यांना वाटतें,' असें सांगून त्यांनी तेथील स्त्रियांच्या वाईट स्थितीचें स्पष्टीकरण केलें. हिंदु स्त्रियांविषयी इतका आदर दर्शविण्यांत येतो की त्यांना पडद्यांत ठेवण्यांत येतें. तेथील सतीच्या जुन्या चालीचें स्पष्टीकरण करतांना त्यांनी सांगितलें की, तेथील स्त्रियांचें आपल्या पतींवर इतकें प्रेम असतें की, त्या पतीशिवाय जिवंत राहूंच शकत नाहीत. तीं दोघें (पति-पत्नी) विवाहसमयीं एक होतात आणि मरणांतहि तीं एकच राहतात.

मूर्तिपूजा व जगरनॉटाच्या [जगन्नाथाच्या] रथाखाली स्वतःस झोकून देण्याची प्रथा यांबद्दल त्यांना विचारलें तेव्हा ते म्हणाले की, रथाच्या चालीबद्दल सरसकट हिंदु जनतेला दोष देण्यांत येऊं नये, कारण तसें कृत्य धर्मान्ध लोक किंवा बहुधा महारोगीच करतात.

मूर्तिपूजेसंबंधी बोलतांना ते म्हणाले की, त्यांनी ख्रिस्त्यांना 'प्रार्थनेच्या वेळीं तुम्ही कुठला विचार करतां ?' असें विचारलें असतां कांहींनी उत्तर दिलें--'आम्ही चर्चबद्दल विचार करतों', तर, कांहीजण म्हणाले, 'G-O-D विषयी' (गॉडविषयी किंवा ईश्वराविषयी). असेंच त्यांचे देशवासी मूर्तीचें चिंतन करतात. गरीब लोकांसाठी मूर्ति अत्यंत आवश्यक असतात. ते म्हणाले की, पुरातनकाळीं ज्या वेळीं त्यांच्या धर्माला प्रथम प्रारंभ झाला त्या वेळीं स्त्रिया त्यांच्या आध्यात्मिक प्रतिभेबद्दल आणि थोर मानसिक सामर्थ्याबद्दल प्रसिद्ध होत्या. असें असून सुद्धा, आजच्या स्त्रियांची अवनति झालेली आहे हें ते मान्य करतांना दिसले. खाणें-पिणें, गप्पागोष्टी, निंदा-कुचेष्टा यांशिवाय त्या कुठलाच विचार करीत नाहीत.

व्याख्यात्यांनी त्यांच्या स्वतःच्या देशांतील त्यांच्या कार्याचें विवरण करतांना सांगितलें की, त्यांना औद्योगिक कार्यासाठी संन्याशांची अशी संघटना करावयाची आहे की, ज्यायोगें हे संन्यासी जनतेला औद्योगिक शिक्षणाचा लाभ करून देऊन तिची स्थिति सुधारण्यास मदत करतील.

*  *  *  *

**( 'सॅलेम इव्हिनिंग न्यूज', १ सप्टेंबर १८९३ )**

या शहरांत कांही दिवस वास्तव्य करीत असलेले भारतांतील विद्वान् संन्यासी हे रविवारीं सायंकाळीं ७-३० वाजतां 'ईस्ट चर्च'मधे भाषण देतील. स्वामी (रे०) विवा कानंद यांनी ॲनिस्क्वाम येथील 'एपिस्कोपल चर्च'मधे गेल्या रविवारीं सायंकाळीं चर्चचे अधिकारी, व

हार्वर्डचे प्राध्यापक राइट यांच्या निमंत्रणावरून प्रवचन दिलें. प्रा. राइट यांनी त्यांच्याबद्दल फार सहानुभूति व अगत्य दाखविलें आहे.

सोमवारीं रात्रीं ते सॅराटोगा येथे प्रयाण करतील. तिथे ते 'सोशल सायन्स असोसिएशन'मधे भाषण देतील. त्यानंतर शिकागो येथे ते सर्वधर्मपरिषदेपुढे भाषण देतील. हिंदुस्थानांतील उच्च विश्वविद्यालयांत शिक्षण घेतलेल्या सर्वच लोकांप्रमाणे विवा कानंद इंग्रजी सहजतेने व शुद्ध बोलतात. गेल्या मंगळवारीं मुलांपुढे झालेलें, हिंदुस्थानांतील मुलांचे खेळ, शाळा, चालीरीती इत्यादींसंबंधीचें त्यांचें भाषण उद्बोधक व अतिशय मनोरंजक होतें एका छोटया मुलीच्या 'माझ्या बाईंनी मला इतक्या जोराने मारलें की माझें बोटच मोडायला झालें. . . .' या वाक्याने त्यांचें दयाळू हृदय हलून गेलें. विवा कानंदांना इतर संन्याशांप्रमाणेच स्वतःच्या देशांत सत्य, पावित्र्य व मानवांचा बंधुभाव शिकविणाऱ्या धर्माचा प्रचार करीत प्रवास करणें प्राप्त असल्याने कोणतेंहि महान् कृत्य व कोणताहि मोठा प्रमाद त्यांच्या दृष्टींतून सुटणें शक्य नव्हतें. सर्व परधर्मीयांसंबंधीचे त्यांचे विचार अत्यंत उदार आहेत, आणि आपल्याशीं मतभेद असलेल्यांसाठी देखील त्यांच्याजवळ गोड शब्द आहेत.

*　*　*　*

( 'डेली गॅझेट', ५ सप्टेंबर १८९३ )

भारतांतून आलेले राजा स्वानी विवि रानंद ह्यांनी रविवारीं सायंकाळीं 'ईस्ट चर्च'मधे 'हिंदुस्थानांतील धर्म व त्या देशांतील दरिद्री जनता' यावर भाषण दिलें. श्रोतृसंख्या चांगली असली तरी भाषणाच्या विषयाचें महत्त्व व आकर्षक वक्ता हीं पाहतां ती साजेशी नव्हती. त्या संन्याशांनी आपल्या देशांतील पद्धतीप्रमाणे पोषाख केला होता व ते सुमारें चाळीस मिनिटें बोलले. ते म्हणाले की, आज हिंदुस्थान पन्नास वर्षांपूर्वी जसा तो होता तसा नाही; आज त्याची मोठी गरज

म्हणजे धार्मिक दृष्टचा नव्हे, तर औद्योगिक किंवा सामाजिक दृष्टचा लोकांना शिक्षण देणारे प्रचारक ही होय. हिंदूंच्याजवळ त्यांना पुरेसा असा धर्म आहे आणि हिंदुधर्म जगांतला सर्वांत प्राचीन असा धर्म आहे. हे संन्यासी सुंदर आल्हाददायक भाषण करतात आणि त्यांनी आपल्या श्रोत्यांचें संपूर्ण चित्त वेधून घेतलें होतें.

* * * *

( 'डेली सॅराटोजियन', ६ सप्टेंबर १८९३ )

...व्यासपीठावर त्यानंतर हिंदुस्थानांतील मद्रासचे [?] संन्यासी विवे कानंद हे उभे राहिले. ते संपूर्ण हिंदुस्थानभर प्रचार करीत फिरले होते. त्यांना समाजशास्त्रांबद्दल रुचि असून ते कुशाग्रबुद्धीचे मनोवेधक व्याख्याते आहेत. ते 'हिंदुस्थानांतील मुसलमानी राजवट' या विषयावर बोलले.

आजच्या कार्यक्रमांत कांही अतिशय मनोरंजक व चित्तवेधक विषय आहेत. विशेषेंकरून हार्टफोर्डचे कर्नल जेकब ग्रीन हे आपला 'बायमेटॅलिझम' ( Bimetallism ) हा निबंध वाचणार आहेत. विवेकानंद परत बोलतील. या वेळीं 'हिंदुस्थानांत चांदीचा उपयोग' हा त्यांचा विषय राहील.

## प्रदर्शनाच्या मेळाव्यांतील हिंदु

( 'बोस्टन इव्हिनिंग ट्रान्स्क्रिप्ट,' ३० सप्टेंबर १८९३ )

**शिकागो, २३ सप्टेंबर**

'आर्ट पॅलेस'च्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला एक खोली आहे आणि तिच्यावर लिहिलें आहे "क्रमांक १——आंत येण्याची मनाई

आहे.'' या खोलींत कमीअधिक वेळाच्या अंतराने धर्मसंमेलनांतील सर्व व्याख्याते एकमेकांशीं किंवा अध्यक्ष श्री. बॉनी यांच्याशीं बोलण्यासाठी येतात. श्री. बॉनी यांचें खाजगी कार्यालय या खोलीच्या एका कोपऱ्यांत आहे. आंत डोकावून पाहतां येईल एवढचा नेहमी उघडचा असलेल्या घडीच्या दारांचें सर्वसाधारण जनसमुदायापासून आता कडेकोटपणें रक्षण केलें आहे. केवळ प्रतिनिधींनाच त्या पवित्र आवारांत प्रवेश मिळतो, पण 'तिळा उघड'चा परवाना मिळविणें व अशा रीतीने त्या प्रसिद्ध पाहुण्यांशीं, 'हॉल ऑफ कोलंबस' मधील व्यासपीठावर येऊं शकतो त्याहून अधिक संबंध येण्याची अल्पशी संधि प्राप्त करून घेणें अशक्य नाही.

बाजूच्या या खोलींत सर्वांत अधिक उठून दिसणारी व्यक्ति म्हणजे स्वामी विवेकानंद हे ब्राह्मण संन्यासी होत. ते सुदृढ बांध्याचे असून हिंदी लोकांचा उत्कृष्ट नूर त्यांच्यांत दिसून येतो. साफ श्मश्रू केलेला चेहरा, मुशींतून काढल्यासारखे रेखीव अवयव, शुभ्र दंतपंक्ति आणि संभाषण करतांना नेहमी उदार स्मिताने विलग होणारे ते कोरीव ओठ—— असे आहेत स्वामी विवेकानंद. त्यांच्या डौलदार मस्तकावर पिवळसर किंवा लाल रंगाचा फेटा विराजमान आहे; आणि थोडा गुडघ्याखाली रुळणारा व कमरेवर पट्टयाने आवळलेला त्यांचा झगा चमकदार नारिंगी व गडद किरमिजी रंगांचा आहे. ते उत्कृष्ट इंग्रजी बोलतात व प्रामाणिकपणें विचारलेल्या कोणत्याहि प्रश्नांना त्यांनी ताबडतोब उत्तरें दिलीं.

त्यांच्या वागण्यांत सरलता दिसून येते आणि स्त्रियांशीं बोलतांना दृष्टीस पडणारा त्यांचा वैयक्तिक संयम त्यांच्या संन्यास-जीवनाचा सूचक आहे. त्यांच्या संन्यासीसंप्रदायाच्या नियमांविषयी पृच्छा केली असतां त्यांनी म्हटले आहे——"मी आपल्या इच्छेनुसार वागूं शकतों. मी स्वतंत्र आहें. कधी मी हिमालय पर्वतांत राहतों तर कधी शहरांतील रस्त्यावर. मला माझें पुढचें भोजन कुठे मिळेल हें कधीच माहीत नसतें, मी माझ्याजवळ पैसे कधीच ठेवीत नाही. वर्गणीच्या पैशावर मी येथे आलों आहें.'' आणि नंतर यदृच्छया जवळच उभे असलेल्या आपल्या एकदोन देशबांधवांकडे दृष्टि वळवून ते परत म्हणाले—— "हे

घेतील माझी काळजी." यावरून हेंच अनुमान निघतें की शिकागो येथे त्यांच्या भोजनाचा खर्च इतर लोक करीत आहेत. 'आपला नेहमीचाच संन्याशाचा पोषाख आपण धारण केला आहे काय ?' असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले-- "हा चांगला पोषाख आहे; मी माझ्या मायदेशांत असतांना जाडेभरडे कपडे घालतों आणि अनवाणी फिरतों. माझा जातिभेदावर विश्वास आहे काय ? जात ही एक सामाजिक रूढि आहे. धर्माला तिच्याशीं कांहीहि कर्तव्य नाही. सर्वच जाती माझ्याशीं संबंध ठेवूं शकतात."

कांहीहि असलें तरी त्यांच्या नुरावरून, त्यांच्या सर्वसाधारण स्वरूपावरून, मिस्टर विवेकानंद यांचा जन्म उच्च वर्णांत झाला हें अगदी स्पष्ट आहे. वर्षानुवर्ष जाणूनबुजून स्वीकारलेलें दारिद्र्य व गृहहीन भ्रमण यांनी सुसभ्यतेवरील त्यांचा जन्मसिद्ध हक्क हिरावून घेतला नाही. त्यांच्या वंशाचें नांवहि अज्ञात आहे. विवेकानंद हें नांव त्यांनी धार्मिक जीवन अंगीकारिलें तेव्हा घेतलेलें आहे, व 'स्वामी' ही उपाधि त्यांना केवळ आदरार्थी लावली जाते. ते तिशीच्या फार पुढे गेले नसावेत, आणि असें दिसतें की ह्याच प्रकारचें जीवन व्यतीत करण्यासाठी, त्यांत साफल्य मिळविण्यासाठी आणि पारमार्थिक जीवनाविषयी चिंतन करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला आहे. त्यांच्या आयुष्याला हें वळण कसें मिळालें याबद्दल आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

सर्वसंगपरित्याग करून त्यांनी संन्यास घेतला या गोष्टीचा कोणीं उल्लेख करतांच त्यांचें चटकन् उत्तर आलें--

"प्रत्येक स्त्रींत जर मला जगन्माताच दिसते तर मी लग्न कां करूं ? मी हा सर्व प्रकारचा त्याग कां करतों ?--ऐहिक बंधनांपासून व आसक्तीपासून स्वतःला मुक्त करण्यासाठी की जेणेंकरून माझा पुनर्जन्म होणार नाही. मृत्यूनंतर मला आत्मतत्त्वांत विलीन होऊन जायचें आहे, ईश्वराशीं एकरूप व्हायचें आहे. मी बुद्ध होणार आहें."

याचा अर्थ असा नव्हे की, विवेकानंद स्वतः बौद्ध आहेत. कोणतेंहि विशिष्ट नाम किंवा संप्रदाय त्यांना चिकटूं शकत नाही. ते उच्च प्रकारच्या 'ब्राह्मणत्वां'तून निर्माण झाले आहेत; व्यापक, स्वप्नाळू

व आत्मविसर्जनप्रिय हिंदुवृत्तींतून निर्माण झाले आहेत. ते एक संन्यासी किंवा पवित्र पुरुष होत.

आपले गुरु श्रीरामकृष्ण यांच्यासंबंधी ते पत्रकें वाटतात. श्रीरामकृष्ण एक हिंदु भक्त होते व त्यांनी आपल्या श्रोत्यांना आणि शिष्यांना इतकें प्रभावित केलें की, त्यांच्या निर्वाणानंतर अनेकांनी संन्यास घेतला. मजुमदार यांनीहि श्रीरामकृष्णांना आपले गुरु मानलें होतें; पण मजुमदार हें जग पवित्र व्हावें म्हणून कार्य करतात; येशूंच्या शिकवणीप्रमाणे ते जगांत आहेत, पण जगाचे नाहीत.

सर्वधर्मपरिषदेपुढे झालेलें विवेकानंदांचें भाषण आकाशासारखें व्यापक स्वरूपाचें होतें व त्यांत सर्वधर्मांतील सर्वोत्कृष्ट तत्त्वांचा समावेश होता. सर्व मानवजातीविषयी दया, शिक्षेच्या भीतीने वा पारितोषिकाच्या आशेने नव्हे, तर ईश्वरावरील प्रेमासाठीच सत्कृत्यांचें आचरण--या तत्त्वांचा या भाषणांत अंतर्भाव झाला होता; आणि यालाच त्यांनी 'अंतिम विश्वधर्म' असें म्हटलें. त्यांच्या भावना-विचारांतील उदात्ततेमुळे आणि त्याचबरोबर त्यांच्या बाह्य स्वरूपामुळे ते सर्वधर्मपरिषदेंत अतिशय लोकप्रिय आहेत. ते व्यासपीठावर केवळ इकडून तिकडे गेले तरी टाळ्या पडतात; आणि हजारो लोकांची त्यांच्याविषयीची ही विशेष आवड--हें विशेष प्रेम ते निष्पाप बालकासारख्या समाधानाच्या भावनेने स्वीकारतात आणि त्यांत गर्वाचा लेशहि नसतो. गरिबी व प्रसिद्धिपराङ्मुखता यांतून संपन्नता व उदोउदो यांमधे झालेले अकस्मात् स्थित्यंतर म्हणजे या विनयशील तरुण ब्राह्मण संन्याशाच्या दृष्टीने एक विचित्रच अनुभव असला पाहिजे. 'थिऑसफिस्टांचा ज्यांच्यावर दृढ विश्वास आहे अशा हिमालयांतील बंधूंसंबंधी आपणांस कांही माहिती आहे काय ?' असें विचारलें असतां त्यांनी सरळ शब्दांत उत्तर दिलें--"त्यांच्यापैकी एकाशींहि माझी गांठ पडली नाही." यावरून त्यांनी एवढेंच सुचविलें की, 'तिथे अशा व्यक्ति असतीलहि; पण हिमालयाशीं माझी खूप घसट असली तरी अशा व्यक्ति तिथे मला अजूनहि भेटल्या नाहीत.'

# सर्वधर्मपरिषद

( दि ड्यूब्यूक, आयोवा, 'टाइम्स', २९ सप्टेंबर १८९३ )

**जागतिक प्रदर्शन,** २८ सप्टेंबर (खास वृत्त)

सर्वधर्मपरिषदेंत असा मुद्दा उपस्थित झाला की, ज्यामुळे तीव्र कटुता उद्भवली. बाह्य सौजन्याचा पातळ पडदा टिकून होता खरा, पण तरीहि त्यामागे कडवट भावना होत्याच. रे० जोसेफ कुक यांनी हिंदूंवर तीव्र टीका केली व उलट त्यांच्यावरहि अधिक तीव्र टीका झाली. रे० कुक म्हणाले की, विश्वाची निर्मिति झाली नाही असें म्हणणें म्हणजे अक्षम्य मूर्खपणा होय; आणि आशियांतील प्रतिनिधींनी प्रत्युत्तर दिलें की, आरंभ असलेल्या विश्वाची कल्पना ही उघडच हास्यास्पद व अशक्य होय. बिशप जे. पी. न्यूमन यांनी ओहिओच्या तीरावरून जणु दुरून तोफ डागीत हल्ला केला की, पौर्वात्य प्रतिनिधींनी मिशनऱ्यांविरुद्ध विकृत माहिती पसरवून अमेरिकेंतील सर्व ख्रिस्त्यांचा अपमान केला आहे; आणि पौर्वात्य प्रतिनिधींनी, चीड आणण्याइतपत शांत राहून आणि किंचित् आढ्यतेने स्मित करून उत्तर दिलें की, 'हा बिशपमहाशयांचा निव्वळ भ्रमाचा भोपळा होय.'

**बौद्ध तत्त्वज्ञान**

सरळ प्रश्न विचारला असतां तीन विद्वान् बौद्धांनी अत्यंत सोप्या व सुंदर भाषेंत ईश्वर, मानव व जडवस्तु यांविषयी स्वतःच्या धर्माची पायाभूत तत्त्वें आमच्यापुढे मांडलीं.

[यानंतर धर्मपाल यांच्या 'बुद्धदेवांनी जगाला काय दिलें ?' ('The world's debt to Buddha') या निबंधाचा सारांश दिला आहे. इतरत्र मिळालेल्या माहितीवरून असें कळतें की, त्यांनी या निबंधापूर्वी सिंहली भाषेंत आशीर्वादपर एक गीत म्हटलें. नंतर 'टाइम्स' वर्तमानपत्र म्हणतें:—]

त्यांच्या (धर्मपालांच्या) भाषणाचा शेवट इतका सुंदर होता की, शिकागो येथील श्रोतृवृंदाने तसा क्वचितच ऐकला असेल. डेमॉस्थेनिसनेहि त्यावर कधी ताण केली नसेल.

## स्फोटक विधानें

हिंदु संन्यासी स्वामी विवेकानंद हे इतके सुदैवी नव्हते. ते अमळ चिडल्यासारखे होते; किंवा लवकरच तसे झालेले दिसले. त्यांनी नारिंगी झगा व फिकट पिवळा फेटा धारण केला होता. ख्रिस्ती राष्ट्रांवर एकाएकी त्यांनी पुढील शब्दांत भयंकर हल्ला चढविला —"पूर्वेकडून आलेले आम्ही इथे दररोज बसत आलों आहोंत व आम्हांला कृपाळूपणें सांगण्यांत आलें की, आम्ही ख्रिस्ती धर्म स्वीकारावा, कारण ख्रिस्ती राष्ट्रें हीं सर्वांहून जास्त भरभराटलेलीं राष्ट्रें आहेत. जेव्हा आम्ही आपल्या अवतीभोवती बघतों तेव्हा आम्हांला दिसून येतें की जगांत सर्वांहून अधिक उत्कर्षशाली असलेलें इंग्लंड हें जें ख्रिस्ती राष्ट्र आहे ते २५०, ०००, ००० आशियावासी लोकांना पायाखाली तुडवीत आहे. आम्ही इतिहासाचें सिंहावलोकन करतों आणि ख्रिस्ती युरोपचा उत्कर्ष स्पेनपासून सुरू झाला असें आम्हांला दिसतें. स्पेनच्या उत्कर्षाचा प्रारंभ मेक्सिकोवरील स्वारीपासून झाला. ख्रिस्तीधर्म आपला उत्कर्ष आपल्या बांधवांचे गळे कापून साधतो. या अशा मोलांत हिंदूंना आपला उत्कर्ष नको आहे."

आणि याच स्वरांत नंतरचे वक्ते बोलूं लागले; प्रत्येक वक्ता जणुकांही अधिकाधिक स्फोटक होऊं लागला.

* * * *

( **'आउटलुक', ७ ऑक्टोबर १८९३** )

... हिंदुस्थानांतील ख्रिस्त्यांचें कार्य हा विषय विवेकानंदांना बोलण्यासाठी उत्तेजित करतो. त्यांनी धर्माचार्याला शोभेशीं भडक नारिंगी वस्त्रें परिधान केलीं आहेत. ते ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्यावर टीका करतात. त्यांनी ख्रिस्तीधर्म समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही हें स्पष्ट आहे; पण, ते सांगतात त्याप्रमाणे, पाद्रीलोकांनी सुद्धा हजारो वर्षांपासून दृढमूल झालेल्या श्रद्धा व जातिविषयक विपरीत ग्रह असलेला त्यांचा धर्म बरोबर समजून घेण्याचा मुळीच प्रयत्न केलेला नाही. त्यांच्या (विवेकानंदांच्या) दृष्टीने ते पाद्री लोक केवळ त्यांच्या अति-

पवित्र अशा श्रद्धांचा तिरस्कार करण्यासाठी व ज्या लोकांना उपदेश करण्यासाठी ते (विवेकानंद) कटिबद्ध झाले आहेत त्यांच्या (हिंदुलोकांच्या) नीतिमत्तेला व धार्मिकतेला सुरुंग लावण्यासाठीच तेथे गेले आहेत.

* * * *

( 'क्रिटिक', ७ ऑक्टोबर १८९३ )

पण, संमेलनांतील सर्वांत प्रभावशाली व्यक्ति म्हणजे लंकेचे बौद्ध भिक्षु एच्. धर्मपाल व हिंदु संन्यासी सुआमी विवेकानंद हे होते. या दोहोंपैकी पहिले म्हणाले, "ईश्वरवाद व विशिष्ट मतमतान्तरें जर तुमच्या सत्यान्वेषणाच्या आड येत असतील, तर त्यांना बाजूला ठेवा. पूर्वग्रह सोडून विचार करायला शिका, प्राणिमात्रावर प्रेमासाठी प्रेम करायला, आपलीं दृढ मतें निर्भयपणें मांडायला व पवित्र जीवन जगायला शिका, आणि मग सत्याचा सूर्यप्रकाश तुम्हांला लाभेल.

जिच्यांतील यशस्वी उत्साहाला साजेसा शेवट 'अपोलो क्लब'ने गाइलेल्या 'हॅलेलुजाह' या सामूहिक गीताने झाला अशा त्या सभेंतील पुष्कळशीं छोटीं भाषणें जरी वक्तृत्वपूर्ण होतीं, तरी सर्वधर्मपरिषदेचा मूलभाव, तिच्या मर्यादा व तिचा प्रभाव हीं त्या हिंदु संन्याशाने जितक्या सुंदर रीतीने स्पष्ट केलीं तितकीं इतर कुणींहि केलीं नाहीत. मी त्यांचें भाषण समग्र उद्धृत करीत आहें; पण श्रोत्यांवरील त्याच्या परिणामाची मात्र केवळ अंधुकशी कल्पनाच फार तर मी देऊं शकेन; कारण, ईश्वरानेच त्यांना वक्तृत्वाचा अधिकार दिला आहे, आणि पिवळ्या व नारिंगी रंगांच्या पेहेरावाच्या वैचित्र्यपूर्ण पार्श्वभूमीने शोभून दिसणारा व बुद्धीचें तेज विलसत असणारा त्यांचा भरीव चेहरा हा त्यांच्या कळकळीच्या शब्दांपेक्षा व त्यांच्या घोसदार तालबद्ध उच्चारांपेक्षा यत्किंचितहि कमी आकर्षक नव्हता. . . . [स्वामीजींच्या समारोपाच्या भाषणाचा बराचसा भाग उद्धृत केल्यानंतर 'क्रिटिक' पत्र पुढे म्हणतें:—]

संभवतः सर्वधर्मपरिषदेचा सर्वांत अधिक दृश्य परिणाम म्हणजे परदेशांत कार्य करणाऱ्या ख्रिस्ती मिशन्सच्या बाबतींत तिने जागृत

केलेली प्रखर भावना हा होय. अर्धवट शिकलेल्या धर्मशास्त्राच्या विद्यार्थ्यांना ज्ञानी आणि विद्वान् अशा पौर्वात्यांना उपदेश देण्यासाठी पाठविण्यांतील उद्धटपणा पूर्वी कधीहि इतक्या प्रभावीपणें इंग्रजीभाषी श्रोत्यांना पटविला गेला नव्हता. फक्त सहिष्णुतेच्या व सहानुभूतीच्या भावनेनेच त्यांच्या धर्माला आपण स्पर्श करावयास हवा, आणि अशा गुणांनी युक्त असणारे प्रचारक विरळा आहेत, बौद्धांना आपल्या-पासून जितकें शिकण्यासारखें आहे तितकेंच आपल्यालाहि त्यांच्यापासून शिकण्यासारखें आहे. आणि त्याचप्रमाणे खराखुरा प्रभाव हा केवळ समसंवेदना व सहानुभूति यांच्या द्वारेंच पडूं शकतो हेंहि उमजून घेणें आवश्यक आहे.

**शिकागो, ३ ऑक्टोबर १८९३.** **ल्यूसी मन्रो**

* * * *

['न्यूयॉर्क वर्ल्ड'ने १ ऑक्टोबर १८९३ रोजीं "महान् सर्वधर्म-परिषदेच्या गर्भित अर्थासंबंधी आपली भावना किंवा विचार प्रकट करावे" अशी परिषदेच्या प्रत्येक धर्मप्रतिनिधीला विनंती केली. तिला उत्तर म्हणून स्वामीजींनी गीतेंतील एक उद्धरण व व्यासांचें एक उद्धरण पाठविलें:—]

"मी तो आहें की जो सर्व धर्मांत आहे—मोत्याच्या माळेंतील सूत्राप्रमाणे." "पवित्र, पूर्णत्वास पोहोचलेले व शुद्धहृदयी पुरुष सर्वच धर्मांत आढळतात, म्हणून ते सर्व धर्म एकाच सत्याप्रत आपल्याला घेऊन जातात हें उघड आहे—कारण, अमृत हें विषापासून कसें निपजेल ?"

## वैयक्तिक वैशिष्टयें

**( 'क्रिटिक', ७ ऑक्टोबर १८९३ )**

...या सर्वधर्मसंमेलनाने सिद्ध झालेल्या गोष्टींमुळे आम्हांला हें स्पष्ट दिसूं लागलें की, पुरातन धर्माच्या तत्त्वज्ञानांत आधुनिकांच्या

दृष्टीनेहि बरेंच सौंदर्य आहे. आम्हांला एकदा हें स्पष्ट उमगल्यावर त्या धर्माच्या उपदेशकांविषयीची आमची आवड बळावली आणि विशेष उत्सुकतेने आम्ही ज्ञानप्राप्तीच्या मार्गाला लागलों. संमेलन संपल्यावर तें ज्ञान मिळवावयाचा सोपा मार्ग म्हणजे, अजून इथे (या शिकागो शहरांत) असलेल्या स्वामी विवेकानंदाचीं भाषणें ऐकणें हा होय. या देशांत येण्याचें त्यांचें मूळ प्रयोजन म्हणजे हिंदु लोकांमधे नवीन उद्योगधंदे काढण्याबाबत अमेरिकन लोकांमधे रुचि निर्माण करणें हें होतें, पण सध्या तरी तो हेतु त्यांनी बाजूला ठेवला आहे; कारण त्यांनी ओळखलें की,"अमेरिकन लोक जगांत सर्वांत अधिक उदार आहेत" म्हणून ज्याच्यापुढे कांही उद्देश आहे असा प्रत्येक मनुष्य तो पूर्ण करण्यास मदत मिळविण्याकरिता इथे येतो. इथल्या आणि हिंदुस्थानांतील गरिबांच्या स्थितीसंबंधी विचारलें असतां ते म्हणाले की, तुमच्या येथील (अमेरिकेंतील) गरीब तेथे (हिंदुस्थानांत) राजपुत्र ठरतील; आणि ते पुढे म्हणाले की, मला या शहरांतील अत्यंत वाईट भागांतून फिरविलें असतां तो भाग, माझ्या माहितीप्रमाणे पाहिलें तर मला सुखकारक आणि आल्हादकारकसुद्धा वाटला.

सर्वोच्च प्रतीचे ब्राह्मण असून सुद्धा विवेकानंदांनी आपला सामाजिक दर्जा सोडून देऊन संन्यासाश्रम स्वीकारला; या संन्यासाश्रमांत जातीसंबंधीचा सर्व अभिमान स्वेच्छेने त्यागण्यांत येतो. आणि तरीहि ते उच्च जातीचे आहेत हें.त्यांना बघतांच दिसून येतें. त्यांची सुसंस्कृतता, त्यांचें वक्तृत्व आणि त्यांचें मोहक व्यक्तिमत्त्व यांनी आम्हांला हिंदु सभ्यतेविषयी एक नवीच दृष्टि दिली आहे. त्यांचें व्यक्तित्व आकर्षक आहे; त्यांच्या बुद्धीची चमक दाखविणारा, पिवळ्या फेट्याच्या कोंदणांतील त्यांचा चेहरा आणि त्यांचा गंभीर नादमधुर आवाज हे कुणालाहि तात्काळ प्रभावित करतात. तेव्हा यांत आश्चर्य नाही की, साहित्यिक संस्थांनी त्यांना पाचारण केलें, त्यांनी 'चर्चेस्' मधून भाषणें केलीं व उपदेश दिला, आणि या साऱ्यांमुळे बुद्धाचें चरित्र व त्याचीं धर्मतत्त्वें [?] यांचा आम्हांला चांगला परिचय झाला. ते टिपणांशिवाय भाषण करतात, आपले सिद्धान्त व निष्कर्ष अतिशय कौशल्याने आणि प्रभाव पाडणाऱ्या कळकळीने प्रतिपादन करतात; आणि

कधी कधी ते स्फूर्तिदायक आणि प्रभावी अशा वक्तृत्वाची चमक दाखवितात. एखाद्या व्युत्पन्न जेसुइटप्रमाणे ते विद्वान् व सुसंस्कृत दिसून येतात, आणि त्यांच्या ठायीं कांही अंशीं जेसुइटांचे गुणहि आहेत; पण त्यांच्या वक्तृत्वांत आढळणारा उपहास कट्यारीप्रमाणे तीक्ष्ण असला तरी, तो इतका सूक्ष्म असतो की बऱ्याचशा श्रोत्यांच्या ध्यानांतहि तो येत नाही. तरीपण त्यांचें सौजन्य कधीहि लोपत नाही, कारण त्यांचे वाक्प्रहार आपल्या चालीरीतींवर इतक्या उघडपणें रोखलेले नसतात की ते उग्र वाटावेत. सध्या ते आपल्या स्वतःच्या धर्माविषयी व त्यांतील तत्त्वज्ञांच्या शिकवणीविषयीच आम्हांला माहिती देत आहेत. ते अशा काळाची अपेक्षा करीत आहेत की, जेव्हा आपण, त्यांच्या मतें अडाणी लोकांसाठी आज आवश्यक असलेल्या मूर्तिपूजेच्या पलीकडे जाऊं, नव्हे कोणत्याहि प्रकारच्या पूजेच्या अतीत होऊं, आणि निसर्गांतील ईश्वराच्या अस्तित्वाचें आणि मनुष्याच्या ईश्वरी स्वरूपाचें व जबाबदारीचें ज्ञान प्राप्त करून घेऊं. बुद्धाच्या निर्वाणसमयींच्या शब्दांत ते म्हणतात, "स्वतःच स्वतःचा उद्धार करून घ्या. मी तुम्हांला साहाय्य करूं शकत नाही. कोणताहि माणूस तुम्हांला साहाय्य करूं शकत नाही. स्वतःच स्वतःला साहाय्य करा."

ल्यूसी मन्रो

## पुनर्जन्म

( 'इव्हॅन्स्टन इण्डेक्स', ७ ऑक्टोबर १८९३ )

मागील आठवड्यांत 'कॉंग्रिगेशनल चर्च'मधे एक व्याख्यानमाला गुंफण्यांत आली; तिचें स्वरूप बरेंचसें नुकत्याच संपलेल्या सर्वधर्मसंमेलनासारखें होतें. त्यांतील व्याख्याते स्वीडनमधील डॉ. कार्ल व्हॉन वर्जेन व हिंदु संन्यासी सुआमी विवेकानंद हे होते. . . .सुआमी विवेकानंद हे सर्वधर्मपरिषदेसाठी आलेले हिंदुस्थानांतील प्रतिनिधि होत.

त्यांनी आपल्या वैशिष्टयपूर्ण नारिंगी रंगाच्या पोषाखानें, आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वानें, ओजस्वी वक्तृत्वानें आणि हिंदु तत्त्वज्ञानाच्या सुंदर व अद्‌भुत विवेचनानें बरेंच लक्ष वेधून घेतलें. शिकागोमधील त्यांचें वास्तव्य म्हणजे त्यांच्यापक्षीं एक अव्याहत जयघोष होता. कॉंग्रिगेशनल चर्चमधील व्याख्यानें तीन दिवस चाललीं व तीं सायंकाळीं होत असत.

[शनिवारच्या व मंगळवारच्या संध्याकाळच्या भाषणांचे विषय, कुठलेंहि मत प्रकट न करतां नमूद केले आहेत. नंतर 'इव्हॅन्स्टन इंडेक्स' पुढे म्हणतें:--]

गुरुवारीं, दि. ५ ऑक्टोबर रोजीं सायंकाळीं डॉ. व्हॉन बर्जेन यांचें, " 'किंगज् डॉटर्स ऑफ स्वीडन' या संस्थेच्या संस्थापिका हुल्डाइन बीमिश ( Huldine Bemish )" या विषयावर, व हिंदु संन्याशाचें "पुनर्जन्म" या विषयावर भाषण झालें. यांपैकी दुसरें भाषण फार मनोरंजक झालें, कारण त्यांतील मतें जगाच्या या खंडांत फारशीं ऐकिवांत नाहीत. आत्म्याच्या पुनर्जन्माचें तत्त्व, या देशांत नवीन व साधारणत: न समजलेलें असलें तरी, तें पौर्वात्यांच्या प्राय: सर्वच धर्मांना आधारभूत असल्यानें त्यांना सुविदित आहे. तिकडील जे लोक धर्ममत म्हणून हें तत्त्व मानीत नाहीत, तेहि त्याच्या विरुद्ध बोलत नाहीत. या तत्त्वासंबंधी निश्चित करावयाचा मुख्य मुद्दा आहे-- आपलें भूतकाळांत अस्तित्व होतें काय ? आपल्याला वर्तमानकाळ आहे हें आपण जाणतों व भविष्यकाळांतील अस्तित्वासंबंधी आपल्याला खात्री वाटते. तरीहि भूतकाळाशिवाय वर्तमानकाळ हा कसा असूं शकेल ? आधुनिक विज्ञानानें सिद्ध केलें आहे की, जडाला अस्तित्व आहे व तें अखंडित आहे. उत्पत्ति ही केवळ रूपाचें परिवर्तन होय. आपली उत्पत्ति अभावांतून, शून्यांतून नाही. ईश्वर हा कांहींच्या मतें सर्व वस्तूंचें सामान्य कारण आहे, व हेंच वस्तूंच्या अस्तित्वाचें पुरेसें कारण आहे असें ते मानतात. पण जडाची उत्पत्ति कुठून आणि कशापासून झाली याचा आपण प्रत्येक गोष्टीच्या संबंधांत विचार केला पाहिजे. ज्या तर्कांनी भविष्य सिद्ध होतें, तेच तर्क भूतकालहि सिद्ध करतात. ईश्वरेच्छेव्यतिरिक्त इतर कारणें देखील असलीं पाहिजेत.

आनुवंशिकता हें पुरेसें कारण नाही कांहीजण म्हणतात की आपल्याला पूर्वजन्माचें ज्ञान नसतें. पण अशा पुष्कळ लोकांचीं उदाहरणें दिसून येतात की ज्यांना पूर्वजन्माची स्पष्ट स्मृति होती. आणि यांतच या तत्त्वाचें मूळ आहे. हिंदूंच्या मनांत मूकप्राण्यांसंबंधी दयाभाव असतो यावरून खालच्या कोटींतील प्राण्यांत आत्म्याचा पुनर्जन्म होतो अशी आमची (हिंदूंची) श्रद्धा आहे, असें पुष्कळांना वाटतें. मूकप्राण्यांविषयी वाटणारा दयाभाव हा खुळचट समजुतीखेरीज आणखी कांही असूं शकतो ही कल्पना करणें त्यांना अशक्य असते. वर नेतो तो धर्म अशी धर्माची व्याख्या एका प्राचीन हिंदु धर्माचार्याने केली आहे. (धर्मामुळे) पशुत्वाचें उच्चाटन होतें, मानवत्व हें देवत्वामधे परिणत होतें. पुनर्जन्माच्या तत्त्वानुसार मनुष्याचा जन्म या लहानशा पृथ्वीवरच होईल असें नाही. त्याचा आत्मा दुसऱ्या श्रेष्ठ लोकीं जाऊं शकतो; तिथे तो पांच सोडून आठ ज्ञानेंद्रियांनी युक्त असा श्रेष्ठ प्राणी बनूं शकतो, आणि असाच मार्ग आक्रमण करीत कालान्तराने तो पूर्णत्वाला, दिव्यत्वाला प्राप्त होईल व तो आनंदामृताचें पान करीत पूर्णतया आत्मविस्मृत होऊन 'कृतार्थ झालेल्या आत्म्यांच्या द्वीपांत (लोकांत) वास करील.

## हिंदु सभ्यता

[जरी ९ ऑक्टोबरच्या स्ट्रीएटर येथील व्याख्यानास उपस्थिति बरीच होती तरी त्या दिवशींच्या 'स्ट्रीएटर डेली फ्री प्रेस'मधे पुढीलप्रमाणे कांहीसा रुक्ष असा अहवाल आला.]

त्या प्रसिद्ध हिंदूचें शनिवारच्या रात्रींचें 'ऑपेरा हाऊस'मधील व्याख्यान फारच वेधक झालें. तुलनात्मक भाषाशास्त्राच्या आधाराने त्यांनी आर्यजाति व नवीन जगांतील (अमेरिकेंतील) तिचे वंशज यांचा पूर्वीपासून मान्य असलेला संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. तीनचतुर्थांश लोकांना गुलामीच्या अत्यंत लाजिरवाण्या स्थितींत ठेवणाऱ्या हिंदुस्थानांतील जातिभेदाला त्यांनी सौम्यपणें पाठिंबा दिला;

आणि अभिमानपूर्वक सांगितलें की, आजचा हिंदुस्थान तोच हिंदुस्थान आहे की ज्याने शतकानुशतकें जगांतील राष्ट्ररूपी धूमकेतु क्षितिजावर क्षणमात्र चमकून विस्मृतींत विलीन होतांना पाहिले आहेत. भारतांतील इतर लोकांप्रमाणेच ते भूतकाळावर प्रेम करतात. ते स्वतःसाठी नव्हे, तर ईश्वरासाठी जगत आहेत. जरी त्यांनी आपल्या व्याख्यानांत तसें स्पष्टपणें सांगितलें नाही तरी त्यांच्या देशांत भिकारी व भटक्या लोकांना महत्त्व देण्यांत येतें. भोजन तयार झालें की, ते कुणाच्या तरी येण्याची वाट बघत असतात व कुणी आला की, त्याला प्रथम जेवूं घालण्यांत येतें आणि मग जनावरें, नोकरचाकर व घरांतील कर्तापुरुष हे जेवतात आणि सर्वांच्या शेवटीं गृहिणी जेवते. मुलें दहा वर्षांचीं झालीं की त्यांना गुरुगृहीं दहा ते वीस वर्षें ठेवण्यांत येतें, तेथील शिक्षण संपल्यावर त्यांना आपला पूर्वीचा धंदा करण्यासाठी परत पाठविण्यांत येतें, किंवा ते परत गेल्यानंतर पैशाला कधीहि स्पर्श न करतां खाण्या-लेण्यास जें मिळेल तें स्वीकारून, साधना करीत करीत उपदेशकाचें अखंड भटकें जीवन अंगिकारतात. विवेकानंद हे या दुसऱ्या वर्गांत मोडतात. वृद्धापकाल आला असतां लोक संसारापासून दूर जातात, आणि कांही काळ अध्ययन व उपासना इत्यादि करून स्वतः पवित्र झालों असें वाटल्यावर ते सुद्धा धर्माचा प्रचार करण्यासाठी भ्रमण करतात. त्यांनी प्रतिपादिलें की बौद्धिक विकासासाठी बराचसा फुरसतीचा काळ आवश्यक असतो. कोलंबसाला रानटी अवस्थेंत आढळलेल्या 'रेड इंडियन' लोकांना शिक्षण न दिल्याबद्दल त्यांनी अमेरिकन लोकांचे वाभाडे काढले. असें करण्यांत त्यांनी वस्तुस्थितीसंबंधी आपलें अज्ञान प्रकट केलें. त्यांचें भाषण दुर्दैवाने फारच तोकडें झालें व त्यांत त्यांनी जें सांगितलें त्यापेक्षा अधिक महत्त्वाचें जें होतें तें सांगायचें राहिलें असें वाटतें.†

† या ना त्या कारणांमुळ अमेरिकन वृत्तपत्रें स्वामीजींच्या व्याख्यानांविषयी नेहमीच उत्साह, सहानुभूति व आस्था दाखवीत नसत हें वरील वृत्तावरून स्पष्ट होतें.

## एक मनोरंजक व्याख्यान

( 'विस्कॉन्सिन स्टेट जर्नल', २१ नोव्हेंबर १८९३ )

काल रात्रीं [मॅडिसन येथील] 'कॉंग्रिगेशनल चर्च'मधे झालेलें हिंदु संन्यासी स्वामी विवेकानंद यांचें भाषण अत्यंत मनोरंजक होतें आणि त्यांत उत्कृष्ट तत्त्वज्ञान आणि चांगलीं धर्मतत्त्वें यांचें त्यांनी विवेचन केलें. ते मूर्तिपूजक असले तरी त्यांचे बरेचसे उपदेश ख्रिस्ती धर्माने अनुसरावे असेच होते. त्यांचें धर्ममत विश्वाइतकें विशाल आहे आणि त्यांत सर्व धर्मांचा समावेश होतो, व जिथे जिथे म्हणून सत्य आढळेल त्याचा तें स्वीकार करतें. धर्मान्धता, अंधविश्वास आणि निरर्थक अनुष्ठानें यांना "हिंदुस्थानांतील धर्मा"मधे स्थान नाही असें ते म्हणाले.

## हिंदु धर्म

( 'मिनिॲपॉलिस स्टार', २५ नोव्हेंबर १८९३ )

काल सायंकाळीं [मिनिॲपॉलिस येथील] 'फर्स्ट युनिटेरियन चर्च'मधे स्वामी विवेकानंदांनी हिंदु धर्म विशद करून सांगितला. ब्राह्मणी धर्मामधे ( Brahminism मधे ) प्राचीन आणि सत्यपूर्ण अशीं तत्त्वें असल्यामुळे त्यांत एकप्रकारचें सूक्ष्म आकर्षण आहे. आणि म्हणून या धर्मासंबंधीचें भाषण श्रोत्यांनी अत्यंत एकाग्र चित्ताने ऐकलें. त्या श्रोतृवर्गांत चिंतनशील महिला आणि पुरुष होते; कारण 'पेरिपॅटेटिक्स' (ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानाचे अनुयायी) यांनी व्याख्यात्यांना निमंत्रण दिलें होतें; व त्यांच्या बरोबरच या सुवर्णसंधीचा लाभ घेणाऱ्या त्यांच्या मित्रांमधे निरनिराळ्या पंथांचे धर्मगुरु, तसेंच विद्यार्थी व विद्वान् मंडळीहि होती. विवेकानंद हे एक ब्राह्मण पुरोहित आहेत व आपल्या देशाच्या पद्धतीप्रमाणे डोक्यावर फेटा, लाल कमरपट्ट्याने कसलेला नारिंगी रंगाचा झगा व लाल अधोवस्त्र असा

पेहराव करून ते व्यासपीठावर बसले होते.

सावकाश व स्पष्टपणें बोलून, जलद हावभाव व हातवाऱ्यांपेक्षा भाषणांतील शांतपणाने त्यांनी आपलीं धर्मतत्त्वें कळकळीने प्रतिपादन केलीं व श्रोत्यांना पटवून दिलीं. त्यांचे शब्द काळजीपूर्वक तोललेले असून प्रत्येक शब्द आपला अर्थ स्पष्टपणें व्यक्त करीत होता. त्यांनी हिंदु धर्मांतील सहजगम्य सत्यें पुढे मांडलीं; आणि ख्रिस्ती धर्माबद्दल जरी ते कांहीहि कठोर बोलले नाहीत, तरी त्यांनी त्याचा अशा रीतीने उल्लेख केला की त्यामुळे ब्रह्मधर्म सर्वश्रेष्ठ ठरावा. हिंदुधर्माचा सर्वव्यापी भाव व त्याचें मुख्य तत्त्व म्हणजे आत्म्याचें स्वाभाविक दिव्य स्वरूप हें होय. आत्मा हा पूर्णस्वरूप आहे आणि धर्म म्हणजे मानवांत आधीपासूनच वास करणाऱ्या ईश्वरत्वाचा आविष्कार होय. वर्तमान ही भूत व भविष्य यांतील केवळ सीमारेखा होय. आणि मानवांत वसणाऱ्या दोन प्रवृत्तींपैकी शुभ प्रवृत्ति जर बळावली तर तो उच्चतर' अवस्थेस प्राप्त होईल. आणि जर अशुभ प्रवृत्ति बळावली तर त्याचा अध:पात होईल. या दोन्ही त्याच्या अंतरंगांत सतत कार्य करीत असतात; त्याचा उद्धार करतें तें पुण्य होय आणि त्याचा अध:पात करतें तें पाप होय.

कानंद उद्या सकाळीं 'फर्स्ट युनिटेरियन चर्च'मधे भाषण देतील.

* * * *

( 'डेस् मॉइनिस् न्यूज', २८ नोव्हेंबर १८९३ )

अतिदूरच्या हिंदुस्थानांतील विद्वान् पंडित स्वामी विवेकानंद यांनी काल रात्रीं (२७ नोव्हेंबर रोजी) 'सेंट्रल चर्च'मधे भाषण दिलें. शिकागो येथे जागतिक प्रदर्शनाच्या निमित्ताने नुकत्याच झालेल्या सर्वधर्मपरिषदेला ते आपला देश व धर्म यांचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते. रे. एच्. ओ. ब्रीडेन यांनी श्रोतृवर्गाला व्याख्यात्यांचा परिचय

करून दिला. ते उठले, आणि श्रोतृवृंदाला वंदन करून, त्यांनी आपल्या भाषणास आरंभ केला. भाषणाचा विषय होता—'हिंदु धर्म'. त्यांचें भाषण कोणत्याहि एखाद्या विचारसरणीपुरतें मर्यादित नव्हतें, तर त्यांत त्यांनी त्यांचा स्वत:चा धर्म व इतर धर्म यांविषयीचे त्यांचे स्वत:चे तत्त्वज्ञानात्मक विचार पुढे मांडले. त्यांच्या मतें पूर्ण ख्रिस्ती होण्यासाठी सर्व धर्मांचा अंगीकार करणेंच आवश्यक आहे. जें एका धर्मांत आढळत नाही तें इतर धर्मांतून प्राप्त होतें. ते सर्व धर्म सत्य आहेत आणि खऱ्या ख्रिस्त्यासाठी ते आवश्यकहि आहेत. जेव्हा एखादा धर्मप्रचारक तुम्ही आमच्या देशांत पाठवितां तेव्हा तो हिंदु ख्रिश्चन होतो व मी ख्रिश्चन हिंदु बनतों. या देशांत मला बरेचदा विचारण्यांत येतें की मी या देशांतील लोकांचें धर्मान्तर करण्याचा प्रयत्न करणार आहे काय ? मी हा माझा अपमान समजतों. माझा या धर्मान्तराच्या कल्पनेवर विश्वास नाही.‡ आज आपल्यापुढे एक पापी माणूस आहे. उद्या तुमच्या कल्पनेप्रमाणे त्याचें धर्मान्तर झालें आणि हळूहळू तो पवित्र होऊं लागला. हें परिवर्तन कुठून येतें ? याविषयी तुमचें काय स्पष्टीकरण आहे ? त्या माणसांत नवीन आत्मा आलेला नाही, कारण, तसें मानल्यास त्याचा जुना आत्मा मृत व्हावयास हवा. तुम्ही म्हणतां की त्याचें परिवर्तन ईश्वराने केलें. ईश्वर हा पूर्ण आहे, सर्वशक्तिमान आहे, साक्षात् पावित्र्यच आहे. मनुष्याचें धर्मान्तर झाल्यावर त्याला पवित्र करण्यासाठी ईश्वराने आपलें कांही पावित्र्य दिलें व त्या प्रमाणांत ईश्वराचें पावित्र्य कमी झालें असें म्हणावें लागेल. आमच्या देशांत दोन शब्द असे आहेत की ज्यांना या देशांतील अर्थापेक्षा अगदी वेगळाच अर्थ आहे. ते म्हणजे 'धर्म' आणि 'पंथ' हे दोन शब्द होत. आमचें मत असें आहे की 'धर्मां'त सर्व धर्मांचा समावेश होतो. आम्ही असहिष्णुतेव्यतिरिक्त सर्वच बाबतींत सहिष्णु आहोंत. त्यानंतर दुसरा शब्द म्हणजे 'पंथ'. या शब्दाने अशा मधुरभाषी लोकांचा निर्देश

‡ असें दिसतें की, जरी कांही ठिकाणीं स्वामीजींचें धर्मान्तरासंबंधीचें मत आकलन करण्यांत प्रस्तुत वार्ताहर सपेशल अयशस्वी ठरला, तरी त्याने, स्वामीजींच्या मतांशीं परिचित असलेल्या वाचकाला त्यांच्या भाषणांतील अर्थ लक्षांत येण्याइतपत अहवाल सादर केला आहे.

होतो की जे स्वतःला उदार समजून म्हणतात -- "आम्ही बरोबर आहोंत; तुम्ही चूक आहांत." यावरून मला त्या दोन बेडकांच्या गोष्टीची आठवण होते. एक बेडूक एका विहिरींत जन्माला आला व जन्मभर तिथेच राहिला. एके दिवशीं समुद्रांतील एक बेडूक त्या विहिरींत येऊन पडला व ते दोघे मग समुद्राविषयी बोलूं लागले. ज्याचें घर विहिरींत होतें त्या बेडकाने पाहुण्याला विचारलें, "समुद्र किती मोठा आहे ?" पण त्याला समाधानकारक उत्तर मिळालें नाही. मग विहिरींतील बेडकाने विहिरीच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत उडी मारली व त्याने पाहुण्याला विचारलें, "इतका मोठा आहे समुद्र ?" तो म्हणला, "होय". त्या बेडकाने परत उडी मारली व तो म्हणाला--"इतका मोठा आहे समुद्र ?" आणि होकारार्थी उत्तर मिळाल्यानंतर तो स्वतःशींच म्हणाला, "हा बेडूक खोटाडचा असला पाहिजे, मी याला माझ्या विहिरींतून घालवून देईन". ह्या पंथांची अशीच तऱ्हा आहे. जे त्यांच्याचसारखा विश्वास ठेवीत नाहीत त्यांना ते घालवून देण्याचा आणि त्यांचा छळ करण्याचा प्रयत्न करतात.

## हिंदु संन्यासी

( 'अपील अॅव्हलांच', १६ जानेवारी १८९४ )

आज रात्रीं [मेंफिस येथे] 'ऑडिटोरियम'मधे ज्यांचें भाषण आहे ते हिंदु संन्यासी स्वामी विवेकानंद हे आजवर या देशांतील धार्मिक व्यासपीठावर आलेल्या किंवा इतरहि वक्त्यांपैकी एक अत्यंत उत्कृष्ट वक्ते आहेत. त्यांचें अतुलनीय वक्तृत्व, गूढ विषयांचें त्यांचें सखोल ज्ञान, वादविवादांतील त्यांचें कौशल्य, आणि त्यांचो पराकाष्ठेची कळकळ यांनी जागतिक प्रदर्शनांतील सर्वधर्मपरिषदेला हजर असलेल्या जगांतील चिंतनशील व्यक्तींचें लक्ष उत्कटतेने वेधून घेतलें; आणि संयुक्त संस्थानांतील पुष्कळ ठिकाणीं झालेल्या त्यांच्या

व्याख्यानाच्या दौऱ्यांत ज्यांनी त्यांचीं भाषणें ऐकलीं अशा हजारो लोकांकडून त्यांना प्रशंसा प्राप्त झाली.

त्यांचें संभाषण अत्यंत मधुर असतें; त्यांनी निवडलेले शब्द म्हणजे इंग्रजी भाषेंतील रत्नेंच असतात, आणि त्यांची सर्वसाधारण चालचलणूक त्यांना पाश्चिमात्य पद्धति व रीतिभाती यांनी सुसंस्कारित झालेल्या लोकांच्या मालिकेंत बसविते. त्यांचा सहवास अत्यंत गोड असतो आणि संभाषणाच्या बाबतींत पाश्चिमात्य जगांतील कोणत्याहि शहरांतील दिवाणखान्यांत त्यांच्यावर मात करणारा कदाचित् कोणीहि सापडणार नाही. ते इंग्रजी केवळ स्पष्टपणेंच नव्हे तर अस्खलितपणें बोलतात, आणि जितके नावीन्यपूर्ण तितकेच ओजस्वी असे त्यांचे विचार त्यांच्या जिव्हाग्रावरून आलंकारिक भाषेच्या अत्यंत विस्मय-कारक ओघाबरोबर स्रवत असतात.

आपल्या आनुवंशिक धर्माच्या किंवा बालपणीं मिळालेल्या शिकव-णुकीच्या योगानें स्वामी विवे कानंद ब्राह्मण म्हणून वाढले, पण हिंदु धर्म स्वीकारून त्यांनी आपला उच्च दर्जा सोडून ते हिंदु पुरोहित, किंवा पौर्वात्य विचारांच्या देशाच्या भाषेंत सांगायचें म्हणजे संन्यासी बनले. ईश्वरविषयक अत्यंत उच्च धारणेंतून निसर्गाकडे बघितल्यास त्यांत आढळणाऱ्या विस्मयकारक गोष्टींचा व घटनांचा ते नेहमीच सखोल अभ्यास करीत आले आहेत; आणि त्या पौर्वात्य देशांतील उच्च महाविद्यालयांत विद्यार्थी व शिक्षक या दोन्ही नात्यांनी कित्येक वर्षें घालविल्यामुळे त्यांनी असें ज्ञान प्राप्त करून घेतलें आहे की ज्यायोगें त्यांची या युगांतील एक सर्वोत्कृष्ट चिंतनशील विद्वान् म्हणून जगभर ख्याति झाली आहे.

जागतिक प्रदर्शनांतील सर्वधर्मपरिषदेच्या सदस्यांपुढे झालेल्या त्यांच्या पहिल्याच भाषणाने धर्मचिंतकांच्या त्या महान् समूहाचे एक नेते म्हणून ते तत्क्षणींच ठरविले गेले. परिषद सुरू असतांना आपल्या धर्माच्या बाजूने ते वरेचदा बोलले, आणि आपल्या भाषणांत मानवाच्या मानवासंबंधीच्या व मानवाच्या ईश्वरासंबंधीच्या उच्चतर कर्तव्यांचें चित्रण करीत असतां, इंग्रजी भाषेला भूषणास्पद ठरणारीं कांही अति-सुंदर व दार्शनिक रत्नें त्यांच्या मुखांतून बाहेर पडलीं. ते विचारांत

कलाकार आहेत, श्रद्धेंत ध्येयवादी आहेत, आणि व्यासपीठावर अभिनेता आहेत.

मेंफिसमधे त्यांचें आगमन झाल्यापासून ते श्री. ह्यू. एल्. ब्रिकले यांचे अतिथि आहेत. त्यांच्याविषयी आदरभाव दर्शविण्याची इच्छा करणाऱ्या मेंफिसमधील बऱ्याच लोकांनी तिथे दिवसा व सायंकाळीं त्यांची भेट घेतली. ते 'टेनेसी क्लब'चे अनौपचारिक पाहुणे आहेत व शनिवारीं सायंकाळीं श्रीमती एस्. आर. शेफर्ड यांनी केलेल्या स्वागताचेहि ते पाहुणे होते. रविवारीं या प्रसिद्ध पाहुण्याच्या सन्मानार्थ कर्नल आर. बी. स्नोडेन यांनी 'ॲनेसडेल' येथे आपल्या घरीं भोजन दिलें. तिथे त्यांची असिस्टंट बिशप थॉमस एफ्. गेलर, रे. डॉ. जॉर्ज पॅटर्सन व इतर बऱ्याच धर्मगुरूंशीं भेट झाली.

काल तिसऱ्या प्रहरीं 'नाइन्टीन्थ सेंच्युरी क्लबा'च्या अनेक संभावित आणि प्रागतिक सभासदांपुढे 'रँडॉल्फ बिल्डिंग'मधील क्लबाच्या दिवाणखान्यांत त्यांनी भाषण दिलें. आज 'ऑडिटोरियम'-मधे त्यांचें 'हिंदु धर्म' या विषयावर भाषण होईल.

## सहिष्णुत्वाची आवश्यकता

( 'मेंफिस कमर्शियल', १७ जानेवारी १८९४ )

सुप्रसिद्ध हिंदु संन्यासी स्वामी विवेकानंद यांचें स्वागत करण्यासाठी आणि 'हिंदु धर्मा'वरील त्यांचें भाषण ऐकण्यासाठी काल रात्रीं 'ऑडिटोरियम'मधे बऱ्याच मोठ्या संख्येने श्रोतृवृंद उपस्थित होता.

न्यायमूर्ति आर्. जे. मॉर्गन यांनी छोटयाशाच पण माहितीपूर्ण अशा आपल्या प्रास्ताविक भाषणांत त्यांचा परिचय करून दिला. त्यांत त्यांनी थोर अशा आर्यवंशाच्या विकासासंबंधीचा आराखडा देऊन त्या विकासांतून युरोपियन मानववंश व हिंदु मानववंश हे दोन्ही कसे निर्माण झाले हें विशद केलें आणि याप्रमाणे अमेरिकेंतील लोक व त्यांच्यापुढे व्याख्यानास उभे असलेले हे व्याख्याते यांच्यांत वांशिक

संबंध असल्याचें दाखवून दिलें.

त्या विख्यात पौर्वात्याचें टाळ्यांच्या प्रचंड गजरांत स्वागत करण्यांत आलें, आणि त्यांचें संपूर्ण भाषण लक्षपूर्वक आणि आवडीने ऐकण्यांत आलें. त्यांचें बाह्य रूप सुंदर आहे, त्यांचा चेहरा गव्हाळ वर्णाचा असून रेखीव आहे आणि त्यांचें शरीर प्रमाणबद्ध आहे. काळ्या कमरपट्ट्याने आवळलेला गुलाबी रंगाचा रेशमी झगा, काळ्या रंगाची तुमान आणि डोक्यावर डौलदार रीतीने बांधलेला पिवळा हिंदी रेशमी साफा हा त्यांचा पोषाख होता. भाषण देण्याची त्यांची शैली अतिशय चांगली असून शब्दांची निवड व व्याकरणशुद्ध वाक्यरचना यांच्या दृष्टीने त्यांची इंग्रजी भाषा अगदी निर्दोष आहे. कधी कधी चुकीच्या अक्षरावर जोर देऊन शब्दोच्चार करणें हाच केवळ त्यांच्या उच्चारांतील दोष म्हणतां येईल. दक्ष श्रोत्यांनी मात्र बहुधा कुठलेच शब्द सोडले नाहीत, आणि त्यांच्या दक्षतेचा त्यांना पुरेपूर लाभहि झाला, कारण मौलिक विचार, माहिती आणि विशाल ज्ञान यांनी ओतप्रोत भरलेलें भाषण त्यांना ऐकायला मिळालें. हिंदुस्थानांतील धर्मासंबंधीचीं मतें ज्यांत उदाहरणांदाखल घेतलीं होतीं असें तें भाषण म्हणजे सार्वजनीन सहिष्णुत्वाचें समर्थनच होतें असें यथार्थपणें म्हणतां येईल. त्यांनी प्रतिपादिलें की, ही भावना——सहिष्णुत्वाची आणि प्रेमाची ही भावना——सर्व खऱ्या धर्मांची मध्यवर्ती प्रेरक शक्ति होय; आणि त्यांच्या मतें हेंच सर्व धर्मांचें साध्य होय.

हिंदुधर्माविषयीचें त्यांचें भाषण फारसें सविस्तर नव्हतें. त्यांतील आख्यानोपाख्यानांची कहाणी किंवा त्याच्या विभिन्न अनुष्ठानांचें चित्र रेखाटण्यापेक्षा त्याच्या सारभूत भावाचें विवरण करण्याचा त्यांचा सर्वसाधारण प्रयत्न होता. आपल्या धर्माच्या कांही थोड्या तात्त्विक व अनुष्ठानात्मक वैशिष्ट्यांवरच त्यांनी प्रकाश टाकला. पण तीं मात्र त्यांनी अत्यंत स्पष्टपणें व सहजगम्य पद्धतीनें विशद केलीं. बहुधा जिचें विकृत स्पष्टीकरण दिलें जातें अशा पुनर्जन्माच्या कल्पनेला जन्म देणाऱ्या हिंदु धर्माच्या गूढ अनुभूतिविषयक तत्त्वांचा त्यांनी सुस्पष्ट आढावा घेतला. आपला धर्म कालाचे भेद कसे मानीत नाही हें सांगून त्यांनी असेंहि प्रतिपादिलें की, ज्याप्रमाणे सर्व लोक आत्म्याच्या वर्तमान व भविष्य काळावर

विश्वास ठेवतात त्याचप्रमाणे ब्रह्मधर्म हा त्याच्या भूतकाळावर विश्वास ठेवतो. त्यांनी हेंहि स्पष्ट केलें की, त्यांचा धर्म 'मूळचें पाप' (Original sin) मानीत नाही; परंतु मानव पूर्णत्व प्राप्त करूं शकतो या विश्वासावर त्यांच्या धर्माची संपूर्ण आकांक्षा व प्रयत्न हीं आधारलेलीं आहेत. त्यांच्या मतें आत्मविकास आणि आत्मशुद्धि हीं या आशेवरच अधिष्ठित हवींत. मानवाचा विकास म्हणजे मूळच्या पूर्णस्वरूपाकडे परत जाणेंच होय. पावित्र्य व प्रेम यांच्या साधनेंतून हें पूर्णत्व प्राप्त करून घ्यावयास हवें. त्यांच्या देशबांधवांनी या गुणांसाठी कशी साधना केली हें त्यांनी वर्णन करून सांगितलें. तसेंच, ज्यांच्यावर अत्याचार झाले आहेत अशा लोकांना हिंदुस्थान कसा आश्रय देत आला आहे हें, टायटसने जेरुसलेम उध्वस्त केल्यानंतर व तेथील मंदिर धुळीस मिळवल्यानंतर हिंदूंनी यहुद्यांचें स्वागत केल्याचें उदाहरण देऊन त्यांनी स्पष्ट केलें.

बाह्य अनुष्ठानांवर हिंदु अधिक जोर देत नाहीत हें त्यांनी सविस्तर वर्णन करून सांगितलें. कधी कधी कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति वेगवेगळ्या पंथांची अनुयायी असेल, पण सर्वजण त्या एकाच प्रेमस्वरूप ईश्वराची पूजा करतील. हिंदु असें मानतात की सर्वच धर्मांत चांगलें आहे; सर्व धर्म म्हणजे पावित्र्य प्राप्त करण्यासाठी मानवाच्या प्रेरणेचीं मूर्तस्वरूपें होत आणि ते तसे असल्याने ते सर्वच आदरास पात्र आहेत, असें ते म्हणतात. याचें उदाहरण म्हणून त्यांनी वेदांतील [?] एक वचन घेतलें. ह्यांत, निरनिराळे धर्म म्हणजे जणुकांही निरनिराळ्या लोकांनी एकाच झऱ्यांतून पाणी आणण्यासाठी घेतलेलीं निरनिराळ्या आकारांचीं भांडीं होत असें म्हटलें आहे. भांड्यांचे आकार वेगवेगळे आहेत, पण सर्वजण आपापल्या भांड्यांत एकच सत्यरूपी जल भरून घेत असतात. त्यांच्या मतें, ईश्वराला सर्व प्रकारचे धर्म माहीत आहेत, व त्याला कोणत्याहि नांवाने संबोधिलें किंवा त्याची कोणत्याहि प्रकारें उपासना केली तरी तो आपलें नांव ओळखीलच.

ते पुढे म्हणाले की, ख्रिस्ती लोक ज्या ईश्वराची पूजा करतात त्याच ईश्वराची पूजा हिंदुहि करतात. हिंदूंची ब्रह्मा, विष्णु, शिव ही

त्रयी म्हणजे ईश्वराचीं उत्पत्तिकर्ता, संरक्षणकर्ता व विनाशकर्ता अशीं केवळ तीन रूपें होत. ह्या तिघांना एक न समजतां तीन समजलें जातें हा प्रमादच होय, व ह्याचें कारण केवळ हेंच की सर्वसाधारण मानवाला नीतितत्त्वें (धर्म) हीं स्थूल, मूर्त रूपांत हवीं असतात. याचप्रमाणे हिंदूंच्या पार्थिव मूर्ति ह्या केवळ दैवी गुणांचीं प्रतीकें होत.

हिंदूंच्या अवतारवादाचें विवरण करून सांगतांना त्यांनी देह-संबंध न घडतां जन्मलेल्या कृष्णाची कथा सांगितली, व येशूंच्या कथेशीं तिचें कसें सादृश्य आहे हेंहि सांगितलें. ते असें म्हणतात की, प्रेमा-साठीच प्रेम ही कृष्णाची शिकवण आहे, आणि ती त्यांनी पुढील शब्दांत व्यक्त केली--"ईश्वराची भीति हा जर धर्माचा प्रारंभ असेल तर ईश्वराविषयी प्रेम ही त्याची परिणति होय."

त्यांच्या संपूर्ण भाषणाची रूपरेखा सांगणें या ठिकाणीं शक्य नाही; पण भ्रातृप्रेमासाठी तें एक अत्युत्कृष्ट आवाहन होतें, एका सुंदर धर्माचें तें वक्तृत्वपूर्ण समर्थन होतें. उपसंहार तर अतिशयच सुंदर होता. त्यांत त्यांनी 'ख्रिस्तांना स्वीकारण्याची माझी तयारी आहे, पण त्यांच्याबरोबरच मी कृष्ण व बुद्ध यांच्या पुढे नतमस्तक होईनच' असें सांगितलें, आणि सभ्यतेच्या क्रौर्याचें सुंदर चित्रण करतांना 'प्रगती'नें केलेल्या गुन्ह्यांसाठी ख्रिस्ताला जबाबदार धरण्याचें त्यांनी नाकारलें.

# हिंदुस्थानांतील चालीरीती

('अपील अॅव्हेलांच,' २१ जानेवारी, १८९४)

हिंदु संन्यासी स्वामी विवे कानंद यांनी काल सायंकाळीं [मेंफिस येथील] 'ला सॅलेट अॅकॅडेमी' येथे भाषण दिलें. मुसळधार पावसामुळे फार थोडे श्रोते उपस्थित होते.

विवेचनाचा विषय 'हिंदुस्थानांतील चालीरीति' हा होता. विवे कानंद हे धर्मविषयक असे सिद्धान्त सादर करतात की ते अमेरिकेंतील या व इतर शहरांतील कांही अतिशय प्रगत अशा चिंतकांच्या मनावर

एकदम ठसतात.

त्यांचे सिद्धान्त ख्रिस्ती उपदेशकांनी उपदेशिलेल्या सनातनी मतांना विघातक आहेत. मूर्तिपूजक हिंदुस्थानांतील लोकांचीं झाकळलेलीं मनें प्रकाशित करण्यासाठी ख्रिस्ती अमेरिकेचा उत्कट प्रयत्न सुरू आहे; पण असें दिसतें की कानंदांच्या धर्माच्या प्राच्य तेजाने आपल्या वाडवडिलांनी उपदेशिलेल्या जुन्या ख्रिस्ती धर्माच्या सौंदर्याला अगदी निष्प्रभ करून टाकलें आहे आणि अमेरिकेंतील अधिक सुशिक्षित अशा कांही लोकांच्या मनांत त्याच्या वाढीस सुपीक क्षेत्र मिळेल.

हें 'खुळां'चें युग आहे आणि कानंद यांनी 'बऱ्याच दिवसांची उणीव' भरून काढलेली दिसते. बहुधा ते आपल्या देशांतील अतिशय विद्वानांतील एक आहेत, आणि त्यांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षक आहे. त्यांचे श्रोते त्यांच्या प्रवाही वक्तृत्वाने मुग्ध होतात. त्यांचीं मतें उदार असलीं तरी सनातनी ख्रिस्ती धर्मांत त्यांना प्रशंसनीय असें कांही दिसत नाही. मेंफिस शहराला आतापर्यंत ज्यांनी भेट दिली अशा प्रायः कोणत्याहि व्याख्यात्यापेक्षा किंवा धर्माचार्यापेक्षा कानंदांनी या शहरांतील लोकांचें अधिक लक्ष वेधून घेतलें आहे.

या हिंदु संन्याशाचें इथे जेवढें प्रेमाने स्वागत केलें जात आहे तेवढें हिंदुस्थानांत जाणाऱ्या धर्मप्रचारकाचें केलें जाईल, तर मूर्तिपूजक देशांत ख्रिस्तांची शिकवण पसरविल्याचें कार्य बरेंच पुढे जाईल. काल सायंकाळचें त्यांचें भाषण ऐतिहासिक दृष्टीने मनोवेधक असें होतें. फार प्राचीन काळापासून तों आधुनिक काळापर्यंतचा त्यांच्या देशाचा इतिहास आणि परंपरा यांच्याशीं ते पूर्णतः परिचित आहेत; आणि तेथील पाहण्यासारख्या निरनिराळ्या स्थळांचें व वस्तूंचें वर्णन ते सहजसुंदरपणें करूं शकतात.

त्यांचें भाषण चाललें असतां श्रोतृवृंदांतील महिलांनी त्यांना वारंवार थांबवून प्रश्न केले; व त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें त्यांनी चट्कन दिलीं. याला एकच अपवाद होता, व तो म्हणजे ज्या वेळीं एका महिलेने त्यांना धार्मिक वादविवादांत खेचण्याच्या हेतूने प्रश्न केला त्या वेळीं त्यांनी आपल्या मूळच्या विषयापासून दूर जाण्याचें नाकारलें, व प्रश्नकर्त्रीला सांगितलें की, 'आत्म्याचा पुनर्जन्म' इत्यादि विषयां-

संबंधीचीं माझीं मतें मी मग केव्हा तरी व्यक्त करीन.'

आपलीं मतें व्यक्त करतांना ते म्हणाले, "माझ्या आजोबांचा विवाह वयाच्या तिसऱ्या वर्षीं झाला होता व माझ्या वडिलांनी अठराव्या वर्षीं विवाह केला होता, पण मीं स्वतः मात्र लग्नच केलें नाही." संन्याशाला विवाह करण्याची मनाई नाही [?] पण त्याने विवाह केला तर त्याची पत्नी त्याच्याइतकेच अधिकार व हक्क प्राप्त करून संन्यासिनी होते व तिला तिच्या पतीचाच सामाजिक दर्जा प्राप्त होतो.†

एका प्रश्नाचें उत्तर देतांना ते म्हणाले की, हिंदुस्थानांत कोणत्याहि कारणांसाठी घटस्फोट प्रचलित नाही; पण चौदा वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर संतति झाली नाही, तर पत्नीच्या अनुमतीने पतीला दुसरा विवाह करतां येतो; पण तिची अनुमति नसेल तर त्याला तसा विवाह करतां येत नाही. प्राचीन कबरी व मंदिरें यांचें त्यांनी केलेलें वर्णन अनुपम व सुंदर असें होतें. आणि त्यावरून हें सिद्ध होतें की प्राचीन लोकांचें शास्त्रीय ज्ञान हल्लीच्या अतिशय कुशल कारागिरांपेक्षा देखील फार श्रेष्ठ प्रतीचें होतें.

या शहरांत स्वामी विवि कानंद हे 'वाय्. एम्.एच्.ए.' सभागृहांत आज रात्रीं शेवटचें भाषण देतील. या देशांत तीन वर्षांचा व्याख्यानांचा दौरा करण्याबाबत त्यांचा शिकागो येथील 'स्लेटन लिसियम ब्यूरो'शीं करार झाला आहे. उद्या ते शिकागोला प्रयाण करतील. तिथे त्यांचा दि. २५ रोजीं रात्रीं कार्यक्रम आहे.

* * * *

('डेट्रॉइट ट्रिब्यून', १५ फेब्रुवारी१८९४)

काल रात्रीं 'युनिटी क्लबच'या विद्यमानें 'युनिटेरिअन चर्च' मधे

† संन्याशाच्या विवाहाविषयीचें स्वामीजींना चिकटविलेलें हें विचित्र मत त्यांनी प्रतिपादिलें असणें असंभवनीय आहे. ही वार्ताहराची चूक आहे हें उघडच होय, कारण संन्याशानें विवाह केला तर हिंदुसमाज त्याला पतित मानतो व त्याला बहिष्कृत करण्यांत येतें हें प्रसिद्धच आहे.

झालेल्या भाषणप्रसंगीं ब्राह्मसमाजाचे [?] हिंदु संन्यासी स्वामी विवेकानंद यांना बघण्याचा व त्यांचें भाषण ऐकण्याचा सुयोग बऱ्याच श्रोत्यांना प्राप्त झाला. ते आपल्या देशी पेहरावांत उपस्थित होते आणि आपला सुंदर चेहरा व भरदार आकृति यांमुळे ते आकर्षक दिसत होते. त्यांच्या वक्तृत्वाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून सोडलें व त्यांनी वारंवार टाळ्या मिळविल्या.

'हिंदुस्थानांतील चालीरीति' या विषयावर त्यांनी भाषण दिलें व त्या विषयाचें प्रतिपादन त्यांनी पूर्णपणें निर्दोष अशा इंग्रजींत केलें. त्यांनी सांगितलें की त्यांच्या देशांतील लोक स्वतःच्या देशाला 'इंडिया' म्हणत नाहीत व स्वतःला 'हिंदु'हि म्हणत नाहीत. देशाचें नांव हिंदुस्थान हें आहे व तेथील लोक ब्राह्मण [?] आहेत. प्राचीन काळीं ते संस्कृत भाषा बोलत असत. त्या भाषेंत शब्दाची व्युत्पत्ति व त्याचा अर्थ आधारासहित स्पष्ट केला जाई; पण आता तें सारें लोपलें आहे. 'ज्युपिटर'चा अर्थ संस्कृतांत 'आकाशांतील पिता' असा आहे. उत्तर हिंदुस्थानांतील सर्व भाषा आता साधारणतः सारख्याच आहेत, पण जर देशाच्या दक्षिण भागांत ते गेले तर त्यांना लोकांशीं संभाषण करण्याची पंचाईत पडेल. 'फादर' (वडील), 'मदर'(आई), 'सिस्टर' (बहीण), 'ब्रदर' (भाऊ) इत्यादि शब्दांचे संस्कृतमधील प्रतिशब्द प्रायः सारख्याच उच्चाराचे आहेत. ह्या व इतर गोष्टींवरून त्यांचें मत असें आहे की आपण सर्वजण 'आर्य' ह्या एकाच सामान्य वंशाचे आहोंत. या वंशाच्या जवळजवळ सर्वच शाखांना आपलें मूळ कोणतें आहे याचा विसर पडला आहे.

हिंदुस्थानांत चार वर्ण आहेत— पुरोहित, जमीनदार व योद्धे, व्यापारी, आणि कारागीर, श्रमिक व सेवकवर्ग. पहिल्या तीन वर्णांतील मुलांना वयाच्या अनुक्रमें दहाव्या, अकराव्या व तेराव्या वर्षी विद्यापीठांतील आचार्यांकडे पाठविण्यांत येतें व तीं त्यांच्याकडे अनुक्रमें तीस, पंचवीस व वीस वर्षांचीं होईपर्यंत राहतात. . .प्राचीन काळीं मुलें व मुलीं दोहोंनाहि शिक्षण दिलें जाई, पण आता केवळ मुलांनाच ही संधि मिळते. पण फार काळापासून होत आलेली ही चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न मात्र आता होत आहे. रानटी लोकांचें राज्य

येण्यापूर्वी प्राचीन काळीं देशांतील तत्त्वज्ञान व समाजशासन यांचा बराचसा भाग स्त्रियांनी निर्मिला होता. हिंदूंना अलीकडे वाटतें की स्त्रियांना अधिकार असावेत. स्त्रीला आता विशिष्ट स्थान लाभलें आहे व कायदाहि तिच्याच बाजूचा आहे. विद्यालयांतून परतल्यावर विद्यार्थी विवाह करून गृहस्थाश्रमी होऊं शकतो. पति व पत्नी दोघांनी मिळून कामाचा भार घेतला पाहिजे व दोघांनाहि त्यांचे त्यांचे अधिकार आहेत. क्षत्रियवर्णांतील मुली बहुधा आपले पति निवडूं शकतात; पण इतर सर्व वर्णांत लग्न जुळविणें वगैरे सर्वकांही आईवडीलच पार पाडतात. बालविवाहाची प्रथा दूर करण्यासाठी, आता अखंड प्रयत्न सुरू आहेत. विवाहसमारंभ फारच सुंदर असतो; एकमेकांच्या हृदयाला स्पर्श करून जमलेल्या समुदायापुढे व देवापुढे ते शपथ घेतात की ते परस्पराशीं एकनिष्ठ राहतील. विवाह केल्याशिवाय कोणीहि पुरोहित होऊं शकत नाही. सार्वजनिक पूजेला उपस्थित राहतांना तो नेहमी आपल्या पत्नीसमवेत तिथे जात असतो. पूजा करतांना हिंदु पांच प्रकारचे विधि करतो— देवपूजा, पितृपूजा, गरिबांची पूजा, मूक प्राण्यांची पूजा व विद्यापूजा. हिंदूंच्या घरांत जोंवर कांही आहे, तोंवर अतिथीला कशाचीच उणीव पडत नाही. जेव्हा तो संतुष्ट होतो, तेव्हा आधी मुलें, नंतर पिता व नंतर माता अन्न ग्रहण करतात. हिंदुस्थान हें जगांतील अत्यंत गरीब असें राष्ट्र आहे; तरीहि, दुष्काळाखेरीज इतर वेळीं कुणीहि भुकेने मरत नाही. सभ्यता ही एक मोठी गोष्ट आहे खरी, पण तुलनात्मक दृष्टीने असें प्रतिपादण्यांत आलें की, इंग्लंडमधे दर ४०० लोकांपैकी एकजण दारूबाज असतो, तर हिंदुस्थानांत दहा लाखांमधे एक हें प्रमाण आहे. मृताच्या दहनविधीचें वर्णन करण्यांत आलें. एखाद्या मोठ्या माणसाची गोष्ट सोडली तर इतर कुणाच्याहि बाबतींत गाजावाजा केला जात नाही. पंधरा दिवसांच्या उपवासानंतर मृत व्यक्तीचे नातेवाईक पितरांच्या नांवाने गरिबांना दान करतात किंवा एखादी संस्था उभारण्यासाठी देणग्या देतात. नीतीच्या बाबतींत इतर राष्ट्रांपेक्षा ते फारच श्रेष्ठ आहेत.

# हिंदु तत्त्वज्ञान

('डेट्रॉइट फ्री प्रेस,' १६ फेब्रुवारी १८९४)

हिंदु संन्यासी स्वामी विवेकानंद यांचें दुसरें भाषण काल रात्रीं 'युनिटेरियन चर्च' मधे विशाल श्रोतृसमूहापुढे झालें व त्यांना तें फार आवडलें. व्याख्यानाचा विषय लक्षांत घेतां "हिंदु तत्त्वज्ञाना'वर कांही प्रकाश टाकला जाईल ही श्रोत्यांची अपेक्षा मर्यादित स्वरूपांतच पूर्ण झाली. बौद्ध तत्त्वज्ञानाचा उल्लेख करण्यांत आला, आणि ज्या वेळीं व्याख्यात्यांनी सांगितलें की "बौद्ध धर्म हा जगांतील पहिला प्रचारक धर्म होय, व त्याने रक्ताचा एक बिंदूहि न सांडतां सगळ्यांत जास्त लोक आपल्या धर्मांत आणले" त्या वेळीं श्रोत्यांनी टाळ्या वाजविल्या. पण त्यांनी बुद्धांचा धर्म किंवा त्यांचें तत्त्वज्ञान यांसंबंधी श्रोत्यांना कांहीच सांगितलें नाही. त्यांनी ख्रिस्ती धर्माला बऱ्याच वेळां सूक्ष्म असे चिमटे काढले; व मूर्तिपूजक देशांत झालेल्या त्याच्या प्रवेशाने उत्पन्न झालेली अशांतता व दु:ख यांचाहि त्यांनी उल्लेख केला; पण स्वत:च्या देशांतील लोक व ज्यांच्यापुढे ते भाषण करीत होते ते अमेरिकेंतील लोक यांच्या सामाजिक स्थितींची तुलना करण्याचें त्यांनी कौशल्याने टाळलें. सर्वसाधारणपणें त्यांनी सांगितलें की हिंदु तत्त्वज्ञांनी खालच्या प्रतीच्या सत्यापासून सुरुवात करून उच्चतर सत्यासंबंधी उपदेश केला आहे; पण ख्रिस्ती धर्म नव्याने स्वीकारणाऱ्या कोणत्याहि माणसाला आपले जुने धर्मविश्वास पूर्णत: सोडून देऊन नवीन धर्म पूर्णपणें स्वीकारण्यास सांगण्यांत येतें, किंवा त्याने तसें करावें अशी अपेक्षा करण्यांत येते. ते म्हणाले, "आपणां सर्वांची एकाच प्रकारचीं धार्मिक मतें होणें हें एक निष्फळ स्वप्न आहे. परस्परविरोधी विचारांचें मनावर कार्य झाल्याशिवाय कोणतीहि [जोरकस धार्मिक] भावना उत्पन्न होऊं शकत नाही. एकामागून एक होणारीं विभिन्न परिवर्तनें, नवीन ज्ञान, नवीनाचा जुन्याशीं संपर्क

यांमुळेच संवेदना [धार्मिक अनुभूति] उद्भवतात.

[पहिल्या भाषणाने कांही लोकांत विरोध उत्पन्न केल्यामुळे 'फ्री प्रेस'च्या वार्ताहराने फारच आखडता हात घेतला होता; परंतु, सुदैवाने 'डेट्रॉइट ट्रिब्यून'ने स्वामीजींची सतत बाजू घेतली आणि म्हणून, 'ट्रिब्यून'च्या वार्ताहराचीं टिपणें कांहीशीं त्रोटक असलीं तरीहि, १६ फेब्रुवारीच्या त्यांतील पुढील वृत्तावरून त्यांच्या 'हिंदु तत्त्वज्ञान' या विषयावरील भाषणाची कांहीशी कल्पना येते:——]

('डेट्रॉइट ट्रिब्यून', १६ फेब्रुवारी १८९४)

ब्राह्मण संन्यासी स्वामी विवे कानंद यांचें काल सायंकाळीं 'युनिटेरियन चर्च'मधे परत भाषण झालें. भाषणाचा विषय 'हिंदु तत्त्वज्ञान' हा होता. व्याख्यात्यांनी कांही वेळ सर्वसामान्य तत्त्वज्ञान व अध्यात्म यासंबंधी विवेचन केलें; पण ते म्हणाले की, व्याख्यानांत ते मुख्यत: धार्मिक बाजूसंबंधी बोलतील. असा एक पंथ आहे की, जो आत्म्यावर विश्वास ठेवतो, पण ईश्वरासंबंधी अज्ञेयवादी आहे. बुड्डा [बौद्ध] धर्म हा एक थोर नैतिक धर्म होय; पण त्याचा ईश्वरावर विश्वास नसल्यामुळे तो फार काळ टिकूं शकला नाही. दुसरा 'जायंट' [जैन] नांवाचा पंथ आत्म्यावर विश्वास ठेवतो, पण प्रचलित नैतिक विधिनिषेधांवर विश्वास ठेवीत नाही. या पंथाचे लक्षावधि लोक हिंदुस्थानांत आहेत. त्यांचे पुरोहित व संन्यासी आपल्या चेहऱ्यावर रुमाल बांधतात, कारण त्यांचा असा विश्वास आहे की त्यांचा उष्ण श्वास कुणा माणसाला किंवा पशूला लागला तर मृत्यु ओढवतो [?]

सनातन्यांपैकी सर्वांचाच ईश्वरी ज्ञानाच्या आविष्कारावर [वेदांवर] विश्वास आहे. कांहींना वाटतें की, धर्मग्रंथांमधील प्रत्येक शब्द साक्षात् ईश्वरापासून आला आहे. अधिकांश धर्मांमधे शब्दाचा अर्थ कदाचित् ताणला जाऊं शकेल, पण हिंदूंच्या धर्मग्रंथांची भाषा संस्कृत आहे व तिच्यांतील शब्दांचा अर्थ व त्यांची व्युत्पत्ति

हीं नेहमी अपरिवर्तित राहतात.

आपल्याला माहीत असलेल्या आपल्या पांच ज्ञानेंद्रियांहून अत्यंत श्रेष्ठ असें एक सहावें ज्ञानेंद्रिय आहे असें ते प्रसिद्ध प्राच्य (स्वामी विवेकानंद) मानतात. तें म्हणजे सत्यानुभूतीचें इंद्रिय होय. एखादा मनुष्य जगांतील धर्मपर अशीं सर्व पुस्तकें वाचील आणि तरीहि तो देशांतील सर्वांत अधिक दुष्ट असेल. वेद म्हणजे नंतर ग्रथित करून ठेवलेले आध्यात्मिक शोध होत.

कांहींचें मत आहे की सृष्टि ही आदि-अंतरहित आहे. समजा, अशी वेळ होती की जेव्हा विश्व अस्तित्वांत नव्हतें. त्या वेळीं ईश्वर काय करीत होता ? हिंदूंच्या मतें सृष्टि ही रूपांची बनलेली आहे. एखादा माणूस सशक्त शरीरानिशीं जन्मास येतो, तो कुलीन असतो आणि पुढे तो देवमाणूस होतो. दुसरा एखादा माणूस पंगु व व्यंग-युक्त शरीराने जन्माला येतो आणि पुढे दुष्ट बनतो व त्याला त्याचें फळ भोगावें लागतें. न्यायी व पवित्र अशा ईश्वराने एकाला इतक्या सुखसोयींनी युक्त व दुसऱ्याला इतक्या दुःखांनी युक्त असें कसें निर्माण केलें ? मनुष्याला स्वतःची निवड नाही. पाप करणाऱ्यांना आपल्या गुन्ह्यांची जाणीव असते. पुण्य व पाप यांतील भेद त्यांनी स्पष्ट करून सांगितला. ईश्वराच्या इच्छेनेच सर्व गोष्टी होतात असें मानलें तर सर्व विज्ञानाचा अंत होईल. मनुष्याची किती अधोगति होऊं शकते ? माणूस परत पशुयोनींत जाणें शक्य आहे काय ?

स्वतः हिंदु असल्याबद्दल कानंदांना आनंद वाटतो. जेव्हा रोमन लोकांनी जेरुसलेम उध्वस्त केलें तेव्हा हजारो लोक [यहुदी] हिंदु-स्थानांत येऊन त्यांनी तेथें वसती केली. जेव्हा अरबांनी पारशी लोकांना त्यांच्या देशांतून बाहेर घालवून दिलें तेव्हा हजारोंना त्याच हिंदुस्थान देशांत आसरा मिळाला आणि तेथे त्यांच्यापैकी कुणावरहि अत्याचार झाले नाहीत. सर्व धर्म सत्य आहेत, पण आपला धर्म सर्वांत प्राचीन आहे, असा हिंदूंचा विश्वास आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांना हिंदु कधीहि त्रास देत नाहीत. सर्वप्रथम आलेल्या इंग्लिश मिशनऱ्यांना इंग्रजांनी हिंदुस्थानांत उतरण्यास मनाई केली होती, पण त्यांच्यासाठी मध्यस्थी करून त्यांना प्रथम मदत करणारा एक हिंदुच होता. जो सर्वांवर

विश्वास ठेवतो तोच धर्म होय. धर्माची तुलना आंधळे व हत्ती यांच्याशीं करण्यांत आली. प्रत्येक आंधळयाने हत्तीचा एकेक विशिष्ट भाग चाचपडला व त्यावरून, हत्ती म्हणजे काय याचा कयास बांधला. आपापल्या परीने प्रत्येकजण वरोवर होता; पण संपूर्ण हत्तीची कल्पना येण्यासाठी सर्वच कयासांची आवश्यकता होती. हिंदु दार्शनिक म्हणतात, "आपण सत्याकडून सत्याकडे, खालच्या प्रतीच्या सत्याकडून उच्चतर सत्याकडे जात असतों." जे असें म्हणतात की, केव्हाना केव्हा सर्वचजण एकाचप्रकारें विचार करतील ते एक निष्फळ स्वप्नच बघत असतात, कारण तसें झाल्यास धर्माचा मृत्युच ओढवेल. प्रत्येक धर्मांतून भिन्न भिन्न पंथ निर्माण होतात, आणि त्यांपैकी प्रत्येकाचा दावा असतो की तोच सत्य आहे व इतर सर्व असत्य आहेत. बुद्धा [?] धर्माला छळ करणें माहीत नाही. सर्वप्रथम त्यांनीच बाहेर धर्म-प्रचारक पाठविले व केवळ तेच असे आहेत की ज्यांनी रक्ताचा एक थेंबहि न सांडतां लक्षावधि लोकांचें धर्मान्तर केलें. दोष व अंधविश्वास यांनी युक्त असूनहि हिंदु कधीच धर्मासाठी दुसऱ्याचा छळ करीत नाहीत. 'ख्रिस्ती देशांत सर्वत्र आढळणारी विषमता ख्रिस्ती लोक कशी चालूं देतात ?'—असा प्रश्न व्याख्यात्यांनी विचारला.

## चमत्कार

( 'इव्हिनिंग न्यूज,' १७ फेब्रुवारी १८९४ )

चमत्काराविषयी लिहिलेला 'न्यूज' पत्राचा अग्रलेख जेव्हा त्यांना दाखविला गेला तेव्हा त्या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला स्वामी विवेकानंद म्हणाले, "माझ्या धर्माचें प्रमाण म्हणून मी एखादा चमत्कार करून दाखवावा ही 'न्यूज' पत्राची विनंति मी मान्य करूं शकत नाहीं. प्रथमत: मी चमत्कार करणारा माणूस नव्हे, आणि दुसरें असें की ज्या शुद्ध हिंदु धर्माचा मी पुरस्कार करतों तो चमत्कारांवर आधारित नाही. आम्ही चमत्कार ही वस्तु मानीत नाहीं, आपल्या पंचेंद्रियां-

पलीकडील राज्यांत कांही आश्चर्यकारक गोष्टी घडतात, पण त्यांचें संचालन कोणत्या तरी नियमाने होतेंच. आमच्या धर्माला त्यांच्याशीं कांहीच कर्तव्य नाही. हिंदुस्थानांत घडणाऱ्या व परदेशांतील वृत्त-पत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या अधिकांश चमत्कारकथा म्हणजे हातचलाखीचे किंवा नजरबंदीचे खेळ असतात. हे चमत्कार ज्ञानी लोकांनी केलेले नसतात. हे लोक पैशासाठी बाजारांत चमत्कार करीत देशभर भटकत फिरत नाहीत. ज्यांच्या ठिकाणीं बालिश उत्सुकता नसते असे सत्या-न्वेषण करणारे लोकच त्यांचें दर्शन घेऊं शकतात किंवा त्यांना जाणूं शकतात.

## मानवाचें देवत्व

( 'डेट्रॉइट फ्री प्रेस,' १८ फेब्रुवारी १८९४ )

हिंदु तत्त्वज्ञ आणि पुरोहित स्वामी विवेकानंद यांनी काल रात्रीं 'युनिटेरियन चर्च'मधे 'ईश्वराचें देवत्व'‡ या विषयावर भाषण देऊन आपल्या भाषणमालेचा किंवा उपदेशमालेचा समारोप केला. हवा वाईट असूनसुद्धा, ते पौर्वात्य बंधु---हें संबोधन त्यांना आवडतें-- येण्याच्या अर्धा तास आधी, चर्च जवळजवळ दारांपर्यंत अगदी गच्च भरलें होतें. लक्षपूर्वक भाषण ऐकणाऱ्या त्या श्रोतृसमुदायांत सर्व प्रकारच्या व्यवसायांचे आणि उद्योगधंद्यांचे लोक उपस्थित होते. त्यांत वकील, न्यायाधीश, ख्रिस्ती धर्मगुरु, व्यापारी व एक यहुदी धर्मगुरु हे होते. आणि ज्यांचें खाजगी बैठकींतील आकर्षण सार्वजनिक व्यास-पीठावरील त्यांच्या सामर्थ्याइतकेंच प्रबळ आहे अशा त्या सावळ्या पाहुण्यांसंबंधी ज्यांनी वारंवार उपस्थित राहून व एकाग्रतेने त्यांचें भाषण ऐकून आपली निश्चित व आदरपूर्ण अनुकूलता व्यक्त केली आहे, अशा अनेक स्त्रियाहि तिथे उपस्थित होत्याच.

‡ खरें म्हणजे विषय होता 'मानवाचें देवत्व' म्हणजेच 'मानवाचें दिव्य स्वरूप'.

काल रात्रीचें भाषण पूर्वीच्या भाषणांपेक्षा कमी वर्णनात्मक होतें; आणि साधारणत: दोन तासपर्यंत विवेकानंद यांनी मानवी व दैवी गोष्टींसंबंधी तात्त्विक विवेचन केलें आणि तें इतकें तर्कशुद्ध होतें की, त्यामुळे विज्ञान हें सामान्य व्यवहारज्ञानाप्रमाणे सुलभ भासलें. त्यांच्या मायदेशांत हातांनी तयार केलेल्या व अतिशय मोहक अशा पौर्वात्य सौरभाने सुगंधित झालेल्या नानारंगी वस्त्राइतकाच आकर्षक व मनन करण्यास रमणीय असा पुष्कळशा चमकदार रंगांनी भरलेला सुंदर तर्कांचा पट त्यांनी विणला. एखाद्या कलाकाराने रंग वापरावे तसाच हे सावळे वक्ते काव्यकल्पनांचा वापर करतात, आणि रंगछटा अगदी योग्य त्याच ठिकाणीं भरतात; या सर्वांचा वैचित्र्यपूर्ण असा प्रभाव पडतो, आणि तरीहि त्यांत एक विलक्षण मोहिनी असते. एकामागून एक भराभर निघणारे तर्कसंगत निष्कर्ष कॅलिडोस्कोप यंत्रांतील रेखीव व बहुरंगी आकृत्यांप्रमाणे आकर्षक होते, आणि त्या कुशल कलावंताला त्याच्या कसबाबद्दल वेळोवेळीं टाळ्यांच्या उत्साहपूर्ण कडकडाटाचें पारितोषिक मिळत होतें.

व्याख्यानाच्या सुरवातीला सांगण्यांत आलें की, व्याख्यात्याला बरेच प्रश्न विचारण्यांत आले आहेत. त्यांपैकी बऱ्याचशा प्रश्नांचीं उत्तरें खाजगी रीत्या देण्याचें त्यांनी इष्ट मानलें, पण तीन प्रश्नांचीं उत्तरें त्यांनी व्यासपीठावरून देण्याचें ठरविलें. याचें कारण पुढे कळेलच. ते प्रश्न असे होते:—

"हिंदुस्थानांतील लोक आपलीं मुलें सुसरींच्या तोंडांत फेकतात काय ?"

"ते जगन्नाथाच्या रथाखाली जीव देतात काय ?"

"ते स्त्रियांना त्यांच्या पतीबरोबर जाळतात काय ?"

न्यूयॉर्कच्या रस्त्यावरून भटकणाऱ्या रेड इंडियन माणसासंबंधी किंवा युरोपांत अजूनहि खऱ्या समजल्या जाणाऱ्या असल्याच इतरहि दंतकथांसंबंधी विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें, परदेशांत गेलेला एखादा अमेरिकन माणूस जसा देईल त्याच स्वरांत व्याख्यात्यांनी पहिल्या प्रश्नाचें उत्तर दिलें. हें विधान इतकें हास्यापद होतें की तें गंभीर उत्तर देण्याच्या लायकीचें नव्हतें. जेव्हा कांही अजाण लोकांनी

सद्हेतुपूर्वक विचारलें की हिंदुस्थानांतील लोक केवळ मुलीच सुसरींना कां अर्पण करतात, तेव्हा त्यांनी तसेंच उपरोधपूर्ण उत्तर दिलें की, त्या अज्ञानांधकारांत पिचणाऱ्या देशांत नदींतील प्राण्यांना सहजपणें चर्वण करतां येणाच्या दृष्टीने मुली बहुधा अधिक मऊ व कोवळया असाव्यात. जगन्नाथाच्या रथाविषयीच्या दंतकथेसंबंधी बोलतांना व्याख्यात्यांनी त्या पवित्र शहरांतील ही पुरातन चाल स्पष्ट करून सांगितली, आणि म्हटलें की कदाचित् दोर धरण्याच्या व रथ ओढण्यांत भाग घेण्याच्या उत्साहांत कांहीजण घसरून पडून मरत असतील. अशा प्रकारच्या कांही अपघातांच्या अतिशयोक्त वृत्तान्तांचें विकृत वर्णन ऐकून इतर देशांतील भल्या लोकांच्या अंगावर शहारे येतात. विधवा स्त्रियांना जाळण्यांत येतें हें खोटें आहे असें विवेकानंदांनी सांगितलें. पण हें मात्र खरें की, विधवा स्वत:ला जाळून घेत. ज्या थोडया बाबतींत असें घडलें त्या वेळींहि तसें न करण्याबद्दल, नेहमीच आत्महत्येविरुद्ध असलेले पुरोहित व धर्मपरायण लोक त्यांना सांगत. पतिव्रता जेव्हा आग्रह धरत की त्यांना पति जिथे गेला आहे तिथे जावयाचें आहे तेव्हा त्यांना अग्निदिव्य करण्यास भाग पाडण्यांत येत असे. अर्थात् त्यांनी त्यांचे हात ज्वालांमधे धरायचे व ते त्यांनी पूर्ण जळून जाऊं दिले तर मग पुढे त्यांच्या इच्छापूर्तींत कोणताहि अडथळा आणण्यांत येत नसे. पण हिंदुस्थान हा कांही एकच देश नव्हे की ज्यांत पतीवर प्रेम करणाऱ्या स्त्रिया आपल्या प्रिय पतीच्या मागोमाग अमृतत्त्वाच्या राज्यांत गमन करत्या झाल्या; अशा बाबतींत आत्महत्या प्रत्येक देशांत झाल्या आहेत. कोणत्याहि देशांतील हें कृत्य म्हणजे कांहीशा लोकोत्तर अशा हेकेखोरपणाचेंच होय. या गोष्टी इतर देशांत जेवढया विरळा आहेत तेवढयाच त्या हिंदुस्थानांतहि आहेत. व्याख्यात्यांनी पुन्हा सांगितलें की, 'नाही, हिंदुस्थानांतील लोक स्त्रियांना जाळत नाहीत; आणि त्यांनी कधी चेटकिणींनाहि जाळलें नाही.'*

* युरोपमधे मध्ययुगांत ख्रिस्ती लोकांमधे जादू व चेटकावरील विश्वास बराच वाढलेला दिसतो. एखाद्या खेडयांत जी सर्वांत वृद्ध स्त्री असेल ती चेटकी असावयाचीच असा विश्वास असे! समुद्रावरील वादळें, लढाया वगैरे चेटकी स्त्रियाच उत्पन्न करतात अशी समजूत असे व त्यामुळे अशा सार्वजनिक आपत्तीं-

व्याख्यानाच्या मुख्य विषयाकडे वळून विवेकानंदांनी मानवाच्या शरीर, मन व आत्मा या तीन घटकांचे विश्लेषण करण्यास सुरवात केली. शरीर हें केवळ कवच आहे; मन हें किंचित् कार्यशील असून तें केवळ आभास निर्माण करीत असतें, आत्म्याला स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व आहे. आत्म्याच्या अनंत स्वरूपाचा साक्षात्कार करून घेणें म्हणजेच मुक्ति होय. ज्याला आपण 'साल्व्हेशन' (उद्धार) म्हणतों त्यालाच हिंदु लोक 'मुक्ति' म्हणतात. खात्री पटेल अशा तर्कपद्धतीने व्याख्यात्यांनी सांगितलें की, प्रत्येक आत्मा स्वतंत्र असतो, कारण जर तो परतंत्र असता तर त्याला अमरत्व प्राप्त होऊं शकलें नसतें. व्यक्तीला याचा साक्षात्कार कशा रीतीने होतो हें स्पष्ट करण्यासाठी त्यांनी आपल्या देशांतील एक प्राचीन आख्यान उदाहरणादाखल घेतलें. एका मेंढीवर झडप घालीत असतांनाच एका सिंहिणीनें एका छाव्याला जन्म दिला. सिंहीण मेली आणि त्या मेंढीने त्या छाव्याला स्तनपान दिलें, व त्या छाव्याला बरींच वर्षे असेंच वाटत राहिलें की मी मेंढीच आहें, व त्याप्रमाणे तो वागत असे. पण एके दिवशीं दुसरा सिंह आला आणि त्याने त्या पहिल्या सिंहाला एका तलावावर नेलें. पहिल्या सिंहाने पाण्यांत पाहिलें तों त्याला आपण दुसऱ्या सिंहासारखे आहोंत असें आढळून आलें. त्या वेळीं त्याने गर्जना केली व त्याला स्वतःच्या महिमान्वित स्वरूपाचें ज्ञान झालें. पुष्कळ लोक त्या मेंढीप्रमाणे वागणाऱ्या सिंहासारखे असतात. ते एका कोपऱ्यांत दडून राहतात, स्वतःला पापी म्हणवितात व सर्वप्रकारें स्वतःला नीच लेखतात, कारण ते स्वतःच्या आत्म्याचें पूर्णत्व व दिव्यत्व जाणत नाहीत. स्त्रीचा व पुरुषाचा 'अहं' हा वस्तुतः आत्मा होय. जीवात्मा जर स्वतंत्र असता, तर त्याला अनंत समष्टीपासून कसें वेगळें करतां आलें असतें ? ज्याप्रमाणे सूर्य जलाशयावर प्रकाशतो आणि असंख्य प्रतिबिंबें निर्माण होतात, तद्वतच बिंबभूत परमात्मा एकच आहे हें जरी मानलें व कळूं शकलें तरी जीवात्मे हे प्रतिबिंबां-

च्या प्रसंगीं वृद्ध स्त्रियांचें जीवित विशेष धोक्यांत असे; कारण त्यांस चेटकी समजून तावडतोब जिवंत जाळण्यांत येत असे. जोन ऑफ आर्क या शूर स्त्रीला इंग्रजांनी चेटकी म्हणून जाळल्याचें उदाहरण इतिहासप्रसिद्धच आहे.

प्रमाणे वेगवेगळे आहेत. आत्मा हा लिंगभेदरहित आहे. पूर्ण मुक्तीची अवस्था अनुभवल्यानंतर त्याला मग शरीराशीं संबद्ध अशा लिंगभेदाशीं काय कर्तव्य ? या संदर्भांत व्याख्यात्यांनी स्वीडनबर्गच्या तत्त्वज्ञाचें अथवा धर्माचें सखोल विवेचन केलें; आणि हिंदु मत व त्यापेक्षा अधिक आधुनिक असलेल्या स्वीडनबर्गचें अध्यात्मविषयक मत यांचा परस्परसंबंध पूर्णत: स्पष्ट झाला. स्वीडनबर्ग हा प्राचीन हिंदु पुरोहिताचा युरोपीय वारसदार आहे असें वाटलें. त्याने पुरातन मतांना आधुनिक पेहराव दिला आहे असें प्रतीत झालें. हीच गोष्ट फ्रान्समधील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ व कादंबरीकार [बाल्झॅक ?] याला पूर्णात्म्यासंबंधीच्या आपल्या उदात्त कथेंत ग्रथित करणें इष्ट वाटलें. व्यक्तिमात्राच्या ठिकाणीं पूर्णत्व वास करीत असतें. त्याच्या शरीरांतील अंत:करणरूपी गुहेंत तें वसत असतें. ईश्वराने आपल्या पूर्णत्वाचा अंश एखाद्या माणसाला दिला म्हणून तो माणूस चांगला झाला असें म्हणणें म्हणजे अशी कल्पना करण्यासारखें आहे की, ईश्वर म्हणजे त्याने पृथ्वीवरील मानवाला दिलेला पूर्णत्वाचा अंश वजा करून उरलेला देव आहे. विज्ञानाचा अनुल्लंघनीय नियम सिद्ध करतो की आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व असून पूर्णत्व त्याच्या ठायींच वसत असलें पाहिजे. या पूर्णत्वाची प्राप्ति म्हणजेच मोक्ष होय. सामान्य अर्थाने ज्याला उद्धार (सॅल्व्हेशन) म्हणतात तशा प्रकारचा हा मोक्ष नाही. मोक्ष म्हणजे स्वत:च्या अनंतस्वरूपाचा साक्षात्कार होय. प्रकृति ! ईश्वर ! धर्म ! ––हीं सारीं एकच होत.

सर्वच धर्म चांगले आहेत. पाण्याने भरलेल्या पेल्यांतील हवेचा बुडबुडा बाहेरच्या हवेमधे विलीन होण्याचा प्रयत्न करतो. तेलामधे किंवा विभिन्न घनतेच्या अन्य पदार्थांत त्या बुडबुड्याच्या प्रयत्नाला त्या त्या द्रवानुसार कमी किंवा अधिक अडथळा होतो. त्याचप्रमाणे आत्मा स्वत:चें अनंतत्व प्राप्त करण्यासाठी निरनिराळ्या माध्यमांमधून प्रयत्न करीत असतो. जीवनाच्या सवयी, भोवतालची परिस्थिति, आनुवंशिक वैशिष्टचें आणि हवामानाचा प्रभाव (भौगोलिक परिस्थिति) यांमुळे एखादा धर्म एखाद्या मानवसमूहाला विशेष सोईचा वाटतो आणि याच कारणांसाठी दुसऱ्या मानवसमूहाला दुसरा एखादा धर्म

सोईचा पडतो. जें कांही आहे तें सर्वच चांगलें आहे हेंच व्याख्यात्यांच्या निष्कर्षाचें सार होतें. एखाद्या राष्ट्राचा धर्म एकदम बदलण्याचा प्रयत्न करणें पुढीलप्रमाण आहे :--एखादा माणूस आल्प्स पर्वतांतून वाहणारी नदी पाहतो व तिने अनुसरलेला मार्ग चूक आहे असें म्हणतो. दुसरा एखादा मनुष्य हिमालयांतून निघणारी अशी विशाल नदी पाहतो की जी पिढयान् पिढया व हजारो वर्षें अखंड वाहत आहे, व म्हणतो, 'तिने अगदी जवळचा व सर्वांत उत्कृष्ट मार्ग स्वीकारला नाही.' ख्रिस्ती माणूस अशी कल्पना करतो की, ईश्वर हा एक सगुण पुरुष आहे व तो आपणां सर्वांच्या वर कुठेतरी बसलेला आहे. जोंवर ख्रिस्ती माणसाला स्वर्गांतील सोन्याच्या रस्त्यांच्या कडेला उभे राहून वारंवार खाली पृथ्वीकडे अवहेलनेने पाहून त्या दोन स्थानांतील भेद बघतां येणार नाही, तोंपर्यंत त्याला सुख वाटणार नाही. 'इतरांनी तुमच्याशीं जसा व्यवहार करावा असें तुम्हांला वाटतें तसा व्यवहार तुम्ही इतरांशीं करा' ह्या सुवर्णनियमाऐवजी हिंदूंचा अशा तत्त्वावर विश्वास आहे की, सर्व निःस्वार्थपणा चांगला आहे व सर्व स्वार्थीपणा वाईट आहे, आणि या निष्ठेंतून योग्य वेळीं स्वतःच्या अनंतस्वरूपाची प्राप्ति होईल व आत्म्याला मुक्ति लाभेल. विवेकानंद म्हणाले की, हा सुवर्णनियम किती खालच्या दर्जाचा आहे ! सदैव स्वार्थ ! सदैव स्वार्थ ! हें आहे ख्रिस्ती तत्त्व. 'इतरांनी तुमच्याशीं जसा व्यवहार करावा असें तुम्हांला वाटतें तसा व्यवहार तुम्ही इतरांशीं करा' ! हें एक भयंकर, रानटी तत्त्व आहे. पण ख्रिस्ती धर्मतत्त्वाचा अधिक्षेप करण्याची त्यांची इच्छा नाही, कारण जे त्यांत समाधान मानतात त्यांच्यासाठी तो सुयोग्य असाच आहे. हा विशाल प्रवाह वाहत राहूं द्या; निसर्गच ज्याअर्थी हा प्रश्न सोडविणार आहे त्याअर्थी त्या प्रवाहाचा मार्ग बदलण्याचा प्रयत्न करणारा मूर्खच म्हटला पाहिजे. अध्यात्मवादी (या शब्दाच्या खऱ्या अर्थाने) व दैववादी अशा विवेकानंदांनी ठामपणें आपलें मत प्रतिपादिलें की, जें कांही आहे तें चांगलेंच आहे, आणि ख्रिस्त्यांचें धर्मान्तर करण्याची त्यांची इच्छा नाही. ते लोक ख्रिस्ती आहेत हें ठीकच आहे. ते स्वतः हिंदु आहेत, तेंहि उत्तमच आहे. त्यांच्या देशांत, भिन्नभिन्न बौद्धिक

पातळीच्या लोकांच्या आवश्यकतेनुसार, भिन्नभिन्न धर्मपंथांची निर्मिति झाली; व ह्यांत आध्यात्मिक क्रमविकासाची प्रगति निश्चित दिसून येते. स्वार्थावर अधिष्ठित असलेला, सदैव अहंभावपूर्ण आकांक्षा असलेला, सदैव पुरस्कारांचें आश्वासन देणारा किंवा दंडाची भीति दाखविणारा असा कांही हा हिंदु धर्म नाही. तो माणसाला दाखवून देतो की, अनंतत्व हें निःस्वार्थीपणानें प्राप्त होतें. पृथ्वीवरील शेलक्याच लोकांना दर्शन देणाऱ्या देवाकडून जी आलेली आहे असें सांगण्यांत येतें ती फूस लावून ख्रिस्ती बनविण्याची पद्धति अति भयंकर होय. ती भयंकर अनीतीकडे नेणारी आहे, आणि ख्रिस्ती धर्मतत्त्वें अक्षरशः स्वीकारल्यास तसें करणाऱ्या धर्मांधांच्या नीतिमत्तेवर त्यांचा लज्जास्पद परिणाम होतो, आणि त्यामुळे मानवाला अनंतत्वाच्या प्राप्तीसाठी विलंब लागतो.

* * * *

[ 'ट्रिब्यून'च्या वार्ताहराने-- हा कदाचित् तोच असावा की ज्याने पूर्वी 'जैनस्' (जैनलोक)च्या ऐवजी 'जायंट्स' (राक्षस) ऐकलें होतें-- या वेळीं 'बर्न' (जाळतात) च्या ऐवजी 'बरी' (पुरतात) असें ऐकलें. पण इतर बाबतींत, स्वामीजींच्या 'सुवर्णनियमा'संबंधीच्या वक्तव्याखेरीज, त्याने साधारणपणें बरोबर असा पुढील अहवाल सादर केला आहे:--]

**('डेट्रॉइट ट्रिब्यून, १८ फेब्रुवारी १८९४)**

काल रात्रीं 'युनिटेरियन चर्च'मधे स्वामी विवेकानंद यांनी घोषित केलें की हिंदुस्थानांत विधवांना कायद्यानुसार किंवा धर्मानुसार कधीच जिवंत पुरण्यांत [जाळण्यांत] येत नसे; पण अशा सर्व बाबतींत तें कृत्य स्त्रियांनी आपखुषीने केलेलें असे. ती प्रथा एका बादशहाने बंद केली होती, पण हळूहळू ती पुनश्च वाढू लागली. शेवटीं इंग्रज-सरकारने ती पूर्णपणें बंद केली. ख्रिस्ती काय किंवा हिंदु काय,

सर्वच धर्मांत धर्मवेडे लोक असतातच. हिंदुस्थानांत असे कांही धर्मवेडे लोक आहेत की जे तपश्चर्या करतांना इतका वेळ आपला हात आपल्या डोक्याच्या वर धरतात की हळूहळू त्यांचा तो हात त्या स्थितींत कडक होतो व तो नंतर नेहमीच तसाच राहतो. तसेंच एकाच स्थितींत उभे राहण्याचें व्रतहि कांही लोक स्वीकारतात. कांही कालाने अशा लोकांचा आपल्या कमरेखालील भागावरील ताबा पूर्णत: जातो व नंतर ते कधीच चालूं शकत नाहीत. सर्वच धर्म सत्य आहेत, आणि लोक नीतीचा अवलंब करतात तो कोणत्या दैवी आज्ञेने नव्हे, तर तींत असणाऱ्या चांगुलपणामुळेच. ते म्हणाले की, हिंदूंचा धर्मान्तरावर विश्वास नाही, कारण त्यांच्या मतें ती एक विकृति होय. साहचर्य, भोवतालची परिस्थिति, व शिक्षण यांच्या भिन्नत्वामुळे एवढे निरनिराळे धर्म अस्तित्वांत आहेत. म्हणून एका धर्माच्या प्रचारकाने दुसऱ्या माणसाचा धर्मविश्वास चुकीचा आहे असें घोषित करणें हें किती मूर्खपणाचें आहे ! असें करणें हें तितकेंच सयुक्तिक होईल की जितकें आशियांतील एखाद्या माणसाने अमेरिकेंत येऊन मिसिसिपी नदीच्या प्रवाहाकडे बघून म्हणावें, "तूं अगदी चुकीच्या मार्गाने प्रवाहित होत आहेस, तुला उगमस्थानीं गेलें पाहिजे व पुनश्च वाहण्यास प्रारंभ केला पाहिजे." तद्वतच, अमेरिकेंतील एखाद्या माणसाने, आल्प्स पर्वतापासून निघून जर्मन समुद्रास मिळणाऱ्या एखाद्या नदीचा प्रवाह पाहून तिला "तुझा प्रवाह फारच नागमोडी आहे आणि त्यावर उपाय म्हणजे मी तुला जसें सांगेन तसेंच तुला प्रवाहित झालें पाहिजे" असें म्हणणें तितकेंच खुळेपणाचें होईल. सुवर्णनियम हा पृथ्वीइतकाच पुरातन असून त्यांतच इतर सर्व नीतियमांचें मूळ आहे असें ते म्हणाले. [?] मनुष्य हा स्वार्थाची जणु मूर्ति आहे. त्यांच्या मतें नरकाग्नीची कल्पना ही अर्थशून्य आहे. जोंवर दु:खाच्या अस्तित्वाची जाणीव आहे तोंवर निर्भेळ सुख असंभाव्य आहे. कांही धार्मिक लोक ज्या पद्धतीने प्रार्थना करतात तिचें त्यांनी हास्योत्पादक वर्णन केलें. ते म्हणाले की, हिंदु लोक डोळे मिटून अन्तरात्म्याचें ध्यान करतात, तर त्यांना कांही ख्रिस्ती लोक एखाद्या बिंदूकडे टक लावून बघतांना दिसले; जणुकाय त्यांना ईश्वरच आपल्या दिव्य सिंहासनावर

विराजमान झालेला दिसत होता. धर्माच्या बाबतींत दोन विरोधी टोकें आहेत–– एक धर्मवेडे लोक व दुसरे नास्तिक. नास्तिकांत कांही-तरी चांगुलपणा असतो पण धर्मान्ध माणूस केवळ आपल्या क्षुद्र स्वार्था-साठीच जगतो. त्यांना येशूंच्या हृदयाचें चित्र पाठविणाऱ्या कोण्या अनामक व्यक्तीचे त्यांनी आभार मानले. त्यांच्या मतें हा धर्मवेडाचाच एक प्रकार होय. धर्मवेडे लोक कोणत्याच धर्माचे नसतात. त्यांचा म्हणजे एक वेगळाच नमुना आहे. [?]

## ईश्वरप्रेम

('डेट्रॉइट ट्रिब्यून,' २१ फेब्रुवारी १८९४)

काल रात्रीं विवे कानंद यांचें भाषण ऐकण्यासाठी 'दि फर्स्ट युनिटेरियन चर्च'मधे बराच जनसमूह जमला होता. 'जेफरसन अॅव्हेन्यु' व 'वुडवर्ड अॅव्हेन्यू'चा वरचा भाग येथून आलेले लोक श्रोतृ-वर्गांत होते. त्यांत अधिकांश स्त्रिया होत्या आणि त्या भाषणांत खूप तल्लीन झालेल्या दिसत होत्या. त्या ब्राह्मण वक्त्याच्या बऱ्याच विधानांना त्या स्त्रिया मोठ्या उत्साहानें टाळ्या देत होत्या.

व्याख्यात्यांनी प्रेमाचा जो विषय हाताळला तो विकारांशीं संबंधित असणाऱ्या प्रेमाचा नव्हता, तर हिंदुस्थानांतील माणसाला त्याच्या ईश्वराविषयी वाटणाऱ्या शुद्ध व पवित्र प्रेमाचा होता. विवे कानंदानी भाषणाच्या सुरवातीस सांगितल्याप्रमाणे विषय होता–– "हिंदुस्थानांतील माणसाला त्याच्या ईश्वराविषयी वाटणारें प्रेम." पण ते या ठरलेल्या विषयावर बोलले नाहीत. त्यांच्या भाषणाचा बराचसा भाग ख्रिस्ती धर्मावरील टीकेनें व्यापला होता. हिंदुस्थानांतील माणसाचा धर्म व त्याचें ईश्वरप्रेम ह्यांना गौण स्थान दिलें गेलें होतें. भाषणांतील मुद्दे इतिहासप्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनांतील कित्येक सम-र्पक घटनांचीं उदाहरणें देऊन त्यांनी स्पष्ट केले. ज्यांच्या जीवनांतील घटना सांगितल्या ते म्हणजे त्यांच्या देशांतील प्रसिद्ध मोगल बादशहा होते, तद्देशीय हिंदु राजे नव्हते.

व्याख्यात्यांनी धार्मिक म्हणवणाऱ्यांचे दोन वर्ग पाडले--- ज्ञानमार्गी आणि भक्तिमार्गी. ज्ञानमार्ग्यांच्या जीवनाचें अंतिम ध्येय साक्षात्कार हें होय. भक्तिमार्ग्यांच्या जीवनाचें अंतिम लक्ष्य ईश्वरप्रेम हें होय.

ते म्हणाले, प्रेम म्हणजे त्याग होय. तें कधीहि घेत नाही, तर नेहमीच देतें. हिंदु माणूस आपल्या देवाला कधीच कांही मागत नाही; मोक्षासाठी किंवा पारलौकिक सुखासाठी तो कधीच प्रार्थना करीत नाही; पण प्रेमांत तल्लीन होऊन तो स्वतःला पूर्णपणें ईश्वराला समर्पित करतो. जीवनांतील ती उत्कृष्ट अवस्था तेव्हाच प्राप्त होऊं शकते की जेव्हा माणसाला ईश्वराची आत्यंतिक गरज भासूं लागते. तेव्हाच ईश्वर आपल्या पूर्ण रूपांत प्रकट होतो.

ईश्वराकडे पाहण्याच्या तीन भिन्न पद्धति आहेत. एक म्हणजे ईश्वर ही सर्वशक्तिमान व्यक्ति कल्पून त्याच्यापुढे नत होणें व त्याच्या शक्तीची पूजा करणें, ही होय. दुसरी म्हणजे त्याला पिता मानून त्याची पूजा करणें, ही होय. हिंदुस्थानांत पिता नेहमी पुत्रांना शिक्षा करतो आणि म्हणून पित्यावरील प्रेमांत व आदरांत एकप्रकारचा भीतीचा अंश मिश्रित असतो. ईश्वराचें चिंतन करण्याची आणखी एक पद्धति म्हणजे त्याला आई मानणें ही होय. हिंदुस्थानांत आईवर खरेंखुरें प्रेम केलें जातें व तिचा खूप आदरहि करण्यांत येतो. हिंदुस्थानांतील माणसांची ईश्वराकडे पाहण्याची पद्धति ही अशी आहे.

कानंद म्हणाले की, ईश्वराचा खरा भक्त त्याच्या प्रेमांत इतका मग्न असतो की, मध्येच थांबून, दुसऱ्या पंथांतील लोकांना, ते ईश्वरप्राप्तीच्या चुकीच्या मार्गाचें अवलंबन करीत आहेत हें सांगायला व त्यांना आपल्या विचारसरणीकडे वळवायला त्याला सवडच मिळत नाही.

* * * *

( 'डेट्रॉइट जर्नल' )

या शहरांत व्याख्यानमाला गुंफणारे ब्राह्मण संन्यासी विवेकानंद

यांचें मन आणखी एक आठवडा इथे राहण्यासाठीं वळविलें गेलें तर डेट्रॉइट शहरांतील सर्वांत मोठ्या सभागृहांत सुद्धा त्यांचें भाषण ऐकण्यास उत्सुक असलेला जनसमूह मावूं शकणार नाही. खरोखरी लोकांना त्यांचा छंदच जडला आहे; काल सायंकाळीं 'युनिटेरियन चर्च' मधील सर्व जागा भरल्या होत्या, आणि पुष्कळांना व्याख्यान चालूं असतां शेवटपर्यंत उभें राहणें भाग पडलें.

व्याख्यात्यांचा विषय होता, 'ईश्वरप्रेम'. त्यांची प्रेमाची व्याख्या होती—"जें पूर्णपणें निःस्वार्थी आहे व ज्या वस्तूवर आपली प्रीति जडली असेल त्या वस्तूच्या गुणगानाशिवाय किंवा आराधनेशिवाय ज्यांत दुसरा विचार नसतो त्याला 'प्रेम' म्हणावें". ते म्हणाले की, प्रेम हा असा गुण आहे की ज्याच्यामुळे माणूस नतमस्तक होतो, पूजा करतो, आणि त्याच्या मोबदल्यांत कांही मागत नाही. त्यांच्या मतें ईश्वरप्रेम हें वेगळेंच आहे. ते म्हणाले की, ईश्वराची आपल्याला खरोखरीच आवश्यकता असते म्हणून आपण तो मानीत नाहीं, तर आपल्या स्वार्थी हेतूसाठीच आपण त्याला मानीत असतों.

त्यांचें भाषण अशा गोष्टी व घटना यांनी भरलें होतें की ज्यांतून ईश्वरप्रेमाच्या मुळाशीं स्वार्थी हेतु कसा असतो हें स्पष्ट होत होतें. ख्रिस्ती लोकांच्या बायबलमधील अत्यंत सुंदर भाग म्हणून सॉलोमनच्या पदांचें उदाहरण व्याख्यात्यांनी दिलें; आणि असें असूनहि तो भाग काढून टाकण्यांत येण्याची शक्यता आहे असें ऐकल्याने आपल्याला अत्यंत खेद होत असल्याचेंहि त्यांनी सांगितलें.

भाषणाच्या शेवटीं त्यांनी आपला मुद्दा पूर्णपणें पटविण्यासाठी सांगितलें—"खरें म्हणजे, ईश्वरप्रेम हें 'त्याने मला काय लाभ होईल ?' या तत्त्वावर आधारित झालेलें दिसतें. ख्रिस्ती लोक आपल्या प्रेमाच्या बाबतींत इतके स्वार्थी आहेत की ते स्वार्थपूर्तीसाठी ईश्वराला नेहमी सर्व प्रकारच्या गोष्टी मागत असतात. म्हणून, आधुनिक धर्म हा निव्वळ छंद किंवा फॅशन याशिवाय कांही नाही; आणि मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे लोक चर्चमधे गोळा होतात."

# हिंदुस्थानांतील स्त्रिया

( 'डेट्रॉइट फ्री प्रेस,' २५ मार्च १८९४ )

काल रात्रीं कानंदांनी 'युनिटेरियन चर्च' मधे 'हिंदुस्थानांतील स्त्रिया' या विषयावर भाषण दिलें. प्राचीन हिंदुस्थानांतील स्त्रियांचा उल्लेख करून व्याख्यात्यांनी दाखवून दिलें की त्या इतक्या आदरास पात्र होत्या की धर्मग्रंथामधे त्यांचा 'द्रष्टचा' म्हणून उल्लेख केला जातो. त्या वेळीं त्यांची आध्यात्मिकता प्रशंसनीय होती. पाश्चिमात्य मापाने पौर्वात्य स्त्रियांचें मूल्यमापन करणें अयोग्य होय. पाश्चात्त्यांच्या दृष्टीने स्त्री ही पत्नी होय, आणि पौर्वात्यांच्या दृष्टीने ती माता होय. मातृत्वाच्या भावनेविषयी हिंदु फार आदर बाळगतात, आणि संन्याशांनाहि जमिनीवर मस्तक टेंकवून आपल्या आईला प्रणाम करावा लागतो. सतीत्वाविषयी खूप आदर आहे.

कानंदांनी दिलेल्या भाषणांपैकी हें एक अत्यंत सरस असें भाषण होतें आणि लोकांनी तें उत्साहाने व आवडीने ऐकलें.

* * * *

( 'डेट्रॉइट इव्हिनिंग न्यूज,' २५ मार्च १८९४ )

'युनिटेरियन चर्च'मधे 'हिंदुस्थानांतील भूतकालीन, मध्ययुगीन आणि वर्तमानकालीन स्त्रिया' या विषयावर स्वामी विवे कानंद यांचें भाषण झालें. त्यांनी प्रतिपादिलें की, हिंदुस्थानांत स्त्री म्हणजे ईश्वराचें प्रत्यक्ष रूपच होय, आणि 'आपण माता आहोंत व पूर्णपणें योग्य अशी माता होण्यास आपण पवित्र असलेंच पाहिजे' हाच विचार तिच्या संपूर्ण जीवनांत प्रमुख असतो. ते म्हणाले की, 'हिंदुस्थानांतील कोणतीहि माता आपल्या मुलांना कधीच टाकीत नाही; व हें खोटें आहे असें कुणीहि सिद्ध करून दाखवावें असें त्यांनी आव्हान दिलें. अमेरिकेंतील मुलींप्रमाणे आपलें अर्धें अंग तरुणांच्या अशिष्ट दृष्टीला पडूं देण्याचें त्यांच्या नशिबीं आलें तर हिंदुस्थानांतील मुली मरण पत्करतील; हिंदुस्थानचें मूल्यमापन त्याच्याच मापाने करावें, ह्या

देशाच्या मापाने नव्हे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

*    *    *    *

( 'ट्रि        १ एप्रिल १८९४ )

स्वामी कानंद डेट्रॉइटला असतांना बऱ्याच वेळां संभाषणांचा योग आला; त्यांत त्यांनी हिंदुस्थानांतील स्त्रियांसंबंधी प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. त्यांनी अशाप्रकारें दिलेल्या माहितीमुळे त्यांनी या विषयावर सार्वजनिक व्याख्यान द्यावें अशी सूचना करण्यांत आली. पण ते टिपणांशिवाय बोलत असल्याने खाजगी संभाषणांतील कांही मुद्दे त्यांच्या सार्वजनिक भाषणांत आले नाहीत. त्यामुळे कांही अंशीं त्यांच्या मित्रांचा विरस झाला, पण श्रोत्यांपैकी एका स्त्रीने त्यांनी सायंकाळच्या संभाषणामधे सांगितलेल्या कांही गोष्टी टिपून घेतल्या होत्या; आणि आता त्या प्रथमच वृत्तपत्रांत छापायला देण्यांत आल्या आहेत :

आर्य प्रथमतः हिमालयाच्या प्रशस्त व विशाल अशा पठारावर वसती करण्यास आले, आणि ज्यांच्याविषयी आम्हां पाश्चात्त्यांना केवळ कल्पनाच करतां येणें शक्य आहे असें शुद्ध ब्राह्मण अजूनहि तेथे राहतात. विचार, आचार आणि कृति यांत ते शुद्ध आहेत आणि ते इतके प्रामाणिक आहेत की सुवर्णाने भरलेली पिशवी एखाद्या सार्व-जनिक ठिकाणीं राहिली तर वीस वर्षांनंतरहि ती तशीच मिळेल. ते इतके देखणे आहेत की, कानंदांच्याच स्वतःच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, "एखाद्या शेतांत एखादी मुलगी पहिली तर थांबून, ईश्वराने इतकी अत्यंत उत्कृष्ट कृति कशी निर्माण केली वरें, असें आश्चर्य प्रकट करावें लागेल." त्यांचे अवयव अगदी रेखीव असतात, त्यांचे डोळे आणि केस काळेभोर असतात, आणि त्यांची त्वचा ही टोचलेल्या बोटांतून गळणारे रक्ताचे थेंब दुधाने भरलेल्या पेल्यांत पडून निर्माण होणाऱ्या शुभ्रतांबूस रंगाची असते. ही हिंदूंची शुद्ध, संकररहित आणि निष्कलंक अशी जात होय.

मालमत्तेसंबंधीच्या त्यांच्या कायद्याप्रमाणे स्त्रीधन हें सर्वस्वी तिचेंच असतें आणि तें पतीचें कधीच होत नाही. पतीच्या परवानगी-शिवाय ती तें विकूं शकते किंवा त्याचें दान करूं शकते. कुणीहि तिला दिलेल्या देणग्या–नवऱ्याने तिला दिलेल्या देणग्या मुद्धा––तिच्याच असतात व ती त्यांचा वाटेल तसा उपयोग करूं शकते.

स्त्री ही भीति न बाळगतां चोहोकडे फिरते. आसपासच्या लोकांवर तिचा पूर्ण विश्वास असल्यामुळे ती एवढ्या स्वतंत्रपणें फिरूं शकते. हिमालयांत पडद्याची प्रथा नाही; आणि हिंदुस्थानचा तो असा एक भाग आहे की जिथे मिशनरी कधीच पोहोचले नाहीत. ह्या खेड्यांमधे पोहोचणें फार कठीण आहे. मुसलमानी प्रभावापासून अलिप्त असलेल्या ह्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्रासदायक व कठीण असें गिर्यारोहण करावेंच लागतें आणि हे लोक मुसलमान व ख्रिस्ती लोकांना सारखेच अपरिचित आहेत.

## हिंदुस्थानचे पहिले रहिवासी

हिंदुस्थानच्या अरण्यांत वन्य मानववंश आहेत–– अत्यंत रानटी नरभक्षक सुद्धा. ते हिंदुस्थानांतील मूळ रहिवासी होत. ते आर्य वा हिंदु नाहीत.

हिंदु जसजसे या देशांत वस्ती करूं लागले व त्यांतील विस्तृत प्रदेशांत पसरूं लागले, तसतसे त्यांच्यांत बऱ्याच प्रकारचे दोष निर्माण होऊं लागले. तिथे सूर्याचें ऊन फार प्रखर असतें आणि या उन्हाने रापून ते लोक वर्णाने काळे बनले.

हिमालय पर्वतांतील टापूंत वस्ती करणाऱ्या श्वेतवर्णीयांची उज्ज्वल कांति हिंदुस्थानांतील हिंदूंच्या गव्हाळी वर्णांत परिणत व्हायला केवळ पांच पिढ्या लागतात.

कानंद यांचा एक भाऊ त्यांच्यापेक्षा खूप उजळ तर एक भाऊ त्यांच्यापेक्षा सावळा आहे. त्यांचे आईवडील उजळ वर्णाचे आहेत. मुसलमानांपासून सुरक्षित राहण्यासाठी निर्माण झालेली दुष्ट पडदा-पद्धति स्त्रियांना घरांतच राहण्यास भाग पाडते व म्हणून त्या साह-जिकच वर्णाने अधिक उजळ आहेत. कानंदांचें वय ३१ वर्षांचें आहे.

## अमेरिकेंतील पुरुषवर्गाला एक चिमटा

डोळयांत एक गमतीची छटा आणून कानंद ठासून सांगतात की, अमेरिकन पुरुषांची त्यांना गंमत वाटते. अमेरिकन पुरुष स्त्रियांची पूजा करण्याचा आविर्भाव आणतात, पण, त्यांच्या मतें, ते केवळ तारुण्य व सौंदर्य यांचीच पूजा करतात. सुरकुत्या व पांढरे केस यांवर ते कधीच प्रेम करीत नाहीत. खरें म्हणजे त्यांना असें पक्कें वाटतें की अमेरिकन पुरुषांची आपल्या म्हाताऱ्या स्त्रियांना जाळण्याची एके काळीं एक कपटयुक्ति होती-- अर्थातच निश्चितच ती आनुवंशिक होती. आधुनिक इतिहास तिला 'चेटकिणींना जाळणें' असें म्हणतो. स्त्रियांवर चेटकिणींचा आरोप करणारे व त्यांना जाळणारे पुरुषच होते; व साधारणत: म्हाताऱ्या स्त्रियांनाच बळी म्हणून वधस्तंभाकडे नेलें जात असे. तेव्हा असेंच दिसून येतें की, स्त्रियांना जिवंत जाळणें ही कांही निव्वळ हिंदूंचीच प्रथा होती असें नाही. त्यांना असें वाटतें की, ख्रिस्ती धर्मानें वृद्ध स्त्रियांना वधस्तंभाशीं बांधून जाळलें याचें जर स्मरण ठेवलें, तर हिंदु विधवांना जाळण्याच्या बाबतींत प्रकट करण्यांत येणारी शिसारी आणि उद्वेग हीं कमी होतील.

## दहनप्रकारांची तुलना

हिंदु विधवा ही उत्सवाच्या व गाण्यांच्या वातावरणांत आणि आपली अति मौल्यवान वस्त्रें परिधान करून मृत्यूचें दु:ख स्वीकारण्यास जात असे, व तिचा सदैव विश्वास असे की तिच्या त्या कृत्यानें (सती जाण्यानें) तिला व तिच्या कुटुंबीयांना स्वर्गाचें ऐश्वर्य प्राप्त होणार आहे. हुतात्मा म्हणून तिची पूजा होई व तिचें नांव कुटुंबाच्या इतिहासांत आदरपूर्वक नोंदलें जाई.

तो विधवादहनाचा विधि आपल्याला कितीहि भयानक का वाटेना, पण तो ख्रिस्ती चेटकिणींच्या दहनाच्या मानानें उज्ज्वलच होय. ख्रिस्ती चेटकीण ही सुरवातीपासूनच गुन्हेगार म्हणून समजली जाई, व बळजबरीनें तिची कबूली घेण्यासाठी तिला कोंदट कोठडींत डांबून तिचा निर्दयपणें छळ केला जाई, तिला लाजिरवाण्या खटल्यास तोंड द्यावें लागे, उपहासाच्या वर्षावांत ती

वधस्तंभाकडे खेचली जाई आणि 'हें तिच्या शरीराचें दहन म्हणजे, यापेक्षाहि तिच्या आत्म्याला ज्यांत अधिक कष्ट भोगावे लागतील अशा चिरकाल टिकणाऱ्या नरकाग्नीची केवळ सूचनाच होय' असा दिलासा तिला एखाद्या प्रेक्षकाकडून मिळे.

## माता ह्या पूज्य होत.

कानंद म्हणतात की हिंदूंना मातृत्वाची पूजा करण्याची शिकवण दिली जाते. माता ही पत्नीपेक्षा अधिक श्रेष्ठ मानली जाते. माता ही पवित्र होय. ईश्वरासंबंधीच्या पितृभावापेक्षा ईश्वरासंबंधीचा मातृभाव त्यांच्या ठिकाणीं जास्त प्रबळ असतो.

सर्व स्त्रिया, मग त्या कोणत्याहि जातीच्या असोत, शारीरिक शिक्षेपासून मुक्त असतात. स्त्रीने खून केला तरी तिला मृत्युदंड दिला जात नाही. तिला गाढवावर शेपटीकडे तोंड करून बसविण्यांत येतें. याप्रमाणे रस्त्यांतून नेले जात असतां दवंडीवाला तिच्या गुन्ह्याची घोषणा करतो. तिच्या हातून पुनः असे गुन्हे घडूं नयेत यासाठी तिची अशी अवहेलना ही पुरेशी शिक्षा आहे असें मानण्यांत येऊन त्यानंतर तिला मुक्त करण्यांत येतें.

जर तिने पश्चात्ताप दाखविला तर तिच्यासाठी धार्मिक स्थानें मोकळीं असतात. तेथे तिला शुद्ध होतां येतें किंवा तिची इच्छा असल्यास तिला संन्यासिनी बनून तात्काळ पवित्र स्त्री होतां येतें.

मि. कानंद यांना असा प्रश्न विचारण्यांत आला की, ज्यांत त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उच्चपदस्थ असा कुणी अधिकारी नाही अशा संन्यासाश्रमाचें अवलंबन करण्याचें जें स्वातंत्र्य स्त्रियांना देण्यांत येतें त्यामुळे, ज्यांना ते सर्वांत पवित्र असे हिंदु तत्त्वज्ञ मानतात त्या संन्याशांच्या संप्रदायांत दांभिकता निर्माण होत नाही काय ? कानंदांनी हें मान्य केलें, पण ह्याचें स्पष्टीकरण करून सांगितलें की, लोक व संन्यासी यांच्या दरम्यान कोणी नसतो. संन्यासी हा सर्व जातिभेदाच्या पलीकडे गेलेला असतो. ब्राह्मण हा नीच जातीच्या स्त्रीपुरुषांना स्पर्श करणार नाही; पण तिला किंवा त्याला संन्यासी होऊं द्या की मग अति उच्च ब्राह्मण असला तरी तो त्या नीच

जातीच्या संन्याशाला साष्टांग नमस्कार करील.

लोकांना संन्याशाची काळजी वाहावी लागते; पण जोंपर्यंत त्यांचा त्याच्या सच्चेपणावर विश्वास असतो, तोंपर्यंतच ते तसें करतात. त्याचा दांभिकपणा कळून आला की मग त्याला खोटारडा म्हणण्यांत येतें व तो भिकाऱ्याच्या अतिहीन अवस्थेप्रत पोहोचतो. तो मग केवळ एक भटक्या भिकारी ठरतो. त्याच्याविषयी मग मुळीच आदर राहत नाही.

## स्फुट विचार

ज्या मार्गानें राजकुमार जातो त्या मार्गानें देखील जाण्याचा स्त्रीला अधिकार आहे. जेव्हा जिज्ञासु ग्रीक लोक हिंदूंपासून शिकण्या-साठी हिंदुस्थानांत गेले तेव्हा त्यांना सर्व दारें खुलीं होतीं; पण जेव्हा मुसलमान आपली तरवार घेऊन व इंग्रज बंदुकीच्या गोळ्या घेऊन तेथें गेले तेव्हा हिंदूंचीं दारें बंद झालीं. अशा पाहुण्यांचें स्वागत झालें नाही. कानंदांच्या लज्जतदार शब्दांत सांगायचें म्हणजे, "जेव्हा वाघ येतो तेव्हा आम्ही आपलीं दारें, तो निघून जाईपर्यंत बंद ठेवतों."

कानंद म्हणतात की, भविष्यकाळीं महान् गोष्टी संभवनीय आहेत अशी अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांनी माझ्या मनांत आशा चेतविली आहे; पण आपलें व जगाचें भवितव्य आजच्या कायदेकर्त्यां-वर अवलंबून नाही, तर तें स्त्रियांवर अवलंबून आहे. मि. कानंदांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, "देशाचा उद्धार त्यांतील स्त्रियांवर अवलंबून आहे."

[illegible] ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: ....................
क्रमांक ... ....................... नों: दि: ..................

# पत्रें

## (१)*

( श्री. प्रमददास मित्र यांना ) †

वृंदावन,
१२ ऑगस्ट १८८८

मान्यवर,

अयोध्येहून मी आता वृंदावनधामीं आलों आहें. कालाबाबूंच्या कुंजांत सध्या मी राहत आहें. शहरांत मन कसें आक्रसल्यासारखें वाटतें. राधाकुंडादि स्थानें फार मनोरम आहेत असें मीं ऐकलें आहे, पण तीं शहरापासून अमळ दूर आहेत. लवकरच हरिद्वारला जावें अशी माझी इच्छा आहे. त्या ठिकाणीं आपल्या ओळखीचे कुणी असतील तर कृपा करून त्यांच्या नांवाने पत्र द्यावें, मोठे उपकार होतील. आपण इथे येणार होतां त्याचें काय झालें ? कृपा करून पत्रोत्तर लवकर पाठवावें.

दास
नरेंद्रनाथ

## (२)*

( श्री. प्रमददास मित्र यांना )

ॐ नमो भगवते रामकृष्णाय

वराहनगर मठ,
१९ नोव्हेंबर १८८८

पूज्यपाद,

आपण पाठविलेलीं दोन पुस्तकें मिळालीं. आपल्या विशाल व

---

* अशी फुली असलेलीं पत्रें स्वामीजींनी मुळांत बंगालीत लिहिलीं होती.

† काशीनिवासी बाबू प्रमदादास मित्र हे एक जुन्या वळणाचे हिंदु गृहस्थ

उदार हृदयाचा परिचय करून देणारें आणि आपल्या विलक्षण प्रेमानें भरलेलें आपलें पत्र वाचून खूपच आनंद झाला. माझ्यासारख्या एका भिक्षाजीवी संन्याशावर आपण जें एवढें प्रेम करीत आहांत तें माझ्या पूर्वजन्मींच्या सुकृतामुळेच होय यांत तिळमात्र संदेह नाही. 'वेदान्ता'ची सप्रेम भेट पाठवून आपण केवळ मलाच नव्हे, तर श्रीरामकृष्णांच्या समस्त संन्यासी शिष्यांना आजन्म ऋणी करून ठेविलें आहे. नतमस्तक होऊन ते सारेजण आपणांस प्रणाम करीत आहेत. मी आपणांकडून पाणिनीचें व्याकरण मागितलें तें फक्त माझ्यासाठीच नव्हे. खरें पाहिलें असतां आमच्या या मठांत संस्कृत धर्मग्रंथांचें सविस्तरपणें अध्ययन होत आहे. आपल्या बंगाल प्रांतांत वेद मुळीच प्रचलित नाहीत असें म्हटलें तरी चालेल. या मठांत अनेकजण संस्कृतज्ञ असून वेदांच्या संहितादि भागांत पारंगत होण्याचा त्यांचा विचार आहे. जें करावयाचें तें संपूर्णपणें करावयाचें अशा मताचे ते आहेत. पाणिनीकृत सर्वोत्कृष्ट व्याकरण आत्मसात् केल्यावांचून वैदिक भाषेंत पारंगत होणें अगदी अशक्य होय असा माझा विश्वास आहे. म्हणूनच त्याची एक प्रत आम्हांला हवी आहे. आमच्या लहानपणीं ज्या 'मुग्धबोध' व्याकरणाचा आम्हीं अभ्यास केला होता तें लघुकौमुदीपेक्षा अनेक बाबतींत चांगलें आहे. आपण स्वतः एक श्रेष्ठ विद्वान् आहांत, म्हणून या बाबतींत आपणच यथार्थ निर्णय देऊं शकतां. पाणिनीची अष्टाध्यायीच आमच्यापक्षीं सर्वांहून अधिक उपयुक्त आहे असें जर आपणांस वाटत असेल तर तिची एक प्रत पाठवून (अर्थात् आपली इच्छा असेल तर व आपणांस हें सोयीचें असेल तर) आम्हांला कायमचें उपकृत करावें अशी प्रार्थना आहे. या मठांत मेधावी, कुशाग्र बुद्धीच्या व चिकाटीच्या व्यक्तींचा अभाव नाही. गुरुकृपेनें थोड्याच दिवसांत अष्टाध्यायीचा अभ्यास करून ते बंगाल प्रांतांत वेदांचें पुनरुज्जीवन

---

होते. त्यांची विद्वत्ता, त्यांचें शास्त्रज्ञान आणि त्यांचें चारित्र्य यांच्यामुळे स्वामी विवेकानंदांना त्यांच्याविषयी अतिशय आदर आणि आपुलकी वाटत असे. त्यांना लिहिलेलीं हीं कित्येक पत्रें एका दृष्टीने अत्यंत महत्त्वाचीं, उद्‌बोधक आणि मनोवेधक आहेत, कारण भगवान श्रीरामकृष्णांच्या लीलासमाप्तीनंतर, अमेरिकेला जाण्यापूर्वींच्या ह्या काळांत स्वामीजी इतस्ततः भ्रमण करीत होते.

करूं शकतील असा भरवसा वाटतो. मी आपणांसाठी माझ्या गुरुदेवांचे दोन फोटो आणि एका जणाने संकलित करून छापलेले माझ्या गुरुदेवांच्या उपदेशांचे दोन खंड पाठवीत आहें. या साऱ्या उपदेशांची भाषा घरगुती आणि साधी आहे. आपण आमची ही सप्रेम भेट स्वीकाराल अशी आशा आहे. त्यामुळे खरोखरच आम्हांला आनंद होईल. माझी प्रकृति आता बरीच सुधरली आहे आणि दोनतीन महिन्यांत मी आपल्या दर्शनाचा लाभ घेऊं शकेन असें वाटतें. अधिक काय लिहावें ?

दास
नरेंद्रनाथ

## (३)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

वराहनगर,
४ फेब्रुवारी १८८९

सादर नमस्कार,

कांही कारणांनी आज माझें मन अतिशय अवघडल्यासारखें आणि क्षुब्ध झालें होतें. त्याच वेळीं दिव्य काशीक्षेत्रीं येण्यासंबंधीच्या निमंत्रणाचें आपलें पत्र मला मिळालें. या निमंत्रणाला श्रीविश्वेश्वरांचाच आदेश मानून मी तें स्वीकारीत आहें. मी सध्या माझ्या गुरुदेवांच्या जन्मभूमीच्या दर्शनासाठी जात आहें. तेथे कांही दिवस राहून मग मी आपणांकडे येईन. काशीपुरी आणि काशीनाथ यांच्या दर्शनाने ज्याचें अंतःकरण द्रवीभूत होत नाही तो पाषाणहृदयाचा आहे असें समजावें. माझी प्रकृति आता पुष्कळच बरी आहे. ज्ञानानंदांना माझे प्रणाम सांगावेत. शक्य तितक्या लवकर मी तेथे येईन, मग

विश्वेश्वरांची जशी इच्छा. बाकी विशेष कांही नाही. सविस्तर भेटीअंतीं.

दास
नरेंद्रनाथ

## (४)

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

श्रीदुर्गा शरणम्

वराहनगर,
२६ जून १८८९

पूज्यपाद,

पुष्कळ दिवस झाले, अनेक कारणांनी मी आपणांस पत्र लिहूं शकलों नाहीं याबद्दल क्षमा करावी. गंगाधरसंबंधी बातमी आता मला समजली आहे. माझ्या आणखी एका गुरुबंधूशीं त्याची भेट झाली आणि ते दोघेजण आता उत्तराखंडीं वास करीत आहेत. आमच्या येथील चौघेजण सध्या उत्तराखंडांत वास्तव्य करीत आहेत— आणि गंगाधर मिळून आता ते पांच जण झाले आहेत. केदारनाथाच्या मार्गावर श्रीनगर नामक स्थानीं गंगाधरची शिवानंद नांवाच्या माझ्या एका गुरुबंधूशीं भेट झाली. गंगाधरने माझ्या येथील पत्त्यावर दोन पत्रें पाठविलीं. हिमालयांत राहत असतां पहिल्या वर्षी त्याला तिबेट-मधे प्रवेश करण्यासाठी परवानगी मिळाली नाही, पण दुसऱ्या वर्षी ती मिळाली. लामांचें त्याच्यावर खूप प्रेम आहे आणि त्याने तिबेटी भाषा देखील शिकून घेतली आहे. तिबेटांत शेकडा नव्वद लोक लामा आहेत असें तो म्हणतो, परंतु आजकाल बहुतेक ते तांत्रिक मतानुसारच उपासना करीत असतात. तो देश अतिशय थंड आहे....माझी प्रकृति साधारण बरी आहे, पण मनांत जणु तुफान माजलें आहे !

दास
नरेंद्र

(५)

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

बागबाजार, कलकत्ता,
४ जुलै १८८९

पूज्यपाद,

काल आपलें सविस्तर पत्र मिळालें. फार आनंद झाला. गंगाधरनें आपणांशीं पत्रव्यवहार करावा असें मीं त्याला सांगावें असें आपण लिहिलें आहे, पण त्याची शक्यता दिसत नाही, कारण जरी आम्हांला त्या लोकांचीं पत्रें मिळतात तरी कोणत्याहि ठिकाणीं ते २–३ दिवसां-पेक्षा जास्त राहत नसल्यामुळे आमचीं पत्रें मात्र त्यांना मिळत नाहीत.

माझ्या पूर्वाश्रमांतील एका नातलगानें सिमुलतला (वैद्यनाथजवळ) येथे एक बंगला विकत घेतला आहे. तेथील हवापाणी उत्तम असल्या-मुळे मी तेथे कांही दिवस राहिलों, परंतु उन्हाळ्याच्या भयंकर उष्णतेमुळे अतिसारानें मी आजारी झालों व तेथून निघून येणें मला भाग पडलें. काशीला येऊन आपलें दर्शन घ्यावें व आपल्या सत्संगतींत काळ घालवावा अशी माझी किती तीव्र इच्छा आहे हें शब्दांनी वर्णन करून सांगतां येत नाही. पण साऱ्या गोष्टी भगवंताच्या इच्छेवर अवलंबून आहेत. आपला आणि माझा पूर्वजन्मींचा कांहीतरी ऋणा-नबंध आहे असें वाटतें, कारण या कलकत्ता शहरांतील अनेक श्रीमंत व प्रतिष्ठित लोक माझ्यावर खूप प्रेम करतात तरी त्यांच्या संगतीचा मला अत्यंत उबग वाटूं लागला आणि आपल्या एकाच दिवसाच्या भेटीनें माझें मन इतकें मोहून गेलें की आपण माझे एक अगदी जवळचे नातलग व आध्यात्मिक जीवनांतील निकटचे सहचर बनून गेलां. याचें एक कारण हें की आपण भगवंताचे प्रिय सेवक आहांत, आणि दुसरें कदाचित् हें की—

"तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वम् ।
भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ।।"†

आपली साधना व आपले अनुभव यांचें फलच असलेला जो उपदेश आपण मला केला आहे त्याबद्दल मी आपला ऋणी आहें. नाना प्रकारच्या अभिनव कल्पना डोक्यांत बाळगल्यामुळे माणसाला कधीकधी दुःखें भोगावीं लागतात हें अगदी खरें आहे आणि याचा मला कितीतरी वेळां अनुभव देखील आला आहे.

परंतु या वेळीं माझा रोग वेगळाच आहे. प्रभूच्या कृपेवर माझा अखंड विश्वास आहे. तो कधीहि लोपणार नाही. धर्मग्रंथांवरील माझी श्रद्धा देखील ढळलेली नाही. पण माझ्या जीवनाचीं गेलीं पांच-सात वर्षें नाना प्रकारच्या विघ्नांशीं सतत झगडण्यांत निघून गेलीं. जशी प्रभूची इच्छा ! आदर्श शास्त्रें मला गवसलींत, आदर्श पुरुषाचें देखील मला दर्शन घडलें, तरी देखील कोणतीहि गोष्ट तडीला नेणें माझ्याकडून जमत नाही याचेंच मला अत्यंत दुःख होतें. विशेषतः कलकत्त्याच्या आसपास राहून कोणत्याहि कार्यांत मी सफल होईन असें मला वाटत नाही. माझी आई आणि दोन भाऊ कलकत्त्यांत राहतात. मी सर्वांत वडील, मधला भाऊ एफ्. ए. ची तयारी करीत आहे आणि तिसरा अद्याप लहान आहे.

त्यांची परिस्थिति पूर्वी पुष्कळच चांगली होती, परंतु वडिलांच्या मृत्यूनंतर ती फारच खालावली--- इतकी की कधीकधी त्यांना उपास घडतात ! या सर्वांवर कळस म्हणजे त्यांच्या असहायतेचा फायदा घेऊन कांही नातलगांनी त्यांना वाडवडिलांनी बांधलेल्या घरांतून काढून लावलें. हायकोर्टांत दावा केल्यानंतर त्यांना या घराचा थोडासा भाग जरी मिळाला तरी हा न्याय मिळविण्यासाठी होतें नव्हतें तें सारें खर्चावें लागल्यामुळे त्यांची आता फारच खडतर दशा झाली आहे--- कोर्टाची पायरी चढल्याने असेंच होत असतें.

कधीकधी कलकत्त्याच्या जवळ असलों म्हणजे त्यांची दुरवस्था माझ्या नजरेस पडते आणि मग रजोगुणाच्या प्राबल्यामुळे माझा

---

† कालिदासकृत शाकुंतल, अंक ५ वा. या वचनाचें तात्पर्य हें की 'हें जन्मान्तरींच्या स्नेहसंबंधाच्या व सौहार्दाच्या अस्फुट स्मृतींचें फल होय.'

अहंकार जागृत होऊन कांहीतरी करण्याची इच्छा उत्पन्न होते. अशा समयीं माझ्या मनांत विचारांचा घोर संग्राम सुरू होतो. म्हणूनच तर मीं लिहिलें होतें की माझ्या मनांत घोर तुफान माजलें आहे. आता त्यांच्या फिर्यादीचा निकाल लागला आहे. उरलेल्या भानगडी मिटविण्यासाठी कलकत्त्यांत कांही दिवस राहून मग या स्थानाचा कायमचा निरोप घ्यावा असा माझा मानस आहे. माझी ही मनीषा पूर्ण व्हावी असा आपण आशीर्वाद द्या.

" आपूर्यमाणमचलप्रतिष्ठम्
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत् कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी ।।"*

महान् दैवी शक्तीने माझें हृदय उत्तरोत्तर बलशाली व्हावें व माझीं सारीं मायाबंधनें गळून पडावीं असा मला आशीर्वाद द्या. For "We have taken up the cross, Thou hast laid it upon us, and grant us strength that we bear it unto death. Amen. †—'Imitation of Christ.'

मी सध्या कलकत्त्यांत राहत आहें. 'बलराम बसूंचें घर, ५७ रामकान्त बसु स्ट्रीट, बागबाजार, कलकत्ता' हा माझा पत्ता आहे.

दास
नरेंद्र

---

* "पाण्याने सर्व दिशांनी भरत असतांहि ज्याची मर्यादा चळत नाही अशा समुद्रामधे पाण्याने प्रवेश करावा, त्याप्रमाणे ज्या पुरुषामधे ( विकृति उत्पन्न न करतां ) सर्व इच्छा प्रवेश करतात त्याला शांति मिळते. वासनांच्या मागे धावणाऱ्यांना शांति मिळत नाही."—गीता, २–७०

† "कारण जगाच्या दुःखकष्टांचा क्रूस आम्हीं खांद्यावर घेतला आहे. हे परमपित्या, तूंच हा क्रूस आमच्या खांद्यावर ठेवला आहेस. आम्ही तो आमरण वाहूं शकूं अशी शक्ति आम्हांला दे, हेंच मागणें आहे. ॐ शांतिः !" ('ख्रिस्तानुसरण')

## (६)

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

वराहनगर, कलकत्ता
७ ऑगस्ट १८८९

पूज्यपाद,

आपलें पत्र मिळून एक आठवडा होऊन गेला. त्या वेळीं तापाने पुनः आजारी पडल्यामुळे पत्रोत्तर देऊं शकलों नाहीं याबद्दल क्षमा करावी. मध्यंतरीं दीडएक महिना प्रकृति चांगली होती, पण गेल्या १०–१२ दिवसांपासून पुनः तापाने आजारी पडलों. आता प्रकृति बरी आहे. मला आपणांस कांही प्रश्न विचारावयाचे आहेत. आपलें संस्कृत शास्त्रांचें ज्ञान व्यापक आहे, तेव्हा कृपा करून पुढील प्रश्नांचीं उत्तरें देऊन आपण मला कृतार्थ करावें.

१. छांदोग्य उपनिषद् सोडून सत्यकाम जाबालि आणि जानश्रुति यांचें उपाख्यान वेदांमधें आणखी कुठे आढळतें काय ?

२. शंकराचार्य वेदान्तसूत्रांवरील आपल्या भाष्यांत जिथे जिथे स्मृतींचा उल्लेख करतात तिथे तिथे प्रायः ते महाभारताचेंच प्रमाण देतात. परंतु महाभारतांतील वनपर्वाच्या अजगरोपाख्यानांत व उमा-महेश्वरसंवादांत, तसेंच भीष्मपर्वांत, जातिभेद हा गुणगत आहे असा स्पष्ट उल्लेख आहे. शंकराचार्यांनी या गोष्टीचा उल्लेख आपल्या ग्रंथांत कुठे केला आहे काय ?

३. वेदांतील पुरुषसूक्तानुसार जातिभेद हा जन्मगत नाही. मग जातिभेद हा जन्मगत आहे असे उल्लेख वेदांमधे कुठे कुठे आढळतात ?

४. शूद्राला वेदाध्ययनाचा अधिकार नाही याबद्दल वेदांचें प्रमाण शंकराचार्य कुठेहि देऊं शकले नाहीत. केवळ 'यज्ञेऽनवक्लृप्तः'

('शूद्र हा वैदिक यज्ञ करण्याचा अधिकारी मानला जात नाही') हें प्रमाण उद्‌धृत करून ते म्हणतात की ज्याअर्थी शूद्राला यज्ञ करण्याचा अधिकार नाही त्याअर्थी उपनिषदादींच्या अभ्यासाचाहि त्याला अधिकार नाही. पण ते स्वतःच 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' ('आता ह्यानंतर, ह्या कारणास्तव, ब्रह्मजिज्ञासा प्रारंभ होते') या सूत्राचें स्पष्टीकरण करतांना 'अथ' या शब्दाचा अर्थ 'वेदाध्ययनानंतर' असा नाही असें म्हणतात, कारण वैदिकमंत्र व ब्राह्मणें यांचें अध्ययन केल्यावांचून उपनिषदांचा अभ्यास होऊं शकत नाही या म्हणण्याला कांही प्रमाण नाही; तसेंच वैदिक कर्मकाण्ड व वैदिक ज्ञानकाण्ड यांमधे कोणत्याहि प्रकारचा पौर्वापर्य संबंध वा अनुक्रम नाही. यावरून हें स्पष्ट आहे की यज्ञात्मक वैदिक कर्मकाण्ड न वाचतां उपनिषदांचें अध्ययन करून कोणालाहि ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतां येतें. याप्रमाणे कर्मकाण्ड व ज्ञानकाण्ड यांमधे जर पौर्वापर्य संबंध वा क्रम नाही तर फक्त शूद्रांच्याच बाबतींत 'न्यायपूर्वकम्' (याच न्यायाने) इत्यादि शब्दप्रयोग करून आचार्य स्वतःचेंच मत कां म्हणून खोडून काढतात ? शूद्रांनी उपनिषदांचा अभ्यास कां करूं नये ?

एका ख्रिस्ती संन्याशाने लिहिलेलें 'Imitation of Christ' (ख्रिस्तानुसरण) नांवाचें पुस्तक मीं आपणांकडे पोस्टाने पाठविलें आहे. पुस्तक फारच सुंदर आहे. ख्रिस्ती लोकांत देखील अशा प्रकारचें त्याग-वैराग्य व दास्यभक्ति होती हें पाहून मन खरोखरच विस्मयचकित होतें. आपण कदाचित् हें पुस्तक पूर्वी वाचलेंच असेल; वाचलें नसल्यास कृपा करून तें अवश्य वाचावें, मला फार आनंद होईल.

दास
नरेंद्रनाथ

(७)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना)

ईश्वरो जयति

वराहनगर,

१७ ऑगस्ट १८८९

पूज्यपाद,

आपणांबद्दल मीं आदरसूचक शब्द वापरल्यामुळे आपणांस संकोचल्यासारखें वाटतें असें आपण मागील पत्रांत लिहिलें. पण हा दोष माझा नसून तो सर्वस्वी आपल्या उच्च गुणांचाच होय. आपल्या गुणांमुळे मी आपणांकडे एवढा आकर्षिला गेलों आहें हें मीं पूर्वी एका पत्रांत लिहिलेंच होतें. त्यावरून आपणांशीं जन्मान्तरींचा माझा कांही संबंध असावा असेंच मला मनोमन वाटतें. अमुक माणूस गृहस्थ आहे व अमुक माणूस संन्यासी आहे असला भेद मी कधी करीत नाहीं —जिथे मला यथार्थ साधुता, उदारता आणि महानता आढळते तिथे माझें मस्तक नेहमीच आदराने झुकतें—शांतिः शांतिः शांतिः। मानासाठी हपापलेल्या, पोटासाठी वैराग्य धारण केलेल्या आणि गृहस्थ व संन्यास या दोहोंच्याहि आदर्शांपासून भ्रष्ट झालेल्या आजकालच्या लक्षावधि संन्याशांपैकी एखादा तरी आपणांसारखा महात्मा निपजो एवढीच माझी भगवंताला प्रार्थना आहे. माझ्या सर्व ब्राह्मण गुरुबंधूंनी आपल्या गुणांचें वर्णन ऐकलें आहे व त्यांनी आपणांस साष्टांग प्रणिपात सांगितले आहेत.

आपण माझ्या अनेक प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. ह्या प्रश्नांपैकी एकासंबंधी माझी जी चुकीची समजूत झाली होती ती आता दूर झाली. याबद्दल मी आपला खरोखरच सदैव ऋणी राहीन. 'महाभारतादि पुराणांमधे गुणगत जातिविभागाचा जो उल्लेख केलेला आहे त्यासंबंधी शंकराचार्यांनी स्पष्ट निर्णय दिला आहे काय ?'—हा एक प्रश्न मीं आपणांस विचारला होता. जर त्यांनी असा निर्णय दिला असेल तर तो कोणत्या ग्रंथांत आढळेल ? आपल्या देशांतील प्राचीन मतानुसा

जातिविभाग हा वंशगत मानलेला आहे याबद्दल मला शंका नाही; तसेंच स्पार्टा देशांतील लोकांनी तेथील गुलामांवर अथवा अमेरिकेंतील लोकांनी तेथील निग्रोंवर जेवढे अत्याचार केले त्यापेक्षा जास्त अत्याचार कधी कधी आपल्या देशांतील शूद्रांवर केले गेले आहेत, याबद्दलहि संदेह नाही. मी स्वतः या जातिविभागाच्या बाबतींत कोणत्याहि एका विशिष्ट पक्षाचा नाहीं, कारण जातिभेद ही एक सामाजिक संस्था असून तो गुण-कर्मप्रसूत आहे हें मला ठाऊक आहे. जर एखाद्याला कर्मांच्या व गुणांच्या पलीकडे जावयाचें असेल तर त्याने जातिभेदाची कल्पना देखील मनाला शिवूं देऊं नये. असली कल्पना बाळगल्यास त्याची मोठी हानि होईल. या सर्व बाबतींत गुरुकृपेने माझे कांही निश्चित विचार बनलेले आहेत, पण आपली विचारसरणी जर मला कळली तर माझीं कांही मतें दृढ होतील व कांहींतील चुका दुरुस्त करतां येतील. मधमाशांच्या पोळ्याला कशाने तरी टोचल्याशिवाय मध बाहेर पडत नाही—यास्तव मी आपणांस आणखी कांही प्रश्न विचारणार आहें. मला बालक आणि अज्ञ समजून राग न मानतां योग्य उत्तरें देण्याची कृपा करावी.

१. वेदान्तसूत्रांत वर्णिलेली मुक्ति आणि अवधूतगीता व इतर ग्रंथ यांतील निर्वाण हीं एकच आहेत काय ?*

२. 'जगद्व्यापारवर्ज्यम्' † इत्यादि सूत्रानुसार पूर्ण ईश्वरत्व जर कुणाला प्राप्त होत नसेल तर मग निर्वाणाचा अर्थ तरी काय ?

३. जगन्नाथपुरी येथे चैतन्यदेव सार्वभौमांना म्हणाले, "व्यास-सूत्रांचा अर्थ मला कळतो, तीं द्वैतप्रतिपादक आहेत; परंतु भाष्यकारांनी

* येथे आपण ही गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी की स्वामीजी विचारीत असलेल्या या साऱ्या प्रश्नांवरून स्वामीजी त्या दिवसांत वेदान्त तत्त्वज्ञान, भारताचीं जुनीं श्रुति-स्मृति-पुराणादि शास्त्रें आणि चालीरीती व रूढि यांचें साकल्याने ज्ञान प्राप्त करून घेऊन त्यांच्याविषयीच्या अंतिम परिपक्व सिद्धान्ताप्रत पोहोचण्यासाठी ज्या बौद्धिक अवस्थांमधून जात होते त्यांची कांहीशी कल्पना येऊं शकते.

† या सूत्रानुसार सृष्टि, स्थिति व प्रलय या तीन क्रियांचा कर्ता फक्त ईश्वरच होय. मुक्त जीवांना या तीन शक्ति सोडून इतर सर्व दैवी शक्ति प्राप्त होतात.

तीं अद्वैतप्रतिपादक आहेत असें कसें म्हटलें हेंच मला कळत नाही"--ही गोष्ट खरी आहे काय ? चैतन्यदेवांचा प्रकाशानंद सरस्वतींशीं या विषयावर वाद होऊन त्यांत चैतन्यदेव विजयी झाले अशी एक लोककथा आहे. असें सांगतात की चैतन्यदेवांनी लिहिलेल्या भाष्याची प्रत प्रकाशानंदांच्या मठांत होती.

४. शंकराचार्यांना तंत्रग्रंथांत प्रच्छन्न बौद्ध म्हटलें आहे. प्रज्ञा-पारमिता नामक बौद्धांच्या महायानग्रंथांतील मतांशीं आचार्यांनी प्रति-पादिलेल्या वेदान्तमताचें पूर्ण सादृश्य आढळतें. बौद्धांचें 'शून्य' व आपलें 'ब्रह्म' हीं दोन्हीं एकच आहेत असें पंचदशीकार देखील म्हणतात. या साऱ्याचा अर्थ काय ?

५. वेदान्तसूत्रांत वेदांच्या प्रामाण्याविषयी कांही आधार कां दिलेला नाही ? परमेश्वराच्या अस्तित्वाचें प्रमाण वेद होत असें प्रथम म्हटलें आहे आणि नंतर 'पुरुषनि:श्वसितम्' (परमेश्वराचें नि:श्वसित) म्हणून वेद प्रमाण आहेत असें सांगितलें आहे. पाश्चात्त्य तर्कशास्त्रांत ज्याला 'चक्राकार तर्क' ('Argument in a circle') म्हणतात तशा प्रकारें हें कथन सदोष नाही काय ?

६. श्रद्धा हवी असें वेदान्त आपल्याला सांगतो, कारण केवळ तर्कानें आपण कोणत्याहि निर्णयाप्रत पोहोचूं शकत नाहीं. हें जर खरें असेल तर मग नैयायिकांच्या अथवा सांख्यांच्या विचारपद्धतींत किंचित् जरी न्यून आढळलें तरी त्यावर आपण तर्कयुक्त आक्षेपांचा भडिमार कां म्हणून करावा ? आणि दुसरें असें की विश्वास तरी कुणावर ठेवावा ? जो तो आपापलें मत प्रस्थापित करण्यासाठी जणु वेडा झालेला आहे. 'सिद्धानां कपिलो मुनि:'* असे थोर कपिल मुनिच जर व्यासांच्या मतानुसार मोठा प्रमाद करीत असतील तर स्वत: व्यास देखील त्याहून मोठा प्रमाद करीत नसतील हें कशावरून ? कपिलांना वेदांचा अर्थच कळला नाही काय ?

७. 'आप्तोपदेशवाक्य: शब्द:' अर्थात् ब्रह्मज्ञ ऋषींची वाणी

* 'सिद्धांमधे मी कपिल मुनि होय'.--गीता, १०-२६. वेदान्तसूत्रभाष्यांत (२-१-१) शंकराचार्यांनी वैदिक कपिल व सांख्यकार कपिल हे दोघे एकच होत याविषयी संदेह प्रकट केला आहे.

म्हणजेच शब्द वा वेद होत असें न्यायमत आपल्याला सांगतें. या दृष्टीने ऋषि हे सर्वज्ञ होत. मग खगोलशास्त्राच्या साध्या साध्या नियमांच्या बाबतींत 'सूर्य-सिद्धान्ता'ने त्यांना अज्ञ ठरविलें हें कसें ? पृथ्वी त्रिकोणी असून ती वासुकीच्या मस्तकावर ठेवलेली आहे इत्यादि जे सांगतात त्यांच्या बुद्धिरूपी नौकेचा आश्रय घेऊन आम्ही या भव-सागराच्या पलीकडे कसें जाणार ?

८. सृष्टिनिर्माणकार्यांत ईश्वर जर जीवमात्राच्या सदसत्-कर्मांवर अवलंबून राहत असेल तर मग त्याची उपासना करून आम्हांला काय लाभ होणार ? नरेशचंद्र कवीने एक सुंदर गीत रचलें आहे, त्याचा आशय असा--

"जें कपाळीं लिहिलें आहे तेंच जर घडणार असेल तर 'जय दुर्गे श्रीदुर्गे' म्हणून टाहो फोडण्यांत काय अर्थ ?"

९. एखाद्या मुद्यासंबंधी पुष्कळशीं समान अवतरणें एखादद्दुसऱ्या विरुद्ध अवतरणाने खोडून काढणें अयोग्य होय. हें जर खरें असेल तर मग मधुपर्कादि * चिरप्रचलित प्रथा 'अश्वमेधं गवालंभं संन्यासं पलपैतृकम्' इत्यादींसारख्या एखादद्दुसऱ्या विरुद्ध अवतरणामुळे कां म्हणून निषिद्ध मानल्या गेल्या ?

वेद जर सर्व काळासाठी आहेत तर 'हा धर्म द्वापर युगासाठी', 'हा धर्म कलियुगासाठी' इत्यादि वचनांचा अर्थ काय व त्यांत कितपत तथ्य आहे ?

१०. ज्या ईश्वरापासून आपल्याला वेद मिळाले त्यानेच नंतर

---

* मधुपर्क ही एक वैदिक प्रथा असून हिच्यांत गोवधाची आवश्यकता आहे. या प्रथेनुसार अतिथीच्या सत्कारासाठी अनेक पक्वान्नें तयार करण्यांत येत. त्यांमधे गोमांसापासून तयार केलेलीं पक्वान्नेंहि असत. स्वामी विवेकानंदांनी उल्लेखिलेलें अवतरण गोमांस निषिद्ध मानतें. पूर्ण अवतरण पुढीलप्रमाणे आहे--

"अश्वमेधं गवालंभं संन्यासं पलपैतृकम् ।
देवरेण सुतोत्पत्ति कलौ पंच विवर्जयेत् ।।"

--अर्थात् अश्वमेध, गोवध, श्राद्धांतील मांसपिंडदान, संन्यासग्रहण व पति असमर्थ असल्यास दिराच्या द्वारें प्रजोत्पत्ति हीं पांच कर्में कलियुगांत निषिद्ध आहेत.

बुद्ध होऊन वेदांचें खंडन केलें. मग या दोहोंपैकी कुणाच्या आदेशाचें अनुसरण करावें? त्यांच्यापैकी कुणाला प्रमाण मानावें?—पहिल्याला की दुसऱ्याला?

११. कलियुगांत वेदमंत्र फलदायी नाहीत असें तंत्रग्रंथ सांगतात. मग भगवान शिवांच्या कोणत्या उपदेशाचें पालन करावें?

१२. वेदान्तसूत्रांत व्यास म्हणतात की वासुदेव, संकर्षणादि चतुष्टयाची उपासना करणें चुकीचें आहे आणि फिरून तेच व्यास भागवतांत या उपासनेचें माहात्म्य विशद करून सांगतात. हे व्यास काय खुळे होते?

यांशिवाय माझ्या आणखी पुष्कळ शंका आहेत. त्यांचें समाधान होईल या आशेने त्या मी पुढे केव्हातरी आपणांसमोर मांडीन. प्रत्यक्ष भेटीशिवाय असले सारे प्रश्न चांगल्या रीतीने मांडतां येत नाहीत व आपल्या अपेक्षेप्रमाणे आपलें पूर्ण समाधानहि होत नाही. म्हणून गुरुकृपेने आपल्या दर्शनासाठी जेव्हा मी लवकरच तेथे येईन तेव्हा हे सगळे प्रश्न आपणांस विचारीन.

धर्माच्या बाबतींत प्रत्यक्ष साधना केल्यावांचून केवळ तर्क-विचारांच्या बळावर सत्य सिद्धान्तांप्रत पोहोचणें शक्य नाही असें मीं ऐकलें आहे. तरी पण सुरवातीला बुद्धीचें थोडेबहुत समाधान होणें आवश्यक आहे असें मला वाटतें.

दास
नरेंद्र

## (८)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

श्रीदुर्गा शरणम्

बागबाजार, कलकत्ता,
२ सप्टेंबर १८८९

पूज्यपाद,

कांही दिवसांपूर्वी आपलीं दोन पत्रें मिळालीं. आपल्या ठिकाणीं

असलेला ज्ञान व भक्ति यांचा अपूर्व मिलाफ पाहून मला फार आनंद झाला. तार्किकपणा सोडून देण्याचा जो उपदेश आपण मला केला आहे तो खरोखर योग्य आहे आणि मानवजीवनाचें अंतिम लक्ष्य देखील हेंच होय--'भिद्यते हृदयग्रंथिः' इत्यादि.† परंतु माझे गुरुदेव म्हणत त्याप्रमाणे घागर पाण्यांत बुडवून भरत असतां आरंभीं भक्‌भक् असा आवाज होतो, पण ती पूर्ण भरल्यानंतर हा आवाज बंद होतो. माझ्याहि बाबतींत अगदी असेंच समजावें. बहुतेक या पंधरा-वीस दिवसांत मी आपल्या भेटीस येऊं शकेन असें वाटतें--ईश्वर माझी मनोवांच्छा पूर्ण करो हीच प्रार्थना.

दास
नरेंद्र

(९)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

वराहनगर, कलकत्ता,
१३ डिसेंबर १८८९

पूज्यपाद,

आपल्या पत्रावरून मला सविस्तर माहिती कळली, आणि त्यानंतर राखाल यांच्या पत्रावरून समजलें की त्यांची आपणांशी भेट झाली. आपण लिहिलेली पुस्तिकाहि मला मिळाली. Theory of Conservation of Energy अर्थात् विश्वांतील शक्तीची ऱ्हास-वृद्धि होत नाही या वैज्ञानिक सिद्धान्ताचा शोध लागल्यापासून

† "भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः। क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥" --"आत्मज्ञान झालें म्हणजे साधकाच्या हृदयग्रंथि छिन्न होऊन जातात, सर्व संशय नष्ट होतात आणि समस्त कर्मबीजांचा नाश होतो." --मुंडकोपनिषद्, २-२-८.

युरोपांत एकप्रकारच्या वैज्ञानिक अद्वैतवादाचा प्रसार होत आहे. परंतु हा वैज्ञानिक अद्वैतवाद परिणामवादाहून वेगळा नाही. शंकराचार्यांचा विवर्तवाद व सांप्रतचा वैज्ञानिक अद्वैतवाद यांमधील भेद आपण दर्शविला हें ठीक झालें. जर्मन सर्वातीतवाद्यांचें † ( Transcendentalists चें) स्पेन्सरने जें विडंबन केलें आहे व ज्याचा आपण उल्लेख केला आहे त्याचा अर्थ मला कळला नाही. स्वतः स्पेन्सरने या जर्मन दार्शनिकांकडून पुष्कळसें ज्ञान ग्रहण केलें आहे. आपला प्रतिपक्षी गफ (Gough) याला हेगेलचें तत्त्वज्ञान चांगलें समजलें आहे की नाही याचीच शंका आहे. तें कांहीहि असो, आपलें उत्तर मात्र अगदी तीक्ष्ण व प्रतिपक्षाचें तोंड बंद करणारें असेंच आहे.

दास
नरेंद्रनाथ

(१०)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

वैद्यनाथ,
२६ डिसेंबर १८८९

पूज्यपाद,

पुष्कळ दिवस प्रयत्न केल्यानंतर आपल्या दर्शनाचा योग आता येईल असें दिसतें. एकदोन दिवसांतच काशीधामीं आपल्या चरणांपाशी उपस्थित होईन.

या ठिकाणीं कलकत्त्याच्या एका गृहस्थाच्या घरीं कांही दिवसांपासून मी राहत आहें, परंतु काशीस जाण्यासाठी माझें मन आता

† इंद्रियज्ञाननिरपेक्ष व स्वयंसिद्ध असें आणखी एक प्रकारचें ज्ञान आहे असें यांचें मत आहे.

अत्यंत व्याकुळ झालें आहे.

काशीक्षेत्रीं कांही काळ वास करावा आणि भगवान विश्वनाथ व जगन्माता अन्नपूर्णा यांची माझ्यावर कशी काय कृपा होते तें पाहावें अशी इच्छा आहे. 'शरीरं वा पातयामि, मंत्रं वा साधयामि'— एक-तर देह टाकीन नाहीतर ध्येय प्राप्त करून घेईन अशी प्रतिज्ञा मीं या वेळीं केली आहे. — भगवान काशीनाथ मला साहाय्य करोत हीच प्रार्थना.

दास
नरेंद्रनाथ

(११)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

प्रयागधाम,
३० डिसेंबर १८८९

पूज्यपाद,

एकदोन दिवसांत काशीस येईन असें पत्र मीं आपणांस लिहिलें होतें, पण ईश्वराच्या इच्छेपुढे कोण काय करणार ? योगेंद्र नामक माझे एक गुरुबंधु चित्रकूट, ओंकारनाथ इत्यादि स्थानांची यात्रा करून येथे आले व देवीने आजारी पडले, अशी बातमी मला कळली. म्हणून त्यांच्या सेवेसाठी मी इथे आलों आहें. आता त्यांची प्रकृति उत्तम आहे. येथील कांही बंगाली सज्जन अत्यंत धर्मनिष्ठ आणि प्रेमळ असून ते माझी सर्वप्रकारें काळजी घेत आहेत. या स्थानीं माघ मासीं मीं कल्पवास‡ करावा असा त्यांचा पराकाष्ठेचा आग्रह आहे. पण माझ्या मनाला मात्र काशीचा सारखा ध्यास लागला असून आपल्या दर्शना-

‡ एक धार्मिक व्रत. या व्रतांत प्रयाग येथील गंगा-यमुनेच्या संगमांत नेमाने विधिपूर्वक स्नान करून पूजा इत्यादि करण्याची प्रथा आहे.

साठी तें अतिशय व्याकुळ झालें आहे. या मंडळींचा आग्रह बाजूला सारून दोनचार दिवसांतच येथून निघण्याचा व काशीनाथांच्या पवित्र राज्यांत उपस्थित होण्याचा प्रयत्न मी करीत आहें. अच्युतानंद सरस्वती नांवाचे माझे संन्यासी गुरुबंधु जर आपणांकडे माझ्याबद्दल चौकशी करावयास आले तर त्यांना कृपा करून सांगावें की मी लवकरच काशीस येत आहें. ते फारच सज्जन आहेत आणि विद्वान्हि आहेत. त्यांना बांकीपूरला सोडून मला येथे येणें भाग पडलें राखाल व सुबोध अद्यापहि काशींतच आहेत काय ? यंदा कुंभमेळा हरिद्वारलाच होणार आहे की काय याविषयी चौकशी करून मला तसें कृपा करून कळवावें.

अनेक ठिकाणीं अनेक ज्ञानी, भक्त, साधु व पंडित मीं पाहिले आणि अनेकांनी माझ्यावर निरतिशय प्रेम देखील केलें. पण 'भिन्नरुचिर्हि लोक:'--लोकांची रुचि भिन्न भिन्न असते. आपणांकडे माझा जीव कसा अगदी सारखा ओढ घेतो--आपल्या संगतींत आनंदाचा जो आस्वाद मला मिळतो तो आणखी कुठेहि मिळत नाही. पाहावें काशीनाथाची काय इच्छा आहे तें !

दास

नरेंद्र

माझा पत्ता--डॉ. गोविंदचंद्र बसु यांच्या घरीं, चौक, अलाहाबाद.

## (१२)*

( श्री. बलराम बोस यांना )

श्रीरामकृष्णो जयति

अलाहाबाद,

सादर नमस्कार, विनंती विशेष, ५ जानेवारी १८९०

आपल्या पत्रांत आपल्या आजारासंबंधीचा मजकूर वाचून फार वाईट वाटलें. वैद्यनाथ येथे हवापालट करण्यासाठी जाण्यासंबंधी जें

पत्र मीं आपणांस लिहिलें होतें त्याचें सार हेंच की आपणांसारख्या अशक्त व तोळामासा प्रकृति असणाऱ्या व्यक्तीला त्या ठिकाणीं खूप पैसा खर्च केल्याशिवाय राहणें अशक्य आहे. आपणांसाठी हवापालट जर खरोखरच आवश्यक असेल आणि केवळ स्वस्त ठिकाण धुंडाळण्या-साठी जर आपण चालढकल करीत असाल तर ही खचित मोठ्या दुःखाची गोष्ट होय.

वैद्यनाथची हवा अत्यंत चांगली आहे, परंतु पाणी वाईट असून त्यामुळे पोट फार बिघडतें. मला तर तेथे रोज आंबट ढेकर येत असत. यापूर्वी मीं आपणांस एक पत्र लिहिलें होतें, तें आपणांस मिळालें नाही काय ?— की बेअरिंग ( पोस्टाचें तिकिट न लावलेलें ) म्हणून तें तसेंच परत धाडून दिलें ? हवापालट करण्यासाठी आपणांस जावयाचेंच असेल तर लवकरच जाणें बरें—शुभस्य शीघ्रं. आपण राग मानूं नका—आपला स्वभावच असा आहे की आपणांस वाटतें की साऱ्या गोष्टी आपल्या मनासारख्या जुळून याव्यात. पण दुर्दैवाने आपल्या मर्जीप्रमाणे साऱ्या गोष्टी या जगांत क्वचितच घडतात. आत्मानं सततं रक्षेत्—आपण सर्वदा स्वतःचें रक्षण केलें पाहिजे. 'भगवत्कृपेने सर्व-कांही होतें' हें ठीक आहे, पण जो उद्यमशील आहे त्यालाच ईश्वर मदत करतो हें देखील आपण लक्षांत घेतलें पाहिजे. पैशाची बचत व्हावी अशीच जर तुमची इच्छा असेल तर ईश्वर काय स्वतःच्या बापाचा पैसा खर्च करून तुमच्या हवापालटीसाठी व्यवस्था करील ? ईश्वरावर जर एवढा निर्भर असेल तर मग डॉक्टरांना बोलावूं नका.... जर हें सारें आपणांस जमत नसेल तर आपण काशीला जावें. मी येथून केव्हाच निघून गेलों असतों, पण येथील सज्जन मंडळी मला जाऊं देत नाहीत. पाहूं या काय होतें तें....

पण मी आपणांस पुनः सांगतों की हवापालट आवश्यकच जर असेल तर पैसा वांचावा म्हणून टंगळमंगळ करूं नका. तसें जर कराल तर तो आत्मघात होईल आणि आत्मघात करणाऱ्याचें रक्षण ईश्वर देखील करूं शकत नाही. तुलसीबाबूंना व इतरांना माझा नमस्कार सांगावा.

आपला
नरेंद्रनाथ

(१३)*

( श्री. यज्ञेश्वर भट्टाचार्य यांना )

अलाहाबाद,
५ जानेवारी १८९०

प्रिय फकीर,

एक विशेष गोष्ट मी तुम्हांला सांगतों आणि ती तुम्हीं सदैव ध्यानांत ठेवावी. कदाचित् तुमची व माझी पुन: भेट होणार नाही. नीतिपरायण व साहसी व्हा, हृदय अगदी शुद्ध असूं द्या. पूर्णपणे नीतिपरायण व शूर व्हा––प्राणाची देखील पर्वा करूं नका. धार्मिक मतमतान्तरांच्या बाबतींत उगीच डोकें शिणवूं नका. जे भित्रे आहेत तेच पाप करीत असतात; वीर कधीहि पाप करीत नाहीत–– पापी विचार देखील ते मनांत येऊं देत नाहीत. सर्वांवर प्रेम करण्याचा प्रयत्न करा. तुम्ही स्वत: खऱ्या अर्थानें 'माणूस' व्हा आणि तुमच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली असणाऱ्या राम, कृष्णमयी, इंदु प्रभृतींना साहसी, नीतिपरायण व सहानुभूतिसंपन्न बनविण्याचा प्रयत्न करा. वत्सांनो, तुमच्यासाठी नीतिपरायणता व साहस यांच्याव्यतिरिक्त दुसरा धर्म नाही. भित्रेपणा, पाप, दुराचरण वा दुर्बलता यांना मुळीच थारा देऊं नका––बाकी सर्वकांही मग तुम्हांला आपोआपच मिळेल. तसेंच, रामला नाटक बघण्यासाठी किंवा मनाला दुर्बल बनविणारे इतर मनोरंजनाचे कार्यक्रम दाखविण्यासाठी स्वत:बरोबर नेऊं नका अथवा त्यालाहि जाऊं देऊं नका.

तुमचा
नरेंद्रनाथ

(१४)*

( राम, कृष्णमयी आणि इंदु यांना )

अलाहाबाद,
५ जानेवारी १८९०

प्रिय राम, कृष्णमयी आणि इंदु,

मुलांनो, लक्षांत ठेवा की, भित्रे आणि दुर्बलच पापाचरण करतात आणि खोटें बोलतात. साहसी व दृढचित्ताच्या व्यक्ति सर्वदा नीतिपरायण असतात. नीतिमान, साहसी व सहानुभूतिसंपन्न होण्याचा प्रयत्न करा.

तुमचा
नरेंद्रनाथ

(१५)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

श्री. सतीशचंद्र मुकर्जी यांचें घर,
गोराबाजार, गाझीपूर,
२१ जानेवारी १८९०

पूज्यपाद,

तीन दिवसांपूर्वी मी गाझीपूरला येऊन पोहोचलों. माझे बालमित्र श्री. सतीशचंद्र मुकर्जी यांच्या घरीं मी उतरलों आहें. हें स्थान खरोखरच अत्यंत रमणीय आहे. जवळच भागीरथी वाहत आहे, पण तिच्यांत स्नान करणें मोठ्या कष्टाचें आहे. तिथे जाण्यासाठी सोपा रस्ता नाही आणि वाळू तुडवीत तुडवीत जाऊं म्हटलें तर बराच त्रास होतो. माझ्या मित्राचे वडील श्री. ईशानचंद्र मुकर्जी इथेच आहेत. ते फारच सज्जन आहेत आणि त्यांच्याविषयी मीं आपणांस

पूर्वीच सांगितलें होतें. आज ते काशीस जात आहेत आणि तेथून मग ते कलकत्त्याला जातील. त्यांच्याबरोबर पुन: काशीला जावें अशी माझी फार इच्छा होती, पण ज्या कामासाठी---अर्थात् बाबाजींच्या † दर्शनासाठी--मी इथे आलों तें अद्याप सफल झालें नाही. म्हणून आणखी दोनचार दिवस मला विलंब होईल. या ठिकाणीं सगळेंकांही चांगलें दिसतें, येथील लोकहि सज्जन आहेत, पण ते पाश्चात्त्य वळणावर गेलेले दिसतात. आणि मला तर पाश्चात्त्यपणा बिलकुल पसंत नाही. केवळ माझा मित्रच असा दिसतो की ज्याला अद्याप या खुळाने फारसें पछाडलें नाही. परकीयांनी येथे आणलेली सभ्यता किती तकलुबी आहे ! त्यांनी या देशांत जडवादाचें कसें मृगजळ निर्माण करून ठेवलें आहे ! भगवान विश्वनाथ या दुबळ्या मनाच्या लोकांचें रक्षण करोत ! बाबाजींची भेट झाल्यानंतर खुलासेवार पत्र लिहीन.

दास

विवेकानंद

ता. क.-- वैराग्य म्हणजे वेडेपणा व पाप असें भगवान शुकांच्या या जन्मभूमींत लोकांना वाटूं लागलें आहे-- केवढा हा दैवदुर्विलास !

(१६)*

( श्री. बलराम बोस यांना )

श्रीरामकृष्णो जयति

गाझीपूर,
३० जानेवारी १८९०

पूज्यपाद,

मी येथे सतीशबाबूंच्या घरीं राहत आहें. गेल्या कांही दिवसांत पाहिलेल्या अनेक स्थानांमधे हेंच मला सर्वांहून जास्त आरोग्यवर्धक

† गाझीपूरचे विख्यात योगी पवहारी बाबा.

वाटतें. वैद्यनाथचें पाणी मोठें जड, त्यामुळे अपचन होतें. अलाहाबादची वस्ती फारच दाट आहे. काशी येथील माझ्या थोड्या दिवसांच्या मुक्कामांत रात्रंदिवस मी तापानेंच आजारी होतों--इतका मलेरियाचा त्रास त्या ठिकाणीं आहे. गाझीपूरचें हवापाणी--विशेषतः ज्या भागांत मी राहत आहें तेथील हवापाणी फार उत्तम आहे. पवहारी बाबांचें निवासस्थान पाहून आलों. तें इंग्रजी बंगल्यासारखें असून त्याच्या चाऱ्ही बाजूला उंच भिंती आहेत, आंतमधें बगीचा आहे, मोठ्या आकाराच्या खोल्या आहेत आणि घराला उंच धुराडींदेखील आहेत. ते कुणालाहि आंत येऊं देत नाहीत, इच्छा झालीच तर दारापाशी येऊन आंतूनच बोलतात. एक दिवस मी तिथे गेलों होतों, पण थंडींत वाट पाहून पाहून थकलों आणि परत आलों. येत्या रविवारीं मी काशीला जाईन. तोंपर्यंत बाबाजींचें दर्शन घडल्यास ठीकच, नाही तर पुढे मी वाट बघणार नाहीं. प्रमदाबाबूंच्या ठिकाणासंबंधी काशीहून मी आपणांस लिहीनच. काली भट्टाचार्यांचा येण्याचा निश्चयच असेल तर काशीला जाण्यासाठी मी रविवारीं निघाल्यानंतर त्यांनी यावें--पण त्यांनी न आलेलेंच बरें. काशी येथे दोनचार दिवस राहून मग हृषीकेशला जाईन. कदाचित् प्रमदाबाबू माझ्याबरोबर हृषीकेशला येतील. आपणां सर्वांना माझा नमस्कार आणि फकीर, राम, कृष्णमयी इत्यादिकांना माझा आशीर्वाद.

दास
नरेंद्र

ता. क.--माझ्या मतें आपण गाझीपूरला येऊन कांही दिवस राहिलांत तर फार चांगलें होईल. इथे सतीशबाबू आपणांसाठी बंगला मिळवून देतील. तसेंच या ठिकाणीं श्री. गगनचंद्र राय नामक एक सद्गृहस्थ राहतात. ते अफूच्या ऑफिसांतील प्रमुख अधिकारी असून अत्यंत सौजन्यशील, परोपकारी व सर्वांशीं मिळून मिसळून वागणारे असे आहेत. हे सारेजण आपली सर्व व्यवस्था करतील. येथे घरभाडें १५ ते २० रु. च्या दरम्यान आहे; तांदुळ महाग असून दूध रुपयाला १६ ते २० शेरांपर्यंत मिळतें. बाकी साऱ्या वस्तु मात्र अत्यंत स्वस्त आहेत आणि येंथील मंडळी आपली सर्व प्रकारें काळजी

घेतील व कोणतीहि अडचण पडूं देणार नाहीत. परंतु येथे थोडा अधिक खर्च येईल—–४०-५० रुपयांपेक्षा जास्त खर्च पडेल. काशींत भयंकर मलेरिया आहे.

प्रमदाबाबूंच्या बगिच्यांत मी केव्हाहि राहिलों नाहीं. त्यांना वाटतें की मीं नेहमीच त्यांच्याजवळ राहावें. त्यांचा हा बगीचा खरो-खरच अत्यंत सुंदर असून फार मोठा आहे व त्यांत मोकळी जागा देखील बरीच आहे. तो खूप चांगल्या रीतीने सजविलेला आहे. या वेळीं जेव्हा मी तिकडे जाईन तेव्हा त्या ठिकाणीं राहीन व आपणांस कळवीन.

—–नरेंद्र

## (१७)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

गाझीपूर,
३१ जानेवारी १८९०

पूज्यपाद,

बाबाजींची भेट होणें फार कठीण आहे. ते आपल्या घरांतून बाहेर पडत नाहीत. आणि इच्छा झालीच तर दाराजवळ येऊन आंतूनच बोलतात. त्यांच्या या बगिच्यांतील घराला दोन धुराडीं असून चोहोबाजूंनी उंच उंच भिंती आहेत. हें घर नुसतें बाहेरूनच पाहून मी परत फिरलों, कारण आंत प्रवेश मिळविण्यासाठी कांहीच उपाय नाही. लोक म्हणतात की आंतमधे गुहेसारखीं तळघरें असून तिथे बाबाजी राहतात. त्या ठिकाणीं ते काय करीत असतात हें त्यांचें त्यांनाच ठाऊक, कारण तिथे जाऊन कुणीच कधी पाहिलें नाही. एके दिवशीं मी बाबाजींच्या दर्शनासाठी गेलों होतों, पण वाट पाहतां

पाहतां अगदी थकून गेलों आणि मला तसेंच परतावें लागलें. तरीपण मी पुनः एकदा प्रयत्न करून पाहीन. रविवारीं मी काशीला जाईन, परंतु येथील मंडळी मला सोडीत नाहीत, एरवी बाबाजींच्या भेटीची माझी इच्छा आता थंडावली आहे. मी आजच येथून निघालों असतों, पण कसेंहि करून रविवारीं निघेन. हृषीकेशला जाण्याचा आपला बेत होता त्याचें काय झालें ?

दास
नरेंद्र

ता. क.––हें स्थान आरोग्यासाठीं उत्तम आहे हें त्यांतल्या त्यांत बरें आहे.

नरेंद्र

## (१८)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ॐ विश्वेश्वरो जयति

गाझीपूर,
४ फेब्रुवारी १८९०

पूज्यपाद,

आपलें पत्र मिळालें. मोठ्या भाग्याने बाबाजींचे दर्शन घडलें. ते खरोखरच एक महापुरुष आहेत. त्यांचें सर्वच कांही अद्‌भुत आहे. त्यांचें जीवन म्हणजे नास्तिकतेच्या या युगांत भक्ति आणि योग यांच्या अलौकिक सामर्थ्याचें एक ज्वलंत उदाहरण होय. मी त्यांना शरण गेलों आहें आणि त्यांनी मला आश्वासन देखील दिलें आहे––हें भाग्य खरोखर फारच थोड्या लोकांच्या वांट्यास येतें. मीं इथे आणखी कांही दिवस राहावें अशी बाबाजींची इच्छा आहे, मग ते माझ्यावर कृपा करतील. म्हणून त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून मी आणखी कांही दिवस या ठिकाणीं राहणार आहें. माझा हा बेत

पाहून आपणांस देखील आनंद होईल यांत शंका नाही. सर्वच गोष्टी कांही पत्रांत लिहितां येत नाहीत--त्या खरोखरच फार आश्चर्यकारक आहेत. भेटीअंतीं मी सर्वकांही आपणांस सांगेन. या कोटीच्या महापुरुषांच्या जीवनाचें प्रत्यक्ष दर्शन जोंपर्यंत घडत नाही तोंपर्यंत शास्त्रांवर पूर्णपणें विश्वास बसत नाही.

दास
नरेंद्र

ता. क.--या पत्रांतील माहिती गुप्त ठेवावी.

नरेंद्र

(१९)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

विश्वेश्वरो जयति

गाझीपूर,
७ फेब्रुवारी १८९०

पूज्यपाद,

आपलें पत्र आताच मिळालें. फार आनंद झाला. बाह्यतः बाबाजी वैष्णव आहेतसे दिसतें. योग, भक्ति आणि विनय यांची ते जणु साक्षात् मूर्तिच होत. त्यांच्या राहत्या ठिकाणाभोवती भिंत असून मधूनमधून दरवाजे आहेत. आंतील आवारांत एक मोठें भुयार आहे आणि बाबाजी या भुयारांत समाधीमधे लीन होऊन पडलेले असतात. जेव्हा ते भुयाराच्या बाहेर येतात तेव्हाच ते लोकांशीं बोलतात. ते काय खातात हें कुणालाच ठाऊक नाही, म्हणून लोक त्यांना 'पवहारी बाबा'† म्हणतात. मध्यंतरीं एकदा पांच वर्षे जेव्हा ते भुयाराबाहेर आले नाहीत तेव्हा लोकांना साहजिकच वाटलें की त्यांनी देहत्याग केला असावा. परंतु आता ते पुनः बाहेर आले आहेत.

† पवन वा वायु खाऊन राहणारे बाबा.

या वेळीं ते लोकांना दर्शन देत नाहीत आणि बोलावयाचेंच झालें तर दाराआडून बोलतात. भाषणांतील असली माधुरी मीं पूर्वी कधी अनुभवली नाही. प्रश्नांचीं प्रत्यक्ष उत्तरें ते देत नाहीत, म्हणतात-- 'दास क्या जाने?' पण नंतर बोलतां बोलतां त्यांच्या मुखांतून जणु अग्नि बाहेर पडतो. मीं त्यांना खूपच आग्रह केला तेव्हा ते म्हणाले, "आपण इथे कांही दिवस राहून मला कृतार्थ करावें." पण अशा प्रकारचें भाषण ते कधीच करीत नाहीत. म्हणून या शब्दांवरून मीं जाणलें की माझी इच्छा पूर्ण करण्याचें आश्वासन त्यांनी मला दिलें आहे, आणि जेव्हा जेव्हा मी त्यांना काकुळतीने आग्रह करतों तेव्हा तेव्हा ते म्हणतात की आणखी कांही दिवस इथे राहा. म्हणून या आशेवर मी इथे राहिलों आहें. ते अत्यंत विद्वान् आहेत पण बाहेरून तसें कांहीच दिसत नाही. होमहवनादि क्रिया देखील ते करीत असतात. पौर्णिमेपासून महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांचें होमहवन चाललेलें असतें. म्हणून या काळांत ते आपल्या भुयारांत जात नाहीत हें निश्चित. (आपल्या येथे येण्याबद्दल) त्यांची अनुमति कशी मिळवावी हाच माझ्यासमोर प्रश्न आहे, कारण प्रश्नांचें प्रत्यक्ष वा सरळ उत्तर न देतां 'हा दास', 'माझें सद्भाग्य' इत्यादि शब्दांचा ते उपयोग करीत राहतात. आपली जर इच्छा असेल तर पत्र पाहतांच इकडे निघून यावें; नाहीतर त्यांनी शरीरत्याग केला तर त्यांचें दर्शन न घडल्याचें दुःख आपल्या मनांत राहून जाईल. दोन दिवस येथे राहून व त्यांचें दर्शन घेऊन (म्हणजेच दाराबाहेरून त्यांच्याशीं बोलून) आपण परत जाऊं शकाल. माझे मित्र श्री. सतीशबाबू आपलें चांगलें आदरातिथ्य करतील. म्हणून पत्र मिळतांच निघून यावें. तोंवर मी बाबाजींना आपणांविषयी सांगून ठेवीन.

दास
नरेंद्रनाथ

ता. क.--असल्या महापुरुषांचा सहवास जरी घडला नाही तरी त्यांच्यासाठी घेतलेले श्रम फुकट जात नाहीत हें निश्चित.

नरेंद्र

(२०)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

गाझीपूर,
१३ फेब्रुवारी १८९०

पूज्यपाद,

आपली प्रकृति बरी नाही हें वाचून काळजी वाटत आहे. माझी देखील कंबर दुखत असून हें दुखणें सध्या बरेंच वाढलें आहे आणि त्यामुळे पुष्कळच त्रास होत आहे. दोन दिवस बाबाजींच्या भेटीसाठी मी जाऊं शकलों नाहीं, म्हणून माझ्यासंबंधी चौकशी करण्यासाठी त्यांच्याकडून एक माणूस आला होता. तेव्हा आज मीं त्यांच्याकडे जाईन. आपले शतशः प्रणाम मी त्यांना अवश्य सांगेन. 'त्यांच्या मुखांतून जणु अग्निच बाहेर पडतो'––अर्थात् त्यांच्या तोंडून अति अद्भुत व प्रगाढ भक्तीच्या व ईश्वर-निर्भराच्या स्फूर्तिदायक गोष्टी ऐकावयास मिळतात. असली अद्भुत तितिक्षा व विनय मीं कधी पाहिला नाही. त्यांच्याकडून जो कांही प्रसाद––ज्या कांही चांगल्या गोष्टी मिळतील त्यांत आपलाहि भाग राहील हें निश्चित जाणावें. आणखी काय लिहावें ?

दास
नरेंद्र

(२१)*

( श्री. बलराम बोस यांना )

ॐ नमो भगवते रामकृष्णाय

सतीशचंद्र मुखोपाध्याय यांचें घर
गोराबाजार, गाझीपूर,
१४ फेब्रुवारी १८९०

पूज्यपाद,

आपलें खेद दर्शविणारें पत्र मिळालें. हें स्थान लवकरच सोड-

ण्याचा माझा विचार नाही, कारण बाबाजींची विनंती टाळणें शक्य नाही. साधूंची सेवा करून कांही विशेष लाभ झाला नाही याबद्दल आपण खेद प्रदर्शित केला आहे. आपण म्हणतां ती गोष्ट खरी आहे आणि खरी नाहीहि. सर्वोच्च आनंदाच्या दृष्टीने ती खरी आहे, पण प्रारंभींच्या अवस्थेकडे जर आपण वळून बघाल तर आपणांस दिसून येईल की, आपण प्रथम पशु होतां, आता आपण माणूस झालां आहांत आणि पुढे आपण देवता अथवा प्रत्यक्ष परमेश्वर व्हाल. शिवाय, असल्या प्रकारचा आपला हा पश्चात्ताप व असंतोष फार चांगला आहे, तो आपल्या भावी उन्नतीचा सूचक आहे. त्यावांचून उन्नति अशक्य आहे. चुटकी वाजवितांच ज्याला ईश्वर दिसूं लागतो त्याचा पुढील उन्नतीचा मार्ग बंद झाला असेंच समजावें. आपल्या ठिकाणीं सतत दिसून येणारा असंतोष म्हणजे वरदानच होय. आपणांस कोणताहि धोका नाही हें पूर्णपणें जाणून असां.... आपण स्वतः बुद्धिमान आहांत, समजदार आहांत. धीर हीच सफलतेची गुरुकिल्ली आहे हें आपणांस सांगण्याची गरज नाही. या बाबतींत आमच्यासारख्या अवखळ पोरांना आपणांपासून पुष्कळच शिकण्यासारखें आहे यांत मुळीच शंका नाही.... आपण सुज्ञ आहांत, मी आपणांस आणखी काय सांगणार ? माणसाला दोन कान असतात, पण तोंड मात्र एकच असतें. विशेषतः आपण स्पष्टवक्ते आहांत आणि अघळपघळ अभिवचनें देणें आपणांस रुचत नाही. यामुळे कधीकधी मी आपणांवर रुष्ट होतों, परंतु नंतर विचार करून पाहिल्यानंतर तुमचेंच वागणें खरोखर विवेकपूर्ण होतें असें मला दिसून येतें. 'Slow but sure' (हळूहळू पण निश्चयपूर्वक पुढे पुढे चला.) 'What is lost in power is gained in speed.' (वरवर पाहतां शक्तीचा जो अपव्यय वाटतो, तो वास्तविक पाहतां गतीचें प्रमाण वाढविण्याच्या कामीं उपयोगी पडत असतो.) तें कांहीहि असो, पण या जगांत माणसाच्या शब्दांवरच सर्वकांही अवलंबून आहे. शब्दांमागे कोणता भाव दडलेला आहे हें जाणण्याची अंतर्दृष्टि सर्वांनाच कांही लाभलेली नसते. (आणि त्यांत परत आपण शब्दांचा उपयोग अगदी हात राखून करीत असतां.) एखाद्याच्या अंतरंगाची ओळख पटण्यासाठी त्याच्या सहवासांत दीर्घकाल राहावें लागतें. त्यावांचून

त्या माणसाची खरी ओळख पटत नाही.... धर्म हा पंथ उभारण्यांत किंवा केवळ धामधूम माजविण्यांत नाही–– आपल्या गुरुदेवांची ही शिकवण आपण कां विसरतां ? दुसऱ्याला जितकें साहाय्य करतां येईल तितकें करा, परंतु त्यांतून काय निष्पन्न झालें, त्याच्यापासून कांही लाभ झाला की हानि, हें सारें पाहण्याचा आपल्याला अधिकार नाही.... गिरीशबाबूंना फार मोठा धक्का बसला आहे. या वेळीं जर ते माताजींची * सेवा करतील तर त्यांच्या मनाला खूपच शांति लाभेल. ते खरोखरच अतिशय तीक्ष्णबुद्धीचे आहेत. आणि गुरुदेवांचा आपणांवर पूर्ण विश्वास होता. तुमच्या घराखेरीज इतरत्र ते अन्न ग्रहण करीत नसत. तसेंच माताजींचा देखील आपणांवर पूर्ण विश्वास आहे असें मीं ऐकलें आहे. या साऱ्या गोष्टी लक्षांत घेऊन आमच्यासारख्या अवखळ पोरांचे सगळे अपराध–––ते आपल्याच पुत्राने केले आहेत असें मानून–– पोटांत घालावे आणि आम्हांला क्षमा करावी एवढेंच मागणें आहे. आणखी अधिक काय लिहूं ?

पत्र पावतांच श्रीरामकृष्णांचा वार्षिक जन्मोत्सव केव्हा आहे हें कृपा करून कळवावें. कंबरेंतील दुःख अद्यापिहि मला खूपच त्रास देत आहे. थोड्याच दिवसांत हें स्थान अत्यंत रमणीय होईल––मैलोगणती पसरलेले गुलाबाच्या फुलांचे ताटवे नवीन उमललेल्या फुलांनी अगदी डवरून निघतील. त्या वेळीं उत्सवासाठी गुलाबाचीं ताजीं फुलें व कलमें पाठवीन असें सतीश म्हणतात.. भगवंताच्या कृपेने आपला पुत्र खऱ्या अर्थाने 'माणूस' बनो–– भेकडपणाचा लवलेशहि त्याच्या ठिकाणीं न राहो, हीच प्रार्थना आहे.... माताजी तेथे आल्या असतील तर त्यांना माझे कोटी कोटी प्रणाम निवेदन करा; आणि मीं सतत प्रयत्नशील व्हावें, किंवा या शरीराकडून तें जर शक्य नसेल तर त्याचा लवकरच अंत व्हावा असा मला आशीर्वाद देण्याची त्यांना प्रार्थना करा.

दास
नरेंद्र

* श्रीसारदादेवी––भगवान् श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मिणी

(२२)

( स्वामी सदानंद यांना )

गाझीपूर,
१४ फेब्रुवारी १८९०

प्रिय गुप्त,

तुमची प्रकृति आता बरी असेल अशी आशा आहे. जपध्यान, साधना करावी आणि आपण दासानुदास आहोंत असें समजून सर्वांची सेवा करावी. तुम्ही ज्या व्यक्तींजवळ राहत आहां त्यांचा दासानुदास म्हणविण्याची व त्यांच्या चरणाची धूळ घेण्याची देखील पात्रता माझ्यांतहि नाही, हें जाणून त्यांची सेवा व भक्ति करावी. त्यांनी कठोर शब्द उच्चारले किंवा तुम्हांला मारून टाकलें तरी रागावूं नका. स्त्रियांच्या सहवासांत कधी राहूं नका. हळूहळू कष्ट सहन करण्याचा व जें कांही भिक्षेंत मिळेल त्यावर राहण्याचा प्रयत्न करा. जे कोणी रामकृष्णांचें नांव घेतात ते तुमचे गुरुच आहेत असें जाणा. स्वतःला मालक समजून सर्वच जण त्याप्रमाणे वागूं शकतात, पण दास होणें हें फार कठीण आहे. विशेषेंकरून तुम्ही शशीचें (स्वामी रामकृष्णानंदांचें) अनुसरण करा. उत्कट गुरुनिष्ठा, अपार धीर व अखंड चिकाटी यांवांचून कांहीहि प्राप्त होऊं शकत नाही हें निश्चित जाणून असां. निर्भेळ नीतिपरायणता हवी—– अगदी किंचित् जरी पाय घसरला तरी सर्वनाश होईल हें ओळखून असां.

तुमचा
नरेंद्रनाथ

(२३)*

( श्री.प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

गाझीपूर,
१९ फेब्रुवारी १८९०

पूज्यपाद,

माझे गुरुबंधु गंगाधर (स्वामी अखंडानंद) यांना मीं लिहिलें होतें की त्यांनी आता आपलें निरनिराळ्या ठिकाणीं फिरणें थांबवून एका जागीं स्थायिक व्हावें. त्यांनी तिबेटांत कोणकोणते साधु पाहिले आहेत, त्यांचा आचारव्यवहार कसा काय आहे याविषयी सविस्तर माहिती कळविण्यासंबंधी देखील मीं त्यांना लिहिलें होतें. त्यांचें मला मिळालेलें उत्तर मी या पत्रासोबत पाठवीत आहें. माझे एक दुसरे गुरुबंधु काली (स्वामी अभेदानंद) यांना हृषीकेश येथे पुनःपुनः ज्वर येत आहे. येथून मीं त्यांना तार पाठविली आहे. त्या तारेच्या उत्तरांत जर त्यांनी म्हटलें की माझें तेथे जाणें आवश्यक आहे तर मात्र मला येथून सरळ हृषीकेशला जावें लागेल. तसें जर कांही झालें नाही तर मी आपणांकडे एकदोन दिवसांत येईन. माझा हा मायेचा प्रपंच पाहून कदाचित् आपणांस हसूं येईल, पण वस्तुस्थिति अशी आहे खरी. जगांत दोन्ही प्रकारच्या शृंखला आहेत–– लोहशृंखला व सुवर्णशृंखला. सोन्याच्या शृंखलेपासून अनेक प्रकारचे लाभ होतात आणि ते सारे प्राप्त झाल्यानंतर ती शृंखला आपोआपच गळून पडते. माझ्या गुरु-बंधूंची माझ्या हातून सेवा घडावी असें मला वाटतें आणि याच बाबतींत माझें कांही कर्तव्य उरलें आहे असेंहि मला वाटतें. काली यांना बहुतकरून मी अलाहाबादला किंवा दुसऱ्या एखाद्या सोयीच्या ठिकाणीं पाठवीन. आपल्या चरणीं मीं आपले शेकडो अपराध वाहिले आहेत––'पुत्रस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्, ––मी आपला पुत्र आहें, मी आपणांस शरण आलों आहें, आपण मला उपदेश द्या. अधिक काय लिहावें ?

दास
नरेंद्र

(२४)*

( स्वामी अखंडानंद यांना )

ॐ नमो भगवते रामकृष्णाय

गाझीपूर,
फेब्रुवारी १८९०

परमप्रिय गंगाधर,

तुमचें पत्र पावलें. फार आनंद झाला. तिबेटासंबंधी तुम्हीं जे कांही लिहिलें आहे तें अत्यंत आशादायक आहे. एखादे वेळीं मी तिथे जाण्याचा प्रयत्न करीन. तिबेट ही म्लेंच्छभूमि नसून संस्कृतांत या देशाला उत्तरकुरुवर्ष म्हटलें आहे. जगांतील हें सर्वोच्च पठार असल्या-मुळे तें अतिशय थंड आहे, पण हळूहळू ही थंडी सहन करतां येऊं शकते. तिबेटी लोकांच्या आचारव्यवहाराविषयी तुम्हीं कांहीच लिहिलें नाही. जर ते खरोखरच आतिथ्यशील आहेत तर मग त्यांनी तुम्हांला पुढे कां जाऊं दिलें नाही ? एक सविस्तर पत्र लिहून सर्व माहिती खुलासे-वार कळवावी. तुम्ही इकडे येऊं शकणार नाही हें वाचून वाईट वाटलें. तुमच्या भेटीची मला फार इच्छा होती. मला वाटतें, इतरांपेक्षा तुमच्यावरच माझें अधिक प्रेम आहे--माझें हृदय तुमच्या-कडेच सर्वाहून जास्त ओढ घेतें. कांहीहि असो, या मायेंतून देखील मुक्त होण्याचा मी प्रयत्न करीन.

तिबेटी लोकांच्या ज्या तांत्रिक अनुष्ठानांविषयी तुम्हीं लिहिलें आहे तीं भारतवर्षांतच बौद्धधर्माच्या अवनतीच्या काळांत अस्तित्वांत आलीं होतीं. आपल्या देशांत ज्या तांत्रिक साधना प्रचलित आहेत त्या सार्‍यांची निर्मिति बौद्धांनीच केली असा माझा विश्वास आहे. हीं सर्व तांत्रिक अनुष्ठानें आपल्या वामाचारांपेक्षा देखील जास्त भयंकर होतीं, कारण त्यांत व्यभिचाराला पूर्ण मोकळीक मिळाली होती. अशा रीतीने बौद्ध जेव्हा चारित्र्यहीन होऊन निर्वीर्य बनले

तेव्हाच कुमारिल भट्टांनी त्यांना बाहेर हाकून लावलें. ज्याप्रमाणे कांही संन्यासी शंकराचार्यांना किंवा बाऊल नामक पंथाचे लोक चैतन्य-महाप्रभूंना 'गुप्तपणें स्त्रीसंग, सुरापान आणि नाना प्रकारचें ओंगळ आचरण करणारे' म्हणतात त्याचप्रमाणे आधुनिक तांत्रिक बौद्ध बुद्धदेवांना घोर वामाचारी समजतात; एवढेंच नव्हे तर त्यांनी 'प्रज्ञापारमिता' ग्रंथांतील 'तत्त्वगाथा' इत्यादींसारख्या सुंदर सुंदर उप-देशांचा अश्लील अर्थ केला आहे. याचा परिणाम हाच झाला की सांप्रत बौद्धांचें दोन संप्रदाय झाले आहेत. ब्रह्मदेश आणि सीलोन यांमधील बौद्धांनी तंत्रांना प्राय: झुगारून दिलें आहे; तसेंच त्यांनी हिंदूंच्या देवदेवतांचें उच्चाटन केलें असून उत्तरेकडील प्रदेशांतील बौद्धांना पूज्य असलेल्या 'अमिताभ बुद्धा'ला देखील त्यांनी बाजूला सारलें आहे.सारांश हा की उत्तरेकडील बौद्ध ज्या अमिताभ बुद्धादिकांना मानतात त्यांचा उल्लेख प्रज्ञापारमितादि ग्रंथांत आढळत नाही, परंतु त्यांत इतर अनेक देवदेवतांना मानलेलें दिसतें. तसेंच, दक्षिणेकडील बौद्धांनी सहेतुकपणें शास्त्रांचें उल्लंघन करून देवदेवतांची उचलबांगडी केली आहे. 'Everything for others' ('जें कांही आहे तें दुसऱ्यांसाठी आहे') हा जो बौद्धधर्माचा पूर्ण नि:स्वार्थतेचा व परसेवेचा भाव आहे आणि जो तिबेटभर प्रचलित आहे त्यानें आधुनिक युरोपला मुग्ध करून सोडलें आहे. असो, या विशिष्ट भावासंबंधी मला पुष्कळच सांगावयाचें आहे, पण या पत्रांत तें सर्वच लिहितां येणें शक्य नाही. जो धर्म उपनिषदांमधे विशिष्ट जातीपुरताच मर्यादित होता तो सर्वांना लाभावा म्हणून बुद्धदेवांनी तो मोकळा केला आणि त्या वेळच्या प्रचलित भाषेंत सोप्या गोष्टी सांगून त्याचा खूप प्रचार केला. त्यांचा मोठेपणा त्यांनी प्रतिपादिलेल्या निर्वाणाच्या सिद्धान्तांत नाही, तर त्यांच्या ठिकाणीं अखिल विश्वाविषयी जी अतुलनीय सहानुभूति होती तिच्यांतच त्यांचा थोरपणा साठलेला आहे. ज्या उच्च उच्च प्रकारच्या समाधींनी त्यांच्या धर्माला महत्त्व प्राप्त झालें आहे त्या बहुतेक साऱ्याच समाधि वेदांमधे आहेत; वेदांमधे जर कांही नसेल तर तें म्हणजे भगवान बुद्धांचें हृदय आणि त्यांची बुद्धि, --आणि या हृदयाला आणि बुद्धीला जगाच्या इतिहासांत तोड नाही.

वेदांमधील कर्मवाद हा यहुद्यांच्या धर्मांतील व इतर धर्मांतील कर्मवादासारखाच आहे, अर्थात् यज्ञ इत्यादि बाह्य कर्मकांडाच्या द्वारें अंतःशुद्धि करावी असेंच या सर्वांचें मत आहे. या कर्मवादाला विरोध करणारी जगांतील पहिली व्यक्ति जर कोणती असेल तर ती भगवान बुद्धच होय, परंतु अंतर्गत भाव मात्र जुन्या काळांतल्या-सारखेच राहिले. उदाहरणार्थ त्यांचा 'अंतःकर्मवाद' आणि वेदांऐवजी 'सूत्तां' वर विश्वास ठेवण्याची आज्ञा. जातिभेदहि राहिला (बुद्धांच्या काळीं तो नष्ट झाला नव्हता), पण तो जातिभेद आता गुणगत मानला जाऊं लागला. जे बौद्धधर्म मानीत नसत त्यांना 'पाखंडी' म्हणण्यांत येई. सारी तीच पूर्वीची तऱ्हा ! 'पाषण्ड' (पाखंडी) हा शब्द बौद्ध फार पूर्वीपासून वापरीत आले आहेत, पण त्या बिचाऱ्यांनी तरवार मात्र कधीहि वापरली नाही व त्यांच्या ठिकाणीं परमता-विषयी मोठी सहिष्णुता होती. तर्काच्या साहाय्याने तुम्ही वेदांना उडवून लावलें, पण तुमच्या स्वतःच्या धर्माचें प्रमाण कोणतें ?––तर 'विश्वास ठेवा !' हेंच ना ? इतर धर्म तरी यावांचून आणखी काय सांगतात ? तथापि भगवान बुद्धांचा उदय व्हावा अशीच आवश्यकता त्या काळीं होती आणि म्हणूनच त्यांनी त्या काळांत अवतार घेतला. त्यांचा मायावाद कपिलांप्रमाणेच आहे. परंतु शंकराचार्यांचा माया-वाद या दोघांच्याहि मायावादापेक्षा किती तरी अधिक उदात्त आणि तर्कसंगत आहे ! बुद्ध आणि कपिल सदासर्वदा हेंच म्हणतात की 'जगांत दुखःच दुःख भरलें आहे, इथे आणखी कांहीच नाही, जगापासून दूर पळा, जीव घेऊन दूर पळा.' या जगांत सुख काय मुळीच नाही ? बुद्ध-कपिलांचें म्हणणें हें ब्राह्मांच्या म्हणण्यासारखें आहे––ब्राह्म म्हणतात की या जगांत फक्त सुखच सुख भरलें आहे !

या जगांत दुःख आहे हें खरें, पण त्यावर उपाय काय ? कुणी कदाचित् म्हणतील की दुःख सहन करतां करतां जेव्हा तुम्हांला तें सहन करण्याची सवयच होऊन जाईल तेव्हा तें दुःखच तुम्हांला सुखासारखें वाटेल. शंकराचार्यांचें म्हणणें अशा प्रकारचें नाही. ते म्हणतात की हे जग आहेहि आणि नाहीहि ('सन्नापि असन्नापि'); तें ब्रह्मापासून भिन्नहि आहे आणि अभिन्नहि आहे ('भिन्नापि अभिन्नापि')––अशा या जगाचें

रहस्य मी जाणून घेईन. या जगांत दुःख आहे की आणखी कांही आहे याचें ज्ञान मी प्राप्त करून घेईन. या जगाला बागुलबुवा समजून मी दूर पळून जाणार नाहीं. मी या जगाचें रहस्य पूर्णपणें उलगडीन. या प्रयत्नांत अनंत दुःख सोसावें लागतें हें मला ठाऊक आहे आणि तें मी मोठ्या आनंदाने सोशीत देखील आहें. मी काय एखादा पशु आहें की तुम्ही मला इंद्रियजनित सुखदुःखाचें वा जरा-मरणाचें भय दाखवितां ? मी यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेईनच आणि हें उद्दिष्ट सिद्ध करून घेण्यासाठी प्राण देखील देईन. या जगांत जाणण्यासारखें कांहीच नाही. म्हणून या सापेक्ष वा मायिक जगता-पलीकडे जर कांही असेल, ज्याला भगवान बुद्ध 'प्रज्ञापारम्' अथवा 'सर्वातीत' म्हणतात त्याचें जर अस्तित्व असेल, तर तेंच मला हवें आहे. त्याच्या लाभाने मला दुःख होईल की सुख होईल, याची मला मुळीच पर्वा नाही. किती उच्च आणि महान् आहे हा भाव ! उपनिषदांच्या आधारावर बुद्धांच्या धर्माची उभारणी झाली आहे. शंकराचार्यांचें तत्त्वज्ञान देखील उपनिषदांवरच आधारलेलें आहे. फरक फक्त एवढाच की बुद्धदेवांच्या ठिकाणीं दिसून येणारी हृदयाची उदारता शंकराचार्यांच्या ठायीं अणुमात्र देखील नव्हती. त्यांच्या ठायीं होतें केवळ शुष्क बुद्धीचें प्राबल्य. तंत्रांच्या भयाने, सर्वसामान्य जनतेच्या भयाने हातावरील फोड कापूं जाऊन त्यांनी पूर्ण हातच कापून टाकला. या सर्व गोष्टी सविस्तर लिहूं म्हटलें तर मला मोठा ग्रंथच लिहावा लागेल. पण माझी तेवढी विद्वत्ता नाही व मला तितकी सवडहि नाही.

भगवान बुद्ध माझें इष्टदैवत आहेत, माझे परमेश्वर आहेत. त्यांनी ईश्वरवादाचा उपदेश केला नाही––ते स्वतःच ईश्वर होते, हा माझा दृढ विश्वास आहे. पण ईश्वराच्या अनंत स्वरूपाला मर्यादा कुणीहि घालूं शकत नाही, फार काय पण ईश्वर स्वतः देखील स्वतःला मर्यादा घालूं शकत नाही. 'सूत्तनिपाता'मधून गण्डारसूत्ताचा तुम्हीं जो अनुवाद केला आहे तो अति उत्तम आहे. या ग्रंथांत अशाच प्रकारचें 'धनीय-सूत्त' नामक सूत्त आहे, त्यांत देखील प्रायः हाच आशय आढळतो. असल्या प्रकारचे विचार असलेले अनेक उतारे

'धम्मपद' या ग्रंथांत देखील आहेत, परंतु ती धर्मजीवनाची अंतिम अवस्था आहे. 'ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः'–– ज्ञान-विज्ञानाने ज्याचें अंतःकरण संपूर्णपणें तृप्त झालें आहे, जो सर्वतऱ्हेच्या परिस्थितींमधे विकाररहित असतो व ज्याने इंद्रियांवर पूर्ण विजय मिळविलेला आहे अशा सिद्ध पुरुषाची ही अवस्था आहे. शरीर ही काळजी घेण्यासारखी गोष्ट आहे असा ज्याचा शरीराविषयी मुळीच बोध नाही, तोच मदोन्मत्त हत्तीप्रमाणे इतस्ततः स्वच्छंद विचरण करूं शकतो. उलटपक्षीं माझ्यासारख्या क्षुद्र जीवाने एका जागीं बसून साधनेच्या द्वारा सिद्धावस्था प्राप्त करावी आणि मगच अशा प्रकारचें आचरण करावें. पण ही फार दूरची––अगदी फार फार दूरची गोष्ट आहे.

चिंताशून्यमदैन्यभैक्ष्यमशनं पानं सरिद्वारिषु
स्वातंत्र्येण निरंकुशा स्थितिरभीर्निद्रा श्मशाने वने ।
वस्त्रं क्षालनशोषणादिरहितं दिग्वास्तु शय्या मही
संचारो निगमान्तवीथिषु विदां क्रीडा परे ब्रह्मणि ।।

विमानमालम्ब्य शरीरमेतद्भुनक्त्यशेषान् विषयानुपस्थितान् ।
परेच्छया बालवदात्मवेत्ता योऽव्यक्तलिंगोऽननुषक्तबाह्यः ।।
दिगम्बरो वापि च साम्बरो वा त्वगम्बरो वापि चिदम्बरस्थः ।
उन्मत्तवद्वापि च बालवद्वा पिशाचवद्वापि चरत्यवन्याम् ।। *

––कांहीहि प्रयत्न न करतां ब्रह्मज्ञाला भोजन आपोआप प्राप्त होतें. जिथे मिळेल तिथे ते पाणी पितात, आपल्या इच्छेनुसार ते कुठेहि परिभ्रमण करतात. भय कसें तें त्यांना माहीत नसतें. कधी वनांत तर कधी स्मशानांत ते झोपतात. ज्या मार्गाने जाऊन वेद थबकतात त्या मार्गावर ते स्वच्छंद संचार करीत असतात. त्यांचें शरीर आकाशासारखें असतें. एखाद्या बालकाप्रमाणे दुसऱ्याच्या इच्छेने ते चालतात. कधी कधी ते नग्न असतात, तर कधी कधी उत्तमोत्तम वस्त्रें परिधान करितात. आणि कधी तर केवळ ज्ञानच त्यांचें आच्छादन असतें. कधी बालवत्, कधी उन्मत्तवत् तर कधी पिशाचवत्––असें त्यांचें आचरण होत असतें.

---

* श्रीशंकराचार्यकृत विवेकचूडामणि––५३८–५४०

तुम्हांला ही अवस्था प्राप्त होवो व तुम्हांला एखाद्या गेंड्याप्रमाणे इतस्ततः अनिरुद्ध संचार करतां येवो अशी माझी गुरुचरणीं प्रार्थना आहे.

तुमचा
विवेकानंद

## (२५)*

( स्वामी अखंडानंद यांना )

ॐ नमो भगवते रामकृष्णाय

गाझीपूर,
मार्च १८९०

परमप्रिय अखंडानंद,

तुमचें पत्र कालच मिळालें. अत्यंत आनंद झाला. या ठिकाणीं पवहारीजी नांवाचे जे एक अद्भुत योगी व भक्त आहेत त्यांच्याच-जवळ मी सध्या राहत आहें. ते आपल्या खोलीबाहेर कधीच येत नाहीत—कांही बोलावयाचें असल्यास दाराआडून बोलतात. खोली-मधे खड्ड्यासारखी एक जागा आहे, त्यांत ते राहत असतात. असें म्हणतात की ते समाधिअवस्थेंत महिनेच्या महिने राहतात. त्यांची तितिक्षा खूपच अद्भुत आहे. आपला बंगाल म्हणजे भक्तिप्रधान, ज्ञानप्रधान देश. तिथे योग कुणाला ठाऊक देखील नाही असें म्हटलें तरी चालेल. आणि जो कांही थोडाबहुत आहे तो केवळ हठयोगाच्या विचित्र श्वासप्रश्वासांच्या क्रियांमधेच अडकून पडला आहे. या प्रक्रिया म्हणजे निव्वळ शारीरिक कसरती होत. म्हणूनच मी या अद्भुत राजयोग्याजवळ राहत आहें, आणि त्यांनी मला कांही आशा-देखील दर्शविली आहे. इथे एका सद्गृहस्थांच्या छोटयाशा बागेंत एक सुंदर बंगला आहे. तिथेच मीं राहण्याचा निश्चय केला आहे. ही बाग बाबाजींच्या अगदी कुटीजवळच आहे. तिथे बाबाजींचा क

भाऊ साधूंच्या आदरातिथ्यासाठी राहत असतो. मी आपली भिक्षा तेथूनच घेईन. या साऱ्या प्रकरणाचा शेवट कसा काय होतो हें पाहण्यासाठी मीं सध्या माझा हिमालय-भ्रमणाचा विचार रहित केला आहे. दोन महिन्यांपासून माझ्या कमरेंत वातामुळे वेदना होत आहेत. या कारणामुळे देखील पहाड चढणें सध्या अशक्य झालें आहे. म्हणून बाबाजी मला काय देतात याची प्रतीक्षा करीत मी येथे पडलों आहें.

ज्या ज्या ठिकाणीं ज्या ज्या चांगल्या गोष्टी आढळतील त्या त्या ग्रहण करावयाच्या हें माझें ध्येयवाक्य आहे. त्यामुळे माझ्या बऱ्याचशा मित्रांना वाटतें की माझी गुरुभक्ति कमी होऊन जाईल. असल्या तऱ्हेचे विचार वा कल्पना वेडेपणाच्या व फोल पंथाभिमानाच्या द्योतक आहेत असें मी समजतों, कारण सारे गुरु एकच असून ते त्या जगद्गुरूचीं-- त्या परमेश्वराचीं विभिन्न रूपेंच होत, त्याचे विभिन्न अंशच होत.

तुम्ही जर गाझीपूरला आलांत आणि गोराबाजारांतील सतीश-बाबू अथवा गगनबाबू यांच्याकडे चौकशी केलीत तर तुम्हांला माझा पत्ता तात्रडतोब मिळेल. किंवा, या ठिकाणीं पवहारी बाबा इतके प्रसिद्ध आहेत की त्यांचें नांव सांगतांच कुणीहि तुम्हांला त्यांच्या आश्रमाचा पत्ता सांगेल. या आश्रमांत जाऊन 'परमहंसजी कोठे राहतात' अशी चौकशी केलीत तर तुम्हांला माझ्यासंबंधी सारी माहिती मिळेल. मोगलसराईजवळ दिलदारनगर नांवाचें एक स्टेशन असून तेथून रेल्वेचा एक फाटा फुटतो. तेथे गाडी बदलावी लागते आणि तारी-घाट या स्टेशनावर उतरावें लागतें. त्यानंतर तेथून समोरच दुसऱ्या कांठावर असलेल्या गाझीपूरला येण्यासाठी गंगानदी ओलांडावी लागते.

सध्या मी येथेच कांही दिवस राहीन आणि बाबाजी काय कर-तात तें पाहीन. तुम्ही जर आलांत तर आपण दोघेहि वर सांगितलेल्या बंगल्यांत कांही दिवस राहूं आणि मग हिमालयांत म्हणा की आणखी दुसरीकडे म्हणा, आपण जाऊं. मी इथे आहें ही गोष्ट वराहनगरला कोणालाहि कळवूं नका.

तुम्हांला माझे अनेक आशीर्वाद.

सतत मंगलाकांक्षी

नरेंद्र

(२६)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

गाझीपूर,
३ मार्च १८९०

पूज्यपाद,

आपलें पत्र आताच हातीं पडलें. मी कठोर वेदान्तवादी जरी असलों तरी माझा स्वभाव अत्यंत मृदु आहे हें आपणांस ठाऊक नाही. आणि हीच गोष्ट मला अत्यंत नडत आली आहे. अगदी थोडेसें जरी कांही घडलें तरी माझें अंतःकरण विरघळतें, माझा दृढ निश्चय डळमळीत होतो. मीं स्वतःच्या हितासंबंधी विचार करण्याचा कितीहि जरी प्रयत्न केला तरी दुसऱ्याच्या हिताचा प्रश्न आला की स्वतः-विषयीचे विचार आपोआपच बाजूला राहतात. या वेळीं मी अगदी पक्का निश्चय करून स्वतःसाठी कांहीतरी करण्याकरता म्हणून बाहेर पडलों होतों, पण माझे एक गुरुबंधु अलाहाबादला आजारी आहेत असें कळतांच मला तिकडे धावत जावें लागलें. आणि आता हृषीकेशहून ही बातमी आली आहे––आणि मन तिकडे पळत सुटलें आहे. मीं शरदला (स्वामी सारदानंदांना) तार केली आहे, पण अजून तिचें उत्तर मिळालें नाही. तार देखील येऊन पोहचायला जिथे इतका उशीर होतो तें हें स्थान अजबच म्हटलें पाहिजे ! कमरेंतील दुःख अजूनहि मला सोडूं इच्छीत नाही असें दिसतें. खूपच त्रास होत आहे. पवहारीजींच्या भेटीसाठी कित्येक दिवस जाऊं शकलों नाहीं; पण त्यांची माझ्यावर फार दया आहे, दररोज माणूस पाठवून माझ्यासंबंधी चौकशी करतात. परंतु आता सगळीच उलटा-पालट झाली आहे असें दिसतें ! वास्तविक मी त्यांच्या दारीं भिक्षा मागावयास आलों पण आता उलट तेच माझ्यापासून कांही शिकूं इच्छिताहेत ! त्यांनी अजून सिद्धावस्था प्राप्त करून घेतली नाही असें वाटतें––त्यांच्या ठिकाणीं कर्मकांड, व्रतें, बाह्य आचार या

साऱ्यांचा फारच अतिरेक दृष्टीस पडतो, आणि स्वतःला गुप्त ठेवण्याची फारच धडपड दिसते. समुद्राला पूर्ण भरती आली म्हणजे तो किनाऱ्याच्या मर्यादेंत कधीच राहूं शकत नाही हें निश्चित. तेव्हा बाबाजींना उगीच अधिक त्रास देणें ठीक नव्हे असें मीं ठरविलें आहे. लवकरच त्यांची रजा घेऊन मी येथून निघेन. काय करूं, विधात्याने माझें हृदय मृदु केलें आहे व तेंच माझें मरण ठरत आहे ! बाबाजी मला जाऊं देत नाहीत आणि गगनबाबू देखील मला सोडीत नाहीत. गगनबाबूंना आपण कदाचित् ओळखत असाल, ते खरोखरच अत्यंत धार्मिक, चारित्र्यशील व सहृदय गृहस्थ आहेत. तारेचें जर उत्तर आलें आणि माझें तिकडे जाणें आवश्यक असलें तर मी येथून निघेन; नाहीतर थोड्याच दिवसांनंतर मी काशीला आपणांकडे येईन. या वेळीं मात्र मी आपणांस हृषीकेशला नेल्याशिवाय सोडणार नाही— या वेळीं मी आपली कोणतीहि सबब ऐकणार नाहीं. आपण म्हणतां की तेथे स्वच्छता वगैरे राखणें कठीण आहे. पहाडांत काय पाण्याचा अभाव आहे, की जागेचा अभाव आहे ! आपण हें विसरतां की हें कलियुग आहे, व या कालांतील तीर्थें व संन्यासी देखील कलियुगांतीलच आहेत ! थैलीचें तोंड थोडें सैल केलें की मंदिरांचे मालक आपल्या देवांच्या मूर्तिदेखील फेकून देऊन आपणांसाठी जागा करून देतील ! म्हणून आपण जागेची चिंता करूं नये. तेथे कांहीच त्रास होणार नाही. तेथे उन्हाळा सुरू झाला, पण काशीसारखी उष्णता तेथे भासत नाही हें चांगलेंच आहे. त्या ठिकाणीं रात्रीं नेहमीच थंड असते, तेव्हा झोप उत्तम होईल हें सांगावयास नकोच.

आपणांस इतकें भय कां म्हणून वाटावें ? आपण घरीं सुखरूप परत जाल आणि आपणांस कोणताहि त्रास होणार नाही याची मी हमी घेतों. या ब्रिटिश राजवटींत फकिरांना म्हणा की गृहस्थाश्रमी लोकांना म्हणा, कोणताहि उपद्रव होत नाही असा माझा अनुभव आहे.

आपल्या दोघांमधे पूर्वजन्मींचा कांहीतरी संबंध आहे हें काय मी उगीचच म्हणत असेन ? आता हेंच पाहा ना, आपल्या एकाच पत्राने माझे सारे संकल्प, माझे सारे बेत ढासळून पडले आणि सर्व कामें बाजूला फेकलीं जाऊन माझीं पाउलें काशीकडे वळलीं !

माझे गुरुबंधु गंगाधर यांना पुनः पत्र लिहून या वेळीं मठांत परत फिरण्याविषयी सांगितलें आहे. ते जर मठांत जातील तर वाटेंत काशीला उतरून आपली अवश्य भेट घेतील. काशीचें हवा-पाणी आजकाल कसें आहे ? येथे राहिल्यामुळे हिवतापांतून मुक्त झालों आहें, फक्त कमरेमधील दुःख उरलें असून त्यामुळे मला अतोनात त्रास होतो. रात्रंदिवस वेदना चालू असतात. मी पहाड कसा काय चढूं शकेन याची मला काळजी लागली आहे. बावाजींची तितिक्षा खरोखरच अद्‌भुत आहे आणि म्हणूनच मीं त्यांच्यापुढे भिक्षेसाठी पदर पसरला आहे, पण पदरांत कांही पडेलसें वाटत नाही. ते कांही देऊं इच्छीत नाहीत, केवळ माझ्यापासूनच ग्रहण करण्याची त्यांची वृत्ति दिसून येते; म्हणून मी हें स्थान सोडीत आहें.

दास

नरेंद्र

ता. क.---आता मी कोण्याहि बडया धेंडाकडे जाणार नाही. भक्त कवि रामप्रसाद म्हणतात--

"हे मना, तूं आपल्याच ठिकाणीं राहा, कुणाच्याहि दारीं जाऊं नकोस. तुला जें हवें आहे तें आपल्याच ठिकाणीं बसून तुला प्राप्त होईल--फक्त आपल्या हृदयाच्या अगदी अंतस्तलीं त्याचा शोध कर. तिथे तें परम धन, तो परिस आहे. तो तुला जें मागशील तें देऊं शकेल. हे मना, या चिंतामणीच्या दारापाशी असंख्य रत्नें विखुरलेलीं आहेत"

श्रीरामकृष्ण खरोखर अजोड आहेत या सिद्धान्ताप्रत मी आता येऊन पोहोचलों आहें. या जगांत असलें अपूर्व पूर्णत्व, असली अद्‌भुत अहेतुक दया, बद्ध जीवांविषयी असली प्रगाढ सहानुभूति आणखी कुठेहि नाही. एक तर ते स्वतः म्हणत त्याप्रमाणे ते अवतार असले पाहिजेत किंवा वेदान्त तत्त्वज्ञानांत म्हटल्याप्रमाणे मुक्त असून देखील लोकहितासाठी शरीर धारण करणारे ते नित्यसिद्ध महापुरुष असले पाहिजेत, अशी माझी पक्की, अगदी पक्की खात्री आहे. अशा

महापुरुषाच्या उपासनेलाच पतंजलींनी 'महापुरुषप्रणिधानाद्वा'* असें म्हटलें आहे.

त्यांनी आपल्या जीवनांत माझ्या एकादेखील प्रार्थनेचा अव्हेर केला नाही--माझे लाखो अपराध त्यांनी पोटांत घातले. माझ्या आईवडिलांनी देखील माझ्यावर एवढें उत्कट प्रेम केलें नाही. हें कांही काव्य नव्हे, ही कांही अतिशयोक्ति नव्हे--हें अगदी बावनकशी सत्य आहे व ही गोष्ट त्यांच्या प्रत्येक शिष्याला ठाऊक आहे. विपत्तींत व प्रलोभनांत सापडलों असतां, 'भगवंता, माझें रक्षण कर' असा मीं टाहो फोडला, पण कुणाकडूनहि मला साहाय्य लाभलें नाही; पण या अद्‌भुत महापुरुषाने म्हणा किंवा या अवताराने म्हणा, लोकांचें अंतर्याम जाणण्याच्या आपल्या शक्तीने माझें सारें दुःख जाणलें आणि मला जवळ बोलावून माझी इच्छा नसतांहि तें दूर केलें. आत्मा जर अविनाशी असेल आणि म्हणून ते जर अजूनहि असतील तर मी त्यांना वारंवार हीच प्रार्थना करीन की हे अपारदयानिधे, हे माझ्या एकमेव शरणदात्या भगवान् रामकृष्णा, कृपा करा आणि माझ्या ह्या नरश्रेष्ठ मित्राच्या साऱ्या इच्छा पूर्ण करा. या जगांत जे एकमेव अहेतुकदया-सिंधु आहेत असा मला अनुभव आला आहे, ते आपलें सर्वप्रकारें मंगल करोत. शांतिः शांतिः शांतिः ।

दास
नरेंद्र

ता. क.--कृपा करून उलट टपालीं उत्तर पाठवावें.

--नरेंद्र

---

* पतंजलींचें मूल सूत्र 'ईश्वरप्रणिधानाद्वा' (ईश्वरावर ध्यान केल्यानेहि मुक्ति लाभूं शकेल) असें आहे. स्वामीजींनी त्यांत किंचित् फरक करून त्याचा येथे उपयोग केला आहे.

(२७)*

( श्री. बलराम बोस यांना )

रामकृष्णो जयति

गाझीपूर,
१५ मार्च १८९०

पूज्यपाद,

आपलें पत्र कालच मिळालें. सुरेशबाबूंचें दुखणें अत्यंत विकोपाला गेलें आहे हें वाचून फार वाईट वाटलें. जें कांही कपाळीं लिहिलें असेल तें घडून येईलच. आपण देखील आजारी आहांत हें वाचून दुःख होतें. जोंवर अहंबुद्धि आहे तोंवर उपचारासाठी योग्य प्रयत्न जर केले नाहीत तर त्याला आळशीपणाच म्हटलें पाहिजे—हा दोषहि आहे आणि अपराध पण आहे. ज्याच्या ठायीं ही अहंबुद्धि नाही त्याने तितिक्षेचाच अवलंब करणें हें सर्वांत चांगलें. जीवात्म्याची वासभूमि असलेलें हें शरीर कर्माचें एक मुख्य साधन आहे. जो या शरीराचें नरककुंड बनवितो तो अपराधी होय; आणि जो या देहाची हेळसांड करतो तो देखील दोषीच होय. कोणत्याहि प्रकारच्या परिस्थितीला न कचरतां, न डगमगतां तोंड द्यावें.

"नाभिनंदेत मरणं नाभिनंदेत जीवितम् ।
कालमेव प्रतीक्षेत निर्देशं भृतको यथा ।।"

—"आपल्या शक्तीच्या आवाक्यांत जें कांही आहे तें करावें. जीवनमरणाची कामना न बाळगतां एखाद्या सेवकाप्रमाणे आज्ञेची प्रतीक्षा करीत काळ कंठावा हाच श्रेष्ठ धर्म होय."

काशीला इन्फ्लुएंझाची भयंकर साथ सुरू झाली असून प्रमदाबाबू अलाहाबादला गेले आहेत. बाबूराम (स्वामी प्रेमानंद) अकस्मात् येथे आले. ते तापाने आजारी आहेत, अशा परिस्थितींत ते बाहेर पडलें हें ठीक झालें नाही. . .मी येथून उद्या निघणार आहें. . .परमपूज्य

माताजींना माझे कोटी कोटी प्रणाम सांगावे. मी समदर्शी व्हावें आणि जन्मतःच प्रत्येकाबरोबर येणाऱ्या बंधनांतून मोकळें होऊन नंतर स्वतःच निर्माण केलेल्या पाशांत मीं पुनः फसूं नये असा आपण लोक मला आशीर्वाद द्यावा. जर कुणी मंगलकर्ता असेल, त्याला जर शक्य असेल आणि त्याला जर सोयीचें वाटत असेल तर तो आपणां सर्वांचें परम कल्याण करो हीच माझी सदैव प्रार्थना आहे.

दास
नरेंद्र

## (२८)*

( श्री. अतुलचंद्र घोष यांना )

गाझीपूर,
१५ मार्च १८९०

प्रिय अतुलबाबू,

आपल्याला भयंकर मानसिक कष्ट होत आहेत हें ऐकून फार दुःख झालें. ज्यामुळे आपण आनंदांत राहाल असेंच वागा.

"यावज्जननं तावन्मरणम् तावज्जननीजठरे शयनम् ।
इति संसारे स्फुटतरदोषः कथमिह मानव तव सन्तोषः ।।"

—"जोंवर जन्म आहे तोंवर मरण आहे आणि मातृगर्भांत पुनः पुनः प्रवेश देखील आहे. हा या संसारांत स्पष्ट दिसणारा दोष असतांना, हे मानवा, येथे तुला संतोष कुठून लाभणार ?"

दास
नरेंद्र

ता. क.— मी उद्या येथून निघणार आहें— अदृष्ट मला कुठे घेऊन जातें तें पाहूं या.

## (२९)*

( स्वामी अखंडानंद यांना )

ॐ नमो भगवते रामकृष्णाय

गाझीपूर,
मार्च १८९०

परमप्रिय अखंडानंद,

तुमचें दुसरें पत्र आताच मिळालें. पत्रांतील गिचिडमिचिड मोठ्या कष्टाने वाचतां आली. पूर्वीच्या पत्रांत मीं सर्वकांही सविस्तर लिहिलेंच आहे. हें पत्र मिळतांच तुम्हीं ताबडतोब निघावें. नेपाळ-मधून तिबेटला जाणाऱ्या ज्या मार्गाविषयी तुम्हीं लिहिलें आहे तो मला माहीत आहे. ज्याप्रमाणे तिबेटमधे कोणालाहि सहजासहजी जाऊं देत नाहीत त्याप्रमाणे नेपाळमधे देखील खाटमांडू राजधानी व एकदोन तीर्थ-क्षेत्रें सोडून कुणालाहि कुठे जाऊं देत नाहीत. पण माझे एक मित्र सध्या नेपाळच्या राजाचे शिक्षक आहेत. ते त्या राजाच्या विद्यालयांत देखील शिक्षकाचें काम करतात. नेपाळ सरकार चीन देशाला आपली खंडणी पाठवितेवेळीं ती ल्हासामार्गाने पाठवितें असें मीं या मित्राकडून ऐकलें आहे. एका साधूने आपली सर्व व्यवस्था करवून घेऊन या मार्गाने ल्हासा, चीन, मांचुरिया व उत्तरचीनमधील तारादेवीचें पीठ हीं स्थानें पाहिलीं. माझ्या त्या मित्राने जर व्यवस्था केली तर आपण देखील सन्मानाने कांहीहि त्रास न होतां तिबेट, चीन, ल्हासा व इतर सारीं स्थानें पाहूं शकूं. म्हणून मुळीच विलंब न करतां तुम्हीं गाझीपूरला निघून यावें. या ठिकाणीं बाबाजींजवळ कांही दिवस राहिल्यानंतर मी या मित्राशीं पत्रव्यवहार करीन आणि सर्व व्यवस्था झाल्यावर नेपाळ-मार्गाने तिबेटांत निश्चित जाईन.

गाझीपूरला येण्यासाठी तुम्हांला दिलदारनगर येथे उतरावें लागेल. हें स्टेशन मोगलसराईच्या तीनचार स्टेशनें पलीकडे आहे. तुमच्या तिकिटाचे पैसे येथे मला जमवतां आले असते तर ते येथून पाठविले असते. म्हणून तुम्हीच तिकिटाची व्यवस्था करून इकडे यावें.

ज्यांच्या घरीं मी राहत आहें ते गगनबाबू खरोखर फारच सज्जन, उदार आणि आतिथ्यशील आहेत. काली तापाने आजारी आहेत हें ऐकतांच त्यांनी त्यांच्यासाठी हृषीकेशला ताबडतोब तिकिटाकरिता पैसे पाठविले. शिवाय माझ्याप्रीत्यर्थ त्यांनी बराच खर्च केला आहे. अशा परिस्थितींत काश्मीरला जाण्यासाठी त्यांच्याजवळ भाडें मागणें व त्यांच्यावर जास्त भार घालणें हें संन्यासीधर्माला सोडून आहे. म्हणून मी तसलें कांहीएक करणार नाहीं. तुम्हीं तिकिटाच्या पैशाची जुळवा-जुळव करावी व हें पत्र मिळतांच निघून यावें. सध्या अमरनाथला जाण्याचा आग्रह बाजूला ठेवणेंच इष्ट.

तुमचा
नरेंद्र

## (३०)*

( श्री. प्रमदादास मित्र यांना )

ईश्वरो जयति

गाझीपूर,
३१ मार्च १८९०

पूज्यपाद,

मी कित्येक दिवस येथें नव्हतों आणि आजच मी पुनः बाहेर जात आहें. माझे गुरुबंधु गंगाधर यांना येथे येण्याविषयी मीं लिहिलें आहे आणि जर ते येथे आले तर आम्ही दोघेहि आपणांकडे येऊं. कांही विशेष कारणास्तव या स्थानापासून थोडें दूर असलेल्या एका खेड्यांत मी अजूनहि कांही दिवस गुप्तपणें राहीन. या खेड्यांतून पत्र वगैरे पाठविण्याची कांहीच सोय नसल्यामुळे इतके दिवस मी आपल्या पत्राचें उत्तर पाठवूं शकलों नाहीं. गंगाधर बहुधा येथे लवकरच येतील, नाहीतर त्यांनी माझ्या पत्राचें उत्तर पाठविलें असतें. माझे दुसरे गुरुबंधु अभेदानंद काशीला डॉ. प्रिय यांच्या घरीं राहत आहेत. माझे आणखी एक गुरुबंधु माझ्याबरोबर होते, पण ते आता अभेदानंदांकडे

गेले आहेत. ते तिथे पोहोचल्याची खबर मला मिळाली नाही आणि त्यांची प्रकृति चांगली नाही, म्हणून मला फार काळजी लागली आहे. त्यांच्याशीं मी फार निष्ठुरपणें वागलों-- त्यांनी माझ्याबरोबर राहूं नये म्हणून मीं त्यांना पुष्कळ त्रास दिला. काय करूं, असें वागण्या-शिवाय गत्यंतर नव्हतें. माझें हृदय फारच दुर्बल आहे--माया-ममतेच्या प्रभावापासून अजूनहि मी मुक्त झालों नाहीं. माझें अंत:करण अधिकाधिक कठोर होत जावें असा आशीर्वाद मला द्या. सध्या माझ्या मनाची अवस्था कशी आहे हें कोणत्या शब्दांनी वर्णन करूं ! रात्रंदिवस प्रचंड अग्नीचा त्यांत जणु भडका उडत आहे ! मी अजून कांहीदेखील, अगदी कांहीदेखील करूं शकलों नाहीं. हा जन्म विफल झाला, सारी गडबड होऊन गेली असें वाटतें. काय करावें, कांहीहि कळत नाही. बाबाजी गोड गोड बोलतात आणि मला येथे थोपवून धरतात. मी आपणांस काय सांगूं ! मी आपले शेकडो हजारो अपराध करीत आहे--मानसिक यातनांनी वेडा बनलेल्या माणसाचीं तीं कृत्यें समजून सारे अपराध पोटांत घालावे. अभेदानंद आंवरक्ताच्या त्रासाने आजारी आहेत. त्यांच्या प्रकृतीची चौकशी करून तेथे आलेल्या माझ्या गुरुबंधूंबरोबर मठांत परत जाण्याची त्यांची इच्छा असेल तर त्यांना तिकडे पाठवून द्यावें. आपण माझ्या-साठी हें कार्य कराल तर माझ्यावर मोठे उपकार होतील. माझे गुरुबंधु मला अत्यंत निर्दय व स्वार्थी समजत असतील. पण मी तरी काय करूं ? माझ्या मनाच्या आंत काय चाललें आहे हें कोण पाहील? रात्रंदिवस मी कसल्या भयंकर यातना भोगीत आहें हें कोण जाणील ? अखंड धीर आणि चिकाटी मला लाभावी असा आशीर्वाद द्या. माझे आपणांस शतकोटी प्रणाम.

दास
नरेंद्र

ता. क.--सोनारपुऱ्यांत डॉ. प्रिय यांच्या घरीं अभेदानंद राहत आहेत. माझ्या कमरेंतील दु:ख अद्याप तसेंच आहे.

--नरेंद्र

# सूचि


अखंडानंद, स्वामी ४९२, ४९३, ५२, ५२१, ५२६, ५३०, ५३४, ५३५
अच्युतानंद सरस्वती ५०६
अणुवाद, त्याचें खंडन ३६४–३६५
अद्वैत, म्हणजे द्वैताचा अभाव २०० त्याची प्रत्यक्ष उपलब्धि शक्य आ- काय ४१८; त्याच्या प्रत्यक्ष उपल- ब्धीचे परिणाम ४१८–४१९
अद्वैतबोध ४१७–४१८
अद्वैतवाद ३७५–३८०; आणि अज्ञेयवाद १९७–१९८; आत्म्याला सर्वोच्च सिंहासनावर बसवितो ३७७–३७९; त्याचा ईश्वर हा समष्टिस्वरूप आहे २१०; त्याची उदार, व्यापक दृष्टि २१०–२१२; एकच सत्ता मानतो २०१, ४०९; त्याची थोरवी २१०; दुर्नीति निवारण्याचा एकमेव उपाय ३०२; द्वैतवाद व बौद्धांचें मत यांचा समन्वय करतो ४०८–४०९; धर्माचा लोप होऊं लागला की तो पुढे येतो २०८; नीतिमान बनवितो ३०६; तोच नीतिशास्त्राचें स्पष्टीकरण करूं शकतो ३८१; त्याचा प्रचार कठीण कां वाटतो ३०२–३०३; त्याच्या प्रसाराविरुद्ध पुढे करण्यांत येणाऱ्या युक्तिवादाला उत्तर ३०४–३०५, बल प्रदान करतो ३०५–३०६; तोच बुद्धिनिष्ठ लोकांच्या मनाची पकड घेऊं शकतो २०८; त्याच्या मतें अभि- न्नत्व हाच ईश्वराशीं योग्य संबंध होय २११; मानवांतील श्रेष्ठता व्यक्त करतो ३०६; मोडतोड करीत नाही २१०; विश्वबंधुत्वाचा एकमेव आधार ३८१; विश्वांत एकच गोष्ट सत्य मानतो ३८३; शंकराचार्यांचा व आधुनिक वैज्ञानिकांचा ५०४; सगळी जबाबदारी मानवावर टाकतो ३०६; त्यांतील सर्वांत कठीण प्रश्न १९३
अद्वैत वेदान्त; त्याचें 'आरण्यक' हें नांव २०६; त्याचा प्रसार कां झाला नाही ३०२, ४२९; त्याचा प्रसार जगभर होईल ४२९; बुद्धदेवांनी त्याचा जन- समाजांत प्रसार केला २०६; त्याला भारतांतील लोकहि भितात ३०४; त्याने भारताला जडवादापासून दोनदा वांचविलें २०६–२०८; भौतिक आणि आध्यात्मिक संशोधनांशीं जुळणारा धर्म आहे २०५–२०६; मानवी विचा- रांची सर्वोच्च अभिव्यक्ति होय ३७४; त्याचें मूलतत्त्व १९३–१९४; तोच युरोपला जडवादांतून सोडवूं शकेल २०८; सगळ्यांत सोप्या स्वरूपांत सत्य व्यक्त करतो ३०२; सर्व कालां- तील सर्व लोकांच्या उपयोगी पडूं शकणारा धर्म होय २०९; सर्वसामा- न्यांचा धर्म होऊं शकत नाही ३७४; स्वतःत बदल घडवून प्रकृतीवर विजय मिळविण्यास शिकवितो २०५
अधिकारीभेद ३१
अध्यात्म, त्याकडे अधिक लक्ष देण्या- विषयीच्या आक्षेपांना उत्तर ९९
अनंत, इंद्रियांतून अभिव्यक्त होऊं शकत नाही ९६; या जगांत अभिव्यक्त होऊं शकत नाही २६०–२६१; दोन असूं शकत नाहीत ११७; त्याकडे परत वळणें म्हणजेच वैराग्य २६१; त्यांत परिवर्तन शक्य नाही ११८; फक्त आत्माच आहे २६५; बहिर्जगतांत व्यक्त होण्याच्या प्रयत्नांत 'मी' बनतें २६१; भौतिक पातळीवर व्यक्त होऊं शकत नाही ९७; सान्त कसें झालें हा प्रश्नच चूक आहे १९६–१९७; सान्त जगांत सापडणें शक्य नाही २६५; सान्त होण्याच्या प्रयत्नापासून माघार घेतें १४९–१५०
अपयश, जीवनाचें सौंदर्य होय २२९

अपरिवर्तनीय सत्ता, बौद्धांचें मत ४०६; ४०८; वेदान्त्यांचें मत ४०८-४०९
अपरोक्षानुभूति, म्हणजे काय ३९
अभेदानंद, स्वामी ५२०, ५३५, ५३६
अमरत्व, त्याची ओढ प्रत्येकाला असते ३४३; त्याची प्रथम कल्पना स्वप्नांमधून आली ९२–९३; त्याचा प्रश्न अजूनहि ताजा आहे ४३; त्याच्या प्रश्नाचा गाभा ३५५; भौतिक पदार्थांना लागू नाही २६६–२६७; वासना नष्ट झाल्याने लाभतें ३८२
'अमिताभ बुद्ध' ५२२
अमेरिका, तेथे अद्वैतवाद कां मूळ धरीत आहे २०८; तेथील दुःखी घरें आणि अपेशी लग्नें १५२; तेथील लोक नवनवीन भाव घेण्यास उत्सुक असतात ४–५; तेथे वेडयांची संख्या अधिक आहे २७१; सर्वांत श्रीमंत देश आहे २७१; तेथे साधी राहणी शक्य नाही २७१
अरबी काव्यांतील स्वर्गाचें वर्णन २५०
अर्नॉल्ड, सर एडविन ९४, २३३
अवतार, त्यांच्यावर विश्वास कसा बसतो ४६
असंतोष, त्याचें आध्यात्मिक जीवनांत स्थान ५१७
'अहं', आणि आत्मा १२४
अहिंसा, तिच्याविषयी बौद्धांची व हिंदूंची कल्पना ३६९
अज्ञान, म्हणजे भेदबोध २३०; मूलभूत १२५; सर्व दुःखांचें मूळ होय १२५
अज्ञेयवाद, आणि अद्वैतवाद १९७–१९८, तर्कविरोधी आहे १५३–१५४
'आकाश' आणि 'प्राण' ३६३–३६४, ३९५–३९७
आत्मत्याग, नीतीची मध्यवर्ती कल्पना ९७; म्हणजे भासमान व्यक्तित्वाचा त्याग १२४
'आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च' ७३, ८०
आत्मवाद, आणि जडवाद २९९–३००
आत्मसाक्षात्कार (आत्मज्ञान, आत्मानुभूति), कठीण आहे २५६; कुणाला होतो २५५, २५६; केवळ वेदाध्ययनाने होणार नाही २५४–२५५; केव्हा होतो ३९; त्यासाठी जागेचें महत्त्व नाही २७९–२८०; प्रत्येकाला होईल १४; त्याचें फल २५६; त्याचा फायदा काय १२४-१२६; त्यांत लिंगभेद नसतो १५; आणि व्याकुळता १५; त्याने शाश्वत शांति लाभेल २७८; त्याविषयी शंका कां येतात २५६; त्याहून श्रेष्ठ कांही नाही ८५; सर्वांचेंच उद्दिष्ट होय १४
आत्मसंयम, समाजाचा आधार १६४
आत्महत्या, सुटकेचा उपाय नाही २८२
आत्मा, अखंड एकरस आहे ३५५; अचल साक्षी आहे ३९९–४००; त्याविषयी अद्वैती कल्पना ३७६–३७९; अनेकांतील एकत्व होय २७८, अनंत आहे ११६, २६५; अपरिवर्तनशील आहे ११८, ११९, ४११, ४१४, त्याचें अमरत्व २५२–२५३, ३४३, ३५५, ४०१; अस्तित्वाचें केंद्र आहे २३६–२३७; त्याच्या अस्तित्वाविरुद्ध बौद्धांचा युक्तिवाद ४०५–४०८; आवाहन केल्याने प्रकट होईल २९४; त्यासंबंधी इजिप्त-वासियांची व बाबिलोन-वासियांची कल्पना ९०-९१; इंद्रियांना गोचर नाही २५६; एकच आहे ११७, २५३, ३५७–३५८; तोच एकमेव चेतन होय ३८३; त्याचीच एकमेव सत्ता आहे ४१०; 'काल' त्यांतच अवस्थित आहे ३२९; त्याचें क्रमप्रकटन १२१–१२३; त्याचें चिंतन सतत करावें ८५; त्याला जन्म-मृत्यु नाही ११७–११८,३५५-३५७; त्याला 'जाणतां' यावयाचें नाही १२३; जातयेत नाही ४१३; तर्काचा विषय नाही २४४; देशकालकार्यकारणभावाच्या पलीकडे आहे ११६; आणि देह व मन ११३, ११४, ११६, ११८,

आत्मा—पुढे चालू
३५२–३५४; द्वैतवाद्यांच्या मतानुसार त्याची त्रिविध गति ४०२–४०५; त्यांत पवित्रता व ज्ञान आधीचींच वसत आहेत २५३; पशूंतहि आहे ३८८–३८९; पावित्र्य आणि मुक्ति त्याचें स्वरूप होय २९४; त्याचे पुनर्जन्म केव्हा संपतात ३३९–३४०; त्याच्याच प्रकाशानें सर्व प्रकाशमान आहे २७८; आणि प्रकृति २७५, ३७७, ३८८ ४१४, त्याचें प्रतिबिंबच पाहतां येतें ३७६; त्याचें 'प्रत्यक्' हें विशेषण २६४; त्याचा प्रत्यय शुद्ध मनानें येतो २८०; फरक केवळ त्याच्या अभिव्यक्तींतच असतो २५३; मानवाचें खरें स्वरूप आहे ३५८–३६०; त्याचा मुक्त स्वभाव वरवरच्या स्वाधीनतेंतून प्रकटत असतो ४२१; त्याला रूप व आकार नाही ११६; त्यांत लिंगभेद नाही ३७६, ४२२; त्याचें 'विपश्चित्' हें विशेषण २५३; विश्वाचें आदिकारण होय २६५; त्यांतच व्यक्तित्व संभवतें १२१; त्याचें श्रवण-मनन निदिध्यासन २२८; सत्-चित्-आनंद त्याचे गुण नसून स्वरूप होय २९४, ३२७–३२८; त्यांत सत्याचा स्पष्ट साक्षात्कार होऊं शकतो २७९; तोच सर्वकांही आहे २७६–२७७, २९४–२९५, ३७६; त्याची सर्वत्र उपलब्धि झाल्यास सर्व अनिष्ट भावना लयास जातील ३८०; सर्वव्यापी आहे ३५६–३५७; त्याचें सर्वातीत स्वरूप २५६; सर्वोच्च ईश्वर होय ३७८–३७९; सुखदु:ख भोगीत नाही २७७–२७८; सृष्ट पदार्थ नाही ३२९; संमिश्र पदार्थ नाही ३५४–३५५; तोच संसाररूपी वटवृक्ष आहे २७८–२७९, स्वत:ला निरनिराळ्या अवस्थांतून अभिव्यक्त करतो ३२९; त्याचें स्वरूप ३५८, ३८३–३८४; ४७२–४७३; स्वरूपत: मुक्त आहे ११७, २९७–

आत्मा—पुढे चालू
२९८; स्वसंवेद्य आहे ३८–३९; त्याची स्वाधीनता आणि पुनर्जन्मवाद ३४०; त्याच्या स्वाभाविक पूर्णतेसंबंधी द्वैती व विशिष्टाद्वैती कल्पना ३७३–३७४; 'ज्ञेय' वा 'अज्ञेय' नाही २००

आदर्श, म्हणजे अनंताकडे जाण्याचा प्रयत्न ९७; तो आत्मसात् कसा करावा २२८–२२९; कठीण आहे म्हणून सोडूं नये ३०४–३०५; नसलेला माणूस अधिक चुका करतो २२८; सर्वोच्च असावा २२८

आध्यात्मिक उन्नति, आणि असंतोष ५१७

आध्यात्मिक तत्त्वांच्या क्रमविकासाचा इतिहास वेदांमधे आढळतो २८८–२८९

आध्यात्मिक धाष्टर्य १२७–१२८

आध्यात्मिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांतील व्यवहार्यता २८४–२८६

आध्यात्मिकता, तिच्यांतच राष्ट्राची खरी शक्ति असते १००

आनुवंशिक संक्रमण ३३७–३३९

आनंद, इंद्रियांमधून मिळत नाही ९६; कुणाला लाभतो ३५८; खरा कसा लाभेल २५१–२५२; खालच्या व वरच्या पातळीवरील १०१

'आरण्यक' हें नांव कां पडलें २०६

आर्य, त्यांच्या धर्माचा उगम निसर्गपूजेंतून ९१–९२; त्यांची हिमालयावरील शुद्ध जात ४८१

आलमबाजार मठ ९

आशावाद, क्रमविकासावर आधारलेला चुकीचा आहे २६९–२७०; खराखुरा २७५, २७७; त्यांतील गुणदोष १८२-१८३; दुबळेपणाचें लक्षण आहे २७४; आणि निराशावाद १३९; आणि ब्रह्मदृष्टि २१९–२२०; त्यांतील फोलपणा १४३–१४४, २७२; मुक्तेचा मार्ग नव्हे १४२

आहार, तुपकट असू नये १७

इंग्रज, त्यांच्याशीं चालू असलेला झगडा ६; त्यांचें वैशिष्टच ५
इंग्लंड, तेथे निराशावादी बनणे कठीण आहे १४३; तिथे वेदान्तकार्य स्थायी होईल ५; तेथील सामाजिक स्वाधीनता व धार्मिक बंधनें १७१
इच्छाशक्ति, तिच्या कार्यासाठी पूर्वानुभव आवश्यक ३३६; जगत्प्रपंचाचें कारण असणें शक्य नाही १९४–१९५; स्वाधीन नाही ४२१
इजिप्तवासी, त्यांची आत्म्यासंबंधी कल्पना ९०–९१
इंद्र, एका पदाचें नांव आहे २६६
इंद्रिय (इंद्रियें), अनंताच्या अभिव्यक्तीसाठी अपुरीं आहेत ९६; आंतली व बाहेरचीं ३२४, ३५४, ३९७; त्यांच्या पलीकडे जाणें ९२, ९५; बहिर्गामी स्वभावाचीं आहेत २६४
इंद्रियसुख, त्यांत तृप्तीची आशा बाळगणें १७८–१७९; त्यांची प्रतिक्रिया होतेच १०८
इंद्रियसंयम, त्याची आवश्यकता २५५-२५६; ज्ञानयोगाचें लक्षण होय २८१
इंद्रियज्ञान, त्याची संपूर्ण प्रक्रिया ३२४-३२५, ३५२-३५३
इसापनीति २२७
ईशोपनिषद २१९, २२९-२३०, २३२
ईश्वर (पाहा भगवान),'अज्ञेय' आहे म्हणजे काय १९७-१९८; आपण त्यांतच जन्मतों, जगतों व विलीन होतों ३१८, ३२१; आपल्या आंतूनच स्वतःच्या शोधास प्रवृत्त करतो १२२; त्याचें ईशोपनिषदांतील वर्णन २२९-२३०; त्याला उणीव असणें शक्य नाही ३९३; त्याचा क्रमविकास १६०-१६२; क्रमविकासपरंपरेच्या प्रारंभीं व अंतीं असतो ३१५-३१६; खरा 'मी' आहे १९८; त्याला जाणल्याने द्वंद्वातीत होतां येतें २४९; 'तत्त्वमसि' हेंच त्याचें योग्य वर्णन होय १९९; त्याविषयीचे

ईश्वर--पुढे चालू
त्रिविध भाव ४७८; नित्य 'विषयी' आहे १९९; निर्गुण आहे २९२; प्रत्यक्षानुभूतीचा विषय आहे, तर्काचा नव्हे २४४; त्याला भ्रम झालाच नाही ३७९; त्याचा लाभ कुणाला होतो २५५; लोहचुंबकाप्रमाणे आहे ३७०; त्याविषयीच्या विचारांचीं तीन पावलें ३८१; विश्व कसा बनला ३७५; त्याने विश्व निर्माण केलें म्हणजे काय ३२०, म्हणजे विश्वव्यापी चैतन्य ३१८, ३५१; 'विषय' होऊं शकत नाही १९९-२००; वेदान्ती त्याचे तीन गुण मानतात २१५; तो (ईश्वर हा) शब्द बदलणें अशक्य आहे ३१९; त्याच्या शोधाची समाप्ति आत्म्यांत होते ३७८-३७९; म्हणजे समष्टि-आत्मा ४००; त्याच्यामधूनच सर्वकांही जाणलें जातें १९८; सर्वकांही त्याच्या मालकीचें आहे २२२; त्याला सर्वत्र पाहणें २२७-२२९; त्याला सर्वत्र स्थाप न करा २२२-२२३; त्याने सर्व वस्तूंना आच्छादण्याचा अर्थ २१९-२२०; त्याच्या सर्वव्यापित्वाच्या ज्ञानाने दुःख लोपतें २३१; सर्वांची सत्ता आहे १९८; 'सारेंकांही' आहे ३२०-३२१; साहाय्य कुणाला करतो ५०७; त्याचें स्वरूप २५४; त्याच्या स्वरूपज्ञानचें फल २५४; त्याच्या स्वरूपाला मर्यादा नाही ५२४; 'ज्ञात' होऊं शकत नाही १९७, १९८-१९९; ज्ञातापेक्षा श्रेष्ठ आहे १९८, २००
ईश्वरविषयक कल्पना, अद्वैती २१०, २११; त्यांमधील एकत्व दाखविणें वेदान्ताचें कार्य १६०; त्यांचा क्रमविकास १५८-१७६; 'देवाधिदेव' १६५-१६६; द्वैतवाद्यांची २११-२१२, ३६४, ३६५-३६६; त्यांचा परमोच्च बिंदु २९०-२९१; प्राचीन १५८, विशिष्टाद्वैती ३७३; वेदान्तांतील तिच्या पायऱ्या १९१

ईश्वरविषयक सगुण कल्पना, तिच्यांतील अडचण आणि 'संतान' व 'कर्मवाद' ३६६-३६७; तिचा उगम स्वाधीनतेच्या कल्पनेंतून होतो १५५-१५६; म्हणजे खूप मोठा मानव २३३; जगाचें 'मानवी' स्पष्टीकरण होय २३३-२३४; तिच्याविरुद्ध तत्त्वज्ञांचें बंड १६९; धर्माची केवळ सुरुवात होय १५७; तिने मिळणारें सान्त्वन अफूसारखें आहे ३०१
'उपजत प्रवृत्ति', त्यांवरून काय सिद्ध होतें ३६६; तिचें संपूर्ण स्पष्टीकरण ३३४-३३६
उपनयन, त्यासंबंधी वैदिक प्रथा ३५
उपनिषदें, त्यांतील आराखड्यांत तपशील भरण्याचें कार्य तत्त्वज्ञांनी केलें २९१; त्यांतील एकमेवाद्वितीय ईश्वर २०९; त्यांना एकेश्वरवादी कल्पना सहन झाली नाही २९०; आणि कर्मकांड यांत पौर्वापर्य नाही ४९७; त्यांची केंद्रभूत कल्पना प्रत्यक्षानुभव २५६; जुनीं आणि नवीं २८७; टिपणांप्रमाणे लिहिलीं आहेत २८९; त्यांतील परमोच्च बिंदु 'तत्त्वमसि' २९०-२९१; त्यांचा प्राण वैराग्य ७५-७६; त्यांची भाषा २८९; माणूस व ईश्वर ज्या अवस्थांमधून जाऊन एक होतात त्यांचें वर्णन होत २९०-२९१; मानवाने गमाविलेलें राज्य मिळविण्याचे सर्व उपाय सांगतात २९७; त्यांतील मूलतत्त्वें बरोबर आहेत १३४-१३५; त्यांचे रचयिते महान् कवि होते २०८; त्यांच्या रचयित्यांची विधायक दृष्टि १७५-१७६; स्वर्गाच्या वासनेचा त्याग शिकवितात २७९
उपयुक्ततावाद, त्याचा अपुरेपणा ९७-९८; त्याला धर्माचें उत्तर २५७-२५८; आणि सत्यानुभूति ४२५-४२६
ऋग्वेद ९१, १०९
ऋषि, त्यांना आत्म्यांतच सर्वाचें केंद्र आढळले २३६-२३७; धीट होते २५४-
ऋषि—पुढे चालू
२५५; महान् कवि होते २०८; म्हणजे मंत्रांचा द्रष्टा ९४
एकत्व, त्याच्या अनुभूतीचें फल ३८०, ४२५-४२९; त्याचें अन्वेषण हाच वेदान्ताचा विषय ३९४, पुरेसें खोल गेल्यास आढळतें २३०-२३१; बौद्धांना मान्य नाही ४०६-४०८
एकेश्वरवाद, उपनिषदांना सहन झाला नाही २९०; त्यापासून वेदान्ताला सुरुवात होते १९०
एकोणिसावें शतक, त्यांतील 'व्यवहारचातुर्य' १८३
ऐक्य, कसें निर्माण होईल ८१
ॐ, त्याविषयी कठोपनिषदांतील शिकवण २५२; त्यांतून सृष्टीची उत्पत्ति ६४
अंत:स्फूर्तिवादी तत्त्वज्ञ १९५
अंधविश्वास, त्याचे प्रकार ३७५, प्राचीन व आधुनिक ११२, ३३१-३३२

कठोपनिषद्, त्यांतील कथानक २३७-२३९, २४१-२४३; त्यांत जगाचें कोडें मानसशास्त्रीय पद्धतीने हाताळलें आहे २३३; यांतील प्रश्न अंतर्जगताविषयी आहे २३३; त्याचा प्रारंभ १०६; त्याची शिकवण २०९, २४३-२४४, २५२-२५६, २६४-२६५, २७६-२८१, ३८०-३८२; सर्वांत सुंदर आहे १३
कन्फ्यूशस, त्याच्या काळचा भोगवादी युक्तिवाद ९९
कपिल ३११, ५२३
कर्म, खरोखर कोण करतो २२३; आणि दुराग्रह १५२-१५३; त्याच्या फलाविषयी विचार करूं नये १३; आणि विचार १२८; सर्वच ईश्वर आहे या बोधाने करावें २२४-२२५, २२५-२२६
'कर्मवाद' ३६६-३६७; त्याची अधोगति ९, त्याला बुद्धांचा विरोध ५२३,
'कल्प' ११२-११३, ३१३, ३६३
'कल्पवास' ५०५
'कारण', उपादान आणि निमित्त ३११-

कारण--पुढे चालू
३१२; आणि 'कार्य' ३११-३१२, ३१४, ३४७, ३७१, त्यांत लय म्हणजे नाश ३११
कार्यकारणभाव (-नियम), त्यांत काय काय अनुस्यूत असतें १९५-१९६; त्यांच्या पलीकडील गोष्ट सीमित असूं शकत नाही ३५६; ब्रह्मांत नसतो १९४; आणि भूतभविष्य सांगणें ३९२; त्याशिवाय विचार करूं शकत नाही १९५-१९६
'काल,' आत्म्यांतच अवस्थित आहे २९३
कालिदासकृत शाकुंतल ४९४ टीप
काली--पाहा अभेदानंद, स्वामी
'कालेनात्मनि विन्दति' १४
काशी ४९१
काशीपूरचें उद्यानगृह ९
कुंभमेळा ५०६
कुमारिल भट्ट ५२२
कृष्ण, आज त्यांच्या कोणत्या पैलूचा विचार व्हावा १५-१६; त्यांचें कुरुक्षेत्रावरील स्वरूप १५; त्यांचें चरित्र सर्वांगसंपूर्ण आहे १५
Comte ११३
क्रमविकास, अत्यंत प्राचीन कल्पना आहे ३४५; त्याची अंतिम परिणति मानवाची मुक्ति २०३-२०४, म्हणजे काय ३१४, ३४४-३४५; आणि क्रमसंकोच २६२, ३१४-३१५, ३४५-३४६; तर्कनिष्ठ कुणीहि त्याच्याविरुद्ध असूं शकत नाही ३१४; त्यांत दोन शक्तींचें कार्य असतें २०३-२०४, प्रकृतीचा होतो, आत्म्याचा नव्हे १२१-१२३, त्याच्या प्रारंभी व अंतीं ईश्वर वा पूर्ण मानव असतो ३१५-३१७
क्रमविकासवाद, त्याचा आशावाद चुकीचा आहे २६९-२७२; त्यावरून ईश्वरापासून विश्वोत्पत्ति सिद्ध होते ३४७; ईश्वराविरुद्ध त्याच्या आक्षेपांना उत्तर ३१६, त्याच्या 'चांगल्या-वाइटा'-विषयीच्या सिद्धान्ताचे खंडन १४४-
क्रमविकासवाद--पुढे चालू
१४६; धर्माचा विध्वंसक नसून पाठीराखा आहे ३१४; आणि पुराणें यांचा समन्वय ११२-११३
'ख्रिस्तानुसरण' ४९५, ४९७
ख्रिस्ती, खरा कोण २४७
ख्रिस्ती धर्म, त्याच्या इतिहासावरून काय दिसतें २९५; त्यांतील कांही तत्त्वांचा दुष्परिणाम ४७५; त्यामुळे राष्ट्रांची भरभराट होते काय १४३; त्याचा सुवर्णनियम खालच्या दर्जाचा आहे ४७४
ख्रिस्ती राष्ट्रें, त्यांची भरभराट कशामुळे झाली ४४४
गफ, श्री. ५०४
गरीब, बल हेंच त्यांच्यासाठी औषध ३०५
गाझीपूर ५०९, ५११, ५२७, ५३४
गीता, 'शांति कुणाला लाभतें' ४९५
गुडविन, श्री. १३, १८
'गुण' आणि 'गुणी' ३२७-३२८
गुरु, त्यांचें कार्य १४; ब्रह्मज्ञ व कुलगुरु २२-२३; यथार्थ कोण ३५, ३६
गुरुभक्ति, तिच्याविषयीची संकुचित आणि व्यापक भावना ५२७
गृहस्थ, त्यांना उपाय काय ७५
गोपी, त्यांची व्याकुळता १५
गोरक्षणमंडळाचा प्रचारक ७-९
गोविंदसिंह, गुरु ८०-८१
गोष्टी--आख्यानें--रूपकें :--अठराशे सत्तावनच्या वणव्यांतील एक संन्यासी १२७; आजारी मनुष्य आणि दारावरील थाप ३७८; इंगरसोल, संत्रें आणि आंबा २८२-२८३; काळवीट आणि कुत्रा २२७-२२८, कूपमंडूक ४५५; चक्री वावटळ ३८५; जलप्रलय आणि मनु ११०-१११; 'जें कांही होतें तें चांगलेंच होतें' २७४; टॅन्टॅलसचा नरक १६६ टीप; डास मारणारा मित्र २१७, नचिकेता २३७-२३९, २४१-२४३; नारदांना मायेचा अनुभव १८०-१८१; 'पृथ्वी कां पडत नाही'

गोष्टी--पुढे चालू
११७-११८,४१३; मृगजळ ४१९; मेंढरांच्या कळपांतील सिंह १२८-१२९, ४७२; वाघाच्या जवड्यांत 'शिवोऽहम्' जपणारा माणूस ३००-३०१; श्रीमंत माणसाची काळजीने आत्महत्त्या २४९; साधूला ठार करण्याची धमकी देणारा सम्राट १२६-१२७
गंगाधर--पाहा अखंडानंद, स्वामी
ग्रीक त्यांच्या पौराणिक कथा ९२
घोष, श्री. अतुलचंद्र ५३३
घोष, श्री. गिरीशचंद्र १०, २८-२९, ४१, ४९, ६५-६८, ५१८
घोष, श्री. नवगोपाल, त्यांच्या घरीं श्रीरामकृष्णांची स्थापना २३-२६

चक्रवर्ती, श्री. शरच्चंद्र ३-४, १०
चमत्कार, त्यांचा धर्माशीं संबंध नाही ४६८-४६९; त्याविषयी स्वामीजींचा अनुभव ८२-८३, ८४-८५
चांगलें, करण्याचा उपयोग काय १४९; वाइटाखेरीज असूं शकत नाही १४७-१४८; वाइटामधून कां यावें १७०
चांगलें आणि वाईट, आत्म्याचें जवळचें व दूरचें आवरण ४२२-४२३; एकाच वस्तूचीं दोन रूपें २६७-२६८, २७२; त्यांची किंमत १५३, त्यांविषयीचा क्रमविकासवाद्यांचा सिद्धान्त चुकीचा आहे १४४-१४६,२६९-२७२; त्यांच्यावर जय कसा मिळेल २७५-२७६; त्यांच्या पलीकडे मानवाचें खरें स्वरूप आहे २७५; त्यांतील फरक फक्त अभिव्यक्तीच्या प्रमाणाचा आहे २५३-२५४
चारित्र्य, संस्कारांनी बनतें ३८४
चार्वाक १७२
चिंतन, त्याचें महत्त्व १२८
'चित्कळा' ३४७, ३४८, ३५१
चित्तशुद्धि, तिचें महत्त्व २८०
चीन, तेथील धर्म ९१
चेटकिणींना जाळण्याची प्रथा ४८३-४८४
चैतन्य, त्यालाच ईश्वर म्हणतात ३१८; म्हणजे प्रतिक्रियाशक्ति ३५२; त्याचें लक्षण ११; विश्वांत क्रमसंकुचित असून क्रमशः अभिव्यक्त होतें ३४७; सृष्टीचें कारण होय ३१८
चैतन्यदेव, त्यांचें व्याससूत्रांविषयी मत ४९९-५००
छांदोग्य उपनिषद् १९९, २८७
जग (जगत्) (पाहा विश्व) त्याकडे अधिक लक्ष दिल्याचे दुष्परिणाम ९९; त्याची अलीकडील व पलीकडील बाजू १८५; त्यांतील अस्तित्वाचे भिन्न स्तर २३६; त्यांत आपल्या मर्जीप्रमाणे गोष्टी घडत नाहीत '१०७; आशावाद व निराशावाद यांचें मिश्रण आहे २७३; त्याविषयीची आसक्ति केव्हा लोपेल ३३२; त्याचा आस्वाद कसा घेतां येईल २२४; ईश्वराचें काव्य आहे २२४; यांत ईश्वराला पाहण्याचे प्रयत्न कसे फसतात २२७-२२८; त्यांतील एकमेव सत्य-आत्मा ८५-८६; अंधारउजेडाचा खेळ आहे १६७-१६८; तेंच कर्मक्षेत्र आहे ४०४-४०५; त्यांत कशाकशाचा अंतर्भाव होतो १९३; त्याविषयी कांही कळत नाही, आणि कळत नाही असेंहि नाही १६७-१६८; त्याचें कारण इच्छाशक्ति असूं शकत नाही १९४-१९५; त्याच्या कारणाचा शोध बाह्य जगांत लागायचा नाही २६४-२६५; कारागृहाचें क्रीडांगण कसें बनेल १९२; त्याचें केंद्र आमच्या आंतच आहे २३६-२३७; त्याचें कोडें सुटण्यासाठी सर्व जगांच्या केंद्राकडे जावें लागेल २३५-२३७; त्यांतील गति लाटेसारखी असते ३४८; चांगल्या वाइटाचें मिश्रण आहे १४७; जसें आपण तसें दिसतें १३०; जसें आहे तसेंच राहणार २५८-२५९; टॅन्टॅलसचा नरक आहे १६६; त्याचा त्याग करावयाचा म्हणजे काय २१९,२२०,२२३; त्यांतील दुःख जुनाट संधिवातासारखें आहे २५७

जग—पुढे चालू
–२५८; दुःखांनी भरलेलें आहे २१७; त्यांतील द्वंद्वांचें स्पष्टीकरण २७२–२७३; त्याच्याशीं धर्माचा मेळ बसणार नाही १८६; त्याचें नंदनवन कसें बनेल १२६; प्रवाहरूपाने नित्य आहे ३५०; त्याला बाहेर अस्तित्व नाही ५४; त्यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न कां करावा ३९० ३९१, बाह्य व आंतर २३९–२४०; त्याचें 'भलें' होण्याची कसोटी ४२५–४२६; भल्याबुऱ्याचें मिश्रण आहे २७५; मिथ्या ज्ञानाचें फल होय ४१०; रहाटपाळण्यासारखें आहे ३९२; त्यांतील वाइटाची उत्पत्ति आणि सगुण ईश्वर १६५–१६६; त्याविषयी विशिष्टाद्वैती मत ३७१–३७२; त्यांतील विषमतेला जबाबदार कोण ३६६–३६७; त्याच्या सत्यत्वाविषयी प्रत्येकाला शंका येते १०६–१०७; सत्याचें विकृत व्यंगचित्र होय २६२; त्यांतील सर्व शुभाशुभ गोष्टींचें स्पष्टीकरण मुक्तीच्या भावनेने होतें १८९; त्यांत सर्वत्र परिवर्तनांचीं वर्तुळें पूर्ण होतात ३४४; त्याला सापेक्ष अस्तित्व आहे १३६–१३७; 'सारें कांहीं' नाही २१६, सैतानाचा खेळ कां वाटतें २२६; संपत नाही ३६८; संपूर्ण चांगलें होऊं शकणार २६८–२६९; त्यांतील स्पर्धीचें कारण २६१; त्याचें स्पष्टीकरण बाह्य जगांतून होत नाही २३४–२३५; त्याचें स्वरूप द्वंद्वमयता २७२; त्याच्या स्वरूपाविषयी शंकराचार्यांचें मत ५२३-५२४; ज्ञानप्राप्तीनंतर पुन्हा दिसतें काय ४२०

जगन्नाथाचा रथ ४३४–४३५, ४३७, ४७१

जड, त्याचें अनुकरण करण्यांत काय बहादुरी १७८

जडद्रव्य, आणि शक्ति यांचा संबंध ११४–११५; स्वप्रकाश नाही ३२६

जडवाद, आणि आत्मवाद २९९–३००; बुद्धदेवांच्या पूर्वीचा २०७–२०८; त्यापासून भारताला अद्वैत वेदान्ताने सोडविलें २०६–२०८; त्यापासून युरोपला अद्वैतवेदान्तच सोडवूं शकेल २०८; शंकराचार्यांच्या काळांतील २०७

जन्म-मृत्यु, देहालाच लागू आहेत ३५६; भ्रम आहे ३५७, ४१४; त्यांतून सुटण्याचा उपाय २८२

जयदेव, त्याचें 'गीतगोविंद' १५

जर्मन तत्त्वज्ञ, त्यांची चूक २६०

जलप्रलय, त्याची कथा सर्व धर्मांत आढळते ११०–१११

जातिभेद, आणि आध्यात्मिक उन्नति ४९९; बुद्धांच्या शिकवणीमुळे त्यांचें फक्त रूप बदललें ५२३, त्यासंबंधी श्रुतिस्मृतींतील उल्लेख ४९६

जीव (जीवात्मा), ईश्वराप्रत परत जाणारच ३५०–३५१; त्याची कायमची अधोगति होणें शक्य नाही ३५०; त्याची गति कर्मांवर अवलंबून असते ३८६–३८८, त्याचा बंध व मोक्ष मनावर अवलंबून असतो ३८६; म्हणजे बंधनांतील आत्मा ३८८; ब्रह्मांतून येऊन वर्तुळ पुरें करून ब्रह्मांत जातो ३८९

जीवन, त्याची अखंडितता ३४६; अतिकठोर वस्तुस्थिति आहे २७६; म्हणजे आदर्शप्राप्तीची धडपड, अधिक माया १५४; त्याची आसक्ति केव्हा जाईल ३३२; त्याचा इतिहास म्हणजे उत्पत्ति-स्थिति-लय ३१०; त्याचा खरा अर्थ ३५८ त्याचा खोटारडेपणा १८४; त्यांतील द्वंद्व १७९; त्याची नदी पूर्णत्वाकडे जात आहे १५३, २८६; त्याविषयीचा पाश्चात्त्य व हिंदु दृष्टिकोण २८२–२८३; 'मी' चा नाश झाल्यासच चांगलें होतें २६२–२६३; मुक्तीच्या भावनेशिवाय शक्य नाही १८७–१८८; आणि मृत्यु १३९–१४०, १४८, २६७

जीवन--पुढे चालू
-२६८, ३५५-३५६; त्यांतील विरोधाची कोंडी फोडण्याचा उपाय १४९; म्हणजे शाळा होय २६२; त्याची सगळी मालिका चित्कळेशीं अभिन्न आहे ३४७-३४८; सत्-असताच्या विरोधावर उभें आहे १३७, १४२, १४६-१४७; त्यांतील सर्वकांही क्षणभंगुर आहे १०८; त्यांतील सर्व प्रश्नांच्या बाबतींत प्रत्यक्षानुभूतीवर विसंबावें २४६; त्यांत सर्वांना दुःखच आहें १६७; त्याचें सूक्ष्म-स्थूल अवस्थांत रूपान्तर ३४८
जीवन्मुक्त ४१३, ४१८-४१९, ४२३, ५२५
जैनधर्म ४६६

ठाकुर--पाहा रामकृष्ण
Design Theory ३१८
डॉयसन, प्राध्यापक ३६१

'तत्त्वमसि' ३५९, ४२९-४३०; त्याचा अर्थ १९९; ईश्वराचें यथायोग्य वर्णन १९९; उपनिषदांचा अखेरचा शब्द होय २९१
तत्त्वज्ञान, त्याच्या उपयुक्ततेचा प्रश्न २५६-२५७
तर्क (-बुद्धि, -विचार), अनुभूतीवरच आधारलेला असतो २४४-२४५; त्याने ईश्वरलाभ होणार नाही २४४; मायेच्या राज्यांतच चालतात ४७; तिचें स्थान ६८-६९
तितिक्षा, आणि अहंबुद्धि ५३२
तिबेट २७०, ४९२, ५२०, ५२१, ५२२, ५३४
तुरीयानंद, स्वामी ३, ४
तंत्रसाधना, बौद्धांच्या अवनतीच्या काळांत अस्तित्वांत आल्या ५२१-५२२
त्याग, म्हणजे अनंत स्वरूपाप्रत परत वळणें २६१; त्याची आवश्यकता २५२; ईश्वरलाभासाठी व परकल्याणासाठी ३५-३६; जीवनाचा पाया होय २६२; जीवनाचा मूलमंत्र असावा ५४; नीतीचा पाया होय ९६, २६१; त्याचें फल २५२, वेदान्ताचें सार होय ३९०
Theory of Conservation of Energy ५०३
थिऑसॉफिस्ट, त्यांचे महात्मे ४४२
दधीचि ३६
दुःख, त्यांनी आपलें आयुष्य भरलेलें आहे २१६; त्याची उपयुक्तता २२१; त्याचें कारण अज्ञान १२५, २३०, त्याचें कारण दुर्बलता ३०१, त्याचें कारण वासना २२१, २२६, २५९; जुनाट संधिवातासारखें आहे २५९, त्याकडे डोळेझाक करून लाभ नाही २७४-२७५, त्यावर धर्मांनी सुचविलेला तोडगा व त्याचें स्पष्टीकरण २१६-२१९, त्याचा नाश कसा होईल ३८०; त्याला मानवच जबाबदार आहे ३४१-३४२, तें मानवच नष्ट करूं शकतो ३४२
दुबळेपणा, त्याला थारा देऊं नका १३०-१३१, दुसऱ्याला दोष दिल्याने वाढतो ३४२, निर्माण करणारा उपदेश नको ३०५; म्हणजेच पाप ३८, सर्व अनिष्टांचें कारण ३०१
देव (-देवता), अजरामर नाहीत २६६-२६७; त्यांच्या कार्याच्या हेतूंची परीक्षा १६५; जमातीचे १६३-१६४; त्यांपासून 'देवाधिदेवा' ची निर्मिति १६५; निसर्गाच्या शक्तीचीं रूपें ३२२; त्यांच्या पूजनाचें महत्त्व ५३; तद्विपयक प्राचीन कल्पनांकडे आजच्या दृष्टींतून बघूं नये १५८-१६०, प्राचीन काळचे आवेगी स्वभावाचे होते १६२; विशिष्ट पदें होत २६६, ३६८-३६९
देवयान आणि पितृयान ४०५
देश-काल २६७

देश-काल-निमित्त ( -कार्यकारणभाव ) ४११; त्यांचें अस्तित्व सापेक्ष आहे २०१-२०३; आपल्या मार्गांतील अडथळे होत २०३; कधी कधी पूर्णपणें लोपतात २०२; त्यांचें कोडें सोडविण्याचा मानवी मनाचा प्रयत्न विफलच ठरणार १३६; बिलोरी कांचेसारखीं आहेत १९४; बुद्धीच्या मर्यादा होत १७९; ब्रह्मांत नाहीत १९४; मनांतच असतात ११६; त्यांनी मर्यादित असलेली प्रत्येक वस्तु मायेंत असते १६९; त्यांच्याच माध्यमांतून विश्वांतील प्रत्येक वस्तु व्यक्त होते २०२

देह (शरीर), एका अर्थाने अमर आहे ३४८-३४९; त्यांत कांही सत्य आहे काय १०८-१०९; म्हणजे जडाचा स्रोत ४०६; सतत परिवर्तनशील आहे ११८; त्याची हेळसांड करणारा दोषी होय ५३२

दैव, म्हणजे काय ३४०-३४१

द्वैत, भ्रांति होय ४११

द्वैतवाद, अजाण लोकांना सोयीचा वाटतो २११, २१३; त्याची ईश्वरविषयक कल्पना २११; जगांतील नव्वद टक्के लोकांचा धर्म असतो ३६५; त्याने जगावर बराच काळ अंमल गाजविला आहे ३०४; आणि बौद्धांचें मत यांचा समन्वय ४०८-४०९

द्वैतवादी, त्यांचा ईश्वर हा मानवच असतो २१२; संकुचितपणा त्यांचा अंगभूत दोष आहे २१२–२१३

द्वैतवादी वेदान्ती, त्यांचें अहिंसेविषयी मत ३६९–३७०; आत्मा व त्याची गति यांसंबंधी यांचें मत ४००–४०५; त्यांचा ईश्वरविषयक सिद्धान्त ३६४; जीव आणि ईश्वर यांच्या संबंधाविषयी मत ३७०; जीवात्म्यांविषयीचा सिद्धान्त ३६६–३६७; मोक्षविषयक सिद्धान्त ३६७–३६९; विश्वाविषयीचा सिद्धान्त ३६४–

द्वैतवादी वेदान्ती—पुढे चालू

३६५; वेदांचा द्वैतपर अर्थ लावतात २९२; त्यांची शिकवण ईश्वरावर शुद्ध प्रेम ३७०–३७१; त्यांचें सर्व गोष्टींविषयीचें स्पष्टीकरण २३२

'धम्मपद' ५२५

धर्म, त्याचें अध्ययन विशाल दृष्टिकोनांतून झालें पाहिजे १०२; त्याविषयी आजकालची समजूत २४५, आध्यात्मिक स्वरूपाचा हवा ९९; त्यांचा आपसांत मित्रभाव हवा १०४; 'आरामशीर' ३७४; त्याच्या उत्पत्ती विषयी मतें ८९–९२; त्यांच्यांतील ऐक्य व मतभेद १८६–१८७; त्यांची जगाविषयी दृष्टि १८६, २१६; जीवनांत कसा उतरेल १७३; त्यांत तर्कविचाराचें स्थान ५०२; त्यांनी दु:खांवर सुचविलेला तोडगा २१६–२१७; त्याबावतींत दुबळेपणाच्या समजुती ३०३; देह व मन यांसंबंधी त्यांचे मत ११३; आणि धार्मिक उत्सव ३०; त्यांवर नुसता विश्वास ठेवल्याने अवनति होईल २४६; त्यांचा पाया इंद्रियातीत सत्यें ९४–९५; त्याचा पाया सत्यान्वेषणाचा दृढ निश्चय १८५; आणि पंथ ४५४–४५५, ५१८; त्यांत प्रयक्षानुभूतीचें स्थान २४५–२४८; त्याची प्रथम कल्पना स्वप्नांमधून आली ९२–९३; त्याचा प्रारंभ केव्हा होतो १०६, १५०, १६३,१८३ २४७–२४८, २५८; त्यासंबंधीचीं भांडणें २४६; भावनांनी वाहवून जातात २१८; भौतिक आणि आध्यात्मिक संशोधनाशी मेळ बसेल असा २०५; आणि भौतिक विज्ञान यांचा मिलाफ १०४–१०५; मानवशरीरांत कार्य करणाऱ्या शक्तीविषयी त्यांचीं मतें ११५–११६; मानवसमाजांत कार्य करणारी सर्वांत प्रबल शक्ति होय ८९,१०२; मानवाचें गमाविलेलें राज्य

धर्म--पुढे चालू
मिळविण्याचे विविध उपाय सांगतात— २९६–२९७, म्हणजे मायेच्या पलीकडे— जाण्याचा प्रयत्न १५४, १८४; त्याचें लक्ष्य २२६; त्याचा लोप थांबविण्यास अद्वैतवाद पुढे येतो २०८; त्याच्या विरुद्ध करण्यांत येणाऱ्या तर्कटांमध्ये अर्थ नाही २४६; त्याने विशाल झालें पाहिजे १०३–१०४, २१०; त्यावर विश्वास कां ठेवावा २४४; त्याची व्याख्या ४५०; त्याची शक्ति आताच प्रकट होऊं लागली आहे १०४; त्यांतील सत्यें अमूर्त असतात ९५–९६; ते सर्व एकाच सत्याप्रत नतात ४४६; सर्व काळांतील सर्व लोकांच्या उपयोगी पडणारा २०९, २१०; ते सर्व ब्रह्मानुभूतीच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचा उपदेश देतात १४; ते सर्वच 'मानव मूळ दिव्य स्वरूपापासून खाली आला आहे व तो तें परत मिळवील' ही कल्पना मानतात १०९–११०, ११२, २६०, २९३–२९६; ते सर्वच सत्य अहेत ४५४; त्या सर्वांत देहापलीकडील सत्य वस्तूची कल्पना आढळते १०९; त्या सर्वांत मुक्तीची भावना (उपदेश) आहे १५५, १८६–१९०; सर्वांत श्रेष्ठ मानसिक व्यायाम होय १००–१०१; त्याचें क्षेत्र अंतःप्रकृतीला जिंकणें १००
धर्मजीवन, त्यांतील अंतिम अवस्था ५२१
धर्मपाल, श्री ४४३, ४४५
धर्मपंथ (संप्रदाय), सर्वच आवश्यक आहेत ४७४–४७५, ४७६; त्याची संकुचितता १०३–१०४
धर्मप्रचार, त्याचें फल ५, आणि राजकीय उन्नति ६
धर्मप्रवर्तक, त्या सर्वांनी जाणिवेपलीकडील अवस्थेंत आध्यात्मिक सत्यें अनुभवलीं ९३–९४
धर्मवेडे लोक ४७६, ४७७
धर्मान्तर ४५४, ४७४, ४७६
धार्मिक, आणि उपयुक्ततावादी २५७–२५८; खरा कोण २४७
ध्यान, त्याच्या बाह्य अवलंबनांचा गाजावाजा ५३, सविशेष व निर्विशेष ५२–५३; त्याचें स्वरूप ५२
नचिकेता २३७–२३९; २४१–२४२
नागमहाशय ३, ४, ४५, ४८, ७५
नाम-रूप ३५०, ३७६, ४१०; आदि-अंतयुक्त असतात ३८४; म्हणजेच माया ४११; त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही २०२–२०३
नारद १८०–१८१
नियम २७५
निवृत्ति, तिनेच धर्माला सुरुवात होते १६३
निसर्गपूजा ९१–९२
नीति (नीतिशास्त्र, नीतिनियम, नैतिकता), अतींद्रिय प्रत्ययाखेरीज असूंच शकत नाही ९७; तिची अत्युच्च कल्पना २४३; तिचा उदय केव्हा होईल २४८; त्याग (निःस्वार्थता) हाच तिचा आधार होय ९६–९७, २६१; हाच धर्म होय ५०८, ५०९, मानवाच्या संपूर्ण स्वरूपाला लागू पडणारे ९८–९९; म्हणजे मुक्तीच्या वाणीचें अनुसरण १८८; मोक्षाप्रत नेते २१०; तिच्या वाढीस अद्वैताचें साहाय्य ३०६; म्हणजे 'विषयी'चें 'विषया'वर स्वामित्व २०४; समाजाच्या चाबकानेच पाळले जातात २४८; तिचें स्पष्टीकरण कशानें होईल ९७–९८, १२३–१२४, ३८१; ती स्वतःच ध्येय नाही ९८
नेपाळ ५३४
नैयायिक, त्यांची 'शब्दशक्तिप्रकाशिका' ६५
नॉर्वे, तेथील लोकांची स्वर्गाची कल्पना २५०–२५१

परोपकार, उपासना होय ३६०, त्याचें मूळ १२३-१२४
पवहारीबाबा ५१०, ५११, ५१२, ५१३ ५१४, ५१५, ५१६, ५२६-५२७, ५२८-५२९, ५३०, ५३६
पाणिनीचें व्याकरण ४९०
पाप ४१६; त्याची कल्पना निर्बुद्धपणाची आहे ३५९, कां दिसतें १३०; भित्रेच करतात ५०८, ५०९
पापपुण्य, त्या कल्पनेचें मूळ ३७-३८
पारशी, त्यांचें जगांतील द्वंद्वांचें स्पष्टीकरण २७२-२७३
पावित्र्य, जुन्या गोष्टींना आपोआप लाभतें २४०-२४१
पाश्चात्त्य देश, तेथील राजनैतिक विकासाचें वैशिष्टच २८९
पाश्चात्त्य लोक, त्यांची धार्मिक माणसाविषयीची कल्पना २१; रजोगुणाच्या चरम सीमेवर आहेत १६; विरोचनाचें वंशज आहेत ६; आणि हिंदु यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनांतील भेद २८२ २८४-२८५
पाश्चात्त्य सभ्यता, तिचे दुष्परिणाम २१
'पाषंड,' बौद्धांनी वापरलेला शब्द ५२३
पुत्रवात्सल्य, म्हणजे गुलामी १७९-१८०
पुनर्जन्म, केव्हा संपतात ३४०; संस्कारांनुसार होतो ३३९-३४०
पुनर्जन्मवाद, आणि आत्म्याची स्वाधीनता ३४०; आणि आनुवंशिक संक्रमण ३३७-३४०; त्यावरील आक्षेपांना उत्तर ३३०-३३२, तर्कसंगत सिद्धान्त आहे ३३०; नैतिक सुस्थितीसाठी आवश्यक आहे ३३०; त्याविषयी प्रमाणें ३३३-३३६, ४४९-४५०, त्याला लोक घाबरतात ३२९-३३०
पुराणें, त्यांतील कथांमागे अमोल सत्यें असतात १११; त्यांच्या रचनाकालाविषयी इतिहाससंशोधकांचें मत ७६, ७७
पूर्णत्व, अनंत असतें २६०, आत्म्यांतच असतें १२२-१२३, ४७३, जगांत व्यक्त होऊं शकत नाही २६०-२६१,
पूर्णत्व--पुढे चालू
त्याची प्राप्ति अपूर्णतेच्या त्यागानेच होईल ३६२
पूर्ण मानव, क्रमविकासाच्या प्रारंभीं व अंतीं असतो ३१७
पूर्वजन्मांचें स्मरण, कां होत नाही ३३१; होऊं शकतें ३३२; त्यान खरें वैराग्य येईल ३३२
पूर्वजपूजा ९०-९१
प्रकृति, आंतर व बाह्य दोन्ही जिंकावयास हव्यात ९९-१००; तिच्यांत ईश्वरच क्रमसंकुचित झाला होता ३१५-३१६; तिची उत्थानपतनात्मक गति ३१२-३१३; तिचा क्रमविकास आणि आत्म्याचें क्रमप्रकटन १२१-१२२; तिच्यांतच परिवर्तन होतें ४१४, तिच्याशीं मनुष्याचा लढा १५६-१५७, मानवाचें लक्ष्य नाही ९९; ती ब्रह्मस्वरूप केव्हा दिसेल १९२; रहाटपाळणा आहे ३५०; तिच्यावर विजय मिळविण्याचा उपाय २०४-२०५; सान्त आहे २०४, २७५, सूक्ष्म अवस्थेंतून स्थूल अवस्थेंत येते व परत सूक्ष्मावस्थेंत जाते ३०९-३११
प्रगति, म्हणजे वासनांनी वासनांना गुणणें २५९
प्रत्यक्षानुभूति, उपनिषदांची केंद्रभूत कल्पना होय २५६, कठीण आहे २४९; तर्काचा व ज्ञानाचा आधार होय २४४-२४५, धर्माचा आधार होय २४६-२४८; आणि नीति २४८; तिचें फल २४९, आणि वडबड ४२३-४२४; तिच्यावरच विसंबून राहावें २४६, २४८, वेदान्ताचें बीदवाक्य होय २४८; तीच सर्वाचें प्रमाण होय २४५
प्रलय, म्हणजे काय ३१२
प्रल्हाद ६०
प्रवृत्ति आणि निवृत्ति १६३
'प्राण', निरनिराळीं शरीरें घडवितो ३८५; आणि सृष्टिप्रक्रिया ३६३-३६४, ३९५-३९६

प्रार्थना, कोणत्या गोष्टीसाठी कुणाजवळ करावी ३७०-३७१
प्रेम, खरें केव्हा होऊं शकतें ४२६-४२७; त्याचें खरें स्वरूप ४७९; म्हणजे त्याग ४७८
प्रेमानंद, स्वामी ५३२
प्लेटो, त्यांच्या मतें कवितेंतून स्फूर्ति मिळते २०८
बल, अद्वैतवादाने लाभतें ३०५-३०६; खरें कोणतें ३०१; प्रत्येकाच्या कामी पडेल ३०५, भवरोगावरील औषध ३०५; त्याखेरीज सत्याचा लाभ होऊं शकत नाही ३०५
बहिर्मुख आणि अंतर्मुख अन्वेषण २६४-२६५
बहुत्व, वरवरचें आहे २९१-२९२
बागबाजार १०
बाबिलोनवासी, त्यांची आत्म्यासंबंधी कल्पना ९१
बाबूराम--पाहा प्रेमानंद, स्वामी
बायबल, त्यांतील ॲडमच्या कथेचें तात्पर्य २९५; मानवाचा अध:पात झाल्याचा त्यांतील सिद्धान्त २६०; विश्वासाच्या सामर्थ्याविषयी शिकवण २४८
बालविवाह, त्याच्या दोन बाजू ५९, १५१-१५२
बुद्धदेव, ईश्वर होते ५२४; त्यांनी उपनिषदांतील धर्म सर्वांना मोकळा केला ५२२; त्यांना कोणीं धक्का लावला नाही १७१-१७२; त्यांचें चरित्र १३८; त्यांनी त्याग-वैराग्याचा विशेष प्रचार केला ७६; नास्तिक गणले गेले २१४; त्यांनी नैतिक आदर्शांचा प्रसार केला २१४; त्यानी प्रलोभनाला कसें तोंड दिलें १८५, त्यांचा मायावाद ५२३; आणि 'मार' ५३; त्यांनी वेदान्ताच्या नैतिक बाजूवर भर दिला २०७-२०८; त्यांनी वेदान्ताच्या प्रसाराने भारताला जडवादांतून वांचविलें २०६-२०७; त्यांच्या शिकवणुकीने हिंदुधर्माचे अंतर्गत भाव बदलले नाहीत
बुद्धदेव--पुढे चालू
५२३; त्यांच्या हृदयाचा मोठेपणा २०९, ५२२
बुद्धि, तिचें कार्य ३२५; तिच्या पलीकडे जातां येतें ९५; तिच्या मर्यादा १७९; सूक्ष्म शरीरांत असते ३२६; आणि हृदय यांचें संमीलन हवें २०९, २१७-२१८
बेलूर मठ, तेथील पहिला संन्यासविधि ७१-७२
बोस, श्री. बलराम १०, ४२, ४३५, ५०६ ५१०, ५१६, ५३२
बौद्ध, त्यांचा आत्म्याच्या (अपरिवर्तनीय सत्तेच्या) अस्तित्वाविरुद्ध युक्तिवाद २९९-३००, ४०५-४०८; त्यांच्या उपदेशांचें सार २९६, त्यांना कुमारिल भट्टांनी काढून लावलें ५२१-५२२, आणि द्वैतवादी यांचा समन्वय ४०८; त्यांचें निर्वाण म्हणजेच ब्रह्म २९६; त्यांचें मत आधुनिक विचारसंप्रदायांनी दत्तक घेतलें ४०७; त्यांच्या मतें दृश्यमान जगत् स्वत:सिद्ध आहे ४०७; त्यांनी मायावादाला विज्ञानवादाचें रूप दिलें १३३-१३४
बौद्ध धर्म ४६६, अतींद्रिय अवस्थेंतूनच निष्पन्न झाला आहे ९४; त्याचे दोन संप्रदाय ५२२; त्याचा प्रसार रक्ताचा थेंब न सांडतां झाला ४६८, ५२३; त्याचें भारतांतून उच्चाटन कां झालें २२; त्याचा ऱ्हास २०७, त्यांतील सर्व प्रकारच्या समाधि वेदांत आहेत ५२२
बॉनी, श्री. ४४०
बंगाल, तेथे योग कुणाला ठाऊक नाही ५२६; तेथे वेद प्रचलित नाहीत ४९०
बंगाली तरुण १३
ब्रह्म, आणि 'इच्छाशक्ति' १९५; अंतिम सत्य होय १७६, तेंच खरा 'मी' आहे १९८; तें जगत् कसें झालें हा प्रश्न चुकीचा आहे १९६-१९७, त्यांत

ब्रह्म--पुढे चालू
देश-काल-निमित्त नाही १९४; नाम-रूपामुळे बहु भासतें ४१०; त्याच्या निर्गुण स्वरूपाचाच सर्वश्रेष्ठ व्यक्तींनी आश्रय घेतला २१३; त्यामधूनच सर्व-कांही जाणलें जातें १९८, त्याचें सिद्धसकल्पत्व ६४; 'ज्ञात' होऊं शकत नाही १९७
ब्रह्मदृष्टि, तिने दुःखें टळतील २२१; प्रत्यक्ष कृतींत आणण्यांतील अडचण २२७–२२८; म्हणजेच वैराग्य २१९
ब्रह्मदेश, तेथील बौद्ध धर्म ५२२
ब्रह्मलोक २७९, ४०२–४०३, ४०४, ४०५
ब्रह्मज्ञ, तेच लोकगुरु होत २२–२३
ब्रह्मज्ञान, त्याच्या पायऱ्या २७९, ५४; संन्यासाशिवाय होऊं शकत नाही ७३–७४
ब्रह्मानंद, स्वामी ४२
ब्राह्मसमाजी, जग सुखाने भरलेले मानतात ५२३
ब्रिटिश राज्य, त्यांत फकिरांना व गृहस्थांना उपद्रव होत नाही ५२९
भगवत्कृपा, तिचे कांही नियम आहेत काय ४६–४७; ती अखंड वाहत असते ३४१
भगवान (भगवंत) (पाहा ईश्वर), त्याची दृष्टि आपल्यासारखी नसते ३४१, देश-काल-निमित्तांच्या अतीत आहे ४७, तो दंड-पुरस्कार देत नाही ३४१
भट्टाचार्य, श्री. मन्मथनाथ ८४
भट्टाचार्य, श्री. यज्ञेश्वर १०८
भय, द्वैताने उद्भवतें ३५८, म्हणजे मृत्यु ३५; केव्हा लोपेल १२१, ३८०; त्यापासून सुटका हेंच आपलें लक्ष्य होय १९१
भवरोग, त्यावर औषध २७५, ३०५
भविष्य, आत्म्याचें सांगतां येत नाही ३५०; कसें सांगतां येतें ३४९–३५०, ३९२
भारत, तेथे अद्वैताचा प्रसार कां झाला नाही २०६, ३०२, ३०४, त्याला अद्वैतानें दोनदा वांचविलें २०६–२०८; त्याचा अध:पात झाल्याचें प्रमाण ९; त्याच्या अवनतीचें कारण शिक्षणाचा अभाव ५५, त्याला कशाची गरज आहे ४३८–४३९; जडवत् पडून आहे ११; तेथे जुन्या गोष्टींना पावित्र्य येतें २४०–२४१; तेथील दारिद्र्य ४३३; तेथील धर्मपंथ ३६१–३६२, ४६६; तेथील धार्मिक स्वातंत्र्य १७१–१७३, ३६१; त्याने पाश्चात्त्यांशीं देवाणघेवाण करावी ५–६; तेथील प्राचीन सभ्यता २१; तेथे माता पूज्य होत ४८४, तेथील मूळ रहिवासी ४८२; त्यासाठी रचनात्मक कार्य २२; तेथे रजोगुणाची आवश्यकता १६; रूढींनी भरून गेला आहे ३५; तेथे लोकतंत्रात्मक संस्था सध्या नको ४०; तेथील सर्वसाधारण लोकांचा धर्म द्वैती आहे ३६५, ३७१; तेथील संन्यासी ७८–७९, ४८४–४८५
भारतवासी, त्यांना कशाची गरज आहे ४३३–४३४; त्यांचा दीन-हीनपणाचा भाव ११; त्यांचे पूर्वज रजोगुणसंपन्न होते १६; मुलांना सुसरींच्या तोंडांत फेकतात काय ४७०–४७१
भारतीय तत्त्वज्ञान, जगाबाहेर जाण्यास सांगत नाही २८१–२८२; त्याच्या विकासाचें वैशिष्टय २८९–२९०; विश्वासंबंधीच्या प्रश्नाला त्याचें उत्तर ३०९–३२१, त्याचे वैदिक व अवैदिक संप्रदाय ३६२; त्याच्या सर्व सप्रदायांना 'मानवाचें दिव्यत्व' मान्य आहे २९३–२९४
भारतीय धार्मिक विचार, त्यांत अद्वैताचें स्थान ३६१
भारतीय समाज, त्यांतील चालीरीती ४५१, ४६३–४६४; त्याने संमतिबिलाविरूद्ध ओरड केली ५८; त्यांतील स्त्रियांची अवस्था १५२, ४३७;

भारतीय समाज--पुढे चालू
त्यांतील स्त्रियांसंबंधीच्या चालीरीती ४३४, ४३६, ४६२, ४८०-४८२, ४८४-४८५
भाषा, म्हणजे काय १११; बालकाची व तत्त्वज्ञाची १११
भुतेखेतें, त्यांचें भय कां वाटतें ३०३
भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमानकाळ यांचा संबंध १०८
'भूमा' २५२
भेद, नामरूपांमुळे होतो ३७६,४१०;त्याचा लोप झाल्याने मुक्ति लाभेल ३८०
भौतिक विज्ञान, त्याची आवश्यकता ५; आणि धर्म १०५; अपुरें आहे ३९६
भौतिक ज्ञान, आत्मज्ञानावांचून धोक्याचें आहे १२६
भ्रम, भ्रमावरच आधारलेला असतो ३७९
मत्सर, केव्हा लोपेल ३८०
मत्स्यावतार ११०-१११
मथुरबाबू ४६
मधुपर्क ५०१
मन, त्याचें इंद्रियज्ञानाच्या प्रक्रियेंतील स्थान ३२५; म्हणजे जाणिवेचा स्रोत ४०७; आणि देश-काल-निमित्त १३६; त्याच्या नाशाने मुक्ति लाभेल ३८६; त्याच्या पलीकडे कांही आहे काय ३२६-३२७; त्याचा लोप झाल्यानंतरची अवस्था ३९; सतत परिवर्तनशील आहे ११८; सूक्ष्म शरीरांत असतें ३२६; स्वतः ज्ञानाला पुरेसें नाही ३५३; स्वप्रकाश नाही ३२७; स्वभावतः बहिर्मुख आहे ३२२
मनुष्यदेह, त्यांतच मुक्ति लाभते ३८९, ४०३-४०४, ४०५
मनोरंजन, मनाला दुबळें करणारें नको ५०८
'महत्' ३९६-३९७
महाकाली पाठशाळा ५६-५७
महापुरुष, भ्याड नव्हते १७५; विधायक सुधारक होते १७४-१७५; समाधीनंतर परत येतात ६५
'महापुरुषप्रणिधानाद्वा' ५३१
'महावाक्य' १९९
महिम्नस्तोत्र ३३
माणूस ( पाहा मानव ), त्याला आधी वांचवायला हवें ८-९; त्याचा इंद्रियांच्या मर्यादा उल्लंघिण्याचा प्रयत्न ९२; त्याच्या उद्यमांपैकी सर्वात महान् कोणता १०१, कोणाला म्हणावें ९; आणि पशु १६७, १६९-१७०; त्याची पारख त्याच्याच आदर्शानुसार व्हावी १५९; त्याला पावित्र्य 'मिळवायचें' नाही १२३; पूर्णत्वाच्या आदर्शामागे कां लागतो १२२; पैशाने निर्माण होत नाही १२; प्रकृतीचा प्रतिस्पर्धी आहे १५६-१५७; त्याचें मन देश-काल-निमित्ताच्या सीमा ओलांडू शकत नाही १३६; मायेने बद्ध असल्याचें स्वप्न बघतो १९१; त्याला मायेपलीकडील वाणी केव्हा ऐकू येते १८४; त्याच्या मूळस्वरूपापासून अधःपात होण्यासंबंधी धर्म व क्रमविकासवाद यांचें मत १०९-११०, ११२-११३; सच्चिदानंदाचा आभास आहे १२४; त्याला त्याच्या सत्यस्वरूपाची शिकवण द्या १३०; सदा भौतिक जगांत राहू शकत नाही ९९; त्याच्या सुधारणेबरोबर सुखदुःखें दोन्हीं वाढतात १४५-१४६; २७०-२७२; त्याला स्वतःमधे अनंत आनंद असल्याची जाणीव नसते २२६; स्वभावतः द्वैतवादी असतो ३६५; त्याच्या स्वभावाचा दुबळेपणा ३७४-३७५
माताजी--पाहा सारदादेवी
मानव, त्याचे आदर्श इंद्रियातीत स्वरूपाचे असतात ९६; आदिम १६२; इंद्रियांच्या व बुद्धीच्या सीमा ओलांडू शकतो ९५; ईश्वरच आहे ३५९-३६०; ईश्वराचें अवनत रूप होय २६०; उच्च अवस्थेपासून च्युत झाला आहे २६२; त्याचें उद्दिष्ट 'विषयी' ला 'विषया'चे स्वामी बनविणें २०४;

मानव--पुढे चालू
त्यांत कार्य करणाऱ्या शक्तीविषयी मतें ११५–११६; त्याला कार्यप्रवण करणारी सर्वांत मोठी शक्ति धर्म होय १०२; 'कोरी पाटी' घेऊन जन्मास येत नाही ३३४; त्याच्या क्रमविकासाची संपूर्ण परंपरा ३१५–३१७; खऱ्या मानवाचें अस्पष्ट प्रतिबिंब होय ११७; त्याची गति मुक्तीकडे आहे २१०, त्याने गमाविलेलें राज्य परत मिळविण्याचा उपाय २९७, त्याच्यापुढे 'जग खरें आहे काय' हा प्रश्न येणारच १०६–१०७, त्याच्यावर जबाबदारी आल्यास त्याची श्रेष्ठता व्यक्त होते ३०६; त्याचें दिव्यत्व सर्व मतप्रणालींना मान्य आहे २९३–२९४; दुबळा नाही ३५९; दुसऱ्याला दोष देण्याने अधिक दुबळा बनतो ३४२; त्याचा देह आणि आत्मा ११३–११४; पापी नाही ३५९; पूर्ण होता व पुन्हा पूर्ण होईलच २६२, २८६, २९५–२९६; प्रकृतीवर विजय मिळवितो २०४; बद्ध भासतो ११७; त्याला बद्ध समजणें अनिष्टकारक आहे ३००, त्यांच्यांतील भेद स्वरूपभूत नव्हे २५३, ३७७; म्हणजे मनूची संतति १११; त्याला रथाची उपमा २५५–२५६; त्याचें लक्ष्य ९९, ३८३; म्हणजे शरीर, मन व आत्मा ३२८–३२९, ३५३–३५४, ४००; शून्यांतून उत्पन्न झाला नाही ३३०; त्याचें सगुणत्व आणि निर्गुणत्व २९०, २९२; सच्चिदानंदस्वरूप आहे ३०६–३०७, त्याचें सत्य स्वरूप (पाहा आत्मा) ११७, ११९, १२०–१२१, १२९; २७५, ३५८–३६०; त्याचें सत्य स्वरूप कसें प्रकट होईल २७५, त्याने सत्यस्वरूपानुसार जीवन घडवावें ३६०; त्याचा सत्याचा शोध १०८–१०९, त्याची सुखी होण्याची इच्छा १०७–१०८; त्याला संकुचित

मानव--पुढे चालू
सीमेंत ठेवतां येणार नाही २१४–२१५; स्वतःच्या उन्नतीला (दुःखांना, भाग्याला) स्वतःच जबाबदार आहे १३–१४, २७६, ३४०–३४२, ३६६–३६७; त्याला स्वभावतः स्थूल गोष्टी आवडतात १००; स्वरूपतः मुक्त आहे २९७; त्याचा स्वरूपसाक्षात्कार ४१६–४१७; त्याच्या स्वरूपाविषयीच्या अज्ञानांतून स्वार्थीपणा जन्मतो १२५–१२६; त्याने स्वस्वरूपाचें स्मरण करावें ३०३

मानवजीवन, म्हणजे अविराम गति १३८–१३९; त्याचें उद्दिष्ट ७७; अंधारउजेडाचें मिश्रण आहे १६८; त्याची गति १७७; त्यांत होणाऱ्या दोन टोकांच्या चुका २२५; दंतकथा आहे ४१५–४१६; त्याच्या नित्यत्वाविषयी प्रश्न ३२३; साखळींतील एक कडी आहे ३८७

मानवीज्ञान, त्याची द्वंद्वात्मक अवस्था १३७–१३८, १६८; म्हणजे फक्त मायेविषयी सामान्य विधानें १६८

माया ४११; तिने आपण कधीच बांधलों गेलों नाहीं १९१; तिच्याशीं आपल्याला दोन हात करावयाचे आहेत १५६–१५७; एकमेव स्पष्टीकरण होय १५१; म्हणजे अंधारउजेडाचा खेळ १६८; तिच्याबाबतींत 'कां' चें उत्तर देतां येत नाही १४२; ती केव्हा जाणवते १८३; तिचा त्याग करतांच ती लोपते २०३; म्हणजे देश-काल-निमित्त २०१; नामरूपात्मक सर्वकांही तिच्या अंतर्गत आहे १६८–१६९; तिच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न सर्व धर्म करतात १५४–१५५; तिच्या पलीकडे वेदान्ताला काय गवसलें १५७; 'माया ती हीच' अशा रीतीने तिच नित्याच्या प्रत्यक्ष जीवनांत दिग्दर्शन १४०–१४२, १४३, १४६, १७०, १७७–१८२, २७१;

माया--पुढे चालू
म्हणजे 'वाद' नव्हे, वस्तुस्थितीचें वर्णन होय १३४, १४६-१४७, १५८; तिच्यावर विश्वास बसत नाही १८१; त्या शब्दाचे निरनिराळे अर्थ १३२-१३४; समजण्यास फार कठीण आहे १८१; सर्वत्र आहे १५६, १८१; तिच्यांतून सुटण्याचा खरा व फसवा मार्ग १८३-१८५; म्हणजे संसारगतीचें वास्तव वर्णन १४२; तिचें स्वरूप २०३
मायावाद, आणि आशावाद १४३; 'एक बहु कां होतें' याचें सर्वोत्कृष्ट स्पष्टीकरण २९१-२९२; आणि क्रमविकासवाद १४४-१४६; भारतांत सर्वांना मान्य नव्हता २९२; वेदान्ताचा आधारस्तंभ होय १३२; शंकराचार्यांचा,बुद्धांचा व कपिलांचा ५२३
मायावादी आणि इतर तत्त्वज्ञ यांतील भेद २९६
मित्र, श्री. प्रमदादास ४८९, ४९१, ४९२, ४९३, ४९६, ४९८, ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०९, ५१२, ५१३, ५१४, ५१६, ५२०, ५२८, ५३२, ५३५
मित्र, श्री. सुरेंद्रनाथ--पाहा सुरेशबाबू
मित्र, श्री. हरमोहन २८
'मिरर' ४
मिशनरी, त्यांचें भारतांतील कार्य ४३४, ४३६, ४४४-४४६
'मी' ( पाहा व्यक्तित्व ), म्हणजे अनंताचा जगतांत व्यक्त होण्याचा प्रयत्न २६१; खरा ३९, १९८; त्याची जाणीव खोटी आहे ३८; त्याचा नाश झाल्याने अनंत जीवन लाभेल २६३; त्यांतूनच लौकिक दृष्टि उद्भवते ३८; त्याविषयीच्या सर्व संकुचित कल्पना भ्रमात्मक आहेत ३५९; सोडून 'तूं'-कडे जावें लागेल २६१
'मी आणि माझें', आत्म्याचें बंधन आहे १२४; फक्त ईश्वरालाच लावावें
'मी आणि माझें'--पुढे चालू
३६९-३७०; सर्व अशुभाचें मूळ आहे ३६९
मी (स्वामी विवेकानंद) (पाहा स्वामीजी), उपनिषदान्तर्गत धर्मच सर्वत्र सांगितला ३२; एका अर्थाने जडवादी आहें २०६, कशाला आलों आहें १२; माझें कार्य सनातन सत्यें आधुनिक भाषेत सांगणें ३२३-३२४; काळ्या बिंदूवर ध्यान करीत असे ५२-५३; कोण्याहि वड्या धेंडाकडे जाणार नाहीं ५३०; माझें गुरुबंधूंविषयी कर्तव्य ५२०; माझ्या घरची स्थिति ४९४-४९५; माझे चमत्कारांसंबंधी अनुभव ८२-८३, ८४-८५; माझें जीवन एका दैवी पुरुषाच्या स्पर्शाने बदललें ४२९; माझ्या जीवनांत रामकृष्णांच्या दयेचीं चिन्हें ४३; तरुणांच्या साहाय्याने उलटापालट करीन १७; माझें ध्येयवाक्य सर्व ठिकाणांहून चांगल्या गोष्टी गोळा करणें ५२७; मला पाश्चात्यांनी देवतुल्य मानलें ११; मला पाश्चात्त्यपणा पसंत नाही ५१०; माझी प्रकृति ४९३, ४९६, ५१६, ५२७, ५३०; भारतीय तत्त्वज्ञानाची आधुनिक ज्ञानाशीं सांगड घालीन ३०९; माझी मन:स्थिति ४९४-४९५, ५३६; माझ्या मनांत कधी हीन विचार येत नाहीत ११; माझें माताजींजवळ मागणें ५१८, ५३३; माझा मृदु स्वभाव ५२८; रामकृष्णांच्या अवतारत्वाचा प्रचार कां केला नाही २३; माझ्याकडून रामकृष्ण आपलें कार्य करून घेत आहेत ४३; रामकृष्णांच्या जन्मभूमीच्या दर्शनास जात आहें ४९१; माझ्यावर रामकृष्णांचें प्रेम ५३१; रामकृष्ण माझें मार्गदर्शन करतात ४९; लोकांना खुळचट समजुतींपासून वांचविण्यासाठी दहा हजार आयुष्यें खर्च करीन ३०४; माझ्या वैराग्याच्या उपदेशाबद्दल अमेरिकन

मी (स्वामी विवेकानंद)--पुढे चालू लोकांचें मत १५०; 'शरीरं वा पातयामि, मंत्रं वा साधयामि' अशी प्रतिज्ञा केली आहे ५०५; संन्यासी व गृहस्थ यांत भेद करीत नाहीं ४९८; संप्रदायांमधे भर घालण्यासाठी जन्मलों नाहीं ४२; स्वतःची मुक्ति घेऊन काय करूं ७०
मुकर्जी, श्री. ईशानचंद्र ५०९
मुकर्जी, श्री. सतीशचंद्र ५०९, ५१०, ५११, ५१५, ५१८
मुक्तात्मे, त्यांविषयी द्वैतवाद्यांचें मत ३७०
मुक्ति, म्हणजे आत्मसाक्षात्कार ४७२, ४७३; जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति ४१८-४१९; त्यागाखेरीज लाभत नाही ७३-७४; तिच्याविषयी द्वैतवाद्यांची कल्पना ३६७-३६९; तिच्यासाठी 'धडपड' कां करावी ३९०; प्रकृतीपलीकडील 'कुणाच्या'तरी साहाय्याने मिळवावयाची १८६; तिचा प्रत्यक्ष साक्षात्कार हवा १९१-१९२, तिच्या प्राप्तीसाठी सर्वजण धडपडत आहेत १८९; तिचीच भावना सर्व धर्मांतून व्यक्त होते १८९-१९०; तिच्या भावनेशिवाय जीवन शक्य नाही १८७-१८८, त्यानंतर भेद पूर्णपणें लोपतात ४२२; मनाच्या नाशाने लाभेल ३८६; मानवाचें स्वरूपच आहे १९१, २९७-२९८; तिची वाणी प्रत्येकाने ऐकली आहे १८८; तिच्या वाणीचें अनुसरण म्हणजेच नीति १८८; तिच्या वाणीप्रत पोहोचल्याने काय होईल १८८-१८९; सर्वकांही तिच्याकडे जात आहे १८७-१८८; सर्व धर्मांचें लक्ष्य आहे १५४-१५५, १८६-१८७; तिची संधि प्रत्येकाला मिळते ४०३-४०४
मुखोपाध्याय, श्री. प्रियनाथ ३
'मुग्धबोध' व्याकरण ४९०
मुजुमदार, श्री. ४४२
मुंडक उपनिषद् ३७२ टीप, ३७३ टीप
मुसलमान, मानवाची स्वरूपसिद्ध पवित्रता त्यांनाहि मान्य आहे २९५
मूर्तिपूजा ४३७
मूलर, कुमारी १७, १८
मृत्यु, त्यानंतर काय होतें हा प्रश्न १०६-१०७; आणि जीवन एकाच नाण्याच्या दोन बाजू होत ३५५-३५६, जीवनाविषयीचें भयंकर सत्य १३९-१४०; त्याचें भय ३३२, ३३४; म्हणजे विघटन ४०१; त्याला विसरण्याचा प्रयत्न १८२; सगळ्यांनाच आहे १८१-१८२; त्या वेळीं होणारीं परिवर्तनें ४०२
मेंदू, त्याचा शरीराबरोबर नाश होतो ३५४
मॅक्स मूलर ६१-६२, ३६१
म्लेच्छ, अज्ञानामुळे म्हटलें जातें ६२

यमराज २३८
यज्ञ, त्याविषयी समजुती २४१
युधिष्ठिर १४१
युरोप, त्याला जडवादांतून अद्वैतच सोडवूं शकेल २०८; तेथील सामाजिक स्वाधीनता व धार्मिक बंधनें यांचे परिणाम १७३
येशू ख्रिस्त, त्यांनी अधिकारानुसार उपदेश केला २१३-२१४; निर्गुण ब्रह्मभावाने प्रेरित झाले होते २१३; त्यांची वैराग्याची शिकवण १५०; त्यांची स्वर्गराज्याविषयीची शिकवण २२३
योगवासिष्ठ ७४
योगेंद्र (स्वामी योगानंद) ४०, ४२-४३, ५०५
यंत्रें आणि क्रमविकास १४५
रजोगुण, त्याचें महत्त्व १६
रज्जुसर्प ४०९-४१०
राइट, प्रा. जे. एच्. ४३८
राखाल (स्वामी ब्रह्मानंद) ५०३, ५०६
रामकृष्ण ४२९; अजोड आहेत ४६, ५३०; त्यांनी अठरा भावांत सिद्धि प्राप्त केली होती २२; त्यांच्या अवतारत्वाचा प्रचार २३; त्यांच्या अव-

रामकृष्ण--पुढे चालू
तारत्वावर विश्वास ४५; त्यांनी अवतार कशासाठी घेतला २१, २३, ३२; त्यांच्या कृपाकटाक्षाने लाखो विवेकानंद निर्माण होतील ४३; त्यांचा जन्मोत्सव २७-३०, ५१८; त्यांची दया ५३१; त्यांच्या भावांना मर्यादा नाही ४२, ४३; सिद्धींची निंदा करीत ८३-८४; स्वतःच्या पूजेचा प्रचार सांगितला नाही ४२; स्वामीजींबद्दल काय म्हणत ४४; त्यांच्याविषयी स्वामीजींनी रचलेला श्लोक २६
रामकृष्णांची शिकवण, अधिकार भेदाविषयी ३१; 'धर्म हा पंथ उभारण्यांत नाही' ५१८; भगवत्कृपेसंबंधी १३, ४७; तिची भाषा ४११; 'मी मेला की जंजाळ संपला' ३८; सांगितलेल्या गोष्टी उमजून स्वीकारा ६८
रामकृष्ण-मठ, तेथील संस्कृतचें अध्ययन ४९०
रामकृष्ण-मिशन, त्याचा उद्देश व कार्यपद्धति ४१; त्याने विद्यादान व ज्ञानदान करावें ६०; त्याची स्थापना ४०-४३
रामकृष्णांचे शिष्य, त्यांचा आदर्श संप्रदायविहीनता ३१-३२; त्यांचा आलमबाजार येथील मठ २६-२७; त्यांची योग्यता ५१९
रामकृष्णानंद, स्वामी २०, ७६-७७, ५१९
रामप्रसाद ५३०
राष्ट्रें, त्यांचा अभ्युदय आध्यात्मिकतेवर अवलंबून असतो १००; कालान्तराने वेगवेगळीं राहणार नाहीत २८५-२८६
रॉय, श्री. गगनचंद्र ५११, ५२९
'लोकायतिक' तत्त्वज्ञान २०७
'ललित विस्तार' १३८
वासना, त्यांची अनिष्ट शक्ति कशी लोपेल २२६; अपूर्णत्वाचें लक्षण होय ३९३; जडाला व मुक्ताला नसतात ३९३; आणि जन्ममृत्यु ३६९; तृप्त होत नसतात १०८; त्यांचा त्याग केल्याने ब्रह्मदृष्टि येईल २२४; त्यांचा त्याग म्हणजे जड होणें नव्हे २२१-२२२; त्यांच्या त्यागाखेरीज सत्य लाभू शकत नाही २४३-२४४; त्या नष्ट झाल्याने अमरत्व लाभेल ३८२; तिचें भुरळ पाडणारें आगळें रूप २५८-२५९; त्या संपल्यावरच धर्म सुरू होतो २५८
विकास, आणि स्वाधीनता १७२-१७३
विचारांचें साहचर्य ३१९
विदेहमुक्त ४१९
विधवाविवाह, त्याच्या दोन बाजू १४१
विवाहप्रथा, समाजाच्या उन्नत अवस्थेचें लक्षण २७०; त्यामुळे उद्भवणारें सुखदुःख २७०
विवेकचूडामणि ४, ५२५
विशिष्टाद्वैतवाद २९२-२९३, ३७१-३७४;
विश्व (पाहा जग), आत्म्याचें प्रतिबिंब आहे ३७६-३७७; त्याचें इंद्रियें, बुद्धि व चैतन्य यांमधून दिसणारें रूप ३८१-३८२; आणि ईश्वर ३२०-३२१; एकच आहे ३७६, ३७७, ३८१, ४१२; त्यांतील एकता १७६; त्याचें अंतर्बाह्य विश्लेषण ३९४-४००; कल्पांच्या गतीने चालतें ३१३; कारणांत विलीन होणारच ३१३; 'कांही नाहीं'तून उत्पन्न होणें शक्य नाही ३१४; त्याविषयी कुतूहल आणि प्रश्न ३०८-३०९; त्याचें कोडें उकलण्याचा अट्टाहास १७९; त्याचें कोडें कां सुटत नाही १३२-१३३; त्याचें कोडें बाह्य जगाच्या ज्ञानाने सुटणार नाही १३५-१३६; त्याच्या कोडयाचें एकमेव स्पष्टीकरण ३२१; म्हणजे क्रमसंकुचित चित्कळेचा क्रमविकास ३४६-३४७; तेंच पृथ्वी-स्वर्ग-नरक इत्यादींच्या रूपांत दिसतें ४१५; त्यासंबंधीच्या प्रश्नांतच त्याचें उत्तर आहे ३०९, बदलतें व न बदलतें आहे ४०९;

विश्व--पुढे चालू
ब्रह्माचें एक रूप आहे २०३, मुक्तीकडे जाण्याच्या धडपडीचें फळ होय १८८; मोहिनीचें फळ आहे ३७५; त्यांतील शक्ति कमीजास्त होत नाही ३१७; समष्टिदृष्टीने स्थिर आहे ११९; त्याविषयीची सर्वांत प्रगत कल्पना ३१८; त्याची सृष्टिपूर्व विश्रांतीची अवस्था ३१३, स्वतःच्या सूक्ष्मावस्थेंतून प्रसृत होतें ३१४; त्याचें स्वरूप वाळूचा एक कण जाणल्याने कळेल ३१०-३११; त्याच्या स्वरूपाचें अधिकाधिक कांटेकोर वर्णन ३२०-३२१
विश्वबंधुत्व (विश्वैक्य) ३८०-३८१
विश्वास, त्याने होणारी अवनति २४६; त्यामागील तत्त्व २४४; प्रत्यक्षानुभूतीवर आधारलेलाच खरा २४८; त्याने बुद्धीची गळचेपी होऊं नये २०५-२०६
विषयानुभूति--पाहा ज्ञान
विज्ञान, एकत्वाप्रत पोहोचत आहे ३४८; म्हणजे 'कसें' हें जाणून घेणें २८३-२८४; त्याची गति २०९-२१०; त्याच्या तपशीलाने विश्वाचें कोडें सुटणार नाही १३५-१३६; आणि धर्म १७३, २०९; त्याचा पुनर्जन्माविरुद्ध आक्षेप ३३६-३३७, प्राचीन ऋषींच्या सिद्धान्तांकडे वळत आहे ३३६; बिनबुडाचें आहे २८४
विज्ञानवादी, आणि वास्तववादी २४५
वृंदावन ४८९
वेद, त्यांच्या अध्ययनाचा अधिकार शूद्रांना आहे काय ४९६-४९७, त्यांच्या आधारें सृष्टि निर्माण झाली ६२-६४, त्यांत आध्यात्मिक तत्त्वांचा क्रमविकास दिसतो २८८-२८९; ईश्वराची वाङ्मयी मूर्ति होत ३६३; त्यांच्या ऋषींचा धीटपणा २५४-२५५; त्यांत ॐकाराचा महिमा सांगितला आहे २५२, त्यांतील कथांचा अर्थ कळणें दुरापास्त आहे

वेद--पुढे चालू
२८९; आणि जगत्कारणाचा शोध २६४-२६५; त्यांतील देवदेवता अजरामर नाहीत २६६-२६७; त्यांतील नीतीची अत्युच्च कल्पना २४३, त्यांचें प्रामाण्य ५००; त्यांचें मूळ स्वरूप जसेंच्या तसें आहे २८८; त्यांतील विश्वरचनेसंबंधीचा प्रश्न ३०८; त्यांतील शब्दांचा अर्थ बदलत नाही ४६६-४६७; त्यांतील सत्यें ऋषींनी प्रत्यक्ष पाहिलीं ९४; त्यांची स्फूर्तिदायी घोषणा १८६; त्यांतील स्वर्गलोकाची कल्पना २३९, २६५; त्यांविषयी हिंदूंची श्रद्धा २५५
वेदान्त (-तत्त्वज्ञान,-दर्शन,-धर्म), अद्वैत तत्त्वाचें पसायदान देतो ३०३; त्याचा अधिकार पाश्चात्त्यांना आहे काय ९-१०; 'अनंत सान्त होण्याचा प्रयत्न करीत आहे' याविषयी त्याचें मत १४९-१५०; त्यानुसार आत्मा नित्य मुक्त आहे ३००; आनंदलाभाविषयी त्याचा उपदेश २५१-२५२ २८१, आशावादी वा निराशावादी नाही १४७, १५३, २७१-२७२, २७६; त्यांतील ईश्वरविषयक कल्पना १९१, २१५, ३०१; एकत्व हा त्याचा महत्त्वाचा विषय आहे २३०, ३९४; त्याला एकेश्वरवाद अपुरा वाटतो १९०-१९१; त्याचें अंतिम साध्य १९१-१९२; त्याचा कर्माविषयी उपदेश २२४-२२६; कर्मफलाची जबाबदारी आपल्यावर टाकतो २७६; काय सिद्ध करतो २२०-२२१; त्याचें कार्य अनेकांत एकत्व शोधणें २७२; त्याचें कार्य ईश्वरविषयक कल्पनांचा समन्वय करणें १६०; त्याचें चांगल्या-वाइटाविषयी मत २५३-२५४, २७५; डोळ्यांत धूळ टाकीत नाही २७३-२७४; त्याच्या तिन्ही अवस्था आवश्यक आहेत ३८२; त्याच्या तिन्ही शाखांचें एकमत असलेले मुद्दे ३६२-

वेदान्त--पुढे चालू
३६४; त्याने दाखविलेला मार्ग ३०७; दु:खाच्या समस्येचा तर्कसंगत उलगडा करतो २१९; दोष आपल्यावर टाकतो २७३; द्वंद्वांतून बाहेर पडण्याचा उपाय सांगतो १६७, २७३; धाडसी धर्म आहे १७०; त्याच्या पायऱ्या १५७; पाश्चिमात्यांनी शिकावा ५; त्याचें प्रमुख तत्त्व 'मानवाचें दिव्य स्वरूप' २९५; त्याचें ब्रीदवाक्य धर्माचा प्रत्यक्ष अनुभव २४८-२४९; त्याच्या मतें ज्ञान व पवित्रता आत्म्यांतच आहेत २५३; मनुष्याला सर्वश्रेष्ठ मानतो ४०५; त्यांतील महावाक्य १९९, त्यांतील मायेचें स्वरूप १३४; त्याला मायेच्या पलीकडे कांही गवसलें आहे १५७; मृत्युसमयीं होणाऱ्या परिवर्तनांविषयी त्याचें मत ४०२; त्याच्या विकासाचा मार्ग रोधण्यास पुरोहितवर्ग नव्हता १७०-१७१; त्याला विशिष्टाद्वैतापासून सुरुवात होते ३७१; विश्वधर्म आहे ५; व्यक्तित्वनाशाच्या भीतीला हसतो १४८; सगुण ईश्वर ही त्याची केवळ सुरुवात आहे १५७, सत्य आपल्यांत असल्याचें सिद्ध करतो २२३, सर्व धर्मांतील एकत्व दाखवितो १८६-१८७; त्याचें सार 'जगाचा त्याग' ३९०; त्याच्या ज्ञानाने दुराग्रह कमी होईल १५२-१५३
वेदान्ती, विशेषत: अद्वैत्यांना म्हणतात ३६२
वैदिक दर्शनकार, त्यांचें वैशिष्टच १३४-१३५
वैद्यनाथ ५०६-५०७, ५११
वैराग्य, उपनिषदांचा प्राण आहे ७५; म्हणजे काय १५०, २१९, २६१; धर्माचा प्रारंभ होय १५०; बुद्धदेवांनंतर त्याचा विशेष प्रचार झाला ७६; त्याला भय नाही ५४; लोक त्याला हसतात १५०, ५१०
वैज्ञानिक, त्यांना अद्वैत वेदान्त रुचतो २०५-२०६; त्याचा उदोउदो १७७; १७८; त्यांचा अंधविश्वास ११२
व्यक्तित्व, कशांत आहे ११९-१२१; त्याचा नाश म्हणजेच नीति ९७, १२४; त्याच्या नाशाची भीति १४८
'व्यवहारचातुर्य' १८३-१८५
व्यवहार्यता, आध्यात्मिक व वैज्ञानिक २८५-२८६
व्याकुळता, तिची आवश्यकता १५
व्यावहारिक सत्ता ३८
शक्ति, तिच्या चिरंतनत्वाचा नियम ३१७; जागी कशी होईल ११, १२
'शब्द' ६३-६५, ३१९, ५१७
शरणागति ४८
शरीर--पाहा देह
शांति, कशी लाभेल २७८, २८५; कुणाला लाभते ३८०, ४९५
शिवानंद, स्वामी ७५, ४९२
शिष्य--पाहा चक्रवर्ती श्री. शरच्चंद्र
शिक्षण, त्याचा प्रसार १२, ५५, त्याचें महत्त्व ६०; आणि समाजसुधारणा ५९-६०; स्त्रियांचें ५६, ५७, ६०
शील, श्री. गोपाललाल ९, १०, १८
शुद्धानंद, स्वामी ३७
शून्यवादी, कुणीच होऊं शकत नाही १०८
शोपेनहॉर, त्याची चूक १९४-१९५
शंकराचार्य ४, ३९; त्यांनी तर्कबुद्धीच्या ज्ञोताने धर्म उजळून टाकला २०९; त्यांचें निर्वाणषट्क ३०७ टीप; त्यांना प्रच्छन्न बौद्ध म्हणतात ५००; आणि बुद्धदेव ५२४; त्यांच्या मतें कर्मकांड व ज्ञानकांड यांत पौर्वापर्य नाही ४९७; त्यांचा मायावाद सर्वांत्त उदात्त आहे ५२३; त्यांनी वेदान्ताला तर्कबुद्धीवर प्रतिष्ठित केलें २०७-२०८; त्यांची शिकवण--जगाचें ज्ञान प्राप्त करून त्याच्या पलीकडे जा ५२३-५२४
श्रद्धा, नचिकेत्याप्रमाणे हवी ३५
श्रेय आणि प्रेय २४३
श्वेताश्वतर उपनिषद १३३, १५६, ३२१

सत्-चित्-आनंद, आत्म्याचें स्वरूप आहे ३२८
सतीची प्रथा ४३४, ४३६, ४७१, ४७५, ४८३
सत्कर्म, प्रकृतीचा पडदा फाडतें १२३; त्यांची शक्ति ३४२
सत्य, अध्ययनाने मिळणार नाही २५५; त्यासाठी असत्याचा त्याग करावा लागेल २५२; अज्ञानामुळे हरवलेलें वाटतें २२३; आचरणांत आणण्याचें धाडस १२७-१२८; आपल्या आंतच विद्यमान आहे २८२; कृतींत उतरवावयास हवें १३; कोणाची मिरास नाही ३०३-३०४; कोणाला लाभतें २५५; त्रिकालाबाधित असतें ३०३; फायदा ही त्याची कसोटी नाही १२५; बाह्य जगांतून त्याच्याकडे पोहोचण्याचा प्रयत्न २३३, वासनांच्या त्यागाखेरीज लाभत नाही २४३-२४४; समाजाहून श्रेष्ठ आहे १२६-१२७; तें सांगणारा व ऐकणारा सुयोग्य हवेत २४४; त्याच्या साक्षात्काराचे परिणाम २५२, ३८०, ४२५-४२९
सत्ययुग, त्याच्या कल्पनेवरून काय सिद्ध होतें १०९-११०
सदानंद, स्वामी ६९, ५१९
सभ्यता, कशाला म्हणतात २०-२१
समन्वय, आध्यात्मिक व वैज्ञानिक क्षेत्रांतील व्यवहार्यतेचा २८५-२८६; क्रमविकासवाद आणि पुराणें यांचा ११२-११३; द्वैतवादी व बौद्ध यांचा ४०८-४०९; धर्म व भौतिक विज्ञान यांचा १०४-१०५, भारतीय व पाश्चात्त्य सभ्यतांचा २१, सत्ता, ज्ञान आणि आनंद यांचा २१५
समाज, त्याचा आधार उपयुक्ततावाद की आध्यात्मिक सत्यें ९८-९९; त्याच्या उच्चतेची कसोटी १२७; एक अवस्था आहे ९८; त्याचा प्रारंभ १६४, सत्याहून श्रेष्ठ नाही १२६, संयमाच्या
समाज----पुढे चालू
भावनेवर उभा आहे १६४
समाजसुधारणा, त्यांच्यांतील द्वंद्व १४१-१४२, १५१-१५२; त्यासाठी फक्त शिक्षण द्यावें ५९-६०
समाजसुधारक, विध्वंसक आणि विधायक १७४-१७५
समाधि, तींत प्रवेश करतांना व तींतून परत येतांना होणारी अनुभूति ६५; 'भाव' आणि 'निर्विकल्प' २२
सर्वधर्मपरिषद ४३९-४४०, ४४३-४४७
'सहानुभूति', म्हणजे काय १२४
साधक, त्याने फोल तर्क करूं नये २४४
साधना, तिचा उद्देश ३८; आणि शरणागति ४८
साम्यावस्था, तिच्याप्रत परत जाण्याची धडपड ३८९-३९०
सायणाचार्य ६१-६२
सारदादेवी ५१८, ५३३
सारदानंद, स्वामी ५२८
साहाय्य, आंतूनच लाभतें ३७८
साक्षात्काराची अवस्था, सर्वच धर्मांमधे तिचा उल्लेख आहे ९३
सिद्धि, थोड्याशा मन:संयमाने लाभतात ८२; रामकृष्ण त्यांची निंदा करीत ८३-८४
सिलोन, तेथील बौद्धधर्म ५२२
सुख, अधिकाधिक उच्च प्रकारचें २५७-२५८; आत्म्यांतच असतें १२५, २७९; इंद्रियांमधे नसतें १२५; त्यासाठी इंद्रियांमागे लागण्याची प्रतिक्रिया १०७-१०८; जगांत नाही १७८; तत्वज्ञान तें सोडून देण्यास सांगत नाही २५०, त्यांच्या त्यागानेच खरा आनंद मिळेल २५२; दु:खरहित असूं शकत नाही १४८, २४९; त्याविषयी प्रत्येकाची कल्पना वेगवेगळी असते २४९-२५०; ब्रह्मानंदाचेंच विकृत रूप होय २५१; त्यांच्या मागे लागण्यांतील अनिष्ट २५०; मायेच्या अंतर्गत आहे १५१; मिळविण्याचा उपाय १४९;

सुख--पुढे चालू
त्याचें रूप बदलत असतें २४९
सुखदुःख, एकाच वस्तूचीं दोन रूपें २६७-२६८; बरोबरीने वाढतात १४५-१४६, २७०-२७२
सुबोध (स्वामी सुबोधानंद) ५०६
सुरेशबाबू ५३२
'सूत्तनिपात' ५२४
सूक्ष्मशरीर ३२६
सृजन, म्हणजे काय ४०१
सृष्टि, अनादि आहे ४६७; तिच्याविषयी अणुवाद्यांची कल्पना ३७०-३७१; 'कांही नाहीं'तून उत्पन्न झाली नाही ३१५, ३७१; चैतन्यच तिचें कारण होय ३१८; तिच्याविषयी द्वैतवाद्यांची कल्पना ३७०-३७१; वेदाधारें विकसित झाली ६२-६४
सृष्टि-स्थिति-प्रलय ३६३, ३९५-३९६
सेन, श्री. नरेंद्रनाथ ४
सेवा, तिने बंधन तुटतें ७०
सेवाश्रम, त्याविषयी स्वामीजींची कल्पना ६९
सैतान ३०३, ३६६
सॉलोमनचीं पदें ४७९
संदेहवादी, त्यांना अद्वैतवादच वांचवू शकेल २०८
संन्यास, त्याची अधिवासक्रिया ७१-७२; त्याचे चार प्रकार ७४-७५; हाच परम पुरुषार्थ होय ७७; ब्रह्मज्ञानासाठी आवश्यक ७३-७४; त्यासाठी योग्य काल कोणता ७४; त्याचा वास्तविक हेतु ७३;
संन्यासाश्रम, त्याचा गौरव ७९
संन्यासी, कसा असावा ७९; त्याचें जीवितध्येय ७९-८०; आणि देशाची उन्नति ७८-७९; त्याचा धर्म ५३५
संमिश्र पदार्थ ३५१-३५२, ३५५
संसार, म्हणजे जन्ममरणाचें चक्र ३९०; त्याच्या वटवृक्षाचें मूळ आत्माच आहे २७८२७९; वासनेच्या गुलामीचें चिन्ह होय ७३-७४; -सागर तरण्याचा मार्ग
संसार--पुढे चालू
४; त्यांतील स्पष्ट दोष ५३३
संस्कार, आत्मसाक्षात्कारांतील अडथळे २५६; म्हणजे काय ४०२; त्यांनीच चारित्र्य बनतें ३८४; त्यांनीच पुढील जन्म ठरतो ३३९-३४०, ४०२; मनांत असतात ३३८-३३९; त्यांनीच मृत्यूनंतरची गति मिळते ३८५; त्यांचें संक्रमण ३३७-३३८
संहिता १५८
स्त्री, भारतांतील व पाश्चात्त्य देशांतील ५८; स्त्रीशिक्षण ५५-५७, ६०
स्पेन्सर ५०४
स्मृति, आणि अस्तित्व ३३१; म्हणजे काय ४०२
स्वप्न, त्यांतून अमरत्वाची प्रथम कल्पना आली ९२-९३;
स्वमतान्धता, कशी कमी होईल १५२-१५३
स्वयंपाक, मन शुद्ध असल्याशिवाय साधत नाही ५१
स्वर्ग, त्याचा ऋषींनी अधिक्षेप केला २८१-२८२; देश-कालांनी मर्यादित आहे २६७; तेथे नवीन कर्म घडत नाही ४०४-४०५; नित्य नाही २६७; माणसानेच रचले आहेत ४१५; त्यांत मानवाची उन्नति होणें अशक्य २५०; त्याच्या वासनेचा त्याग करावा २७९
स्वर्गवाद, त्यांतील चूक २४०
स्वर्गाची कल्पना, आर्यांची २६५; पोरकट आहे २६६; प्रत्येकाची निरनिराळी असते २५०-२५१; समाधानकारक नाही २३९; संहितेंतील २३९; तिचें स्वरूप २५१; स्वाभाविक असूनहि चुकीची आहे २४९
स्वाधीन काय आहे ४२१
स्वाधीनता, तिच्या कल्पनेचा विकास १५५-१५६; तिचें ढोंग ४२०, ४२२; आणि बंधन यांचें मिश्रण १७९; विकासासाठी आवश्यक आहे १७२-१७३

73064

स्वामीजी (स्वामी विवेकानंद) (पाहा मी), अमेरिकेंत कां गेले ४३४, ४४७; त्यांच्याविषयी गिरीशबाबूंचा विश्वास २८-२९; त्यांवर गुरुबंधूंचें प्रेम २०; त्यांच्या जीवनाचें, व्यक्तिमत्त्वाचें व वक्तृत्वाचें अमेरिकेंतील वार्ताहरांनी केलेलें वर्णन ४३५, ४३८, ४३९, ४४०, ४४२, ४४४, ४४५, ४४७-४४८, ४४९, ४५२-४५३, ४५५-४५६, ४५८, ४६०-४६१, ४६३, ४६९-४७०; देशाची स्थिति ऐकून कळवळतात ६७; त्यांचे पाश्चात्त्य शिष्य ९-१०; पंडितांशीं त्यांचा संस्कृतांत वाद १८-२०; त्यांनी प्रमदादास मित्रांना विचारलेले प्रश्न ४९६-४९७, ४९९-५०२; त्यांना भारतांत करावयाचें कार्य ४३५, ४३७; त्यांच्या योगदृष्टीचें प्रत्यंतर १८; त्यांच्याबद्दल रामकृष्ण काय म्हणत ४४; रामकृष्णांची नवगोपालबाबूंच्या घरीं स्थापना करतात २३-२६, त्यांनी रामकृष्णांविषयी रचलेला श्लोक २६; कोणत्याहि विषयाचा श्रोत्यांच्या मनावर खोल ठसा उमटवीत ६६; त्यांच्यासाठी शिष्य स्वयंपाक करतो ५०-५१; शिष्याला मंत्रदीक्षा देतात ३४-३७; त्यांची सर्वधर्मपरिषदेंतील लोकप्रियता ४४२, त्यांचें सर्वधर्मपरिषदेसमोरील भाषण अत्यंत व्यापक होतें ४४२; त्यांचें सारेंच अद्‌भुत आहे १७; संन्यासी होण्यास प्रोत्साहन देत ७०-७१; स्वतःच्या स्वरूपाची जाणीव झाल्यास देहांत राहणार नाहीत ४९

'स्वाराज्यसिद्धि' २९६

स्वार्थीपणा, अज्ञानांतून जन्मतो १२५

स्वीडनबर्ग ४७३

हिंदु, जगांतून बाहेर पडण्याला ध्येय मानतात ३६७; त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन पाश्चात्त्यांहून वेगळा आहे २८२, २८४-२८५; त्यांची धार्मिक सहिष्णुता ४६७-४६८, पाश्चात्त्यां-

हिंदु--पुढे चालू

इतकेच व्यवहार्य आहेत २८२, २८४-२८५; त्यांची वेदांसंबंधी श्रद्धा ३५५; त्यांची सत्ययुगांची कल्पना १०९-११०; सैतान मानीत नाहीत ३६६

हिंदुजाति आणि युरोपीय जाति यांचें संमीलन २०९-२१०

हिंदु धर्म, त्यांतील उत्सवांचें महत्त्व ३०; आणि ख्रिस्ती धर्म यांच्या उपदेशपद्धतींतील भेद ४६५; चमत्कारांवर आधारलेला नाही ४६८-४६९; त्याने बौद्धधर्मांतील त्यागाचा आदर्श आत्मसात् केला ७६, त्याचीं मूलभूत तत्त्वें ४५३, ४५८ ४६०

हिंदु पुराणें, त्यांतील 'कल्पां'चा सिद्धान्त ११२-११३; त्यांतील जलप्रलयाची कथा ११०-१११

हिंदु मन, तपशिलांत रमत नाही ३९४

हिंदुस्थान--पाहा भारत

हिब्रू, चर्मपटाला पवित्र मानतात २४०

क्षय-वृद्धि, कोणाला लागू आहे ३२६-३२७

ज्ञान, त्यासाठी अचल आधार हवा ३९९; अनुभवाच्याच मार्गाने होतें ३३४, ३४४; आत्मा आणि शरीर-मन यांचा संबंध तोडतें ४१८; इंद्रियज्ञानाची संपूर्ण प्रक्रिया ३२४-३२५, ३९७-३९८; त्याचें कार्य एका वर्तुळांतच १३७-१३८; जडाचा धर्म नाही ३२६; म्हणजे नवीन अनुभवाला सजातीय संस्कारांशीं संबद्ध करणें ३३३; पूर्वानुभवांच्या साठ्याशिवाय होऊं शकत नाही ३३४; प्रत्यक्षानुभूतीवरच आधारलेलें असतें २४५; त्याच्या प्रसाराच्या दोन बाजू १४१-१४२, त्या बाबतींत माणसामाणसांतील भेद ३३३; त्याच्या लाभाचा एकमेव मार्ग ३८०; म्हणजे 'विषयीकरण' १९७, १९९; त्यासाठी शरीर व मन पुरेसें नाही ३५३

ज्ञानयोग, त्याचें लक्षण इंद्रियसंयम २८०-२८१

REFBK-0013075